Dr. BABASAHEB AMBEDKAR WRITINGS AND SPEECHES

Vol. 20

डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे

खंड २०

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता

१९२९ ते १९५६

डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र-साधने प्रकाशन समिती,
उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग,
महाराष्ट्र शासन
२००५

डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे
इंग्रजीतील १७ प्रकाशित खंड

खंड-१
भारतातील जाती आणि इतर ११ निबंध
(आवृत्ती संपली)

खंड-२
मुंबई विधीमंडळामध्ये डॉ. आंबेडकर
(आवृत्ती संपली)

खंड-३
हिंदुत्वाचे तत्त्वज्ञान
(आवृत्ती संपली)

खंड-४
हिंदूधर्मातील कूटप्रश्न
रुपये ३५/-

खंड-५
अस्पृश्य आणि अस्पृश्यता
(आवृत्ती संपली)

खंड-६
रुपयाचा प्रश्न
(आवृत्ती संपली)

खंड-७
शूद्र पूर्वी कोण होते ?
(आवृत्ती संपली)

खंड-८
पाकिस्तान
(आवृत्ती संपली)

खंड-९
गांधी आणि काँग्रेस यांनी अस्पृश्यांचे काय केले ?
(आवृत्ती संपली)

खंड-१०
मजूर मंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर
(आवृत्ती संपली) .

खंड-११
बुध्द् आणि त्यांचा धम्म
रुपये ७०/-

खंड-१२
अप्रकाशित साहित्य
रुपये ९५/-

खंड-१३
भारतीय राज्यघटनेचे प्रमुख शिल्पकार,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
(आवृत्ती संपली)

Dr. BABASAHEB AMBEDKAR WRITINGS AND SPEECHES

VOL. 20

डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे

खंड २०

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता

१९२९-१९५६

वाय ६४१ - १

Digitized by the Internet Archive
in 2017 with funding from
Public.Resource.Org

https://archive.org/details/mkbook2700mkga

'' या राजकारणापासून समाजकारणाकडे वळतांना सहारा वाळवंट सोडून एकाद्या हिरवळींत प्रवेश केल्याचा भास होतो. हल्लीचें राजकारण हा शुद्ध पोरखेळ होऊन बसला आहे. सामाजिक चळवळीची परिस्थिती निराशाजनक असली तरी इतकी निराशाजनक नाही. उपमा द्यायची असल्यास असें म्हणता येईल कीं राजकीय चळवळ अजीर्ण होऊन मरत आहे तर सामाजिक चळवळ, मरत असली तर, भुकेमुळें मरत आहे. वास्तविक ती मरत नाही. तिला मारण्याचें अनेक प्रयत्न झाले व आजही होत आहेत. टिळक-चिपळुणकरांपासून तो परवां काशीला जमलेल्या ब्राह्मणांपर्यंत या प्रयत्नांची परंपरा येऊन पोंचते. टिळक-चिपळुणकरांनी सामाजिक सुधारणेची चळवळ मारण्यासाठीं कसेकसे प्रयत्न केले ते महाराष्ट्राच्या इतिहासात नमूद आहे. त्यांच्या घंटाबडव्यांनी हिंदुसंघटनाच्या नांवाखालीं सामाजिक अंतःशुद्धीच्या चळवळीला गुदमरण्याची कसकशी कारस्थानें चालवलीं आहेत तें सर्वांना माहित आहे. काशीच्या ब्राह्मणसंमेलनानें समाजसुधारणेच्या मुळावरच कुऱ्हाड कशी घातली हेही सर्वांना विदीत्त झालें आहे. हे प्रयत्न निराळ्या वेळीं, निराळ्या स्थळीं व निराळ्या लोकांकडून झाले. पण सुधारणेची हिंसा हें त्यांचें एकच ध्येय आहे. पण सुधारणेची चळवळ या सर्व प्रयत्नांना पुरुन उरली आहे. तिच्या सैन्यांत, तिच्या विरोधकांच्या अपेक्षेबाहेर रिक्रुटभरती होत आहे. समाजसुधारणेशिवाय राजकीय चळवळीचीही धडगत नाहीं हे आतां सर्वांना पटूं लागलें आहे. ''

सत्यमेव जयते

Dr. BABASAHEB AMBEDKAR WRITINGS AND SPEECHES
VOL. 20

डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे
खंड २०

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता
१९२९-१९५६

संपादक :

हरी नरके

म. ल. कासारे

एन. जी. कांबळे

अशोक गोडघाटे

डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती,
महाराष्ट्र शासन,
शासकीय कुटीर क्र. १८, मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०२१

Dr.Babasaheb Ambedkar Writings and Speeches
Vol.20 (Dr. Babasaheb Ambedkar Yanchi
Patrakarita) Marathi Book, Edited by Hari Narke,
and others for Dr.Babasaheb Ambedkar Source
Material Publication Committee,
Govt. of Maharashtra, Barrack No.18.
Opp.Mantralaya, Mumbai 400 021. INDIA.

The object of the present publication is to compile
Dr. Babasaheb Ambedkar's Writings on a variety
of topics. The State Government has brought together
these writings in the form of present publication.

प्रस्तुत प्रकाशनाचा हेतू डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विविध
विषयांवरील लेखन एकत्रित करुन प्रकाशित करणे हा आहे.
महाराष्ट्र शासनाने हे साहित्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन
आणि भाषणे या मालिकेद्वारे प्रसिध्द् केले आहे.

All rights reserved. No part of this publication may be
Reproduced, stored in a retrieval system, or transmitted,
In any form or by any means, without the prior permission
In writing of Dr.Babasaheb Ambedkar Source Material
Publication Committee or as expressly permitted by law,
Or under terms agreed with the appropriate reprographics
Rights organization. Enquiries concerning reproduction
Outside the scope of the above should be sent to the
Dr.Babasaheb Ambedkar Source Material
Publication Committee, at the address above.
You must not circulate this book in any other binding or cover
And you must impose this same condition on any acquirer

हया प्रकाशनाचे सर्व अधिकार सुरक्षित ठेवण्यात आले आहेत.
यातील कोणताही भाग अंशत: वा पूर्णत: पुनर्प्रकाशित करण्यापूर्वी
वा त्याचा इतर फॉर्ममध्ये (इलेक्ट्रॉनिक, दृकश्राव्य इ.)वापर करण्यापूर्वी
प्रकाशकांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

प्रथमावृत्ती - : २००५

प्रती : ३०,०००

© **प्रकाशक :**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र-सांधने प्रकाशन समिती.
महाराष्ट्र शासन, शासकीय कुटीर क्र.१८, मंत्रालयासमोर,मुंबई - ४०० ०२१.
करिता
प्रधान सचिव,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई - ४०० ०३२.

मुद्रक :-
शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, कोल्हापूर
मूल्य :- रुपये २००/-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र–साधने प्रकाशन समिती

(१)	मा. ना. दिलीप वळसे-पाटील . . . . . . *(मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण, उर्जा)*	अध्यक्ष
(२)	श्री. सुरेश शेट्टी . . . . . . *(मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण, पर्यटन व विशेष सहाय्य)*	सदस्य
(३)	मा. रा. सु. गवई *(खासदार)*	सदस्य
(४)	मा. रामदास आठवले *(खासदार)*	सदस्य
(५)	मा. प्रकाश आंबेडकर *(माजी खासदार)*	सदस्य
(६)	प्रा. जोगेंद्र कवाडे *(आमदार)*	सदस्य
(७)	मा. टी. एम. कांबळे *(माजी आमदार)*	सदस्य
(८)	मा. लक्ष्मण माने *(माजी आमदार)*	सदस्य
(९)	प्रा. एन. डी. पाटील	सदस्य
(१०)	डॉ. जनार्दन वाघमारे	सदस्य
(११)	प्रा. केशव मेश्राम	सदस्य
(१२)	डॉ. यशवंत मनोहर	सदस्य
(१३)	डॉ. गंगाधर पानतावणे	सदस्य
(१४)	डॉ. एम. एल. कासारे	सदस्य
(१५)	मा. एन. जी. कांबळे	सदस्य
(१६)	प्रा. अशोक गोडघाटे	सदस्य
(१७)	संचालक, *शासन मुद्रण, लेखन सामग्री व प्रकाशने.* . .	सदस्य
(१८)	डॉ. जॉयस् शंकरन् . . . . . . प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण.	सदस्य
(१९)	डॉ. एस. एन. पठाण, ... संचालक, *उच्च शिक्षण.*	निमंत्रक
(२०)	श्री. हरी नरके	सदस्य-सचिव

प्रस्तावना

महाराष्ट्र शासनाचे प्रकाशन क्षेत्रातील जे उपक्रम आहेत त्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे समग्र साहित्य प्रकाशित करण्याची योजना सर्वाधिक लोकप्रिय योजना ठरलेली आहे. आजवर पाच लाखांहून अधिक वाचकांनी रांगा लावून हे ग्रंथ खरेदी केलेले आहेत. जगातल्या शंभराहून अधिक देशातून या ग्रंथांना मागणी असते. आपल्या देशाच्या कानाकोप-यातून या ग्रंथांसाठी नागरिक विचारणा करीत असतात. त्यामुळे हा ग्रंथ प्रकल्प महाराष्ट्राला सर्वाधिक नावलौकिक मिळवून देणारा महत्त्वपूर्ण प्रकल्प ठरलेला आहे.

१५ मार्च १९७६ला सुरु झालेला हा ग्रंथ प्रकल्प वाढत वाढत २१ खंडांपर्यंत जाणार असा अंदाज होता. परंतु सुधारित अंदाजानुसार आता तो दुपटीने मोठा होणार असून या मालिकेचे ४२ खंड प्रकाशित करण्याचा आराखडा शासनाने मान्य केला आहे. आजवर १८ खंड प्रकाशित झालेल्या या योजनेतील खंड १९ व २० आज प्रकाशित होत आहेत. हे दोन्ही ग्रंथ डॉ.आंबेडकरांनी विविध वर्तमानपत्रातून १९२० ते १९५६ या काळात केलेल्या लेखनाचे खंड आहेत. काही खाजगी प्रकाशकांनी डॉ.आंबेडकरांच्या वृत्तपत्रिय लेखनाचे सुटे सुटे काही ग्रंथ यापूर्वी प्रकाशित केलेले असले तरी समग्र पत्रकार डॉ.आंबेडकर या दोन खंडांनी प्रथमच वाचकांना उपलब्ध होत आहेत. यातील काही भाग 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे बहिष्कृत भारत आणि मूकनायक' या आम्ही प्रकाशित केलेल्या ग्रंथात आला होता. परंतु त्याची २५००० प्रतींची आवृत्ती आता संपलेली असून मूलतः तो 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि अस्पृश्यांची चळवळ यांच्या अभ्यासाची साधने ' या मालिकेतला ग्रंथ होता. 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे ' या मुख्य मालिकेत हे साहित्य प्रथमच प्रकाशित होत आहे. आम्ही आजवर प्रकाशित केलेल्या १८ खंडांपैकी खंड १ व ४च्या दुस-या आवृत्त्या काढाव्या लागल्या. पहिल्या खंडांची दुसरी आवृत्तीही आता संपली आहे. अठरापैकी खंड १, २, ३, ५, ६, ७,८,१०,१३,१४,१५,१६ या बारा खंडांच्या आवृत्त्या आज संपलेल्या आहेत. संदर्भ साहित्याच्या प्रकाशित झालेल्या दोन्ही खंडांच्या प्रतीही संपलेल्या आहेत. हा महाराष्ट्रातल्या प्रकाशन विश्वातला चमत्कारच मानावा लागेल. आपल्या महाराष्ट्रात सर्वसाधारणपणे एखाद्या ग्रंथांच्या १ ते ३ हजार प्रतींची आवृत्ती काढण्याची

प्रथा आहे. डॉ.आंबेडकरांच्या ग्रंथांची आमची आवृत्ती १५ ते ३० हजार प्रतींची असते. सर्वश्री,डॉ.बी.जी.कुंटे, म.भि.चिटणीस, पी.टी.बोराळे, एस्.एस्.रेगे, भालचंद्र फडके आणि वसंत मून यांच्या परिश्रमातून प्रारंभीचे खंड प्रकाशित झाले. त्यांना अन्य अभ्यासकांचेही सहाय्य लाभले. वसंतराव मून यांच्या निधनानंतर त्यांच्या संशोधकीय बैठकीत तयार झालेले हरी नरके या तरुण अभ्यासकांवर ही जबाबदारी सोपवण्यात आली. त्यांनी समर्पित वृत्तीने हया फुले आंबेडकरी साहित्य प्रकल्पासाठी स्वतःला वाहून घेतले. परिणामी गेल्या ३ वर्षात खंड १७ व १८ चे सहा भाग आणि आता खंड १९ व २० वाचकांना उपलब्ध होत आहेत. खासदार रा.सु.गवई आणि आमदार प्रा.जोगेंद्र कवाडे या ग्रंथ प्रकल्पाचा वारंवार पाठपुरावा करीत असतात. समितीचे अध्यक्ष, सर्व मान्यवर सदस्य आणि संपादक यांच्या मेहनतीमुळे हे खंड वाचकांना उपलब्ध होत आहेत. वाचक याही ग्रंथाचे प्रचंड स्वागत करतील असा मला विश्वास वाटतो.

विलासराव देशमुख
मुख्यमंत्री

मनोगत

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे एक महान राष्ट्रीय नेते होते. त्यांच्या महापरिनिर्वाणाला २० वर्षे झाली असताना त्यांचे समग्र साहित्य प्रकाशित करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने १९७६ साली डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीची स्थापना केली. डॉ.आंबेडकरांचे वारस (पत्नी डॉ.सविता आंबेडकर आणि पुत्र श्री.यशवंत आंबेडकर) यांच्याकडून साहित्य प्रकाशनाचे अधिकार घेऊन १९७९ साली डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड-१ प्रकाशित केला गेला. आजवर या २९ वर्षात समितीने बाबासाहेबांच्या साहित्याचे १८ खंड आणि संदर्भ साहित्याचे २ खंड प्रकाशित केले. चौदावा खंड २ भागात होता तर खंड सतरा आणि अठरा प्रत्येकी ३ भागांचे होते. अशाप्रकारे एकुण २५ ग्रंथ प्रकाशित झाले. या सर्वच ग्रंथांवर वाचकांच्या उडया पडल्या. एवढी तुफान लोकप्रियता शासकीय प्रकाशनांना क्वचितच मिळत असते.

नागपूरला खंड अठराच्या प्रकाशन समारंभाला मी उपस्थित होतो. त्यावेळी कार्यक्रमाच्या हॉलवर पहाटेपासून लोकांनी रांगा लावलेल्या मी बघितल्या. विक्रीला ठेवलेल्या सगळया प्रती हातोहात संपल्या. असे दृश्य मी प्रथमच पाहात होतो. वसंत मून यांच्या निधनानंतर हे काम थांबू नये यासाठी आम्ही महात्मा फुले साहित्याच्या आणि संशोधनाच्या क्षेत्रात नावाजलेले तरुण विद्वान हरी नरके यांच्याकडे बाबासाहेबांच्या साहित्याचे काम सोपवले. त्यांनीही टेल्कोसारख्या नामवंत कंपनीतील आपली मोठया अधिकार पदाची नोकरी सोडून या कामाला पूर्ण वेळ वाहून घेतले. फुले-आंबेडकर प्रकाशन समित्यांना शासनाने आजवर हंगामी स्वरुप दिले असल्याने दरवर्षी समित्यांना मुदतवाढ द्यावी लागते. या किचकट प्रक्रियेत जाणारा वेळ आणि होणारी दमछाक यांच्यामुळे संशोधन-प्रकाशन कार्याला खीळ बसते. हे सारे सतत चालणारे काम आहे. त्यामुळे डॉ.आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीचे हंगामी स्वरुप संपवून ती कायमस्वरुपी करण्यात यावी ही मागणी करुन तिचा पाठपुरावा श्री.हरी नरके यांनी केला. त्याला यश आले असून शासनाने आता डॉ.आंबेडकर आणि महात्मा फुले यांच्या साहित्याचे प्रकाशन करणा-या दोन्ही समित्यांचे कायमस्वरुपी फौंडेशनमध्ये रुपांतर करण्याचे ठरवले आहे. गेले दोन वर्षे अनेक कारणांनी प्रलंबित राहिलेल्या या मुद्दयाला आम्ही आता गती दिली आहे.

' फुले-शाहू-आंबेडकर ' ही विचारधारा महाराष्ट्रात शिरोधार्य मानली जाते. राजर्षी शाहूंचे विचार, भाषणे, पत्रव्यवहार, शासनादेश यांचे प्रकाशन करण्याचा श्री.हरी नरके यांनी दिलेला प्रस्ताव आम्ही स्विकारला असून त्याचेही काम लवकरच सुरु होईल. भारत सरकारने डॉ.आंबेडकरांच्या साहित्याचे विविध भारतीय भाषांमध्ये भाषांतर करुन ते ग्रंथरुपाने प्रकाशित करण्यासाठी डॉ.आंबेडकर फौंडेशनची १९९१ मध्ये स्थापना केली आहे. या फौंडेशनला महाराष्ट्र शासनाने हिंदी, बंगाली, तेलगू, कन्नड आदी भारतीय भाषांतील कामांसाठी सहकार्य केले आहे. मराठी अनुवादाच्या कामासाठी फौंडेशनने महाराष्ट्र शासनाला अनुदान देऊ केले असून त्यासाठी ग्रंथ समिती कायमस्वरुपी असण्याची गरज आहे. या समितीला स्वायत्तता दिल्यास ती स्वयंपूर्ण आणि गतिमान होऊ शकेल हे लक्षात घेऊन आम्ही त्यादृष्टीने पावले टाकीत आहोत. मराठी अनुवादाला खूप मागणी असूनही समितीकडील अत्यल्प मनुष्यबळ व समितीचे हंगामी स्वरुप यासारख्या असंख्य अडचणींमुळे हे काम खूपच मागे राहिले आहे याची आम्हाला जाणिव आहे. समितीकडे एकही संशोधन सहाय्यक, संपादन सहाय्यक वा मुद्रित शोधक नसल्यामुळे या सा-याच कामांचा बोजा सदस्य सचिवांवर पडतो. पुढील खंडांची छपाई, अनुवादांचे कार्य व समितीचे अन्य नियोजित प्रकल्प या सा-यांमध्ये सध्यातरी छपाईच्या अवस्थेत असलेल्या अनुवादांच्या खंडांना अग्रक्रम देण्याचा समितीचा निर्णय आहे. समिती कायमस्वरुपी आणि स्वायत्त झाल्यानंतर बरीच कामे बाहेरुन करुन घेण्याचाही पर्याय उपलब्ध असेल व त्यामुळे प्रलंबित कामांना गती देता येईल.

६ डिसेंबर २००६ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणाला ५० वर्षे पूर्ण होत आहे. त्याआधी अधिकाधिक मराठीतील अनुवाद खंड प्रकाशित करण्याचा आमचा सर्वतोपरी प्रयत्न राहील.

मराठीतील खंड १८ला वाचकांचे अलोट प्रेम मिळाले. तसेच या एकोणीस व वीस खंडांना मिळेल असा मला विश्वास वाटतो.

दिलिप वळसे-पाटील

मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण,वैद्यकीय
शिक्षण, आणि उर्जा, तथा अध्यक्ष
डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने
प्रकाशन समिती.

खंड वीसच्या निमित्ताने

प्रिय वाचक,

सप्रेम जयभीम!

डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीच्या स्थापनेला नुकतीच २९ वर्षे पूर्ण झाली. या काळात समितीने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या साहित्याचे एकुण २५ ग्रंथ प्रकाशित केले. त्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे मालिकेतील १८ खंड आणि संदर्भ साहित्य मालिकेतील दोन खंड यांचा समावेश आहे. चौदावा खंड दोन भागात, तर सतरावा व अठरावा खंड प्रत्येकी ३ भागात होता. अशाप्रकारे प्रकाशित झालेल्या उपरोक्त २५ ग्रंथातील २१ इंग्रजी भाषेत तर ४ मराठी भाषेत होते. या सर्व ग्रंथांचे वाचकांनी प्रचंड स्वागत केले. देशाच्या कानाकोप-यातून आणि जगातल्या सुमारे १०० देशांतून या ग्रंथांना मागणी आली. येत आहे. आजवर १४ ग्रंथांच्या आवृत्त्या संपलेल्या आहेत. पहिल्या खंडाची तर दुसरीही आवृत्ती संपली असून चौथ्या खंडाची दुसरी आवृत्ती संपत आली आहे. भारतीय ग्रंथविश्वामध्ये ग्रंथाची आवृत्ती काढताना सामान्यपणे १००० ते ३००० प्रतींची आवृत्ती काढली जाते. संदर्भ साहित्याच्या खंड एकची (मूकनायक व बहिष्कृत भारत) आवृत्ती २५००० प्रतींची होती आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या भाषणांच्या खंडाच्या (खंड १८) तिन्ही भागांच्या प्रत्येकी तीस हजार प्रती आपण छापल्या होत्या. खंड १९ व २० मध्ये प्रत्येकी तीस हजार प्रती आपण वाचकांना उपलब्ध करुन देत आहोत. या सा-या तपशिलावरुन आपल्या लक्षात येईल की आजही डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे बेस्ट सेलर आहेत. समितीने छापलेल्या पाच लाखांवर प्रतींची आजवर आपण विक्री केलेली आहे. हा वैचारिक ग्रंथांच्या विक्री विश्वातला अखिल भारतीय पातळीवरचा राष्ट्रीय उच्चांक होय.

या शासकीय प्रकल्पाद्वारे वाचकांना रास्त किंमतीत ग्रंथ उपलब्ध होत असले तरी हा तोटयात चालणारा उपक्रम नाही. यातून प्रचंड नफा मिळवण्याचा महाराष्ट्र शासनाचा हेतू नसला तरीही आजवर सुमारे एक कोटींहून अधिक रुपयांचा नफा महाराष्ट्र शासनाला यातून झालेला आहे हे नमूद केले पाहिजे. असे उपक्रम म्हणजे शासनावरचा बोजा, तोटयात चालणारी योजना अशी सर्वसाधारणपणे सार्वत्रिक समजूत असते.

महाराष्ट्र शासनाला यातून मिळालेले श्रेय आणि या ग्रंथांमुळे झालेले सामाजिक प्रबोधन यांचे मूल्य हजारो कोटी रुपयांपेक्षा अधिक असल्याचे प्रतिपादन सतराव्या खंडाच्या प्रकाशन समारंभात तत्कालीन उपमुख्यमंत्री आयु.छगन भुजबळ यांनी केले होते. हे चिरकाल चालणारे काम असल्याने या समितीला कायमस्वरुपी मुदतवाढ देण्याची घोषणा याच समारंभात तत्कालीन मुख्यमंत्री आयु.सुशिलकुमार शिंदे यांनी केली होती.

समारंभानंतर पंधरवडयातच समितीच्या सर्व अडचणी सोडवण्यासाठी आयु. भुजबळ यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक घेण्यात आली होती. बैठकीला अर्थमंत्री, उच्च शिक्षण मंत्री, मुख्य सचिव, वित्त सचिव असे सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते. समितीला कायमस्वरुपी मुदतवाढ देण्यासाठी मंत्रीमंडळापुढे प्रस्ताव आणावा लागेल, तो एक आठवडयात आणू असे आश्वासन तत्कालीन उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या प्रधान सचिव श्रीमती चंद्रा अय्यंगार यांनी बैठकीत दिले होते. या घटनेला आता शंभर आठवडे उलटून गेले आहेत. अद्यापही हा प्रस्ताव मंत्रीमंडळापुढे आलेला नाही.

डॉ.बाबासाहेबांच्या साहित्याचे एकुण १४ खंड होतील असा समितीचा १९९० पर्यंत अंदाज होता. त्यानंतर मिळत गेलेल्या साहित्यामुळे ही खंड संख्या वाढून २१ पर्यंत जाणार असे दिसू लागले. हे २१ खंडांचे काम पूर्ण केल्यानंतर सदर समितीला मुदतवाढ देण्याची आवश्यकता राहणार नाही असा शासनाचा विचार असावा. दरम्यान समितीचे काम हाती घेतल्यानंतर आम्ही ही खंड संख्या २१ ऐवजी ४२ पर्यंत वाढणार असल्याचे सप्रमाण दाखवून दिले. याशिवाय यातील सर्व इंग्रजी खंडांचे मराठीत भाषांतर करणे व मराठी खंडांचे इंग्रजीत भाषांतर करणे गरजेचे असून त्याचे ४२ खंड होतील. या समग्र साहित्याचे विषयवार संपादन करुन अभ्यासकांना ते उपलब्ध करुन देण्याची गरज आहे.

सध्या मजकूर हाताशी आला, तसा खंडामध्ये समाविष्ट करण्यात आला आहे. त्यामुळे एकाच खंडात बाबासाहेबांचे विविध विषयांवरील विचार एकत्र दिले गेले आहेत. उदा.जातीव्यवस्था निर्मुलन, शिक्षण, स्त्रीपुरुष समता, आर्थिक विचार, धर्म विषयक विचार अशा विविध विषयांवरील साहित्य एकत्र झालेले आहे. त्याची विषयवार आणि कालानुक्रमे विभागणी करुन त्याचे प्रकाशन करणे आवश्यक

आहे. एकाच विषयावर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दोन किंवा अधिक ठिकाणी मतप्रदर्शन केले असेल आणि त्यात भिन्नता असेल तर त्यातील कोणते मत प्रमाण मानायचे असा अभ्यासकांना प्रश्न पडू शकतो. अशावेळी खुद्द डॉ.बाबासाहेबांनीच याबाबतचा निकष देऊन ठेवला आहे. त्यांनी आपल्या थॉटस ऑन लिंग्वीस्टीक स्टेटस् (भाषावार राज्यांविषयी विचार) या १९५५च्या ग्रंथाच्या प्रस्तावनेत म्हटले आहे की, "जबाबदार माणसाला पुनर्विचार करण्याचे आणि आपले विचार बदलण्याचे धैर्य असले पाहिजे. अर्थात शिकलेले न शिकलो आहोत असे त्याच्या होण्यामागे चांगली आणि पुरेशी कारणे असणे मात्र जरुर आहेत. विचारात कधी अंतिमत: नसणे शक्य असावे." याच प्रस्तावनेत त्यांनी आपले कोणत्याही विषयावरील दोन किंवा अधिक ठिकाणच्या प्रतिपादनातील कालानुक्रमे नंतरचे असेल ते मत प्रमाण मानावे असे स्पष्ट केले आहे. त्यासाठी बाबासाहेबांच्या समग्र साहित्याची कालानुक्रमे मांडणी करणेही आवश्यक ठरते.

डॉ.बाबासाहेबांच्या सहका-यांचे डॉ.आंबेडकरविषयक लेखन, आठवणी, चळवळीचे दस्तावेज आणि समकालिनांच्या नोंदी असे मुबलक साहित्य उपलब्ध आहे. बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतरही गेल्या ५० वर्षात खूप लिहिले गेले आहे. लिहिले जात आहे. या सर्व साहित्याची सविस्तर वर्णन सूची असणारा डॉ.आंबेडकर महाकोष सिद्ध करण्याचा आमचा मनोदय आहे. दरम्यानच्या काळात डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंडाच्या नव्या आवृत्त्यांचेही काम चालू ठेवावे लागणारच. या सा-यांसाठी ही समिती कायमस्वरुपी असण्याची नितांत आवश्यकता आहे. वास्तविक पाहता पहिल्या २४ वर्षात या बाबींकडे कसे लक्ष गेले नाही, याचेच नवल वाटते. समितीला दरवेळी १ वर्षाची मुदत दिली जाते. ती संपण्यापूर्वी मुदतवाढीचा प्रस्ताव सादर करावा लागतो. या प्रस्तावाच्या मान्यतेसाठी करावयाच्या प्रशासकीय बाबींमुळे मुदत संपल्यानंतर आठ दहा महिन्यांनी नविन मुदतवाढ मिळते. तोवर जेमतेम दोन चार महिने शिल्लक राहिलेले असतात. समितीच्या कार्यालयातील कर्मचा-यांच्या मुदतवाढीसाठी तर वर्षातून चार वेळा प्रस्ताव सादर करावे लागतात. कागदी घोडे नाचवण्याच्या या कामात संशोधन, प्रकाशन, अनुवाद यासारख्या सर्वाधिक महत्त्वाच्या कामांचा वेळ वाया जातो.

महाराष्ट्र शासनाच्या सुमारे पाच संस्था ग्रंथप्रकाशनाचे काम करतात. (१) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ (२) मराठी विश्वकोष निर्मिती मंडळ (३) गॅझिटिअर (दर्शनिका) विभाग (४) राज्य मराठी विकास संस्था (५) डॉ.आंबेडकर आणि महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन समिती, यातल्या पहिल्या चार संस्था कायमस्वरुपी आहेत. त्यांना मुदतवाढीचे सव्यापसव्य करावे लागत नाही. यातल्या राज्य मराठी विकास संस्था व साहित्य संस्कृती मंडळाला शासनाने स्वायत्तताही दिलेली आहे. उपरोक्त चारही संस्थांना दरवर्षी दिला जाणारा निधी प्रत्येकी रुपये पन्नास लाख ते पाच कोटींपर्यंत असतो. फुले-आंबेडकर समित्यांच्या वाटयाला वर्षाला प्रत्येकी रु.पाच लाखही येत नाहीत. डॉ.आंबेडकर समितीकडे २ लिपिक आणि १ सेवक आणि म.फुले समितीकडे १ लिपिक आणि १ सेवक एवढा कर्मचारी वर्ग आहे. उपरोक्त ४ संस्थांकडे प्रत्येकी २५ ते १०० एवढा कर्मचारी वर्ग आहे. फुले-आंबेडकर समित्यांकडे एकही मुद्रितशोधक, संशोधन सहाय्यक, संपादन सहाय्यक नाही. समितीच्या कामाबद्दल अनेकांना कुतुहल असते. अनेकजण पत्राद्वारे, दूरध्वनीवरुन अथवा प्रत्यक्ष भेटीत याबाबत वारंवार विचारणा करीत असतात. त्यामुळे वाचकांना विश्वासात घेऊन थोडे हितगुज करण्यासाठी उपरोक्त स्थिती त्यांच्यापुढे मांडणे भाग पडले आहे. यात कोणाविरुध्द् तक्रार करण्याचा हेतू नाही. लोकसत्ता, लोकमत, सकाळ, सम्राट, वृत्तमानस, दि टाइम्स ऑफ इंडीया आदी वृत्तपत्रांमधून या दूरावस्थेबाबत अनेकवार टिका झाली आहे. विधिमंडळात आमदार प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी अनेकवार याबाबत चर्चा घडवून आणली आहे. समितीच्या प्रत्येक बैठकीत यावर उहापोह झालेला आहे. गेली तीनचार वर्षे आम्ही स्वत: ही परिस्थिती बदलण्यासाठी सर्व स्तरांवरुन आटोकाट प्रयत्न केलेले आहेत. त्यातून छोटेछोटे अनेक प्रश्न मार्गी लागले आहेत.

समितीच्या कार्यालयाची अवस्था अतिशय वाईट होती. तत्कालीन उच्च शिक्षणमंत्री आयु.लक्ष्मण ढोबळे यांनी यापेक्षा खेडयातील खताच्या दुकानाची अवस्था अधिक चांगली असते अशा शब्दात खेद व्यक्त केला होता. सार्वजनिक बांधकाम मंत्री ना.छगन भुजबळ यांच्या सहाय्यामुळे त्यात आता थोडीफार सुधारणा करता आली आहे. आयु.भुजबळ यांनी स्वतःच्या आमदार निधीतून समिती

कार्यालयाला तीन संगणक संच पुरवले. समितीचे ज्येष्ठ सदस्य आणि खासदार दादासाहेब तथा रा.सु.गवई यांनीही आपल्या खासदारनिधीतून एक संगणक संच देण्याची घोषणा केली आहे.

उच्चशिक्षण मंत्री हे समितीचे पदसिध्द् अध्यक्ष असतात. गेल्या दोन वर्षात आम्हाला पाच अध्यक्ष लाभले. प्रा.लक्ष्मण ढोबळे, प्रा.जयदत्त क्षीरसागर, आयु.मनोहर नाईक, आयु.सुरेश जैन आणि दिलिप वळसे पाटील यांचे अध्यक्षतेखाली समितीने काही अडचणी सोडविण्यात यश मिळवले. समितीला मुदतवाढ देतांना पूर्वी " यापुढे मुदतवाढ मिळणार नाही, तीन महिन्यात उरलेले सर्व काम आटोपावे " असे शासनादेश निघत असत. समितीचा जाहीर गौरव करणा-या मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्यापुढे सतराव्या खंडाच्या प्रकाशन समारंभात आम्ही " समितीचा कुपोषणामुळे मृत्यू ओढवण्याची भिती " जाहीरपणे व्यक्त केली होती. आयु.सुशिलकुमार शिंदे यांनी समिती कायमस्वरुपी करावी असे लेखी आदेश देऊन दोन वर्षे होत आली आहेत. शासन निर्णय प्रतिक्षाधीन आहे. कालवश वसंत मून यांनी आयुष्यभर समितीचे काम केले. ते वारले तेव्हा त्यांना दोन वर्षांचा पगार मिळालेला नव्हता. आम्ही टेल्कोतील नोकरी सोडून या कामासाठी पूर्णवेळ द्यायला लागल्यानंतर आम्हाला पहिले वेतन मिळाले ते २७ महिन्यानंतर आणि दुसरे त्यानंतर एक वर्षाने ! समितीकडून जनतेच्या फार अपेक्षा आहेत याची आम्हाला जाणीव आहे. मराठी अनुवाद लवकरात लवकर प्रकाशित व्हावेत असा तगादा लोकांकडून वारंवार येत असतो. त्यांना हया अडचणींची काहीही कल्पना नसते. महाराष्ट्र शासनाने माहितीच्या अधिकाराचा कायदा पास केला आहे. फुले आंबेडकरी जनतेला आमची ही सद्यःस्थिती माहित करुन घेण्याचा अधिकार आहे अशी आमची नम्र धारणा आहे. त्यामुळे गैरसमज होण्याचे तरी टळेल.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी वर्षात भारत सरकारने तत्कालीन पंतप्रधान व्ही.पी.सिंग यांच्या पुढाकाराने दिल्लीत डॉ.आंबेडकर फौंडेशनची स्थापना केली. दरवर्षी या फौंडेशनला रु.२०० कोटींचा निधी दिला जातो. त्यांनी आपल्याकडून हिंदी, बंगाली, तेलगू, गुजराथी अशा प्रमुख भारतीय भाषातील अनुवादाचे काम मागून घेतले आहे. आजवर १३ भाषांतील अनुवादाचे खंड प्रकाशित झाले आहेत. मराठीचे काम आपणच चांगले करु शकू या हेतूने आपण हे काम

त्यांना दिले नाही. आपण जाणकारांकडे हे काम सोपवले. त्यातल्या वसंत मून, प्र.श्री.नेरुरकर, आ.ना.पेडणेकर या अनुवादकांचे काम पूर्ण केल्यानंतर निधन झाले आहे. गौतम शिंदे, विजय कवीमंडन, प्रा.विनोद नंद, डि.वाय.हाडेकर, डॉ.आर.के.क्षीरसागर यांनी त्यांच्याकडील अनुवादाचे काम पूर्ण करुन आमच्याकडे सुपूर्द केले आहे. हे अनुवाद तज्ञांकडून तपासून घेतले असून त्यांची छपाई लवकरात लवकर करण्याचा आमचा प्रयत्न आहे. अत्यल्प मनुष्यबळ आणि उपरोक्त अडचणी यामुळे हे काम धीम्या गतीने चालू आहे. उर्वरित खंडांच्या अनुवादकांचे कामही लवकर पूर्ण व्हावे यासाठी आम्ही पाठपुरावा करीत आहोत. दरम्यान आवृत्त्या संपलेल्या ग्रंथांच्या प्रतींना खूप मागणी आहे. त्यांच्या नव्या आवृत्त्या काढण्याचेही नियोजन आम्ही केले आहे. दुसऱ्या खंडाची दुसरी आवृत्ती लवकरच उपलब्ध होईल.

१९ व्या खंडात बाबासाहेबांच्या ८७ लेखांचा समावेश असून त्यातील समकालीन संदर्भ कळण्यासाठी आवश्यक ती ४७ परिशिष्टे सोबत दिली आहेत.

२० व्या खंडात बाबासाहेबांचे ११७ लेख असून सोबत २६ परिशिष्टे दिलेली आहेत. बाबासाहेबांचे समग्र मराठी साहित्य वाचण्याकरिता अभ्यासकांनी खंड १८, १९ व २० एकत्रित वाचायला हवेत. अठराव्या खंडात आम्ही बाबासाहेबांची भाषणे छापतांना मूकनायक, बहिष्कृत भारत, जनता व प्रबुध्द् भारत यामधील त्यांची भाषणे घेतली होती. त्यांची पुनरुक्ती टाळण्यासाठी या १९ व २० खंडांमध्ये या भाषणंचा समावेश केलेला नाही.

मराठी अनुवाद आम्ही लवकरात लवकर प्रकाशित करावेत यासाठी दिल्लीच्या डॉ.आंबेडकर फौंडेशनचे प्रमुख आयु.किशोर बाबू यांनी आमच्याकडे आग्रह धरला. बहुजन समाज पक्षाचे नेते प्रा.सुरेश माने यांनी या कामी पाठपुरावा केला. संपादक आणि पत्रकार मित्र आयु.कुमार केतकर (लोकसत्ता), आयु.अरुण खोरे (सकाळ), आयु.उत्तम कांबळे (सकाळ), आयु.बबन कांबळे (सम्राट), आयु.बाबा गाडे (महानायक), विजय चोरमारे, बंधुराज लोणे, स. सो. खंडाळकर, यदु जोशी, विद्याधर दाते या सर्वांनी समितीबद्दल लेखन करून समितीच्या कामांना गती दिली.

दुबई येथील डॉ.आंबेडकर इंटरनॅशनल मिशनने एप्रिल २००४ मध्ये आम्हाला डॉ.आंबेडकर जयंती समारंभाचे प्रमुख व्याख्याते म्हणून निमंत्रित करुन मध्यपूर्वेतील आखाती देशांमध्ये आमची व्याख्याने आयोजित केली होती. दुबई , आबूधाबी, शारजा, अलयेन, कुवेत,' कतार, मस्कत आदी ठिकाणचे हजारो लोक या व्याख्यानांना उपस्थित होते. डॉ.आंबेडकरांच्या विविध पैलूवरील भाषणांच्या सी.डी.काढून त्यांचा अनेक देशांमध्ये प्रसार करण्यात आला. डॉ.आंबेडकर विचारांचा प्रचार-प्रसार करण्यासाठी तळमळीने प्रेरित होऊन कार्यक्रम आयोजित करणारे आयु.डॉ.वसंत म्हस्के, आयु.रत्नाकर दंडवते, प्रा.काशीकृष्णा, आयु.संदीप कर्डक, आयु.महेंद्र रोकडे, आयु.मनिष गेडाम, आयु.धीरज गोंडाणे, आयु.सोपान शिवभक्त, आयु.मारुती खारगे आणि त्यांच्या सर्व सहका-यांचा ऋणनिर्देश केला पाहिजे.

बामसेफ हे आंबेडकरी विचारांच्या प्रचार प्रसारामध्ये अग्रेसर असलेले संघटन आहे. त्यांचे राष्ट्रीय अध्यक्ष, आयु.वामन मेश्राम, बी.डी.बोरकर, मुंबईचे डॉ. विनायक काळे आदींचे या कामाकडे बारकाईने लक्ष असते. मुंबई फ्रेंड सर्कल, बहुजन साहित्य संस्कृती कला अकादमी आणि भवतु सब्ब मंगलम् या तीन कृतिशिल युवक गटांचे डॉ. हर्षदीप कांबळे, डॉ.राहुल गजभिये, आयु.सचिन शेंडे, आयु.जयंत रामटेके, डॉ.अनूप ताकसांडे, डॉ.अमोल सूर्यवंशी, डॉ.राहुल पाटील, आयु.शुद्धोधन आहेर, अनिल पवार, सुनिल खोब्रागडे, शांतू डोळस, जितेंद्र निकाळजे, आयु.माणिक भोंगडे, धोंडिराम लोखंडे,मुलुंड, एच.आर.गवई,नेरुळ व त्यांचे कुटुंबिय यांच्याविषयीची कृतज्ञता शब्दात व्यक्त करणे कठीण आहे.

समितीचे कार्यालय मुंबईत आणि आमचे घर पुण्यात असल्याने तसेच व्याख्याने, शोधदौरे यांच्यासाठीही सतत फिरावे लागत असल्याने घरच्यांना कमी वेळ देता येतो. त्यात भर म्हणजे वर्षानुवर्षे वेतन न मिळणे यामुळे होणारा त्रास कूरकूर न करता सोसणाऱ्या कुटुंबियांबद्दलची (पत्नी संगिता, मुलगी प्रमिती, आई सोनाबाई) कृतज्ञता कोणत्या शब्दात व्यक्त करणार ?

जयसिंगपूर येथील बुद्धविहार हा दक्षिण भारतातील बौध्द् चळवळीचे महत्त्वपूर्ण केंद्र होय. कालवश भू.आ.कांबळे आणि जयसिंगपूरच्या उपासकांच्यासमवेत आम्ही आदरणीय भदंत उपगुप्त महास्थवीर यांच्या नेतृत्वाखाली १ महिन्याची संपूर्ण बौद्ध धम्मयात्रा केली. आयुष्यभर पुरणारी उर्जा या अभ्यासातून व अनुभवातून आम्हाला मिळाली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना दीक्षा देणा-या संघामध्ये समाविष्ट असलेले

भदंत जी.प्रज्ञानंद यांच्या भेटीत त्यांनी डॉ.आंबेडकर लेखन आणि भाषणे मालिकेची आस्थेवाईकपणे चौकशी केली. पूज्य भंतेजींनी समितीच्या कार्यालयाला भेट दिली व समितीच्या कार्याची प्रशंसा केली. महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनचे आयु.एस्.पी.कांबळे, जे.जे.हॉस्पिटलचे नेत्रशल्य विशारद डॉ.तात्याबा लहाने आणि सुगावा प्रकाशनाचे प्रा.विलास वाघ यांचे अमोल मार्गदर्शन समितीच्या कामांना बळ देणारे ठरते.

समितीच्या कामांसाठी पुढील मान्यवरांनी आम्हाला लक्षणीय मदत केलेली आहे. सर्वश्री,ना.विलासराव देशमुख (मुख्यमंत्री), ना.सुशिलकुमार शिंदे (माजी मुख्यमंत्री व राज्यपाल,आंध्रप्रदेश), ना.आर.आर.पाटील (उपमुख्यमंत्री), ना.छगन भुजबळ (माजी उपमुख्यमंत्री व विद्यमान सार्वजनिक बांधकाम मंत्री), समितीचे पदसिध्द् अध्यक्ष आणि उच्च व तंत्र शिक्षण मंत्री ना. दिलीप वळसे पाटील, राज्यमंत्री ना. सुरेश शेट्टी, सामाजिक न्याय मंत्री ना. चंद्रकांत हांडोरे, विभागाच्या प्रधान सचिव डॉ.जॉयस् शंकरन्,उच्च शिक्षण विभागाचे संचालक डॉ.एस्.एस्.पठाण, सहसंचालक, प्रा.मुनव्वर अली, प्रशासन अधिकारी,आयु.वा.ग.भगत यांचे आम्ही कृतज्ञ आहोत.

मुख्यमंत्री कार्यालयाचे तत्कालीन सचिव,डॉ.संजय चहांदे, यशदाचे महासंचालक रत्नाकर गायकवाड, प्रा. रवीन्द्र चव्हाण, यवतमाळचे जिल्हाधिकारी डॉ.हर्षदीप कांबळे, वित्त विभागाचे सहसचिव आयु.सुरेश गायकवाड, उपसचिव,आयु.जयंत गायकवाड,अपंग कल्याण विभागाचे आयुक्त आयु. आर. के. गायकवाड, आदिवासी विकास विभागाचे सचिव भा.ई.नगराळे, मित्रवर्य प्रल्हाद जाधव (माहिती संचालक), सुरेश बांदीले, पोपट मलिकनेर, डॉ.अविनाश ढाकणे, श्री.संजीव जाधव, श्री.भोर, वित्त विभागाच्या कार्यासन अधिकारी श्रीमती सोनलस्मित पाटील यांच्या ऋणात राहायला आम्हाला आवडेल.

समितीचे ज्येष्ठ सदस्य, खासदार दादासाहेब तथा रा.सु.गवई म्हणजे आमचे उर्जाकेंद्रच होय. समितीच्या कामांमध्ये संपूर्ण बुडून गेलेले आमचे मार्गदर्शक म्हणून आम्ही त्यांना मानतो. त्यांची पाठपुरावा करण्याची क्षमता अपूर्व आहे. या खंडाच्या निर्मितीत त्यांचे विशेष श्रेय आहे. आम्ही त्यांचे आभारी आहोत.

आमदार प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी वारंवार समितीच्या अडचणींना सभागृहात वाचा फोडली. त्यांच्या प्रयत्नामुळे प्रश्न सुटायला मदत झाली. खासदार रामदास आठवले, माजी खासदार प्रकाश आंबेडकर आणि अ.भा.मराठी साहित्य संमेलनाचे

अध्यक्ष प्रा.केशव मेश्राम यांचा विशेष ऋणनिर्देश करायला हवा. आमचे सहकारी प्रा. कासारे, आयु. कांबळे व प्रा. गोडघाटे यांनी या खंडासाठी घेतलेल्या मेहनत आणि विस्तृत सूचीबद्दल आयु. कासारे यांचे आभार.

डॉ.कृष्णा कांबळे, डॉ.सिध्द्‌ार्थ कांबळे, प्रा.आनंद आर.गजवे, डॉ.शैलेंद्र डी.लेंडे, प्रा.पारीश सी.भगत, दिनेश व्ही.रामटेके, प्रदीप गायकवाड, आणि प्रमोद एन्.कांबळे यांचे सहकार्य या खंडाच्या कार्यात आम्हाला मिळाले. नागपूरच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिसर्च इन्स्टिटयूट कडून काही मजकूर उपलब्ध झाला.

शासन मुद्रण,लेखन सामग्री आणि प्रकाशने संचालनालयाचे प्रमुख श्री.प.ज.गोसावी, नागपूर येथील शासकीय मुद्रणालयाचे व्यवस्थापक, श्री.म.शं.गायकवाड आणि त्यांचे सर्व सहकारी यांचे आभार.

समितीचे सर्व मान्यवर सदस्य आणि सहसंचालक कार्यालयातील वरिष्ठ लिपिक श्रीमती उपरकर, समिती कार्यालयाचे श्रीमती शलाका तांबे, श्रीमती सु.मा.नेवरेकर,श्री.कमलाकर नीलवर्ण,श्री.मा.द.पाडावे.श्री.वि.अ.वैद्य यांचाही उल्लेख करायला हवा.

आयु.अप्पासाहेब रणपिसे, (दलितांची वृत्तपत्रे,१९६२), आयु.रत्नाकर गणवीर,(बहिष्कृत भारतातील अग्रलेख, बहिष्कृत भारतातील स्फूटलेख), डॉ.हरीश्चंद्र निर्मळे (दलितांची नियतकालिके), प्रा. सुखराम हिवराळे, डॉ. यशवंत मनोहर, प्रा. अरुण कांबळे (जनता पत्रातील लेखः डॉ.बाबासाहेब आंबेडकर,१९९२) प्रा. गंगाधर पानतावणे (पत्रकार डॉ. आंबेडकर) यांच्या प्रयत्नाने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता आपल्यापुढे आली होती. तिचे समग्र रुप आपल्याला आमच्या या खंडांमध्ये बघता येईल.

डॉ.आंबेडकर भारतीय पत्रकारांचे अग्रणी आणि मराठी पत्रकारितेचे अग्रमानांकित पत्रपंडीत होते, याची जाणीव या खंडांनी सर्व भारतीयांमध्ये निर्माण होईल असा विश्वास वाटतो.

या ग्रंथातील उणिवा कळविल्यास पुढील आवृत्तीत त्या दुरुस्त करु. कृपया कळावे / कळवावे. अभिप्रायाच्या प्रतिक्षेत.

आपला स्नेहांकित,

हरी नरके

सदस्य सचिव,

डॉ. बाबसाहेब आंबेडकर चरित्र साधने

प्रकाशन समिती

संपादकीय

बाबासाहेब आंबेडकरांनी मूकनायक (१९२०), बहिष्कृत भारत (१९२७), जनता (१९३०) आणि प्रबुद्ध भारत (१९५६) या चार वृत्तपत्रांची निर्मिती केली. या चारही वृत्तपत्रांमधून त्यांनी व्यापक व विस्तृत प्रमाणात वैविध्यपूर्ण विचारांचा आविष्कार केला. मूकनायक व बहिकृत भारतातील अग्रलेख व स्फुटलेख याआधीच्या १९ व्या खंडामधून महाराष्ट्र शासनाने प्रकाशित केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वृत्तपत्रलेखनाचा उर्वरित भाग या २० व्या खंडाद्वारे प्रकाशित करण्यात येत आहे. या खंडामध्ये १९२९ ते १९५६ या कालखंडातील बाबासाहेबांचे वृत्तपत्रांमधील लेखन संपादित करण्यात आले आहे. हे लेखन बाबासाहेबांच्या उमेदीच्या कालखंडापासून तर त्यांच्या अखेरच्या काळापर्यंत आकारास आलेले असल्यामुळे, त्यांचे हे लेखन विशेष मोलाचे आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले वृत्तपत्रीय लेखन त्यांच्या एकमेवाद्वितीय शैली गुणविशेषांनी मंडित झालेले आहे. या वृत्तपत्रीय लेखनामधून त्यांची भव्यदिव्य पत्रकारिता मूर्तिमंतपणे प्रगट होते. बाबासाहेबांचे मराठी लेखन हे पूर्णतः वृत्तपत्राच्या माध्यमातून आकारास आले आहे. ते अव्वल दर्जाचे पत्रकार होते, याची साक्ष त्यांच्या लेखांच्या पानापानांवरून सिद्ध होताना दिसते. बाबासाहेबांच्या इंग्रजी लेखनाप्रमाणे मराठी लेखन- देखील विलक्षण प्रत्ययकारी आहे. त्यांच्या मराठी लेखनाला ज्याप्रमाणे वैचारिक गुणवत्ता आहे, त्याचप्रमाणे वाङ्मयीन गुणवत्ता देखील आहे. मराठी पत्रकारितेचे स्मरण करताना टिळक-आगरकर-चिपळूणकर जांभेकर-परांजपे-केळकरांचे नाव नेहमी घेतले जाते. पण बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेचा साधा उल्लेखही साहित्य-विमर्शकांकडून होताना दिसत नाही. अस्पृश्य हे जीवनाच्या सर्वच क्षेत्रात कायमचे बहिष्कृत राखले गेल्याने बाबासाहेब आंबेडकरांना भारतीय वृत्तपत्रसृष्टीने दूरस्थ ठेवणे, हे येथील परंपराशरण समाज संकेतांशी सुसंगतच मानावे लागते.

बाबासाहेबांनी प्रचंड ताकदीने वृत्तपत्रीय लेखन केलेले असले तरी त्यांच्या पत्रकारितेची प्रस्थापित वर्गाकडून दखल घेतली गेली नाही. या संदर्भात श्री. यदुनाथ थत्ते यांनी मोठे मार्मिक वास्तव नोंदविले आहे. ते साधनेत लिहितात, डॉ. आंबेडकर उत्तम मराठी लेखक होते, ही गोष्ट क्वचितच ध्यानी घेतली जाते. त्यांची मराठी भाषा, तिचे सर्व संचित संस्कार घेवून शैलीबद्ध होते, पण ती ग्रंथित करते ते विचार मात्र नवे आहेत. इतकी अस्सल मराठी भाषा लिहिणाऱ्या बाबासाहेबांना मराठी लेखक म्हणून फारशी मान्यता असू नये आणि कोणत्याही

पाठ्यपुस्तकांत त्यांच्या वैचारिक निबंधांना स्थान मिळू नये, हे विद्याक्षेत्र किती कोते आणि कल्पनाहीन आहे त्याचेच निदर्शक म्हणावे लागेल. इंग्रजी भाषेत डॉ. बाबासाहेबांचे बरेच लिखाण झाले व पुस्तककारात ते उपलब्ध असल्याने मराठी विचारवंतांना त्यांची गणना करण्याचेही विस्मरण होत असावे. प्रस्थापित सारस्वतांनी डॉ. आंबेडकरांच्या वृत्तपत्रीय योगदानाला दुर्लक्षित केलेले असले तरी आंबेडकरी लेखकांच्या व संशोधकांच्या अथक लेखनातून ही स्थिती पालटत चालली आहे. आयु. रत्नाकर गणवीर, डॉ. गंगाधर पानतावणे, प्रा. अरुण कांबळे, डॉ. यशवंत मनोहर, आयु. वसंत मून आदी अभ्यासकांनी बाबासाहेबांचे वृत्तपत्रीय योगदान जनतेसमोर मांडून ही वाट सूकर केली आहे. महाराष्ट्र शासनातर्फे प्रकाशित झालेल्या १९ व्या व या २० व्या खंडाच्या रथातून बाबासाहेबांचे वृत्तपत्रीय कार्यकर्तृत्व परिपूर्णपणे अखिल मराठीजनात पोहोचणार आहे, ही आमच्याकरिता अत्यंत समाधानाची बाब आहे.

या खंडामध्ये बाबासाहेब आंबेडकरांचे बहिष्कृत भारत व जनता या नियतकालिकांमधील अग्रलेख, स्फुटलेख, संदेश तसेच प्रासंगिक विचार संग्रहित केलेले आहेत. यासोबतच महत्त्वपूर्ण विषयांवरील परिशिष्टेही स्वतंत्रपणे जोडलेली आहेत. बाबासाहेबांच्या या समग्र लेखनामधून विचारांचा प्रवाह अप्रतिहत वाहताना दिसतो. त्यांचे हे विचार वैविध्यपूर्ण तसेच बहुप्रवाही स्वरूपाचे आहेत. या लेखांमधून ते विविध विषयांचा परामर्श घेतात. या विषयांच्या कक्षाही विस्तृत व सर्वव्यापक आहेत. या लेखनाला कोणताही विषय वर्ज्य नाही. मानवी समाजजीवनाच्या कक्षेत येणारा प्रत्येक विषय ते समर्थपणे हाताळतात. समाजजीवनाच्या नाना अंगोपांगावर ते मौलिक प्रकाश टाकतात व त्या घटकातील अंतस्तत्त्व उलगडून दाखवितात. त्यांचे वृत्तपत्रीय लेखन म्हणजे मानवी जीवनास उन्नत करणारे चिंतन होय. हे चिंतन कधी समाजशास्त्रांच्या अंगाने आकारास येते, कधी धर्मशास्त्राच्या अंगाने अस्तित्वात येते. कधी ते अर्थशास्त्राच्या, कधी राज्यशास्त्राच्या तर कधी इतिहासाच्या अंगाने प्रगट होते. बाबासाहेब हे प्रकांडपंडित होते. सामाजिक शास्त्रांचे व मानव्यविद्यांचे त्यांना सखोल ज्ञान होते. पाश्चात्य ज्ञान-विज्ञानावर त्यांची बुद्धी पोसली गेली होती. इहवादी व विज्ञानवादी विचारांना त्यांनी आत्मसात केले होते. लोकशाही मूल्यांवर अधिष्ठित असणाऱ्या समताविचारांच्या रसा-कसावर त्यांच्या मनाची जडणघडण झाली होती. त्यांचे ज्ञान अद्यावत स्वरूपाचे होते व त्यांच्या नित्यनूतन ज्ञानाला तत्त्वशुद्धतेची बैठक प्राप्त झाली होती. बाबासाहेबांचे व्यक्तिमत्त्व हे असे प्रखर बुद्धिनिष्ठ असल्यामुळे त्यांचे लेखनही या सर्व गुण विशेषांसह सर्वस्पर्शित्वभावाने आविष्कृत होते.

बाबासाहेबांच्या लेखांची शीर्षके पाहिली की, त्यांच्या सर्वस्पर्शी बुद्धिवैभवाची प्रचिती येते. भारतातील हिंदू धर्म व या धर्माचे विषमतावादी तत्त्वज्ञान हे त्यांच्या लेखनाचे प्रमुख लक्ष्य आहे. या धर्मातील जातीयता, विषमताग्रस्तता व अस्पृश्यता यांसारखे ज्वलंत प्रश्न त्यांच्या चिंतनाचे विषय आहेत. ते अस्पृश्यतेची कुळकथा विस्तारपूर्वक मांडतात. समाजसमतेच्या विरोधकांची परंपरावादी विचारसरणी स्पष्ट करतात. अस्पृश्यवर्गाला गुलाम करणाऱ्या महार वतनाची विघातकता विशद करतात. केवळ अस्पृश्यवर्गाचे प्रश्न हाच त्यांच्या चिंतनाचा विषय नाही. समस्त भारतातील स्त्री-शुद्रातिशूद्र वर्ग व त्यांचे प्रश्नोपप्रश्न त्यांच्या चिंतनाचे विषय आहेत. या देशातील बहुजन वर्गाच्या शोषणाचे भीषण चित्र ते रेखाटतात. खोती उर्फ शेतकरी वर्गाची गुलामगिरी व त्यामागील पार्श्वभूमी ते विश्लेषित करतात. अस्पृश्य वर्गाची कैफियत व्यक्त करताना ते ज्यांचा त्यांचा महारांवर कटाक्ष कशाप्रकारे असतो, हे सप्रमाण स्पष्ट करतात. या देशात शूद्रातिशूद्रांबरोबरच स्त्रियांची अवस्था कशी भयावह आहे, याचे प्रत्ययकारी लेखन बाबासाहेब करतात. '' हिंदू समाजातील वर्गा-वर्गातील उच्च-नीच भेद व लिंगभेद कायम ठेवून कोणतेही सुधारणेचे कायदे करणे म्हणजे घाण न काढता त्यावर उभारलेले पत्त्यांचे बंगले होत, याचे तपशीलवार विश्लेषण ते साकारतात. हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनती या विषयाचा मागोवा घेताना ते या अवनतीस जबाबदार असणाऱ्यांची दांभिकता उलगडून दाखवितात. हिंदुत्ववादी राष्ट्रवादाचा फसवेपणा स्पष्ट करताना फसव्या राष्ट्रवादाच्या भुलथापांनी व पोकळ घोषणांनी कामगार वर्ग फसला जावू नये याची ते दक्षता घेतात. गिरण्यांचे मालक व कामगार यांच्या संबंधाची चर्चा करताना ते कामगारवर्गास हितोपदेश देतात. बाबासाहेबांचे लेखन अस्पृश्य वर्गाची सर्वतोपरी काळजी वाहण्याच्या उद्देशातून आकारास आलेले असल्यामुळे ते हिंदुमहासभा व अस्पृश्यता यासारख्या घटकाचा विचार सावधपणे करतात. या देशातील प्रतिगामी नाझीवादाचे व त्याच्या प्रतिकूल परिणामांचे ते साक्षेपाने विश्लेषण करतात.

बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लेखांमधून भारतीय समाजरचनेची, या समाजरचनेतील विविध मतप्रवाहांची, त्यातील विचारभिन्नतेची सखोल चर्चा केली आहे. ते अस्पृश्यांच्या, बहुजनांच्या व स्त्रीवर्गाच्या गुलामगिरीचा, त्यांच्या शोषणाचा सर्वांगीण विचार करतात. त्यांचे लेखन शूद्रातिशूद्रांच्या अवनतीचे, कैफियतीचे रेखाटन करून थांबत नाही. स्त्री-शूद्रातिशूद्रांचे प्रश्न किती गंभीर आहेत, हे विशद करून ते त्यावरील उपाययोजना सिद्ध करतात. या युगानुयुगांपासून अनाकलनीय ठरलेल्या प्रश्नांवर ते अचूक उत्तरे शोधून काढतात. या कूटप्रश्नांची ते सर्वांगीण

उकल करू पाहतात व या प्रश्नांचा गुंता सोडविण्यात ते सफलही होतात. हिंदूस्थानचे भवितव्य घडविण्यासाठी ते जीवाचा आटापिटा करतात. प्रस्थापित हिंदुधर्माला नकार दिल्याशिवाय येथील शोषितांची उन्नती होऊ शकत नाही, हे बाबासाहेबांनी अभ्यासान्ती ओळखले होते. त्यामुळेच ते हिंदुधर्माला नोटिसा ! देण्याची भाषा करतात. येथील प्रस्थापित संस्कृती भाकरी मागितली-दगड दिला या प्रकारची असल्यामुळे या संस्कृतीकडून दलित वर्गाच्या उत्थानाची अपेक्षाच करता येत नाही. नाक दाबल्याशिवाय तोंड उघडत नाही हा या जगाचा न्याय असल्यामुळे बाबासाहेब दलित वर्गाला नव्या संघर्षासाठी सज्ज करतात. '' ब्राह्मणेतर वर्गाने म. फुले यांची स्मृती पुसूनच टाकली, नव्हे त्यांच्या तत्त्वज्ञानास निर्लज्जपणे दगा दिला '' हे वास्तव त्यांच्या नजरेसमोर आहे. अशा प्रतिकूल परिस्थितीमध्ये अस्पृश्य समाजाचे तेजोभान जागृत करणे व त्यांना विद्रोही बनविणे बाबासाहेबांना अत्यावश्यक वाटते. अस्पृश्यवर्गाला ते स्वाभिमानाची ज्योत तेवत ठेवा ! असा सत्त्वपूर्ण संदेश देतात. आम्हाला स्वातंत्र्य पाहिजे ! त्याचबरोबर गुलामगिरीला आम्ही ठोकरीने उडवणार हा त्यांचा बाणा आहे. डॉ. बाबासाहेबांचे व्रत हे असे मूलभूत परिवर्तनाचे व क्रांतीचे आहे. अस्पृश्य समाज हा धार्मिक व राजकीय दृष्टीने स्वतंत्र व्हावा, या अभिलाषेने त्यांचे मन झपाटून गेले आहे. त्यामुळेच ते अस्पृश्यांचे धर्मांतर आणि त्यांचे राजकीय हक्क या विषयाचा विचार स्वातंत्र्यप्राप्तीच्या कित्येक वर्षांपूर्वी करताना दिसतात. हिंदू धर्म म्हणजे गुलामगिरीचेच दुसरे नाव असल्यामुळे बाबासाहेबांना धर्मत्याग करणे अपरिहार्य वाटत होते. त्यांच्या दृष्टीने धर्मांतर म्हणजे मूल्यांतर होते. हे धर्मांतर समतातत्त्वाच्या प्रतिष्ठापनेकरिता त्यांना हवे होते. बुद्ध जयंती आणि तिचे राजकीय महत्त्व यासारख्या लेखामधून बाबासाहेबांच्या मनातील धर्मांतरांचे संसूचन मौलिकपणे प्रगट होते. त्यांच्या लेखांचा प्रवास हा असा अस्पृश्यवर्गाच्या तसेच स्त्री-शूद्रादी वर्गाच्या बंधमुक्तीचा प्रवास आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समग्र लेखन हे विचारप्रवर्तक आहे. या निबंधामधून ते विविध वादविषयांना व प्रश्नव्यूहांना सामोरे जातात आणि त्या घटकांतील सत्यासत्यता ते वाचकांसमोर मांडतात. बाबासाहेबांची सद्सद्विवेकबुद्धी मोठी विलक्षण व तत्त्वशुद्ध स्वरूपाची आहे. त्यांच्या सद्सद्विवेकबुद्धीला न्याय्य हक्कांची व वैधानिकतेची किनार आहे. तर्कशुद्ध विचारसरणी व बिनतोड युक्तिवादाच्या आधारे ते विचारांचा आविष्कार करतात. आंबेडकरांच्या सत्यान्वेषी बुद्धीचे दर्शन या लेखनातील शब्दाशब्दांतून घडते. त्यांच्या विचारातील समतानिष्ठा मूल्यगर्भ आहे. समताप्रस्थापनेच्या मार्गाबद्दल त्यांना अचूक जाण आहे. समतेसाठीच ही विषमता या लेखामध्ये समतावाद्यांचे ध्येय त्यांनी सुंदरपणे

व्यक्त केले आहे. बाबासाहेब लिहितात, '' समतावाद्यांचे ध्येय सर्वांना समतेने वागविणे, हे नसून समता प्रस्थापित करणे हे आहे. हे ध्येय साधताना सर्वांना समतेने वागवून चालणे शक्य नाही. जेथे सर्व व्यक्ती समान आहेत, तेथे काही व्यक्तींना असमानतेने वागविल्यास विषमता उत्पन्न होईल. पण जेथे व्यक्ती असमान आहेत तेथे त्यांना सारख्या लेखून चालणे म्हणजे समता प्रस्थापनेच्या ध्येयाला विरोध करणे होय. या बाबतीत रोगी माणसाचे उदाहरण बरोबर लागू पडते. सुदृढ माणसाला जाडेभरडे अन्न चालते. पण सुदृढ माणूस व रोगी माणूस हे दोघेही सारखे मानून जर एखादा वेडगळ समतावादी ते जाडेभरडे अन्न रोग्याला देईल तर तो रोग्याला प्राणदाता होण्याऐवजी प्राणहर्ता होईल. त्याचप्रमाणे श्रीमंतावर जितका कर असतो, तितकाच गरिबावर ठेवावा, कारण तसे न केल्यास असमानता होईल, असे जर कोणी म्हणेल तर लोक त्याला वेड्यात काढतील. सारखा कर देण्याची ऐपत असलेल्या श्रीमंतांपैकी काहींवर कमी व काहींवर जास्त असा जर कर लादला किंवा सुदृढ माणसाला पचण्याजोगे अन्न पचविण्याची ज्यांच्यात ताकद आहे त्यांना रोग्याचे अन्न दिले तर मात्र विषमता होईल. या उदाहरणावरून तात्पर्य घ्यावयाचे ते हे की, समानांना असमानतेने व असमानांना समानतेने न वागविणे हा समतावाद्यांचा दस्तुर आहे. या दस्तुराने पाहिले असता डॉ. आंबेडकरांची मागणी त्यांच्या समतावादाला पूर्णपणे धरून आहे, हे कळून येणे सोपे आहे.'' याप्रकारे बाबासाहेब समर्पक उदाहरणांच्या व बिनतोड युक्तिवादाच्या साहाय्याने सैद्धांतिक विचारांचा प्रभावीपणे अविष्कार करीत जातात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वैचारिक लेखन समाजरचनेमध्ये मूलभूत स्थित्यंतर घडविणारे आहे. समाजातील स्थितीशीलतेचे रेखाटन करताना ते न्यायनिष्ठूर व कर्तव्यकठोर स्वरूपाची भूमिका घेतात. बाबासाहेबांच्या या लेखनाची यथार्थता आजही आपणास प्रतीत होऊ शकते. धर्मतत्त्वांचा व समाजकारांचा मागोवा घेताना ते शास्त्रीयतेची व तर्कनिष्ठेची कास कधीही सोडीत नाहीत. त्यामुळेच त्यांचे सामाजिक व धार्मिक प्रश्नांसंबंधीचे चिंतन समाजशास्त्रीय रूप धारण करते.

बाबासाहेब आंबेडकरांचे वृत्तपत्रीय लेखन समाजपरिवर्तनाच्या जाणिवेने मुसमुसलेले आहे. सामाजिक परिवर्तनाच्या ध्येयातून हे लेखन आकारास आले आहे. ही परिवर्तनशीलता समन्वयवादी अथवा तडजोडवादी नाही. बाबासाहेब विचाराविष्कार करताना कोठेही ढिलेपणाची अथवा धीमेपणाची भूमिका घेत नाहीत. त्यांची भूमिका ही नेहमीच समरांगणावरील लढवय्या योद्ध्याची असते. संघर्ष हा त्यांच्या समग्र लेखनाचा गाभा आहे व निर्भयता हा त्यांचा स्वभाव आहे.

समाजामध्ये आमूलाग्र परिवर्तन करताना विरोधकांचा थरकाप उडविणारी व प्रतिपक्षाच्या उरात धडकी भरविणारी निर्भय आक्रमकता आवश्यकच असते. प्रस्थापित उच्चभ्रूंवर आक्रमक पावित्र्यात झेपावणाऱ्या बाबासाहेबांचे संघर्षशील लेखन हे प्रतिपक्षाची भंबेरी उडविते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतातील प्रज्ञावंत निबंधकार आहेत. ते इहवादी विचारसरणीचे बुद्धिनिष्ठ विचारवंत आहेत. बुद्धिप्रामाण्यवाद व विवेकवादाचा प्रखर प्रकाश त्यांच्या निबंधात सर्वत्र दिसून येतो. बाबासाहेबांच्या विज्ञाननिष्ठ व लोकशाहीवादी दृष्टिकोनामुळे त्यांचा निबंध मराठी विचारपरंपरेतील वैशिष्ट्यपूर्ण व अनन्यसाधारण स्वरूपाचा निबंध ठरतो. हा निबंध आमूलाग्र क्रांतीच्या ध्येयाने प्रेरित झालेला असल्यामुळे त्यातील आशयतत्त्व तेजःपुंज रूप धारण करते. बाबासाहेबांच्या या निबंधातील आशयाकडे पाहिले की, गॅरीसनच्या विचारांची आठवण होते. त्याने म्हटले आहे, ''मी सत्याइतकाच निष्ठूर आणि न्याय देवतेप्रमाणे निःस्पृह राहीन, मी निग्रही आहे आणि नेहमी खंबीर राहीन.'' बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या पत्रकारितेत गॅरीसनच्या उक्तीप्रमाणेच सत्य जपले. त्यांची पत्रकारिता सुरुवातीपासून शेवटपर्यंत निःस्पृह, न्यायनिष्ठूर व कर्तव्यकठोर राहिली आहे. या न्यायनिष्ठूरतेमुळे व कर्तव्यकठोरतेमुळे बाबासाहेबांचा वैचारिक निबंध तिमिरकुलावर हल्ला चढवितो व तेथे प्रकाशपर्व निर्माण करतो. सतत संघर्षरत राहणारा हा निबंध तळागाळातील दलित शोषित समूहाला दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करतो. दलित वर्गाला संघर्षप्रवण करण्याकरिता व अन्यायाविरुद्ध झुंज देण्याकरिता बाबासाहेब महाभारतातील वीरपत्नी विदुलेच्या उपदेशाचे उदाहरण देतात. दलितांची मृतावस्थेस गेलेली अस्मिता जागी करण्यासाठी ते जीवाचे रान करतात आणि या जळणाऱ्या जीवाची काहिलीही शब्दाशब्दांतून ओततात. गुलामांना गुलामीची जाणीव करून द्या म्हणजे ते पेटून उठतील, हे विचारसूत्र डोळ्यांपुढे ठेवून ते नवमूल्यांचे सर्जन करतात. ही नवमूल्यांची सर्जनशीलता मराठी वैचारिकतेमध्ये अपूर्व मानावी लागते.

बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेचे मूल्य ऐतिहासिक स्वरूपाचे आहे. त्यांची पत्रकारिता दलित-शोषित समाजाच्या अभ्युदयाची नांदी ठरली. शेकडो वर्षांच्या अमानुष शोषणाने दलितांच्या जीवनाची राखरांगोळी झाली होती. त्यांच्यातील आत्मतेज केव्हाच लयास गेले होते. त्यांच्या पूर्वजांनी दाखविलेल्या क्षात्रतेजाची त्यांना विस्मृतीही झाली होती. अशा मूक व बहिष्कृत लोकांच्या जीवनात कोणत्याही प्रकारची अर्थपूर्णता नव्हती की जिवंतपणा नव्हता. या अस्पृश्यांचे जीवन हिंदू समाजातील श्रेणीबद्ध विषमतेचे बळी ठरले होते. शेकडो वर्षांचे हे अंधकारमय

जीवन अस्पृश्यांच्या माथी मारण्यात आले होते. गावबंदी, रोटीबंदी, बेटीबंदी या श्रृंखलांनी त्यांचे जीवन कायमचे बंदिस्त झाले होते. अशा या ग्लानीग्रस्त समाजात बाबासाहेब आंबेडकरांनी क्रांतीचे स्फुल्लिंग प्रज्वलीत केले. आकाशातील काळ्याकभिन्न अंधाराला चिरीत विजेचा कल्लोळ उठावा आणि संपूर्ण आकाश नखशिखान्त प्रकाशमान व्हावे, त्याप्रमाणे बाबासाहेबांचे दलित वर्गाच्या जीवनात आगमन झाले. बाबासाहेबांचे हे आगमन समस्त दीनदलितांच्या बंधमुक्तीचे प्रतीक ठरले. बाबासाहेबांनी आपल्या पत्रकारितेच्या व त्यातील वैचारिक लेखनाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासात पहिल्याप्रथम स्वातंत्र्यसूत्रांचे प्रभावी प्रगटीकरण केले. त्यामुळेच त्यांची पत्रकारिता युगप्रवर्तक पत्रकारिता ठरते.

बाबासाहेबांनी आपल्या वृत्तपत्रीय लेखनातून घडवून आणलेली विचारक्रांती सर्वंकष स्वरूपाची आहे. बाबासाहेबांच्या वैचारिक निबंधाने महाराष्ट्रात अभूतपूर्व विचारमंथन केले. हिंदू समाजव्यवस्था व त्याच्याशी संबंधित असणारे धर्मकारण, राजकारण, अर्थकारण या सर्व घटकांची त्यांनी सखोल चर्चा-चिकित्सा केली. बाबासाहेब आंबेडकर हे असे समाजशास्त्रज्ञ व धर्मशास्त्रज्ञ होते तसेच ते राज्यशास्त्रज्ञ व अर्थशास्त्रज्ञ होते याची साक्ष त्यांच्या या मूलगामी चर्चा-चिकित्सेमधून अभिव्यक्त होते. बाबासाहेबांच्या व्यक्तिमत्वातील संशोधकाचे हे सर्व पैलू त्यांच्या लेखनातून विशेषत्वाने प्रगट होतात. त्यांची वैचारिक जडणघडण ही मानव्यविद्याशास्त्रज्ञांची आहे. बाबासाहेबांची संशोधकीय वृत्ती केवळ तथ्यांना व निष्कर्षांना मांडून थांबत नाही. या नवसिद्धांतांची सांगड ते समाजविकासाच्या प्रक्रियेशी घालतात. बाबासाहेबांचे संपूर्ण समाज-चिंतन व विचार-मंथन हे समाजविकासाच्या संकल्पनेशी प्रतिबद्ध आहे. त्यांचा प्रत्येक विचार सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेतून आकारास आलेला आहे. बाबासाहेबांचे मन स्त्री-शूद्रातिशूद्रांच्या समूहमनाशी घट्ट बांधलेले आहे. म्हणूनच ते वैयक्तिक विकासापेक्षा समाजाच्या विकासास श्रेष्ठ स्थान देतात. '' वैयक्तिक कर्तबगारी ही आदरणीय असते, पण पुष्कळवेळा ती अनुकरणीय नसते व म्हणूनच वैयक्तिक कर्तबगारी व सामुदायिक कर्तबगारी यांच्यात तुलना करता सामुदायिक कर्तबगारी शेकडो पटींनी श्रेयस्कर ठरते. वैयक्तिक कर्तबगारी आकाशाएवढी उंच असली तरी साधारण उंचीच्या सामुदायिक कर्तबगारीच्या पासंगालाही ती पुरणार नाही.'' बाबासाहेबांचे हे विचार त्यांच्या उत्कट समाजनिष्ठेचे द्योतक आहेत. त्यांची ही उत्कट समाजनिष्ठा दलितवर्गाबरोबर स्त्री-शूद्रांचे जीवन प्रकाशमय करते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वृत्तपत्रीय निबंधलेखनातून महाराष्ट्रीय समाजाचे प्रबोधन निष्ठापूर्वक केले. नवविचारांच्याच साहाय्याने समाजाचा उत्कर्ष होऊ शकतो, यावर त्यांचा पूर्ण विश्वास होता. हजारो वर्षांपासून ज्ञानवंचित व

विद्यावंचित असलेल्या अस्पृश्य वर्गाकरिता नवविचार हे जीवनदायी ठरत असतात. लोकशिक्षणाशिवाय अस्पृश्य समाज हा जागृत होऊ शकत नाही हे बाबासाहेबांनी पक्के ओळखल्यामुळे त्यांची वृत्तपत्रांच्या द्वारे जनप्रबोधनाचे कार्य अप्रतिहत सुरू ठेवले. या देशातील समस्त शोषित वंचितांना परिवर्तनकारी विचार देणारे विचारवंत या नात्याने बाबासाहेबांचे कार्यकर्तृत्व अनन्यसाधारण ठरते. ते प्रबोधनकारी लोकशिक्षक होते तसेच समाजशिक्षकही होते. स्त्री-शूद्रातिशूद्रांना शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही हे त्यांनी निक्षून सांगितले.शिक्षणाच्या, उच्च शिक्षणाच्या द्वारेच अस्पृश्यांच्या जीवनात स्वातंत्र्यसूर्य उगवू शकतो, याबद्दल ते निःसंदिग्ध होते. औरंगाबाद येथील पीपल्स एज्युकेशन सोसायटी कॉलेजच्या शिलान्यास प्रसंगी बाबासाहेबांनी व्यक्त केलेले शिक्षण विचार अत्यंत मननीय आहेत. ते म्हणतात, '' हिंदू समाजाच्या अगदी खालच्या थरातून आल्यामुळे शिक्षणाचे किती महत्त्व आहे हे मी जाणतो. खालच्या समाजाची उन्नती करण्याचा प्रश्न आर्थिक असल्याचे मानण्यात येते. पण ही मोठी चूक आहे. हिंदुस्थानातील दलित समाजाची उन्नती करणे म्हणजे त्यांच्या अन्न, वस्त्र व निवाऱ्याची सोय करून पूर्वीप्रमाणेच त्यांना उच्च वर्गाची सेवा करावयास लावणे नव्हे. खालच्या वर्गाची ज्याच्यामुळे प्रगती खुंटून त्यांना दुसऱ्याचे गुलाम व्हावे लागले, तो न्यूनगंड त्यांच्यापासून नाहीसा करणे, चालू समाजपद्धतीमुळे जे त्यांचे जीवन लुबाडण्यात आले त्याचे त्यांच्या स्वतःच्या आणि राष्ट्राच्या दृष्टीने काय महत्त्व आहे याची त्यांना जाणीव करून देणे हाच खालच्या वर्गाचा प्रश्न आहे. उच्च शिक्षणाच्या प्रसाराखेरीज दुसऱ्या कशानेच हे साध्य होणार नाही. आमच्या सर्व सामाजिक दुखण्यावर माझ्या मताप्रमाणे हेच औषध आहे. '' बाबासाहेबांनी व्यक्त केलेले हे शिक्षणविषयक विचारसूत्र विलक्षण अन्वर्थक आहे. शिक्षण हेच दलित मुक्तीचे केन्द्रवर्ती तत्त्व होय, ही बाबासाहेबांची विचारसरणी मोठी द्रष्टेपणाची मानावी लागते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सूर्यकुळाच्या निबंधपरंपरेतील अत्यंत जहाल आणि श्रेष्ठतम निबंधकार आहेत. त्यामुळे त्यांच्या निबंधामधील विचारविश्वच केवळ धगधगत आहे असे नाही तर त्यांच्या गद्यशैलीमधूनही तीच धगधग, तोच बेदरकारपणा प्रत्ययास येतो. बाबासाहेबांच्या गद्यशैलीला एक घाट, एक वळण आहे. प्रतिपाद्य विषयाच्या गाभ्याला ते बेधडक स्पर्श करू शकतात. प्रतिपाद्य विषय हा सर्वसामान्यांचा साधारण अनुभव असो अथवा तात्त्विक पातळीवरचा अगम्य सिद्धांत असो, त्या आशयाला त्यांची गद्यशैली लीलया पेलते. आपले लेखन हे वरिष्ठ वर्गास आत्मपरीक्षण करण्यास प्रवृत्त करण्यासाठी व अस्पृश्य वर्गास आत्मभान आणण्यासाठी आहे, याचे भान त्यांनी कधीही सोडले नाही: त्यामुळे त्यांची लेखनशैली दुर्बोध, बोजड व कृत्रिम न होता ती सुबोध, सुगम, अर्थगर्भ व स्वाभाविक स्वरूपाची बनते. या लेखनशैलीमध्ये आक्रमकता आहे, आवेशपूर्णता

आहे व आत्मविश्वासही आहे. बाबासाहेबांच्या विचारांची तात्विक बैठक ही अगदी तर्कशुद्ध व बुद्धिनिष्ठ असल्यामुळे त्यांची लेखनशैली त्याच ताकदीने झळाळताना व लखलखताना दिसते. बाबासाहेबांचा निबंध रात्रंदिन चाललेल्या युद्धाच्या प्रसंगात सरसेनापतीची भूमिका वठवितो. हा निबंध एकाच वेळेस सवर्णांशी वाद घालतो, अस्पृश्यांशी संवाद साधतो व राष्ट्राच्या उज्ज्वलतेची समतोल भूमिका घेतो. बाबासाहेबांचा स्वभावधर्म '' दुर्जनांशी पंचानन, तुका रजवेणू संताचा '' असा आहे. या वैचारिक जडणघडणीतून त्यांची लेखनशैली नित्यनूतन आविष्कार धारण करीत जाते. त्यांच्या लेखनामध्ये संतांची वचने, संस्कृतातील वचने, सुभाषिते, म्हणी व वाक्प्रचार विपुल प्रमाणात दिसतात. विचारांच्या प्रभावी प्रगटीकरणासाठी ते दृष्टांत व रूपकांचा अचूक उपयोग करतात. आशयाची मुद्रा वाचकांच्या मनावर ठसविण्यासाठी ते कथासामर्थ्याचा उपयोग अत्यंत प्रभावीपणे करतात. उपरोध, उपहासाच्या साहाय्याने ते प्रतिपक्षाचा दंभस्फोट करतात. बाबासाहेब आंबेडकर हे भौतिकवादी जाणीवेचे निबंधकार असल्यामुळे हा निबंध तर्काची व तत्त्वाची साथ कधीही सोडत नाही. बाबासाहेब हे प्रज्ञावंत विचारवंत आहेत, त्याचप्रमाणे प्रतिभावंत विचारवंत आहेत. प्रज्ञा आणि प्रतिभा यांचा अद्‌भूत संगम बाबासाहेबांच्या व्यक्तिमत्वात झाल्यामुळे त्यांचे लेखन विलक्षण वाचनीय, चिंतनीय व मननीय ठरते.

या ग्रंथात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अग्रलेख, स्फुटलेख, संदेश, लेख इत्यादी अंतर्भूत करताना त्यांनी लेखांस जी शीर्षके दिली होती, ती तशीच कायम ठेवण्यात आली आहेत. ज्या लेखांना, विशेषतः स्फुट लेखांना त्यांनी शीर्षके दिली नव्हती, त्यांना आम्ही त्यातील आशयानुरूप शीर्षके दिली आहेत. ही शीर्षके लक्षात येण्यासाठी ती इटॅलिकमध्ये खंड १९ प्रमाणेच नमूद केली आहेत. तत्कालीन महत्त्वपूर्ण घटना प्रसंगांवर भाष्य करणारी परिशिष्टे येथे विशेषत्वाने जोडलेली आहेत. बाबासाहेबांनी विचाराविष्कार करताना देश-विदेशातील अनेक विद्वान लेखकांच्या विचारांचा, कार्याचा उल्लेख केला आहे. त्याचप्रमाणे विविध ऐतहासिक, समाजशास्त्रीय तत्त्वसरणीचा तत्त्वज्ञांच्या कार्यकर्तृत्वाचा आपल्या लेखनात परामर्श घेतला आहे. त्या व्यक्ती, संस्था यांच्या कार्याची विषयाच्या दृष्टीने माहिती होणे अगत्याचे असल्यामुळे त्यांच्याविषयीची आवश्यक ती माहिती '' व्यक्ती, संस्था, कार्य-सूची '' या विभागात दिलेली आहे. याचप्रमाणे डॉ. आंबेडकर यांनी आपल्या लेखनात कांही महत्त्वपूर्ण घटना लक्षात घेवून विचार प्रदर्शित केले आहेत व त्या घटनांची माहिती वृत्तपत्रातून प्रसिद्ध केली आहे. डॉ. आंबेडकरांनी काही लेखन स्वतः केले असले तरी प्रसंगानुरुप त्यांनी आपले नाव तृतीय वचनी लिहिले आहे. ही सर्व माहिती परिशिष्टात अंतर्भूत करण्याचा प्रयत्न केला आहे.

संपादक

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका--चालू

अनुक्रमणिका--चालू



१

युवक परिषद

डिसेंबर महिन्याचा शेवटचा आठवडा म्हणजे परिषदांचा हंगामा. परिषदा, व्याख्यानें व ठराव यांचा पाऊस या आठवड्यांत जेवढा पडतो तेवढा वर्षांत अन्यवेळी केव्हांही पडत नाही. आणि या परिषदांत पास होणारें ठराव विशेष प्रगतिपर असतात असेंही नाहीं. साधारणतः मागील वर्षांच्या ठरावांची पुनरावृत्तीच करण्यांत येते. आणि परिषदेचें अधिवेशन आटोपल्यानंतर त्या ठरावांची स्मृतीही कोणाला रहात नाहीं. यंदाच्या अखिल भारतीय युवक परिषदेचे, अध्यक्ष मि. के. एफ. नरीमन यांच्या ध्यानांत ही गोष्ट आली असावी असें दिसतें. म्हणूनच त्यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत सांगितलें कीं, ''युवक परिषद ही फक्त वादविवादासाठीं असेल तर देशांत तशा प्रकारच्या ज्या अनेक संस्था आहेत, त्यांत आणखी एका संस्थेची भर पडण्यापलीकडे आणखी कांहीं होणार नाहीं.''

मि. नरिमन यांचा हा इशारा अस्थानीं आहे असें कोण म्हणेल ? विशेषतः युवक परिषदांनीं तो डोळ्याआड करून कधींच चालणार नाहीं. पण काय असेल तें असो. युवक परिषदांचें स्वरूपही इतर परिषदांप्रमाणेच वादविवादी यांच्या पलिकडे गेलें नाहीं. ''वादे वादे जायते तत्त्वाबोधः'' या तत्वानुसार आचाराचें तत्त्व निश्चित व्हावयासाठी वादविवाद व्हावा लागतो ही गोष्ट खरी आहे. पण त्याला कांहीं सीमा असते. त्या सीमेपलीकडे वादविवाद गेल्यास निष्क्रियता आलीच असें समजावें. 'निष्क्रियता सोडून देऊन कार्यास लागा' असा संदेश श्री. सुभाषचंद्र बोस यांनीं युवकांना याच परिषदेंत दिला आहे खरा. पण युवक परिषदेने आपल्या पुढें जो कार्यक्रम ठेवला आहे तोच मुळीं अशाप्रकारचा आहे कीं त्यामुळें क्रियाशक्तीला चालना मिळण्यापेक्षां निष्क्रियता येण्याचाच जादा संभव आहे. ''संपूर्ण स्वातंत्र्य'' हें युवक परिषदेचे ध्येय अत्यंत श्रेष्ठ आहे यांत शंका नाहीं. पण ध्येयाची श्रेष्ठता क्रियाशक्तीला चालना देते हा नियम मात्र नेहमींच खरा असतो असें नाहीं. उलट ध्येय जितके श्रेष्ठ तितके अपयशाचे प्रसंग जास्त असतात. निष्क्रीयता येते ती त्या मुळेंच. सर्वच जण कांहीं सुभाषचंद्र अगर जवाहिरलाल नसतात.

कोणत्याही चळवळींत असल्या निधड्या लोकांपेक्षां साधारण प्रतीच्या लोकांचाच भरणा जास्त असतो. असल्या साधारण प्रतिच्या लोकांना झेपेल असा कार्यक्रम पुढे ठेवल्यास तो यशस्वी होतो. परिस्थितीचीं व मनुष्य स्वभावाचीं बंधनें लक्षांत न घेतां म. गांधींनीं असहकारितेची चळवळ पुकारिली, तिची गत काय झाली हे आपण पाहिलेंच आहे. अपयश हा गुन्हा नाहीं हे खरें. पण म्हणून अपयश नेहमीं घेत रहावें असे कोणीही म्हणणार नाहीं. असल्या अपयशांचे पर्यवसान निष्क्रियतेंत होतें हे जाणून, कोणत्याही चळवळीच्या प्रवर्तकांनीं आपल्या सर्वसाधारण अनुयायांना झेपेल असाच कार्यक्रम पुढें ठेवला पाहिजे.

पण ''संपूर्ण स्वातंत्र्या'' चा कार्यक्रम असा नाही. सुभाषचंद्र बोस व जवाहिरलाल नेहरू यांचे अनुयायी आज या कार्यक्रमाला टाळ्या वाजवीत असले तरी या बाबतींत सोसावे लागणारे अपयशाचे तडाखे सोसण्यास त्यांपैकीं किती जणांची तयारी असेल हा प्रश्नच आहे. त्यांच्या दौर्बल्यामुळें जी निष्क्रियता येईल तीच घातक ठरेल. ''वसाहतिक स्वराज्य'' वाले लोक Δ देशाचें नूकसान करणार नाहींत तितके ही निष्क्रियता करील. वसाहतीचे स्वराज्य व संपूर्ण स्वातंत्र्य यांच्यांत जी ही तेढ जवाहिरलाल प्रभृती युवकांनी उत्पन्न केली आहे, तिचें पर्यवसान हें असें आहे. मि. नरिमनला नको असणारा वादविवादच तिच्यामुळे माजला आहे. तो उपयुक्त असता तर गोष्ट निराळी होती. पण परिस्थितीची बंधनें लक्षांत घेतां तो अवास्तवपणाचा आहे. लोकांना द्विधाचित्त करून संशयाच्या भोंवऱ्यांत ढकलणारा व शेवटीं निष्क्रियता आणणारा असा तो आहे.

● ● ●

Δ पं. मोतीलाल नेहरू वगैरे लोक.

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. ४ जानेवारी १९२९.

२

काँग्रेस व सर्वपक्षीय परिषद

यंदाच्या काँग्रेसमध्येंही याच वसाहतिक स्वराज्य कीं संपूर्ण स्वातंत्र्य या प्रश्नावर धुमाळी माजली होती. सायमन कमिशनची घटना कांहीं राजकीय पुढाऱ्यांना अग्राह्य वाटून त्यांनीं हिंदुस्तानचे राजकीय भवितव्य ठरविण्यासाठीं 'सर्व पक्षीय परिषद' Δ बोलाविली होती ही गोष्ट सर्वांना माहितच आहे. या परिषदेनें स्वराज्याचा खर्डा तयार करण्यासाठीं पंडित मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी नेमली. प्रस्तुत कमिटीनें तयार केलेली स्वराज्यघटना नेहरू कमिटीचा रिपोर्ट म्हणून प्रसिद्ध आहे. वसाहतिक स्वराज्य ब्रिटीश पार्लमेंटनें हिंदुस्तानला ताबडतोब द्यावे अशी मागणी या रिपोर्टांत केलेली आहे. या मागणीला बहुतेक राजकीय पुढाऱ्यांचा पाठिंबा आहे. पण गतवर्षी मद्रास काँग्रेसमध्यें ज्यांनीं संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव पास करून घेतला, त्यांनीं मात्र, संपूर्ण स्वातंत्र्य हेच ध्येय नेहरू रिपोर्टात ग्रथित करण्यांत यावें अशी खटपट बऱ्याच दिवसांपासून चालविली आहे. पंडित जवाहरलाल नेहरू प्रभृती कांहीं चुकले तरी प्रामाणिक पणानें चुकणारे लोक या पक्षाचे धुरीण आहेत. पण या पक्षाला दुसरे कांहीं असे लोक मिळाले आहेत कीं त्यांचा राजकीय आयुष्यक्रम लोकांच्या दृष्टीनें अत्यंत अविश्वसनीय आहे. उदाहरणार्थ श्रीनिवास अय्यंगार. यांना निश्चित राजकीय मतें अशी कोणतींच नाहींत. येन केन प्रकारेण लोकांच्या पुढें नाचायला मिळाले कीं त्यांच्या राजकारणाचें चीज झालें. एकाद्या ठिकाणीं त्यांना नाचायला मिळालें नाहीं कीं अंगण वाकडें ही त्यांची ओरड ठरलेली आहे. हीच त्यांची वक्रनीति प्रस्तुत बाबतींतही दिसून येते. संपूर्ण स्वातंत्र्यांच्या चळवळींत ते मनापासून पडले आहेत अशांतला भाग नाही. ती चळवळ त्यांना मोतीलाल नेहरूंचें पुढारीपण हाणून पाडण्याचें साधन वाटत आहे. पंडित नेहरूंच्या जागीं जर श्रीनिवास अय्यंगारांचे नांव विराजमान होईल तर संपूर्ण स्वातंत्र्य आपल्या हातीं आलें असें म्हणून ते स्वस्थ बसतील यांत कांही शंका नाही.

संपूर्ण स्वातंत्र्यवादी पक्षाला मिळालेले इतर लोकही याच मनोवृत्तीचे आहेत. कांहीं दिवसांपूर्वी भरलेल्या ऑल इंडिया काँग्रेसकमिटीच्या बैठकींत या

Δ मे १९२८ मध्ये ही परिषद बोलविली गेली होती.

पक्षाचें मताधिक्य होऊन या लोकांनीं संपूर्ण स्वातंत्र्यावरील आपला विश्वास लोकनिदर्शनास आणला. परवां कलकत्ता येथें भरलेल्या सर्व पक्षीय परिषदेचे हेंच ध्येय मान्य करून नेहरू रिपोर्टांत अंतर्भूत करावें अशी सूचनाही त्यांनी पाठविली होती. सर्व पक्षीय परिषदेंतील बहुमत मात्र वसाहतिक स्वराज्याच्या बाजूचे होतें. पण कॉंग्रेसमध्ये या लोकांनीं मोठाच गडबडगुंडा माजविल्यामुळें त्यांचे म्हणणे पंडित मोतीलाल प्रभृती वसाहतिक स्वराज्याच्या पुरस्कर्त्यांना विचारांत घ्यावें लागलेंसें दिसतें. कदाचित या लोकाचें पाठबळ नाहीसें झाल्यास पार्लमेंटवर नेहरू रिपोर्टचा बोजा पडणार नाहीं अशीही भीति त्यांना वाटली असेल म्हणून त्यांनीं वसाहतिक-स्वराज्यपक्ष व संपूर्ण स्वातंत्र्यवादी पक्ष यांना एकत्र ठेवण्याची एक टुम काढली. म. गांधी यांचा जो तडजोडीचा ठराव कॉंगेसनें मान्य केला, तो याच स्वरूपाचा आहे. १९३० सालच्या डिसेंबरच्या आंत पार्लमेंटनें वसाहतिक स्वराज्य मान्य करावें; तसें न झाल्यास मग असहकारितेची व करबंदीची चळवळ सुरू करण्यांत यावी असा या ठरावाचा आशय आहे. या पोकळ धमकीत कांहीं अर्थ नाहीं हें म. गांधी जाणूनच असतील. अनुभवानें त्यांना तो धडा शिकविला आहेच. पण श्रीनिवास अय्यंगार प्रभृती संपूर्ण स्वातंत्र्याच्या आघाडीवरच्या चौघड्यांची तोंडें तात्पुरती बंद पाडण्यासाठीं त्यांनीं ही युक्ती केली असावी हें उघड आहे.

● ● ●

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. ४ जानेवारी १९२९.

३

सामाजिक परिषद

"या राजकारणापासून समाजकारणाकडे वळतांना सहारा वाळवंट सोडून एकाद्या हिरवळींत प्रवेश केल्याचा भास होतो. हल्लीचें राजकारण हा शुद्ध पोरखेळ होऊन बसला आहे, हें कॉंग्रेस, सर्व पक्षीय परिषद वगैरेंच्या हकिकती पाहिल्यास कोणासही कळून येईल. आणि याचें कारणही उघड आहे. हल्लींच्या राजकारणी लोकांत खराखुरा पुढारी असा कोणीच दिसत नाहीं. त्यामुळें सगळेच पुढारी, अशी स्थिति झाली आहे. या सर्व भूतांना ताब्यांत ठेऊन त्यांच्या कडून इच्छित काम करून घेणारा पंचाक्षरी हल्ली कोणीच नाहीं. त्यामुळें ही भूतें मोकाट सुटून त्यांनी राजकारणांत सांवळा गोंधळ घातला आहे.

पण सामाजिक चळवळीची परिस्थिति निराशाजनक असली तरी इतकी निराशाजनक नाहीं. उपमा द्यायची असल्यास असें म्हणतां येईल कीं राजकीय चळवळ अजीर्ण होऊन मरत आहे तर सामाजिक चळवळ, मरत असली तर, भुकेमुळें मरत आहे. वास्तविक ती मरत नाहीं. तिला मारण्याचें अनेक प्रयत्न झाले व आजही होत आहेत. टिळक-चिपळुणकरापासून तो परवां काशीला जमलेल्या ब्राह्मणांपर्यंत या प्रयत्नांची परंपरा येऊन पोंचते. टिळक-चिपळुणकरांनी सामाजिक सुधारणेची चळवळ मारण्यासाठीं कसेकसे प्रयत्न केले ते महाराष्ट्राच्या इतिहासात नमूद आहे. त्यांच्या घंटाबडव्यांनीं हिंदूसंघटनाच्या नांवाखालीं सामाजिक अंतःशुद्धीच्या चळवळीला गुदमरण्याचीं कसकशी कारस्थानें चालवलीं आहेत तें सर्वांना माहित आहे. काशीच्या ब्राह्मणसंमेलनानें * समाजसुधारणेच्या मुळावरच कुऱ्हाड कशी घातली हेही सर्वांना विदीत झालें आहे. हे प्रयत्न निराळ्या वेळीं, निराळ्या स्थळीं व निराळ्या लोकांकडून झाले. पण सुधारणेची हिंसा हें त्यांचें एकच ध्येय आहे. पण सुधारणेची चळवळ या सर्व प्रयत्नांना पुरून उरली आहे. तिच्या सैन्यांत, तिच्या विरोधकांच्या अपेक्षेबाहेर रिक्रुटभरती होत आहे. समाजसुधारणेशिवाय राजकीय चळवळीचीही धडगत नाहीं हें आतां सर्वांना पटूं लागलें आहे.

---

* : पाहा परिशिष्ट क्र. ४६, खंड-१९.

हिंदी राष्ट्रीय सामाजिक परिषदेचे △ अध्यक्ष या नात्याने बॅरिस्टर जयकर यांनीं जे भाषण † केलें तें या दृष्टीनें मननीय आहे. या भाषणांत बॅरिस्टर जयकरांनीं समाज सुधारणेचा आतांपर्यंतचा इतिहास सांगितला व आज ही चळवळ कोणत्या अवस्थेप्रत येऊन पोचली आहे हेंही निर्दिष्ट केलें. बॅ. जयकर हे नुस्ते सुधारक नसुन त्यांच्यांत सत्यशोधकी पाणी आहे हें या ठिकाणी सिद्ध झालें. तसें नसतें तर इतर सुधारकांप्रमाणे त्यांना अस्पृश्य व ब्राह्मणेतर या चळवळींचे रहस्य जाणतां आलें नसतें. पण त्यांनीं तें जाणलें आहे व समाजसुधारणेच्या इतिहासांत या चळवळींचे महत्त्व केवढें आहे हेही त्यांना समजलें आहे. आगरकरकालीन सुधारणेची व्याप्ति व या चळवळींची व्याप्ति यांतील फरक त्यांनीं जाणला आहे; व या चळवळींचे बाह्य स्वरूप कोणाला कितीही अप्रिय असलें तरी त्यांच्या अंतरंगीं समाज समतेची तीव्र तळमळ भरलेली आहे हेंही त्यांनीं पाहिलें आहे. बॅ. जयकर टिळक-चिपळूणकर परंपरेंत वावरत असले व आपली राजकीय मतें त्यांनीं त्या परंपरेला विकली असलीं, तरी त्यांचीं सत्यशोधकी सामाजिक मतें त्यांच्या या भाषणावरून स्पष्ट होतात. किती झाले तरी ते ब्राह्मणेतर आहेत. सामाजिक विषमतेची आंच त्यांना केव्हांना केव्हां लागली असणारच; व त्यामुळेंच त्यांनीं असें भाषण केलें तर नवल नाहीं. या भाषणांत असावी तितकीं भावनेची तीव्रता व जिव्हाळ्याची उत्कटता नाहीं. पण राजकारणी लोकांना समाजसुधारणेची आवश्यकता पटत चालली आहे असें जें बॅ. जयकर यांनीं म्हटलें आहे त्याचें हें भाषण स्पष्ट निदर्शक आहे. त्यांनीं सुचविलेली समाजसुधारणेसाठीं सरकारी कायद्याची आवश्यकता राजकारणी लोकांच्या बदलत्या दृष्टीकोणाचें गमक आहे. ''[१]

△ : राजकीय प्रगतीसारखेच सामाजिक सुधारणांसंबंधी कॉंग्रेसच्या अधिवेशनात विचारविनिमय व ठराव करण्यात यावेत असा दृष्टीकोन असणारे काही गृहस्थ होते. सामाजिक परिषद कॉंग्रेसच्या अधिवेशनात दरवर्षी भरवावी असा त्यांनी विचार मांडला व कॉंग्रेसच्या सूत्रधारांनी तो मान्य केला. १८८७ च्या डिसेंबरमध्ये कॉंग्रेसचे अधिवेशन मद्रासला भरले, तेंव्हा त्यात सामाजिक परिषद पहिल्यांदा भरविण्यात आली. या परिषदेचे अध्यक्ष राजा सर टी. माधवराव हे होते. १८८७ पासून १८९४ पर्यंत या परिषदा कॉंग्रेसच्या मंडपात भरविण्यात आल्या. १८९५ चे अधिवेशन पुण्यात भरविण्याचे ठरले तेव्हा सामाजिक परिषदेचे अधिवेशन कॉंग्रेसच्या मंडपात भरू द्यावयाचे नाही असा पुण्यातील जीर्णमतवाद्यांनी चंग बांधला. त्यावेळी टिळकांनी त्यांची बाजू घेऊन व अनेक युक्त्या प्रयुक्त्या योजून सामाजिक परिषद भरवू इच्छिणाऱ्या सुधारकांना हैराण केले. सामाजिक परिषदेच्या मंडपाला आग लावू व सुधारकांना बडवून काढू अशाही जाहीर धमक्या दिल्या गेल्या. सुधारकांचे अग्रणी न्यायमूर्ती रानडे, गोपाळ कृष्ण गोखले वगैरे पुढाऱ्यांनी संयम राखून माघार घेतली व सालाबादाप्रमाणे कॉंग्रेसच्या मंडपात सामाजिक परिषद न भरता ती पोलीस संरक्षणात वेगळी भरविली गेली. तेव्हापासून सामाजिक परिषदा वेगळ्याच भरविल्या जाऊ लागल्या.

† : पाहा, परिशिष्ट क्र. १.

१ : प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. ४ जानेवारी १९२९.

४

पानगलच्या राजाचा मृत्यू

मद्रासच्या ब्राह्मणेतरपक्षाचे पुढारी रामराय निंगार उर्फ पानगलचे राजेसाहेब यांच्या निधनामुळें एक कर्तृत्वशाली व्यक्ती देशांतुन नाहींशी झाली आहे. मद्रासच्या ब्राह्मणेतरपक्षानें तिकडील ब्राह्मणेतर जनतेची ब्राह्मणीवर्चस्वापासून सुटका करण्यांत जें अप्रतिम यश संपादन केलें त्यांच्या श्रेयाचा मोठा वाटा राजेसाहेबांकडे जातो. डॉ. नायर व सर त्यागराय चेट्टी यांच्यानंतर ब्राह्मणेतर पक्षाला राजेसाहेबांसारखा खंदा पुढारी लाभला नसता, तर शाहुछत्रपतीच्या पश्चात् मुंबईच्या ब्राह्मणेतर पक्षाची जी अवस्था झाली आहे तीच मद्रासच्या ब्राह्मणेतर पक्षाची झाली असती. सारेच पुढारी पण खरा पुढारी कोणीच नाहीं. या अवस्थेंतुन कोणतीही चळवळ बचणें कठीण असते, पण राजेसांहेबामुळें मद्रासच्या ब्राह्मणेतर पक्षावर ही आपत्ती ओढवली नाहीं व त्यामुळे तो पक्ष महत्वाचीं कामें पार पाडूं शकला. मुंबईपेक्षांही मद्रासच्या ब्राह्मणेतर जनतेवर ब्राह्मणशाहीच्या वर्चस्वाची पकड जास्त बळकट आहे. ब्राह्मणेतर पक्षाला मारण्यासाठीं सरकारचे सहाय्य घेण्यासही तिकडील **स्वराजिस्ट व संपूर्ण स्वातंत्र्यवादी** ब्राह्मण तयार असतात. अशा स्थितींतून ब्राह्मणेतर चळवळ चालवणें कठीण तर खरेंच पण राजेसाहेबांमुळे ते सुकर झालें. स्वतांचें घोडे पुढे न दामटतां इतरांना योग्य मानमरातब देऊन त्यांच्या हातुन कामें करून घेणें हा पुढारीपणाचा अत्यावश्यक गुण त्यांच्या अंगीं होता. त्यामुळेंच त्यांना हें कार्य करतां आलें.

राजेसाहेबांच्या कारकिर्दीतील ब्राह्मणेतर पक्षाचा इतिहास संस्मरणीय आहे. या अवधींत मोठमोठ्या अधिकाराच्या जागा ब्राह्मणेतर पक्षानें काबीज केल्या, व अशा तऱ्हेनें ब्राह्मणीवर्चस्वाचा सरकारी पाठिंबा पुष्कळच ढिला करून टाकला. देवस्थान बिलही याच कारकिर्दीत पास झालें; व समाजसुधारणा व सरकारी कायदा यांची सांगड जुळविली गेली. या अपूर्व यशाच्या मुळाशीं राजे साहेबांची निःस्वार्थ बुद्धी आहे हें विसरून चालणार नाहीं. ते स्वतः श्रीमंत होते. पण इतर श्रीमंत लोकाप्रमाणें ते जनतेपासून अलग राहिले नाहींत अगर बोलघेवड्या राजकारणाशीं तद्रूप झाले नाहींत. जनतेला झुलविण्यासाठीं नव्हे तर तिच्या हितासाठीं ते सार्वजनिक कार्यात पडले व तेंच ध्येय डोळ्यापुढें ठेऊन त्यांनीं काय करतां येईल तें केलें. सरकारशीं सहकार्यही केलें व विरोधही

केला. पण विरोध म्हणजे कृतिशून्य वावदूकपणा ही जशी त्यांची व्याख्या नव्हती तसेंच सहकार्य करायचें म्हणजे सरकारच्या भृकुटीभंगाचे दास झाले पाहिजे असेंही त्यांना वाटत नव्हतें. राजेसाहेब मृत्युवश झाले असले तरी त्यांचे हे गुण अनेकांना मार्गदर्शक होण्यासारखें आहेत.

●●●

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. ४ जानेवारी १९२९.

५

अस्पृश्य कीं पूर्वास्पृश्य

कोंकण प्रांतिक बहिष्कृत शिक्षण परिषद लवकरच भरणार आहे. या बाबतींत आमचेकडे आलेलें जाहिर पत्रक † आम्हीं दुसरीकडे छापलें आहे. या पत्रकांत बहिष्कृत अगर अस्पृश्य शब्द न वापरता पूर्वास्पृश्य हा शब्द योजला आहे. ही टूम कोणी काढली हें आम्हांला नक्की माहीत नाहीं. पण ती कोणातरी स्पृश्य वर्गीय हिंदूच्या डोक्यांतून निघाली असावी असा आमचा तर्क आहे. तिचा हेतु जाणणें कठीण नाही. तू गुलाम आहेस असें स्पष्ट शब्दांत गुलामाला सांगितले म्हणजे तो गुलामगिरी विरूद्ध बंड करतो. पण तू गुलाम होतास, आतां नाहींस, असें म्हटलें कीं त्यांच्या मनांतील बंडाचा आवेश पुष्कळ कमी होतो. हें जाणूनच अस्पृश्यवर्गाला कायम गुलामगिरींत ठेवू इच्छिणाऱ्या स्पृश्य हिंदूनीं ही गोडबोली टूम काढली असली पाहिजे. अस्पृश्यवर्गानें या बाबतींत जाणलें पाहिजे तें हें कीं आपली अस्पृश्यता ही अद्याप भूतकालीन बाब झाली नाहीं, आपण अद्याप अस्पृश्यच आहों, व या अस्पृश्यतेविरूद्ध आपल्याला झगडायचें आहे व तें स्पृश्यवर्गाशीं झगडायचें आहे. यापासून आपल्याला परावृत्त करण्यासाठीं डोकेबाज स्पृश्य लोक वाटेल त्या युक्त्या योजतील. तुम्हीं हल्लीं अस्पृश्य नाहींत असें सांगतील अगर तुम्हांला अस्पृश्य म्हणणें आमच्या ज़ीवावर येतें म्हणून आम्हीं तुम्हाला पूर्वास्पृश्य म्हणतो असाही बहाणा करतील. या युक्त्यांनीं अस्पृश्यवर्गानें फसतां उपयोगी नाहीं. आपल्या रोगाचा स्पष्ट उल्लेख करण्यांत कोणाला लाज कां वाटावी ?

● ● ●

---

† : पाहा, परिशिष्ट क्र. २.

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. ४ जानेवारी १९२९.

६

स्पृश्यांची '' खासगी मालकी. ''

कोचीन संस्थानांतील धर्मशाळा, विहीरी, तलाव वगैरें सार्वजनिक ठिकाणें अस्पृश्यांना खुली करण्यांत यावी असा ठराव त्या संस्थानच्या कायदेमंडळापुढे मि. मॅथ्यु नांवाच्या सभासदानीं आणला होता. हा ठराव पास झाला असता तर जीं सार्वजनिक ठिकाणें अस्पृश्यांना खुली करण्यांत येणार होती तीं महाडच्या चवदार तलावाप्रमाणें स्पृश्य हिंदूंच्या '' खासगी मालकीं '' ची नव्हतीं, तर कोचीन संस्थाननें सरकारी खर्चानें चालविलेली होतीं. सरकारी मत्ता म्हटली कीं तिच्यावर सर्व प्रजाजनांचा सारखा हक्क आहे व अस्पृश्य हे प्रजाजन असल्यामुळें त्यांना स्पृश्यांप्रमाणें तो हक्क आहे हें सांगणें नकोच. पण स्पृश्य हिंदूंच्या माणुसकीचे इतकें दिवाळें वाजलें आहे कीं त्यांना ही साधी गोष्टही कळत नाहीं. तसें नसतें तर प्रस्तुत ठरावाला त्यांनीं विरोध केला नसता. आपल्या '' खासगी मालकी '' च्या ठिकाणीं त्यानीं अस्पृश्यांना मज्जाव केला तर तो सकारण आहे असें एक वेळ म्हणतां येईल. पण या शंभरनंबरी सार्वजनिक ठिकाणीं त्यांनीं आपल्या '' खासगी मालकी '' ची अर्गला आडवी लावावी हा अमानुषपणाचा कळस होय. शासनसंस्थेलाही स्पृश्यलोक स्वतःच्या '' खासगी मालकी '' ची समजतात असें अनुमान अस्पृश्यांनीं यावरून कां काढूं नये ? व ज्या स्वराज्यासाठीं स्पृश्य लोक धडपडत आहेत ते त्यांच्यांच ''खाजगी मालकी'' चें स्वराज्य होईल असें त्यांनीं कां म्हणूं नये ?

●●●

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. ४ जानेवारी १९२९.

७

नेहरू कमिटीची योजना व हिंदुस्थानचें भवितव्य

''मध्यंतरीच्या काळात काँग्रेसने एक सर्वपक्षीय परिषद बोलविली होती. ही परिषद प्रथम १९२८ च्या फेब्रुवारी महिन्यात व नंतर मे महिन्यांत भरुन तिने पंडित मोतीलाल नेहरू ह्यांच्या नेतृत्वाखाली हिंदी स्वराज्याच्या राज्यघटनेचा आराखडा तयार करण्यासाठी एक समिती नेमली. नेहरू समितीने १९२८ च्या जूनपासून ऑगस्ट पर्यंत काम केले आणि राज्यघटनेचा खर्डा तयार केला.

राज्यघटना तयार करण्याचा हा पहिला हिंदी प्रयत्न होता. तिचा उद्देश मुख्यतः हिंदी मुसलमानांचा विरोध कमी करण्याचा होता. दलित वा पददलित समाजांविषयी नेहरू समितीच्या वृत्तांतात म्हटले होते की, 'राज्यघटनेविषयी' आम्ही ज्या सूचना केल्या आहेत, त्यात दलित वर्गाच्या विधिमंडळातील प्रतिनिधित्वाविषयी विशिष्ट अशी तरतूद केलेली नाही.' हे कार्य स्वतंत्र मतदार संघ निर्माण करून किंवा सदस्यांची नियुक्ती करुन साधता येण्यासारखे आहे. तथापि, हे दोन्ही मार्ग अपायकारक नि सदोष असल्याने त्यांपैकी एकही मार्ग स्वीकारावयास योग्य वाटला नाही, असे नेहरू समितीचे मत पडले. तिच्या मते मूलभूत हक्कांचा जाहीरनामा हाच दलितांच्या सर्व दुखांःवर रामबाण उपाय होता.

काँग्रेसच्या कार्यकारी मंडळाने मुसलमान, शीख, पारशी, खिश्चन, ॲग्लो इंडियन यांच्या प्रमुख सदस्यांना, इतकेच नव्हे तर ब्राह्मणेतरांच्या संस्थांना नि द्रविड महाजनांच्या संस्थेलाही सर्वपक्षीय परिषदेसाठी आमंत्रिले होते. परंतु डॉ. आंबेडकरांनी संस्थापिलेल्या दलित वर्गाच्या संस्थेलाच नव्हे तर भारतातील दलित वर्गाच्या कोठल्याही संस्थेला पाचारण केले नव्हते.'' यावरून राष्ट्रीय सभेचा अस्पृश्य वर्गाच्या प्रश्नांच्या समस्येकडे पाहण्याचा दृष्टिकोन कसा होता याविषयी चांगलीच कल्पना येते. तरी बरे की दहा वर्षापूर्वी साऊथबरो मंडळापुढे डॉ. आंबेडकरांची साक्ष झाली होती. तरीसुद्धा नेहरू समितीच्या शिफारशींसंबंधी डॉ. आंबेडकरांचे मत विचारार्ह नि माननीय आहे. नवीन प्रांतनिर्मितीच्या मुसलमानांच्या दुष्ट काव्यास बळी पडलेल्या नेहरू समितीच्या शिफारशींत 'हिदूंना धोका, तसेच हिंदुस्थानवर अरिष्ट आहे' अशी डॉ. आंबेडकरांनी भयसूचक घंटा वाजविली होती. मोतिलाल नेहरू मुसलमानधार्जिणे होते, हाच त्यांचा अभिप्राय होता.

'हिंदूसमाजाचा आमच्यावर रोष आहेच. त्यात मुसलमान समाजाच्या रोषाची भर पडणार हे बरे नव्हे, हे आम्हांला कळत आहे. पण ज्यात आमच्या देशाचे अकल्याण आहे त्यात आमचेही अकल्याण आहे, अशी आमची भावना असल्यामुळे ही जोखीम आम्ही आमच्या शिरावर घेतली आहे. हाडाचे देशभक्त डॉ. आंबेडकरांनी यांनी त्या वेळी असा टाहो फोडला. या काळात तरवार नि लेखणी यांच्या प्रतीकाने आपल्या जीवनकार्याचा निःस्पृहपणे संदेश देणाऱ्या त्या ज्ञानी नि द्रष्ट्या पुरुषाचे बोल पुढे खरे ठरले.''[१]

(मोतीलाल नेहरू समितीच्या शिफारशींवर लोकांच्या आग्रहास्तव डॉ. आंबेडकरांनी उपरोक्त शीर्षकाचा अग्रलेख बहिष्कृत भारतात लिहून स्वतःची प्रतिक्रिया व्यक्त केली. तोच प्रस्तुत अग्रलेख–संपादक)

१९२८ सालच्या मे महिन्यात राजकारणात वावरत असलेल्या सर्व पक्षांच्या वतीनें स्वराज्याची घटना तयार करण्याकरितां पंडित मोतिलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखालीं एक कमिटी नेमण्यांत आली होती. या कमिटीचा रिपोर्ट प्रसिद्ध होऊन बराच काळ लोटला. रिपोर्ट प्रसिद्ध झाल्या दिवसापासून त्यावर सर्वत्र टीका चालू होती. त्या टीकाकारांत कांहीं रिपोर्टातील योजनेच्या बाजूनें व कांही तिच्या लोकमतास चालना देत होते. रिपोर्टातील स्वातंत्र्याच्या योजनेवर फार मोठेंच रण माजलें होतें. शेवटीं बरीच भवति न भवति होऊन गेल्या डिसेंबर महिन्यांत कलकत्ता येथें भरलेल्या कॉंग्रेसमध्यें सदरील कमिटीच्या योजनेंत दुरुस्ती होऊन ती मान्य करण्यात आली. आम्ही मात्र या नेहरू कमिटीच्या रिपोर्टाबद्दल आमचें मत स्पष्टपणें जाहीर केलेलें नव्हतें. तरी पण त्या रिपोर्टाची होत असलेली वाच्यता आमच्या वाचकांच्या कानावर गेल्याशिवाय राहिली नाहीं. त्याचा परिणाम असा झाला कीं, आमच्या वाचकांपैकीं कांहीं जणांनी नेहरू कमिटीच्या रिपोर्टासंबंधीं तुमचे काय मत आहे, अशी पृच्छा आमच्याकडे केली आहे. आमच्या या जिज्ञासू वाचकांची इच्छापुरी करणें हें आमचें कर्तव्य आहे. आणि म्हणून प्रस्तुत विषयाची चर्चा करण्याचें आम्ही योजिलें आहे.

कोणत्याही देशांतील राज्यकारभार सुरळितपणें चालण्यास त्याला कसल्यातरी प्रकारची, बरी वाईट, राज्यघटना आवश्यक असावी लागते. तिच्याशिवाय भागत नाही. आणि म्हणूनच दरेक सुधारलेल्या देशात एक तऱ्हेची राज्यघटना अस्तित्वांत असते. त्याप्रमाणें आपल्या या देशांतहि एक प्रकारची राज्यघटना प्रचलित आहे. इतकेंच नव्हें, तर ज्या प्रजासत्तात्मक स्वराज्याकरितां सारे राजकारणवादी लोक कंठशोष करीत आहेत, त्याच स्वराज्याच्या कोंदणांत

---

१ : कीर, पृ. १२०-१२१.

बसविलेली राज्यघटना या देशांत सन १९२१ पासून प्रस्तापित करण्यांत आलेली आहे. राजकारणवादी लोकांपुढे जर कोणता प्रश्न उरला असला तर आहे त्या राज्यघटनेंतील स्वयंसत्तेचे मूळ सर्वव्यापी कसें होईल, अशी दुरुस्ती करणें एवढाच होय. सुदैवानें हल्ली प्रस्तापित असलेली स्वराज्यघटना इतकी लवचिक आहे कीं तिच्यांत वाटेल त्या प्रकारची दुरुस्ती सहजगत्या करतां येण्यासारखी आहे. दुरुस्ती करण्याचें साधें सोंपे काम बाजूस टाकून सगळीच उलथापालथ करून नवी करकरीत राज्यघटना उभी करण्याचें बिकट कार्य नेहरू कमिटीला अंगावर घेण्याची कांही जरूरी नव्हती. सुव्यवस्थित अशी राज्यघटना अस्तित्वांत असतां नसती भानगड उपस्थित करून नवी योजना तयार करावयास नेहरू कमिटी सिद्ध झाली, याचा आम्हास विस्मय वाटतो ! हा व्यर्थ शीण घेण्याचीं दोन कारणें संभवतात. त्यापैकी नव्या कृतीची हौस, हें एक कारण असलें पाहिजे. ''प्रतिसृष्टीचा अपरधाता'' होऊन मिरविण्याची हौस नुसत्या विश्वामित्रास होती, असें नव्हे. विधाता होण्याची हौस ही विश्वमित्रापासून तों साध्या माणसापर्यंत सर्वात दिसून येते. नव्याची मांडणी करुन आपले नांव अजरामर करावें या भावनेचें मूळ सर्वांच्या अंतःकरणात रुजलेले असतें. स्वराज्याची नवी योजना तयार करतांना नेहरु कमिटी याच भावनेला बळी पडली असावी असें दिसतें. शिवाय अकृतत्वाची लाज हें एक कारण असल्याचें संभवतें. आज चाळीस वर्षे राजकारणांत मुरलेल्या लोकांनी राज्यघटना तयार करण्याच्या बाबींत इंग्रजांच्या तोंडाकडे बघावे व ते ठरवितील ती राज्यव्यवस्था पत्करावी, ही गोष्ट त्यांच्या इभ्रतीस शोभण्यासारखी नाहीं. अशानें कॉंग्रेसमध्यें सामील असलेले लोक षंढ व अविचारी असून अनभ्यासीहि आहेत, असा ठपका त्यांच्यावर येण्याचा संभव आहे. तो ठपका न यावा व इंग्रजाप्रमाणें राज्यघटनेची घडामोड करण्यांत आपणहि पटाईत आहोंत, हे सिद्ध करून देण्याकरिता हा उद्योग नेहरू कमिटिनें आरंभिला असावा असें वाटतें. असो ! या प्रश्नांशी आम्हांस विशेष कर्तव्य नाहीं. नेहरू कमिटीनें जी स्वराज्याची योजना तयार केली आहे, तिचे गुणदोष तपासून पाहणें, एवढेच कार्य आज आम्हास करावयाचें आहे.

कोणत्याहि स्वराज्याच्या योजनेंत जर ती स्वराज्ययोजना प्रजासत्तात्मक पद्धतीची असेल तर तिच्यांत मतदार संघाचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा होऊन राहतो. जेथें मतदार संघाची घटना जबाबदार राज्यपद्धतीच्या दृष्टीनें अयोग्य असेल तेथे स्वराज्य म्हणजे नुसतें सोंग आहे हें सर्वास मान्य करावें लागेल. म्हणून प्रथमतः नेहरू कमिटीनें मतदारसंघाच्या बाबतींत सादर केलेली योजना जबाबदार राज्यपद्धतीच्या दृष्टीनें कितपत उपयुक्त आहे, याचा विचार करूं.

हल्लींच्या राज्यपद्धतींत तीन प्रकारचे मतदारसंघ अस्तित्वात असल्याचें आढळून येते. कांही मतदारसंघ नुसतेच स्थलवाचक आहेत. कांही स्थलवाचक असून जातिवाचक आहेत. कांही नुसतेच जातिवाचक आहेत. बाकी वर्गवाचक आहेत. स्थलवाचक–जातिवाचक संघ मागासलेल्या हिंदूंकरिता निर्माण करण्यांत आलेले आहेत. त्यांत सर्व जातींच्या मतदारांचा संमिश्रित असा संघ असला तरी मागासलेल्या जातींचे प्रतिनिधी निश्चितपणे निवडून यावे म्हणून कांही जागा राखीव म्हणून ठरविण्यांत आलेल्या आहेत. स्वतंत्र जातिवाचक संघ हे मुसलमानांकरितां प्रस्थापित करण्यांत आलेले आहेत. व वर्गवाचक संघ हे व्यापारी, उदमी, व इनामदार, वगैरे वर्गांकरिता योजिलेले आहेत. हल्ली अस्तित्वांत असलेल्या मतदार संघांसंबंधी दोन पक्ष उपस्थित झालेले आहेत. एका पक्षाचे म्हणणें असें आहे की, स्थलवाचक मतदार संघाशिवाय इतर प्रकारचे जे मतदार संघ आहेत ते सर्व जबाबदार राज्यपद्धतीच्या मूल तत्वांशीं विसंगत व विरोधी आहेत. दुसऱ्या पक्षाचें मत असें आहे कीं, ज्या देशांत जातिभेदाचा, धर्मभेदाचा इतका पगडा मनावर बसला आहे कीं, माणसांच्या माणुसकीला किंवा त्यांच्या मताला किंमत न देतां केवळ त्याच्या जातीलाच किंमत देण्यांत येते, त्या देशांत मतदार संघ जातिवाचकच असले पाहिजेत. या दोन्ही पक्षांच्या लोकांना आम्ही दुराग्रही असें समजतो. हिंदुस्थानांत सर्वत्र स्थलवाचक मतदार संघ स्थापन करण्यात यावेत व जातीभेदाच्या परिणामांकडे मुळींच लक्ष पुरविण्यात येऊ नये, हें म्हणणें जितकें भ्रामक व लबाडीचें आहे तितकेंच जातिभेद व धर्मभेद मानलाच पाहिजे, नव्हे, त्याशिवाय दुसरा कसल्याही प्रकारचा हितसंबंध मतदार संघ तयार करतांना ध्यानांत येऊं नये, हें म्हणणें मूर्खपणाचें आहे. स्थलवाचक मतदार संघ असल्याखेरीज जबाबदार राज्यपद्धति अस्तित्वांत येऊं शकत नाही, व जातिवाचक संघ असल्याखेरीज जातिभेदाच्या दडपणाखाली गडदुन गेलेल्या जातींना तरणोपाय नाही. हें निर्विकल्पपणें विचार करणाऱ्या कोणाहि माणसास मान्य करणें भाग आहे. अशा निर्विकल्प दृष्टीनें पाहिलें असतां हल्ली अस्तित्वात असलेल्या मतदार संघात अत्यंत अनिष्ट असा एकादा मतदार संघ असेल तर तो मुसलमानांकरिता स्थापन केलेला स्वतंत्र जातिवाचक मतदार संघ हा होय. या देशाच्या राजकारणांत बेजबाबदारी व बेबंदशाही माजली असेल तर त्याला मुख्य कारण म्हणजे हा मुसलमानांकरितां स्वतंत्र स्थापन केलेला जातिवाचक मतदार संघ होय. वर्गवाचक संघालाहि कमिजास्त प्रमाणानें तोच आक्षेप लागूं पडतो. या मतदार संघामुळें एखाद्या अल्पशा व विशिष्ट प्रकारच्या हितसंबंधानें बद्ध झालेल्या मतदारांतर्फे निवडून आलेल्या प्रतिनिधींस सार्वजनिक हितसंबंधाच्या प्रश्नांवर मत देण्याचा अधिकार प्राप्त होतो. असला हा मतदार

संघ नाहीसा होणे आवश्यक आहे. ब्राह्मणेतर वर्गाकरिता निर्माण करण्यांत आलेल्या स्थलवाचक–जातिवाचक संघांस वरील आक्षेप लागूं पडत नाही. अशा संघांतून निवडून आलेला प्रतिनिधी बेजबाबदार असतो असे कोणासही म्हणतां यावयाचें नाही. फार तर दुसऱ्या जातींतून त्याच्याहिपेक्षां लायक उमेदवार उपलब्ध झाले असते, असें म्हणतां येईल. परंतु हा आक्षेप मोठासा आहे, असे आम्हास वाटत नाही. राजकारणांत लायकीपेक्षां जबाबदारीचें महत्त्व विशेष आहे व जबाबदारीच्या दृष्टीनें पाहिलें तर, स्थलवाचक––जातिवाचक संघापासून राष्ट्राचें कांहीं मोठेसें नुकसान होतें असें म्हणतां येत नाहीं. नेहरू कमिटीनें मतदार संघाच्या बाबतीत जी योजना केली आहे, ती अशी कीं मागासलेल्या हिंदूंकरितां व व्यापारी व इनामदार वर्गाकरितां अस्त्विांत असलेलें संघ काढून टाकले व त्यांच्याऐवजी सर्वत्र स्थलवाचक संघ स्थापन करण्याचें ठरविलें आहे. जणूं बिया करितां मुसलमानांना राखून ठेवावे म्हणून कीं काय त्यांच्याकरितां अस्तित्वांत असलेले स्वतंत्र जातिवाचक संघ काढून घेऊन स्थलवाचक––जातिवाचक संघाची सवलत कमिटीनें त्यांना दिली आहे. मुसलमानांचे स्वतंत्र जातिवाचक संघ काढून टाकले हें नेहरू कमिटीच्या रिपोर्टाचें मोठें गुह्य आहे. आणि या रिपोर्टाचें जें एवढें स्तोम माजविण्यांत आलें आहे तें यामुळेंच होय. परंतु कमिटीचा उदो उदो करणाऱ्या तिच्या भक्तांस असा आमचा सवाल आहे कीं, स्थलवाचक मतदार संघाशिवाय दुसऱ्या कोणत्याहि प्रकारचा मतदार संघ राष्ट्रहितास विघातक आहे, असें जर नेहरू कमिटीचें मत आहे तर मुसलमानांच्या बाबतींत तीच पद्धत कमिटीनें कां लागूं केली नाहीं ? मागासलेल्या हिंदुकरितां घडविलेले जे स्थलवाचक–जातिवाचक संघ राष्ट्रहिताच्या दृष्टीनें नुकसानकारक आहेत, म्हणून टाकाऊ ठरविण्यांत आले तेच स्थलवाचक–जातिवाचक संघ मुसलमानांकरितां निर्माण करण्यांत कमिटीला कसा मुळींच दुगदा वाटला नाहीं, याचें आम्हास तरी आश्चर्य वाटतें. जी पद्धत एका वर्गाला लागूं केली असतांना सदोष म्हणून काढून टाकण्यांत येतें, तीच पद्धत दुसऱ्या एका वर्गाला निर्दोष म्हणून लागूं करण्यांत येते, हा तर्कशास्त्राचा विचित्र मांसला कमिटीच्या रिपोर्टात पहावयास सांपडतो. कदाचित्, कोणी असें म्हणतील की मागासलेल्या हिंदूंचा वर्ग बहुसंख्यांक आहे व मुसलमानांचा वर्ग हा अल्पसंख्यांक आहे. म्हणून जीं सवलत मागासलेल्या हिंदूंना देण्याचें कारण नव्हतें ती सवलत मुसलमानांना देणें भाग होते. व ती देतांना तिचें स्वरूप जितकें निर्दोष करण्यांत येईल तितकें निर्दोष करण्यांत आलें आहे. यावर आमचें असें उत्तर आहे कीं, जी सवलत मुसलमानांना दिल्यानें राष्ट्राचें नुकसान होत नाहीं तीच सवलत मागासलेल्या हिंदूंना जर आणखीं कांही दिवस देण्यांत आली असती

तर काय बिघडलें असतें ? परस्परांतील चढाओढींत महत्त्व असते तें संघटनेला असतें. नुसत्या संख्येला नसतें. दुहीनें फाटलेला व मनानें परवश झालेला समाज संख्येनें कितीहि मातलेला असला तरी आत्मीय भावनेनें एकजीव झालेल्या व स्वत्त्वाला जागलेल्या अशा संख्येनें घटलेल्या समाजापुढें त्याचा निभाव लागणें अशक्य आहे. हा व्यवहारांतील नियम जो ओळखील त्याला सुसंघटींत अल्पसंख्यांक वर्गाला ज्या सवलती देणें अवश्य आहे त्याच सवलती बहुसंख्यांक वर्गाला तो विस्कळीत व मागासलेला असल्यामुळें देणें इष्ट आहे, हें मान्य करावें लागेल. आतां सवलती द्यावयाच्या त्या अल्पसंख्यांकांशिवाय दुसऱ्या कोणासच द्यावयाच्या नाहींत, हा सिद्धांत पाळण्याचा जर कमिटींने दृढनिश्चय केला होता तर ज्या सवलती कमिटीनें मुसलमानांना दिल्या त्याच सवलती कमिटीनें अस्पृश्य वर्गाला कां दिल्या नाहींत ? सर्वांत अल्पसंख्यांक लोक असतील तर ते अस्पृश्य लोक होत. अस्पृश्य लोकांइतके दारिद्र्यानें पिडलेले व अन्यायांनीं त्रस्त झालेले दुसरे लोक नाहींत. सर्वांत अज्ञानामुळें संरक्षण करण्यांत असमर्थ असलेले लोक म्हणजें अस्पृश्य लोक होत. अस्पृश्यतेच्या कलंकामुळें राजकीय हक्कांना पारखा झालेला अस्पृश्यवर्गाशिवाय दुसरा वर्ग नाही. ज्याच्या उन्नतीला हातभार लावण्याची समाजानें कधीं काळजी घेतली नाहीं व ज्याच्या अवनतीला धर्माची सबब पुढे करून हिंदुसमाज कारणीभूत होतो, त्या अस्पृश्यसमाजाला मुसलमानांच्या सहस्त्रपटीनें राजकीय संरक्षणाची आवश्यकता आहे. केवळ बुडत्याला हात द्यावयाचा या तत्त्वानुसार मुसलमानांच्या आधीं अस्पृश्यांची तरतूद करणें अवश्य होतें. परंतु तसें कांही न करिता ' तरत्याला हात व बुडत्याला लाथ ' या कुटिलनीतीचा कमिटीनें अवलंब केला. अस्पृश्यांना कांही सवलती नकोत. त्यांचा प्रश्न सामजिक स्वरूपाचा असून तो शिक्षणानें सुटण्यासारखा आहे, असा अभिप्राय देऊन नेहरू कमिटी मोकळी झाली आहे.

अस्पृश्यांचा प्रश्न जर सामाजिक आहे तर मुसलमानांचा प्रश्न सामाजिक नाही काय ? श्रेष्ठ जातीच्या वक्र दृष्टीचा दोष जसा अस्पृश्यांना भोगावा लागतो तसा मुसलमानांनाही भोगावा लागतो. त्या शिवाय मुसलमानांना दुसरी कोणती व्यथा लागली आहे कीं, जिच्या पासून मुसलमानांचें संरक्षण करणे अवश्य आहे, व अस्पृश्यांचे संरक्षण करण्याची जरूरी नाही ? दृष्टीदोषाची पिडा उभयतांना सारखीच आहे. एकाची पिडा शिक्षणानें जर निवारेल अशी कमिटीला खात्री वाटते तर मग त्याच सबबीवर मुसलमानांची खातर जमा करून कमिटी स्वस्थ कां बसली नाही ? आपल्या या कृत्याला सिलोन कमिशनच्या रिपोर्टाचा आधार कमिटीनें दिला आहे. परंतु सिलोन कमिशननें अस्पृश्यांना राजकीय सवलती

दिल्या नाहींत याचें कारण त्यांनी त्या कोणालाच दिल्या नाहींत. अस्पृश्यांना दिल्या नाहींत तशा मुसलमानांनाहीं दिल्या नाहीत. सिलोन कमिशनसारखा निःपक्षपातीपणा नेहरू कमिटीने दाखविला असतां व अस्पृश्यांना वागविलें तसें मुसलमानांना वागविलें तर अस्पृश्यांना राखीव जागा कमिटीने न दिल्याचा आम्ही विषाद मानला नसतां. अस्पृश्यांना कांहीं प्रमाणांत राखीव जागा मिळाल्यानें त्यांच्या हाती मोक्ष येईल असें मानण्याइतके दुधखुळे कोणी नाहीत. राखीव जागांची संख्या कितीही वाढली तरी कायदेकौन्सिलांत अल्पसंख्यांक लोक अल्पसंख्यांकच राहणार आहेत. बहुसंख्याक लोकांच्या जुलमापासून अल्पसंख्याकांची सुटका होण्यास राखीव जागेची मात्रा केव्हांही झाली तरी अपुरीच पडणार आहे. जुलमी बहुसंख्यांकाविरुद्ध बंड करून आपला तरी प्राण देणें किंवा त्यांचा प्राण घेणें हाच अल्पसंख्यांकांच्या हाती अखेरचा उपाय आहे याची पूर्ण जाणीव आम्हांस असल्यामुळे राखीव जागेच्या सवलतीवर आमची विशेष भिस्त नाहीं. पण आमचा मुद्दा असा आहे कीं, नेहरू कमिटीने केलेली मतदार-संघाची योजना निःपक्षपाताची नाहीं. हिंदु समाजाच्या उतरंडीला धक्का न लावतां वरच्यांना वरती व खालच्यांना खालीं ठेवून स्वराज्यसत्ता संपादन करण्याचा हा ब्राह्मणी कावा आहे असें आमचें स्पष्ट मत आहे. नाहीं तर ज्या सवलती मुसलमानांना देण्यांत आल्या त्या सवलती मागासलेल्या हिंदूंना किंवा अस्पृश्यांना देण्यांत आल्या नसत्या काय ? त्या न देण्याचे कारण नेहरू कमिटी कोणतेहि देवो. आम्हाला दिसत असलेले कारण अगदीं निराळे आहे. मुसलमान व ब्राह्मणेतर दोघेहि मागासलेले आहेत. पण ब्राह्मण्य संरक्षणाच्या दृष्टीनें त्या दोहोंत एक मोठा फरक आहे. तो हा कीं मुसलमानांना राजकीय बाबतींत सवलती दिल्यानें देश बुडाला तर बुडेल पण ब्राह्मण्य बुडूं शकत नाहीं. त्याच ब्राह्मणेतरांना दिल्यानें देश बुडणार नाहीं पण ब्राह्मण्याचा नाश होईल हें खास. ब्राह्मणांचे धार्मिक वर्चस्व जें आजवर टिकून राहिलें आहे, याचें मुख्य कारण म्हणजे ब्राह्मणेतरांच्या हातची राजकीय सत्ता धार्मिक सत्ता हातीं असलेल्या ब्राह्मणांकडे गेली हें होय. राजकीय सत्तेची जोड मिळाल्यामुळंच त्यांची धार्मिक सत्ता टिकून राहिली आहे. राजकीय सत्तेचा आधार तुटल्याबरोबर सामाजिक व धार्मिक सत्तेचा पाया ढासळून पडणार आहे. जेथे धार्मिक सत्तेला राजकीय सत्तेची जोड मिळाली तेथें ब्राह्मण वर्ग पाणक्या किंवा स्वयंपाकी होऊन राहिला आहे व जेथें धार्मिक सत्तेला राजकीय सत्तेची जोड मिळाली तेथें ब्राह्मण राज्यावर बसले आहेत. याची साक्ष पेशवाई देत आहे. ज्या दिवशी ही जोडी फुटेल आणि ब्राह्मणाच्या हातची राजकीय सत्ता ब्राह्मणेतरांच्या हाती जाईल त्या दिवशीं हा ब्राह्मण्याचा घडा भरणार आहे. मागासलेल्या हिंदूंना अगर अस्पृश्यांना

राखीव जागा दिल्या गेल्या तर त्या प्रमाणांत ब्राह्मणांची राजकारणांतली मिरास कमी होणार आहे. अस्पृश्यांना व मागासलेल्या हिंदूंना राजकीय सत्तेपासून होता होईल तितके दूर ठेवल्याशिवाय ब्राह्मणी वर्चस्व टिकू शकत नाहीं याची जाणीव ब्राह्मण व तत्सम जातीस आहेच. नेहरू कमिटीतील हिंदुसभासदांत ब्राह्मण व तत्सम जातीचा भरणा मोठा आहे. अर्थात कमिटीतील आपल्या सभासदत्वाचा फायदा घेऊन होईल तितका स्वार्थ साधल्याशिवाय ते राहिले नाहींत. मागासलेल्या हिंदूंना व अस्पृश्यांना राखीव जागा न देणें हा त्यांच्या या स्वार्थी वृत्तीचा मासला आहे. यास्तव आम्ही असें म्हणतो कीं नेहरू कमिटीनें मतदार संघांची जी पद्धत सुचविलेली आहे तिच्यांत सरळ राजकारणापेक्षां ब्राह्मणी कावाच जास्त भरला आहे.

मागासलेल्या हिंदूंची व

अस्पृश्यांची पायमल्ली

करून नेहरू कमिटीनें हिंदूंचें हित साधलें असते तरी आनंद मानण्यास जागा होती. परंतु तेंहि कमिटीला साधतां आलें नाहीं. मुसलमानांना राजकीय बाबतींत जे हक्क आज प्राप्त झालेले आहेत त्याचे उगमस्थान १९१७ सालीं कॉंग्रेस व मुस्लिम लीग यांच्या दरम्यान लखनौ येथें झालेला करार हा होय. हिंदूंची कॉंग्रेस व मुसलमानांचीं लीग या दोन संस्थांत १९१७ सालापूर्वी इतका सवतीमत्सर मातला होता कीं एकीचे तोंड पुर्वेस तर दुसरीचें तोंड पश्चिमेस असें. जणू एकीची सावली दुसरीवर पडू नये म्हणून कीं काय ज्या ठिकाणीं एकीचे अधिवेशन होत असे त्या ठिकाणी दुसरीचे अधिवेशन कधींहि होत नसे ! हिंदुस्थानांत स्वराज्य स्थापन करण्याचा जाहीरनामा ता. २० जुलै १९१७ रोजीं जेव्हां प्रसिद्ध झाला त्या वेळेपासून मात्र उभयतांनीं आपला सवतीमत्सर थोडा बहुत कमी करुन आपसामध्यें तडजोड करण्यास सुरवात केली. या तडजोडीनें जो लखनौचा करार अस्तित्वांत आला त्या करारान्वयें मुसलमानांवर अनेक सवलतींची खैरात करण्यांत आली. राखीव जागेची सवलत मुसलमानांना अपुरी वाटली म्हणून स्वतंत्र मतदार संघाची मागणी कॉंग्रेस पक्षातर्फे कबूल करण्यांत आली. स्वतंत्र मतदार संघाची सवलत ही फक्त अल्पसंख्यांकांकरितां आहे हें मत सर्वमान्य आहे. अर्थात् ज्या प्रांतांत मुसलमान अल्पसंख्यांक होते तेवढ्याच प्रांतांपुरती

ही सवलत त्यांना द्यावयास पाहिजे होती. परंतु ज्या प्रांतांत आम्ही बहुसंख्यांक आहोत त्या प्रांतांतही आम्हांस स्वतंत्र मतदार संघाची आवश्यकता आहे, असा मुसलमानांनीं आग्रह धरल्याबरोबर काँग्रेस पक्षातर्फे ही सवलतहि त्यांना देण्यांत आली. स्वतंत्र मतदार संघ मिळूनहि मुसलमानांची तृप्ति झाली नाहीं. प्रतिनिधींच्या संख्येच्या बाबतींतहि त्यांना सवलत पाहिजे होती. काँग्रेस पक्ष त्यांच्या लोकसंख्येच्या मानानें त्यांना प्रतिनिधी देण्यास कबूल होता. पण प्रतिनिधींचें प्रमाण लोकसंख्येवर अवलंबून राहिल्यास आपली लोकसंख्या कमी असल्यामुळें आपल्याला प्रतिनिधी मिळणार ते अगदीं कमी मिळतील व कायदे कौन्सिलांत आपलें कांही वजन पडणार नाहीं, यास्तव मुसलमान समाजानें लोक संख्येच्या प्रमाणाला आपली संमति दिली नाहीं. आपलें गतवैभव कायम राहिल, अशा प्रमाणांत आपणांला प्रतिनिधी मिळाले पाहिजेत, असा हट्ट त्यांनीं धरला. व तो काँग्रेसपक्षाला मान्य करावा लागला. नवीन स्वराज्यघटना जेव्हां १९२१ सालीं घडविण्यांत आली तेव्हां तिच्यांत या लखनौच्या करारांला सहजगत्या ठाव प्राप्त झाला. ज्या अटी दोन्ही पक्षांनीं तडजोडीनें मान्य केल्या त्या कितीही वावग्या असल्या तरी त्या नापसंत करुन त्यांच्यांऐवजी योग्य अशा अटी तयार करण्याची जोखीम इंग्रज सरकारनें घेण्याचें नाकारलें ; व करार जसा होता तसा कबूल करुन त्यास कायद्याचें स्वरूप दिलें. फक्त एकाच बाबतींत इंग्रज सरकारनें वरील लखनौ करारांत रदबदली केली व ती बाब म्हणजे मुसलमानांना देऊं केलेल्या प्रतिनिधींचें प्रमाण, मुसलमानांच्या प्रतिनिधींचें लखनौच्या करारानें ठरलेले प्रमाण कोणत्याहि दृष्टीने पाहिलें तरी अगदीं गैर होतें. केवळ मुसलमानांची मर्जी संपादन करण्याच्या हेतूनें तें मान्य करण्यांत आलें होतें. खाजगी व्यवहारांत झालेली चूक व्यक्तिमात्रास काय ती नडते. योग्य वेळीं तिचीं दुरुस्ती झाली तरी ती खपूं शकते. परंतु राज्यव्यवस्थेसारख्या सर्वव्यापी व्यवहारांत चूक झाली तर तिचे परिणाम साऱ्या समाजास भोगावे लागतात. यास्तव तिची योग्य वेळीं दुरुस्ती करणें, अवश्य असतें, याची जाणीव ठेवून मुसलमानांच्या प्रतिनिधींच्या प्रमाणांत इंग्रज सरकारनें बरीच छाटाछाट केली. मुसलमानांची प्रांतवार लोकसंख्या, लखनौ करारान्वयें त्यांच्या प्रतिनिधींचें ठरलेलें प्रमाण व त्यांत इंग्रज सरकारनें छाटाछाट करुन निश्चित केलेली संख्या,

ही सारी माहिती खालील कोष्टकांत एकत्रित करून दिली आहे. त्यावरून मुसलमानांना लखनौ करारान्वयें किती फाजील सवलती दिल्या गेल्या आहेत, हें सहज ध्यानात येईल.

प्रांत	मुसलमानाचें एकंदर लोक-संख्येशी दर शेंकडा प्रमाण	मुसलमान प्रतिनिधींचें एकंदर निवडून आलेल्या प्रतिनिधीशी ब्रिटीश सरकारनें ठरवून दिलेले दर शेकडा प्रमाण	लखनौच्या करारांत ठरलेलें मुसलमान प्रतिनिधींचें दर शेकडा प्रमाण
मद्रास	६.७	१३.२	१५
मुंबई	१९.७	३१.३	३३
बंगाल	५३.९	३४.२	४०
युनायटेड प्रांत	१४.३	२९	३०
पंजाब	५५.३	४५.७	५०
बिहार, ओरीसा	१०.९	२३.६	२५
मध्यप्रांत	४	१२.७	१५
आसाम	२८.९	३०.७	

या लखनौच्या करारांत नेहरू कमिटीने दोन महत्त्वाचें फेरबदल केले आहेत. पहिला फेरबदल म्हणजे स्वतंत्र मतदार संघाऐवजी एकत्रित मतदार संघ व राखीव जागा. दुसरा फेरबदल म्हणजे लोकसंख्येच्या प्रमाणांत प्रतिनिधींची संख्या. हे दोन्ही फेरबदल अत्यंत महत्त्वाचे आहेत याला कोणीहि ना म्हणणार नाहीं. नेहरू कमिटी एवढेंच करती तर तिचे उपकार मानणें रास्त झालें असतें. परंतु कमिटीनें वर निर्दिष्ट केलेले जे दोन लखनौच्या करारांत फेरबदल केलेले आहेत त्याला जोडून आणखी जी तिसरी योजना केली आहे तिच्यामुळें वरील दोन्हीं रदबदलींचा जो इष्ट परिणाम व्हावयाचा तो समूळ नष्ट होऊन हिंदु समाजावर उपकार करण्याऐवजी त्यावर मोठा अपकार केला आहे असें म्हणणे प्राप्त आहे. ही जोड योजना म्हणजे नवी प्रांतरचना होय. या नवीन प्रांतरचनेनुरुप नेहरू कमिटीनें असें ठरविलें आहे कीं, सिंध प्रांत मुंबई प्रांतांतून वेगळा करण्यात यावा, व बलुचिस्तान व वायव्य सरहद्दीवरील प्रांत, हे दोन्हीं प्रांत स्वायत्त करून अन्यप्रांतांत असलेली राज्य घटना त्या प्रांतांनाहि लागूं करावी. या प्रांतरचनेचें इंगित काय आहे याचा उलगडा पुष्कळांना झाला नाहीं, हें उघड आहे. नाहीं तर नेहरू कमिटीवर हिंदू लोक जे आज इतके फिदा झालेले आहेत ते कदापि झाले नसते. अशी आमची खात्री आहे. नेहरू कमिटीनें तर हें इंगित लोकांस कळूं नये म्हणून मुद्दाम त्यावर पांघरूण घालून लोकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला आहे. नेहरू कमिटीनें असें भासविलें आहे कीं, आपण

केलेली नवी प्रांतरचना केवळ प्रांतरचना भाषावार असावी, एवढ्याच तत्त्वानुसार करण्यांत आली आहे. भाषावार प्रांतरचनेचे तत्त्व चांगलें आहे. परंतु तें अमलांत आणल्यानें या देशाचें अपरिमीत नुकसान होणार आहे असें आमचे प्रामाणिक मत आहे. या देशांत जर कोणत्या एकाद्या गोष्टीची उणीव असेल तर ती राष्ट्रीय भावनेची होय. ही राष्ट्रीय भावना या देशांत उद्‌भवली नाहीं याची जी अनेक कारणें आहेत त्यापैकी मुख्य कारण म्हणजे अनेक भाषा हे होय. हे कारण नष्ट झाल्याशिवाय राष्ट्रैक्याची भावना जनतेंत उत्पन्न होणें शक्य नाहीं. भाषावार प्रांतरचना करणें म्हणजे ऐक्याच्या भावनेचे मुळावर घाव घालण्यासारखे आहे. कारण, जितक्या प्रमाणांत प्रांतिक भावनेचे पोषण केलें जाईल तितक्या प्रमाणांत राष्ट्रीय भावनेचा कोंब सुकून जाणार आहे. आहे त्या प्रांतरचनेंतून राष्ट्रीय भावना उद्‌भवली नाहीं हे खरें. परंतु भाषावार प्रांतरचना झाल्यानें ती कधींच उद्‌भवणार नाहीं. भाषावार प्रांतरचना करण्याच्या ऐवजीं सर्व राष्ट्राला एक भाषा प्राप्त होईल असा प्रयत्न करणें यांत खरें राष्ट्रहीत आहे असें आम्हांस वाटतें. परंतु भाषावार प्रांतरचना बरी कीं वाईट हा प्रश्न तुर्त बाजूस ठेवूं. मुख्य प्रश्न आहे तो हा कीं, नेहरू कमिटीनें ही जी प्रांतरचना सुचविली आहे तिच्या मुळाशीं भाषावारीचें तत्त्व आहे किंवा दुसरें कोणते तत्त्व आहे ? कमिटीचा रिपोर्ट वाचून आमचें जें मत बनलें आहें तें हें कीं, कमिटीच्या मुळाशीं भाषावारीचें तत्त्व नाहीं. भाषावार प्रांतरचनेच्या तत्त्वास जर कमिटी अनुसरली असती तर या देशाच्या क्षेत्राचें एकंदरीत १७९ प्रांतवार तुकडे करावेत अशी योजना कमिटीनें केली असती, कारण या देशांत तितक्या भाषा बोलणारे लोक आहेत. पण तशी योजना कमिटीनें केलेली नाहीं. उलट भाषावार प्रांतरचना करणें अत्यंत कठीण आहे याची जाणीव ठेऊन भाषावार प्रांतरचना करण्याची कांहीं लोकांची मागणी कमिटीनें फेटाळून लाविली आहे. सिंध, बलूचिस्थान, वायव्य सरहद्दीवरील प्रांत या तीन क्षेत्रांनाहि त्यापैकी कांही अडचणी लागूं पडतात. परंतु त्या सर्व अडचणी बाजूस सारून या तीन क्षेत्रांस निराळ्या प्रांतांचे स्वरूप देण्यांत, भाषावारीच्या तत्त्वाशिवाय दुसरें कांही तरी प्रबल कारण असावें असा संशय साहजिकपणें येतो. भाषावार प्रांतरचना करावयाची होती तर वायव्यसरहद्दीवरील प्रांत, पंजाब व संयुक्तप्रांत यांची एकच भाषा आहे. त्यांची हल्लीची हद्दमर्यादा मोडून निराळ्या मर्यादा ठरवून निरनिराळे प्रांत घडवितां आले असते. पण कमिटीनें तसेंही केलें नाहीं. यावरून ही प्रांतरचना भाषावार नसून दुसऱ्याच कोणत्या तरी तत्त्वानुसार करण्यांत आली आहे असा ग्रह कायम होतो. हे तत्त्व कोणतें हे नेहरू कमिटीनें छपवून ठेविलें असलें तरी म्हातारीनें कोंबडा झाकून ठेविल्यामुळें जसा सुर्योदय व्हावयाचा राहीला नाही तसे नेहरू कमिटीने झाकून ठेविलेले तत्त्व

उघडकीस आल्याशिवाय राहिलेलें नाहीं. नेहरू कमिटीनें जी योजना सादर केलेली आहे ती योजना मुळची मुसलमान लोकांची आहे, नेहरू कमिटीची नव्हे, हे पुष्कळशा लोकांच्या ध्यानांत आलेले दिसत नाही. परंतु तारीख २० मार्च १९२७ रोजी दिल्ली येथे मुसलमान लोकांनी ज्या मागण्या प्रसिद्ध केल्या त्या व नेहरू कमिटीनें प्रसिद्ध केलेल्या योजना ताडून पाहिल्या असतां कोणासहि कळून येईल की हे नेहरू कमिटीनें नवें असे कांहींच केलें नाहीं. फक्त मुसलमानांच्या मागण्या मान्य करून त्या आपल्या योजनेंत ग्रथित केल्या आहेत. त्या मागणींत मुसलमान लोकांनी असें जाहीर केलें होतें कीं, सिंध प्रांत वेगळा करण्यांत आला व सरहद्दीवरील प्रांत व बलुचिस्तान स्वयंसत्ताक करण्यांत आले, तर आपण स्वतंत्र मतदारसंघ सोडून देऊन एकत्र मतदारसंघ व राखीव जागा पत्करण्यास तयार होऊं. ही मागणी आम्हांस अतिशय विचित्र अशी वाटत होती. एकत्रित मतदारसंघ पत्करणें व सिंध, बलुचिस्तान व वायव्य सरहद्दीवरील प्रांत यांची निराळी प्रांतरचना करणें या दोन गोष्टींचा परस्पर काय संबंध आहे हें आम्हांस कळत नव्हतें. स्वतंत्रमतदारसंघ केल्यानें मुसलमानांचा होणारा तोटा, निराळी प्रांतरचना झाल्यानें कसा भरून निघेल ह्याचा उलगडा होत नव्हता. परंतु पंजाबांत सायमन कमीशनची जी बैठक झाली त्या बैठकीत मुसलमान पुढाऱ्यांची जी साक्ष झाली त्या साक्षींत या दोन्ही गोष्टींची सांगड कां बांधण्यात आली आहे याचे त्यांनीं स्पष्टीकरण केलें आहे. तें स्पष्टीकरण असें कीं हल्लीच्या प्रांतरचनेत फक्त पंजाब व बंगाल या दोन प्रांतांतच मुसलमान हिंदूंपेक्षां संख्येंनें अधिक आहेत. सिंध, बलुचिस्तान व वायव्य सरहद्दीवरील प्रांत हे वेगळे व स्वतंत्र करण्यांत आले म्हणजे हिंदुस्तानांत जे एकंदर नऊ दहा प्रांत आहेत त्यापैकी, पांच प्रांतात मुसलमानांचे प्राबल्य होईल. अशी प्रांतरचना झाली असतांना ज्या प्रांतांत मुसलमान अल्पसंख्यांक आहेत त्या प्रांतातील हिंदूंनीं जर मुसलमानांचा छळ केला तर ज्या प्रांतात हिंदूंची कमी संख्या आहे त्या प्रांतातील मुसलमान लोक त्यांना छळावयास लागतील. अशा रीतीनें एकमेकानां शह देतां येईल. व असा शह देतां आला म्हणजे जातवार संघ गेल्यानें होणारा तोटा भरून निघेल. वरील स्पष्टीकरणावरुन एक गोष्ट सिद्ध होते ती ही कीं, मुसलमानांनी सुचविलेली व नेहरू कमिटीनें मान्य केलेली प्रांतरचना भाषावारीच्या तत्त्वावर केलेली नसून ज्याप्रमाणें कांही ठिकाणीं मुसलमानांची दाढी हिंदूंच्या हातात आहे त्याप्रमाणें इतर ठिकाणीं हिंदूंची शेंडी मुसलमानांच्या हातांत जाईल, या तत्त्वानुसार करण्यांत आलेली आहे. दरेक हिंदुमात्राला आम्ही असा प्रश्न विचारतों कीं, मुसलमानांना स्वतंत्र मतदार संघ देणें बरें किंवा कांहीं मुसलमानी प्रांत निर्माण करून तेथील हिंदु लोकांना मुसलमानांच्या ओलीस देणें बरें ? मुसलमानांचें स्वतंत्र मतदारसंघ

राहिले तर त्या मानानें राज्यपद्धती बेजबाबदार राहिल. परंतु मुसलमानांच्या हातीं राजकीय सत्ता जाऊन हिंदूंची गळचेपी होणार नाहीं. स्वतंत्रसंघाऐवजी एकत्रितसंघ व राखीव जागेची पद्धत अमलांत आली तर राज्यपद्धती जबाबदार पद्धतीची होईल हें खरें. पण त्या योजनेला जोडून नवी प्रांतरचना घडण्यात आली तर हिंदूंची गळचेपी झाल्याशिवाय राहाणार नाहीं. ज्या योजनेंत

हिंदूंना धोका

पोहोंचतो ती योजना काय कामाची ? मुसलमानांचे स्वतंत्रमतदारसंघ राहू देणे बरे, परंतु नेहरू कमिटीची ही नवी योजना नको असें आमचे स्पष्ट मत आहे. हिंदूंच्या हितसंबंधाच्या बाबतींत नेहरू कमिटीनें इतकी बेपर्वाई केली आहे कीं, अल्पसंख्यांक मुसलमान लोकांना जे हक्क देण्यांत आले आहेत ते देखील हक्क अल्पसंख्यांक हिंदूंना देण्यांत आलेले नाहींत. उदाहरणार्थ ज्या ज्या प्रांतात मुसलमान अल्पसंख्यांक आहेत त्या त्या प्रांतात त्यांच्या करितां कायदे कौंसिलांत अमूक इतक्या जागा राखून ठेवण्यात आल्या आहेत. बंगाल व पंजाब या दोन प्रांतात हिंदु अल्पसंख्यांक आहेत परंतु त्यांच्या करितां नेहरू कमिटीनें राखीव जागेची सवलत दिलेली नाहीं !! या दोन प्रांतांतील हिंदूंना कदाचित राखीव जागेच्या सवलतीची जरूरी नसेल. परंतु तशी सवलत त्यांना दिली असती तर कांही वाईट झालें नसतें. खंदकावरून उडी मारून जाता येत असले तरी त्यावर पूल बांधणे यांत चातुर्य आहे. आणि व्यवहारांत धाडसापेक्षां चातुर्यालाच जास्त किंमत आहे. आता कांहीं असें म्हणतील कीं, आम्ही ही जी भयसूचक घंटा वाजविली आहे तिला कांहींच कारण नाही. मुसलमानांची बहुसंख्या असलेलें प्रांत जरी कांही निर्माण झाले तरी त्यांच्या तोडीला हिंदूंची बहुसंख्या असलेलें प्रांत अस्तित्त्वांत आहेतच व मुसलमानांची बहुसंख्या असलेल्या प्रांतांत मुसलमानांनी चढाईचे धोरण स्वीकारल्यास हिंदूंची बहुसंख्या असलेल्या प्रांतांत हिंदूंना त्याचें उसने सहज फेडता येईल. यावर आमचे उत्तर असें आहे कीं, " दिधलें दुःख परांने उसनें फेडू नयेचि सोसावें " ही शिकवण हिंदुमात्राच्या रोमरंभ्रांत भिनली असल्याकारणानें, परप्रांतातील हिंदुंची सुटका करण्याकरितां स्वप्रांतातील मुसलमानांचा छळ करण्यास ते प्रवृत्त होतील हें मुळींच संभवत नाहीं. पण मुसलमानांच्या बदफैलीमुळें ही उसनें फेडण्याची प्रवृत्ती वाढली व अशात-हेनें परस्परांच्या धाकाखाली दोन्ही समाज दबून रहाणे संभवनीय असलें तरी हा प्रकार बिलकुल स्पृहणीय नाहीं. सत्तेच्या समतोलपणाचें तत्त्व निरनिराळ्या राष्ट्रांच्या व्यवहारांत कदाचित फायदेशीर असेल. पण ज्या समाजांना एका देशांत शेजारी शेजारी राहावयाचे आहे व ज्यांचे हितसंबंध इतके परस्परावलंबी आहेत ते एकमेकांशी सुखाने नांदतील अशी व्यवस्था करण्याऐवजी

ते सदोदीत एकनेकाकडे वक्र दृष्टीनें पहात राहतील व एकनेकांचे उट्टे काढण्यास सिद्ध होतील, अशी व्यवस्था करणें या सारखी दुसरी मूर्खपणाची कोणती योजना असू शकेल ? आपल्या प्रांतातील हिंदुलोक हे आपणास जामीन दिलेले लोक आहेत असें मुसलमानांनी मानावयाचे व आपल्या प्रांतातील मुसलमान लोक हे आपणास जामीन दिलेले लोक आहेत असे हिंदूंनी मानावयाचे असा जर उभयपक्षांनी कृतनिश्चय केला तर एकाही प्रांतातील लोकांस सुख व स्वास्थ लाभेल असें आम्हास मुळींच वाटत नाहीं. एका प्रांतातील बहुसंख्यांक लोक तेथील अल्पसंख्यांक लोकांचा छळ करण्याचा मूर्खपणा करतील म्हणून इतर प्रांतातील बहुसंख्यांक लोकांना तेथील अल्पसंख्यांक लोकांचा विनाकारण छळ करण्याची संवड देण्यांत यावी हा न्याय अगदी रानटी आहे. आतां नेहरु कमिटीवाले लोक असें म्हणतील कीं, आम्ही जी प्रांतरचनेची योजना केली आहे ती एक भाषा एक प्रांत अशा भावनेने केली आहे, त्याचा परिणाम कांहीं प्रांतात हिंदूंचे प्राबल्य व कांहीं प्रांतांत मुसलमानांचे प्राबल्य असा होत असेल तर त्याला नाइलाज आहे ! याला आमचे उत्तर असें आहे कीं, कोणतीही व्यवस्था बरी निपजेल किंवा वाईट निपजेल हें सर्वस्वी तिच्या मुळाशी असलेल्या हेतुवर अवलंबून राहील. व्यवस्था दिसावयाला चागली असली पण तिच्या मुळाशी असलेला हेतु जर वाईट असेल तर तिचे परिणाम वाईट झाल्याशिवाय राहणार नाहींत. '' जैसी वासना तैसे फळ '' ही संतोक्ति प्रसिद्धच आहे. एक भाषा बोलणारे लोक एकत्र यावेत, त्यांचे मीलन होऊन ते संघटीत व्हावेत, त्यांची संस्कृती वाढावी व राष्ट्राच्या ऐश्वर्यात व लौकिकांत भर पडावी हा जर भाषावार प्रांतरचनेचा हेतु असतां तर ती आम्ही खपवून घेतली असती पण भाषावार प्रांतरचनेचा हा हेतु नाहीं हें मुसलमान लोकांनी अगदीं स्पष्ट करून सांगितले आहें.. आमची दाढी कांही प्रांतात हिंदूंच्या हातांत आहे तशी कांहीं प्रांतात तरी हिंदूंची शेंडी आमच्या हातात पाहिजे म्हणून अशा तऱ्हेची प्रांतरचना आपणांस अवश्य आहे असें त्यांनी अगदी स्पष्ट शब्दांत सांगितलें आहे. हिंदु समाजांत साटालोटीच्या लग्नाची पद्धत आहे. त्यांत 'अ' ची बहीण 'ब' ला आणि 'ब' ची बहीण 'अ' ला देऊन सोयरसंबंध करण्यांत येतो. हेतु हा की 'अ' नें जर 'ब' च्या बहिणीला जांच केंला तर 'ब' ने 'अ' च्या बहिणीला जांच करून एकमेकांनी एकमेकांस ताळ्यावर आणीत राहावे. नेहरु कमिटीची प्रांतरचना म्हणजे हिंदु-मुसलमानामधील एक प्रकारचे साटालोटीचे लग्न आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. ज्या हेतुनें साटालोटीचे लग्न करण्यांत येतें त्याच हेतूनें ही प्रांतरचना करण्यात येत आहे. साटालोटीचे लग्न हें इतर प्रकारच्या लग्नासारखेंच असतें. पण त्याचा वाईट हेतु कृतींत अवतीर्ण झाल्या शिवाय राहत नाहीं. याचा अनुभव सर्व हिंदुंना आहेच. त्याच प्रमाणें या प्रांतरचनेचा

हेतु जो आहे तो कृतीत उतरल्याशिवाय राहणार नाहीं. या प्रांतरचनेच्या मुळाशीं मुसलमान लोकांचा साटालोटीचाच हेंतु आहे, दुसरा कोणताही नाहीं, याचे प्रत्यंतर दुसऱ्या एका गोष्टींत पहावयास सांपडते. प्रांतिक सरकार व मध्यवर्ती सरकार यांचे परस्पर संबंध कशा प्रकारचे असावेत हा अत्यंत मोठा महत्वाचा प्रश्न आहे. प्रांतिंक सरकार व मध्यवर्ती सरकार यांच्यांत अधिकार विभागणी होतेच होते. त्याशिवाय उभयतांचा राज्यकारभार सुरळीतपणे चालणें अशक्य होईल. परंतु अशी विभागणी करतांना दोन प्रश्न उद्‌भवतात त्या पैकीं पहिला प्रश्न हा कीं, प्रांतिक सरकारास विभागून दिलेल्या अधिकारावर नियंत्रण ठेवण्याचा हक्क मध्यवर्ती सरकारला असावा किंवा नसावा ? दुसरा जो प्रश्न उद्‌भवतो तो हा कीं, परस्परांमध्ये अधिकार विभागणी झाल्यानंतर राहिलेले शेष अधिकार कोणाच्या स्वाधीन असावयाचे ? प्रांतिक सरकारच्या कीं मध्यवर्ती सरकारच्या ? आजपावेतों मुसलमान लोकांचे धोरण असें होतें कीं, प्रांतिक सरकारला जे अधिकार विभागून दिले असतील त्या अधिकारांवर मध्यवर्ती सरकारचें नियंत्रण असणें अवश्य आहे. परंतु, तेच मुसलमान लोंकं आता अगदी निराळी मागणी मागूं लागले आहेत. ते असें म्हणूं लागले आहेत की, प्रांतिक सरकारला जें कांही अधिकार दिले जातील त्यावर मध्यवर्ती सरकारचें कोणत्याही प्रकारचे नियंत्रण असूं नये !! प्रांतिक सरकारला जें कांहीं अधिकार प्राप्त होतील त्या अधिकारांचा बरा वाईट उपयोग करण्यास ते स्वतंत्र असले पाहिजे. नेहरु कमिटीनें ही मुसलमानांची मागणी मान्य केली आहे. या योजनेच्या बरे-वाईटपणा-बद्दल कोणालाही दुराग्रह धरता येणार नाही. कारण अशा प्रकारची योजना अन्य देशांतही आढळून येते. परंतु, मुलमानांच्या दृष्टीकोणात एकाएकी इतका फेरबदल कां झाला ही गोष्ट विचार करण्यासारखी आहे. या फेरबदलांचें कारण कोणी कांही देवो, आम्हाला तरी असें वाटतें कीं, ही मुसलमानांची मागणी हिंदुमुसलमानामधील सत्तेच्या समतोलपणाचें इंगित साधण्यासाठी जी प्रांतरचना नियोजित केली आहे तिच्या पूर्ततेसाठींच करण्यांत आली आहे. प्रांतिक सरकार मध्यवर्ती सरकारपासून अनियंत्रित झाले नाहीं तर नवीन प्रांतरचनेनुरूप हिंदूंची शेंडी त्यांच्या हातात सांपडली तरी ती पिरगळण्याची त्यांना मोकळीक राहणार नाही. कारण प्रांतिक सरकारवर मध्यवर्ती सरकारचे नियंत्रण राहिलें असतां एकाद्यां प्रांतातील बहुसंख्यांक मुसलमान लोक तेथील अल्पसंख्यांक हिंदुलोकांचा छळ करूं लागले तर मध्यवर्ती सरकार त्याला आळा घालूं शकेल, बंदी करूं शकेल. अर्थात हिंदुंचा छळ करण्याचा प्रांतरचनेपासून मुसलमानांना होणारा फायदा पुर्णपणे त्यांच्या पदरांत पडावयास प्रांतिक सरकार अनियंत्रित राहिलेच पाहिजे व म्हणूनच मुसलमानांनी तशा प्रकारची मागणी केली आहे. नेहरू कमिटीनें ती मागणी मान्य करून हिंदुसमाजाचें मोठेंच अनहित केलें आहे असें आम्ही म्हणतों.

नेहरू कमिटीच्या योजनेंत हिंदूंना धोका आहे इतकेंच नव्हे तर

हिंदुस्थानावरही अरिष्ट

येणार आहे, असें म्हणणें भाग पडतें. प्रांतिक सरकारचा व मध्यवर्ती सरकारचा अधिकारसंबंध कसा असावा ह्या प्रश्नाइतकाच महत्त्वाचा किंबहुना त्याच्याहिपेक्षां अधिक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे या देशांतील मध्यवर्ती सरकार आणि ब्रिटीश साम्राज्य सरकार याचें नातें कसें असावें हा होय. हें नातें निश्चित करण्याच्या बाबतींत राष्ट्राचें ध्येय काय असावें, साम्राज्यांतर्गत स्वराज्य असावें कां स्वातंत्र्य असावें असे दोन पक्ष साहजिकपणें उद्भवतात. नेहरू कमिटीनें साम्राज्यांतर्गत स्वराज्य हें हिंदुस्थानचे ध्येय असावें अशी शिफारस केली होती. परंतु सन १९२७ साली काँग्रेसनें हिंदुस्थानचे ध्येय स्वातंत्र्य असल्याबद्दलचा ठराव केला होता. अर्थात नेहरू कमिटीचें ध्येय व काँग्रेसचे ध्येय यांत महत्त्वाचा विरोध उत्पन्न झाला व या विरोधाचे भूत किती जबर होते याचा अनुभव गेल्या काँग्रेसच्या अधिवेशनांत सर्वांनाच आला. या भुताला गाडून सर्वांची एकवाक्यता करण्याकरितां एक समेटचा ठराव पास करण्यांत आला. तो ठराव इतका गुळमुळीत आहे कीं वाटेल तो अर्थ त्यांतून काढतां येण्यासारखा आहे. एवढें मात्र खरें की नेहरू कमिटीच्या योजनेला धक्का न लावतां तिला धाब्यावर बसविण्यांत आले व स्वातंत्र्य हेंच हिंदुस्तानचें ध्येय म्हणून कायम करण्यांत आलें. आपल्या देशाला स्वातंत्र्य असू नये, आपला देश कायमचा पारतंत्र्यांत राहावा असें इच्छिणारा एकहि स्वदेशाभिमानी माणूस सापडणार नाहीं. स्वातंत्र्याच्या ध्येयासंबंधानें सर्वांना सहानुभूती वाटणे साहजिक आहे. पण या प्रश्नांचा नुसता तात्त्विक दृष्ट्या विचार करुन चालावयाचें नाहीं. व्यवहारदृष्ट्या साध्यासाध्यतेच्या, शक्याशक्यतेच्या, इष्टानिष्टतेच्या दृष्टीने विचार करणे जरूर आहे. कायद्यानें ब्रिटीश साम्राज्यांत समाविष्ट झालेलीं राष्ट्रें इतकी हतबद्ध झालेली दिसतात की त्यांना स्वेच्छेनुरूप वागण्यास मुळी अवसरच नाही असें वाटूं लागतें. त्यांनी केलेले कायदे इंग्रज बादशहा नामंजूर करूं शकतो. तसें न झालें तर त्यांनी केलेल्या कायद्यांत व पार्लमेंटनें केलेल्या कायद्यांत विरोध उत्पन्न झाला तर त्यांचे कायदे आपोआप रद्दबातल होतात. त्यांच्याकरितां गव्हर्नर, व्हाईसराय सारखे मुख्य अधिकारी नेमावयाची सर्व सत्ता ब्रिटीश सरकारच्या हाती आहे. त्यांच्या हायकोर्टांनी दिलेले निकाल अखेरचे ठरत नाहींत. त्यांच्यांत रदबदली करण्याचा अधिकार ब्रिटीश प्रिव्ही कौन्सिलकडे आहे. कायद्यानें ब्रिटीश साम्राज्यांतर्गत राष्ट्रांवर जी बंधनें घातलेली दिसतात त्यामुळें कदाचित साम्राज्यांतर्गत स्वराज्या-संबंधी कांही लोक नाकें मुरडीत असतील. पण कायद्यानें जरी असे निर्बंध

घातलेले असले तरी वास्तविक प्रकार अगदी निराळा आहे हें जाणण्याइतकी अक्कल स्वातंत्र्यवादी कंपूत असावयास पाहिजे. ज्यांना खरा प्रकार माहित आहे त्यांना मान्य करावें लागेल कीं साम्राज्यांतील राष्ट्रें साम्राज्याच्या बाहेर असलेल्या राष्ट्रांइतकी स्वतंत्र आहेत. त्यांच्या करिता नेमलेले गव्हर्नर अगर व्हाईसराय त्यांच्या मर्जीनुरूप नेमले जातात. त्यांचे कायदे नामंजूर करण्याचीं वहिवाट अजीबात नष्ट झाली आहे. त्यांच्यासाठी कायदे करण्याचा अधिकार ब्रिटीश पार्लमेंटनें त्यांच्या सल्ल्याशिवाय कधीच अंमलांत आणावयाचा नाहीं हें बहुतेक ठरल्यासारखे झालें आहे. त्यांच्या न्यायकोर्टांनीं दिलेल्या निकालावर ब्रिटीश प्रिव्ही कौन्सिलकडे अपील होऊं नये अशी इच्छा असल्यास तेहि होण्यासारखे आहे. त्यांच्या राज्यघटनेंत दुरुस्ती करण्याचा अधिकार त्यांच्याच हाती देण्यांत आला आहे. सन १८८० पासून त्यांची संमती घेतल्याशिवाय कोणताहि ब्रिटीश सरकारनें केलेला व्यापारविषयक तहनामा त्यांच्यावर बंधनकारक करण्यांत आलेला नाहीं. सन १९१८ पासून कोणताहि राजकीय तहनामा करतेप्रसंगी ब्रिटीश मंत्र्याबरोबर त्यांचेहि मंत्री घेण्याचा रिवाज पडला आहे व त्यांची संमतीं घेतल्याखेरीज असले राजकीय तहनामे कायम करण्यात येत नाहींत. महायुद्धानंतर स्थापन झालेल्या राष्ट्रसंघाचे ते सर्व सभासद आहेत. ब्रिटीश साम्राज्याच्या प्रतिनिधीशिवाय त्या दरेकांचे प्रतिनिधी राष्ट्रसंघात आहेत. व वाटेल त्या प्रश्नावर वाटेल त्या बाजूनें मत देण्यास ते स्वतंत्र आहेत, त्यांना आपल्या मर्जीनुरूप लढाई पुकारता येत नाही, अगर ब्रिटीश सरकारनें लढाई पुकारली असतां आपण तटस्थ आहोंत असें म्हणतां येत नाहीं. पण हा साम्राज्यांतर्गत स्वराज्याचा परिणाम आहें असे म्हणण्याचे कारण नाहीं. साम्राज्याबाहेर असलेल्या दोस्त राष्ट्रांना देखील या अटी पाळाव्या लागतात. उलट दोस्त राष्ट्रांना जी सूट नाहीं ती सूट साम्राज्यातील राष्ट्रांना आहे. ब्रिटीश सरकारनें लढाई पुकारली तर साम्राज्यातील राष्ट्रांना कायद्यानें आपण तटस्थ आहोंत असें म्हणता येत नाही हें खरें, पण लढाईचा बोजा अंगावर घेऊन ब्रिटीश सरकारला पैशाची अगर सैन्याची मदत करण्याची जबाबदारी त्यांच्यावर पडत नाहीं हेहि खरें आहे. ब्रिटीश साम्राज्याच्या घटनेला लेखी स्वरूप प्राप्त झालें नसल्याकारणानें त्यांत सामील असलेल्या राष्ट्रांना साम्राज्याच्या बाहेर पडून स्वतंत्र संसार थाटण्याचा अधिकार आहे किंवा नाहीं हें आज निश्चितपणें सांगणे अशक्य असले तरी मिस्टर बॉनर लॉ, सर रॉबर्ट बोर्डेन यांच्यासारख्या राजकारणपटु लोकांच्या मतें ब्रिटीश साम्राज्यांतर्गत राष्ट्रांना साम्राज्य सोडून जाण्याचा हक्क आहे. व तो नसला तरी तो त्यांना मिळेल अशी तरतुद करून घेण्यास कांही हरकत नाहीं. असें जर झाले तर ब्रिटीश साम्राज्यांतर्गत स्वराज्य व संपूर्ण स्वातंत्र्य यांत कांहीच तफावत नाहीं असे

व्यावहारीकदृष्ट्या विचार करणाऱ्या कोणाहि माणसास वाटल्याशिवाय राहणार नाही. साम्राज्यांतर्गत स्वराज्य हें जसें कॅनडा, साउथ आफ्रिका, ऑस्ट्रेलिया वगैरे साम्राज्यांत सामील असलेल्या राष्ट्रांना झालेले आहे तसें हिंदुस्थानाला कांही प्राप्त झालेलें नाहीं हें खरें, पण तें प्राप्त होण्यासारखें नाहीं असें मात्र नाहीं. प्रश्न इतकाच आहे कीं या साम्राज्यांतर्गत स्वराज्यावर हिंदुस्थान देशानें संतुष्ट राहावे किंवा नाहीं? लाला लजपतराय , दासबाबु हे साम्राज्यांतर्गत स्वराज्य याच ध्येयाचे पुरस्कर्ते होते. हे दोघे कांही कमी प्रतीचे राष्ट्रभक्त होते किंवा त्यांचा देशाभिमान कमी प्रतीचा होता असा आरोप कोणासहि करतां यावयाचा नाहीं. त्यांनी जें ध्येय निश्चित केले ते विचार केल्याशिवाय केलेलें नाहीं. व व्यावहारिकदृष्ट्या हेंच ध्येय डोळयापुढे ठेवणें कल्याणकारक आहे असें आम्हास वाटतें. तत्त्वाशी खाणाऱ्या लोकांना हें ध्येय कमी प्रतीचे वाटेल. पण तात्विक दृष्ट्या विचार करणाऱ्या लोकांना आमचा असा प्रश्न आहे कीं असें कोणते स्वतंत्र राष्ट्र आहे कीं ज्याचे स्वातंत्र्य मर्यादीत झालेलें नाही ? स्वतंत्र असलेली राष्ट्रे देखील इतर राष्ट्रांपासून कांही विशेष प्रकारचा अर्थ साधावयाचा असल्यास इतर राष्ट्रांच्या अटी मान्य करून आपलें स्वातंत्र्य मर्यादित करून घेतात. आणि ते घ्यावेंहि लागते. कारण एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्रांशी देवाण-घेवाण केल्याशिवाय कोणाचेहि चालणार नाही. एकंदरीत सर्वच राष्ट्रे तात्विक दृष्ट्या स्वतंत्र असली तरी व्यवहारांत त्यांना परतंत्र होऊनच रहावें लागतें. नुसत्या शब्दच्छलासाठी स्वातंत्र्याचा पुरस्कार करावयाचा असल्यास त्याला कोणीही हरकत करण्याचा शीण घेईल असें आम्हांस वाटत नाहीं. परंतु, सर्वांनी ध्यानांत घेण्याजोगी गोष्ट ही की तात्विक दृष्ट्या राष्ट्रांनी स्वातंत्र्यांची शेखी कितीहि मिरविली तरी व्यवहारांत त्यांना थोडें बहुत पारतंत्र्य पत्करावेंच लागते.असे जर आहे तर ब्रिटीश साम्राज्यांतर्गत स्वराज्य लाभल्यास या देशाला तें कां उणें पडावें याचें आम्हांस आश्चर्य वाटतें. पण समजा कीं स्वातंत्र्य मिळालें तें राखता येईल किंवा नाहीं याचाहि विचार झाला पाहिजे. तें जर राखतां आलें नाही तर साम्राज्यातील स्वराज्य घालवून पारतंत्र्य ओढून घेतल्यासारखे होईल. व तसें जर झालें तर हातचा हिरा जाऊन पदरी गार येईल. आम्हीं जो या विषयासंबंधीं विचार केला आहे, त्यावरून काँग्रेसवाल्या लोकांनी जो हा स्वातंत्र्याचा उपद्व्याप आरंभिला आहे, त्यामुळे या देशाला पुन्हा पारतंत्र्याची दशा भोगावी लागणार आहे अशी आम्हांस धास्ती वाटते. जो कोणी आशीया खंडाच्या नकाशाकडे पाहील त्याला कळून येईल की हा देश कसा बेचकडींत सांपडला आहे. एका बाजुनें चीन व जपान या भिन्न संस्कृतीच्या राष्ट्रांचे वेष्टण पडलें आहे. दुसऱ्या बाजूनें टर्की, परशिया व अफगाणीस्तान या तीन मुसलमान राष्ट्रांचे वेष्टण पडलें आहे. या

दोहोंच्या माऱ्यांत सापडलेल्या या देशाला फार जपून वागले पाहिजे असें आम्हास वाटतें. या सर्व राष्ट्रांचा एकसंघ तयार होईल व आपण सर्व एका खंडातील लोक या भावनेनें प्रेरीत होऊन गुण्यागोविंदानें ती नांदतील अशी आशा करण्यास आज तरी कांहीं सबळ कारण दिसत नाही. एका संस्कृतीनें बद्ध झालेले लोक ज्या युरोप खंडांत आहेत त्या युरोप खंडातील राष्ट्रांतील यादवी अजून मिटली नाहीं. आशिया खंडात तर बोलून चालून विविध नव्हे विरोधी संस्कृतींच्या लोकांनी आपलें ठाणें धरलें आहे. त्यांचा मिलाफ होईल अशी आशा धरून चालणें म्हणजे मृगजलाच्या पाठीं लागून आपली फसवणूक करून घेण्यासारखे आहे. फाजील आशावाद न करतां परिस्थितीची जाचणूक ध्यानांत घेऊन वागणें हें बरें. आहे या परिस्थितींत चीन व जपान या दोहोंपैकीं कोणाकडूनहि जर मारा करण्यांत आला तर त्यात पराजय कोणाचा होईल हें जरी सांगतां आले नाहीं तरी त्यांच्या माऱ्याला सर्व लोक एकजुटीनें तोंड देतील याबद्दल कोणालाहि खात्री देतां येईल. पण स्वतंत्र झालेल्या हिंदुस्थानावर जर टर्की, परशिया किंवा अफगाणीस्थान या तीन मुसलमान राष्ट्रांपैकीं कोणी एकानें जर मारा केला तर त्याप्रसंगी सर्व लोक एक जुटीने तोंड देतील याची खात्री कोणी देईल काय ? आम्हास तरी देतां येत नाही. या देशांत हिंदु आणि मुसलमान हें दोन समाज नव्हें ही दोन राष्ट्रे नांदत आहेत. हिंदीमुसलमान लोकांचा ओढा मुसलमान संस्कृतीच्या राष्ट्राकडे असणे अगदी साहजिक आहे. हा ओढा इतका बेसुमार बळावला आहे कीं मुसलमानी संस्कृतीचा प्रसार करून मुसलमानी राष्ट्रांचा संघ तयार करणे व होतील तितके काफीर देश त्याच्या अंमलाखाली आणणें हें त्यांचे ध्येय होऊन बसलें आहे. या विचारांनी पछाडल्यामुळें पाय हिंदुस्थानांत असले तरी त्यांचे डोळे तुर्कस्थानाकडे अगर अफगाणीस्थानाकडे लागलेले आहेत. हिंदुस्थान देश आपला आहे याबद्दल ज्यांना अभिमान नाहीं व त्यांतील निकटवर्ती हिंदु बांधवाविषयीं ज्यांना बिलकूल आपलेपणा नाही असे मुसलमान लोक मुसलमानी परचक्रापासून हिंदुस्थानचे संरक्षण करण्यास सिद्ध होतील असें धरून चालणें धोक्याचे आहे असें आम्हास वाटतें. स्वातंत्र्य संरक्षणाचा विचार करतांना नुसत्या मुसलमानांच्या मनोवृत्तीचा विचार करून चालावयाचे नाही. या देशांतील प्रांत रचनेचाहि विचार करणे प्राप्त आहे. सगळे मुसलमानी प्रांत हिंदुस्थानच्या अगदीं सरहद्दीवर आहेत. विंध्य पर्वतापर्यंत सारी धरित्री मुसलमानमय आहे. यामुळे मुसलमान लोक हे स्वतंत्र झालेल्या हिंदुस्थानचे द्वारपाळ आहेत. शत्रुला त्यांनी अडकवून धरलें तर ठीक पण जर

कां त्यांनी शत्रुला सहाय्य केले, नव्हें तटस्थ राहिले तर अर्धे मकान गाठींपर्यंत त्याला कोणीच शह देऊं शकत नाहीं. घरच्यांच्याच सहाय्यानें आंत आलेला शत्रु घर करून रहाणार. त्याला बाहेर घालविणें अशक्य आहे. याची जाणीव सर्व हिंदुंनी ठेवणें अवश्य आहे. मुसलमानी वारें कोणत्या दिशेनें वाहत आहे याबद्दल कांही संशय उरलेला नाही. एकदां राजनिष्ठ प्रजेमध्ये मुसलमानांची गणना मोठ्यां प्रामुख्यानें होत होती. ब्रिटीश साम्राज्याचे कट्टे उपासक म्हणून मुसलमान लोकांनी अराजक अशा कांग्रेस पक्षाशी होता होईल तो स्नेहसंबंध जोडण्याचे टाळलें. ते मुसलमान लोक आज स्वातंत्र्यवादी बनले आहेत. !! पण ही त्यांची स्वातंत्र्याची आवड राष्ट्रप्रेमामुळे उत्पन्न झालेली नसून ब्रिटीश साम्राज्याच्या चौकटींत सुखानें बसलेल्या या देशाला मुसलमानी साम्राज्याच्या चौकटींत जखडून ठेवण्यासाठीं उघड्यावर आणण्याचा हा मुसलमानी कावा आहे, असें मुसलमानांचेच पुढारी सर अली इमाम सांगत आहेत. आमचे महात्मा गांधी मात्र हें मुसलमानामधील मतांतर राष्ट्रप्रेमाचें चिन्ह आहे असें मानून त्याच्या आधारावर १९३१ सालापासून स्वातंत्र्याची चळवळ सुरू करणार आहेत. ईश्वर करो आणि म. गांधी पासून या देशाची सुटका होवो !

आमच्या देशबांधवांस आमची अशी विनंती आहे कीं नेहरू कमिटीच्या योजनेची आम्ही जी छाननी केली आहे तिचा त्यांनी पूर्ण विचार करावा. ती छाननी आम्ही स्वार्थांध होऊन केलेली नाही. नेहरू कमिटीच्या योजनेला जो आम्ही विरोध केला आहे तो कमिटीनें अस्पृश्यांची पायमल्ली केली आहे म्हणून नव्हे. तिच्यांत हिंदुंना धोका तसेंच हिंदुस्थानवर अरिष्ट आहे म्हणून आम्ही विरोध केला आहे. या योजनेंत कांही धोका नाही असें वाटून कांहीं लोक तिला पाठिंबा देत असतील. कांहीं धोका आहे असें जाणून पाठिंबा देत असतील. या दोन्ही वर्गांबद्दल आम्हांस कांहीं कर्तव्य नाहीं. पण या दोन वर्गाशिवाय दुसरा असा मोठा वर्ग आहे की जो यांत कांहीं धोका आहे हें न जाणल्यामुळे या योजनेला पाठिंबा देत आहे. त्या वर्गाला योग्य ती बूज व्हावी म्हणून हा प्रयत्न आहे. हा प्रयत्न सिद्धिस जाण्यासाठीं आत्यंतिक स्पष्टोक्ती करणें आम्हांस प्राप्त झाले आहे. या अग्रलेखांतील स्पष्टोक्ती पाहून कांही लोक आम्हांस दुषण देतील. व्यवहारांत कांही प्रसंगी सत्य लपवून ठेवणे फायदेशीर असते. उलट पक्षी कांहीं प्रसंगी सत्य उघडकीस न आणणें या सारखे मोठे पातक नसते. आजचा हा प्रसंग दुसऱ्या प्रकारचा असल्या कारणानें इतकी स्पष्टोक्ती करणे आम्हास भाग पडलें आहे. शिवाय जेथे भीक आलेली पुरवली पण भीड मोडू नये अशी वृत्ती

सर्वत्र धारण करण्यांत आली आहे तेथें कोणीतरी निर्भीडता स्वीकारून खरें असेल ते जनतेपुढे मांडले पाहिजे. हिंदुसमाजाचा रोष आमच्यावरती आहेच. त्यांत मुसलमान समाजाच्या रोषाची भर पडणे बरे नव्हे हे आम्हांला कळत आहे. पण ज्यांत आमच्या देशाचे अकल्याण आहे त्यांत आमचेहि अकल्याण आहे अशी आमची भावना असल्यामुळें हें जोखीम आम्हीं आमच्या शिरावर घेतलें आहे. त्याचें चीज होऊन लोक मतास योग्य वळण लागेल अशी आम्हांस आशा आहे.

● ● ●

अग्रलेख : बहिष्कृत भारत, ता. १८ जानेवारी १९२९.

८

समतेसाठींच ही विषमता

डॉ. आंबेडकरांनी सायमन कमिशनपुढें दिलेल्या साक्षींतील निरनिराळ्या मुद्यांवर निरनिराळे आक्षेप आजवर घेण्यांत आले. यांपैकी बरेच आक्षेप स्पृश्यांनीं घेतले होते तर फार थोडे अस्पृश्यांनी घेतले होते. यांपैकी बहुतेक आक्षेपांचें खंडण आम्ही यापूर्वी केलेलें आहे व अस्पृश्यसमाजाच्या परिस्थितीचा सर्व बाजूंनीं विचार करतां ती साक्ष कशी यथायोग्य होती हें दाखवून दिलें आहे. आम्हांला आनंद वाटतो कीं तें आमचें विवेचन बहुतेकांना पटलें आहे. विशेषतः अस्पृश्य समाजाकडून डॉ. आंबेडकरांच्या साक्षीला मनःपूर्वक पाठिंबा मिळाला आहे व मिळत आहे. कांही अस्पृश्यांचीं मनें अद्याप संशयात लोंबकळत नसतील असें नाहीं. पण तीं लवकरच ठिकाणावर येतील यांत आम्हांला मुळींच शंका वाटत नाहीं. आतां आमचे स्पृश्य आक्षेपक जे आहेत त्यांचीं तोंडें मात्र अद्याप बंद पडलेली नाहींत, व पुढेंही बराच काळपर्यंत पडण्याचा संभव नाहीं. त्यांच्या आक्षेपांचे खंडण म्हणजे व्यर्थ कालाचा व्यय हें आम्हांला समजतें. . तरी पण त्यांच्यामुळें होणारी अस्पृश्यसमाजाची दिशाभूल टाळण्यासाठीं त्यांच्या खंडणार्थ आम्हांला हातीं लेखणी घ्यावी लागते. एवंच आमचा हा प्रयत्न स्पृश्यांच्या समाधानासाठीं नसून, त्यांच्या आक्षेपामुळें अस्पृश्यसमाजाची होणारी दिशाभूल टाळण्यासाठी आहे.

या आक्षेपांपैकीं एक नवा आक्षेप पुढीलप्रमाणें आहे. असें विचारण्यात येत आहे कीं डॉ. आंबेडकर हे समाजसमतासंघाचे अध्वर्यु व अध्यक्ष असतां त्यांनीं अस्पृश्यसमाजासाठीं जातवार प्रतिनिधित्वाची मागणी कशी केली ? एकाद्या समाजासाठीं जातवार प्रतिनिधी मागणें ही विषमता नव्हे काय ? हा आक्षेप प्रथमतः पुण्याच्या चित्रमयजगत्च्या संपादकाकडून घेण्यांत आला, व पाठीमागून त्याचे प्रतिध्वनी पुष्कळ लुंग्यासुंग्या पत्रांतून उमटले. अजूनही ते उमटत आहेत हें वृत्तपत्राच्या वाचकांना माहीत आहेच. प्रस्तुत आक्षेप अगदीं बिनतोड, मोठ्या वकिली पेंचाचा व प्रतिपक्षाचें तोंड एकदम बंद करणारा असा आहे असा आक्षेपकांचा समज असावा. पण हा त्यांचा भ्रम आहे हें विचार केल्यास ध्यानांत येईल. या आक्षेपकांना

समतावाद्यांचे ध्येय

काय आहे हेंच मुळी कळलेले नाहीं. ते जर त्यांनीं जाणून घेतलें असतें तर असला आक्षेप घेण्याचा मुर्खपणा त्यांनी केलाच नसता. त्यांना असे वाटत असावें कीं सर्वांना समतेनें वागविणें हें समतावाद्यांचे ध्येय आहे. पण हीच त्यांची चूक आहे हें त्यांना कळविण्याची आम्ही परवानगी घेतों. समतावाद्यांचे ध्येय सर्वांना समतेनें वागविणें हें नसून

समता प्रस्तापित करणें

हें आहे. हें ध्येय साधतांना सर्वांना समतेनें वागवून चालणें शक्य नाहीं. जेथें सर्व व्यक्ती समान आहेत तेथें कांहीं व्यक्तींना असमानतेनें वागविल्यास विषमता उत्पन्न होईल. पण जेथें व्यक्ती असमान आहेत तेथे त्यांना सारख्या लेखून चालणें म्हणजे समताप्रस्थापनेच्या ध्येयाला विरोध करणे होय. या बाबतीत रोगी माणसाचें उदाहरण बरोबर लागू पडतें. सुदृढ माणसाला जाडेंभरडें अन्न चालतें. पण सुदृढ माणूस व रोगी माणूस हे दोघेही सारखे मानून जर एखादा वेडगळ 'समतावादी' तें जाडेंभरडें अन्न रोग्याला देईल तर रोग्याचा प्राणदाता होण्याऐवजीं प्राणहर्ता होईल. त्याचप्रमाणे श्रीमंतांवर जितका कर असतो, तितकाच गरीबांवर ठेवावा, कारण तसें न केल्यास असमानता होईल असें जर कोणी म्हणेल तर लोक त्याला वेड्यात काढतील. सारखा कर देण्याची ऐपत असलेल्या श्रीमंतांपैकी कांहींवर कमी व कांहीवर जास्त असा जर कर लादला किंवा सुदृढ माणसाला पचण्याजोगे अन्न पचविण्याची ज्यांच्यांत ताकद आहे त्यांना रोग्याचे अन्न दिलें तर मात्र विषमता होईल. या उदाहरणावरून तात्पर्य घ्यावयाचें तें हें कीं,

समानांना असमानतेनें व असमानाना समानतेनें न वागविणें हा समतावाद्यांचा दस्तुर आहे.

या दस्तुरान्वयें पाहिलें असता डॉ. आंबेडकरांचो मागणी त्यांच्या समतावादाला पूर्णपणें धरुन आहे हें कळून येणें सोपें आहे. स्पृश्य व अस्पृश्य हे दोन्ही वर्ग सारख्या भूमिकेवर असते व मग अस्पृश्यांना जातवार प्रतिनिधि पाहिजेत अशी डॉ. आंबेडकरांनी मागणी केली असती, तर त्यांच्या समतावादावर आक्षेप घेणे योग्य ठरले असतें. एकाच दर्जाच्या लोकांत डॉ. आंबेडकर भेदभाव माजवूं इच्छितात असें मग म्हणतां आलें असतें. पण स्पृश्य व अस्पृश्य या दोन वर्गात कोणत्याही प्रकारची समानता नाहीं हें उघड दिसत आहे. शिक्षण, सपत्ती व लोकसंख्या ह्या तिन्ही बाबतींत या दोन्ही वर्गात जमीन अस्मानाचें अंतर आहे.

शिक्षणाच्या बाबतीत स्पृश्य पुढारलेले व अस्पृश्य मागासलेले, संपत्तीच्या बाबतींत स्पृश्य श्रीमंत व अस्पृश्य गरीब व लोकसंख्येच्या बाबतींत स्पृश्य बलवान व अस्पृश्य दुर्बल असा प्रकार आहे. म्हणजे अस्पृश्यसमाजाचें पारडे स्पृश्य-समाजाच्या पारड्यापेक्षां सर्वच दृष्टींनीं हलके आहे. अशा असमान वर्गांना समानतेनें वागवायचें ठरलें तर त्यांच्या परस्पर वागणुकींत कोणताही बदल होण्याची आशा करावयास नको, हें उघड आहे.

समता म्हणजे समानतेची वागवणुक असा जे अर्थ करतात त्यांच्या विचारसरणींत केवढा अनर्थ भरलेला आहे हे वरील विवेचनावरून ध्यानांत येईल. डॉ. आंबेडकरांची उक्ती व कृती यांच्यात विसंगतता दाखविण्याच्या हेतूनें ज्या लोकांनी ही दिशाभूल करणारी व अनर्थावह विचारसरणी प्रसृत केली आहे त्यांना आमचें एवढेंच सांगणें आहे कीं लाजेखातर चुकीच्या विचारांत लोळत पडण्यापेक्षां आपण चुकलों हें जाणून आपल्या विचारांची दिशा बदलणें यात जास्त प्रामाणिकपणा आहे याची जाणीव डॉ. आंबेडकरांना आहे. आपण चुकत आहों असें जर त्यांना वाटलें असतें तर एकतर त्यांनीं समतावाद सोडून दिला असता, किंवा प्रस्तुत मागणी मागितली नसती. पण त्यांच्या मागणींत व समतेच्या तत्वांत कांहीं विरोध नाही हें ते जाणून आहेत. परिस्थितींतील विषमतेकडे न पाहतां रोगी निरोगी, गरीब श्रीमंत, पुढारलेले मागासलेले, बहुसंख्य अल्पसंख्य यांना सारखेपणानें वागविले पाहिजें असें मानणारें वेडगळ 'समतावादी ' ते असतें, तर अस्पृश्यांसारखा दलितसमाज व स्पृश्यांसारखा सत्ताधारी समाज यांच्यांत कोणताही भेदभाव त्यांनी केला नसता व जिच्यायोगें अस्पृश्यसमाज स्पृश्यसमाजाशीं तुल्यबल होईल अशी मागणीही त्यांनी मागितली नसती.

आणि या मागणीवर जे आक्षेप घेतात त्यांच्या मनाचा संताप व्हावयाला वास्तविक कारण येथेंच आहे. डॉ. आंबेडकरांच्या उक्ती-कृतींतील दिखाऊ विसंगतता हा या आक्षेपकांचा निव्वळ दाखवायचा दांत आहे. त्यांच्या मनाला जी गोष्ट लागून राहिली आहे ती ही कीं

डॉ. आंबेडकरांच्या मागणीनें स्पृश्य व अस्पृश्य हे राजकारणांत समान अधिकारी होणार आहेत.

आणि स्पृश्यवर्गीयांना हेंच नको आहे. कारण अस्पृश्यसमाज राजकारणांत समानाधिकारी होण्यांत स्पृश्यांच्या चातुर्वर्ण्यात्मक सनातनधर्मांचे मरण आहे. एका वर्गाचे दुसऱ्या वर्गावर वर्चस्व रहाणें हें या चातुर्वर्ण्याचें मर्म आहे. या चातुर्वर्ण्याविरुद्ध आजवर अनेक बंडें झालीं. त्यांत महाराष्ट्रांतील भागवतधर्मी साधूसंतांचें बंड प्रमुख होय. पण या बंडांतील लढा अगदी निराळा होता. मानवी

ब्राह्मण श्रेष्ठ की भक्त श्रेष्ठ असा तो लढा होता. ब्राह्मण मानव श्रेष्ठ की शूद्र मानव श्रेष्ठ हा प्रश्न सोडविण्याच्या भरीस साधूसंत पडले नाहीत. या बंडांत साधूसंतांचा जय झाला व भक्तांचे श्रेष्ठत्व ब्राह्मणांना मान्य करावें लागलें तरी सुद्धां, या बंडाचा चातुर्वर्ण्यविध्वंसनाच्या दृष्टीनें कांहींच उपयोग झाला नाही. असें म्हणता येईल कीं तुमचें चातुर्वर्ण्य तुम्ही ठेवा आम्हीं भक्त होऊ व तुमच्यांतील श्रेष्ठत्व गणल्या गेलेल्या ब्राह्मणांना लाजवू अशी अहमन्यता धरून संतांनीं चातुर्वर्ण्याला मुळींच धक्का लावला नाही. भक्तीच्या मुलाम्यानें माणुसकीला किंमत येते असें नाहीं. तिची किंमत स्वयंसिद्ध आहे हा मुद्दा प्रस्थापित करण्यासाठी संत भांडले नाहींत. त्यामुळे चातुर्वर्ण्याचें दडपण कायम राहिलें. संतांच्या बंडाचा एक मोठाच दुष्परिणाम झाला. तुम्हीं चोखामेळ्यासारखे भक्त व्हा मग आम्हीं तुम्हांला मानूं असें म्हणून दलितवर्गाची वंचना करण्याचा एक नवा उपाय मात्र त्यामुळे ब्राह्मणांच्या हातीं सांपडला. दलितवर्गातील कुरकुरणारीं तोंडें या उपायानें बंद होतात असा ब्राह्मणांचा अनुभव आहे ; व याच उपायाच्या सहाय्यानें त्यांनी अस्पृश्य व ब्राह्मणेतर हिंदु यांना विषमतेंत दडपून ठेवलें आहे. आतां या मागासलेल्या वर्गांनी असा विचार केला पाहिजे कीं एकादा चोखामेळ्यासारखा संत आपल्या समाजांत निर्माण झाल्यानें सबंध समाज उन्नत दशेला पोंचतो की काय ? तसा तो पोंचत नाही हें खोल विचार केल्यास कळून येईल. वैयक्तिक कर्तबगारी ही आदरणीय असते, पण पुष्कळ वेळां ती अनुकरणीय नसते ; व म्हणूनच वैयक्तिक कर्तबगारी व सामुदायिक कर्तबगारी यांच्यात तुलना करतां सामुदायिक कर्तबगारी शेंकडों पटींनी श्रेयस्कर ठरते. वैयक्तिक कर्तबगारी आकाशाएवढी उंच असली तरी साधारण उंचीच्या सामुदायिक कर्तबगारीच्या पासंगालाही ती पुरणार नाहीं. असें असल्यामुळे जी परिस्थिती समाजाच्या सामुदायिक कर्तबगारीला दडपून टाकते ती केव्हांही त्याज्य होय. चोखामेळ्यासारखा एकादा संत फारतर तिच्यांतून पुढे येईल ; पण सबंध समाजाची वाट काय ? एका व्यक्तीसाठीं सबंध समाजानें दलितावस्थेंत रहावयाचें कीं काय ? अस्पृश्य व ब्राह्मणेतर या वर्गांच्या इतिहासाकडे पाहिल्यास असें दिसून येतें कीं त्या समाजांत आकाशाएवढ्या उंचीच्या कांही व्यक्ती निर्माण झाल्या असल्या तरी त्या समाजांची सामुदायिक उंची मात्र केव्हांही वाढली नाहीं. चातुर्वर्ण्यजन्य विषमता हें याचें कारण होय. कांहीं व्यक्ती या विषमतेच्या नाकावर पाय देऊन पुढे येतात. पण शे. ९९ लोकांची कर्तबगारी तिच्यामुळे गारठून जाते. ब्राह्मणेतर व अस्पृश्य या समाजांची कर्तबगारी अशाप्रकारें गारठून जाणें हें ब्राह्मणांच्या फायद्यावर असल्यामुळे ही विषमता नष्ट होणें त्यांना पसंत नाहीं. व या विषमतेविरुद्ध ज्यांनी बंड केलें त्यांच्या प्रयत्नांच्या अर्धवटपणामुळें ही विषमता नष्ट होऊंही शकली नाहीं. पण आजवर जी ही विषमता टिकून राहिली ती साफ नष्ट होण्याची वेळ आज आली आहे.

दलितवर्गाच्या हातीं राजकीय सत्ता गेली कीं ही चातुर्वर्ण्यजन्य विषमता धुळींला मिळालीच

असें समजावें. आजवर ती टिकली याचें कारण राजसत्तेचा तिच्यावर कधीच मारा झाला नाही. राजसत्तेची तिच्यावर नेहमीच कृपा होती. हिंदुराजांची होतीच, पण मुसलमान राजांचीही होती. इंग्रज तर महाधूर्त. त्यांनी दलित जनतेला वर न येऊ देण्यासाठी चातुर्वर्ण्यातील श्रेष्ठ जे ब्राह्मण त्यांच्यावर राजकीय सत्तेची खैरात केली. डॉ. आंबेडकरांची मागणी फलद्रुप झाल्यानें मात्र चातुर्वर्ण्याचा हा गाडा उलटणार आहे ; व ही भावी स्थिति ओळखण्याइतकी दृष्टी ज्यांना आहे त्यांनीच अस्पृश्यसमाजाला सत्तावान बनवणाऱ्या डॉ. आंबेडकरांच्या योजनेविरुद्ध गिल्ला चालविला आहे.

अस्पृश्यसमाजाला हिंदुसमाजापासून अलग लेखण्यांत यावें अशी जी मागणी डॉ. आंबेडकरांनीं केली तिचेंही रहस्य पुष्कळांना कळलेलें नाहीं. हिंदुसमाजांत राहिल्यास अस्पृश्य समाज हा ब्राह्मण्याच्या कुशींत एक कांटा होऊन राहील असें ज्यांना वाटतें, त्यांना ही मागणी पसंत पडली आहे. तिच्यायोगें आपल्या मागचा ससेमिरा टळेल अशी त्यांना आशा आहे. दुसरे कांही लोक असे आहेत कीं त्यांना ही मागणी जातवार प्रतिनिधित्वाच्या मागणीप्रमाणेंच तत्वविरोधी वाटते. स्पृश्य समाजाशीं समतेचे नाते जोडण्याचा प्रयत्न करीत असतां डॉ. आंबेडकर अशी मागणी कशी करतात असा प्रश्न ते विचारीत असतात. पहिल्याप्रकारच्या लोकांना आमचे सांगणें आहे कीं आम्हीं बाहेर जातों, ते आपली वाट आपण सुधारावी या इच्छेने जात नाहीं. आम्हाला ब्राह्मण्यावर मारा करावयाचा आहे. ब्राह्मण्यावर मारा करून त्याच्या तावडींतून देशाची सुटका करणें हें हिंदूंचेंच नव्हे तर मुसलमानांचें व ख्रिश्चनांचेंहीं कर्तव्य आहे. आम्हीं बाहेर जाऊं इच्छितों तें घरांत राहून गुदमरण्यापेक्षां घराबाहेर पडून मारा करण्याच्या हेतूनें. त्याचप्रमाणें दुसऱ्या प्रकारच्या लोकांना आम्ही सांगू इच्छितों कीं, आम्हाला हिंदू समाजाशीं समतेचें नातें जोडावयाचें आहे तें हिंदूसमाजांत राहून, त्याचे गुलाम म्हणून नव्हे. हिंदुसमाजाशी आम्हांला सर्व बाबतींत समानाधिकारी व्हावयाचें आहे. डॉ. आंबेडकरांच्या योजनेचें हेंच ध्येय आहे ; व त्या योजनेंतील वरपांगी विषमतेवर जर तुमचा कटाक्ष असेल तर ही विषमता समतेसाठींच आहे असे आमचें त्यावर उत्तर आहे.

●●●

अग्रलेख : बहिष्कृत भारत, ता. १ फेब्रुवारी १९२९.

९

अस्पृश्य समाजाला अस्पृश्यता, ब्राह्मणी धर्मपद्धती व तज्जन्य भेदप्रिय मनोवृत्ती नष्ट करावयाची आहेत

श्री. प्र. ना. उबाळे यांजकडून अस्पृश्य समाजाला उद्देशून आलेला खिस्त जयंतीचा संदेश† आम्हीं गेल्या अंकांत छापला होता. श्री. उबाळे यांनी हा संदेश अत्यंत सद्धेतुपुरस्सर व कळकळपूर्वक पाठविला आहे यांत शंका नाहीं. पण सद्धेतुपुरस्सर व कळकळपूर्वक केलेल्या सर्व गोष्टी दोषरहीत असतात असें मात्र कोणीच म्हणणार नाहीं. सद्धेतुपूर्ण विचारसरणी सदोष असूं शकते व श्रीं. उबाळे यांच्या या संदेशांतील विचारसरणींत अशाच कांहीं चुका राहून गेल्या आहेत, कीं तों प्रसिद्ध करतांना त्या चुका दाखवून दिल्याशिवाय संपादक या नात्यानें आम्ही आपलें कर्तव्य केले असे होणार नाहीं. श्री. उबाळे येशु खिस्ताचे अनन्य अनुयायी आहेत व त्यांच्या संदेशामुळें त्यांच्या अनुयायांचें सर्व दृष्टीनीं कल्याण झालें असें त्याना वाटत आहे. हा प्रश्न वैयक्तिक श्रद्धेचा असल्यामुळें आम्हांला त्या बाबतींत कांही लिहिण्याचें कारण नाहीं. त्याचप्रमाणें, ज्या तत्वावर आपला विश्वास आहे, तें इतरांनींही घ्यावें अशी इच्छा पूर्णपणें स्वाभाविक असल्यामुळें, खिस्त धर्माचे अनुयायी होण्याची जी सूचना श्री. उबाळे यांनी अस्पृश्यांना केली आहे, तिच्यावरही आम्हीं आक्षेप घेऊं शकत नाहीं. आम्हांला एवढेंच सांगायचें आहे की ज्या पायावर श्री. उबाळे अस्पृश्यांना येशूचे शिष्य होण्याचा उपदेश करीत आहेत तो पायाच मुळी चुकीचा आहे.

श्री. उबाळे हे अत्यंत भाविक व धार्मिकवृत्तीचे गृहस्थ दिसतात. आपल्या संदेशांत त्यांनीं धर्म या विषयावर जितका जोर दिला आहे तितका सामाजिक हक्कांवर दिला नाहीं. पण अस्पृश्य समाजाची चळवळ ही श्री. उबाळे म्हणतात त्याप्रमाणें पापमुक्ती व ईश्वरप्राप्ति साधण्यासाठीं नसून ती सामाजिक हक्क साधण्यासाठीं आहे. पापमुक्ती व ईश्वरप्राप्तीसाठीं सामुदायिक चळवळ करण्याची आवश्यकता आहे असें कोणीही म्हणणार नाहीं. कारण समाजच्या समाज केव्हांही पापी नसतो. पण अस्पृश्यांची चळवळ पापमुक्ती व ईश्वरप्राप्ती यांसाठीं आहे असें थोडावेळ गृहीत धरलें व यांसाठीं मध्यस्थाची गरज आहे असें मानलें, तरीही त्यासाठीं येशू खिस्ताला मध्यस्थ केल्याशिवाय गत्यंतर नाहीं असें आम्हांला

---

† : पाहा परिशिष्ट क्रमांक : ३

वाटत नाहीं. येशू ख्रिस्ताच्या शिकवणुकीबद्दल व बोले तैसा चाले या सदरांतील त्याच्या वर्तणुकीबद्दल प्रत्येकाला आदरच वाटला पाहिजे. पण त्याच्याशिवाय दुसरा मध्यस्थ नाहीं. हें म्हणणें अत्यंत भाविकपणाचें असले तरी निराधार आहे. येशूने आपल्या अनुयायांना दिलेल्या आश्वासनांची जंत्री श्री. उबाळे यांनीं उद्‌धृत केली आहे; व तशा प्रकारची आश्वासनें दुसऱ्या कोणीं दिलीं आहेत काय असा त्यांचा सवाल आहे. या सवालाचें उत्तर देण्यास भगवद्‌गीता समर्थ आहे. पापमुक्ती विषयीं बोलावयाचे झाल्यास 'सर्व धर्मान् परितज्य मामेकं शरणं व्रज अहं त्वा **सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि** मा शुचः ' असें आश्वासन भगव्‌द्‌गीतेत आहे. तसेच ज्याप्रमाणे मी मुक्तीदाता आहे असे येशूख्रिस्त जाहीरपणे सांगतो, त्याचप्रमाणें ' मामेव ये प्रपद्यन्ते मायामेतां तरन्ति ते ' असे कृष्ण भगवद्‌गीतेंतून सांगत आहे व स्वतः अज-अनादि असा लोकमहेश्वर असल्याचेही तो गर्जत आहे. आणि ही सर्व आश्वासनें त्यानें विशिष्ट वर्गासाठी देऊन ठेवली आहेत असेंही नाहीं. ' स्त्रियो वैश्यास्तथा शूद्राः ' त्यायोगें परागतीला जाता असें त्याचें आश्वासन आहे. कष्टी व भाराक्रांत लोकांना उद्देशून येशूने दिलेल्या आश्वासनांपेक्षां हीं आश्वासनें कमी दर्जाचीं आहेत असें कोण म्हणेल ? भगवद्‌गीतेप्रमाणेंच हिंदूंची लहान सहान पोथ्यापुराणें उघडून पाहिलीं तरी त्यांच्याशेवटी त्यांच्या वांचकांना दिलेली पारमार्थिक मोक्षाचींच नव्हे तर ऐहिक सुखसमृद्धिची व संततिसंपत्तिलाभाची आश्वासनें मुबलक आढळून येतात. आणि बायबलातील आश्वासनें जर अमोघ मानायची तर हीं आश्वासनेंही तशी मानायला कोणतीच हरकत नाहीं.

पण खरें पांहू जातां अस्पृश्य समाजाला असल्या आश्वासनांची खातरजमा देण्यांत काय अर्थ आहे तें आम्हांला कळत नाहीं. अस्पृश्य समाज पापी आहे ही समजुतच मुळीं खोटी आहे. त्याची अस्पृश्यता हा पापाचा परिणाम नसून तो जेत्यांनीं जितांना पूर्णपणें नेस्तनाबूद करण्यासाठीं त्यांच्यावर टाकलेला सामाजिक बहिष्कार आहे. असें असल्यामुळें अस्पृश्यांना पापमुक्तीसाठीं धडपडण्याची व त्यासाठीं योग्य मध्यस्थ किंवा देवाघरचा वाटाड्या शोधण्याची काय गरज ? आणि अस्पृश्य समाजांत ज्या व्यक्ती पापी असतील, त्यांना हिंदू राहूनच पापमुक्ती व ईश्वरप्राप्ति साधतां येईल. मोक्ष मिळविण्याच्या आड अस्पृश्यता येत नाही, असें हिंदु लोकाचें अस्पृश्यांना आश्वासन आहे. चोखामेळा, रोहिदास वगैरे संतांनीं, अस्पृश्य असूनही मोक्ष मिळविला; व आज जर सगळे अस्पृश्य ' पंढरीचिया वाटा । मोक्ष लाभे हातोहाता ' असें टाळ मृदंगाच्या गजरांत ओरडत मोक्षाच्या वाटेला लागतील तर हिंदु त्यांच्या आड मुळींच येणार नाहींत, ही सर्व परधर्मीयांनीं खात्री बाळगावी. पण खुबी ही आहे कीं तेच अस्पृश्य

हिंदूंच्या ' खासगीमालकी ' च्या एकाद्या तलावावर पाणी भरायला जाऊं द्या, अगर सरकारी शाळांतून आमच्या मुलांना तुमच्या मुलांत बसवा असा आग्रह धरूं द्या, कीं भूतलावरची महान् हिंदु जातच नव्हे तर आकाशपाताळांतील तेहतीस कोटी देवांची वसाहत लाठीबंद होऊन अस्पृश्यांना मारायला धांवत येईल. रत्नागिरी स्कूल बोर्डाच्या ठरावानुसार तेथील अस्पृश्यानीं आपलीं मुले स्पृश्यांच्या मुलांबरोबर बसावयास पाठविल्यामुळें त्यांच्यावर देव कोपला अशा प्रकारची हकीकत रत्नागिरीच्या ' सत्यशोधकां'त प्रसिद्ध झाली होती. ती या ठिकाणीं विचारांत घेण्यासारखी आहे.

मोक्षप्राप्तीसाठीं अस्पृश्यांनीं चळवळ केली तर त्यांच्याविषयीं सहानुभूति बाळगणारे हिंदू व देव सामाजिक हक्क प्राप्तीसाठीं झगडणाऱ्या अस्पृश्यांवरच इतके कोपायमान कां होतात हा प्रश्न खरोखरच विचारार्ह आहे. या प्रश्नाचें उत्तर ज्याला उमगेल, व हिंदूंच्या व देवांच्या या विसंगत वर्तनाचें इंगित ज्याला कळेल त्याला ब्राह्मणी धर्मपद्धतीचें रहस्य समजलें असें म्हणावयास हरकत नाहीं. हिंदूंचीं धार्मिक तत्त्वें मोठीं उज्वल आहेत, पण त्यांच्या सामाजिक व्यवहाराचें त्या तत्त्वांपासून खास पुणेरी पद्धतीनें विभक्तीकरण केलेलें आहे. यामुळेंच सर्वांभूतीं भगवंत या तत्त्वाच्या पोपटपंचीबरोबर अस्पृश्यांवरचा सामाजिक बहिष्कार हिंदु समाजांत आढळून येतो. दलितांनीं सामाजिक बंड पुकारूं नये म्हणून त्यांच्या डोळ्यांपुढें मोठमोठीं तत्त्वें आमिषादाखल ठेवण्यांत आलीं आहेत. हें या तत्त्वविरोधी व्यवहारचें मर्म आहे. पुष्कळ काळापर्यंत स्पृश्यांच्या ध्यानांत हा कावा आला नव्हता. पण आतां त्यांना तो कळला आहे व आपले सामाजिक हक्क मिळवण्यासाठी त्यांनी चळवळ सुरू केली आहे. धर्मांतराचा त्यांना उपदेश करायचा झाल्यास तो याच पायावर करणें योग्य होईल. खिस्ती धर्मांत सर्व मानवांना सारखे हक्क व सारख्या संधीं आहेत म्हणून तुम्हीं त्या धर्मांचे अनुयायी व्हा या म्हणण्याला अस्पृश्य समाजांत एकदम होकार न मिळाला तरी मान मिळेल. पण पापमुक्तीसाठीं, ईश्वरप्राप्तिसाठीं व योग्य मध्यस्थासाठीं तुम्हीं खिस्ती व्हा हें म्हणणें मात्र कोणालाही पटणार नाहीं. कारण हिंदुधर्मात राहून त्यांना या गोष्टी साध्य आहेत.

डॉ. आंबेडकर अगर अस्पृश्य धर्मांतराला भितात असा गैरसमज यावरून श्री. उबाळे यांनीं करून घेऊं नये. त्यांना एवढेंच वाटतें कीं धर्मांतरानें त्यांच्या चळवळींचा हेतु साध्य होण्यासारखा नाहीं. स्वतःपुरती अस्पृश्यता नाहींशी करणें एवढेंच जर त्यांच्या चळवळीचे ध्येय असतें तर धर्मांतरानें तें त्वरित साध्य झाले असतें. पण अस्पृश्य समाजाला एवढेंच कार्य करावयाचें नसून त्याला ब्राह्मणी

धर्मपद्धती व तत्जन्य भेदप्रिय मनोवृत्ती हीच नष्ट करावयाचीं आहेत. खिस्ती झाल्यानें ही पद्धती व ही मनोवृत्ती नष्ट होत नाहींत. कारण खिस्ती झालेल्या लोकांतही ब्राह्मण खिस्ती, मराठा खिस्ती असे भेदभाव आहेत. म्हणून खिस्ती होण्याच्या यातायातींत न पडता, हिंदू राहूनच ब्राह्मणीधर्म नाशाची चळवळ करणें श्रेयस्कर असें आम्हांला वाटतें. आणि स्वत:पुरत्या अस्पृश्यतेविषयी बोलायचें झाल्यास तिच्यापासून पळून जाण्याऐक्षां तिच्याविरूद्ध उघड उघड लढा घेऊन तिला नेस्तनाबूद करणें यांतच मर्दपणा आहे असें कोणीही म्हणेल.

●●●

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. १ फेब्रुवारी १९२९.

१०

देह मारणाऱ्यापेक्षां मनें मारणारे जास्त भयंकर

अस्पृश्योद्धारक म्हणून मिरविणारे पुण्याचें माटे मास्तर यांच्या अस्पृश्योद्धारांत कोणता ब्राह्मणी कावा भरलेला आहे तो आम्हीं यापूर्वीच वाचकांच्या निदर्शनास आणून दिला आहे. ब्राह्मणेतरांविरूद्ध ब्राह्मणांचा पक्ष बळकट करण्याच्या हेतूंनें अस्पृश्यांना गोंजारणाऱ्या या माटे मास्तरांचें नुकतेंच पुणें येथे चातुर्वर्ण्य या विषयावर व्याख्यान झालें. त्यांत ते असें म्हणाले की हल्लींच्या इंग्रजांच्या राज्यापेक्षां पेशव्यांच्या† राज्यांत अस्पृश्यांना सवलती जास्त होत्या. विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं माटे मास्तरांनीं या अद्‌भुत शोधाचें जनकत्व स्वतःकडे घेतलें नसून तें एका 'अस्पृश्य पुढाऱ्या' च्या माथी मारलें आहे. एक अस्पृश्य पुढारी आपल्याला असें सांगत होता असें ते म्हणाले आहेत व तें खरें आहे असा शेरा त्यांनी मारला आहे. हा शोध लावणाऱ्या 'अस्पृश्य पुढाऱ्या' चें व तो जगापुढें आणणाऱ्या माटे मास्तरांचें आरंभीच अभिनंदन करून आम्ही त्यांना एवढेंच कळविण्याची परवानगी घेतों कीं 'बाबांनों तुमचे हें श्रम व्यर्थ आहेत.' त्यांच्यावर विश्वास ठेवण्याइतका अस्पृश्य समाज सध्या तरी बेअकली राहिला नाहीं व तो तसा राहिला आहे असें मानण्याचा बेअकलीपणा तुम्हींही करूं नये अशी आमची इच्छा आहे.

हा शोध माटे म्हणतात त्या प्रमाणे खरोखरच एका अस्पृश्य पुढाऱ्याचा आहे कीं माट्यांनीच तो एकाद्या बेअकली अस्पृश्याला नामधारी पुढारीपणाची लालुच दाखऊन त्यांच्या गळ्यात बांधला आहे हें आम्हांला नक्की सांगता येत नाहीं. पण असा एकादा अस्पृश्य पुढारी त्यांना भेटला नसेल असें मात्र आमच्यानें म्हणवत नाहीं. आणि हा अस्पृश्य पुढारी बहुत करून सकट असावा. आपल्या गुरुमाऊलीला संतुष्ट करण्यासाठी असले बोल बोलण्याची तयारी आज सकटाशिवाय कोणाही अस्पृश्याची नाही असें म्हणणे वस्तुस्थितीला फारसें सोडून होईल असें आम्हांस वाटत नाहीं. पण हा प्रश्न बाजूला सोडला व माटे मास्तरांचा 'अस्पृश्य पुढारी' म्हणतो त्याप्रमांणे आंग्लाईपेक्षां पेशवाईत अस्पृश्यांना जास्त सवलती होत्या असे मानलें तरी तेवढ्यावरून पेशवाईतील अस्पृश्यांची स्थिती कशी स्पृहणीय ठरते हें आम्हांला कळत नाहीं. माटे मास्तरांनीं किंवा त्यांच्या

† :पाहा, परिशिष्ट क्रमांक ८, खंड १९.

खिशांतील अस्पृश्य पुढाऱ्यानें तसा कांहींच खुलासा केला नाही. काय, त्या काळीं अस्पृश्यांना तळीं विहिरी वगैरे सार्वजनिक ठिकाणी बंदी नव्हती ? कीं नोकऱ्यांच्या ठिकाणीं त्यांना अस्पृश्यता येत नसे ? कीं विद्यार्जन करून वाटेल तो दर्जा प्राप्त करून घेण्याची त्यांना मोकळीक होती ? होतें तरी काय ? खरं पाहूं गेल्यास या बाबतींत अस्पृश्यांना आज ज्या सवलती आहेत तितक्या पूर्वी कधीच नव्हत्या. इंग्रज सरकारनें अस्पृश्यता नाहीशी करण्यासाठी जितके प्रयत्न केले पाहिजे होते तितके केले नाहींत ही गोष्ट खरी. आणि इंग्रजसरकार जें कांहीं नाइलाजास्तव कां होईना करीत आहे, ती अस्पृश्यांवर मेहरबानी होय असेंही आम्ही मानून चालत नाही. पण इंग्रज सरकारच्या हातून जें कांहीं अल्पस्वल्प कार्य घडले आहे तसें पेशव्यांच्या हातून कांहींच घडलें नाहीं. पेशवाईत अस्पृश्यांच्या गळ्यांत मडकीं बांधण्यांत येत असत हें म्हणणें एक सत्यशोधकी थोतांड आहे असे पेशवाईछाप ब्राह्मणांना वाटतें. पण प्रभूसारख्या पुढारलेल्या जातीचाही छळ करण्यास ज्यांनीं मागें पुढे पाहिलें नाही व मराठ्यांना शुद्रत्वाच्या कोटींत ढकलण्यास ज्यांनीं जंगजंग पछाडले त्याच पेशव्यांनीं, प्रभू मराठेही ज्यांना तुच्छ लेखतात, त्या अस्पृश्यांच्या गळ्यांत मडकी बांधावीं हें त्यांच्या कृतीशीं सर्वथै व सुसंगत आहे. माटे मास्तरांनीं एका अस्पृश्य पुढाऱ्याच्या साहाय्यानें हा जो शोध लाविला आहे तो पेशवाईचा इतिहास वाचून लाविला नसून एकाद्या भटानें लिहिलेली कादंबरीमय पेशवाई वाचून लावला असावा असेंच म्हटलें पाहिजे.

माटे मास्तरांच्या या व्याख्यानाच्या वेळीं श्री. ग. वि. केतकर केसरीचे माजी संपादक, हे अध्यक्ष होते. माटे मास्तरांनीं पेशवे आणि इंग्रज यांच्यांत तुलना करून पेशवे बरे असें सांगितलें असलें तर केतकरांनीं ब्राह्मणी धर्मवाले स्पृश्य हिंदू व अफ्रिकेंतील गोरे यांची तुलना करून स्पृश्य हिंदू बरे असें सांगितलें. निग्रो वगैरे लोकांना गोऱ्या जेत्यांनीं दुष्टपणानें व क्रुरपणानें वागविलें असलें तर आम्हीं अस्पृश्यादी लोकांना सदयतेनें वागविलें आहे असें ते म्हणाले. श्री. केतकरांचें हें म्हणणें मोठें भ्रामक व लबाडीचें आहे. आणि म्हणूनच त्याच्यामुळें पुष्कळांची मनें गोंधळण्याचा संभव आहे. वरवर पहाणाऱ्या कोणालाही असें वाटेल कीं आफ्रिकेतील गोरे लोक निग्रो गुलामांना चाबकानें झोडपतात, लाथांनीं मारतात, व त्यांचे मनस्वी शारिरिक हाल करितात; पण आमचे स्पृश्य हिंदू अस्पृश्यांच्या बाबतींत यापैकीं एकही गोष्ट करीत नाहींत. ' सर्वांभूतीं अन्तरात्मा ' हें तत्व ध्यानांत ठेऊन ते वागत असतात. पण हा समज साफ चुकीचा आहे. गोऱ्या लोकांच्या हातून निग्रो गुलामांचा जितका छळ होतो त्याच्या शतपट स्पृश्यांच्या हातून अस्पृश्यांचा होत असतो. फरक एवढाच कीं निग्रो गुलामांचा छळ

शारिरीक असतो आणि अस्पृश्यांचा मानसिक असतो. आणि त्याचे पर्यवसान पुष्कळ वेळा शारिरीक छळांतही होतें. अस्पृश्यांनीं आपली पायरी सांभाळून राहावें, त्यांनीं वर येण्याचा प्रयत्न करूं नये, त्यांनीं चांगले कपडे घालूं नयेत, त्यांच्या बायकांनी चांगले दागिने लेवूं नयेत वगैरे स्पृश्यांच्या इच्छा अस्पृश्यांच्या मानसिक छळांत जमा होतात; आणि अस्पृश्य लोक ही पायरी सोडूं लागले म्हणजे त्यांच्या शारिरीक छळास सुरुवात होते. असल्या छळाचीं उदाहरणे आमच्या वाचकांच्या पूर्ण परिचयाचीं आहेत. अस्पृश्य जोंपर्यंत आपल्या पायरीवर आहेत तोंपर्यंत स्पृश्य त्यांच्या वाटेला जावयाचे नाहींत. पण ते आपली पायरी सोडूं लागले तर त्यांना त्यांच्याच पायरीवर ठेवण्यासाठी स्पृश्य लोक त्यांचा वाटेल तसा छळ करितील. निग्रोंना गोरे छळतात ते स्वतःच्या स्वार्थासाठीं. पण अस्पृश्यांनीं आपली पायरी सोडण्यांत स्पृश्यांची स्वार्थहानीं नसली तरी ते त्यांचा छळ करितात. म्हणजे अस्पृश्यांनीं हीन स्थितींत राहणें हे स्पृश्य स्वतःच्या मोठेपणाचें गमक समजून चालतात. गोऱ्यांच्या व स्पृश्यांच्या मनोवृत्तींत हा मोठा फरक आहे. गोऱ्या लोकांनीं निग्रो लोकांचे देह मारले असले तर स्पृश्यांनीं अस्पृश्यांचीं मनें मारिलीं आहेत. आणि देह मारणाऱ्यापेक्षां मनें मारणारे जास्त भयंकर असेंच कोणीही म्हणेल.

● ● ●

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. १ फेब्रुवारी १९२९.

११

अस्पृश्यांना हितावह योजना धुळीस मिळविण्याचा सत्ताधारी स्पृश्य धर्मबांधवांचा डाव

शिक्षणखातें हें आजवर इंग्रज सरकारच्या हातीं होतें. इंग्रज सरकार परकी असल्यामुळे प्रजेच्या शिक्षणाकडे त्यानें द्यावें तसें लक्ष दिलें नाहीं. विशेषतः अस्पृश्य समाजाच्या शिक्षणाकडे त्यानें साफ दुर्लक्ष केलें. नवीन सुधारणा कायद्यान्वयें शिक्षण खातें हिंदी लोकांच्या हातीं आल्यावर हा अन्याय दूर होईल अशी पुष्कळांना आशा होती. पण ती आशा सफल होण्यास फारशी जागा नाहीं हें दुसरीकडे छापलेल्या पत्रव्यवहारांतील ''पुणे जिल्हा बोर्ड व अस्पृश्य समाज'' या पत्रावरून† दिसून येईल. सरकारने खर्च दिल्यास बोर्ड अस्पृश्यांसाठीं बोर्डिंग चालवणार व शाळांतून अस्पृश्य सुपरवायझर नेमणार ! काय जुलूम आहे ? सरकारनें ज्या अर्थी शिक्षण खातें हिंदी लोकांच्या हातीं दिलें आहे त्या अर्थी खर्चाची जबाबदारी सरकारवर कोणत्याही अर्थानें उरलेली नाहीं, हे स्पष्ट आहे. असें असल्यामुळें सरकार खर्च देण्यास कधींही तयार होणार नाहीं, व त्यामुळें सदर पत्रांत उल्लेखिलेल्या अस्पृश्यांना हितावह होणाऱ्या योजना आपोआपच धुळीस मिळतील असाही आमच्या सत्ताधारी स्पृश्य धर्मबांधवांचा डाव असावा. सरकार खर्च देण्यास तयार होईल असें खरोखरच वाटून त्यांनी तशी मागणी त्यांच्याकडे केली असेल असे आम्हांस वाटत नाहीं. त्यांच्या या वक्रनीतीवरून एकच गोष्ट स्पष्ट होण्यासारखी आहे आणि ती ही कीं मुसलमानांप्रमाणे पूर्णपणे सवता सुभा स्थापन केल्याशिवाय अस्पृश्यांना गत्यंतर नाहीं. स्पृश्य हिंदू त्यांच्या उन्नतीला हातभार लावतील ही आशा व्यर्थ आहे.

---

† :पाहा, परिशिष्ट क्रमांक ४

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. १ फेब्रुवारी १९२९.

१२

धनिकाकडून घेतलेल्या रकमेची परतफेड न करता त्यांतून विपद्ग्रस्तांची सोय लावावी

पंजाबांत सध्यां एक विलक्षण सत्याग्रह चालू आहे. सत्याग्रह म्हटल्याबरोबर म. गांधींच्या सत्याग्रहाची कल्पना डोळ्यापुढे येते. पण आम्हीं उल्लेखिलेला सत्याग्रह अशा प्रकारचा नसून तो सैनिकांचा सत्याग्रह आहे. लाहोरच्या आसमंतात राहणारे मुसलमान, शीख वगैरे माजी सैनिक व महायुद्धांत धारातीर्थी पडलेल्या सैनिकांची बायका मुलें मिळून सुमारे ५-६ हजार लोकांनीं हा सत्याग्रह चालविलेला आहे. महायुद्धांतून जे सैनिक जिवानिशीं परत आले त्यांच्या पलटणींना सरकारनें रजा दिल्यामुळें ते बेकार झाले, व जे महायुद्धांत कामास आले त्यांची बायकामुलें विपद्ग्रस्त झालीं. या लोकांच्या पोटापाण्याची सोय लावणें सरकारचे कर्तव्य आहे. पण आजवर सरकारनें हें कर्तव्य आंगाबाहेर टाकल्यामुळें, प्रस्तुत सत्याग्रह सुरू झाला आहे. आपल्याला जमिनी पाहिजेत अशी या लोकांची सरकारकडे मागणी आहे. ही मागणी पूर्ण करणें सरकारला जर शक्य नसेल, तर तिच्याऐवजी दुसरी कांहीं व्यवस्था करून या विपन्न लोकांची तरतूद सरकारनें केली पाहिजे. महायुद्धांत धनिक लोकांकडून सरकारनें ज्या रकमा घेतल्या, त्यांची कर्ज म्हणून सरकार आतां परतफेड करीत आहे. पण तें कर्ज समजून न चालतां ती सरकारला मदत आहे. असें सरकारनें समजावें; व त्याची परतफेड करण्याच्या भरीस न पडतां त्यांतून या विपद्गस्त लोकांची सोय लावावी, हा याबाबतींत एक उपाय आहे.

●●●

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. १ फेब्रुवारी १९२९.

१३

देशद्रोहात्मक सनातन धर्म विरूद्ध क्रांतिवाद

अफगाणिस्थानचे अमीर अमानुल्ला हे आपल्या क्रांतीवादी मतांबद्दल प्रसिद्ध आहेत. पण त्यांना राज्यत्याग करावा लागला यावरून त्यांचा क्रांतीवाद अफगाण लोकांच्या पचनीं पडला नाहीं असें दिसतें. या त्यांच्या राज्यत्यागाच्या मुळाशीं कांहीं बड्या राष्ट्रांचें एक बडें कारस्थान आहे असा ध्वनी मधून मधून ऐकूं येतो. पण ते खरें असलें तरी अफगाण लोकांच्या पुराणमतवादाचा त्या कारस्थानांना चांगलाच उपयोग झाला यांत शंका नाहीं. अमानुल्लांनीं ज्या सुधारणांचा पुरस्कार केला त्या तेथील मुल्लामौलवींना नको होत्या. त्यांच्यामुळें अफगाण लोकांचे कल्याण होणार होते व अमानुल्लांना तेंच करावयाचें होते. पण मुल्लामौलवी प्रभृतींना देशाच्या कल्याणापेक्षां स्वतःच्या स्वार्थाचीच पर्वा जास्त असते असा आजपर्यंतचा अनुभव आहे. स्वतःच्या स्वार्थासाठीं देशाच्या कल्याणावर निखारे ठेवण्यास हे लोक कधींच मागें पुढें पाहत नाहींत. व अमानुल्ला विरूद्ध अफगाण प्रजेला चिथावून त्यांनीं आपला हा देशद्रोहात्मक सनातन धर्म जगाच्या निदर्शनास आणून दिला आहे. असल्या लोकांची शक्ती किती मोठी असते व तिच्याविरूद्ध क्रांतिवाद विजयी व्हायचा असेल तर त्याच्या पुरस्कर्त्यांनीं केवढी तयारी केली पाहिजे हे अमानुल्लाच्या उदाहरणावरून लक्षांत येण्यासारखे आहे.

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. १ फेब्रुवारी १९२९.

१४

मुंबई म्युनिसिपालिटींतले लोक प्रतिनिधी

थोड्या दिवसांपूर्वी मुंबई म्युनिसिपालिटींतले शहराच्या वेगवेगळ्या वॉर्डाचे प्रतिनिधी निवडण्यांत आले. दरमहा दहा रुपये किंवा त्यापेक्षां अधिक घरभाडें देणाऱ्या लोकांना मताधिकार मिळाल्यापासून साधारण लोकसमुदायामध्यें म्युनिसिपालिटींतल्या लोकप्रतिनिधींच्या कर्तव्यासंबंधानें थोडीबहुत चर्चा होऊं लागली आहे. खरें पाहिलें असतां म्युनिसिपालिटीच्या कारभारासंबंधाने श्रीमंत लोकांपेक्षा मध्यम व गरीब स्थितींतल्या लोकांनाच अधिक अगत्य वाटलें पाहिजे. मध्यम व गरीब वर्गातल्या लोकांच्या जीविताचा आणि म्युनिसिपालिटीचा अगदीं निकट संबंध आहे. स्वच्छता, आरोग्यरक्षण, औषधोपचाराची व्यवस्था, पाणीपुरवठा, प्राथमिक शिक्षण, घरांची रचना, खेळण्याच्या व फिरण्याच्या सार्वजनिक जागा वगैरे कामें म्युनिसिपालिटीच्या कार्यक्षेत्रांत येतात. श्रीमंत लोकांना यांतल्या बऱ्याचशा गोष्टींकरितां म्युनिसिपालिटीवर अवलंबून राहावें लागत नाहीं. मलबार हिल, खंबाला-हिल, पेडर रोड, अशांसारख्या हवाशीर ठिकाणीं मोठमोठ्या बंगल्यांत राहणाऱ्या लोकांना स्वतःच्या सर्व सोयी करून घेतां येतात. साफसुफी, स्वच्छता ठेवण्याचीं साधनें त्यांना पैशामुळें उपलब्ध असतात. औषधोपचाराची व्यवस्था मोठमोठ्या डॉक्टरांना त्यांची जबर फी देऊन सधन लोकांस करुन घेतां येते. प्राथमिक शिक्षणांसाठी त्यांच्या मुलांवर कोणी सक्ति करावयास नको असते. आपल्या मुलांच्या शिक्षणांसाठीं हवा तितका पैसा खर्च करणें त्यांना शक्य असतें. त्यांना खेळण्यासाठीं बंगल्याच्या आवारांत किंवा क्लबांमध्यें भरपूर जागा मिळू शकते आणि हवा खाण्याच्या जागा कितीही लांब असल्या तरी ते मोटारींतून किंवा गाडींतून बसून तेथें सहज जाऊं शकतात. उलट पक्षीं, शहराच्या गचडीच्या भागांत चाळींमधील लहान लहान खोल्यांत राहणाऱ्या मध्यम व गरीब स्थितींतील लोकांना स्वतःच्या सोयी स्वतः करणें शक्य नसतें. त्यांचें जिवित जर सुखावह झालें पाहिजे तर म्युनिसिपालिटीसारख्या सार्वजनिक संस्थांनींच त्यांच्या सोयीसुखांकडे लक्ष दिलें पाहिजे, परदुःखानें दुःखित होणारे लोक जगांत केव्हांही विरळाच असावयाचे. अर्थात् म्युनिसिपालिटीचा कारभार मध्यम व गरीब वर्गाच्या प्रतिनिधींच्या तंत्रानेंच चालला पाहिजे, म्युनिसिपालिटीमध्यें बहुमत मध्यम व गरीब वर्गातल्या लोकांच्याच प्रतिनिधींचें असलें पाहिजे, हें उघड होय. गरिबांचीं दुःखें

गरिबांनाच चांगल्या रीतीनें ठाऊक असावयाचीं. कदाचित् स्वतःची स्थितीं गरिबीची नसली तरी गरिबांच्या सुखदुःखांची खऱ्या लोकप्रतिनिधींना माहिती असली पाहिजें, गरिबांविषयीं सहानुभूति वाटली पाहिजे, आणि गरिबांची बाजू कॉर्पोरेशनमध्यें जोरकसपणानें मांडून त्यांना गरिबांचे हित साधतां आलें पाहिजे.

उमेदवारांची लायकी व मतदारांची मतें

म्युनिसिपल कॉर्पोरेशनमध्यें निवडून येण्याकरितां जे उमेदवार उभे राहतात त्यांची मतें मिळविण्यासाठीं मोठी धडपड चालते. आजकाल मुंबई म्युनिसिपालिटींत निवडून येणें साधारण स्थितींतल्या उमेदवारांना कठीण झालें आहे. मतें मिळविण्यांकरितां बराचसा खर्च करावा लागतो. श्रीमंत उमेदवार मतें विकत घ्यावयाससुद्धां तयार असतात. परंतु मतें विकत घ्यावयाचीं नसलीं तरी तीं मिळविण्यांकरितां जे प्रयत्न करावे लागतात ते खर्चाचे असतात. कॉर्पोरेशनमध्ये निवडून आल्यावर वेगवेगळ्या लटपटी करून ज्यांना स्वतःचा कांहीं आर्थिक फायदा करून घ्यावयाचा नसतो अशांना कॉर्पोरेशनमध्यें निवडून येणें म्हणजें गांठचें खाऊन शेटची नोकरी करण्यासारखेंच होतें. अर्थात् कॉर्पोरेशनमध्यें जाऊन लोकसेवा करण्याची लायकी अंगी असतांही साधारण स्थितींतले लोक उमेदवार म्हणून उभे राहावयास धजत नाहींत. उलटपक्षीं, अंगी म्हणण्यासारखी कांहीं लायकी नसतांही कित्येक लोक पैशाच्या जोरावर मानासाठी हपापून उमेदवार म्हणून उभे राहतात. म्यु. कॉर्पोरेशनमध्यें लोकहित साधण्याचे काम करण्याला जे गुण अवश्य असतात ते म्यु. कॉर्पोरेशनमध्यें निंवडून येण्यास लागणाऱ्या गुणांपेक्षां वेगळ्या प्रकारचे असतात. त्यामुळें, निवडून आलेले उमेदवार नेहमीं लायकच असतात असें नाहीं, किंबहुना नालायक. पण यशस्वी उमेदवारांची संख्या नेहमी बरीच मोठी असल्याचें दिसून येतें. मुंबई म्युनिसिपालिटींत वेगवेगळे पक्ष, त्यांचीं वेगवेगळीं धोरणें व वेगवेगळे कार्यक्रम नाहीत म्हटलें तरी चालेल. नांवाला कांहीं पक्ष आहेत, परंतु त्यांत तत्वाचा भाग फारच थोडा असून निवडणुकीच्या वेंळी तर मतदारांपुढे ते पक्ष योग्य रीतीने मुळीच मांडले जात नाहीत. खाजगी प्रयत्नांनींच मतें मिळविण्यांत येतात. गेल्या निवडणुकींत जाहीर सभांच्या द्वारें मतदारांचीं मनें वळविण्याचें प्रयत्न किती थोडे झाले तें मुंबई शहरांतल्या लोकांना ठाऊकच आहे. पक्ष, धोरण, कार्यक्रम, जाहीर सभा, जाहीर आश्वासनें यांच्या अभावी मतदारांना नागरीकत्वांचीं कर्तव्यें, हक्क व जबाबदारी यांच्या संबंधानें जें शिक्षण मिळणें अवश्य आहे तें मिळत नाहींच, परंतु मतदारांची दिशाभूल होऊन कसलेही रद्दी उमेदवार निवडून येऊ शकतात. कित्येक लोक तर मुंबईच्या म्युनिसिपल कॉर्पोरेशनमधले कायमचे वतनदार बनलेले आहेत. ते नेहमीं गरीब लोकांच्या हिताच्या आड येणारे असोत,

पुच्छप्रगतीच्या धोरणाचे पुरस्कर्ते असोत, केवळ माना हालवणारे नंदीबैल असोत, कधीं तोंड न उघडणारे मूकस्तंभ असोत अथवा कॉर्पोरेशन हॉलमध्ये वर्षासहा महिन्यांतून तोंड दाखविणारे धूमकेतू असोत, दरखेपेला ते निवडून यावयाचेच. वर सांगितलेल्या प्रकारचे कांही सभासद सरकारनें नेमलेले असतात. तथापि, आम्हांला त्यांच्याबद्दल तेवढें आश्चर्य वाटत नाहीं ; परंतु वार्डांच्या निवडणुकींतूनहि तसले लोक पुनः पुनः निवडून येऊं शकतात हीच विशेष आश्चर्याची व खेदाची गोष्ट समजली पाहिजे. इकडील मतदारांमध्यें अद्यापि आपल्यावरील जबाबदारीची जाणीव व्हावी तशी उत्पन्न झालेली नाहीं याचीच ही साक्ष होय.

जात्याभिमानाचें बंड

बऱ्याचशा निवडी जातिभेदाच्या तत्त्वावर होत असतात. ज्या उमेदवाराच्या जातीच्या मतदारांची संख्या फार लहान असेल तो खरोखरच तितका नांवाजलेला व सर्व शहरांत अतिशय लोकप्रिय असा असल्याखेरीज अथवा पगारी एजंट ठेवून मतें विकत घेण्याची ऐपत त्याला असल्याखेरीज त्याला निवडणुकींत यशस्वी होणें शक्य नाही. मतदारांचा ओढा स्वाभाविकपणें आपल्या जातींच्या उमेदवारांकडे असतो. आपल्या जातीचा प्रतिनिधी म्युनिसिपालिटींत बसणें हे आपल्या जातीला एक भूषण आहे असें पुष्कळांना वाटतें. जात्याभिमानापुढे उमेदवाराच्या लायकी-नालायकीचा विचार फारच थोड्या लोकांच्या मनांत येतो. जातिभेदाचें बंड माजविणाऱ्या उमेदवारांना उदारमतवादी उमेदवारांपेक्षां अधिक मतें मिळतात आणि उदारमतवादी उमेदवार निवडणुकींत पडतातही. म्युनिसिपालिटींच्या प्राथमिक शाळांमध्यें बहिष्कृत वर्गातल्या विद्यार्थ्यांकरितां पिण्याच्या पाण्याचीं भांडीं वेगळी असावी किंवा पंक्तिप्रपंच असूं नये असा प्रश्न निघाला असतां कॉर्पोरेशनमध्यें कडाक्याचा वादविवाद झाला व सभासदामध्यें तीव्र मतभेद झाला. या वादविवादाचा गेल्या निवडणुकामध्यें कित्येक वार्डात परिणाम पुष्कळ झाल्याचें दिसून आलें. वरील प्रश्नामुळे गुजराथी लोकांत तर अतिशय खळबळ उडाली होती. रा. लखमीदास तेरसी हे समाजसुधारणा पक्षाचे असल्यामुळें त्यांनीं पंक्तिप्रपंच क़रण्याविरुद्ध मत दिलें होतें. त्याबद्दल जुन्या मताच्या सोंवळ्या लोकांनी त्यांच्यावर गिल्ला केला आणि त्यामुळे ते निवडणुकींत यशस्वी झाले नाहींत. जी वार्डात डॉ. जावळे व रा. पी. जी. सहस्त्रबुद्धे यांना सोवळ्या लोकांनीं विशेषतः ब्राह्मणांनी निवडून दिलें. या दोन उमेदवारांच्या बाबतींत दादर भागांतल्या सोवळ्या ब्राह्मणांनी हस्तपत्रकें वांटून ते जुन्या मताचे अभिमानी आहेत यासाठींच सर्वांनी त्यांना मतें देऊन निवडून आणावें अशी चळवळ केली होती. डॉ. जावळे हे सरकारपक्षाचे म्हणून प्रसिद्ध असतां केवळ त्यांनीं कॉर्पोरेशनमध्यें सोवळेपणाचा पुरस्कार केला आणि अस्पृश्यतानिवारणाच्या

कार्यात ते आडवे आले एवढ्यासाठींच राजकीय बाबतींत जहाल मताचा पुरस्कार करणाऱ्या ब्राह्मणांनीही त्यांना आपलीं मतें दिली. दादर भागांतल्या एका पुलाला कै. टिळकांचें नांव द्यावें अशी सूचना कॉर्पोरेशनमध्यें आणणें एवढीच ज्यांची कामगिरी त्या सहस्त्रबुद्ध्यांना ते जातीनें ब्राह्मण आणि त्यांतही सुधारणेचे विरोधी म्हणूनच त्यांच्या जातभाईनीं मतें दिली आणि त्यांच्याकरितां इतरांचींही मतें मिळविलीं. यावरून अद्यापि मुंबईसारख्या शहरांतल्याही म्युनिसिपल निवडणुकी कशा रीतीनें होतात आणि शिकलेल्या वर्गातले लोकही आपला मतदानाचा हक्क कोणत्या धोरणानें बजावतात तें दिसून येतें.

हिंदु, मुसलमान व पारशी समाजांतील यशस्वी उमेदवार.

मुंबई शहरांतील लोकसंख्येपैकीं शेंकडा १६ टक्के वस्ती मुसलमानांची असतां ७६ जागांपैकी १४ जागा म्हणजे शेंकडा १८ टक्के जागा त्यांच्या वांट्याला आल्या. पारशांची लोकसंख्या मुंबईत शेंकडा फक्त ७ टक्के असतां त्यांनीं १८ जागा म्हणजे शेंकडा २४ टक्के जागा मिळविल्या. पारशी व मुसलमान उमेदवारांमधील कित्येक सधन उमेदवारांनी जो खर्च केला होता व जे शिकस्तीचे प्रयत्न केले होते त्यांच्यामुळें त्यांना आपआपल्या जातीच्या मतदारांखेरीज इतर विशेषतः हिंदु मतदारांची मतें मिळालीं. जातिभेदाप्रमाणें धर्मभेदहि मनांत न आणतां मतदारांनीं केवळ उमेदवाराची लायकी व आंतापर्यंतची त्याची सार्वजनिक कामगिरी यांच्याचकडे लक्ष्य देऊन आपलीं मतें द्यावी हें अर्थातच् स्पृहणीय होय. परंतु सर्व हिंदु मतदारांनीं हें उदात्त तत्त्व दृष्टीपुढें ठेऊन आपलीं मतें दिलीं असें मात्र म्हणावयास आम्ही तयार नाहीं.

अस्पृश्यांची स्थिती.

हिंदुसमाजानें आपल्याच धर्मातला जो एक मोठा वर्ग अस्पृश्य मानलेला आहे त्या वर्गाचा प्रतिनिधी सध्यांची व्यवस्था चालू असेपर्यंत तरी मुंबईच्या म्युनिसिपल कॉर्पोरेशनमध्यें कोणत्याच वॉर्डांत निवडून येणें शक्य नाहीं असें म्हटलें तरी चालेल. एक तर सध्यां मताधिकार दरमहा दहा रुपये किंवा त्यापेक्षां अधिक घरभाडे देणारांना आहे. त्यामुळें मुंबई शहरांत बहिष्कृत वर्गातील मतदारांची संख्या त्या वर्गातील लोकसंख्येच्या मानाने अतिशय अल्प आहे. या वर्गातील लोक सर्वात दरिद्री असल्यामुळे दरमहा दहा रुपये भाडें देण्याचें सामर्थ्य हजारांत एकालाच असतें. शिवाय, या वर्गातील लोकांची वस्ती शहराच्या वेगवेगळ्या भागांत पांगलेली आहे. तिसरी गोष्ट ही की, या वर्गातल्या मतदारांमध्येहि अशिक्षित व अज्ञान लोकांचा भरणा असल्या कारणानें आपल्या वर्गाच्या

हितसंबंधाच्या दृष्टीनें उमेदवाराच्या लायकीचा विचार न करताच बहुधा ते आपलीं मतें देतात. अशा स्थितींत बहिष्कृत वर्गाचे प्रतिनिधी मुंबई म्युनिसिपालिटींत निवडून येऊं शकत नाहींत आणि त्यामुळें सरकारनें केलेल्या नेमणुकीवरच समाधान मानून घेऊन राहावें लागतें. हल्लीं मुंबई शहरांतील कामगार वर्गाचे चार प्रतिनिधी घेण्याची मुंबई म्युनिसिपल अॅक्टात दुरुस्ती होऊन व्यवस्था झालेली आहे. कामगारसंघातून एक मतदार मंडळ (electoral college) तयार करण्यांत येतें व त्या मंडळानें हे चार प्रतिनिधी निवडून घ्यावयाचे असतात. तशा प्रकारची व्यवस्था बहिष्कृत वर्गाच्या बाबतींत होईल तरच त्या वर्गाचे प्रतिनिधी निवडून येण्याची आशा आहे. किंवा हल्लीं शहराचे सात वॉर्ड केले आहेत व प्रत्येक वॉर्डाला कमी जास्ती अनेक प्रतिनिधी निवडण्याचा हक्क दिलेला आहे. त्याच्याऐवजीं शहराचे लहानसहान असे पुष्कळ भाग पाडून प्रत्येक भागाला फक्त एकएकच प्रतिनिधी निवडण्याचा हक्क दिला तर हल्लीपेक्षां विशेष समाधानकारक रीतीनें प्रतिनिधींची निवड होईल. याखेरीज, लोकसंख्येच्या प्रमाणानें वेगवेगळ्या वॉर्डांमधील प्रतिनिधींची संख्या ठरविणें आणि मताधिकाराची मर्यादा अधिक विस्तृत करणें या सुधारणाहि अवश्य आहेत. सध्यां सधन लोकांची वस्ती असलेल्या थोड्या वस्तीच्या वॉर्डांना मोठ्या वस्तीच्या परंतु गरीब लोक असलेल्या वॉर्डांपेक्षा अधिक प्रतिनिधी निवडून देतां येतात. ही गोष्ट लोकशाहीच्या तत्त्वाविरुद्ध आहे. तसेंच मताधिकार कमींत कमी दहा रुपये भाडें देणारांना असल्यानुळें हजारों लोक मतदानाच्या हक्काला मुकतात. मताधिकार विस्तृत होऊन वयांत आलेल्या प्रत्येक मनुष्याला मतदानाचा हक्क मिळाल्यास मतदारांची संख्या इतकी वाढेल कीं, खासगी रीतीनें भीड-वशील्याचा उपयोग करून अथवा मतें विकत घेऊन निवडून येणें सहसा शक्य होणार नाहीं.

❀ ❀ ❀

अग्रलेख : बहिष्कृत भारत, ता. १ मार्च १९२९.

१५

मुंबई शहरांतील दंगे

हिंदुमुसलमानांच्या दंग्याचा कालिमा हल्लीं पुष्कळ वर्षें मुंबई शहरास लागलेला नव्हता. इतर अनेक ठिकाणीं हिंदुमुसलमानांचे दंगे झाले तरी मुंबई शहरांत दोन्हीं धर्मांचे लोक गुण्यागोविंदानें नांदत होते. परंतु अकल्पित रीतीने मुंबई शहरांत फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यांत हिंदु मुसलमानांच्या दंग्याची आग पेटली. शिवडी येथील तेलाच्या कंपन्यांमधील कामगारांचा संप झाला असतां त्या कंपन्यांच्या अधिकाऱ्यांनीं संपवाल्याच्या जागीं पठाण लोक नेमून संपवाल्यांची खोड मोडण्याचा प्रयत्न केला. त्यामुळें संपवाले हिंदुमुसलमान कामगार व त्यांच्या जागीं काम करणारे पठाण यांच्यामध्यें मारामाऱ्या झाल्या. तितक्यांतच ग्रँटरोड, भेंडीबाजार वगैरे भागांत पठाण लोक मुलें पळवून नेतात अशी हूल उठून ती सर्व शहरभर पसरली. पठाणांना त्यामुळें ठिकठिकाणीं मार पडूं लागला व कित्येक पठाण मारानें ठारहि झाले. पठाण पाहिला कीं त्याला मारावयाचें असा प्रकार चालू झाल्यामुळें पठाणांचें धर्मबंधू जे मुसलमान त्यांनी पठाणांची कड घेतली. त्यामुळें हिंदुमुसलमानांच्या दंग्याचें या गडबडीला भयंकर स्वरूप आलें. या दंग्यांत उभय पक्षांकडील मिळून सुमारें १५० लोक प्राणांस मुकले व शेंकडों लोकांना जबर जखमा झाल्या. मेलेल्या व जखमी लोकांपैकी बहुतेक लोक निरुपद्रवी होते. एकट्या दुकट्याला पुष्कळशा लोकांनीं गांठावयाचे व त्याला मरेपर्यंत मार द्यावयाचा किंवा अचानक रीतीनें सुरीनें भोसकाभोसकी करावयाची, अशा प्रकारचा खाटिकपणाच या दंग्यांत दिसून आला. शांतता करण्याकरितां दंग्याच्या जागीं गेलेल्या थोड्या तरुण, सद्धेतुपूर्ण स्वयंसेवकांचेही दंगेखोरांनीं बळी घेतले ! त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट ही कीं, पुष्कळ हिंदूंनीं मुसलमानांचें व मुसलमानांनीं हिंदुंचें शेजारधर्माला स्मरून संरक्षण केलें, नाहींपेक्षां हजारों निरपराधी माणसांचें प्राण गेले असते. उभय पक्षांतले सुशिक्षित आगलावे या दंग्याच्या वेळीं चिडवाचिडवी करीत होते व त्यामुळेंच संपाचा वणवा इतका भडकला हें मात्र येथें अवश्य नमूद केलें पाहिजे.

उभय समाजांतल्या खऱ्या धार्मिक, पापभीरू, सात्विक लोकांचीं अंतःकरणें निरपराधी लोकांच्या हत्या पाहून दुःखानें हळहळत होतीं तर आगलावे पुढारी हत्याकांडाला प्रोत्साहन देत होते. या दंग्यामुळें कोणत्याच धर्माचा फायदा झाला नाहीं, उलट दोन्ही धर्मांतील विचारी लोकांना लज्जेनें मान खाली घालण्याचा प्रसंग आला !

●●●

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. १ मार्च १९२९.

१६

हिंदु देवालयांचें संरक्षण करणारे अस्पृश्य !

हिंदुसमाजांत बहिष्कृत वर्गाला समतेचे हक्क नाहींत इतकेंच नव्हे तर परधर्मातल्या लोकांपेक्षाही अस्पृश्यांना हिंदुसमाज तुच्छ लेखीत असतो. देवळाच्या आवारात मुसलमान जाऊं शकतात, परंतु अस्पृश्यांना आसपासही पाऊल टाकतां येत नाहीं, मग देवदर्शनाची गोष्ट बाजूलाच राहिली ! अशा प्रकारें हिंदुसमाजांत बहिष्कृत वर्गाची स्थिति असतां मुंबईतल्या हिंदुमुसलमानांच्या मोठ्या दंग्याच्या वेळीं त्या वर्गांतील लोकांना, ते हिंदुधर्मास चिकटून राहिल्यामुळें इतर हिंदूंप्रमाणेंच मुसलमानांच्या क्रोधाला बळी पडण्याचा प्रसंग आला. इतकेंच नव्हे तर ज्या देवालयांत त्यांना देवदर्शन घेण्यासही मोकळीक नसते त्या देवालयांतल्या देवांच्या त्यांना अदृश्य असलेल्या मूर्तीचें संरक्षण करण्यासही भायखळा वगैरे भागांत अस्पृश्य वर्गातले लोक केवळ पूर्वजांच्या धर्माचा अभिमान बाळगून आणि आपल्यावर हिंदुसमाजांत होत असलेला जुलूम घटकाभर [illegible], [illegible] काठ्या घेऊन तयार झाले आणि त्यांनीं अशी मदत केल्यामुळेंच मुसलमानांच्या हल्ल्यापासून त्या हिंदु देवालयांचा बचाव झाला. या प्रसंगीं आमच्या अस्पृश्यवर्गीय लोकांनी आपले प्राण धोक्यांत घालण्यास मागेपुढे पाहिलें नाहीं. अस्पृश्यांनी या आणीबाणीच्या वेळीं हिंदुसमाजाची जी बहुमोल कामगिरी बजावली त्याबद्दल हिंदुसंघटनवाल्यांनीही त्यांची स्तुति केली आहे. परंतु एरव्हीं त्यांना अस्पृश्यांच्या धार्मिक व सामाजिक हक्कांची कधीं आठवण होत नाहीं. अस्पृश्यांनी हिंदुधर्मांतून बाहेर जाऊं नये, हिंदुसमाजाच्या खांद्याला खांदा भिडवून परधर्मीयांशीं सामना करावा, परंतु हिंदुसमाजांत समतेच्या हक्काची मागणी त्यांनी करूं नये, अशी या धर्माभिमानी म्हणविणाऱ्या आकुंचित बुद्धीच्या लोकांची इच्छा असते. अस्पृश्य लोक समतेची मागणी करूं लागले तर ' तुम्हांला आम्ही वागवितों तसें वागवून घ्यावयाचें असेल तर हिंदुधर्मांत राहा, नाहीं पेक्षा तुम्ही खुशाल परधर्मात जा. आम्हांला त्याची बिलकुल पर्वा नाहीं ' असें उघड म्हणावयासही हे धर्माभिमानी म्हणविणारे लोक कमी करीत नाहींत. दंग्याच्या वेळीं अस्पृश्यांची हिंदुसमाजाला जरूरी होती, म्हणून मुंबईच्या कित्येक भागांत त्या दिवसांत हिंदुउपहारगृहांमध्येंही अस्पृश्यांना घेण्यांत येत असे,

असें सागतात. तसें असल्यास हिंदुलोकांच्या सोंवळयाच्या मतलबी लवचीकपणाची वाहवाच केली पाहिजे ! हिंदुउपहारगृहांमध्यें अस्पृश्यांना घेण्यात येत नाहीं व त्यामुळें त्यांना मोंगलांच्या, मुसलमानांच्या किंवा इराण्यांच्या हॉटेलांमध्यें जावें लागतें. ज्या लोकांना दंग्याच्या वेळीं हिंदुउपहारगृहांमध्यें प्रवेश करता येत होता, त्यानाही आता परत परधर्मीयांच्या हॉटेलाचा आश्रय करावा लागेल याविषयीं आमची खात्री आहे. कारण ' गरज सरो नी वैद्य मरो ! '

● ● ●

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. १ मार्च १९२९.

१७

स्वाभिमानसंघाची चळवळ

गेल्या ता. १७ फेब्रुवारी १९२९ रोजी मद्रास इलाख्यांत चिंगलपुट येथें स्वाभिमानसंघाची (Self-respect League) पहिली परिषद भरली. या परिषदेला मद्रास सरकारचे लॉ. मेंबर दि. ब. कृष्णन् नायर, मुख्य दिवाण डॉ. सुबारायन्, आरोग्य खात्याचे दिवाण मि. मुथिया मुदलियार, मि. पी. टी. राजन्, मि. रामस्वामी नायकर वगैरे पुढारी मंडळी हजर होते. मि. राजन् यांच्या हस्तें स्वाभिमानाचा झेंडा उभारण्यांत आला आणि त्यांनी, या परिषदेचा उद्देश सामाजिक विषमता व अन्याय यांचें निमूर्लन करणें हा आहे, असें जाहीर केलें व परिषदेच्या कामाला सुरवात करून देतांना डॉ. सुबारायन् म्हणाले, "सामाजिक स्वाभिमानाखेरीज राजकीय स्वाभिमान उत्पन्न व्हावयाचा नाहीं. ज्या समाजपद्धतींत जातिभेदाचा बुजबजाट झालेला आहे त्या पद्धतींतून लोकशाहीला पोषक असा ऐक्यसंपन्न समाज निर्माण होणें कधींही शक्य नाहीं." ही स्वाभिमानसंघाची चळवळ म्हणजे समाजसमतावादाचीच चळवळ होय. स्वाभिमान म्हणजे दुरभिमान नव्हे, अहंकार नव्हे, इतरांना तुच्छ लेखण्याची प्रवृत्ति नव्हे. स्वाभिमान ही पवित्र भावना आहे. आपण मनुष्य आहो, आपल्याला माणुसकीचे हक्क आहेत, आपले माणुसकीचे हक्क हिरावून घेण्याचा कोणाला अधिकार नाही, सर्वांना स्वतःची उन्नति करण्याची पूर्ण मोकळीक असली पाहिजे, असें वाटणें हा स्वाभिमान. खरा स्वाभिमानी मनुष्य दुसऱ्याच्या स्वाभिमानालाही जपत असतो, कारण त्याला स्वाभिमानाची किंमत ठाऊक असते. हिंदुसमाजाचा स्वाभिमान नष्टप्राय झाला आहे. म्हणूनच एक जात दुसऱ्या जातीला कमी मानते आणि अशा रीतीने दुसऱ्यांना कमी मानण्यांत आपला मोठेपणा आहे अशी खोटी समजूत सर्वत्र फैलावली आहे. ही समजूत घालविण्याकरितां आणि हिंदुसमाजांत खरी तेजस्विता उत्पन्न करण्याकरितां स्वाभिमानसंघ, समाज समतासंघ, जातपात तोडक मंडळ अशा चळवळींची आवश्यकता आहे.

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. १ मार्च १९२९.

१८

मद्रासची अस्पृश्यतानिवारक परिषद

स्वाभिमानपरिषदेच्या थोडे दिवसापूर्वी मद्रास येथें अस्पृश्यतानिवारक परिषदेचें दुसरें अधिवेशन भरलें होते. परिषदेच्या अध्यक्षस्थानीं कलकत्त्याच्या कुमारी ज्योतिर्मयी गांगुली यांची योजना करण्यांत आली होती. सुप्रसिद्ध टागोर घराण्यांत या बाईचे आजोळ असून त्या उदारमतवादी आहेत. मद्रासच्या म्युनिसिपल कॉर्पोरेशनचे अध्यक्ष मि. रामस्वामी मुदलियारें यांनीं अस्पृश्यतानिवारणाचा ध्वज रोंवला आणि मद्राससरकारचे एक माजी दिवाण सर परशुराम पात्रो यांनी परिषदेच्या कामाला सुरवात करून दिली. त्यानंतर अध्यक्ष बाईंचें अस्पृश्यतेच्या निर्मूलनाची आवश्यकता प्रतिपादणारें सुंदर भाषण झालें. त्या म्हणाल्या कीं, ''अस्पृश्यता म्हणजे हिंदी राष्ट्रपुरुषाला झालेला पक्षघाताचा रोग आहे. या रोगामुळें राष्ट्रपुरुषाचा देह हळुहळू परंतू खात्रीने मृत्युपंथाला लागला आहे. थोडक्यांत सांगावयाचे म्हणजे अस्पृश्यतेनें हिंदुसमाजाच्या सामाजिक, नैतिक व आत्मिक जीवनांत विष कालविलें आहे. अस्पृश्यतेचे त्वरीत उच्चाटन झालें तरच हिंदी राष्ट्राची धडगत आहे.'' या परिषदेंत अनेक ठराव पसार झाले. त्यांतला मुख्य ठराव, अस्पृश्यतेच्या सबबीवर विशिष्ट वर्गांना नागरिकत्वाचे हक्क न देण्याच्या प्रवृत्तीचा निषेध करणारा आणि देवालयांसुद्धां सर्व सार्वजनिक संस्थांमध्यें प्रवेश करण्याचा हक्क अस्पृश्यांना असावा असें प्रतिपादणारा होता. पूर्ण राजकीय स्वातंत्र्याच्या वल्गना करणारे एस. श्रीनिवास अय्यंगार, सत्यमूर्ति यांच्यासारखे सोंगाडे राष्ट्रीय पुढारी या परिषदेंत कोठें दिसले नाहींत हें लक्षांत ठेवण्यासारखे आहे. राष्ट्रपुरुषाला झालेला पक्षघाताचा रोग त्यांना कायमचा ठेवावयाचा आहे. फक्त मोठमोठ्यानें व रागानें ओरडल्यानें राष्ट्रपुरुष सामर्थ्यवान् होईल असें या देशभक्तांना वाटत असावें !

●●●

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. १ मार्च १९२९.

१९
सकटांचा संघ

पुण्याचे रा. के. के. सकट यांनीं तेथें ' अस्पृश्य समाज समतासंघ ' नांवाची एक संस्था स्थापल्याचें ' भाला ' पत्रावरून कळतें. अस्पृश्यसमाजात महार, मांग, चांभार, ढोर, भंगी वगैरे ज्या अनेक जाती व पोटजाती आहेत त्या सर्व मोडून अस्पृश्यांमध्यें सरसहा रोटीबेटीव्यवहार सुरू करणें व अस्पृश्यांत सामाजिक समता प्रस्थापित करणें हें या संघाचें मुख्य ध्येय असल्याचें सकटांनीं जाहिर केलें आहे. रोटीबंद, बेटीबंद, लोटीबंद वगैरे अनेक बंद असलेल्या जातिभेदाचें समर्थन करणाऱ्या ' भाला ' पत्रांत ही बातमी प्रसिद्ध झाली आणि ' भाला ' कारांनीं सकटांच्या प्रयत्नांचें अभिनंदन करतांना आपल्या धोरणाप्रमाणें या सकटसमतासंघाचे भविष्यही वर्तवून ठेवलें ! ' भाला ' कार म्हणतात, अस्पृश्यांच्या सर्व जातींमध्यें बेटीव्यवहार होण्याची गोष्ट दूरच राहिली, परंतु नुसता रोटीव्यवहार व्हावयास कमींत कमी सात पिढ्या तरी जाव्या लागतील ! ' भाला ' कारांचा हा शाप आहे कीं आशीर्वाद आहे हे सकटांनींच ठरवावें. त्यांना कळत नसल्यास आपल्या गुरुजीला विचारावें ! सदरील भविष्य वर्तवितांना ' भाला ' कारांची मनोवृत्ति कोणत्याही प्रकारची असो, आम्हांला तरी त्यांत त्यांची एक अप्रत्यक्ष कबुलीच दिसते. स्पृश्य वर्गांतला जातिभेद कालात्रयीं नष्ट होणार नाही व होतां कामा नये, असें ' भाला ' काराचें मत आहे, परंतु अस्पृश्य हा वर्ग वेगळा राहिल्यावर त्यांच्यात रोटीबेटीव्यवहार होऊन तो एकजात बनला तर भालाकारांना तें अनिष्ट नाही आणि स्पृश्यांतला जातिभेद वज्रलेप असला तरी अस्पृश्यांतला जातिभेद सात पिढ्यानंतर कां होईना परंतु नष्ट होण्याचा संभव आहे असें त्यांना वाटते. म्हणजे भालाकाराची ब्राह्मण जात तेवढी अलग राहिली म्हणजे झालें आणि स्पृश्यवर्गीय लोक जातीभेदाला कायमचे चिकटून राहण्याइतके दुरभिमानी व अविचारी असले तरी अस्पृश्य वर्ग तसा दुरभिमानी व अविचारी नाही ; आज ना उद्या तरी तो जातिभेदाच्या शृंखला साफ तोडून टाकणार, अशी त्यांच्याच कबुलीवरून भालाकाराची खात्री असावी असें दिसतें. पण भालाकार ! जो महार किंवा चांभार जातीचा मनुष्य भंग्याला कमी लेखणार नाही तो ब्राह्मणादि जातींना आपल्यापेक्षा श्रेष्ठ समजेल काय ? सकटांना आता कांहीं ब्राह्मण लोक उचलून धरतील, किंबहुना सकटांच्या डोक्यांत त्याच लोकांनीं ही कल्पना घातली असेल. त्यांना पक्कें ठाऊक आहे कीं, अस्पृश्य समाज अशिक्षित व अज्ञान

आहे. जातिभेदानें ग्रासलेला आहे. आधींच कित्येक दुरभिमानी लोकांनीं बहिष्कृत वर्गामध्यें जातिभेदाच्या तत्त्वावर फाटाफूट करण्याचा प्रयत्न चालविला आहे, त्यांत सकटांचा हा संघ निघाला म्हणजे अधिकच भांडणें होतील आणि मग अस्पृश्यांना मोठ्या दिमाखानें विचारतां येईल कीं ' तुमच्यांतच जर समता नाही, तुम्हींच जर आपसांत एकमेकांना कमी समजतां तर आमच्यापाशीं समतेचे हक्क तुम्हीं कोणत्या तोंडानें मागतां ? ' असा प्रश्न आजही मोठ्या साळसूदपणानें विचारण्यांत येतो. तोंच आणखी जोरानें विचारावयास मिळावें यासाठीच सकटांच्या डोक्यांत ही कल्पना भरविण्यात आली असावी, अशी आमची समजूत आहे. ' अंदरकी बात ' कांहीं असो, सकटांचे हे समतापोषक प्रयत्न यशस्वी होवोत असेंच आम्हीं इच्छितों. बाकी, आतापर्यंतच्या त्यांच्या धोरणांवरून त्यांच्या संबंधानें आम्हाला भरंवसा वाटत नाहीं आणि अस्पृश्यांना आपसांतला जातिभेद नाहीसा करण्याच्या कामीं यश आलें तरी तेवढ्यानें त्यांची अस्पृश्यता नष्ट होईल ही आशा अगदी व्यर्थ आहे. असेंही आम्ही स्पष्ट सांगून ठेवतों कीं, केवळ बुद्धिवादानें जर हा प्रश्न सुटण्यासारखा असता तर यापूर्वी केव्हांच तो सुटला असता. अरे तर कारे म्हणण्याची, मनगटाला मनगट घासण्याची, अडवणुकीचे मार्ग स्वीकारण्याची, निरनिराळ्या सर्व बाजूंनीं शह देण्याची तयारी असल्यावांचून अस्पृश्यतेचें ग्रहण सुटण्याची आशाच करावयास नको.

●●●

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. १ मार्च १९२९.

२०

दरोडेखोर धर्माभिमान

बिजनोरा जिल्ह्यांतील देवगड नांवाच्या गांवीं ता. ९ फेब्रुवारी १९२९ रोजीं अस्पृश्य वर्गांतील एका लग्नाची मिरवणुक निघाली असतांना तिला उच्च जातीचे असें म्हणविणाऱ्या हिंदुकडून विरोध करण्यांत आला. हा विरोध साधारण स्वरूपाचा नव्हता. तर सदहू मिरवणुकीला अडथळा करणाऱ्या उच्च हिंदूंची मजल अत्याचारापर्यंत जाऊन त्यांनीं त्या समारंभांतल्या अस्पृश्यांवर दरोडा घातला आणि त्यांची चीजवस्तू पार लुबाडली ! हा प्रकार घडून आला त्या वेळीं गांवचा पटवारीहि तेथें हजर होता म्हणतात ; पण स्थानिक अधिकाऱ्यांकडून या अत्याचाराची अद्यापि दाद घेण्यांत आली नाहीं ! सध्या हें प्रकरण दिल्लीच्या श्रद्धानंद दलितोद्धार सभेनें हाती घेतलें असून तिच्या मुख्य चिटणीसांनीं यासंबंधीं बिजनोरच्या कलेक्टराकडे तारेंने दाद मागितली असल्याचें समजतें. सभेनें आपला एक प्रतिनिधीहि प्रस्तुत प्रकरणाची चौकशी करण्यासाठीं समक्ष पाठविला होता. त्याजकडून एकंदर वस्तुस्थिती खरी असल्याचा रिपोर्ट आहे. बहिष्कृत मानलेल्या वर्गातील लोकांच्या लग्नाच्या मिरवणूकींना अडथळे करणें हा उच्चवर्णीय म्हणविणाऱ्या हिंदूंचा सनातन संप्रदाय आहे. अस्पृश्यांच्या मिरवणुकींनीं आपलें नाक कापलें जातें अशी या धर्माभिमानी लोकांची समजूत आहे. परंतु परधर्मीय लोकांच्या लग्नाच्या मिरवुणकींना ते अडथळा करावयाला धजत नाहीत इतकेंच नव्हे तर वाजंत्र्यांचीं वगैरे कामेंही करितात. अस्पृश्यांच्या मिरवणुकीचा व अगदी जुन्यात जुन्या मताच्या धर्माचाही संबंध कसा येतो तें समजणें कठीण आहे. ज्या रस्त्यांवरुन एकट्या दुकट्या किंवा दहा पांच अस्पृश्यांना जाता येते त्या रस्त्यांना मिरवणुकीनेंच विटाळ होतो असें नाही. यांत विटाळाचा प्रश्न नसून अस्पृश्य वर्गाला आनंद होत असलेला पाहूनही उच्चवर्णीय म्हणविणाऱ्या हिंदूंना विषाद वाटतो. जणूं काय अस्पृश्यांच्या लग्नाची मिरवणुक म्हणजे यांच्या सनातन धर्माची प्रेतयात्राच ! वरील उदाहरणांत, दरोडा हा एक नवीन विशेष आहे. धर्माच्या नांवाखालीं लुटारू गुंडांना ही चांगलीच संधि मिळाली म्हणावयाची. इतकें झालें तरी अस्पृश्यांना शांतिपाठ शिकविण्यास मानभावी पुराणमतवादी तयारच असतात आणि उलट अस्पृश्यांवरच अत्याचाराचा आरोप करतात.

●●●

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. १ मार्च १९२९.

२१

हिंदुधर्माला नोटीस !

दुसरीकडे, वऱ्हाडातील जळगांव व त्याच्या आसपासचे गाव येथील पांच हजार महार लोकांच्या तर्फे ' हिंदू धर्मास जाहीर आव्हान ' या मथळ्याखाली कांही पुढारी मंडळीच्या सह्यानिशीं जो मजकूर प्रसिद्ध करण्यांत येत आहे† तिकडे स्वत:ला हिंदु धर्मीय म्हणविणाऱ्या विशेषत: वरिष्ठ वर्णीय म्हणून स्वत:स समजणाऱ्या लोकांचें लक्ष जाईल अशी आम्हांस आशा आहे. हिंदू समाजांतील जातिभेदाला, उच्चनीचपणाच्या वर्गावर्गीला, स्पर्शास्पर्शाच्या निर्बंधांना, उच्चवर्णीय म्हणविणाऱ्या लोकांकडून होणाऱ्या अन्यायाला व जुलुमाला, पदोपदीं जाचक असणाऱ्या विषमतेला कंटाळून आतापर्यंत हजारों लाखों लोकांनी हिंदुधर्माला रामराम ठोकून परधर्मांचा अंगीकार केला आहे. ज्या मानानें बहुजनसमाजांत शिक्षणप्रगति होईल, विचार करण्याची प्रवृत्ति वाढेल, स्वाभिमानाची जागृति होईल त्या मानानें, अन्याय व विषमता यांच्या पायावर उभारलेल्या समाज रचनेसंबंधाचें असमाधान वाढावें, अन्यायाची चीड यावी, विषमतेनें संताप उत्पन्न व्हावा आणि जो धर्म व समाज आपल्या माणुसकीच्या हक्कांची पायमल्ली करतो, जो आपली माणुसकी काढून घ्यावयास पाहतो, त्या धर्माचा व त्या समाजाचा तिटकारा यावा, हें अगदीं स्वाभाविक आहे. एकादा अन्याय शतकानुशतकें चालत आलेला असला, सत्तेच्या जोरावर तो खपवून गेलेला असला, लोकांच्या अज्ञानामुळें व बनावट धार्मिक समजुतींच्या दडपणामुळें त्याचा शतकानुशतकें प्रतीकार झालेला नसला, तरी तो अन्यायच. त्या अन्यायाला धर्माची बेगड लावलेली असली म्हणून तो न्याय होईल असें नाहीं. आणि जेथें माणुसकीच्या हक्कांचा प्रश्न आहे तेथें चालू वहिवाटीचा प्रश्न पुढें आणून किंवा मुदतीच्या कायद्याकडे बोट दाखवून अन्यायाचें समर्थन करणें म्हणजे स्वत:च्या ठिकाणीं माणुसकीच नाहीं, माणुसकीच्या पवित्र हक्कांची आपल्याला जाणींव नाहीं, असें दाखविणेंच. होय. ज्या वर्गाला हिंदुसमाजानें आतांपर्यंत लाथाळलें, जुलुमाच्या भाराखालीं चिरडलें, माणुसकीच्या हक्कांना आंचवावयास लावलें, ज्या वर्गाची भौतिक व मानसिक अवनति केली त्या

बहिष्कृत वर्गावर हिंदूसमाजाचा कांहींच हक्क नाहीं.

बहिष्कृत वर्गातले जे लोक अद्यापि हिंदुधर्माला चिकटून आहेत ते हिंदू समाजाविषयी त्यांना आपलेपणा वाटतो म्हणून नव्हे. हिंदुसमाजाविषयीं

---

† पाहा, परिशिष्ट क्रमांक : ५.

आपलेपणा त्यांना कां वाटावा ? शेळ्यांना लांडग्या विषयीं आपलेपणा वाटणें कधीं तरी संभवनीय आहे काय ? हिंदुसमाजाविषयीं नाहीं, परंतु हिंदुधर्माविषयी मात्र त्यांना आपलेपणा अद्यापि वाटतो हें खरें आहे. व त्याचे कारण एवढेंच की, तो त्यांच्या पूर्वजांचा धर्म आहे व त्या धर्मामध्यें ते लहानाचे मोठे झाले आहेत. परंतु एवढ्याच कारणास्तव वाटणारा आपलेपणा त्यांना हिंदुसमाजांत कायम ठेवण्यांस पुरेसा नाही. धर्म वेगळा व समाज वेगळा, धर्माचें नियम समाजांत नडत नाहीत व सामाजिक निर्बंध धार्मिक बाबतींत आड येत नाहींत, असें थोडेच आहे. हिंदुधर्म व हिंदुसमाज यांचा परस्परांशी अगदीं निकट संबंध आहे, एवढेच नव्हे तर ते एकजीव आहेत. इतर धर्म सामाजिक बाबतींत अशा प्रकारें ढवळाढवळ करीत नाहींत, परंतु सामजिक बाबतींत ढवळाढवळ करणें, सामाजिक आचारविचाराचे नियंत्रण करणें हा हिंदुधर्माचा विशेष आहे. खावें काय, प्यावें काय, उठावें कसें, बसावें कसें, निजावें कसें ? असल्या गोष्टींतसुद्धा धर्माचे नियम आहेत. ईश्वर व मनुष्य यांच्यामधील संबंध आणि ठोकळ नीतीनियम इतक्यांपुरतेच इतर धर्मांप्रमाणें हिंदुधर्मानें आपले कार्यक्षेत्र मर्यादित केलेलें नाहीं. हिंदुधर्माप्रमाणे दुसऱ्या कोणत्याहि धर्मात इतके सामाजिक निर्बंध नाहींत. जातिभेद हा हिंदुधर्मामध्ये एक और प्रकार आहे. दुसऱ्या कोणत्याहि धर्मामध्यें ही अजबचीज सांपडावयाची नाहीं. आणि जातिभेदांतहि अस्पृश्यता हा जो प्रकार आहे त्याला तर जगात दुसरीकडे कोठेच तोड सांपडावयाची नाही. सामाजिकभेद इतरत्र असतील आणि अस्पृश्यतेचे पर्यायहि इतरत्र सांपडतील. परंतु हिंदुसमाजांत त्या भेदावर व अस्पृश्यतेवर

धर्माचा शिक्का

बसलेला आहे ! म्हणून हिंदुसमाजात धार्मिक सुधारणेखेरीज सामाजिक सुधारणा होणें शक्य नाहीं. हिंदुसमाजाला नोटीस म्हणजे हिंदुधर्मालाच नोटीस आहे. सध्या अस्पृश्य समजले जाणाऱ्या वर्गातल्या लोकांनीं हिंदुसमाजांत रहावें, हिंदुसमाजाबाहेर जाऊन स्वतःचा तरणोपाय पहावा याचा निकाल हिंदुधर्माची सुधारणा इष्ट दिशेनें करण्यावरच अवलंबून आहे. तशी सुधारणा करणें हें बहिष्कृत वर्गाच्या हातीं नाहीं. स्वतःला उच्च वर्णीय म्हणविणाऱ्या लोकांनीं मनावर घेतले तरच ही गोष्ट होणार आहे. परंतु स्वतःच्या कृत्रिम उच्चपणाला सोडल्यावाचून त्यांच्या हातून खरी धार्मिक व सामाजिक सुधारणा होणे शक्य नाहीं. उच्चवर्णीय म्हणविणारे लोक आपली वतनदारी कायम ठेवू पहात असल्यामुळे हिंदुसमाजांतील जातींजातींमध्यें सामनें होत आहेत व अस्पृश्यतेचें बंड मोडत नाहीं. बहिष्कृत वर्गातल्या लोकांनी धर्मांतराचा प्रश्न काढला म्हणजे

हिंदुधर्मातल्या तत्वज्ञानाला पाश्चात्य देशांतले लोक सुद्धा माना डोलवितात. अशा प्राचीन व थोर धर्माला तुम्ही सोडूं नका, असा उपदेश स्पृश्य वर्गीय हिंदु करितात. परंतु

तत्वज्ञान काय चाटावयांचें आहे ?

व्याकरणानें भूक थांबत नाहीं आणि काव्यरसानें तहान शमत नाहीं, अशा अर्थाची संस्कृत भाषेंत जी म्हण आहे ती धर्मातील तत्वज्ञानालाहि लागू आहे. धर्माची व्याख्या तरी कशी आहे ? 'यतोऽभ्युदयःनि श्रेयससिद्धि सधर्म' म्हणजे ज्याच्या योगानें अभ्युदय म्हणजे ऐहिक उत्कर्ष होतो व मोक्षप्राप्ति होते तो धर्म. म्हणजे ऐहिक उत्कर्ष प्रथम व मोक्ष नंतर असा क्रम आहे. बहिष्कृत वर्गावर अशा प्रकारचे सामाजिक निर्बंध लादण्यांत आले आहेत की, त्या वर्गातील लोकांना आपलें डोकेंच वर काढता येऊं नये, त्यांना आपल्या बुद्धिमत्तेचा उपयोग करण्यास व लायकी दाखविण्यास संधिच मिळूं नये, अस्पृश्यता याचा अर्थच असा आहे. उत्कर्ष बाजूलाच राहिला, परंतु साध्या सोप्या सवलतीहि अस्पृश्यतेमुळें मिळूं शकत नाहीत, त्यामुळें बहिष्कृत वर्गाला नानाप्रकारच्या विपत्ति व हाल अपेष्टा सोसाव्या लागतात. अशा स्थितींत पारमार्थिक मुक्ति किंवा मोक्ष प्राप्त होण्याचा मार्ग मोकळा असला काय व नसला काय सारखेच. मोक्ष पाहिला कोणी व कसा आहे ? या जगांत मोक्षासाठी धडपडणारा व ऐहिक उत्कर्षावर लाथ मारणारा कोटींत एकादा. बाकीच्या सर्वांची ऐहिक उत्कर्षासाठी, ऐहिक सुखासाठी धडपड चाललेली असते. हिंदुधर्म हा फक्त मुमुक्षूंकरिता आहे, हिंदु समाजांत कोणी सुखाची अपेक्षा करतां कामा नये, असें ठरविलें तर जे उच्चवर्णीय म्हणविणारे लोक धर्माभिमानाच्या लंब्याचवड्या गप्पा मारतात, अस्पृश्यतेचें समर्थन करून बहिष्कृत वर्गाला स्वधर्मांत राहण्याचा मोठ्या आढ्यतेनें उपदेश करतात, त्यातला एकसुद्धा इसम हिंदुधर्मात राहणार नाहीं, असें आम्ही खात्रीनें सांगू शकतों. धर्माभिमान्यांचा वेदान्त

परदुःख शीतळ

या न्यायाचा आहे. उच्चवर्णीय म्हणविणाऱ्या लोकांना विलायतेंत जाऊन गोमांस खाऊन आलेले आपले जातभाई खपतात. एकादा मनुष्य विलायतेला जात असला किंवा जाऊन परत आला म्हणजे त्यानें अभक्ष्य भक्षण व अपेयपान केलें किंवा नाहीं याची चौकशी न करता आणि त्यानें तसें केलें आहे अशी मनाची बालंबाल खात्री असतांहि त्याला जातींच्या लोकांकडून निरोप देण्यांत येतो किंवा त्यांचे स्वागत करण्यांत येतें. एखादा अस्पृश्य मानलेल्या जातीचा इसम खिस्ती

किंवा मुसलमान झाला असतां त्याला त्याचा विटाळ न मानतां समाजामध्यें वागविण्यांत येतें, परंतु अस्पृश्यांची अस्पृश्यता ते हिंदुधर्मात असतांनाच नाहींशी करा म्हटलें कीं, स्मृतिपुराणादि ग्रंथांतले शास्त्राधार, लटपटपंचीचे कोटिक्रम, ढोंगीपणाचीं बोलणीं पुढें आलींच! ब्राह्मण आदिकरून उच्च म्हणविणाऱ्या जातींच्या लोकांनीं स्मृतिग्रंथांना, शास्त्रांना, रूढींना आपल्या सोयीप्रमाणें केव्हांच धाब्यावर बसविलें आहे. ज्या धर्मशास्त्रांचा अस्पृश्यतेचें समर्थन करण्यास ते आधार दाखवितात त्या धर्मशास्त्रांतले स्वतःला गैरसोयीचे असणारे नियम ते कधीच पाळत नाहींत. परंतु बहिष्कृतांना मात्र शास्त्राचा व रूढीचा मोठा बाऊ करून दाखवावयाचा ! हल्लीं खिस्ती मुसलमानांच्या, विशेषतः मुसलमानांच्या चढाईच्या धोरणामुळें उच्चवर्णीय म्हणविणाऱ्या लोकांना हिंदूंचे संख्याबळ कमी होत आहे या गोष्टीची जाणीव होत आहे आणि तसें होऊ नये म्हणून त्यांनीं संघटना व शुद्धि या चळवळीच्या द्वारे धडपड चालविलेली आहे. परंतु सध्याच्या

संघटण व शुद्धि या चळवळी म्हणजे संभावित लफंगेगिरी

आहे. मानवी हक्कांच्या पवित्रतेची जेथे भावना नाहीं, जेथें अन्यायाची व आप्पलपोटेपणाची चीड नाहीं, जेथे समतेच्या इष्टतेविषयी जळजळीत आस्था नाहीं तेथे संघटन व शुद्धि म्हणजे नुसते फार्स आहेत! या नाटकांवर बहिष्कृत वर्गाचा विश्वास नाहीं हें सांगावयास नको. ' तुम्हीं आम्ही एक आणि कंठाळिला मेख ' त्यांतले हें संघटन आहे आणि सध्याची शुद्धि म्हणजे 'परभारा पावणेतेरा' पैकीं प्रकार आहे. उघड विरोध करणारे पुराणमतवादी पतकरले. परंतु शुद्धिसंघटनवाले हे ढोंगी म्हणून अधिक भयंकर होत. बहिष्कृतांच्या स्वाभिमानपर चळवळीचा द्वेष करणारे, खऱ्या समाज सुधारणेवर आणि उदार मतवादावर चोरटे हल्ले करणारे लोक हेच सध्यां संघटनवाल्यांत शिरले आहेत. ब्रह्मीभूत स्वामी श्रद्धानंद यांच्या पवित्र चळवळीचा या ढोंगी लोकांनीं विचका करून टाकला आहे. लफंगे, पोटभरू व फुकटची आत्मप्रतिष्ठा वाढवून घेणारे लोक या चळवळींत भरले आहेत. हिंदु-मुसलमानांत भांडणे लावून देणें हा धंदाच झाला आहे. त्यांना लाथा मारून बाहेर हांकून लावल्याशिवाय त्या चळवळीला खरा जोर केव्हांही येणार नाही. हे निर्लज्ज लोक बहिष्कृतांनी सध्याच्या स्थितीस कंटाळून परधर्मात जाण्याची गोष्ट काढली कीं जा, तुम्हीं खुशाल परधर्मात जा, आम्हाला तुमची पर्वा नाहीं, तुमच्या धमक्या आम्ही ऐकून घेणार नाहीं, तुम्हाला हिंदुसमाजात राहावयाचें असेल तर आम्हीं वागवूं तसेंच वागवून घेतलें पाहिजे, असें म्हणावयास कमी करीत नाहींत. बहिष्कृत लोकांची इच्छा कोणालाही धमक्या देण्याची नाहीं, ते परधर्मात जाणे बरें असें म्हणतात तें

हिंदुसमाजांतील जाच असह्य झाल्यामुळेंच म्हणतात. परंतु त्या म्हणण्याचा अर्थ धमकी असा करून हे स्वार्थी लबाड लोक उलट धमकावण्या दाखवितात. तसें करावयाला ते धजतात, याचें कारण असें कीं बहिष्कृत वर्ग सामाजिक जुलुमाला कितीहि कंटाळलेला असला तरी त्याचें हिंदुधर्मावर प्रेम आहें व त्या प्रेमाखातर असाच जांच हे यापुढेहि सोसतील असें त्यांचे मन त्यांना सांगत असतें. परंतु या ढोंगी लोकांच्या धमकावण्या बहिष्कृत लोक आतां साफ ऐकून घेणार नाहींत, असें जळगांवचे लोक कृतीनें दाखवून देणार आहेत. या पांच हजार लोकांनी धर्मांतर केलें तर त्याची जबाबदारी सर्वस्वी हिंदुसमाजावर आणि विशेषतः बहिष्कृतांना धमकावूं पहाणाऱ्या ढोंगी संघटनवाल्यांवर आहे, हें आम्ही अगोदरच सांगून टाकतों. आम्ही स्वतः धर्मांतर करण्यास आज तरी तयार नाहीं, कारण उन्मत्त लोकांची खोड मोडून हिंदुसमाजांत बहिष्कृत वर्गाचे माणुसकीचे हक्क प्रस्थापित करण्याची अद्यापि आम्हांस धमक आहे व हिंदु समाजाचा मुर्दाडपणा घालविण्यांत यश येईल अशी अद्यापि आम्हांला आशा आहे. तथापि, हिंदुसमाजाचा कंटाळा येऊन हिंदुधर्माचा त्याग करण्यास जे प्रवृत्त झाले असतील त्यांना, 'तुम्ही असें करूं नका,' असें सांगावयाला आमचें मन घेत नाही. ज्याच्या त्याच्या सोशिकपणाचा हा प्रश्न आहे तथापि जळगांवच्या पांच हजार महार बंधूंना एक सूचना देणें मात्र आम्हाला इष्ट वाटतें ती ही कीं, तुम्हाला

धर्मांतरच करावयाचें असले तर मुसलमान व्हा

तुम्हाला मोक्षासाठी धर्मांतर करावयाचें नाही. कोणत्या धर्माचीं तत्त्वें विशेष संयुक्तिक आहेत या विषयींचा हा प्रश्न नाहीं. तर धर्मांतर करण्यांत आपली अस्पृश्यता घालविणें, हाच तुमचा उद्देश आहे. हा उद्देश प्रार्थना समाजिस्ट किंवा आर्य समाजिस्ट अगर बौद्ध धर्मीय होऊनहि साधावयाचा नाही. कारण तुम्ही व्यवहारदृष्ट्या हिंदुच समजलें जाल आणि अस्पृश्यतेचें तुमच्या मानेवर असलेलें जोखड तुमच्या मानेवर कायमचे राहील. इतकेंच नव्हे तर ख्रिस्ती होऊनहि तुमची अस्पृश्यता पूर्णपणें निघून जाणार नाहीं. हिंदी ख्रिस्त्यांनाहि जातिभेदानें साफ सोडलेलें नाही. मुसलमानी धर्मात मात्र सर्वांना आत्मसात् करण्याचें सामर्थ्य आहे. मुसलमान समाज स्वकीयांविषयीं जाज्वल्य अभिमान बाळगणारा व स्वकीयांच्या सहाय्याला धांवून जाणारा आहे. म्हणूनच सात कोटी मुसलमान बावीस कोटी हिंदूंना भारी झाले आहेत. तुम्हीं मुसलमान झाल्यावरहि उन्मत्त हिंदु लोक तुम्हांला हिडिस फिडीस म्हणून वागवूं पाहतील तर तुमच्या पाठिमागे असणाऱ्या सात कोटी मुसलमानांशीं त्यांना सामना करावा लागेल आणि भ्याड हिंदु लोक तसा सामना करावयाला केव्हांहि तयार होणार नाहींत. तुमच्याकडे

वाकड्या डोळ्यानें पाहण्याची त्यांना छाती होणार नाहीं व तुम्हां मुसलमान आतां कीं तुम्हांला 'भाई भाई ' म्हणून मिठ्या मारावयाला, इतकेंच नव्हे तर तुम्हांला 'खिलाफत पाहिजे असल्यास तुमच्यासाठी तुरुंगांत जावयालाहि एखादा शौकतअल्ली (खिलाफतीच्या चळवळींत, कराची येथें झालेल्या खटल्यानें दिसून आलें त्याप्रमाणें) तयार होईल आणि तुमच्या सभांमध्ये तुमच्यापेक्षाहि मोठ्यानें ओरडून 'अल्ला हो अकबर ' असा हिंदु लोक जयघोष करतील !

●●●

अग्रलेख : बहिष्कृत भारत, ता. १५ मार्च १९२९.

२२

सायमन कमिशनला लोटांगण घालणारे ब्राह्मण

सायमन कमिशन मद्रासला गेल्या वेळीं तेथल्या सनातनी ब्राह्मणांचे एक शिष्टमंडळ त्यांच्या भेटीला गेलें होतें. हे सनातनी ब्राह्मण म्हणजे श्री. श्रीनिवास अय्यंगार व श्री. सत्यमूर्ति या ज्वलज्जहाल निर्भेळ स्वातंत्र्यवादी पुढाऱ्यांचे जातभाई या सनातनी ब्राह्मणांची बाजू घेऊन सदरील कॉंग्रेसवाले पुढारी समाज सुधारणेच्या कायद्यांना विरोध करितात. देवस्थानें व मठ यांच्यासंबंधाचा जो उपयुक्त कायदा त्या वेळच्या मद्रास येथील ब्राह्मणेतर मंत्रिमंडळानें केला, त्याच्याविरूद्ध सनातनी ब्राह्मणांची बाजू सत्यमूर्ति प्रभृति पुढाऱ्यांनीं हाकाटी केली होती, आजहि त्या कायद्याला त्या पक्षाचा विरोध आहे आणि तो कायदा रद्द करण्यासाठीं केलेले आटोकाट प्रयत्न निष्पळ झालें तरी अद्यापि ते चालूच आहेत. मद्रासी ब्राह्मण राजकीय बाबतींत स्वातंत्र्याच्या व स्वराज्याच्या गोष्टी चुरचुर बोलण्यांत पटाईट आहेत, परंतु सामाजिक बाबतींत त्यांच्यासारखे पुच्छ प्रगतीचा पुरस्कार करणारे लोक साऱ्या दुनियेत सांपडावयाचे नाहींत. धार्मिक व सामाजिक बाबतींत त्यांच्यासारखें अनुदार तेच. मद्रास इलाख्याला 'मागासलेला प्रांत' (benighted presidency) असें नांव मिळावयाला तेथल्या ब्राह्मणांचें सामाजिक व धार्मिक बाबतींतील मागासलेलें धोरणच कारण आहे. स्पर्शास्पर्शाचें तर बेट्यांनी एक भलें मोठे शास्त्रच बनविलें आहे! कोणत्या जातीचा किती यार्डांच्या अंतरावरून विटाळ मानावयाचा त्यांची जंत्री तयार करणें, दृष्टिदोष आदि करून नवीन नवीन दोष ऊर्फ विटाळ शोधून काढणें, असल्या कामांत मद्रासी ब्राह्मणांनी आजपर्यंत आपली बुद्धि खर्चिली आहे. या बुद्धिचा उपयोग जर भौतिक शास्त्राचे शोध लावण्यांत झाला असता तर साऱ्या देशाचें दारिद्र्य दूर झाले असतें. सध्यां देशांत समाजसुधारणेचा मार्ग कायद्याने सुलभ करण्याचे जे प्रयत्न होत आहेत त्यामुळें मद्रासच्या सोंवळ्या ब्राह्मणांची तिरपीट उडून गेली आहे. आतां आपले वर्चस्व नाहीसे होणार, आणि तसें झालें म्हणजे हिंदुधर्म रसातळाला जाणार, असें त्यांना वाटूं लागलें आहे. सायमन कमिशनवर बहिष्कार घालण्यांत श्रीनिवास अय्यंगार, सत्यमूर्ति, सांबमूर्ति वगैरे ब्राह्मण पुढारी असूनही मद्रास येथें सायमन कमीशन गेले त्यावेळी त्यांच्यापुढें लोटांगण घालण्यास सनातनीं ब्राह्मणांनीं कमी केलें नाहीं. त्यांच्या वतीने भांडून कॉंग्रेसचे ब्राह्मण पुढारी समाजसुधारणेला विरोध करितात त्यांनाही ते पुढारी बहिष्काराच्या

चळवळीमध्यें सामील करून घेऊं शकले नाहींत. मग ब्राह्मणेतर व बहिष्कृत वर्ग यांनीं आपआपली बाजू कमिशनपुढे मांडली म्हणून त्याना दोष देण्यास, त्यांच्यावर देशद्रोहाचा आरोप करण्यास, ब्राह्मण पुढाऱ्यांना कसा अधिकार पोहचतो तें त्यांनाच ठाऊक. सनातनी ब्राह्मणांच्या शिष्टमंडळानें बहिष्काराच्या चळवळीस न जुमानतां सायमन कमिशनला भेटून सांगितलें काय तर देशांतल्या कायदेमंडळाना धार्मिक बाबतींत कायदे करण्याची मुभा असूं नये ! स्वराज्य मिळो वा न मिळो, स्वराज्याची घटना कशीही असो, यांच्या सोवळ्याचें संरक्षण झालें म्हणजे झालें. कायदेमंडळामध्यें आतांपर्यंत जे कायदे झालें त्यांच्यामुळें खरोखर पाहिलें असतां, धर्मावर कांहीं घाला पडला काय? परंतु सरकारनें धर्मात हात घालूं नये ही यांची कायम ठशाची ओरड. सरकार परधर्मी असेल, परंतु कायदेमंडळांतील बहुमत परदेशच्या लोकांचें नव्हे ना ? वस्तुस्थिति अशी आहे कीं, ब्रिटीश सरकारनें सतीची बंदी, विधवा विवाह, विवाहाची नोंदणी वगैरे जे थोडे कायदे पूर्वी केलें त्यानंतर सरकारनें सामाजिक बाबतींत लोक प्रगतीच्या दृष्टीनें इष्ट असणारे कायदे करण्याच्या कामीं अनास्था दाखविली, इतकेंच नव्हे तर कायदेमंडळांतील लोक नियुक्त सभासदांना पाहिजे असलेल्या सामाजिक कायद्यांनाहि सरकारनें विरोध केल्याची उदाहरणें अनेक दाखवून देतां येतील. नुकतींच घडलेलीं अशीं कांहीं उदाहरणें आहेत. लोकांना जरी धार्मिक व सामाजिक बाबतींत कायदे पाहिजे असले तरी कायदेमंडळांना ते पसार करण्याचा अधिकार असूं नयें असें मूठभर सनातनी लोकांनी सांगितलें तरी त्या रडगाण्याचा काय उपयोग ? सरकार स्वराज्याचे हक्क देतांना तसा निर्बंध घालूं शकत नाही. सनातनी ब्राह्मणांना आपल्या सामाजिक वर्चस्वाचीं शंभर वर्षे भरलीं असें आतां कळून चुकलें आहे. सामाजिक बाबतींत स्मृतींचे आधार मानून आपली अवनति करून घ्यावयास बहुजनसमाज तयार नाहीं याविषयीं त्यांची खात्री झालेली आहे आणि मताधिकारामुळें ब्राह्मणेतर व अस्पृश्य यांचे आपल्या वर्चस्वावर कायद्याच्या द्वारें हल्ले होणार, राजसत्ता या वर्गाच्या हातीं जाणार, अशी त्यांना सकारण भीति वाटत आहे. परंतु या जरीपुराण्यांचें रक्षण करण्यास सायमन कमिशनांहि समर्थ नाही.

● ● ●

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. १५ मार्च १९२९.

२३

सर जॉन सायमन व अस्पृश्य वर्ग

सायमन कमिशनकडे वर सांगितल्याप्रमाणें सनातनी ब्राह्मणांचें शिष्टमंडळ गेलें होतें त्याचा ब्राह्मणी पत्रांनीं एवढा गवगवा केला नाहीं. परंतु उटकमंड येथें सायमनसाहेबांना अस्पृश्य वर्गानें मानपत्र दिलें त्यावेळीं उत्तर देताना, अस्पृश्य वर्गाचा प्रश्न हा मुख्यत्वेंकरून सामाजिक स्वरूपाचा आहे, राजकीय स्वरूपाचा नाहीं, असें सायमनसाहेब म्हणाले व तसें बोलून त्यांनी पर्यायानें असें दर्शविलें कीं, राजकीय घटनेचा विचार करण्याकरितां नेमलेल्या कमिशनला अस्पृश्यांसंबंधीचा प्रश्न समाधानकारक रीतीनें सोडविणें शक्य नाहीं, या गोष्टीचा मोठा गवगवा करून अस्पृश्य वर्गाला सामयन कमिशनशी सहकारिता केल्याबद्दल हिणविण्याचा प्रयत्न चालू आहे. सायमन कमिशनशी सहकारिता केली म्हणजे आपला अस्पृश्यतेसंबंधीचा प्रश्न सुटेल अशी अस्पृश्य वर्गाची केव्हांच समजूत नव्हती, आणि सामाजिक प्रश्न सोडविण्याचें काम राज्यघटना ठरविण्याकरितां नेमलेल्या कमिशनकडून समाधानकारक रीतीनें होणें शक्य नाहीं हें सर जॉन सायमन यांनीं तसें सांगण्यापूर्वीहि अस्पृश्य वर्गाच्या पुढाऱ्यांना माहित होते. सायमन कमिशनवर बहिष्कार घालण्याच्या चळवळींत अस्पृश्यवर्ग कां सामील झाला नाहीं त्यांचीं कारणें उघड आहेत. अस्पृश्य वर्गाचे प्रश्न, त्यांच्या अडचणी, त्यांच्या आपत्ती इतरांच्या पेक्षां अगदीं वेगळ्या स्वरुपाच्या असून त्यांच्या निरसनार्थ देशांतील लोकांकडून म्हणण्यासारखे कांहींहि प्रयत्न झालेले नाहींत आणि अस्पृश्यतेचा प्रश्न जरी मुख्यतः सामाजिक स्वरूपाचा असला तरी तो सोडविण्यास राजकीय उपायाचा थोड्याबहुत प्रमाणाने उपयोग होण्यासारखा आहे. हिंदी लोकांना स्वराज्याचे विशेष हक्क देण्याचा प्रश्न जेव्हां ब्रिटिश पार्लमेंटापुढें येईल तेव्हां अस्पृश्यांच्या अडचणीकडे लक्ष देऊन, त्यांची प्रगती सुगम होईल अशा दृष्टीनें, स्वराज्याची घटना तयार करण्यांत यावी, या उद्देशानें, सायमन कमिशन-पुढें आपले म्हणणें मांडणें अस्पृश्यवर्गाच्या पुढाऱ्यांना इष्ट वाटलें. मुसलमान, ब्राह्मणेतर, जमीनदार वगैरे वर्गांनीं सायमन कमिशनवर बहिष्कार घातला नाहीं, इतकेच नव्हे तर सनातनीं ब्राह्मणसुद्धां कमिशनपुढें लोटांगणें घालीत गेले. मग अस्पृशंनी तरी मागें कां रहावे ? बहिष्काराची चळवळ ही पुढारलेल्या वर्गांची होती आणि पुढारलेल्या वर्गांवर आतांपर्यंतच्या अनुभवावरून बहिष्कृत वर्गाचा विश्वास नाही. अस्पृश्यवर्गानें मागण्या केल्यावर कमिशननें त्या तत्काळ कबूल कराव्या

अशी आम्ही तरी अपेक्षा केली नव्हती. सर जॉन सायमन यांनीं उटकमंड येथें अस्पृश्यांच्या मानपत्राला दिलेले उत्तर आमच्या दृष्टीनेंही समाधानकारक नाहीं, राजकीय व सामाजिक बाबींमधला संबंध सर जॉन सायमन यांच्या लक्षांत यावा तसा आला नाहीं, हें खरे असलें तरी तेवढ्यावरून अस्पृश्यांना ते कमिशनवरील बहिष्काराच्या चळवळींत सामील झालें नाहींत म्हणून ही संधी साधून हिणविणें शहाणपणाचें ठरत नाहीं. शिवाय, अशा प्रकारें हिणविण्याचा प्रयत्न करणाऱ्या लोकांना " He laughs best who laughs last" (शेवटी हंसेल तोच खरा) या इंग्रजी म्हणीचीहि आम्हीं आठवण देतों.

●●●

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. १५ मार्च १९२९.

२४

पुण्याची मिश्र वसाहत

पुण्याच्या म्युनिसिपालिटीनें तेथील नदीकिनाऱ्यावर सरकारी नोकरांच्या वसाहतीला लागून, तीन एकर जमिनींत सर्व जातींच्या ऐंशीं कुटुंबांची एक वसाहत स्थापण्याचे ठरविले आहे. ब्राह्मण वगैरे जातींचीं व अस्पृश्य मानलेल्या जातींचींहि कुटुंबें या वसाहतींत असणार आहेत. स्वच्छतेसंबंधाची जबाबदारी तेथल्या को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटीनें पतकरली असून शौचकूप वगैरेंची व्यवस्था घराघराकरितां वेगळी न करतां समाईक पद्धतीची करण्यांत यावयाची आहे. या योजनेला कांही सरकारी अधिकारी व श्रीमंत लोक यांनीं म्युनिसिपालिटींत कसून विरोध केला, परंतु बहुमतानें ती पसंत ठरली. म्युनिसिपालिटीचे चीफ ऑफिसर यानीं या योजनेच्या बाबतींत प्रशंसनीय उत्साह दाखविला आहे. हा एक प्रयोग आहे असें मानून त्या योजनेचे पुरस्कर्ते चालले आहेत, परंतु तो प्रयोग यशस्वी कां होऊं नये तें आम्हांस समजत नाही. अस्पृश्यांच्या वेगळ्या वसाहती काढल्यानें अस्पृश्यतेचा प्रश्न सुटणार नाही. अस्पृश्यता नाहींशी करण्यास सामाजिक दळणवळण हेच विशेष उपयोगी आहे. इतर लोकांच्या वस्तीत राहावयास मिळाल्यानें अस्पृश्यांची राहणी सुधारण्यास साहाय्य होईल आणि प्रत्यक्ष सहवासानें पुष्कळ गैरसमज दूर होतील. इतर समाजापासून अलग केल्यामुळेंच बहिष्कृत समाजाची राहणी बिघडली आहे. शिवाय, एकाच ठिकाणी निरनिराळ्या जातींची मुलें बसतील, उठतील, खेळ खेळतील व त्यामुळे पुढील पिढींत तरी आजचा निरनिराळ्या जाती मधील दूरभाव दिसणार नाही. चीफ ऑफिसर व या योजनेला पाठिंबा देणारे म्युनिसिपालिटीचे सभासद यांना या प्रत्यक्ष सुधारणेच्या उपाययोजनेबद्दल आम्ही मनःपूर्वक धन्यवाद देतों.

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. १५ मार्च १९२९.

२५

हिंदुधर्म व अस्पृश्यता

नुकतेच रंगून येथील एका जाहीर सभेमध्यें भाषण करतांना महात्मा गांधी म्हणाले, "सांप्रत जगांतील वेगवेगळया धर्मांमध्यें स्वतःचा जीव जगविण्यासाठी जी शर्यंत लागलेली आहे तीमध्यें एक तर हिंदुधर्मानें नामशेष झालें पाहिजे किंवा अस्पृश्यतेचें तरी पूर्ण निर्मूलन झालें पाहिजे. अस्पृश्यतेचे पूर्ण निर्मूलन झालें तरच अद्वैतवादी हिंदुधर्माचा व्यवहारांत प्रत्यय येऊं शकेल." (In the race of life in which all the religions of the world are today engaged, I think, either Hinduism has got to perish or untouchability has to be routed out completely. so that the fundamental fact of Advaita Hinduism may be realised in practical life) महात्माजींचें हें मत किती हिंदु लोकांना पटत असेल? आतांपर्यंत त्यांनीं अस्पृश्यतेचा निषेध केला आहे, परंतु या बाबतींतील त्यांची चळवळ जवळ जवळ अरण्यरूदनवत झाली आहे. महात्माजींच्या सांगण्यावरून आतां ठिकठिकाणीं परदेशी कपड्यांच्या होळ्या पेटविल्या जात आहेत. तें सोपें काम करणारे कितीसे देशभक्त अस्पृश्यतेची होळी करावयास तयार आहेत ? अद्वैत वादाचा शंखहि 'कलौ वेदान्तिनो भान्ति फाल्गुने बालका इव' या सुभाषिताप्रमाणें देवळोदेवळीं, घरोघरीं ऐकूं येतो. परंतु पुराणांतलीं वांगीं पुराणांत. व्यवहारात अद्वैत वेदान्ताचा मागमूसहि नाहीं, उलट द्वैत मात्र जिकडे तिकडे माजलेलें आहे!

● ● ●

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. १५ मार्च १९२९.

२६

गिरण्यांचे मालक व कामगार

गेल्या सालीं मुंबईतील गिरण्यांचे मालक व कामगार यांच्यामध्यें लढा उत्पन्न होऊन सर्व गिरण्यांमधील कामगारांनी संप केला. हा संप सहा महिने चालला व शेवटीं मुंबई सरकारचे जनरल मेंबर ना. सर गुलाम हुसेन हिदायतुल्ला यांच्या मध्यस्थीनें तात्पुरती तडतोड करून तो मिटविण्यांत आला. ज्या अटींवर ही तडजोड करण्यात आली त्यांपैकी एक अट सरकारनें मालक व कामगार यांच्यामधील लढ्याची चौकशी करण्यासाठी एक कमिटी नेमावी अशी होती. त्याप्रमाणें सरकारनें सर चार्लस फॉसेट, मुंबई हायकोर्टाचे एक जज्ज (अध्यक्ष) आणि मि. एम. पी. खारेगाट, आय. सी. एस. रिटायर्ड व रा. बाळकृष्ण सीताराम कामत (सभासद), अशा तिघा जणांची एक कमिटी नेमली. या कमिटीनें दोन्ही बाजूंचे म्हणणें व पुरावा ऐकून घेऊन वादासंबंधाच्या वेगवेगळया मुद्यांची कसून चौकशी केली. त्या चौकशीचा रिपोर्ट गेल्या शनिवारी प्रसिद्ध झाला आहे. कमिटीनें बऱ्याच गोष्टींचा कांटेतोल दृष्टीनें विचार केलेला असून शक्यतोवर निपक्षपातीपणानें अभिप्राय देण्याचा प्रयत्न केलेला आहे. तथापि निकाल देतांना दोन्ही बाजूंना सावरून धरण्याचा व दोन्ही बाजूंचे म्हणणे खोडून काढण्याचा प्रयत्न झालेला असल्यामुळे कमिटीचा अनेक बाबतींतील निकाल डळमळीत वाटतो. दोन्ही पक्षांचे कमिटीच्या रिपोर्टनें पूर्ण समाधान होणें शक्य नाहीं आणि दोन्ही पक्षांना पूर्ण नापसंती दाखविणेंहि शक्य नाहीं. कामगारांच्या बाजूचे कांही मुद्दे कमिटीने कबूल केलेले असले तरी कांही मुद्यांवर कामगारांच्या विरूद्ध निकाल कमिटीने दिलेला आहे. कमिटीच्या रिपोर्टाचें सविस्तर परीक्षण करण्याच्या भरीस आम्ही पडत नाही. मुंबईच्या गिरणीकामगारांमध्ये बहिष्कृत वर्गातल्या हजारो स्त्रीपुरुषांचा समावेश होत असल्या कारणाने बहिष्कृत वर्गाचा या बाबतींत निकटचा संबंध आहे. त्या अर्थी रिपोर्टातील ठोकळ गोष्टींचा येथें थोडक्यांत विचार करणें अवश्य आहे. बहिष्कृत वर्गाचा अगदी जिव्हाळयाचा प्रश्न म्हटला म्हणजे त्या वर्गातील लोकांना

कापड खात्यांत साच्यांवर काम करण्याची मोकळीक

असावी, या संबंधाचा होय. कामगारांच्या संप कमिटीनें ज्या सतरा मागण्या मालकांपाशी केल्या होत्या त्यामध्यें ही एक मागणी होती. या मागणीला मालकांनी विरोध केला नाहीं आणि अस्पृश्य म्हटलेल्या वर्गातील लोकांनी

कापडखात्यांत काम करण्याला जर कोणाची हरकत असेल तर ती मराठे वगैरे कामगाराचीच आहे. आपल्या कडून केव्हाच हरकत नव्हती, असेहि मालकांनी सांगितलें. खरें पाहिलें असतां यात मालकांचा प्रश्नच नव्हता. कापड विणण्याचें काम स्पृश्यांनीं केलें काय किंवा अस्पृश्यांनी केले काय, मालकांना त्यांत कांही सुखदु:ख नाहीं, त्यांचा माल निघाला व त्यांना फायदा मिळाला म्हणजे झालें. बहिष्कृत वर्गातल्या लोकांबरोबर आपण कापडखात्यांत काम करणार नाहीं असें कापडखात्यांतले कामगार म्हणतात त्याला मालकांनी काय करावें ? त्रासन वगैरे इतर खात्यांत अस्पृश्य मानलेल्या माणसांना काम करतां येतें, परंतु कापड खात्यांत पगार अधिक मिळतो तेथें मात्र अस्पृश्यांना मज्जाव! कापड खात्यांत महार, चांभार काम करूं लागले तर मात्र मराठे वगैरे लोकांची जात बुडते ! काय म्हणे कापड खात्यांत सूत तोंडांत धरावें लागतें आणि त्यामुळें बाटाबाट होते ! जणूं काय कापडखात्यांत काम करणाऱ्या मुसलमानामुळें मराठ्यांची जात बुडत नाहीं ! मुसलमानांचें उष्टे सोवळें व अस्पृश्यांचें मात्र ओवळें? कमिटीनें या बाबतींत निकाल देऊन न देऊन सारखा आहे. संप कमिटीनें केलेली मागणी मालकांनी कबूल केली आहे व मालकांची यापूर्वीहि केव्हां हरकत नव्हती. या मागणीची अंमलबजावणी खुद्द कामगारांच्याच हाती आहे. मुंबई गिरणी कामगारसंघाने या बाबतींत कमिटीचा रिर्पोट बाहेर पडण्यापूर्वीच अस्पृश्य मानलेल्या कामगारांच्या वतीनें प्रयत्न चालविला आहे. कित्येक गिरण्यांच्या मालकांनी अस्पृश्यांची कापड खात्यांत सोय करण्याचें कबूल केलें आहे. एकाद्या दुसऱ्या गिरणींत कापड खात्यांत एकजात अस्पृश्य ठेवले जाणें हें जेथे मुळींच प्रवेश नाहीं तेथे आपला हात शिरकावून घेण्याच्या दृष्टीने ठीक असले तरी सर्व गिरण्यांच्या कापड खात्यांचे दरवाजे बहिष्कृत वर्गाला खुलें होणे अत्यंत अवश्य आहे हे विसरतां कामा नयें. बहिष्कृत वर्गातल्या लोकांनी त्यासाठी जोरानें चळवळ केली पाहिजे आणि मराठें वगैरे गिरणी कामगार आड येऊं लागल्यास त्यांचा जोरानें प्रतिकार करण्यास, वेळी अडणुकीच्या मार्गाने त्यांना वठणीस आणण्याला तयार असले पाहिजे. लाल बावटेवाला म्हणून ओळखला जाणारा 'गिरणी कामगार युनियन संघ' या बाबतींत आतापर्यंत मुग्ध आहे, त्याच्या पुढाऱ्यांनी आपल्या अनुयायांना या बाबतींत योग्य शिकवण देण्याची इच्छा अद्यापि दर्शविलेली नाहीं. परंतु बहिष्कृत वर्गातल्या गिरणी कामगारांनी एकजूट करून स्वत:च्या हक्कांसाठी शिकस्तीनें भांडण्याची तयारी दाखविल्यास विरूद्ध पक्षाला शेवटी नमतें घ्यावे लागेल अशी आमची खात्री आहे. त्याखेरीज, बहिष्कृत

वर्गातल्या होतकरू कामगारांनीं पुढें येऊन कापडखात्यांतलें काम शिकण्याची इच्छा दर्शविली पाहिजे. त्याप्रमाणे तरूण होतकरू मंडळीनीं आपलीं नांवें आमच्यापाशीं अर्थात् दामोदर हॉलमध्ये गिरणी कामगार संघामध्यें नोंदल्यास त्यांना कापड खात्यांतले काम शिकविण्याची व्यवस्था करण्यासहि ठीक पडेल. असो. फॉसेट कमिटी मालकांच्या विणकरांचे पगार कापण्यासंबंधाच्या योजनेला संमति देते किंवा काय हें जाणण्याकरितां गिरणी कामगारांचें कमिटीच्या रिपोर्टाकडे डोळे लागून राहिले होते. पगारांची निरखबंदी (स्टँडर्डायझेशन) करण्याची योजना कमिटीनें पसंत ठरविली आहे आणि गिरण्यांच्या धंद्याला सध्या मंदी असल्यामुळें व असावी तितकी तेजी नसल्यामुळे विणकरांचे पगार शेंकडा ७॥ टक्क्यांनीं कापणें गैरवाजवी होणार नाहीं असे मत दिलें आहे ; तथापि मालकांनी स्वतःच्या फायद्याकडे लक्ष देऊन विणकरांचे पगार छाटण्याची कल्पना अंमलांत आणू नये, कारण शेंकडा ७॥ टक्के पगार कापून मजुरींत बचत झाल्यानें जो फायदा होईल त्यापेक्षा पगार कापले नाहींत व त्यायोगें निरखबंदीची योजना अंमलात आणावयाला कामगारांच्या पुढाऱ्यांची मदत मिळाली म्हणजे अधिक फायदा होईल, असें कमिटीने मुद्दाम म्हटले आहे. त्याशिवाय निरखबंदीची योजनाहि मालक येत्या ऑक्टोबरपर्यंत अंमलात आणीत नाहींत, असेहि प्रसिद्ध झाले आहे. एकंदरींत

पगाराचे टक्के कापले जाण्याचा प्रसंग तूर्त टळला

असें म्हणावयास हरकत नाहीं. मालकांनीं निरखबंदीची जी योजना तयार केली आहे तिच्या अन्वयें सूतखात्यातल्या माणसांची सध्याची संख्या थोडी कमी होणार आहे परंतु सूत खात्यातले सध्या अगदींच हलके असलेले पगार थोडें वाढणार आहेत. कक्के छाटले जाण्याची भीति विणकरांच्या बाबतींत होती आणि आजमितीस तर विणकरांमध्यें बहिष्कृत वर्गातले कोणी लोक नाहीत. तथापि, विणकरांच्या पगारांत काट होण्याचा प्रसंग तूर्त टळला ही गोष्ट बहिष्कृत वर्गामधीलही गिरणीकामगारांच्या दृष्टीनें समाधानाची समजली पाहिजे. कारण, विणकरांचे पगार कापले गेले असते म्हणजे त्यांनी संप पुकारला असता आणि सर्व गिरण्यांची कापड खातीहि बंद पडल्यावर सूत खाती आपोआप बंद पडली असती व बहिष्कृत वर्गातल्या कामगारांवरहि उपासमारीचा प्रसंग आला असता. आधीच गेल्या बारा महिन्यांत सहा महिन्यांचा मोठा संप व नंतर झालेले वेगवेगळ्या गिरण्यातले फुटकळ संप यांच्या योगानें महिन्यांचे महिने खाडे होऊन बहिष्कृत वर्गातल्या गिरणीं कामगारांची स्थिति अतिशय हलाखीची झालेली आहे व त्यांच्या डोक्यांवर कर्जाचे भारे चढलेले आहेत. आधीच पगार फार थोडा व

त्यात वरचेवर संप यामुळें अशी स्थिति होणे स्वाभाविक आहे. त्यांत आणखी या वेळी गिरण्यांच्या सार्वत्रिक संपाची भर पडली असती तर बहिष्कृत वर्गातील गिरणी कामगारांच्या हालांना सीमाच राहिली नसती. म्हणून विणकरांच्या पगारांना तूर्त तरी कात्री लागत नाहीं ही गोष्ट सूत खात्यांतल्या अर्थात बहिष्कृत वर्गातल्याहि कामगारांच्या दृष्टीनें समाधानाची आहे. तथापि, एवढ्यावरून बेसावध न राहतां बहिष्कृत वर्गातल्या गिरणी कामगारांनीं गिरणी कामगार संघाचे सभासद होऊन आपली संघशक्ती वाढविली पाहिजे व आजमितीस त्यांना ज्या अडचणी व जीं दुःखें सोसावी लागत आहेंत तीं दूर करुन घेतली पाहिजेत.

●●●

अग्रलेख : बहिष्कृत भारत, ता. २९ मार्च १९२९.

२७

हिंदु महासभा व अस्पृश्यता

नुकतेंच थोड्या दिवसांपूर्वी सुरत येथें हिंदुमहासभेचे अधिवेशन भरले आणि त्या अधिवेशनाबरोबरच, राष्ट्रीय सभेच्या बैठकीच्या निमित्तानें सामाजिक परिषद वगैरे परिषदा भरतात त्याप्रमाणें शुद्धि परिषद व अस्पृश्यतानिवारक परिषद या परिषदाहि भरल्या. सुरत येथे झालेल्या हिंदुमुसलमानांच्या दंग्यासंबंधाचें खटले अजूनपर्यंत चालू असल्या कारणानें सुरतच्या हिंदुसमाज़ात हिंदु महासभेविषयीं विशेष उत्साह असणें व त्या कारणास्तव चालू वर्षी सदहू महासभेचें अधिवेशन तेथे भरणें हें एका अर्थी स्वाभाविकच होते. तेथील हिंदुमहासभेच्या शाखेचे एक प्रमुख कार्यकर्ते डॉ. रायजी यांचे नांव त्यांच्यावरील हिंदुमुसलमानांच्या दंग्यासंबंधाच्या खटल्यांत हल्ली विशेष प्रसिद्धीस आले आहे व तेच स्वागत मंडळाचे प्रमुख होते. महासभेच्या अध्यक्षस्थानीं कलकत्त्याच्या 'मॉडर्न रिव्ह्यू' या सुप्रसिद्ध इंग्रजी मासिकाचे स्थापक व संपादक श्री.रामानंद चतर्जी यांची योजना झाली होती. श्री. चतर्जी हे नांवाज़लेले लेखक असून स्वतंत्र विचार व स्पष्टवादित्व याच्याबद्दल त्यांची ख्याती आहे. ते ब्राह्मसमाजाचे अनुयायी आहेत आणि सामाजिक बाबतींतील त्यांचे विचार पहिल्यापासून सुधारणेला अनुकूलच नव्हेत तर कट्टे सुधारणावादी आहेत. अशा गृहस्थांची हिंदुमहासभेच्या अध्यक्षस्थानी योजना झाली हें एक प्रकारें आश्चर्यच समजलें पाहिजे. अपेक्षेप्रमाणे त्यांचे भाषण सडेतोड झालें. जातिभेद व अस्पृश्यता या हिंदुसमाजाला लागलेल्या महारोगाचे पूर्ण निर्मूलन झालें पाहिजे, असें श्री. चतर्जी यांनी प्रतिपादिलें. त्यांनी आपल्या भाषणांत हिंदुसमाजाच्या डोळ्यांमध्ये झणझणीत अंजन घातलें खरें, परंतु तें कितपत लागू पडलें असेल याची आम्हाला शंकाच वाटते. कारण,

हिंदुसमाज कलपनातीत कोडगा

आहे. वरीलसारखी भाषणें ऐकताना टाळया वाजविण्यास सुद्धा तो कमी करणार नाहीं, इतकेंच नव्हे तर तसे विचार प्रदर्शित करणाऱ्या माणसाला उच्चस्थानीं बसवील, परंतु आपला पूर्वीचा कार्यक्रम मात्र तसाच कायम ठेवील याची साक्ष गौतम बुद्धापासून महात्मा गांधीपर्यंतच्या काळाचा इतिहास देईल. गौतम

बुद्धानें जातिभेदाचा निषेध केला, धर्मकांडाचा फोलपणा प्रतिपादिला, तरी सुद्धा हिंदुसमाजानें त्याला देवाचा एक अवतार बनवून त्याची शिकवण तेवढी अचूक धाब्यावर बसविली ! आज म. गांधींशीं हिंदुसमाज तेंच वर्तन करीत आहे. आपल्या महाराष्ट्रांतील गांधीपंथी लोकांकडे दृष्टी फेंकली तर आपल्याला काय दिसून येतें? म. गांधींच्या कितीशा महाराष्ट्रीय अनुयायांनी अस्पृश्यतानिवारणासाठीं मनःपूर्वक प्रयत्न केलें आहेत ? प्रयत्न केले नाहींत इतकेंच नव्हे तर अस्पृश्यतानिवारणाच्या प्रयत्नांना विरोध करण्यासही त्यांतल्या बहुतेकांनी कमी केलेलें नाहीं. मोठमोठ्या धर्मसुधारकांना व समाजसुधारकांना आपल्या पोटांत जिरवून टाकण्याची जी हातोटी हिंदुसमाजाला पुरातन काळापासून साधलेली आहे ती लक्षांत घेतली म्हणजे मात्र रामानंद चतर्जीसारख्या एका कट्ट्या ब्राह्मसमाजिस्टाला हिंदुमहासभेचें अध्यक्षस्थान देण्यांत आलें याबद्दल तितकेंसें आश्चर्य वाटावयास नको. हिंदुसमाजाच्या पोटांतील वडवानळांत बुद्ध खाक झाला, महावीर खाक झाला, बसव खाक झाला, चैतन्य खाक झाला, रामानंद खाक झाला, महानुभावांचा चक्रधर खाक झाला, व भागवत संप्रदायी साधुसंत खाक झाले ! नानक व कबीर यांचीहि तीच वाट लागली. राममोहन, दयानंद, रामकृष्ण परमहंस, विष्णुबुवा ब्रह्मचारी, जोतीबा फुले, रानडे, भांडारकर, विवेकानंद, रामतीर्थ, श्रद्धानंद, लजपतराय याची तीच वाट हिंदुसमाजानें लावलीं किंवा तो लावूं पाहत आहे. म. गांधी, आचार्य राय, रामानंद चतर्जी यांनाहि पचवून टाकूं अशी हिंदुसमाजाला धमक वाटत आहे. व्यक्तीचें माहात्म्य वाढवावयाचे व तिचीं आपल्यास नको असेल ती शिकवण कितीहि चांगली असली तरी तिच्याकडे बिलकूल लक्ष्य द्यावयाचें नाहीं, आपला पूर्वीचा परिपाठ चालूच ठेवावयाचा, ही कला हिंदुसमाजाला उत्कृष्ट प्रकारें साध्य झालेली आहे. पूर्वीच्या वैष्णवपंथी रामानंदाचा उदारमतवाद ज्यानें निष्क्रिय करून टाकला तोच हिंदुसमाज हल्लींच्या ब्राह्मपंथी रामानंदाचा उदारमतवाद निष्क्रिय करून टाकण्याची धमक बाळगत असल्यास त्यात नवल तें कोणतें ? हिंदुसमाज म्हणजे फ्रान्सच्या बर्बून राजघराण्याप्रमाणे कांही शिकत नाहीं व कांहीं विसरत नाहीं (learns nothing and forgets nothing) हिंदुसमाज इतका कोडगा असला तरी त्याच्या अंगी आपल्या अस्तित्वाचें तात्पुरतें संरक्षण करण्याइतका लवचीकपणा आहे हेंही मात्र कबूल केलें पाहिजे. पर्याय शोधून काढण्यांत हिंदुधर्मातल्या शास्त्रीपंडितांचा कोणी हात धरूं शकणार नाहीं. वेळ पडेल

त्याप्रमाणें वाटेल तशी तडजोड करणें आणि आलेली वेळ कशीबशी मारून नेणें हा हिंदुसमाजाचा जन्मस्वभावच आहे. या लवचीकपणामुळेंच, 'महापुरें झाडें जाती! तेथे लोहाळे वांचती' या न्यायानें तो आतापर्यंत टिकून राहिला. बाकी,

असले जगणें कितपत श्रेयस्कर

आहे हा प्रश्न अलाहिदा. हा लवचीकपणा केवळ तात्पुरत्या आत्मसंरक्षणालाच उपयोगीं पडूं शकतो. समाजपुरुषाची शरीरप्रकृती निकोप होण्यास आणि त्याचें सामर्थ्य वाढण्यास त्याच्या शरिरांतील सर्व दोष अगोदर निघून गेले पाहिजेत. सुरत येथील हिंदुमहासभेच्या वेळीं अस्पृश्य मानलेल्या लोकांची स्पृश्यांसहीत एक मिरवणूक काढण्यांत आलीं. या मिरवणुकीमध्यें सुमारें पांचशेंच लोक होते आणि स्पृश्य व अस्पृश्य यांच्या एकत्र मिरवणुकीनें हिंदुधर्मावर कांहीं प्राणसंकट ओढवलें नसतें, इतकेंच नव्हें तर हिंदुधर्माचें मरण अशानें थोडें लांबणीवरच पडेल. परंतु तेंहि कांहीं सोवळ्या लोकांना खपलें नाहीं. वैष्णव म्हणविणाऱ्या सुरतेच्या कांहीं लोकांनीं या मिरवणुकीविरुद्ध हस्तपत्रकें वांटून, हा भयंकर अधर्म होत आहे, अशी ओरड केली. आम्हांला या वैष्णव म्हणविणाऱ्या लोकांची खरोखरच कींव येते.

' विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेदभ्रम अमंगळ '

असें तुकोबारायासारख्या महावैष्णवांनीं कितीहि कानीं कपाळीं ओरडून सांगितलें अथवा ' विप्राद्विषड्गुणयुतादरविन्दनाभ– । पादारविंदविमुखात् श्वपचं वरिष्ठम्' असें खुद्द भागवत पुराणामध्यें प्रतिपादण्यांत आलें तरी ज्यांचा जातिदुरभिमान नाहींसा होत नाहीं, ते वैष्णव नसून वैष्णव धर्माच्या नदींतले गोटे असें कां म्हणूं नये ? सुरत येथें हिंदुमहासभेबरोबर अछुतोद्धार परिषदहि भरविण्यांत आली आणि त्यांत मामुली ठराव पसार झाले. अस्पृश्यांना शाळा, विहिरी व सार्वजनिक इमारती यांमध्यें मज्जाव नसावा अशी म्युनिसिपालिट्या, लोकलबोर्डस् व इतर सार्वजनिक संस्था यांना विनंति करण्याबद्दलचा ठराव त्यांमध्यें होता. ह्या ठरावाच्या अंमलबजावणीकरितां हिंदुमहासभेच्या स्थानिक शाखांनीं कोठें कोठें प्रत्यक्ष प्रयत्न केले आहेत तें समजेल तर बरें होईल. सदरील अछूतोद्धार परिषद म्हणजे हिंदुमहासभेचेंच शेपूट होतें. अस्पृश्यांनीं स्वतःच्या पायावर उभे राहण्याकरितां जे प्रयत्न चालविले आहेत ते हिंदुमहासभेच्या पुढाऱ्यांना पसंत नाहींत, इतकेंच नव्हे तर हिंदु म. स. चे लोक अस्पृश्यांमध्यें फाटाफूट करण्याचे प्रयत्न मुद्दाम करीत असतात. आम्ही खुशीनें देऊं तेवढें अस्पृश्यांनीं घ्यावें, त्यांत समाधान मानून आमच्याविषयीं कृतज्ञता बाळगावी, आम्हीं जेथें बसा म्हणूं तेथें बसावें आणि उठा म्हटल्याबरोबर ' जी हुजूर ' म्हणून उठावें, असें

हिंदुमहासभावाल्यांचे अस्पृश्यांच्या बाबतींत धोरण !

आहे. याची आणखी एक ताजी साक्ष पाहिजे असल्यास ती सुरतेच्या हिंदुमहासभेच्या अधिवेशनांत पसार झालेल्या अस्पृश्यताविषयक ठरावामध्यें सांपडेल. या ठरावांत अस्पृश्यांना देवळें, विहिरी, शाळा, सभा वगैरे ठिकाणी मज्जाव न करितां समतेनें वागविण्यांत यावें असें म्हणून अस्पृश्यांचे स्थानिक संस्थांमधील—म्युनिसिपालिट्या, लोकलबोर्डस् वगैरेंमधील व त्याचप्रमाणें प्रांतिक कायदेकौन्सिलें व लेजिस्लेटिव्ह ॲसेंब्ली यांमधील प्रतिनिधी सरकारनें नेमणें हें समाजाच्या हिताला खुद्द अस्पृश्यवर्गाच्या स्वाभिमानाला विघातक आहे असें म्हटलें आहे. आम्हांलाहि सरकारनें अस्पृश्यांचे प्रतिनिधी नेमणें हा गौण मार्गच वाटतो. तथापि, हिंदुमहासभेनें हे प्रतिनिधी अस्पृश्यांसुद्धां सर्व हिंदूंनी निवडून द्यावयाचे कीं फक्त अस्पृश्यांनींच निवडून द्यावयाचे याविषयीं सदरील ठरावांत मुग्धता दाखविली आहे व तेथेंच सारें पाणी मुरत आहे. अस्पृश्यांसारख्या वर्गातल्या लोकांचे प्रतिनिधी सरकारनें नेमण्यांवर ज्या तत्वावर आक्षेप घेतां येतो त्याच तत्वावर मिश्रमतदारसंघातर्फे अस्पृश्यांच्या प्रतिनिधींची निवड होण्यावर आक्षेप घेतां येईल. इतकेंच नव्हे तर, प्रस्तुतच्या परिस्थितींत मिश्रमतदारसंघांतर्फे अस्पृश्यांचे प्रतिनिधी निवडून येण्यापेक्षां त्यांची सरकारनें नेमणूक केलेलीच बरी, असें आमचें स्पष्ट मत आहे. हिंदुमहासभेला अस्पृश्यांच्या स्वाभिमानाची जर खरोखरच कळकळ होती तर तिनें अस्पृश्यांचे प्रतिनिधी त्याच वर्गातल्या खास मतदारसंघांतर्फे निवडून येणें इष्ट आहे असें स्पष्ट म्हटले असतें. अस्पृश्यतेचा जेव्हां नायनाट होईल तेव्हां आम्हीही मिश्रमतदारसंघांना संमति देऊं. परंतु सध्याच्या परिस्थितींत इतर समाजावर विश्वास ठेवावयाला आम्हीं तयार नाहीं. सरकार व अस्पृश्य वर्ग यांचे हितसंबंध परस्परविरोधी नाहींत, परंतु अस्पृश्य वर्ग व इतर समाज यांचे हितसंबंध मात्र एकरूप नाहींत. इतकेंच नव्हे तर जोंपर्यंत स्पर्शास्पर्शाचें बंड हिंदुसमाजात आहे तोपर्यंत या दोन वर्गांचे हितसंबंध परस्पर विरुद्धच आहेत असें म्हणावयास हरकत नाहीं. मिश्रमतदारसंघांतर्फे अस्पृश्यांचे प्रतिनिधी निवडून येण्याची व्यवस्था झाल्यास अल्पसंख्यांक अस्पृश्यांच्या हिताकडे दुर्लक्ष्य झाल्याशिवाय राहणार नाही. जे अस्पृश्य प्रतिनिधि म्हणून निवडून येण्यास उमेदवार या नात्यानें उभे राहतील त्यांना इतर वर्गांतील लोकांच्या मतानें वागावें लागेल आणि अर्थातच हिंदुसभावाल्यांचे बगलबच्चे होण्यास जे अस्पृश्यवर्गीय उमेदवार तयार होतील तेच निवडून येऊं शकतील. तसें झालें म्हणजे अस्पृश्यांची स्वतंत्र स्वाभिमानी चळवळ ठार बुडेल आणि अस्पृश्य वर्गाला स्पृश्य वर्गाच्या ताटाखालचीं मांजरें म्हणूनच राहावें लागेल. हिंदुसभावाल्यांचा

हा अंतःस्थ डाव आहे. त्यांच्या या कुटिल नीतीमुळेच आम्हीं आमच्या अस्पृश्यबंधूंना त्यांच्या चळवळीपासून दूर राहण्यास सांगत असतो. असो. हिंदुमहासभेची चळवळ ही कृत्रिम, आकुंचित दृष्टीची, ध्येयशून्य व तत्त्वपराङ्मुख आहे. अस्पृश्यांविषयीं खरी कळकळ त्या चळवळीच्या पुढाऱ्यांत नाहीं. अस्पृश्यांनीं धर्मांतर करूं नय व त्यामुळें हिंदूंचे सख्याबळ कमी होऊं नये. एवढ्याच उद्देशानें हिंदुमहासभावाल्यांनी अस्पृश्यतानिवरणाचा प्रश्न हातीं घेतलेला आहे. अर्थात् त्यात जीवंत कळकळ नाहीं. जेव्हां केवळ न्यायाच्या व समतेच्या दृष्टीनेंच विचार करण्यास आणि मानवी हक्कांविषयीं तळमळ बाळगण्यास हिंदुसभावाले शिकतील तेव्हांच त्यांच्या चळवळींत खरा जीवंतपणा येईल. आज हिं. म. सभावाल्यांना

चातुर्वर्ण्याची चौकट मोडून टाका

म्हणून सांगितलें तर तें रुचत नाहीं व तें त्यांच्या बुद्धीलाही पटत नाहीं. हिंदुसमाजाची प्रगति खुटविणारी, त्यांचीं शकलें पाडणारी, त्याला हतबल करून टाकणारी जातिभेदपद्धति कायम ठेवून खरें हिंदुसंघटण होणें शक्य नाहीं. अर्थातच जातिभेदजन्य उच्चनीचपणा कायम ठेवून जे संघटण होत आहे तें केवळ संघटणाचें सोंग आहे.

* * *

अग्रलेख : बहिष्कृत भारत, ता. १२ एप्रिल १९२९.

२८

धर्मैक्यपरिषद्

मुंबई प्रार्थनासमाजाच्या ६२ व्या वर्षाच्या वर्धापनदिनानिमित्त एक समारंभ झाला. त्याच्या कार्यक्रमांत वेगवेगळ्या धर्मांच्या लोकांमध्ये सलोखा वाढविणारी परिषद् (Inter-communal Amity Conference) ही एक बाब होती. परिषदेमध्यें निरनिराळ्या धर्मांच्या गृहस्थांची भाषणें होऊन परिषदेच्या हेतूला अनुसरून ठराव पसार झाले त्यांत अस्पृश्यता निषेधाचाहि एक ठराव होता. परिषदेमध्ये झालेल्या भाषणांत ' बॉंबे क्रॉनिकल ' चे संपादक मि. ब्रेलवी यांचे भाषण विशेष मुद्देसुद होतें. अध्यक्ष मि. नटराजन् यांनीं आपल्या भाषणांत धर्मामुळें भांडणें होत नाहींत तर धर्मविषयक खोट्या समजुतींमुळे भांडणें होतात असें सांगितलें. तें अंशतः खरें असलें तरी प्रत्येक धर्मामध्यें (religion) कांहीं ना कांहीं विशिष्ट मतवाद (dogma) असतोच आणि धर्मापासून मतवाद सर्वथैव अलग करतां येत नाहीं ही गोष्ट दृष्टीआड करून कसें चालेल ? तसेंच, मि. नटराजन् यांनीं हिंदुमुसलमानांमधील सध्याच्या वितुष्टाची उघड्या डोळ्यांनीं चर्चा केली नाहीं आणि केवळ आशावादावरच सगळा भर दिला. आशावाद इष्ट याविषयीं शंका नाहीं. परंतु कार्यकारणमीमांसा योग्य रीतीनेंच झाली पाहिजे. चिकित्सा यशस्वी झाली पाहिजे तर रोगाचें निदान बिनचूक झालें पाहिजे. चिकित्सा चालू ठेवावयास आशावाद उपयोगीं पडेल, परंतु निदानांतील चुकीची भरपाई आशावादानें होऊं शकणार नाहीं, हें विसरतां कामा नये. असो, अशा प्रकारच्या परिषदांमध्ये सुशिक्षित लोक भाग घेतात, परंतु दंगे करणारे लोक अशिक्षित असतात. आणि जे दुसरे शिक्षित लोक स्वार्थाला वश होऊन जाती-जातींत वैमनस्य वाढवितात तेही अशा परिषदांमध्यें भाग घेत नाहींत. सध्यांचीं हिंदुमुसलमानांमधलीं भांडणें मौलवी, शास्त्री, भिक्षुक आणि आपआपल्या समाजांत पुढारीपणा मिळवावयास हपापलेले लोक व थोडेसे माथेफिरू यांच्यामुळे माजलीं आहेत. ही गोष्ट नाकबूल करून, केवळ एकमेकांच्या धर्मांच्या अनभ्यासामुळें वेगवेगळ्या धर्मानुयायांमध्यें सलोखा, ऐक्य व प्रेम हीं नांदतील असें मानणें ही आमच्या मतें केवळ आत्मवंचना होय.

● ● ●

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. १२ एप्रिल १९२९.

२९

अस्पृश्यांकरिता खास देवालय

रत्नागिरी येथें तेथील रा. कीर नावाच्या एका धनिक हिंदु गृहस्थांनीं अस्पृश्यांकरितां पतितपावन मंदिर नांवाचे एक खास देवालय बांधण्याचें ठरविलें असून त्या देवळाची कोनशीला बसविण्याचा समारंभ डॉ. कुर्तकोटी यांच्या अध्यक्षतेखालीं झाला. डॉ. कुर्तकोटी यांचीं धार्मिक व सामाजिक मतें रबरासारखीं लवचीक आहेत आणि अस्पृश्यता निवारणाच्या बाबतींत आतांपर्यंत अनेक वेळां त्यांनीं धरसोडीचीं मतें प्रदर्शित केलीं आहेत हें प्रसिद्धच आहे. आम्हाला फक्त रा. कीर याच्या गैरसमजुतीबद्दल वाईट वाटतें. त्यांनी आपला पैसा अशा प्रकारें खर्च करण्याऐवजीं अस्पृश्य वर्गांतील लोकांच्या शिक्षणासाठीं व अस्पृश्यता निवारणाच्या चळवळींमध्ये खर्च केला असता तर तो सत्कारणीं लागला असता. बहिष्कृत वर्गासाठीं खास देवळांची जरूरी आहे असें आम्हांस वाटत नाहीं, इतकेंच नव्हे तर अशीं खास देवळें बांधल्यानें अस्पृश्यतेचा प्रश्न सुटणें अधिक लांबणीवर पडेल अशी आमची पक्की समजूत आहे. अस्पृश्यांची मागणी मुख्यतः अस्पृश्यता निवारणासंबंधाची आहे, अर्थात् सध्यां अस्तित्वांत असलेल्या इतर हिंदुसमाजाच्या भजणुकीच्या देवळांत त्यांना प्रवेश हवा आहे. देवळें नाहींत म्हणून देवाची भक्ति करतां येत नाहीं असें नाहीं. घरीं बसूनहि देवाची पूजा करतां येते, देवाचें स्मरण करतां येतें, त्याला देऊळच पाहिजे असें नाहीं. मात्र अस्पृश्यांकरितां खास देवळें बांधल्यानें स्पृश्य व अस्पृश्य यांच्यामधील भेदरेषा कायम होणार आहे. रत्नागिरीचें नवीन देऊळ महार-चांभारांचे देऊळ म्हणून मानलें जाईल व सोवळ्या लोकांना आपलीं देवळें विटाळापासून सुरक्षित राहिल्याबद्दल समाधान वाटण्याला मात्र कारण होईल, याविषयीं आमची खात्री आहे. रा. कीर यांनीं नकळत व सद्धेतूनें कां होईना, परंतु कुर्तकोटींसारख्याच्या नादीं लागून अस्पृश्यता निर्मूलनाच्या कार्याची स्वतःचे पैसे खर्चून मोठी हानि केली असेंच आमचें मत आहे आणि रा. कीर यांनीं देऊं केलेली ही खास देवळाची देणगी रत्नागिरी येथील आमच्या बहिष्कृत वर्गीय बंधूंनीं आतांच साभार नाकारावी अशी त्यांना आमची सूचना आहे.

● ● ●

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. १२ एप्रिल १९२९.

३०

पुनः शाळांतलीं पाणी पिण्याची भांडी !

मुंबई म्युनिसिपालिटीनें आपल्या शाळांमधील मुलांमुलींकरितां ठेवलेलीं पाणी पिण्याचीं भांडीं स्पृश्यांकरितां वेगळीं व अस्पृश्यांकरितां वेगळीं अशीं ठेवूं नयेत असें ठरविल्यापासून पुराणमतवाद्यांना झोंप येईनाशीं झाली आहे. सदरील ठराव रद्द करून घेण्यासाठीं अद्यापि त्यांची धडपड चालली आहे. या शिळ्या कढीला ऊत आणण्याचा प्रयत्न नवीन कॉर्पोरेशनच्या सभेत नुकताच झाला आणि त्या वेळीं पुराणमतवाद्यांनीं आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा केली. सदरील ठराव रद्द करण्यासाठीं भांडणाऱ्या सभासदांमध्यें गुजराथी लोकांचा भरणा विशेष होता आणि विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं वालभाई देसाई, मोहनलाल देसाई वगैरे कांहीं कट्टे कॉंग्रेसवालेहि त्यांमध्यें होते ! दक्षिणी सभासदांपैकीं डॉ. जावळे यांनीं या वादांत अस्पृश्यांच्या विरुद्ध जोरानें भाग घेतला होता. शिंगें मोडून वासरांत शिरणाऱ्या गाईप्रमाणें वागणाऱ्या या लोकांची अखेरीस फजिती झाली ही समाधानाची गोष्ट होय.

● ● ●

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. १२ एप्रिल १९२९.

३१

बीचमें मेरा चांदभाई !

वऱ्हाडांतील सुमारें पांच हजार महारांनीं, आपली अस्पृश्यता हिंदुसमाजानें अमुक मुदतीपर्यंत काढून टाकली नाहीं तर आपण धर्मांतर करणार असें प्रसिद्ध केल्याचें आमच्या वाचकांना ठाऊकच आहे. सदरील मंडळीचें हस्तपत्रक व त्यावरील आमचे विचार आम्हीं यापूर्वीच प्रसिद्ध केले आहेत.† त्या बाबतींत रा. जयराम नाना वैद्य यांनीं बडोद्याच्या 'जागृति' पत्रांत दोन लेख आतांपर्यंत प्रसिद्ध केले आहेत. पहिला लेख आमच्या वाचण्यांत आला तेव्हां आम्हीं जाणूनबुजून तिकडे दुर्लक्ष केलें. परंतु पुनः तेंच तुणतुणें वाजविण्याचें वैद्यांनीं चालू ठेवल्याकारणानें त्या बाबतींत दोन शद्ब लिहिणें इष्ट वाटतें. वैद्यांनीं वरील धमकी पोकळ आहे असें म्हटलें आहे. या आव्हानाचा स्वीकार करणें किंवा न करणें हें ज्यानीं ती धमकी दिली आहे त्यांचें काम आहे. परंतु वैद्यांनी आपल्या लेखात मरीआई, जरीमरी वगैरे देवतांची उपासना वगैरे अप्रस्तुत गोष्टींचा उल्लेख करून, जर अस्पृश्यांना आपली अस्पृश्यता नाहींशी करावयाची असेल तर त्यांनीं प्रार्थनासमाजाचे अनुयायी व्हावें, असा उपदेश केला आहे. प्रार्थनासमाजाच्या मतांचा प्रश्न येथें अप्रस्तुत आहे आणि त्या समाजानें अस्पृश्यता निवारणासाठीं केलेले प्रयत्नहि आम्ही नाकबूल करूं इच्छीत नाहीं. परंतु मुख्य प्रश्न आहे तो हा कीं, अस्पृश्य वर्गाला आत्मसात् करण्याचें सामर्थ्य प्रार्थनासमाजामध्यें आहे किंवा काय ? तसें सामर्थ्य नसेल तर अस्पृश्यता निर्मूलनाचा उद्देश पार पडूं शकत नाहीं हें स्पष्ट होय. जे अस्पृश्य धर्मांतर करूं इच्छितात तें मोक्षप्राप्तीसाठी नव्हे तर अस्पृश्यतेचा डाग घालविण्यासाठींच. प्रार्थनासमाजाचें संख्याबल अल्प आहे, हिंदुसमाजाशीं टक्कर देण्याचें त्याच्यात सामर्थ्य नाहीं, खेडोखेडीं त्याचे अनुयायी नाहींत, इतकेंच नव्हे तर प्रार्थनासमाजाचे सभासद हे साधारणतः हिंदुच म्हणून समजले जातात. फार काय, जातिभेदाची बंधनें तोडणारे लोक त्यामध्यें हातांच्या बोटांवर मोजण्याइतके तरी सापडतील किंवा नाहीं याची शंका आहे. अशा स्थितींत अस्पृश्य प्रार्थनासमाजिष्ट झाले तरी त्यांची अस्पृश्यता कशी नाहींशी व्हावी ? रा. वैद्य हे समतावादी व बहिष्कृत वर्गांविषयीं सहानुभूति बाळगणारे गृहस्थ आहेत. हें आम्हांला माहीत आहे. परंतु प्रस्तुत वादांत 'गप्प बसावयाला काय घ्याल ?' असें त्यांना विचारण्याची पाळी आमच्यावर आली आहे.

●●●

---

†पाहा. अग्रलेख क्रमांक २१ आणि त्या संबंधी परिशिष्ट.

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. १२ एप्रिल १९२९.

३२

देव पुजाऱ्यांचा कीं भक्तांचा ?

मद्रास इलाख्यांतील एरोड देवस्थान कमिटीनें आपल्या ताब्यांतल्या पांच तालुक्यांमधील देवालयें अस्पृश्यांसुद्धां सर्व हिंदुंना मुक्तद्वार करण्याचा ठराव केला आहे, परंतु जीर्णमतवाद्यांना अर्थातच हा ठराव नापसंत असून ते त्याविरूद्ध खटपट करीत आहेत. त्या ठरावाला विरोध होणार ही अटकळ होतीच. या ठरावाची बातमी समजली तेव्हां एरोड येथील 'ईश्वरा' च्या देवळांत जाण्यासाठीं बहिष्कृत वर्गातले कांही लोक तारीख ४ एप्रिल १९२९ रोजी जमावाने निघाले. त्याची गुणगुण कळल्याबरोबर देवळाच्या पुजाऱ्यानी देवळाच्या गाभाऱ्याच्या दरवाज्याला कुलुपें लावलीं आणि बहिष्कृतांना देवदर्शन होऊं नये अशी व्यवस्था केली ! तेव्हां बहिष्कृत वर्गातली मंडळी मुखशाळेंत बसून राहिली आणि नारळ वगैरे नैवेद्याच्या वस्तु तेथेंच देवाला अर्पण करून घंटा वाजवूं लागली पुजाऱ्यांनीं, कमिटीनें सदरील ठराव रद्द केला नाहीं तर आपण राजीनामे देऊं अशी धमकी दिली आहे आणि जीर्णमतवादी लोकांनीं या ठरावाविरूद्ध चळवळ चालवून मारामाऱ्या करण्याचीहि तयारी केली आहे अशी बातमी आहे. एरोड देवस्थान कमिटी आपल्या ठरावाला चिकटून राहण्याचें धैर्य कितपत दाखविते तें आतां पहावयाचें आहे. देव पुजाऱ्यांचा, नुसत्या वरिष्ठ वर्गाचा किंवा अस्पृश्यांसुद्धां सर्व हिंदूंचा, हा प्रश्न जितक्या लवकर धसाला लागेल तितकें चांगलें.

●●●

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. १२ एप्रिल १९२९.

३३

खोती ऊर्फ शेतकरी वर्गाची गुलामगिरी

भारतीय बहिष्कृत समाज सेवक संघाच्या विद्यमानें रत्नागिरी जिल्ह्यांतील खेड व चिपळूण या तालुक्यातर्फे रत्नागिरी जिल्हा बहिष्कृत परिषदेचें दुसरें अधिवेशन गेल्या ता. १३ मिनहू *रोजीं चिपळूण मुक्कामीं भरलें होतें. त्या संबंधीचा फायदा घेऊन शेतकरी वर्गाची एक परिषद तेथेंच दुसऱ्या दिवशीं भरविण्यांत आली. अर्थातच या शेतकरी परिषदेला कुणबी, मराठे व महार या जातीच्या लोकांचा भरणा होता. आधीं सर्व हिंदुस्थानांत शेतकरी वर्गाची स्थिति अत्यंत हलाखीची आहे आणि त्यांतहि रत्नागिरी जिल्ह्यांत शेतकऱ्यांचा विशिष्ट परिस्थितिमुळें विशेषतः धारेबंदीच्या तेथल्या खास पद्धतीमुळें आज कैक पिढ्या भयंकर कोंडमारा झालेला आहे. कोंकणांत रत्नागिरी व कुलाबा या जिल्ह्यांमध्यें खोती पद्धति प्रचलित आहे. मुंबई इलाख्यांतील दुसऱ्या कोठेंही ही पद्धति अस्तित्वांत नाहीं. रत्नागिरी व कुलाबा येथील खोती पद्धतीत कांही फरक आहे. कुलाब्यापेक्षां रत्नागिरी जिल्ह्यांत शेतकऱ्यांना विशेष जाच व जुलूम सोसावा लागतो आणि खोतांचे प्राबल्य फारच आहे. रत्नागिरी जिल्ह्यांतील मालवण व वेंगुर्ले हे दोन तालुके खेरीज करून बाकी सर्व तालुक्यांत कमीजास्त प्रमाणानें खोतीचें बंड आहे. रत्नागिरी जिल्ह्याच्या ज्या भागांत खोतांचे विशेष प्रस्थ आहे त्या भागांतील व ज्या भागांत खोतांची पद्धति नाहीं किंवा असली तरी अल्प प्रमाणांत आहे त्या भागांतील व ज्या भागांतील शेतकरी वर्गाच्या स्थितींत ठळक फरक असल्याचें दिसून येतें. खोतीपद्धतीखालील शेतकऱ्यांची सांपत्तिक स्थिति वाईट असतेच, परंतु इतर बाबतींतही त्यांची अवनति झाल्याचें दिसून येतें. विशेषतः स्वाभिमान, तडफ, हिंमत हे

मनुष्याच्या उन्नतीस अवश्य असलेले गुण

खोतीसारख्या गुलामगिरीमध्यें पिळून निघाल्यामुळें नष्ट होतात. खोतीच्या जाचाची कल्पना माहितगाराखेरीज इतरांना होणें शक्य नाहीं. खोत म्हणजे गावांतला एक लहानसा सुलतान असतो. जेव्हां गांवची खोती वेगवेगळ्या

---

* ता.१३ एप्रिल १९२९.

मिनहू = वर सांगितलेल्या महिन्याचा, त्याच महिन्याचा, चालू महिन्याचा–महाराष्ट्र शब्दकोश, विभाग सहावा, संपादक-य. रा. दाते, पुणे, १९३८, पृष्ठ २४८६.

लोकांमध्यें व त्याच्या अनेक घराण्यांमध्यें हिस्सेरसीनें विभागली असते तेव्हां अनेक सुलतानांचा जुलूम गांवांतल्या शेतकऱ्यांना सोसावा लागतो. शेतकऱ्याला सरकारदेणें देऊन शिवाय खोतीहक्काबद्दल वेगळें देणें द्यावें लागतें. रयतवारी पद्धतीमध्यें फक्त सरकार देणेंच द्यावयाचें असतें. खोतीमध्यें अशा रीतीनें शेतकऱ्यावर कराचा बोजा अधिक पडतोच, परंतु त्याखेरीज नानाप्रकारांनीं कुळांकडून खोत पैसे उकळीत असतात. कुळानें पैसे भरले म्हणजे रीतसर पावती द्यावयाची नाहीं असा खोतांचा बाणा असल्यामुळे

कुळाची शेंडी नेहमीं खोताच्या हातांत

राहतें. वाटेल तशी बाकी कुळावर काढून खोत लोक त्यांना नेहमीं सतावीत असतात. खोत ब्राह्मण असला तर कुळाच्या परसांतल्या झाडावर फणस राहावयाचा नाहीं आणि भाजी लावूनहि त्याला व त्याच्या घरांतल्या माणसांना ती खावयाला मिळावयाची नाहीं. भोपळ्याच्या वेलीवर भोपळा टिकावयाचा नाहीं. खोत मराठा किंवा मुसलमान असला तर तो कोंबडीं शिल्लक ठेवावयाचा नाहीं. म्हणजे कुळाला स्वामित्व असें कांहींच नाहीं ! जें कांहीं त्याच्या घरांत असेल तें खोताच्या मालकीचें ! एकादा शेतकरी खोताच्या जुलूमाचा प्रतिकार करण्यास पुढें सरसावला तर त्याला वठणीस आणण्याची अनेक साधनें खोतापाशीं असतात. एक तर गांवचा खोत हाच बहुतकरून गांवचा पोलीस पाटील असतो. त्यामुळें दमदाटी करण्याचा किंवा खोटा आळ घालून शेतकऱ्याला छळण्याचा मार्ग त्याला मोकळा असतो. दुसरा एक उपाय म्हणजे शेतकऱ्याचीं गुरें चरणीस गेलीं असता कोंडवाड्यात घालणें हा होय. गांवांतली चराईची जमीन खरोखर सबंध गावाच्या मालकीची असता तिच्यावर खोत आपला मालकी हक्क गाजवीत असतो आणि गुरांवाचून शेती शक्य नसल्यामुळें शेतकऱ्याला आपल्या ऐपतीप्रमाणें व जरूरीप्रमाणें गुरें बाळगावींच लागतात व शेतकऱ्याच्या खास मालकीची चराईची जमीन नसल्यामुळें गांवचराईत तीं धाडावीं लागतात. अर्थात् शेतकरी स्वाभाविकपणेंच खोताच्या कचाटींत सांपडतो. खोताच्या जुलुमाचा दुसरा सर्वांत वाईट प्रकार म्हणजे वेठीच्या कामाची पद्धती होय. कायद्यानें वेठीला मनाई केली आहे, परंतु खोत हा गांवांतला 'कर्तुमकर्तुम' सामर्थ्यवान असल्यामुळे कायद्यातली मनाई असून नसून सारखीच होते. खोताच्या 'खाजगी' म्हणून काहीं जमिनी असतात, या जमिनीमधील लागवडीचीं सर्व कामें खोत लोक वेठीनें करून घेतात. या कामाबद्दल शेतकऱ्याला व त्याच्या बायकामुलांना धड पोटापुरतीहि मजुरी मिळत नाहीं. खोत हाच गांवांतला सावकार असतो व त्या रूपानेंहि तो शेतकऱ्यांना

वाटेल तसा पिळून काढतो. शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण मिळूं नये यांसाठीं खोत हरप्रयत्न करीत असतात. कारण शेतकरी लिहावयास व वाचावयास शिकले तर आपली सुलतानी अशीच चालूं देणार नाहींत याची त्यांना खात्री असते. त्याखेरीज शेतकऱ्यांवर खोतांचा सामाजिक जुलूम असतो तो तर विचारूंच नये. कुणबी मुंबईला येऊन दोन पैसे मिळवून गांवी गेला अणि त्याला धोतर, कोट, रुमाल वापरण्याचे सामर्थ्य असेल तरी गांवात गेल्यावर

धोतर सोडून लंगोटी नेसणें भाग पडतें

त्यानें ठरलेल्याच हीन दर्जाचा पोषाख केला पाहिजे, नाहींपेक्षां त्यानें आपली मर्यादा ओलांडली असें खोत समजात ! कुणब्यांच्या बायकांवर सुद्धां विशिष्ट पद्धतीनें लुगडें नेसण्याची सक्ती असते ! अशा प्रकारें अस्पृश्य मानलेल्या जाती किंवा गुजराथमधील 'काळीपरज' किंवा 'राणीपरज' नांवाची जात यांच्यावर जसा सामाजिक जुलूम होतो, तसा खोतीपद्धतीखालील कुणबी जातीच्या लोकांवरहि जुलूम होतो आणि त्या दृष्टीनें या सर्व जाती समदुःखी आहेत असें म्हणावयास हरकत नाहीं. माणुसकीला लांच्छनास्पद अशी ही गुलामगिरी या विसाव्या शतकांत चालू असावी ही खरोखरच हिंदी समाजाला मोठ्या शरमेची गोष्ट आहे. सध्यां शेतकरी कामकरी पक्षाची चळवळ म्हणून वर्तमानपत्रांतून व सभांतल्या भाषणांतून ऐकूं येतें. या चळवळीची हल्लीं एक 'फॅशन'च निघाली आहे. परंतु या खोतीकडे अद्यापि कोणी लक्ष देत नाहीं, इतकेंच नव्हे तर शेतकरी कामकरी चळवळीचे गोडवे जीं वर्तमानपत्रे गातात, त्यांतली बहुतेक पत्रे खोतीचे समर्थन करितात आणि शेतकऱ्यांच्या खोतीविरूद्ध असलेल्या तक्रारी केव्हांहि प्रसिद्ध करीत नाहींत ! सरकारला शिव्या देण्यापुरतीच त्यांना शेतकरी कामकरी चळवळ पाहिजे असते. शेतकऱ्यांना सध्यांच्या परिस्थितींत न्याय मिळणें कठीण आहे. एक तर वर म्हटल्याप्रमाणें बहुतेक गांवांत खोत हाच गांव फौजदार असतो. खोतांच्या जातभाईचा तालुक्याच्या व जिल्ह्याच्या अधिकाऱ्यांत भरणा असतो, फार काय परंतु शेतकऱ्याला न्याय मिळविण्यासाठीं खोतावर दिवाणी फौजदारी काम चालवायाचें असल्यास त्याचें वकीलपत्र घेण्यास कोणी सहसा तयार होत नाहीं ! थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे चोहीकडून तेथील खोतीच्या पाशांत गुरफटून गेलेले आहेत. अशी ही खोती मूळची आहे तरी काय व खोतांचे वाजवी हक्क आहेत तरी काय, याचा विचार केला असतां आणि खोतीचा आजपर्यंतचा इतिहास चिकित्सक दृष्टीनें पाहिला असतां आपल्यांस असें दिसून येतें कीं,

खोतांनीं हळुहळू पाय पसरून शेतकऱ्यांचे हक्क बळकावले

आहेत आणि त्यांना निर्माल्यवत् केलें आहे. देशावरचा जसा पाटील तसा कोंकणांतला खोत. शब्दशः 'खोत' म्हणजे मक्तेदार असा अर्थ आहे. कित्येक गांवें शेतकरी आणून वसविण्याच्या कामीं खोतांनीं मदत केल्यामुळें त्यांना गावकीचें वगैरे कांही विशेष हक्क देण्यांत आले. खोतानें ठरलेली रक्कम शेतकऱ्यांकडून जमीन सारा म्हणून वसूल करावयाची आणि त्यांतली ठरलेली रक्कम सरकारांत भरावयाची. बाकीची रक्कम खटपटीबद्दल त्यानें स्वतःला घ्यावयाची. तो जमिनीचा मालक नव्हे. जमिनीचे मालक शेतकरीच. **खोत जमिनीचा मालक नव्हें** असें म्हणण्यास अनेक सबळ पुरावे आहेत. खोतांच्या सनदामध्यें ते गांवांचे मालक असल्याबद्दल कोठेंच आधार सांपडत नाहीं. उलट, खोतांना सरकारसाऱ्याच्या वसुलीबद्दल देशावरील पाटलांप्रमाणें **मुशाहिरा** मिळत असे, असें स्पष्ट पुरावे सांपडता खोत हेच जर त्यांच्या गांवांतल्या जमिनींचे मालक असते तर त्यांना मुशाहिरा देण्याचें कारण काय ? मुशाहिरा मालकांना देत नसतात, नोकरांनाच देतात. सनदी हक्काच्या दृष्टीनें खोत हे देशावरील पाटलांप्रमाणेंच असतांहि त्यांच्यांत लेखणीवाले ब्राह्मण वाढल्यामुळें त्यांनी हळुहळू हातपाय पसरून शेतकऱ्यांच्या हक्कांचे आक्रमण केलें आणि पूर्वी कायद्यानें नसलेले हक्क वहिवाटीच्या द्वारें बळकाविले. खोती हक्क वंश परंपरागत असले तरी त्यांची गहाण विक्री करतां येते. त्यामुळें मराठे वगैरे ब्राह्मणेतर खोतांची संख्या कमी होऊन ब्राह्मण, कायस्थ वगैरे लेखणीवाल्या लोकांची खोतवर्गांत संख्या वाढली आणि त्याकारणानें देशावरील पाटलांना जें साध्य झालें नाहीं तें खोतांना साध्य झालें. खोतीपद्धतींत रयतेचे अनेक प्रकार आहेत, आणि कमी जास्त प्रमाणानें त्यांचा दर्जा आहे. त्याविषयीं माहिती देण्याचें हे स्थळ नव्हें. खोतीमध्यें धारेकरी वर्गांतल्या लोकांना तेवढासा त्रास पोंहचत नाहीं. किंबहुना धारेकरी हे आपल्या कुळांवर थोड्या कमी प्रमाणांत कां होईना सत्ता गाजवित असतात. खोतांची 'खाजगी' म्हणून जमीन असते, हीं त्यांच्या मालकीची. परंतु ही खाजगी जमीन, संस्थानिक जसें आपली खाजगी संपत्ति संस्थानच्या कारभारांतूनच पैदा करितात, तशी खोतांनीं आपल्या खोतपणाचा फायदा घेऊन बहुधा संपादलेली आहे. या खाजगी जमिनींतले शेतकरी म्हणजे शुद्ध उपरी कुळें. त्यांच्याकडून जमीनवहिवाटीची एकसाली कबुलायत घेण्यांत येते. खोतांनी अनेक लपंडाव लढवून आतांपर्यंत

हजारों हक्कदार शेतकऱ्यांना उपरी कुळें बनविलें

असून अद्यापि तो क्रम चालूच आहे. शेतकरी अशिक्षित, अज्ञान व पैशाच्या दृष्टीनें लाचार असल्यामुळें खोतांचे चांगले फावले आणि त्यामुळे शेतकरी आपले हक्क गमावून बसले. हक्कदार शेतकऱ्यांकडून जबरदस्तीनें व अप्रत्यक्षरीत्या छळ करून एकसालीं कबुलायती घेण्याचा सपाटा सध्यां खोतांनी लावल्यामुळे शेतकऱ्यांमध्यें

भयंकर असंतोष

माजलेला आहे. आज ना उद्यां आपल्या सुलतानीचे बारा वाजणार हें बहुतेक खोतांना कळून चुकलें आहे. म्हणून 'खाजगी' जमीन वाढविण्यासाठीं व हक्कदार शेतकऱ्यांना उपरी कुळें बनविण्यासाठीं त्यांचें प्रयत्न जोरानें चालू आहेत. हे प्रयत्न म्हणजे अर्थातच शेतकऱ्यांची निरनिराळ्या मार्गांनीं जळणूक करणें हे होय. त्यामुळें खोतीचा प्रश्न सध्या निकराला आलेला आहे. खोती प्रदेशांतील शेतकऱ्यांना माणुसकीचें हक्क पुनः मिळवून दिले पाहिजे तर

खोती पद्धती समूळ नष्टच केली पाहिजे.

सध्या खोतीसंबंधाचा कायदा आहे. तो अत्यंत अपुरा आहेच, परंतु जो कायदा आहे त्याची अंमलबजावणी योग्य रीतीनें होऊं शकत नाहीं. आणि जोंपर्यंत खोती नष्ट झाली नाहीं निदान तिचीं नखें काढून टाकण्यांत आली नाहींत व तिचें दांत पाडण्यांत आले नाहींत, तोंपर्यंत त्या कायद्याची अंमलबजावणी योग्यरीतीनें होणे केव्हांही शक्य नाही. सदरील कायद्यांत तात्पुरती दुरुस्ती करूनही कांहीं उपयोग व्हावयाचा नाहीं. याकरितां डॉ. आंबेडकर यांनीं कायदेकौन्सिलमध्यें खोतीसंबंधाचे एक झणझणीत बिल आणण्याचें ठरविले आहे व तसें त्यांनीं चिपळुणच्या शेतकरी परिषदेमध्ये † जाहीरही केलें.

● ● ●

† पहा. खंड १८, भाग-१, पृ. १६२–१६५.

अग्रलेख : बहिष्कृत भारत, ता. ३ मे १९२९.

३४

पुनः सर्व गिरण्यांचा संप

गेल्या वर्षी मुंबईतील गिरण्यांचा सार्वत्रिक संप होऊन तो सहा महिने चालला. तो कसाबसा मिटला आणि गिरण्या पुनः चालू झाल्या तरी कोणत्या ना कोणत्या निमित्तानें निरनिराळ्या गिरण्यांमध्ये व गिरण्यांच्या खटांमध्ये संप होतच होते. गेल्या मोठ्या संपाच्या तडजोडीच्या वेळीं सरकारनें वादाच्या चौकशीसाठी नेमलेल्या फॉसेट कमिटीचा रिपोर्ट प्रसिद्ध होऊन, गिरण्यांचे मालक व कामगार यांच्यामध्यें वेळोवेळीं उद्‌भवणाऱ्या वादांचा निकाल लावण्याची कांहीं तरी कायमची व्यवस्था होईल अशी आशा वाटत होती, इतक्यांत दुसऱ्या मोठ्या संपाची कल्पना निघाली. वाडियाबंधूंच्या मोरबाग (स्प्रिंग), टाकसाळ (टेक्सटाइल) व सेंच्युरी या तीन गिरण्यांतले सुमारें अठरा लोक मालकांनीं कामावर ठेवण्याचे नाकारल्या-बद्दल त्या गिरण्यांतल्या पंधरा सोळा हजार लोकांचा संप करविण्यांत आला आणि गिरणीकामगार यूनियन व मालक यांच्या दरम्यान तडजोड होऊन हा संप मिटला नाहीं तेव्हां मालकांनीं पुनः कामावर येतील तीं जुनीं व बाकीचीं नवीं माणसें भरून आपल्या गिरण्या पुनः चालू केल्या. त्यानंतरही मालक व यूनियन यांच्या दरम्यान वाटाघाट झाली, परंतु त्यांत कांहीं तडजोडीचा मार्ग निघाला नाहीं. तेंव्हा यूनियननें मुंबईतील सर्व गिरण्यांचा संप ता. २६ एप्रिलपासून पुकारला. पंधरा हजार लोकांचा संप यूनियनला यशस्वी करतां आला नाहीं, म्हणून दीड लाख लोकांचा संप करून आपली अब्रु बचावण्याचा युनियनच्या पुढाऱ्यांनीं प्रयत्न चालविला आहे. तक्रारीचें पहिलें कारण मोरबाग गिरणींत एका माणसाला तो सुमारें पंधरा दिवस गैरहजर राहुन पुनः कामावर आला तेव्हां त्याला परत कामावर ठेवण्यांत आलें नाहीं त्यामुळें घडलें. त्यानंतर टाकसाळ व सेंच्युरी या गिरण्यांतले कांहीं लोक काढून टाकण्यांत आलें. सेंच्युरी मिलमध्यें यूनियनच्या एका स्थानिक पुढाऱ्यानें फ्रेमीचे सांचे साफ करण्याकरितां नेहमीपेक्षां एक तास अगोदर सर्व खातें, गिरणीच्या अधिकाऱ्यांना न विचारतां स्वतःच्या हुकुमानें बंद केलें ; म्हणून त्याला काढून टाकण्यांत आलें व त्याच्याकरितां संपाची चळवळ केली म्हणून दुसऱ्या कांहीं लोकांना काढून टाकण्यांत आलें. टाकसाळींत रजेशिवाय गैरहजर राहिल्याबद्दल दोन चार इसमांना खात्याच्या अधिकाऱ्यांनीं बंद केलें. मोरबागच्या ज्या एका माणसाला कामावर घेतलें नाहीं तो रजा

घेतल्यावाचून गैरहजर राहिला होता व त्याचें कारण दहा नंबरचें सूत त्या वेळी खात्यांत चालू होतें आणि बारीक सूत पुनः चालू झाले तेव्हां तो कामावर परत आला व आपले पूर्वीचें सांचे मागूं लागला, परंतु त्याच्या गैरहजेरींत दुसरा इसम त्याच्या साच्यावर कायमचा नेमला होता म्हणून ते सांचे त्याला देतां येणें शक्य नव्हतें. असें मालक म्हणतात तर उलटपक्षी युनियनवाले म्हणतात कीं, तो इसम रजा घेऊनच गैरहजर राहिला होता, परंतु तो ह्या गिरणीतला पुढारी असल्यामुळें त्याला मुद्दाम कामावर घेतलें नाहीं. गिरण्यांत रजेसाठीं लेखीं अर्ज करण्याची व रजा दिल्यास दाखला दप्तरीं ठेवण्याची पद्धती नसल्यामुळें मालकाचें म्हणणें खरें की युनियनचें म्हणणें खरें तें ठरविण्यास लेखी पुरावा कांहींच नाहीं. उभयपक्षी जो पुरावा आहे तो तोंडीच आहे. काहीं झालें तरी अठरा माणसांसाठी सोळा हजार माणसांचा संप करण्यांत चूक झाली हें स्पष्ट आहे. इतकेंच नव्हे तर युनियनचे त्या वेळचे पुढारी डांगे, आळवे व कासले यांनीं मोरबाग गिरणीच्या गेल्या नोव्हेंबर मधल्या संपांत मालकाला करार लिहून देऊन, कामगारांचीं कांहीं तक्रार असल्यास ती प्रथम मालकापुढें रीतसर मांडून दाद मिळण्याची निराशा झाल्याखेरीज संप करणार नाहीं अशी अट जॉबर व कामगार यांच्यातर्फे कबूल केली होती. या कराराच्या अस्सल कागदाचा फोटोहि मालकांनी प्रसिद्ध केलेला आहे. परंतु मोरबागचा संप अगोदर मालकापुढें तक्रार मांडल्यावाचून करण्यांत आला. ही चूक झाल्याची कबुली युनियनच्या हल्लींच्या पुढाऱ्यांनीं मालकांपाशीं थोड्या दिवसांपूर्वी झालेल्या वाटाघाटींत दिली आहे. म्हणजे युनियनच्या पुढाऱ्यांनीं एकामागून एक अशा घोडचुका केल्या आणि आतां दीडलाख लोकांवर व त्यांच्या कुटुंबावर उपासमारीचा प्रसंग आणून त्या चुकांवर पांघरून घालण्याचा आणि कामगारांना झुलविण्याचा त्यांनीं प्रयत्न चालविलेला आहे.

● ● ●

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. ३ मे १९२९.

३५

बहिष्कृत वर्गातील कामगारांचा कोंडमारा

बहिष्कृत वर्गातली हजारों माणसे गिरण्यांत कामावर आहेत. पुरूषांचा भरणा मुख्यतः त्रासन खात्यांत आहे. कपडा खात्यांत अस्पृश्येच्या सबबीवर त्यांना मज्जाव करण्यात येतो. त्रासन खात्यांत पगार अगदीं लहान आणि त्याच्या दुप्पटीचौपटीनें कापड खात्यांत पगार मिळतात हें प्रसिद्धच आहे. बहिष्कृत वर्गातल्या गिरणीकामगारांना सरासरी मानानें दरमहा वीस रूपयांपेक्षा अधिक पगार मिळत नाहीं. अर्थातच् या पगारांतून बचत करणें जवळजवळ अशक्यच असतें. त्रासन खात्यांतल्या कामगारांना दाणेवाल्या व्यापाऱ्याकडून उधारीनें माल मिळत नाहीं. अर्थात् संपात टिकाव काढण्यांचें त्राण त्यांच्या अंगी बिलकूल नसतें. त्यांतहि गेल्या वर्षदीडवर्षातल्या संपामुळें आधिंच नाकींनऊ आलेले आहेत. या वर्गातल्या लोकांना कर्ज काढावयाचें झाल्यास पठाणांखेरीज दुसरा कोणी सावकार सांपडत नाहीं. पठाणाचें कर्ज काढावयाचें म्हणजे दरमहा दर रुपयामागें चार आणे व्याज द्यावयाचें. शिवाय पठाणांच्या कर्जामुळें अब्रुवर केव्हां घाला पडेल याचा नेम नसतो. गिरण्यांत कामावर जाणाऱ्या पुष्कळ बायकांना संपांतली उपासमारी टाळण्यांसाठीं पठाणांचें कर्ज घेण्याचा प्रसंग येतो आणि त्याचे परिणाम पुढें भयंकर होतात. याची यूनियनच्या पुढाऱ्यांना आणि त्यांच्या नादास लागलेल्या कापड खात्यांतल्या भक्कम पगाराच्या इतर हिंदूंना जाणीव नाहीं व जाणीव असली तरी त्याची पर्वा वाटत नाहीं. युनियनपासून कामगारांना दोन पैसे अधिक मिळाले पाहिजेत, त्यांची स्थिती सुधारली पाहिजे, परंतु कम्युनिस्टाच्या--लालबावटेवाला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या यूनियनच्या--पांचवीलाच संप पूजलेला असल्यामुळें गिरणीकामगारांना दोन पैसे अधिक मिळण्यांच्याऐवजी त्यांची सांपत्तिक स्थिति दिवसेंदिवस खालावत आहे. संप केव्हां व कशाकरितां करावयाचा याविषयी कांहीं ताळतंत्रच उरलेला नाहीं हे इतर वर्गातल्या कामगारांना तूर्त कळत नाहीं म्हणून बहिष्कृत वर्गातल्या कामगारांनीं त्यांच्याबरोबर नाचून कसें चालेल ? बहिष्कृत वर्गातल्या कामगारांमधल्या पुष्कळजणांनीं आपली ही स्थिति निवेदन केल्यामुळें डॉ. आंबेडकरांना हा प्रश्न हातीं घेऊन बहिष्कृत वर्गातल्या गिरणीकामगाराचें वाह्यात् चळवळीपासून संरक्षण करणें भाग पडलें आहे.

● ● ●

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. ३ मे १९२९.

३६

चिपळूण येथील सहभोजन

चिपळूणच्या परिषदेच्या वेळी †तेथील रा. बर्वे* वकील यांच्या घरी पूर्वास्पृश्यांसुद्धां सर्व जातीचें सहभोजन झाले. त्याची हकीकत दुसरीकडे दिलीच आहे. मुंबइपुण्यासारख्या शहरांमध्यें अशीं सहभोजनें झालीं तर त्यांचे तेवढेंसें कौतुक न केलें तरी चालेल. परंतु परशुरामक्षेत्र म्हणून नांवाजलेल्या चिपळूणसारख्या एका लहानशा शहरात–कोंकणस्थ ब्राह्मणांच्या बाले किल्ल्यांत आणि खुद्द एका कोंकणस्थ ब्राह्मणाच्या घरीं त्याच्या आमंत्रणावरून असा संस्मरणीय सहभोजन समारंभ व्हावा, हें बदलत्या काळाचें लक्षण नव्हे असें कोण म्हणेल ? रा. बर्वे वकील यांनी चिपळुणसारख्या ठिकांणी समतावादाचें ध्वजारोपण करण्यांचें जें धैर्य दाखविलें त्याबद्दल त्यांना आम्ही मनःपूर्वक धन्यवाद देतों. जातीभेद व अस्पृश्यता याच्या बाबतींतील लोकांचे पूर्वग्रह इतके खोल गेलेले आहेत कीं, त्यांचे उन्मूलन व्हावयाला लोकमताला वेळोवेळी जबर धक्के बसणें अवश्य आहे. ब्राह्मणादि जातींच्या पंक्तीला बसून जेवण्यांत मोक्षप्राप्ति आहे किंवा त्यामुळें बहिष्कृत वर्गांतल्या लोकांना मोठेपणा किंवा धन्यता वाटली पाहिजे असे मुळींच नाहीं. परंतु समतेच्या आड येणारे अडथळे दूर होण्यास अशा सहभोजनांचे सहाय्य होतें, हाच त्यांचा विशेष आहे. समतेच्या प्रस्थापनेनें दलितवर्गाचा भौतिक उद्धार होईल. परंतु वरिष्ठ म्हणविणाऱ्या जातींचा आत्मिक उद्धार होईल. सांप्रत त्यांचा जातिदुराभिमान त्यांच्या आत्मिक उद्धाराच्या आड येत नाहीं असें कोणी म्हणू शकेल काय? व त्यासारखे समाजवीर ठिकठिकाणीं निघतील तर अस्पृश्यता हां हां म्हणतां हद्दपार होईल आणि ब्राह्मणब्राह्मणेतर वादाचेंहि कारण उरणार नाहीं.

●●●

---

†शनिवार, ता.१३ एप्रिल १९२९ रोजी रत्नागिरी जिल्हा बहिष्कृत परिषद आणि रविवार ता. १४ एप्रिल १९२९ रोजी रत्नागिरी जिल्हा शेतकरी परिषद भरली होती. त्या दोन्ही परिषदा चिपळूण येथे भरल्या होत्या. पाहा वृत्तांत भाषण क्रमांक, क्रमशः २५ आणि २६, खंड १८ भाग-१.

*विनायकराव बर्वे वकील.

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. ३ मे १९२९.

३७

शंकराचार्य कीं प्रतिसंकराचार्य

करवीर पीठाचे माजी शंकराचार्य 'डॉ.' कुर्तकोटी हे हिंदुसंघटना व शुद्धि या चळवळींचे पुरस्कर्ते असून परवां सुरत येथें हिंदुमहासभेच्या अधिवेशनाबरोबर भरविण्यांत आलेली शुद्धिपरिषद त्यांच्याच अध्यक्षतेखालीं भरविण्यांत आली होती*. या परिषदेच्या अध्यक्षस्थानावरून भाषण करतांना कुर्तकोटींनीं असें प्रतिपादलें कीं, हिंदुसमाजांत जातिसंकर होऊं नये याकरितां शुद्धिकृतांची एक वेगळी जात करण्यांत यावी. खाशी तोड! बाकी हिंदुसमाज जर जातीभेदाला चिकटून राहणार तर शुद्धिकृत लोक तरी जातिभेद सोडून आपसांत रोटीबेटीव्यवहार करावयाला कां तयार होतील ? म्हणजे जितक्या हिंदुसमाजांत जाती तितक्या शुद्धिकृत मंडळींत निर्माण व्हावयाच्या ! अशा स्थितींत 'शुद्ध' होण्याला तरी कोण तयार होईल? व एकादा वेडा पीर निघाला, तरी तो किती दिवस टिकाव काढू शकेल? अशानें हिंदुसंघटन छान होईल! कुर्तकोटीना शंकराचार्य म्हणवून घेण्याची हौस आहे, परंतु त्यांना 'प्रतिसंकराचार्य' असें म्हणणें विशेष उचित होईल, वाटल्यास 'प्रतिवादी भयंकर' अशी पदवी धारण करणारे एक मठाधीश आहेत. त्यांच्या पदवीच्या चालीवर 'संकर भयंकर' अशी पदवी द्यावी. कुर्तकोटी हिंदुधर्माच्या प्रसारार्थ युरोप अमेरिकेंत जाऊं पहात आहेत म्हणून विजयी मराठ्यानें त्यांना जगद्गुरूच्या ऐवजीं 'जगत् फिरूं' असें म्हणावें म्हणून सुचविलें आहे. आम्ही त्यांत थोडी भर घालून 'संकटभीरु जगत् फिरु' अशी पदवी त्यांना बहाल करतो.

● ● ●

---

*ही परिषद शुक्रवार, ता. २९ मार्च १९२९ रोजी भरली होती.

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. ३ मे १९२९.

३८

जीर्णमतवाद्यांची बेचवदारी

महाड येथील चवदार तळ्याच्या बाबतींत बहिष्कृत वर्गातील लोकांनीं चालविलेल्या लढ्यांत आपल्याला यश येण्याची आशा नाहीं आणि त्या तळ्यावर पाणी भरण्याचा बहिष्कृत वर्गाचा हक्क शाबीत होणार याची खात्री वाटूनच कीं काय तेथील जीर्णमतवादी हिंदूंनीं त्या तळ्यावर बहिष्कार घालण्याचें योजिलें असून आसपासच्या भागांतले सोवळे लोक आपआपल्या आवारांत विहिरी खोदू लागले आहेत अशी बातमी महाड† येथील बातमीदारानें पाठविलेली दुसरीकडे प्रसिद्ध केली आहे. चवदार तळें खाजगी मालकीचें म्हणून ठरविण्याचें प्रयत्न केल्यावर आतां त्या तळ्यावरच बहिष्कार घालून सोवळे हिंदू लोक आपला सोवळेपणा कायम ठेवूं पाहत आहेत, ही पराजयाविषयीं त्यांची कबुलीच समजली पाहिजे. बहिष्कृत वर्गाच्या स्वाधीन सदरील तळें करण्याची त्यांची कल्पना आम्हांस तरी अनिष्ट वाटत नाहीं. धर्मशाळा, देवालयें वगैरेही सार्वजनिक स्थळें त्यांनीं बहिष्कृतांच्या हवालीं केल्यास वाईट नाहीं. बाकी, चवदार तळयाजवळील भागांत विहिरी खणल्यास त्यांना त्याच तलावाच्या पाण्याचे झरे लागतील व पर्यायानें त्याच तलावाचें पाणी सोवळया लोकांच्या पोटांत जाईल. परंतु जीर्णमतवाद्यांचें सोवळें रबराप्रमाणें लवचीक असल्याकारणानें जमिनीच्या फिल्टरमधून आलेलें पाणी सोवळें समजून पिण्यांत त्यांचा धर्म बुडणार नाही ही त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट होय !

●●●

---

†पाहा, परिशिष्ट क्रमांक : ६.

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. ३१ मे १९२९.

३९

गिरणी कामगारांचा संप व ब्राह्मणेतर पत्रें

"मुंबईच्या गिरणी कामगारांच्या सध्यांच्या संपासबंधानें कित्येक ब्राह्मणेतर पत्रांनीं लोकांचा गैरसमज करण्याचा प्रयत्न चालविला आहे. कामगारांनीं संप केला कीं त्याविषयीं सहानुभूति दाखविलीच पाहिजे, मग तो संप दुर्बोधा असो किंवा योग्य कारणास्तव केलेला असो, खुद्द कामगारांचें त्यापासून नुकसान होवो किंवा त्यांचा नफा होवो, अशी या पत्रकारांची समजूत झालेली दिसते. विशेष आश्चर्याची गोष्ट ही कीं, सध्याच्या संपाला अनुकूल नसल्यामुळे जे कामगार कम्युनिस्टांच्या युनियनच्या व्हॉलंटियर्सना न जुमानता कामावर जात आहेत त्याच्यावर जातिविषयक स्वार्थाचा आरोप करण्यापर्यंत एका ब्राह्मणेतर पत्रकाराची मजल गेली आहे ! या खेपेच्या गिरण्यांच्या सार्वजनिक संपाला पहिल्यापासून बहिष्कृत वर्गातील व मुसलमान कामगारांची अनुकूलता नाहीं हें प्रसिद्धच आहे. तथापि मराठे व तत्सम वर्गातलेहि पुष्कळ कामगार सध्याच्या संपाला विरुद्ध असून तेहि कामावर जात आहेत. सुमारें पन्नास गिरण्यांत कामावर जाणारे पन्नास हजार लोक सर्वच मुसलमान किंवा महार-चांभार नाहींत. बेजबाबदार लोकांनीं चुकांवर चुका व घोडचुका करून सार्वत्रिक संपाची पाळी निष्कारण आणावी, सर्व कामगारांनीं मेंढराप्रमाणें त्यांच्या संपात सामील व्हावें आणि त्यांनीं मिळून आपलें भयंकर नुकसान करून घ्यावें हा न्याय कोठला ? एकमेकांच्या गळ्याला मिठी मारून सर्वांनीं संपाच्या समुद्रांत जीव दिला तरच ती कामगारवर्गाची चळवळ अशी या पत्रकारांची समजूत आहे काय ? कम्युनिस्टांची कामगार चळवळ ही खरी कामगार चळवळ नसून राज्यक्रांतीच्या उद्देशाच्या सिद्ध्यर्थ तें एक साधन आहे. सध्यांच्या संपाचें समर्थन करूं पाहणाऱ्या ब्राह्मणेतर पत्रकारांना राज्यक्रांतीचें ध्येय मान्य आहे काय ? कम्युनिस्टांचीं मतं कबूल आहेत काय ? पोटापाण्यासाठीं जर झगडा असता तर बहिष्कृत वर्गातील व मुसलमान कामगार यापूर्वीच्या सर्व संपांत जसे सामील झाले होते तसे याहि संपांत सामील झाले असते. गेल्या वर्षा दीड वर्षात कम्युनिस्टांच्या चळवळीमुळें मुंबईच्या गिरणी कामगारांचें किती नुकसान झालें याची या ब्राह्मणेतर पत्रकारांना कल्पना तरी आहे काय ? उपासमारी, दंगे, मारामाऱ्या, फौजदारी खटले वगैरे अनेक आपत्ति कामगारांवर आल्या. त्यांतून डोकें वर काढण्यास त्यांना

वेळ मिळाला न मिळाला इतक्यात या सार्वत्रिक संपाची धाड आली. ज्याना राज्यक्रांतीची चळवळ मान्य नाही आणि कामगार वर्गाची सर्व बाजूंनीं सुधारणा व्हावी अशी इच्छा आहे त्या लोकांनीं या प्रसंगीं कांहीं हालचाल न करतां, आत्मघातकी धोरणाला विरोध न करतां, कम्युनिस्ट पुढाऱ्याना यथेच्छ धुडगूस घालूं द्यावा, कामगारांचें होत असलेलें भयंकर नुकसान उघड्या डोळ्यांनीं पाहावें, अशी या ब्राह्मणेतर पत्रकारांची अपेक्षा होती काय ? कामगारवर्गाला निराशेनें बेफाम बनविणें हें क्रान्तिवादाच्या दृष्टीनें युक्त असेल, परंतु देशावरील व कोंकणांतील शेतकऱ्यांना मुंबईच्या गिरण्यांतल्या मजुरीचा भाग मिळून होणारें साहाय्य बंद पडावें, कामगार व शेतकरी वर्गाचा कर्जबाजारीपणा वाढावा, सावकार व खोत यांच्या हातांत ब्राह्मणेतरांची शेंडी अधिक सांपडावी आणि मराठे वगैरे लोकांना कर्जबाजारीपणामुळें, थोडीशी शिल्लक राहिलेली जमीनहि गहाण विक्रीत करण्याचा प्रसंग यावा, हें या ब्राह्मणेतर पत्रकारांना इष्ट आहे काय ? बेळगांवांत किंवा पुण्यांत बसून मुंबईच्या गिरणी कामगारांविषयीं छापील पद्धतीची सहानुभूति दाखविण्याचा मार्ग सोडून मुंबईला येऊन हे मराठे पत्रकार आपल्या जातिबांधवांच्या स्थितीची चौकशी करतील तर त्यांना वस्तुस्थिती कळून येईल. विशेष आश्चर्याची गोष्ट ही कीं, यांना ब्राह्मणांचा वास कोठेंच खपत नाहीं, परंतु कम्युनिस्ट ब्राह्मणांनीं यांच्या जातभाईंना भुरळ घालून त्यांचा पुढारीपणा बळकावला व त्यांचा वाटेल तसा उपयोग केला तरी तिकडे यांचे लक्ष गेलें नाहीं ! बरें हे स्वतः कम्युनिस्ट आहेत म्हणावें तर तसेंहि हे सांगत

कम्युनिझम हे भांडवलशाहीच्या विरोधातील एक मत आहे. सर्व मालमत्ता ही राष्ट्राची मालमत्ता असावी, प्रत्येकाला त्याच्या गरजेप्रमाणे उदरपोषणाचा मानवी हक्क म्हणून मोबदला मिळावा. त्यासाठी त्याची कर्तबगारी अगर जनसेवा लक्षात घेण्याची गरज नाही. प्रत्येकाने राष्ट्राकरिता आपली सर्व शक्ती वेचावी व त्याबद्दल त्याला मजुरी न देता अन्नवस्त्र पुरेसे मिळेल अशी व्यवस्था करावी हे कम्युनिझमचे मत आहे. मजुरांच्या तंत्राने चालणारे राज्य असावे व समता ही सर्व स्तरात असावी हा आग्रह कम्युनिझमला पूर्णतः मान्य आहे आणि म्हणून क्रांतीचा मार्ग हा जास्त सोयीस्कर वाटतो.

ट्रेड युनियन किंवा कामगारसंघ हे एक कामगार व इतर मजूर यांच्या हितसंबंधाची दाद मालकवर्गाकडे लावण्याकरिता स्थापन झालेल्या संस्थांचे नाव आहे. या संस्था मजुरांना भरपूर पगार, कामाचे कमी तास व इतर अनेक प्रकारचे फायदे मिळवून देण्याचा प्रयत्न करतात. मालकमजुरांमधील नोकरीचे करार व्यक्तिशः न करता संघशः करावे व त्या करारांचा फायदा सभासद नसलेल्या मजुरांनाही मिळावा असा या संस्थांचा उद्देश असतो. शाब्दिक वाटाघाटींना यश आले नाही तर संप करणे हे साधन या संस्था उपयोगात आणतात.

नाहींत ! कम्युनिझम् (Communism) व कामगार संघांची चळवळ (The Trade Union movement) हीं एक नव्हत, हें त्यांनीं कृपा करून लक्षात ठेवावें. आम्हाला कामगारसंघाची चळवळ अवश्य पाहिजे आहे, भांडवलशाहीशी कामगारांच्या वतीनें झगडण्याची आवश्यकताहि आम्हांला पूर्णपणें मान्य आहे इतकेच नव्हे तर संप हें सुद्धा कामगारांचें एक कायदेशीर शस्त्र आहे असेंहि आम्ही समजतों. परंतु त्या शस्त्राचा जपून व योग्य वेळींच उपयोग करावयाचा असतो. ''

* : प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. ३ मे १९२९.

४०

नाक दाबल्याशिवाय तोंड उघडत नाहीं तें असें !

वऱ्हाडांतील जळगांव येथील सुमारें पांच हजार महार लोकांनीं थोड्या दिवसांपूर्वी एक जाहीर नोटीस प्रसिद्ध करून, हिंदुसमाजानें आपली अस्पृश्यता ठरीव मुदतीच्या आंत काढून टाकली नाहीं तर आपण परधर्माचा स्वीकार करूं म्हणजे मुसलमान किंवा ख्रिश्ती होऊं, असे जाहीर केले होतें. ही नोटीस त्यावेळी आम्हीं आमच्या पत्रांत प्रसिद्ध करून त्या विषयावर एक अग्रलेखही लिहिला होता. जळगांवच्या महार लोकांचा हा जाहीरनामा म्हणजे नुसती एक पोकळ धमकी आहे असें ब्राह्मणी पत्रानींच नव्हे तर ब्राह्मणेतर चळवळीत भाग घेणाऱ्या रा. जयराम नाना वैद्यासारख्यांनींही मत देऊन ती बाब थट्टेवर नेण्याचा प्रयत्न केला होता. परंतु जळगांवच्या महारसमाजाचे पुढारी थट्टा करावयास बसले नव्हते. त्यांचा पक्का निर्धार झालेला होता. आज शेंकडो हजारों वर्षे चालत आलेली गुलामगिरी त्यांना नाहींशी करावयाची होती आणि त्याकरितां आगाऊ पूर्ण विचार करून आणि आपल्या पूर्वजांच्या धर्माला, त्यांच्यात सामाजिक विषमतेला व अन्यायाला आळा घालण्याचें सामर्थ्य नाही असें सिद्ध झाल्यावरून, मोठ्या कष्टानें कां होईना कायमचा रामराम ठोकण्याची आपल्या मनाची पुरी तयारी करूनच ते वरील आव्हान द्यावयास सिद्ध झाले होते. त्यांचें आव्हान पोकळ धमकी नव्हती, थट्टा नव्हती, पोरखेळ नव्हता ; मात्र स्पृश्य वर्गांतल्या लोकांनी त्यांची थट्टा करून व त्यांच्याशी पोरखेळ करून त्यांच्या न्याय्य मागण्यांना वाटाण्याच्या अक्षता लावण्याचा प्रयत्न केला होता. वरील आव्हान प्रसिद्ध झालें तेव्हां स्थानिक स्पृश्यांच्या पुढाऱ्यांनीं महार मंडळीस पेंच घालण्याच्या उद्देशानें असा जबाब दिला कीं, तुम्हां अस्पृश्यांत वेगवेगळ्या जाती असून त्या एकमेकांचा विटाळ मानतात, एकमेकांना उच्चनीच लेखतात. तरी प्रथम तुम्ही आपसातला स्पर्शास्पर्श भेद काढून टाका, आपल्यांतली विषमता दूर करा, आणि मग आम्ही तुमची अस्पृश्यता नाहींशी करूं आणि तुम्ही जे हक्क मागत आहां ते कबूल करूं. परंतु स्पृश्य म्हणविणाऱ्या

सोवळ्या हिंदूंचा लपंडाव

जळगांवच्या महार पुढाऱ्यांनी तत्काळ ओळखला. ' न करत्याचा वार शनिवार ' या म्हणीप्रमाणे वरिष्ठ वर्णीय म्हणविणाऱ्या हिंदूंची ही सबब आहे, त्यांना मनापासून

अस्पृश्यतेचा नायनाट करण्याची इच्छा नाहीं, हे जळगांवच्या बहिष्कृत वर्गाच्या पुढाऱ्यांना पक्कें ठावूक होते. शिवाय, स्वतःच्या समाजांतलें भेदाभेद त्यांना नकोच होते, आपसांतली विषमता त्यांना नकोच होती, इतकेंच नव्हे तर आपसांत विटाळ किंवा जातिभेद पाळणें त्यांना मान्यच नव्हतें. अर्थात् त्यांनी स्पृश्यवर्गीयांचें उलट आव्हान आनंदानें स्वीकारलें. त्यांनी बहिष्कृत वर्गांतल्या महार, मांग, चांभार, भंगी वगैरे सर्व जातींची सहभोजनें घडवून आणून बहिष्कृत वर्गांतले लोक आपसात विटाळ मानींत नाहींत किंवा सामाजिक विषमतेला थारा देत नाहींत हें सोवळ्या हिंदू लोकांच्या प्रत्ययाला आणून दिलें. सोवळ्या हिंदू लोकांना वाटलें होतें की, बहिष्कृत वर्गांतल्या लोकांना आपसांतला भेदाभेद मोडण्याच्या कामीं यश येणार नाहीं आणि तसें झालें म्हणजे आपोआप. धर्मांतराची धमकी देणाऱ्यांचीं तोंडें बंद होतील. परंतु सोवळ्या लोकांच्या दुर्दैवानें त्यांनीं घातलेला

पेंच फुकट गेला !

तोडीला तोड मिळाली आणि सोवळ्या लोकांच्या अंगावर त्यांचाच डाव उलटला. तेव्हां ते पुनः अळम् टळम् करूं लागले. या सुमारास डॉ. आंबेडकर हे त्या बाजूस गेले, होते व जळगांवच्या महार मंडळीनें त्यांचा सल्ला विचारला. धर्मांतर केल्याशिवाय अस्पृश्यता दूर करवून घेण्याचा मार्ग कठीण आहे, त्या मार्गानें जाण्यास जो सोशिकपणा पाहिजे तो ज्याच्या अंगी नसेल त्यानी धर्मांतर करण्याच्या विरूद्ध आपण नाहीं. अस्पृश्यतेच्या उच्चाटनाचा प्रश्न ज्याला जसा सोडवितां येईल तसा सोडवावा, असें डॉ. आंबेडकर यांनी स्पष्ट सांगितलें व " बहिष्कृत भारता " मध्ये जळगांवच्या महार मंडळीच्या जाहीरनाम्यावरील अग्रलेखांतही तसेंच त्यांनीं पूर्वी प्रतिपादिलें होतें. सोवळे हिंदुलोक अस्पृश्यता दूर करण्यास तयार नाहींत असें दिसून आल्यावर जाहीरनाम्यांतली मुदत पुरी झाली तेव्हा सुरवात म्हणून जळगांवच्या

बारा महारांनी मुसलमानी धर्म स्वीकारला !

आणि त्याच्या मागोमाग आणखीं शेंकडों हजारों लोक हाच मार्ग स्वीकारणार होते. बारा महारांनीं धर्मांतर केल्याबरोबर सोवळ्या हिंदु लोकांचें डोळे खाडकन उघडले. जाहीरनाम्यांतील धमकी पोकळ नाहीं याविषयीं त्यांची खात्री होऊन चुकली, आतां हजारों अस्पृश्य मुसलमान किंवा खिस्ती होणार, विशेषतः मुसलमान होणार आणि त्यामुळे हिंदूचें संख्याबल कमी होऊन मुसलमानांचे संख्याबल वाढणार, मुसलमान झालेले अस्पृश्य आपल्या छातीवर बसून स्वतःचे मानवी हक्क प्राप्त करून घेणार या विचारानें सोवळ्या लोकांचे धाबे दणाणून

गेले ! जे महार वगैरे अस्पृश्य मानलेले लोक स्वतःला देवळांत जाण्यास मनाई असली तरी आपल्या धर्माची देवळें म्हणून त्यांचे संरक्षण करण्यास आतापर्यंत जिवावर उदार होऊन लढत आले ; तेच लोक आपल्या धर्माचे दुश्मन होणार, कदाचित धार्मिक कलहांमध्यें इतर मुसलमानांना देवळे फोडण्यास किंवा भ्रष्ट करण्यास मदत करणार, या भीतिप्रद विचारांचे काजवे पुराणमतवादी हिंदूंच्या डोळ्यांसमोर चमकू लागले. जे सोवळें व तोतये हिंदुसंघटनवादी लोक जळगांवच्या बहिष्कृत लोकांना मोठ्या तोन्याने म्हणत होते, " जा खुशाल परधर्मात जा ; खिस्ती व्हा नाहीं तर मुसलमान व्हा. आमचे तुमच्यावाचून कांहीं अडलेलें नाहीं ; ' महार मेला आणि विटाळ गेला ' ही म्हण आमच्यात आहेच, " तेच लोक जेव्हा जळगावच्या बहिष्कृतांनीं खरोखरच धर्मांतराची सुरवात करून दाखविली तेव्हां एकदम नरम आले ! बारा महारांच्या धर्मांतरानें हिंदुसमाजांत भयंकर खळबळ उडून गेली आणि आतां कांहींही करून हा धर्मांतराचा प्रवाह येथेंच थांबविला पाहिजे असें सोवळ्या लोकांना वाटूं लागलें. तडजोडीची बोलणी सुरू झाली आणि सोवळ्या लोकांनीं अस्पृश्यांच्या उपयोगासाठीं दोन सार्वजनिक विहिरी खुल्या केल्या, इतकेच नव्हे तर तिघां गृहस्थांच्या घरी बहिष्कृतांच्या पुढाऱ्यांना मुद्दाम पानसुपारीसाठी बोलावण्यांत आलें आणि त्यावेळी स्पर्शास्पर्शाचे निर्बंध पाळण्यांत आले नाहींत. अशा रीतीनें जळगांवच्या बहिष्कृत पुढाऱ्यांनी स्वतःच्या

खंबीरपणाने जय संपादिला

त्यांच्या या यशाबद्दल आम्ही त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करितो. विजयश्री नेहमी शूरांच्या गळ्यांत माळ घालते, हें इतर ठिकाणच्या बहिष्कृतानी पूर्णपणे लक्षात ठेवलें पाहिजे. धमकी द्यावयाची तर कधीही पोकळ देऊं नये, अगोदर विचार करून व मनाची पक्की तयारी करूनच धमकी द्यावी. जळगांवच्या बहिष्कृत पुढाऱ्यांनी धमकीची अंमलबजावणी करून सर्व बहिष्कृत वर्गाची पत राखली. नाहीं पेक्षां धर्मांतराची धमकी म्हणजे सोंवळ्या हिंदू लोकांमध्यें एक थट्टेचा विषय झाला असता आणि अस्पृश्यता निर्मूलनाचे काम आणखी कांहीं वर्षे लांबणीवर पडले असतें. या करिता बहिष्कृत वर्गातल्या लोकांना आमची अशी सूचना आहे कीं जळगावचा कित्ता गिरवावयाचा असेल तर, पोकळ धमकीनें साधलें तर पाहावें असा विचार करून मात्र धर्मांतराची धमकी देऊं नये. बहिष्कृत वर्गांतले लोक बोलतील त्याप्रमाणें करतील अशी पुराणमताभिमानी हिंदू लोकांची खात्री होऊन चुकली पाहिजे, आपल्या धमकीचा अचूक परिणाम झाला पाहिजे तर जळगांवच्या मंडळीप्रमाणे मनाचा पूर्ण निर्धार करूनच धमकी दिली पाहिजे. जळगांवच्या

मंडळीला जो जय मिळाला, सोवळ्या हिंदू लोकांनीं नमतें घेऊन तडजोडीच्या बोलण्यास सुरवात करून बहिष्कृत वर्गातल्या लोकांवर आजपर्यंत चालत आलेल्या अन्यायाची जी अप्रत्यक्ष कबुली दिली, त्यामुळे सर्व बहिष्कृत वर्गीयांना साभिमान समाधान वाटणें स्वाभाविक आहे. बारा महार मुसलमान झाल्यावर दोन सार्वजनिक विहिरी पूर्वास्पृश्यांच्या उपयोगासाठी खुल्या करून देण्यांत आल्या आणि तीन वरिष्ठवर्णीय हिंदू लोकांच्या घरांत स्पर्शास्पर्श न पाळतां पूर्वास्पृश्यांच्या पुढाऱ्यांना पानसुपारीला बोलावून त्यांचा सन्मान करण्यात आला ; ह्याच गोष्टी जर अगोदरच आपखुषीने, धमकी देण्याचा व तिची अंमलबजावणी करण्याचा प्रसंग न आणता, करण्यात आल्या असत्या तर वरिष्ठ जातीय म्हणविणाऱ्या हिंदूंच्या

मनाचा मोठेपणा व बुद्धीचा समंजसपणा

दिसून आला असता, कदाचित जळगांवच्या वरीष्ठ वर्णीय म्हणविणाऱ्या लोकांमध्यें थोडे खरोखच मनाचे थोर, समतावादी, न्यायप्रिय लोक असतील, परंतु त्यांच्या मताला इतर सोवळ्या लोकांनी मान देण्याची तयारी बहिष्कृतांची धमकी अंमलांत येईपर्यंत दाखविलीं नाहीं ही गोष्ट निर्विवाद खरी आहे. हिंदुसमाजाचा हा मोठा अधःपात आहे असें आम्ही समजतों. हा लवचिकपणा आहे व याच्यामुळेंच आतापर्यंत हिंदुसमाज टिकला व यापुढें टिकेल असें जे कोणी म्हणणार असतील ते म्हणोत परंतु आम्ही तरी हा त्यांचा अधःपातच समजतों. जळगांवच्या सोवळ्या लोकांनीं केलेली तडजोड म्हणजे जबरीचा रामराम होय. मुसलमानी व ख्रिस्ती हे धर्म हिंदुस्थानांत नसतें, हिंदुसमाजापुढें आपल्या संख्याबलाचा प्रश्न नसता, तर अस्पृश्यांची काय स्थिती झाली असती, त्यांना आपल्यावरील अस्पृश्यता घालविणें किती कठीण झालें असतें, स्वतःच्या उन्नतीप्रीत्यर्थ प्रयत्न केल्याबद्दल त्यांना आणखी किती अनन्वित छळ सोसावा लागला असता, हा विचार अशा प्रसंगी मनात आल्याखेरीज राहात नाहीं. हिंदुसमाजाची स्पर्शास्पर्शविषयक समजुतीवर जर खरोखरच श्रद्धा असती तर बाराच्याऐवजीं बाराशें, बारा हजार किंवा बारा लाख अस्पृश्य मुसलमान झाले असते म्हणून त्यानें कधींही नमतें घेतलें नसतें. आणि जर त्याला खरोखरच न्यायाची, समतेची व माणुसकीची चाड असती तर त्यानें अस्पृश्यावरील सामाजिक अन्याय दूर करण्याकरिता, धर्मांतराची धमकी मिळेपर्यंत व ती अंशतः अंमलांत येईपर्यंत कधीही वाट पाहिली नसती. जोपर्यंत बहिष्कृतांना चिरडतां येईल तोंपर्यंत चिरडावें, जोपर्यंत त्यांच्यावरील अन्याय खपून जात असेल तोपर्यंत तो खपू द्यावा, जोंपर्यंत जोराचा प्रतिकार होत नसेल तोपर्यंत खुशाल जुलूम करावा, जोंपर्यंत न्याय देण्याच्या

बाबतींत सुरक्षितपणें टाळाटाळी करता येत असेल तोंपर्यंत डोळे मिटून खुशाल टाळाटाळी करावी, जोपर्यंत उपहास करून बहिष्कृतांच्या चळवळीला लघुत्व देता येईल तोपर्यंत लघुत्व द्यावें, जोंपर्यंत बहिष्कृतांच्या अज्ञानाचा व संघटनेच्या अभावाचा फायदा घेतां येईल तोंपर्यंत तो घ्यावा, आणि बहिष्कृतांनीं नाक दाबलेच तर तोंड उघडावे आणि आपला धर्म व आपला समाज लवचीक आहे म्हणून बढाई मारावी. हें धोरण म्हणजे हिंदुसमाजाच्या मुर्दाडपणाचें लक्षण आहे. अशा मुर्दाडपणानें जगण्यात कोणत्याही समाजाला भूषण नाही. 'काकोऽपि जीवति चिराय बलिच भुंक्ते' या वचनाप्रमाणें, कावळ्यांचे हजार वर्षे जगणे व हिंदुसमाजाचें हे हजारों वर्षे जगणें सारखेंच आहे !

● ● ●

अग्रलेख : बहिष्कृत भारत, ता. २१ जून १९२९.

४१

देव आड येतो काय ?

जळगांव येथील बारा महारांनीं इस्लामचा स्वीकार केल्याबरोबर तेथल्या जीर्णमतवाद्यांचे डोळे उघडले आणि त्यांनीं दोन सार्वजनिक विहीरी बहिष्कृतांच्या उपयोगासाठी मोकळ्या करून दिल्या आणि तीन वरिष्ठवर्णीय हिंदूंच्या घरीं बहिष्कृत वर्गाच्या पुढाऱ्यांना पानसुपारीसाठीं जाहीर रीतीनें बोलवण्यांत आलें ही हकीकत आजच्या अग्रलेखांत* दिलीच आहे. परंतु तेवढ्यानें अस्पृश्यता निवारणाचा तेथला प्रश्न पूर्णपणें सुटलेला नाहीं. देवालयामध्यें पूर्वास्पृश्यांना जाऊं देण्यास तेथील जीर्णमतवादी लोक अद्यापि कबूल होत नाहींत असें समजतें. तें खरें असल्यास देवालयांत बहिष्कृतांना मज्जाव करणाऱ्या लोकांची त्यांच्या बुद्धिदौर्बल्याबद्दल कींव करावी किंवा त्यांना धूर्त म्हणावें, तें आम्हांस समजत नाहीं. बहिष्कृत वर्गातले लोक जर हिंदू राहिले पाहिजेत तर त्यांना इतर हिंदुच्या बरोबरीनें सार्वजनिक हिंदुदेवालयें मुक्तद्वार असलीं पाहिजेत. कोणाच्या खासगी देवघरांत शिरण्याची बहिष्कृतांची इच्छा नाहीं. परंतु सार्वजनिक हिंदु देवालयामध्यें कोणाहि हिंदूना कां मज्जाव असावा ? सार्वजनिक विहीरींवर बहिष्कृतांनीं इतरांबरोबर पाणी भरण्यास जर हरकत नाहीं अथवा त्यांना आपल्या घरीं जाहीर रीत्या पानसुपारीस बोलावल्यानें व त्यांच्यांत मिसळल्यानें जर जीर्णमतवाद्यांच्या सोवळ्याची घडी बिघडत नाहीं, तर केवळ सार्वजनिक हिंदु देवालयांच्याच बाबतींत बहिष्कृतांना आडकाडी ठेवण्यास कांहीं कारण दाखवितां येईल काय ? जळगांवच्या सोवळ्या हिंदूंना स्वतःला विटाळ बाधण्याची भीति आतां वाटत नसून फक्त देवळांतले देव विटाळले जातील अशी भीति वाटते असें समजावयाचें काय ? खरें पाहिलें असतां देवाला कोणाच्याच व कसल्याच विटाळाची भीति नाहीं. देव जसा ब्राह्मणादि हिंदूंचा आहे तसाच तो बहिष्कृतांचाहि आहे. बहिष्कृतांच्या स्पर्शानें जर देवळांत जाणाऱ्या इतर हिंदूंना विटाळ होत नाहीं तर देवांच्या मूर्तीला विटाळ कां बाधावा ? स्वतःच्या घरांत अस्पृश्यता पाळावयाची नाहीं, देवळांत मात्र पाळावयाची हा खरोखरच उलटा न्याय, समजला पाहिजे. एक तर जीर्णमतवाद्यांचा नेहमींच्या अप्रयोजकपणाचा हा एक भाग असला पाहिजे किंवा बहिष्कृतांना विहिरींवर पाणी भरूं देणें व त्यांना आपल्या घरीं पानसुपारीस बोलावणें हे त्यांच्या डोळ्यांना पाणी लावून त्यांचें

---

* पाहा, अग्रलेख क्रमांक ४०.

तात्पुरतें समाधान करण्याचे डाव तरी असले पाहिजेत. ज्या दोन सार्वजनिक विहिरी अस्पृश्यांसाठी खुल्या करण्यांत आल्या आहेत त्यांच्यावर बाकीच्या हिंदूंना बिनबोभाट बहिष्कार घालून आपल्या पाण्याची सोय दुसऱ्या खाजगी किंवा सार्वजनिक विहिरीवर करावयाची असा तर डाव नसेल ना ? पानसुपारीची गोष्ट ज्या त्या व्यक्तीच्या खुषीची असल्यामुळें अस्पृश्यांना समारंभांच्या वेळीं आपल्या घरीं बोलावून त्यांना स्पर्शास्पर्श सोडून वागविण्यास बांधलेला आहे. बहिष्कृतांचें समाधान झालें म्हणजे हळूच पूर्वीचा स्पृश्यास्पृश्य भेद कायम ठेवायवाचा. ज्यांनीं बहिष्कृतांना परवां आपल्या घरीं पानसुपारीस बोलावले त्यांना हळूच प्रायश्चित घेउन मोकळें होता येईल आणि कदाचित त्याच वेळी पानसुपारीस हजर असलेल्या गृहस्थांनीं स्नान करुन आपलीं जानवीं बदललेलींहि असतील ! देवळांची गोष्ट तशी नाहीं. देवळांत बहिष्कृतांनीं जाण्याचा पायंडा पडला म्हणजे विटाळाची ब्याद कायमची मागें लागेल व अखेरीस विटाळाची कल्पनाच सोडून देणें भाग पडेल. अर्थात, जळगांव येथील विशिष्ट परिस्थितीचा विचार करतां, देवळांच्या बाबतींत बहिष्कृतावरील बहिष्कार कायम ठेवूं पाहणें हा शुद्ध अप्रयोजकपणा तरी असला पाहिजे किंवा धूर्तपणा तरी असला पाहिजे ; तिसरें अनुमान शक्य नाहीं.

● ● ●

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. २१ जून १९२९.

४२

मजूरपक्षाचें मंत्रिमंडळ

आतांपर्यंत गेलीं पांच वर्षे इंग्लंडांत कॉन्झरवेटिव पक्ष अधिकारारूढ होता. नियमाप्रमाणें पार्लमेंटची साधारण निवडणूक नुकतीच झाली व या निवडणुकीत कॉन्झरवेटिव पक्षाचा पराभव होऊन मजूरपक्षाचे सर्वांत अधिक सभासद निवडून आले. अर्थात कॉन्झरवेटिव पक्षाच्या मंत्रिमंडळाला राजीनामा देऊन मजूरपक्षाच्या मंत्रिमंडळासाठीं जागा मोकळ्या करून देणें भाग पडलें. आतां मि. रॅम्सेमॅकडोनल्ड यांच्या प्रमुखत्वाखाली ब्रिटनचें नवीन मंत्रिमंडळ स्थापित झाले आहे. मजूरपक्ष अधिकारारूढ झाल्याची ही दुसरी खेप होय. मजूरपक्षाचें पहिलें मंत्रिमंडळ १९२४ सालीं अस्तित्वांत आलें होतें. परंतु त्या पक्षाच्या सभासदांचें संख्याधिक्य पार्लमेंटमध्यें असावें तितकें नसल्यामुळें त्या मंत्रीमंडळाला भीतभीतच आपले काम चालवावें लागलें व इतकें करूनही शेवटीं त्याची कारकीर्द अल्पायुषीं ठरली. या खेपेसहि पार्लमेंटमध्यें मजूरपक्षाच्या सभासदांची संख्या कॉन्झरवेटिव व लिबरल यांपैकीं कोणत्याही एका पक्षाच्या सभासदापेक्षां जास्त असली, लिबरलपक्षापेक्षां फारच मोठी असली तरी कॉन्झरवेटीव व लिबरल हे दोन पक्ष मजूरपक्षाच्या विरुद्ध एक झाल्यास मजूर-पक्षाचा पार्लमेंटमध्यें पराभव होऊं शकेल. कॉन्झरवेटिव पक्ष उघडपणें भांडवलशाही, जमीनदारशाही व साम्राज्यवाद यांचा कट्टा पुरस्कर्ता आहे आणि लिबरल पक्ष त्या पक्षाच्या विरुद्ध असला तरी तो भांडवलशाही, जमीनदारशाही व साम्राज्यवाद यांचा पक्षपाती आहे. मजूरपक्षाच्या सोशियालिस्ट मतांची अंमलबजावणी धडाडीनें होऊं लागली तर तें त्याला केव्हांहि खपणार नाहीं आणि तसाच प्रसंग आल्यास तो कॉन्झरवेटिव पक्षाला मिळण्यासहि कमी करणार नाहीं. अर्थात या खेपेसहि मजूरपक्षाच्या मंत्रिमंडळाची शाश्वती नाहीं. त्याला जपून जपूनच आपलें काम चालवावें लागणार आहे. मजूरपक्षाची कारकीर्द शक्य तितक्या लवकर संपुष्टांत आणण्यासाठीं भांडवलशाहीचे पुरस्कर्ते आपली पराकाष्टा करितील हें स्पष्ट आहे. खरा लढा कॉन्झर्वेटिव व मजूर या पक्षांमध्यें असून लिबरल पक्ष हा मध्यंतरींच्या काळाचा अवशेष आहे. जोंपर्यंत मजूरपक्ष अस्तित्वांत येऊन बचावला नव्हता तोंपर्यंत लिबरल पक्षाच्या अस्तित्वाला सबब होती, त्यांच्या अस्तित्वाची आवश्यकता होती. आता लिबरल पक्षाच्या अस्तित्वाची कांहीं आवश्यकता राहिलेली नाहीं. त्याच्या आयुष्याला झपाट्यानें ओहोटी

लागली आहे. त्या पक्षांतील होतकरू व तडफदार लोक एका मागून एक याप्रमाणें कोणी मजूरपक्षास तर कोणी कॉन्झर्वेटिव पक्षास मिळत आहेत. लिबरल पक्षाला या पुढें केव्हांतरी अधिकारारूढ होण्याची आशा आतां बिलकूल राहिलेली नाहीं मात्र सध्यां त्याच्या अंगीं विघातक शक्ति आहे. कारण विरुद्ध पक्षाला मिळून अधिकारारूढ पक्षाला अधिकारच्युत करण्याची किल्ली त्याच्या हाती आहे. त्यामुळें मजूर पक्षाच्या मंत्रीमंडळाला तारेवर कसरत करण्याप्रमाणें आपल्या राज्यकारभाराचा तोल सांभाळणें भाग आहे.

मजूर पक्षाचें राजकारण.

मजूर पक्षाचें राजकारण बव्हंशी समाजसत्तावादी आहे. देशांतील उद्योगधंदे समाजाच्या मालकीचे असावे, भांडवलशाहीच्या हाती सत्ता राहूं नये, भांडवलशाही नाहीशी करून तिच्या जागीं खरी लोकसत्ता स्थापन करावी, बेकारी नाहींशी करून ज्यांना काम देतां येत नसेल त्यांच्या उदर निर्वाहाची तरतूद करावी, देशांतल्या प्रत्येक व्यक्तीला स्वतःची उन्नति करण्यास व कर्तबगारी दाखविण्यास पूर्ण संधि देण्यांत यावी, असे मजूर पक्षांचें स्वदेशाच्या बाबतीत धोरण असून जगांत शांतता नांदविणें, युद्ध होऊं न देणें, प्रत्येक देशाचें स्वातंत्र्य कबूल करणें आणि जगांतील सर्व जनतेचे हितसंबंध एकरूप करणे असे परराष्ट्रीय धोरण आहे. तथापि इंग्लंडांतील मजूरपक्ष क्रांतिवादी नाहीं. कम्युनिस्ट पक्षाच्या क्रांतिवादाला तो विरूद्ध असून मजूरपक्ष व कामगारसंघ यांमधून कम्युनिस्टांची हकालपट्टी करण्यांत आली आहे. आपलें ध्येय साधावयाचें, परंतु क्रमाक्रमानें तें गाठावयाचें; त्याकरितां जालीम उपाय, अत्याचार व रक्तपात यांचा उपयोग करावयाचा नाहीं, सनदशीर मार्गानें लोकमत आपल्या बाजूचें करून आपल्याला इष्ट असतील त्या सुधारणा घडवून आणावयाच्या, असें मजूरपक्षाचें धोरण आहे. इंग्लंडच्या मजूरपक्षांत फेनर ब्रॉक्वेसारखे जहाल स्पष्टवादी पुढारी आहेत, तसेच टॉमस टर्नर यांच्यासारखे अगदीं मवाळ व जुन्या मुत्सुद्दीगिरीला अनुसरणारेहि पुढारी आहेत.

हिंदुस्थानच्या बाबतींत धोरण.

मजूरपक्षाच्या मंत्रिमंडळाचें धोरण हिंदुस्थानाच्या बाबतींत कशाप्रकारचें असेल हा प्रश्न यावेळीं मनांत येणें स्वाभाविक आहे. वर सांगितल्याप्रमाणें मजूरपक्षाच्या मंत्रिमंडळाच्या आयुष्याची दोरी लिबरल पक्षाच्या हातीं आहे. स्वतःच्या देशांतील कामगारवर्गासंबंधाचें इतकें निकडीचें प्रश्न त्याच्यापुढें आहेत कीं ते सोडवितांना त्याला पुरेवाट होईल. ते प्रश्न सोडविण्याच्या बाबतींतहि त्याला तेथल्या कामगारवर्गाचें पूर्ण समाधान करणें शक्य नाहीं.

त्या ब्रिटनमध्यें खाणींतल्या कामगारासंबंधाचा प्रश्न अत्यंत निकडीचा आहे आणि सध्याच्या पार्लमेंटमध्यें खाणींतल्या कामगारांचे पुष्कळ प्रतिनिधि निवडून आलेले आहेत. तथापि त्या प्रश्नाचा स्वतःच्या मनाप्रमाणें निकाल लावणें व खाणींतल्या कामगारांचें पुरेसे समाधान करणें मजूर पक्षाच्या मंडळाला शक्य नाहीं, असें एव्हांपासूनच मजूर पक्षाचे पुढारी म्हणूं लागले आहेत. खुद्द इंग्लंडांतल्या कामगारवर्गाच्या बाबतींत जर ही स्थिती तर हिंदुस्थानच्या बाबतींत अशा आशेला फारशी जागा नाहीं हें सांगावयास नकोच. कॉन्झर्वेटिव पक्षाच्या मंत्रिमंडळापेक्षा थोड्या अधिक सहानुभूतीनें मजूर पक्षाचे मंत्रिमंडळ हिंदुस्थानकडे पाहील हें मात्र खरें आहे. कामगार वर्ग व अन्याय पीडित अस्पृश्य वर्ग यांच्या संबंधाने केव्हांहि मजूर पक्षाच्या मंत्रिमंडळाला कॉन्झर्वेटिव किंवा लिबरल पक्षाच्या मंत्रिमंडळाला वाटेल त्या पेक्षा अधिक सहानुभूती वाटावी हें स्वाभाविक होय.

● ● ●

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. २१ जून १९२९.

४३

ब्राह्मण-आदिद्रविड विवाह

मद्रास येथें ता. १० जून रोजीं भिन्नजातीय वधुवरांचा एक संस्मरणीय विवाह झाला. या विवाहांतील वर ब्राह्मण जातीचे असून वधु आदिद्रविड म्हणजे तिकडील बहिष्कृत वर्गातील होती हा विशेष होय. या विवाहाला वेगवेगळ्या जातींची मंडळी हजर असून सर्व दिवाणखाना माणसांनीं भरुन गेला होता. दिवाण बहादुर आर. रामचंद्रराव, सी. एस. आय., मि. सी. बी. कनिंग्हॅम, रा. ब. कंदास्वामी चेट्टी, रा. ब. डॉ. सी. नटेश मुदलियार, मि. जी. रंगय्या नायडू, मि. व्ही. गजेंद्र मुदलियार, मि. जयवेलू वगैरे पुढारी मंडळी या विवाहाला हजर होती. वधूचें नांव सीतादेवी असें असून तिचा भाऊ तेथील सरकारी छापखान्यामध्यें नोकरीस आहे. वरांचें नांव श्री नटेश अय्यर असें असून त्याचे वडील कै. श्रीकंठ शास्त्री हे कोइंबतूर येथील हायकोर्ट जज्ज होते. वधु व वर या उभयतांचे आईबाप हयात नाहींत. वधूचें शिक्षण आतापर्यंत थर्ड फॉर्मपर्यंत झालें आहे. विवाहविधि आर्यसमाज पद्धतीनें झाला. विधि झाल्यावर लगेच जाहीर सभा भरविण्यांत आली व अध्यक्षस्थानीं डॉ. वरदराजलू नायडू यांची योजना करण्यांत आली. अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत, हा विवाह म्हणजे वरिष्ठ जातींच्या लोकांनीं आजपर्यंत शतकानुशतकें बहिष्कृत वर्गावर जुलून करून जें पाप संपादिलें आहे त्याचें अंशतः क्षालन होय. जातिभेदानें हिंदुसमाजाचीं शकलें करून टाकलीं आहेत तीं पुनः जोडण्याचा मार्ग हाच आहे. अशा मिश्र विवाहानें परस्परांशीं बद्ध झालेल्या जोडप्यांना थोडाबहुत त्रास पोंहचावयाचाच, परंतु त्याला भिऊन चालावयाचें नाहीं. कायदेशीर अडचणी दूर करण्यांकरितां भिन्न जातीय वधुवरांचें विवाह मॅरेज रजिस्ट्रेशन ॲक्टाखाली नोंदावें हें चांगलें. रा. ब. डॉ. नटेश मुदलियार यांनीं आपल्या भाषणांत सांगितलें कीं, असले विवाह साजरे करून आपण चैतन्य रामानुज, स्वामी दयानंद वगैरे थोर पुरुषांची शिकवणच अंमलांत आणीत आहों. दि. ब. रामचंद्रराव म्हणाले कीं, जातीभेदाचें बंड माजवून आपण हिंदू लोकांनीं आपला समाज निःसत्त्व करून टाकला आहे आणि जातीभेदामुळें साऱ्या जगांत आपलें हंसें होत आहे. प्रस्तुत सारख्या विवाहांमुळें जातिभेद शेवटीं नामशेष होईल यांत शंका नाहीं. इतर कित्येक गृहस्थांचीहि भाषणें झालीं. पण विवाहाला हजर राहण्याचे श्री. सत्यमूर्ती यांनीं कबूल केलें होतें,

परंतु अखेरीस त्यांनीं हजर राहण्याचें टाळलें. तथापि, त्याची भरपाई दि. ब. रामचंद्ररावासारखें वयोवृद्ध, सन्मान्य व विद्वान् ब्राह्मण गृहस्थ हजर राहल्यानें झाली, असें डॉ. मुदलियार यांनीं सभेंतच बोलून दाखविलें. सत्यमूर्तीचा आजपर्यंतचा इतिहास लक्ष्यांत घेतां त्यांनीं धरसोडी केली त्याबद्दल आम्हांस तरी आश्चर्य वाटत नाहीं. असो. मद्राससारख्या जातिभेदाचे कडक निर्बंध व अस्पृश्यता यांनीं पराकाष्टेच्या ग्रस्त झालेल्या प्रांतांत वरील सारखा विवाह घडून यावा आणि त्याला हजर राहून ब्राह्मणादि स्पृश्य वर्गातल्या गृहस्थांनीं उघडपणे सहानुभूती दाखवावी, हें खरोखरच भावी काळाचें शुभचिन्ह समजलें पाहिजे.

●●●

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. २१ जून १९२९.

४४

समाजसमतेचे विरोधक

समाज-समता-संघाची चळवळ सुरू होऊन त्या चळवळीचा अस्पृश्यतानिर्मूलनाच्या कामी उपयोग होऊ लागला. अस्पृश्य मानलेल्या जातीतल्या लोकांची मौजीबंधनें होऊन ते यज्ञोपवीतें धारण करूं लागले, गायत्री मंत्राचा उच्चार करूं लागले. सहभोजनें व थोडे कां होईना भिन्नजातीय वधुवरांचे विवाह होऊं लागले, त्यामुळें चातुर्वर्ण्याच्या नांवाखालीं समाजांत विषमतेचें साम्राज्य माजवूं पाहणाऱ्या आणि स्वतःची जातिश्रेष्ठता मिरविणाऱ्या लोकांच्या काळजात धडकी भरली आहे. समतेसंबंधाच्या चळवळीनें आपल्या जातिभेदपद्धतीचें बालाग्र वांकडें व्हावयाचें नाहीं, असें म्हणून त्या चळवळीचा उपहास करणारे व तिला लघुत्व देऊं पाहणारे हे लोक मनातून घाबरून गेले आहेत, याविषयी बिलकूल शंका नाहीं. नाहींपेक्षां इतका जळफळाट त्यांनीं दाखविला नसता. विशेषतः हिंदुसंघटनेच्या चळवळीत पुढाकार घेणाऱ्या कित्येक लोकांच्या डोळ्यांत समतासंघाची चळवळ सतत सलत असते. बहिष्कृत वर्गाची स्वतंत्र चळवळ आणि समाज-समता-संघाची चळवळ या चळवळी नसत्या तर अस्पृश्यतानिवारणाचा प्रश्न फसवाफसवी करून आपण बाजूला काढला असता, बहिष्कृत वर्गाच्या स्थितींत फारशी सुधारणा न करता व त्यांच्यात स्वाभिमानाचें वारें शिरण्याला अवसर न देतां, मुसलमान व ख्रिश्ती समाजांशी भांडण्यांत त्यांचा हवा तसा उपयोग करून घेतला असता, असें तोतया हिंदुसंघटनावाद्यांना व ढोंगी शुद्धिप्रचारकांना वाटणें स्वाभाविक आहे. परंतु बहिष्कृत वर्गाची स्वतंत्र चळवळ व समाज-समता प्रस्थापित करण्याची चळवळ या आता दृढमूल झाल्या आहेत, त्या भक्कम तत्त्वांवर उभारलेल्या आहेत, त्यांची तत्त्वें बहुजन-समाजांत प्रसार पावत आहेत आणि निंदा व उपहास यांचा परिणाम होऊन त्या दबल्या जाण्याचा आता बिलकूल संभव नाहीं. या चळवळींची निंदा व उपहास करणारे लोक जर खरोखरच हिंदुसंघटनेचे पुरस्कर्ते असतील, त्यांना संघटनाची खरोखरच आस्था असेल आणि आपली

संघटनाची चळवळ लफंगेगिरीची

आहे असा सार्वजनिक ग्रह होऊ नये असे जर त्यांना वाटत असेल तर त्यांनी चूप बसावे यातच त्यांचा शहाणपणा आहे. डॉ. आंबेडकर, श्री. देवराव नाईक, बापूसाहेब सहस्त्रबुद्धे, श्री. प्रधान बंधु, श्री. शिवतरकर इत्यादि मंडळींवर वैयक्तिक

टीका करून, त्यांच्याविषयी लोकमत कलुषित करण्याचा प्रयत्न करून अस्पृश्यतानिवारण्याची व समतावादाची चळवळ नेस्तनाबूद होईल अशी जर या दुधखुळ्यांची कल्पना असेल तर त्यांची कींवच केली पाहिजे. मिसेस पार्टगॅटन नांवांची एक बाई केरसुणी हातात घेऊन अटलांटिक महासागर मागे हटवावयास पाहात होती अशी जी एक आख्यायिका आहे त्या आख्यायिकेंतल्या प्रयत्नाप्रमाणेच हे प्रयत्न हास्यास्पद आहेत. खोट्या गोष्टी, खोटे आरोप, बाष्कळ कोटीक्रम इत्यादी साधनांचा उपयोग करून बहिष्कृत वर्गाची स्वतंत्र चळवळ व समाजसमतावाद हीं चिरडून टाकू पहाणारें लोक ' मी हांसते लोकांना व शेंबूड माझ्या नाकाला, या म्हणीप्रमाणें कसे वागणारे आहेत हे त्यांची रहस्यें उघड करून आणि तोंडावर बुरखा घेऊन हल्ला करणाऱ्या लोकांचे शिखंडी स्वरूप जगाला दाखवून त्यांची सर्व जगात बेअब्रू करणें कठीण नाहीं. परंतु आम्हाला आमच्या चळवळीच्या तत्त्वांसंबंधाने इतकी खात्री आहे कीं, या विरोधकांना त्यांच्याच साधनांचा उपयोग करून ' सळो की पळो ' करून सोडण्याची आवश्यकता आम्हास भासत नाहीं. शिवाय, यातल्या बऱ्याचशा विरोधकांची इतर बाबतीत लोकांमध्यें अगोदरच फटफजिती होत आहे, त्यांत आणखी भर घालून त्यांना जगातील जिणे असह्य करावें अशी आमची इच्छा नाही.

आडगोळ्या मारणाऱ्या शिखंडींना पुढें खेंचून

त्यांची काळी तोंडे जगाला दाखविणें म्हणजे त्या प्राण्यांची नसती जाहिरात देणें आहे. असो. अमका गृहस्थ समतावादी म्हणवितो, परंतु तो अमक्या जेवणाला हजर नव्हता, किंवा त्याने आपल्या घरी जेवणासाठी वेगवेगळ्या जातीच्या माणसांना बोलावलें असतां त्यानें बाहेरून स्वयंपाक करवून आणला, असल्या गोष्टी प्रसिद्ध केल्याने समतेची चळवळ कुचकामी ठरेल अशी या भ्रमिष्ठांची समजूत असेल तर तो त्यांचा शुद्ध भ्रम आहे. सहभोजनाला मागें पंचवीस वेळा हजर राहिलेला मनुष्य काहीं अडचणीमुळें एखाद्या सहभोजनाला हजर राहू शकला नाही म्हणून तो भ्याला असें होत नाही, तसेंच घरगुती अडचणीमुळे एखाद्याला स्वतःच्या घरात स्वयंपाक करतां आला नाहीं म्हणूनही तो ढोंगी ठरत नाहीं. अस्पृश्य मानलेल्या लोकांशी पंक्तिभेद न पाळता तो जेवावयास बसतो आणि अस्पृश्य मानलेल्या जातींच्या माणसांनीं वाढलेलें अन्न त्याला चालतें, याच गोष्टी महत्त्वाच्या आहेत. त्या महत्त्वाच्या नाहीत, असें ज्यांचे म्हणणें असेल त्यांनी तसें करून दाखवावें. हा तपशिलाचा प्रश्न झाला. परंतु सर्वांत महत्त्वाचा मुद्दा आहे तो हा कीं, कोणतीही सामाजिक सुधारणा ग्राह्य किंवा अग्राह्य ठरवावयाची ती कोणा माणसाच्या वर्तनावरून ठरवावयाची नसते. बोलण्याप्रमाणे

करून दाखविणारी माणसे केव्हाही वंद्य होत. परंतु एखाद्या माणसाला स्वतःच्या मताप्रमाणे कृति करण्याचे धैर्य झाले नाही तर तो त्याचा दुर्बळपणा होय. त्यामुळे त्यांचे मत चुकीचे ठरत नाही. विधवाविवाह वगैरे सामाजिक सुधारणांच्या बाबतीत दुर्बळ मनाच्या सुधारकांवर टीका करून त्या सुधारणाच त्याज्य ठरविण्याची वहिवाट मध्यंतरीच्या काळात होती. परंतु तसल्या

वैयक्तिक टीकांनीं समाजसुधारणा मागें पडली नाहीं

अमुक एक सुधारणा तुम्हाला मान्य आहे किंवा नाही असे विचारले असता होय किंवा नाही स्पष्ट उत्तर देण्याच्या ऐवजी अमक्याने ती सुधारणा ग्राह्य मानली होती परंतु त्याने ती अंमलात आणण्याच्या कामी आयत्या वेळी माघार घेतली, असें म्हणणें हें काही रीतसर उत्तर नव्हे. अमे माघार घेतली तर बने ती अंमलांत आणून दाखवावी. परंतु अच्या ठिकाणी पुरेशा मनोधैर्याचा अभाव दिसून आला त्या अर्थीच ती सुधारणा त्याज्य होग असे कसे म्हणता येईल ? परंतु व्यक्तीवर टीका करून तत्त्वे ठार करण्याचा मोह पडल्यामुळे भ्याड टीकाकार असा असंबद्धपणा दाखवितात. बोलल्याप्रमाणे तंतोतंत कृति करून दाखविणारीं माणसें जगात केव्हांही थोडीच असावयाचीं. परंतु ज्यांना बोलल्याप्रमाणे कृति करण्याचें धैर्य नसेल त्यांनी प्रामाणिकपणें आपल्या ठिकाणी धैर्याचा अभाव कबूल केला म्हणजे झालें. तसेंच कित्येकांना खरोखरच कांही अडचणी असतील. सर्वांना सारख्याच अंतरापर्यंत सारख्याच वेगानें धांवतां येणें शक्य नसतें. परंतु एखादी सुधारणा योग्य आहे किंवा अयोग्य आहे हें युक्तिवादानें सिद्ध करण्याच्या कामी टाळाटाळ करून व्यक्तीच्या आचरणावरून ती सुधारणा टाकाऊ ठरवूं पाहणे हा

पोरकटपणाच नव्हे तर भ्याडपणाहि

आहे. बोलण्याप्रमाणें आचरण करणारे लोक समाजसुधारकात नसतील तर नसोत, पण पुराणमतवाद्यांत तरी कितीसे आहेत ? शास्त्राप्रमाणें आज एक तरी पुराणमताभिमानी चालत आहे काय ? वैराग्याची महती गाणारे आणि साधुसंतांच्या चरित्रांचा व वचनांचा कीस पाडणारे कितीसे लोक स्वतः विरक्त आहेत ? एवंच, व्यक्तीवरील टीकेनें कोणतीही समाजसुधारणा टाकाऊ ठरत नाहीं. समतावादावर मोठ्या शिष्टपणानें असा आक्षेप घेण्यात येतो कीं, निसर्गातच मुळीं समता नाहीं, मग ती कोण कशी प्रस्थापित करूं शकणार ? परंतु जातिभेद हा निसर्गजन्य भेद नव्हे हें प्रथम लक्ष्यांत ठेविलें पाहिजे. अमक्या एका जातींतले सगळेच लोक बुद्धिमान, तेजस्वी, सदाचरणी असे निपजतात आणि दुसऱ्या एका जातींतले सगळें लोक निर्बुद्ध, अजागळ व दुराचरणी निपजतात असे

जोंपर्यंत दाखवून देतां येत नाहीं तोंपर्यंत जातिभेद हा नैसर्गिक भेद आहे असें म्हणतां यावयाचें नाही.

मनुष्यकृत भेद नाहींसे करणें मनुष्याला अशक्य नाहीं

व सध्यांची सामाजिक विषमता मनुष्यकृत असल्यामुळें ती काढून टाकणें अगदीं शक्य आहें. त्यांवर हे असें म्हणतात कीं, जगांत कोणत्या ना कोणत्या रुपानें थोडी बहुत विषमता केव्हाही राहणारच कबूल ! परंतु त्याचा अर्थ असा होतों काय कीं कृत्रिम विषमता तशीच राहूं द्यावी, तिला मुळींच धक्का लावूं नयें ? तसें जर म्हणावयाचें असेल तर आम्ही उलट विचारितों, निसर्गात नीति कोठें आहे ? जगांतली अनीति पूर्णपणें नाहींशी करणें कधी तरी शक्य आहे काय ? थोड्या बहुत प्रमाणानें जगाच्या अंतापर्यंत जगांत अनीति राहणारच ना ? मग नीतीचा उपदेश कशाला करितां ? नीतितत्त्वांना मान्यता का देतां ? चोरी वगैरे गुन्ह्यांबद्दल शिक्षा करावयाचे कायदे कशाला पाहिजेत ? या प्रश्नांची उत्तरें समतेचें आक्षेपक देऊं शकतील काय ? जर नीति पाहिजे तर समताही पाहिजे.

समता हें सार्वजनिक नीतीचें एक मुख्य तत्त्व

आहे. राजकीय, धार्मिक, सामाजिक व आर्थिक बाबतींत समतेचे तत्त्व लागू करणें म्हणजे समाजरचना नीतीच्या पायावर करणेंच होय. परंतु घुबडाला सूर्यप्रकाश सहन होत नाहीं त्यांप्रमाणें सामाजिक विषमतेमुळें ज्यांना जातिश्रेष्ठता मिरवावयास मिळते त्यांना जातिभेदावर कुऱ्हाड पडलेली पाहून साहजिकच संताप येतो. हिंदुसमाज म्हणजे अनेक भेदांची व पोटभेदांची एक उतरंड आहे, आपल्या खालची पायरी कोणाची तरी आहे व आपण वरच्या पायरीवरचे आहों, एवढ्याने प्रत्येक जात खुष असते. जातिभेदाचें समर्थन करणारे लोक जातिदुरभिमानी असल्यामुळें ते समतेच्या भावनेला पारखे झालेले असतात. जातिभेद नाहींसा झाला तर आम्हाला श्रेष्ठता कशी मिरवतां येईल ? अशी त्यांच्या मनाला भीति वाटत असते. म्हणूनच ते समताप्रस्थापनेच्या चळवळीविरूद्ध जळफळत असतात. हिंदुसंघटना यांना पाहिजे ती याच करितां. हिंदुसमाजात आजचे भेद रहावे, विषमता तशीच असावी आणि समाजामध्ये वरिष्ठ वर्ग म्हणून आपल्यास मिरवितां यावें. तसें होत नसेल आणि समता प्रस्थापित होऊन हिंदुसमाज जिवंत राहावयाचा असेल तर तो जिवंत न राहिला तरी हरकत नाही. ज्यांना समता पाहिजे असेल त्यांनी खुशाल परधर्मात जावें, एक पीडाच गेली असे आम्ही समजू, असेही म्हणावयास हे समताद्वेष्टें कमी नाहीत ! हिंदुसमाज जेव्हां नामशेष होईल

तेव्हा होवो, तो अस्तित्त्वांत असेल तोंपर्यंत आपल्या जातीला वरिष्ठपणाचा टेंभा मिरवावयाला मिळाला पाहिजे. यापलीकडे कांहीं या

ढोंगी संघटनावाद्यांचें ध्येय

नाही. हिंदुधर्माविषयीं आणि जुन्यापुराण्या स्मृतिपुराणादि ग्रंथांविषयी त्यांना प्रेमाचा इतका उमाळा येतो याचें कारण एवढेंच कीं, त्यांच्यामुळे त्यांना स्वतःच्या जातीचें स्तोम माजवितां येतें. तों फायदा मिळाला नाही तर त्यांच्या प्रेमाला ओहोटी लागलीच म्हणून समजावे ! काहीं जातीं आपणाला ब्राह्मण म्हणविणाऱ्या आहेत. त्यांची अर्थात्च आपल्या जातीचा पहिला मान राखून ठेवण्यासाठीं धडपड चालत असते. या ब्राह्मणांत अनेक पोटजाती आहेत, त्या एकमेकांना उच्चनीच समजतात, एकमेकांच्या उखाळ्या पाखाळ्याही काढतात; परंतु जातिभेद कायम ठेवण्याच्या कामी सर्व एक होतात. आपल्याला लोकांनी ब्राह्मण म्हणावें, मग कसलेहि ब्राह्मण म्हटलें तरी चालेल; विषारी ब्राह्मण म्हणा किंवा अशकुनी ब्राह्मण म्हणा, आर्य ब्राह्मण म्हणा किंवा अनार्य ब्राह्मण म्हणा, षटकर्मी ब्राह्मण म्हणा किंवा त्रिकर्मी ब्राह्मण म्हणा, आचारी ब्राह्मण म्हणा किंवा पाणके ब्राह्मण म्हणा, धूर्त ब्राह्मण किंवा मूर्ख ब्राह्मण म्हणा, भाजीखाऊ ब्राह्मण म्हणा, किंवा मटनखाऊ ब्राह्मण म्हणा, मासेखाऊ ब्राह्मण म्हणा किंवा कोंबडीखाऊ ब्राह्मण म्हणा,

कसलेही ब्राह्मण म्हणा परंतु ब्राह्मण मात्र म्हणा,

असा या ब्राह्मण म्हणविणाऱ्या लोकांचा आग्रह असतो. त्यानंतर राहिले क्षत्रिय, वैश्य म्हणविणारे लोक. यांना ब्राह्मणांनी आपल्या कामापुरते क्षत्रिय वैश्य म्हणून प्रत्यक्ष व्यवहारांत शूद्र समजून वागविले इतकेंच नव्हें तर ब्राह्मणांखेरीज बाकीचे सगळे हिंदू शूद्र आणि अतिशूद्र असें म्हटले तरी चालतें. ब्राह्मणांच्या घाणेरड्या पायाचें पाणी पिण्यास देखील हे तयार होतात, मात्र यांना आपल्या खालच्या जातींवर जुलूम गाजवावयास व वर्चस्व मिरवावयास मिळाले म्हणजे झालें. खरे गुलाम जगात कोण असतील तर हे ब्राह्मणांचे बगलबच्चे होत. याखेरीज वारकरी, रामदासी वगैरे पंथांचे धर्माभिमानी म्हणविणारे लोक. हे आपल्यास साधुसंतांचे अनुयायी म्हणवितात, परंतु साधुसंतांचा मुख्य उपदेश जो समतेनें इतरांना वागविण्याचा तो धाब्यावर बसविणारे जर कोण असतील तर हेच सांप्रदायी लोक होत. एकनाथ, तुकाराम यांच्यासारख्या साधूंची नावे हे लोक मोठ्या प्रेमाने घेतील आणि त्यांच्या कविता आळवून आळवून म्हणतील, त्या साधूंच्या चमत्कारांच्या दंतकथा शक्य तितक्या अतिशयोक्तीनें वर्णन करतील, परंतु त्या

साधूंनी प्रतिपादिलेल्या न्यायबुद्धीची, भूतदयेची, समतावादाची व उदार विचारांची हटकून पायमल्ली करतील ! कारण यांनाही जातिदुरभिमानानें पछाडलेलें असतें. रामदासी पंथाचे लोक तर पहिल्यापासून जातिदुरभिमानी व कडवे म्हणून प्रसिद्ध आहेत. त्या पंथाचा संस्थापकच जातिदुरभिमानानें ग्रासलेला होता व म्हणून वारकरी संप्रदायाशी स्पर्धा करणारा वेगळा संप्रदाय त्यानें स्थापिला. अशा अनेक प्रकारच्या समताविरोधकांशी अस्पृश्यतानिर्मूलन व समाजसमतावाद या चळवळींना सामना करावयाचा आहे. परंतु या चळवळी

न्याय, सत्य व विवेक

यांच्या पायावर उभारलेल्या असल्या कारणानें त्या सर्व विरोधकांना पुरून उरतील आणि त्यांचाच शेवटी जय होईल याविषयीं आमची खात्री आहे.

अग्रलेख : बहिष्कृत भारत, ता. १२ जुलै १९२९.

४५
दटावणीची भाषा

जळगांव (वऱ्हाड)* येथील पांच हजार मंडळीनें तेथल्या इतर हिंदुसमाजास आपली अस्पृश्यता दूर करण्याच्या बाबतीत ठराव मुदतीची नोटीस † दिली होती आणि ती मुदत टळून गेली तरी हिंदुसमाजानें दाद घेतली नाहीं तेव्हां नोटिशींत आगाऊ कळविल्याप्रमाणे धर्मांतरास आरंभ Δ करण्याचें ठरून प्रथम बारा इसमानीं मुसलमानी धर्माची दीक्षा घेतली. त्यावरून सोवळ्या हिंदूंचे डोळे खाडकन् उघडले आणि त्यांनीं महाराच्या उपयोगाकरिता दोन विहीरी खुल्या करून दिल्या, वगैरेसंबंधानें आम्ही गेल्या अंकी जे लिहिलें ते कित्येकांना रुचलेलें दिसत नाहीं. आमचीही अपेक्षा तें सर्वांना रुचेल अशी नव्हती. परंतु खरी बाजू पुढे मांडावयाची असल्यास ती अमक्या तमक्याला आवडेल किंवा नाहीं याचा विचार करुन चालत नाहीं. आमच्या टीकाकारांनीं 'चोर तो चोर आणि पुनः शिरजोर' ह्या म्हणीप्रमाणे आपले वर्तन चालविलें आहे. डॉ. आंबेडकरांनीं जळगांवच्या महारांना धर्मांतरापासून परावृत्त होण्याचा उपदेश करावयाचा होता, असें या टीकाकारांचें म्हणणें आहे. डॉ. आंबेडकरांनीं धर्मांतराचा उपदेश केला नाहीं, तर जे लोक स्वतःच्या बुद्धीनें धर्मांतराचा तोडगा उपयोगात आणून स्वतःची अस्पृश्यता दूर करून घेण्यास तयार झालें त्यांना आंबेडकरांनीं तुम्हीं तसें करू नका, धर्मांतर न करता अस्पृश्यतेचा प्रश्न सोडवून घ्या, असें सांगितलें नाहीं हें खरें आहे. तसें न सांगण्याचें कारण यापूर्वी आम्हीं जाहीर केलेंच आहे. एक तर आंबेडकरांना हिंदुधर्मात राहून अस्पृश्यता घालविणें शक्य वाटत असले आणि त्याकरिता कांहीं काळ वाट पाहण्याची त्यांची तयारी असली म्हणून बाकीच्या सर्वांना ती शक्यता पटलीच पाहिजे असें नाहीं आणि सर्वांना इतका काळ सोशीकपणा दाखविणें शक्य आहे असेंहि नाहीं. डॉ. आंबेडकरांना कांहीं अडचणी तितक्या तीव्रतेनें भासत नसतील, म्हणून बाकी सर्वांनाहि त्या भासत नसतील असें म्हणता यावयाचें नाहीं. वेगवेगळ्या ठिकाणीं वेगवेगळी परिस्थिति असते. शिवाय डॉ. आंबेडकरानीं तरी कोणाच्या विश्वासावर हिंदुधर्मात राहून अस्पृश्यता घालविण्याची खात्री द्यावी ? एक दोन पिढ्यांत अस्पृश्यता

---

* (जिल्हा बुलडाणा)

† पाहा, परिशिष्ट क्रमांक : ५

Δ पाहा, परिशिष्ट क्रमांक : ७

औषधालाहि उरणार नाहीं असा आशीर्वाद देणारे आणि डॉ. आंबेडकरांना '' आस्ते कदम '' चालण्याचा उपदेश करणारे ' भाला ' कारासारखे टीकाकार एरव्ही नेहमी आपल्या उद्दाम लेखनानें व भाषणांनीं बहिष्कृत वर्गाला चिडवीत असतात आणि बहिष्कृत वर्गाचे मानवी हक्क धर्माच्या व रूढीच्या नांवावर नाकबूल करणाऱ्या आपल्या जातभाईंची सणसणीत कानउघाडणी करण्याचें टाळीत असतात, दटावणीची भाषा वापरून बहिष्कृतांना गप्प बसवावयाला पहातात. ' तुम्ही खुशाल मुसलमान व्हा. आम्हां स्पृश्यांचें तुमच्यावांचून कांहीं अडत नाहीं. सहा कोटी अस्पृश्यांना आम्ही भावी हिंदूसमाजांतून केव्हांच वजा केलें आहे.' अशी धमकी वजा भाषा वापरणारे ' भाला ' कार तसें करावयाला कां धजतात याचें कारण त्यांनींच सदरील वाक्यांच्या पुढील वाक्यांत दिलें आहे. ते वाक्य हें ' पण सारेंच अस्पृश्य बाटतील व मुसलमान होतील हें संभवत नाहीं.' आम्ही विचारतों तसा संभव असला तर ही तुमची भाषा बदलेल कीं नाहीं ? सहा कोटी अस्पृश्य तुमच्या खिसगणतींत नाहींत, परंतु लक्ष्यांत ठेवा, हे सहा कोटी अस्पृश्य-हिंदूलोक मुसलमान झालें कीं, मुसलमानांबरोबर सामना करितांना या सहा कोटींची भर घालूनच तुम्हांला प्रतिपक्षाच्या संख्याबलाचा हिशोब करावा लागेल. तुमच्या सध्यांच्या वल्गना बहिष्कृतवर्गाला चिडविणाऱ्या आहेत. ही तुमची दटावणीची व धमकीची भाषा बहिष्कृत वर्ग केव्हाहि ऐकून घेणार नाहीं. ' नाक दांबल्याशिवाय तोंड उघडत नाहीं ' या आमच्या गेल्या अंकातील अग्रलेखावर टीका करितांना ' भाला ' कार असें दर्शवितात कीं, आपलें नाक दाबले तरी आपण तोंड उघडणार नाहीं. नका उघडूं, खुशाल जीव द्या ! सर्व अस्पृश्य मुसलमान होतील असें जसें तुम्हाला वाटत नाही त्याच प्रमाणें नाक दाबलें असतां तोंड न उघडण्याचा हट्ट धरून बाकीचा स्पृश्य समाज आत्महत्त्या करावयाला तयार होईल असे आम्हासही वाटत नाहीं.*

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. १२ जुलै १९२९.

४६

प्रत्यक्ष पाहिलेलें एक दृश्य

अस्पृश्यांना मुसलमान होण्याची प्रवृत्ति कां होते, याचें एक उदाहरण नुकतेंच आमच्या दृष्टोत्पत्तीस आलें. धरमतर बंदरावर एक ब्राह्मणाची खाणावळ आहे. या खाणावळीच्या समोर, पावसानें चिखल झालेल्या जागेंत पावसानें भिजत कांहीं मुलांना खाणावळींतलें अन्न वाढण्यांत आलें. चिखलांतून पानें उचलून तीं मुलांनीं दुसरीकडे नेलीं, व जेथें थोडा बहुत आसरा मिळेल तेथें बसून तें अन्न खाल्लें. तीं मुलें चांगले कपडे घातलेली होतीं आणि तीं ब्राह्मणेत्तर स्पृश्य वर्गातली असावी असेंहि एकादा समजला असता. परंतु त्यांना चिखलांत पानें वाढून देण्यांत आली त्यावरून तीं बहिष्कृत वर्गातली असावीं असा आम्हीं तर्क केला. अशा रीतीनें या हिंदू मुलांना वागविण्यांत आलें, परंतु खाणावळवाला ब्राह्मण मुसलमानांना अशा रीतींनें वागवावयाला धजला असता काय ? आम्हीं चौकशीं केली तेव्हां सदरील खाणावळींत उपाहारगृहाचीहि सोय असून तेथें मुसलमानांना चहापाणी पुरविण्यांत येतें, मुसलमानांकरितां एक स्वतंत्र खोली ठेवून तेंथें बसण्याची सोय केलेली आहे आणि तेथें मुसलमान पांथस्थ चहापान करितात, इतकेंच नव्हे तर बरोबर आणलेल्या अन्नाच्या--अर्थातच बहुतकरून त्यांत मांस व मासे असतात--शिदोऱ्या सोडून खातात, असे आम्हांला कळलें. भालाकार प्रभूति टीकाकारानों, तुमचे जातभाई जोंपर्यंत वरील प्रकारचें हिंदुसंघटनाप्रेम दाखवित आहेत तोंपर्यंत बहिष्कृत वर्गातल्या लोकांना धर्मांतर करुन मुसलमान होणेंच चांगलें असें कां वाटूं नये याचा जबाब देऊं शकाल काय ?

●●●

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. १२ जुलै १९२९.

४७

ब्राह्मणेतर स्पृश्यांचें परोपदेशे पांडित्यम् !

जळगांवचे* बारा महार मुसलमान झाले त्याबद्दल कोल्हापूरच्या इंग्रजी नांव धारण करणाऱ्या पण मराठी भाषेंत निघणाऱ्या एका ब्राह्मणेतर पत्रानेंहि Δ आपली नापसंती व्यक्त करून अस्पृश्यांना उपदेश करण्याचा आव घातला आहे. सत्यसमाजिष्ट म्हणविणाऱ्या या पत्रकाराला वास्तविक पाहतां या वादांत पडण्याचें कांहीं कारण नव्हतें. अस्पृश्यांनीं मुसलमान होण्याच्या भरीस न पडतां देवळांत शिरण्याचा सत्याग्रह करावा आणि आपली अस्पृश्यता दूर करून घ्यावी असें या पत्रकाराचें म्हणणें आहे. तोहि एक मार्ग आहे हें आम्ही नाकबूल करीत नाहीं. तो अनुसरण्याचा प्रयत्न आतांपर्यंत बहिष्कृतांनीं केला असून त्यानिमित्त पुष्कळ नुकसानहि त्यांनीं सोसलें आहे. परंतु हा मार्ग दिसतो इतका सोपा आहे काय ? देवळांत शिरण्याचा सत्याग्रह बहिष्कृतांनीं ठिकठिकाणीं सुरू केला तर मराठे वगैरे ब्राह्मणेतर स्पृश्य त्यांच्या मदतीला येतील कीं विरोध करतील ? केवळ ब्राह्मणच विरोध करतील असें थोडेंच आहे ! सत्याग्रहाची चळवळ केल्यावर मराठे वगैरे लोकांनीं बहिष्कृतांना मारहाण करावी आणि उलट त्यांच्यावर ब्राह्मण व ब्राह्मणेत्तर स्पृश्यांनीं एक होऊन दिवाणी फौजदारी खटले भरावे, आणि सत्यशोधक चळवळीच्या पुढाऱ्यांनीं आपल्या जातभाईंना ठपका न देतां फक्त ब्राह्मणांच्या डोक्यावर खापर फोडून मोकळें व्हावें, हा अनुभव आतांपर्यंत आलेला नाहीं काय ? मराठे वगैरे जातींची मनोवृत्ति या बाबतींत ' परदु:ख शीतळ ' या म्हणीप्रमाणें आहे. त्यांना बहिष्कृतांच्या मानानें सामाजिक विषमता म्हणण्यासारखी कांहींच जाचत नाहीं. पाण्यासाठीं उन्हांतून मैलांचे मैल तळतळत त्यांना जावें लागत नाहीं, त्यांच्या मुलांना ब्राह्मणांच्या मुलांबरोबर शाळेंत बसावयास हरकत येत नाहीं, धर्मशाळा व देवळें यांत त्यांना कोणी मज्जाव करीत नाहीं. तरी ब्राह्मणांच्या जुलुमाविरूद्ध त्यांची केवढी हाकाटी चालते ! आणि पुन: बहिष्कृतांना उपदेश करावयाला हे तयारच !

●●●

---

* जिल्हा–बुलडाणा.

Δ खंडेराव गोपालराव बागल यांचे ' हंटर ' नावाचे वृत्तपत्र.

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. १२ जुलै १९२९.

४८

शुद्धि कशाकरितां पाहिजे ?

शुद्धीच्या चळवळीचे पुरस्कर्ते उदात्त हेतूंनीं प्रेरित झालेले नाहींत याची आणखी एक साक्ष पाहिजे असल्यास ती नुकतीच सांपडली आहे. कर्नाटकांतील एका लिंगायत स्वामींनीं ढोर जातीच्या लोकांची शुद्धि करून त्यांना कोणी अस्पृश्य समजूं नये अशी आपल्या अनुयायाना आज्ञा केली. ही बातमी प्रसिद्ध करतांना कित्येक मराठी वर्तमान पत्रकारांनीं, ' स्वामी याऐवजीं मुसलमान व ख्रिस्ती यांची शुद्धि करतील तर बरें होईल, ' अशा अर्थाचे उद्‌गार काढले आहेत ! हिंदुसमाजांतल्या दलित वर्गाला त्याच स्थितींत ठेवावयाचें आणि बाहेरचे मुसलमान व ख्रिस्ती मात्र शुद्ध करून आंत आणावयाचे असें हें धोरण आहे. जे मुसलमान व ख्रिस्ती शुद्ध होऊन हिंदुसमाजांत येतील त्यांची एक वेगळी जात करावयाची हा डाव पुनः आहेच ! कारण, ज्यांचा इतर जातीशीं शरीरसंबंध घडला नसेल व फक्त अन्नोदक, व्यवहारापुरतीच बाटाबाट झाली असेल त्यांनाच फार तर स्वतःच्या मूळच्या जातींत प्रायश्चित घेऊन सामील होणे शक्य आहे ; बाकीच्या शुद्धीकृतांना स्वतःची वेगळी जात केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. अर्थात् शुद्धीची चळवळ ही पूर्णपणें आत्मसात् करण्याची चळवळ नसून ती केवळ संख्याबल वाढविण्याची धडपड आहे. शुद्धिवाद्यांना न्यायाची व समतेची चाड नाहीं, भूतदयेची पर्वा नाहीं ; कसलीहि खोगीरभरतीं करून, हिंदूंची संख्या वाढविणें हेंच त्यांचें ध्येय आहे. शिवाय, एकाद्या लिंगायत स्वामीनें ढोरांना पावन करून आपल्या समाजांत घेतल्यानें ब्राह्मणी वर्चस्वाला धक्का बसतो, हेंही अंतःस्थ वैषम्य आहेच !

● ● ●

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. १२ जुलै १९२९.

४९

वतन बिलाची तात्पुरती इतिश्री !

डॉ. आंबेडकर यांनीं महार वतन बिल मुंबईच्या कायदेकौन्सिलमध्ये आणलें होतें आणि त्याला ठिकठिकाणच्या महार वतनदारांनीं आपआपल्या भागात सभा भरवून पाठिंबाहि दिला होता. मात्र महार समाजांतल्या कांही कुऱ्हाडीच्या दांड्यांनीं या बिलाला विरोध करून गोताला काळ होण्याचा प्रयत्न केला होता आणि त्याकरितां महारसमाजाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला होता. परंतु या विरोधास डॉ. आंबेडकरांनीं न जुमानता बिलाचे पहिलें वाचन त्यांनी कौन्सिलमध्यें पास करून घेतलें तेच बिल डॉ. आंबेडकर यांनी परवां पुण्याच्या चालू बैठकींत तें बिल मागें घेण्याची परवानगी मागितली व कौन्सिलानें ती परवानगी दिली. अशा रीतीनें, वतन ॲक्टांत सुधारणा करून महारांच्या कपाळाची

वतनदारींच्या नांवाखाली चालू असलेली गुलामगिरी

काढून टाकण्याचा प्रयत्न आज तरी शेवटास गेला नाहीं. डॉ. आंबेडकरांनीं या बाबतींत माघार घेतली म्हणून त्यांच्या नांवानें सदोदित खडे फोडीत, बसणाऱ्या आणि बहिष्कृत समाजाच्या स्वतंत्र चळवळीला हरएक प्रकारें विरोध करून तिचा उपहास करणाऱ्या लोकांना आनंदानें टाळ्या वाजविण्याची संधी मिळाली आहे. आम्हीं त्यांच्या सैतानीं समाधानाच्या आड येऊं इच्छीत नाहीं. वतन बिलासंबंधाच्या चळवळींत ज्यांनी त्यांना साहाय्य केलें, ज्यांनी त्या बिलाला पाठिंबा दिला, त्यांच्याकरितां मात्र येथें थोडा खुलासा करणें इष्ट आहे. प्रथमतः बिलाचें मूळ स्वरूप बहुतांशीं जशास तसें ठेऊन तें जर कौन्सिलमध्ये पास करून घेतां येण्यासारखें असतें तर तो सुयोग डॉ. आंबेडकर यांनी कधींच दवडला नसता. परंतु सिलेक्ट कमिटीकडे गेल्यावर बिलांत इतकें भलभलते फरक करण्यांत आलें कीं, बिलाचे स्वरूप पार बदलून गेलें. सिलेक्ट कमिटीनें मूळ बिलांत दोन महत्वाच्या दुरूस्त्या केल्या. पहिली दुरूस्ती म्हणजे बलूत्याचे ऐवजीं नगदपगार मिळावा अशी जी कलमें मूळबिलांत होती ती गाळून टाकण्यांत आली. दुरूस्ती दुसरी कोणत्या अटीवर वतनी जमीनी रयतांव्या करण्यांत याव्यात या कलमांत करण्यांत आली होती. मूळ बिलांत शेतसारा घेऊन रयतावा करण्यांत याव्यात असें कलम होते. सिलेक्ट कमिटीनें अर्धाखंड घेऊन जमीनी रयतावा करण्यांत याव्यात अशी दुरूस्ती केली. मूळ बिलांत हे दोन

फेरबदल करण्यांत आल्यामुळें जें बिल महार लोकांना हितावह होणार होतें तेंच त्यांना अनहितकारी बनलें. पैकीं पहिली दुरुस्ती विरुद्ध विशेषसा आक्षेप घेता येण्यासारखा नव्हता कारण बलूता किती मिळतो, कोणत्या कामासाठीं मिळतो या बद्दल रयत महार व सरकार यांच्यात मतभेद असल्याचें सिलेक्ट कमिटीस दिसून आल्यामुळे ह्या मतभेदाचा निकाल लावल्याशिवाय बिलांतील बलूत्याबद्दलचीं कलमें तूर्त कायद्याच्या रूपांत घालूं नयेत असा अभिप्राय सिलेक्ट कमेटींने दिला. व ह्या प्रश्नाचा निकाल लावण्या करिता

बलूता चौकशी कमिटी

नेमण्याचें अभिवचन सरकारनें दिल्यामुळे डॉ. आंबेडकरांनीहि हीं कलमें बिलांतून काढून घेण्यास आपली हरकत नाहीं असें सांगितलें. कारण तसें करण्यांत महार समाजाचे कांहीं नुकसान नव्हतें. दिवसाला दोन दिवस लागले असते इतकाच काय तो फरक पडला असता. दुरुस्ती नंबर दोन मात्र अत्यंत विघातक होती. तिच्यामुळे डॉ. आंबेडकरांनी आपल्या बिलाच्या रूपानें तयार करून दिलेल्या

गणपतीच्या मूर्तीस माकडाचे रूप

प्राप्त झालें. हेच माकड आतां कौन्सिलपुढें येणार होतें आणि महारांच्या मानगुटीवर बसणार होतें. सिलेक्ट कमिटीनें बदललेलें बिल पुन: कौन्सिलमध्ये आल्यावर त्यांतले सिलेक्ट कमिटीचे जांवईशोध काढून टाकून मूळच्या बहुतांशीं तरी मूळच्या स्वरूपांत तें पास करून घेण्याची आशा असती तर तें आंबेडकरांनी मागें घेतलें नसतें. परंतु कौन्सिलमधल्या आजच्या परिस्थितींत वरील आशेला बिलकूल जागा नाहीं. निरनिराळ्या हेतूंनीं प्रेरित होऊन आंबेडकरांनी सुचविलेली वतन ॲक्टाची सुधारणा हाणून पाडण्याकरितां

सरकार, ब्राह्मणेतर, ब्राह्मण व मुसलमान यांचे संगनमत

होणार हें त्यांना स्पष्ट दिसून आलें तेव्हां त्यांनी उपकार करावयास जातांना अपकार होण्याचा प्रसंग येऊं नये म्हणून माघार घेतली. ब्राह्मण, ब्राह्मणेतर व मुसलमान सभासदांमधील क्वचित् एकादाच सभासद आंबेडकरांच्या मूळ बिलाला अनुकूल झाला असता. सरकारची तर पहिल्यापासून सहानुभूति नव्हती. महारांना सध्यांच्याच स्थितींत ठेवलें तरच त्यांच्यावरील आपली सुलतानशाही चालू राहील असे बाकीच्यांना वाटतें व म्हणूनच त्यांना वतन ॲक्टामध्ये महारांची गुलामगिरी काढून टाकण्याच्या दृष्टीनें सुधारणा होणें इष्ट वाटत नाहीं. ब्राह्मण व ब्राह्मणेतर हे आपसांत कितीहि भांडले तरी बहिष्कृत

वर्गानें आपलें डोकें वर काढूं नये, आपल्या पंक्तीला येऊन बसूं नये, हे त्या उभयतांची सारखीच इच्छा आहे. वतनदार महाराला त्याच्या वतनदारीचा फायदा घेऊन हवा तसा राबवावा, ही कुळकर्णी व पाटील यांना जी संवय पडली आहे त्यामुळें महारांना स्वातंत्र्य देण्याला ते दोघेहि तयार नाहींत. कौन्सिलांतल्या ब्राह्मण सभासदांना कुळकर्णी व ब्राह्मणेतर सभासदांना पाटील मतें मिळवून देणारे अर्थात्च ब्राह्मण व ब्राह्मणेतर सभासदांनी पाटीलकुळकर्ण्यांच्या इच्छेला अनुसरून वागावें हें स्वाभाविक होय. तिसरा पक्ष सरकारचा. त्याचाहि या बाबतींत निकट हितसंबंध पोंहचतो. मामलेदार, पोलिसफौजदार वगैरे सरकारी अधिकाऱ्यांना फिरतीवर असतांना महार लोकांचा अतिशय उपयोग होतो. वतनदारीच्या गुलामगिरींत सांपडलेले महार नसतील तर त्यांना थोडक्यांत चैन करावयाला मिळणार नाहीं; मजुरीचे पैसे रोख मोजावे लागतील. तसेंच सरकारी कामेंहि थोडक्या---केवळ नांवाच्या पगारांत वतनदार महारांकडून करून घेतां येतात. अशा रीतींने सरकार व सरकारी अधिकारी यांना वतनदारीची सध्यांची स्थिति कायम ठेवणें इष्ट असावें हे स्वाभाविक आहे. कौन्सिलांतील मुसलमान सभासदांना बहिष्कृत हिंदूंविषयीं फारशी सहानुभूति वाटली नाहीं तर त्यांतहि काहीं आश्चर्य नाहीं. बहिष्कृत वर्गाच्या मागण्या जोरानें पुढे येऊं लागल्या त्यामुळें मुसलमानांच्या खास सवलतींसंबंधाच्या मागण्यांना आपोआप थोडा शह बसूं लागला आहे. जोंपर्यंत बहिष्कृत वर्ग आपली बाजू जोरानें मांडीत नव्हता, तोपर्यंत मागासलेपणाच्या व अल्पसंख्याकपणाच्या सबबीवर मुसलमान भरमसाट मागण्या करावयास धजत होते. परंतु आतां बहिष्कृत वर्गाचे प्रतिनिधी आपल्या वर्गाच्या मागण्या जोरानें मांडू लागले आहेत. त्यामुळें आपल्या वांट्यास येणाऱ्या सवलतींत नवीन वांटेकरी उत्पन्न झाले याबद्दल मुसलमान सभासदांना वैषम्य वाटणें एका अर्थी साहजिक आहे. सायमन कमिशनशीं सहकारिता करण्यासाठी मुंबई सरकारनें नेमलेल्या कमिटीच्या रिपोर्टमध्ये डॉ. आंबेडकर यांनीं जी मतभेदपत्रिका जोडली आहे त्यांत मुसलमानांच्या अवास्तव मागण्या खोडून काढल्या असल्याकारणानें आणि बहिष्कृत वर्गाच्या मागण्यांचे जोरदार रीतीनें समर्थन केलें असल्यामुळें कौन्सिलांतील मुसलमान सभासदांचा डॉ. आंबेडकर व बहिष्कृत वर्ग यांच्यावर मोठा घुस्सा झाला आहे व वतन बिल या वेळीं कौन्सिलांत आलें असतें तर सूड उगविण्याची संधी त्यांनीं वायां जाऊं दिली नसती. या सर्व गोष्टींचा विचार करून आणि सिलेक्ट कमिटीनें महारांच्या गळ्यांत बांधावयाकरितां पुढें केलेलीं घोरपड टाळण्यासाठी आपलें बिल मागे घेणें आंबेडकरांना भाग पडलें. त्यामुळें त्या बिलाला जाहीर सभा वगैरेच्या द्वारें ज्यांनीं मनःपूर्वक पाठिंबा दिला होता त्यांची निराशा होईल यांत शंका नाही. परंतु

परिस्थितिच अशी जुळून आली की, या वेळीं बिल मागें घेतले नसतें तर भलताच कायदा महार समाजाच्या बोकांडी बसला असता. ही गोष्ट लक्षांत आणून सदरील बिलाविषयी आस्था बाळगणारे लोक

दुःखांत थोडे समाधान

मानतील अशी आशा आहे. हें बिल कौन्सिलमध्यें आणलें तेव्हां वेळ पडल्यास सत्याग्रहाचाहि आश्रय करून तें पसार करून घेण्याचा आंबेडकरांचा संकल्प होता, आणि त्याप्रमाणे कौन्सिलामध्ये त्यांनी एकदा बोलूनही दाखविलें होतें. बिलाचा उद्देश कोणाही वतनदारावर वतन सोडण्याची सक्ती करण्याचा नव्हता, तर ज्यांना वतनामुळे प्राप्त होणारी गुलामगिरी नको असेल त्यांना सरकारसाऱ्याची जुडी देऊन आपली वतन जमीन स्वतःपाशी ठेवण्याचा मार्ग मोकळा व्हावा असेच बिलाचें धोरण होतें. तथापि, कित्येक अदूरदर्शी अथवा व्यक्तीद्वेषप्रेरित मंडळीने बिलाविषयी महारसमाजात गैरसमज उत्पन्न केल्याकारणाने सत्याग्रहाचा उपाय अंमलात आणणे अशक्य झाले. महारसमाजाचा बराच मोठा भाग अज्ञान व अशिक्षित असल्यामुळे बिलाविषयी गैरसमज पसरू पाहणाऱ्या लोकांना चांगलेच फावले. तथापि आमची खात्री आहे की, स्वाभिमानाची जागृति समाजात अधिकाधिक होत असल्यामुळें नवीन पिढी तरी

वतनदारीचें हांडूक गळ्यांत बांधून मिरविण्यांत भूषण

मानणार नाही. वतनदारीचा पायबंद जोंपर्यंत कायम आहे तोंपर्यंत महारसमाजाची व्हावी तशी प्रगती केव्हांही होऊं शकणार नाहीं. वतनदारीचा शिळा तुकडा चघळण्याची आणि त्याच्याकरिता गुलामगिरीचा पट्टा गळ्यांत बांधून घेण्याची ज्यांना सवय पडलेली आहे, त्यातच ज्यांना धन्यता वाटते, ज्यांच्या अंगांत स्वातंत्र्याची धमक नाही, त्यांच्याकरिता आंबेडकरांचे बिल नव्हते. तसेच त्यांच्या गुलामगिरीच्या आवडीच्या आडही ते येत नव्हतें. तर ज्यांना माणुसकीचें हक्क संपादावयाचे आहेत, ज्यांना स्वातंत्र्याची आवड आहे, ज्यांना स्वतःकरिता आणि आपल्या मुलांनातंवाकरितां प्रगतीचा मार्ग मोकळा करून घेण्याची उत्कट इच्छा आहे, त्यांच्याकरिताच आंबेडकरांनी हे बिल आणलें होते. या खेपेस ते यशस्वी झालें नाही तरी स्वतः आंबेडकरांची पूर्ण निराशा झालेली नाही. पुनः योग्य संधी येईल तेव्हा ही सुधारणा घडवून आणण्याचा

डॉ. आंबेडकरांचा निर्धार कायम

आहे. तोंपर्यंत महारसमाजातील स्वाभिमानी लोकांनी प्रबळ लोकमत तयार करून वेळ पडल्यास सत्याग्रह एकमतानें होईल अशासाठी शिकस्तीचे प्रयत्न करावे. अशाप्रकारच्या सुधारणा चुटकीबरोबर होत नसतात. सरकार काय

किंवा इतर लोक काय ज्यांच्या ज्यांच्या अन्यायमूलक परंपरागत हितसंबंधांना अशा सुधारणांमुळे धक्का बसण्याचा संभव असतो ते विरोध करावयाचेच. इंग्लंडात व इतर पाश्चात्य देशात बहुजनसमाजाच्या हक्कासंबंधाचे कायदे, अनेक अपयशस्वी प्रयत्न झाल्यावरच, पसार झाले; खुद्द हिंदुस्थानातही सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा होण्यास किती तरी वर्षे लोटावी लागली; ही उदाहरणे विसरून चालावयाचें नाही. आजच आपल्यास पाहिजे ती सुधारणा वतन ॲक्टात झाली नाहीं म्हणून हताश होऊन हातपाय गाळून बसण्याचें कारण नाही. आपला निर्धार कायम असला तर कितीही दांडगा विरोध झाला तरी त्याला न जुमानतां आज ना उद्या तरी आपल्यास पाहिजे ती सुधारणा आपण घडवून आणूं शकूं. या बाबतीत चळवळ सतत चालू ठेवणें हें

महार वतन परिषदेचें कर्तव्य

आहे. या परिषदेच्या कल्पनेला मूर्त स्वरुप देणें चालकांना अद्यापि शक्य झालें नाही. परिषद यापूर्वीच भरली असती तर बरे झाले असतें. परंतु बिल तूर्त मागे घेण्यात आलें असलें तरी परिषदेची आवश्यकता नाही असें नाही. जोपर्यंत महार वतनासंबंधाची सदरील बिलात दर्शविलेली सुधारणा वतनासंबंधाच्या कायद्यामध्यें झाली नाही तोंपर्यंत चळवळीची जरूरी आहें हे स्पष्ट आहे. महार वतनपरिषद ही संस्था तोंपर्यंत कायम ठेवून तिच्या विद्यमाने वार्षिक परिषदा भरविणे, वेगवेगळ्या ठिकाणी सभा भरविणे, सरकारकडे डेप्युटेशन पाठविणे, सद्याच्या कायद्यामुळे महार समाजाचें कसे नुकसान होत आहे हे दाखविण्याची इंग्रजी व देशी भाषांतल्या वर्तमानपत्रांमध्ये वेळोवेळी लेख प्रसिद्ध करणें, इतर लोकांचे मत शक्य तितकें अनुकूल करून घेण्याचे वेगवेगळ्या प्रकारचे प्रयत्न करणें, ही कामे चालू राहिली पाहिजेत. खास त्याच कामाकरिता एक स्वतंत्र संस्था असल्याशिवाय ती नियमितपणे व सतत होत राहणे शक्य नाही. बिलामुळे उत्पन्न झालेल्या उत्साहाच्या योगानें परिषदेसाठी थोडाबहुत फंड गोळा झालेला आहे. या पैशाचा विनियोग लोकांकडून ज्या कामाकरिता तो मागून घेण्यात आला

त्याच कामाप्रीत्यर्थ झाला पाहिजे.

त्या पैशाचा विनियोग दुसऱ्या कामी करण्याची खटपट वतन परिषदेच्या कार्यकारी मंडळातील कित्येकांनीं चालविली असल्याबद्दलची गुणगुण आमच्या कानीं आली आहे. म्हणून या बाबतींत स्पष्ट इषारा देणें आम्हांस जरूरीचें वाटतें. एक तर, एका कामासाठी मिळविलेल्या पैशाचा उपयोग ज्यांनी पैसे दिले आहेत त्यांच्या संमतीखेरीज दुसऱ्याच कामाकडे करण्याचा अधिकार कोणालाही नाही हे विसरता कामा नये. ज्या दुसऱ्या कामाकडे विनियोग करावयाचा तें उपयुक्त व

जरूरीचेही असेल. परंतु ज्यांनी पैसे दिले त्यांची संमति न घेता दुसऱ्या कोणत्याही कामाकडे त्या पैशाचा उपयोग करणे हा विश्वासघात होय. दुसरी गोष्ट ही कीं, ज्या कामासाठी पैसे जमविलेलें असतील ते काम जोपर्यंत झाले नाही तोपर्यंत दुसऱ्या कामाकडे त्या पैशाचा उपयोग करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. तरी महार वतन परिषदेच्या कामांत पुढाकार घेतलेल्या मंडळीला त्याचप्रमाणे त्या परिषदेच्या फंडाला ज्यांनी हातभार लावलेला आहे त्यांना आमची अशी सूचना आहे कीं, परिषद ही संस्था कायम ठेवून तिच्यामार्फत वतन ॲक्टात सुधारणा करून घेण्याची चळवळ चालू ठेवावी आणि जेंव्हा इष्ट सुधारणा घडून येईल तेव्हाच परिषदेच्या घटनेचे विसर्जन करावे. असो. याखेरीज लक्षात ठेवावयाची गोष्ट ही कीं, कायदे कौन्सिलांची सद्यांची घटना अत्यंत असमाधानकारक आहे आणि त्यामुळेंच न्याय्य सुधारणांना तेथें पाठिंबा मिळू शकत नाही. बहिष्कृत वर्गाचे प्रतिनिधी भरपूर प्रमाणात कौन्सिलामध्ये असणे आवश्यक आहे व तें आंबेडकरांनी रिफॉर्म्स कमिटीच्या रिपोर्टात स्वतंत्र मतपत्रिका जोडून दाखविले आहे. बहिष्कृत वर्गानें राजकीय हक्कांच्या बाबतीत जागरूकता दाखविली पाहिजे व त्याकरिता निकराने भांडले तरच वतन बिलासारख्या सुधारणांचा मार्ग सुगम होईल. कायदेकौन्सिलातील वतनदारीचे उच्चाटन केले तरच बहिष्कृतांची व इतर दलित वर्गांची झपाट्यानें प्रगती होऊं शकेल.

◎ ◎ ◎

अग्रलेख : बहिष्कृत भारत, ता. १६ ऑगस्ट १९२९.

५०

नकटा नकट्याला हांसतो !

पुणें येथें रा. वल्लभभाई पटेल यांच्या पुढारीपणाखाली मुंबई इलाख्यांतील जमीनदारांच्या संघाची (The Land League—लँड लीगची) नुकतीच स्थापना करण्यांत आली. वल्लभभाईंना बोलावून आणण्यांत व सदरील संघाची स्थापना करण्यांत केळकर, भोपटकर प्रभृति ब्राह्मण पुढाऱ्यांनी प्रमुखपणें भाग घेतल्यावरून ब्राह्मणेतर पक्षाच्या पुढाऱ्यांनीं त्यांत भाग घेतला नाहीं, इतकेंच नव्हे तर सदरील संघ स्थापण्यांत ब्राह्मण पुढाऱ्यांचा अंतःस्थ हेतु करबंदीची चळवळ करण्याचा आहे त्याअर्थी शेतकरी वर्गानें सावध राहावें व या चळवळींत पडूं नये, असा इषाराहि ब्राह्मणेतर पुढाऱ्यानीं दिला होता. तथापि रा. विठ्ठलराव शिंदे व रा. जेधे हे सदरील संघाच्या स्थापनेच्या वेळीं हजर राहिले होते. ब्राह्मणेतर पुढाऱ्यांनीं लँड लीगवर बहिष्कार घातल्यामुळें वल्लभभाई पटेल यांनीं त्यांची पुणें येथेंच एक भाषण करून चांगली हजेरी घेतली. वल्लभभाई पटेल हे स्वतः ब्राह्मणेतर असले तरी ते 'भटाळलेले' असल्या कारणानें, ज्या ब्राह्मणेतर पत्रकारांनीं बार्डोली प्रकरणांतील त्यांच्या विजयाबद्दल त्यांचें अभिनंदन केलें होतें, ते ब्राह्मणेतर म्हणून त्यांच्याविषयीं आपलेपणाच्या भावनेनें अभिमान व्यक्त केला होता, तेच ब्राह्मणेतर पत्रकार आतां त्यांच्यावर उलटून पडले आहेत. गुजराथमध्यें दुबळा नांवाची एक जात असून पाटीदार कुणब्यांच्या शेतांत तेच मेहनत करतात, त्यांची बायकामुलें पाटीदारांच्या चाकरींत खपतात, पाटीदार लोक आयतखाऊ व नांवाचे कुणबी आहेत, आणि त्यांनीं दुबळा जातीच्या लोकांना गुलामगिरींत ठेवलें आहे, त्यांच्यावर ते वाटेल तसा जुलूम करितात, तथापि वल्लभभाई पटेल हे आपल्या जातभाईंनीं दुबळा लोकांवर चालविलेल्या जुलुमाला आळा घालण्याचा कांहीं प्रयत्न करीत नाहींत, अशा प्रकारची उलट टीका ब्राह्मणेतर पत्रांनीं वल्लभभाईवर केली आहे. वल्लभभाई व त्यांचे जातभाई यांनीं दुबळा जातीच्या लोकांच्या बाबतींत जें स्वार्थीपणाचें धोरण दाखविलें आहे त्यांचा आम्हीहि निषेध करितों. दुबळा, काळीपरज ऊर्फ राणीपरज वगैरे मागासलेल्या लोकांवर हिंदु, पारसी वगैरे सधन वर्गांतल्या लोकाकडून भयंकर जुलूम होतो याबद्दल मुळींच शंका नाहीं. तथापि, महाराष्ट्रांतील ब्राह्मणेतर पक्षानें या बाबतींत नाकानें कांदे सोलण्याचा प्रयत्न करणें हें मात्र हास्यास्पद होय. खोतीपद्धतीमध्यें कुळांवर खोतांचा व त्यांच्या खालोखाल धारेकऱ्यांचा अतिशय जुलूम होतो हें आतां जगजाहीर झालेलें

आहे. खोतांमध्यें ब्राह्मण, मराठा वगैरे स्पृश्य हिंदु यांचा भरणा असून थोडे मुसलमान खोतहि आहेत. हे सर्व जातींचे खोत कुळांना म्हणजे कुणबी व अस्पृश्य वर्गांतले लोक यांना नाना प्रकारांनीं नाडतात, त्यांच्यावर अनन्वित जुलूम करितात, परंतु कुळांच्या हक्काचा प्रश्न निघाला म्हणजे ब्राह्मण व ब्राह्मणेतर खोत एक होऊन कुळांची गुलामगिरी कायम ठेवण्यासाठीं आकाशपाताळ एक करितात. कुळांनीं आपली चळवळ आरंभिली तेव्हां तिला विरोध करण्याकरितां मुंबई शहरामध्यें ब्राह्मणेतर मंडळींनेंच सभाचा धूमधडाका लावला होता. खोतांची बाजू घेणाऱ्या मंडळींत ब्राह्मणेतर पक्षाचे पुढारी म्हणविणारेहि कांही लोक सामील झाले होते आणि कुळांची बाजू घेणारे रा. ब. बोले, अंड. सुर्वे वगैरे ब्राह्मणेतर पुढाऱ्यावर मराठी मंडळी उलटून पडली होती. ब्राह्मणंतर पक्षाची विशेषतः मराठा जातीची सहानुभूति मिळविण्याकारितां कुणबी लोकांनीं शिकस्तीचे प्रयत्न केले, परंतु त्यांत त्यांना यश आले नाहीं. थोड्या वर्षापूर्वी ब्राह्मणेतर पक्षाच्या मुकुटमणी पुढाऱ्याच्या अध्यक्षतेखालीं मुबई शहरांत कुणब्यांनीं अर्थात खोती कुळानीं एक सभा भरविली होती. त्या सभेंत जे ठराव पास झाले होते त्यांमध्ये खोती पद्धती नाहीशी करावी अशी सरकारला विनंति करण्याचा ठराव सभेंपुढें आला तेव्हां अध्यक्षांनीं त्याला कांहीं हरकत घेतली नाही आणि तो सर्वानुमतें पसार झाला. परंतु सदर सभेंत पसार झालेले ठराव अध्यक्षांच्या सहीनें सरकारकडे पाठविण्याची वेळ आली तेव्हां सदरील ठराव पाठवावयाचा असेल तर आपण सही करणांर नाहीं असें अध्यक्षांनीं चक्क सांगितलें ! अंतस्थ कारण काय तर अध्यक्षांच्या सोयऱ्या पाहुण्यामंडळींत कांहीं मराठे खोत होते ! अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या वर्गाच्या उन्नतींच्या आड ब्राह्मणच येतात असें नाहीं. ब्राह्मणेतरहि आड येतात. अस्पृश्याना मारहाण करण्यात व त्याचा छळ करण्यांत ब्राह्मणेतर पुढाकार घेतात, परंतु ब्राह्मणेतर पुढारी सगळं खापर ब्राह्मणांच्याच डोक्यावर फोडून मोकळे होऊं पाहतात. महार वतन बिलाचा सिलेक्ट कमिटींत विचका करणारे एक ब्राह्मणेतर पुढारी रा. नवले, एम. एल. सी., यांचेहि उदाहरण या बाबतींत लक्षात ठेवण्यासारखें आहे. साराश, दुबळा जातीच्या लोकांशीं पाटीदार कुणब्याचे वर्तन आहे त्याबद्धल वल्लभभाईंना दोष देऊन त्यांची नालायकी सिद्ध करावयाची तर तेंच माप महाराष्ट्रांतील ब्राह्मणेतरपक्षाच्या पुढाऱ्यांनाहि लागू करून त्याची नालायकी सहज शाबीद करतां येईल.

●●●

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. १६ ऑगस्ट १९२९.

५१

कम्युनिझम पाहिजे तर करबंदी कां नको ?

लँडलीगच्या चळवळींत ब्राह्मणेतरानीं कां पडूं नये तर त्या चळवळीचा अंत:स्थ हेतु सरकारविरुद्ध करबंदीची चळवळ करण्याचा आहे असें ब्राह्मणेतर पुढाऱ्यांनीं जाहीर केलें आहे. खरें पाहिलें असतां महाराष्ट्रांतले केळकर, भोपटकरासारखे पुढारी करबंदीची चळवळ करण्याचे धाडस करतील असें आजपर्यंतच्या त्यांच्या इतिहासावरून मानण्यास कांहीं जागा नाहीं. परंतु, तें कसेंहि असलें तरीं, करबंदीच्या चळवळीचा ब्राह्मणेतरांनीं एवढा बाऊ तरी कां करावा ? शेतकऱ्यांचें हित पाहावयाचें तर वेळ पडल्यास करबंदीचीहि चळवळ करावयास नको काय ? बाकी सर्व उपाय हरले, शेतकऱ्यांची तक्रार सकारण असून त्यांची दाद सरकारनें घेतली नाहीं, तरी शांततापूर्वक करबंदीची चळवळ करूं नये असें ब्राह्मणेतर पुढाऱ्यांचे म्हणणें आहे काय ? बार्डोलीच्या लढ्याच्या वेळीं करबंदीच्या उपायाचा आश्रय करण्यांत आला नसता तर बार्डोलीच्या शेतकऱ्यांची दाद लागली असती काय ? त्यावेळीं ब्राह्मणेतर पत्रांनींहिं बार्डोलीच्या वल्लभभाई प्रभृति पुढाऱ्यांचे अभिनंदन केलें नव्हतें काय ? मग आतांच करबंदीचा बाऊ करण्यांत अर्थ कोणता ? ज्या ब्राह्मणेतर पत्रकारांनीं लँड लीगच्या विरुद्ध सध्यां आपली लेखणी चालविली आहे त्यांनींच आतांपर्यंत मुंबईतल्या कम्युनिस्ट चळवळींचे कौतुक केलें आहे, कम्युनिझमचा उद्देश मुळाशीं असल्याचा आरोप करून कोणी कामगारांच्या चळवळीला नावे ठेवूं नयेत आणि कम्युनिस्टांच्या यूनियननें पुकारलेला संप कामगारांच्या नाशाला कारण होणारा असला तरीं त्याला सर्वांनीं पाठबळ द्यावें असें प्रतिपादिलें आहे. सदरील यूनियन स्थापणारे कम्युनिस्ट ब्राह्मण होते, परंतु त्या मुद्यावर या पुण्या-बेळगांवच्या ब्राह्मणेतर पत्रकारांनीं आतांपर्यंत जोर दिला नाहीं. कारण उघडच आहे. त्या गोष्टी परभारें होत होत्या ! शेतकरी संघांची बाब ब्राह्मणेतर पुढाऱ्याच्या अंगाशीं लगटणारी पडली आणि त्यांतून मोठ्या पुढाऱ्यांचें फर्मान सुटलें. या मोठ्या पुढाऱ्यांना सरकारची मर्जी सांभाळावयाची होती. म्हणून करबंदीसंबंधानें उगाच मोठा बाऊ करून ब्राह्मणेतर वर्गाला लँड लीगपासून अलिप्त ठेवण्याची धडपड करण्यांत आली, हें लोकांच्या लक्ष्यांत आल्यावांचून राहिलेलें नाहीं, हें त्या पुढाऱ्यांनीं व त्यांच्या सांगण्याप्रमाणें टिमकी वाजविणाऱ्या पत्रकारांनीं समजून असावें.

●●●

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. १६ ऑगस्ट १९२९.

५२

कुलाबासमाचारा ' चा चावटपणा

पेण येथें प्रसिद्ध होणाऱ्या 'कुलाबासमाचारा' ची वावदूकपणाविषयीं प्रसिद्धीच आहे. वावदूकपणाला खोडसाळपणाची जोड देण्यांत आणि कुचकट अनुदार विचारांचें निर्लज्जपणें प्रदर्शन करण्यांत या पत्रकाराचा हातखंडा आहे. गेल्या ता. १७ जून रोजीं कुलाबा जिल्हा बोर्डाची सभा भरली असतां तिसऱ्या प्रहरीं चहापानाकरितां झालेल्या सुट्टीमध्यें सदरील बोर्डाचे एक सरकारनियुक्त सभासद, अस्पृश्य वर्गाचे प्रतिनिधि, रा. भातणकर हे, स्पृश्य सभासद जेथें चहा पीत बसले होते तेथें मुद्दाम शिरले व इतरांबरोबर त्यांनीं चहा घेतला, तें पुष्कळांना रुचलें नाहीं, असें लिहून यापुढें भातणकर यांनीं वेगळ्या ठिकाणीं चहा घ्यावा, अशी त्यांना ढोंगी मित्रत्त्वाने ' समाचारा ' नें सूचना केली आहे. या बाबतींत आम्हीं चौकशी केली तेव्हां ' कुलाबासमाचारा ' नें हें सगळें कुभांड रचिलें आहे, असें आम्हांस आढळून आलें, खरा प्रकार असा आहे कीं, सदरील दिवशीं चहाची सुट्टी झाल्यावर बाकी सर्व सभासद चहा पिण्याच्या खोलींत गेले व भातणकर हे आपल्याच जागीं बसून राहिले. तेथें बोर्डाचा शिपाई आला व ' तुम्हांस प्रेसिडेंट साहेब चहा पिण्याकरितां बोलावीत आहेत ' म्हणून त्यानें त्यांस सांगितलें. चहाच्या खोलींत गेल्यावर बोर्डाचे बाकी सर्व सभासद व बाहेरीलहि कांहीं मंडळी चहा घेत उभी असल्याचें दिसून आलें. भातणकरहि तेथें उभे राहिले व शिपायानें चहाचा कप त्यांच्या हातीं दिला. तो चहा भातणकरांनीं इतरांबरोबर उभें राहून घेतला. त्यावेळीं बोर्डाचा कोणी सभासद त्या बाबतींत बोलला नाहीं, व चहा तसाच टाकून कोणी बाहेर गेलाहि नाहीं. त्या बाबतींत त्या दिवशीं त्या खोलींत किंवा त्यानंतर बोर्डाच्या सभेंत कांहींच चर्चा झाली नाहीं. परंतु ' कुलाबासमाचार ' पत्रानें खोडसाळ व आगलावेपणाची बातमी प्रसिद्ध केली तिचा मात्र बोर्डाच्या सभासदांवर दुष्ट परिणाम झाला. कारण, ता. २७ जून रोजीं बोर्डाची सभा भरली त्यावेळीं चहाच्या सुट्टींत अध्यक्षांनीं अगोदरच भातणकरांना एका बाजूस बोलावून नेलें आणि सांगितलें कीं, ' गेल्या खेपेप्रमाणेंच आपण स्पर्शास्पर्शभेद न पाळतां या वेळींहि एकत्र चहा घेतला तर आजचा माझा चहाचा खर्च फुकट जाणार आहे. तरी तुम्ही वेगळ्याठिकाणीं चहा घ्या. ' त्यावर अध्यक्षांना भातणकरांनीं

विचारलें कीं, आपण सर्वांकरितां चहा केला आहे ना ? त्यावर अध्यक्षांनीं ' होय ' असें उत्तर दिलें. तेव्हां भातणकर म्हणाले कीं, ' तसें असेल तर वेगळ्या ठिकाणीं मी मुळींच चहा घेणार नाहीं '. ' तुम्ही व मी मिळून एका ठिकाणीं चहा घेऊं ' असें अध्यक्षांनीं सुचविल्यावर भातणकरांनीं, ही खाजगी गोष्ट नाहीं त्याअर्थी वरील सूचना आपल्यास कबुल नाहीं असें सांगितलें. तेव्हां अध्यक्ष म्हणाले कीं, आपल्या मनांत कांहींहि किंतु नाहीं, परंतु बोर्डाचे दुसरे कांहीं सभासद हरकत घेत असल्यामुळें आपला नाईलाज आहे. इतक्यांत रा. भाटे यांना अध्यक्षांनीं बोलावलें व ही हकीकत सांगितली. तेव्हां भाटे म्हणाले कीं, " मी रोहें म्युनिसिपालिटीचा अध्यक्ष असतांना चहाची व्यवस्था मी केली होती व त्यावेळीं असाच प्रश्न निघाला होता. परंतु मी मेंबराना असें स्पष्ट सांगितलें कीं चहा सर्वांसाठीं केलेला आहे. ज्यांना घ्यावयाचा असेल त्यांनीं एकत्र घ्यावा. ज्यांना एकत्र घ्यावयाचा नसेल त्यांच्या करितां वेगळी सोय करतां येणार नाहीं. त्याप्रमाणें ज्यांची हरकत नव्हती त्यांनीं एकत्र चहा घेतला व ज्याची हरकत होती त्यांना चहा मिळाला नाहीं. " रा. भाटे यांनीं आपलें उदाहरण सांगितलें तरी सोवळ्या सभासदांना सडेतोड सागण्याचें धैर्य अध्यक्षाना झालें नाहीं. शेवटी भातणकर यांनीं शिपायाकडून बाहेरील चहा चिवडा विकत आणविला. अशी खरी हकीकत आहे. यावरून, राष्ट्रीय गप्पा मारणारे व खादी वेष धारण करून मिरविणारे लोकच कसा आगलावेपणा करितांत तें दिसून येईल.

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. १६ ऑगस्ट १९२९.

५३

भोजन भास्कराचा उर्मटपणा

' भाला ' कार भोपटकरांनीं सालाबादप्रमाणें या वर्षीहि पुणें येथें लोकमान्य भोजनाचा समारंभ घडवून आणला. या भोजनाची जाहिरात आपल्या वर्तमान पत्रांतून देतांना, लोकमान्यपंथी स्पृश्य लोकांचेंच हें जेवण आहे ; असें म्हणून न थांबता ' या भोजनांत अस्पृश्यांना घेतलें जाणार नाहीं ' असें आणखी मुद्दाम जाहीर केलें होतें. लोकमान्यपंथ व त्याची शिकवण बहिष्कृत वर्गाला माहिती आहे व या भोजनामध्यें भाग घेण्यास कोणीही बहिष्कृतवर्गीय इसम उत्सुक असण्याचा संभव नव्हता. शिवाय, रोटी लोटीबंद ' भाला ' कारांच्या पुढारीपणाखालीं होणाऱ्या भोजनसमारंभाची बहिष्कृतांना कल्पना नव्हती असेंहि नाहीं. परंतु, बहिष्कृतवर्गांचा उर्मटपणानें मुद्दाम उपमर्द करण्याची संधी या भोजनभास्करानें वायां जाऊं दिली नाहीं. जातीचाच प्रश्न निघाला, तेव्हां पुण्याहून बहिष्कृतवर्गाच्या एका गृहस्थानें ' विविधवृत्ता ' ला लिहून कळविलें कीं, '' फुकटच नव्हे तर वर चार चार आणे दक्षिणा देऊं करूनहि या भोजनाला अस्पृश्यांना बोलाविलें असतें तरी तेथें कोणीं गेला नसता. ' भाला ' कारांचें जालीम ब्राह्मण्य आम्हांस माहित नाहीं कीं काय ? त्यांच्या घरी जेवावयास जावयाला आमचे जीव कांहीं वर आले नाहीत ! '' नरमेध हा नरमांसभक्षण पद्धतीचा अवशेष आहे. नरमेध उघडपणें करतां येइना तेव्हां भोजनांत विष घालून माणसें मारण्याचा पर्याय निघाला. या नरमेधात जांवयास विष घालून मारणे हें सर्वांत पुण्य कृत्य समजलें जात होतें. कोणत्याहि अस्पृश्य म्हटलेल्या जातीसंबंधानें अशा नरमेधाचा प्रवाद नाही. कोणत्या एका हिंदु जातीसंबंधानें असेल तर ती ' भाला '–कारांची जात होय. मनुष्यमांस भक्षकांना हल्लीं ख्रिस्ती लोक आपल्या धर्माची दीक्षा देऊन सुधारतात. या देशांत प्राचीनकाळीं वैदिक धर्माच्या प्रचारकांनीं ते काम केले, परंतु त्या मूळ स्वभावाचा अवशेष राहिला असें लोकप्रवादावरून दिसतें. मनुष्यमांस भक्षकांच्या (Cannibals) वंशजांच्या पंक्तीला बसून ठेवण्यात भूषण आहे असें कोणत्या अस्पृश्याला वाटेल !

●●●

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. १६ ऑगस्ट १९२९.

५४

वेंगुर्ल्याचा सत्यनारायण

सावंतवाडीच्या " वैनतेय " पत्रांत पुढील बातमी प्रसिद्ध झाली आहे :— " (वेंगुर्ले)* येथील सधन चांभार रामा याला नवसाचा सत्यनारायण करावयाचा होता. वेंगुर्ले शहरीं चांभारवाड्यात श्रीसत्यनारायणाची ही पहिलीच पूजा असल्यामुळें रूढिप्रिय स्थानिक पुरोहित वर्गातून पौरोहित्य करण्यास कोणीच पुढें होईना. त्यामुळें कामळेरहून श्री. सीतारामपंत पटवर्धन मुद्दाम आले व त्याच्या पौरोहित्याखालीं श्रीसत्यनारायणाची पूजा गेल्या आषाढपौर्णिमेच्या दिवशीं मोठ्या थाटानें पार पडली. शहरांतील सर्व वर्गांतील व जातींतील पुष्कळ प्रतिष्ठित मंडळी रामा चांभार याचे निमंत्रणावरून प्रसादाला आली होती. त्यांमध्यें किरातकर श्री. मराठे, श्री. गुंडोबा जोशी, श्री. झाट्ये, श्री. पेठे मास्तर, ख्यालगिरीचे बुवा वगैरे मंडळी प्रामुख्यानें दिसत होती. श्री. शेट्ये व गावडे वगैरे मराठा समाजातील मंडळी आपला भजनी मेळाही घेऊन आली होती. त्या मेळ्यानें सुस्वर भजनही केलें. हा समारंभ यशस्वी करण्याचे कामीं येथील खादी कार्यालयाचे व्यवस्थापक श्री. न. तु. वालावलकर यांनी फारच मेहनत घेतली. एकदां पायंडा पडला असल्यामुळें यापुढें सत्यनारायणाच्या पूजा करण्यास चांभारवर्गाला स्थानिक पुरोहित मिळण्याची अडचण पडणार नाहीं असें वाटतें. " ज्या लोकांनीं वरील पूजासमारंभाला प्रत्यक्ष हजर राहून अस्पृश्यांविषयीं सहानुभूति दाखविली त्यांना त्याचप्रमाणे रा. पटवर्धन, रा. वालावलकर प्रभृति अस्पृश्य वर्गातील पुढारी मंडळीला आम्ही धन्यवाद देतों. परंतु वरील बातमीपत्राचा लेखक जो आशा प्रदर्शित करतो ती आशा फलद्रूप झाली तर भिक्षुक वर्गाचा फायदा होऊन अस्पृश्यांच्या बोकांडीं एका नवीन खर्चाची रूढि बसेल अशी मात्र आम्हांस भीति वाटते ? शिवाय, सत्यनारायणाची पोथी बनावट आहे. तें प्रकरण स्कंदपुराणातल्या रेवाखंडातलें म्हणून भासविलेलें आहे, परंतु सदरील पुराणामध्यें खरोखर तें नाहीं. त्या पोथींतली ईश्वरविषयक कल्पना अगदीं हीन प्रकारची आहे. उलटपक्षीं, चोखोबा राय, रोहिदास

---

* जिल्हा सिंधुदुर्ग (महाराष्ट्र)

प्रभूतिसाधूंची ईश्वरविषयक कल्पना किती उदात्त आहे ! या संतांच्या देवाशीं सदरील पोथींतल्या मारवाडी स्वभावाच्या, निष्कारण रागावणाऱ्या, क्षुल्लक अपराधाबद्दल भयंकर सूड उगविणाऱ्या देवाची तुलना करून पाहिल्यास बहिष्कृतांनीं आपल्या चोखोबाच्या व रोहिदासाच्या देवाला सोडून या आधुनिक बनावट देवाला भजणें ही आध्यात्मिक पिच्छेहाटच समजली पाहिजे.

● ● ●

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. १६ ऑगस्ट १९२९.

५५

गणेशोत्सवाच्या सार्वजनिकत्वाची व्याख्या

गणेशोत्सव हा सार्वजनिक व राष्ट्रीय आहे असें म्हणण्यांत येतें. वस्तुतः राष्ट्रीयत्वाचा त्यांत कांहीं संबंध नाहीं. गणेशोत्सव ही धार्मिक बाब असल्यामुळें आणि हिंदी राष्ट्रांत अंतर्भूत होणाऱ्या मुसलमान, पारशी वगैरे अन्यधर्मीयांचा या उत्सवांत कांहीं संबंध येऊं शकत नसल्याकारणानें त्या उत्सवाला राष्ट्रीय म्हणणे म्हणजे ' राष्ट्रीय ' शब्दाची नुस्ती थट्टा करणेंच होय. हिंदूंचा सार्वजनिक उत्सव असें फार तर म्हणतां येईल. बाकी ' हिंदु ' या शब्दाची हल्ली जी व्याख्या करण्यांत येतें तिला अनुसरून मूर्तिपूजा व पुराणें न मानणाऱ्या आर्यसमाजी व प्रार्थनासमाजी उर्फ ब्रह्मसमाजी लोकांचा त्याचप्रमाणें वैदिक धर्मात न समावणाऱ्या लिंगायत, जैन, शीख व बौद्ध या पंथांच्या लोकांचाहि हिंदूंमध्यें समावेश केला जातो. या दृष्टीने गणेशोत्सव हा सर्व हिंदूंचाहि धार्मिक उत्सव आहे असें म्हणता येत नाहीं. परंतु या उत्सवाचें पुरस्कर्ते तो हिंदूंचा सार्वजनिक म्हणत असतात, आणि गमंत ही कीं, सार्वजनिक उत्सव म्हणून त्यांत जातिभेद पाळला जातो. उत्सवाला सार्वजनिक म्हणावयाचें, सर्व जातींच्या हिंदूंकडून त्याकरितां वर्गणी घ्यावयाची आणि एका विशिष्ट जातीच्या लोकांनीं इतरांना तुच्छ लेखून उत्सवामध्यें वागवावयाचें. जातिभेद, स्पर्शास्पर्श वगैरे सर्व बंडे या उत्सवात चालूच ठेवावयाचीं. दादर येथें गेल्या वर्षापर्यंत अशा रीतीनें सार्वजनिक गणपत्युत्सव साजरा करण्यांत येई. गेल्या सालीं ब्राह्मणेतर व अस्पृश्य मानलेल्या जातींच्या मंडळीनें असल्या ढोंगी सार्वजनिकपणाला हरकत घेतली. त्यावेळीं स्वाभिमानी मंडळीचा जोर पाहून उत्सवाच्या वतनदार चालक मंडळीनें पडतें घेतलें त्यावेळीं जी तडजोड झाली होती ती सर्वस्वीं समाधानकारक होती असे नाहीं. परंतु वतनदार चालकांना तूर्त इतका डोस पुरे आहे असें वाटून स्वाभिमानी मंडळीनें विशेष आग्रह धरला नाहीं. तथापि, यावर्षी वतनदार चालकांनीं ती तडजोडही धुडकावून लावून पुनः एकजात पेशवाई आरंभिली आहे ! उत्सवाला ' सार्वजनिक ' म्हणण्याचें, त्यांच्या करितां सर्व जातींच्या हिंदूकडून वर्गणी गोळा करावयाची आणि पुनः गणपतीला ब्राह्मणेतरांच्या पूजेचा किंवा नैवेद्याचा विटाळ होऊं द्यावयाचा नाहीं. जणू काय गणपती म्हणजे

भटजातीचा जातभाईच असे समजून त्याचा बंदोबस्त ठेवावयाचा ! ब्राह्मणांनीं आपल्या देवघरांत गणपतीला खुशाल वाटेल तितक्या सोवळ्यांत ठेवावें, परंतु सार्वजनिक गणपतीला ब्राह्मणांचा कैदखाना कशाला ? सोंवळ्या लोकांना इतरांचा संबंध खपत नसेल तर त्यांनीं आपल्या जातीपुरताच उत्सव करावा आणि दुसऱ्या जातींच्या माणसांकडून त्या उत्सवासाठीं वर्गणी घेऊं नये. तसें ते करीत नसतील तर इतर जातींनीं असल्या तोतया सार्वजनिक उत्सवाला वर्गणी देऊं नयें, त्याच्यावर कडकडीत बहिष्कार घालावा. सार्वजनिक व धार्मिक उत्सव अशा रीतीनें करण्यापेक्षां न केलेले बरें. सांप्रत या उत्सवामुळें हिंदूंची एकी होण्याच्या ऐवजी त्यांच्यातली फाटाफूट वाढण्यास मात्र साहाय्य होत आहे. आणि हिंदु संघटनेच्या गप्पा मारणारें लोकच ही फाटाफूट वाढवीत आहेत ?

●●●

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. १६ ऑगस्ट १९२९.

५६

वर्तमानपत्रांतल्या जाहिराती

पुष्कळ वर्तमानपत्रकर्ते द्रव्यलोभाला बळीं पडून आपल्या वर्तमानपत्रांत जाहिराती प्रसिद्ध करण्याच्या बाबतींत विधिनिषेध बाळगीत नाहीं. मराठी वर्तमानपत्रांमध्ये औषधाच्या घाणेरड्या मजकुराने भरलेल्या जाहिरातींचा सुळसुळाट पूर्वीपासून आहे. बऱ्याचशा जाहिराती फसवेगिरीच्या व कांहीं तर अनितीला उघड उत्तेजन देणाऱ्या, शरीरप्रकृतीची नासाडी करणाऱ्या, वाचकांच्या अनिष्ट वासनांचें उद्दीपन करणाऱ्या अशा असतात. तशाच कांहीं जाहिराती विलायती दारु संबंधांच्या असतात. अशा जाहिराती वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध न होणें हें सार्वजनिक हित दृष्ट्या सर्वथैव इष्ट आहे. नाशिक येथें याबाबतींत कांही वर्तमानपत्रकर्त्यांनी उपक्रम केला आहे. तो स्तुत्य आहे. त्या संबंधाची माहिती आमच्याकडे प्रसिद्धीसाठीं आली असून ती आम्ही दुसरीकडे दिली आहे. त्या माहितीवरून, दारू व कामोत्तेजक औषधे यांच्या संबंधाच्या जाहिरातीवर सदर पत्रकर्त्यांनीं बहिष्कार घालण्याचें ठरविलें असल्याचें दिसून येते. देशावरील बहुतेक वर्तमानपत्रांत नवरा बायकोच्या एकमेकांनां नोटीसा छापलेल्या असतात. कित्येक पत्रांत तर अशा नोटीसांखेरीज इतर मजकूर केवळ नांवाला असतो. या नोटीसांमध्येहि कित्येक वेळा अश्लील मजकूर असतो तोहि न येऊं देण्याची व्यवस्था झाली पाहिजे.

● ● ●

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. १६ ऑगस्ट १९२९.

सापांत चांभार आहेत की माणसांत साप आहेत ?

सापांमध्यें सुद्धां जाती आहेत !

ता. ३ जून १९२९ सोमवार रोजीं रात्रौ ८ वाजण्याचे सुमारास पेण येथील महारवाड्यांतील पिठ्या महादू नावाचा एक महार बेशुद्ध स्थितींत दवाखान्यांत उपचाराकरितां आणण्यांत आला. डॉ. कर्णिक यांनी त्याला उपचार करण्यास सुरुवात केली असतां त्याला ताडे येऊ लागले. डॉक्टरसाहेबांनीं फौजदारसाहेबांना बोलावणें पाठविलें. त्यांनीं येऊन रोग्याची स्थिति पहातांच तर्क बांधला कीं, त्याला सर्प वगैरे कांहीं तरी विषारी जनावर लागलें असावें ; तो दारूनें झिंगलेला रोगी नव्हे. लागलीच त्यांनीं येथील सर्पमांत्रिक रा. वासुदेवशास्त्री जोशी वैद्य यांजकडे बोलावणें पाठविले व दुसरें सर्पमांत्रिक रा. विष्णुपंत ओक यांचेकडे पिठ्या महाराला रवाना केले. डॉ. कर्णिक हेहि जिज्ञासेनें तेथे गेले. तेथें रा. ओक यांनी मंत्रांचें पाणी मारून सर्व विष उतरविण्याचा प्रयोग केला. सर्प अंगात येऊन त्यानें आपली जात चांभार असें सांगितलें व शेवटीं रीतीप्रमाणें शपथ घेऊन तो गेला. रा. वासुदेवशास्त्री हे निरोप पोचून दवाखान्यात गेले व तेथून ओकांकडे गेले त्यां वेळी दंशित मनुष्य बरा होऊन आपल्या पायानें घरीं जाण्यास निघाला होता. पुढें थोड्या वेळानें शास्त्रीबोवा आपल्या घरीं आले तों आपल्या घरी पुनः पिठ्यास बेशुद्ध स्थितींत आणण्यांत आल्याचें पाहून त्यास चमत्कार वाटला. चौकशीअंती त्यांना समजलें कीं, पिठ्या घरीं जातो न जातो तोंच त्यास पुनः ' लहर येऊन ' ताडे येऊं लागले म्हणून आता त्याला त्यांच्याकडे उतरविण्याकरिता आणलें आहे. त्यांनीं लागलीच पाणी मारण्यास सुरुवात केली. डॉ. कर्णिकास त्यांनी मुद्दाम निरोप पाठवून बोलावून घेतलें.

पाणी मारण्यास सुरवात होताच सर्पाचा संचार दंशिताच्या आंगांत झाला व तो मंत्र्याच्या* आंगावर जाण्याकरिता त्वेषानें धडपडू लागला. या त्वेषांत मांत्रिक त्याच्या तडाक्यांत सांपडून त्यांने त्याला जर दंश केला तर मांत्रिकाचा निश्चित मृत्यूच असल्यामुळें सर्पसंचार झालेल्या दंशितास फार सावधगिरीनें बांधून ठेवावें लागतें. पिठ्या महाराच्या आंगात मंत्राच्या पाण्याच्या मारानें इतका त्वेष आला

* मांत्रिकाच्या ' असावे–संपादक.

होता कीं त्याला आवरण्याकरितां १०-१२ माणसे लागली. सर्प त्याच्या आंगात आल्यानंतर पुढील प्रश्नोत्तरें झाली--

१ ' तूं कां चावलास ? ' ' वेल ओढतांना मला ढका लागला म्हणून चावलों ' २ ' आतां कोठें आहेस ? ' ' जंगलांतच आहे '. ३ ' तुझी जात काय ? ' चांभार ' ४ ' तुला मघाशीं ओकांनीं पाणी घातले व तूं शपथ घेऊन गेलास, मग आतां पुन्हां कसा आलास ? ' ' मी त्यांना शपथ घेतांना फसविलें ' ५ 'मग आतां जातोस कीं नाही ? मलाहि पुन्हां फसवणार काय ? ' ' नाहीं, आतां खरेंच जातो. ' ६ ' तूं जातीचा चांभार आहेस तेव्हां तुला शपथ पायतणाची घेतली पाहिजे. ' ' घेतो. तुम्हीं सांगाल ती घेतों, ' ७ ' मघाशीं तूं पायतण हातानें उचलून शपथ घेतलीस व लोकांना फसविलेंस. आतां तुला पायतण तोंडानें उचलून शपथ घेतली पाहिजे ' ' तशी शपथ मी घेतो '. असें म्हणून आपल्या दांतांनीं त्यानें पायतण उचललें व मांत्रिकानें सांगितल्याप्रमाणें ' जातो जातो ' असें एका दमांत न थांबतां म्हणून त्यानें जमिनिवर डोकें ठेवून शपथ रीतसर पुरी केली. लागलीच तो महार साफ शुद्धीवर आला व मंत्र्यानें दिलेलें मंतरपाणी पिवून आपल्या पायांनीं हुशारीनें चालत घरी महारवाड्यात गेला. तेव्हांपासून आज तागायत तो खडखडीत बरा असून कामधंदा करीत आहे.

येथील सरकारी डॉक्टर मे. कर्णिक यानीं वरील सर्व हकीकत समक्ष पाहिली असून, वरील सर्व मजकूर त्यांना दाखवूनच आम्ही प्रसिद्ध करीत असल्यामुळें त्याच्या खरेपणाविषयीं संशयाला जागा नाहीं. म्हणून मंत्रीशास्त्रावर अविश्वास करणाऱ्यांना आपण बरोबर किंवा चूक आहों याचा पडताळा पाहण्याला या हकीकतीचा विशेष उपयोग होईल अशी आशा वाटते. मनुष्यामधील जातीचे बंड मोडण्याला निघालेल्या सत्यसमाजिष्टांना अथवा जातपात तोडक मंडळांना, सरपटणाऱ्या प्राणिवर्गामध्येंहि जातीचें बंड आहे हें वरील समजूत हकीकतीवरून, तें कसें मोडावें याची नवी चिंता यापुढें उत्पन्न न होवो म्हणजे झाले.

' कुलाबा समाचार. '

सापांत चांभार आहेत कीं माणसांत साप आहेत ?

वरील सारख्या हकीकती मधून मधून कांहीं लोक प्रसिद्ध करीत असतात आणि त्यामुळें साधारण माणसांच्या मनांत भ्रामक समजुती उत्पन्न होतात किंवा आधीच असलेल्या तशा समजुती दृढतर होतात.

वरील हकीकती वरून पिठ्या महाराला साप चावल्याबद्दलची माहिती किंवा तसा संशय कोणास पूर्वी नव्हता कदाचित खुद्द पिट्यालाहि आपल्यास साप

चावल्याबद्दलची खात्री नसेल, असें म्हणावें लागतें. कारण, त्याला दवाखान्यांत ज्यांनी पोचविलें त्यांना ती माहिती नव्हती ; नाहीपेक्षां डॉक्टरांनी त्याला भलतेच उपचार केले नसते. डॉ. कर्णिक यांनी पिठ्याला सर्पदंश झाल्याबद्दल, त्याला मांत्रिकाकडे पाठविण्यापूर्वी स्वतःची खात्री करून घेतली नव्हती, असेंहि सदरील हकीकतीवरून म्हणावें लागतें.

सर्पदंश पूर्णपणे झाला नाहीं म्हणजे सर्पाचे पुरे विष माणसाच्या अंगांत पडले नाहीं तर त्या विषाचा प्राणघातक परिणाम होत नाहीं आणि विष उतरण्याचें श्रेय मांत्रिकाला किंवा वैद्याला मिळतें. पिठ्याला पुर्ण दंश झाला होता किंवा त्याच्या आंगांत अपुरें विष पडलें होतें, अथवा दंश मुळींच न होतां मनाची भावना किंवा भीति यामुळेंच त्याला विष बाधेची लक्षणे होत होती याबद्दल कोणींच स्वतःची खात्री करून घेतलेली दिसत नाहीं. अपुऱ्या विषाचा परिणाम आपोआपच कांहीं वेळानें कमी होऊ शकेल आणि भावनेचा परिणाम असल्यास मांत्रिकाला फुकटचे श्रेय मिळेल, हें विसरतां कामा नये. या बाबतींत परळ येथील लेबॉरेटरीमध्यें व इतरत्र शोधक डॉक्टरांनीं जे प्रयोग करून पाहिले आहेत त्यांना, सर्पाचें विष पूर्णपणें अंगांत पडलें असतां तें उतरणारा एकहि मांत्रिक आढळलेला नाहीं.

मांत्रिकाच्या मंत्रामुळें पिठ्याच्या अंगात त्याला चावलेल्या सापाचें वारें आलें आणि त्यानें आपली हकीकत सांगितली, हा प्रकार कितपत खरा मानावयाचा याच्या बद्दल थोडा विचार केला असतां, कोणासहि जबर शंका येईल. श्रद्धाळु माणसानें आपल्या अंगांत सापाचें वारें आलें असें समजून उत्तरें देणें अशक्य नाहीं परंतु तीं उत्तरें कितपत खरीं मानावयाचीं हाच काय तो प्रश्न आहे. ज्या वेळीं पिठ्याच्या अंगांत सापाचे वारें येऊन तो बोलत होता, त्या वेळीं त्याच्याच म्हणण्याप्रमाणे साप जंगलांत जीवंत होता. सापाला दोन आत्मे असतात कीं काय ? त्याशिवाय, एकाच वेळीं स्वतःचा देह व दुसऱ्याचा देह अशा दोन ठिकाणीं त्याचें अस्तित्व कसें असूं शकेल ? कीं सापाला परकाया प्रवेशाची योगविद्या अवगत असते ? जीवंत माणसाचें वारें कोणाच्या अंगांत आणतां येत नाहीं, मग जीवंत सापाचें तरी कसें आणतां यावें ?

सापानें आपली जात चांभार म्हणून सांगितलीं. चांभार ही जात धंद्यावरून झालेली आहे. अमुक एका स्वभावावरून जात उत्पन्न होत नाहीं. सुष्टपुष्ट जसे इतर जातींत असतात तसे चांभारातहि असतात. माणसांच्या समाजांत चांभारांचा धंदा हा उपयोगीं धंदा आहे. परंतु सापांत चांभाराचा धंदा काय उपयोगाचा ! सापांना पायच नाहींत मग ते जोडे, वहाणा, बूट कसे वापरणार ? अर्थात सापांत जर कोणती जात मुळींच नसेल तर ती चांभाराची

होय. माणसांप्रमाणें सापांत जाती असतील तर पोटजातीहि कशावरून नसतील ? कांहीं साप ' कुलाबा समाचार ' कर्त्यांच्या जातीचे, कांहीं ' सुदर्शन ' काराच्या जातीचे, कांहीं ' भाला ' काराच्या जातीचे, असण्याचाहि संभव आहे. त्याप्रमाणे आहाराचे निर्बंधहि ते पाळीत असतील. हे ब्राह्मण साप अर्थातच अंडी, बेडूक वगैरे खात नसतील, मात्र त्यांतल्या त्यांत ' सुदर्शन ' काराचे जातभाई साप पाण्यात शिरून कदाचित पाणशेंगांचा फन्ना उडवीत असतील !

' कुलाबा समाचारांतील वरील हकीकत वाचून साप वगैरे सरपटणाऱ्या प्राणीवर्गामध्ये सुद्धा जातीचें बंड आहे अशी आमची खात्री होत नाहीं. मात्र त्या हकीकतीवरील समाचार कर्त्यांची संपादकीय मल्लीनाथी वाचून माणसांमध्यें सुद्धा कांहीं सरपटणाऱ्या प्राण्यांच्या जातींचें लोक आहेत ते आपल्या विषारी विचारांनीं भोळसर लोकांची विचारशक्ति पंगु करण्याचा प्रयत्न करितात या विषयीं आमची खात्री होऊन चुकली !

सं. बं. भा.

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. १६ ऑगस्ट १९२९.

५८

अस्पृश्यांना मंदीर प्रवेश

(हिं. सं. च्या प्रचारकाकडून)

हिंदुसभेच्या कार्याचा प्रचार जिल्ह्यांत व्हावयास लागल्यापासून अस्पृश्यबंधूंविषयीं स्पृश्य हिंदूच्या ठिकाणीं कशा प्रकारें सहानुभूती उत्पन्न व्हावयाला लागली याचे प्रत्यंतर एलीचपुर * येथें नुकतेंच घडून आलें आहे. एलीचपुरला सुलतानपुऱ्यामध्यें स्वामी विमलानंद यांनीं भिक्षेवर ८३,००० रुपये जुळवून एक सुंदर व प्रेक्षणीय दत्त मंदीर बरेच दिवसापूर्वी बांधले आहे. सदहू मंदिराप्रीत्यर्थ नेमल्या गेलेल्या कमेटीच्या सभासदांनीं

अस्पृश्यांना मंदीर खुलें करण्याचें ठरवून

तो संस्मरणीय प्रसंग ता. ३१ जुलै १९२९ रोजीं श्रीशेठ जमनालालजी बजाज यांच्या हस्तें घडवून आणला. माननीय श्रीशेठ जमनालालजी यांची दुपारी मिरवणूक निघून ज्या मंदिरांत अस्पृश्यांचा प्रवेश व्हावयाचा होता त्याच मंदिरासमोर स्पृश्यास्पृश्य हिंदूंची डॉ. पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखालीं जाहीर सभा होऊन श्री. विनोबाजी भावे व जमनालालजी बजाज यांची स्फूर्तिदायक भाषणें झालीं. सभा आटोपल्यानंतर जमनालालजी यांच्या नेतृत्त्वांखालीं सरासरी १०० अस्पृश्य बंधूंनीं मंदिर प्रवेश केला आणि भक्तियुक्त अंतःकरणानें देवदर्शन घेतलें. मंदिर प्रवेश होऊन देवदर्शन झाल्यानंतर अस्पृश्य बंधूंच्या मुखांतून हिंदुधर्मावर निष्ठा व्यक्त करणारी एक गगनभेदी आरोळी उठली व ती म्हणजे ' हिंदु धर्म कीं जय ' ही होय !

सायंकाळीं स्थानिक हिंदु सभेमार्फत सभा होऊन नागरिकांनीं माननीय जमनालालजी यांना मानपत्र अर्पण केलें व अशा रीतीनें झालेल्या प्रकाराबद्दल आपली सहानुभूति व्यक्त केली. सदहू प्रसंगाला श्री. दास्ताने वकील, सत्यदेव विद्यालंकार, डॉ. भोजराज, डॉ. सबनीस वगैरे मंडळी हजर होती.

जिल्ह्यांतील प्रत्येक तालुक्यांतून हिंदुसभा प्रेमी लोकांनीं तूर्त निदान एक तरी मंदीर अस्पृश्य बंधुकरितां खुलें करण्याचें ठरविलें तर अमरावती जिल्ह्यांत अस्पृश्यता नष्ट व्हावयाला कितीसा काळ लागणार आहे ? सदहू प्रसंगीं

---

* जिल्हा अमरावती (महाराष्ट्र)

श्रीस्वामी विमलानंद व मंदिराच्या कमिटीचे सभासद यांनीं जी मनाची उदारता दाखविली त्याबद्दल त्यांचे कोण अभिनंदन करणार नाहीं.

नवा काळ.

मुंबईच्या हिंदुमहासभेचे लोक आपली पोकळ बडबड सोडून अस्पृश्यता निवारणाच्या कार्याला मनापासून लागतील तर मुंबईतही मंदीर प्रवेश होण्यास विलंब लागणार नाहीं. पण त्यांच्या मनांतून अस्पृश्यता निवारण करण्याचें नाहीं. तोंडपाटीलकी करून मोठेपणा घेऊन जगांत अस्पृश्यता निवारणाचा डांगोरा पिटावयास पाहिजे एवढेंच त्यांचे कार्य होय. अस्पृश्य वर्गांतील एखादा मांग, चांभार किंवा महार ज्याला कोठें आपला लब्धप्रतिष्ठितपणा मिरवावयास मिळत नसेल तो आपल्या बाजूला वळला किंवा आपल्या पंखाखालीं आला म्हणून गंगेत घोंडे न्हाले असें समजूं नये तर खरें भरीव कार्य करून दाखवावें. इच्छा असली तर मार्ग सांपडतो. सभांत पास होणाऱ्या कागदी ठरावांनीं काम होत नसतें. या पुढें तरी मुंबईचे हिंदु महासभावाले अंतःकरणा पासून कामाला लागतील आणि " बोले तैसा चाले " या साधुक्तीची सत्यता पटवितील काय ?

सं. ब. भा.

बहिष्कृत भारत, ता. १६ ऑगस्ट १९२९.

५९

आमची कैफियत

या जगात सर्वांचें समाधान करणें कोणाला शक्य नाहीं. सर्वांचे समाधान करण्याचा जो कोणी प्रयत्न करील त्याच्या हातून कांहीच व्हावयाचें नाहीं. त्याचप्रमाणें या जगांत ' अजातशत्रु ' कोणी नाही. युधिष्ठिर धर्मराजाला ' अजातशत्रु ' अशी संज्ञा दिलेली आहे. स्वतः धर्मराजा कोणाशी शत्रुत्व करीत नव्हता, या दृष्टीनें तो अजातशत्रु होता ; परंतु त्याच्याशीं शत्रुत्व करणारे दुर्योधनासारखे त्याचेच भाऊबंद होते. सार्वजनिक कामांत पडणाऱ्या माणसाला तर सर्वांचें समाधान करणें अशक्य असतें आणि कोणी सार्वजनिक कार्यकर्ता लोकसंग्रहाचो भलतीच व्याख्या करून सर्वांचें समाधान करण्याच्या फंदात पडेल तर त्याला, वर म्हटल्याप्रमाणे म्हणण्यासारखें कांहीं काम करता येणार नाहींच. परंतु त्याशिवाय त्याला तत्त्वनिष्ठा सोडावी लागेल. आम्ही जेव्हा सार्वजनिक कार्यात पडलों तेंव्हा, आमच्यावर कोणाची टीका होणार नाहीं अशी आमची मुळीच अपेक्षा नव्हती. कदाचित् त्या वेंळीं, सार्वजनिक आयुःक्रमाच्या महासागरांतील अंतर्गत प्रवाह व आडवे प्रवाह (undercurrents and crosscurrents) यांच्या संबंधानें आम्हास पुरेशी कल्पना नसेल, कदाचित् त्या वेळी आम्ही हल्लींपेक्षा विशेष आशावादीही असूं ; परंतु सार्वजनिक आयुःक्रम म्हणजे एक प्रकारचें रणांगण आहे, त्यात प्रतिपक्षाबरोबर दोन हात केलेच पाहिजेत आणि एका बाबतींत मित्र असणारे दुसऱ्या बाबतीत शत्रु होण्याचा संभव असतो, हे मात्र आम्ही पूर्णपणे जाणून होतो. अर्थात आमच्यावर वेगवेगळ्या पक्षांच्या लोकांकडून वेगवेगळ्या प्रसंगीं जी टीका होते त्याबद्दल आम्हास आश्चर्य वाटत नाहीं. आमच्या अंगीकृत तत्त्वांवर आमची पूर्ण श्रद्धा आहे, आमच्या हेतूच्या पावित्र्याबद्दल आमची पूर्ण खात्री आहे, म्हणून आम्हाला आमच्यावर होत असलेल्या टीकेबद्दल वाईट वाटत नाहीं. प्रतिकूल परिस्थितीमुळें निराशेचा पगडा केव्हा केव्हां मनावर बसूं पाहतो, परंतु अद्यापि तरी तो आम्ही आमच्या मनावर बसूं दिलेला नाहीं. आमच्या हातून चुका होत नाहींत असें आमचे म्हणणें नाहीं आणि आमच्या चुका खरोखर प्रामाणिक बुद्धीनें जर कोणी दाखविल्या तर त्याचा आम्हाला मुळींच विषाद वाटत नाही, इतकेंच नव्हे तर तशा माणसाचे आभार मानून त्याच्या टीकेचा विचार करण्यास आम्ही सदैव तयार असतों. मनुष्यसमाजात सर्वज्ञ व अस्खलनशील असा कोण आहे ? असो. आमच्या टीकाकारांचे अनेक वर्ग करतां येतील. कांहीं

टीकाकार सार्वजनिक मतभेदास्तव आमच्यावर हल्ला करतात तर कांहीं लोक खाजगी द्वेषाने प्रेरित होऊन आडगोळ्या मारतात. अस्पृश्यतानिवारण हा उद्देश ज्यांना मान्य आहे, त्यांतल्या कांहींना आम्ही फार जहाल आहों असे वाटतें म्हणून आमच्यावर तुटून पडतात तर काहींना आम्ही मवाळ आहों असे वाटतें म्हणून [illegible] आमच्या [illegible]

बहिःशत्रु व अंतःशत्रु

असे दोन वर्ग करता येतील. अर्थातच, आमच्या उद्देशाविषयीं ज्यांची मनःपूर्वक सहानुभूति आहे, परंतु तपशिलाच्या बाबतींत ज्यांचा आमच्याशीं मतभेद आहे, आमची चळवळ हाणून पाडण्याची ज्यांची इच्छा नाहीं, तसेंच जे खाजगी द्वेष किंवा हेवा न बाळगतां आपुलकीच्या भावनेने मतभेद प्रदर्शित करितात, अशा टीकाकारांना आम्ही आमच्या शत्रुवर्गात लेखीत नाहीं. बहिःशत्रूंमध्ये अस्पृश्यवर्गीयेतर सर्व शत्रूंचा समावेश होतो. या बहिःशत्रूंमध्ये अनेक पोटभेद [illegible] अस्पृश्यता हे हिंदुधर्माचे लांच्छन नसून ती त्याची शोभा आहे, जातिभेद हे हिंदुधर्माचे वैशिष्ट्य आहे. जातिभेद नाहीसा झाला तर हिंदुधर्म नावाला जिवंत राहिला तरी तो नामशेष झाल्यासारखाच समजला पाहिजे, असे म्हणणारा [illegible] भेटीबंद हिंदुधर्माचा अभिमानी वर्ग हा केव्हांही आमच्याशी शत्रुत्व करणारच. त्यांच्या खालोखाल, केवळ भेटीव्यवहार व्हावयास हरकत नाही, [illegible] बेटी व लोटी याच्या बाबतींत बंदी राहिलीच पाहिजे असें [illegible]. परंतु भेटीव्यवहाराच्या बाबतीतही अगदीं ' आस्ते कदम ' म्हणून नेहमी ओरडत राहणाऱ्या लोकांचा पक्ष होय. या पक्षांतही काही लोक असे आहेत कीं अस्पृश्यता [illegible] नाहीशी होईल असे म्हणून काळावर हवाला देऊन अस्पृश्यांनी स्वस्थ बसावें, आपले हातपाय हालवू नयेत, असे त्यांना वाटतें. अस्पृश्यता हा अन्याय आहे हें नाकबूल करण्याचे धैर्य त्यांना होत नाही, परंतु अस्पृश्यतेच्या तटाला एखादे भगदाड पडले तर तें पाहून त्यांच्या आंतड्याला पीळ पडल्याखेरीज रहात नाहीं ! अर्थातच अशा लोकांच्या जिवाला अस्पृश्यतानिवारणाच्या बाबतींत निष्क्रियतेखेरीज दुसऱ्या कशानें समाधान वाटावयाचें नाहीं. त्यांचे समाधान करणें आम्हास बिलकूल शक्य नाही हे सांगावयास नकोच. ' आस्ते कदम ', म्हणणाऱ्या व खरोखरच तशी समजूत असणाऱ्या लोकांच्या मतें ' आस्ते ' म्हणजे गतीचे प्रमाण कमीत कमी किती मंद असले पाहिजे हें समजत नाहीं व आमची [illegible] आहे की तें त्यांनाही सांगता येणार नाही. दुसरा वर्ग हिंदुमहासभावाल्यांचा. या वर्गातील लोकांना अस्पृश्यांच्या संबंधाने पान्हा फुटतो तो केवळ बहिष्कृत समाजातील लोक मुसलमान किंवा ख्रिस्ती धर्मात जाऊ नयेत,

एवढ्याचसाठीं. हिंदूंचे संख्याबळ कमी होऊं नये, वाढवितां आलें तर वाढवावें, याच एका हेतूने ते प्रेरित झालेले असतात. सामाजिक न्याय, समता व बंधुता याची त्यांना काही किंमत वाटत नाही. बहिष्कृतांना नुसते चुचकारून ठेवावयाचें, त्यांच्या डोळ्याला उगीच पाणी लावावयाचें आणि बाह्यात्कारी आपलेपणा दाखवून हक्कांचा प्रश्न निघाला म्हणजे त्यांच्या तोंडाला पाने पुसावयाची हें हिंदुमहासभावाल्यांपैकीं बहुतेकांचे धोरण आहे. बहिष्कृत वर्गातले लोक आपल्या लाटाखालचीं मांजरें व्हावी असा त्यांचा अंतःस्थ हेतु असल्याकारणानें बहिष्कृत वर्गाची स्वतंत्र चळवळ त्यांना खपत नाहीं, त्या चळवळीचा ते द्वेष करितात आणि त्या चळवळीत पुढाकार घेणाऱ्या लोकांना ते आपल्या शत्रूप्रमाणें लेखतात. बहिष्कृतांनी स्वयंस्फूर्तीने काहीं चळवळ करूं नये, आपल्या गोडगोड थापा डोळे मिटून खऱ्या मानाव्या, माणुसकीच्या हक्कांची मागणी करू नये, मागणी केलीच तर ती हक्क म्हणून नव्हे तर याचना म्हणून करावी, जातिभेदाच्या पोलादी चौकटीला धक्का लावण्याचा प्रयत्न करू नये आणि ज्या कांहीं किरकोळ सवलती मेहरबानी म्हणून वरिष्ठ वर्गातले लोक त्यांच्या तोंडावर टाकतील त्यातच समाधान मानून ऱ्हावे व त्याबद्दल कृतज्ञ असावे, अशी या ढोंगी हिंदुसंघटनावाद्यांची इच्छा असते. दुसरे कित्येक सुधारणावादी मतांचे परंतु विशिष्ट धर्मपंथांचे व मूर्तिपूजेचा निषेध करणारे लोक आहेत, त्यांना देवळांत जाण्याच्या हक्कासंबंधाने अस्पृश्यांनी चळवळ करणें पसंत पडत नाहीं. त्यांना वाटतें कीं अस्पृश्यांनी प्रार्थनासमाजिस्ट किंवा आर्यसमाजिस्ट व्हावे. कट्टया ब्राह्मणेतरांना बहिष्कृतांच्या चळवळीने ब्राह्मणेतर चळवळीची कास धरून चालावें, ब्राह्मणेतर चळवळीचे पुढारी म्हणतील तसे अस्पृश्यांच्या पुढाऱ्यांनी वागावें, बहिष्कृतांच्या चळवळीवर ब्राह्मणांची मग ते उदारमतवादी असले तरी त्यांची दुरून सावलीही पडूं देऊ नयें आणि ब्राह्मणेतर पुढारीच आपल्याला सुस्थिति प्राप्त करून देतील असा दृढ भरवंसा बाळगून स्वतंत्र चळवळीच्या भानगडीत पडूं नये, असें वाटतें. ही बहिष्कृतवर्गाबाहेरील लोकांची गोष्ट झाली. आता खुद्द आमच्याच वर्गातले आमचे जे आक्षेपक आहेत त्यांच्याकडे पाहिलें तर असें दिसून येईल कीं, काहीं लोक जातिभेदानें किंवा मत्सराने प्रेरित झालेले आहेत व काही वैयक्तिक कारणांनुळें असंतुष्ट आहेत. बहिष्कृतवर्गात अनेक जाती व पोटजाती आहेत. आपली जात आणि त्यातही आपली पोटजात बाकी बहिष्कृतांपेक्षा श्रेष्ठ असें समजणारे व आपल्या जातभाईंना तसे सांगून त्यांना आपला सवता सुभा स्थापण्याचा उपदेश करणारे काहीं लोक आहेत. बहिष्कृतांच्या सर्व वर्गांची एकच चळवळ करणें म्हणजे ' सबगोलंकार ' करणे आहे, अस्पृश्यता दूर होण्यास कालावधी लागला तरी हरकत नाहीं, परंतु आपल्या पोटजातीचा सवता सुभा

कायम राहिला पाहिजे, असे त्यांना वाटतें. सगळ्यांची एकच चळवळ झाली तर सबगोलंकार होऊन आपल्या पोटजातीला आपण इतर बहिष्कृतांपेक्षां वरिष्ठ दर्जाचे आहोंत असे सांगावयास वाव मिळणार नाहीं अशी त्यांना भिती वाटतें. शिवाय बहिष्कृतांच्या सर्व जातींची एकच चळवळ झाली तर आपल्यास सध्यां पुढारी समजणारे जातभाई दुसऱ्या जातीच्या पुढाऱ्यांचे अनुयायी होऊन आपण निर्माल्य होऊं हाही वैयक्तिक स्वार्थाचा विचार या सवत्या सुभ्याच्या खटपटींत अंतःस्थ ज्ञातरत असतो. दुसरे कित्येक लोक बहिष्कृतांचा पुढारीपणा ही आपली वतनदारीच आहे, हा आपला खासगी हक्कच आहे असें समजत होते, इतकेंच नव्हे तर या पुढारीपणाचा फायदा घेऊन समाजावर चरत होते.

लोक अज्ञानांत राहिले तरच आपला पुढारीपणा टिकेल असें त्यांना वाटणें स्वाभाविक असल्यामुळें समाजजागृति करणारी धडाडीची चळवळ त्यांना असह्य झाली तर त्यांत आश्चर्य नाहीं. आपली पुढारीपणाची वतनदारी गेलेली पाहून आमच्या चळवळीवर आडगोळ्या मारण्याचें काम त्यांनीं चालविलेलें आहे. दुसऱ्या कित्येक लोकांचा डॉ. आंबेडकर या व्यक्तिवर घुस्सा झालेला आहे व तें त्यांच्याशीं उघड किंवा प्रच्छन्न शत्रुत्व करूं लागले आहेत याचें कारण असें आहे कीं त्यांच्या खाजगी महत्त्वाकांक्षांचें समाधान करणें आंबेडकरांना शक्य झालेलें नाहीं. आंबेडकर आपल्या सामर्थ्याप्रमाणें सर्वांना मदत करावयास तयार असतात, परंतु सर्वांच्या खाजगी महत्त्वाकांक्षांचें समाधान करणें त्यांना शक्य नाहीं. आंबेडकरांनीं नुसता रस्ता दाखवून उपयोगीं नाहीं, हातानें धरून चालवूनहि उपयोगीं नाहीं, तर त्यांनीं आपल्या खांद्यावर घेऊन गेलें पाहिजे ! आंबेडकरांनीं कोणाकोणाला म्हणून खांद्यावर घेऊन जावें ? घरांत पाहुणे आले तर यजमान त्यांना जेवावयास वाढील, परंतु त्यानें स्वतःच्या हातानें आपल्या तोंडांत घांस घातले पाहिजेत असें जर प्रत्येक पाहुणा म्हणूं लागला तर यजमान त्यांचें कसे समाधान करूं शकेल ? आंबेडकरांना असें असंतुष्ट लोक अनेक भेटले आहेत व भेटत आहेत. खाजगी कारणामुळें आंबेडकरांवर राग झाल्यावर आंबेडकरांच्या चळवळींना नांवें ठेवावयाची, त्यांच्यावर शिंतोडे उडविण्याचा प्रयत्न करावयाचा, इतकेंच नव्हें तर बहिष्कृतांच्या स्वतंत्र चळवळीला पाण्यांत पाहणाऱ्या लोकांना फितूर होण्यासहि कमी करावयाचें नाहीं. हे झाले शत्रुत्वाच्या नात्यानें आमच्याशीं वागणाऱ्या लोकांचें. आतां दुसरा एक टीकाकारांचा वर्ग आहे. ते शत्रुभावानें टीका करीत नाहींत, त्यांच्या टीकेच्या मुळाशीं प्रामाणिक मतभेद असतो हें आम्ही जाणून आहों. यातल्या कित्येक टीकाकारांच्या दृष्टीनें आमची चळवळ थोडीबहुत जहाल ठरते आणि दुसऱ्या कित्येकांच्या मतें आम्ही मवाळपणानें वागतों. हे दोन्ही प्रकारचें टीकाकार आमचे

व आमच्या चळवळीचें चिंतक खरें. प्रकृतिभेदानुसार आम्हांला जहाल किंवा मवाळ समजतात. निष्कारण जहालपणानें वागण्याची किंवा दुसऱ्याची मनें निष्कारण दुखविण्याची आमची इच्छा नाहीं व तसें आमचें धोरणहि नाही परंतु अस्पृश्यता निवारणाच्या चळवळीला जहालपणानें विरोध करणारें लोक असल्यावर प्रसंगविशेषी जहाल झाल्याशिवाय आणि ' अरे तर कारे ' अशा धोरणानें वागल्याशिवाय चालत नाही. जे लोक आम्हांला मवाळ म्हणतात त्यांच्या उत्साहाचें आम्ही मन:पूर्वक कौतुक करतों. परंतु आमच्या अडचणींचा ते विचार करीत नाहींत, एवढेंच आमचें म्हणणें आहे. आपल्या चळवळीचा झगडा होता होईल तों तडजोडीनें कायदेशीर साधनांनीं आणि स्वतःच्या पक्षाची कमीत कमी हानी होईल अशा रीतीनें चालवावयाचा असें आमचें धोरण आहे. या धोरणाला अनुसरून आम्ही वागत असतों. या आमच्या जहाल हितचिंतकांकडून आमच्यावर

अवसानघातकीपणाचा आरोप

करण्यांत येतो. वतन बिल डॉ. आंबेडकरांनीं मागें कां घेतलें याचा खुलासा यापूर्वीच ' बहिष्कृत भारता ' मध्यें केलेला आहे. तथापि, आंबेडकरांनीं बिल मागें घेऊन अवसानघात केला असें हे टीकाकार म्हणतच आहेत. कायदेकौन्सिलांत एखादें बिल पसार करून घेणें हें परस्वाधीन काम असतें. सरकार, मुसलमान, ब्राह्मण, ब्राह्मणेतर या सर्व पक्षांचे बहुतेक सभासद सदरील बिल हाणून पाडण्यास बद्धपरिकर झालेले होते आणि त्यांत त्यांचे काय काय हेतू होते तें आम्हीं यापूर्वी सांगितलेंच आहे. जेथें हितसंबंधांचा प्रत्यक्ष विरोध येतो आणि इतर बाबतींतले मतभेद लक्ष्यांत आणून अस्पृश्यानें पुढें आणलेलें बिल म्हणून तें हाणून पाडावयास वेगवेगळ्या पक्षांचे लोक एकत्र होतात, तेथें तें बिल पसार होण्याची आशा कशी बाळगावयाची ? आणि विरोधकांचा हेतू कां म्हणून सिद्धीस जाऊं द्यावयाचा ? आंबेडकरांना बिल मागें न घेतां मतांवर घालतां आले असते. परंतु मूळचें बिल नापास होऊनच राहिलें नसतें तर सिलेक्ट कमिटीनें गणपतीच्या मूर्तीचें माकडाच्या मूर्तीत जें रुपांतर केलें होतें ते वतनदार महारांच्या मानगुटीवर बसलें असतें, त्याची वाट काय ? तसें झालें असतें म्हणजे हेच टीकाकार आंबेडकरांनीं वतनदार मंडळींला आगींतून बाहेर काढून फाफाट्यांत टाकलें अशी ओरड करावयास तयार झाले असते. महाडचा सत्याग्रह व उमरावतीच्या अंबा देवालयासंबंधाचा सत्याग्रह यांच्या बाबतींतही आंबेडकरांवर अवसान घातकीपणाचा आरोप करणारे कांहीं लोक आहेत. होतां होईल तों गोष्ट विकोपाला न्यावयाची नाहीं, जेथे नखानें तुटत असेल तेथें कुऱ्हाडीचा उपयोग करावयाचा नाहीं आणि बहिष्कृत वर्गाची शक्ती एखाद्या कामांत सगळी खर्चून टाकून आपल्या चळवळीला

धक्का बसू द्यावयाचा नाहीं. हें आमचें धोरण फाजील मवाळपणाचें आहे असें ज्या कोणास वाटत असेल त्याला तें तसें वाटो. परंतु या धोरणानें वागण्यात आमची चूक झाली किंवा आमच्या तत्त्वांच्या विरुद्ध आम्ही वागलों, असें आमची मनोदेवता तरी आम्हांस सांगत नाही. चळवळींत धडाडी पाहिजे हें जसें खरें आहे तसेंच, डुकराच्या मुसंडीप्रमाणें, पुढच्या परिणामाचा विचार न करतां, धडाक्या मारीत सुटणें हे चळवळीचा घात करणारें आहे, हेंही खरें आहे, हें विसरतां कामा नये. आम्हीं

मध्यम मार्ग

स्वीकारला आहे. मवाळपणा व जहालपणा या दोन मार्गांमधला हा मार्ग आहे. धैर्य, शौर्य व स्वतंत्र बाणा दाखविण्याचा हा मार्ग आहे, परंतु आततायीपणाला, त्रागा करण्याच्या प्रवृत्तीला या मार्गात अवकाश नाही. फाजील मवाळ प्रवृत्तीचे लोक आमचे पाय मागें खेचूं पाहतात आणि फाजील जहाल प्रवृत्तीचे लोक आम्ही खाच खळगे, कांटे न पाहता धूम ठोकीत नाहीं म्हणून आम्हांला नांवें ठेवतात. स्वतः आमच्या व्यक्तीलाच धोका असता तर आम्हीं त्याचा तितकासा विचार केला नसता ; परंतु आम्हाला आमच्या चळवळीच्या सुरक्षितपणाचा व मजबुतीचा विचार केला पाहिजे. ज्या तत्त्वांच्या आधारावर आमच्या चळवळीची इमारत आम्ही उभारू पाहत आहों, त्या तत्त्वांना बाध न आणता देशांतील कोणत्याही पक्षाशीं, समाजाशीं किंवा व्यक्तींशीं सहकारिता करावयाला आमची तयारी आहे. आम्हाला जितकी सहानुभूति मिळेल तितकी थोडीच आहे ; परंतु आमच्या अंगीकृत तत्त्वांची किंमत देऊन कोणाची सहानुभूति विकत घेण्यास मात्र आम्ही तयार नाहीं. अशाप्रकारचा तत्वविक्रय नीतिशुद्ध तर नव्हेच, परंतु परिणामी तो इष्टही नव्हे. टीकाकारांपैकीं कोणत्याही एका वर्गाला संतुष्ट केलें तरी इतर वर्ग असंतुष्ट राहणारच, आणि त्यांजकडून टीका होणारच. अशा रीतीनें एकाला संतुष्ट ठेवून बाकी सर्वांचें शत्रुत्व संपादण्याच्यापेक्षा अंगीकृत तत्त्वांप्रमाणें चालावें, मग कोणाचा रोष होवो किंवा संतोष होवो, हें धोरण व्यवहारदृष्ट्यासुद्धां विशेष फायद्याचे नाही काय ? आणखी एक मार्ग आहे. तो सर्वांना खुष ठेवण्यासाठी लटपट करणे, एकाला एक व दुसऱ्याला दुसरेंच भासविणे हा होय. परंतु तो आम्हाला शक्य नाहीं. शिवाय, तो मार्ग अदूरदर्शीपणाचा आहे. एखादा मनुष्य कांहीं काळ सर्व माणसांना किंवा कांहीं माणसांना सर्व काळ फसवूं शकेल परंतु सर्व काल सर्वांना फसावेणें हें कोणालाच शक्य नाही.

अग्रलेख : बहिष्कृत भारत, ता. ६ सप्टेंबर १९२९.

६०

दत्तदरबारचे उदाहरण

एलिचपूर येथील ' दत्तदरबार ' नांवानें प्रसिद्ध असलेल्या हिंदुदेवालयाचीं द्वारें बहिष्कृतांसुद्धां सर्व जातींच्या हिंदूंना उघडीं ठेवण्याचा उपक्रम करण्यांत आला.△ त्याची हकीकत दुसरीकडे दिली आहे.† सदरील देवालयाच्या कमिटीमध्यें या सुधारणेस बहुमत अनुकूल होतें अर्थात थोडी मंडळी विरुद्ध होती ; तथापि सर्व ट्रस्टींची अनुकूलता होती. या बाबतींत शेट जमनालाल बजाज प्रभृति मंडळीनें खटपट केली व त्या खटपटीला यश आलें ही मोठ्या संतोषाची गोष्ट होय. सदरील देवालय हें वऱ्हाड प्रांतांतील एक प्रमुख देवालय असल्यामुळें तें बहिष्कृतांना मुक्तद्वार झाल्याचा अप्रत्यक्ष परिणाम इतर देवालयांवर होण्याचा संभव आहे. सदरील देवालय हें श्रीदत्तात्रयाचें मंदीर आहे ही विशेष लक्ष्यांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. कारण दत्तसंप्रदाय हा सोवळ्याओवळ्याचे व जातिभेद विषयक निर्बंध बाकी बऱ्याचशा संप्रदायांपेक्षां विशेष कडकपणानें पाळणारा आहे. वारकरी सांप्रदायात तितकें सोवळें ओवळें पाळण्यांत येत नाहीं. परंतु अद्यापि विठोबाच्या देवालयांच्या बाबींत जी सुधारणा झालेली दिसत नाहीं ती दत्ताच्या एका देवालयामध्यें अंमलांत आली हें खरोखर विशेष होय. वास्तविकपणें पाहतां, दत्त हें दैवत स्वतः सोवळें आहे असा प्रकार नाहीं. दत्तात्रेयाचा साक्षात्कार मलंगाच्या वेषानें एकनाथादि साधूंना झाल्याची वर्णनें जुन्या पुस्तकांमध्यें आढळतात आणि गुरुचरित्राच्या पोथीचा प्रसार होईपर्यंत दत्तसंप्रदायाला हल्लींचें कडक सोवळेपणाचें स्वरुप प्राप्त झालें नव्हतें असें म्हणावयास हरकत नाहीं. महानुभावपंथामध्यें कृष्ण व दत्त या दैवतांची उपासना पूर्वीपासून चालू असून महानुभावपंथाचा प्रसार महाराष्ट्रांतच नव्हे तर पंजाब, अफगणिस्थानपर्यंत असल्याचें आढळून येतें. सर्वांत जुनें मराठी वाङ:मय महानुभावपंथाचें आहे. या पंथांत दत्तोपासना चालू असली तरी जातिभेदाचें व सोवळ्याओवळ्याचें बंड त्या पंथांत नाहीं. अर्थातच, हल्लीचा सोवळा दत्तसंप्रदाय हा आधुनिक आहे हें उघड सिद्ध होतें. एकाद्या देवाला कमी अधिक सोवळा करणें हें भक्तांच्या हातांत असते. भक्तांच्या समजुतीप्रमाणें देवाचें स्वरुप बनत असतें. भक्त मंडळी स्वतःच्या समजुती आपल्या उपास्यावर लादीत असतें. भक्त सोवळे तर

△ मंदीर, ३१ जुलै १९२९ रोजी खुले केले गेले.

† पाहा, परिशिष्ट क्रमांक : ८

देवहि सोवळा, भक्त उदारमतवादी तर देवहि उदारमतवादी, भक्त हिंसाप्रिय तर देवहि हिंसाप्रिय, भक्त लांचखाऊ तर देवहि लांचखाऊ, भक्त शीघ्रकोपी तर देवहि शीघ्रकोपी, असेंच सर्वत्र दिसून येतें. हिंदूधर्मातल्या भक्तांना बहिष्कृतांच्या सावलीनें आपण विटाळूं असें वाटतें मग आपल्या देवाला विटाळाची बाधा होऊं नये याकरिता त्यांनीं त्याला कडीकुलपात घालून ठेवावें. बहिष्कृतांचा वाराहि त्याला लागूं देऊं नयें, हें स्वाभाविकच होय. सारांश, देवाच्या नांवावर चालू असलेलें सोवळ्या-ओवळ्यांचें बंड माणसांनींच उत्पन्न केलेंले आहे. वऱ्हाडांतच कांहीं दिवसापूर्वी जमनादास पोतदार∆ यांच्या श्रीराममंदिरांत† देवदर्शन घेण्यास महार जातीची एक स्त्री गेली म्हणून तिकडील ब्राह्मणानीं तिला मारहाण करून तिच्याकडून माफीपत्र लिहून घेतलें, अशी बातमी प्रसिद्ध झाली होती. अनार्य शबरीची उष्टी बोरें खाणाऱ्या रामाला एकाद्या भाविक महार स्त्रीनें दर्शन घेतलें म्हणून विटाळ व्हावा आणि जणू काय राममूर्तीचा विध्वंस करण्यास आलेली राक्षसी होती म्हणून ब्राह्मणांनीं त्या गरीब श्रद्धाळू अबलेला मारझोड करावी हें त्या श्रीरामचंद्राचें दुर्दैवच नव्हे काय ? दिल्ली येथेंहि बहिष्कृतांनीं हिंदूंच्या देवालयामध्यें जाण्याचा प्रयत्न केला असतां तिकडील सोवळ्या लोकांनीं आकाशपाताळ एक केलें अशी बातमी कांही वर्तमानपत्रांमध्यें प्रसिद्ध झाली होती. हिंदूसमाजांतील जातिभेदाची व सोवळ्याओवळ्यांची सग्डेसाती देवालाहि कशी बाधत आहे तें या उदाहरणांवरून दिसतें. शेठ जमनालाल बजाज प्रभृति पुढाऱ्यांनीं देवाच्या मागचें हें अस्पृश्यतेचें ग्रहण सोडविण्याचे जे प्रयत्न चालविले आहेत ते खरोखरच हिंदुधर्माला उज्वल स्वरूप देणारे आहेत. रावणानें तेहतीसकोटी देवांना बंदीत टाकलें होतें असें म्हणतात, आणि प्रमुख रावण हा दशग्रंथी वेदपाठी विद्वान ब्राह्मण होता असेंहि पुराणिक सांगतात. पण आजकालच्या सोवळ्या रावणांनीं श्रीरामसुद्धां सर्व देवांना कडीकुलपांच्या देवळांत कोंडून त्यांना बंदींत घातलें आहे.

● ● ●

∆ नागपुरातील एक दानशूर व भाविक गृहस्थ.

† नागपूर शहरातील शनिवार पेठेत असलेले श्रीरामांचे प्रसिद्ध मंदीर.

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. ६ सप्टेंबर १९२९.

६१

आतां हें चित्र पहा !

महात्मा गांधींच्या अनुयायांपैकी शेठ जमनालाल बजाज प्रभृति मंडळीचें अस्पृश्यांच्या बाबतींत महात्माजींच्या शिकवणीला अनुसरून कसें वर्तन आहे, तें दत्तदरबाराच्या उदाहरणावरून दिसून आलें आहे. परंतु दुर्दैवानें महात्माजींची शिकवण त्यांच्या सर्व अनुयायांच्या बाबतींत अशा रीतीनें फलद्रूप झालेली नाहीं, इतकेंच नव्हे तर स्वतःला महात्माजींचे अनुयायी म्हणविणारांपैकी बहुतेक लोक अस्पृश्यता निवारणाच्या बाबतींतील महात्माजींचा उपदेश धाब्यावर बसविणारेच आहेत. बार्डोली तालुक्यामध्यें महात्माजींचा कार्यक्रम पूर्ण रीतीनें अंमलांत आलेला असून त्या तालुक्याइतकी देशाच्या दुसऱ्या कोणत्याच भागाची आत्मिक प्रगति झालेली नाहीं असें म्हणण्यांत येतें. त्या तालुक्यांत खादीचा प्रसार सर्वत्र झाला असेल, सत्याग्रहाकरितां लागणारी शिस्त लोकांच्या अंगी बाणली असेल, परंतु अस्पृश्यता निवारणाच्या बाबतींत मात्र तो तालुका कोरडाच आहे असे दिसून येतें. सदरील तालुक्यांत मोता नांवाचा एक मोठा गांव असून तेथें मुंबई शहरांतल्या एका उदार धनिकाच्या आश्रयानें चाललेला एक धर्मार्थ दवाखाना आहे. या दवाखान्यावरील डॉक्टरच्या हातून एक मोठा भयंकर गुन्हा घडला. तो इतकाच कीं, दवाखान्यांत येणाऱ्या बहिष्कृत वर्गातल्या रोग्यांची रोगपरीक्षा करण्याकरितां तो त्यांना शिवला ! त्यामुळें डॉक्टरच्या विरुद्ध भयंकर काहूर माजलें आणि त्या बिचाऱ्यानें जर गांवांतल्या लोकांना माफीपत्र लिहून दिलें नसतें तर त्याच्या हातीं नारळच देण्यांत आला असता ! महात्माजींच्या अनुयायांमध्यें जमनालाल बजाजसारखे लोक हे अपवाद होत. बाकीचे अनुयायी अस्पृश्यता निवारणाच्या बाबतींत साधारणतः धाब्यांवर बसविणारेच आहेत. महाराष्टांत ' भुताळ ' पक्षांतलें लोक गांधीजींच्या विरुद्ध असून त्यांना जातिभेद व अस्पृश्यता यांचें भूत हिंदु समाजाच्या मानगुटीवर असेंच राहूं द्यावयाचें आहे आणि त्यांनींच गांधी पक्षाला त्याच्या चरकाभक्तीवरून ' सुताळ ' असें नांव दिलेलें आहे. महाराष्ट्रांतील भुताळ व सुताळ हे दोन्ही अस्पृश्यांच्या बाबतींत जवळ जवळ सारखेच आहेत. 'नवा काळ ' व ' चित्रमय जगत् ' यांच्यामध्यें गांधीपक्षाचा मोठ्या जोरानें पुरस्कार करण्यात येतो, परंतु अस्पृश्यता निवारणाची बाब मात्र अचूक वगळण्यात येते ! एकाद्या व्यक्तीला देवाप्रमाणें पूज्य मानावयाचे, परंतु त्या व्यक्तीच्या उपदेशांतला आपल्यास आवडतो तेवढाच भाग घेऊन बाकी

नावडता भाग खुंटीवर लावून ठेवावयाचा ! कोणी म्हटलें, महात्माजी काय म्हणतात व स्वतः काय करितात तें तरी पहा. तर त्यावर या मंडळापाशीं उत्तर तयार आहेच. लगेच सांगतील कीं, महात्माजींचा हा उपदेश आमच्यासाठी नाहीं. ' न देवचरितं चरेत् ' अथवा ' न साधु चरितं चरेत् ' असें म्हटलेंच आहे. महात्माजींनीं अस्पृश्य वर्गातली एक मुलगी आपल्या घरांत स्वतःच्या मुलीप्रमाणें पाळली म्हणून महात्माजींच्या प्रत्येक अनुयायानें आपआपल्या घरीं एक एक अस्पृश्य मुलगी पाळावी असें कोण म्हणतो ? तो ज्याच्या त्याच्या खुषीचा किंवा सामर्थ्याचा प्रश्न आहे. महात्माजीहि तसें सांगत नाहीं. अस्पृश्यता ही माणुसकीला सोडून आहे, न्यायाला व धर्माला सोडून आहे. म्हणून ती समाजांतून नाहींशी करा, असें महात्माजी सांगतात. मग तेथें ' न देव (साधु) चरितं चरेत् ' हें उत्तर कसें लागू पडतें ?

* * *

प्रासंगिक विचार : ६ सप्टेंबर १९२९.

६२
हरदासाचा ट्रेड युनियन !

दोन वर्षांपूर्वी मुंबई शहरांत कुमार विनयमंदीराचा (बहिष्कृत वर्गांतील मुलांचा) मेळा सार्वजनिक गणपतीपुढें विशेषतः ब्राह्मण सभेच्या गणपतीपुढें येऊं देण्यासंबंधानें कडाक्याचा वाद माजला होता हें आमच्या वाचकांना ठाऊकच आहे. सदरील मेळ्याला दुसऱ्या कित्येक सार्वजनिक गणपतीपुढें आपली पदें म्हणू देण्यांत आलीं, कित्येक चाळींतल्या उत्सव चालकांनीं तर त्या मेळ्याचा थाटाने सत्कार केला, तें पाहून आतां जीर्णमतवाद्यांनीं खुनशी धोरणाचा अंगीकार करण्यास सुरूवात केली आहे. उत्सवाच्या कार्यक्रमांमध्ये मेळ्याचा गायनाप्रमाणें व्याख्यानें, प्रवचनें, कीर्तनें, वगैरेचाहि अंतर्भाव होत असतो. म्हणून एका हरदासानें, अस्पृश्यांचा मेळा जेथें आणण्यांत येईल तेथील कीर्तनाचें आमंत्रण आपण स्वीकारणार नाहीं असें जाहीर केलें. परंतु एका हरदासावांचून उत्सवांत कोणाचें कांहीं नडणार नाहीं असें त्याला आढळून आलें तेव्हां दुसऱ्या कांहीं हरदासांनाहि त्यानें आपल्या कटांत ओढलें आणि आतां या पांच सहा हरदासांनी आपला ट्रेड युनियन या कामाकरितां स्थापला आहे असें म्हणतात ! जीर्णमतवादाचें ढोलकें बडविणाऱ्या या नामधारी पोटभरू हरदासांच्या उपद्व्यापांमुळें समाजसुधारणेची लाट आतां कांहीं थांबणें शक्य नाहीं. एका अर्थी असले हरदास उत्सवांत कीर्तनें न करतील तरच बरें. कारण कीर्तनांत जीर्णमतवाद प्रतिपादून भोळ्या भाविक लोकांची हे दिशाभूल करावयाचे. त्या अर्थी त्यांचा बहिष्कार म्हणजे ' सुंठीवांचून खोकला गेला ' या न्यायानें फायदेशीरच समजला पाहिजे. जे कोणी उदार मतवादी हिंदुधर्माचे अभिमानी असतील त्यांनीं, समाजसुधारणेचा सूर्यप्रकाश क्षितिजावर आलेला पाहून सुधारणा विरोधी घुबडें ढोलींत लपून राहिलीं तर त्याबद्दल मुळींच विषाद मानून घ्यावयास नको.

●●●

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. ६ सप्टेंबर १९२९.

६३

आधीं कळस, मग पाया !

या देशांत कम्युनिस्टांचे प्रयत्न कामगार चळवळ काबीज करण्याकरितां चालले असून मुंबईमधील गिरणीकामगारांच्या गेल्या मोठ्या संपाचा जो परिणाम झाला त्याच्यावरून कामगार वर्गापुढें आपल्या चळवळीचीं सूत्रें कम्युनिस्ट धोरणाच्या पुढाऱ्यांच्या हातीं द्यावीं कीं काय, हा प्रश्न विशेष अगत्यानें उभा राहिलेला आहे. सरकारनें न्या. पीयर्सन यांच्या प्रमुखत्वाखालीं नेमलेल्या चौकशी कोर्टानें गिरणीकामगार यूनियनच्या विरुद्ध निकाल दिला आहे.† सदरील यूनियनला आपली बाजू पुराव्यानिशीं शाबीद करतां आली नाहीं असें कोर्टाचें म्हणणें असून, सदरील यूनियनच्या पुढाऱ्यांनी वाडिया व सासून यांच्याशीं कामगार व जॉबर्स यांच्या वतीनें जे करार केले होते त्या करारांतील अटींना अनुसरून यूनियनचे पुढारी वागले नाहींत असा अभिप्राय कोर्टानें व्यक्त केला आहे. गेल्या खेपेस सदरील यूनियननें सर्व गिरण्यांचें काम संप करून बंद पाडण्याचें ठरविलें त्या वेळीं सुरवातीला पुढाऱ्यांच्या शब्दाला मान देऊन आणि यूनियनच्या कमट्यांचे सभासद व स्वयंसेवक यांच्या दराऱ्यानें भिऊन जाऊन लोक गिरण्यांतून बाहेर पडले. तरी या खेपेस संपाचा उत्साह लोकांमध्यें नव्हता, कुटुंबपोषणाची ज्यांच्या आंगावर जबाबदारी आहे अशा कामगारांना तर या वेळीं संप बिलकुल नको होता; गेल्या वर्षीच सहा महिन्यांचा संप लोकांनीं लढविला होता व त्यामध्यें ते जेरीस आले होते; या वेळीं लोकांच्या पोटापाण्याचा प्रश्न नव्हता, आणि कामगारामध्यें मतभेद नसता तरी या खेपेस फार दिवस संप चालविणें त्यांना अशक्यच होतें. या संपाला म्हणूनच आम्हीं विरुद्ध होतों. आम्हांला कामगारांची चळवळ जरूर पाहिजे, कामगारांच्या हितसंबंधांचें संरक्षण होण्यासाठी कामगारसंघ अवश्य पाहिजेत असें आमचें मत आहे. परंतु कामगार चळवळीचें पर्यवसान

निष्कारण उपासमार व कर्जबाजारीपणा

यांच्यामध्यें होणें आम्हांला इष्ट नव्हतें. गिरणीकामगारांमध्यें अस्पृश्य मानलेल्या जातींचे हजारों लोक असून त्यांची स्थिति इतर गिरणीकामगारापेक्षां वाईट प्रकारची आहे. आधींच त्यांना गिरण्यांमध्ये सगळ्यांत कमी पगाराचीं कामें

---

† पाहा परिशिष्ट क्रमांक : ९

मिळतात आणि बहुतेकांना गांवांत शेतीचा आधार नसतो. बहुतेक सर्व हातावरील पोटाचे असल्यामुळें आणि गेल्या वर्षातला सहा महिन्यांचा मोठा संप आणि त्यानंतर आज या गिरणींत तर उद्यां त्या गिरणीत याप्रमाणें झालेले ८०।९० किरकोळ संप यांच्या योगें कर्जाच्या पायीं जेरीस आलेले असल्याकारणानें या खेपेस संपावर जाण्याचें व संपांत टिकाव काढण्याचें त्यांना बिलकूल त्राण नव्हतें. परंतु या गोष्टींचा विचार न करतां गि. का. यूनियनच्या पुढाऱ्यांनीं इरेला पडून मोठा संप पुकारला. त्याचा जो परिणाम व्हावयाचा तोच झाला. संप हें कामगारांचें एक मोठें अस्त्र आहे, परंतु त्याचा उपयोग जपूनच करावयाचा असतो. जी केवळ शुद्ध कामगारसंघाची चळवळ असते तीमध्येंहि संप करावे लागतात, परंतु त्या संपाचा उद्देश कामगारांचीं दुःखें दूर करून घेणें असतो. क्रांतिवादी चळवळींमध्यें कामगारांचीं दुःखें दूर करून घेणें हा दुय्यम उद्देश असून मुख्य उद्देश क्रांतीच्या तयारीची तालीम देणें हा असतो. कामगार चळवळीमध्यें कामगारांची आर्थिक स्थिति सुधारण्याकडे लक्ष्य देण्यांत येतें, परंतु क्रांतिवादी चळवळीमध्यें कामगारांची आर्थिक स्थिति सुधारणें हें बाह्यतः दाखविण्याचें निमित्त असतें आणि अंतःस्थ हेतु कामगारांमधील असंतोष वाढविणें आणि क्रांतिवादाला त्यांचीं मनें अनुकूल करून घेणें हा असतो. अर्थात् कामगारांची जितकी उपासमार होईल व त्यांचे जितके हाल होतील, त्यांच्यावरील जुलूम जितका वाढेल, तितकें क्रांतिवादाच्या दृष्टीनें इष्ट असतें. कारण वैतागल्याशिवाय क्रांतीसाठीं कोणी तयार होत नाहीं. अल्पकाळांत क्रांति होऊन आजची समाजव्यवस्था पार बदलून जाईल आणि कामगारांचें राज्य अस्तित्वांत येईल असा क्रांतिवाद्यांना भरवंसा असल्यामुळें त्यांना कामगारांच्या तात्पुरत्या हालांचें कांहीं वाटत नाहीं. अशा प्रकारची झटपट क्रांति इष्ट व शक्य आहे असें ठरलें तर क्रांतिवादी पुढाऱ्यांचें धोरण बरोबर आहे असेंच म्हटलें पाहिजे. परंतु

झटपट क्रांति शक्य नाही व इष्टंहि नाहीं

असें आमचें प्रामाणिक मत आहे. आजची समाजव्यवस्था समाधानकारक नाहीं, समाजांत संपत्तीची वांटणी अत्यंत विषम प्रमाणानें झाली आहे आणि मूठभर लोकांच्या हातीं कोट्यावधि लोकांचे जीव पडले आहेत, याबद्दल वाद नाहीं. मतभेद आहे तो समाजव्यवस्थेमध्यें जो फेरबदल घडवून आणावयाचा तो कोणत्या मार्गांनीं, याविषयींच जबर रोगावर जबर उपायच पाहिजे असतात हें खरें, परंतु त्याचा अर्थ उपायाच्या नांवावर रोग्याला अपाय करावयाचा असा नव्हे. हिंदुस्थान देशाच्या सध्याच्या परिस्थितींत कम्युनिझम कितपत इष्ट आहे, दांडगाईनें राज्यक्रांति घडवून आणणें कितपत शक्य आहे वगैरे गोष्टी आपण घटकाभर बाजूला ठेवूं

देशांतील कामगारांची मनोभूमिका क्रांतीसाठी कितपत तयार झालेली आहे याचाच आपण प्रथम विचार करूं. पहिल्यानें आपल्या दृष्टोत्पत्तीस गोष्ट येते ती ही कीं,

पुढारी कम्युनिस्ट, पण अनुयायी कम्युनिस्ट नाहींत.

कम्युनिस्टांना जे कामगार आपले पुढारी मानतात ते कम्युनिस्टांचीं सर्व खरीं मतें त्यांना बरोबर रीतीनें माहीत नाहींत म्हणून, हें आपण विसरतां कामा नये. कम्युनिझममधून देव, धर्म व राष्ट्र यांना हद्दपार केलेलें आहे. देव, धर्म व राष्ट्र यां संबंधाच्या कल्पना मतलबी लोकांनीं स्वतःचें श्रेष्ठत्व कायम राखण्याच्या उद्देशानें बहुजनसमाजामध्ये पसरून ठेवलेल्या आहेत; या कल्पनांचा फायदा भांडवलशाही, जमीनदारशाही व साम्राज्यशाही यांना मिळत आहे आणि त्या कल्पनांचें निर्मूलन केल्याखेरीज जगांत कायमची खरी शांतता नांदावयाची नाहीं व बहुजनसमाज सुखी व्हावयाचा नाहीं, हा कम्युनिस्टांचा सिद्धांत आहे. पण त्याची कितीशा कामगारांना कल्पना असेल ? देव व धर्म यांच्या संबंधाचीं कम्युनिस्टांचीं मतें उघडपणें प्रतिपादण्यांत येतील तर कम्युनिस्टांना सध्यांच्या स्थितींत तरी कामगारांमध्यें एकहि अनुयायी सांपडावयाचा नाहीं. लेनिनच्या पुतळ्याला किंवा तसबिरीला मान देणाऱ्या कम्युनिस्ट पुढाऱ्यांनीं शिवाजी महाराजांची तसबीर यूनियनच्या कार्यालयांत ठेवण्यास हरकत घेतली तेव्हां त्यांचे कित्येक मराठे अनुयायी त्यांच्यावर बिथरले, हें आम्हांला ऐकून ठाऊक आहे. जातिभेद व स्पर्शास्पर्श यांचें बंड कामगारांमध्यें कमी नाहीं. अद्यापि गिरण्यांतल्या पाण्याच्या नळावर अस्पृश्यांना फिरकूं न देण्याकडे लाल बावटेवाल्या कामगारांचाहि कटाक्ष असतो व त्यामुळें वरचेवर भांडणें होतात. जातिभेद व अस्पृश्यता हीं कम्युनिझमच्या मूलतत्त्वांना अगदीं सोडून आहेत. लेनिन हिंदुस्थानांत जन्मला असता तर प्रथम त्यानें जातिभेद व अस्पृश्यता यांना साफ गाडून टाकलें असतें व तसें केल्याखेरीज क्रांतीची कल्पना त्यानें मनांतहि आणली नसती. वादाकरितां आपण क्षणभर गृहीत करूं कीं, या देशांतील कम्युनिस्टांना क्रांति घडवून आणण्यांत यश आलें. पण ती क्रांति बहुजनसमाजाला सुखावह होईल काय ? कम्युनिस्टांचें ध्येय असलेली समाजव्यवस्था अंमलात येऊ शकेल काय ? कदाचित्, समाजामध्यें विशेषच गोंधळ माजेल, अंतःकलह वाढतील आणि सध्यां दुर्बळ असलेले वर्ग जातिदुराभिमानी प्रबळ वर्गांच्या जुलुमाला बळी पडतील. रशियाप्रमाणें हिंदुस्थानांत सोव्हिएट राज्यव्यवस्था चालू झाली म्हणजे आपोआप जातिभेद नाहींसा होईल, यक्षिणीची कांडी फिरल्याप्रमाणें परिणाम होऊन सामाजिक विषमता आपोआप अदृश्य होईल, असें हिंदी कम्युनिस्टांना वाटतें

काय? देशांतील सर्व भांडवल व सर्व जमीन समाजाच्या मालकीची आहे हे कम्युनिस्टांचे तत्त्व या देशांतील लोकांच्या विशेषतः जमीन ही समाजाची मालकीची असून व्यक्तीची खाजगी मालकी तिच्यावर असतां कामा नये हें तत्त्व या देशांतील शेतकरी लोकांच्या गळीं सहज उतरेल अशीं कम्युनिस्टांची समजूत आहे काय ? रशियन शेतकऱ्यांच्याहि गळीं हें तत्त्व अद्यापि उतरलेलें नाहीं व म्हणून त्या बाबतींत सोव्हिएट सरकारला तत्व सोडून तडजोडीचें धोरण स्वीकारावें लागलें हें प्रसिद्धच आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे या देशांतील कामगारांना व शेतकऱ्यांना कम्युनिस्टांचीं तत्वें आज तरी रुचणें व पचणें शक्य नाहीं. कम्युनिस्टांचा आदर्श समाज अस्तित्वांत यावयाला बहुजनसमाजाची जी मनोभूमिका तयार झाली पाहिजे ती मुळींच तयार झालेली नाहीं. म्हणूनच कम्युनिस्टांची या देशांतील सध्याची चळवळ 'आधीं कळस मग पाया' अशा प्रकारच्या विपरीत क्रमाची आहे असें आम्ही म्हणतों.

अग्रलेख : बहिष्कृत भारत, ता. २७ सप्टेंबर १९२९.

६४

एकाक्ष हरिणाची गोष्ट !

इसापनीतीमध्यें एका हरिणाची गोष्ट सांगितली आहे. हें हरीण एका डोळ्यानें आंधळें होतें. आपल्या एकाक्षपणाचा फायदा घेऊन शिकारी लोकांनीं आपली सुलभपणें शिकार करूं नये याकरितां त्या रानांतल्या तळ्याच्या कांठीं चरतांना फुटलेला डोळा तळ्याच्या बाजूस व धड डोळा जमिनीच्या बाजूस राहील याविषयीं तें खबरदारी घेई. त्यामुळें शिकारी लोकांचे प्रयत्न फुकट जात. ती गोष्ट एका पारध्याच्या लक्षांत आली आणि त्यानें होडींत बसून तळ्यामध्यें जाऊन तेथून त्या हरिणावर नेम धरला. तळ्याच्या बाजूनें धोका नाहीं असें समजून निर्धास्तपणें चरणाऱ्या एकाक्ष हरिणाला पारध्यानें तळ्यांतून आपल्यावर नेम धरला आहे हें समजलें नाहीं व त्यामुळें अखेरीस त्याची शिकार झालीच. गेल्या गणेशोत्सवामध्यें पनवेल येथें जो प्रकार† घडला त्याच्यावरून इसापनीतींतल्या सदरील गोष्टीची आठवण झाल्याखेरीज राहत नाहीं. पनवेलच्या जीर्णमतवाद्यांनीं तेथल्या तळ्याच्या देवघाटावर अस्पृश्यांच्या गणपतींचे विसर्जन करण्यास या वर्षी हरकत घेऊन सरकारची पायधरणी केली. कांहीं भटजींनीं कित्येक लोकांची भलतीच समजूत करून देऊन आपल्या बाजूस त्यांच्या सह्या घेतल्या, परंतु देवघाटावर अस्पृश्यांच्या गणपती विसर्जनास आपली हरकत नाहीं असें शेंकडों लोकांनीं उलट सरकारला कळविलें, तेव्हां देवघाटावर जाण्यास बल्लाळेश्वराच्या देवळाकडून जो एकच रस्ता आहे तो देवळाच्या खाजगी मालकीचा आहे असें सांगून सोवळ्या मंडळींनें मामलेदाराकडून त्या रस्त्यानें गणपती नेण्यास मनाई असल्याबद्दलचा हुकूम बजावला. तळें व देवघाट हीं खाजगी नसलीं तरी देवघाटावर जाण्याचा रस्ता खासगी ठरवून टाकला म्हणजे अस्पृश्यांना आपोआप शह बसेल अशी सोवळ्या मंडळींची समजूत होती म्हणून त्यानीं वरील युक्ति लढविली होती. परंतु ही त्यांची युक्ती अखेरीस फसली ! बहिष्कृत वर्गाचे गणपती, पनवेल म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष श्री आत्माराम शेठ आटवणे यांच्या गणपतीबरोबर होडींत बसवून देवघाटावर नेण्यांत आले व तेथें मोठ्या थाटानें विसर्जन समारंभ करण्यांत आला. अशा रीतीनें दुराग्रही सोवळ्या लोकांची एकाक्ष हरिणाप्रमाणें अखेरीस फसगत झाली! गेल्या वर्षी बहिष्कृतांच्या गणपतीचें देवघाटावर विसर्जन करण्यांत आलें होतें व त्या वेळीं कोणी हरकत घेतली नव्हती

---

† पाहा परिशिष्ट क्रमांक : १०

इतकेच नव्हे तर मागाहून घाटाची शुद्धीही कोणी केली नव्हती. या वर्षी तरी देवघाटावर सोवळे फेनाईल उर्फ गोमूत्र शिंपडून आणि नंतर एकादें ब्राह्मणभोजन घालून तो शुद्ध केला जातो किंवा काय तें पहावयाचें आहे. गांवातल्या लोकांची वर्गणी देण्यास तयारी असल्यास मंत्रपठणपूर्वक व ब्राह्मण-भोजणासहित शुद्धि समारंभ होईल हें सांगावयास नकोच. असो, पनवेल येथें बहिष्कृतांच्या गणपतींचे देवघाटावर विसर्जन करण्यास ज्यांनीं साहाय्य केलें त्या मंडळीचा अस्पृश्य वर्ग आभारी आहे. या बाबतींत श्री. आत्माराम शेठ आटवणे यांना विशेष धन्यवाद दिले पाहिजेत. ते वारकरी संप्रदायांतले आहेत, परंतु त्यांचे धार्मिक व सामाजिक बाबतींतील विचार त्या संप्रदायांतल्या इतर पुष्कळ मंडळीप्रमाणे अनुदार नाहींत. पनवेलची ही उदारमतवादी मंडळी आणि तेथला बहिष्कृत समाज हें प्रकरण येथेंच थांबू न देतां बल्लाळेश्वराच्या देवळाजवळून देवघाटावर जाणारा रस्ता खाजगी असल्याचा जो खोटा दावा दुराग्रही सोवळ्या लोकांनीं पुढें केला आहे त्याचा कायमचा निकाल करून घेईल अशी आम्हांस आशा आहे.

❁ ❁ ❁

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. ४ आक्टोबर १९२९.

६५
एकाक्ष हिंदु समाज

इसापनीतींतल्या एकाक्ष हरिणाप्रमाणेंच हिंदु समाज अनेक बाबतींत एकाक्ष आहे. त्याचा एक डोळा रूढीनें फोडून टाकला आहे. हा फुटका डोळा ज्या बाजूस असतों ती बाजू हिंदु समाजाला दिसत नाहीं, इतकेंच नव्हे तर हा फुटका डोळा सोयीप्रमाणें वाटेल त्या बाजूस फिरवून आत्मवंचना करण्याची कला हिंदु समाजानें साध्य केली आहे. इंग्लंडचा आरमारी योद्धा नेल्सन यांची एक गोष्ट अशी सांगतात कीं, लढाई पाहतांना एकदां त्यानें मुद्दाम आपल्या फुटक्या डोळ्याला दुर्बीण लावली होती. आमचे सोवळे वीर नव्या-जुन्याच्या वादांत असेंच करीत असतात. फरक इतकाच कीं, नेल्सननें ट्राफल्गारची लढाई जिंकलीं आणि यांची मात्र सारखी पिछेहाट होत आहे ! हिंदु समाजाच्या धडक्या डोळ्याला अद्वैतवाद व 'शुनिचैव श्वपाकेच ब्राह्मणे गवि हस्तिनि ' हा समतावाद, ' यातिकुळ येथें असे अप्रमाण.' गुणांचें कारण असे अंगी ' हा तुकारामबुवांचा कोटिक्रम दिसतो, परंतु समाजांतील विषमतेकडे त्यानें आपला फुटका डोळा फिरविलेला असतो. धडक्या डोळ्याला राजकीय गुलामगिरी दिसते, परंतु सामाजिक गुलामगिरी फुटक्या डोळ्याच्या वाट्याला आलेली असते. धडक्या डोळ्याला धर्मशास्त्रांतला स्वच्छतेचा उपदेश दिसतो, परंतु ब्राह्मणांच्या पायांचे घाणेरडें पाणी पिण्यानें ब्राह्मणेतरांना मोक्षलाभ होतो या शिकवणीचा आचरटपणा फुटक्या डोळ्यानें पाहण्यांत येतो. धडक्या डोळ्याला मुसलमान व खिस्ती या धर्मांची चढाई दिसते आणि त्यामुळें संघटन व शुद्धि यांची आवश्यकता पटते, परंतु अंतःस्थ विघटना व अंतःशुद्धीचा अभाव पाहण्याच्या वेळेस फुटका डोळा आड येतो. या फुटक्या डोळ्यावर रूढिप्रियतेचा व स्वार्थाचा पडदा आलेला आहे, तो पडदा शस्त्रक्रियेनें काढून टाकून डोळा नीट करणें शक्य आहे. परंतु या डोळ्यावर शस्त्रक्रिया करून घेण्यास हिंदु समाज तयार होत नाहीं. कारण या फुटक्या डोळ्याचा आपल्या सोयीप्रमाणें उपयोग त्याला करतां येतो.

●●●

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. ४ आक्टोबर १९२९.

६६

दावर व वराडकर

कम्युनिस्टांचें ध्येय व त्यांचे मार्ग यांच्याविषयीं सहानुभूति दाखविणाऱ्या आणि त्यांची बाजू घेऊन, खऱ्या कामगार चळवळीच्या वतीनें कम्युनिस्टांना विरोध करणाऱ्या पक्षालाहि शिव्याशाप देऊन आपल्या वर्तमानपत्राच्या प्रती खपवूं पाहणाऱ्या कांही संपादकांनीं रत्नागिरी जिल्ह्यांतील मालवण देवगड नजीक कुणकवळे गांवांत तेथले एक जमीनदार वराडकर यांचा खून झाला तेव्हां मात्र आकाशपाताळ एक केले ! इतकेंच नव्हे तर सेशन कोर्टांत वराडकर खुनाच्या खटल्यांतील तीन आरोपींना फांशींची व अकरा आरोपींना जन्मठेपीची शिक्षा झाली तेव्हां सदरील पत्रकारांनीं समाधान व्यक्त करण्यासहि कमी केलें नाहीं. शिक्षा फर्मावलेल्या आरोपींच्या बायका-मुलांसंबंधानें सहानुभूतीचे नक्राश्रू ढाळून या पत्रकारांनीं त्या बायका-मुलांना वराडकरांच्या बायकामुलांच्या स्थितीची आठवण करून दिली आहे. कम्युनिस्टांच्या ' क्रांति ' पत्रानें आपल्या तत्त्वाला स्मरून वराडकर खुनासंबंधाच्या खटल्याच्या निकालावर जो लेख लिहिला आहे तो वाचून सदरील पत्रकारांना काय वाटलें असेल तें आम्हांस सांगवत नाहीं. ' क्रांती ' च्या या लेखावर टीका करण्याचें धैर्य त्यांना झालें नाहीं एवढें तरी खास ' क्रांती ' चा हा लेख कदाचित् त्यांच्या अवलोकनांत आला नसेल तर त्यांनीं अवश्य वाचून पाहावा. ज्या वेळीं पर्ल मिलमधील वीव्हिंग मास्तर दावर यांचा गिरणींत कांहीं कामगारांनीं खून केला त्या वेळीं या पत्रकारांचा किंवा लेखकांचा अत्याचाराविषयींचा तिटकारा कोठें गेला होता ? दावरला बायको-मुलें नव्हती काय ? दावरच्या खुनांत दोषी ठरलेला पापामिया फाशीं गेला तेव्हा त्याच्या बायको-मुलांना दावरच्या बायको-मुलांची त्यांनीं आठवण करून दिली होती काय ? पण दावर त्यांचा जातभाई नव्हता, तो कोंकणांतला किंवा देशावरला जमीनदार किंवा सावकार नव्हता. चायना मिलमधल्या ज्या तीन पठाण रखवालदारांचे नाहक खून करण्यात आले त्यांच्यासाठीं रडणारीं त्यांच्या कुटुंबातलीं कोणीच माणसें नसतील काय ? त्या खुनाचा निषेध या पत्रकारांनीं कधीं केला होता काय ? हे तीन खून हिंदु मुसलमानांच्या दंग्यापूर्वी झाले होते व आतांपर्यंत प्रसिद्ध झालेल्या माहितीवरून पाहतां त्यांत कांहीं खाजगी द्वेषाचा संबंध होता असेंहि दिसत नाहीं. वराडकरांच्या खुनाला पूर्वेतिहास तरी होता. कुणकवळ्याच्या आरोपीतर्फे हायकोर्टांत अपिलामध्यें अखेर निर्णय काय

होणार असेंल तो होवो, त्या बाबतींत प्रस्तुत आम्हांस कांहीं लिहावयाचें नाहीं. मुख्य मुद्दा एवढाच कीं, स्वार्थी मनोवृत्ति व ' परदुःख शीतळ ' मानण्याचें धोरण यांच्यामुळे न्यायान्यायाच्या कल्पना बदलत असतात. शहरांतली भांडवलशाही काय किंवा खेड्यांतील जमीनदारशाही, खोतशाही किंवा सावकारशाही काय, त्या सर्वांचें धोरण गरिबांच्या रक्ताचें शोषण करण्याचें असतें. ज्यांचा खेड्यांतल्या जमीनदारशाहीशीं, खोतशाहीशी किंवा सावकारशाहीशीं प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष हितसंबंध असतो ते शहरांतल्या भांडवलशाहीवर सडकून टीका करितात, कामगारांच्या संबंधाने मोठा कळवळा दाखवितात, कामगारांनी जहाल मार्ग स्वीकारले तर त्यांचे कौतुक करितात, परंतु खेड्यांतले आपल्या जातभाईचें व नातलगांचे राज्य मात्र तसेंच अबाधित राहिलें पाहिजे असें त्यांना वाटतें. शेतकऱ्यांनीं पांढरपेश्यांचा जुलूम निमूटपणें सोसला पाहिजे ; त्यांनी आपल्या घरादारांवरचीहि मालकी नाहींशी केली, आपल्या अज्ञानाचा व गरिबीचा फायदा घेऊन आपल्यास हवे तसें नागविलें, आपल्यास व आपल्या बायकां-मुलांना गुलामांप्रमाणे वागविलें, तरी त्यांत संतोषच मानला पाहिजे, असे हे संपादक धरून चालतात.

●●●

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. ४ ऑक्टोबर १९२९.

६७

पांढरपेशांची मतलबीं सहानुभूति

गिरण्यांतल्या संपाकडे नुसत्या तिऱ्हाईत दृष्टीनेंच नव्हे तर मतलबी दृष्टीनेंहि पांढरपेशा वर्ग पाहत असतो. मुंबईला येऊन कोंकणांतले व देशावरचे शेतकरी दोन पैसे मिळवितात आणि त्यामुळें गांवांतल्या सावकारांच कर्ज काढण्याचा त्यांच्यावर प्रसंग येत नाहीं. तसेंच जमीनदारांनीं जमिनीचा खंड भलतीकडे वाढविला तर मुंबईतल्या प्राप्तीमुळें शेतकरी कुटुंबांना त्या जमिनी पडित टाकणें शक्य होतें. शेतकीमध्ये मुळींच फायदा नाहीं, मेहनत करून मालकाची व सावकाराची भर करावी, असें झाल्यामुळें पुष्कळ शेतकरी कुटुंबे गांव सोडून मुंबईस येऊन राहतात व मोलमजुरी करून पोट भरतात. त्यामुळें जमीनदारांना कुळाचा तुटवडा पडून त्यांच्या जमिनी उत्पन्नाशिवाय पडून राहतात. अर्थात् गिरण्यांत संप होऊन गांव सोडून मुंबईस गेलेले लोक पुनः गावांत आले तर आपल्या जमिनी लागवडीस येतील अशी पांढरपेशा जमीनदारांना आशा असते. त्याचप्रमाणें मुंबईचा आधार नाहींसा झाला म्हणजे शेतकऱ्यांना आपल्याकडें कर्ज मागावयास येणें भाग पडेल व त्यांनी आपल्याकडून कर्ज घेतलें म्हणजे लांड्यालबाड्या करून त्यांच्या मालकीच्या जमिनी गहाण विक्रीच्या रूपानें आपल्या घशांत उतरवतां येतील असें पांढरपेशांना वाटत असतें. परंतु त्यांनी पक्के समजून असावें कीं शहरांतली चळवळ केवळ शहरांपुरतीच राहणार नाहीं. शहरांतले कामगार ती चळवळ आपआपल्या खेड्यांपर्यंत नेऊन पोंहचवितील आणि शेवटीं जमीनदार, खोत, सावकार यांना ' त्राहि भगवान् ' म्हणण्याची पाळी येईल. शहरांतल्या भांडवलशाहीचा जुलूम पाहून तापणारें रक्त जमीनदारशाही, खोतशाही व सावकारशाही यांचा जुलूम सोसतांना बर्फासारखें थंड राहील असें जर त्यांना वाटत असेल तर तो त्यांचा भ्रम आहे.

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. ४ ऑक्टोबर १९२९.

६८

हिंदु संस्कृतीचा बागुलबुवा

थोड्या दिवसांपूर्वी नायगांव येथें सत्यनारायणाच्या पूजेचा समारंभ झाला त्या वेळीं ब्राह्मण, मराठे वगैरे स्पृश्य आणि महार, मांग, चांभार वगैरे बहिष्कृत मानलेले लोक यांचे एकत्र सहभोजन झालें. या सहभोजनामध्यें भाग घेणारांमध्यें डॉ. सावरकर, रा. सुरतकर, डॉ. उदगांवकर वगैरे हिंदुमहासभावाले गृहस्थ होते. सदरील सहभोजनाची इत्यंभूत हकीकत प्रसिद्ध झाल्यावर, सदरील स्पृश्य हिंदूंना धमकावून व जबरीनें सहभोजनामध्यें भाग घेण्यास भाग पाडलें, इतकेंच नव्हे तर सदरील सत्यनारायणपूजेच्या वेळीं झालेल्या भाषणांमध्यें कांहीं समतावादी वक्त्यांनीं सत्यनारायण व गणपति या देवतांची निंदा केली, अशी बातमीहि हिंदुसमाजाचीं मनें समतावादाच्या चळवळीविरुद्ध चिथावण्याच्या उद्देशानें येथल्या एका जीर्णमतवादी पत्रानें प्रसिद्ध केली होती. त्यावर त्याच पत्रांत डॉ. उदगांवकर व रा. धडफळे यांनीं धमकावणी व जबरी यांच्यामुळें आपण व आपल्या बरोबरच्या इतर स्पृश्य हिंदूंनी सहभोजनांत भाग घेतला हें खोटें असल्याबद्दल कळविलें आहे. त्याचप्रमाणें सदरील पूजेच्या वेळीं समतावादी मंडळी आली होती ती ' बंडखोरपणा करण्यास ' आली होती, हेंहि सत्याला सोडून आहे असें वरील उभय गृहस्थानीं जाहीर केलें आहे. समतासंघाच्या नांवानें वेळीं अवेळीं बोटें मोडणाऱ्या या पत्रकाराचा खोडसाळपणा अशा रीतीनें परभारें शाबीद झाला, तेव्हां त्यानें हिंदु संस्कृतीची ढाल पुढें करून अस्पृश्यांना धमकी दिली आहे. सहभोजनानंतर मिश्रविवाहाचा प्रश्न येईल आणि महारचांभारलोक ब्राह्मण वगैरे हिंदूंपाशीं लग्नासाठीं त्यांच्या मुली मागतील आणि अशा रीतीनें सबगोलंकार झाला म्हणजे हिंदुसंस्कृति रसातळाला जाईल, त्यापेक्षां हिंदुसमाजांतून अस्पृश्य लोक बाहेर गेले तरी बेहत्तर, असें या जीर्णमतवाद्याचें म्हणणें आहे. जणूं काय, जातीतल्या जातींत तरी एकाची मुलगी दुसऱ्यानें मागितली म्हणजे त्यानें दिलीच पाहिजे असें कोठें आहे ! हिंदु संस्कृति म्हणजे काय, तिचें वैशिष्ट्य कशांत आहे, हें तरी एकदां या जीर्णमतवाद्यानीं जाहीर करावें. हल्लीं शारदा बिलाच्या विरुद्ध हाकाटी करणाऱ्या लोकांच्या मतें हिंदु संस्कृतीचें अर्थात् हिंदुधर्माचें वैशिष्ट्य, पाळण्यांत असल्यापासून आठदहा वर्षांचे वय होईपर्यंत मुलीचें लग्न करण्यांत आणि कोवळ्या वयाच्या पोरींना गर्भाधानाच्या खोलीमध्यें ढकलण्यांत आहे. एका काळीं हिंदु संस्कृति चक्री पागोटीं व रेशमी

मुगटे यांच्यांत गुरफटून राहिली होती, परंतु चक्रीपागोटीं व रेशमी मुगटे आतां फारसे कोठें दिसत नाहींत आणि हॅट, नेकटाय, कॉलर, पाटलोण असा पोशाख रूढ होऊन अंगांत सदरे घालून ब्राह्मण जेवावयास बसतात तरी हिंदु संस्कृति अद्यापि जिवंत राहिलेली आहे. इराण्यांच्या, ख्रिश्चनांच्या व मुसलमानांच्या हॉटेलांमध्यें ब्राह्मणादि जातींच्या लोकांनीं वाटेल त्या पदार्थावर ताव मारला आणि परदेशांत जाऊन तेथल्या लोकांबरोबर सहभोजन करून व त्यांच्या हातचें अन्न खाऊन इकडे शेकडों लोक आले तरी हिंदु संस्कृति नामशेष झालेली नाहीं. फक्त महार चांभारांबरोबर सहभोजन केल्यानेंच ती रसातळास जाणार आहे ! हिंदु संस्कृति म्हणजे जातिभेदाचे बंड अशीच जर व्याख्या असेल तर हिंदु संस्कृति जितक्या लवकर नामशेष होईल तितकें या देशाच्या व साऱ्या जगाच्या प्रगतीच्या दृष्टीनें चांगलें असें कोणता विचारी मनुष्य म्हणणार नाहीं ? म्हणे, सबगोलंकार हेंच जर अस्पृश्यतानिवारणाच्या चळवळीचें ध्येय असेल तर भेटीव्यवहारापुरती अस्पृश्यता असूं नये असें म्हणणाऱ्या लोकांना या बाबतींत पुनः विचार करावा लागेल ! करा, खुशाल विचार करा, अगदीं वस्त्रगाळ विचार करा. तुमचा विचार संपेपर्यंत जग बरेंचसें बदलून जाईल. तुमच्या ढोंगी सहानुभूतीची बहिष्कृतांना तरी पर्वा कशाला पाहिजे ? सहभोजनाचा धूमधडाका सुरू झाला तेव्हां कोठें ' आमची भेटीव्यवहाराला हरकत नाहीं ' असें तुम्ही म्हणूं लागलां आणि आमची खात्री आहे कीं, मिश्रविवाहांचा धूमधडाका सुरू झाला म्हणजे ' आमची रोटीव्यवहारापर्यंत हरकत नाही ' असें तुम्हीच म्हणाल. जगाच्यामागे तुमच्या हिंदुसंस्कृतीचें रहस्य दहावीस पावलें राहण्यास सांठवलेलें आहे, तुम्ही आपखुशींने पुढें पाऊल टाकणारे नाहींत, तुम्हांला दुसऱ्यांनीं खेंचून पुढें न्यावें लागतें, हें काय आम्हांला ठाऊक नाहीं ?

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. ४ ऑक्टोबर १९२९.

६९
पुणे येथील पर्वती सत्याग्रह प्रकरण

गेल्या आगष्ट महिन्याच्या २७ तारखेला रा. ल. ब. भोपटकर यांनी पर्वती येथील देवस्थानाच्या पंचांना "देवस्थानाच्या आवारांत स्पृश्यास्पृश्य भेदभाव यंदापासून नष्ट करावा व सर्व देवस्थान व देवता सर्व हिंदुधर्मीयांना खुल्या कराव्यांत व त्यांच्या धन्यवादाचें धनीं व्हावें" अशी एका जाहीर पत्राच्या द्वारें विनंती केली.† हें पत्र रा. भोपटकर यांनीं पुणें येथें ब्राह्मण वर्गानीं चालविलेल्या अस्पृश्यता निवारण मंडळातर्फे लिहिलें होतें असें समजतें. कोठेंच कांहीं नसतांना एकाएकीं सोवळ्या लोकांच्या काळजाला हात घालणारी अशी ही मागणी अस्पृश्यता निवारक मंडळानें केलेली वाचून आम्हांस मोठाच आचंबा वाटला. आणि चौकशीअंती असें समजलें कीं, पत्र लिहिण्यापूर्वी पुणें येथें राजकारणांत वावरणाऱ्या कांही ब्राह्मण गृहस्थांनी महाराष्ट्रांतील आपल्या जात भाईंची, अस्पृश्यता निवारणा संबंधी आपणांस काय करतां येईल याचा विचार करण्याकरितां एक खाजगी बैठक भरविली होती व त्या बैठकींत ज्यांनी त्यांनीं आपापल्या ठिकाणची देवळें अस्पृश्यांना खुली करण्याचा प्रयत्न करावा असें ठरविण्यांत आलें होतें. रा. भोपटकर यांनी लिहिलेलें पत्र सदरहू बैठकींतील ठरावाचाच परिणाम असावा असा आमचा तर्क आहे. कसेंहि असो अस्पृश्यता निवारक मंडळानें एक जबर कार्य आपखुषीनें व जाणूनबुजून आपल्या उरावर घेतलें हें निर्विवाद आहे व त्याच्या निष्पत्तीकडे सर्व लोकांचे डोळे साहजिकपणें लागून राहिलें होतें. बराच काळ लोटला तरी पण पर्वतीच्या पंचांनी वरील मागणीस कांहीं एक उत्तर न देतां मुग्धता स्विकारिली. पंचा कडून कांहींच उत्तर येत नाहीं, असें पाहून पुणें येथील अस्पृश्य वर्गानेंही आपणास पर्वतीचें देवालय खुलें असावें अशी प्रत्यक्ष मागणी केली. त्या मागणीला दुजोरा मिळावा म्हणून पुणें येथील युवक संघानेंही विनंती वजा पत्र लिहिलें. तरीही पंचांना वाचा फुटली नाहीं. या मुग्धतेचा अर्थ पंच आपल्या मागणीस कबूल नाहींत असें जाणून पुणें येथील अस्पृश्य वर्गातील पुढाऱ्यांनीं आपली मागणी तडीस नेण्यासाठीं जरूर तर आपण सत्याग्रह करूं अशी जाहिरात दिली. तरी पण पर्वतीच्या पंचांनीं हूं का चूं केले नाहीं. अखेर ता. २-१०-२९ रोजीं पंचांनीं अस्पृश्य वर्गांतर्फे

† पाहा परिशिष्ट क्रमांक : ११

स्पष्ट खुलासा तीन दिवसाचे आंत करावा अशी जाहीर नोटीस देण्यांत आली. या थराला जेव्हां गोष्ट गेली तेव्हां अर्थात पंचांना स्तब्ध बसणें अशक्य झालें आणि म्हणून त्यांनीं ता. ८ ऑक्टोबरच्या केसरीत आपला खुलासा जाहीर रीतीनें सर्वांना कळविला. त्यांत ''सदरहू देवस्थान पंचकमिटीच्या खाजगी मालकीचें आहे, ज्या श्रीमंत बाळाजी बाजीराव उर्फ नाना साहेब पेशवे यांनीं तें बांधलें तें त्यांनीं आपल्या खाजगीं खर्चानें बांधलें त्यांत अस्पृश्य वर्गास, तें हिंदुधर्मीय असले तरी इतर उच्च वर्णीय हिंदु वर्गाला देवळांत जेथवर जातां येतें तेथवर जाण्याचा हक्क नाहीं व तशी आजपर्यंत वहिवाटही नाहीं व सदरहू देवस्थानाची व्यवस्था पंचकमिटीकडे ट्रस्टी या नात्यानें असल्यामुळें मूळ संस्थापकाच्या हेतू बाहेर कोणतेंही कृत्य करण्याचा कोणत्याही पंचास बिलकूल अधिकार पोहोंचत नाहीं''. अशी कारणें देऊन आपल्याला ही मागणी मान्य करतां येत नाहीं म्हणून सांगितले. हा खुलासा प्रसिद्ध झाल्यानंतर पुण्यांतील अस्पृश्य वर्गाला सत्याग्रहाचा उपाय अमलांत आणणें प्राप्त झालें व त्या प्रमाणें त्यांनीं गेल्या महिन्याच्या ता. १३ रोजी पर्वती येथें सत्याग्रह केला.†

पुणेरी कर्मठांची गुंडगिरी.

या सत्याग्रहांत विरूद्ध पक्षाच्यातर्फे कोणकोणतें अनन्वित प्रकार घडले याचे निरिक्षण केलें असतां पुणें म्हणजे एक बदमाषांचा अड्डा व लबाडांची पेठ आहे असेंच म्हटलें पाहिजे. पुण्याच्या सत्याग्रहांत † कायते १००-१५० लोकच होतें. एवढ्याशा अल्पसंख्याबलावर इतक्या मोठ्या कार्याची उभारणी करण्याचें साहस करणाऱ्या पुण्याच्या अस्पृश्य लोकांवर हात टाकण्याऐवजी त्यांचें कौतुक करणेंच योग्य झालें असतें. शिवाय हा सत्याग्रह अगदीं शांततायुक्त होणार असें पूर्वीच जाहीर झालें होतें. सत्याग्रहांत येणाऱ्या लोकांनी हातांत काठ्या घेऊं नयेत व छत्र्या देखील घेऊं नयेत अशी एक अट घालण्यांत आली होती व ती अक्षरशः पाळण्यातहि आली होती. असें असतां १००-१५० सत्याग्रही लोकांना नामोहरम करण्यासाठीं पांचसहा हजार स्पृश्य लोकांचा जमाव गोळा करून सत्याग्रही लोकांवर हात टाकावयास लावून त्यांच्यावर दगडांचा, विटांचा व वहाणांचा वर्षाव करावयास सांगून प्रतिकार न करण्याचा निर्धार ज्यानीं पूर्वीच जाहीर केला होता, अशा सत्याग्रही लोकांवर हल्ला करण्यास प्रवृत्त होणें यासारखा आसुरी प्रकार इतरत्र कोठें पहावयास सांपडेल किंवा नाहीं याची मोठी शंकाच आहे. या दांडगाईखोर लोकांना आमचें असें सांगणें आहे कीं ते अस्पृश्यांच्या सत्याग्रहाच्या बाबतींत जर सशस्त्र प्रतिकाराचा अवलंब करतील तर अस्पृश्यांच्या सत्याग्रहाच्या

---

† पाहा, परिशिष्ट क्रमांक : १२

आजच्या भांडणाचें रूपांतर करण्यास तें कारणीभूत होतील. अस्पृश्यांचा आजचा सत्याग्रह शस्त्रसंन्यासयुक्त आहे; परंतु त्यांचे विरोधी जर प्रतिकाराच्या धोरणाचा अवलंब करतील तर अस्पृश्य लोकहि आपले हक्क प्रस्थापित करण्यासाठीं दगडांचा व विटांचा मार खात न बसतां माणुसकी विसरून निःशस्त्र व निरुपद्रवी सज्जनांना मारहाण करणाऱ्या पाशवी वृत्तीच्या लोकांना ताळ्यावर आणण्यासाठीं उलट तशाच प्रतिकाराचे धोरण स्वीकारण्याच्या तजविजीस लागतील. अप्रतीकाराच्या सत्याग्रहाचें तत्व महाराष्ट्रीय अस्पृश्यांच्या तरी अंगी बाणलेलें नाहीं. इतकेंच नव्हे तर अप्रतीकारावर अवलंबून राहिल्यास आपल्या उदात्त वर्तनाला क्लेब्य समजून आपले प्रति पक्षी आपला छळ करण्यास अधिकच प्रवृत्त होतील हेंही ते विसरलेले नाहीत. तथापि हा सर्व मुळस्वभाव बाजूस ठेऊन अप्रतीकाराचें सोंग घेऊन हा सत्याग्रहाचा क्रार्यक्रम तडीस नेण्याचा त्यांचा मानस आहे. परंतु हें सोंग कितपत टिकेल हें सर्वस्वी त्यांच्या प्रतिपक्षाच्या वागणुकीवर अवलंबून राहील. आपल्या हल्ल्यामुळें जर्जर होऊन बहिष्कृत वर्गांतलें लोक मंदिर प्रवेशाची मागणी सोडून देतील, अशी समजूत बऱ्याचशा धर्म भोळ्या लोकांत त्यांच्या सनातनी पुढाऱ्यांनी उत्पन्न केली आहे. आणि म्हणूनच कोणत्याही प्रकारचा उपाय योजून अस्पृश्यांना बंदी करा अशा प्रकारची हस्तपत्रके पुण्यांत वाटण्यांत आली. परंतु वाटेल त्या प्रकारचें अतिक्रमण करून अस्पृश्यांचा सत्याग्रह चालूं देऊं नये अशी शिकवण देणाऱ्या लोकांना आम्हाला असे सुचवावयाचें आहे कीं, जे अस्पृश्य लोक आज भक्तिभावानें व हिंदुधर्माविषयींच्या आपुलीकीच्या भावनेनें देवदर्शनासाठीं येत आहेत तें गझनीच्या महमुदाप्रमाणें मूर्ती फोडण्याची मोहीम सुरूं न करोत म्हणजे झालें. पाण्याचा ओघ वळवितां येईल पण तो आडवितां येणार नाहीं. जो बांध घालून आडविण्याचा प्रयत्न करील त्याचा बांध तर फुटून जाईलच पण अडविलेलें पाणी अनर्थ केल्याशिवाय राहणार नाहीं. अज्ञ समाजांतील गुंडांच्या शक्तिवर उड्या मारून अस्पृश्यांना हिणविणाऱ्या, त्यांचा तेजोभंग करणाऱ्या या महामुर्खांनीं ध्यान्यांत ठेविलें पाहिजे कीं, कोणत्याहि शक्तिचा आसुरी रितीनें उपयोग करणें यांत इतरापेक्षां स्वतःचाच नाश अधिक असतो.

अस्पृश्यांचे ढोंगी कैवारी.

जीर्ण मतवाद्यांनी घातलेला हा गोंधळ आणि हिंदुधर्माची केलेली विटंबना उमगण्यासारखी आहे. परंतु या सत्याग्रह प्रकरणांत न उमगण्यासारखी व

वैचित्र्यपूर्वक अशी एकादी कोणती गोष्ट असेल तर ती पुण्यांतील अर्धवट नवमतवाद्यांची वर्तणूक ही होय. या पुणेरी नवमतवाद्यांत दोन पक्ष आहेत. एक समाजकारणासाठीं अस्पृश्यता निवारक मंडळासारखें अस्पृश्यांचे पुरस्कर्ते म्हणविणारें व दुसरे राजकारणासाठीं अस्पृश्याबद्दल सहानुभूती दाखविणारें केळकराखारखे राजकीय पुढारी हे होत. या लोकांची स्वतः सत्याग्रह करण्याची तयारी नव्हती हें त्यांनीं जाहीर केलें आहे. तथापि सत्याग्रही लोकांना जी हाणमार करण्यांत आली ती देखील आपणास मान्य नाहीं असें हे लोक मोठ्या पोक्तपणानें सहानुभूतीचा आव आणून सांगत आहेत. परंतु या लोकांना आम्ही असें विचारतो कीं, तुमची ही हळहळ व सहानुभूति जर वरवरची नसेल तर हा अनर्थ टाळण्यासाठीं तुम्ही काय केलें ? अस्पृश्य सत्याग्रहींना विरोध करावयाचा असेल तर त्यांत देहदंडनाचा समावेश होऊं नये अशी शिकवणूक देण्यासाठीं पुण्यांत एखादी तरी सभा भरवून शांततेचा उपदेश तुम्हीं केलात काय ? यांना सत्याग्रह करावयाचा नव्हता तो त्यांनीं केला नाहीं त्याबद्दल आम्ही त्यांना दोष देतं नाही. परंतु त्यांना निदान सत्याग्रही अस्पृश्य लोकांना विरोध करतांना अनत्याचारपूर्वक विरोध करावा एवढी तरी चळवळ करतां आली नसती काय ? एवढें जर त्यांनीं केलें असतें तर अस्पृश्यांचा सत्याग्रह सिद्धीसही गेला असतां असें आम्हास वाटतें. कारण मारहाणीचा प्रकार नाहींसा झाला असतां तर अखेर सामना झाला असतां तो निष्ठेचाच झाला असतां आणि त्या निष्ठेच्या सामन्यांत अस्पृश्य सत्याग्रही कसास उतरलें नसतें असें कोणासही म्हणतां येणार नाहीं. हिंदुसमाजाचे पुढारी म्हणविणाऱ्या या शिष्टांनी हें तर केलें नाहींच परंतु अस्पृश्यांचा सत्याग्रहच होऊं नयें म्हणून त्यांच्या मार्गात अडचणी मात्र उत्पन्न केल्या. असो ! वरील दोन पक्षांपैकीं पहिल्या म्हणजे पर्वती देवालय प्रवेशाचे सूतउवाच करणाऱ्या पक्षावर विशेष जबाबदारी होती हें कोणीही सांगू शकेल. परंतु आश्चर्याची गोष्ट ही कीं, ज्या दिवशीं पर्वती पंचांनीं आपला खुलासा जाहीर केला त्याच दिवशीं अस्पृश्यता निवारक मंडळानेंही जाहीर रीतीनें पुणेंकरांस कळविलें कीं, सत्याग्रहाच्या चळवळींशी आपला अगर आपल्या मंडळींचा कोणताही संबंध नाहीं. आपण तिचा आरंभही केलेला नाहीं किंवा तिला प्रोत्साहनही दिलेलें नाही. अशा रीतीनें स्वतः केलेली मागणी सार्थ करण्याच्या जबाबदारींतून आपलें अंग काढून घेतल्यानंतर त्याची सर्व जबाबदारी स्थानिक अस्पृश्य वर्गावर साहाजिकपणेंच येऊन पडली.

पंच व ढोंगी कैवारी यांचे संगनमत.

पर्वती पंचांचा खुलासा व अस्पृश्यता निवारक मंडळाचा खुलासा हें दोन्ही खुलासे एकाच तारखेस प्रसिद्ध होतात ही गोष्ट मुळांतच विचित्र अशी दिसते. पंच व अस्पृश्यता निवारक मंडळ या उभयतांत आदल्या दिवशीं विचार विनिमय होऊन अस्पृश्यता निवारक मंडळाच्या मनाचा ठाव घेतल्यानंतरच पंचानीं नकारार्थी उत्तर दिलें असें म्हटलें असतां तार्किक दृष्ट्या तें अयुक्त होईल असें आम्हांस वाटत नाहीं. तसें जर नसतें तर ज्या दिवशीं पुणें येथील अस्पृश्यांनी आपण सत्याग्रह करूं असें जाहीर केलें, त्याच दिवशीं या सत्याग्रहास आपली संमती नाहीं व त्यास आपण कोणत्याहि प्रकारचा पाठिंबा देणार नाहीं असें अस्पृश्यता निवारक मंडळास जाहीर करण्यास काय हरकत होती ? तसें जर झालें असतें तर ट्रस्टींशीं संगनमत करून अस्पृश्यांचा विश्वासघात केल्याचा त्यांच्यावर आरोप करण्यास वस्तुस्थितीमुळें जें कारण सांपडतें तें सांपडलें नसतें. शिवाय अस्पृश्य लोकांना अस्पृश्यता निवारक मंडळ आपल्याला कोठपर्यंत सहाय्य करण्यास तयार आहे याचा वेळींच उलगडा होऊन, प्रसंगी कोणावर विसंबून रहावें लागेल याचा अंदाज करतां आला असता. तसें न करण्यात अस्पृश्यता निवारक मंडळाची शुद्ध फसवेगिरी आहे असें मोठ्या दिलगिरीनें म्हणावें लागते.

नीच कुटील भेदनीति !

अस्पृश्य वर्गाच्या फसगतिवरच ही गोष्ट थांबली असती तरी पुरें झालें असतें. परंतु दुर्दैवानें तसें झालें नाहीं. अस्पृश्यतानिवारक मंडळाचा पाठिंबा गेला तो गेलाच पण त्याचबरोबर पुणें येथील अस्पृश्य वर्गांत फाटाफूट पाडण्याचा प्रयत्न करण्यांत आला. पुणें येथें मातंग समाजाचे पुढारी म्हणविणारे रा. सकट यांनी सत्याग्रहाशीं आपला कोणत्याही प्रकारचा संबंध नाहीं असें जाहींर करून अगदीं आयत्यावेळी सत्याग्रही लोकांना दगा दिला. त्याच प्रमाणे पुण्यांतील हरळे चांभार समाजाच्या कांही पुढाऱ्यांनीं आपण या सत्याग्रहांत भाग घेण्यास तयार नाहीं असें जाहीर केलें. आणि सर्वांत खेदाची गोष्ट म्हणजे ही कीं, ज्या अस्पृश्य वर्गांतील महार जातीवर ती बहुसंख्यांक असल्या कारणानें सहजगत्या सर्वप्रकारची जबाबदारी येऊन पडते त्या महार जातीतील ६०-६५ लोकांच्या सह्यांचें एक पत्र केसरींत प्रसिद्ध करून महार जातीचा सत्याग्रहास विरोध आहे असें जाहीर करण्यांत आले. ह्या सर्व फाटाफुटीच्या गोष्टी आपखुशींने झाल्या किंवा कोणी तरी कारवाई करून त्या घडवून आणल्या ही गोष्ट विचार करण्यासारखी आहे. आमची खात्री आहे की, अस्पृश्यांतील ही फाटाफूट

कोणीतरी नीच वृत्तीच्या लोकांनी घडवून आणली असली पाहिजे. खरोखरीच जर पुण्यांतील अस्पृश्य वर्ग सत्याग्रहाच्या विरूद्ध असता तर आपला विरोध त्यांनी केव्हांच जाहीर केला असता. शेवटच्या दिवसापर्यंत त्यांनी मुग्धता स्वीकारली नसती. शिवाय ज्या महार लोकांनी सत्याग्रहाच्या विरूद्ध आपलें मत प्रसिद्ध केलें त्यांनी आपण होऊनच कबुली दिली आहे कीं, आपल्या सह्या फसवून घेण्यांत आल्या ! त्यांना कोणी फसविलें ही गोष्ट जाहीर झाली असती तर फार बरें झालें असतें. तथापि ही कारवाई अस्पृश्याशीं सहानुभूती दाखविणाऱ्या कोणातरी बदमाषांची असली पाहिजे. आम्हांस आनंद वाटतो कीं ज्या महार लोकांनी सत्याग्रहाच्या विरूद्ध आपलें मत जाहीर केलें होतें त्यांनी सत्याग्रहाच्या दिवशीं प्रसंग ओळखून निःशंकपणें सत्याग्रहांत भाग घेतला. आमच्या अस्पृश्यबंधूस आमची अशी नम्र सूचना आहे की, स्वतःच्या उन्नतिच्या बाबतींत त्यांनी कोणत्याही स्पृश्य माणसाच्या सल्लामसलतीवर विश्वास ठेऊन चालूं नये. नाहींतर ज्याप्रमाणे पुण्यांत ऐन आणिबाणीच्या प्रसंगी एकीची बेकी झाली तशी बेकी सर्वत्र झाल्याशिवाय राहणार नाहीं.

अस्पृश्यता निवारणाचा प्रसार करून देवळें उघडावी असें ज्यांनी प्रतिपादन केलें व तेणें करून अस्पृश्यांची मनोभूमीका सत्याग्रही बनविण्यास जे कारणीभूत झाले त्याच लोकांनी ऐन वेळीं सत्याग्रहाशीं आमचा कांहीं संबंध नाहीं असें म्हणून अवसानघात केला, इतकेंच नव्हें तर त्यांनी अस्पृश्यांत फूट पाडून त्यांच्या कार्यातील अडचणी शतगुणित केल्या. अशा प्रकारचे नामधारी अस्पृश्यतानिवारक लोक आमच्या मतें उघडपणें दंडेली करणाऱ्या सनातन्यांपेक्षांहि हीन दर्जाचें ठरतात, आणि म्हणून पुण्याच्या सनातन्यांच्यां सभेंत त्यांचा जो निशेध करण्यांत आला तो योग्यच होता असें आम्हांस वाटते.

विचित्र कोटीक्रम.

या लोकांनी सत्याग्रहाला पाठिंबा दिला नाहीं, याची अनेक कारणें देण्यांत आली आहेत. त्यांतील एक कारण म्हणजे हा सत्याग्रह केवळ नांवाचा बडेजाव करण्याकरितांच करण्यांत आला होता हें एक होय. रा. राजभोजादि सत्याग्रहांत भाग घेणाऱ्या मंडळीवर असा ठपका ठेवण्यांत आला आहे कीं, "राजभोज सांप्रदायाप्रमाणें देवालयें स्वेच्छेंने उघडण्याची कांही मातबरी नाहीं. कारण त्या योगे या सांप्रदायाला हवें असणारे पराक्रमश्रेय व स्वावलंबनश्रेय हारपेल ! उलट स्वेच्छेंने देवळें उघडणाऱ्या देऊळवाल्यांस यापुढें कदाचित असें सांगावे लागेल कीं "तुम्ही कांही अस्पृश्य मंडळींना, विषेशतः त्यांतील पराक्रमेच्छू राजभोज संप्रदायी पुढाऱ्यांना कांही तरी युक्तीनें सत्याग्रहच करावयास लावा कांहीं

दिवस त्या सत्याग्रहाला विरोध करा. धक्काबुक्कींत शारिरीक त्रास सोसल्याचें श्रेय, खरें अगर निदान वर्तमान पत्रांत जाहीर होण्यापुरतें, त्यांना लाभूं द्या आणि शेवटीं, स्वेच्छेनें नव्हे या पराक्रमी मंडळीच्या पराक्रमापुढे हतबल होऊन मी देऊळ उघडलें असें म्हणा ! म्हणजे अस्पृश्यता निवारणहि साधेल आणि राजभोज संप्रदायाचे पराक्रम श्रेयही साधेल !" ज्या स्पृश्य हिंदुंची आपखुषीनें देवळें खुली करण्याइतकीं दानत असेल त्यांना अशी भाषा कदाचित शोभेल. पण ज्यांच्यांत तशी दानत नाहीं त्यांनीं एवढा आव आणणें म्हणजे दैत्यानें स्वतःस देव म्हणवून घेण्यासारखें आहे. परंतु वरील म्हणण्यांत कांहीं तथ्यांश असला तरी देखील अस्पृश्यांनी स्वतःचे हक्क कमाविण्याच्या बाबतींत याचकवृत्तीचा परिपोष का करावा ? आपल्याला सकाळ संध्याकाळ फुकट सुग्रास अन्न मिळत असतांना, तें न घेतां स्वकष्टार्जित आर्धी भाकर मिळविण्याचा जो कोणी मनुष्य प्रयत्न करतो त्यास परान्नपुष्ट ब्राह्मणांखेरीज कोणी दोष देईल असें आम्हांस वाटत नाहीं. मग याचकवृत्तीची संभावना न करतां क्षात्रतेज प्रगट करून जर अस्पृश्यांनी आपलें हक्क मिळविण्याचा प्रयत्न केला तर त्यांना ठपका कां देण्यांत यावा हें आम्हांस कळत नाहीं. शिवाय सत्याग्रह करणाऱ्यांचा हेतु कितीही दोषास्पद असला तरी त्यांचे ध्येय त्या योगें कसें दूषित होऊं शकते हेंच आम्हांस कळत नाहीं. साधनांचा बरें वाईटपणा हा सर्वस्वीं त्याच्या परिणामाकडे पाहूनच ठरविला पाहिजे. अर्थात सत्याग्रहाच्या विरूद्ध, ही जी सबब सांगण्यांत आली आहे ती सर्वथा पोकळ आणि लबाडीची आहे, असेंच म्हटले पाहिजे. सत्याग्रहाला विरूद्ध सांगण्यांत आलेली दुसरी सबबहि त्याच मासल्याची आहे.

मतपरिवर्तनाची सवय.

ती सबब ही कीं, अस्पृश्यता निवारणाचा प्रश्न हा मतपरिवर्तनानेंच सोडविला पाहिजे तो सत्याग्रहानें सोडविला जाणार नाहीं; व सत्याग्रहानें सोडविण्यास गेलें असतां तो अधिकच बिकट होईल. अस्पृश्यता निवारण म्हणजे स्पृश्य हिंदूंचे मत परिवर्तन ही गोष्ट आम्हांसही पटते; पण सत्याग्रह व मतपरिवर्तन हे दोन मार्ग अगदीं भिन्न व परस्पर विरोधी आहेत, हें मात्र कबूल करावयास आम्ही तयार नाहीं. ज्या लोकांनी मतपरिवर्तनाचा एवढा मोठा महिमा गाण्यास आरंभ केला आहे त्या लोकांनीं मतपरिवर्तन करण्याचे मार्ग कोणते हे तरी एकदां निश्चितपणे सांगावें. व्याख्यानादि उपायांची मात्रा हिंदु जनतेवर केव्हांही लागू पडणें शक्य नाहीं याचा अनुभव सर्वांना येऊन चुकला आहे; कारण हिंदु जनता ही रामदासानें सांगितल्याप्रमाणें सिद्ध, साधक किंवा मुमुक्षु या कोणत्याच वर्गात येऊं शकत नाही.

ती फक्त बद्ध वर्गात येऊं शकतें. अशा बद्धवर्गाचें मतपरिवर्तन करण्यासाठी व्याख्यानांशिवाय दुसरा कांहीं मतपरिवर्तनाचा मार्ग असल्यास तो पडताळून पाहण्यास आमची हरकत नाही. परंतु, तसा एखादा मार्ग आहे, याची आम्हांस कल्पना नाही. उलट आमची अशी खात्री आहे की, सत्याग्रह व मतपरिवर्तन हे दोन भिन्न व परस्परविरोधीं असें मार्ग नसून मतपरिवर्तन साध्य होण्यास सत्याग्रह हें एक मोठेच साधन आहे. बद्ध लोकांच्या कोणत्याहि प्रश्नाची ज्ञानयुक्त धारणा करावयास लावण्यास त्यांच्या आचारांत व विचारांत मोठी क्रांति घडवून आणली पाहिजे. त्या शिवाय ते आत्मनिरिक्षण करण्यास उद्युक्त होणार नाहींत व तसें जोपर्यंत नाहीं तोपर्यंत त्यांच्यांत मतांतर होणार नाहीं.

हा युक्तीवाद जर ग्राह्य धरला, आणि डोळ्यांत झणझणींत अंजन पाडल्याशिवाय ज्ञान नाहीं हें जर कबूल केलें तर हेंहि मान्य करावे लागेल कीं, सत्याग्रहासारखी समाजाच्या दुराग्रहावर लागूं पडणारी कोणतीच दुसरी मात्रा नाहीं. कारण तिचा आघात प्रत्यक्ष आचारावर होत असल्याकारणानें ती दरेक माणसास विचार करण्यास लावते. याचे प्रत्यंतर खुद्द पुण्यातच पाहावयास सापडतें. पुण्यांत हल्ली जी खळबळ उडाली आहे व जे लोक पूर्वी अस्पृश्यता निवारणाच्या बाबतींत मुग्ध होते तेहि उघड बहिष्कृतांची बाजू घेऊं लागले आहेत हा कशाचा परिणाम आहे ? या प्रश्नाला एकच उत्तर आहे असें आमचे मत आहे. आणि तें उत्तर म्हणजे हा परिणाम सत्याग्रहाचा आहे; दुसरा कशाचाहि नाहीं. सत्याग्रहाला नाकें मुरडणाऱ्या केसरी कंपूनें सत्याग्रहामुळें तडजोड घडवून आणण्यास आपण कबूल झालों याचा केसरीतून इन्कार केलेला आहे. परंतु या केसरी कंपूला आमचा असा प्रश्न आहे कीं, सत्याग्रहापूर्वीच आपलें मतपरिवर्तन झालें होतें ही गोष्ट खरी असेंल. परंतु त्या मतपरिवर्तनाप्रमाणें काही तरी प्रत्यक्ष कृति घडवून आणावी या उद्देशानें देवालय प्रवेशाच्या बाबतींत पंचाशीं मध्यस्थी करण्यास कोणता प्रसंग कारणीभूत झाला हें सांगून द्याल काय ? आमच्या मतें केसरीं कंपूला आपल्या मताप्रमाणें कृति करण्यास जर कशानें भाग पाडलें असेल तर तें सत्याग्रहानेंच होय. सत्याग्रह जर झाला नसता तर केसरीचें मत वांझेच्या पुत्रेच्छे प्रमाणे कल्पनेंतच राहिलें असतें. सत्याग्रहानें केसरी कंपूस क्रिया करावयास लावली ही सत्याग्रहाच्या सामर्थ्याची कांही लहानशी साक्ष नव्हे. जे लोक अशा परिणामकारी उपायाला बिचकतात आणि त्याचा अवलंब निषिद्ध ठरवितात त्या लोकांची ध्येयाच्या ठिकाणी निष्ठा नसून ध्येयाविषयीं नुसती वाचाळता आहे असेंच म्हणणें प्राप्त होतें.

तडजोडीच्या निष्फळतेची कारणें.

आतां हीं तडजोड निष्फळ ठरली हें खरें. तथापि, त्याचा दोष सत्याग्रहावर नसून मध्यस्थांच्या कमकुवतपणावरच ठेवला पाहिजे. हें तडजोडीचें कार्य

रा. केळकर, रा. भोपटकर व रा. माटे यांच्यावर सोंपविण्यांत आलें याचेंच आधीं आम्हांला आश्चर्य वाटतें. तडजोड करणाऱ्याच्या अंगी दोहोंपैकी एकतरी गुण असावा लागतो. एकतर त्यांच्या अंगी एवढें थोरपण असलें पाहिजे कीं, त्यांच्या शब्दाला जनता मान तुकविण्यास तयार होईल किंवा तडजोड करणारांत निकराचा करारीपणा तरी हवा. सामोपचाराचें बोलणे ऐकलें नाहीं व तडजोड केली नाहीं तर मध्यस्थांची मनें दुखावली जाऊन ते उघडपणें सत्याचा पक्ष घेऊन सामना देण्यास तयार होतील अशी दुराग्रही पक्षाला भिती वाटली पाहिजे. या दोन्ही दृष्टींनीं पहातां सदरील मध्यस्थ अगदी कूचकामाचें होते असे म्हटल्याशिवाय गत्यंतर नाहीं. कारण त्यांचा शब्द खाली न पडण्याइतकें बहुजन समाजावर त्यांचे वजन नाहीं. अस्थिरबुद्धि व अनिश्चित कृती यामुळें रा. केळकर ह्यांना महाराष्ट्रांत मान नाहीं असे म्हटल्यास त्यांत अतिशयोक्ति होणार नाही असे आम्हास वाटते. या मध्यस्थांच्या ऐवजी जर हें कार्य एखाद्या खऱ्या हिंदुधर्माची ओळख असणाऱ्या शंकराचार्यानें हातीं घेतलें असतें तर त्यांत त्याला कदाचित अधिक यश येण्याचा संभव होता. करारीपणाच्या दृष्टीनें पहावयास गेलें तर अगदीं शून्य ! जो मनुष्य अन्यायानें निकाल झाला तरी आपण कांहींच करणार नाहीं असें अगोदरच जाहीर सांगतो त्यानें हक्क संरक्षणाच्या प्रित्यर्थ न्यायाचें व नितीचें कितीही रडगाणें गाईलें तरी त्याचें कोणीहि ऐकणार नाहीं हा व्यवहारांतील अनुभव सर्वांना आहेच. माटे, केळकर व भोपटकर यांनीं आगोदरच जाहीर केलें होतें कीं, मध्यस्थीचा घाट फसला तरी आपण सत्याग्रह केव्हांच करणार नाहींत. इतकेंच नव्हें तर आपण सत्याग्रह करूं असें ज्यांनी जाहीर केलें होते त्यांच्या वर्तनाला केसरीनें निंद्य म्हटलें आहे. जणूं काय सत्याग्रह करणें म्हणजे मद्यपान वा वेश्यागमन अशा पातकापेक्षांहि मोठें पातक आहे ! इतकें ज्यांचें दौर्बल्य आहे, त्यांच्या हातून जर इष्ट अशी तडजोड झाली नाहीं तर तो मध्यस्थांच्या कमकुवतपणाचा परिणाम आहे, सत्याग्रहाचा नव्हें असेंच म्हटले पाहिजे.

मतपरिवर्तनाचें तुणतुणें वाजविणारांना सवाल.

या मतपरिवर्तनवादी लोकांना आम्ही असें विचारितो कीं तुम्ही अस्पृश्यांचा देवालय प्रवेश होण्यापूर्वी किती काळ पर्यंत व किती लोकांचे मतपरिवर्तन करणार ? सर्वच स्पृश्य हिंदु जनतेचें मतपरिवर्तन झाल्याशिवाय अस्पृश्यांना मंदीर प्रवेश नसावा असें जर यांचें मत असल तर अस्पृश्यांना अनंतकालपर्यंत थांबावें लागणार आहे व तेवढ्याच कारणावरून हें मत अव्यवहार्य म्हणून सोडून दिलें पाहिजे. आता स्पृश्य हिंदु समाजातील बहुजन समाजाचें मतपरिवर्तन झाले, म्हणजे मग अस्पृश्यांनी मंदीर प्रवेशाचा प्रयत्न करावा असें जर मतपरिवर्तनवाद्यांचे ध्येय

असेल तर त्यामुळं सत्याग्रहाची जरूरी कमी न होतां उलट अधिकच शाबीद होते. कारण ज्यांचे मतपरिवर्तन झालें नाहीं अशा स्पृश्य हिंदूंनी जर अस्पृश्यांस मंदीर प्रवेशाच्या बाबतींत अडथळा करण्याचें मनांत आणिलें तर, त्यांच्याविरूद्ध तरी अस्पृश्यांना सत्याग्रह हा करावाच लागणार आहे. अशा दृष्टीने पहातां अस्पृश्यता निवारणासाठीं

सत्याग्रहाशिवाय दुसरा उपाय नाहीं

असें आमचें प्रामाणिक मत आहे. आणि जे लोक आज सत्याग्रहाविरूद्ध मतपरिवर्तनाची तळी उचलून धरीत आहेत ते जर निर्विकार बुद्धीनें व प्रामाणिकपणानें या प्रश्नाचा विचार करतील तर त्यांनाही दिसून येईल कीं, मतपरिवर्तनासाठीं तरी सत्याग्रह हा झालाच पाहिजे

स्वराज्य मिळेपर्यंत थांबण्याचा सल्ला !

आमचा हा कोटिक्रम मान्य असूनहि ज्यांना सत्याग्रह अमान्य आहे असे शेट जमनालाल बजाज यांच्यासारखे कट्टे अस्पृश्यता निवारक आहेत, हें आम्ही कबूल करतों. परंतु त्यांची विचारसरणी आम्हांस पटत नाहीं. अस्पृश्यांनी सत्याग्रह करणें रास्त असलें तरी हल्लींच्या परिस्थितींत तो करणें ईष्ट नाहीं असें त्यांचे मत आहे. देशाची परतंत्रता घालविण्यासाठी सर्व देशांतील लोकांनी एकवट होऊन आज इंग्रज सरकारकडून स्वराज्य मिळविण्याचा घाट घातला असताना अशा आणिबाणीच्या वेळीं अस्पृश्यांनी आपल्या हक्काचे भांडण पुढें करून देशात दुही माजवावी हें बरे नाहीं, या युक्तिवादाला आमचें असें उत्तर आहे कीं, अस्पृश्यांची गुलामगिरी कायम ठेवण्याकरितांच जर स्वराज्य मिळविण्याची खटपट असेल तर अशा खटपटीला जितकी विघ्नें आणता येतील तितकीं विघ्नें आणणें हें अस्पृश्य वर्गांतील दरेक व्यक्तीनें आपलें कर्तव्यकर्म म्हणून समजलें पाहिजे. आज अस्पृश्यांना हक्क देण्यास जर स्पृश्यलोक तयार झाले असते तर आमच्या कल्याणाबद्दल त्यांना आस्था आहे असा विश्वास ठेऊन स्वराज्याच्या दोऱ्या त्यांच्या हातांत जाऊं देण्यास अडथळा करा असा उपदेश कोणी केला नसता; परंतु जे लोक आज आम्हांला साधे माणुसकीचे हक्क देण्यास तयार नाहींत ते उद्या स्वराज्य मिळाल्यानंतर आमची माणुसकी ओळखतील व स्वतःच्या माणुसकीला जागतील असे मानणारा एकही अस्पृश्य नाहीं. म्हणूनच ज्या स्वराज्याला स्पृश्यलोक भाग्य असें म्हणतात त्यालाच अस्पृश्य लोक एक मोठी आपत्ती आहे असें समजतात. खरोखर शेट जमनालाल बजाज यांचा युक्तीवाद आम्हांस अगदीं पोचट असा दिसतों. स्वराज्य मिळविण्याप्रित्यर्थ ज्यांचे सहाय्य पाहिजे अशा लोकांना

त्यांच्यावरील अन्याय दूर करून परस्परांत विश्वासाचा ऋणानुबंध उत्पन्न करणें हाच राजकारणांत एकी उत्पन्न करण्याचा राजमान्य मार्ग आहे असें आम्हांस वाटतें. अन्याय पिडीत लोकांना तुम्हीं आतां ओरड करू नका, स्वराज्य मिळाल्यानंतर तुमची दाद घेऊं, असें सांगणें हा एकी उत्पन्न करण्याचा खुळा प्रकार आहे असेंच म्हटलें पाहिजे. कोणी कांहींही म्हणों, अस्पृश्य लोकांनी मात्र एवढें ध्यानांत ठेवलें पाहिजे की, कोणत्याही सबबीवर त्यांच्या स्वातंत्र्याचा काळ त्यांनी लांबणीवर टाकण्याच्या भरीस पडू नये, शत्रूंच्या अडचणी पाहून त्यांच्यावर मार करणें हा युद्धांतील एक सर्वसामान्य असा नियम आहे. त्याचा अवलंब सर्वत्र जेत्या विरूद्ध जित लोकांनीं केलेला आहे. आयरिश लोकांनीं इंग्लिश लोकांपासून आपलें हक्क प्राप्त करून घेण्यासाठीं ह्या मार्गाचा पदोपदी उपयोग केला होता. खुद्द कै. टिळकांनीं 'साम्राज्याच्या गरजा, येति आमच्या काजा' या आयरिश लोकांच्या वागणुकीचा अनुवाद करून हिंदुस्थानांतील लोकांनी तोच अडवणुकीचा मार्ग पत्करून जेव्हां जेव्हां इंग्लिश साम्राज्यावर आणिबाणीचे प्रसंग येतील तेव्हां आमचे हक्क द्या तरच आम्ही तुम्हाला सहाय्य करूं अशी निकराची वृत्ति राजकारणांत सदोदित ठेवण्याविषयीं शिकवण दिलेली आहे. स्वराज्यासाठीं उतावीळ झालेल्या हिंदु पुढाऱ्यापासून आपले हक्क मिळवून घेण्याची हीच संधी आहे, असें पाहून आमचे हक्क द्या मग आम्ही तुमच्या स्वराज्याच्या मागणीला दुजोरा देतो, अशा हटीतटीनें मुसलमान लोक हिंदूशीं वागत आहेत. मग बिचाऱ्या अस्पृश्यांनीच हें धोरण ठेवूं नयें असें म्हणण्यांत काय हाशील आहे. आमच्या मतें स्वराज्य मिळेपर्यंत थांबा म्हणून सांगणारा एक तर भोळा किंवा कार्यसाधु असला पाहिजे व ते ऐकणारा तर शुद्ध मूर्ख असला पाहिजे. आमच्या अस्पृश्य बंधूस आमचें असें सांगणे आहे, कीं, त्यांनी याउपर वेळ न दवडितां आपलें हक्क संपादण्याच्या कार्यास लागावें; त्यासाठी भरपूर व जोरानें तयारी करावी आणि विरूद्ध पक्षाच्या लोकांशीं त्यांच्याच साधनांनी सामना देण्यास सिद्ध व्हावें.

●●●

* अग्रलेख : बहिष्कृत भारत, ता. १५ नोव्हेंबर १९२९.

७०

क्रांति कशाला म्हणतात ?

गेल्या खेपेस आम्हीं कम्युनिस्टांच्या चळवळीवर लिहिलेल्या अग्रलेखांत विषयानुरोधानें, सध्यांच्या परिस्थितींत झटपट क्रांति शक्य नाहीं व इष्टहि नाहीं, असें म्हटलें होतें. त्यावर आमच्या एका व्यवसायबंधूनें भाष्य रचून, आमचे मत तत्त्वतः बहिष्कृत वर्गातर्फे चाललेल्या जोरदार चळवळीला विरुद्ध आहे आणि बहिष्कृत वर्गाच्या तशा चळवळीमध्ये आम्ही पडतों ते आमच्या तत्त्वाला सोडून पडतों, असें भासविण्याचा प्रयत्न केला आहे. आमचे सदरील व्यवसायबंधु हे आमच्या चळवळीचे एक ठरीव हितशत्रु असून, समाजसमतेची चळवळ तर त्यांच्या डोळ्यांत सतत खुपत असते. समाजसमतेच्या चळवळीवर किंवा तिच्या पुरस्कर्त्यांवर दोनचार शिंतोडे उडविल्याखेरीज जर एकादा आठवडा सुना गेला तर आपल्या जीविताची इतिकर्तव्यता अपूर्ण राहील असें त्याला वाटत असतें. अर्थातच, आमच्या लेखांतलें एक मधलेंच वाक्य वरच्यावर उचलून, एकादें पोर ' कशी मात केली ' अशा आविर्भावानें क्षुल्लक कारणास्तव टाळ्या पिटतें, त्याप्रमाणें या वृद्ध अर्भकानें, आम्ही कोटिक्रमांत सांपडलो अशी विजयभावना व्यक्त केली आहे. आम्ही त्यांच्या समाधानाच्या आड येऊं इच्छीत नाहीं. परंतु असल्या शब्दच्छलानें बहिष्कृत वर्गाच्या जोरदार चळवळीचे पाय तुटतील असा जर त्याला भ्रम असेल तर तो भ्रम मात्र त्यानें सोडून द्यावा, इतकेंच त्याला आणि त्याच्यासारख्या उथळ टीकाकारांना आम्हांला सांगावयाचें आहे. आमचा लेख कम्युनिस्टांच्या क्रांतिकारक चळवळी संबंधानें होता. कम्युनिस्टांचें ध्येय आत्यंतिक असलें तरी तें अयोग्य आहे असें आम्ही म्हटलें नव्हतें. कम्युनिझम्‌चें ध्येय जसें राजकीय स्वरूपाचें आहे तसेंच तें आर्थिक व सामाजिक स्वरूपाचें आहे, आणि सामाजिक बाबतींत लोकमतामध्यें प्रथम, जी क्रांति व्हावयास पाहिजे ती झालेली नाहीं. त्याचप्रमाणें कम्युनिझम्‌चें आर्थिक व राजकीय ध्येय समजण्याची पात्रता बहुजनसमाजाच्या अंगीं अद्यापि आलेली नाहीं. सोशियालिझ्म व कम्युनिझ्म यांच्या ध्येयांमध्यें म्हणण्यासारखा कांहींच फरक नाहीं. कम्युनिझ्म (रशियांतील बोलशेव्हिक चळवळ) याला सध्या विशिष्ट अर्थ प्राप्त झालेला आहे आणि सोशियालिझम्‌चे अंतिम साध्य ज्यांना मान्य

आहे असे लोकहि कम्युनिस्टांच्या चळवळीविरुद्ध आहेत याचें कारण रशियन कम्युनिस्टांचे मार्ग व धोरण हीं झटपट क्रांतीच्या उद्देशानें योजिलेलीं असून उत्क्रांतीच्या मार्गाच्या आड येणारीं आहेत, हें होय. क्रांति घडवून आणण्याचा प्रयत्न करतांना सत्यासत्य, न्यायान्याय कांहीं पहावयाचा नाहीं, अत्याचार निषिद्ध समजावयाचे नाहींत आणि वेळ पडल्यास रक्तपात करून सोव्हिएट पद्धतीवर नवीन राज्य स्थापावयाचें हा जो क्रांतिवादी कम्युनिस्टांचा मार्ग तो आम्हांला पसंत नाहीं, तो देशाच्या प्रगतीच्या आड येणारा आहे, इतकेंच नव्हे तर त्यामुळें पिच्छेहाट होण्याचाहि दृढ संभव आहे, असें आम्हीं आमच्या त्या लेखांत दर्शविले होतें. त्या आमच्या कसोटीस लावून पाहिल्यास आमच्या चळवळीवर आक्षेप घेण्यास जागा आहे असें आम्हांस मुळींच वाटत नाहीं. हिंदुमहासभेचें अध्यक्षस्थान डॉ. आंबेडकर यांना दिलें म्हणजे ते आपलीं सभ्यांची मतें बदलतील अशी जी आमच्या सदरील व्यवसायबंधूची समजूत आहे ती साफ चुकीची आहे. आमचे मार्ग झटपट क्रांतीचे व अत्याचारप्रवर्तक नाहींत. आमच्या चळवळीवरच काय, परंतु एकंदर अस्पृश्यवर्गाच्या चळवळीवरहि असा आक्षेप घेतां येणार नाहीं. समाज समता संघाची चळवळसुद्धां अत्याचाराच्या दोषापासून अलिप्त आहे. हिंदूंच्या देवळांत जाऊन देवदर्शन घेण्यास हिंदुसमाजांतल्याच एका वर्गाला मोकळीक असावी असें म्हणणें हा काय क्रांतिवाद ? जातिभेदाचें निर्मूलन करावें असें म्हणून सहभोजनाचे समारंभ घडवून आणणें हा काय अत्याचार ? आतां एवढें खरें कीं, आजच्या हिंदुसमाजाची घटना आम्हांला बदलून घ्यावयाची आहे, विषमतेच्या जागीं समता स्थापन करावयाची आहे, अन्याय नाहींसा करून न्याय नांदवावयाचा आहे, सर्वत्र बंधुभावाची वृद्धि करावयाची आहे, फुसक्या तडजोडीवर भरवंसा ठेऊन तत्त्वांचा भंग होऊं देणें आम्हांला पसंत नाहीं. आमच्या आक्षेपकांना मुळीं प्रगतिच नको आहे. त्यांना धर्माच्या नांवाखालीं अन्याय, जुलूम, विषमता व फाटाफूट हीं समाजांत कायम ठेवावयाचीं आहेत. अर्थात्च, प्रगतीची थोडी जरी चळवळ झाली तरी ते ' क्रांति ', ' क्रांति ' असा कोलाहल करतात. खरें म्हटलें असतां सोवळ्या हिंदु लोकांनींच बहिष्कृत वर्गावर राजरोस अत्याचार चालविले आहेत. बहिष्कृतांनीं आपले माणुसकीचे हक्क प्रस्थापित करण्यासाठीं किंचित् जरी हालचाल केली, तरी त्यांचा अमानुष छळ करण्यास हे सोवळे धर्माभिमानी म्हणविणारे लोक कमी करीत नाहींत. अशा छळाचीं उदाहरणें आतांपर्यंत किती तरी प्रसिद्ध झालेलीं आहेत व सर्व देशभर बहिष्कृत वर्गाचा छळ वर्षातून तीनशें साठ दिवस चालूच

असतो. बहिष्कृतानीं आपल्या हक्कांकरिता गेल्या दोन चार वर्षांत जी चळवळ केली तींत त्यांनीं बाकीच्या हिंदूंवर अत्याचार केला कीं, बाकीच्या हिंदूंनीं त्याच्यावर अत्याचार केला ? महाडच्या व पुण्याच्या सत्याग्रहामध्यें अत्याचार करणारे लोक बहिष्कृत वर्गातले होते कीं इतर हिंदु होते ? परंतु ' इकडून तिकडून मिळविलेल्या ' बुद्धीवर वर्तमानपत्र चालविणाऱ्या इसमाला ' क्रांति ' शब्दाची व्याख्या नीट कळावी अशी कोणी अपेक्षा तरी कां करावी ?

◉◉◉

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. १५ नोव्हेंबर १९२९.

७१

अस्पृश्यांची पुंडाई की स्पृश्यांची गुंडाई ?

पर्वती सत्याग्रहाला ' पुंडाई ' म्हणण्यापर्यंत ज्याची मजल गेली आहे त्याला अस्पृश्यतानिवारणाची जोरदार चळवळ म्हणजे भयंकर समाजक्रांतीची चळवळ दिसावी हें स्वाभाविकच आहे. या टीकाकारांना सनातन्यांची गुंडाई दिसत नाहीं. ज्यांनीं पूर्ण शांतता स्वीकारून घाणेरड्या शिव्यागाळी, काठ्यांचा मार, आणि दगडांचा व वहाणांचा वर्षाव निमूटपणें सहन केला ते पुंड आणि ज्या गुंडांनीं या अन्त्याचारी लोकांवर अत्याचार केलें ते मात्र सत्वगुणाचे पुतळें ! खासा न्याय ! ' संताची शिकवण ' अशी विपरीत न्यायबुद्धि उत्पन्न करणारी असतें काय ? सत्याग्रहीं लोक महमुद गझनीप्रमाणें मूर्तिभंजन करावयास निघाले होते काय ? देवदर्शनाच्या हक्काची आकांक्षा आणि त्या आकांक्षेच्या उत्कटतेमुळे आणि समान हक्कांच्या तीव्र जाणिवेमुळे ' कार्य वा साधयेत् देह वा पातयेत् ' अशा निर्धारानें अनत्याचार व अप्रतीकार यांची कास धरून करण्यांत आलेला सत्याग्रह यांना जर पुंडाई म्हणावयाचें तर एकनाथ, चोखामेळा वगैरे पूर्वीचें साधू आणि वर्तमानकाळांतील महात्मा गांधींसारखे पुढारी यांचीहि पुंडांमध्येंच गणना करावी लागेल ! हल्लींचा देवालयप्रवेशासंबंधाचा अस्पृश्यांचा सत्याग्रह हा या साधुमहात्म्यांच्याच शिकवणीचा परिणाम आहे.

●●●

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. १५ नोव्हेंबर १९२९.

७२

आतां तरी डोळे उघडले काय ?

डॉ. आंबेडकर व ' बहिष्कृत भारत ' यांच्यावर वैयक्तिक कारणांमुळे असंतुष्ट झालेल्या किंवा बहिष्कृत वर्गातल्या पोटभेदांचे स्तोम माजवून पुढारी म्हणून मिरविण्यास हपापलेल्या कांहीं लोकांनीं अस्पृश्यता निवारणाच्या प्रच्छन्न व अप्रच्छन्न शत्रूंशीं संगनमत करण्यास आतांपर्यंत कमी केलें नाहीं. स्वजनद्रोहाचें पाप करण्यास न कचरणाऱ्या या अदूरदृष्टी लोकांचा या शत्रूंनीं आतांपर्यंत यथेच्छ उपयोग करून घेतला ; परंतु पर्वती सत्याग्रहामुळें आपले खरे मित्र कोणते, खोटे मित्र कोणते आणि खरे शत्रु कोणते तें आतां बहिष्कृत वर्गाला चांगल्या रीतीनें कळून चुकलें आहे. पुण्या-मुंबईच्या, ' हुरळली शेळी आणि गेली लांडग्याचे पाठीमागून ' या न्यायानें वागणाऱ्या आणि कोणत्याही वर्तमानपत्रांत कसल्याही निमित्तानें स्वतःचे नांव फडकलें कीं, आपले बेचाळीस पूर्वज स्वर्गास गेल्याची धन्यता मानणाऱ्या लोकांची खोड त्यांच्या मतलबी स्पृश्य दोस्तांनीं, देवालय प्रवेशाच्या सत्याग्रहाला पुंडाई म्हणून आणि सत्याग्रहाची चळवळ हाणून पाडण्याकरितां चोरटीं उघड कारस्थाने रचून चांगलीच मोडली आहे !

'' यःस्वपक्षं परित्यज्य परपक्षं निषेयते ।
सःस्वपक्षे क्षयं याति पश्चातैरेव हन्यते ।। ''

(जो मनुष्य स्वजनांचा पक्ष सोडून परपक्षाला जाऊन मिळतो तो स्वपक्षांतून नष्ट होतोच पण शेवटीं परपक्षाकडून त्याचा नाश केला जातो) हें वाल्मीकि ऋषीचें वचन आतां तरी, खाजगी द्वेष, महत्वाकांक्षा किंवा असूया यांना बळी पडून आपल्या वर्गाच्या हितशत्रूंच्या बगलेंत शिरणाऱ्या बहिष्कृतांनीं पूर्णपणें लक्षांत ठेवावें.

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. १५ नोव्हेंबर १९२९.

७३

भविष्यवादी भालाकार भोपटकर !

पर्वती सत्याग्रहाचा निषेध करण्यासाठीं पुणें येथे सनातन्यांची एक सभा हल्लीं भरली होती. त्या वेळी भाषण करतांना भालाकार भा. व. भोपटकर यांनीं, बहिष्कृत वर्गाला देवालयप्रवेशाची मुभा मिळण्यास आणखी दोनशें वर्षे लागतील, असें भविष्य वर्तविलें. एकूण आशेला कांहीं जागा आहे म्हणावयाची ! जगाच्या अंतापर्यंतसुद्धां बहिष्कृतांना हिंदुदेवालयात जाण्यास मिळणार नाहीं असें भविष्य भोपटकरांनीं सांगितलें असतें तर त्यांचे तोंड कोण धरणार होता ? हें गणिताच्या आधारानें वर्तविलेलें भविष्य आहे की फक्त त्यावरून भोपटकरांची तशी इच्छा (wish is father to thought) आहे असें समजावयाचें ? दोनशें वर्षांनी बहिष्कृतांना देवळांत घ्यावयास हरकत नाहीं असें जर भों भों भोपटकरांचे म्हणणें असेल तर बहिष्कृतांना देवळांत जाण्यास मनाई करण्यांस तत्वाचा किंवा धर्मशास्त्राचा आधार नाहीं हें त्यांनीं अप्रत्यक्षपणें कबूल केलें आहे असेंच म्हटलें पाहिजे. कारण दोनशेंच काय पण दोन हजार वर्षे गेलीं म्हणून जें खरोखर नीतिबाह्य असेल तें थोडेंच नीतिशुद्ध ठरणार आहे ? यात जर नीतिअनीतीचा प्रश्न नसेल तर दोनशे वर्षांची तरी मर्यादा कशाला ? लोकमताच्या प्रतिकूलतेचीच अडचण असेल तर भोपटकरांसारख्यांनीं शिंगें मोडून वासरांत न शिरतां बहुजनसमाजाला छातीठोकपणें खरें तें सांगावें व लोकमत अनुकूल करून द्यावें. परंतु अशा रीतीनें गंभीरपणें कोटिक्रम कोणाशीं करावयाचा ? ' बफून ' भोपटकरांवर असल्या कोटिक्रमांचा कांहीं परिणाम होणार नाहीं. गाईंना ज्याप्रमाणें कावळ्याच्या शापामुळें मरणाची भीति बाळगण्याचे कारण नाहीं त्याप्रमाणें भास्कर (बाष्कळ ?) भोपटकरी भविष्याची बहिष्कृतांच्या सत्याग्रह चळवळीला बाधा होण्याची भीति बाळगावयास नको. हिंदी लोकांनीं निर्भेळ स्वातंत्र्याची गोष्ट सोडूनच द्यावी, परंतु डोमिनियन स्टेटस् मिळण्यालाहि आणखी दोनशें वर्षे त्यांनीं वाट पाहिली पाहिजे, असें जर एखादां इंग्रज म्हणेल तर तें भों भों भोपटकरांच्या वरील म्हणण्याइतकेंच संयुक्तिक ठरेल हें काय सांगावयास पाहिजे ?

●●●

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. १५ नोव्हेंबर १९२९.

७४

ब्राह्मणांच्या मुली मागणारे अस्पृश्य !

पुण्याच्या सनातन्यांनीं भरविलेल्या सत्याग्रहनिषेधक सभेंत, बहिष्कृत समाजाच्या आकांक्षांविषयीं अज्ञजनसमाजाचा गैरसमज करण्याच्या उद्देशानें कित्येक वक्त्यांनीं अशा अर्थाचीं भाषणें केलीं कीं " अस्पृश्य लोक स्पृश्य हिंदूंच्या देवळांत प्रवेश करूनच स्वस्थ बसणार नाहींत, ते आतां ब्राह्मणांच्या मुलीही मागूं लागले आहेत, तुम्ही त्यांची तीहि आळ पुरविणार काय ? " बाष्कळ भोपटकरांनीं तर या बाबतींत डॉ आंबेडकर यांच्या नांवाचा उल्लेख करण्यासही कमी केलें नाहीं ! या आरोपाची उपपत्ति अशी दिसते कीं, ज्या अर्थी डॉ. आंबेडकर हे समाजसमतावादी आहेत आणि जातिभेदाचें निर्मूलन करून हिंदुसमाजामधील सर्व वेगवेगळ्या जातींत भेटीव्यवहारच नव्हे तर रोटीबेटीव्यवहार होण्यासही आडकाठी असतां कामा नये असें प्रतिपादितात ; त्या अर्थी अस्पृश्य लोक ब्राह्मणांच्या मुली मागतात असें मानावयास हरकत नाहीं ! याचें नांव तर्कशास्त्र ! जातिभेदाला शास्त्राचा व युक्तीचा आधार नाहीं, मनुष्य स्वभावांतल्या हीन वृत्तीमुळें अस्तित्वांत आलेली ती एक संस्था आहे, भौतिक शास्त्राच्या दृष्टीनें जातिभेद कृत्रिम ठरतो, अतएव तो अधर्म्य व त्याज्य आहे, असें डॉ. आंबेडकर व इतर समाजसमतावादी यांचें प्रामाणिक मत आहे ; तसेंच विषमतेच्या पायावर उभारलेल्या जातिभेदाच्या इमारतीचा कळस म्हणजे अस्पृश्यता आहे, असेंहि सर्व समतावाद्यांचें स्पष्ट मत आहे. समतावाद्यांमध्यें आंबेडकरांसारखे बहिष्कृत वर्गातलेच लोक नाहींत तर ब्राह्मण व ब्राह्मणेतर स्पृश्य हे सुद्धां आहेत. समाजसमतावाद आंबेडकरांनीं नवा निर्माण केलेला नाहीं. हा समतावाद वज्रसूचि† उपनिषदांत आहे, महाभारतांतल्या धर्मनहुष संवादांत आहे, साधुसंताच्या वचनांत आहे आणि आधुनिक काळीं राजा राममोहनराय, स्वामी दयानंद, स्वामी विवेकानंद, स्वामी रामतीर्थ, रानडे, भांडारकर, राजारामशास्त्री भागवत, दि. ब. आर. रघुनाथराव अशा हिंदुधर्मशास्त्राचें मंथन केलेल्या थोर विद्वान् पुरुषांनीं हल्लींची जातिभेदपद्धती कृत्रिम, अशास्त्र, विषमतामूलक व समाजाच्या प्रगतीला अडथळा आणणारी आहे असें स्पष्टपणें प्रतिपादिलें आहे. जातिभेद नष्ट झाल्यावर ब्राह्मण-ब्राह्मणेतर,

---

†पाहा परिशिष्ट क्रमांक : १३.

अस्पृश्य हे भेद आपोआप नष्ट होतील. जेथें हल्लींच्या अर्थानें ब्राह्मणहि कोणी नाहीं व अस्पृश्यहि कोणी नाहीं तेथें ' ब्राह्मणांच्या मुली ' व ' अस्पृश्यांची मागणी ' अशा प्रकारची भाषा आपोआपच खुंटते. अद्वैतानुभव व्यक्त करावयास द्वैताची भाषा उपयोगीं पडत नाहीं त्यांतलीच ही गोष्ट आहे. समतावादामुळें समाजांतलीं वेगवेगळीं कामें थबकून राहण्याची भीति नाहीं. ज्यांप्रमाणें ज्याची प्रवृत्ति, कार्यक्षमता व पात्रता असेल त्याप्रमाणें तो समाजांतलें विचारप्रवर्तनाचें, शास्त्रीय संशोधनाचें, वाङ्मयसेवेचें, राष्ट्रीय संरक्षणाचें, समाजसेवेचें, संपत्तीच्या उत्पादनाचें किंवा विनिमयाचें, अथवा दुसरें कांहीं काम करील. परंतु जातिविशिष्ट उच्चनीचपणाला अवकाश राहणार नाहीं. अशी समता प्रस्थापित झाल्यास आपल्यास आपल्या जातीच्या सबबीवर जो उच्चपणा मिरवावयास मिळतो तो मिळणार नाहीं, अशी ज्यांना भीति वाटते ते लोक अर्थातच, समतावादाचा जोरानें पुरस्कार होऊं लागला म्हणजे अस्पृश्य लोक ब्राह्मणांच्या मुलीं मागूं लागले आहेत अशी ओरड करूं लागतात ! खरें म्हटलें असतां, या धूर्तांना ठाऊक असतें कीं, हल्लींचा काळ मुली मागण्याचा नाहीं आणि कोणीं मागणी घातली म्हणून ती मान्य करावयास दुसरा बांधलेला नाहीं. जातींतल्या जातींत सुद्धां मागणी घातली म्हणून मुलगी मिळते असें नाहीं. परंतु, अशिक्षित लोकांची मनें चिथाविण्याला ही ओरड चांगली उपयोगीं पडेल, अशा कावेबाजीनें मुद्दामच ही ओरड करण्यांत येते.

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. १५ नोव्हेंबर १९२९.

७५

नरसोबाच्या वाडींत अस्पृश्यांना देवदर्शन

श्रीक्षेत्र नरसोबाची वाडी हें महाराष्ट्रांतील श्रीदत्तात्रयाचें एक सुप्रसिद्ध स्थान असून या देवळांत पूजा करण्यासंबंधानें ब्राह्मणेतरांनीं चळवळ चालविली होती. त्या चळवळीला पुजारी व पुराणमतवादी मंडळी यांनीं दुराग्रहानें विरोध केला आणि या भांडणाचें पर्यवसान मारामाऱ्या व फौजदारी खटले यांमध्यें झालें. तथापि, या भांडणाचा शेवट गोड झाला ही समाधानाची गोष्ट होय. देव्हाऱ्याला कठडा घालावा, त्या कठड्याच्या आंत जाण्याची ज्याची पूजेची पाळी असेल तो पुजारी व त्याचे पूजेच्या कामांतलें मदतगार यांच्याखेरीज दुसऱ्या कोणाला परवानगी असूं नये आणि कठड्याबाहेरून ब्राह्मण, ब्राह्मणेतर, व बहिष्कृत अशा सर्व जातींच्या हिंदूंनीं दर्शन घ्यावें, असें तडजोडीनें ठरलें. या तडजोडींत सर्व हिंदूंना पूजा करण्याचा हक्क न ठेवता ब्राह्मणांचाहि पूजेचा हक्क काढून घेण्यांत आला ही एक प्रकारची पिच्छेहाटच झाली ; तथापि बहिष्कृत हिंदूंना देवळांत जाण्यास सुद्धां मनाई होती ती दूर झाली. त्यामुळें अस्पृश्यता निवारणाच्या बाबतींत एक पाऊल पुढें पडलें असें समजावयास हरकत नाहीं. विशेषतः नरसोबाच्या वाडींतील देवस्थान हें पंढरपूर वगैरे देवस्थानापेक्षां सोवळेपणाच्या बाबतींत कडक म्हणून प्रसिद्ध असतांहि त्या ठिकाणीं देवालयाचीं द्वारें बहिष्कृत वर्गाला खुलीं करण्यांत आलीं, त्यामुळें इतर ठिकाणच्या देवालय प्रवेशासंबंधाचा प्रश्न सुटण्यास सहाय्य होण्याचा बहिष्कृतांना संभव आहे. नरसोबाच्या वाडींतल्या कडक सोंवळे पाळणाऱ्या देवस्थानामध्यें जी सवलत बहिष्कृत हिंदूंना मिळते ती पुण्याच्या पर्वती देवस्थानासारख्या, युरोपियन वगैरे अहिंदु लोकांनींहि विशिष्ट मर्यादेपर्यंत देवळांत जाण्याची जेथें वहिवाट आहे आणि जेथें देवांच्या चांदी सोन्याच्या मूर्ती आसनावरून उचलून युरोपियन लोकांना पंचाच्या आज्ञेनें दाखविण्यांत येतात तेथें बहिष्कृत मानलेल्या हिंदूंना कां मिळूं नये ? हा प्रश्न आतां प्रत्येक निःपक्षपाती व दुराग्रही रहित हिंदूंच्या मनांत उत्पन्न झाल्याखेरीज राहणार नाहीं.

●●●

प्रासंगिक विचार : बहिष्कृत भारत, ता. १५ नोव्हेंबर १९२९.

७६

' भाकरी मागितली–दगड दिला ! '

नाशिकला रामनवमीच्या दिवशी घडलेल्या प्रकाराची बातमीं मला येथें लागलीच तारेनें समजली. स्थानिक सरकारी अधिकाऱ्यांच्या हातून घडलेल्या अन्यायी व पक्षपातीपणाच्या वर्तनाबद्दलचीहि सविस्तर माहिती मागाहून वाचण्यांत आली. अस्पृश्य प्रजेच्या दृष्टीनें विचार करता इंग्रज सरकारचें स्वामित्व हें मळमळीत सौभाग्याप्रमाणे आहे. ज्यांचा अस्पृश्य जनतेशीं संबंध येतो ते सारे सरकारी अधिकारी स्पृश्य वर्गांपैकींच असतात ; आणि मराठेशाही अगर पेशवाई जाऊन आंग्लाई आल्यामुळें जरी या लोकांचे पोशाख बदललेले दिसले तरी यांचे अंतःकरण कांही बदललें नाहीं. जिल्ह्याचा मुख्य अधिकारी जरी युरोपियन अगर इंग्रज असला तरी तो बहुधा या बाबतीत अजाण, तटस्थ व बेदरद असतो. त्याच्या हाताखालचे अधिकारी सांगतील तेवढेच त्याला ऐकूं येतें व दाखवितील तेवढेंच त्याला दिसतें. असे नसतें तर नाशिकाला परवा घडला तसला प्रकार इंग्रजांच्या राज्यातही कसा व कां घडला असतां ?

भाऊराव गायकवाड, रणखांबे, दाणी वगैरे कार्यकर्त्यांना या प्रसंगी तुरुंगवास निष्कारण पत्करावा लागला. त्यांतल्या त्यांत श्री. तुळशीरामजी काळे यांच्या वृद्ध मातोश्री, त्याच प्रमाणे अमृतराव रणखांबे यांच्या मातोश्री बंदिवान झाल्याचे ऐकून खेदही वाटला आणि एक प्रकारची धन्यताही वाटली. नाशिक जिल्ह्यातील माझ्या अस्पृश्य बांधवांबद्दल मला मोठा अभिमान वाटतो. अस्पृश्यांची सर्वतोपरी असलेली विपरीत व बिकट परिस्थिती लक्षांत घेता, त्यांनी गेल्या तीन चार वर्षात जें स्वावलंबन व जें संघटन प्रत्यक्ष व्यवहारांत प्रगट करून दाखविलें व ज्या सोशिक व धैर्यवृत्तीचा माझ्या या बंधुभगिनींनी परिचय करून दिला ती ही सारीं घटना खरोखरच अपूर्व अशी आहे. दुसऱ्या कोणाचें सहाय्य नाहीं ; कोणाची सहानुभूति नाहीं ; उलट कोणत्या ना कोणत्या तरी निमित्तानें सर्वजण नाखूष व विरोधी बनलेले ; अशा परिस्थितीत अस्पृश्यांनी, अस्पृश्यांकरतां व अस्पृश्यांच्या सहाय्यावर नाशिक सत्याग्रहासारखी चळवळ सतत तीन चार वर्षे एवढ्या मोठ्या प्रमाणांत, एवढ्या उत्साहानें व इतक्या संघटीतपणानें चालवावी ही एकट्या हिदुस्थानांतीलच नव्हे तर जगातील सर्व पददलीत जनतेनें अभिमान बाळगण्याजोगी घटना आहे असें म्हटल्यास त्यांत अतिशयोक्ती मुळींच नाहीं.

पण ब्राह्मणी धर्मानें मूढ, अनुदार व असहिष्णु बनविलेल्या हिंदु समाजाला या सर्व गोष्टींचें काय होय ? या सत्याग्रहाच्या रुपानें अस्पृश्य बांधवांनीं स्पृश्य हिंदूंजवळ समतेची कमींत कमी मागणी केली. आपल्या हिंदु बांधवांजवळ अस्पृश्यांनीं समतेची आणि प्रेमाची भाकरी मागितली पण भाकरी ऐवजीं त्यांच्या पदरात ब्राह्मणादि स्पृश्य हिंदूंनीं दगड धोंडे टाकले !

सिमला : — भीमराव आंबेडकर [१] —

२६-४-१९३२.

या वक्तव्याबाबत खालील घटना कारणीभूत होत्या :

१९३२ च्या रामनवमीला काळराम मंदिर, रामकुंड व सीताकुंड यांच्या क्षेत्रासभोवती पुन्हा सत्याग्रह करण्याचे जाहीर केल्यानंतर १५ एप्रिल या दिवशी सत्याग्रह झाला. सत्याग्रहाच्या वेळी १९ स्त्रिया, १३ पुरुष सत्याग्रही आणि सत्याग्रहींचे पुढारी सर्वश्री भा. कृ. गायकवाड, सावळाराम दाणी, अमृतराव रणखांबे याना अटक करण्यात आली. स्पृश्य व अस्पृश्य यांच्यात सत्याग्रहासंबंधी तडजोड व्हावी, याबद्दल काही सवर्ण पुढाऱ्यांनी प्रयत्न केले. पण त्यात त्यांना जीर्णमताभिमानी सनातन्यांच्या दुराग्रहापुढे नांगी टाकावी लागली. अस्पृश्यांनी मात्र सनातनी व सुधारक हिंदुंच्यापुढे माना तुकविल्या नाहीत.

त्यांनी आपली सत्याग्रही चळवळ चालू ठेवली. ही चळवळ आपल्या माणुसकीच्या हक्कासाठी आहे. तीत भक्तिभावना व आध्यात्मिक प्रगती वगैरे कल्पना यांना थारा नव्हता. या भावनांपासून अस्पृश्यांना मुक्त करावे, कारण या भावनाच अस्पृश्यांच्या मानसिक गुलामगिरीच्या शृंखलेतील दुवे होऊन गेली हजारो वर्षे बसलेल्या आहेत. त्या भावना नष्ट करणे, हेच ध्येय बाबासाहेबांनी अस्पृश्यांच्या पुढे ठेवले होते आणि या ध्येयाने प्रेरित होऊनच अस्पृश्य सत्याग्रही नाशिकात लढा लढत होते.

सवर्ण हिंदू व अस्पृश्य सत्याग्रही यांच्यात समेट होत नाही, हे पाहून कलेक्टरला शांतिरक्षणाची चिंता लागली. त्याने विचार करून दोन्ही पक्षांना कळविले की, रामकुंडाच्या बाबतीत आपापसात काही तडजोड झाली नाही, तर दोन्ही पक्षांनी आपली बाजू सरकारपुढे मांडण्याचा मी हुकूम काढीन.[२]

---

[१] : जनता, दिनांक ३० एप्रिल १९३२.

[२] : खैरमोडे, खंड, ३ पृ. ३४९–३५०

घटना क्रम खालील प्रमाणे :—

रणखांबे–गायकवाड–दाणी यांना अटक

सत्याग्रह संग्रामाला तोंड लागलें !

ता. १२-४-१९३२

नाशिक मंदिर प्रवेश सत्याग्रहासंबंधीची आमंत्रणें अचानकपणें खेडोपाडी पाठविण्यांत आली. यंदाहि सालाबादाप्रमाणें रामनवमीच्या उत्सवांत काळेराम मंदिरावर सत्याग्रह करावयाचा असा निर्धार नाशिक जिल्ह्यांतील अस्पृश्य बांधवांनी केला. यंदाचा सत्याग्रह फक्त काळेराम मंदिरापुरताच नव्हता. त्यांचें क्षेत्र रामकुंड–सीता कुंडापर्यंत वाढलें होतें. ही दोन्ही ठिकाणें एका ठिकाणीं नसल्यामुळें सनातनी लोकांना अस्पृश्यांना वेळ प्रसंगी मज्जाव करण्यासाठीं दोन्ही ठिकाणीं धरणें धरुन बसणें भागच होतें. तशांत नाशिकचे नवीन कलेक्टर मि.ब्राऊन यांनी 'आपापसांत कांहींतरी नक्की तडजोड करा नाहीं तर आम्हीं रामकुंडावरची सरकारी नियंत्रणाचा हुकूम अधिक वाढवूं शकत नाहीं' अशा आशयाचा इशारा उभय पक्षास देतांच दोन्ही पक्षाला आपल्या पुढील धोरणाविषयीं ठराविक बेत करणें भागच होतें. सरकारी नियंत्रण काढून घेतल्यास उभयपक्षांत सत्याग्रहाच्या वेळी काय होईल–उभयपक्षाचा लढा कोणत्या थराला जाऊन कोणत्या विकोपास जाऊन पोचेल याचा नक्कीं ठोकताळा कोणालाच करतां येत नव्हतां. नाशिकचें वातावरण मात्र गंभीर स्वरुपाचें भासूं लागलें. एकदोन दिवसांत नाशिकमध्ये काय होणार (?) असा प्रश्न सर्वांच्या दृष्टीसमोर उभा असतांच मि. ब्राऊन, कलेक्टर साहेब यांनी रामकुंडाची मुदत आणखी एक महिनाभर वाढवून सरकारी नियंत्रणाचे छत्र ठेविलें. सनातन्यांच्या जिवांत जीव आला. तरीपण रामनवमीला काळेराम मंदिरावर अस्पृश्य बांधव सत्याग्रह करण्यास कमी करणार नाहींत हीही गोष्ट तितकीच खरी असल्यामुळें या अरिष्टाला कसें तोंड द्यावें याबद्दलच्या सनातनी मंडळीच्या खाजगी बैठकी चालूं आहेत.

सत्याग्रहाचें निमंत्रण मिळतांच नाशिक जिल्ह्यांतील निरनिराळ्या गांवांहून सत्याग्रहाकरितां सत्याग्रही वीरांच्या तुकड्या बेसकर वाड्यांत जमूं लागल्या आहेत. सत्याग्रह कमिटी आपल्या स्वाभिमानाच्या लढ्यांविषयीं कोणतें धोरण ठेवावें याचा विचारविनिमय करीत आहे.

ता. १३-४-१९३२.

मंदिर प्रवेश सत्याग्रहाचा लढा कशा रीतीनें मिटवावा अशा बाबत सनातनी व अस्पृश्य लोक विचारविनिमय करीत असतानांच डिस्ट्रीक्ट मॅजिस्ट्रेटनें पुढील

आशयाचा व सरकाररीत्या हुकूम काढिल्याचें कळतें. 'एकंदर परिस्थिती बिकट व भयानक अशी वाटल्यावरुन सरकारी हुकूमान्वयें सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं, काळेराम मंदिराच्या आसपास १०० यार्डांच्या अंतराच्या आंत कोणीही इसमानें निरर्थक फिरावयाचें नाही किंवा बसावयाचें नाहीं. तीहीपेक्षां जास्त जमावानें कुणीहीं मंदिरापाशी जावयाचे नाहीं.' हा हुकूम १४४ क्री. पी. सी. च्या कायद्यानुसार जाहीर केला आहे. ह्या हुकूमाची मुदत एक महिन्यापर्यंत आहे.

अस्पृश्यांना मज्जाव करण्याकरतां सनातनी मंडळींनी बाहेर गांवाहून–विषेशतः मुंबईकडून स्वयंसेवक मिळविण्याचें प्रयत्न जारीनें सुरुं चालविलें आहेत. या लढ्याचा समाधानकारक निकाल लागण्याकरितां व एखादा तडजोडीचा मार्ग शोधून काढण्याकरितां नाशिक म्युनिसिपालिटीचें अध्यक्ष रा. ब. प्रधान हे सनातनी मंडळींची सभा भरवून प्रयत्न करीत असल्याचें कळतें. मंदीरप्रवेश सत्याग्रह कशारीतीनें यशस्वी करतां येईल याबाबतीसंबंधी अस्पृश्य पुढारी मार्ग शोधून काढण्याच्या विचारांत आहे. मुंबईहून बरेचसें स्वयंसेवक सत्याग्रहाचा लढा लढविण्यासाठी अगोदरच सत्याग्रह छावणींत येऊन राहिलें आहेत. रामनवमीच्या दिवशीं बहुतेक ठिकाणाहून स्वयंसेवक लोक नाशकास येतील. सत्याग्रह संग्रामाची वादळी हवा नाशिककरांना बेचैन करीत आहे असें एकंदर परिस्थितीवरुन अजमावयास कांहींच हरकत नाहीं. नाशिक मार्गावर 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर कीं जय' चा ध्वनि धुमधुमूं लागला आहे.

ता. १४-४-१९३२.

आज सत्याग्रह छावणीत सत्याग्रह वीरांच्या तुकड्या जमू लागल्या. सालाबादाप्रमाणे यंदाहि महारवाड्यांतून पंचवटीपर्यंत मिरवणूक काढण्यांचें ठरलें होतें व त्याप्रमाणे मिरवणुकीला लोक जमाव हजारांनीं जमूं लागला होता. नाशिक शहराकडे वळणाऱ्या प्रत्येक रस्त्यांतून 'डॉ. आंबेडकर की जय' चा जयजयकार ऐकूं येत होता. आज अस्पृश्य आपले धोरण कशारीतीनें आंखणार याची कल्पना सनातनी मंडळींना होत नव्हती. ते आपल्या संघटणेच्या अभावी बेचैन स्थितींत असलेले दिसत होते. अस्पृश्य मंडळींचा उत्साह दांडगा दिसत होता. वाटेल त्या बिकट परिस्थितीला धैर्यानें व शिस्तीनें तोंड देण्याचें त्यांनी ठरविलेंच होतें. माणुसकीच्या व स्वाभिमानाच्या लढ्यांत मृत्यूची पर्वा करणें हें केवळ नामर्दपणाचें लक्षण त्यांना वाटत होते. भीतीचें असे काढलेले उद्‌गार त्यांना बिलकूल पसंत पडत नव्हते.

मिरवणुकीची तयारी करण्यांत सर्वजण गुंतलें असतांना एक अवचित् आणि अनिष्ट बातमी सत्याग्रह कॅम्पांत कळली गेली. सत्याग्रह चळवळीचे एक कार्यकर्ते आणि नाशिकचे सन्माननीय पुढारी श्री. सावळाराम दाणी यांची आई मृत्यूमुखीं पडली. त्यांच्या शोचनीय मृत्यूची बातमी सत्याग्रह कॅम्पांत कळतांच प्रत्येकांना दुःख झालें. सत्याग्रह कमिटीची तातडीची सभा भरवून या दुःखप्रद प्रसंगानिमित्त आज रोजी निघणारी अस्पृश्यांची प्रचंड मिरवणूक रद्द करण्यांत आली.

सायंकाळी सत्याग्रह कमिटीची दुसरी एक सभा भरविण्यांत आली. या सभेंत रामनवमीच्या दिवसापासून सुरू होणाऱ्या सत्याग्रहासाठीं काळेराम मंदिराजवळील पंचवटी मुक्कामीं एक सत्याग्रह छावणी उभारण्यांचें ठरले. आणि तीन तीन इसमांच्या तुकडीनें काळेराम मंदिरांत देवदर्शनास जाण्यासाठीं सत्याग्रह करण्याचें ठरलें. अस्पृश्य लोकांचे हें ठरलेलें धोरण पाहून सनातनी आपल्या परीनें सत्याग्रही मंडळींना प्रतिकार करण्यांच्या तयारींत गुंतलें आहेत. मंदिराच्या चार दरवाजांपैकी फक्त दोनच दरवाजे उघडे ठेवण्यांत आले आहेत. दर्शनास येणाऱ्या प्रत्येक इसमास त्याची प्रथम जात विचारण्यात येते.

रात्रौ अस्पृश्यांच्या जाहिर सभेंत जनता पत्राचे संपादक श्री. देवराव नाईक यांचे सत्याग्रहाच्या लढ्यासंबंधी विस्तारपूर्वक असें भाषण झालें. त्यांनी सर्वांना शिस्तीनें व शांततेनें वागण्याची विनंती करून हा सत्याग्रह संग्रामाचा लढा नेटानें आणि संघटणेच्या बळकटीने लढविण्याविषयी विनंती केली.

काळेराम मंदिराच्या आसपासचें एकंदर वातावरण केव्हां व कसें विकोपास जाईल याचा कांहींच नेम नसल्यामुळें पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त ठेविला गेला आहे. रात्रभर निरनिराळ्या भीतिदायक अफवा सत्याग्रह छावणींत पसरविण्याचा प्रयत्न करण्यांत आला ; परंतु सत्याग्रही वीर असल्या धमकावण्याला किंवा भीतिदायक बातम्याला किंमत देण्याइतके कमकुवत नव्हते. त्यांचा संकल्प कायम असून ते आपला आंखलेला कार्यक्रम शिस्तीनें व धैर्यानें पार पडण्याच्या तयारीत आहेत.

सत्याग्रह संग्रामाची मोहीम

ता. १५-४-१९३२.

काल रात्रौ सत्याग्रह कॅम्पमध्यें असंख्य लोकसमुदाय जमला होता. सत्याग्रह यशस्वी करण्याकरितां मे. भाऊराव गायकवाड, दाणी, रणखांबे व पतितपावनदास यांचीं स्फुर्तिदायक भाषणें झाली.

आज सकाळीं मंदिरप्रवेश सत्याग्रहाबाबत सारखी चुरस लागून गेली होती. पहिल्या तुकडीमध्यें जाण्याची स्त्री व पुरुष सैनिकांची चुरस विशेष

कौतुकास्पद होती. सकाळीं मंदिरासभोवतालचें वातावरण बरेंच क्षुब्ध व गंभीर असें भासत होते. शांतता राखण्यासाठीं बंदोबस्त कडक रीतीनें ठेविण्यांत आला होता. मंदिर प्रवेशासाठीं जेव्हां लोक आंत जाऊं लागलें तेव्हां आगाऊ ठरल्याप्रमाणें सत्याग्रही वीरांनीं मंदिरांत जाण्याचा प्रयत्न करून सत्याग्रह करण्यास सुरवात झाली. एकामागून एक सत्याग्रही स्वयंसेवकांना अटक करण्यांत आली. जवळ जवळ वीस स्वयंसेवकांना अटक करतांच लगेच सत्याग्रह संग्रामाचे पुढारी मि. गायकवाड, दाणी व रणखांबे यांना अटक करण्यांत आली. यावेळीं अस्पृश्य जनसमुदायांत बरीच खळबळ उडाली. मंदिरांत स्पृश्य पुरुषांना पोलिसांनीं मज्जाव केला व फक्त स्त्रियांना आंत सोडण्यास सुरवात होतांच अस्पृश्य स्त्रियाहि त्यांच्याबरोबर मंदिरप्रवेश करीत असतां त्यांना अटक करण्यांत आलीं.

बारा स्त्रियांना अटक

आमचेकडे बातमी येऊन पोंहोचेपर्यंत एकंदर बारा स्त्रियांना अटक करण्यांत आली व मंदिराचे दरवाजे सर्वांनाच बंद केले. पोलिस शिपायांची साखळी करून लोकांना मंदिराच्या दरवाज्यापर्यंत येण्याचा मज्जाव करण्यांत आला. एकंदर परिस्थिती चिंताजनक असून अस्पृश्य पुढाऱ्यांना पकडल्याची बातमी खेडोपाडीं कळतांच अस्पृश्य लोक सत्याग्रह संग्रामासाठीं तातडीनें नाशिकला निघाल्याचें कळतें.[१]

नाशकांत पेशवाईची चुणूक !

रामनवमीच्या दिवशीं पुढाऱ्यांना व इतर स्त्रीपुरुष सत्याग्रहींना पकडल्यावर त्या दिवशीं एकंदर जो प्रकार घडला तो उद्वेगजनक असल्यामुळें व अस्पृश्यांच्या छावणींतील सर्व लोक त्यामुळें अत्यंत हवालदिल झाल्यामुळें खरा प्रकार सर्वांस समजावा म्हणून मंदिर प्रवेश सत्याग्रह मंडळाचे अध्यक्ष श्री पतितपावनदास यांनीं खालील जाहीर पत्रक लागलींच त्या दिवशीं वर्तमान पत्राकडे प्रसिद्धी करतां पाठविले आहे :––

A statement.

As already announced, the untouchable satyagrahis went to the Kala Ram Temple at 8 A. M. to day * to offer satyagraha at the doors of the same which were open. By the orders issued under 144 Cri. P. C. not more than three persons were to go there in a batch. But when the untouchable satyagrahis went there they found that the touchables were entering the temple in large crowds and the Police were complacently

१ : जनता : १६ एप्रिल १९३२.

*The 15th April 1932.

observing this breach of Government orders under their very nose. The untouchable satyagrahis however began to try to enter in batches of three. But the police singled them out and prevented them from approaching even the doors, while the touchables were freely allowed to go in large numbers as before. The police even handles the satyagrahis very roughly and some were kicked and harassed in various ways to produce terrifying effect. Seeing this unexpected and unwarranted turn in the hitherto neutral policy of the Government, the untouchable leaders Messrs ; Gaikwad, Rankhambe and Dani offered satyagraha and got themselves arrested. The District Magistrate, Mr. Brown appeared on the scene at this stage. It was then observed that the police began to prevent even touchable males from entering the temple, allowing only the touchable females to go. Seeing this change in the police tactics the untouchables brought their lady volunteers on the scene to offer satyagriha. They also met with the same fate. The police did not scruple at all in treating the untouchable women with scanty courtesy. By twelve noon when the pujaris closed the doors of the temple as the Ram Janma Ceremony was over, 14 females and 2o males of untouchables were arrested.

The untouchables were never flattered themselves with the hope of getting any active assistance from the Government in the course of their fight for their human rights. But hitherto they were thankful to the Government for maintaining the balances even. They were rather disagreeably surprised to-day to see this change in the Government policy. It is no wonder if they felt to-day that the British Government was suspended for the time being and that the rule of the caste Hindus prevailed. In trying to account for this change, one may venture a guess of the possibility of Mr. Brown, the District Magtt. being led astray by his subordinates having a definite Sanatanic turn of mind. It may noted here that Mr. Brown who has taken charge of his office only recently.

President,

Temple Entry Satyagriha

Committee, Nasik.

(पूर्वी ठरल्याप्रमाणें अस्पृश्य सत्याग्रही ता. १५-४-१९३२ रोजीं सकाळीं आठ वाजतां काळेराम मंदिरामध्यें प्रवेश मिळण्याकरतां गेले होते. मंदिराचे दरवाजे उघडे होते. क्रि. कोडच्या १४४ कलमाचा हुकूम सरकारनें जाहीर केला असूनहि स्पृश्य लोक प्रचंड जमावानें मंदिराकडे चालले होते. मंदिरासमोरील गर्दी पाहून सरकारी १४४ कलमाचा उपयोग कोणासाठीं करण्यांत आला आहे हें कांहींच

कळेना. ब्रिटीश सरकारचे हुकुम धाब्यावर बसवून सनातनीं सरकारचे राज्य चाललेलें दृष्टोत्पत्तीस येत होते. हुकूनाच्या भाषेनुसार अस्पृश्य सत्याग्रही अगदीं तीन तीनच्या तुकडीनें मंदीर प्रवेशासाठीं जात असतानांच त्यांना अडवून त्यांची फळी फोडून सरकारी शिपाई व सनातनीं मंडळीं त्यांना मारहाण करीत होती व पकडून नेत होती. हा अत्याचार असह्य झाल्यामुळें अस्पृश्यांचे पुढारी श्री. भाऊराव गायकवाड, रणखांबे व दाणी स्वतः सत्याग्रह करण्यांस पुढें गेले. त्यावेळीं सरकारी अंमलदाराचें डोळे एकदम उघडले. सनातनी आश्चर्यचकित झाले. मि. ब्राऊन कलेक्टर साहेब इतक्यांतच तेथें आल्यामुळें मंदिराचे दरवाजे एकदम बंद करून प्रत्यक्ष पेशवाईच्या राज्यकारभाराचा लोप करण्यांत आला. मि. ब्राऊन हे नाशिकला नवीनच आल्यामुळें खऱ्या परिस्थितीची त्यांना तरी कोण जाणीव करून देणार ?[१]

---

१ : जनता : २३ एप्रिल १९३२.

(७७)

अस्पृश्यबांधवांना संदेश

स्वाभिमान व समतेचा नाश करणारी व समाजाला काळिमा लागणारी कृत्यें करूं नयेत.

माघ व फाल्गुन महिन्यात काहीं गावच्या देवांच्या काठ्या तालुक्याचे अगर जिल्ह्याचे ठिकाणचे मुख्य देवस्थानात जातात. या देवांच्या काठ्या घेऊन जाणाऱ्या स्पृश्य लोकांबरोबर अस्पृश्य समाजातील बरेच लोक दरसाल जात असतात. या काठ्या घेऊन जाणाऱ्या स्पृश्य लोकांची बडदास्त बऱ्या प्रकारची ठेवली जाते व त्यांना जाता येता देवाचा प्रसाद म्हणून जेवणें देण्यात येतात. काठी बरोबर आलेले म्हणून अस्पृश्य यात्रेकरूनांही प्रसाद म्हणून जी जेवणें वाढण्यात येतात ती गलीच्छ व उकीरडावजा किंबहुना उकरिड्यावर वाढण्यात येतात अगर अस्पृश्य यात्रेकरूंच्या पदरात दुरूनच अन्न फेकण्यात येते. आपले अस्पृश्य बांधव तो देवाचा केवळ प्रसाद म्हणून तसल्या घाणेरड्या जागेवर बसून खातात. दुरून फेकलेले अन्न घेणे अगर घाणेरड्या जागेवरून बसून खाणे ही गोष्ट स्वाभिमानाला धक्का लावणारी, विषमता दर्शवणारी अशी आहे.

स्वाभिमान व समतेचा ज्यावेळीं नाश होतो अशी व समाजाला ज्यामुळें काळिमा लागतो अशी कोणतीही कृत्यें कोणीही करूं नयेत.

देवाचा प्रसाद जरी असला व तो स्वाभिमानाच्या आड येत असला तरी त्याचा आपण त्याग केलाच पाहिजे. स्पृश्य समाजाच्या मांडीस मांडी लावून जेवण्यासाठी जर देवस्थानचे पंच सरमिसळ आपली पानें मांडीत असली तरच आपण या प्रसंगी जेवावें. अपमानास्पद अन्नाचा आपण त्याग करावा. ज्याप्रमाणें आपण अस्पृश्य बांधव रायगडावर समानतेनें स्पृश्य बांधवांचे बरोबर जेवलों त्याप्रमाणें जर जेवावयास मिळालें तरच देवस्थानच्या जेवणावळींत भाग घ्यावा नाहींतर हे अन्न अजिबात ग्रहण करूं नये.

टप्याचे पंच पुढारी व गांवकीतील पंच यांनी ह्या विषमताजनक जेवणावळींत यात्रेकरूंनी भाग घेऊं नये म्हणून सर्वांना सांगावें व ही समाजहितघातक व लांछन लागणारी दुष्ट रूढी बंद करावी. जर आपणास जत्रेंत अगर जेवणांत अगर

कोणतेही कामांत स्पृश्य हिंदू समानतेनें वागू देत नाहीत–अगर वागवीत नाहींत तर मग आपण त्यांच्या कोणत्याही कार्यात कां भाग घ्यावा ? आपण सर्वजण लवकरच धर्मांतर करणार असल्यामुळें, आपल्याला हिंदू देवांच्या कोणत्याही जत्रे-यात्रेंत अगर सणांत यापुढें भाग घ्यावयाचा नाहींच तरीपण धर्मांतराचे पूर्वीही आपण आपला समानतेचा बाणा सोडूं नये.

आपले पुढारी परमपूज्य बाबासाहेब आंबेडकरांची वरीलप्रमाणें आज्ञा लक्षांत घेऊन सर्वांनी त्याप्रमाणें वागावें.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर,
यांच्या खास आज्ञेवरून,
सुभेदार–विश्राम गं. सवादकर.

❋ ❋ ❋

जनता, दिनांक १५ फेब्रुवारी १९३६.

७८

अस्पृश्यांचे धर्मांतर आणि त्यांचे राजकीय हक्क

अस्पृश्यांनी धर्मांतर केले तर त्यांना १९३५ च्या कायद्यान्वये जे राजकीय हक्क देण्यात आलेले आहेत त्यांचा त्यांना उपभोग घेण्याचा हक्क राहतो किंवा नाही, हा मोठा वादग्रस्त प्रश्न होता. धर्मांतराची घोषणा करण्याअगोदर या प्रश्नाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व बाजूंनी विचार केलेला होता. हा प्रश्न स्पृश्य आणि अस्पृश्य लोक सभांतून व वर्तमानपत्रांतून वेळोवेळी उपस्थित करीत असत. तेव्हा काही वेळा साहेब त्यांना त्रोटकपणे उत्तरे देत व अस्पृश्यांनी धर्मांतर केले तरी त्यांना अस्पृश्य म्हणून जे राजकीय हक्क मिळालेत ते त्यांना धर्मांतरानंतरही उपभोगावयास मिळतील असे आपले मत प्रदर्शित करीत असत. या बाबतीत जे साशंक होते, त्यांची शंकानिवृत्ती व्हावी या हेतूने त्यांनी ' जनते ' च्या २५ जुलै आणि १ ऑगस्ट १९३६ च्या जोडअंकात उपरोक्त शीर्षकाचा अग्रलेख लिहिला तो असा :—

अस्पृश्य वर्गाने हिंदुधर्माचा त्याग करून परधर्माचा अंगीकार करण्याचा आपला मनोदय व्यक्त केल्यापासून हिंदू लोकांत मोठीच खळबळ उडून गेलेली आहे. धर्मांतराच्या चळवळीला शह देण्यासाठी हिंदू लोक शिकस्तीचे प्रयत्न करीत आहे. शह देण्याकरिता ते ज्या मार्गाचा अवलंब करीत आहे, ते मार्ग न्यायान्यायाची चाड असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला शिष्टसंमत होणार नाहीत, अशी आमची खात्री आहे. ज्या ज्या वेळी अस्पृश्यांनी स्वाभिमान संरक्षणासाठी स्वतंत्रतेच्या मार्गावर पाऊल ठेवून आपली प्रगती करून घेण्याचा निर्धार जाहीर केला त्या त्या वेळी हिंदूंनी जातिहिताच्या व श्रेष्ठतेच्या भावनांना बळी पडून अस्पृश्यांना जरब बसविण्यासाठी पूर्वीपासून ज्या शस्त्रांचा उपयोग ते करीत आले आहेत ती शस्त्रे अस्पृश्यांच्या धर्मांतराच्या घोषणेलाही विरोध करण्याकरिता उपयोगात आणण्याचा उपक्रम त्यांनी चालू केला आहे. हिंदू जमीनदार अस्पृश्य कुळांकडील जमिनी काढून घेत आहेत. तसेच हिंदू जनता अस्पृश्यांवर सामाजिक व आर्थिक बहिष्कार पुकारीत आहेत. परंतु अस्पृश्यांना गुलामगिरीत डांबून ठेवण्यासाठी योजिलेल्या या जुन्या पुराण्या उपायांचा काहीच उपयोग होत नसून अस्पृश्यवर्गाची धर्मांतराची चळवळ अप्रतिहतपणे सर्वत्र पसरत चाललेली

आहे. अस्पृश्यांना जेरीस आणण्याचे जुने उपाय अपुरे पडू लागले आहेत, असा अनुभव येताच हिंदू लोकांनी अस्पृश्यांना भेडसावून व गांगरून टाकण्याचा एक नवीनच मार्ग शोधून काढला आहे. अस्पृश्यांनी धर्मांतर केल्यास त्यांना नवीन राज्यघटनेत प्राप्त झालेल्या राजकीय हक्कांना मुकावे लागेल, असा गिल्ला हिंदू लोकांनी चालविलेला आहे. आतापर्यंत अस्पृश्य वर्गाने धर्मांतर केल्यास त्यांचे राजकीय हक्क नष्ट होतील असा इशारा अस्पृश्य वर्गाबद्दल सहानुभूती बाळगणारे काही स्पृश्य हिंदू मधून मधून देत असत. हे लोक अस्पृश्य वर्गाचे विरोधक नसून हितचिंतक होते. परंतु या हिंदू हितचिंतकांनी जे इशारे म्हणून म्हटले होते, त्याचा विरोधी लोक धमकी म्हणून उपयोग करीत आहेत. ता. २१ च्या ' **जन्मभूमि** ' नावाच्या गुजराथी दैनिक पत्रात अशी बातमी प्रसिद्ध करण्यात आली होती की, हिंदूधर्माचा त्याग करण्याच्या ठरावामुळे अस्पृश्य वर्ग कोंडीत सापडला आहे व हिंदूधर्माचा त्याग केल्यास जे राजकीय हक्क मिळाले आहेत ते नष्ट होतील अशी त्यांना भीती वाटू लागली आहे. या पत्राने अशी थाप उठवून दिली होती की, डॉ. आंबेडकरांना ही चूक कळून आल्यामुळे ते गांगरून गेले आहेत ; आणि म्हणूनच ते येत्या निवडणुकीत उमेदवार म्हणून उभे रहाणार नसून आपल्या अनुयायांनाही तशा प्रकारचा सल्ला देत आहेत. ' **बॉम्बे क्रॉनिकल** ' च्या ता. २२ च्या अंकात तर या पत्राच्या प्रतिनिधीने फारच मोठी कंडी पिकवून विकली आहे. या पत्राच्या प्रतिनिधीने अशी बातमी प्रसिद्ध केली आहे की, डॉ. आंबेडकरांनी धर्मांतरामुळे राजकीय हक्क हिरावले जातील की काय या प्रश्नासंबंधी मुंबई सरकारबरोबर पत्रव्यवहार केला होता व मुंबई सरकारने त्यांना असे कळविले की, धर्मांतर केल्यास अस्पृश्यांकरिता कायदे कौन्सिलात राखून ठेवलेल्या जागेसाठी उमेदवार म्हणून उभे राहता येणार नाही. या बाबतीत डॉ. आंबेडकरांनी ' **टाईम्स ऑफ इंडिया** ' पत्राच्या प्रतिनिधीला दिलेली मुलाखत त्या पत्राच्या ता. २४ च्या अंकात प्रसिद्ध झाली आहे. या मुलाखतीत डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्य वर्गाला मिळालेल्या राजकीय हक्कांवर धर्मांतरामुळे कायद्याच्या दृष्टीने काय परिणाम घडतील या विषयी आपले मत सविस्तर रीतीने प्रदर्शित केले आहे. धर्मांतराने अस्पृश्यांचे राजकीय हक्क नष्ट होतील अशी धमकी देणाऱ्या वृत्तपत्रांना आपली विचारसरणी बिनचूक आहे अशी खात्री वाटत होती. परंतु डॉ. आंबेडकरांनी आपली मुलाखत प्रसिद्ध केल्या नंतर ज्या ज्या लोकांनी एक आठवडाभर नंगानाच चालविला होता, त्या लोकांची दातखिळी बसून आता जिकडे तिकडे सामसूम झालेली दिसत आहे. डॉ. आंबेडकरांनी आपल्या तर्कशुद्ध विचारसरणीने या प्रश्नाची चर्चा इतक्या मुद्देसूदपणे केलेली आहे की, अस्पृश्य वर्गाच्या प्रतिस्पर्ध्यांना धर्मांतरामुळे अस्पृश्यांचे राजकीय हक्क नष्ट

होतील असा जो विश्वास वाटत होता तो नष्ट झाला आहे. इतका की ज्या ज्या लोकांनी पहिल्या दिवशी अस्पृश्यांना भेडसावून सोडणारे अग्रलेख लिहिले त्या त्या लोकांनी दुसऱ्या दिवशी जीभ चावून आपले चुकले म्हणून उलट अग्रलेख लिहिले व डॉ. आंबेडकरांनी केलेला अर्थ व मांडलेली विचारसरणी बरोबर व कायदेशीर आहे, अशी कबुली दिली.

धर्मांतराने राजकीय हक्कांस बाध येतो की काय या प्रश्नासंबंधाने डॉ. आंबेडकरांनी महार परिषदेत केलेल्या भाषणात त्यांनी त्या प्रश्नाची चर्चा सविस्तर केलेली होती. ' जनते ' च्या वाचकांनी ते भाषण वाचलेले असल्यामुळे फिरून त्या प्रश्नाची चर्चा ' जनते ' त करण्याची आवश्यकता नव्हती. परंतु हा विषय अत्यंत महत्त्वाचा आहे आणि अस्पृश्य समाज नवीन राजकीय घटनेच्या बाबतीत ज्ञानहीन असल्यामुळे त्याची या बाबतीत दिशाभूल करणे कोणालाही शक्य होऊ नये म्हणून या विषयाची पुन्हा एकदा चर्चा करणे प्राप्त झाले आहे. गेल्या आठवड्यात हिंदू विरोधकांनी जी वावटळ उठविली होती व तीत जे अनेक मुद्दे मांडले होते, त्यांतील पहिला मुद्दा जो प्रामुख्याने मांडला गेला होता तो हा की, अस्पृश्य लोकांनी हिंदूधर्माचा त्याग करण्याचा व हिंदू देवतांना व ग्रंथांना न मानण्याचा जो ठराव पास केला त्यामुळे त्यांना दिलेल्या राजकीय हक्कांचा उपभोग घेण्यास ते कायद्याने अपात्र ठरले आहेत. याचा स्पष्ट अर्थ असा की, अस्पृश्य लोकांना नवीन राजकीयघटनेत जे राजकीय हक्क देण्यांत आलेले आहेत त्याचा जर उपभोग घ्यावयाचा असेल तर त्यांना हिंदू म्हणूनच राहिले पाहिजे. आपण हिंदू नाही असे ते जर म्हणतील तर ते आपल्या राजकीय हक्काला मुकतील. जसा कोळी आपले जाळे लांबवर पसरून त्यात ओहोळातील मासे अडकवून धरण्याचा प्रयत्न करतो तसाच हिंदुत्वाचा अस्पृश्यांभोवती पाश पसरून त्यांना आपल्या जाळ्यात अडकविण्याचा हिंदूंचा हेतू असेल तर तो या डावाने साध्य होऊ शकणार नाही. कारण हा डाव सफल होण्यास आधी हिंदू कोणाला म्हणावे याची काहीतरी ठराविक कायदेशीर व्याख्या असावयास पाहिजे. पण हिंदू या शब्दाची सर्वसामान्य व्याख्या आजवर कोणीही दिलेली नाही व कोणत्याही कायद्यात ठेवण्याचा प्रयत्नही केलेला नाही. हिंदूधर्माची व्याख्या करणे इतके कठीण आहे की, जो कोणत्याच धर्माचा अनुयायी नाही तो हिंदूधर्माचा अनुयायी, अशी व्याख्या एक तज्ज्ञ माणसाने तयार केलेली आमच्या वाचनात आहे. खुद्द हिंदूमहासभेने देखील हिंदुस्थानात उत्पन्न झालेल्या कोणत्याही धर्माचे पालन करणारा तो हिंदू अशी हिंदू या शब्दाची व्याख्या केलेली आहे व हिंदू या शब्दात सनातनी, आर्यसमाज, जैन, शीख, बौद्ध व ब्राह्मो

वगैरे सर्वांचा समावेश होतो असे आपल्या उद्देश व नियम पत्रकात म्हटले आहे. जेथे हिंदू कोण आणि कोण नव्हे हेच अनिश्चित आहे तेथे अस्पृश्यांना हिंदू या कोंडीत कोंडून ठेवण्याचा प्रयत्न निष्फळ होणार आहे. हिंदुधर्म हे एक अशाप्रकारचे जाळे आहे की, ह्या जाळ्यातून कोणत्याही माणसास तो पुरेसा लवचिक जिभेचा व उलट्या काळजाचा असला तर त्याला निसटून जाता येईल, अशा स्थितीमध्ये हिंदू लोकांनी हा जो प्रश्न उपस्थित केला आहे त्याचा विचार करण्याची खरोखरी काही आवश्यकता नाही. परंतु प्रश्न महत्त्वाचा असल्यामुळे एवढ्या प्रास्ताविक मुद्दावरच निकाल करून सोडून देणे आम्हांस योग्य वाटत नाही.

राजकीय हक्क उपभोगण्यासाठी अस्पृश्यांनी हिंदू म्हणून घेतलेच पाहिजे काय या प्रश्नाचे खरोखरी दोन भाग पाडतात. एक नुसता हिंदू धर्माचा त्याग केला तर त्यांच्या राजकीय हक्कांवर काय परिणाम होईल व दुसरा हिंदू धर्माचा त्याग करून परधर्माचा स्वीकार केला तर त्यांच्या राजकीय हक्कांवर काय परिणाम होईल ? हिंदू लोकांनी उपस्थित केलेली बाब इतकी गुंतागुंतीची आहे की, वरीलप्रमाणे दोन भाग पाडूनच एक एका भागाचा निरनिराळा विचार करणे वाचकांच्या समजुतीच्या दृष्टीने इष्ट आहे. प्रथमतः नुसता हिंदू धर्माचा त्याग केला तर काय होईल ? त्यांना आपल्या राजकीय हक्कांना मुकावे लागेल काय ? या प्रश्नाचा विचार करू. या प्रश्नांचा विचार करताना गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्टात निरनिराळ्या जातींना जे प्रतिनिधित्व देण्यात आले आहे त्याला लागू असणाऱ्या कलमाचा परिचय करून घेणे अत्यंत जरूरीचे आहे. ज्या लोकांनी हे बुजगावणे पुढे केले आहे त्या लोकांना आमची अशी सूचना आहे की, त्यांनी अस्पृश्य वर्गाची जी व्याख्या कायद्यामध्ये केली आहे या व्याख्येकडे लक्ष पुरवावे. ही व्याख्या गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्टाच्या पहिल्या परिशिष्टाच्या २६ व्या कलमामध्ये दिलेली आहे. या कलमामध्ये अस्पृश्यवर्ग असा शब्दप्रयोग मुळीच केलेला नाही. ही गोष्ट प्रथमतः सर्वांनी ध्यानात ठेवणे आवश्यक आहे. दुसरी गोष्ट ध्यानात ठेवण्यासारखी आहे ती ही की या कलमामध्ये–डिप्रेस्ड क्लासेस–दलित वर्ग असा देखील शब्द प्रयोग केलेला नाही. या कलमात जो शब्दप्रयोग केलेला आहे तो ' शेड्युल्ड कास्ट ' असा शब्दप्रयोग केलेला आहे. या शब्दप्रयोगावरून उघड आहे की, कलम २६ यामध्ये जी व्याख्या दिलेली आहे ती व्याख्या धर्मावर अवलंबून ठेवलेली नाही. सम्राट बादशहा व त्यांचे कौन्सिल यांनी ज्या जातींना या लिस्टात घातले असेल त्यांना शेड्यूल्ड कास्ट म्हणण्यात यावे. अशी शेड्यूल्ड कास्ट याची व्याख्या करण्यात आलेली आहे. शेड्यूल्ड कास्ट म्हणजे फक्त पूर्वीचे अस्पृश्य किंवा डिप्रेस्ड

क्लासेस असे व्याख्येत म्हटलेले नाही. तसेच ज्या जातींचा समावेश लिस्टात करून त्यांना शेड्यूल्ड कास्टमध्ये टाकण्यात आले आहे, त्यांचा उल्लेख करताना हिंदूंपैकी अमूक अमूक जाती असे विशेषणात्मक वचन लावलेले नाही. हे परिशिष्ट १, कलम २६ यात शेड्यूल्ड कास्टच्या व्याख्येवरून उघड होत आहे. इतकेच नव्हे तर शेड्यूल्ड कास्टच्या बाबतीत जी सार्वभौम बादशहाची ऑर्डर इन कौन्सिल प्रसिद्ध झाली आहे त्यात शेड्यूल्ड कास्टमध्ये प्रांतोप्रांती कोणकोणत्या जातींचा समावेश करावयाचा याची जी यादी देण्यात आलेली आहे त्यातही हिंदूंतील अमूक अमूक जाती असे विशेषणात्मक वचन घातले नाही. नुसता जातींचा उल्लेख केलेला आहे. या व्याख्येवरून स्पष्ट आहे की, राजकीय हक्काकरिता हिंदू समाजात किंवा हिंदुधर्मात राहिले पाहिजे अशी अट कायद्याने घातलेली नाही आणि म्हणून जे लोक असे म्हणतात की, हिंदू धर्मांतर्गत किंवा हिंदू समाजांतर्गत जातींनाच हे राजकीय हक्क दिले आहेत, ते त्या जाती हिंदूधर्माचा त्याग करतील तर त्यांना राजकीय हक्कांना मुकावे लागेल, त्या लोकांचे म्हणणे या एका व्याख्येच्या विवेचनावरून कसे निखालस खोटे आहे हे कोणासही कळून येईल.

अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांच्या बाबतीत हिंदुधर्मत्यागाच्या ठरावाचा काही विघातक परिणाम होऊ शकत नाही. याला दुसरीही कारणे देता येतील व ही कारणे सुलभ रीतीने जनतेच्या वाचकांना समजावी म्हणून ती देण्यापूर्वी जातवार प्रतिनिधित्वाच्या कायद्याने ठरविलेल्या पद्धतीची रुपरेषा काय आहे हे आधी सांगितले पाहिजे. म्हणून या विषयाची मांडणी प्रथम आम्ही करण्याचे योजिले आहे. हिंदुस्थानातील लोक भिन्न भिन्न धर्मांचे अनुयायी आहेत. उदाहरणार्थ हिंदू, जैन, बौद्ध, पार्शी, मुसलमान वगैरे लोक त्या त्या धर्माचे अनुयायी आहेत. त्याच प्रमाणे कित्येक लोक नास्तिक असून कोणत्याच धर्माला मानीत नाहीत. या सर्व लोकांचा मिळून हिंदुस्थानामध्ये सामान्य जनसमूह बनलेला आहे. या सामान्य जनसमूहाचा जो मतदार संघ घडविण्यात आला आहे त्यालाच कायद्याने सामान्य मतदार संघ असे नाव देण्यात आले आहे. जातवार प्रतिनिधींचे तत्त्व जर हिंदुस्थानात आले नसते तर एकाच मतदारसंघात सर्व धर्माच्या लोकांचा तसेच निधर्मी लोकांचाही समावेश झाला असता. म्हणजे सामान्य मतदार संघाला धर्माचा कोणत्याही प्रकारचा विधिनिषेध झाला नसता. परंतु जातवार प्रतिनिधित्वाचे तत्त्व मान्य झाल्यामुळे जातीय निवाड्याने पहिली जी गोष्ट केली ती ही की, सामान्य मतदारसंघातून काही विशिष्ट धर्माचे लोक निवडून काढून त्यांचे स्वतंत्र मतदारसंघ घडविण्याचे ठरविले. त्याप्रमाणे जातीय निवाड्याने तीन धर्मांच्या लोकांना सामान्य मतदारसंघातून बाहेर काढून

त्यांचे स्वतंत्र गट बनविले ते म्हणजे खिस्तीधर्म, इस्लामधर्म व पंजाबांतील शीख धर्म हे होत. अशा रीतीने जातीय निवाड्याने हिंदुस्थानामध्ये मतदारांचे दोन प्रकारचे संघ निर्माण केले आहेत. एक सामान्य मतदार संघ आणि दुसरा स्वतंत्र मतदार संघ. या बाबतीत एक गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे. ती ही की, धर्मावलंबी स्वतंत्र मतदार संघात ठेवलेल्या राजकीय हक्कांचा उपभोग घेण्यासाठी खिस्ती, इस्लाम व शीख या तीन धर्मांपैकी ज्या धर्मानुयायांचा तो संघ असेल त्या धर्माचे अनुयायित्व मान्य करणे ही एक आवश्यक अट आहे. परंतु सामान्य मतदार संघामध्ये दाखल होण्याकरिता आणि या मतदार संघाकरिता दिलेल्या हक्कांचा उपभोग घेण्यासाठी त्यांत समाविष्ट झालेल्या कोणत्या तरी धर्माचे अनुयायित्व मान्य करण्याची अट कायद्याने घातलेली नाही. ही गोष्ट मुसलमान व खिस्ती मतदार संघांतील आणि सामान्य मतदार संघांतील मतदारांसाठी कायद्याने ज्या अटी ठरविल्या आहेत त्या ताडून पाहिले असताना सहज कळून येण्यासारखी आहे. गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्टच्या ६ व्या परिशिष्टात मतदार होण्याला अवश्य असलेली पात्रता अंगी येण्याकरिता ज्या अटी कायद्याने घातल्या आहेत त्या पाहिल्या तर असे आढळून येईल की, मतदार २१ वर्षांचा असला पाहिजे, विवक्षित ठिकाणी ठराविक मुदतीपर्यंत वस्ती करीत असला पाहिजे अगर त्याचे शिक्षण एका विशिष्ट मर्यादेपर्यंत झाले असले पाहिजे. या अटी जशा सर्वसाधारण मतदार संघातील मतदाराला लागू आहेत त्याचप्रमाणे स्वतंत्र मतदार संघातील मतदाराला या सर्वसाधारण मतदाराच्या अटी लागू आहेतच. परंतु ६ व्या परिशिष्टाच्या कलम ५ व कलम ६ याकडे नजर फेकली असताना असे दिसून येईल की विवक्षित धर्माचे अनुयायित्व ही एक जादा अट घालण्यात आली आहे. म्हणजे मुसलमान मतदार संघात सामील असलेला मनुष्य धर्माने आपण मुसलमान आहोत असे मान्य करणारा असला पाहिजे. खिस्ती मतदार संघात सामील असलेला मनुष्य खिस्ती धर्माचा तो अनुयायी आहे असे मान्य करणारा असला पाहिजे. तसेच शीख स्वतंत्र संघात सामील असलेला मनुष्य आपण शीख धर्माचे आहोत असे मान्य करणारा असला पाहिजे. सामान्य मतदार संघात सामील असलेला मतदार हा त्या सामान्य मतदार संघात ज्या अनेक धर्मांचा समावेश झालेला आहे त्यांपैकी कोणत्या तरी एका धर्माचा अनुयायी आहे असे त्याने मान्य केले पाहिजे अशी अट कायद्यात कोठेच घातलेली नाही. यावरून असे दिसून येईल की, सामान्य मतदार संघात धर्माला कोणत्याही प्रकारचे राजकीय महत्त्व देण्यात आलेले नाही आणि ज्यांचा समावेश सामान्य मतदार संघात करण्यात आला आहे त्यांचे राजकीय हक्क अमूक धर्म असण्यावर अगर नसण्यावर कोणत्याही प्रकारे अवलंबून ठेवलेले नाहीत. अस्पृश्य वर्गाचा

समावेश सर्व सामान्य मतदार संघात करण्यात आलेला आहे, ही गोष्ट ध्यानात घेतली आणि वर दर्शविल्याप्रमाणे सामान्य मतदार संघात धर्माधर्माचा आणि मतदाराच्या पात्रापात्रतेचा कोणत्याही प्रकारचा संबंध नाही. या दोन गोष्टी जमेस घेतल्या म्हणजे अस्पृश्य वर्गाला जे राजकीय हक्क दिले आहेत ते हक्क त्यांनी हिंदुधर्माचा त्याग केल्याचा निश्चय जाहीर केल्यामुळे हिरावले जातील, असे म्हणणें कोणालाही शक्य होणार नाही. कारण ते हक्क धर्मावलंबी नाहीत. ज्या अस्पृश्य लोकांनी हिंदू धर्माचा त्याग करण्याचा निश्चय जाहीर केला आहे परंतु ज्यांनी अजून दुसरा धर्म स्वीकारला नाही त्या लोकांना फार तर निधर्मी म्हणता येईल. परंतु निधर्मी लोकांचा समावेश सामान्य मतदार संघात करता येणार नाही असे कायद्याचे अल्पस्वल्प ज्ञान असणारा कोणीही माणूस म्हणू शकणार नाही.

ज्या लोकांनी हा बागुलबोवा अस्पृश्यांपुढे उभा केला आहे त्या लोकांचा असा समज आहे की, अस्पृश्य वर्गाला देण्यात आलेल्या जागा हिंदू लोकांच्या वाट्यास आलेल्या जागांमधून दिलेल्या आहेत. परंतु आमच्या मते हा त्यांचा केवळ भ्रम आहे. कारण हिंदुजातीला कायद्याने ठराविक अशा जागा कोणत्याच प्रांतात दिलेल्या नाहीत. मुसलमान, ख्रिश्चन, शीख इत्यादी मतदार संघांना ठरवून दिलेल्या जागासोडून ज्या शेष जागा राहिल्या त्या मुसलमान, ख्रिश्चन, शीख यांना वगळून जी बाकीची जनता राहिली व जिचा सर्वसाधारण मतदारसंघात समावेश करण्यात आलेला आहे, त्या सामान्य जनतेला मिळून म्हणून देण्यात आलेल्या आहेत आणि अस्पृश्यांना देण्यात आलेल्या जागा या सामान्य जनतेला देण्यात आलेल्या जागांपैकी राखीव असलेला भाग असल्यामुळे केवळ हिंदू लोकांच्या वाट्यास आलेल्या जागांपैकी काही जागा अस्पृश्य लोकांना देण्यात आल्या, या म्हणण्याला काहीच आधार नाही. कारण ज्या सर्वसाधारण मतदार संघाच्या वाट्यातून अस्पृश्य वर्गाकरिता काही भाग राखून ठेवलेला आहे त्या सर्वसाधारण मतदार संघात हिंदूप्रमाणे जैन, बौद्ध, पारशी, यहुदी, नास्तिक वगैरे हिंद्वेतरांचा समावेश झालेला आहे. मुळातच हिंदूंच्या जागा नाहीत असे ठरल्यानंतर हिंदूंनी आपल्या वाटणीपैकी काही भाग अस्पृश्यांना ते हिंदू आहेत म्हणून व हिंदू राहतील असे समजून दिल्या, असे म्हणावयास काही आधार नाही.

येथपर्यंत आमच्या मताच्या समर्थनार्थ आम्ही तीन कारणे दिली आहेत. पहिले कारण असे की, शेड्यूल्ड कास्ट याची व्याख्या देताना हिंदू धर्मांतर्गत जाती असा उल्लेख कायद्यात कोठेच केलेला नाही. दुसरे कारण असे की, ज्या सर्वसाधारण मतदार संघामध्ये अस्पृश्यांचा समावेश करण्यात आलेला आहे, त्या सर्वसाधारण

मतदार संघामध्ये दाखल होण्यास ज्या अटी कायद्याने घातल्या आहेत त्यांत हिंदुधर्माचे अनुयायित्व नव्हे तर कोणत्याही धर्माच्या अनुयायित्वाची आवश्यकता सांगितलेली नाही व तिसरे कारण असे की, अस्पृश्य वर्गाला ज्या जागा देण्यात आलेल्या आहेत त्या हिंदूंच्या वाट्यातून दिलेल्या नसून सर्वसाधारण जनतेच्या वाट्यातून दिलेल्या आहेत. परंतु हिंदू लोकांनी शेड्यूल्ड कास्टच्या लिस्टात समाविष्ट झालेल्या जातींना राखून ठेवलेल्या जागांचा फायदा घेण्याकरिता हिंदू धर्मातच राहिले पाहिजे, असा जो प्रश्न उपस्थित केला आहे, त्याला आम्ही नकारार्थी उत्तर दिले आहे. त्याला आणखी चौथे कारण देता येण्यासारखे आहे. शेड्यूल्ड कास्टच्या लिस्टात समावेश केलेल्या जातींनी हिंदू धर्माशी एकनिष्ठ राहिले तरच त्यांना राखीव जागांचा फायदा घेता येईल असे जे म्हणतात त्यांनी एका महत्त्वाच्या गोष्टीकडे दुर्लक्ष केले असावे असे आम्हांस वाटते. आमच्या मते या जातींतील लोकांना राखीव जागेचा जो फायदा देण्यात आलेला आहे तो त्या जातींतील मतदारांच्या धार्मिक निष्ठेवर नसून मतदारांच्या जातित्वावरच आधारलेला आहे. जातीय निवाड्याने सामान्य मतदार संघात जे वर्ग किंवा ज्या जाती समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत त्यांपैकी काही विशिष्ट जाती निवडून काढून त्यांचा एक गट बनविला आहे आणि त्या गटाला शेड्यूल्ड कास्ट असे नाव देऊन त्या गटासाठी सामान्य मतदार संघाच्या वाट्यास आलेल्या जागांपैकी काही ठराविक जागा त्यांच्याकरिता राखून ठेविल्या आहेत. या राखीव जागेकरिता पात्रापात्रतेची कसोटी पाहावयाची झाल्यास ती जातीवरून पाहावयाची आहे. धर्मावरून पाहावयाची नाही. **राखीव जागेकरिता अस्पृश्य उमेदवाराची पात्रता ठरवावयाची झाल्यास ती जातीवरून ठरवावयाची, धर्मावरून ठरवावयाची नाही.** या आमच्या म्हणण्याची सत्यता खालील उदाहरणावरून स्पष्टपणे वाचकांच्या ध्यानात येईल.

पंजाबातील शेड्यूल्ड कास्टच्या लिस्टात आदधर्मीय लोकांचा व रामदासी लोकांचा समावेश करण्यात आलेला आहे. ही गोष्ट शेड्यूल्ड कास्टच्या बाबतीत जी सरकारी ऑर्डर-इन-कौन्सिल प्रसिद्ध झालेली आहे त्यावरून दिसून येईल. या आदधर्मीय लोकांचा इतिहास याठिकाणी अतिशय उद्‌बोधक होईल अशी आमची खात्री आहे. काही वर्षापूर्वी पंजाबातील चांभार व च्यूडा वगैरे अस्पृश्य जातींच्या लोकांनी आदधर्म मंडळ नावाची संस्था स्थापन केली होती. या संस्थेचा मूळ उद्देश हिंदू धर्माचा त्याग करणे असाच होता. सन १९३१ च्या खानेसुमारीचे वेळी या संस्थेने पंजाब सरकारकडे असा अर्ज केला होता की, आम्ही हिंदुधर्माचा त्याग केलेला आहे आणि म्हणून खानेसुमारीत

आम्हांला हिंदूंपासून निराळे करून सेन्सस रिपोर्टात आमची लोकसंख्या आदधर्मीय या नावाखाली स्वतंत्रपणे निराळी दाखविण्यात यावी. या मागणीमुळे पंजाबातील हिंदू लोक चिडून जाऊन त्यांनी पुष्कळ अत्याचार केले. परंतु या लोकांनी आपला निश्चय न सोडल्यामुळे आदधर्मीयांची चळवळ यशस्वी होऊन पंजाबच्या सेन्सस रिपोर्टात आदधर्मीयांची संख्या आदधर्मीय नावाखाली हिंदूंपासून निराळी दाखविण्यात आली आहे. रामदासी लोक हे शीख धर्माचे अनुयायी आहेत. अर्थातच ते हिंदू नाहीत. तथापि त्यांचा समावेश शेड्यूल्ड कास्टमध्ये करण्यात आलेला आहे. यावरील दोन उदाहरणावरून एकच निष्कर्ष निघू शकतो व तो हा की, शेड्यूल्ड कास्टच्या गटातील जातींना त्यांना दिलेले राजकीय हक्क उपभोगण्याकरिता ते पात्र आहेत किंवा अपात्र आहेत हे ठरविण्याकरिता ते हिंदू धर्माचे आहेत किंवा नाहीत हा प्रश्न निरर्थक आहे. उमेदवार या शेड्यूल्ड कास्टच्या लिस्टात समाविष्ट केलेल्या कोणत्या तरी एका जातीचा माणूस असला म्हणजे कायद्याच्या दृष्टीने बस्स आहे. तो त्यांच्याकरिता राखून ठेवलेल्या राजकीय हक्कास पात्र होऊ शकतो. अमूक एका धर्मावर निष्ठा असण्याची आवश्यकता नाही. म्हणजे हिंदू धर्माचा त्याग करून देखील त्यांना कायद्याने मिळालेल्या राजकीय हक्कांचा उपभोग घेता येईल.

परधर्मात गेल्याने काय होईल ?

अस्पृश्य वर्गाच्या हितशत्रूंनी जो प्रश्न उभा केला आहे तो खोडून टाकण्यासाठी याहून अधिक लिहिण्याची आवश्यकता आहे असे आम्हांस वाटत नाही. शेड्यूल्ड कास्टच्या लिस्टमधील काही जातींनी हिंदू धर्माचा त्याग केला इतकेच नव्हे तर दुसऱ्या एखाद्या धर्माचा अंगीकार केला तर त्यांच्या राजकीय हक्कांचे काय होईल याही प्रश्नाची वासलात आजच लावण्याचा आमचा इरादा आहे. अस्पृश्य वर्गाच्या प्रतिपक्षीयांनी या बाबतीत काही प्रख्यात हिंदू कायदे पंडितांचा सल्ला घेतल्याचे जाहीर झाले आहे. या हिंदू पंडितांनी शेड्यूल्ड कास्टच्या लिस्टमधील जातींनी हिंदू धर्माचा त्याग करावा असे केवळ अभावात्मक धोरण ठरविले तर राजकीय हक्क हिरावून घेण्याला कायद्याच्या दृष्टीने ते कारण अपुरे पडेल असे मत दिले आहे. आम्हांला आनंद वाटतो की, कायदे पंडितांच्या या सल्ल्यामुळे अस्पृश्य वर्गाच्या हितशत्रूंच्या कुटील नीतीला बराच आळा बसेल. परंतु या हिंदू कायदे पंडितांनी अस्पृश्यांनी धर्मांतर केले तर त्यांचे हक्क नष्ट होतील असे जे मत दिले आहे, त्याने आमचे समाधान होऊ शकत नाही. या हिंदू कायदे पंडितांच्या मतांत अतिव्याप्तीचा दोष आहे आणि म्हणून कायद्याच्या दृष्टीने ते अग्राह्य आहे, असे आम्हांला वाटते. आमच्या कायद्याच्या मते जातीय

प्रतिनिधीत्वाच्या बाबतीत कायद्याने ठरवून दिलेल्या व्यवस्थेप्रमाणे अस्पृश्य वर्गाला सामान्य मतदार संघात असलेले राजकीय हक्क काही धर्म अंगीकारिल्याने निश्चितपणे नष्ट होतील हे खरे ; परंतु हा नियम सर्व धर्मास लागू होईल असे नाही. आमच्या म्हणण्याचा स्पष्ट अर्थ असा की, **अस्पृश्य वर्गाने सामान्य मतदार संघापासून विभक्त करण्यात आलेल्या एखाद्या धर्माचा अंगीकार केला तरच त्यांचे राजकीय हक्क नष्ट होतील.** सामान्य मतदार संघातून वगळण्यात आलेला धर्म कोणता हे प्रत्येक इलाख्यात कायद्याने जी व्यवस्था ठरवून दिली असेल तिच्यावर अवलंबून आहे. इस्लाम आणि ख्रिस्ती धर्म हिंदुस्थानातील सर्वच प्रांतांत सामान्य मतदार संघापासून वेगळे काढण्यात आलेले आहेत. परंतु शीख धर्म फक्त पंजाब प्रांतातच स्वतंत्र करण्यात आलेला आहे. याचा अर्थ असा की, अस्पृश्य लोक मुसलमान किंवा ख्रिश्चन झाले तर हिंदुस्थानातील सर्वच प्रांतांत त्यांचे राजकीय हक्क नाहीसे होतील आणि शीख झाले तर फक्त पंजाब प्रांतातच ते नाहीसे होतील. अस्पृश्य वर्गाने बुद्ध, जैन, ज्यू आणि शीख–पंजाब प्रांतखेरीज करून–धर्माचा अंगीकार केला तर त्यांच्या राजकीय हक्कांना कोणत्याही प्रकारचा बाध येऊ शकणार नाही, ही गोष्ट निर्विवाद आहे. याला बंगाल प्रांत हा एकच अपवाद आहे. बंगाल प्रांतातील शेड्यूल्ड कास्टच्या बाबतीत असा नियम करण्यात आला आहे की शेड्यूल्ड कास्टपैकी एखाद्या व्यक्तीने बुद्ध धर्माचा स्वीकार केला तर त्याची शेड्यूल्ड कास्टमध्ये गणना करता येणार नाही. म्हणजे त्याला त्या गटाचे राजकीय हक्क उपभोगता येणार नाहीत हा नियम शेड्यूल्ड कास्ट ऑर्डर्स-इन-कौन्सिलमध्ये घालण्यात आलेला आहे. हा प्रतिबंध फक्त बौद्ध धर्मापुरता असून तो फक्त बंगालच्या अस्पृश्य लोकांनाच लागू आहे.

या सर्व विवेचनाचा मतितार्थ आमच्या वाचकांना पूर्णपणे कळावा म्हणून धर्मांतराचा राजकीय हक्कांवर काय परिणाम होईल हे थोडक्यात सांगणे इष्ट आहे असे आम्हांस वाटते म्हणून आमच्या विवेचनाचे संकलन आम्ही खालील कलमांत देत आहोत.

(१) नुसता हिंदू धर्माचा त्याग केल्याने व दुसरा कोणताही धर्म न स्वीकारल्याने म्हणजे निधर्मी बनल्याने अस्पृश्यांचे राजकीय हक्क नष्ट होऊ शकत नाहीत. हा नियम सर्व प्रांतांना लागू पडेल.

(२) हिंदुधर्माचा त्याग करून अस्पृश्य लोकांनी इस्लाम अगर ख्रिस्ती धर्म स्वीकारला तर त्यांचे राजकीय हक्क हिरावले जातील. हा नियम सर्व प्रांतातील लोकांना लागू पडेल.

(३) बंगाल प्रांतखेरीज करून इतर कोणत्याही प्रांतांतील अस्पृश्य लोकांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला असताना त्यांचे राजकीय हक्क नष्ट होणार नाहीत.

(४) पंजाब प्रांतखेरीज करून बाकी सर्व प्रांतांतील लोकांनी शीख धर्माचा स्वीकार केला असतांना त्यांचे राजकीय हक्क नष्ट होणार नाहीत.

(५) कोणत्याही प्रांतांतील अस्पृश्य लोकांनी जैन, यहुदी, इस्राईली अगर झोरोस्ट्रियन पार्शी धर्म स्वीकारला तर त्यांचे राजकीय हक्क नष्ट होणार नाहीत. हा नियम सर्व प्रांतांना लागू पडतो.

वरती जेथे आम्ही असे म्हटले आहे की, सर्व प्रांतांतील अस्पृश्य लोक खिस्ती अथवा मुसलमान झाले अथवा पंजाबमधील अस्पृश्य लोक शीख झाले तर त्यांचे राजकीय हक्क बुडतील यावरून कोणाही धर्मांतरवादी अस्पृश्य माणसाने दुःखित होऊ नये किंवा स्वार्थसाधू हिंदूने समाधान मानू नये. कारण त्यांचे हक्क नष्ट होतील याचा अर्थ त्यांना कोठेच राजकीय हक्क उपभोगावयास मिळणार नाहीत, असा समज कोणीही करून घेऊ नये. त्यांचे हक्क बुडतील याचा अर्थ इतकाच की, अस्पृश्य म्हणून जे हक्क दिले गेले आहेत त्यांचा उपभोग त्यांना घेता येणार नाही. परंतु अस्पृश्य म्हणून दिलेल्या राजकीय हक्कांना ते जरी आचवले तरी हिंदुस्थानातील मुसलमानांना व खिस्ती लोकांना प्रांतोप्रांती जे राजकीय हक्क दिलेले आहेत किंवा पंजाबात शिखांना जे राजकीय हक्क दिलेले आहेत त्या हक्कांचे खिस्ती म्हणून, मुसलमान म्हणून वा शीख म्हणून ते भागीदार होऊ शकतील. तेथे कसलीही आडकाठी येऊ शकणार नाही.

अस्पृश्य वर्गाला होता होईल तोपर्यंत नामोहरम करण्याचा हिंदूंनी केलेला हा पहिलाच उपद्व्याप नव्हे. पुणे-करार झाल्यानंतर तो निष्फळ कसा करावा व त्यापासून अस्पृश्य लोकांना जास्तीत जास्त लाभ कसा न घेता येईल अशी व्यवस्था करण्याचा घाट हॅमंड कमिटीपुढे करण्याचा शक्य तो प्रयत्न हिंदूंनी केला. अस्पृश्यांच्या प्राथमिक निवडणुकीत कमीत कमी चार उमेदवार उभे राहिलेच पाहिजेत. चारांपेक्षा कमी राहिले तर पुणे करारास बाध येतो, असा लबाडीचा मुद्दा हिंदू लोकांनी हॅमंड कमिटीसमोर मोठ्या आग्रहाने मांडला होता. चार उमेदवार उभे राहिलेच पाहिजेत असे जर ठरले तर अस्पृश्यांच्या मतांची विभागणी होऊन हिंदूंनी आपल्यातीलच थोडकीच मते भरीस टाकली असताना त्यांना आवडता असेल असा अस्पृश्यांतील उमेदवार निवडून देता येईल म्हणून चारही संख्या कमीत कमी आहे असा आग्रह ते धरून बसले होते. परंतु त्यांच्या दुर्दैवाने हॅमंड कमिटीतील सभासद इतके मूर्ख नव्हते. त्यांनी हिंदूंची

विचारसरणी लबाडीची होती असे जरी स्पष्ट भाषेत म्हटले नाही तरी ती विचारसरणी अयोग्य आहे असा निकाल दिला. हॅमंड कमिटीसमोर अशाप्रकारे त्यांच्या करामतीची वासलात लागल्यानंतर आता हिंदू लोकांनी अस्पृश्यांचे राजकीय हक्क संपुष्टात आणण्याची ही दुसरी करामत चालू केली आहे.

हिंदू लोकांनी अस्पृश्यांच्या धर्मांतराच्या बाबतीत ज्या करामती चालविल्या आहेत त्या पाहता मालकांची गुलामासंबंधाने जी मनोवृत्ती दिसून येते तीच मनोवृत्ती हिंदू लोकांची अस्पृश्य वर्गासंबंधी दिसून येते. जर हिंदूंना अस्पृश्य वर्गाच्या कल्याणाची खरीखुरी कळकळ असती तर त्यांनी असे म्हटले असते, '' खेद वाटतो आजवर आम्ही तुम्हाला गुलाम म्हणून वागविले. आमच्या हातून तुमची उन्नती होऊ शकली नाही. परंतु, आज आम्ही तुम्हाला स्वातंत्र्य देतो, आणि तुमच्या उद्धाराची आमच्या मनाला जी तळमळ लागलेली आहे आणि तुमच्याविषयी आमच्या मनात ज्या सदिच्छा वसत आहेत त्यांची खूण पटविण्यासाठी आम्ही राजकीय सत्तेचा एवढा भाग तुमच्या स्वाधीन करतो. आपल्या इच्छित मार्गाने जा आणि आपल्या सामर्थ्याने समाजात योग्य असे सन्मानाचे स्थान प्राप्त करून घ्या. '' परंतु हिंदूंची मनोवृत्ती अशाप्रकारची नाही. गुलाम सेवा करण्याला कबूल असेल तरच त्याला अन्न घालणाऱ्या मालकाच्या मनोवृत्तीप्रमाणे हिंदू लोकांची मनोवृत्ती आहे. अस्पृश्य वर्गातील ज्या आमच्या मित्रांना हिंदू लोकांच्या सहानुभूतीचा मोह वाटतो त्यांनी या त्यांच्या मित्रांच्या–हिंदूच्या–मनोवृत्तीपासून योग्य तो धडा घ्यावा. हिंदू लोकांना आमचे उत्तर अगदी सरळ आणि सोपे आहे. आम्ही जे राजकीय हक्क संपादन केले आहेत ते हिंदू लोकांनी आम्हाला देणगी म्हणून दिलेले नाहीत. आमच्या राजकीय हक्कांवर आमचा जन्मसिद्ध हक्क आहे. ख्रिश्चन, मुसलमान किंवा शीख यांचा राजकीय हक्कांवर जितका नैसर्गिक हक्क आहे त्यापेक्षा अस्पृश्यवर्गाचा अधिक हक्क आहे. आमचे नैसर्गिक हक्क आम्हाला या पूर्वीच मिळाले नाहीत, यावरून त्यांच्यावर आमचा हक्क पोहोचत नाही असा अर्थ करता येणार नाही. आजपर्यंत हिंदू लोक सामर्थ्यवान होते आणि अस्पृश्य असमर्थ होते म्हणून हिंदू लोकांनी अन्यायाने दाबून ठेवलेले आमचे हक्क आम्हाला मिळू शकले नाहीत, एवढेच फार तर म्हणता येईल. आम्ही कोणत्याही तऱ्हेने हिंदूंचे ओशाळे नाही आणि जे हक्क वस्तुतः आमचेच होते ते आम्हाला मिळाल्याबद्दल हिंदू लोकांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचे अस्पृश्यांना काहीच कारण नाही. उलट अस्पृश्यांचे मार्गात हिंदू लोकांनी जे काटे पेरले त्याबद्दल संताप वाटण्याला अस्पृश्यांना सबळ कारणे आहेत. अस्पृश्य वर्गाने जर कोणाबद्दल कृतज्ञता व्यक्त करावयाची असेल तर ब्रिटीश सरकार संबंधानेच होय ! आमच्या संकटाच्या वेळी तेच आमच्या

सहाय्याला धावले आणि आमचे न्याय्य हक्क संपादन करण्याला त्यांच्या सहाय्यानेच आम्ही समर्थ झालो. अस्पृश्य वर्गासंबंधी महात्मा गांधींनी केलेल्या लीला जगजाहीर झालेल्या आहेत. कॉंग्रेस आणि मुसलमान यांच्या संयुक्त प्रयत्नाने अस्पृश्य वर्गाच्या मागण्या हाणून पाडण्यासाठी मुसलमानांना लाच देण्याचा जो कावा या महात्म्याने रचला होता त्याची हकिगत हिंदुस्थानच्या इतिहासात वाचीत असताना कोणाही हिंदी माणसाला लज्जेने मान खाली घालावी लागेल. महात्म्याने अस्पृश्य वर्गाचा जो विश्वासघात केला त्याला, जगाच्या इतिहासात कोठेही तुलनाच सापडणार नाही. आमची खात्री आहे की, कॉंग्रेस आणि अस्पृश्यवर्ग यांची पुरतेपणी ताटातूट करण्याला जर एखादी गोष्ट प्रामुख्याने कारणीभूत झाली असेल तर गोलमेज परिषदेच्या वेळी या महात्म्याने अस्पृश्यवर्गाचा केलेला विश्वासघात हीच होय. म्हणून अस्पृश्य वर्गाने हिंदू लोकांबद्दल कृतज्ञतेची भावना दाखविली नाही तर त्याबद्दल त्यांना आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. अस्पृश्यता वाटण्यासारखे हिंदूंनी त्यांच्यासाठी काहीच केलेले नाही.

या विषयावर ता. २८ जुलैच्या अंकात ' केसरी'च्या संपादकाने '' धर्माचा विचित्र लिलाव '' या शीर्षकाखाली एक अग्रलेख लिहून आपल्या अकलेचे प्रदर्शन केले आहे. या अग्रलेखात जी हीन मनोवृत्ती व्यक्त करण्यात आलेली आहे व जो शिवराळपणा करण्यात आला आहे त्याच्याशी आम्हाला काही कर्तव्य नाही. स्वतःच्या मुलाला त्याच्या आईसमोर 'शिंदळीच्या' म्हणून संबोधण्यास ज्या जातीच्या लोकांना कवडीचीही खंत वाटत नाही त्या जातीपैकी एकाने परकीयासंबंधाने अयोग्य भाषा वापरली तर त्याबद्दल कोणास आश्चर्य का वाटावे ? 'केसरी' च्या संपादकाने रचलेल्या तर्कटातील दोनच विधानांना आम्ही उत्तर देऊ इच्छितो. कम्युनल अवार्ड मध्ये अस्पृश्यांकरिता अवघ्या एकाहत्तर जागा राखून ठेवल्या होत्या. त्याच्याऐवजी पुणे करारात अस्पृश्यांना १४८ जागा देण्यात आल्या. म्हणजे ७१ जागा अधिक देण्यात आल्या. हा मोठा स्वार्थत्याग आहे, असे 'केसरी' चा शहाणा संपादक सांगत सुटला आहे व अस्पृश्य लोक हिंदुंचे आभार मानीत नाहीत, म्हणून तो त्यांना कृतघ्न म्हणतो. या उडाणटप्पू संपादकाला असे सांगणे प्राप्त आहे की, कम्युनल अवार्डमध्ये फक्त ७१ जागा राखून ठेवल्या होत्या, जास्त काही दिले नव्हते, ही गोष्ट खोटी आहे. अस्पृश्य लोकांना कम्युनल अवार्डमध्ये नुसत्या ७१ जागा राखून ठेवल्या होत्या इतकेच नव्हे, तर त्याच्याहीपेक्षा जास्त विस्तृत प्रकारचे राजकीय हक्क देण्यात आलेले होते. कम्युनल अवार्डमध्ये स्वतंत्र मतदार संघातर्फे ७१ जागा देण्यात आल्या होत्या एवढीच गोष्ट या निंदकाच्या ध्यानी राहिलेली दिसते. परंतु कम्युनल अवार्डमध्ये अस्पृश्यांकरिता स्वतंत्र मतदार संघातर्फे ७१ जागा राखून ठेवल्या होत्या व

त्याशिवाय त्यांना सार्वजनिक मतदारसंघात मत देण्याचा अधिकार देण्यात आलेला होता, ही गोष्ट पुष्कळसे हिंदुलोक विसरून गेलेले दिसतात. कम्युनल अवार्डमध्ये अस्पृश्य मतदाराला दोन मते देण्यात आलेली होती. एक त्यांच्या स्वतंत्र मतदार संघात त्यांचा प्रतिनिधी निवडून देण्याकरिता व दुसरे सर्वसाधारण मतदार संघात सर्वसाधारण उमेदवाराला निवडून देण्याकरिता. ही दोन मतांची सवलत हिंदुस्थानातील इतर कोणत्याही वर्गातील अगर धर्मातील लोकांना देण्यात आलेली नव्हती. पुणे–करारात सत्त्याहत्तर जागा अधिक देण्यात आल्या हे खरे. परंतु पुणे–करारात अस्पृश्यांचे दुय्यम मत काढून घेण्यात आले हेही तितकेच खरे आहे. या सौद्यात कोणाचा लाभ झाला. कोणाचे नुकसान झाले हे तराजूत घालून कोणालाही नक्की सांगता येणार नाही. परंतु या सौद्यात फक्त अस्पृश्यांचा फायदा झाला व हिंदूंचे नुकसान झाले म्हणणाऱ्यांची गणती लुच्चे लोकांत किंवा निर्बुद्ध लोकांत केली पाहिजे. डॉ. आंबेडकरांनी मांडलेला हा धर्माचा लिलाव कसा विचित्र आहे हे दाखविण्याकरिता 'केसरी' च्या संपादकाने मोठ्या दिमाखाने म्हटले आहे की, शीख व बौद्ध झाल्याने अस्पृश्यतेचा डाग तर जावाच पण अस्पृश्य वर्गाच्या मतदार संघाकरिता राखून ठेवलेल्या जागा पटकाविण्याची सवलत मात्र आपल्या हातची जाऊ नये, अशी डॉ. आंबेडकरांची दुहेरी मागणी आहे. धर्मांतरापुढे राजकीय हक्कांची आपल्याला काही मातब्बरी नाही हे डॉ. आंबेडकर यांनी नुकत्याच भरलेल्या महार परिषदेत जे भाषण केले त्यात त्यांनी अगदी स्पष्टपणे जाहीर केले होते. परंतु 'केसरी' ने म्हटल्याप्रमाणे डॉ. आंबेडकरांना दोन्हीही गोष्टी साधावयाच्या आहेत, असे जरी गृहीत धरले तरी त्यांत वेगळे असे काय आहे ? खिस्ती लोक अस्पृश्य नाहीत, तथापि हिंदूंनी त्यांना स्वतंत्र जागा राखून ठेवण्याचे बाबतीत कसलीच आडकाठी दाखविलेली नाही. मुसलमान लोक काही अस्पृश्य नाहीत. त्यांना त्यांच्या संख्येच्या अनेक पटीने जागा राखून ठेवल्या आहेत व त्यालाही 'केसरी' ने कधी हरकत घेतलेली नाही ! खिस्ती लोक अस्पृश्य नसूनही राखीव जागेच्या सवलतीचा उपभोग घेतात. मुसलमान लोक अस्पृश्य नसूनही राखीव जागेच्या सवलतीचा उपभोग घेतात. मग अस्पृश्य लोकांनी अस्पृश्यतेचा डाग घालवून राखीव जागेची सवलत टिकवून धरणेचा जर प्रयत्न केला तर 'केसरी' चे पोट का दुखावे ? 'केसरीचे' वाचक ज्यांना हिंदु–संस्कृतीच्या रक्षणार्थ काळजी वाटत असेल, त्यांनी या पत्राच्या नादान संपादकास असा प्रश्न विचारावा की, अस्पृश्यांकरिता राखून ठेवलेल्या जागा ते ज्या धर्मात जातील त्या धर्माच्या लोकांना लाभणार असतील तर अस्पृश्य लोक शीख अगर बौद्ध होऊन त्या धर्मियांची भर झालेली बरी, का अस्पृश्य लोक मुसलमान व खिस्ती होऊन मुसलमान व खिस्ती लोकांची धन झालेली बरी ? कोणी तरी या जागांचा अपहार करणार असेल तर, तो शीख किंवा बौद्ध यांनी केलेला बरा, का मुसलमान किंवा खिस्ती यांनी केलेला बरा ?

राखीव जागेच्या बाबतीत हिंदू लोकांच्या मनात जो एक भ्रम उत्पन्न झाला आहे त्याचे आम्ही निरसन करू इच्छितो. धर्मांतरामुळे अस्पृश्य वर्गाला मिळालेल्या जागा त्यांच्या हातून जातील अशी धमकी देणे किंवा अस्पृश्यांना धर्मांतराचा प्रयत्न यशस्वी झाल्यास त्यांनी गमावलेल्या जागा आपल्या पदरात पडतील अशी आशा करणे या दोन्ही गोष्टी अगदी निष्फळ आहेत हे हिंदु लोकांनी विसरू नये. आम्ही वर सांगितलेच आहे की, अस्पृश्य वर्गाने ख्रिश्चन किंवा मुसलमान धर्माचा स्वीकार केला तर त्यांचे राजकीय हक्क नष्ट होतील. परंतु दुसऱ्या एखाद्या कोणत्या तरी धर्माचा जर त्यांनी अंगीकार केला तर त्यांच्या कोणत्याही हक्काला बाध येणार नाही. परंतु महत्त्वाचा मुद्दा असा की, अस्पृश्य वर्गाने ख्रिश्चन किंवा मुसलमान धर्माचा स्वीकार केला तर शेड्युल्ड कास्टच्या गटातील जाती म्हणून त्यांचे जे हक्क़ असतील त्यांना ते जरी मुकले तरी ख्रिस्ती किंवा मुसलमान लोकांना जे हक्क असतील ते त्यांना प्राप्त होतील. कारण ख्रिस्ती किंवा इस्लाम धर्मात प्रवेश केलेल्या नव्या लोकांना मुळच्या ख्रिश्चन किंवा मुसलनान लोकांना कायद्याने जे हक्क दिलेले आहेत ते मिळू नयेत असे कोणालाही म्हणता येणार नाही आणि जर इस्लाम आणि ख्रिश्चन धर्मात गेलेल्या नवीन लोकांना राजकीय हक्क देण्याची व्यवस्था करावयाची असेल तर सामान्य मतदार संघातील शेड्यूल्ड कास्टच्या गटाला मूळच्या ज्या जागा देण्यात आल्या असतील आणि ज्या त्यांच्या धर्मांतराच्या कारणाने रिकाम्या पडल्या असतील त्या जागा ख्रिश्चन किंवा मुसलमान मतदार संघाला जातील. नव्हे ख्रिस्ती व मुसलमान लोक आपली लोकसंख्या वाढली म्हणून हिंदूंच्या उरावर बसून त्या जागा घेतील.

प्रत्येक हिंदुमात्राने हे ध्यानात ठेविले पाहिजे की, ज्या जागा आज अस्पृश्य वर्गाला देण्यात आलेल्या आहेत, त्यांची परतवणी कधीच होणार नाही व त्या हिंदू लोकांना कधीच मिळणे शक्य नाही. जमिनीबरोबर त्या जमिनीसंबंधीचे करारमदार ज्याप्रमाणे कायम असतात त्याचप्रमाणे अस्पृश्य जातीला ह्या मिळालेल्या जागा जातीय प्रतिनिधित्व अस्तित्वात असेपर्यंत त्या जातीच्याच ताब्यात राहातील. ते जिकडे जातील तिकडे त्यांच्या मागे त्या जातील. म्हणून अस्पृश्य हिंदूंनी अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांच्या बाबतीत जे धोरण स्वीकारले आहे ते अगदीच निर्बुद्धपणाचे आहे. धर्मांतराच्या चळवळीला थोपवून धरण्याला हिंदू लोकांच्या या धोरणाचा काहीच उपयोग होणार नाही. त्या धोरणाने अस्पृश्य वर्गाला मिळालेल्या जागा त्यांच्या हाती लागू शकणार नाहीत. त्यांच्या या धोरणाचा एकच निश्चित परिणाम होईल तो असा की, गुलामाच्या मनात आपल्या धन्यासंबंधाने जी तिरस्कार आणि संतापाची भावना वसत असते तशाच प्रकारची भावना हिंदुलोकांसंबंधाने अस्पृश्यांच्याही मनात उत्पन्न होईल.

अस्पृश्य वर्गाने हिंदू लोक आणि त्यांचा हिंदुधर्म यांचे बरोबर असलेला संबंध सर्वस्वी तोडावा असाच सल्ला आम्ही अस्पृश्य वर्गाला दिलेला आहे. हिंदू लोकांचे व त्याचप्रमाणे त्यांच्याबरोबर ज्या जातींचे राजकीय भवितव्य निगडित झाले आहे, त्यांचे कल्याण व्हावे म्हणून त्यांनी कोणते धोरण ठेवणे इष्ट होईल हे सांगण्याची जबाबदारी आमच्यावर येऊ शकत नाही. परंतु या बाबतीत हिंदू लोकांच्या हातून इतकी अक्षम्य चूक घडत आहे की, त्यांनी आपले मार्ग बदलले नाहीत तर त्यांच्या सर्वस्वाचा नाश झाल्याशिवाय रहाणार नाही, अशी आम्हाला भीती वाटते. केवळ या भावनेमुळेच आम्हांला हिंदुलोकांना दोन उपदेशाचे शब्द सांगावेसे वाटतात आणि ते त्याचा शांत चित्ताने व निर्विकल्प मनाने विचार करतील अशी आम्ही आशा बाळगतो. सामाजिक जीवन अविरोध आणि सुरक्षितपणे चालण्यासाठी एक मूलभूत तत्त्व सर्वमान्य झाले पाहिजे. ते तत्त्व हे की, ज्यांच्याजवळ माया आहे त्यांनी ती ज्यांच्याजवळ नाही त्यांच्याबरोबर राहून खाण्यास शिकले पाहिजे. पुरातन काळापासून जगाच्या इतिहासात ज्या अनेक बंडाळ्या घडून आल्या त्यांचा विचार केल्यास असे आढळून येईल की, जेव्हा जेव्हा समाजातील सत्ताधारी लोकांनी आपल्या हाती असलेली सत्ता आणि अधिकार यांची सत्ताहीनांबरोबर वाटणी करण्याचे नाकारले, त्या त्या वेळी क्रांती घडून आली. क्रांतीचा मार्ग रोखून धरण्याचा फक्त एकच उपाय आहे आणि तो म्हणजे समाजात सत्ता आणि अधिकार यांची योग्य प्रकारे वाटणी करणे हा होय.

युरोप खंडातील कांही देशांत ज्याप्रमाणे क्रांत्या घडून आल्या त्याप्रमाणे इंग्लंड देशात क्रांती घडून आली नाही. युरोपमधील वरिष्ठ सत्ताधारी वर्ग (ARISTOCRACY) नाश पावला. परंतु इंग्लंडमधील वरिष्ठ सत्ताधारी वर्ग (ARISTOCRACY) अद्याप जिवंत आहे. याचे कारण इतकेच की, इंग्लंडमधील वरिष्ठ सत्ताधारी वर्गाला आपल्या हाती असलेली सत्ता आणि संपत्तीची वाटणी केली पाहिजे, हे माहीत आहे आणि त्याप्रमाणे तो वर्ग ती वाटणी करीत असतो. आमच्या हिंदुमित्रांना आम्हांला एवढीच सूचना द्यावयाची आहे की, भूतकाळात सत्ताधारी वर्गांनी केवळ स्वार्थ बुद्धीला बळी पडून सत्ता आणि संपत्तीचा सारा वाटा आपल्याच पदरांत पाडून घेण्याची अभिलाषा धरली व शेवटी आपल्या सर्वस्वाचा नाश करून घेतला. तीच गत हिंदूंची झाल्याशिवाय राहणार नाही. (जनता जोड अंक, २५ जुलै व १ ऑगष्ट १९३६, पा. ९-१२)

अग्रलेख : जनता, ता. २५ जुलै व १ ऑगष्ट १९३६.

उद्‌धृत, खैरमोडे, खंड ७ वा, पृ. ३३-४९.

७९

महाराज–उत्कृष्ट न्यायाधीश

सावंतवाडीचे लोकप्रिय राजेसाहेब श्रीमंत बापूसाहेब महाराज यांच्या अकाली मृत्यूची शोकजनक बातमी वाचल्यावर मला धक्काच बसला. राजेसाहेबांचे निधन ज्या परिस्थितींत झालें त्या दुर्दैवी परिस्थितीचे वर्णन शब्दांनी करतां येणार नाही !

महाराजांच्या सहवासाचा दीर्घ कालपर्यंत लाभ घेण्याचे भाग्य माझ्या वांट्याला आलें नाही. गरिबांचा कैवाळू आणि एक कर्तव्यनिष्ठ व प्रागतिक विचारांचा संस्थानिक हा त्यांचा लौकिकच माझ्या परिचयाचा होता. महाराजांचा प्रत्यक्ष परिचय करून त्यांच्याशी संबंध येण्याची संधि फक्त एकदांच मला मिळाली. तथापि या अल्प परिचयांतच महाराजांच्या अंगच्या कांही ढळक सद्‌गुणांची जी छाप माझ्या मनावर पडली, ती कधींही पुसून जाण्यायोगी नाही. सावंतवाडी संस्थानांतील पडदें गांवचे जमीनदार श्री. वराडकर यांच्या खुनाच्या खटल्यांत आरोपींचा वकील या नात्यानें महाराजांपुढें अपील चालविण्यासाठी मी गेलो होतो. तेवढाच माझा व त्यांचा संबंध आला होता. पण अपीलाचें काम महाराजांपुढें सतत तीन दिवस चालू होते आणि महाराज दुपारी ११ वाजल्यापासून सायंकाळी ५-३० वाजेपर्यंत अपीलांतील मुद्दे लक्षपूर्वक ऐकत बसत. मध्यंतरी जी अर्ध्या तासाची सुट्‌टी ते घेत असत, तेवढीच त्यांची विश्रांती. मोठमोठ्या नाणावलेल्या न्यायमूर्तींच्या अंगीही क्वचितच दिसेल अशा सावधान वृत्तीनें एका महाराजानें रोज सतत ६ तासपर्यंत वकिलांचा युक्तिवाद ऐकत बसावें, आणि मधून मधून एखाद दुसरा मार्मिक व मुद्देसुद प्रश्न विचारून आपली शंकानिवृत्ति करून घेण्याची कळकळ दाखववी हा अनुभव मला निःसंशय असामान्य असाच वाटला. अपीलाचें काम चालू असतां नुसती उभयपक्षांच्या वकिलांची भाषणें ऐकतच हे स्वस्थ राहिले नव्हतें; तर आपल्या सूक्ष्म व चिकित्सक दृष्टीला जेथें जेथें शंकास्थळें दिसतील, तेथे तेथें या शंकांचा खुलासा विचारून वकिलांकडून आपले पूर्ण समाधान त्यांनी करून घेतलें, आणि त्यांनी काढलेल्या त्या शंका व घेतलेले आक्षेप बुद्धिमत्तासूचक होते.

महाराजांनी नंतर आपले जजमेंट तयार केलें आणि या जजमेंटवरूनही त्यांच्या श्रेष्ठ बुद्धिमत्तेची खात्री मला पटली. हे जजमेंट अव्वल दर्जाचे होते व सर्व मुद्यांचा विचार त्यांत अत्यंत खुलासेवार रीतीनें करण्यांत आला होता. महाराज

जरी स्वतः कायद्याचे पढीक पंडित नसले, तरी कायद्यांच्या मुद्यांवरची त्यांची पकड नावाजण्याजोगी होती व योग्य निर्णय ठरविण्याची वृत्ति त्यांच्या अंगी उपजतच होती हें या जजमेंटवरून माझ्या प्रत्ययास आले.

तथापि यापेक्षांही जर कोणत्या गोष्टींचे मला त्यावेळी अधिक नवल व कौतुक वाटलें असेल, तर ते महाराजांच्या धर्मशीलतेचें ! कामाला सुरवात करतांना ते नेहमीं दोन्ही हात जोडून व डोळे बंद करून परमेश्वराचें नामस्मरण करीत व तोंडानें कांही तरी पुटपुटत असत. आपल्या कर्तव्याची जाणीव सदैव चित्तांत बाळगून हें कर्तव्य उत्कृष्ट रितीनें पार पाडतां यावें म्हणून परमेश्वराची भाविकपणें करूणा भाकणारा असा पापभीरू न्यायप्रिय नृपति नृपमंडळांत एखादा तरी आढळून येईल काय ? अशा प्रकारच्या या थोर, कर्तव्यतत्पर व वंदनीय पुरुषांचे जीवितकार्य आकस्मिक रीतीनें मध्येंच कुंठित व्हावे हे, खरोखरच दुर्दैव म्हटलें पाहिजे. या दुर्दैवानें भारावून गेलेल्या राजकुटुंबाबद्दल मला अत्यंत सहानुभुति वाटते, व महाराजांच्या प्रजेला त्यांच्याबद्दल अभिमान, आदर व प्रेम वाटत असें हें मला माहित आहे. ही प्रजाही आपल्या खऱ्या हितकर्त्याला मुकल्याबद्दल मला खेद होतो. परमेश्वर बापूसाहेबांच्या आत्म्याला चिरशांति देवो !

विविध वृत्त : ता. ११ जुलै १९३७

८०

रॅम्से मॅक्डोनल्ड व हिंदुस्थान

''मॅक्डोनल्ड आपण फिरून आपल्या पक्षाला जाऊन कां मिळत नाही ?'' – एक वर्ष झाले; गेल्या नोव्हेंबरांत लंडनमध्यें माझा मुक्काम असतां मी रॅम्से मॅक्डोनल्ड यांच्या भेटीस गेलो असतां त्यांना मी वरील प्रश्न केला होता. माझा प्रश्न ऐकून क्षणभर विचार करीत त्यांनी खिन्नपणें उत्तर दिले :

''हं, तें खरंच; पण त्यांनी मला परत आपल्यांत घेतलं पाहिजे ना ? ''

ब्रिटिश मजूर पक्षाचा स्वतः मी एक अभ्यासू आहें व त्या पक्षाच्या उत्कर्षापकर्षाकडे मी अगदी आस्थेनें लक्ष देत आलों आहे. या पक्षांत १९३१ साली जी फूट पडली, तिच्यामुळें माझ्या मनावर एक प्रकारचा खेदजनक परिणाम झाला व या पक्षाला नांवारुपाला आणण्यास ज्याचे कष्ट कारणीभूत झाले, इतकेंच नव्हें तर या पक्षाचा जो केवळ प्राणदाताच होता, त्या रॅम्से मॅक्डोनल्ड यांच्या हातून खुद्द स्वतःला व त्याच्या पक्षाला विनाशक ठरणारें वर्तन कसें पडलें, याचें मला राहून राहून आश्चर्य वाटत होते. १९३१ सालचें मजूर पक्षावर आलेलें गंडांतर जबरदस्त होते. यांत शंकाच नाही. या गंडांतरानें असें स्पष्ट दाखवून दिलें कीं, '' भांडवलवाला वर्ग हा हातीं '' राजकीय सत्ता नसतांही बहुसंख्यांक श्रमजीवि वर्गाला राज्यकारभार चालवूं देण्याच्या कामी सहज प्रतिबंध करूं शकतो !

पेंच प्रसंग

ग्रेटब्रिटन सधन असतांही १९३१ सालीं ब्रिटिश अंदाजपत्रकांचें खर्चाचें पारडें बेसुमार जड झालें होतें. या अंदाजपत्रकांतील खर्चाच्या दोन प्रमुख बाबींनी उत्पन्नाचा बराच मोठा लचका तोडला होता. महायुद्धाच्या खर्चासाठीं काढलेल्या कर्जाच्या डोंगरापायीं द्यावे लागणारें भरमसाट व्याज ही त्यांपैकी एक बाब व बेकारीच्या कायद्याखाली (अनएम्प्लॉयमेंट इन्शुअरन्स ॲक्ट) बेकार मजुरांना द्यावा लागणारा भत्ता ही दुसरी बाब : या अवाढव्य खर्चाच्या पायीं भांडवलदार वर्गावर करांचें जें जड ओझें पडलें होतें, ते हलकें करण्यासाठीं तो वर्ग खर्चातच काटाकाट करायला फार उत्सुक झाला होता. आपणावर शेकणार

नाहीं असा काटकसरीचा उपाय योजण्याचें या भांडवलवाल्यांनी ठरविलें होतें ! युद्धकर्जाच्या व्याजांत काटाकाट करण्याचें भांडवलदारांच्या मनांत नव्हतें; कारण या व्याजाचें पैसे एवीतेवीं शेवटी त्यांच्याच खिशांत जाणार होते. यामुळें त्यांनी अनएम्प्लॉयमेंट इन्शुअरन्स अॅक्टखाली बेकार कामगारांना द्यावयाच्या भत्त्यांत कापाकापी करून अंदाजपत्रकाची तोंडमिळवणी करण्याची तोड काढली. '' पण ही तोड उघडपणें अंमलांत आणणें शक्य कोठें होते'' तेव्हा त्यांनी आपला विचार एका अप्रत्यक्ष, पण तितक्याच रामबाण मार्गाने अंमलांत आणण्याचा घाट घातला. आतां इंग्लिश जमाबंदी खात्याची अशी एक वहिवाट आहे कीं, कांही वेळा खजिन्यांत प्रत्यक्ष खर्चासाठी लागणाऱ्या रकमेपेक्षां बरीच मोठी रक्कम पडून असते. कांही कांही वेळां याच्या उलट परिस्थिति असते. म्हणजे खजिन्यातल्या आद्याच्या पैशांपेक्षां खर्चाचें प्रमाण वाढते. अशा परिस्थितीमुळें खजिना रिता पडला आहे अशा प्रसंगी सरकार खर्चाच्या बाबी भागविण्यासाठीं बँकांकडून कर्ज काढते. ''वेज अँड मीन्स'' देणीं या नांवानें सरकारचा हा व्यवहार महशूर आहे. लंडनच्या भांडवलवाल्यांना या व्यवहाराची म्हणजे पर्यायानें सरकारच्या वर्माची बरोबर माहिती होती. तिचा फायदा घेऊन लंडनमधील भांडवलदारांनी मजूर सरकारवर कांही शर्ती लादून आपणासाठीं सवलती उकलण्याचें ठरविलें. या शर्ती अशा कीं, सरकारला बँकांकडून हातउसनें कर्ज (वेज अँड मीन्स अॅडव्हान्सिस) हवे असल्यास सरकारनें अनएम्प्लॉयमेंट इन्शुअरन्स अॅक्टखाली मजुरांना मिळणाऱ्या तनख्यांत काटाकाट केली पाहिजे. या अटीमुळें मजूर सरकारची इकडून आग व तिकडून फोंफाटा अशी त्रेधा उडून तें कैचीत सांपडले. हाती पैसा नसल्यामुळें एक दिवाळखोर ठरावें, नाही तर आपल्याच हातानें बेकारांचा भत्ता कमी करून आपल्याच पायांवर धोंडा पाडून घ्यावा या खेरीज सरकारला तिसरा उपाय राहिला नाही. अशा परिस्थितींत कोणत्या उपायांचा स्वीकार करावा याबद्दल मजूर प्रधान मंडळांत एकमत होईना. रॅम्से मॅक्डोनल्ड, स्नोडन, जिमी थॉमस अशा तिघांचे यावेळीं असें मत पडलें कीं, बेकारांचा भत्ता कमी करावा व अधिकाराला चिकटून राहावें. पण हेंडरसन प्रभृति इतर मजूर मंत्र्यांचें मत यावेगळें पडलें. त्यांचें म्हणणें असें होते कीं, बेकार तनखा कमी करूं नये व मजूर मंत्र्यांनी मंत्रिमंडळाचा राजिनामा देऊन हुजूर पक्षाला अधिकारावर येऊं द्यावें व बेकार भत्ता कमी करण्याचें पाप करुन अंदाजपत्रकाची तें सरकार तोंडमिळवणी करणार असलें, तर त्याची जबाबदारी त्यांच्या वांट्याला जाऊं द्यावी.

कोडे उलगडत नाही

या मतभेदाच्या संबंधात मला निःसंशयपणें असेच वाटतें कीं, हेंडरसन प्रभृतीचेंच म्हणणें रास्त होते व रॅम्से मॅक्डोनल्ड व त्याचें सोबती यांचा विचार गैर होता. बेकारांचा तनखा कमी करण्याचें स्वतः होऊन पाप करणाऱ्या एखाद्या मजूरपक्षाला प्रधानमंडळ बनविण्याइतकें अफाट संख्याबळ निवडणुकींत मिळविण्याची कधी तरी शक्यता आहे काय ? रॅम्से मॅक्डोनल्ड यांनी त्या वेळीं ज्या धोरणाचा स्वीकार केला, तसा तो करण्यास त्यांना कोणतीं कारणें झाली असावीं याची मला अजूनही फोड झालेली नाहीं. पण त्याबरोबरच लक्षांत घेण्यासारखी गोष्ट ही कीं, त्या सालच्या गंडांतरानें मजूरपक्षाला रॅम्से मॅक्डोनल्ड यांची किती निरतिशय आवश्यकता होती हेंही दिसून आलें. हेंडरसनप्रभृति मंत्र्यांनी बेकार तनख्यांत कापाकापी करण्याला कसून विरोध केला; पण असें असूनही खुद्द त्यांना आपण निवडणुकींत यशस्वी होणार नाही असेंच वाटलें. या विलक्षण घटनेची फोड करणें कठीणच आहे. तथापि माझा निष्कर्ष या बाबतींत असा आहे कीं, ·

> कोणत्याही राजकीय पक्षाला कार्यक्रम, शिस्त व साधनसामुग्री यांची जितकी गरज असते, त्याहूनही त्याला आपल्या कर्तृत्वानें लोकमताला भारून टाकणाऱ्या नेत्याची अधिक गरज असते.

मजूरपक्षाचा १९३१ च्या निवडणुकीनंतर जो बोजबारा उडाला, त्याचें कारण हेंच कीं, रॅम्से मॅक्डोनल्ड यांच्या पक्षांतरामुळें रिकामी पडलेली जागा भरून काढण्याला मजूरपक्षांत एकही लायक पुढारी नव्हता. मॅक्डोनल्डमुळेंच मजूरपक्ष उभा होता; ते जातांच तो कोसळला !

न्याय्य पण अनुदार धोरण

'मजूरपक्ष आपल्याला परत घेणार नाही', असे मॅक्डोनल्ड यांनी माझ्यापाशीं उद्‌गार काढले, तेव्हां मजूरपक्षाचें हें धोरण आत्मघातकी आहे असेंच मला वाटल्याखेरीज राहिलें नाही. त्या पक्षाचें तें धोरण न्याय्य असलें, तरी उदारपणाचे होते असें म्हणतां यावयाचें नाही. रॅम्से मॅक्डोनल्ड यांचा आपल्या सहकाऱ्यांशी झालेला हा कांही पहिलाच बेबनाव नव्हता. १९१४ सालीही ते आपल्या सहकाऱ्यांपासून असेच फुटले होते. भांडवलवाल्यांनी स्वार्थ साधण्यासाठी निर्माण केलेलें एक युद्ध या दृष्टीकोनानें ते महायुद्धाकडें पाहात होते. व त्यामुळेंच त्यांचा महायुद्धाला भयंकर विरोध होता. पण मजूरपक्षातील त्यांच्या इतर सहकाऱ्यांना युद्ध कोणी निर्माण केलें अथवा तें कोणाचें हित साधणार याचा विचार करण्याची ती वेळ नव्हें असें वाटत होते. आपल्या राष्ट्राच्या भवितव्यावर घाला पडत आहे, तेव्हां मजूर व भांडवलवाले यांनी हातांत हात घालून एकजुटीने पहिल्यानें देशाच्या स्वातंत्र्याचें रक्षण करावें असें त्या लोकांचें म्हणणें होते.

केवळ शास्त्रोक्त मजूर तत्वांच्या दृष्टीनें विचार करतां मि. मॅक्डोनल्ड यांची विचारसरणी रास्त होती व त्यांच्या विरोधकांची विचारसरणी मजूर मतद्रोहाची होती असेंच म्हणावे लागेल. तथापि महायुद्ध संपल्यावर मजूरपक्षीय जेव्हा आपली फिरून संघटना करण्यासाठी एकत्र आले तेव्हां मॅक्डोनल्ड यांनी आपल्या त्या साऱ्या सोबत्यांना उदार मनानें क्षमाच केली व मजूरपक्षाची पुनर्घटना करण्यासाठी ते त्यांच्यातच पुन: सामील झाले. मॅक्डोनल्ड यांचा हा उमदेपणा पाहिला म्हणजे मला तर असेंच म्हणावेंसें वाटते कीं, मॅक्डोनल्ड यांना १९३१ साली वाळींत टाकणाऱ्या त्यांच्या सोबत्यांनी त्यांना या वेळीं क्षमा करून आपल्या मनाचा मोठेपणा दाखविणें रास्त होते.

स्वार्थ ?

मि. मॅक्डोनल्ड यांच्या वागणुकीनें व धोरणानें मजूर पक्षांत जी फाटाफूट घडून आली, ती त्यांच्या कार्याला काळीमा आणणारी झाली असें मानण्यांत येते. ज्या मजूरपक्षाला त्यांनी जन्म दिला व ज्याचें त्यांनी संवर्धन केले, त्या पक्षाच्या नाशाला अखेरीस ते स्वत:च कारण झाले ही मॅक्डोनल्ड यांच्या हातून अक्षम्य चूक घडली यांत शंकाच नाही. त्यांच्या या कृत्याचा संबंध त्यांचे टीकाकार कसेंही करून मुख्य प्रधानकीला चिकटून राहण्याच्या त्यांच्या स्वार्थी महत्वाकांक्षेला लावतात. टीकाकारांचें हें म्हणणें योग्य अथवा अयोग्य आहे असें म्हणण्याला कोणतेंच साधन उपलब्ध नाही. पण यासंबंधात मला मात्र एका सद्‌गृहस्थाकडून असे ठामपणें सांगण्यांत आले कीं, मॅक्डोनल्ड यांनी मजूरपक्षाशीं जी प्रतारणा केली ती कांही त्यांच्या स्वत:च्या वैयक्तिक स्वार्थासाठी नव्हती, तर ती केवळ हिंदुस्थानचेच हित साधण्यासाठी होती ! ही माहिती देणारे गृहस्थ मॅक्डोनल्ड यांचे निकटस्नेही व सहकारी होते. या सद्‌गृहस्थांच्या सांगण्यावरून असें दिसतें की, आपण मागें पाय घेतल्यास कॉंझर्वेटिव पक्ष सत्ताधीश होईल व तो हिंदी सुधारणांची योजना मध्यवर्ती जबाबदारी देण्याइतकी विस्तृत होऊं न देतां ती सायमनकमिशनच्या शिफारशीप्रमाणें स्वायत्ततेपुरती मर्यादित करून ठेवील अशी रॅम्से मॅक्डोनल्ड यांना भीती वाटत होती.

गांधींचे पत्रक

हे कारण संयुक्तिक होते असें मी तरी म्हणणार नाही. तथापि इतकें खरें कीं दुसऱ्या रा. टे. परिषदेच्या वेळी म्हणजे गांधी ज्या अधिवेशनाच्या वेळी रा. टे. परिषदेत हिंदुस्थानची फक्त प्रांतिक स्वायत्ततेवरच बोळवण करण्याच्या बऱ्याच

कारवाया चालल्या होत्या व त्या सर्व मॅक्डोनल्ड होते म्हणूनच फसल्या. दुसऱ्या रा. टे. परिषदेच्या वेळी कांहीं धूर्त ब्रिटिश मुत्संद्यानी गांधींना मथवून त्यांच्याकडून आम्हांला प्रांतिक स्वायत्तता दिली म्हणजे भरपूर झाले. मग आणखी कांही नको अशा आशयाचें कसें प्रसिद्ध करविले हें कैक हिंदी पुढाऱ्यांना ठाउक असेलच. या अचरट मागणीला विरोध करण्यासाठीं बाकीच्या हिंदी प्रतिनिधिंनाही एक पत्रक काढून '' हिंदी लोक निवळ प्रांतिक स्वायत्ततेला राजी नाहीत '' असें तेव्हा जाहीर करावें लागलें होते, व त्याही पत्रकावर सही करण्यास गांधींना भाग पाडले होते. हा इतिहास पुष्कळांच्या स्मरणांत असेलच पण जनतेच्या कानापर्यंत न पोहोचलेली अशी दुसरीही एक महत्वाची घटना त्यावेळी घडून आली होती. ती अशी कीं, हिंदुस्थानला सायमन साहेबांच्या शिफारशींबाहेर एक तसूभरही जागा देण्यास तयार नसलेल्या कॉन्झर्वेटिव् पुढाऱ्यांनी गांधींच्या प्रांतिक स्वायत्ततेच्या मागणीला घट्ट चिकटून राहून इतर प्रतिनिधींनी काढलेल्या दुसऱ्या पत्रकाची वास्तुपुरस्त करण्याचेही नाकारलें. आणि असें करण्यास त्यांनी कारण काय दाखवलें, तर म्हणे हिंदुस्थानांत एकटें गांधींच काय तें मानले जातात ! इतरांना तेथें कोणी पुसत नाही : गांधींच्या त्या अचरट पत्रकापासून हिंदुस्थानचा त्या वेळी जर कोणी ब्रिटिश मुत्सद्यांने बचाव केला असेल, तर तो मॅक्डोनल्ड यांनीच ; दुसऱ्या कोणीही नव्हे.

ब्रिटिश मंत्रिमंडळानें अखेरीला गांधींच्या पत्रकाचा पुरा फायदा घेउन आपली शेवटची योजना निश्चित करण्यापूर्वी रा. टे. परिषदेला बोलविलेल्या निरनिराळ्या प्रतिनिधींच्या मुलाखती घेऊन त्यांचे विचार अजमावण्याचें ठरविले. अशा मुलाखती घेण्यासाठीं त्यावेळी मि. मॅक्डोनल्ड सर सॅम्युअल होअर व लॉर्ड संकी या तिघांची कमिटी नेमण्यांत आली व या कमिटीकडून प्रतिनिधींच्या भेटी घेऊन, गांधी म्हणतात त्याप्रमाणें हिंदुस्थान फक्त प्रांतिक स्वायत्तता स्वीकारायला तयार होईल कीं काय याचा अंदाज घेण्यांत आला. या कमिटीने किती प्रतिनिधींच्या मुलाखती घेतल्या हें मला निश्चित ठाऊक नसलें, तरी ना. आगाखान, सर तेजबहादूर सप्रू व मी अशा आम्हा तिघांच्या मुलाखती या कमिटीनें घेतल्या व आम्ही कमिटीला असें निक्षून सांगितलें कीं, हिंदुस्थान केवळ प्रांतिक स्वायत्ततेला तर राजी होणार नाहींच, पण मध्यवर्ती जबाबदारी जर देण्यांत आली नाही, तर हिंदुस्थानांत शांततेची आशा करावयास नको, याचीही ब्रिटिश मंत्रिमंडळाने खात्री बाळगावी. गांधींनी कॉन्झर्वेटिव् पक्षाबरोबर केलेले संगनमत जर यशस्वी झाले असते, तर हिंदुस्थानांत कल्लोळ माजला असता यांत तिळमात्र शंका नाही. जातां जातां यासंबंधात मला ना. जयकर यांनी या विधिघटनेसंबंधांत काढलेले मननीय उद्गार येथें नमूद करावेसें वाटतात :

गांधींचा पुतळा

" काय हो आंबेडकर " जयकर म्हणाले, " या कॉन्झर्वेटिवांनी गांधींचा पुतळा उभारल्याचें दृष्य लवकर दिसेल असें तुम्हांला नाही वाटत ? "

ना. जयकर यांचे म्हणणें अक्षरशः खरें होते. गांधी कॉन्झर्वेटिव् पक्षावर जो उपकार करूं पाहत होते, तो त्यांनी कृतज्ञतेनें गांधींचा पुतळा उभारण्याच्याच मासल्याचा होता. पण हा प्रसंग मि. मॅक्डोनल्ड यांच्यामुळेंच टळला. त्यांनीच त्या वेळी आमच्या या महात्म्यापासून हिंदुस्थानच्या भवितव्याचा संभाळ केला. ज्या हिंदी प्रतिनिधींचे मॅक्डोनल्डविषयीं प्रतिकूल मत बनलें आहे, त्यांनी या घटनेवर अवश्य विचार करावा व मगच आपलें मत बनवावें. कांहीं हिंदी लोकांचा मॅक्डोनल्ड यांच्या धोरणाविरूद्ध मोठा आक्षेप आहे. परंतु तो तसा कां असावा हें मला कळत नाही. फेडरेशनची योजना व जातीय निवाडा या दोन पापाचें खापर मि. मॅक्डोनल्ड यांच्या डोक्यावर नेहमी फोडण्यात येतें. पण माझ्या मतें तर या दोहोंचाही दोष मॅक्डोनल्ड यांच्याकडे पोहोचत नाही. कारण फेडरेशनला सध्यां जें विकृत स्वरुप आलें आहे व घटनाकारानें ज्यावर आतां कायदेशीर शिक्कामोर्तब केलें आहे, त्याची सारी जबाबदारी गांधीं, सप्रू व शास्त्री या तिघांवरच पडते. या फेडरेशनच्या योजनेंतील एक मोठी अनिष्ट बाब ही कीं, जबाबदार राज्यपद्धति अस्तित्वांत येणे-न येणें हे संस्थानिक फेडरेशनमध्यें दाखल होण्या-न-होण्यावर अवलंबून आहे. या ग्यानबाच्या मेखेमुळेंच ब्रिटिश हिंदुस्थानला संस्थानिकाशी कशाच बाबतींत सौद्याची भाषा करतां येत नाहीं व त्यांना संस्थानिकांच्या मर्जीवर अवलंबून राहावें लागतें. वास्तविक संस्थानिकांच्या संबंधांत ब्रिटिश हिंदुस्थानची अशी कुचंबणूक होतां नये होती. परंतु ती झाली खरी आणि त्याला जर कोणतें एक कारण असेल, तर तें--

> मॅक्डोनल्ड यांच्या कारवाया हे नव्हे, तर हिंदुस्थानच्या उपरोक्त विश्वासू पुढाऱ्यांनी ब्रिटिश हिंदुस्थानचें सारें हितसंबंध बुद्धिपुरस्सर संस्थानिकांना सोडून दिलें, हेंच होय.

रा. टे. परिषदेच्या ब्रिटिश प्रतिनिधींना मध्यवर्ती जबाबदारी स्थापन करण्याच्या बाबीसंबंधांत, मध्यवर्ति कायदेमंडळांतील ब्रिटिश हिंदुस्थानच्या प्रतिनिधींच्या आत्यंतिकपणाला आळा घालणारी कांही तरी व्यवस्था अथवा बंधन मध्यवर्ति घटनेंत आणावें असें वाटत होते. असा आळा घालणारी एखादी योजना हवीच असल्यास ती कोणत्या तऱ्हेनें अस्तित्वांत आणावी यासंबंधानें मी एक योजना पुढें मांडली होती. संस्थानिकांच्या प्रतिनिधीऐवजीं, मध्यवर्ती कायदे मंडळांत एक सरकारनियुक्त गट निर्माण करण्यांत यावा ही ती योजना होय. अशा

सरकारनियुक्त गटांमुळें दोन उद्‌देश साधले असते. एक तर ब्रिटिश प्रतिनिधींची नियंत्रणाची मागणी पुरी झाली असती, व दुसरें म्हणजे मध्यवर्ती जबाबदारीची स्थापना संस्थानिकांच्या येण्या-न-येण्यावर अवलंबून राहती ना. शिवाय त्यामुळें मध्यवर्ति जबाबदारीच्या स्थापनेबद्‌दल धास्ती न राहिल्यामुळें ब्रिटिश हिंदुस्थानला संस्थानिकाशी बरोबरीच्या नात्यानें सवलतींच्या बाबतींत फायदेशीर सौदा पाडतां आला असता व संस्थानी प्रजेलाही कदाचित् आपले प्रतिनिधी निवडण्याचा हक्क, यापुढे साधणार नाहीं, इतक्या उत्तम रीतीनें मिळवून देतां आला असता. मी मांडलेली ही योजना अशा रीतीनें ब्रिटिश प्रतिनिधींनी मांडलेल्या व आतां घटनाकायद्यांत नमूद झालेल्या योजनेपेक्षा भिन्न, पण तितकींच संपूर्ण कशी होती हें यावरून दिसून येईल.

मॅक्डोनल्ड दोषी नाहींत

माझ्या या योजनेचा स्वीकार झाला नाहीं हें खरें; पण तो मि. मॅक्डोनल्ड यांच्या उपेक्षेमुळें झाला असें मात्र मी मुळींच म्हणणार नाही तर सप्रू, शास्त्री व गांधी या ब्रिटिश हिंदुस्थानच्या तीन प्रतिनिधींनी या योजनेला आपला पाठिंबा दिला नाही म्हणूनच माझी सूचना फेटाळली गेली ! सर तेजबहादूर सप्रू यांनी सरकारनियुक्त गटापेक्षा संस्थानिकांच्या प्रतिनिधींच्या योजनेला आपली पसंती दर्शविली हे पाहून मला आश्चर्यच वाटले; सप्रूंसारख्या पुढाऱ्यानें हवा तेव्हां नष्ट करतां येण्यासारख्या सरकारनियुक्त गटाऐवजी संस्थानिकांच्या कायम होऊन बसणाऱ्या गटाला मान्यता द्यावी, याला काय म्हणावे ? मला तरी त्यांच्या या विचारसरणीचे अद्यापि कोडेंच आहे. तेव्हा मला असें म्हणावेसें वाटतें कीं,

फेडरेशनच्या चालू घाणेरड्या स्वरुपाला जर खरोखर कोण जबाबदार असतील तर ते हे आमचे हिंदी देशभक्तच होत. मॅक्डोनल्ड नव्हेत.

सर मॅक्डोनल्ड यांच्या डोक्यावर कम्युनल अवॉर्डचेंही खापर फोडलें आहे. पण या बाबतींतही त्यांना मुळींच दोष लागू होत नाही. असें मी ठांसून म्हणेन. कम्युनल अवॉर्डमधील अनिष्ठ योजनेला खुद्द हिंदी लोक, विशेषतः हिंदुच जास्त कारण आहेत. माझें हे विधान अनुदारपणाचें दिसेल खरें; पण खरें सांगायचें तर जगांतील इतर मिरासदारांना (Haves) हे कळतें, ते हिंदुंना अद्यापि कळत नाहीं अशी माझी प्रामाणिक समजूत आहे. एखादी मिरास आपल्यापुरतीच राखून ठेवायची असती, तर तिच्यांत इतरांना भागीदार करून घेतलें पाहिजे; इतरांना त्यांतील वांटा दिला नाही, तर सगळेंच गमावण्याची नक्की पाळी येते असा रोजच्या व्यवहाराचा अनुभव आहे. रा. टे. परिषदेत हिंदुंचें जातीय तडजोडीसंबंधांचें धोरण अथपासून इतिपर्यंत मूर्खपणाचे होते. या धोरणांत

विधायक अशी कसलीच बाजू नव्हती. हिंदूंनी उठल्या-सुटल्या हाका मारीत बसण्याइतकें त्या अवॉर्डांत आहे तरी काय याचा मला अजून बोध झालेला नाही. अवॉर्डला आमचा विरोध आहे असें सर्वसाधारणपणें सर्वच म्हणतात; पण त्यांत अमुक एक बाब हानिकारक आहे, असें मात्र स्पष्टपणें एकानेंही या घटकेपर्यंत दाखवून दिलेलें नाही. माझ्या स्वतःच्या दृष्टींने अक्षम्य व असमर्थनीय दिसणारी अशी कम्युनल अवॉर्डांत एकच बाब आहे. ती ही की, हे अवॉर्ड अल्पसंख्याकांचा विरोध असताही कांही कांही प्रांतांत बहुसंख्यांक वर्गाला, कायदेशीर रीतीनें स्वतंत्र मतदार संघ देतें. पण असें होण्याला तरी जबाबदार कोण ? मी तर म्हणेन की, याबद्दलही स्वतः हिंदुच जबाबदार होत. स्वतंत्र मतदार संघाला आपण संमति देणार हाही असा विरोधी हेका हिंदु फक्त धरून बसले होते. पण येणें करून अवॉर्ड मुसलमानांना ग्राह्य व किंबहुना कमी हानिकारक होईल अशी एकही विधायक सूचना पुढें मांडण्याची त्यांनी तत्परता दाखविली नाही. कम्युनल अवॉर्डच्या त्रांगड्यांतून मार्ग काढण्याला एक युक्ति होती. परंतु हिंदुंना " देवाण घेवाण " करण्याचे तंत्र अवगत असेल तर ना या गोष्टी ? या जातीय प्रश्नाच्या गोंधळातून मार्ग काढण्याची माझी एक योजना होती व मीं ती ऑक्सफर्ड येथील प्रोफेसर मि. एडवर्ड टॉम्सन यांच्या कानावरही घातली होती. माझी ही योजना अशी कीं, स्वयंनिर्णयाच्या तत्वानुसार दर प्रांतांत अल्पसंख्यांक समाजाला, स्वतंत्र अथवा संयुक्त यांपैकी हवा तो मतदारसंघ निश्चित करण्याचा हक्क द्यावा; मतदारसंघाचा प्रश्न बहुसंख्यांक समाजावर सोंपविला जाऊं नये. माझी ही सूचना अंमलांत आली असती, तर कम्युनल अवॉर्डचें आज जे स्वरुप दिसतें आहे त्यापेक्षा ते निराळें दिसले असतें.

माझ्या योजनेचा फायदा

माझ्या या योजनेमुळें काय फायदा झाला असता तो पहा. पंजाब, बंगाल, सिंध व सरहद्द प्रांत या ठिकाणच्या अल्पसंख्य हिंदू समाजाच्या इच्छेमुळें या प्रांतांत संयुक्त मतदारसंघ अस्तित्वात आलें असते व इतर प्रांतांत अल्पसंख्यांक मुसलमानांच्या इच्छेनुसार स्वतंत्र मतदारसंघ स्थापन झालेले दिसले असते. माझ्या या योजनेमुळें सरसहा संयुक्त मतदारसंघ असावें ही हिंदु मागणी व सरसहा स्वतंत्र मतदार संघ असावे ही मुसलमानी मागणी या दोन टोकांच्या मागणीतील सुवर्णमध्य साधला गेला असता. प्रो. टॉम्सन यांना ही योजना पसंतच पडली इतकेंच नव्हे,

तर लगेच त्यांनी ती समजावून देण्यासाठी पं. मालवीयांकडे त्यांनी मला नेलें. पण दुर्दैवाची गोष्ट ही कीं, पं. मालवीयांनी आमची दारुण निराशा केली ! सर्वत्र संयुक्त मतदार संघ अस्तित्वांत आणण्याचा आपला हेका तें सोडीनांत व इतकंच नव्हे, तर ब्रिटिश सरकार हिंदुस्थानांत कोणत्याही जातीला स्वतंत्र मतदारसंघ बहाल करण्याची कारवाई करणार नाही, असें त्यांना भाविकपणें वाटत असल्यामुळें माझी सूचना पुढें मांडण्याचीही त्यांना आवश्यकता भासली नाही ! कम्युनल अवॉर्डसारखी ही हानिकारक बाब म्हणजे पं. मालवीयांसारख्या हिंदुंचा आपल्या प्रतिपक्षाचें कांही कांही चालूं न देण्याच्या दुराराध्य व हेकेखोर धोरणाचें व ब्रिटिश सरकारवरील दुधखुळ्या भक्तिचें दृश्यफल होय. हिंदु प्रतिनिधिंनी माझ्या सूचनेला पाठिंबा दिला असता तर, ब्रिटिश सरकारची तिला मान्यता मिळाली असती यात शंकाच नाही. ही खात्री बाळगण्यास मला दोन आधार आहेत. जॉ. पा. कमिटीच्या बैठकीहून येण्यापूर्वी लॉर्ड झेटलंडप्रभूति कमिटीच्या कांही सभासदांच्या मी भेटी घेतल्या होत्या व या भेटींत त्या त्या सभासदांना कम्युनल अवॉर्डमुळें होणारा अन्याय पटवून दिला होता. मी हा खटाटोप केला, तो अन्याय झालेल्या पक्षाबद्दल मला जिव्हाळा वाटत होता म्हणून नव्हे, तर केवळ न्यायप्रेमाखातरच मला तसें करावेंसे वाटलें आणि सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे मीं ज्यांच्या भेटी घेतल्या, त्यांपैकी बऱ्याच जणांनी माझ्या सूचनेला पाठिंबा दिला. लॉर्ड झेटलंड यांना तर माझी योजना मनापासून पसंत पडली व त्यांनी सुधारणाकायद्याचें बिल लॉर्डाच्यापुढे चर्चेसाठी येईल तेव्हां माझ्या सूचनेनुरुप कम्युनल अवॉर्डला उपसूचना आणण्याचें अभिवचन दिलें आणि खरोखरच त्यांनी पुढें तसें केलेही. येथे मॅक्डोनल्ड यांच्यासंबंधांत हें मुद्दाम नमूद केले पाहिजे कीं, त्यांना तर माझ्या योजनेची उपयुक्तता सर्वस्वी पटली होती, व

आपल्या स्वतःच्या खासगी उपयोगासाठीं त्यांनी मला कम्युनल अवॉर्डावर एक विस्तृत व खुलासेवार टांचण लिहून तयार करण्यासही सांगितले होते, त्यांच्या इच्छेप्रमाणें मी एक विस्तृत टांचण तयार करून ते त्यांना सादरही केले होते.

परंतु त्यानंतर त्यांनी मला पत्र लिहून त्या घटकेला आपल्याला कम्युनल अवॉर्डच्या बाबतींत कांही करतां येण्यासारखें कळविलें. त्यांना माझी योजना अमान्य होती असा याचा अर्थ नव्हे; तर माझी सूचना अंमलात आणल्यास त्या

योगानें मुसलमान रुष्ट होतील व हिंदुही असंतुष्ट राहतील असें वाटलें म्हणूनच त्यांनी त्यावेळी कांही न करण्याचें ठरविलें. माझ्या योजनेला पं. मालवीयांसारख्या हिंदूंचा पाठिंबा असता तर मि. रॅम्से मॅक्डोनल्ड यांनी ती अंमलांत आणण्याला आपली पराकाष्ठा केली असती याबद्दल मला मुळींच संशय नाही. हा सारा तपशील मी येथे देण्याचें कारण मॅक्डोनल्ड यांच्या धोरणाबाबत पसरलेल्या गैरसमजाचें शक्य तो वस्तुस्थिति सांगून निराकरण करावें हेंच आहे.

मॅक्डोनल्ड हे पक्षद्रोही असतील, पण ते हिंदुस्थानचें मित्र होते व त्यांनी आपला स्नेहभाव कृतींत उतरण्यासाठीं प्रामाणिकपणें खटपटही केली होती.

● ● ●

विविध वृत्त, ता. २१ नोव्हेंबर १९३७.

८१

गांधी महात्मा आहेत काय ?

ह्या प्रश्नाचा मला वीट येत आहे. याची कारणे दोन. एक, मी सर्वच महात्म्यांचा द्वेष्टा आहे आणि एकजात सर्व महात्म्यांना निकालांत काढावें असें माझें मत आहे. त्यांचें अस्तित्व हा कोणत्याहि राष्ट्राला शाप आहे, कारण ते बुद्धि आणि बुद्धिवाद यांच्या जागी अंधश्रद्धेची प्रतिष्ठापना करूं पहातात. दुसरें म्हणजे महात्मा या शब्दाचा नक्की अर्थ लोक काय करतात हें मला माहित नाहीं. आणि म्हणून या प्रश्नाचें उत्तर देणें अशक्य आहे. तरी पण " चित्रे " चे संपादक या प्रश्नाच्या उत्तरासाठी धरणें धरून बसल्यामुळें मी तें देण्याचा आटोकाट प्रयत्न करीत आहे.

सर्वसाधारण हिंदू माणसाच्या दृष्टीनें कोणत्याहि महात्म्याच्या ठिकाणीं तीन गोष्टींची आवश्यकता असते; त्याचे कपडे, त्याचें शील आणि त्याची शिकवण. त्यांपैकी कपडे हीच जर महात्म्याची कसोटी मानली तर, स्वतःच्या मोक्षासाठी दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहणाऱ्या अडाण्यांच्या मतें कदाचित मोहनदास गांधी महात्मा ठरतील. वेश बदलून महात्मा बनणें हिंदुस्थानांत फार सोपें आहे. सामान्य रीतीनें जीवन कंठणाऱ्या सामान्य मनुष्यानें कोणतेंहि चांगले कृत्य केलें तरी त्याच्याबद्दल हिंदुमात्राला कांहीं आदर असा वाटत नाही. पण तोच सामान्य मनुष्य कांही एक चांगले न करतां जर असामान्य म्हणजे विचित्र तऱ्हेने वागूं लागला तर तेवढ्याच कारणांमुळे तो संत बनतो, महात्मा बनतो, द्रष्टा बनतो. सुटाबुटाचा किंवा कोटधोतराचा साधा पोशाख करा, तुमच्याकडे लोक ढुंकूनहि पहाणार नाहीत. पण तेंच दिगंबर बना, जटा वाढवा, गटारांतलें पाणी प्या, लोक तुमच्या पायावर लोळण घेऊं लागतील. मग हिंदुस्थानांत गांधी " महात्मा " बनले यात काय नवल ? दुसऱ्या कोणत्याहि देशांत अशा महात्म्यांना दुःसह दिवाणा म्हणून लोकांनी त्यांची रेवडी उडविली असती !

गांधीची शिकवण पाहिली तर ती दिसायला मोठी गोंडस आहे. सत्य आणि अहिंसा ही उदात्त तत्वें आहेत, आणि गांधी त्यांचा जयघोष आधुनिक जगाला अपूर्व अशा गाजावाजानें करीत आहेत. या तत्वाचा ते उच्चार करतात एवढ्याच साठी हिंदुझुंडींनी त्यांच्या मागें कां धांवावें हें एक मला अद्याप न उलगडलेलें कोंडे

आहे. या तत्वांची शिकवण बुद्धानें पूर्वी दिलेली आहे, आणि एकाद्या अभिजात निर्बुद्ध इसमाखेरीज दुसरा कोणीहि तिचे श्रेय गांधींना देणार नाही. मानवी संस्कृतीच्या संरक्षणासाठीं सत्य व अहिंसा या दोन तत्वांची आवश्यकता आहे, हें आतां कोणी नव्यानें शिकविण्याचें कारण नाही. मी वर म्हटल्याप्रमाणें ही गोष्ट कित्येक शतकांपूर्वी बुद्धानें शिकविलेली आहे. त्यांत गांधींचें नवीन असें कांहीं नाहीं. सत्य आणि अहिंसा यांच्या प्रयोगासंबंधी वारंवार उद्‌भवणाऱ्या कूट प्रश्नांवर जर गांधींनी प्रकाश पाडला असता तर ते महात्मा या पदवीला पात्र झाले असते, आणि जगहि त्यांचें सदैव ऋणी राहिलें असतें. सत्यकथन केव्हां करावे ? हिंसा समर्थनीय केव्हां समजावी ? या दोन कोडयांच्या उत्तरांची जग आतुरतेनें वाट पहात बसलें आहे. बुद्धाच्या मतें सत्य व अहिंसा या तत्वांचा प्रयोग साध्याच्या दृष्टीनें करावा (attitude to truth and non-violence should be pragmatic). या प्रश्नाचें उत्तर येशू ख्रिस्तानें काय दिलें असतें तें कळण्याला दुर्दैवानें मार्ग नाहीं–कदाचित् पायलटनें (Pilate) त्याला उत्तर देण्यास पुरेसा वेळ दिला नसावा ! गांधींनी या प्रश्नाचें कांही उत्तर दिलें आहे काय ? मला तर कांहीं दिसत नाही. आणि त्यांच्या शिकवणीपुरता विचार केला तर ते दुसऱ्याच्या भांडवलावर आपला धंदा चालवीत आहेत असें मी बिनदिक्कत म्हणूं शकतों. सत्य आणि अहिंसा हे कांही त्यांचे शोध नव्हेत.

गांधींच्या शीलासंबंधी विचार करतां माझा ग्रह असा झालेला आहे कीं या माणसांत कळकळीपेक्षा काचा अधिक आहे. माझ्या मतें त्यांच्या प्रत्येक कृत्याचा नाद खोट्या नाण्याचा आहे, आणि त्यांची नम्रता डेव्हिड कॉपरफिल्डमधील उरायाहीपच्या नम्रतेसारखी आहे. स्वतःला सर्वांच्या पुढे आणून बसविण्याची कामगिरी त्यांनी फार कौशल्यानें साधली आहे. ज्या व्यक्तीचा आपल्या कर्तबगारीवर, कळकळीवर व आपल्या संदेशाच्या सत्यतेवर अतुल विश्वास असतो ती व्यक्ति समोरून हल्ला करून आपलें स्थान दृढ करते. बगलेकडून छापा घालण्याची तिला कधी आवश्यकता वाटत नाही. नेपोलियन आघाडीवर हल्ला करीत असे. बाजूबाजूनें छापे घालण्याचें तंत्र कमकुवत सेनानींनी शोधून काढलेलें आहे. गांधी नेहमीं याच तंत्राचा अवलंब करीत आहेत. अनेक वर्षेपर्यंत ते स्वतःला गोखल्यांचा विनम्र अनुयायी म्हणवीत असत. कित्येक वर्षेपर्यंत त्यांनी टिळकांची स्तुति करण्याचा क्रम चालू ठेवला होता. ते टिळकांचा द्वेष करीत असत, ही गोष्ट प्रत्येकाला ठाऊक आहे. तरीपण टिळकांच्या नांवाचा उपयोग केल्यावांचून आपणाला एक कोटीचा स्वराज्य फंड उभारता येणार नाहीं हें पूर्णपणें ओळखून त्यांनी आपल्या खाजगी भावना बाजूला सारल्या आणि

कसलेल्या मुत्सद्याचें कसब चालवून त्या फंडाला टिळकांचें नांव जोडले. खरें पाहिलें तर ख्रिश्चन धर्माचे हिंदुस्थानांतले ते कट्टर विरोधक आहेत. पण पाश्चात्य जगाला खूष करण्यासाठी, संकटसमयी आपण नेहमी बायबलकडे धांव घेतो, असे ते हमेशा बयाण करीत असतात. त्यांच्या मानभावीपणाची आणखी दोन उदाहरणें मजपाशी आहेत. वर्तुळ परिषदेच्या वेळी अल्पसंख्यांक कमिटीच्या बैठकींत त्यांनी असे कबूल केले होतें कीं, इतर प्रतिनिधींनी दलित वर्गाच्या (Depressed Classes) प्रतिनिधित्वाच्या मागणीला मान्यता दिली तर त्याला आपण कोणत्याहि प्रकारची हरकत घेणार नाही; आणि इतर सर्व प्रतिनिधींनीं जेव्हां ही मान्यता दिली तेव्हां त्यांनी जें वर्तन केलें त्याला मी विश्वासघात हेंच नांव देऊं शकतों. ते मुसलमानांकडे जाऊन त्यांच्या कानाला लागले आणि त्यांना म्हणाले की, " तुम्ही जर दलित वर्गाच्या मागण्यांना विरोध करण्याचें कबूल कराल, तर मी तुमच्या चौदाच्या चौदा मागण्या मान्य करीन. " एकाद्या घोंटीव बदमाषानेंहि असलें नीच कपट केलें नसतें. सध्यांची हिंदु-मुसलमानांची तेढ हीहि त्यांच्या अशाच एका कपटाचरणाची औरस संतति आहे. नेहरूकमिटीचा रिपोर्ट कॉंग्रेसच्या खुल्या अधिवेशनांत जेव्हां चर्चेसाठीं आला तेव्हां त्याला काही दुरुस्त्या सुचविण्यांत आल्या होत्या हें पुष्कळांना माहित असेल. आणि त्या दुरुस्त्यांना जयकरांनी विरोध केला, हेंहि प्रसिद्ध आहे. परंतु या दुरुस्त्या कां सुचविल्या गेल्या आणि त्यांना जयकरांनी कां आणि कसा विरोध केला याची माहिती लोकांना असावी तितकी नाही. यासंबंधीची जी हकीकत मला ठाऊक आहे (ती जर खरी असेल, आणि तिच्या खरेपणाबद्दल संशय घेण्याला मला जागा नाही, कारण या खेदकारक प्रकरणांत प्रमुख भाग घेणाऱ्यांकडूनच मला ती समजली आहे) ती अशी कीं हा सारा प्रकार गांधींनी आपले सहकारी पं. मोतिलाल नेहरु आणि मुसलमान समाज यांच्याशी जो कमालीचा विश्वासघात केला त्यामुळे घडून आला. नेहरु कमिटीच्या रिपोर्टाला ज्या दुरुस्त्या सुचविण्यांत आल्या होत्या त्या, तो रिपोर्ट मुसलमानांना स्वीकार्य व्हावा म्हणून पं. मोतिलाल नेहरु आणि जिना यांना परस्परमान्य झालेल्या अशा होत्या, पण गांधींना जेव्हां हें कळलें तेव्हां त्यांना असें वाटलें कीं, आपण मुसलमानांना जें द्यायला तयार होतों त्यापेक्षा पंडित मोतिलाल नेहरुंनी अधिक दिले होतें आणि पंडित मोतिलाल नेहरुंचा पडाव करण्याच्या अट्टाहासानें प्रेरित होऊन त्यांनी या दुरुस्त्यांना विरोध करण्यासाठी जयकरांचा उपयोग करून घेतला. (Mr. Jayakar was hired, by Mr. Gandhi, to oppose them) जो इसम दलित वर्गाचा व मुसलमानांचा मित्र म्हणून मिरवतो त्यानें, दिलेली वचनें पाळण्याच्या जबाबदारींतून निसटून जाण्यासाठी भुयारी मार्गाचा अवलंब करावा,

हा विचार खरोखर उद्वेगजनक आहे. '' मुखमे राम बगलमें छुरी '' अशा प्रकारच्या माणसाला जर महात्मा म्हणतां येत असेल तर मोहनदास गांधी हे महात्मा आहेत.

'' चित्रा '' च्या संपादकांना त्यांच्या मागणीपेक्षा मी अधिक दिलें आहे. आणि '' चित्रा '' च्या वाचकांना जेवढें चावून पचवितां येईल त्यापेक्षा कदाचित मी अधिक सांगितलें असेल. आणखी दोन गोष्टींचा उल्लेख करून मी हा लेख संपवितो. रानडे, गोखले, आगरकर आणि टिळक यांचे युग हें कदाचित गांधीयुगाइतकें आंदोलनमय आणि अपेक्षामय नसेल, पण तें ज्ञानयुग होते याबद्दल माझ्या मनांत बिलकूल शंका नाही. गांधीयुग हे भारतवर्षाचें तमोयुग आहे. त्यावेळचें राजकारण उफाळणारें नसलें तरी प्रामाणिक होतें. उलट गांधींचें राजकारण उफाळणारें आणि खळाळणारें असलें तरी ते हिंदुस्थानच्या आतापर्यंतच्या कोणत्याहि राजकारणापेक्षा अधिक अप्रामाणिक आहे. राजकारणाच्या अध्यात्मीकरणाचें पुण्याहवाचन करून त्यांनी त्याची परिसमाप्ती व्यापारीकरणानें केली. पण यांत नवल तें काय ? '' मीठच जर अळणी झालें तर त्याला खारटपणा कशानें आणणार ? '' असें येशू ख्रिस्त फॅरिसिजना (Pharisees) म्हणाला नव्हता काय ?

राजकारणातील गांधींच्या या बुवाबाजीचा नायनाट कसा करावयाचा हा या घडीचा दुसरा आणि अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. हिंदी जनता ताळ्यावर येऊन या महात्म्याच्या विचित्र लहरीप्रमाणे नाचण्यापेक्षा स्वतंत्रपणे आपलीं मते बनवूं लागण्याची वेळ येण्यापूर्वी कदाचित बराच कालावधि लोटेल. बहुसंख्य जनता ही अद्यापपर्यंत अडाणी आणि पशुतुल्य राहिली आहे. हा सर्वस्वी तिचाच दोष नसेल. वरिष्ठ वर्गांनी तिला मुद्दामच अज्ञानांत डांबून ठेवलें आहे. कारण कांही असो. वस्तुस्थिति अशी आहे. निव्वळ बुद्धीच्या जोरावर या महात्म्याच्या विरूद्ध लढा चालविणे शक्य नाही. दैवी चमत्कारांविरूद्ध कोरडा तर्कवाद, असा हा लढा आहे. निव्वळ तर्कवाद चमत्कारांची झांपड केव्हाहि दूर करूं शकणार नाहीं. या परिस्थितींत मला असें सुचवावेंसे वाटतें की, या महात्म्याचा निकाल लावण्यासाठी देशातील, इतर महात्म्यांनी राजकारणात शिरून आपापले राजकीय पक्ष स्थापावे म्हणून त्यांचे मन वळविण्याचे प्रयत्न करावे. हिंदुस्थानांत अशा महात्म्यांचा मुळींच तुटवडा नाही, उपासनीबुवा, दादामहाराज, मेहेरबाबा, नारायणबुवा केडगांवकर हे व यांच्यासारखे इतर अनेक बुवा हिंदुस्थानांत आहेत. अनेक अज्ञ लोकांना भुरळ पाडून त्यांना आपल्या जाळ्यांत अडकविण्याची

कला त्यांना अवगत आहे. गांधींच्या पेक्षा त्यांच्या अनुयायांची संख्या लहान आहे ही गोष्ट खरी. पण त्यांची नालायकी हें याचें कारण नव्हे. हिंदी जनतेला मोक्षाबरोबरच राजकीय स्वातंत्र्यहि प्राप्त करून देण्याचें सामर्थ्य आपल्या अंगी आहे याची जाणीव, कांही कारणानें, त्याना अद्याप झालेली नाही, हेंच तें कारण होय. गांधींचा प्रभाव या त्यांच्या दुहेरी धोरणामुळें शक्य झाला आहे. ते लोकांना दोनहि–अध्यात्मिक आणि राजकीय–मोक्ष मिळवून देण्याचें आश्वासन देतात. माझी खात्री आहे कीं, उपासनी, दादामहाराज, मेहेरबाबा, नारायण महाराज वगैरे बुवांनी गांधींचें धोरण स्वीकारलें तर गांधींच्या नांवाचा टिळा लावणाऱ्या पक्षाशी मुकाबला करणारे पक्ष तें निःसंशय स्थापन करूं शकतील. अनेक पक्ष अस्तित्वात असण्यांत, देशाचे निदान तूर्त तरी, कल्याण आहे. या विविध बुवापुढाऱ्यांचे पक्ष स्थापन होण्यानें जी स्पर्धा निर्माण होईल तिच्यामुळें गांधी व उपासनीप्रभूति, बुवा, ज्या प्रमाणें पुराणांतील सुंदोपसुंद एका अप्सरेकरितां एकमेकांचा नाश करण्यास सिद्ध झाले त्याप्रमाणें, परस्परांचा नाश करतील आणि यदाकदाचित तसें न झालें व तें केवळ प्रतिस्पर्धी ठरले तरी तेंहि चांगलेंच होईल. त्यामुळे निदान जे फॅसिझम् आज बोकाळलें आहे तें तरी दूर होईल. एकंदरींत असें दिसते कीं, दुसऱ्या कोणत्या तरी महात्म्यानें पुढें सरसावून आपल्या विशिष्ट ध्येयाचा झेंडा फडकाविण्यात हिंदुस्थानचा बौद्धिक मोक्ष आहे. ही चेष्टा नव्हे. मी हें अगदीं गंभीरपणें लिहीत आहे. उपासनी, दादा महाराज, मेहेरबाबा किंवा नारायणबुवा यांचा एकादा शिष्य आपल्या महाराजांचे याबाबत मन वळवून हिंदी लोकांवर उपाय करील काय ? इतर लोक त्यांना धन्यवाद देतील किंवा नाही मला सांगवत नाही. पण माझ्यापुरतें बोलायचें तर मी या बुवांना असें आश्वासन देऊं इच्छितो कीं या कृपेबद्दल मी कर्तव्यबुद्धीनें परमेश्वरापाशी त्यांचा सदैव ऋणी राहीन.

चित्रा : दिवाळी अंक, ऑक्टोबर १९३८.

८२

लबाड कोण ? कॉंग्रेस की मजूरांचे पुढारी !

संपाच्या कायद्यासंबंधाने कॉंग्रेस सरकार व मजूरांचे पुढारी यांच्यामध्ये जी धुमश्चक्री चालू झाली आहे ती सर्व लोकांना माहीत आहे. या लढ्यात कामगार लोक हे मजूर पुढाऱ्यांच्या मागे आहेत व त्यांना हा संपाचा कायदा नापसंत आहे, ही गोष्ट जगजाहीर झाली आहे. तथापि कॉंग्रेसचे लोक 'हे बील मजूरांना मान्य आहे' असे खोटेच सांगत सुटले आहेत.

सभेतील लोकसमुदायावरून जर या गोष्टीचा निकाल द्यावयाचा असेल तर मजूरांना हा कायदा नको ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी आता लख्ख झाली आहे. आतापर्यंत झालेल्या मजूरांच्या सभा वीस-वीस, तीस-तीस हजारांच्या झाल्या. उलट पाचपन्नास माणसांची देखील सभा कॉंग्रेसच्या लोकांना मुंबईसारख्या बकाली शहरात भरविता येऊ नये, ही कशाची साक्ष आहे ? कॉंग्रेसच्या बाजूला सरकार, पोलिस, पैसा, मुंबईचे दादा लोक इतकी सर्व संग्रामाची सामुग्री हाती असताना मूठभरशा मजूर पुढाऱ्यांशी त्यांना तोंड देता येऊ नये हे कशाचे द्योतक आहे ?

या बिलाच्या बाबतीत कॉंग्रेसची बाजू न्याय्य असती, मजबूत असती तर कॉंग्रेसच्या लोकांची अशी धुळधाण झाली नसती ! अशी त्यांना माती खावी लागली नसती. या एकाच गोष्टीवरून हा कायदा किती वाईट व मजूरांच्या हिताला किती विघातक आहे, हे मजूरांना सर्वस्वी पटले आहे, असे सिद्ध होत आहे. परंतु या बिलाविरुद्ध असलेला विरोध लोक निदर्शनास आणण्याकरिता सात तारखेला सर्वत्र मजूरांच्या सभेत निश्चित झाल्याप्रमाणे मजूर लोक संपावर जाणार यात बिलकूल शंका राहिलेली नाही, असे कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांना दिसून आल्यानंतर त्यांनी मजूरांची दिशाभूल करण्याच्या उद्देशाने एक पत्रक ५-५० मजूरांना हाताशी धरून त्यांच्या सह्यांनी प्रसिद्ध केले आहे. त्या पत्रकाने मजूरांचा गैरसमज होण्याचा संभव असल्याकारणाने त्यासंबंधी खुलाशाचे दोन शब्द लिहिणे आवश्यक झाले आहे.

या पत्रकांमधून असा आक्षेप करण्यात आलेला आहे की ' ज्या बिलाला आज मजूरांचे पुढारी एवढा जोराचा विरोध करीत आहेत त्याच बिलातील मुख्य तत्त्वांना त्यांनी आरंभी पाठिंबा दिला होता, आणि म्हणून त्याला आजचा विरोध हा

अप्रामाणिकपणाचा विरोध आहे ' या आरोपासंबंधाने काही गोष्टी कामगारांच्या निदर्शनास आणणे प्राप्त आहे. प्रथम हा आरोप कोणाला लागू पडतो, याचा मजूरांनी बारकाईने तपास करणे अवश्य आहे. संप कायद्याच्या बाबतीत कामगारांच्या वतीने जे पुढारी भांडत आहेत त्यांच्या आज तरी दोन तुकड्या आहेत, हे सर्व कामगारांनी ध्यानात ठेवावयास पाहिजे आहे. एक तुकडी ट्रेड युनियन काँग्रेसमध्ये सामील असलेल्या मजूर पुढाऱ्यांची व दुसरी स्वतंत्र मजूर पक्षाशी संलग्न असलेल्या मजूर पुढाऱ्यांची. चंचलतेचा, धरसोडीचा हा आरोप कोणत्याही इतर मजूरांच्या पुढाऱ्यांवर करणे वाजवी असो किंवा गैरवाजवी असो-तो मजूरांच्या चळवळीचा मुख्य आधारस्तंभ होत असलेला जो स्वतंत्र मजूर पक्ष त्याच्यावर अगर त्याच्या कोणत्याही कार्यकर्त्यावर करता येणार नाही, असे आम्ही स्पष्टपणे सांगू इच्छितो. या बाबतीत स्वतंत्र मजूर पक्षाची भूमिका धुतल्या तांदळासारखी स्वच्छ आहे. त्याच्यावर कोणालाही आपली बाजू बदलल्याचा आरोप केव्हाही करता येणार नाही. स्वतंत्र मजूर पक्षाला हे बील कधीही मान्य झाले नव्हते. आणि म्हणून त्या पक्षाचा विरोध अप्रामाणिक आहे, असे कोणालाही म्हणता येणार नाही.

मजूरांच्या इतर पुढाऱ्यांना अर्थात जे काही सांगावयाचे असेल, ते सांगण्यास ते समर्थ आहेत. त्यांची वकीली करण्याची आम्हास काही आवश्यकता नाही. परंतु कोणाच्याही पापाने सार्वजनिक कार्याला विघातक होणे अनुचित असल्याकारणाने त्यासंबंधानेसुद्धा खुलासा करणे क्रमप्राप्त आहे. ज्या लोकांनी हे पत्रक काढून मजूरांच्या पुढाऱ्यासंबंधाने गैरसमज पसरविण्याचा प्रयत्न केलेला आहे त्या लोकांना एक सवाल विचारणे आवश्यक आहे.

ट्रेड युनियन काँग्रेसमध्ये सामील असलेल्या मजूर पुढाऱ्यांनी पाठिंबा दिला असे जे म्हणतात त्यांनी तो पाठिंबा कोणत्या तत्त्वांना (धरून) दिला याचा खुलासा करणे जरूर आहे.

पाठिंबा दिला, अशाप्रकारच्या भरमसाट कल्पना करून स्वतःचा गैरसमज करून घेणे व लोकांची दिशाभूल करणे यात काही अर्थ नाही. या बिलाच्या मुळाशी एकंदर पाच तत्त्वे आहेत. (१) सक्तीची तडजोड, (२) सक्तीचा लवाद, (३) संप हा गुन्हा व त्याकरिता शिक्षा, (४) कामगार संघ स्थापण्यास मालकाची मान्यता आणि (५) सरकार सांगेल त्याच युनियन्सना कामगारांचे प्रतिनिधी होण्याचा हक्क. या पाच तत्त्वांपैकी कोणत्या तत्त्वाला ट्रेड युनियन काँग्रेसमध्ये सामील असलेल्या कामगार पुढाऱ्यांनी मान्यता दिली आहे, याचा

खुलासा केल्याखेरीज त्यांचा आजचा विरोध अप्रामाणिक आहे, असे म्हणणे गैरवाजवी होणार नाही काय ? आमच्यामते या बाबतीत खरी परिस्थिती काय आहे, याचा खुलासा ट्रेड युनियन कॉंग्रेसमध्ये सामील असलेल्या मजूर पुढाऱ्यांनी करणे आवश्यक होते. लोकांमध्ये अशा प्रकारचा गैरसमज राहू देणे अनर्थकारक आहे. कॉंग्रेस सरकार म्हणते 'या पुढाऱ्यांनी बिलाला संपूर्ण पाठिंबा दिला होता. बिलातील कोणत्याच तत्त्वाला हरकत किंवा आक्षेत घेतला नव्हता.' ट्रेड युनियन कॉंग्रेसचे पुढारी म्हणतात 'हा आरोप खोटा आहे. आपण तसा पाठिंबा दिला नाही. पाठिंबा दिला, तो बिलाला नव्हे. कॉंग्रेसच्या इलेक्शनच्या जाहीरनाम्याला दिला.' उभयतामध्ये झालेला पत्रव्यवहार प्रसिद्ध झाल्याशिवाय या वादाचा निकाल देता येणे शक्य नाही. परंतु कॉंग्रेस सरकारचे म्हणणे खरे आहे असे एकवार गृहीत जरी धरले तरी कामगारांच्या काही पुढाऱ्यांनी एकेकाळी बिलातील तत्त्वांना पाठिंबा देऊन आज त्यालाच विरोध करून आपला अप्रामाणिकपणा (दाखविल्यामुळे) हे बील चांगले आहे, असे कसे सिद्ध होऊ शकते, हे आम्ही समजू शकत नाही. मजूरामध्ये काही पुढारी लबाड असतील, परंतु कॉंग्रेसमध्ये असलेले हजारो पुढारी मजुरांच्या पुढाऱ्यांपेक्षा हजारो पटींनी लबाड आहेत. परंतु कॉंग्रेसमध्ये लबाड लोक आहेत म्हणून कॉंग्रेसमधील सारीच भूमिका लबाडीची आहे, हे कॉंग्रेसचे लोक मान्य करावयास तयार आहेत का ? केवळ विसंगतता एवढेच एक कारण अप्रामाणिकपणा सिद्ध करण्याकरिता पुरेसे आहे, असे कॉंग्रेस भक्त मान्य करीत असेल तर कॉंग्रेसच्या धोरणामध्ये विसंगतता दाखवून देणे अशक्य होणार नाही. या बिलाच्या पाठी कॉंग्रेसचे आज जे धोरण आहे व नॉनकोऑपरेशनची चळवळ सुरु करताना मजूरांच्या चळवळीसंबंधाने कॉंग्रेसचे काय धोरण होते, हे ध्यानात घेण्यासारखे आहे. १९२० साली नागपूर येथे कॉंग्रेसच्या अधिवेशनात स्वराज्याच्या मागणीचा ठराव पास झाला व त्याबरोबर स्वराज्य संपादण्याकरिता नॉनकोऑपरेशन (असहकार) व कायदेभंग या दोन शस्त्रांचा उपयोग करण्यात यावा, असाही ठराव पास झाला होता. त्याच कॉंग्रेसच्या अधिवेशनात मजूरांच्या संबंधाने खालील दोन ठराव पास झाले होते. त्याचा इंग्रजी उतारा भाषांतरासहित वाचकाकरिता खाली देत आहोत–

(1920) Nagpur Congress Resolution No. VII

" The Congress express its fullest sympathy with the workers of India in their struggle for securing their legitimate rights through the organization of trade unions, and places on record its condemnation of the brutal policy of treating the lives of Indian workers of no account under false pretest of preserving law and order.

VII

The Congress is of opinion that Indian Labour should be organised with a view to improve and promote their well being and secure to them their just rights, and also to prevent exploitation (1) of Indian Labour (2) of Indian resourcesly foreign agencies ; and that the All India Congress Committee should appoint a committee to take effective steps in that behalf. "

नागपूर काँग्रेस (१९२०) ठराव ७ व ८

" आपले न्याय्य हक्क मिळवून घेण्यासाठी आपल्या ट्रेड युनियन्स तर्फे हिंदी कामगारांनी जो लढा चालविलेला आहे त्याबद्दल ही काँग्रेस आपली पूर्ण सहानुभूती दर्शविते. शांतता व सुव्यवस्थेच्या खोट्या नावाखाली हिंदी कामगारांच्या जिवास काही किंमतच नाही. अशा प्रकारच्या पशुतुल्य धोरणाचा ती निषेध करते.

ह्या काँग्रेसचे असे मत आहे की, त्यांची स्थिती सुधारण्याकरिता त्यांना त्यांचे न्याय हक्क मिळवून घेण्याकरिता, आणि त्यांची पिळवणूक थांबविण्याकरिता व हिंदी साधनांचा परकीयांनी चालविलेला उपभोग थांबविण्याकरिता कामगारांची संघटना करणे जरूर आहे ; आणि ह्या ऑ. इं. काँ. कमिटीने हे कार्य प्रभावीपणे करण्यासाठी एक समिती नेमावी.

या ठरावाची अंमलबजावणी करण्याकरिता १९२२ साली गयेस जे काँग्रेसचे अधिवेशन भरले त्यात खालील आणखी एक ठराव पास करण्यात आला. त्याचाही इंग्रजी उतारा तर्जम्यासह खाली देत आहोत.

(1922) Gaya Congress Resolution No. XIII

Whereas this Congress is of opinion that Indian Labour should be organised with a view to improve and promote their well being and secure to them their just rights and also to prevent exploitation of Indian Labour and Indian resources, it is resolved that this congress while welcoming the move made by All India Trade Union Congress and Various Kisan Sabhas in organising the workers of India hereby appoints the following committee with power to co-opt, to assist the Executive Council of the All India Trade Union Congress for the orgnization of Indian Labour, both agricultural and industrial.

(1) C. F. Andrews
(2) J. N. Sen Gupta
(3) S. N. Haldor
(4) Swami Dinanath
(5) Dr. D. D. Sathaye
(6) S. Singravelu Chethiar

गया काँग्रेस (१९२२) ठराव १३ वा

ज्याअर्थी या काँग्रेसचे असे मत आहे की त्यांची स्थिती सुधारण्याकरिता, त्यांना त्यांचे न्याय्य हक्क मिळवून देण्याकरिता, त्यांची व हिंदी साधनांची पिळवणूक थांबविण्याकरता हिंदी कामगार वर्गाची संघटना करणे जरूर आहे ; त्याअर्थी ही काँग्रेस असा ठराव करते की ही काँग्रेस ऑ. इं. ट्रेड युनियन काँग्रेस व अनेक किसान सभा ह्यांनी हिंदी कामकरी वर्गास संघटित करण्यासाठी चालू केलेल्या चळवळीचे स्वागत करते व ऑ. इं. ट्रे. यु. काँग्रेसच्या कार्यकारी मंडळात शेतमजूर व औद्योगिक कामगारांची संघटना करण्यास मदत करण्यासाठी खालील गृहस्थांची कमेटी नेमते. ह्या कमेटीत अधिक गृहस्थ कमेटीस घेण्यास अधिकार आहे.

(१) सी. एफ. अँण्ड्रयूज (२) जे. एन. सेनगुप्त
(३) एस्. एन्. हलधर (४) स्वामी दीनानाथ
(५) डॉ. डी. डी. साठ्ये (६) एस. सिंगारावेलू चेटियार

या ठरावातील मजूरांच्या चळवळीसंबंधाने काँग्रेसने घेतलेली भूमिका आणि या बिलात सामील केलेली तत्त्वे यांच्यामध्ये केवढे जमीन आस्मानचे अंतर आहे, हे कोणाही वाचकास सहज कळण्यासारखे आहे. या ठरावात चालू बिलात असलेल्या अनिष्ट तत्त्वांची पडछाया देखील दिसून येत नाही. काँग्रेसच्या ठरावामध्ये मजुरांची चळवळ स्वतंत्र असावी त्यांचे रक्तशोषण कोणीही करू नये, असे उघडपणे म्हटले आहे. तीच काँग्रेस आजच्या या बिलाने मजुरांना गुलाम करण्याचे अधम कार्य करीत आहे. नुसते ठराव करूनच काँग्रेसचे लोक राहिलेले नव्हते त्यांनी मजुरांच्या संपात भाग घेतला होता. इतकेच नव्हे तर मजुरांना संप करावयास प्रोत्साहन दिल्याचे अनेक दाखले पटवून देता येतील. खुद्द गांधींनी टिकवून धरण्याचे उपदेश अनेक वेळा केले आहेत, ही गोष्टही सिद्ध करून देता येईल अशी जेथे परिस्थिती आहे तेथे लबाड कोण, हा प्रश्न साहजिकच उद्‌भवतो. काँग्रेस लबाड की ट्रेड युनियन काँग्रेसमधील पुढारी लबाड ? आणि केवळ विसंगततेमुळे जर ट्रेड युनियन काँग्रेसमधील पुढाऱ्यांना लबाड म्हणावयाचे तर काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना लबाड का म्हणू नये ? ट्रे. यु. काँग्रेसमधील कामगार पुढाऱ्यांपेक्षा काँग्रेसचे लोक जास्त लबाड आहेत, त्यांनी मजुरांना फसविले आहे, असे निदान आमचे तरी मत आहे.

स्वराज्य मिळविण्याकरिता मजुरांच्या पाठिंब्याची त्यांना आवश्यकता होती. म्हणून त्यांनी २०-२२ साली काँग्रेसच्या अधिवेशनामधून वर नमूद केलेले

ठराव पास केले आणि सत्ता हाती आल्याबरोबर त्याच मजूरांना गर्तेत लोटून दिले. अशा लोकांना फसवे म्हणू नये तर काय म्हणावे, हेच आम्हाला समजत नाही. कामगार लोकांना आम्हाला इतकेच सांगावयाचे आहे की त्यांनी प्रामाणिक कोण व अप्रामाणिक कोण याचा शोध लावीत बसण्याऐवजी बिल त्यांच्या हिताचे आहे किंवा अहिताचे आहे याचा प्रामुख्याने विचार करावा आणि एवढ्याच दृष्टीने जर ते या बिलाकडे पाहतील व त्याची छाननी करतील तर आमची खात्री आहे की या बिलाचा निषेध करणे आवश्यक असून त्याचा निषेध करण्याकरिता ठरल्याप्रमाणे ७ नोव्हेंबर रोजी एक दिवसाचा संप घडवून आणणे हाच एक हिताचा व स्वाभिमानाचा मार्ग आहे, असे त्यांना वाटेल, अशी आमची खात्री आहे.

अग्रलेख : जनता, ता. ५ नोव्हेंबर, १९३८, अग्रलेखाच्या शेवटी B. R. A. अशी अक्षरे आहेत.

उद्धृत : गांजरे, खंड ४ पृ. ३२-३७.

सर सयाजीराव गायकवाड : राष्ट्रीय वृत्तीचे देशभक्त

" सर सयाजीराव महाराज †हे दीर्घ आजारानंतर सोमवारी ६ फेब्रुवारी १९३९ रोजी रात्री मुंबईतील त्यांच्या जयमहाल पॅलेसमध्ये दिवंगत झाले, त्यांच्या मृत्यूची बातमी जगातील प्रमुख पत्रांनी प्रसिद्ध केली व त्यांच्यावर गुणगौरवपर मृत्युलेख लिहिले. कारण ते प्रबुद्ध, शीलवंत, पुरोगामी आणि प्रजाहिततत्पर राजे म्हणून सर्वत्र ओळखले जात होते. त्यांनी जी जी माणसे विद्यार्जनासाठी व राज्यकारभारासाठी निवडली ती ती जगात कीर्तीवंत झाली. बाबासाहेबांना त्यांनी १९१३ सालच्या मार्चमध्ये परदेशी शिक्षण घेण्यास निवडले व बाबासाहेब जुलैमध्ये अमेरिकेला उच्च विद्यार्जनासाठी गेले. त्यांनी १९१३ ते १९१७ च्या दरम्यान इतका उत्तम अभ्यास केला की त्यांच्या शिक्षकांनी त्यांची पाठ थोपटली. या काळात त्यांनी तीन ग्रंथही लिहिले. बाबासाहेबांची ही अचाट कर्तबगारी पाहून महाराज त्यांच्यावर फार खुष झाले. महाराजांनी आपल्या जीवनास कसे बाळसेदार वळण लावले याबद्दल बाबासाहेब खाजगी बैठकीतून महाराजांच्याबद्दल कृतज्ञतापूर्वक गौरवपर उद्‌गार काढीत असत. महाराजांचा मी कसा उतराई होईन, याबद्दलही ते योजना सांगत असत." [१]

'मुंबई, ता. ७ डॉ. **आंबेडकर यांना श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांच्या निधनाची दुःखद वार्ता कळताच** त्यांनी वर्तमानपत्रांच्या प्रतिनिधीजवळ पुढील **उद्‌गार काढले.** ते म्हणाले, ' श्री. सयाजीराव महाराजांचे निधन ही माझी वैयक्तिक व फार मोठी हानी झाली आहे. त्यांचे उपकार मी केव्हाही विसरणार नाही. मला त्यांनी जे शिक्षण दिले त्यामुळे आजची योग्यता मला प्राप्त झाली. अस्पृश्य जातीवर त्यांचे फार मोठे उपकार झाले आहेत. त्यांच्याइतके अस्पृश्य जातीसाठी दुसऱ्या कोणीही कार्य केले नाही. ते मोठे समाजसुधारक होते व बडोदे संस्थानात सामाजिक सुधारणांविषयी जे कायदे करण्यात आले ते युरोप वा अमेरिकेतील कोणत्याही सुधारलेल्या राष्ट्राच्या तद्विषयक कायद्यांपेक्षा पुढारलेले होते. त्यांनी सर्व सामाजिक घाणेरड्या चालींचा अभ्यास करून त्यातील दोष काढून टाकण्यात पुढाकार घेतला. स्वतःच्या प्रजेच्या

---

†पाहा, परिशिष्ट क्रमांक–१४.

१ : खैरमोडे खंड ४, पृ. १०२

कल्याणासाठी इतके सतत प्रयत्न दुसऱ्या कोणत्याही संस्थानिकांनी केले नाहीत. ते राष्ट्रीय वृत्तीचे असून देशभक्त होते. हा सद्गुण संस्थानिकात क्वचितच दिसून येतो. कित्येक बाबतीत त्यांनी ब्रिटिशांना उदाहरण घालून दिले व ते त्यांच्या हुकमतीखाली कधीच गेले नाहीत. त्यांच्यात वितुष्ट आणण्याचा प्रयत्न करण्यात आला, ही गोष्ट दुःखाची आहे. ते महाराष्ट्रीय असले तरी आपल्या गुजराथी प्रजाजनाच्या विरुद्ध पक्षपात त्यांनी केला नाही, ही गोष्ट त्यांना ओळखणारे सर्व लोक मान्य करतील. माझ्या माहितीप्रमाणे असे अशुद्ध विचार त्यांच्या मनात येणे शक्यच नव्हते.

'सयाजीराव महाराजांच्या मृत्यूने हिंदुस्थानातील एक फार मोठा मनुष्य नाहीसा झाला व बडोदे संस्थान फार मोठ्या राज्यकर्त्याला मुकले. महाराष्ट्रातील एक विभुती नाहीशी झाली. सामाजिक सुधारणांचा पुढारी नाहीसा झाला. अस्पृश्यांचा एकमेव कैवारी गेला, संस्थानिकांतील द्रष्टा गमावला.'[१]

---

[१] : जनता, ११ फेब्रुवारी १९३९.

८४

स्वतंत्र मजूर पक्षाचे युद्धविषयक धोरण

स्वतंत्र मजूर पक्षाच्या कार्यकारी मंडळाने त्या पक्षाच्या अध्यक्षास आपले युद्धविषयक धोरण जाहीर करण्याचा अधिकार दिला आहे. यापुढे दिलेल्या धोरणावरून वरील पक्षाची चालू युरोपियन युद्धासंबंधी मनोवृत्ती काय आहे हे*

युद्धास सुरवात* हिंदी पुढाऱ्यांच्या युद्धविषयक* प्रवाह वाहू लागला आहे. हिंदुस्थानने ग्रेट बिटनला या युद्धात मदत करावी असा या धोरणाचा सूर प्रामुख्येकरून वाहात आहे तरी त्यातून फारसा उत्साह मात्र कोठेही व्यक्त होत नाही. उलटपक्षी असे म्हणता येईल की या व्यक्त झालेल्या धोरणावरून ब्रिटनशी सहकार्य करण्याबाबत निश्चयाभाव व अनिच्छा हीच दृग्गोचर होत आहेत. ब्रिटनला मदत करावयाची तर कोमटपणा व मैत्रीचा अभावही असता कामा नयेत, हे उघड आहे. सोमळ (सीमित ?) लोकांचे हिंदुस्थानच्या रक्षणापुरते मर्यादित सहकार्य व विरोधकांच्या निष्क्रीय. विरोधामुळे उत्पन्न होणारी विघ्ने ही परस्परास मारक होऊन ब्रिटनला द्यावयाची मदत स्थगित झाल्याशिवाय राहणार नाही. म्हणून सर्व हिंदी जनतेचा पाठिंबा मिळविण्याची व्यवस्था करावयास हवी. असे करणे झाल्यास लोकांमध्ये अनुत्साह कोणत्या कारणांनी उत्पन्न झाला आहे तेच प्रथमतः पाहिले पाहिजे. स्वतंत्र मजूर पक्षाच्या दृष्टीने या कारणांचे पृथःकरण केल्यास या निरुत्साहतेचे खरे कारण इंग्लंड व फ्रान्स या देशांच्या पूर्वार्जितामध्येच आढळून येते. जर्मन अन्यायाचा प्रतिकार या दोन देशांनी गोगलगाईच्या वेगाने आजवर केला आहे. जर्मनीच्या पहिल्याच अन्यायाचा सहकार्याने प्रतिकार न करता त्यांनी जर्मनीस एकामागून एक अन्याय करण्यास मोकळीक दिली ; व झेकास्लोव्हाकियाचे रक्षण करणे हे त्यांचे पवित्र कर्तव्य असताही त्यांनी त्या देशाचा बळी देऊन जर्मनीची आराधना करण्याचा अश्लाध्य प्रयत्नही केला. हिटलरला आजवर पाच खून माफ केले ! पोलंडवरील चढाई हे त्याचे सहावे पातक आहे. आता हिटलरला विरोध करण्यास सरसावलेल्या राष्ट्रांनी यापूर्वीच असा विरोध करावयास हवा होता, असे स्वतंत्र मजूर पक्षाचे स्पष्ट मत आहे. लहान राष्ट्रांचे जर्मनीला बळी देऊन आजवर संपादन केलेल्या शांततेमुळेच चालू लढाईसाठी सहकार्य मागण्याचा नैतिक अधिकार संपुष्टात आला आहे.

---

*उपलब्ध स्त्रोतामध्ये काही शब्द अस्पष्ट असल्यामुळे देता आले नाही.—संपादक.

लढाईनंतर न्यायाला धरून तह करण्यासाठी लढाया लढल्या जात नाही, असे स्वतंत्र मजूर पक्षाचे मत आहे. शांततेनंतर तहाच्या अटी मोडल्या जाणार नाहीत अशी काळजीही जेती राष्ट्रे घेत नाहीत. निव्वळ सहकारी-सुरक्षिततेने कार्यभाग होणार नाही. सन १९१४ मध्ये असले सहकार्य होते. अनेक राष्ट्रे एक होऊन त्यांनी जर्मनीचा पाडाव केला. पण पाडाव झालेल्या जर्मनीचे पुनरुत्थान होऊन तो आज जगाच्या छातीवर नाचत आहे. यावरून अन्याय करणाऱ्याचा पराभव केल्याने कार्यभाग होईल, असे मानणे फोल ठरते.*

(१) युद्धात जय मिळाल्यानंतर तह करणे तो न्यायाच्या तत्त्वास धरूनच करावयास हवा.

(२) युद्धाप्रमाणेच तहाच्या बाबतीतही राष्ट्रानी सहकार्य करावयास हवे.

(३) तहाचा भंग झाला की भंग करणारास शिक्षा व्हावयास हवी. याबाबतीत भंग करणारा कोण, अन्याय कोणास झाला, या गोष्टी जवळच्या देशात घडल्या का दूरच्या देशात घडल्या, याचा विचार न करता अन्यायाचा प्रतिकार केव्हाही कोठेही झालाच पाहिजे. अशी काळजी घेतल्याशिवाय युद्ध प्रवृत्तीचा बीमोड होणे नाही. स्वतंत्र मजूर पक्षाला या गोष्टीचे अत्यंत महत्त्व वाटत असून चालू युद्धात भाग घेणाऱ्या सहकारी राष्ट्रांनी एक प्रातिनिधिक मंडळ नेमून आपल्या तहाच्या अटी आगाऊच जगजाहीर कराव्या, असे या पक्षाचे मत आहे. अशी घोषणा केल्यानेच लोकशाही राष्ट्रांच्या मागण्यांचा रास्तपणा जगास पटेल व न्यायाच्या तत्त्वांना धरून शांतता प्रस्थापित करणे व ती टिकवणे हेच लोकशाही राष्ट्रांचे ध्येय आहे, अशी सर्वांची खात्री होईल. अशी घोषणा केली तरच चालू युद्ध हे युद्धाचा बीमोड करण्यासाठी केलेले युद्ध आहे, असे म्हणता येईल ; व मग अशा युद्धात भाग घेण्यास कोणाही विचारवंतास आळेटाळे करण्याचे कारण उरणार नाही.

ब्रिटनला मदत करण्यास कांकू करण्याचे आणखीही एक कारण आहे, असे स्वतंत्र मजूर पक्षाचे मत आहे. हिंदुस्थान देश आज ब्रिटीश मंत्रीमंडळाच्या जगन्नाथ रथाला बांधला जाऊन त्या रथाबरोबर तो फरफटत जात आहे. इंग्रज मुत्सद्यांना आंतरराष्ट्रीय धोरण ठरविण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असून त्यांना हवी तशी देवाणघेवाण करण्याची मुभा आहे. लढाई पुकारणे न पुकारणे, तह करणे न करणे ही त्यांच्या मर्जीची गोष्ट आहे. या आंतरराष्ट्रीय राजकारणात हिंदुस्थानला कोणी विचारीत नाही. लढाई करणे, तह करणे याबाबत

---

*अस्पष्ट.

हिंदुस्थानचा विचार कोणी घेत नाही, आंतरराष्ट्रीय राजकारण यशस्वी झालं तर हिंदुस्थानचा काही फायदा नाही, पण ते फसले व लढाईचा प्रसंग आला की हिंदुस्थानने पैसा व मनुष्यबल पुरविलेच पाहिजे ! ही परिस्थिती हिंदुस्थानच्या दृष्टीने अन्यायाची आहे, हे कोणीही कबूल करील. व्हर्सायच्या तहावर हिंदुस्थानच्या प्रतिनिधींनी सह्या केल्या होत्या ही गोष्ट खरी आहे. पण तह करण्याच्या बाबतीत 'विचार न घेता निव्वळ ' सह्याजीराव ' होण्याने कोणाचेही समाधान होण्याजोगे नाही. आंतरराष्ट्रीय राजकारणात हिंदुस्थानास मताचा अधिकार असणे ही गोष्ट साम्राज्यातील इतर देशांना मताचा अधिकार असण्यापेक्षाही अधिक अगत्याची आहे. साम्राज्यातील वसाहतींना योग्य त्या कारणास्तव तटस्थ राहण्याचा हक्क आहे. तसा हिंदुस्थानास नाही. युद्धात भाग घेणे हिंदुस्थानच्या मर्जीवर अवलंबून नाही. म्हणूनच युद्धापुर्वी या देशाचा विचार घेणे अगत्याचे आहे. पण ही अगत्याची गोष्ट आजवर कधीही करण्यात आलेली नाही.

युद्धप्रसंगी अळंटळं करण्याच्या सर्व कारणांचा स्वतंत्र्य मजूर पक्षाने विचार केला आहे. ही कारणे बरीच संयुक्तिक आहेत ही गोष्टही कोणास नाकबूल करता यावयाची नाही. निव्वळ पोलंडचे संरक्षण करणे हाच काय तो युद्धाचा हेतू असता तरी वरील कारणास अधिक बळकटी आली असती. चालू युद्धात पोलंडच्या बाजूला न्यायाचे पारडे झुकत आहे, असे स्वतंत्र मजूर पक्षाचे मत नाही. पोलंडने केव्हाच लोकशाहीचे श्राद्ध उरकून टाकलेले आहे. ज्यू लोकावर पोलंडने जर्मनीपेक्षा कमी अन्याय केलेले नाहीत. चालू भीषण परिस्थितीत पोलंडने रशियाची मदत घेऊन जगण्यापेक्षा मरणच बरे, असे धोरण ठेवले आहे. चालू युद्ध निव्वळ पोलंडच्या रक्षणासाठी पुकारलेले नाही, असे स्वतंत्र मजूर पक्षाचे मत आहे. पोलंडचे रक्षण हा युद्धाच्या हेतूपैकी एक कार्यभाग आहे इतकेच. पोलंड व जर्मनी यांच्या युद्धाच्या मुळाशी एक व्यापक व गंभीर प्रश्न आहे, हे कोणासही नाकबूल करता यावयाचे नाही. जगातील अनेक राष्ट्रांपैकी एक राष्ट्र म्हणून राहण्यास जर्मनी कबूल नाही. जर्मनीला आपण उच्च दर्जाचे राष्ट्र आहो ही गोष्ट जगाला पटवून द्यावयाची आहे. आपले म्हणणे इतर राष्ट्रांनी मान्य केलेच पाहिजे, असा जर्मनीचा आग्रह आहे व असे न केल्यास जबरदस्तीने आपण आपले म्हणणे मान्य करावयास इतरास भाग पाडू, असे चालू युद्धाने जगास जर्मनीने आव्हान दिलेले आहे. हे आव्हान निव्वळ पोलंडला दिलेले नसून सर्व जगासच दिलेले आहे. अशा स्थितीस सर्व राष्ट्रास समानतेचे हक्क आहेत असे मानणाऱ्या राष्ट्रांनी जगाच्या संस्कृतीत आपणासही भर टाकता यावी म्हणून सहकार्य करून जर्मनीच्या शिरजोरीला आळा घालणे हेच त्याचे

कर्तव्य आहे. जर्मनीची माजोरीची मागणी हा जगाचा उपमर्द आहे, व हिंदुस्थानला तर ही शिरजोरी सर्वथैव तिरस्करणीय वाटत आहे. हिन्दुस्थानच्या इच्छा व महत्त्वाकांक्षा यांना जर्मनीच्या शिरजोरीच्या मागणीने मूठमाती मिळणार आहे. हिन्दुस्थानला स्वराज्य हवे असून कितीही संकटे आली तरी ते मिळविण्याचा व मिळाल्यावर टिकविण्याचा हिन्दुस्थानचा निर्धार आहे. नॉर्डीक वंशाच्या लोकांनीच जगाचे राज्य करावे व इतर लोकांनी त्या लोकांच्या अंकीत राहावे असे जर्मनीचे म्हणणे असल्याने जर्मनीचे धोरण म्हणजे जगातील इतर सर्व लोकांना आव्हानच होय. अशा स्थितीत जर्मनीचे हे आव्हान स्वीकारून आपल्या स्वातंत्र्याच्या ध्येयासाठी झगडून आपला हक्क शाबीत करण्याशिवाय हिन्दुस्थानला गत्यंतर नाही. स्वतंत्र मजूर पक्षाची अशी भूमिका असल्यामुळे हिन्दुस्थानच्या रक्षणासाठी हिन्दी लोकांनी ब्रिटनला पूर्ण पाठिंबा दिला पाहिजे, असे या पक्षाचे सांगणे आहे.

इतर पक्षांचे लोकही ब्रिटनला युद्धात मदत करण्याच्या कामी टाळाटाळ करीत आहेत, ही गोष्ट स्वतंत्र मजूर पक्षाला माहीत आहे. इतर पक्षांचे हे धोरण तत्त्वावर आधारलेले नसून ते डावपेचासाठी स्वीकारण्यात येत आहे. इंग्लंडची आपत्ती हीच हिंदुस्थानची संधी असे त्यांना वाटते. मुस्लीम लीग व हिन्दुसभा या इंग्लंडच्या आपत्तीचा फायदा घेऊन आपल्या पारड्यात जादा हक्क पाडून घेऊन जातिनिवाडा आपआपल्या दृष्टीने दुरुस्त करू पहात आहेत. या जातिनिविष्ट धोरणाचा विचार करण्याची येथे जरूरी नाही. इंग्लंडची गरज ही हिन्दुस्थानच्या स्वातंत्र्याची संधी होय असे तिसऱ्या एका महत्वाच्या पक्षाचेही मत आहे. हे समजणे कठीण आहे. हिन्दुस्थानला आपल्या शक्तीच्या जोरावर आपणास हवे ते मागण्याची ही संधी आहे, असे त्या पक्षाचे म्हणणे असल्यासही हिन्दुस्थानची संधी पोकळ आहे. त्यात काही राम नाही असेच कोणासही कबूल करावे लागेल. गांधींचा सत्याग्रहाचा दमछाकीचा मार्ग असून तो पुन्हा हाताळण्याचा कोणाचाही मानस नाही. इंग्लंडच्या एखाद्या शत्रूस पाचारण करून हिंन्दुस्थानची गुलामगिरीतून मुक्तता करण्याची ही संधी आहे, असे म्हणणे हे आपणास जाळ्यात अडकवून घेण्यासारखे आहे. बोलावून आणलेला पाहुणा घरधनी होण्याचा संभव असल्याने, भावनावश न झालेल्या कोणाही विचारी इसमास असे करणे शहाणपणाचे वाटणार नाही. जवळच्या भविष्य काळाकडे नजर टाकल्यास, हवेत त्रिशंकूप्रमाणे तरंगत राहण्याची इच्छा नसणाऱ्या कोणासही, हिंदुस्थानने ब्रिटीश साम्राज्यातच राहून ब्रिटनपासून समानतेचे हक्क प्राप्त करून घेण्याचे प्रयत्न करावे, असेच वाटणार, असा स्वतंत्र मजूर पक्षाचा विश्वास आहे. आजपर्यंत हिन्दुस्थानने बराच प्रवास करून या स्वातंत्र्याच्या मार्गावर मोठा पल्ला गाठलेला आहे.

उरलेला मार्ग थोडा असून तो आक्रमणणे ही हिन्दुस्थानच्या आटोक्यातले आहे. स्वातंत्र्यासाठी हिन्दुस्थानच्या परक्या मित्रास पाचारण करणें हे आत्मघातकी ठरले नाही तरी हातचे सोडून पळत्याच्या मागे लागण्यासारखे मूर्खपणाचे खास ठरणार. नव्या धन्याच्या हुकमतीत हिन्दुस्थानचे काय होणार हे कोणासही सांगता येणे शक्य नाही. या सट्टेबाजीच्या अनिश्चित धोरणाचा त्याने सर्वनाश होणार असला तरी हिन्दी लोकांनी अंगीकार करावा, असे कोणताही शाबूत डोक्याचा माणूस सांगू शकणार नाही.

हिंदुस्थानच्या लोकांनी आपल्या हितार्थ चालू युद्धात ब्रिटनशी सहकार्य करणे अगत्याचे आहे. ब्रिटननेही हिंदुस्थानसंबंधी करावयाची आपली कर्तव्ये ओळखून ती यापुढे दिरंगाई न करता पार पाडली पाहिजेत.

हिंदुस्थानच्या लोकास आपल्या देशाचे संरक्षण करण्यास तयार करणे हे ब्रिटनचे पहिले कर्तव्य होय. हिंदुस्थानवर सर्व बाजूंनी हल्ला करता येण्यासारखा आहे. असे असूनसुद्धा आज हिंदुस्थानइतका संरक्षणरहित असा दुसरा कोणताही देश नाही. जमीन, समुद्र व हवा या तिन्हीपैकी कोणत्याही मार्गाने हिंदुस्थानवर आक्रमण झाल्यास त्याजपाशी स्वतःच्या हिंमतीवर प्रतिकार करण्याचे साधन उपलब्ध नाही. संरक्षणासाठी मुख्यत्वेकरून आज हा देश ब्रिटीश सैन्य, ब्रिटीश आरमार व ब्रिटीश विमाने यावरच अवलंबून आहे. राऊंड टेबल कॉन्फरन्समध्ये हिंदुस्थानच्या संरक्षणाची जबाबदारी हिंदुस्थानवर सोपविण्याचे ठरले होते. पण आजतागायत हे तत्त्व अमलात आणण्यासाठी उपाय योजना करण्यात आलेली नाही. लष्करी शाळा व लष्करातील अधिकाराच्या जागा देणे याबाबत बरीच वाच्यता करण्यात येत आहे. हिंदी लोकांना देशाच्या संरक्षणासाठी तयार करण्याच्या मानाने पाहता वरील दोन्ही गोष्टी गौण आहेत, असे स्वतंत्र मजूर पक्षाचे मत आहे. अमुक एका वयावर सर्व हिंदी लोकांना जात, वर्ग, धर्म वगैरे गोष्टीचा विचार न करता सक्तीचे लष्करी शिक्षण देणे ही अत्यंत महत्वाची गोष्ट होय. हे धोरण स्वीकारल्यानेच हिंदुस्थानच्या संरक्षणाचा प्रश्न सुटणार आहे. हिंदुस्थानची मानवी शक्ती अपरिमित आहे. या शक्तीची जोपासना केली तर हिंदुस्थानच्या संरक्षणाचा प्रश्न सुटेल असे नाही तर अखिल ब्रिटिश साम्राज्यावर केवढाही बलाढ्य शत्रू आला तरी त्याचा बंदोबस्त करणे शक्य होईल. अशी परिस्थिती असतांनाही ब्रिटीश सरकारने हिंदी लोकास लष्करी शिक्षण न देणे ही आश्चर्याची गोष्ट होय. लढाईपुरते हिंदी लोकांना सरकारने युद्धास बोलावून लढाई संपल्याबरोबर त्यांना युद्धास नालायक म्हणून सोडून देणे, ही आश्चर्य करण्याजोगी गोष्ट नाही काय ? ब्रिटिश सरकार हिंदी लोकांना युद्धकाळी व युद्धानंतर युद्धक्षम करण्यास का तयार नाही, असा प्रश्न सर्व बाजूंनी विचारण्यात येत असतो. हिंदी लोकांवर ब्रिटिशांचा विश्वास नाही म्हणून ते

हिंदी लोकांना सक्तीचे शिक्षण देत नाहीत असा सार्वत्रिक समज आहे. लोकांच्या मनातील हा किंतू काढून टाकण्याचे प्रयत्न करावयास हवेत. हिंदी लोकांनी आपणास मदत करावी. आपले संरक्षण करावे अशी ब्रिटनची इच्छा असल्यास त्याने हिंदी लोकांवर विश्वास ठेऊन त्यांना लष्करी शिक्षण देणे अगत्याचे आहे. विश्वासानेच विश्वास वाढतो, ही गोष्ट खरी आहे. हिंदुस्थानीय खड्या सैन्यातही युद्धास लायक व नालायक असा भेदभाव न करता सर्व जातीच्या लोकांचा शिरकाव झाला पाहिजे. अधिकाराची जागा हिंदी लोकांना देतांना पक्षपात न होता देण्याची व्यवस्था झाली पाहिजे. सध्या फक्त श्रीमंतासच लष्करी व नाविक शिक्षण घेता येते. श्रीमंत लोक अशा शिक्षणास पात्र असतात म्हणून त्यांना हे शिक्षण मिळते असे म्हणता येणार नाही. त्यांच्याजवळ पैसा असल्यामुळे त्यांना हे महागडे शिक्षण घेता येते, अशी वस्तुस्थिती आहे. ब्रिटीश सरकारला जनतेचा विश्वास संपादन करावयाचा असल्यास त्यांनी लष्करातील वरिष्ठ जागा काही फक्त श्रीमंतास व विशिष्ट जातीच्या लोकास देऊन एक वतनदार वर्ग निर्माण करण्याचे धोरण सोडून दिले पाहिजे.

ब्रिटिश साम्राज्यातील हिंदुस्थानचा दर्जा समानतेचा आहे. अशी हिंदुस्थानची खात्री करून देणे हे ब्रिटीश सरकारचे दुसरे कर्तव्य आहे. हिंदी राज्यघटनेच्या कायद्यात हिंदुस्थानला डोमिनिअन स्टेटस् देणे हे ध्येय निर्दिष्ट करण्याचे टाळले असल्याने बऱ्याच लोकांना विषाद वाटत आहे. लॉर्ड अर्विन यांनी सन १९२९ मध्ये दिलेल्या आश्वासनास पार्लमेंटने १९३५ मध्ये हरताळ फासल्याने बऱ्याच लोकांचा ब्रिटीशावरील विश्वास डळमळू लागला आहे. याबाबतीतील हिंदी लोकांच्या शंका ताबडतोब दूर केल्या पाहिजेत. तत्त्वासाठी हिंदुस्थानने युद्ध करावयाचे तर युद्ध जिंकल्यानंतर या तत्त्वाचा फायदा हिंदुस्थानच्या पदरात पुरेपुर पडला पाहिजे.

वरील विवेचनावरून स्वतंत्र मजूर पक्षाचे धोरण स्पष्ट होते. व्हाईसरॉय साहेबाच्या ब्रिटनला मदत करण्यासाठी केलेल्या विनंतीवर दिलेली कारण परंपरा लक्षात घेऊन स्वतंत्र मजूर पक्षाचा पूर्ण पाठिंबा आहे. या आणीबाणीच्यावेळी मदत करण्यापूर्वी शर्ती घालणे योग्य होणार नाही, असे या पक्षाचे मत आहे. तरीपण ब्रिटीशांनी व हिंदी लोकांनी आपण एकत्र का लढत आहो व आपण परस्परापासून काय अपेक्षा करीत आहोत, याची जाणीव करून घेणे अगत्याचे आहे, असे स्वतंत्र मजूर पक्षाला वाटते.

●●●

जनता : २६ सप्टेंबर १९३९

८५

अस्पृश्यतेची कुळकथा

'' हिंदुस्थानातील लोकांनी शेतीस नुकतीच कोठे सुरवात केली होती. अशा प्राचीन काळापासून आपण या अस्पृश्यतेच्या कुळकथेचा विचार करावयास हवा. फार प्राचीनकाळी स्थानबद्ध शेतकऱ्याप्रमाणे गुरेढोरे बाळगून त्यांना चारापाणी मिळेल अशा ठिकाणी इतस्ततः भटकत राहणारे धनगर वृत्तीचे लोकही असत ही गोष्ट आपण प्रथमतः लक्षात घेतली पाहिजे. या धनगर वृत्तीच्या लोकांत चारापाण्यासाठी नेहमी लढाया चालू रहात असत व त्यांना अनेक प्रसंगी स्थानबद्ध झालेल्या शेतकरी वर्गाशीही झुंजावे लागत असे हे उघड आहे. या नित्य चालू असलेल्या लढ्यामुळे या भटक्या धनगर वृत्तीच्या जमातीपैकी काही नाश पावत असत, या पसरलेल्या लोकांना वाहतुकीची साधने त्याकाळी उपलब्ध नसल्यामुळे, संघटित होणे कठीण जात असे हे सांगणे नकोच अशा स्थितीत त्यांनी काय करावे हा प्रश्नच होता.

वर सांगितल्याप्रमाणे त्याकाळी पुष्कळ लोक शेतकरी होऊन स्थानबद्ध झालेले होतेच. या लोकांना आपली शेतवाढी, घरे दारे, पीकपाणी व उच्च संस्कृति यांना या भटक्या लोकांकडून उपसर्ग होऊन शांतता भंग होऊ नये अशी तीव्र इच्छा वाटत असे. पण या भटक्या सडेसोट फाटक लोकांशी तोंड देण्याचे सामर्थ्य मात्र त्या लोकांत नसे हे सांगणे नकोच.

या भटक्यांच्या उपद्रवापासून आपल्या मालमत्तेचे संरक्षण करण्याच्या हेतुने त्याकाळच्या शेतकरीवर्गाने या भटक्यापैकीच आपसांतील लढायामुळे, जर्जर व विस्कळीत झालेल्या लोकांची गांवरक्षक म्हणून योजना केली व त्यांना गावाबाहेर जमिनी देऊन त्यांजकडे शांतता राखून सुव्यवस्था राखण्याचे काम सोपविण्यात आले.

या रक्षकांनी खेड्यांचे रक्षण करण्याचे आपले कर्तव्य पिढ्यानुपिढ्या बजावले आहे. त्या कालांत खेड्यांच्या सीमेवर राहणारे हे संरक्षक व खेड्यांतील शेतकरी यांच्यामध्ये सलोख्याचे व माणुसकीचे संबंध असून त्याकाळी अस्पृश्यतेची कल्पना कोणासही नव्हती. तर मग या अस्पृष्यतेचा जन्म कसा झाला.

अस्पृश्यतेचा उगम कसा झाला हे पाहण्यासाठी आपणास बुद्धधर्माच्या वाढीच्या इतिहासाकडे नजर फिरविली पाहिजे. हिंदुस्थानच्या इतिहासांत जेत्यानाही कधी न मिळलेले यश बुद्धधर्माला मिळाले. तो धर्म या देशांतील कानाकोपऱ्यांतही हां, हां म्हणता पसरला. थोड्यांच पिढ्यांत हिंदुस्थानातील शेतकरी व व्यापार उदीम करणाऱ्या जनतेने बुद्धधर्माचा स्वीकार केला.

ब्राह्मणी धर्माला या बुद्धधर्माच्या प्रचाराने भयंकर भीती वाटू लागली. ब्राह्मणांनी मोठ्या धूर्ततेनें आपणास प्रिय असणाऱ्या अशा आपल्या पुरातन सामाजिक व धार्मिक चाली झुगारून नव्या परिस्थितीशी जुळतें घेतलें नसते तर ब्राह्मणीधर्म खास रसातळास गेला असता. ब्राह्मणांच्या या संधिसाधु धोरणानेंच त्यांचा धर्म तगला हें उघड आहे.

ब्राह्मणानीं त्यावेळीं काय केलें तें आपण पाहू या. बुद्धधर्माची शिकवण मुख्यत्त्वें करून त्रिविध स्वरूपाची होती व तिने जनतेच्या मनाची पकड घेतली होती. बुद्धधर्मातील समतेची घोषणा, हिंसा व चातुर्वर्ण्य व यज्ञयाग यांचा निषेध, यांनी जनतेची मने आकर्षुन घेतली होती. ब्राह्मणी धर्माच्या यज्ञयागानें जनतेची नागवणूक होत असल्यामुळे तिला या धार्मिक उपाधींचा वीट आलेला होता.

याकालचे ब्राह्मण मुळींच शाकाहारी नसत. ते अगदी ' मटण मार्तंडच ' असत. देवांच्या नावाने ते हजारो गाई व इतर पशू मारून आपली मांसाशनाची खाज ते धर्माच्या पांघरुणाखाली देवास नैवेद्य दाखवून भागवीत असत.

या मांसाशनाच्यां अतिरेकानें पशुहत्त्या होऊन शेतकऱ्यांची नागवणूक होत असे. यज्ञयागासाठी गाई त्या शेतकऱ्यांनाच पुरवाव्या लागत. ब्राह्मणांच्या या कसाब करणीनें शेतकऱ्यांस आवश्यक असणारे दुधदुभते व त्यापासून उत्पन्न होणारे पदार्थ याचे दुर्भिक्ष्य पडून शेतकऱ्यांच्या सात्विक अन्नाचा झराच आटवून टाकण्यांत येत असे.

वेदांतील पशुयज्ञांची उघडी नागडी वर्णने वाचून, या अंगावर शहारे आणणाऱ्या अमानुष यज्ञयागांची हिडीस कल्पना, आजही करिता येण्याजोगी आहे. या ब्राह्मणी रानटीपणाची आजही प्रत्येक सभ्यमाणसांस खंत येणारच व त्या जुन्याकाळच्या सभ्यांनाही तिचा तिटकारा वाटत असलाच पाहिजे.

बुद्धाचा अवतार झाल्यावर त्याने या यज्ञयागाविरुद्ध व हिंसेविरुद्ध बंड पुकारले. जनतेला आर्थिक व नैतिक दृष्ट्या बुद्धाची शिकवण तंतोतंत पटली व त्यांनी ब्राह्मणीधर्माला लाथ मारून बुद्धधर्माचा अंगिकार केला.

या बुद्धधर्माच्या वाढत्या लाटांपासून, ब्राह्मणीधर्माने आपला बचाव कसा केला, हे पहाण्याजोगें आहे. त्या धर्मानें आजपर्यंतचें आपले यज्ञयाग व धार्मिक विधितंत्र झुगारून दिले. गोमांसावर यथेच्छ ताव मारणाऱ्या या ब्राह्मणांनी गाईच्या माना मुरगळण्याचे सोडून बुद्धधर्मावर चढाई करण्याच्या पापी दृष्टीने, गाईला आपली पवित्र गोमाता बनवून सोडले.

अशा रीतीनें मांसभक्षक ब्राह्मण शाकाहारी बनून, सोमरस पिऊन झिंगणाऱ्या ब्राह्मणांचे रूपांतर होऊन, त्यांनी सुरापानास महापातक ठरविले.

क्षत्रियांना बुद्धधर्मापासून परावृत्त करण्यासाठी व त्यांना ब्राह्मणधर्मात डांबून ठेवण्यासाठी ब्राह्मणांनी, त्यांना आपल्या बरोबरीचे हक्क दिले. वैश्यशूद्रांना ब्राह्मणधर्मातून फुटून जातां येऊं नये म्हणून ब्राह्मण व क्षत्रियांनी पोलीस शिपायाप्रमाणे त्यांच्या दोहोंबाजूस राहून, त्याना आपल्या कळपातच राखले पाहिजे अशा अर्थांची वचने ब्राह्मणी धर्मग्रंथातून आढळतात.

गाईला पवित्र ठरवून व बुद्धधर्माच्या इतर अनेक शिकवणींचा ब्राह्मणी धर्मात अंतर्भाव करून ब्राह्मणांनी यज्ञयागाची आपल्या धर्मातून हकालपट्टी केली व अशारितीने जे असंख्य हिंदुलोक बुद्धधर्मात गेले होते त्यांना पुनरपी आपल्या धर्मात सामील करून घेतले. ब्राह्मणांनी बुद्धाच्या समतेचा स्वीकार करून चातुर्वर्ण्याची चौकट मात्र कधीही नाहीशी केली नाही ही लक्षात घेण्याजोगी गोष्ट आहे. त्यांनी एक गोष्ट केली. क्षत्रियांना आपल्या बरोबरीने हक्क देऊन ब्राह्मणी वैदिक देवता, इंद्र, वरुण, अग्नि वगैरे यांची धूर्तपणे हकालपट्टी केली व त्यांच्या जागी इतर क्षत्रियांना प्रिय असणाऱ्या रामकृष्णादि देवांची स्थापना केली. अशा अनेक तडजोडी करून त्यांनी आपला डाव मोठ्या मुत्सद्देगिरीने साधला.

या तडजोडीच्या चाणक्यपणांतून बुद्ध धर्माला तिटकारा वाटण्याजोगी एक गोष्ट घडून आली. गोयज्ञाची बंदी बुद्धानेच केली होती. गाईला ब्राह्मणांनी पवित्र बनवून सोडले होते. हिंदुंना हा गाईचा पवित्रपणा पटून त्यांनी गोवध बंद केले. आज ज्यांना आपण अस्पृश्य समजतो त्या लोकांनीही गोवध बंद केलेच. परंतु हे अस्पृश्य लोक दारिद्र्यांत असल्याने त्यांना ताजे मास विकत घेणे शक्य होत नसे. त्यांनी आपली मृतमांस भक्षणाची पुरातन चाल मात्र पुढे चालू ठेविली.

बुद्धानी व ब्राह्मणांनी, कोणीही, मृत जनावरांच्या मांस भक्षणाची बंदी केलेली नव्हती. जिवंत गाई मारण्याविरुद्ध दोघांचाही कटाक्ष होता. परंतु आजच्या अस्पृश्य मानलेल्या लोकांनी एक मोठा गुन्हा केला. दारिद्र्यानें पीडलेल्या

समाजाच्या खालच्या थरांतील या लोकांनीं बुद्ध धर्माला फार काळ चिकटून राहण्याचा मोठा भयंकर गुन्हा केला. त्यांना ताळ्यावर आणण्यासाठी वर्षानुवर्षे महाप्रयास करावे लागले. दुसऱ्या कोणत्याही उपायांनी ते ताळ्यावर येत नाहींत असें पाहून त्यांज्वर कडक बहिष्कार घालून त्यांना अस्पृश्यतेच्या गर्तेत लोटून देण्यांत आलें.

त्यांचे मृतमांस भक्षण हेंच शस्त्र त्यांजविरुद्ध वापरण्यांत आले. या अभक्ष्य भक्षणाची हिंदुंना साहजिकच शिसारी येई. ब्राह्मणांनीं या परिस्थितीचा पुरेपुर फायदा घेऊन कोट्यावधी लोकांना अस्पृश्य म्हणून वाळींत टाकलें. इतर लोकांनी बुद्धधर्म सोडला त्याप्रमाणेंच या लोकांनीही बुद्धधर्म सोडला त्याप्रमाणेंच या लोकांनीही आपली पगडी फिरवली नाही म्हणूनच त्यांना ही जन्मठेपेची, वंशपरंपरागत शिक्षा ठोठावण्यांत आली आहे. अशी या अस्पृश्यतेची कुळकथा असून आजच्या सुशिक्षणाच्या, स्वातंत्र्य ध्येयाच्या व समाज समतेच्या नवयुगांतही ती आज सुखरूपपणें नांदत आहे हें नवल नाहीं काय ? ''[१]

---

[१] जनता, २ मार्च १९४०.

८६

वृत्तपत्रांच्या स्वातंत्र्य रक्षणाचा मार्ग

" हिंदुस्थानांत लोकशाही यशस्वी करावयाची असल्यास तसें करण्यासाठीं योग्य असें राजकीय यंत्र निर्माण करण्यांत आलें पाहिजे.

हिंदुस्थानांतील सामाजिक परिस्थिती, येथील जातिभेद व सर्वत्र पसरलेला दैववाद, दारिद्र्य व श्रीमंती यामधील विक्राळ दरी, वगैरे गोष्टींचा विचार करूनच हे राजकीय यंत्र निर्माण केलें पाहिजे.

यादृष्टीनें प्रांतिक सरकारचा विचार करूं लागल्यास, विरोधी पक्षाची, लोकशाहीच्या दृष्टीनें, सरकारी पक्षाइतकीच आवश्यकता आहे ही गोष्ट उघड होते. या विरोधी पक्षाचा व सरकारी पक्षाचा दर्जा समान असला पाहिजे. मुख्य प्रधानाप्रमाणेंच विरोधी पक्षाच्या नेत्याला पगार दिला पाहिजे. कानडामध्यें आज कित्येक वर्षे असे करण्यांत आलें आहे. इंग्लंडमध्येही नुकतीच ही पद्धति सुरूं केली आहे. इंग्लंड व इतर लोकशाही देशांतून विरोधी पक्षाच्या नेत्याशीं विचारविनिमय केल्याविना कोणताही महत्वाचा कायदा अगर क्रिया करण्यांत येत नाहीं. या विरोधी पक्षाच्या नेत्याला, मुख्य प्रधानाप्रमाणेंच सर्व राष्ट्रीय प्रश्नांचा अभ्यास करावा लागतो.

ह्या विरोधी पक्षाच्या नेत्याला आपला सर्व वेळ याच करतां खर्चावा लागत असतो. हिंदी प्रांतांतील विरोधी पक्षाच्या नेत्यांना आपल्या पक्षाचे लोकशाहीस आवश्यक असणारें काम यथायोग्य बजावावयाचें असल्यास त्यांनी या कामांतच आपला सर्व वेळ खर्च केला पाहिजे. असें करणें झाल्यास त्यांना मुख्य प्रधानाप्रमाणेंच तनखा मिळून, त्यांना लागणारे सेक्रेटरी व इतर साधनसामुग्री सरकारी पक्षाप्रमाणेंच सरकारच्या खर्चाने पुरवली पाहिजे व त्यांचा सल्लाही सरकारी पक्षानें हरएक महत्त्वाच्या प्रश्नाबाबत घेतला पाहिजे.

लोकशाहीतील निवडणुकींसाठीं इतका मोठा खर्च करावा लागतो की, त्या काँग्रेससारख्या भांडवलशाही पक्षाशिवाय इतरांना लढवतां येणें शक्य नाहीं. दर उमेदवारामागे पांच ते वीस हजार रुपये खर्च केल्याविना या निवडणुकी लढविणें अशक्य होते. चालू निवडणुकीची पद्धत यापुढें अशीच चालू रहाणार असल्यास

या निवडणुकी अमेरिकेप्रमाणेंच येथेहि भांडवलदारांच्याच हुकमती खाली लढविल्या जाणें अपरिहार्य होऊन रहाणार आहे. आजच्या कॉंग्रेस सरकारलाही कायदे मंडळाबाहेरील बेजबाबदार, बड्या धेंडाचेच हुकूम पाळावे लागतात हें उघड आहे. ही परिस्थिती यापुढें अधिकच भयंकर झाल्याविना रहाणार नाही खास. लोकशाही सरकारला निवडणुकींची आवश्यकता असल्यास, त्या सरकारनें या निवडणुकींचा खर्च भागविणें हें त्या सरकारचें कर्तव्यच आहे. प्रत्येक निवडणुकीस उभे राहणाऱ्या उमेदवारास त्याला ठराविक प्रमाणांत मते मिळाल्यास, त्याच्या निवडणुकी प्रीत्यर्थ झालेल्या खर्चाची ठराविक रक्कम सरकारनें त्यास दिली पाहिजे. असें केल्यानें अलबत्यागलबत्या उमेदवारास उभे राहणें कठीण होऊन, मध्यम व गरीब वर्गाच्या लायक उमेदवारास भांडवलदार जमीनदार वगैरे लोकांच्या आहारी न जातां निवडून येणे शक्य होईल हें सांगणे नकोच.

याशिवाय वृत्तपत्रांना पूर्ण स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठीं एक पन्नास लाख भांडवलाची समिती निर्माण करून तीस कायद्यानें मान्यता देणें आवश्यक झालें आहे. या समितीचें विश्वस्त सरकारने दोन्ही कायदे मंडळाच्या मतानें नेमावें. वृत्तपत्रांचे संपादकही याच पद्धतीनें नेमण्यांत यावे. पण वरील विश्वस्त व संपादक यांना हायकोर्टाच्या न्यायाधिशा इतकेंच मतस्वातंत्र्य दिलें पाहिजे. त्यावर सरकारी नियंत्रण असतां कामा नये.

या विश्वस्तांना व संपादकांना 'अयोग्य वर्तनाबद्दल' त्यांचे स्वतःच्या बचावाबद्दल काय म्हणणें आहे तें ऐकल्यानंतर, दोन्ही कायदे मंडळाच्या ठरावानेंच जरूर पडल्यास काढण्यांत यावें.

अमेरिकेंत सुप्रीम कोर्टाचे न्यायाधिश नेमण्याबाबत ज्या पद्धतीचा अंगिकार करण्यांत येतो तीच पद्धत वरील विश्वस्त व संपादकवर्गाच्या निवडणुकीबाबत सुचविण्यांत आली आहे. वर्तमान पत्राच्या चालकवर्गाला जें कर्तव्य बजावावयाचें असते, त्याची योग्य जाणीव त्यांना स्वतःला व वाचकवर्गालाही असल्याचें दिसून येत नाही ही दुःखाची गोष्ट होय. वर्तमानपत्रांच्या चालकांला आपलीं मतें प्रतिपादन करण्याचे व सार्वजनिक प्रश्नांची शहानिशा करण्याचे हायकोर्टच्या न्यायाधिशांप्रमाणेच पूर्ण स्वातंत्र्य असलें पाहिजे. बाह्य उपाधींच्या नियंत्रणानें त्यांच्या निर्णयास बाधा येतां कामा नये.

हिंदी वर्तमानपत्रांचा चालकवर्ग भांडवलशाहीच्या मुठींत जाण्याची भीति जास्त आहे. हिंदुस्थान इतकी ही भीति इतर कोणत्याही देशांत नाही. आजच्या कॉंग्रेस पत्रांतून कामगार व किसानाबाबत पुष्कळच गोष्टी छापण्यांत येत असतात

हें खरें आहे. पण परक्या भांडवलदारांविरुद्ध हिंदी भांडवलदारांचा जो लढा सध्या येथे चालू आहे त्यांत कामगार व किसानांची मदत मिळावी हाच या लिखाणाचा हेतु असतो. हा लढा थांबून हिंदी भांडवलदारांच्या पक्षपाती कॉंग्रेसच्या हातीं राज्यसूत्रें आल्याबरोबर हा कामगार, किसान सहानुभूतीचा झरा आटून जाईल व भांडवलशाहीचें खरें स्वरूप प्रगट होऊं लागेल यांत संशय नाही.

आजच्या परिस्थितींतही कॉंग्रेसविरोधी राजकीय कार्यकर्त्यांना, कॉंग्रेस पत्रकारांकडून न्याय मिळणे अशक्य झाले आहे. आज वर्षानुवर्षे मला स्वतःला या पत्रकारांनी अन्यायानेच वागविले आहे. कित्येक वर्षे माझ्या व माझ्या मताच्या इतर लोकांचे म्हणणे ऐकावयासही हे तयार नसत. आमच्याबद्दल गैरसमज उत्पन्न करून त्यांचे निराकरण करण्याची संधी आम्हांस द्यावयाची नाही असेंच यांचे धोरण आहे. चालू चळवळीनें हिंदी भांडवलादारांचे मनोरथ पूर्ण झाल्यावर ही स्थिति शतपट भीषणच होणार यांत संशय नाही. पक्षाच्या दृष्टीने विचार करतांही, इतर पक्षांची मुस्कटदाबी करण्याचें हे धोरण घातकच ठरणार.

कानडा व इतर कांही देशांत एखाद्या सार्वजनिक कार्यकर्त्यावर वर्तमान पत्रांतून हल्ला झाल्यास या कार्यकर्त्यास, हल्ला करणाऱ्या पत्रांतून आपल्या वरील हल्ल्यास दिलेलें आपलें उत्तर छापून घेण्याचा कायदेशीर हक्क असतो. अशा तऱ्हेची कायदेशीर व्यवस्था करणें हें येथेंहि अत्यावश्यक झालें आहे.

अशा तऱ्हेनें सरकारनें निर्माण केलेली समिती, जी वृत्तपत्रें चालवील त्यांवर कोणत्याही पक्षाची हुकमत न चालल्यामुळें त्यांना पूर्ण मतस्वातंत्र्य उपभोगतां येईल. दुसऱ्या खाजगी पत्रांना ही पत्रें आदर्शभूत होऊन त्यांच्या योगें जनतेला सर्व महत्वाच्या प्रश्नाबाबत, सरकारी व विरोधी पक्षांची मतें कांही असली तरी, योग्य असें मार्गदर्शन होईल. सर्वपक्ष व भिन्न भिन्न मताचे राजकीय पुढारी यांजबद्दल अशी पत्रें तटस्थ राहून एकारलेली मतें व पक्षांधतेची जाहिरातबाजी यांना ती आळा घालू शकतील.

अर्थात इतर पक्षांना जिवंत राहण्याचा हक्क नाही असें कॉंग्रेसला वाटत असल्यामुळें तिला ही कल्पना मानवणार नाही. शक्य झालें तर ती इतर सर्व पक्ष व स्वतंत्र मतवादी लोक यांना नामशेष करण्याचेच प्रयत्न सतत करीत राहील. पण शुद्ध सार्वजनिक जीवनाची आम्हास कदर असल्यामुळे हिंदुस्थानच्या नव्या घटनेत वृत्तपत्रांचें स्वातत्र्य अबाधित राहाण्यासाठी आम्ही अशी कायदेशीर समिती निर्माण करण्याची योजना घडवून आणू व खऱ्या लोकशाहीचे संरक्षण करू अशी आम्हास उमेद आहे. ”[१]

●●●

---

[१] जनता, ९ मार्च १९४०.

८७

राष्ट्र अजून बनायचेच आहे !

''लीगच्या मुक्तिदिन समारंभानंतर इतर जातींतही राजकीय हक्कासंबंधी धडपड करण्याची प्रवृत्ती उत्पन्न झाली. याबाबतीत विचार विनिमय करण्यासाठी पार्शी जातीतील काही लोकांची बैठक डॉ. एफ. के. दादाचांदजी, श्री. एन. एच. एहनवाला आणि श्री फिरोजशहा मेहता या तिघांनी प्रेसिडेन्सी असोसिएनच्या कचेरीत घेतली. ती सोमवारी ५-२-१९४० रोजी सायंकाळी झाली. पार्शी जातींतील ३० प्रमुख गृहस्थ बैठकीस बोलविलेले होते. बॅ. वि. दा. सावरकर व डॉ. आंबेडकर यांनाही आमंत्रण असल्यामुळे ते बैठकीस उपस्थित झाले. डॉ. आंबेडकरांनी पार्शी जातीला असा सल्ला दिला की ही जात मुंबईत जास्त आहे. व येथील दैनंदिन घडामोडीत पार्शी लोकांना भाग घेता येईल. तो भाग त्यांनी कोणत्या पक्षातर्फे घ्यावा हा मुद्दा महत्वाचा नाही, पण त्यांनी गुपचूप न बसता चळवळीत भाग घ्यावा हे महत्वाचे आहे. त्यांनी कॉंग्रेस विरोधी फळी उभारण्यासाठी अस्पृश्य लोक, मुसलमान, हिंदू महासभावादी हिंदू वगैरे जमातींची एकजूट केली तर कॉंग्रेस व तिचा विरोधी पक्ष ही फळी, असे चित्र देशात दिसेल. राजकीय दृष्टीने हे इष्ट आहे. विरोधी पक्षाला इंग्लंडमध्ये महत्त्व आहे. तशी हिंदुस्थानात परिस्थिती नाही. ती उत्पन्न करणे जरूर आहे.

पार्शांना अस्पृश्यादी जातींकडून मतदान भरपूर पडेल व त्यांचे उमेदवार निवडून येतील, असा बाबासाहेबांच्या भाषणाचा व त्यांना विचारलेल्या प्रश्नांना दिलेल्या उत्तरांचा सारांश होता.

बॅ. सावरकर यांनी पार्शांने सल्ला दिला की, तुम्ही मुस्लीम लीगशी सहकार्य न करता हिंदू महासभेशी सहकार्य करा. त्यात तुमचे हित आहे. ("Strong Opposition To Congress—Move in Bombay Province—Parsis Advised To Work With Hindu Mahasabha."—*The Times of India.* Tuesday, 6-2-40, p.-7)

कॉंग्रेस व लीग यांचे भारतीय स्वातंत्र्याबद्दलचे जे दृष्टीकोन आहेत, त्याबद्दल डॉ. आंबेडकर याचे विचार आजमाविण्यासाठी टाईम्सच्या प्रतिधिनीने त्यांची सोमवारी ५-२-१९४० रोजी रात्रौ मुलाखत घेतली. भारत हे एक राष्ट्र आहे, हे

कॉंग्रेस व गांधीजी यांचे मत मला मान्य नाही, तसेच हिंदू व मुसलमान यांची दिलजमाई होणे शक्य नाही, हे लीगचे मतही मला मान्य नाही. आजच्या स्थितीत आपण राष्ट्र या स्थितीत नाही. परंतु दोन्ही समाजात ऐक्य साधण्याच्या हेतूने जर योग्य अशा काहीं सामाजिक पुनर्रचना हिंदू व मुसलमान या दोन्ही समाजात करण्यात आल्या तर आपण राष्ट्र या पदवीला पोहोचू शकू, असा माझा विश्वास आहे, असा बाबासाहेबांच्या मुलाखतीतील भाषणाचा सारांश होता. Discussing the Congress and Muslim League viewpoints with a representation of their paper on Monday night, Dr. B. R. Ambedkar, Leader of the Independent Labour Party. said, "I do not agree with Mr. Gandhi and the Congress when they say that India is a nation. I do not agree either with the foreign relations committee of the Muslim League when they say that Hindus and Muslims could not be welded together into a nation.

"My belief is" he continued "that we are not a nation. But my confident hope is that we can be a nation provided proper processes of social amalgamation are set forth"—*The Times of India*, Tuesday, 6-2-1940 p-11). या वृत्तांताची माहिती 'आशा, प्रमोद'ने दिली ती अशी—''[१]

''मला वाटते---हिंदू समाज राष्ट्र नाही. मुस्लीम समाज राष्ट्र नाही. हिंदु-मुस्लीम समाज हेही राष्ट्र नव्हें. राष्ट्र अजून बनायचेच आहे. हिंदु समाजाला पाहिजे असेल तर निराळे राष्ट्र बनविता येईल. मुसलमान लोकांना स्वतःचें राष्ट्र बनवावयाचे असेल तर त्यांनाही निराळे राष्ट्र बनविता येईल. दोघांचं मिळून जर एक राष्ट्र करावयाचं असेल तर तसेही एक राष्ट्र करतां येईल. राष्ट्र ही काही उपजत वस्तु नव्हे. ही घडीव आहे. घडवणाऱ्याची इच्छा असेल तर ते घडवितां येईल. नुसत्या एकत्र मतदार संघानी एवढं होणार नाही. पांच वर्षाच्या अवधींत जे लोक एकमेकांचा तिरस्कार करतात, एकमेकाशीं फटकून

---

[१] खैरमोडे, खंड-९ पृ. ३०–३१.

वागतात त्यांनी एक दिवस निवडणुकी करतां एके ठिकाणी येऊन एकत्र मतदान केल्याने हिंदु-मुसलमानांचं एक राष्ट्र होईल असं म्हणणारे लोक शतमूर्ख आहेत असें माझें म्हणणें आहे.

वरील विचारांत आक्षेप घेण्यासारखें कांही आहे असे कोणासही केव्हांही वाटण्यासारखे नाही. पण कॉंग्रेसच्या आमिषानें ज्याची बुद्धि विकृत झाली आहे त्याची विद्वता भोपळ्या ऐवढी मोठी आहे, डोके नीरासक्तीने फिरलेले आहे व शरीर व मन लूद लागलेल्या कुत्र्याप्रमाणे सडलेले आहे ज्यानें विदुषकीकरून स्वार्थ साधन्यापलीकडे व वाचाळ पंचवीशी पलीकडे आजवर आपल्या आयुष्यांत कधी कांही केले नाहीं अशा पुण्याच्या आधींच मर्कट असणाऱ्यास वरील सुविचार हे तर्कट आहे असें वाटलें तर त्यांत दोष कोणाचा ? पुणेरी टग्यांच्या सुपलींत सदैव लोटांगण घालून ' मी उभा आहे ' असें बडबडणाऱ्या मर्कटाला दुसऱ्याचे सुविचार हें तर्कट वाटणारच. "[१]

●●●

१. जनता, २३ मार्च १९४०.

८८

हिंदी राजकारणाचा विचका

अर्धवट ब्राह्मण धर्माला विघ्न, अर्धवट राजकारणी देशाला विघ्न

गेल्या जून-जुलै महिन्यात काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी दोन महत्वाचे ठराव केले. त्यापैकी पहिला ठराव ता. २२ जून रोजी वर्धा येथे जी काँग्रेस वर्किंग कमिटीची सभा भरली होती त्या सभेत पसार करण्यात आला. त्या ठरावाने '' अहिंसेला हिंदुस्थानच्या राज्यकारभारात काँग्रेस वर्किंग कमिटीच्या मते कोणते स्थान असू शकेल '' या संबंधाने आपली भूमिका स्पष्ट केली गेली आहे. दुसरा ठराव वर्किंग कमिटीच्या दिल्ली येथे ता. ७ जुलै रोजी भरलेल्या बैठकीत पसार करण्यात आला. त्या ठरावाने '' चालू युद्ध व त्या संबंधाने काँग्रेसचे धोरण काय आहे '' हे जाहीर करण्यात आले आहे. हे वरील दोन्ही ठराव नुकतेच पुणे येथे गेल्या आठवड्यात भरलेल्या काँग्रेसच्या ऑल इंडिया कमिटीच्या समोर ठेवण्यात आले ; व ते दोन्ही ठराव ऑल इंडिया काँग्रेस कमिटीने बहुमताने पसार केल्याचे जाहीर झाले आहे. त्यापैकी पहिला म्हणजे अहिंसेबद्दलचा ठराव ९१ विरुद्ध ६३ मतांनी पास झाला व दुसरा म्हणजे ' युद्धविषयक ' ठराव हा ९५ विरुद्ध ४७ मतांनी पास झाला.

वरील दोन्ही ठराव अत्यंत महत्त्वाचे असे आहेत, हे कोणासही सांगावयास नको. काँग्रेसच्या आतापर्यंतच्या इतिहासामध्ये इतक्या महत्त्वाचे दुसरे कोणतेही ठराव झालेले नाहीत, असे म्हटले असता त्यात काही अतिशयोक्ती होईल असे आम्हास वाटत नाही. या ठरावांना एवढे महत्त्व असण्याचे कारण उघड आहे. काँग्रेस ही संस्था गांधींच्या ताब्यात गेल्या दिवसापासून म्हणजे १९२० सालापासून तर १९४० सालापर्यंत 'गांधी' म्हणजे 'काँग्रेस' व 'काँग्रेस' म्हणजे 'गांधी' असा उभयतांचा अन्योन्य संबंध होता. गांधींनीं बोलावे व काँग्रेसने मान्य करावे, गांधींनी सांगावे व त्याप्रमाणे काँग्रेसने वागावे, अशी ही गुरु-शिष्य परंपरा आतापर्यंत चालू होती. दासबाबू व पंडित मोतीलाल यांनी गांधींविरुद्ध स्वतंत्र भूमिका घेऊन 'स्वराज्य पक्ष' निर्माण केला. तेवढा एक प्रसंग बाजूस टेवला तर गांधी व काँग्रेसमधील लोक म्हणजे बाप व त्याची आज्ञाकारक मुले, असा हा संबंध असे. परंतु या दोन ठरावांच्या बाबतीत गांधी आणि काँग्रेस यांच्यामध्ये मतभेद

होऊन गांधी एका बाजूला तर गांधींचे आतापर्यंतचे कल्याणशिष्य दुसऱ्या बाजूला असे दोन पंथ निराळे झाले आहेत. वरील दोन्ही ठराव गांधींना अमान्य आहेत. काँग्रेसने अहिंसेच्या तत्त्वाला सोडू नये, तसेच मंत्रीमंडळ स्थापना करण्याच्या योजनेला मान्यता देऊ नये ; कारण तसे जर केले तर या मंत्रीमंडळास लढाईत इंग्रजास मदत करावी लागेल व तसे करण्याने पदोपदी अहिंसेची हिंसा होईल, असे गांधींचे म्हणणे आहे. परंतु ही विचारसरणी काँग्रेसच्या वर्किंग कमिटीच्या सभासदांना मान्य झाली नाही व गांधींच्या सांगण्याविरुद्ध हे दोन्ही ठराव त्यांनी पसार केले. हा जो मतभेद उभयतांमध्ये निर्माण झाला आहे तो मतभेद कोणत्या थराला पोहोचेल ; त्याचा शेवट कसा होईल याचे भाकित आजच कोणाला करता येणे शक्य नाही. परंतु या लढ्यात कोणत्या पक्षाचे मत राष्ट्राला पोषक आहे व कोणत्या पक्षाचे मत राष्ट्राला पोषक नाही या प्रश्नासंबंधाने आपली भूमिका ठरविणे अत्यंत आवश्यक आहे. राष्ट्राच्या हितसंवर्धनास 'अहिंसेचे तत्व' पोषक आहे किंवा नाही याचा विचार आम्ही आजच न करिता नंतर पुढे करू, कारण युद्धविषयक बाबतीत काँग्रेसने जो ठराव पास केला आहे व ज्याला नुकतीच पुणे येथे भरलेल्या 'ऑल इंडिया' कमिटीमध्ये मान्यता मिळाली आहे, त्याचा विचार करण्याचे आम्ही ठरविले आहे.

या ठरावात काँग्रेसने आपण सर्व पक्षीय मध्यवर्ती मंत्रीमंडळे प्रस्थापित करण्यास सिद्ध होत आहोत, असे जाहीर केले आहे. आमच्या मते काँग्रेसच्या वर्किंग कमिटीच्या या धोरणाबद्दल तिचे अभिनंदन करणे आम्हाला आवश्यक वाटते. परंतु त्याबरोबरच काँग्रेस वर्किंग कमिटीची कानउघाडणी करणेही आवश्यक आहे. खरे म्हटले असता ''सर्व पक्षीय मध्यवर्ती मंत्रीमंडळ'' प्रस्थापित करण्याची जी योजना आज काँग्रेसने पुढे केली आहे ती योजना व्हाईसरॉय लॉर्ड लिनलिथगो यांची आहे. युद्ध सुरु झाल्यावर व्हाईसरॉय यांनी तारीख ५ सप्टेंबर रोजी गांधींना भेटीस बोलविले व हिन्दी लोकांनी लढाईच्या प्रसंगी पूर्णपणे मदत करावी अशी विनंती केली. त्यानंतर ता. २६ सप्टेंबर रोजी उभयतांची दुसरी मुलाखत झाली. तिसरी ता. १ ऑक्टोबर रोजी झाली. चौथी मुलाखत चालू वर्षाच्या फेब्रुवारी महिन्याच्या २ तारखेस झाली. त्याच्यानंतर पाचवी मुलाखत तारीख २९ जूनला झाली. या मुलाखतींपैकी दुसऱ्याच मुलाखतीत व्हाईसरॉय यांनी ही योजना गांधींपुढे माडली, हे त्यांच्या पत्रव्यवहारावरून दिसून येईल. त्यात व्हाईसरॉय यांनी आपण दोन गोष्टी करण्यास तयार आहोत, असे सांगितले होते. पहिली गोष्ट म्हणजे साम्राज्यात हिंदुस्थानचा दर्जा हा वसाहतीचा दर्जा, असे जाहीर करण्याचे आश्वासन दिले; इतकेच नव्हे तर युद्ध संपल्या नंतर कमीत कमी

अवधीत वसाहतीच्या स्वराज्याची योजना अंमलात आणू हेही जाहीर करण्याचे कबूल केले. त्याप्रमाणे हल्लीच्या व्हाईसरॉय यांच्या कार्यकारी मंडळास ''लोकमतानुवर्ती'' स्वरुप देण्यास आपण तयार आहोत, असेही सांगितले. या योजनेचा खल व्हाईसरॉय यांनी सर्व पक्षांच्या एकंदरीत ५२ पुढाऱ्यांबरोबर केला. त्या सर्वांनी या योजनेला पाठिंबा दिला व मुसलमानांनीही तिला कबुली दिली. असे असतांना काँग्रेसने ती योजना उर्मटपणे लाथाडली. तरीपण ता. ११ जानेवारी रोजी पुन्हा मुंबई येथे 'ओरिएंट क्लब' मध्ये भाषण करतांना व्हाईसरॉय यांनी आपली योजना अजूनही काँग्रेसची तयारी असल्यास आपण अंमलात आणण्यास सिद्ध आहोत, असे पुन्हा जाहीर केले. तरी देखील काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी ती योजना मान्य केली नाही. त्यानंतर हरेक मुलाखतीत पुन्हा तीच योजना व्हाईसरॉयनी गांधींपुढे मांडली. परंतु हरेकवेळी त्या योजनेचा त्यांनी इन्कार केला. चार किंवा पांच वेळा आपण होऊन लाथाडलेली योजना नऊ दहा महिन्यानंतर मान्य केली जावी हे एक मोठे आश्चर्यच आहे. परंतु हे सर्व काँग्रेसचा आतापर्यंतचा इतिहास जर पाहिला तर एक गोष्ट उघड होते. कोणताही प्रश्न देशापुढे उभा राहिला तर देशातील काँग्रेस व्यतिरिक्त पुढारी जे मत जाहीर करतील त्या मतापेक्षा भिन्न मत, किंवा त्यापेक्षा आत्यंतिक जहाल मत काँग्रेसचे लोक देणार, असे बहुतेक ठरल्यासारखेच असते. तसेच सुरवातीला जी गोष्ट आपण करणार नाही, असे 'घोषित' केले तीच गोष्ट अन्ती केल्याची अनेक उदाहरणे काँग्रेसच्या इतिहासात सापडतील. हा कदाचित डावपेचांचा प्रश्न असेल. पारतंत्र्यात सापडलेल्या लोकांना जहाल विचार, जहाल कार्यक्रम, जहाल भाषा, या गोष्टी मनरंजनाला कारणीभूत होतात. पारतंत्र्यातील लोक जहाल भाषणाला आणि जहाल कार्यक्रमाला जसे व जितक्या लवकर वश होतात तसे व तितक्या लवकर नेमस्त भाषणाला व नेमस्त कार्यक्रमाला वश होत नाहीत या सिद्धांताला ओळखूनच काँग्रेसचे लोक अशा प्रकारचा लपंडाव करीत असले पाहिजेत. काही असो, काँग्रेसच्या वर्किंग कमिटीने, उशिरा का होईना, लाथाडलेली योजना पुन्हा स्वीकारण्याचे धैर्य दाखविले, याबद्दल ते स्तुतीस पात्र आहेत, असे आम्हास वाटते.

या ठरावावर दुसऱ्या एका दृष्टीने टीका करणे आम्हास आवश्यक वाटते. सर्वपक्षीय मंत्रीमंडळ प्रस्थापित करण्याच्या योजनेस काँग्रेसने पाठिंबा दिला ही गोष्ट जरी अभिनंदनीय अशी झाली तरी तिच्यापासून देशाला काही तत्कालीन लाभ होईल, असे दिसत नाही. ही योजना आणि इंग्रज सरकारकडून स्वातंत्र्याच्या घोषणेची केलेली मागणी यांची जी सांगड घातली आहे त्यावरून

ही योजना अंमलात येईल असे वाटत नाही. या योजनेबरोबर काँग्रेसने स्वातंत्र्य घोषणेची मागणी केली, ही गोष्ट पूर्ण विचार करून केलेली नाही, असे आम्हास प्रामाणिकपणे वाटते.

या संपूर्ण स्वातंत्र्याच्या मागणीचा इतिहास जितका किसळवाणा आहे तितकाच तो उद्‌बोधकही आहे. 'संपूर्ण स्वातंत्र्य' हे हिंदुस्थानचे ध्येय आहे. अशाप्रकारची घोषणा पहिल्याप्रथम सन १९२७ साली मद्रास येथे भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात करण्यात आली. या मागणीची पार्श्वभूमी बहुतेकास माहीत नाही, परंतु ती महत्त्वाची असल्याकारणाने तिची माहिती करून देणे आम्हास आवश्यक वाटते.

पंडित मोतीलाल नेहरू व श्रीनिवास अयंगार या दोन व्यक्ती काँग्रेसमध्ये महान व्यक्ती समजल्या जात असत. त्यांचा दरारा व त्यांचे वजन सर्वव्यापी व सर्वमान्य असे. गांधींनासुद्धा या दोघांचा वचक वाटे. हे दोन काँग्रेसचे आधारस्तंभ अनेक काळपर्यंत बंधुभावाने वागत असत. पण काही काळाने त्यांच्यात चुरस वाढली व चुरशीमुळे वितुष्ट वाढले. एक दुसऱ्याचा हेवा करू लागला व दोघेही एकमेकास हाणून पाडण्याकरिता एकमेकांवर डाव करू लागले. या व्यक्तिवादात पंडित मोतीलाल यांना गांधींनी साथ दिल्यामुळे, अर्थात अयंगार यांचे वजन व प्रतिष्ठा थोडीशी कमी होऊ लागली. त्याचा वचपा काढण्याकरिता ज्या अनेक क्लृप्त्या श्रीयुत अयंगार यांनी केल्या त्यापैकीच संपूर्ण स्वातंत्र्यांची कल्पना ही एक होय. गांधी व मोतीलाल या उभयतांना हाणून पाडावयाचे झाल्यास ते मवाळ आहेत व आपण त्यांच्यापेक्षा जहाल आहोत, हे दाखविल्याशिवाय आपण यशस्वी होऊ शकणार नाही, असे अयंगार यांस वाटू लागले. तेव्हा बाकीचे लोक नुसते स्वराज्य मागतात, तर आपण त्याच्यापेक्षा एक पाऊल पुढे जाऊन संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी केली तर अर्थात आपले कार्य सिद्धीस जाईल, असे अयंगार यांनी ठरवून त्यांनी मद्रास काँग्रेसच्या वेळी तशा प्रकारची घोषणा करण्यास सुरवात केली. अर्थात गांधी-मोतीलाल यांच्यावर हा मोठाच पेचप्रसंग ओढवला व अयंगारइतकेच आपणही जहाल आहोत, असे दाखवून दिल्याखेरीज त्यातून सहीसलामत बाहेर पडणे शक्य नाही, हे त्यांनी ओळखले. देशदुराभिमानाने संतप्त झालेल्या काँग्रेसमंडळापुढे नेमस्त भाषा वापरून आपली आब्रू वाचेल, असे वाटले नाही आणि म्हणून श्रीनिवास अयंगार यांची भाषणे स्वीकारून अयंगार यांनी रचलेला डाव या उभयतांनी मोठ्या शिताफीने त्यांच्यावरच उलटविला. संपूर्ण स्वातंत्र्याच्या ठरावाच्या प्रसूति-वेदना ह्या अशा वांझेच्या प्रसूति-वेदनासारख्या आहेत हे वरील माहितीवरून सर्वांना कळून येईल.

हा ठराव केवळ पोकळ होता व त्यांच्या मुळाशी स्वातंत्र्याची तिडिक नव्हती. या गोष्टीस आणखी दुसराही पुरावा आहे. सन १९२७ साली हा ठराव पास झाल्यानंतर एकच वर्षाने काँग्रेसच्या विद्यमाने एक सर्वपक्षी कमिटी पंडित मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली प्रस्थापित करण्यात आली होती.

हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी लॉर्ड बर्कन हेड यांनी सन १९२८ साली हिंदी लोकास उद्देशून असा एक टोमणा मारला होता की राजकीय घटना तयार करण्याची प्राज्ञा हिंदी लोकात नाही व आम्ही इंग्रज लोक जी योजना करणार आहोत ती जर हिंदी लोकांना मान्य नसेल तर त्यांनी आपली अशी एखादी योजना तयार करून दाखवावी. त्या आव्हानाला उत्तर म्हणून एक सर्वपक्षीय कमिटी प्रस्थापित करण्यात आली होती. या कमिटीने आपला रिपोर्ट सन १९२८ साली तयार केला. आश्चर्याची गोष्ट ही की १९२७ साली संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव पास झाला असतांनाही त्या कमिटीने संपूर्ण स्वातंत्र्याची योजना करण्याऐवजी वसाहतीच्या स्वराज्याची योजना मान्य केली ! इतकेच नव्हे तर त्या योजनेला काँग्रेसने सन १९२९ साली लाहोर येथे भरलेल्या अधिवेशनात आपली मान्यताही दिली !!

सन १९२७ साली ज्या काँग्रेसने संपूर्ण स्वातंत्र्याचे ध्येय जाहीर केले तीच काँग्रेस सन १९२९ साली वसाहतीच्या स्वराज्याच्या योजनेला मान्यता देते, या एकाच गोष्टीवरून संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव करतांना काँग्रेसचा 'संपूर्ण' स्वातंत्र्याच्या ठिकाणी कितीसा अढळ विश्वास होता हे साहजिकपणे कोणाच्याही लक्षात येण्यासारखे आहे. सन १९२९ साली जो ठराव पास करण्यात आला, त्यात असे म्हटले आहे की, ''ता. ३१ डिसेंबर सन १९२९ च्या आत ब्रिटिश सरकारने जर नेहरू कमिटीची योजना मान्य केली तर काँग्रेस संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी सोडून देऊन वसाहतीच्या स्वराज्यात समाधान मानून राहील.'' संपूर्ण स्वातंत्र्याच्या ध्येयाचे बाबतीत काँग्रेसचे वर्तन किती पोरकटपणाचे आहे, ह्याचा हा एक दुसरा पुरावा आहे. स्वातंत्र्यच पाहिजे, त्याशिवाय दुसरे हिंदुस्थानचे ध्येय काँग्रेसला कबूल होऊ शकत नाही, अशी जर काँग्रेसची मनोदेवता सांगत होती तर अमुक तारखेच्या आत वसाहतीचे स्वराज्य-जे काँग्रेसच्या दृष्टीने कमी प्रतीचे ध्येय-इंग्रज सरकारने मान्य करण्याचे कबूल केले तर 'सर्वोत्तम' ध्येय सोडून देण्यास जी काँग्रेस सिद्ध होती त्या काँग्रेसचा या संपूर्ण ध्येयावर कितीसा विश्वास होता, ह्याचा उलगडा वाचकांना सहज करता येण्यासारखा आहे.

या संपूर्ण स्वातंत्र्याच्या ध्येयाच्या मांडणीचा इतिहास पाहिला म्हणजे या महत्त्वाच्या बाबतीत काँग्रेसने कसा नादानपणाचा कळस केला आहे, हे उघड

होते. हिंदुस्थानचे ध्येय राजकीय वसाहतीचे स्वराज्य असावे किंवा स्वातंत्र्य असावे हा प्रश्न पहिल्याप्रथम सन १९२७ साली काँग्रेसपुढे आला. परंतु ह्यापुर्वी त्याचा कोणी उच्चार केला नव्हता, असे काही म्हणता येणार नाही. दोनच वर्षापूर्वी बाबू चित्तरंजनदास यांनी या विषयाची चर्चा केली होती.

ता. २ मे १९२५ साली फरीदपूर येथे झालेल्या प्राव्हिन्सियल काँग्रेसचे अधिवेशन भरले होते. त्या अधिवेशनाचे अध्यक्ष या नात्याने त्यांनी जे भाषण केले त्यात या प्रश्नाचा त्यांनी सांगोपांग विचार केला होता. परंतु ही माहिती देखील कोणाला असेल असे दिसत नाही. परंतु या विषयासंबंधी त्यांचे विचार इतके महत्त्वाचे व समंजसपणाचे आहेत की आजही जो वाचील त्याला काँग्रेसने याबाबतीत पूर्ण विचाराशिवाय ध्येयपालट केला, हे पटल्यावाचून राहणार नाही आणि म्हणूनच त्यांच्या त्यावेळच्या भाषणातील खालील उतारा आम्ही मुद्दाम देत आहोत :

... Mr. C. R. Das in his speech defined what he meant by independance for India and asked whether India should see before herself the ideal of independance within or without British Empire. Answering this question he said that the Indian National Congress had always stated its desire that India should remain within the British Empire if the Empire recognised her rights, "Indeed" he said, "the Empire gives us a vivid sense of many advantages. Dominion status today is in no sense serviceable. It is essentially an allianse of consent of those who form part of the Empire for material advantages in the real spirit of co-operation. Free alliance necessarily arises with its right seperation. Before the war a seperatist tendency was growing up in several parts of the Empire; but after the war, it is generally believed that it is only as great Confederation that the Empire or its Component parts can live. It is relised that under modern condition no nation can live in isolation, and dominion status, while it offords Complete Protection to each constituent composing the great Commonwealth of Nations, called the British Empire, secures to each the rights to realise itself, develop itself and fulfill itself, and therefore it expresses and implies all the elements of Swaraj which I have mentioned. To me the idea is specially attractive because of its deep spiritual significance. I believe in world peace, in the ultimate federation of the world; and I think that the great Commonwealth of Nations, called the British Empire a federation of diverse races, each with its distinct

mental out look-if properly led with statesmen at the helm, is bound to make a lasting contribution to the great problem that awaits the statesman, the problem of knitting the world into the greatest federation, the mind can conceive the federation of the human race. But only if properly led with statesmen at the helm-for the development of the idea involves apparent sacrifice on the part of the constituent nations, and it certainly involves the giving up for good of the Empire, idea with its ugly attribute of domination. I think it is for the good of India, for the good of the world that India should strive for freedom within the Commonwealth and so serve the cause of humanity.

वरील उताऱ्यावरून स्पष्ट दिसून येईल की, 'संपूर्ण स्वातंत्र्या' पेक्षा 'वसाहतीचे स्वराज्य' हेच हिंदुस्थानच्या दृष्टीने श्रेयस्कर आहे, हे श्रीयुत दास यांचे मत कॉंग्रेसने संपूर्ण स्वातत्र्याचे ध्येय मांडण्यापूर्वी दोनच वर्षे अगोदर जाहीर केले होते.

दोन वर्षामध्ये एवढा मोठा फेरबद्दल होण्याला हिंदुस्थानच्या इतिहासामध्ये विशेष काही घडले होते, असे कोणास काही म्हणता यावयाचे नाही. तसेच बाबू सी. आर. दास हे इतर कॉंग्रेसजनापेक्षा मवाळ वृत्तीचे होते, असेही कोणास म्हणता यावयाचे नाही. अर्थात त्यांचे मत निदानभूत मानले तर कॉंग्रेसने 'संपूर्ण स्वातंत्र्य' ध्येयाचे बाबतीमध्ये जी घडामोड केली ती घडामोड एका उच्चप्रतिच्या सुविचारी, समंजस व जहाल अशा कॉंग्रेस कार्यकर्त्याच्या दृष्टीने अगदी पोरकटपणाची झाली, असे म्हणावयास काही हरकत नाही. नंतर पुढे काही वर्षे संपूर्ण स्वातंत्र्याचे अनेक अर्थ लावण्यात कॉंग्रेस कार्यकर्त्यांनी वेळ घालविली. संपूर्ण स्वातंत्र्य म्हणजे स्वातंत्र्य नव्हे पण "स्वातंत्र्याचा गाभा" संपूर्ण स्वातंत्र्य म्हणजे "ग्रेट ब्रिटन आणि हिंदुस्थान यांची भागिदारी" वगैरे प्रकारचे अर्थ लावण्यात आले. शेवटी सन १९३७ साली ही गोष्ट भलत्याच थराला जाऊन पोहोचली. इतकी की गांधींनी त्यांचे सहकारी मित्र मिस्टर पोलॉक यांना लेखी लिहून दिले की, "ब्रिटिश सरकारने हिंदुस्थानला वसाहतीचे स्वराज्य दिले तर आपण त्यात समाधान मानावयास तयार आहोत !"

संपूर्ण स्वातंत्र्याच्या बाबतीत गांधी व कॉंग्रेस कार्यकर्ते यांनी ज्या विलांट्या कोलांट्या घेतल्या त्यावरून संपूर्ण स्वातंत्र्याच्या ध्येयावर त्यांचा अटळ विश्वास आहे, त्याशिवाय दुसरे कोणतेच ध्येय ते मान्य करणार नाहीत, याच्यावर कोणाचाही विश्वास बसू शकत नाही. ही केवळ लोकांना उलविण्याची व झूलविण्याची एक शक्कल आहे, असे सर्वांचे मत झाले आहे. याच कारणामुळे इंग्रज सरकारने या मागणीला आतापर्यंत महत्व दिले नाही. म्हणून आमच्या

नते काँग्रेसने हे संपूर्ण स्वातंत्र्याचे सोंग सोडून देऊन वसाहतीच्या स्वराज्याची मागणी केली असती तर त्यात त्यांनी जास्त धैर्य व जास्त शहाणपणा दाखविला, असे म्हणता आले असते

संपूर्ण स्वातंत्र्याचे ध्येय एकदा जाहीर केल्यानंतर ते मागे घेणे हे मनुष्यमात्राच्या स्वभावाला अनुसरून अत्यंत कठीण काम आहे, हे आम्ही मान्य करतो. चुकणे हा मनुष्यधर्म आहे. चुक झाली असे कबुल करणे मनुष्यमात्राला अत्यंत कठीण व जड जाते. त्यात विशेषतः इभ्रतीचा प्रश्न आड येतो. परंतु जेथे चूक झाली हे निर्विवाद आहे व झालेली चूक दूरुस्त केल्याशिवाय ती तशीच पुढे चालू देणे राष्ट्राला विघातक आहे तेथे ती चूक कबूल करणे हे भूषणावह आहे ; इतकेच नव्हे तर कर्तव्यप्राप्त आहे.

'घडी भरकी बेशरमी और जनमभरेका आराम' अशी उर्दू भाषेमध्ये एक अत्यंत व्यावहारिक अशी म्हण आहे. एका मिनिटासाठी थोडीशी शरम बाजूला ठेवली तर पुष्कळ वेळा माणसाला जन्माचे सुख लाभू शकते या दृष्टीने पाहताना वर्किंग कमिटीने या प्रसंगी संपूर्ण स्वराज्याची मागणी न करिता वसाहतीचे स्वराज्य मागीतले असते व या चुकीची दुरुस्ती केली असती तर अधिक शहाणपणाचे झाले असते, असे आम्हास वाटते.

दुसऱ्याही एका दृष्टीने या प्रश्नाचा विचार करणे काँग्रेसला आवश्यक होते. संपूर्ण स्वातंत्र्य उपभोगीत असलेल्या राष्ट्रांची आज काय दुर्दशा झाली आहे, ही चालू युद्धाची हकीकत वाचणाऱ्या वाचकांना काही सांगावयास नको. लढाई सुरू होण्याच्यापूर्वी बेल्जम, हॉलंड, डेन्मार्क, नार्वे, पोलंड, फिनलंड, झेकोस्लोव्हाकिया ही राष्ट्रे संपूर्ण स्वातंत्र्याचा उपभोग घेत होती. नऊ महिन्याच्या आत हिटलरने त्यांचे स्वातंत्र्य नष्ट करून त्या सर्व राष्ट्रांना आपल्या अमलाखाली डांबून टेविले आहे. स्वतंत्र हिंदुस्थान बेल्जम, हॉलंड वगैरे स्वतंत्र देशांच्या परचक्रापासून संरक्षण करण्यास जास्त समर्थ आहे, असे कोणाच्यानेही आज म्हणवणार नाही व संपूर्ण स्वातंत्र्य मिळाल्यावर हिंदुस्थानची जर तशीच गत होणार असेल तर तशा प्रकारचे संपूर्ण स्वातंत्र्य मिळवून काय उपयोग होणार, याचा दरेकाने विचार करणे अवश्य आहे या परिस्थितीचा विचार करून जर काँग्रेस वर्किंग कमिटीने जसे अहिंसेचे तत्व सोडून देण्यामध्ये धैर्य दाखविले त्याचप्रमाणे संपूर्ण स्वातंत्र्याच्या बाबतीत धैर्य दाखविले असते व तूर्त वसाहतीच्या स्वराज्यात आपले समाधान आहे, असे म्हटले असते तर त्यात त्यांना कोणीही दोष दिला नसता. दुसरे असे की ही जी संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी केली आहे

ती मागणी इंग्रज सरकार पूर्ण करील अशी अपेक्षा करण्याला काही जागा असती तर तशी मागणी केल्याबद्दल खेदाला कारण उरले नसते. परंतु आजच्या परिस्थितीत इंग्रज सरकार तशा प्रकारची घोषणा जाहीर करण्यास सिद्ध होईल, अशी आशा करण्याला कवडीचाही आधार नाही. इंग्रज लोक हे काही देवदूत नव्हेत, ते काही वैष्णवजन नव्हेत, ते साधे व्यवहारी व संसारी लोक आहेत. संसारी व व्यवहारी माणूस आपल्या हातची गोष्ट सहजासहजी स्वसंतोषाने जाऊ देणार नाही. यात इंग्रज सरकारला दोष देण्यासारखे काही नाही. दोन हजार वर्षे अस्पृश्य लोकांना अस्पृश्य ठेवण्यात येऊन अजून देखील त्यांना देवळाची दारे खुली करण्याचे औदार्य जे हिंन्दू लोक दाखवीत नाहीत त्या हिंदू लोकांनी तरी या बाबतीत इंग्रजांची निंदा करण्याच्या भरीस पडू नये. इंग्रजांना जरब लावण्याची ज्यांच्या अंगात शक्ती असेल त्यांनीच त्यांच्या कडून स्वातंत्र्याच्या घोषणेची अपेक्षा करावी, हे कोणालाही मान्य करावे लागेल. ज्या वर्किंग कमिटीच्या लोकांनी संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी केली आहे त्यांनी इंग्रजांना जरब लावण्याकरिता आपल्या जवळ काय साधने आहेत, याचा उलगडा करावा म्हणजे तिने केलेली मागणी कितपत सिद्धीस जाईल, याचा अंदाज करता येईल. आम्हाला तरी काँग्रेसजवळ इंग्रजांना जेरीस आणण्यास काही साधन आहे, असे दिसत नाही. येऊन जाऊन काँग्रेसचा सर्व भर सत्याग्रहाच्या शस्त्रावरती आहे, परंतु ते शस्त्र आज इतके बोथट झाले आहे की त्याच्यापासून इंग्रजांना काही अपाय तर होणे शक्य नाहीच पण ते अमलात आणण्याऱ्याचे मात्र हासे होईल, हे एक खास आहे. या बाबतीत लोकांची तयारी नाही, हे सत्याग्रहात भाग घेणाऱ्यांची जी यादी मागे प्रसिद्ध झाली होती त्यावरून दिसून येईल. हे जाणूनच की काय होणारा सत्याग्रह लांबणीवर टाकण्यात आला आहे. अजूनही त्याबाबतीत काँग्रेस कार्यकर्त्यांचा निश्चय आहे, असे दिसत नाही. परवाच पुणे येथे भरलेल्या ''ऑल इंडिया काँग्रेस कमिटी'' च्या बैठकीत श्री. राजगोपालचारी यांना काही प्रश्न विचारण्यात आले होते. त्यापैकी ''इंग्रज सरकारने जर तुमच्या मागणीप्रमाणे स्वातंत्र्याची घोषणा केली नाही तर त्यांना तसे करण्यात भाग पाडण्याकरिता तुम्ही काही उपाययोजना करणार आहात काय ?'' असा प्रश्न विचारण्यात आला. हा प्रश्न अगदी शेलका होता व खरे म्हटले असता याचे समर्पक उत्तर देता येण्यासारखे होते परंतु या प्रश्नाला श्री. राजगोपालचारी यांनी जे उत्तर दिले ते वाचून काँग्रेसकार्यकर्त्यासही विस्मय वाटल्याखेरीज राहिला नसेल. ''इंग्रज लोकावरती आजच अविश्वास दाखविण्याचे कारण नाही''

असे उत्तर देऊन प्रश्नकर्त्याला त्यांनी गप्प बसविले. या उत्तराने कोणा स्वातंत्र्यवाद्यांची शांती होणार असेल त्याची होवो! पण या उत्तराने कोणीही फसून जाणे शक्य नाही. या उत्तराने जर कोणती गोष्ट सिद्ध होत असेल तर ती एकच की काँग्रेस या बाबतीत इंग्रज लोकांबरोबर लढा करण्यास सिद्ध नाही व लढ्याला जी सामग्री अवश्य असते तीही त्यांच्याजवळ नाही. ही गोष्ट इंग्रज सरकार पूर्णपणे जाणून आहे. पार्लमेंटमध्ये हिन्दुस्थानाविषयी जी परवाच प्रश्नोत्तरे झाली त्यात हिन्दुस्थानची राजकीय परिस्थिती क्षोभकारक व चिंताजनक नाही, असे स्टेट सेक्रेटरी मि. एमरी यांनी जे उत्तर दिले त्यावरून काँग्रेसचे इंग्रज सरकारला किती भय वाटते हे दिसून येते. काँग्रेसची मागणी म्हणजे कोल्ह्यांची कुई आहे, सिंहाची गर्जना नव्हे, हे इंग्रज सरकार पूर्णपणे जाणून आहे. ती जाणीव खोटी आहे, असे कोणाला म्हणता येणार नाही. अशा परिस्थितीत असाध्य गोष्टी मिळविण्याच्या भानगडीत न पडता जी गोष्ट साध्य आहे ती हस्तगत करून घेऊन राष्ट्राची शक्ती वाढविणे यातच खरे शहाणपण आहे, असे आम्हास वाटते. "अर्धा मुल्ला हा धर्माला विघ्न आहे" अशी पर्शियन भाषेमध्ये एक म्हण आहे. अर्धवट राजकारणी पुरुष हा देखील राष्ट्राला विघ्न आहे, असे म्हणण्यास हरकत नाही. शहाणपणा जर शिकावयाचा असेल तर तो काही घुटक्या घुटक्याने शिकता येणार नाही, किंवा पाठापाठाने शिकता येणार नाही. जे वेडगळपणाचे असेल ते सर्व सोडून दिले पाहिजे व जे शहाणपणाचे असेल ते सर्व ग्रहण केले पाहिजे. अर्धवटपणा करून काही उपयोग नाही आणि म्हणून वर्किंग कमिटीने सर्वपक्षीय मंत्रीमंडळास मान्यता देण्याचा ठराव करून जसा आपला शहाणपणा दाखविला तसा संपूर्ण स्वातंत्र्याच्या बाबतीत आपला आग्रह सोडून प्राप्त होण्यासारखे जे वसाहतीचे स्वराज्य, त्याच्यावर तूर्त तहान भागवून या देशाच्या बाबतीत जो घोर प्रसंग उद्भवला आहे त्याचे निवारण करण्याकरिता सत्ता हस्तगत करण्याची ही जी अमोल संधी प्राप्त झाली आहे तिचा इन्कार करू नये, अशी आमची त्यांना सूचना आहे.

अहिंसेचा अतिरेक आणि देशाचे धिंडवडे

गेल्या अंकात काँग्रेस वर्किंग कमिटीने पसार केलेल्या युद्धविषयक ठरावासंबंधाने आमचे मत काय आहे ते आम्ही प्रसिद्ध केले आहे. या अंकात अहिंसेसंबंधीचा जो ठराव काँग्रेस वर्किंग कमिटीने पसार केला आहे त्या संबंधाने आमचे विचार मांडण्याचे आम्ही योजले आहे. अहिंसेसंबंधीचे आपले मत काँग्रेस वर्किंग

कमिटीने गेल्या जून महिन्याच्या २१ तारखेस प्रसिद्ध केले. सध्याच्या परिस्थितीत अशा प्रकारचे पत्रक प्रसिद्ध करून अहिंसेसंबंधाने आपले मत काय आहे, हे जगजाहीर करण्याचे काही प्रयोजन नव्हते, असे पुष्कळांना वाटणे साहजिक आहे. परंतु याचवेळी या प्रश्नासंबंधाने काँग्रेस वर्किंग कमिटीला आपले मत जाहीर करण्याला काय कारण झाले हे पुणे येथे भरलेल्या ऑ. इ. काँ. कमिटीच्या बैठकीत मौ. आझाद यांनी केलेल्या भाषणात उघड केले आहे. मौलाना यांनी सांगितल्याप्रमाणे १९३८ च्या सप्टेंबरमध्ये गांधींनी वर्किंग कमिटीने या प्रश्नावर आपले मत द्यावे असे सुचविले. लवकरच म्युनिकचा तह झाल्यामुळे तो प्रश्न तसाच पडून राहिला. लढाई सुरू झाल्यानंतर गेल्या नोव्हेंबर महिन्यात पुन्हा गांधींनी तो प्रश्न उपस्थित केला, पण मौलाना आझाद यांनी त्यांस थोपवून धरले. पुन्हा गेल्या जून महिन्यात गांधींनी पाठ पुरविली व या प्रश्नाबद्दल निर्णय दिलाच पाहिजे म्हणून आग्रह धरला. यास्तव निर्णय देणे वर्किंग कमिटीला भाग पडले.

सन १९२० साली पहिल्याप्रथम अहिंसेच्या तत्त्वाने हिंदी राजकारणात प्रवेश केला, तेव्हापासून अहिंसेच्या तत्त्वाचा काँग्रेसच्या प्लॅटफार्मवरून जिकडे तिकडे 'उदो उदो' केला जात असे. तथापि गांधी व काँग्रेसवाले यांच्यामध्ये एकमत नव्हते. आपण अहिंसेला ध्येय म्हणून वागवावे असे म्हणत असताना बाकी लोक केवळ धोरण म्हणून अहिंसेचा उच्चार करतात ही गोष्ट गांधी जाणून होते असे असताना देखील गेल्या २० वर्षात हा प्रश्न धसास लावण्याच्या भरीस ते पडले नाहीत. तो आज धसास लावल्यामुळे एक विचित्र परिस्थिती त्यांनी उत्पन्न करून ठेवली आहे. युद्धाच्या सुरवातीस एकवटून इंग्रजांशी सामना करण्याला सिद्ध झालेले काँग्रेसचे लोक मुख्य प्रश्न बाजूला ठेवून एकमेकांचे शत्रू जरी नसले तरी विरोधी झाले आहेत, हे उघड दिसत आहे. सुरवातीस गांधी आणि वर्किंग कमिटी एकवटून इंग्रजांशी भांडत असल्याचा जो देखावा दिसत होता त्याऐवजी गांधी आणि वर्किंग कमिटी हे एकमेकांच्या उखाळ्यापाखाळ्या काढीत असल्याचा देखावा आज दृष्टीस पडतो. एका दृष्टीने हा वाद धसास लावून नसती दुफळी केली याबद्दल खेद वाटणे साहजिक असले तरी दुसऱ्या दृष्टीने पाहताना झाले हे बरे झाले, असे वाटू लागते. हिंसा-अहिंसा हा प्रश्न गांधींच्या राजकारणात नुसता तात्त्विक विचाराचा प्रश्न आहे, असे कोणालाही म्हणता यावयाचे नाही. तो स्वराज्य प्राप्तीच्या व राष्ट्राच्या संरक्षणाच्या साधनाचा प्रश्न होऊन बसला आहे. अशा दृष्टीने पाहता अहिंसेच्या प्रश्नासंबंधाने लोकांचे खरे मत

काय आहे, याचा अखेर निकाल लावणे अत्यंत आवश्यक आहे आणि म्हणून गांधींनी या प्रश्नाला पुन्हा वाचा फोडली व एकदाचे लोकांचे खरे मत काय आहे हे कसास लावण्याचा प्रसंग ओढून आणला, हे चांगले केले, असे आम्हास वाटते.

गांधींच्या अहिंसेचे स्वरुप कसे आहे, हे जाणून घेणे आवश्यक आहे. जर्मन लोकांनी इंग्लंडवरती स्वारी केली असताना आपला बचाव कोणत्या मार्गाने करावा याबाबतीत इंग्रज लोकांना उद्देशून जे अनावृत्त पत्र गांधींनी जुलै महिन्याच्या ६ तारखेस लिहिले होते त्यावरून गांधींची अहिंसा कोणत्या स्वरुपाची आहे हे चांगले कळून येण्यासारखे आहे. या पत्रात गांधींनी इंग्लिश जनतेस असा सल्ला दिला आहे की ''ब्रिटिश जनतेने शस्त्राशिवाय जर्मन राष्ट्राचा प्रतिकार करण्याचा निर्धार करावा. हिटलर किंवा मुसोलिनी† इंग्लिश भूमीवर स्वारी करण्याच्या अगोदरच 'या तुम्हाला काय हवे असेल ते घ्या' असे जाहीर करा तसेच हिटलरला स्वारी करून जे काही घ्यायचे असेल ते त्याला घेऊ द्या व हिटलर व त्याच्या सैनिकांना जर तुमच्या घरादारांचा ताबा घ्यावयाचा असेल तर तुम्ही खुशीने आपली घरेदारे खाली करून त्यांच्या स्वाधीन करा आणि तुम्हाला राहण्याला कोठे स्थळ सापडत नसेल व हिटलर जर तुम्हाला देश सोडून जाऊ देत नसेल तर त्याच्या हातून मरण्यास सिद्ध व्हा. परंतु आत्मरक्षणार्थ कोणत्याही शस्त्रास्त्रांचा उपयोग करू नका.'' ही गांधींची आत्मसंरक्षणाची योजना आपण स्वीकारु शकत नाही, अशाप्रकारच्या सौम्य शब्दात उत्तर दिल्याचे प्रसिद्धही झालेले आहे. ते कसेही असो, गांधींच्या अहिंसेचे स्वरुप कसे आहे, हे ब्रिटिश जनतेपुढे मांडलेल्या त्यांच्या या योजनेवरून सर्वांना स्पष्टपणे कळण्यासारखे आहे.

इंग्रजांना अहिंसेचे धडे देऊन गांधी स्वस्थ बसले नाहीत. यापुढे जाऊन या देशानेही परचक्र आले तर या मार्गाशिवाय दुसऱ्या कोणत्याही मार्गाचा अवलंब करू नये ; इतकेच नव्हे तर आज तशाप्रकारचा निश्चय जाहीर करून जगाला योग्य मार्गाची दिशा दाखविल्याचे श्रेय या देशाने घ्यावे असे गांधींचे म्हणणे आहे. अशा प्रकारच्या अहिंसावृतीच्या निःशस्त्र प्रतिकाराच्या पद्धतीने आपणास या देशाचे संरक्षण करता येईल. असे शक्य न वाटल्यामुळे वर्किंग कमिटीने गांधींचे म्हणणे अमान्य केले. वर्किंग कमिटीने आपली भूमिका स्पष्ट करताना अमक्या विरुद्ध प्रसंगी हिंसा आणि तमक्या विरुद्ध अहिंसा असा अमंगल भेदाभेद केला आहे. इंग्रजांशी तेवढी अहिंसा बाकी सर्वांशी-म्हणजे घरच्याशी व

† पाहा परिशिष्ट : १५.

बाहेरच्याशी हिंसा, अशी जी मनोवृत्ती त्यांनी प्रकट केली आहे ती त्यांच्या कुटिल नीतीस साजण्यासारखीच आहे. परंतु हा भेदाभेद बाजूला ठेवला आणि मुख्य प्रश्नाकडे दृष्टी दिली तर हिंदुस्थानचा परचक्रापासून कोणत्या रीतीने बचाव करता येईल या बाबतीत गांधी व वर्किंग कमिटी यांच्यात मोठाच भेद उत्पन्न झाला आहे, यात शंका नाही.

या हिंसा-अहिंसा वादात गांधींची बाजू घेणारे लोक असा आधार घेतात की गांधी हे प्रामाणिक आहेत, परंतु येवढ्यावरून गांधींचे मत ग्राह्य होऊ शकत नाही. या प्रश्नाचा निकाल लावण्याकरता प्रामाणिकपणाला काही महत्त्व आहे, असे आम्हास वाटत नाही. अहिंसातत्त्व मनुष्यमात्राच्या जीवनाला कितपत उपयुक्त आहे, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. गांधींच्या प्रामाणिक अप्रामाणिक वृत्तीसंबंधाने विचार करण्याचे काही प्रयोजन नाही. त्याचबरोबर प्रामाणिक मनुष्य भोळा किंवा खुळा असू शकतो, हे कोणी विसरु नये. म्हणून गांधी प्रामाणिक आहेत किंवा अप्रामाणिक आहेत हा वादाचा प्रश्न नसून गांधींची अहिंसेची म्हणजे नि:शस्त्र प्रतिकाराची योजना मान्य करण्यासारखी आहे किंवा काय, हा वादाचा प्रश्न आहे. या प्रश्नाची चर्चा करतांना एकदोन महत्त्वाच्या गोष्टी ध्यानात ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. पहिली गोष्ट ही की, अहिंसा किंवा नि:शस्त्र प्रतिकार हा काही बेफिकीरीचा किंवा टवाळीचा विषय होऊ शकत नाही. युद्धाच्या बाबतीत दोन प्रकारचे प्रवाह वाहत असलेले दिसून येतात. काही लोकांची विचारसरणी बेफिकीरीची असते. त्यांच्या मते सर्व राष्ट्रांचे राजकारण सदोष आहे. सर्वच राष्ट्रे स्वार्थलोलूप आहेत व त्यांच्या दोष-दूषित व स्वार्थलंपट राजकारणातून बाहेर पडणे कोणाही राष्ट्राला शक्य नाही आणि म्हणून युद्ध व शांती अशा प्रश्नांचा विचार करण्याचे कारण नाही. युद्धासारख्या भयंकर आपत्ती ह्या निसर्गाने उत्पन्न केलेल्या आपत्तीप्रमाणेच समजून स्वस्थ बसण्यापलिकडे विचारी माणसाला दुसरे काही करता येण्यासारखे नाही.

दुसऱ्या प्रकारची विचारसरणी अशी आहे की युद्ध हे अनिवार्य आहे. इतकेच नव्हे तर इष्टही आहे. या लोकांना असे वाटते की राष्ट्र म्हणजे काही तरी महान दैवत आहे व त्या राष्ट्राची इभ्रत, वैभव व त्याचा व्याप वाढण्याकरिता जर युद्ध करण्याचा प्रसंग आला तर तो टाळण्याऐवजी ती एक महापर्वणी समजून राष्ट्राच्या उत्कर्षाकरिता सर्वांनी युद्धामध्ये सामील होण्यास सिद्ध व्हावे. मग त्या युद्धात असंख्य कोटी धन नासले, राष्ट्राच्या सर्व दैवी संपत्तीचा नाश झाला तरी हरकत

नाही, परंतु ''युद्धस्य कथा रम्य:'' या दृष्टीने हे सर्व ठीक आहे. युद्धात पाशवी शक्तीचा उपयोग करण्यात आल्यामुळे झालेले युद्धाचे घोर परिणाम ज्यांनी पाहिले आहेत, ऐकिले आहेत किंवा अनुभविले आहेत त्या सर्व लोकांना युद्ध म्हणजे मनुष्यमात्रावरती केवढी भयंकर आपत्ती आहे हे सांगावयास नको. हिटलरसारख्या निर्दय काळपुरुषाची मनोभावना अगर हिंदुस्थानातील आर्य संस्कृतीच्या अभिमानी लोकांची मनोभावना बाजूस ठेविली तर जगामध्ये कोठेही पाशवी शक्ती व युद्ध ही चांगली गोष्ट आहे असे म्हणणारा एकही समंजस मनुष्य सापडणार नाही. तसेच युद्ध म्हणजे विधी घटना आहे; तिच्या उलट जाऊन काय उपयोग, होणार असेल ते होऊ द्या, असे बेफीकीर वृत्तीचे लोकही बरेच सापडतील. उलटपक्षी युद्ध कसे टाळता येईल या खोल विचारात गढून गेलेली माणसे पूर्वी-पेक्षा आज पुष्कळच सापडतील.

अहिंसा किंवा नि:शस्त्र प्रतिकाराची योजना काही बेफिकिरीचा किंवा टवाळीचा विषय होऊ शकत नाही किंवा पूजेवर चढलेल्या विंचवाला मारण्याइतकी स्वल्प बाबही नाही. तसेच या योजनेचा पुरस्कार करणारे लोक खुळे किंवा वेडगळ आहेत, असे म्हणता येणार नाही. या विषयावर जी चर्चा चालू आहे त्यावरून पाहता नि:शस्त्र प्रतिकाराची योजना एकट्या गांधींची आहे, असा लोकांचा समज झाला, असे दिसते. परंतु हा समज अगदी चुकीचा आहे.

गांधींचे मताचे अनेक लोक जगाच्या पाठीवर आहेत की जे पाशवी शक्तीच्या विरुद्ध आहेत व ज्यांचा नि:शस्त्र प्रतिकाराच्या यशस्वीतेवर विश्वास आहे. उदाहरणाच द्यावयाचे झाले तर सुप्रसिद्ध प्रोफेसर बर्ट्रण्ड रसेल यांचे देता येईल.

प्रोफेसर बर्ट्रण्ड रसेल यांच्यासारख्या जगविख्यात विद्वान माणसानेही गेल्या लढाईत ब्रिटिश जनतेपुढे 'अटलांटिक मंथली' नावाच्या अमेरिकन मासिकाच्या १९१५ सालच्या ऑगस्ट महिन्याच्या अंकात लिहिलेल्या एका लेखात अगदी गांधी सारखीच एक योजना मांडली होती. ती योजना मांडतांना त्यांनी असा युक्तिवाद केला होता की, इंग्रज लोकांनी आपण नि:शस्त्र प्रतिकार करणार आहोत, असे जर जाहीर केले तर इंग्लंडवरती स्वारी करण्यास जर्मन लोकांना मनोधैर्य होणार नाही. सैन्य नाही, आरमार नाही अशा नि:शस्त्र इंग्रज प्रजेवर जर्मन लोकांना स्वारी करण्याला काही सबब उरणार नाही आणि यदाकदाचित जर जर्मन लोक आलेच तर सशस्त्र प्रतिकाराची भीती नसल्याकारणाने अगदी थोडे व अल्प असे सैन्य घेऊन येतील व आल्यानंतर त्यांनी जर राज्य करण्याचा निश्चय केला व इंग्रज लोकांनी त्यांच्याशी जर असहकार केला तर एकतर जर्मनांना राज्यकारभार करणे अशक्य होईल किंवा लहानसहान जागा भरून

काढण्याकरिता त्यांना जर्मनीतून माणसे आणावी लागतील. एकतर लाजेमुळे ते स्वारी करणार नाहीत किंवा निर्लज्ज होऊन निःशस्त्र प्रजेवरती त्यांनी स्वारी केलीच तर असहकारितेच्या निर्धारामुळे त्यांना राज्य करणे अशक्य होईल व आले तसे त्यांना परत जावे लागेल. अशारीतीने निःशस्त्र प्रतिकाराच्या उपायाने राष्ट्राचे यशस्वी रीतीने परचक्रापासून रक्षण करता येईल.

प्रोफेसर बर्ट्रण्ड रसेलच्या योजनेत व गांधींच्या योजनेत काहीच फरक नाही. फरक असलाच तर तो एवढाच की प्रो. रसेल यांनी ही योजना अंमलात आणण्यास एका पीढीची मुदत घातली होती. निःशस्त्र प्रतिकाराच्या तत्त्वाची शिकवण एका पिढीपर्यंत लोकांना दिल्यानंतर ती योजना अंमलात आणावी असा व्यवहारीपणाचा निर्बंध त्यांनी आपल्या योजनेत घातला होता. गांधी एका पीढीचा काय पण एका घडीचासुद्धा अवसर देण्यास तयार नाहीत. या घडीस आपली निःशस्त्र प्रतिकाराची योजना यशस्वी रीतीने अंमलात आणता येईल, असा त्यांचा विश्वास आहे. या भेदामुळे गांधींना आततताईपणाबद्दल व आत्यंतिक विचारसरणीबद्दल दोष देता येईल. तसेच जगात दुसरे अनेक देश असतांना हिंदुस्थानच्या लोकांनी जगाला धडा देण्याकरिता आपली आहुती का द्यावी, असा सवालही विचारता येईल ; पण ज्या योजनेला प्रो. बर्ट्रण्ड रसेलसारख्या व्यवहारी माणसाचा पाठिंबा आहे ती योजनाच मुळी खुळचट आहे, असे सहजासहजी कोणाला म्हणता यावयाचे नाही.

गांधींची निःशस्त्र प्रतिकाराची योजना मनुष्यमात्राच्या जीवनाला कितपत उपयुक्त आहे, याचा निर्णय करणे सोपे नाही. परंतु या साधनाने कोणता लाभ होतो व पाशवी शक्तीने कोणती हानी होते याचा तौलनिक दृष्टीने विचार केला तर या योजनेबद्दल निर्णय देणे फारसे कठीण जाणार नाही.

निःशस्त्र प्रतिकाराच्या उपायाने कोणता लाभ होऊ शकतो, असा प्रश्न केला असता जे लोक निःशस्त्र प्रतिकाराच्या योजनेचा पुरस्कार करतात त्यांचेकडून असे सांगण्यात येते की निःशस्त्र प्रतिकार ही निर्वैर मनोदशेची जननी आहे आणि निर्वैर मनोदशा ज्याचे ठायी बाणली त्यांना एकमेकाविरुद्ध पाशवी शक्तीचा तर नाहीच पण कोणत्याही शक्तीचा उपयोग करण्याचे कारण राहणार नाही.

ही विचारसरणी गांधींची विचारसरणी आहे आणि याच विचारसरणीचा याठिकाणी परामर्श घेणे विशेष जरूरीचे आहे. हरेकाने चित्तशुद्धी करून अहिंसेचे तत्त्व अंगी बाणविले तर त्याने सर्व कार्यभाग होईल. या विचारसरणीत मुख्यतः दोन दोष दिसून येतात. पहिला दोष असा की युद्धासारख्या प्रसंगी

हरेक माणसापुढे मुख्य प्रश्न जो उद्‌भवतो तो म्हणजे मी या युद्धात भाग घेऊ की नको, हा नसून इतरांना मी त्यातून कसा वाचवू शकेन हा प्रश्न असतो. स्वार्थ सोडून परार्थ साधीन, असा मंत्र जपल्याने निर्वैर मनोदशा तयार होईल पण त्यामुळे परार्थ साधेलच हे निश्चित सांगता येणार नाही. लढाईमध्ये लोकजीवनावर आघात होत असतो, ते संकटात सापडले असते व त्याचा नाश होण्याचा संभव असतो. तो नाश 'मी नाश इच्छित नाही' एवढे म्हणून स्वस्थ बसणाऱ्या माणसाच्या हातून टळू शकत नाही. दुसरी गोष्ट अशी की जगामध्ये नुसत्या न्यायाच्या तत्त्वाची स्थापना करून भागत नाही; ते तत्त्व प्रत्यक्ष कृतीत उतरुन ज्या-ज्या प्रसंगी त्याच्यावर आघात होईल त्या-त्या प्रसंगी आखाड्यांत उतरून त्याचा प्रतिकार केल्याशिवाय कार्यभाग होणार नाही. नुसती न्यायी वृत्ती ठेवल्यास स्वतःपलिकडे दुसऱ्या कोणालाही त्याचा उपयोग होत नाही आणि प्रत्यक्ष कृती करू लागले असताना कोणतीही कृती तिच्या पाठी शक्ती असल्याखेरीज सिद्धीस जाऊ शकणार नाही.

यावरून दिसून येईल की नुसती निर्वैर मनोदशा अंगी बाणल्याने काही उपयोग होऊ शकत नाही. मनोवृत्तीप्रमाणेच हातून कृती झाली पाहिजे आणि कृती जर व्हावयाची तर शक्तीचा उपयोग केल्याखेरीज गत्यंतर नाही.

निःशस्त्र प्रतिकाराचे पुरस्कर्ते 'आम्ही मुळीच शक्तीचा उपयोग करीत नाही' असे जे सांगतात तो त्यांचा केवळ भ्रम आहे. परंतु आमची शक्ती नैतिक आहे-पाशवी नाही. हा त्यांचा जो मुद्दा आहे तो मात्र खरा आहे. पण त्यावर पहिला प्रश्न असा की पाशवी शक्ती ही नैतिक शक्तिपेक्षा कितीशी भिन्न आहे व नैतिक शक्ती पाशवी शक्तीपेक्षा कमी क्रूर स्वरूपाची आहे, असे नेहमीच म्हणता येईल काय ?

पाशवी शक्तीने भयंकर नाश होऊ शकतो हे उघड दिसते. म्हणून पुष्कळ लोकांना पाशवी शक्तीचा तिरस्कार वाटतो. परंतु नैतिक शक्तीदेखील तितकाच नाश करू शकते-तितकेच क्रूर स्वरुप धारण करू शकते– हे पुष्कळांना दिसू शकत नाही. परंतु हे आमचे म्हणणे खरे आहे. हे एक-दोन उदाहरणांनी पटवून देता येण्यासारखे आहे. समजा, एका स्त्रीला मूल झाले परंतु हे तिच्या इच्छेप्रमाणे जितके सुस्वरुप असावयास पाहिजे होते तितके ते नव्हते. मुलाचा वीट येऊन आईने त्याच्याशी असहकार केला. त्याच्या मानेला नख देऊन त्याचा प्राण घेण्याचे पाशवी कृत्य न करता त्याला स्तनपान करण्याचे सोडून दिले. स्तनपान सोडून देणे हे सकृतदर्शनी गळ्याला नख देण्याइतके पाशवी कृत्य दिसत नाही. परंतु

परिणामाच्या दृष्टीने जर पाहिले तर 'नख देणे' व 'स्तनपान न करणे' या दोहोत काय फरक आहे, हे सांगणे कठीण आहे. आणखी एक उदाहरण घेऊ. समजा एका गावामध्ये एक मनुष्य असा निघाला की तो गावापासून भिन्नरितीने व भिन्न विचाराने आपले जीवन घालवू लागला. गावातल्या लोकांनी त्याचा खून केला नाही. परंतु त्याचे पाणी बंद केले, त्याचा बाजार बंद केला व त्याच्यावर सर्व तऱ्हेने बहिष्कार पुकारून त्याचे जिवित अशक्य केले. बहिष्कारात खून होत नाही म्हणून बहिष्कार पाशवी शक्ती नव्हे, असे कदाचित म्हणता येईल. परंतु प्रत्यक्ष खून करण्यामध्ये व बहिष्कार घालण्यामध्ये काय मोठे अंतर आहे, असा जर प्रश्न केला तर त्याचे कोणी होकारार्थी उत्तर देऊ शकेल, असे दिसत नाही.

दुसरा प्रश्न, नैतिक शक्ती पुरी पडली नाही-तिच्याने युद्धाचे संकट टळले नाही-तरीसुद्धा पाशवी शक्तीचा उपयोग करू नये काय? नि:शस्त्र-प्रतिकारवादी लोक स्वारी करणाऱ्या शत्रूच्या अंगच्या नैतिक बलावरती आपल्या कार्यसिद्धीकरिता अवलंबून असतात. आपण नैतिक बल दाखविले तर शत्रूला लाज वाटल्याशिवाय राहणार नाही ; त्याचे मन द्रवेल, तो माघार घेईल व हा घोर प्रसंग टळेल, अशी त्यांची अपेक्षा असते. प्रो. बर्ट्रण्ड रसेल यांची योजना याच कोटीक्रमावर रचलेली होती. परंतु वरील प्रश्नाला हे काही उत्तर नव्हे. समजा की एखाद्याने सर्वप्रकारची लाजलज्जा सोडून सर्व नीतीची बंधने झुगारून दिली आणि नि:शस्त्र प्रजेवर पाशवी शक्तीचा उपयोग करण्यास तो सिद्ध झाला तर नि:शस्त्र प्रतिकाराच्या योजनेतून उत्पन्न होणारे नैतिक बल कितीसे टिकू शकेल आणि ते टिकणे शक्य नाही, असे दिसत असतानासुद्धा पाशवी शक्तीचा उपयोग अतिक्रमणाकरिता नव्हे पण निदान संरक्षणाकरितादेखील करू नये की काय? व तसे न करणे हे जर त्यांचे तत्त्व असेल तर पाशवी शक्तीच्या आघाताने मरणे आणि आत्महत्त्या करणे यात काय फरक आहे ? आता कोणी असेही म्हणतात की नि:शस्त्र प्रतिकाराच्या योजनेची यशस्वीता शत्रूच्याठायी जागृत होणाऱ्या नैतिक बलावरच अवलंबून आहे, असे नव्हे तर नि:शस्त्र-प्रतिकारवाद्यांचे आत्मबल व शत्रूंशी असहकार या दोहोवरती अवलंबून आहे. आणि म्हणूनच तिच्या यशस्वीतेसंबंधाने त्यांना खात्री वाटते. निदान प्रोफेसर रसेल यांच्या योजनेच्या मुळाशी हा युक्तिवाद होता.

नि:शस्त्र प्रजेचा असहकार प्रतिकाराच्या दृष्टीने कोठवर जाऊ शकतो याचा अनुभव हिंदुस्थानातील लोकांना सांगण्याचे काही कारण नाही. असहकाराची भाषा फार सोपी आहे. परंतु कृती फार कठीण आहे व कृती झालीच तर तिचा प्रतिपक्षावर कवडीचाही परिणाम होऊ शकत नाही, हे वीस वर्षांच्या अनुभवाने या

देशातील लोकांना कळून चुकले आहे व ते प्रामाणिकपणाला जागले तर असहकाराची मातब्बरी काय आहे, हे आज ते जगाला सांगू शकतील. नैतिक बल, अथवा नैतिक बल व त्यांच्याबरोबर असहकारता या जोडगोळीचा उपयोग होत आहे. हे सिद्ध झाल्यावर पाशवी शक्तीचा उपयोग कराच असा दुराग्रह कोणीही धरणार नाही. परंतु या मार्गाने जर प्रसंग टळला नाही तर काय ? तरी देखील पाशवी शक्तीचा आश्रय घेऊ नये काय ?

पाशवी शक्तीचे कायमचे उच्चाटण करणे हे जर अहिंसकांचे ध्येय आहे व ते ध्येय निःशस्त्र प्रतिकाराच्या उपायाने साध्य होत नसेल तर पाशवी शक्तीचा उपयोग करावा किंवा न करावा हा तिसरा प्रश्न उभा राहतो. हा प्रश्न दिसावयाला मागच्या प्रश्नासारखाच जरी असला तरी तो भिन्न आहे. मागचा प्रश्न पाशवी शक्तीची धाड आली असताना काय करावे या संबंधीचा आहे, आताचा प्रश्न पाशवी शक्तीचे निर्मूलन कसे होईल यासंबंधीचा आहे. जेव्हा जेव्हा पाशवी शक्तीची धाड येईल तेव्हा तेव्हा निःशस्त्र प्रतिकाराच्या शस्त्राने त्याला तोंड द्यावयाचे, एवढाच जर अहिंसावाद्यांचा कार्यक्रम असेल तर निःशस्त्र-प्रतिकार हा एक मोठा उपद्रवच आहे, असे म्हणावे लागेल. अशा या निःशस्त्र-प्रतिकाराच्या पद्धतीने जग पाशवी शक्तीच्या भोवऱ्यातून कधीही बाहेर पडू शकणार नाही. एका पीढीने निःशस्त्र-प्रतिकार करून मिळविलेला लाभ दुसऱ्या पीढीला मिळू शकला नाही तर पाशवी शक्तीच्या भोवऱ्यातून कोणी बाहेर पडू शकणार नाही व अहिंसेच्या तत्त्वाचा विजय झाला असे केव्हाच म्हणता येणार नाही. पाशवी शक्तीचा योग कायमचाच बंद झाला नाही तर प्रसंगोपात्त निःशस्त्र-प्रतिकार हा एक पोरखेळच होऊन बसेल. पाशवी शक्तीचे निर्मूलन करणे हे ध्येय साध्य होत नसेल तर पाशवी शक्तीचा उपयोग कां करू नये, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. आता असे म्हणता येईल की एकदा पाशवी शक्तीचा उपयोग केल्याने पुन्हा पाशवी शक्ती आपले डोके वर काढणार नाही, अशी तरी हमी कोण देऊ शकेल ? याला उत्तर असे की ज्या बाजूच्या पाशवी शक्तीचा जय होईल त्या बाजूने आपल्याला प्राप्त झालेल्या विजयाचा स्वार्थाकरिता उपयोग न करता नवीन जागतिक घटना तयार करण्यासाठी केला तर पाशवी शक्तीचा पाशवी शक्तीने नायनाट करणे शक्य आहे. प्रश्न असा की अशा कामी पाशवी शक्तीचा उपयोग करणे रास्त आहे किंवा नाही ? वरील विवेचनावरून खालील सिद्धांत ठरविता येतील :

पहिला सिद्धांत असा की पाशवी शक्तीचा कधीही उपयोग करण्यात येऊ नये हे म्हणणे [illegible] आहे, नव्हे, आम्हाला तर असे वाटते की 'कोणत्याच

प्रसंगी पाशवी शक्तीचा कोणीही उपयोग करू नयें,' असे म्हणणे म्हणजे मोठाच दुराग्रह आहे. अमेरिकेतील निग्रो लोक अनेक वर्षेपावेतो गुलामगिरीत खितपत पडले होते. त्यांच्या सुटकेकरिता अमेरिकेत मोठे युद्ध घडले अर्थात पाशवी शक्तीचा पूर्ण उपयोग करण्यात आला. नुसत्या नैतिक बलावर जर त्यांची सुटका अवलंबून ठेवण्यात आली असती तर निग्रो लोक आतापर्यंत तरी गुलामगिरीतून मुक्त झाले असते किंवा नाही याबद्दल आम्हास संशय वाटतो. तसेच त्यांना स्वातंत्र्य संपादन करून देण्याकरिता ज्या पाशवी शक्तीचा उपयोग करण्यात आला, त्यात अमेरिकन राष्ट्राची नैतिक चूक झाली, असे म्हणणारा नैतिक वृत्तीचा कोणी माणूस क्वचितच सापडेल, असा आम्हास विश्वास वाटतो. आज जगामध्ये अनेक राष्ट्रे गुलामगिरीत आहेत. त्या सर्व राष्ट्रांची मुक्तता व्हावयाची आहे. नैतिक बलाने त्यांची मुक्तता होणे शक्य असेल, तर पाशवी शक्तीचा विनाकारण उपयोग करा, असे म्हणणाऱ्या माणसाला वेड्यात काढण्यास कोणीही हरकत घेणार नाही. परंतु नैतिक बलाने हे कार्य जर होणार नसेल तर या कार्याला पाशवी शक्तीचा उपयोग करू नये, असे म्हणणाऱ्या माणसालाही मुर्खात काढल्याशिवाय गत्यंतर नाही. शक्ती हे साधन आहे, स्वातंत्र्य हे ध्येय आहे. ध्येय जर निष्कलंक व शुद्ध असेल तर त्या ध्येयाची सिद्धी करण्याकरिता आत्यंतिक साधनाचा उपयोग करण्यास नीतीचे तत्त्व आड येऊ शकत नाही व जर आले तर ते नीतीचे तत्त्व खोटे आहे, असे म्हणावयास काही हरकत नाही. अहिंसा हे साधन आहे, ध्येय नव्हे आणि ध्येयानुसार साधनांची युक्तायुक्तता ठरवावयाची असते, हा पहिला सिद्धांत होय. या अहिंसेच्या वादामध्ये सदोष व आत्यंतिक विचाराची मांडणी करण्यात येत असेल तर त्याचे मुख्य कारण म्हणजे वाद करणाऱ्या लोकांनी ''साधन कोणते'' व ''ध्येय कोणते'' हे नीटपणे ध्यानात न ठेविल्यामुळे असा प्रकार होतो. 'अहिंसा' हे काही झाले तरी ध्येय होऊ शकत नाही. अहिंसा एक साधन आहे. ध्येय संपादनाकरिता ते जर पुरे पडत असेल तर पाशवी शक्तीचा कोणीही उपयोग करू नये, असे म्हणता येईल. परंतु ध्येयाच्या संपादनाकरिता जर अहिंसेचे साधन अपुरे पडत आहे, आणि ध्येयाचा नाश होत आहे, तरीसुद्धा अहिंसेशिवाय दुसऱ्या कोणत्याच साधनाचा उपयोग करता कामा नये, असा आग्रह धरणाऱ्या माणसाला मूर्खातच काढावे लागेल.

दुसरा सिद्धांत असा आहे ; पाशवी शक्तीचा उपयोग दुसऱ्यावर अन्याय लादण्याकरता करणे हे पाप आहे; परंतु पाशवी शक्तीचे निवारण करण्याकरिता तिचा उपयोग करणे यांच्यात काही पाप नाही, नव्हे, तसे करणे नीतीस धरून होईल. या प्रश्नासंबंधाने अहिंसावाद्यांच्या विचारात बराचसा घोटाळा झालेला

दिसतो. एका बाजुने ते सांगतात की, पाशवी शक्तीच्या बळाने कोणत्याही गोष्टीचा निर्णय करण्यात येऊ नये, दुसऱ्या बाजूने सांगतात की जर तुमच्यावर कोणी पाशवी शक्तीचा उपयोग केला तर त्याचा प्रतिकार करू नका. पण या गोष्टी कशा परस्पर विरोधी आहेत, हे त्यांना दिसत नाही. पाशवी शक्तीचा प्रतिकार न करणे म्हणजे पाशवी शक्तीला निर्णय करून घेण्याला मोकळीक करून देण्यासारखेच नव्हे, मदत करण्यासारखे आहे. खरी विचाराची दिशा अशी आहे : तुमच्यावर पाशवी शक्तीचा जर कोणी उपयोग केला तर त्याचा आवश्यक असेल तर पाशवी शक्तीने प्रतिकार करा. परंतु पाशवी शक्तीने प्रतिपक्षाला पराजित केल्यानंतर वादाचा निकाल आपल्या तर्फेचा लावून पराजितावर अन्याय करण्याला पाशवी शक्तीने मिळविलेल्या जेतेपणाचा उपयोग करू नका.

पाशवी शक्तीचा उपयोग करून दुसऱ्यावरती आपली सत्ता लादणे हा प्रश्न निराळा आहे. हे दोन्ह प्रश्न अगदी भिन्न आहेत व ते भिन्न आहेत याची जाणीव नसल्यामुळे सर्वत्र विचारांचा घोटाळा दिसून येतो. पाशवी शक्तीचा उपयोग पाशवी शक्तीच्या विरुद्ध करणे हे आमच्या मते आवश्यक आहे, इतकेच नव्हे तर न्याय्यही आहे कारण पाशवी शक्तीचा नाश जर पाशवी शक्तीनेच होणार असेल तर व तो नाश करणे जर इष्ट असेल तर पाशवी शक्तीचा उपयोग करणे काही वावगे नाही. जगात जो अन्याय उत्पन्न होतो तो पाशवी शक्तीविरुद्ध पाशवी शक्तीचा उपयोग केल्याने होत नसून पराजितावरती जेत्यांनी लादलेल्या दुर्घट अटींमुळे होतो ही गोष्ट बरेच लोक विसरतात. शांतताप्रिय लोकांनी पाशवी शक्तीच्या विरुद्ध बंड न पुकारता युद्ध संपल्यानंतर पाशवी शक्तीमुळे विजय संपादून केलेल्या राष्ट्रांनी पराजित राष्ट्रावरती अन्याय केल्यास जर प्रतिकार करण्यास सिद्धता दर्शविली तर जगातील अन्याय नाहीसा होईल. अन्याय नाहीसा झाला तर युद्ध नाहीसे होईल व युद्ध नाहीसे झाले तर पाशवी शक्तीची उपासना करण्याचे काही कारण उरणार नाही. अहिंसा प्रस्थापित करण्याच्या बाबतीत हा महत्त्वाचा सिद्धांत आहे असे आम्हास वाटते.

तिसरा सिद्धांत असा की निःशस्त्र प्रतिकाराचा मार्ग एका राष्ट्राने पत्करला व बाकीच्यांनी पत्करला नाही तर त्याचा काही उपयोग होणे शक्य नाही. एका राष्ट्राने निःशस्त्र प्रतिकाराचा स्वीकार केल्याने बाकीची राष्ट्रे त्याचे अनुकरण करतीलच, असे समजून चालावयास काही आधार नाही. नवा मार्ग सुलभ असला तर त्याचे लोक अनुकरण करतात पण दुर्गम असेल तर करीत नाहीत. दुसरे असे की काही गोष्टी एकानेच करून भागत नाही. सर्वांनीच त्या करावयाच्या असतात ; नाहीतर त्या होत नाहीत. उदाहरणार्थ सोशॅलिझम

एकट्याने करून सर्वत्र सोशॅलीझमची पद्धत पडू शकत नाही. सर्वांनीच केला तर सोशॅलिझम अमलात येऊ शकेल. तोच न्याय निःशस्त्र प्रतिकाराच्या तत्त्वाला लागू पडतो. पद्धत पाडणे आणि धडा घालून देणे, या दोहोत फार अंतर आहे. कधी कधी धडा घालून देणाराची मात्र आहुती पडते पण मुख्य हेतू जो पद्धत पाडण्याचा तो सिद्धीस जात नाही. निःशस्त्र प्रतिकारासारखी जोखमींची योजना अंमलात आणण्याची जबाबदारी एकाच राष्ट्राने आपल्या अंगावर घेणे यात औदार्य असेल पण शहाणपणा आहे, असे म्हणता येणार नाही. निःशस्त्र प्रतिकार ही गोष्ट सर्वांनीच एकसमयावच्छेदेकरून करावयाची आहे, तसे व्हावयास जागतिक संघटना झाली पाहिजे व सर्व राष्ट्रांना हे तत्त्व मान्य झाले पाहिजे. हे एकट्या दुकट्या राष्ट्राचें काम नव्हे.

अहिंसेचे तत्त्व हिंदुस्थानमध्ये आदिकालापासून चालत आलेले आहे. अहिंसा धर्माचा उपज येथेच झाला आहे. आर्य लोक हे ध्येयाने व कृतीने हिंसावादी होत. यज्ञ हा त्यांच्या धर्माचा मुख्य पाया. त्या यज्ञात हिंसा व मद्यपान याशिवाय दुसरे काहीच नसे. या हिंसेचा इतका अतिरेक झाला होता की, त्याकाळच्या काही आर्य लोकांना त्यांच्या हिंसेचा वीट आला होता. या हिंसक आर्य धर्माला कंटाळून महावीर याने अहिंसा-वादी जैन धर्म प्रस्थापित केला. पण या दोहोत तत्वाचा अतिरेक झाला. आर्यांची आत्यंतिक हिंसा वृत्ति तर जैनांची आत्यंतिक अहिंसा! या दोन्ही अव्यवहार्य वृत्ती! म्हणून गौतम बुद्धाने आपला बौद्ध धर्म प्रस्थापित केला. यात दोहोतील अतिरेक सोडून त्यातील सुवर्णमध्य साधण्याचा प्रयत्न केला. 'शक्य तोवर अहिंसा, जरूर तर हिंसा' ही गौतम बुद्धाची भूमिका होती. हा बौद्ध धर्म जर टिकून राहिला असता तर अहिंसेबद्दलचे आजचे हे प्रश्न उपस्थित झालेच नसते. पण आमच्या ब्राह्मण बंधूंना हिंसेविरूद्ध उठलेली जनता वश करून बुद्धाचा पाडाव करण्याची लालसा उत्पन्न झाल्यामुळे त्यांनी अहिंसेला धरले आणि त्याचा पुरावा म्हणून गोमांस खाण्याचे सोडून शाकाहार करू लागले. अशा रीतीने बुद्धाच्या विचारसरणीचा लोप होऊन आत्यंतिक अहिंसेचा पगडा हिंदू लोकांवर बसविण्यात आला. हा पगडा आज हजारो वर्षांपासून बसला असल्या कारणाने लोक भेकड दुबळे झाले आहेत. त्यांचा आत्मविश्वास नाहीसा झाला आहे. या आत्यंतिक अहिंसेच्या तत्त्वानेच वागा म्हणून सांगेल तो त्याचा मित्र नसून शत्रू आहे असे म्हणावे लागेल.

मानवी जीवनाला कोणत्यातरी नैतिक तत्त्वाचा पाया असावा हे आम्हास मान्य आहे. संसारी जीवनालाच नव्हे तर राजकारणालाही तो असावा हे आम्हास कबूल आहे. मागे १९२० साली गांधी आणि टिळक ह्या उभयतात या

प्रश्नासंबंधाने वाद झाला होता. त्यात राजकारणात 'शठं प्रतिशाठयंम्' याच तत्त्वाच्या आधारे आपण वागले पाहिजे असे टिळकांनी प्रतिपादिले होते. अगदीच नागडे तत्त्व मांडल्याची लाज वाटून की काय टिळकांनी त्यावर पदर घालण्याचा प्रयत्न केला. 'शठं प्रतिशाठयंम्' तत्त्वाने आपल्या मताचा विपर्यास केला जातो व आपली खरी भूमिका दर्शविण्याकरिता आपण ''अक्कोधेन जिने क्रोधं असाधुं साधुना जिने ! जिने कदरिये दानेन सच्चेन लोकवादिना'' (दुसऱ्याचा क्रोध आपल्या शांतीने जिंकावा, दुष्टास साधुपणाने जिंकावे, आणि असत्य सत्याने जिंकावे) हे गौतम बुद्धांचे तत्त्व मान्य नाही, पण गीतेत सांगितलेल्या 'ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम्' (जे मला ज्या प्रकारे भजतात त्यांना मी त्याप्रमाणेच फल देतो) या तत्वाप्रमाणे राजकारणात वागावे व ती आपली भूमिका आहे, असा त्यांनी नंतर खुलासा केला. या वादात गांधींनी गीतेतल्या तत्त्वापेक्षा बुद्धाचेच तत्त्व श्रेष्ठ आहे व राजकारणात गीतेच्या तत्त्वापेक्षा बुद्धाचे तत्त्व लाभदायक होईल असे सांगितले. आम्ही या बाबतीत गांधींशी सहमत आहोत. गीतेतील तत्त्व आणि नाना फडणविसाचे शठम्प्रतिशाठ्यम् यांच्यात आम्हाला काही फरक दिसत नाही. परंतु बुद्धाची बाजू जरी गांधींनी घेतली असली तरी अहिंसेच्या बाबतीत बुद्ध आणि गांधी यांच्यात मोठा फरक आहे हे ध्यानात ठेवणे आवश्यक आहे. तो फरक म्हणजे तत्त्व आणि नियम यातला फरक आहे. बुद्ध अहिंसेला तत्त्व म्हणून मानीत असे, नियम म्हणून मानीत नसे. गांधी अहिंसा हा नियम आहे. असा प्रचार करीत आहेत. तत्त्व आणि नियम यांच्यात फरक आहे व तो फरक मोठा आहे. (Principle is to be followed) नियम पाळावयाचा असतो. (Rule is to be obeyed) नियम झाला की मनुष्य त्याचा गुलाम होतो. तत्त्व ठरले की मनुष्य त्याचा उपासक होतो ; गुलाम होत नाही. हा फरक ध्यानात न आल्याकारणाने अनेक समाज रसातळास गेले आहेत. तत्त्व लवचीक असते, नियम कडक असतो. त्याला मोडता येत नाही. नियम मात्र समाजाची मोडतोड करू शकतो. नियम अडाण्याकरिता असतो. तत्त्व शहाण्याकरता असते. तत्त्व प्रगतीला बाधा आणू शकत नाही. नियम गती खुंटवितो. हा महत्त्वाचा फरक गांधींना समजलेला नाही असे दिसते.

अहिंसेसारख्या गंभीर विषयासंबंधाने गांधींच्या विचारात काही फेरबदल झाला आहे की काय हे जाणून घेण्याची जिज्ञासा होणे सहाजिकच आहे. गांधींचे जुने विचार कसे होते हे त्यांच्या लेखातून घेतलेल्या उताऱ्यावरून सहज ध्यानात येण्याजोगे आहे.

ता. २ मार्च १९२२ च्या 'यंग इंडियाच्या' अंकात या विषयासंबंधाने गांधींनी म्हटले आहे की,

I am sorry that I find a nervous fear among some Hindus and Mohammedans that I am undermining their faith and that I am even doing irreparable harm to India by my uncompromising of non-violence.

I may be bold to say that violence is the creed of no religion and that, whereas non-violence in most cases, is obligatory in all, violence is merely permissible in some cases. But I have not put before India the final form of non-violence. The non-violence that I have preached from Congress platforms is non-violence as a policy.

If they do not believe in the expedient of non-violence, they must denounce it; but not claim to believe in the expedient, when their heart resists it. How disastrous it would be if, not believing in violence even as an expedient, joined, say a violence party and apporached a gun with a perturbed heart. The reader will believe me when I say that I have the capacity for killing a fly. But I do not believe in killing even flies. Now suppose I joined an expedition for fly-killing as an expedient. Will I not be expected, before being permitted to join the expedition to use all the available engines of destruction whilst I remained to the army of fly-killers ? If those who are in the Congress and the Khilafat Committees will perceive this simple truth, shall certainly either finish the struggle this year to a successful end, or be so sick of non-violence as to give up the pretention and set about some other programme.

"मला खेद वाटतो तो हा की, काही हिंदू आणि मुसलमान लोकांच्या मनात असे भय उत्पन्न झाल्याचे मला आढळून आले आहे की, अहिंसा तत्त्वाच्या माझ्या शिकवणुकीमुळे मी त्यांच्या धर्मश्रद्धेचा मूळ पायाच उखडून काढीत आहे आणि हिंदुस्थान देशाचेही अपरिमित नुकसान करीत आहे.

मी बिनदिक्कत म्हणतो की हिंसा हे कोणत्याच धर्माचे ब्रीद नाही; उलटपक्षी बहुतेक सर्व धर्मात अहिंसा तत्त्वाचे पालन करण्याचे बंधन (त्या त्या धर्मातील) व्यक्तीमात्रावर घालण्यात आले असून, प्रसंगविशेष केवळ आपद्धर्मकर्म म्हणूनच हिंसेला मान्यता देण्यात आलेली आहे. शिवाय आत्यंतिक स्वरुपाच्या अहिंसेचा मार्ग मी हिंदुस्थानापुढे ठेवलेला नाही. कॉंग्रेसच्या व्यासपीठावरून मी जी अहिंसेची शिकवण देत आलो आहे ती (तत्त्व म्हणून नसून) केवळ धोरण या दृष्टीने देत आलो आहे.

अहिंसापालन हे एक प्रसंगोपात्त अनिवार्य असे कर्तव्य आहे, या गोष्टीवर ज्यांचा विश्वास नसेल, त्यांनी उघडपणे त्याचा धिक्कार केला पाहिजे. हे कर्तव्य पार पाडण्याला ज्याच्या मनोदेवतेचा विरोध असेल त्यांनी बाह्यतः त्यावर विश्वास दाखविण्याचे ढोंग करता कामा नये. गृहित धरू या की हिंसा ही प्रसंग

विशेष आवश्यक अशी गोष्ट आहे. या प्रमेयावर माझा विश्वास नसताना मी हिंसेच्या तत्त्वावर आधारलेल्या एखाद्या पक्षाला मिळालो आणि ऐन लढ्याला धुमश्चक्रीत अस्थिर अंतःकरणाने बंदूक हातात धरून (विचार करीत स्वस्थ) राहिलो तर ते कृत्य किती धोक्याचे होईल बरे ? एखादी माशी मारण्याचे सामर्थ्य माझ्यात निःसंशय आहे ; (या माझ्या म्हणण्यावर वाचकांनी विश्वास ठेवावा) परंतु माशांची हिंसा करण्यास हरकत नाही. या गोष्टीवर माझा विश्वास नसतांना समजा की, मी माशांची शिकार करण्यासाठी स्वारीवर निघालेल्या एका टोळीत केवळ आवश्यक आणि प्रसंगोपात्त कर्तव्य म्हणून दाखल झालो. अशावेळी मला स्वारीत भाग घेण्याला परवानगी देण्यापूर्वी माशांची शिकार करण्यासाठी निघालेल्या तुकडीत मी असे तोपर्यंत माशांचा विध्वंस करण्यासाठी उपलब्ध असलेल्या सर्व साधनांचा उपयोग करण्याची माझी तयारी आहे, अशी अपेक्षा केली जाणार नाही काय ? जे कोणी कॉंग्रेसमध्ये आणि खिलाफत कमिटीत आहेत त्यांना जर हे साधे सत्य पटले तर एकतर आपण आपल्या लढ्याचा चालू वर्षातच निश्चितपणे यशस्वी निकाल लावून घेऊ. किंवा हिंसेचा आपल्याला इतका वीट येईल की अहिंसावादाची सारी सोंगेढोंगे आपण पार झुगारून देऊन दुसरा काही तरी कार्यक्रम आखण्याच्या उद्योगाला लागू.''

त्यानंतर ९ मार्च १९२२ च्या यंग इंडियाच्या अंकात यासंबंधीचे त्यांचे विचार अधिकच स्पष्टपणे खालील शब्दात मांडलेले आहेत.

"A correspondent from Lahor writes :

So far as the facts about Bardoli decision have come to light appears the decision was arrived at either under the influence of Pandit Malviya or under some far-fetched notions of non-violence. In the former case the act is most unworthy and in the later case most unwise. Is not the ideal of the Congress Swaraj, and not non-violence ?"

"It is impossible to withhold sympathy from the writer. His letter is typical of the attitude; I saw reflected in Dehli I have already given the assurance that Pandit Malviya has nothing to do with the Bardoli decision. Nor have any far-fetched notions of non-violence, anything to do with it Correspondent's letter is the best justification for it. To me the Bardoli decision is the logical out-come of the national pledge of limited non-violence. I entirely endorse the opinion that Swaraj is the nation's goal, not non-violence. It is true that my goal is as much Swaraj as non-violence because I hold Swaraj for the masses to be unattainable save through non-violence. But have I not repeatedly said in these columns that it would have India to become free even by violence rather than that she should remain in bondage ?"

"लाहोरचे एक गृहस्थ आपल्या पत्रात म्हणतात. बार्डोली निर्णयाबाबत आजपर्यंत प्रकाशात आलेल्या हकीकतीवरून असे दिसून येते की, एकतर हा निर्णय पंडित मालवीय यांचे वजनामुळे अगर अनत्याराच्या अवास्तव कल्पनांमुळे घेण्यात आलेला असावा. पहिल्या बाबतीत ही गोष्ट मालवीयजीस न शोभणारी दिसते तर दुसऱ्या बाबतीत जाणतेपणाचा अभाव दिसून येतो. काँग्रेसचे ध्येय अहिंसा नसून स्वराज्य आहे, हे खरे नाही काय ?"

"पत्र लेखकाविषयी सहानुभूती न वाटणे अशक्य आहे. दिल्लीमध्ये दिसून आलेल्या मनोवृत्तीचे त्यांचे पत्र हे एक प्रतीक आहे. पंडित मालवीयांचा बार्डोली निर्णयाशी काहीच संबंध नाही. हे मी पूर्वीच जाहीर केले आहे. तसेच 'अहिंसेच्या अवास्तव कल्पनां' चाही या निर्णयाशी काही संबंध नाही. पत्रलेखकाचे पत्र हेच याचा उत्कृष्ट पुरावा आहे. माझ्या कल्पनेप्रमाणे तर्कशुद्ध दृष्टीने विचार केल्यास मर्यादित अनत्याराच्या राष्ट्रीय शपथेतच बार्डोली निर्णयाचा उगम आहे, असे दिसून येईल.

राष्ट्राचे ध्येय स्वराज्य आहे, अहिंसा नव्हे या मताला माझी पूर्ण संमती आहे. माझ्याबाबतीतही अहिंसा हे माझे ध्येय आहे परंतु त्याबरोबर स्वराज्य हे देखील माझे ध्येय आहे, हेही तितकेच खरे आहे. कारण अहिंसा मार्गाचा अवलंब केल्याशिवाय जनतेला स्वराज्य प्राप्ती होणे अशक्य आहे. परंतु हिंदुस्थान देश पारतंत्र्याच्या बेडीत खितपत राहण्यापेक्षा अत्याचाराच्या मार्गानेही स्वराज्य मिळवणे मला पत्करेल, असे मी वारंवार मत दिले नाही काय ?"

२९ मे सन १९२४ च्या 'यंग इंडिया' च्या अंकात त्यांनी जो हिंदू-मुसलमानांच्या 'दंग्या' वरती लेख लिहिला त्यातही या विषयासंबंधाने खालीलप्रमाणे विचार व्यक्त केले आहेत.

"What I see around me to-day is, therefore, a reaction against the creed of non-violence. I feel the wave of violence coming. The Hindu-Muslim tension is on acute of this trend.

I have never presented to India that extreme form of non-violence, it only because I do not find myself fit enough to re-deliver that ancient message. Though my intellect has fully understood and grasped it, it has not as yet become part of my whole being. My strength lies in my asking people to do nothing that I have not tried repeatedly in my own life. I am often asking my country-men today to adopt non-violence as their creed, only for the purpose of regulating the relations between the different races, and for the purpose of attaining Swaraj. Hindus and Musalmans, Christians, Sikhs and Parsis must not settle their differences by resort to violence and the means for the attainment of Swaraj must be non-violence.

I do not say ' eschew violence in your dealing with robbers or thieves or with nations that may invade India.' But in order that we are better able to do so, we must learn to restrain ourselves. It is a sign of strength but of weakness to take up the pistol on the slightest pretext. Mutual fisticuffs are a training not in violence but in emaseution. My method of non-violence can never lead to loss of strenght, but it alone will make it possible, if the nation wills it, to offer disciplined and concerted violence in time of danger. "

" आज मला अहिंसावादाच्या प्रसाराची प्रतिक्रिया माझ्या सभोवार दिसत आहे. अत्याचाराची लाट उसळणार, असे मला वाटू लागले आहे. हिंदू-मुसलमानांची तेढ हे याच प्रतिक्रियेचे आत्यंतिक लक्षण आहे.

अहिंसेचा हा पुरातन संदेश फिरून पुकारण्यास मी स्वतःला लायक समजत नसल्यामुळे मी हिंदुस्थानापुढे अनत्याचाराचे आत्यंतिक स्वरूप कधीच मांडले नाही. अहिंसेचे तत्त्व माझ्या बुद्धीला जरी पूर्णपणे उमगले असले-माझ्या बुद्धीला जरी त्याचे पूर्णपणे आकलन झाले असले-- तरी ते माझ्या अंगी बाणलेले नाही. जी गोष्ट मी माझ्या स्वतःच्या आयुष्यात फिरफिरून अनुभवून घेतलेली नाही, ती गोष्ट करण्यास मी लोकांना सांगत नाही व यातच माझे नैतिक बल साठलेले आहे. म्हणून केवळ जातिजातीतील परस्पर संबंधाची घडी नीटपणे बसविण्यासाठी व स्वराज्य संपादनासाठी अहिंसेचे ब्रीद स्वीकारा, असे मी माझ्या देशबांधवांना सांगत आहे. माझे म्हणणे असे की, हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन, शीख व पारशी यांनी आपसातील कलह मिटविण्यासाठी अत्याचाराचा अवलंब करता कामा नये. त्याचप्रमाणे स्वराज्य संपादनाचा मार्गदेखील अनत्याचाराचा असला पाहिजे.

" चोर, दरवडेखोर अगर हिंदुस्थान देशावर स्वारी करणाऱ्या राष्ट्राचा समाचार घेताना 'अत्याचार टाळा, अहिंसा पाळा ' असे मी मुळीच म्हणत नाही ; परंतु अनत्याचारी व्रत धारण करण्यास समर्थ होण्यासाठी आपण संयम राखण्यास शिकले पाहिजे. क्षुल्लक कारणासाठी पिस्तुलाला हात घालणे हे ताकदीचे लक्षण नसून कमकुवतपणाचे लक्षण आहे. आपापसातील हातघाईने अत्याचाराचे शिक्षण न मिळता उलट नामर्दपणाच निर्माण होतो. माझ्या अनत्याचारी पद्धतीने बलहीनता येणे कदापि शक्य नसून, उलट तीमुळेच वेळ पडल्यास संकटसमयी राष्ट्राची इच्छा असल्यास पद्धतशीर शिस्तीने संघटितपणे अत्याचारी मार्गाचा अवलंब करणे शक्य होईल. "

वरील लेखातून प्रतिपादिलेले त्यांचे जुने मत व आज त्यांनी मांडलेले मत या दोहोत किती महदंतर पडले आहे, हे कोणास सांगावयास नको. हे अंतर का पडले या प्रश्नाचे उत्तर अत्यंत उद्‌बोधक ठरेल, यात शंका नाही. आमच्या मते गांधींच्या विचारांमध्ये अशातऱ्हेचे परिवर्तन होण्यास जी कारणे असू शकतील त्यापैकी महत्वाचे कारण त्यांना 'हिंदुस्थानचा पुढारी ' ही स्थिती कमी प्रतीची वाटून ' जगाचा उद्धारक ' म्हणून जगावयाचे, अशी अहंभावना उत्पन्न झाली आहे, असे आम्हांस तरी वाटते. गांधी यांना प्रसिद्धीची व मोठेपणाची किती हाव आहे, हे त्यांच्या भक्तगणातील पुष्कळ लोकांना कबूल नसले तरी ती सर्वांच्या माहितीतील गोष्ट आहे. निःशस्त्र–प्रतिकाराची एक '' अमोल चीज '' '' अमृतवल्ली '' आपण शोधून काढली आहे असे त्यांना वाटते. हे तत्त्व हिंदुस्थानच्या उद्धाराकरिताच काय परंतु जगाच्या उद्धाराकरिता उपयोगात आणता येईल, अशी त्यांची महत्वाकांक्षा आहे. हिंदुस्थान देशावर त्याचा प्रयोग करून दाखवून जगाला त्याची सिद्धता दर्शवून द्यावी, अशी त्यांची मनीषा आहे. कारण तसे झाले तर साहाजिकपणे जगातील अद्वितीय पुरुष म्हणून आपणास कीर्ति संपादन करता येईल अशी त्यांची वासना आहे.

'' हिंदुस्थानचा पुढारी की जगाचा उद्धारकर्ता ? ''

यांच्या झगड्यात जगाचा उद्धारकर्ता होण्यांची तृष्णा बलवत्तर झाली असल्यामुळे गांधींचे अहिंसेच्या बाबतीत मतांतर झाले आहे, असे आम्हास वाटते.

याचा पुरावा ता. २३ फेब्रुवारी १९२२ च्या ' यंग इंडिया ' च्या अंकात "*No end to my sorrow*" '' माझ्या खेदाला सीमा उरली नाही. '' या लेखात सापडू शकतो. बार्डोलीचा कायदेभंगाचा कार्यक्रम पुढे ढकलण्यात आला याबद्दल गांधींची मिस्टर पॉल रिचर्ड नावाच्या गृहस्थाबरोबर चर्चा झाली होती. त्यात गांधी म्हणाले की,

" I do not work for freedom of India. I work for non-violence in the world and that is the difference between me and Mr. Tilak. Mr. Tilak was telling me, ' I would sacrifice even truth for freedom of my country ' but I am ready to sacrifice even freedom for the sake of truth. "

'' माझे कार्य हिंदुस्थान देशाला स्वातंत्र्य मिळवून देणे हे नसून जगात अहिंसा तत्त्वाची प्राणप्रतिष्ठा करणे हे आहे. हा मी आणि टिळक यांच्यातला भेद आहे. टिळक मला म्हणत 'माझ्या देशाच्या स्वातंत्र्याकरिता मी सत्याचादेखील बळी देईल.' परंतु मी म्हणतो की सत्याकरिता देशाच्या स्वातंत्र्याचा बळी देण्यास देखील माझी तयारी आहे. ''

या मुलाखतीचा स्फोट मि. रिचर्ड यांनी त्यावेळच्या '' लोकमान्य '' वृत्तपत्राच्या प्रतिनिधीशी केला व म्हणाले की, गांधींची तहान हिंदुस्थानच्या पुढारीपणाने भागणार नसून त्यांना जगातला महात्मा होण्याची इच्छा झाली आहे. हे खरे का, म्हणून लोकमान्याच्या संपादकाने गांधींना विचारले. त्यास उत्तर देण्याकरिता गांधींना वरील लेख लिहावा लागला. त्यात गांधींना मोठ्याच कष्टाने म्हणावे लागले की, ''मि. रिचर्ड यांनी माझ्या तोंडी जे शब्द घातले आहेत त्यात अंतर्भूत असलेले सत्य मला नाकबूल करता यावयाचे नाही. '' *(It is not possible to deny the substance of it.)*

गांधींनी या देशाचे धिंडवडे काढण्याचे जे अनेक उपक्रम केले त्यापैकीच आत्यंतिक अहिंसेचा हा एक उपक्रम आहे. मदांध होऊन आपल्या बायकांचे धिंडवडे काढणारे नवरे सर्वत्र सापडतात. पण देशाचे धिंडवडे काढणारा पुढारी मात्र हिंदुस्थानाबाहेर अन्यत्र कोठे पाहावयास सापडणार नाही. हा सगळा मदांधपणाचा परिणाम आहे. मद दारू प्याल्यानेच येतो, दुसऱ्या कशानेच येत नाही, असे मात्र म्हणता येणार नाही. महात्मा होण्याची पिपासा दारू इतकीच मद आणते हे गांधींनी सिद्ध करून दिले आहे.

युद्धात साहाय्य करणारांचे तीन पंथ

हिन्दुस्थान व इंग्रज लोक यांचा संबंध इतका अन्योन्य आहे की युद्ध सुरू झाल्याबरोबर इंग्रजांना या युद्धात मदत करावी किंवा नाही हा प्रश्न या देशातील लोकांसमोर उभा राहणे अगदी अपरिहार्य होते. परंतु या महत्वाच्या प्रश्नासंबंधाने आतापर्यंत या देशामध्ये एकमत झालेले नाही, हे सर्वांना माहीत आहे. लढाई सुरू झाल्यापासून गेल्या जून महिन्यापर्यंत या देशात साहाय्य करावे किंवा न करावे या प्रश्नासंबंधाने दोन पंथ होते.

पहिला पंथ म्हणजे या युद्धात ब्रिटीश लोकांना बिनशर्त मदत करावी, असे म्हणणारा पक्ष होता. त्यात स्वतंत्र मजूर पक्ष व नेमस्तांचा पक्ष या दोन पक्षांची गणना केली पाहिजे. स्वतंत्र मजूर पक्षातर्फे आम्ही (डॉ. आंबेडकर यांनी) तारीख १३ सप्टेंबर सन १९३९ रोजी एक जाहीर पत्रक काढून असा खुलासा केला होता की, इंग्रज सरकारच्या हातून हिंदुस्थानच्या हिताच्या बाबतीत पुष्कळ हेळसांड झालेली आहे, व देशाच्या संरक्षणाच्या दृष्टीने तर मोठी आबाळ झालेली आहे. तथापि, या देशाला ब्रिटिशांशी जे भांडण भांडावयाचे असेल त्याची शहानिशा युद्ध संपल्यावर करून घ्यावी. परंतु युद्धामध्ये साहाय्य करण्यास यावेळी तरी अटीतटीचा वापर या देशातील लोकांनी करू नये. अशाच

प्रकारचे एक पत्रक लिबरल पक्षाच्या वतीने सर चिमणलाल सेटलवाड यांनी तारीख ११ सप्टेंबर सन १९३९ रोजी जाहीर केले होते. अशी भूमिका घेण्यात आली होती की ब्रिटीश लोकांच्या विरूद्ध या देशातील लोकांच्या अनेक तक्रारी आहेत व त्यातील काही तक्रारी तर रास्त आहेत तथापि या देशातील लोकांनी आमच्या तक्रारीची वासलात लागली तरच आम्ही सहाय्य करू अशा प्रकारची भुमिका न घेता या युद्धात खुल्या दिलाने इंग्रजांना मदत करावी.

बिनशर्त मदत करणाऱ्यांचा जसा एक पंथ आहे तसाच सशर्त मदत करणाऱ्यांचा दुसरा पंथ आहे. या पंथात मुस्लिम लीग व काँग्रेस या दोहोंचाही समावेश होऊ शकतो. मुस्लीम लीगने आपल्या कार्यकारी मंडळाची बैठक भरवून तारीख १९ सप्टेंबर सन १९३९ रोजी आपली भूमिका स्पष्ट केली होती. हल्ली घडवून ठेवलेले पण अंमलात न आलेले फेडरेशन मोडून टाकावे व राज्यघटना कोणत्या तऱ्हेची असावी याचा फेरविचार करण्यात यावा व ही जी नवी घटना होणार ती मुसलमानांच्या संमतीशिवाय होऊ नये व या अटी इंग्रज सरकारने मान्य केल्या तरच मुस्लीम लीग या लढाईमध्ये इंग्रजांना साहाय्य करण्यास सिद्ध होईल, असा ठराव करण्यात आला होता. जशा मुस्लिम लीगच्या अटी तशाच काँग्रेसच्या अटी काय आहेत हे वर्किंग कमिटीने तारीख १५ सप्टेंबर १९३९ रोजी प्रसिद्ध केलेल्या ठरावात जाहीर केले आहे. त्यात या युद्धात इंग्रजांनी आपले ध्येय काय आहे व ते ध्येय ते हिंदुस्थानास कितपत लागू करतील याचा खुलासा करावा , तसेच हिंदुस्थान हा स्वतंत्र देश आहे, हिंदुस्थानची राज्यघटना करण्याचा अधिकार फक्त या देशातील लोकांचाच आहे, राज्यघटना या देशातील निवडून दिलेल्या निर्णायक मंडळाकडून करण्यात येईल व निर्णायक मंडळाने घडविलेली राज्यघटना पार्लमेंट मान्य करील, असे इंग्रजांनी जाहीर करावे व तसे जर त्यांनी जाहीर केले नाही तर काँग्रेस ब्रिटिश लोकांना या लढाईत मदत करण्यास तयार होणार नाही.

बहुजन समाजाचा कल बिनशर्त मदत करू नका असे म्हणणाराकडे आहे. ही गोष्ट नाकबूल करता येण्यासारखी नाही. म्हणून त्या भूमिकेची छाननी करणे आवश्यक आहे. काँग्रेस व मुस्लिम लीग या दोहोंची भूमिका एकाच मासल्याची असली तरी मुस्लिम लीगच्या भूमिकेचा विचार करण्याचे काही कारण नाही. '' फेडरेशन '' कोणालाच नको. मुस्लिम लीगला जसे ते नको आहे तसेच ते काँग्रेसला नको आहे. तेव्हा त्या बाबतीत मुस्लिम लीगने विशेष काही निराळ्या प्रकारची अट घातली आहे, असे म्हणावयास काही कारण नाही. मुस्लिम लीगच्या संमतीशिवाय नवी राज्यघटना अंमलात आणू नये या अटीतही मोठे काही कोडे आहे, असे आम्हास वाटत नाही. इंग्रज सरकारपासून अशा प्रकारचे

आश्वासन मागण्यापूर्वीच, काँग्रेसने सर्व प्रकारच्या अल्पसंख्यांकांना आश्वासन दिले आहे की अल्पसंख्यांकांच्या संरक्षणाच्या अटी ज्यात घातलेल्या नाहीत अशा प्रकारची राज्यघटना स्वत: काँग्रेस मान्य करणार नाही. शिवाय हिन्दू बहुजन समाजाचा जो कल आहे तो काँग्रेसच्या भूमिकेकडे आहे. उलट मुस्लिम लीगच्या अटींना हिंदूंचा विरोधच आहे. कारण या अटी ब्रिटीश सरकारविरुद्ध नसून हिंदूविरुद्धच आहेत म्हणून फक्त काँग्रेसच्याच भूमिकेचा विचार करणे पुरेसे आहे व प्रासंगिक आहे. काँग्रेसच्या सर्वच अटींचा विचार करण्याचे कारण उरलेले नाही. कारण ज्या अटी काँग्रेसने पहिल्याप्रथम मांडल्या होत्या त्यातील पुष्कळशा अटी काँग्रेसने मुकाट्याने गिळल्या आहेत, असे म्हणावयास काहीच हरकत नाही. देशातील लोकांनी निवडून दिलेल्या निर्णायक मंडळाने राज्यघटना तयार करावी ही अट हिंदुस्थानातील काँग्रेसवाल्याशिवाय अन्य कोणत्याही पक्षास मान्य झालेली नाही. या योजनेवर सर्व बाजूंनी जो प्रहार करण्यात आला त्यामुळे गांगरून जाऊन या प्रश्नाची काँग्रेसने पुन्हा वाच्यता केल्याचे दिसत नाही व ती अट काँग्रेसने बहुतेक सोडून दिल्यासारखीच आहे. स्वातंत्र्याच्या बाबतीत जवळ जवळ तोच प्रकार झाला आहे, असे म्हणावयास काही हरकत नाही.

नुकतेच काँग्रेसचे डेप्युटी महात्मा श्री. राजगोपालाचारी यांनी जे भाषण केले आहे त्यात ''हिंदुस्थान देश आजपासून स्वतंत्र आहे, अशी मागणी आजच काही आम्ही ब्रिटिशांकडे केलेली नाही. आम्ही जे मागत आहो ते इतकेच की हिंदुस्थान देशाला पुढे मागे केव्हातरी तसे वाटल्यास स्वतंत्र होण्याचा हक्क आहे, एवढेच इंग्रजांनी मान्य करावे. याच्यापलिकडे काँग्रेस आज काही मागत नाही.'' असा त्यांनी खुलासा केला आहे.

वाघीन व्याल्यावर जशी आपली पिल्ले आपणच खाते त्याप्रमाणे काँग्रेसने आपल्या अटी आपणच गिळंकृत केल्या. तरीपण हिंदू बहुजन समाज इंग्रजांना बिनशर्त मदत करावी असे म्हणावयास तयार नाही, हे उघड आहे. ही जी हिंदू समाजाची भावना झाली आहे तिच्याबद्दल कोणालाही आश्चर्य करण्यासारखे काही नाही. ब्रिटीश साम्राज्याचे जे अनेक भाग आज ज्याप्रमाणे इंग्रजांच्या साहाय्यास धावून येत आहेत त्याप्रमाणे या देशातील लोक धावून जातील अशी अपेक्षा करणे व्यर्थ आहे. ' कळवळ्याची याति आणि लाभावीन प्रीती ' अशी जी तुकारामाची उक्ती आहे ती अगदी यथार्थ आहे. हिंदुस्थानातील लोक व ब्रिटीश लोक याच्यात एकमेकांबद्दल कळवळा वाटण्याला काही कारण नाही. त्यांचा रक्तामासाचा काहीच संबंध नाही. जितजेत्याचे नाते असल्यामुळे उभयतांमध्ये सलोखा नाही. अशा परिस्थितीत परकीय आणि दुखवलेल्या भावनांमुळे हिंदुस्थानातील लोकांना इंग्रजांना मदत करण्याची इच्छा झाली नाही तर त्यात काही नवल नाही.

अशाप्रकारची भावना उत्पन्न होण्यास एक गोष्ट विशेषतः कारणीभूत झाली आहे, असे आम्हास वाटते. इंग्रजांचे राज्य म्हणजे साम्राज्य आहे, या साम्राज्याच्या विस्तारावर पुष्कळ लोकांचा कटाक्ष आहे. एकंदर पृथ्वीच्या खुष्कीच्या पृष्ठभागाचे क्षेत्रफळ ५ कोटी ५५ लक्ष स्क्वेअर मैल आहे. त्यापैकी १ कोटी ४० लक्ष स्क्वेअर मैल इतके क्षेत्र इंग्रजांच्या ताब्यात आहे, ८२ लक्ष ५० हजार स्क्वेअर मैल इतके सोव्हिएट रशियाच्या ताब्यात आहे ; ४३ लक्ष ३०हजार फ्रेंचांच्या ताब्यात आहे ; ४२ लक्ष ५० हजार चीनच्या ताब्यात आहे आणि ३७ लक्ष ५० हजार अमेरिकेच्या ताब्यात आहे. बाकीच्या राहिलेल्या देशांचे क्षेत्रफळ अगदी लहान आहे, हे आकडे पाहिले म्हणजे पुष्कळांना हेवा वाटतो. त्वेषही वाटतो. ५।' कोटी क्षेत्रफळापैकी इंग्रजांच्या ताब्यात जवळ जवळ १।। कोटी प्रांत आहे, हे पाहून कोणासही आश्चर्य व हेवा वाटणे साहजिक आहे. तसेच या इंग्रजांच्या साम्राज्याकरिता आपण लढणे म्हणजे हे साम्राज्य कायम करण्यास मदत करणे, असे हिंदू लोकांस वाटल्यास त्यातही मोठेसे आश्चर्य नाही. हा समाज पं. जवाहरलाल नेहरू यांच्या साम्राज्यविरोधी भाषणांनी अगदी दृढ झालेला आहे.

हिंदू लोकांचा हा समज अगदी चुकीचा आहे व त्यामुळे त्यांच्याहातून होत असलेली कृती त्यांना अंती घातक होणार आहे, असे आम्हास निःसंशय वाटते. म्हणून त्यांनी खालील प्रश्नांचा विचार करावा ; व मग आपले मत काय असेल ते ठरवावे, अशी आम्ही त्यांना सूचना करू इच्छितो. कॅनडा हा देश ब्रिटीश साम्राज्याचा भाग आहे, पण आज कॅनडा ब्रिटीश लोकांच्या अंमलाखाली आहे असे कोणाला म्हणता येईल काय ? साऊथ आफ्रिका हा देश ब्रिटिश साम्राज्याचा एक भाग आहे पण तो ब्रिटिश अंमलाखाली आहे, असे कोणाला म्हणता येईल काय ? आस्ट्रेलिया हा देश ब्रिटिश साम्राज्याचा एक भाग आहे, पण आस्ट्रेलियावर ब्रिटिशांचा अंमल आहे असे म्हणता येईल काय ? आयर्लंड हा देश ब्रिटिश साम्राज्याचा भाग आहे, पण तो ब्रिटिशांच्या अंमलाखाली आहे, असे कोणाला म्हणता येईल काय ? हेच प्रश्न निराळ्या पद्धतीने मांडावयाचे झाले तर, विचारता येईल की कॅनडा हा जरी ब्रिटिश साम्राज्याचा भाग असला तरी सवलतीच्या दृष्टीने अशी कोणती गोष्ट आहे की जी गोष्ट इंग्रजांना कॅनडा देऊ शकतो ती गोष्ट जर्मनांना देऊ शकत नाही ? जी गोष्ट आस्ट्रेलिया ब्रिटिशांना देऊ शकतो ती जर्मनांना देऊ शकत नाही ? साऊथ आफ्रिका ब्रिटिशांना देऊ शकते ती जर्मनांना देऊ शकत नाही? आयर्लंड ब्रिटिशांना देऊ शकते ते जर्मनांना देऊ शकत नाही ? आणखी एका दृष्टीने पाहिले तर हा प्रश्न तिसऱ्या तऱ्हेने

मांडता येईल. अशी कोणती गोष्ट आहे की जी कॅनडा करू इच्छितो पण इंग्लंड त्याला ती करू देणार नाही ; जी गोष्ट आस्ट्रेलिया करू इच्छिते पण इंग्लंड त्याला हरकत घेऊ शकतो ; साऊथ आफ्रिका करू म्हणते पण इंग्रज त्याला आडकाठी करू शकतील ? या दृष्टीने विचार केला असताना असे दिसून येईल की इंग्रजांच्या राज्य पद्धतीस साम्राज्यशाही असे नाव देणे म्हणजे गैरसमज करून घेण्यासारखे आहे. साम्राज्यशाही म्हणजे एक प्रकारची सरदेशमुखीच आहे आणि जेथे सरदेशमुखी कायमचे स्थान करून राहील त्यालाच साम्राज्यशाही म्हणता येईल. इंग्रजांच्या साम्राज्यशाहीत सरदेशमुखीला कायमचे स्थान नाही. अन्य सर्वत्र ठिकाणी ज्याप्रमाणे साम्राज्यशाही अस्त्वात आली त्याचप्रमाणे इंग्रजांच्या साम्राज्यशाहीचा उगमही सरदेशमुखापासूनच झाला. परंतु कालांतराने त्यांच्या साम्राज्यशाहीतून सरदेशमुखीचे उच्चाटन होऊ शकते. इंग्रजांच्या अंमलाखाली असलेले देश सरदेशमुखीपासून स्वतंत्र होऊ शकतात, ही गोष्ट इंग्रजांचा इतिहास सिद्ध करू शकतो.

कॅनडा, आस्ट्रेलिया, न्यूझीलंड, साऊथ आफ्रिका, आयर्लंड वगैरे देश इंग्रजांच्या सरदेशमुखीखाली चालत होते. आज तेच देश कोणत्याही प्रकारचा रक्तपात किंवा यादवी केल्याखेरीज या इंग्रज सरदेशमुखीपासून स्वतंत्र झालेले आहेत व इंग्रजांचा त्यांच्यावर कोणत्याही तऱ्हेचा ताबा राहिलेला नाही. यादृष्टीने पाहिले असताना ब्रिटिशांच्या साम्राज्याचा जो एवढा मोठा विस्तार दाखविला जातो त्यात काही अर्थ नाही. कारण कोणत्याही दृष्टीने जरी पाहिले तरी कॅनडा, ऑस्ट्रेलिया, आयर्लंड वगैरे देश हे ब्रिटिश साम्राज्याच्या क्षेत्राच्या बाहेरचे आहेत, असे म्हणावयास काही हरकत नाही. यांना जर साम्राज्यातून वगळले तर ब्रिटिश साम्राज्य आज जे मोठे भव्य दिसते ते फारच चिमुकले आहे, असे दिसून येईल.

यावर कोणी असे म्हणतील की हे खरे असले तरी त्याचा आम्हाला काय उपयोग ? बाकीचे साम्राज्यातील देश ब्रिटिशांच्या सरदेशमुखीपासून मुक्त झाले असले तरी हिंदुस्थान अजून त्यांच्याच सरदेशमुखीखाली खितपत पडलेला आहे आणि जर मुक्तता होत नाही तर आम्ही इंग्रजांना मदत कां करावी ? या प्रश्नाला दोन उत्तरे देता येतील.

पहिले उत्तर असे की हिंदुस्थान देश ब्रिटिशांच्या सरदेशमुखीपासून मुक्त होण्याच्या मार्गाला लागलेला आहे. इतकेच नव्हे तर त्याने पुष्कळसा पल्ला गाठलेला आहे. आज ना उद्या कॅनडा-आस्ट्रेलियाचा दर्जा या देशाला प्राप्त झाल्याशिवाय राहू शकत नाही. या गोष्टी इतक्या स्पष्ट आहेत की त्या आंधळ्याला देखील दिसू शकतील. असे असताना साम्राज्यशाहीला चिकटून

हिंदू लोकांनी या युद्धात मदत करण्याचे नाकारावे, हे मोठे अनुचित आहे. आजच्या आज तो दर्जा ब्रिटिश लोक हिंदुस्थानला देत नाहीत म्हणून त्यावर आग पाखडण्यात काही अर्थ नाही. कॅनडा-आस्ट्रेलिया यांचा दर्जा हिंदुस्थानास प्राप्त होण्यास विलंब होत असेल तर त्याचा सर्वच आरोप ब्रिटिशांवर लादता येईल, असे आम्हास वाटत नाही. हिंदुस्थानातील लोकांच्या आपापसातील भांडणामुळेच हा उशीर होत आहे, हे विसरून चालणार नाही. सर्वांचे एकमत झाले तर हा दर्जा प्राप्त होण्यास काडीचाही विलंब लागणार नाही. ब्रिटिशांकडून तरी हरकत होणे शक्य नाही. कारण त्यांनी अनेक वेळा जाहीर केले आहे की ब्रिटिश साम्राज्यात जो कॅनडाचा दर्जा आहे तोच हिंदुस्थानचा दर्जा. हिंदुस्थानच्या या विरोधाला दुसरे उत्तर असे की या युद्धात इंग्रजांचा पराभव झाला व हिंदुस्थानवर हिटलरचे राज्य झाले तर हिंदुस्थानातील लोकांना पुन्हा राजकारणास श्रीगणेशापासून सुरवात करावी लागेल. म्हणजे आतापर्यंत झालेल्यावर पाणी सोडून ' नवी विटी नवे राज्य ' अशी सुरवात करावी लागेल. पण ही आशा फारच मोठी आहे, असे म्हणता येईल. हिटलरने हिंदुस्थानातील लोकांना पुन्हा श्रीगणेशापासून सुरवात करण्यास जर सवलत दिली तर या देशातील लोकांचे ते मोठेच भाग्य समजले पाहिजे. काळ्या रंगाच्या लोकांसंबंधी हिटलरच्या मनाचा कल काय आहे, हे समजून घेणे अवश्य आहे. त्याची पूर्ण कल्पना यावी म्हणून त्याच्या ' माईन कांफ ' या पुस्तकातून पुढील वाक्ये देत आहोत :

" It is a crime against the eternal Creator to train the dark races for intellectual careers. They should be trained like poodles. The earliest human civilization has rendered possible not so much as the training of animals as by the employment of men of inferior race. . . . . . It is in accordance with the Eternal will which rules Universe to advance the victory the better and the stronger and command the subordination of the weaker and the worse. "

" बुद्धिजीवी आयुष्यक्रम आखण्याचे काळ्या लोकांना शिक्षण देणे म्हणजे सनातन अशा जगज्जनक परमेश्वराचा गुन्हा करणे होय. काळ्या लोकांना कुत्र्याप्रमाणेच शिक्षण दिले पाहिजे. सनातन मानवी संस्कृती अस्तित्वात येऊ शकली ती जनावरांना शिकविल्याने नव्हे तर हलक्या जातीच्या लोकांना कामाला जुंपून ह्या विश्वावर सत्ता गाजविणाऱ्या पुराण पुरुषांच्या इच्छेला अनुसरून उच्च आणि बलिष्ठ जातींनी नीच आणि बलहिन अशी जातींवर आपली ताबेदारी लादून आपल्या विजयश्रीच्या मार्गावर पुढे सरकले पाहिजे. "

तसेच हिटलरच्या आमदनीत राजकीय चळवळीस कितीसा वाव मिळेल व ज्याला लढाऊ राजकारण म्हणतात ते कितपत करता येईल याची कल्पना यावी म्हणून हिटलरचा एक सहकारी इ. टी. रोब्यास याच्या ' कामेरून्समध्ये जर्मनी ' (*Germany in the cameroons by E. T. Robasche*) या पुस्तकातून खालील उतारा देत आहोत :

" The Germans, being supermen, have every right to determine how the natives should live and the natives should never be allowed to forget that their lives, their work and actions should be placed at the disposal of the Germans to exploit as they wish . . . . It is thoroughly sickening to me observing the British encouraging the education amongst the natives, even going so far as to allow them to enter the universities and colleges in England ; but it passes my comprehension altogether that they allow them to enter Government service in their own colonies where, unless they are checked in time they will eventually occupy executive positions. It seems incredible that these natives will ultimately become, for example, high court judges when white men will have to debase themselves and occupy the undignified position of appearing before them and perhaps being sentenced by them.

. . . . . Thank heaven, the Germans rule by the head and not the heart. Thank heaven the Germans understand the native and where he belongs. . . . . . . the servant of his white master . . . . . In order to retain our prestige and position we could not sentence the Germans (in the comeroons) who had been found guilty ; so they were either transferred to another district or were sent home.

The only punishment the native, irrespective of position, understands and appreciates is flogging and plenty of it. Flog the native well and he will soon realise that the straight path is better and not quite as painful. "

" जर्मन लोक हे मानवामध्ये श्रेष्ठतम अशा जातीत जन्मले असल्याकारणाने काळ्या लोकांनी आपले जीवित कोणत्या अवस्थेत कंठावे हे ठरविण्याचा त्यांना (जर्मन लोकांना) सर्वस्वी अधिकार आहे. काळे लोक हे नीच जातीचे आहेत ; आणि त्यांचे जीवित, त्यांचे श्रम आणि त्याची परिचर्या यांचा जर्मनांच्या इच्छेनुरुप त्यांच्या (जर्मनांच्या) फायद्याकरिता उपयोग करून घेण्याला त्यांनी (काळ्या लोकांनी) मान्यता दिली पाहिजे. ही गोष्ट त्यांना केव्हाही विसरू देता कामा नये. . . . . . ब्रिटिश लोक काळ्या लोकांमध्ये शिक्षण प्रसाराला प्रोत्साहन देतात. इतकेच नव्हे तर इंग्लंडमधील कॉलेजात आणि युनिव्हर्सिटीत प्रवेश करण्याची त्यांना मुभा ठेवतात, हे पाहून माझे पित्त खवळून जाते. पण त्यांच्या स्वतःच्या वसाहतीत सरकारी नौकरीत प्रवेश करण्याची परवानगी तेथील काळ्या लोकांना ते (ब्रिटिश लोक) कसे देऊ शकतात याची मला कल्पनाही करवत

नाही. या गोष्टीला जर वेळीच आळा घातला नाही तर त्याचा परिणाम असा होईल की वसाहतीतील कायद्याची अंमलबजावणी करण्याची अधिकारपदे ते (काळे लोक) पटकावतील. उदाहरणार्थ, हे काळे लोक पुढेमागे हायकोर्टाचे न्यायाधीश होतील आणि गोऱ्या लोकांना हलका दर्जा पत्करून, त्यांच्यापुढे हीनता स्वीकारून न्याय मागावा लागेल आणि कदाचित त्यांच्याकडून (काळ्या लोकांकडून) त्यांना (गोऱ्या लोकांना) शिक्षाही केली जाईल. असल्या गोष्टीवर माझा तर विश्वासच बसू शकत नाही.

ईश्वरा ! मी तुझे आभार मानतो की आम्ही जर्मन लोक डोक्याने राज्य चालवतो-हृदयाने नव्हे ईश्वरा ! मी तुझे उपकार मानतो की जर्मन लोक काळ्या आदमीना नीटपणे ओळखतात. काळ्या आदमीचे कार्यक्षेत्र म्हणजे आपल्या गोऱ्या धन्याची सेवा करणे एवढेच ! जर्मनांना हे पूर्णपणे कळून चुकलेले आहे.

कामेरून्समध्ये आमची इज्जत आणि आमचा दर्जा सांभाळण्यासाठी एखाद्या जर्मनाने काळ्या इसमाविरुद्ध गुन्हा केल्याचा आरोप कोर्टात सिद्ध झाला तरीदेखील त्याला कोर्टात (जर्मनाला) शिक्षा देता येत नाही. जर्मन गुन्हेगार दुसऱ्या जिल्ह्यात पाठविला जातो किंवा जर्मनीत त्यांच्या घरी त्याची रवानगी होते.

काळा माणूस कोणत्याही दर्जाचा असो, त्याला फक्त एकाच प्रकारची शिक्षा समजते आणि तिची किंमत कळते, ती म्हणजे फटक्याची ! भरपूर सपासप बसणाऱ्या फटक्याची शिक्षा ! काळ्या आदमीला चाबकाखाली असा व्यवस्थित झोडपून काढा की फटक्याच्या यातना भोगण्यापेक्षा (गुलामगिरीचा) धोपट मार्गच अधिक सुखाचा आहे, याची त्याला लगेच जाणीव होईल. ''

इंग्रजांचा पराभव व्हावा, हिटलरला यशप्राप्ती व्हावी आणि हिटलर आला तर आपल्याला स्वराज्य देईल आणि कायदेभंगाची चळवळ करू देईल व तुरुंगात गेली तर ' ए ' क्लासात ठेवील, अशी आशा करणाऱ्या हिंदूंना आम्ही असे सुचवितो की हिटलर व त्याचे साथीदार यांच्या मनोरचनेचा त्यांनी नीटसा विचार करावा व मग इंग्रजांना युद्धात मदत करावी किंवा नाही हे ठरवावे.

गेल्या जून महिन्यापावेतो हिंदुस्थानात दोन पंथ होते. बिनशर्त मदत करणारांचा एक व शर्तीवर मदत करणारांचा दुसरा. परंतु गेल्या जून महिन्यापासून एक तिसराच पंथ उपस्थित झाला आहे. तो पंथ म्हणजे गांधींचा तृतीय पंथ होय.

हा वरील दोन्ही पंथापेक्षा अगदी भिन्न आहे. गेल्या जून महिन्यात दिल्ली येथे कॉंग्रेस वर्किंग कमिटीने जो युद्धविषयक ठराव पास केला व ज्यात ' इंग्रजांनी काही गोष्टी मान्य केल्या तर आपण अधिकार ग्रहण करू व लढाईत मदत करू ' असे म्हटले होते त्याला गांधींनी विरोध केला, ही गोष्ट सर्वास अवगत आहे.

हा विरोध आपण का केला याचा खुलासा जो गांधींनी केला आहे त्यावरून या गांधीपंथाची काय भूमिका आहे, हे स्पष्टपणे कळून येण्यासारखे आहे. थोडक्यात सांगावयाचे झाल्यास " आपण अहिंसावादी आहोत, इंग्रजांनी अहिंसेच्या मार्गाने हिटलरचा प्रतिकार करावा " ही गांधींची मुख्य भूमिका आहे आणि भूमिकेनुसार त्यांचे म्हणणे आहे की कॉंग्रेस यावेळी अधिकारग्रहण करून मंत्रीमंडळे बनविण्याची योजना मान्य करू नये. कारण तसे जर केले तर या मंत्रीमडळांना लढाईत इंग्रजांना मदत करण्याकरिता, जे जे काही आवश्यक आहे ते ते सर्व करावे लागेल व ज्याअर्थी इंग्रज लोक हिंसक साधनांनी शत्रूचा परामर्श घेत आहेत त्याअर्थी कॉंग्रेस मंत्रीमंडळाला इंग्रजांना मदत केल्याने हिंसेला मदत केल्याचे पातक लागणार आहे आणि ज्याअर्थी कॉंग्रेस अहिंसेच्या तत्त्वाला आतापर्यंत मानीत आली आहे त्याअर्थी त्या तत्त्वाला तिने मूठमाती देण्यास सिद्ध होऊ नये. म्हणजे इंग्रज हे युद्धात हिंसक साधनांचा उपयोग करीत असल्यामुळे त्यांना या देशातील लोकांनी मदत करू नये. " हे या गांधीपंथाचे मतवैशिष्ट्य आहे.

या गांधींच्या विचारसरणीने पुष्कळ लोक आश्चर्यचकीत झाले असतील यात काही शंका नाही. ही विचारसरणी गांधींना कधीपासून सुचली ? अहिंसेच्या तत्त्वाला बाध येतो म्हणून इंग्रजांना मदत करू नये, असे म्हणणाऱ्या गांधींना आम्ही असे विचारतो की खिलाफतीच्या चळवळीमध्ये तुमची भूमिका काय होती आणि तुमचे अहिंसेचे तत्त्व त्यांना मदत करण्याचेबाबत आड येऊ शकले काय ?

हा प्रश्न आम्ही आजच उपस्थित केला आहे असे नव्हे तर १९२१ सालात जेव्हा खिलाफतीची चळवळ सुरू झाली त्यावेळी सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीचे मेंबर मि. झकेरियस ह्यांनी सर्व्हंट ऑफ इंडियामध्ये गांधींना, तुम्ही अहिंसावादी असताना हिंसक साधनांनी खिलाफतीचे संरक्षण करू इच्छिणाऱ्या मुसलमान खिलाफतवाद्यांस कशी मदत करू शकता, असा रोखठोक प्रश्न विचारला होता. त्याला गांधींनी जे उत्तर दिले आहे ते मोठे उद्‌बोधक आहे. म्हणून आम्ही खाली देत आहोत,

" Mr. Zacharias argues in the Servant to India that the Khilafat is based on force. The Khilafath is the earthly representative of Islam pledged to defend it even with the sword. And how can I, believer in non-violence, fight to sustain an institution that is permitted to resort to physical force for its defence.

Mr. Zacharias is right in his description of the Khilafat. He is wrong in his estimate of the function of a votary of non-violence of physical force either directly or indirectly in defence of any thing, but he is not precluded from helping men or institutions that are themselves not based on non-violence. If reverse were the case. I would, for instance, be precluded from helping India to attain Swaraj, because the future Parliament of India under Swaraj, I know for certain, will be having some military and police forces, or to take a domestic illustration, I may not help a son to secure justice, because for sooth he is not a believer in non-violence.

Mr. Zacharia's proposition will reduce all commerce by a believer in non-violence to an impossibility. And there are not wanting men, who do believe that complete non-violence means complete cessation of all activity.

Not such, however, is my doctrine of non-violence. My business is to refrain from doing any violence myself, and to induce by persuasion and service as many of God's creatures as I can to join me in the belief and practice. But I would be untrue to my faith, if I refused to assist in a just cause, any men or measures that did not entirely coincide with the principle of non-violence. I would be promoting violence, if, finding the Mussalmans to be in the right, I did not assist them by means strictly non-violent against those who had treacherously plotted the destruction of the dignity of Islam. Even when both parties believe in violence, there is often such a thing as justice on one side or the other. A robbed man has justice on his side, even though he may be preparing to regain the lost property by force. And it would be accounted as a triumph of non-violence if the injured party could be persuaded to regain his property by methods of Satyagrah, *i. e.* love or soulforce rather than a free fight.

Of course it is open to Mr. Zacharias to reject my claim as a devotee of non-violence, in view of all the limitations I have mentioned. I can only suggest to him that life is a very complex thing, and truth, non-violence present problems, which often defy analysis and judgment. One discovers truth and the method of applying the only legitimate means of vindicating it, *i.e.* Satyagrah or soulforce, by patient endeavour and silent prayer. I can only assure friends that I spare no pains to grope my way to the right, and that humble but constant endeavour and silent prayer are always my two trusty companions along the weary but beautiful path that all seekers must tread."

''सर्व्हंट ऑफ इंडिया'' पत्रात मि. झकेरियस म्हणतात की खिलाफत हिंसेच्या तत्त्वावर आधारलेली आहे. खिलाफत इस्लाम धर्माची इहलोकीची प्रतिनिधी असून, जरूर तर तरवारीने त्या धर्माचे रक्षण करणे हे तिचे ब्रीद आहे आणि अहिंसा तत्त्वावर श्रद्धा ठेवणारा मी, स्वरक्षणासाठी भौतिक (Physical) सामर्थ्याचा अवलंब करण्यास धर्माने मोकळीक दिलेल्या संस्थेचे अस्तित्व टिकविण्याकरिता लढा कसा

करू शकतो? मि. झकेरियस यांनी केलेले खिलाफतीचे वर्णन अगदी बरोबर आहे. अहिंसा व्रत धारण करणाराच्या कार्याचा त्यांनी केलेला अंदाज मात्र चूक आहे. कोणत्याही गोष्टीच्या संरक्षणासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीतीने भौतिक शक्तीचा उपयोग अत्याचारी मार्गाने करणे अहिंसावाद्याचे ब्रीद नव्हे, हे जरी खरे असले, तरी अमुक एक संस्था अहिंसेवर आधारलेली नाही म्हणून तिला किंवा तिच्यात असलेल्या लोकांना सहाय्य करण्याला अहिंसावाद्याला प्रतिबंध करण्यात आलेला नाही. असे जर नसेल तर, उदाहरणार्थ, हिंदुस्थानला स्वराज्य संपादनासाठी मदत करण्याला मला प्रतिबंध होईल. कारण हिंदुस्थानचे भावी स्वराज्यातील पार्लमेंट थोडे तरी लष्कर आणि पोलिस ठेवणारच. घरगुती उदाहरण घ्यावयाचे तर, माझ्या मुलाचा अनत्याचारावर विश्वास नाही म्हणून त्याला न्याय मिळवून देण्याला मला मदत करता येणार नाही.

मिस्टर झकेरियस यांचा मुद्दा मान्य केला तर अहिंसावाद्याला कोणताही व्यापारधंदा करणे अशक्य होईल आणि पूर्ण अहिंसा म्हणजे पूर्ण निष्क्रियता असे मानणारे लोकही काही कमी नाहीत. माझे अहिंसातत्त्व मात्र असे नाही. स्वतःला कोणत्याही अत्याचारापासून परावृत्त करणे आणि माझ्याप्रमाणेच श्रद्धा आणि आचरण ठेवण्याविषयी ईश्वराच्या जितक्या प्राण्यांचे त्यांच्या बुद्धीला पटवून देऊन आणि त्यांची सेवा करून मन वळविता येईल तितके वळवणे हे माझे काम आहे. परंतु माझ्या अहिंसा तत्वाशी ज्यांचा पूर्ण मेळ बसत नाही अशा लोकांना किंवा अशा कार्यांना त्यांची बाजू रास्त असतांना देखील सहाय्य करण्याचे मी टाळले तर मी माझ्या श्रद्धेला जागलो नाही, असेच म्हणावे लागेल. मुसलमानांची बाजू रास्त आहे असे कळून आल्यावर, इस्लाम धर्माचा दर्जा नष्ट करण्यासाठी कट करणाऱ्या विश्वासघातकी लोकांच्या विरुद्ध निव्वळ अनत्याचारी साधनांनी मी मुसलमानांना मदत केली नाही तर मी अत्याचाराला प्रोत्साहन देत आहे, असाच त्याचा अर्थ होईल. अत्याचारावर विश्वास ठेवणारे दोन पक्ष ज्यावेळी परस्पराशी झगडत असतील त्यावेळी त्यांच्यापैकी ह्या किंवा त्या पक्षाच्या बाजूला न्याय हा बहुधा असतोच. ज्याची मालमत्ता लुटली गेली असेल, अशा माणसाने आपली गमावलेली मालमत्ता जबरदस्तीने परत मिळवण्याची तयारी केली तरी देखील त्याची बाजू न्यायाचीच असते आणि अनिर्बंध लढा करण्याऐवजी किंवा आत्मसामर्थ्याने म्हणजे सत्याग्रहाच्या मार्गाने आपली मालमत्ता परत मिळविण्याविषयी, ज्याचे नुकसान झालेले आहे अशा माणसाचे मन वळविणे शक्य झाले तर अहिंसा तत्वाचा तो एक फार मोठा विजय झाला असेच मानावे लागेल. अर्थात अहिंसेला ज्या ह्या अनेक मर्यादा मी घातल्या आहेत त्यामुळे अहिंसाभक्त म्हणवून घेण्याचा मला अधिकार नाही असे मिस्टर झकेरियस यांना म्हणता येईल.

मी त्यांना इतकेच सुचवू शकतो की जीवन हे अनेकविध अंगोपांगांनी बनलेले आहे आणि या जीवनामध्ये सत्य आणि अहिंसा या तत्त्वासंबंधी असे काही गूढ प्रश्न उपस्थित होतात की त्यांचे पृथःकरण करणे आणि त्यावर मत देणे म्हणजे अनेक वेळा बुद्धीला ते एक आव्हानच असते. दीर्घ प्रयत्न आणि मूक प्रार्थना यांच्या योगाने मनुष्याला सत्य प्रतीत होते आणि त्या सत्याची समाजात प्राणप्रतिष्ठा करण्यासाठी फक्त न्याय्य अशा साधनांचा जो एकच मार्ग आहे तो-म्हणजेच सत्याग्रहाचा किंवा आत्मशक्तीचा-मार्ग त्याला दिसू लागतो. मी माझ्या मित्रांना इतकेच आश्वासन देऊ शकतो की सत्यसंशोधन करण्याच्या कामी मी काडीइतकीही कसूर करत नाही आणि सत्यान्वेषणाच्या कंटाळवाण्या पण रमणीय अशा मार्गाचे आक्रमण करणाऱ्या पांथस्थाप्रमाणे, विनम्र पण सतत प्रयत्न आणि मूक प्रार्थना हे दोन विश्वासू सहचर मला सदैव लाभलेले असतात.''

वरील उताऱ्यातील विचारसरणी केवळ तात्त्विकदृष्ट्या प्रतिपक्षाला उत्तर देण्याच्या हेतूने जर गांधींनी उपयोगात आणली असेल तर त्याबद्दल आम्हाला काही म्हणावयाचे नाही. परंतु ही विचारसरणी जर प्रामाणिकपणाची असेल तर गांधींना असा सवाल करणे भाग पडते की हिंसावादी मुसलमान खिलाफतवाद्यास मदत करण्यास अहिंसावादी गांधींना कोणत्याही प्रकारची नैतिक अडचण जर आड येऊ शकली नाही तर इंग्रजास या युद्धात मदत करण्याकरिता गांधींच्या आड अहिंसा का यावी ? खिलाफतवाद्यांचे ध्येय न्याय्य होते म्हणून त्यांना मदत करण्यास अहिंसावादी गांधी यांना काही अडचण नव्हती तर या युद्धात इंग्रजांची बाजू अन्याय्य आहे असे गांधींना म्हणावयाचे आहे काय ? या प्रश्नाला गांधी काय उत्तर देऊ शकतात हे पाहाण्यास पुष्कळ लोक मोठ्या कौतुकाने वाट पाहात बसतील यात काही आश्चर्य नाही. परंतु आम्हाला तरी या प्रश्नाचे गांधी काही उत्तर देऊ शकतील, असे वाटत नाही. वाटेल त्यावेळी वाटेल ते बोलावयाचे व साधेल त्याप्रकारे बाजू मारून न्यावयाची याची गांधींना खोडच लागलेली दिसते. आतापर्यंत कोणत्याही बाबतीत एक मत देऊन गांधी स्थिरावले आहेत, असे आम्हाला तरी आढळून आलेले नाही. सन १९१४ सालच्या महायुद्धात टिळकांनी ''इंग्रजांची नड ही हिन्दुस्थानची सवड,'' ''साम्राज्याच्या गरजा येती आमच्या काजा'' या व्यावहारिक म्हणीप्रमाणे हिन्दुस्थान देशाने युद्धात बिनशर्त मदत करू नये, या मताचा प्रचार सर्व देशभर केला होता. त्यावेळी गांधींनी टिळकांना विरोध केला व इंग्रजांना बिनशर्त मदत करावी या मताचा पुरस्कार

केला. त्याप्रसंगी त्यांनी नामदार शास्त्री यांना एक पत्र लिहिले होते व ते पत्र मुंबईच्या टाईम्स ऑफ इंडियाच्या ता. १९ जुलै सन १९१८ च्या अंकात प्रसिद्ध झाले होते. त्या पत्रातील एक उतारा आम्ही खाली देत आहोत,

" I cannot however, conclude my observations without stating what I consider, to be the means of enforcing our opinion whatever shape it may finally take. I entirely endorse concluding remarks of the authors of the historic documents that thousands of Indian reformers are to-day studying with avidity : "If anything could enter the sense of responsibility under which our recomendations are made, in a matter fraught with consequences so immense, it would be the knowledge that even as we are bringing our report to an end, far greater issues still hang in the balance upon the battle-field of France. It is there and not in Dehli or White Hall that the ultimate decision of India's future will be taken." May God grant us home-rules, the wisdom to see this simple truth ! The gate-way to on freedom is situated on the French soil. No victory worth has yet been won without the shedding of blood. If we could but crowd the battle-fields of France with an indomitable army of home-rules fighting for victory for the cause of the Allies, it will also be a fight for our own cause. We could then have made out an unanswerable case for the granting of home-rule not any distant time or near future but immediately. My advice, therefore, to the country would be, fight unconditionally unto death with the Britain for the victory, and agitate simultaneously also unto oath, if we must, for reforms that we deserve. This is the surest method of gaining an honourable victory for ourselves over the strongest opposition of bureaucratic forces, and at the end of it there would be no ill-will left. It may not be impossible to gain our end by sheer obstructive and destructive agitation. But it is easy enough to see that we shall at the same time reap ill-will between the British and the Indian elements, not a particularly cohesive cement, for binding would be partners."

''हे पत्र पुरे करण्यापूर्वी, आपल्या मागण्यांना अखेर जे स्वरूप यावयाचे असेल ते येवो, पण त्या मागण्या मान्य करण्यास भाग पाडण्याचा माझ्यामते सर्वोत्तम मार्ग कोणता, हे सांगणे जरूर आहे. हिंदी राजकीय क्षेत्रातील सहस्त्रावधी कार्यकर्ते राजकीय सुधारणांच्या ज्या ऐतिहासिक मसुद्याचे आज उत्सुकतेने मनन करीत आहेत तो मसुदा तयार करणारांनी शेवटी जो निष्कर्ष काढला आहे तो मला सर्वतोपरी संमत आहे. ज्या योजनेचे परिणाम इतके मोठे होणार आहेत की त्यांची आज कल्पनाही करता येत नाही त्या योजनेविषयी शिफारशी करताना आमच्यावरील जबाबदारीची जाणीव असूनही एका कारणामुळे आमचे मन साशंक होत आहे. ते कारण म्हणजे आमचा अहवाल पुरा होण्यापूर्वीच हिंदी राजकीय सुधारणेच्या प्रश्नापेक्षा अधिक गंभीर असे प्रश्न फ्रान्सच्या रणांगणावर सोडविले

जाणार आहेत. हिंदुस्थानच्या भविष्यकालासंबंधी जो निर्णय लागावयाचा आहे तो दिल्ली किंवा व्हाईटहॉल येथे लागणार नसून फ्रान्सच्या रणभूमीवर लागणार आहे. हे साधे सत्य ओळखण्यासाठी परमेश्वर आपणाला व स्वायत्ततावाद्यांना शहाणपण देवो. आपल्या स्वराज्याचा दिंडी दरवाजा फ्रान्सच्या भूमीवर आहे. रक्ताचे सडे पडल्याशिवाय खराखुरा विजय आतापर्यंत कोणालाही प्राप्त झालेला नाही. दोस्तांच्या विजयासाठी लढणारी स्वातंत्र्यवाद्यांची अजिंक्य सेना जर आपण फ्रान्सच्या रणभूमीवर पाठवू शकलो तर त्यामुळे आपण आपल्याही हितासाठी लढू शकू असे केल्याने भविष्यकाळी नव्हे तर ताबडतोब स्वायत्तता मिळवण्यासारखी आपण परिस्थिती निर्माण करू. म्हणून माझे देशाला असे सांगणे आहे की ब्रिटनच्या विजयासाठी मरणाचीही पर्वा न करता ब्रिटनसहित लढा उभारा, त्याबरोबरच आपणास योग्य त्या सुधारणा मिळविण्यासाठी चळवळ करा. नोकरशाहीच्या कट्टर विरोधावर सन्माननीय विजय मिळविण्याचा हाच खात्रीलायक मार्ग आहे. असे झाल्याने शेवटी कसल्याही प्रकारचा हेवा-दावा मनात राहणार नाही. केवळ अडवणुकीच्या व विध्वंसक मार्गाने आपणाला ध्येयप्राप्ती होणे अशक्य नसेल, परंतु त्यामुळे आपल्या व ब्रिटिश लोकांमध्ये एकमेकांविषयी वैरभाव मात्र निर्माण होईल व तो भावी कालातील परस्पर भागीदारासाठी केव्हाही पोषक ठरणार नाही.''

यावरून गांधी १९१४ सालच्या युद्धात ब्रिटिशांना मदत करण्याच्या मताचा किती जोराने प्रचार करीत होते, याची कल्पना वाचकांना येईल. त्यावेळी 'तुम्ही इंग्रजांना बिनशर्त मदत करण्यास का सांगता' असे त्यांना जिकडून तिकडून विचारण्यात येत असे. त्या प्रश्नाला गांधींनी जे उत्तर दिले आहे तेही आजच्या प्रसंगी ध्यानात ठेवण्यासारखे आहे. १९१५ सालच्या एप्रिल महिन्यात मद्रास येथे वकिलांचा वार्षिक जेवण समारंभ झाला. त्याप्रसंगी गांधी यांना आमंत्रण दिले होते. इतकेच नव्हे तर ब्रिटिश साम्राज्याला दीर्घायुष्य चिंतण्याबद्दल त्यांना भाषण करण्यास विनंती करण्यात आली होती. तो प्रसंग साधून बिनशर्त विरोध करणाऱ्या विरोधकांना खालीलप्रमाणे उत्तर दिले.

" During my three months tour in India as also in South Africa I have been so often questioned how I, a determined opponent of modern civilization and an avowed patriot could reconcile myself to loyalty of the British Empire of which India was such a large part, how it was possible for me to find it consistent that India and England could work together for mutual benefit. It gives me the greatest pleasure this evening at this great and important gathering to re-declare my loyalty to the British Empire and my loyalty is based upon very selfish grounds. As a

passive resister, I discovered that a passive resister has to make good his claim to passive resistence, no matter under what circumstances he finds himself, and I discovered that the British Empire has certain ideals with which I have fallen in love and one of the ideals is that every subject of the British Empire has the best scope possible for his energies and honour and whatever he thinks is due to his conscienee. I think that this is true of the British as it is not true of any other Government. (Applause) I feel, as you here perhaps know that I am no lover of any Government, and I have more than once said that, that Government, is the best which governs least. And I have found that it is possible for me to be governed least under the British Empire." (Loud applause).

"माझ्या हिंदुस्थानातील तीन महिन्यांच्या दौऱ्यात व त्याचप्रमाणे अफ्रिकेमध्ये मला बऱ्याच वेळा असे प्रश्न विचारण्यात आले की मी आधुनिक सुधारणांचा कट्टा विरोधक आणि कट्टा स्वदेशाभिमानी असताना ब्रिटिश साम्राज्याशी राजनिष्ठ कसा राहू शकतो ? आणि हिंदुस्थान व इंग्लंड हे दोन्ही देश मिळून एकमेकांच्या बऱ्याकरिता झटतील हे मी कसे सांगू शकतो ? आजच्या या मोठ्या महत्त्वाच्या प्रसंगी मला पुन्हा एकदा ब्रिटिश राज्याशी माझी राजनिष्ठा जाहीर करावयास आनंद वाटतो. माझ्या या राजनिष्ठेच्या मुळांशी मोठा स्वार्थ आहे. मी स्वतः अनत्याचारी विरोधक असल्यामुळे मला असा अनुभव आलेला आहे की कोणत्याही बिकट परिस्थितीत अशा विरोधकाने असा विरोध करण्याची आपली लायकी सिद्ध करावयास पाहिजे. मला ब्रिटिश साम्राज्यात काही उत्कृष्ट गोष्टी आढळल्यामुळे मला त्याच्याबद्दल आस्था वाटावयास लागली. त्यातील एक उत्कृष्ट गोष्ट म्हणजे ब्रिटिश साम्राज्यात प्रत्येक व्यक्तीच्या उत्साहाला, प्रतिष्ठेला आणि सद्सद्विवेक बुद्धिला भरपूर वाव मिळतो. ही वस्तुस्थिती फक्त ब्रिटिश साम्राज्यातच आढळून येते, दुसऱ्या राजवटीत आढळत नाही. (टाळया) मला असे वाटते, आणि तुम्हाला पण त्याची जाणीव असेल की मी कोणत्याही सरकारचा भक्त नाही ; व मी किती तरी वेळा बोलूनही दाखविलेले आहे की जे सरकार कमीत कमी सत्ता चालविते तेच सरकार उत्तम म्हटले पाहिजे आणि मला असा संभव वाटतो की माझ्यावर ब्रिटिश साम्राज्यच कमीत कमी सत्ता चालवील. म्हणूनच ब्रिटिश सरकारशी मी एकनिष्ठ आहे." (मोठ्याने टाळया)

वरील मताप्रमाणे गांधी १९१४ सालच्या युद्धात वागले, याच्याबद्दल कोणांस काही सांगावयास नको. या युद्धात इंग्रजांना साहाय्य करावे किंवा न करावे या एकाच विषयासंबंधाने या गेल्या दहा महिन्यात त्यांनी तीन प्रकारची परस्पर विरोधी मते प्रगट केल्याचे दिसून येते.

या प्रसंगी आम्हास लोकांना इतकेच सांगावयाचे आहे की गांधींचे खरे मत कोणते हे कळणे अत्यंत कठीण आहे, एखादा लहरी मनुष्य लहर लागली म्हणजे मागचा पुढचा विचार न करता मनास येईल तसे किंवा एखादा वेडा मनुष्य ज्यावेळी जे सुचेल तसे त्यावेळी बरळतो तशाच प्रकारचा गांधींच्या मताचा प्रकार आहे, असे आम्हास तरी मोठ्या खेदाने म्हणावे लागते. गतकाळातील त्यांची मतांतरे कसकशी होत गेली आहेत याचे कोणी जर संशोधन केले तर ते मोठे मनोरंजक होईल असे आम्हास वाटते. परंतु गतकाळातील एकाच विषयावरील त्यांचा झालेला मतपालट बाजूस ठेविला आणि हे युद्ध सुरु झाल्यापासून या युद्धात या देशातील लोकांनी आपले धोरण कोणत्या प्रकारचे ठेवावे एवढाच एक विषय जर घेतला तर या दहा महिन्यात या विषयासंबंधाने, त्यांना तीन प्रकारची परस्पर विरोधी मते प्रकट केल्याचे दिसून येते. लढाई सुरू झाल्याबरोबर दोन-तीनच दिवसांनी गांधी आणि व्हाईसरॉय ह्यांच्या सिमला येथे गाठभेटी झाल्या. गांधी यांच्या विरुद्ध त्यांच्याच कॉंग्रेसमधील अनुयायांची अशी तक्रार आहे की गांधी कॉंग्रेसचे पुढारी म्हणून, कॉंग्रेसच्या वतीने व्हाईसरॉय ह्यांना भेटावयास जातात, परंतु व्हाईसरॉय ह्यांच्याबरोबर काय बोलणे झाले, याचा पत्ता ते कॉंग्रेसवाल्यासही कधी लागू देत नाहीत. परंतु या प्रसंगी मात्र त्यांनी आपण होऊनच व्हाईसरॉयच्या मुलाखतीत काय घडले ह्याचे खुलासावजा एक पत्रक प्रसिद्ध केले होते. त्या पत्रकात त्यांनी खालील प्रमाणे आपले विचार प्रकट केले होते,

"Having made my position vis-a-vis Congress quite clear I told His Excellency that my own sympathies were with England and France from the purely humanitarian standpoint, I told him that I could not contemplate, without being stirred to the very depth, the destruction of London, which had hitherto been regarded as impregnable. And as I was picturing before him the Houses of Parliament and Westminster Abbey and their possible destruction, I broke of down. I am in perpetual quarrel with God that He should allow such things to on. My non-violence seems almost impotent. But the answer comes at end of the daily quarrel that neither God nor non-violence is impotent. Impotence is in men. I must try on without loosing faith even though I may break in the attempt."

''कॉंग्रेसच्या संबंधात माझे स्थान कोणते हे अगदी स्पष्ट केल्यावर मी नामदार व्हाईसरॉयांना सांगीतले की इंग्लंड आणि फ्रान्स यांच्याविषयी मला स्वतःला जी सहानुभूती वाटते ती शुद्ध मानवी हिताच्या दृष्टीनेच वाटते. आतापर्यंत अभेद्य समजल्या जाणाऱ्या लंडन शहराचा नाश होणार हा विचार देखील मला सहन होत नाही. या विचाराने अन्तःकरण थरारून जाते, असेही मी व्हाईसरॉयांना म्हटले. हाऊस ऑफ पार्लमेंट व वेस्ट मिन्स्टर ॲबे यांच्या संभाव्य नाशाचे चित्र

मी नामदारांच्या समोर रेखाटीत असतांना माझी कंबर खचली. माझे चित्त खिन्न झाले. मनातल्या मनात, परमेश्वराने अशा प्रकारच्या गोष्टी घडू द्याव्यात याबद्दल मी परमेश्वराबरोबर नित्य भांडत असतो. माझे अहिंसातत्व जवळ जवळ दुबळे झाले, असे मला भासू लागले आहे. पण प्रत्येक दिवशी भांडणाच्या अखेरीस मला उत्तर मिळते की ईश्वर दुबळा नाही आणि अहिंसाही दुबळी नाही. दुबळेपणा माणसाच्या ठिकाणी आहे. या प्रयत्नात माझा देश भंग पावला तरी हरकत नाही, पण श्रद्धा न गमावता मला प्रयोग करीत राहिलेच पाहिजे.''

" I am not therefore just now thinking of India's deliverance. It will come. But what will it be worth if England and France fall ?"

''सध्या मी हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्याचा विचार करीत नाही. हिंदुस्थान स्वतंत्र होईलच. पण इंग्लंड आणि फ्रान्स पडल्यावर त्या स्वातंत्र्याला काय किंमत राहणार आहे ?'' हे उद्‌गार गांधींचे आहेत. ता. ५ सप्टेंबर १९३९ ला व्हाईसरॉय बरोबर मुलाखात झाल्यानंतर गांधींनी वर्तमानपत्राच्या प्रतिनिधीजवळ हे उद्‌गार काढले.

ही त्यांची पहिल्याप्रथमची भूमिका होय. या उताऱ्यावरून स्पष्ट दिसून येईल की लढाईच्या सुरवातीस ब्रिटिश लोकांना या देशातील लोकांनी बिनशर्त मदत करावी असे त्यांचे मत होते. यानंतर १५-९-३९ रोजी कॉंग्रेस वर्किंग कमिटीची बैठक वर्ध्यास भरली. त्या बैठकीत वर्किंग कमिटीने असा ठराव केला की '' ब्रिटिशांनी या युद्धात, लोकशाहीच्या तत्त्वासंबंधी, तसेच साम्राज्यशाहीच्या तत्त्वासंबंधी आपले ध्येय व त्या ध्येयाचा फायदा हिंदुस्थानातील लोकांना कितपत देण्यात येईल, ह्याचा स्पष्ट शब्दात व निःसंदिग्ध भाषेत खुलासा करावा व जोपर्यंत इंग्रज सरकार तशाप्रकारचा खुलासा करीत नाही तोपर्यंत या लढाईत इंग्रजांना कॉंग्रेसने मदत करणे शक्य नाही. '' कॉंग्रेस वर्किंग कमिटी आणि गांधी यांचा परस्परांचा गुरुशिष्यांचा संबंध आहे हे ज्यांना माहीत आहे त्यांना अशा प्रकारचा ठराव वर्किंग कमिटीने पास केला हे पाहून खरोखरीच आश्चर्य वाटल्यावाचून राहणार नाही. ५ सप्टेंबरला इंग्रजांना या युद्धात बिनशर्त मदत करावी असे गांधी म्हणतात आणि त्याच महिन्याच्या १५ तारखेस गांधींच्या विद्यमाने भरलेल्या कॉंग्रेस वर्किंग कमिटीच्या सभेने 'इंग्रजांनी आपले ध्येय जाहीर केल्याशिवाय त्यांना मदत करता येणे शक्य नाही' असा ठराव पास करावा हा एक विचित्र प्रकार आहे, असेच म्हणावे लागेल. एक तर गांधींचे पहिले मत म्हणजे केवळ दांभिकपणा होता, किंवा वर्किंग कमिटीने त्यांना धाब्यावर बसविले, असे म्हटल्याखेरीज गत्यंतर नाही. परंतु ह्याच्यापेक्षा विशेष चमत्कारिक गोष्ट म्हटली म्हणजे वर्किंग

कमिटीने जो सशर्त मदतीचा ठराव पास केला त्याला गांधींनी पुष्टि दिली हे होय. बिनशर्त मदत करावी म्हणणारे गांधी, सशर्त मदतीचा जो ठराव वर्किंग कमिटीने पास केला त्याला पाठिंबा देतात, ही गोष्ट कदाचित काही लोकांना खरी वाटणार नाही. गांधींनी ता. २३ सप्टेंबर १९३९ च्या 'हरिजन' च्या अंकात जे आपले मत प्रकट केले आहे, त्याचा उतारा आम्ही खाली देत आहो.

" The working Committee's Statement on the world crisis took four days before it received final shape. Every member expressed his opinion freely on the draft that was, at the Committees invitation prepared by Pandit Jawaharlal Nehru. I was sorry to find myself alone in thinking that whatever support was to be given to the British should be given unconditionally. This could only be done on a purely non-violent basis. But the Committee has a tremendous responsibility to discharge. I could not take the purely non-violent attitude felt that the nation had not imbibed the non-violent spirit requisite for the possession of the strength which disdains to take advantage of the difficulty of the apponent. But in starting the reasons for its conclusion the Committee desired to show the greatest consideration for the English. "

" It will be a pity in Congressmen to engage in petty squabbles and party strife. If anything big or worthy is to come out of the Committee's action, the undivided and unquestioned loyalty of every Congressman is absolutely necessary. I hope too that all other political parties and communities will join the Committee's demand for clear declaration of their policy about the British Government with such corresponding action as is possible amidst martial conditions."

" All that is required is mental revolution on the part of the British statesmen. To put it still more plainly, all that is required is honest action to implement the declaration of faith in democracy made on the eve of the war and still being repeated from British platforms. Will Great Britain have an unwilling India dragged into the war or a willingly cooperating with her in the prosecution of defence of true democracy ?"

"कॉंग्रेस वर्किंग कमिटीचे जागतिक आपत्तीसंबंधीचे पत्रक अखेरच्या स्वरुपात तयार होण्याला चार दिवस लागले. कमिटीच्या विनंतीवरून पंडित जवाहरलाल नेहरु यांनी त्या पत्रकाचा मसुदा तयार केला आणि त्यावर प्रत्येक सभासदाने आपले मत मनमोकळेपणाने व्यक्त केले. कोणत्याच प्रकारची अट न घालता जी काही मदत ब्रिटीशांना करणे आपल्याला शक्य असेल ती करावी अशा विचाराचा मी एकटाच असल्याचे कळून आल्यावर मला खेद वाटला. माझ्या मते जी मदत करावयाची ती शुद्ध अनत्याचाराच्या पायावरच असली पाहिजे. पण कमिटीला प्रचंड जबाबदारी पार पाडावयाची होती. केवळ अनत्याचारी वृत्तीचा कमिटी

स्वीकार करू शकली नाही. कमिटीला वाटले की प्रतिस्पर्धाच्या संकटाचा फायदा घेणे ही तिरस्करणीय गोष्ट वाटावी इतके मानसिक सामर्थ्य प्राप्त होण्याला जरूर असलेली अहिंसावृत्ती राष्ट्रामध्ये अजून बिंबलेली नाही. पण कमिटीने घेतलेल्या या निर्णयाची कारणे नमूद करताना इंग्रजांबद्दल जास्तीत जास्त कळकळ प्रदर्शित करण्याची कमिटीची इच्छा दिसली.''

''यावेळी क्षुल्लक भांडणात आणि पक्षातर्गत झगडे करण्यात काँग्रेसचे अनुयायी गुंतून राहणार असतील तर ती खेदाची गोष्ट आहे. कमिटीने घेतलेल्या निर्णयातून जर काही महत्त्वाचा आणि यथायोग्य परिणाम निष्पन्न होणार असेल तर एकूण एक काँग्रेसच्या अनुयायांनी कमिटीवर अविभक्त आणि असंदिग्ध निष्ठा ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. त्याचप्रमाणे ब्रिटीश सरकारने आपले धोरण स्पष्टपणे जाहीर करावे आणि त्याला अनुसरून चालू युद्ध परिस्थितीत शक्य असलेली अशी काहीतरी कृती करून दाखवावी, अशी जी मागणी कमिटीने केली आहे तिला इतर सर्व राजकीय पक्ष आणि सर्व जाती संयुक्तरीतीने पाठिंबा देतील अशीही मी आशा करतो.''

'' आज जर कशाची जरूर असेल तर ती ब्रिटिश मुत्सद्यांची मानसिक क्रांती होण्याची आहे. अधिक स्पष्टपणे बोलावयाचे तर लढाईच्या प्रारंभी केलेली आणि अजूनही ब्रिटिश व्यासपीठावरून पुन:पुन्हा केली जाणारी लोकशाहीवर असलेल्या विश्वासाची जाहीर घोषणा प्रामाणिक कृतीच्या द्वारे अंमलात आणणे एवढ्याच गोष्टीची आज जरूरी आहे. ग्रेट ब्रिटन हिंदुस्थानला त्याच्या इच्छेविरुद्ध युद्धक्षेत्रात ओढणार की खऱ्या लोकशाहीच्या संरक्षणाच्या कामी स्वखुशीने सहकार्य करणारा मित्र म्हणून जवळ करणार ?''

पहिले मत बिनशर्त मदत, दुसरे मत सशर्त मदत. दुसरे मत प्रतिपादिल्यानंतर, तिसरे मत म्हणजे मुळीच मदत न करणे ! आणि ते का तर मदत केल्याने अहिंसेच्या तत्त्वाला बाध येतो म्हणून ! गांधींचे पहिले मत आमच्या मताप्रमाणेच होते व तेच याप्रसंगी योग्य आहे, असे आमचे म्हणणे आहे. दुसरे मत पहिल्या मतापेक्षा जरी भिन्न असले तरी ते व्यवहारास धरून होते, हे आम्हास मान्य आहे. परंतु त्यांचे तिसरे मत हे अगदीच वेडगळपणाचे आहे. हिंसावादी खिलाफतवाल्यांना अहिंसावादी गांधी मदत करावयास तयार होतात तर इंग्रजांच्या बाबतीतच त्यांना अहिंसा आड का यावी, याचे कोणासही आश्चर्य वाटल्यावाचून राहणार नाही. 'न कर्त्याचा वार शनिवार' म्हणून अहिंसेचे खुळ त्यांनी पुढे केले असावे किंवा बेजबाबदार विचारांच्या प्रवाहात गटांगळ्या खात ते पडले असावेत, याशिवाय तिसरे काही आमच्या मते तरी संभवत नाही.

युद्धाच्या बाबतीत आमची भूमिका आम्ही स्पष्ट केलीच आहे. अटीतटीचा करारमदार करीत बसण्यापेक्षा या देशातील लोकांनी लढाईत इंग्रजांना मदत करावी, असे आमचे मत आहे. ते मत अप्रामाणिक आहे, असे कोणास म्हणावयाचे असेल तर त्याने खुशाल म्हणावे. आम्ही उत्तरादाखल म्हणू शकू की जे आमचे मत आहे तशाचप्रकारचे मत १९१४ सालच्या युद्धात गांधींचे होते. फरक इतकाच की गांधींनी आपली भूमिका बदलली आहे. आम्ही आमची भूमिका बदलली नाही आणि तशी भूमिका बदलण्यास इंग्रजांकडून काही प्रमाद घडला आहे, असे आम्हास वाटत नाही.

आमची भूमिका स्पष्ट केलेली असल्याने इतरांच्या मतांतराच्या भानगडी उकरून काढण्याची आम्हास काही हौस नाही. परंतु कारण नसताना पुढारी गणला गेलेला माणूस आपल्या मताची उलटापालट करू लागतो तेव्हा अशा गोष्टी उकरून काढणे जरूर होते-नव्हे कर्तव्य होऊन बसते. मताच्या उलटापालटीत गांधींच्या अपराधाचा घडा भरावयाचा राहिलेला आहे, असे आम्हास वाटत नाही. वाटेल त्यावेळी वाटेल ते मत द्यावयाचे ही गांधींना एक खोडच लागलेली आहे, असे दिसते. कोणाही माणसाला एकदा एक मत द्यावयास व दुसऱ्यांदा दुसरे मत द्यावयास मोठी शरम वाटते. पण गांधींनी याबाबतीत सारी लाजलज्जा सोडून दिल्यासारखे वाटते. नुकतेच कोणीतरी गांधींच्या वारंवार होणाऱ्या मतांतराबद्दल पृच्छा केली होती. पृच्छकाला गांधींनी जे उत्तर दिले ते मोठे वाचण्याजोगे मासलेवाईक आहे. ता. ३०-९-१९३९ च्या 'हरिजन' च्या अंकात गांधी लिहितात :–

" At the time of writing I never think of what I have said before. My aim is not to be consistent with my previous statements on a given question, but to be consistent with truth as it may present itself to me at a given moment. The result has been that I have grown from truth to truth; I have saved my memory an undue strain; and what is more, whenever I have been obliged to compare my writing even of fifty years ago with the latest, I have discovered no inconsistency between the two. But friends who observed inconsistency will do well to take the meaning that my latest writing may yield unless, of course, they prefer the old. But before making the choice they should try to see if there is not an underlying and abiding consistency between the two abiding seeming inconsistencies."

''कोणत्याही विषयावर लिहिताना त्या विषयासंबंधी मी पूर्वी काय म्हटले होते याचा विचार मी केव्हाच करीत नाही. एखाद्या विशिष्ट प्रश्नासंबंधी मी पूर्वी केलेल्या विधानाशी आजची विधाने सुसंगत आहेत की नाहीत हे पाहणे हा माझा हेतू नसतो. विशिष्ट क्षणी जे सत्य मला प्रतीत होते त्या सत्याशी माझ्या त्या

क्षणाच्या विधानांचा मेळ बसतो आहे एवढेच मी पाहात असतो. याचा परिपाक असा झाला आहे की मी माझे आयुष्य सत्याकडून सत्याकडे जाण्यास (शाश्वत सत्याच्या मार्गावर) व्यतीत करीत आहे. या योगे माझ्या स्मरण शक्तीवर पडणारा अनावश्यक ताण मी टाळला आहे आणि विशेष सांगावयाचे म्हणजे असे की जेव्हा जेव्हा पन्नास वर्षापूर्वी मी लिहिलेल्या लिखाणाशी माझे अगदी ताजे लिखाण ताडून पाहणे मला भाग पडले तेव्हा तेव्हा त्या दोहोमध्ये मला यत्किंचितही विसंगती आढळून आली नाही. तथापि ज्या माझ्या मित्रांना अशी विसंगती आढळेल त्यांनी (अर्थातच ज्यांना पूर्वीच्या लिखाणातील अर्थ अधिक पसंत असेल त्यांनी तो अर्थ घ्यावा) माझ्या अगदी अलिकडील लिखाणातील अर्थ ग्राह्य धरणेच अधिक उचित होईल. परंतु अशा प्रकारची निवड करण्यापूर्वी वरवर दिसणाऱ्या दोन विसंगतीत मूलभूत आणि सातत्यक्षम अशी सुसंगती आढळते की नाही हे शोधण्याचा त्यांनी प्रथम प्रयत्न करुन पाहावा.''

पुढारी पाहिजे असतो तो दिशा दाखविण्याकरता-सत्य शोधण्याकरता नव्हे! पण गांधींनी याचा विचार का करावा ? गांधींना जाब विचारणारा कोणी असता तर असले महात्मेगिरीचे म्हणजेच फाजीलपणाचे उत्तर गांधींना देणे शक्य झाले नसते. जाब विचारणारा नाही म्हणून तर गांधींचा हा राजकारणातला स्वेच्छाचार सुखाने चालला आहे. अशी भाषा युरोपातील कोणा पुढाऱ्याने जर काढली असती तर त्याला पुढारीपणावरून खेचून काढण्यास तेथील लोकांस पाच मिनिटेही लागली नसती. 'लोक पडले भोळे आणि अधिकारी झाला उन्मत्त' अशी या देशातली स्थिती आहे. महात्म्याने काहीही केले तरी तो महात्माच अशी लोकांची भावना आहे. अधिकार आहे तेव्हा आपण वाटेल ते म्हटले तरी लोक कबूल करतील हा गांधींचा मद ! जेथे लोक भोळे आहेत व अधिकारी पुरुषावरती त्यांचा पूर्ण विश्वास आहे तेथे अधिकारी पुरुषाची जबाबदारी फारच मोठी आहे. त्याने लहरीप्रमाणे मतपालट करणे म्हणजे लोकांना भांबावून टाकण्यासारखेच आहे. गांधींनी घेतलेली ही नवी भूमिका म्हणजे उपदेश नसून उपदंश (उपद्रव?) आहे. असे आम्हास वाटते व त्यापासून लोकांनी सावध राहावे, अशी आमची त्यांना सूचना आहे.

गांधींच्या उपदेशापासूनही सावध राहा तसेच कॉंग्रेस वर्किंग कमिटीच्यापासूनही सावध राहा, असे सांगणे आम्हास अवश्य वाटते. अटीतटीच्या करारमदारापासून काही निष्पन्न होणार नाही. अडवणूक करू अशी किती जरी इच्छा असली तरी इग्रजांची अडवणूक होऊ शकत नाही. कॉंग्रेस काही रिक्रुट भरतीला बंदी करू शकत नाही. कॉंग्रेसने करू म्हटले तर इतर पक्ष सहाय्य करण्यास तयार

आहेत. असा प्रकार असल्याकारणाने इंग्रजांची अडवणूक तर होत नाहीच पण अडवणूक करू म्हणणारांची नागवणूक मात्र होणार, यात संदेह नाही. बाकी सगळे पक्ष युद्धात सहाय्य करण्यास सिद्ध आहेत. एक कॉंग्रेसच अडून बसली आहे व ज्याअर्थी कॉंग्रेस म्हणजे हिंदू त्याअर्थी नागवणूक होणार ती हिंदूंचीच होणार आहे तरी या सर्व गोष्टींच्या सूचनेचा त्यांनी निर्विकारपणे विचार करावा अशी आमची त्यांना सूचना आहे.

●●●

अग्रलेख : जनता, ता. ३,१० आणि २४ ऑगष्ट १९४०.

उद्‌धृत : गांजरे, खंड ४ पृ. ११६-१२५, १२८-१६८.

८९

क्रांतीची उपासना कां ध्येयाचे रक्षण

" पहिले महायुद्ध संपल्यानंतर युरोपमधील बहुतेक देशांना वाटू लागले की लोकशाहीप्रणीत राज्य देशाला व समाजाला हितावह नाही. रशियाने कम्युनिझमचे तत्वज्ञान स्वीकारले आणि हेच सर्व देशांना तारक होय असा प्रचार चालविला. इटलींत फॅसिझम† सुरु होऊन त्या देशानेही तोच प्रचार चालविला. . जर्मनीत नाझीझम सुरू होऊन त्या देशानेहि तोच प्रचार चालविल्यामुळे युरोपात, लोकशाही, साम्यवाद व दंडूकेशाही (फॅसिझम व नाझीझम) असे तीन गट उत्पन्न झाले आणि ते परस्परांचे हाडवैरी झाले. दंडुकेशाही गट लोकशाही व साम्यवाद यांना नष्ट करण्याच्या घोषणा करूं लागला. हिटलर व मुसोलिनी यांनी लोकशाही गट नष्ट केला तर ते आपणालाही नष्ट करतील अशी स्टालिनला भिती वाटत होती; आणि त्या दोन दंडुकेबहाद्दरांनी स्टालीनचा साम्यवाद नष्ट केला तर ते आपणांलाही नंतर नष्ट करतील, अशी भीती लोकशाही राष्ट्रांना वाटत होती. या तीन गटांची स्पर्धा स्वशक्ती वाढविण्यासाठी सुरू झाली. इटलीने अबिसिनियावर स्वारी करून तो देश आपल्या वर्चस्वाखाली आणला. जर्मनीने पोलंड, झेकोस्लोव्हाकिया, ऑस्ट्रिया हे देश जिंकले व दुसऱ्या महायुद्धाला तोंड लागले. जर्मनी व इटली यांच्यावर इंग्लंड व फ्रान्स या देशांनी युद्ध पुकारले (३-९-१९३९) जर्मनी व रशिया यांचा मैत्रीचा करार झाला होता (ऑगस्ट १९३०). म्हणून रशिया युद्धांत पडला नाही. पण या कराराचा भंग जर्मनीने केला व रशियावर स्वारी केली तेव्हा रशियाने जर्मनी व इटली यांच्याबरोबर युद्ध पुकारले. हे दुसरे महायुद्ध साम्राज्यवादी राष्ट्रांचे आहे, म्हणून त्यांत भारत भाग घेणार नाही; असा भारतीय राष्ट्रसभेने पुकारा केला. सात प्रांतातील काँग्रेस मंत्रीमंडळांनी १९३९ च्या नोव्हेंबरमध्ये राजिनामे दिले. जोपर्यंत रशिया या युद्धांत पडला नाही, तोपर्यंत हिंदी कम्युनिस्ट पार्टी असा प्रचार करीत असे कीं हे रक्तपिपासू साम्राज्यवाद्यांचे युद्ध आहे, त्याला कामगारांनी मदत करू नये. स्वतंत्र मजूरपक्ष या युद्धाला सर्वांनी मदत करावी, असा प्रचार करीत असे. काँग्रेस व कम्युनिस्ट पार्टी यांची भूमिका कशी चुकीची आहे आणि स्वतंत्र मजूर पक्षाची भूमिका कशी बरोबर आणि परिणामी देशाला व पर्यायाने सर्व जगाला हिंतावह आहे याबद्दल साधक-बाधक माहिती देऊन बाबासाहेबांनी जनतेच्या ९-११-१९४० च्या अंकात (पा. ४-५) एक अग्रलेख लिहिला. " [१]

---

†पाहा, परिशिष्ट क्रमांक : १६.

१ : खैरमोडे, खंड ९ वा, पृ. ४४–४५.

दरवर्षी ता. ७ नोव्हेंबर हा दिवस रशियन राज्यक्रांतीचा दिवस म्हणून जगांतील सर्व कामगार उत्साहाने साजरा करतात. हिंदुस्थानमध्ये रशियन क्रांतीचे चहाते व उपासक जरी पुष्कळ नसले तरी बरेचसे आहेत असे म्हणावयास कांही हरकत नाही व ते देखील हा दिवस हिंदुस्थानमध्ये मजूर लोकांनी साजरा करावा अशा प्रकारचा प्रयत्न करीत असतात. त्याप्रमाणे थोड्या बहुत प्रमाणांत तो हिंदुस्थानमध्ये या वर्षी साजरा करण्यांत आलाच.

रशियामध्यें प्रस्थापित करण्यांत आलेल्या कम्युनिस्ट समाज† पद्धतीसंबंधाने, कोणाचे कांही मत असो, परंतु रशियन क्रांतीचा दिवस मानवी समाजाच्या इतिहासामध्ये अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे. याबद्दल कोणाही सुजाण माणसाला शंका असेल, असे आम्हाला वाटत नाही. सुरूवातीपासून आतापर्यंत मानवी समाजाच्या जीवनक्रमाच्या इतिहासातील टप्पे शोधून काढण्याचा कोणी जर प्रयत्न केला, तर फ्रेंच राज्यक्रांतीचा दिवस हा **पहिला टप्पा** आहे, हे कोणांसही कबूल करावे लागेल. मानवी समाजाच्या इतिहासांत समाजाची रचना प्रथम समता आणि स्वातंत्र्य या तत्त्वांवर झाली पाहिजे अशी घोषणा जर पहिल्या कोणी केली असेल तर ती फ्रेंच क्रांतीकारकांनी केली आहे. या फ्रेंच क्रांतीच्या पूर्वी समाजाची रचना गुलामगिरीच्या तत्त्वावर आधारलेली होती. श्रेष्ठ, कनिष्ठ, वरचा, खालचा या भेदभावाने समाजाचे बंधारण रचण्यांत आले होते, त्यांत असंख्य दरिद्री व निर्विद्य जनांना स्वातंत्र्याची माहिती नव्हती. नव्हें, त्याचा हक्कहि त्यांना नव्हता. श्रम करणे, धनोत्पादन करणे आणि ते मालकांस देणे व मालक देईल त्यावर जगणे याशिवाय त्यांच्या स्वतःच्या माणुसकींत व जीवनात कांही अर्थ नव्हता. दारिद्र्याच्या गर्तेत सांपडल्यामुळे संस्कृतीचा सुगंध त्यांना ठाऊक नव्हता व त्यामुळे श्रीमंतापासून समतेच्या वागणुकीची त्यांना कोणत्याही प्रकारची अपेक्षा नव्हती, नव्हे हक्कही नव्हता. या असमानतेचे समूळ उच्चाटन करून समतेच्या व स्वातंत्र्याच्या तत्त्वाचा पुरस्कार केल्यामुळें फ्रेंच क्रांतीचा दिवस, तो जरी पाळण्यात येत नसला, तरी त्याचे महत्त्व फार मोठे आहे. फ्रेंच क्रांतीनंतर रशियन क्रांतीचा दिवस हा मानवी समाजाच्या विकासाच्या इतिहासांतील **दुसरा टप्पा** आहे. एका दृष्टींने पाहिले असतांना रशियन क्रांती व फ्रेंच क्रांती यांचा निकटचा संबंध आहे. फ्रेंच क्रांतीत सामाजिक समता व सामाजिक स्वातंत्र्य यांच्यावर भर देण्यांत आला होता. आर्थिक स्वातंत्र्य व आर्थिक समानता यांकडे दुर्लक्ष करण्यांत आले होते. आर्थिक स्वातंत्र्य व आर्थिक समानता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न झाला नव्हता व जो झाला होता तो अयशस्वी झाला.

---

†पाहा, परिशिष्ट क्रमांक : १७.

रशियन क्रांतीचे महत्व जर कोणत्या एका गोष्टींत सांठविलेले असेल, तर ते आर्थिक स्वातंत्र्य व समानता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केल्यामुळेच होय. हा कार्यक्रम काही लहानसहान नव्हे. आर्थिक समानतेशिवाय सामाजिक समता व सामाजिक स्वातंत्र्य ही दोन्ही फोल आहेत, हे फ्रेंच क्रांतीचा इतिहास† जो कोणी परिशिलन करून पाहील त्याला कळून चुकेल. ज्याला धन नाही त्याला मान नाही. ज्याला धन नाही त्याला स्वातंत्र्य नाही, कारण त्याला पोटाकरितां दुसऱ्यावर अवलंबून राहिल्याशिवाय मार्ग नाही. जो परावलंबी आहे तो मनुष्य केव्हांही स्वतंत्र असू शकत नाही. रशियन क्रांतीकारकांचे मार्ग सदोष अघोरी आहेत अशी तक्रार करता येईल. समता प्रस्थापित करण्याकरितां रशियाने व्यक्तीस्वातंत्र्य नष्ट केले. असे करणे समाजाच्या धारणेच्या दृष्टीने योग्य आहे काय अशी विरोधी वृत्ती घेता येईल परंतु कांही म्हटले तरी जेथे आर्थिक असमानता अपरिमित प्रमाणांत नांदत आहे तेथे खरे स्वातंत्र्य नाही ही गोष्ट सर्वांस कबूल करावीच लागेल. अशा पद्धतीने पहाता रशियन क्रांतीचा कसा अन्योन्य संबंध आहे व फ्रेंच क्रांतीपेक्षा रशियन क्रांतीचे महत्त्व जास्त कां हे दिसून येईल. फ्रेंच क्रांती ही पोळी आहे. रशियन क्रांती ही पोळीतले पुरण आहे. फ्रेंच क्रांती ही कळी आहे व रशियन क्रांती हे विकास पावलेले फूल आहे. मनुष्यमात्राच्या इतिहासांत त्यांचे उदंड महत्व असल्याकारणाने रशियन क्रांतीचा दिन फ्रेंच क्रांतीच्या दिनापेक्षा जास्त प्रमाणात साजरा करण्यात यावा, हे सहाजिक आहे.

वर सांगितल्याप्रमाणे रशियन क्रांतीचे उपासक हिंदूस्थानमध्ये अनेक आहेत. या उपासकामध्ये बरेचसे किरकोळ, ढोंगी, पोटभरू असे लोक आहेत; परंतु त्या बरोबरच या देशातील राजकारणामध्ये अग्रभागी असलेले कांही लोक आहेत, हेहि तितकेच खरे आहे. पं. जवाहरलाल नेहरू, जयप्रकाश नारायण वगैरे राजकारणात पुढारी असलेले लोक या रशियन क्रांतीचे उपासक आहेत. परंतु या रशियन क्रांतीच्या हिंदुस्थानातील उपासकांना आमचा असा सवाल आहे की, तुम्ही फक्त हा दिवस साजरा करणार व स्वस्थ बसणार, कां या रशियन क्रांतीने ज्या तत्त्वांना जन्म दिला त्या तत्त्वांच्या संरक्षणार्थ तुम्ही प्रयत्न करणार ? आज जे जागतिक युद्ध चालू झाले आहे त्या युद्धात तत्त्वाचा लढा आहे, हे कोणीही नाकबूल करू शकणार नाही. एका बाजूला झोटिंगशाही व दुसऱ्या बाजूला लोकशाही असे पक्ष पडलेले आहेत. या लढ्यात रशियन क्रांतीच्या उपासकांना लोकशाहीच्या बाजूने लढून लोकशाहीचा विजय करणे हे त्यांचे कर्तव्य कर्म आहे, असे आम्हास वाटते. परंतु आश्चर्याची गोष्ट ही की, जे लोक रशियन क्रांतीचे

---

†पाहा, परिशिष्ट क्रमांक : १८.

उपासक म्हणून अभिमान बाळगतात तेच लोक ह्या लढाईमध्ये ब्रिटिश सरकार लोकशाहीच्या वतीने लढत आहे, हे मान्य असूनही मदत करण्यास तयार नाहीत. नव्हे मदत करू नये म्हणून प्रचार करण्याचा त्यांनी चंग बांधला आहे. ही वागणूक कशी विचित्र व कशी विसंगत आहे हे उघड आहे. रशियन क्रांतीचे उपासक म्हणवून घेत असताना स्वातंत्र्याचे व समतेच्या तत्त्वांचे रक्षण करण्याकरिता या उपासकांनी पुढे येऊ नये, याला काय उत्तर असावे; याचा पुष्कळांना अचंबा वाटल्याशिवाय रहाणार नाही. याला विसंगतपणाचे जे उत्तर देण्यात येते ते असे आहे.—खुद्द रशिया ज्याने समतेकरिता व स्वातंत्र्याकरिता जगामध्ये अघोर साधनांचा उपयोग करून व अघोरीपणाच्या दूषणांस न जुमानता क्रांती केली तोच रशिया आजच्या युद्धात लोकशाहीच्या वतीने लढण्यास जर सिद्ध नाही तर आम्ही या लढ्यात का भाग घ्यावा ? गुरू वागेल तसेच शिष्यांनी वागावे या शिष्टाचाराप्रमाणेच वागणे, हेच जर ध्येय असेल, तर ही विचारसरणी तर्कशुद्ध आहे हे मान्य करावे लागेल. या युद्धात रशियाची वर्तणूक दुर्बोध आहे हे सर्वांनाच दिसण्यासारखे आहे. हे लढाईच्या सुरुवातीसच ज्या साम्राज्यशाही जर्मनीविरुद्ध रशियाने आज वीस वर्षेपावेतो धर्मयुद्ध चालविले होते त्याच साम्राज्यशाहीबरोबर तहनामा करून त्याने पोलंडवरती अतिक्रमण करून त्याचा विच्छेद केला व त्याचे स्वातंत्र्य हरण करून त्या देशाचा अर्धा भाग आपल्यात सामील केला. पोलंडचे स्वातंत्र्यहरण केल्यानंतर रशियाने फिनलंडवर स्वारी केली व ५/६ महिन्याच्या लढाईनंतर फिनलंडचेही स्वातंत्र्य नष्ट केले. फिनलंडचे स्वातंत्र्य नष्ट केल्यानंतर रशियाने एस्थोनिया, लॅटव्हिया अशा बाल्टिक समुद्राच्या किनाऱ्यावरती वास्तव्य करून रहात असलेल्या स्वतंत्र राष्ट्रावरती घाला घालून त्यांचेही स्वातंत्र्य हरण केले. त्यानंतर काळयासमुद्रावरतीं आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या हेतूने रशियाने त्या भागाकडे आपली दृष्टी फिरविली व रुमानियाचा डव्ऱ्यूज या नांवाचा जो प्रांत होता, तो नुसत्या दमदाटीने गिळकृत करून टाकिला. रशियाचा या मुलुखगिरीमुळे हिटलरला मोठाच फायदा झाला हे उघड आहे. जर्मनीची पूर्व बाजूची सरहद्द निर्वैर झाल्यामुळे जर्मनीला आपले सर्व सैन्य व आपली सर्व युद्धाची सामुग्री एकवट करून जर्मनीच्या पश्चिम सरहद्दीवरील राष्ट्रांवर मारा करण्याचे काम साधे व सुलभ होऊन गेले. फ्रान्स, बेलजियम, नॉर्वे, हॉलंड या देशांना जर्मनी या युद्धांत पायाखाली तुडवू शकला याची जबाबदारी पर्यायाने रशियावरतीच पडते, असे निदान आम्हांस तरी वाटते. रशियाने जर्मनीच्या पूर्व दिशेवरती ही पुंडाई चालविली नसती आणि जर्मनीच्या हुकुमशाहीस आळा

घालण्यास जर्मनीच्या पूर्व बाजूवर जर रशियाने हल्ला केला असता तर फ्रान्स, बेलजियम, नॉर्वे, हॉलंड वगैरे जर्मनीच्या पश्चिम सरहद्दीवरल्या राष्ट्रांचे स्वातंत्र्य नष्ट झाले नसतेच. जर्मनी या बनावाने हतबल होऊन उभय सरहद्दीवरती एकाच वेळी लढण्यास मात्र असमर्थ होऊन तह करण्यास उत्सुक झाला असता. झाली ही गोष्ट विपरित झाली आणि ती विपरित होण्याचे कारण म्हणजे रशियाचे असमर्थनीय धोरण होय; असे म्हटल्यावाचून गत्यंतर नाही. जर्मनीने फ्रान्स, बेलजियम, नॉर्वे वगैरे पश्चिम सरहद्दीवरील राष्ट्रांचे स्वातंत्र्य नष्ट केले इतकेच नव्हें तर, सर्व बाल्कन राष्ट्रांवरती आपले वर्चस्व नव्हे स्वामित्व बसविण्याचा उपक्रम चालविला आहे. झेकोस्लोव्हाकियाचा तर अंत झालाच आहे. रुमानिया जर्मनीने हस्तगत केला आहे. जर्मनीचा साथी इटली याने ग्रीसवरती स्वारी केली आहे. हा सर्व भाग जर्मनी व इटाली या दोन राष्ट्रांच्या स्वाधीन झाला तर रशियाची धडगत नाही. निदान त्याची मोठी कुचंबणा तरी होईल ही गोष्ट रशियन क्रांतीचे उपासकही कबूल करतील. कारण रुमानिया व ग्रीस ही जर जर्मनीच्या ताब्यांत गेली तर ज्या डार्डानेलस्च्या समुद्रधुनीवरती आज अनेक वर्षे रशियाचा डोळा आहे ती समुद्रधुनी जर्मनीच्या अतिक्रमणामुळे टर्कीच्या हातून जाऊन जर्मनीच्या हाती लागली तर त्यामुळे रशियाचा भलताच कोंडमारा होईल. रशियाने केलेली मुलुखगिरी एकेवेळी क्षम्य म्हणता येईल. जे जे प्रांत या लढ्यांत रशियाने घेतले ते प्रांत एकेकाळी रशियाचेच होते. रशियाचे क्षेत्र, रशियाचे संख्याबल व आरमारी बळ कमी व्हावे या हेतूने गेल्या लढाईमध्ये रशियाची त्या काळची अनवस्था झालेल्या स्थितीचा फायदा घेऊन हे प्रांत इंग्लंड व फ्रान्स यांनी तहाच्या वेळी रशियापासून तोडून काढले व त्यांची स्वतंत्र राष्ट्रे बनविली. ती रशियाने या युद्धात परत घेतली व आपली आतांची सरहद्द पूर्वीच्या सरहद्दीला नेऊन भिडविली. हे चालू जमान्याच्या राजनितीला मोठेसे विसंगत आहे, असे म्हणता येणार नाही; परंतु येवढी मुलुखगिरी संपल्यानंतर व मान्याचे प्रांत आपल्या सरहद्दीत सामील करून ती सरहद्द बळकट करण्याचे कार्य संपल्यानंतर रुमानिया व ग्रीस या रशियाला जिव्हाळयाच्या असणाऱ्या प्रांतावर जर्मनीने मारा केल्यावर तरी रशिया आपल्या धोरणात बदल करील अशी आशा पुष्कळांना होती; परंतु मॉस्कोहून ६ नोव्हेंबर रोजी सोव्हियट सरकारच्या सुप्रीम कौन्सिलचे अध्यक्ष कालीनीन यांनी मॉस्को शहरातील सोविएतच्या सभासदांपुढे ता. २३ ऑक्टोबर रोजी केलेल्या भाषणाचा गोषवारा तारेने इकडे आला आहे. त्या भाषणावरून अशी आशा करण्यास काही आधार उरलेला नाही. त्या भाषणात त्यांनी असे स्पष्टपणे सांगितले की, '' ह्या लढाईत कोणतीच बाजू घेण्याचा रशियाचा इरादा नाही. रशिया या लढाईत तटस्थ रहाणार आहे.''

एकेकाळी रशियन क्रांतीचे पुढारी असे म्हणत होते की, रशियामध्ये समता प्रस्थापित करून भागणार नाही. जर ज्याप्रमाणे मिशनरी लोक आपल्या धर्माचा प्रसार जगभर करीत असतात, त्याचप्रमाणे रशियाने आपले समतेचे तत्त्व जगभर प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. याकरिता त्यांनी कोट्यावधी रुपये खर्च करून सर्व जगभर आपले हस्तक नेमून, त्यांच्याकरवी समतेची क्रांती करण्याचे कार्य मोठ्या नेमाने चालू केले होते. कालिनिन यांच्या भाषणावरून पहाता या धोरणात व चालू रशियाच्या धोरणात जमीन अस्मानाचे अंतर पडले आहे, हे उघड आहे. रशिया आज ध्येयाच्या दृष्टीने शून्यवत् झाला आहे. परंतु रशियाने ध्येय सोडले तरीपण त्याने आपला स्वार्थ का सोडावा हे समजणे कठीण आहे. ध्येयासाठी नको असेल तर रशियाने लढू नये. पण ज्या डार्डानेल्सच्या समुद्रधुनीवरती रशियाचे पुढील भविष्य अवलंबून आहे त्याकरिता तरी रशियाने का लढू नये ? केवळ इंग्लीश लोकांचा द्वेष म्हणून जर त्यांच्या बाजूला होऊन रशियाला लढावयाचे नसेल तर ती गोष्ट निराळी आहे. या लढाईत इंग्रज लोकांच्या मूर्खपणाची कमाल आहे ही गोष्ट कोणालाही लपवून ठेवता येणे शक्य नाही. त्यांची वर्तणूक अशी विचित्र झाली आहे की, त्यांना या लढाईत युरोपमधील एक देखील राष्ट्र मित्र म्हणून उरले नाही. रशियाचा तर इंग्लंडने जन्मभर गेली वीस वर्षे द्रोह केला व त्याला केवळ समतेच्या क्रांतीने अस्पृश्य मानून त्याच्याशी कांही वर्षे व्यवहार देखील बंद केला होता. परंतु एवढ्यामुळेच जर इंग्लंडला मदत करावयाची नाही असेच जर रशियाचे म्हणणे असेल तर मग रशिया कोणत्या तोंडाने हिटलरशी दोस्ती करूं शकतो हे आम्हांस उमगू शकत नाही. हिटलरने रशियाचा द्वेष कांही कमी प्रमाणांत केला नाही. नाझी† पार्टीची सारी उभारणी रशियाच्या द्वेषावरतीच केलेली होती. रशियाचा नाश करणे हेच एक आपले ध्येय आहे, असा पाठ रात्रंदिवस हिटलर घोषित होता. हिटलरसारख्या शत्रूशी जर रशिया कार्यानिमित्त सख्य करू शकतो तर तशाच प्रकारचे सख्य रशिया इंग्लंडशी कां करू शकत नाही, हे आम्हास कळत नाही. हिटलरचा वृक्ष वाढला, तर त्याचे सावट रशियावर पडून रशियाची वाढ खुंटल्याशिवाय रहाणार नाही, असा इशारा दिल्याखेरीज आमच्याने रहावत नाही. या लढाईतील रशियाचे वर्तन कसे सदोष आहे, हे आम्ही वर सांगितले आहे. ते रशियन क्रांतीच्या काही उपासकांना मान्य होईल. काहीना मान्य होणार नाही. परंतु रशियन क्रांतीच्या सर्व उपासकांना आम्ही असा प्रश्न विचारू

† पाहा, परिशिष्ट क्रमांक :१९.

इच्छितो कीं तुम्ही रशियन क्रांतीची उपासना करीत बसणार की समतेच्या स्वातंत्र्यांच्या ध्येयाचे रक्षण करणार ? क्रांती मोठी की ध्येय मोठे याचा निर्णय सर्वांनी करून वागले पाहिजे. आणि क्रांतीपेक्षा ध्येय मोठे ही गोष्ट निर्विवाद असेल तर रशिया काय करतो, काय न करतो याकडे लक्ष पुरवीत ध्येयाच्या संरक्षणार्थ सर्वांनी चालू लढाईत मनोभावाने भाग घ्यावा हेच सर्वांचे परम् कर्तव्य ठरेल व तीच रशियन क्रांतीची खरी उपासना ठरेल.

" रशिया सांगेल तोच धर्म. रशिया करील ते कार्य, अशी अंधभक्ती किती दिवस चालणार ? रशियापासून नेहमीच धडे घेत बसण्यापेक्षां चुकेल त्यावेळी रशियाला धडा देणे योग्य होणार नाही काय ? "[1]

---

[1] : अग्रलेख : जनता, ता. ९ नोव्हेंबर १९४०, उदधृत, खैरमोडे, खंड ९ वा, पृ. ४५–५०.

१०

''कामगारशाहीचा विजय असो''

ता. ७ नोव्हेंबर हा रशियन राज्यक्रांतीचा वाढदिवस आहे. या दिवशी जगांतील शेतकरी व कामकरी यांनी एकत्र येऊन कामगारशाहीची घोषणा करण्याचा प्रघात आहे. मुंबईचे कामगार तरी हा दिवस कधीही विसरणे शक्य नाही. कांही वर्षांपूर्वी मुंबईत होऊन गेलेल्या एक दिवसाच्या संपात याच दिवशी काँग्रेसशाहीने दोन कामगारांचे बळी घेऊन आपल्या बेगडी अहिंसेचे स्वरूप जगजाहीर केले होते. जगातील कोणत्याही देशांत शेतकरी व कामकरी लोकांचीच बहुसंख्या असल्याने खरी लोकशाही जगांत नांदावयाची असल्यास कामगारशाहीचाच उदय व्हावयास हवा यांत शंका नाही. जगांतील मानवी समाजांत क्रांती यशस्वी व्हावयाची तर खऱ्या लोकशाहीचा म्हणजे अर्थातच कामगारशाहीचा जगांत प्रचार व्हावयास हवा आहे. या दृष्टीने पहाता जगात आजवर झालेल्या क्रांत्या फोलच ठरणार आहेत. इंग्लंडात क्रांती होऊन इंग्लंडची राज्यसूत्रे फक्त धनिक वर्गाच्या हातात गेली व खरी लोकशाही अस्तित्वात येणे ही गोष्ट दुरापास्त होऊन बसली. फ्रेंच राज्यक्रांतीने 'समता, स्वतंत्रता व बंधुता' या लोकशाही तत्त्वांची घोषणा केली. पण भांडवलदाराच्या हातात राज्यसत्ता जाऊन ती घोषणाही फोलच ठरली. रशियन क्रांतीने एक पाऊल पुढे टाकले आहे, असे म्हणावयास हरकत नाही. पण रशियातील क्रांतीने भांडवलशाहीचा बंदोबस्त केला असला तरी रशियामध्ये एकंदर कामगार वर्गाच्या हातात राज्यसत्ता आलेली नाही, हे त्या क्रांतीचे एक मोठे वैगुण्य आहे. रशियामध्ये सर्व राज्यसत्ता एका सोटेशाही पक्षाच्या हाती आहे ; तोंवर त्या देशांतही खरी कामगारशाही निर्माण झाली आहे असे कदापि म्हणता येणार नाही. जगांत खरी कामगारशाही व्हावयाची असल्यास तिचा पाया लोकशाहीच्या तत्वावरच रचला गेला पाहिजे. हुकुमशाहीच्या सोटेशाहीने निर्माण झालेली क्रांती ही कधीही चिरस्थायी होणे शक्य नाही.

वरील विचारसरणी खरी असल्यास आपणास जी कामगारशाही हवी आहे ती लोकसत्ताक समाजसत्तेच्या तत्वावर आधारलेली असावयास पाहिजे. आपणास हव्या असणाऱ्या लोकशाही कामगारशाहीने मूठभर भांडवलदारापासून व सोटेशाहीपासून अलिप्त रहावयास हवे. असे झाल्याविना एखाद्या नामधारी कामगारशाहीने कामगारवर्गाचे खरे कल्याण होणे, मृगजळाने तहान भागविण्याइतकेच अशक्य आहे. म्हणून जगात खऱ्या नव्या कामगारशाहीचा संभव होणे असल्यास

जगातील लोकशाही राष्ट्रांनी आपले भांडवलशाही धोरण सोडावयास हवे व रशियानेही आपले सोटेशाही धोरण टाकून द्यावयास हवे. असे झाले तर समाजसत्तावादी रशिया व लोकशाही राष्ट्रे यांच्या संगनमताने जगात नव्या युगाला सुरुवात होईल असे वाटते.

जागतिक कल्याणासाठी वर दर्शविल्याप्रमाणे रशिया व जगातील इतर लोकशाही राष्ट्रे यांचे सहकार्य घडून यावयास हवे आहे. पण आजतरी असा सुयोग येण्याचा संभव दिसत नाही. चालू लोकशाही विरूद्ध हिटलरशाही यामध्ये जे महायुद्ध चालू आहे त्यात रशियाच्या स्टॅलिनशाहीचे जर्मनीच्या हिटलरशाहीशी चांगलेच मेतकूट जमले आहे. या परिस्थितीत लोकशाही राष्ट्रांना एकाकीच हिटलरशाहीला तोंड देणे प्राप्त झालेले आहे. भावी कामगारशाहीच्या दृष्टीने पहाता आजचा प्रसंग आणिबाणीचा आहे. हिटलरशाही विजयी होऊन भावी जगात 'बळी तो कानपिळी' हा न्याय सर्रास जारी होणार कां? लोकशाही यशस्वी होऊन जगात नव्या जगाची, नव्या जोमाने 'स्वतंत्रता, समता व बंधुता' या त्रिकालबाधीत तत्त्वावर पुनर्घटना होणार, हा प्रश्न चालू युद्धाने सुटावयाचा आहे. अशा या प्रसंगी सर्व लोकशाही व कामगारशाहीवादी मुत्सद्यांनी चालू युद्धात लोकशाही राष्ट्रानांच शारीरिक, मानसिक व आर्थिक अशी शक्य तितकी मदत करून 'बळी तो कानपिळी' या हिटलरशाही पिशाच्याला खोल गाडून टाकणे हेच त्यांचे खरे कर्तव्य होणार नाही काय ?''[१]

● ● ●

---

[१] : स्फुट, जनता, दिनांक ९ नोव्हेंबर १९४०. उदधृत, खैरमोडे, खंड ९ वा, पृ. ५०–५१.

९१

ज्याचा त्याचा महारावर कटाक्ष

काय असेल तें असो महार जात सर्वांच्या डोळयांत सलते. पेशवाईत अस्पृश्यता फार कडक होती. पण तिचा धग जितका महारांना लागला तितका कोणत्याही अस्पृश्य जातीला लागलेला नाहीं. अस्पृश्यांची देखतां डोळा ओळख पटावी म्हणून गळयांत काळा दोरा बांधण्याचा नियम निघाला. पण बांधण्यांत आला महारांच्याच गळ्यांत ! अस्पृश्यांच्या स्पर्शाने रस्त्यावर पडलेल्या विटाळलेल्या धूळीवर पाय पडू नये म्हणून त्यांच्या कमरेला खराटा बांधा म्हणजे ती आपोआप लोटून जाईल असा हुकूम पेशव्यांनी काढला. पण तो बांधला गेला महारांच्या कमरेला ! अस्पृश्यांची थूंकी जमीनीवर पडूं नये कारण त्याच्या थुंकीवर पाय पडला तर विटाळ होतो म्हणून त्यांची थुंकी साठविली जावी व ती रस्त्यावर पडू नये म्हणून त्यांच्या गळयांत मडकी बांधण्याचा हुकूम सुटला. पण मडकी बांधली गेली महारांच्या गळयांत ! महारांना स्पृश्य हिंदूनी उपद्रव दिला तेवढा अस्पृश्यांतील इतर जातींना कधींच दिला नाहीं. हिंदुचा महारांवरच एवढा कटाक्ष कां याचे कांही कारण उमगत नाहीं. पण उभयतांमधले हाडवैर अगदीं पूरातन आहे हें निखालस खरे आहे. याचे कारण महार जात चळवळी आहे हें असूं शकेल. इंग्रज सरकारचे राज्य झाल्यापासून तर महारांनीं आपली चळवळ नेटाने सुरूं केली. अस्पृश्य उन्नतीचे भांडण भांडण्याचें कंकण तिनें आपल्या हातीं बांधले. पुण्याला १८८६ सालीं कॉंग्रेस भरली असतांना हिंदु धर्माचा पुतळा उभा करून जाळला महारांनीं. अस्पृश्यांना गुलामगिरींत ठेवून स्वराज्य मागण्याचा तुम्हाला काय अधिकार असा रोकडा सवाल याच कांग्रेसच्या अधिवेशनांत विचारण्यास उभे राहिले ते महारच होते. यामुळें सनातनी हिंदुच्या विरोधाला राजकारणी हिंदुच्या विरोधाचीही जोड मिळाली. गांधींनी अस्पृश्योन्नतीची चळवळ हाती घेतल्यावर तरी महारांना हिंदु लोक जवळ करतील असें वाटलें होतें. परंतु, ती आशासुद्धां निष्फळ झाली. गांधीने स्थापन केलेल्या हरीजन सेवक संघाचे† प्रणेते ठक्कर बापा (ठक बापा नव्हे) यांनीं मुंबई इलाख्यांतील ब्याकवर्ड क्लास बोर्डाकडे तक्रार केली आहे कीं सरकारी सवलतीचा सर्व फायदा महारच घेतात तरी त्याला आळा घालण्यात यावा. खरा प्रकार काय आहे तो चौकशीअंती कळेलच. पण महारांबद्दल हिंदुंच्या पोटात किती विष आहे हें यावरून स्पष्ट होतें. आतापर्यंत निदान हिंदुच महारांचा द्वेष करीत. त्यांच्या

---

†पाहा, परिशिष्ट क्रमांक :२०.

रांगेत चांभार मांग शिरलेले दिसतात. त्यांनीही महारांचा द्वेष करण्याचे कार्य आरंभिलेले दिसते. नव्हे महारांचा द्वेष करण्यापलिकडे दुसरें कांहींच त्यांच्या हातून होत असलेलें दिसत नाही. चांभार मांगाची महारांविरूद्ध उठावणी हिंदु लोकांनीच केलेली आहे असा आम्हांस विश्वास वाटतो. पण महारांविरूद्ध उठलेल्या चांभार मांगांना आम्हाला इतकेंच सांगावयाचें आहे कीं ज्या कांही सवलती मिळाल्या आहेत त्या महाराच्या श्रमामुळें आणि चळवळीमुळें मिळाल्या आहेत. आणि महारांवर कांहीं आरोप करावयाचे असतील तर जे खरे असतील असेच आरोप करावेत. भलते सलते वायफळ बोलूं नये. हल्लीं हे सत्र महारांविरूद्ध सर्वत्र चालूं आहे. नुकतीच नागपूर येथील नवमतवादी मातंग समाजाची जी मध्यप्रांत–वऱ्हाड महारेतर ' हरिजन ' परिषद, कौंडण्यपूर येथे गेल्या नोव्हेंबर महिन्यांत भरविण्यांत आली तींत ह्या खोट्या आरोपाचा पाढा वाचण्यांत आला. या परिषदेंत "महार समाज महारेतर हरिजनांची पिळणूक करितो ; डॉ. आंबेडकर हे महारेतर हरिजनांचे पुढारी नव्हत, " असलेही दोन ठराव पास करवून घेण्यांत आले. ही कारवाई कोणाची, हें जाणत्यांना आजमावतां येतेंच. आम्ही वर दर्शविल्याप्रमाणें हा प्रकार अगदींच नवा नव्हे, बराच जुना आहे. पण सध्यां अनपेक्षित होय. कारण, कॉंग्रेस-कचेरींतून आपण उठविलेल्या सत्याग्रहांत ज्यांना भाग घेतां येत नसेल त्यांनी सूत कांतणें, ग्रामोद्धारासाठीं राबणें व जातीजातींत ऐक्य उत्पन्न करणें हें विधायक कार्यक्रम प्रामाणिकपणें पार पाडावेत, असा गांधींचा आदेश किंवा हुकूम आहे. आणि लेकी बोले सुनेस लागे असली गांधींची भाषा दुटप्पीपणाची नसल्याचा अनेकांना विश्वास असल्यामुळें गांधीगण झिजले, झटले तर देशकल्याणाच्या कामगिरीकरितांच, असा कित्येकांमध्यें समज वाढणें सहाजिकच होय. परंतु वरील परिषद कॉंग्रेस पक्षाच्या चळवळींतच पैदा झाली आहे, हे पाहिलें म्हणजे सामान्य लोकांची बुद्धि कुंठित झाल्याशिवाय रहाणार नाही.

या आरोपाला महार लोक उत्तर देऊ शकतील, नाहीं असे नाहीं. परंतु, परक्यांनीच कान टोंचलेले बरे, म्हणून राष्ट्रवीरकारानीं या परिषदेंतील ठरावावर जी टीका केली आहे, त्यांतील उतारा आमच्या चांभार, मांग बंधूंच्या कान उघाडणी करतां आम्ही उद्‌धृत करीत आहोंत. त्याचा त्यांनी योग्य तो विचार करावा. राष्ट्रवीरकार म्हणतात :—

" महार समाज महारेतर हरिजनांची पिळणूक करितों असें म्हणणें केवढें हें कांगावखोरीचें ! यावरून वरच्या महारेतर हरिजन परिषदेंतल्या एकाहि माणसाला कसलेंहि स्वातंत्र्य नव्हतें; सगळे कॉंग्रेस-पुढाऱ्यांचे पाळीव पोपट होते, हें स्पष्ट सिद्ध होत नाहीं काय ? महार समाजाचाही पुढारलेल्या वर्गाच्या पायमळणींत अजून देखील चेंदामेंदा उडत आहे. त्याचे दांत, हात दोनहि मोडले

तुटले आहेत. म्हणजे तोही पुढारलेल्या वर्गाकरितां हाडाची काडें करून घेऊन राबत खपत आहे. अशा स्थितींत महारेतर हरिजनाची तो पिळणूक करितो असें अस्पृश्य समाजातल्याच लोकांनी बोल काढावे, हे देशाचेच दुर्भाग्य ! महार समाजाच्या हातांत सावकारी, कारखानदारी, डॉक्टरी, वकिली, दलाली नी अंमलदारी यापैकीं कोणताहि एक धंदा अधामुर्धा नव्हे, तर गिर्धासुद्धा नाही. अशा स्थितींत तो महारेतर हरिजनांची पिळवणूक करितों ती कोठें ? घरच्या सुनेच्या हरकतीस न जुमानतां शिंक्यावरच्या लोण्याचा फन्ना उडवीत असतांना सासूबाई येतांच गोपाळ कृष्णानें शेवटच्या घासाचे बोटास लागलेलें लोणी त्या सुनेच्या तोंडास फांसलें आणि आपण बाजूला होऊन, त्या सुनेला सासूच्या तोंडाला दिलें तसलीच ही चाणक्यचंडिरामाची कारवाई नव्हे काय ?

परिषदेंत अध्यक्ष मि. वऱ्हाडे यांनीं भाषण केल्याप्रमाणें बोर्ड, असेंब्ली वगैरेंच्या निवडणुकींत अस्पृश्य समाजांतील महार जातीचे उमेदवार महारेतरापेक्षां अधिक यशस्वी होत असतील; नव्हे होतातहि. परंतु महार समाज बहुसंख्य आहे त्याचाच तो परिणाम होय. आणि निवडणुकींत पोटसमाजांत बरोबर वांटणी पाडून देण्याइतकें पुढारीपण केव्हांही निर्माण होणे शक्य नाहीं. गांधी-नेहरूसारखे महान पुढारी कॉंग्रेस पक्षाला असतांहि सातहि प्रांतांचे मुख्य प्रधान अत्यल्पसंख्य बामण जातींतलेच झाले ! तेव्हां निवडणुकींत महारेतर हरिजनांना वास्तविक वांटा देण्यास डॉ. आंबेडकर समर्थ नाहींत; म्हणून अस्पृश्य समाजाचे ते पुढारी नव्हेत, असा बोलवित्या धन्याकरितां सूर काढणें म्हणजे आपला आपणच घात करून घेणें होय. आणि म्हणूनच अस्पृश्यांतील मांग समाजाला डॉ. आंबेडकर लांबचे वाटूं लागले असून उमरावतीच्या डॉ. सबणीस सारखे लोक जवळचे आणि कल्याणकर्ते वाटत आहेत ! एकूण काय बहुजन समाजाचा उद्धार करणे आणि त्याला पुढारलेल्या वर्गाच्या दाढांतून बाहेर काढून घेणे ही कामगिरी बरीच कठीण आहे पण ती समाजसेवकांस केलीच पाहिजे. ''

सदरहू लेख जनता दिनांक ४ जानेवारी १९४१ च्या अंकात ' संकीर्ण समालोचन ' या सदराखाली प्रसिद्ध झाला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिनांक १३ जुलै १९४० च्या जनतेच्या अंकात ' जनतेंसाठी लेख लिहिण्याचे जाहीर केले होते. दिनांक ११ जानेवारीच्या ' जनते ' च्या अंकात '' चालू आठवड्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आजारपणामुळे ' संकीर्ण समालोचन ' हे सदर या अंकात देणे शक्य झाले नाही तरी ते पुढील अंकात देण्यात येईल '' असा संपादकाने खुलासा केला आहे.

यावरून मागील आठवड्याच्या दिनांक ४ जानेवारी १९४१ च्या जनतेच्या अंकात ' संकीर्ण समालोचन ' या सदराखाली जे दोन समालोचन प्रसिद्ध झाले आहेत ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिले आहेत हे स्पष्ट होते.

—संपादक.

९२

*राजकारणांतला नवा सांप्रदाय **

लिबरल लोकांच्या राजकारणाला ते निष्क्रीय आहे या सबबीवर तो एक हसण्याचा विषय होऊन बसला आहे. याबद्दल आम्हाला काही म्हणावयाचे नाही. या निष्क्रियतेमुळेच लिबरल पक्ष अस्थीपंजर उरला आहे. परंतु, निष्क्रिय राजकारणापेक्षां निष्ठाविहीन राजकारण फारच निंद्य आहे याचा कोणी विचार देखील करीत नाहीं. अशाप्रकारचे निष्ठाविहीन राजकारण आज तितके फैलावत चालले आहे हे कोणास सांगावयास नको. एकच माणूस दोन दोन, तीन तीन संस्थांतून प्रवेश करून घेतो व उजळ माथ्यानें त्यांतून वावरतो व दोन्ही तिन्ही ठिकाणी अधिकारपदहि भोगतो. त्या संस्थांच्या ध्येयांत साम्य आहे किंवा विरोध आहे त्याचा विचार सुद्धां त्यांच्या मनाला शिवत नाहीं. खुद्द हिंदु महासभेचे अध्यक्ष यांची अशीच स्थिती आहे असें म्हणतात. ते हिंदुमहासभेचे बहुतेक कायमचेच–अध्यक्ष तर आहेतच. पण ते चित्पावन ब्राह्मण सभेचेही अध्यक्ष आहेत असें समजतें. असाच एक नवा प्रकार ना. बेळवी यांच्या संबंधानें घडलेला उघडकीस आला आहे. एकेकाळीं ते कॉंग्रेसचे भक्त होते. नंतर ते कॉंग्रेस मधून बाहेर पडले. गेल्या वर्षाच्या नोव्हेंबर महिन्यांत ते बेलगाव जिल्हा हिंदु महासभेचे अध्यक्ष झाले व आता नुकतीच कर्नाटकांतील ब्राह्मण सभेची बेलगाव शहरांत एक शाखा उघडण्यात आली, तिचेही अध्यक्षपद स्वीकारण्यास ते पुढें आलें. या विचित्र निष्ठाहीन राजकारणाचा काहीं उलगडा होऊच शकत नाहीं. याचे कारण सवंग लोकप्रियता कां ज्ञाती स्वार्थ याचा खुलासा होणें अत्यंत अवश्य आहे. या बाबतींत राष्ट्रवीरकारांनीं काढलेले विचार मननीय आहेत. ते म्हणतात :––

'' वरील सभेची बेळगांवला शहर-शाखा निर्माण झाली असून, तिचे अध्यक्ष श्रीयुत दत्तोपंत बेळवी हे आहेत. बेळवीचे पाऊण अधिक आयुष्य कॉंग्रेसमध्ये पुढारीपणाचा उपभोग घेण्यात गेलें असून तारीख १४ नोव्हेंबर १९४० रोजीं बेळगांव जिल्हा हिंदु महासभेचेहि त्यांना अध्यक्ष बनविण्यात आलें आहे. असें असता, वरील प्रकार पुढे यावा हें बहुजन समाजाला मोठें कोडेंच झाले असलें पाहिजे. पण बामण शेवटीं जातीवर जाणार. त्याला राष्ट्र नि धर्म याची

---

*पहा. 'ज्याचा त्याचा महारावर कटाक्ष' या लेखा खालील संपादकीय टीप––संपादक.

स्वार्थसिद्धीपलीकडे माया नाही. जें आमच्यांतील कित्येकांचे जाहीर मत आहे. ते या ठळक उदाहरणानें अगदी सोळा आणे खरे ठरले. जातिविशिष्ठ चळवळीला श्री. बेळवींनी नांवें ठेविलीं नसती, तर असे येथे त्यांना पुढें खेचण्याचे आम्हास कांहींच प्रयोजन नव्हते. परंतु यांनीं कॉंग्रेसच्या पवित्र्यावरून जातीय चळवळीला केलेल्या विरोधामुळें बहुजन समाजाचे आतापर्यंत भारीच नुकसान झाले आहे व पुढारलेल्या वर्गाची परस्वापहार वृत्ति भयंकर बळावलेली आहे. तेव्हां आपण जाणते आहों असें बहुजन समाजातील ज्या कोणास वाटते, त्यांनी आत्महितार्थ तरी समाज संघटनेची कास धरणे अपरिहार्य झालेलें नाहीं काय ?

अशा या दाखल्यामुळें हिंदु महासभेचा प्रश्न गंभीर विचाराचा झालेला नाही काय ? कारण कर्नाटक हिंदु महासभेचे अध्यक्ष सर सिद्दाप्पा कांबळी हें असून, बेळगाव जिल्हा हिंदुमहासभेचे उपाध्यक्ष रा. ब. अण्णासाहेब चौगुला हे आहेत. आपला धर्म तशी संस्कृति हिंदूंहून भिन्न आहे व तसा येत्या खानेसुमारींत स्वतंत्र उल्लेख झाला पाहिजे, अशी लिंगायत व जैन समाजाची चळवळ जोरांत चालू आहे आणि म्हणून मुसलमानांप्रमाणे हिंदुमहासभेचें कार्य संघटित धोरणानें चालेल काय, असा आक्षेप निघत असतो. त्यांत श्री. दत्तोपंत बेळवी ब्राह्मणसभाहि स्वतंत्र चालविणार आहेत या अनिष्ट गोष्टीची भरती पडत नाहीं काय ? सार्वजनिक मुखवट्यानें पुढारलेल्या वर्गातले बामण वगैरे समाज हिंदूंतल्या इतर जातींच्या हक्कांची पायमल्ली करून, त्यांच्या प्रगतीच्याहि आड येतात म्हणून बहुजनसमाजातहि जातिविशिष्ट चळवळीस जन्म मिळाला नि त्यामुळेंच हिंदू म्हणून संघटना निर्माण होणें कठीण झालें. अर्थात तें घातक ठरलें व यासाठींच पुनः दृढतर हिंदुसंघटनेची गरज उत्पन्न करण्यांत येते आणि हिंदुंतल्या पुढारलेल्या जातींची धर्मवैशिष्ठ्यास तिलांजली दिल्यांशिवाय इतःपर हिंदुंचा बळकट एकोपा अशक्य आहे, हीहि गोष्ट कोणी अमान्य करीत नाहींत. अशा स्थितींत श्री. दत्तोपंत बेळवी यांचे ब्राह्मण्यप्रेम आणखी दुप्पट उसळावें, हा हिंदुमहासभेच्या पहिल्या घासांतच मक्षिकापात नव्हे काय ? जर आम्ही हिंदुमहासभेचे जूं मानेवर घेणाऱ्या बहुजनसमाजांतल्या भावनाप्रधान लोकांना थोडी सबुरी पत्करा अशी सल्ला दिली तर ती अस्थानी होईल काय ? "[१]

○ ○ ○

[१] : जनता, ४ जानेवारी १९४१.

९३

बरे झाले, महात्मा गेला, माणूस राहिला

'' मी दरेक इंग्लिश माणसास अशी विनंती करतो की त्यांनी हिंसेच्या ऐवजी अहिंसेचा मार्ग स्वीकारावा आणि अहिंसेच्या मार्गानेच जे काही तंटेबखेडे उपस्थित झाले आहेत ते सोडविण्याचा प्रयत्न करावा. आतापर्यंत तुम्हाला हा उपदेश करण्याचे धैर्य मला नव्हते. परमेश्वर कृपेने हे धैर्य आज मला प्राप्त झाले आहे. म्हणून मी तुम्हाला हा उपदेश करीत आहे. ही लढाई बंद करा, असे मी आपणास सांगू इच्छितो. तुम्ही लढाई करण्यास सामर्थ्यवान नाहीत म्हणून हे मी तुम्हाला सांगतो असे नव्हे तर हिंसा ती अत्यंत वाईट गोष्ट आहे म्हणून मी सांगत आहे. कोणतेही कार्य कितीही पवित्र असले तरी त्याच्याकरिता असंख्य लोकांचा संहार करणे रास्त होणार नाही इतकेच नव्हे तर ज्या कार्याच्या पूर्ततेकरिता एवढा संहार करावा लागतो ते कार्य पवित्र आहे किंवा काय याबद्दल मला मोठा संशय वाटतो. तुम्हाला जर्मनांच्याविरूद्ध लढावयाचे आहे, ते मला मान्य आहे. त्यात इंग्रजांना अपयश यावे, अशी माझी मुळीच इच्छा नाही. मला तुम्हाला एवढेच सांगावयाचे आहे की नाझीविरूद्ध लढा पण अहिंसात्मक साधनांनी लढा. तरवारी, बंदुका, दारूगोळा वगैरे हिंसात्मक साधनांचा उपयोग करू नका. माझी अशी इच्छा आहे की तुम्ही इंग्रज लोकांनी हिटलर व मुसोलिनी यांना ' तुम्हाला आमच्यापासून काय पाहिजे असेल ते या आणि घ्या ' असे आमंत्रण पाठवावे. त्यांना येऊ द्या व तुमच्या देशात जे काही त्यांना लागेल व आवडेल ते घेऊ द्या. हिटलर व मुसोलिनी यांना जर तुमची घरेदारे घ्यावयाची असतील तर ती खाली करून तुम्ही त्यांच्या स्वाधीन करा. ते जर तुम्हाला घर सोडून बाहेर जाण्याला परवानगी देत नसतील तर तुम्ही तुमच्या पुरुष, बायका व मुलांचा खून होऊ द्या. पण हिंसात्मक प्रतिकार करू नका, मी जो हा अहिंसेचा उपदेश तुम्हास करीत आहे तो मी अडाणी मनुष्य आहे म्हणून असे तुम्ही समजू नका. अहिंसेच्या साधनाचा मी आज पन्नास वर्षे सारखा अनुभव घेतलेला आहे. माझ्या आयुष्यातील दरेक प्रकारच्या व्यवहारात घरगुती, सार्वजनिक, आर्थिक व राजकीय प्रसंगी मी या मार्गाचा अवलंब केला आहे व मला त्यात कधीही अपयश आलेले नाही. '' (गांधी.)

गेल्या महिन्या दीड महिन्यात गांधीनी अहिंसेच्या बाबतीत अनेक विधाने केलेली दिसून येतात. कर्नल एमरी यांनी गेल्या महिन्यात २३ तारखेस पार्लमेंटमध्ये जे भाषण केले त्या भाषणाला गांधींनी ता. २८ एप्रिल रोजी उत्तर म्हणून एक लांबलचक पत्रक प्रसिद्ध केले होते. त्या पत्रकात गांधीनी कर्नल एमरी यांना उद्देशून खालीलप्रमाणे उद्‌गार काढले आहेत.

गांधी म्हणतात '' मी ब्रिटिश सरकारला एक प्रश्न विचारू इच्छितो. दीडशे वर्षे ब्रिटिशांनी आपले राज्य प्रस्थापित केल्यानंतरदेखील काही मुठभरशा गुंडांच्याविरूद्ध हिंदी लोकांना उभे राहण्याची ताकद का आली नाही ? खरोखरीच हिंदी लोकांपेक्षा ब्रिटिश लोकांना जास्त लाज वाटली पाहिजे की हजारो लोक काहीशा गुंड लोकांच्या भीतीला घाबरून आपले घर सोडून पळून जातात ! राज्यकर्त्यांची पहिली जबाबदारी जर कोणती असेल तर प्रजेला आत्मसंरक्षणाचे शिक्षण देणे हेच होय. परंतु परकीय ब्रिटिश सरकारला हिंदी प्रजेच्या संरक्षणाच्या बाबतीत काही जबाबदारी वाटली नाही, आणि म्हणून प्रजेला हत्यार ठेवण्याची त्यांनी मनाई केली. ''

'' कर्नल एमरी यांनी पार्लमेंटमध्ये हिंदी सैन्याच्या बाबतीत जे शाबासकीचे व अभिनंदनाचे उद्‌गार काढलेले आहेत त्याचा हिंदुस्थानात कोणत्याही प्रकारचा परिणाम होणे शक्य नाही. कारण हिंदुस्थान देशाला युद्ध सामुग्रीच्या दृष्टीने समृद्ध केले असते आणि हिंदी लोकांना लष्करी शिक्षण दिले असते तर युरोपातील कोणतेही राष्ट्र ब्रिटिश साम्राज्याच्या वाटेस जाणे शक्य नव्हते. ''

चालू महिण्याच्या २ तारखेला गांधी यांनी अहमदाबाद येथील जो हिंदू-मुसलमानांचा दंगा झाला त्या दंग्याच्या बाबतीत एक कमिटी स्थापन केली आहे. त्या कमिटीचे अध्यक्ष श्री. भोगीलाल यांना गांधीनी पत्र लिहिले आहे. त्यात हिंसा-अहिंसा या विषयावर गांधीनी आपले मत प्रदर्शित केले आहे. त्यातील खालील वचने ध्यानात ठेवण्याजोगी आहेत.

'' गुंडांच्या भीतीने जीव घेऊन लोकांनी पळावे ही गोष्ट असह्य होय. गुंडांचा प्रतिकार हिंसेने व अहिंसेने करण्याचे सामर्थ्य त्यांच्या अंगी असले पाहिजे. 'ब्रीदचा ' मी करीत असलेला अर्थ जर खरा असेल तर काँग्रेसवाल्यांनी अहिंसेनेच प्रतिकार करावा त्यात ते यशस्वी होतील. परंतु पळून जाणे हा भ्याडपणा असल्याचे आपण लोकांना अगदी स्पष्ट सांगितले पाहिजे. अहिंसेने प्रतिकार करण्यास ते असमर्थ असतील तर त्यांनी हिंसेने प्रतिकार करणे हे त्यांचे कर्तव्य आहे. ''

" स्वतःचे अगर दुसऱ्याचे संरक्षण हिंसेने करावे असे म्हणणारे लोक काँग्रेसमध्ये किती आहेत ते तुम्ही पाहिले पाहिजे. जर काँग्रेसच्या बहुमतवाल्याचे असे मत पडले की गुंडांच्या हल्ल्याविरुद्ध हिंसात्मक प्रतिकार केलाच पाहिजे व तो करणे हे काँग्रेसच्या ध्येयाविरुद्ध नाही तर त्यांनी तसे उघड जाहीर करून त्याप्रमाणे जनतेला मार्गदर्शन करावे. "

" जीवित संरक्षणासाठी गुंडांना भिऊन जनतेने पळ काढावा हा सहन न होणारा प्रकार आहे. त्याचा हिंसात्मक अथवा अहिंसात्मकरीतीने प्रतिकार करण्याची शक्ती असणे जरूर आहे. "

" काँग्रेसने लष्कर अगर पोलिसाची मदत मागू नये. ज्यांचा अहिंसेवर विश्वास आहे, त्यांनी सरकारी मदत मागावी. "

" ज्या ठिकाणी हिंसात्मक शारीरिक शिक्षण देण्यात येते अशा आखाड्याशी काँग्रेसने संबंध ठेऊ नये. "

" दंग्यातील नुकसानीबद्दल काँग्रेस मोबदला मागणार नाही. ते काँग्रेसचे कार्य नाही. स्वसंरक्षणात कमकुवत असल्यामुळे जनतेने नुकसान सोसलेच पाहिजे व त्यांनी ते सहन केले पाहिजे. "

" भय्या, शीख अथवा ठाकूर यांचेकडून संरक्षण घेणे याची मला कल्पनाही करवत नाही. "

" मुसलमानी वस्तीत राहणाऱ्या हिंदूंनी तेथून हलू नये. जीवित धोक्यात घालूनदेखील तेथेच राहावे. "

" हिंदू वस्तीत राहणाऱ्या मुसलमानांना हिंदूंनी पूर्ण संरक्षण द्यावे. "

जी कोणी, गांधीनी इंग्लिश लोकांना १९४० साली लिहिलेले पत्र व १९४१ साली केलेली ही वरील विधाने ताडून पाहील तो काय म्हणेल ? जो गांधी एकेकाळी इंग्रजलोकांना तुमची शस्त्रास्त्रे फेकून द्या, लष्करी वृत्तीचा त्याग करा, असे सांगत होता तोच गांधी हिंदुस्थानातील लोकांना लष्करी शिक्षण का दिले नाही, शस्त्रास्त्रची निर्मिती का केली नाही व हिंदी लोकांना हिंसक लोकांपासून संरक्षण करण्यास का शिकविले नाही, असे दात ओठ चावतो; आणि त्याचा जळफळाट होतो. या माणसाला काही तत्त्व आहे किंवा नाही, त्याची बुद्धी स्थिर आहे किंवा नाही, याबद्दल कोणाच्या मनात संशय उत्पन्न झाल्यास त्याला कोण दोष देईल ? जो गांधी एक वर्षापूर्वी इंग्रज लोकांना उपदेश करीत होता की, तुम्ही सशस्त्र प्रतिकार करू नका, हिटलर व मुसोलिनी यांना आमंत्रण द्या व ते

आले तर घरेदारे खुली करून जे लागेल ते त्यांना नेऊ द्या, तोच गांधी अहमदाबादच्या लोकांना आज स्पष्टपणे सांगतो की तुम्ही आपली घरेदारे सोडून पळून जाऊ नका; पळून जाणे हा भ्याडपणा आहे; अहिंसेने तुम्हाला प्रतिकार करता येत नसेल तर हिंसेने करा. असा हा चंचल वृत्तीचा माणूस लोकांनी मार्गदर्शक कसा मानावा, असा प्रश्न कोणी उपस्थित केला तर त्याला गैर म्हणता येईल काय ? जो गांधी प्रतिकार न करणे, परपीडा सहन करणे आपले तत्त्व आहे म्हणून सांगत बसला होता तोच गांधी प्रतिकार करणे आवश्यक आहे–नव्हे अहिंसेच्या मार्गाने प्रतिकार करता आला नाही तर हिंसात्मक मार्गाने करणे आवश्यक आहे, असे आता सांगतो. तेव्हा त्याला बुद्धिभ्रंश झाला, अशी शंका जरी घेतली तरी ती निरर्थक व विकारवश, असे म्हणता येईल काय ? जो गांधी अहिंसा सर्वांनी पाळावी असा आग्रह धरून बसला होता तोच गांधी अहिंसा फक्त काँग्रेसच्या लोकांनी पाळावी, असे म्हणतो! जो गांधी एकदा म्हणत असे की काँग्रेसच्या लोकांनी अहिंसा पाळलीच पाहिजे तोच गांधी आता म्हणतो की काँग्रेसच्या लोकांनी जर बहुमताने ठरविले की गुंडाशाहीचा हिंसक मार्गाचा अवलंब केल्याखेरीज प्रतिकार होणे शक्य नाही, तर त्यांनी हिंसक मार्गाचा अवलंब करण्यास लोकांना सांगण्यास हरकत नाही ! यावरून गांधीचा अहिंसेच्या तत्त्वावर विश्वासच नव्हता, असा आरोप केल्यास तो अन्यथा होईल काय ? अहिंसेवरील गांधींची परस्पर विरोधी विधाने वाचल्यावर कोणीही माणूस गोंधळून गेल्याशिवाय राहणार नाही. ही वचने म्हणजे जबाबदार माणसाची घोषणा मानावयाची, वेड्याचे बरळणे समजावयाचे, महात्म्याची लहर म्हणावयाची किंवा एखाद्या वाण्याच्या हिशेबी वृत्तीचे रचलेले पुराण म्हणावयाचे याचा काही थांग लागू शकत नाही.

काही असले तरी गांधींची हल्लीची अहिंसेसंबंधीची वृत्ती ही गांधीची दुर्दशा आहे, असे म्हणावयास काहीच हरकत नाही. कारण एकदा एक मत व दुसऱ्यांदा त्याच्या उलट मत देण्याचा प्रसंग येणे यासारखी दुसरी दुर्दशा कोणती असू शकणार ? कधी कधी माणसाला आपले मत बदलावे लागते. कारण मत हे परिस्थितीला धरून असते. परिस्थिती बदलली तर मतही बदलावे लागते. पण मत बदलले तरी माणूस आपले तत्त्व बदलू शकत नाही. मत बदलणाऱ्या माणसाला जरी कोणी लबाड म्हटले नाही तरी तत्त्व बदलणाऱ्या माणसाला हा लबाड आहे, असे म्हटल्याखेरीज कोणी राहणार नाही. गांधीच्या अहिंसेच्या भूमिकेत जो फरक पडला आहे तो फरक मतांतराचा नसून तत्त्वाच्या स्वरुपाचा आहे, याबद्दल शंका नाही. एकदा सांगितलेले तत्त्व माघारे घेण्याचा प्रसंग यावा यासारखी दुसरी दुर्दशा कोणती ? या दुर्दशेची कारणे जाणून घेणे अवश्य आहे.

गांधीची अहिंसा ही मुळातच अहिंसेची विटंबना होती. हिंदुस्थानात पूर्वापार जी अहिंसा प्रतिपादण्यात आली आहे, तिची व्याख्या, तिची मर्यादा आणि तिचा व्याप तुकारामाने आपल्या एका अभंगात पूर्वीच सांगून टाकलेला आहे.

दया तेचि नांव भूतांचे पालन ।
आणिक निर्दळण कंटकांचे ।।

ही जी तुकारामाने केलेली अहिंसेची व्याख्या तीच अहिंसेची खरी व्याख्या आहे 'आणिक निर्दळण कंटकांचे' हा या तुकारामाच्या व्याख्येतील भाग अत्यंत महत्त्वाचा आहे. गांधीनी तो भाग काढून टाकून अहिंसा म्हणजे 'भूताचे पालन' हाच तेवढा भाग घेऊन 'आणिक निर्दळण कंटकांचे' हा भाग गाळून अहिंसेची अतिव्याप्ती केली.

अहिंसेची ही अतिव्याप्ती करण्याच्या मुळाशी गांधींचा स्वार्थ होता. जगद्‌वंद्य होण्याची, जगन्मान्य गांधीला जेवढी हाव आहे तेवढी कोणालाही नसेल. जगप्रसिद्ध होण्याचा सोपा मार्ग म्हणून गांधीने आत्यंतिक अहिंसेची घोषणा केली. याशिवाय आम्हाला दुसरे काही कारण दिसत नाही. आत्यंतिक अहिंसा, शत्रूचा प्रतिकार न करता त्याला प्राणनाश, द्रव्यनाश, लुटालूट, जाळपोळ करू देणे हे विघातक आहे, हे गांधीला कळत नाही, असे म्हणता येणार नाही.

हिंदुस्थानात गेल्या वीस वर्षात हजारो हिंदू-मुसलमानांचे दंगे झालेले आहेत. आणि त्यातल्या त्यात मुंबई इलाख्यामध्ये आणि मुंबई शहरामध्ये हिंदू-मुसलमानांच्या दंग्याची संख्या सर्वापेक्षा अधिक होती, असे म्हणावयास काहीच प्रत्यवाय नाही. हिंदू-मुसलमानांच्या दंग्यांत मुंबई शहरामध्ये हिंदूची प्राणहानी व द्रव्यहानी झाली. तिची दखलगिरी गांधीला पूर्णपणे होती. पण त्यावेळी गांधीने आपली अहिंसा आवरती घेऊन प्रतिकार करा, असा उपदेश करणे गांधीला सुचले नाही, याचे कारण अहिंसेच्या घोर परिणामाकडे पाहण्याला गांधीला काही प्रयोजन वाटले नाही. पण अहमदाबादचे हिंदू हे गांधीला परके नव्हते. आणि अहमदाबाद येथे मुसलमानांनी हिंदुवर केलेला अत्याचार हा काही परकीयावर झालेला अत्याचार नव्हे. अहमदाबादचे हिंदू म्हणजे परकीय नव्हते. गांधी सन्याशी असले तरी गुजराथ आपली मातृभूमी आणि अहमदाबादचे हिंदू म्हणजे आपला पोटचा गोळा; ही भावना त्यांना सुटली नाही. अहिंसेने पोटच्या गोळ्याचा घात झाला !! अहिंसेची चूड, जिने जगाला मार्ग दाखविला होता, तिने आपलेच घर पेटले हे जेव्हा गांधींनी पाहिले, तेव्हा ते शुद्धिवर आले आणि अहिंसेला तिलांजली देण्यास तयार झाले !!

हिंदुस्थानात शंकराचार्य, माधवाचार्य, रामानुजाचार्य असे आचार्य झाले. हिंदुस्थानात तुकाराम, गोरा कुंभार, चोखामेळा वगैरे साधूसंत झाले. पण गांधींच्यापूर्वी कोणी महात्मा झाला नाही, असे पुष्कळ लोक गौरवाने सांगतात. हल्लीच्या पुष्कळ लोकांना आचार्य, साधू-संत हे व्यर्थ जन्माला आले असे वाटते. त्यांनी देशाच्या उन्नतिकरिता काही केले नाही, असा त्यांच्यावर आरोप आहे. हे जरी खरे असले तरी आचार्य साधू-संत या देशात जन्मले याला काही आपत्ती म्हणता येणार नाही; पण या देशात महात्मा उत्पन्न झाला ही मोठीच आपत्ती आहे, असे आम्ही समजतो. त्या दिवशी गांधीला महात्मा पदवी देण्यात आली तो दिवस देशाच्या इतिहासात मोठा दुर्भाग्याचा आणि ज्या पुरुषाला, गांधीला महात्मा ही पदवी देण्याची बुद्धी झाली, त्याला काळपुरुष समजण्यास हरकत नाही असे आमचे स्पष्ट मत आहे. महात्मा सर्व परीने जनतेवर आपत्ती आहे. जनतेला यम पाहिजे, नियम पाहिजे, जनतेला कोणतीही गोष्ट करण्यापूर्वी ती चोरवाळून पाहिल्याखेरीज गत्यंतर नाही. सत्य म्हटले तर पुरावा मागीतला पाहिजे. आज्ञा म्हटली तर परिणामाची छाननी केली पाहिजे. पण महात्म्याला यम नाही, नियम नाही. महात्मा म्हणेल ते सत्य आणि सांगेल ती आज्ञा. तसे आचार्य व साधू-संत यांचे नाही. आचार्य व साधू-संत यांच्याशी खऱ्या खोट्या, बऱ्या वाईटाचा वादविवाद करता येतो. ते यम नियमाच्या, तर्कशास्त्राच्या बंधनापलिकडे नाहीत. एकदा महात्मा मानला, मग त्याला 'हे असे का ?' असे विचारण्याची प्राज्ञाच राहात नाही. कारण महात्मा आणि परमेश्वर यांच्यात भेद नाही. महात्मा म्हणजे परमआत्मा म्हणजे परमेश्वर अशी जगाची समजूत आहे. तसे आचार्य व साधू-संत नाहीत. ते मार्गदर्शक आहेत. मोक्षदाते नाहीत. महात्मा हा नुसता मार्गदर्शक नसून तो मोक्षदाता आहे, अशी सर्वसाधारण लोकांची कल्पना आहे. आचार्यांना, साधूसंताना लोक वंदितात. महात्म्याला लोक अनन्यभावे शरण जातात.

शरणागती म्हणजे एक आपत्तीच आहे. तिच्याइतकी दुसरी मोठी आपत्ती कोणतीच असू शकणार नाही. कारण ती मानसिक गुलामगिरी आहे आणि मानसिक गुलामगिरीत जे लोक सापडले त्यांची प्रगति खुंटली जाते, याची साक्ष साऱ्या जगाचा इतिहास देत आहे.

लोक खुळे असल्याखेरीज महात्मेगिरी चालू शकत नाही, आणि महात्मेगिरीचा पगडा लोकांवर बसला म्हणजे लोक खुळे होतात, गुलाम बनतात. आपत्तीतून सुटका होण्यास महात्मेगिरीचा बिमोड होणे हाच एक उपाय आहे. गांधीची महात्मेगिरी अहिंसेवरच उभारलेली होती व अहिंसेच्या घोषणेमुळे ती टिकून

राहिले होते. आमची खात्री आहे की गांधीने अहमदाबादचा दंगा झाला नसता तर अहिंसेची घोषणा मरेपर्यंत सोडली नसती. आणि अहिंसेचे घोर परिणाम माहीत असतांनाही जगाला तरण्याचा-अहिंसेचा-नवा मार्ग सांगणारा महात्मा म्हणून मरण्याची आपली हौस पुरवून घेतली असती. पण गांधी शुध्द दुर्दैवी ठरला. इतका की गांधीच्या दारात बसलेला परमेश्वरही त्याला सहाय्यक झाला नाही. अहमदाबादच्या दंग्याचा प्रसंग म्हणजे गांधीचे मोठेच दुर्दैव म्हणावयाचे. जितक्या परीने गांधीचे दुर्दैव तितक्याच परीने हे देशाचे सुदैव म्हणणे प्राप्त आहे. अहमदाबादच्या प्रसंगामुळे एक गोष्ट फार नामी झाली. अहिंसा ही गांधीने महात्मेगिरी चालू ठेवण्याकरिता अंगाला लावलेली राखुंडी आहे, हे सिद्ध झाले आहे. स्वतःच्या बडेजावाकरिता अहिंसेची चिता चेतविली आणि स्वकीयाचा बचाव करण्याकरिता आता ती विझविली ! एकंदरीत गांधीची अहिंसा म्हणजे एक मोठे ढोंग होते हे अहमदाबादने सिद्ध केले. देशाचे सुदैव उदयाला आले, असे आम्ही समजतो.

ज्या दिवशी गांधीला अहिंसेचे बाबतीत कच खावी लागेल त्या दिवशी गांधीची महात्मेगिरी नाहीशी व्हावयास लागेल, हे आमचे फार दिवसापूर्वी केलेले भाकीत आहे. या दृष्टीने पाहता अहमदाबादचा दंगा ही इष्टापत्तीच आम्ही समजतो. कारण अहमदाबादला हिंदू-मुसलमानाचा दंगा झाला नसता आणि तेथील हिंदूंची अहिंसेमुळे धुळधाण झाली नसती तर गांधी अहिंसेचे ढोंग आपल्या बडेजावाकरता तसेच उराशी धरून बसला असता.

अहमदाबादच्या दंग्याने बरे झाले राख उडाली, कोळसा राहिला, महात्मा गेला, माणूस राहिला, असे आशेचे उद्गार काढण्याला जागा झाली. म्हणून अहमदाबादच्या हिंदूंचे तसेच मुसलमानांचे आम्ही अभिनंदन इच्छितो.

●●●

अग्रलेख : जनता, ता. ११ मे १९४१.

उद्धृत, गांजरे, खंड ४, पृ. १८६-१९२.

१४
बुद्धजयंती आणि तिचे राजकीय महत्त्व

हिंदुस्थानातील लोक उत्सवप्रिय आहेत हे काही कोणास सांगावयास नको. वर्षांतून अर्धे अधिक त्यांचे दिवस उत्सवात आणि सणात जातात. त्यातल्या त्यात देशातील महान व्यक्तींच्या जन्म-मरणाच्या उत्सवांना तर ते फारच महत्त्व देतात. कृष्णजन्माष्टी, रामनवमी, हनुमानजयंति हे उत्सव त्यांच्या या मनोभावनेची साक्ष देतात. असे असताना हिंदुस्थानातील हिंदू लोक बुद्धाची जयंती साजरी करीत नाहीत याचे कोणाही परकीय माणसास आश्चर्य वाटल्यावाचून राहात नाही. ज्या विभूती हिंदुस्थानात निर्माण झाल्या त्यांत बुद्धाचे स्थान फार उच्च प्रतीचे आहे. जगाला प्रकाशित करणारा तेजस्वी सूर्य अशी महती गाणारे बुद्धाचे काही भक्तगण आहेत. ख्रिस्ती लोक, ज्यांना बुद्धाबद्दल हेवा वाटतो, ते देखील एशिया खंड प्रकाशित करणारा सूर्य अशी त्यास उपमा देतात. हिंदू लोकही त्याला विष्णूचा अवतार मानीत असत. अशा या विख्यात पुरुषाची या देशातील लोकांना आठवण देखील राहिली नाही. बाजीरावाने ठेवलेली रांड मस्तानी हिचे नांव ज्यांना माहित आहे, असे सामान्य लोक आज पुष्कळ सापडतील. पण बुद्धाच्या नावाचा परिचय असलेले सामान्य लोक यांच्यापेक्षा फारच कमी सापडतील अशी मला शंका वाटते. एवढ्या मोठ्या विभूतीची एवढी मोठी विस्मृती व्हावी, ही मोठी सखेदाश्चर्याची गोष्ट आहे. अशा परिस्थितीत आनंदाची ही गोष्ट की, बंगाल व इतर प्रांतांत बुद्धजयंतीचा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. हा उपक्रम अत्यंत स्तुत्य आहे. पण आमच्या मते या उत्सवाला फारच मोठे राजकीय महत्त्व आहे. ते पटवून देण्याकरिता गौतमबुद्धाचे चरित्र व त्याचे कार्य याचा जनतेला परिचय करून देण्याचे आज आम्ही योजिले आहे.

अडीच हजार वर्षांपूर्वी शुद्धोधन नावाच्या साक्य वंशातील एक राजा कपिलवस्तु येथे राज्य करीत होता. शुद्धोधन राजाच्या कुळाचे नाव गौतम असे होते. कपिलवस्तु हे ठिकाण आजच्या हिंदुस्थानातील संयुक्त प्रांत म्हणतात त्या प्रांतांत होते. ते वस्ती व अयोध्या यांच्या मधोमध असून फैजाबादपासून पूर्वेकडे ५० मैलावर होते. शुद्धोधन राजाच्या दोन पत्नी होत्या. एकीचे नाव मायादेवी व

दुसरीचे नाव प्रजापति असे होते. शुद्धोधन व मायादेवी यांचे लग्न झाल्यावर काही दिवसानी मायादेवी गरोदर राहिली. गरोदर राहिल्यानंतर पहिले बाळंतपण माहेरघरी व्हावे, अशी पूर्वापार चाल असल्या कारणाने मायादेवीचा बाप सुबुद्ध याने मुलीस बाळंतपणास आपल्या गादी पाठवावी म्हणून त्यांचा जावाई शुद्धोधन यास निरोप पाठविला. त्याप्रमाणे मायादेवी व तिची बहीण प्रजापति या उभयता लवाजम्यानिशी आपल्या माहेरी जावयास निघाल्या. वाटेत त्यांना लुंबीणी वन लागले. व त्या ठिकाणी मायादेवी हीस प्रसूतिवेदना सुरू झाल्या व त्या वनात ती बाळंत होऊन पुत्ररत्न प्रसवली. प्रसूत झाल्या बरोबर मायादेवी मरण पावली. व त्या मुलाचे संगोपन तिची बहिण प्रजापति हिने केले. त्याचे नाव सिद्धार्थ असे ठेवण्यात आले. हाच पुढे गौतमबुद्ध म्हणून प्रसिद्धीस आला.

क्षत्रिय कुळात व राजघराण्यात जन्माला आल्यामुळे त्याच्या परिस्थितीला साजेल असे शिक्षण सिद्धार्थाला देण्यात आले होते. क्षत्रियाचे लष्करी शिक्षणच देण्यात आले होते असे नव्हे तर त्याचा वेदाभ्यासही चांगलाच झाला होता. परंतु सिद्धार्थाचा एकंदरीत मनाचा कल एकांताकडे होता. राजवैभव उपभोगण्याकडे त्याचा विशेष कल नव्हता. आपला पुत्र कदाचित संन्यास घेऊन भलत्याच मार्गाला लागेल या भीतीने शुद्धोधनाने आपल्या मुलाचे लग्न करून त्यास संसारात डांबून टाकण्याचा निश्चय केला. व त्याप्रमाणे दंडपाणी याची मुलगी, जिचे माहेरचे नाव गोपी व सासरचे नाव यशोधरा, हिच्याबरोबर लग्न लावून दिले. व या लग्नापासून सिद्धार्थ गौतमास राहूल या नावाचा एक मुलगा झाला. शुद्धोधनाने आपल्या मुलाला ऐषआरामात राहाता यावे म्हणून तीन मोठमोठे राजवाडे बांधून दिलेले होते. त्याच्या ऐषआरामात कोणत्याही प्रकारची न्यूनता राहू नये, अशा प्रकारची व्यवस्था केली होती.

एके दिवशी गौतमाने गावातून हिंडून येण्याचा व एकंदरीत सामाजिक परिस्थिती पाहून येण्याचे ठरविले व त्याप्रमाणे रथ जुंपून तो राजवाड्यातून बाहेर पडला. शहरात शिरल्यानंतर चार गोष्टी त्याच्या नजरेस पडल्या. प्रथम एक अत्यंत वृद्ध, जराग्रस्त, गलितगात्र, दंतभग्न, चेहऱ्यादर सुरकत्या पडलेल्या, केस सगळे पांढरे झालेले, पाठीची कमान झालेली, हातात काठी धरून मुंगीच्या मंदगतीने तोंडातून काहीतरी अस्पष्ट बोलत व सर्व शरीर कंपायमान होत असलेला त्याच्या नजरेस पडला. पुढे गेल्यावर त्याला दुसरे दृश्य दिसले. एक माणूस भयंकर तापाने ग्रस्त झालेला, अत्यंत अशक्त व बेशुद्ध, निराश्रीत असा वाटेवरती पडलेला दिसला. आणखी पुढे गेल्यावर एका माणसाचे प्रेत तिरडीवर घालून

त्याचे नातेवाईक व त्याचे मित्रगण वाहून नेत होते. त्याच्यापुढे एक संन्यासी प्रफुल्ल मनाने व शांत चित्ताने हातात भिक्षापात्र घेऊन चालला होता हे चौथे दृश्य पाहिले. ही चार दृश्ये पाहून गौतमाच्या मनावरती मोठाच परिणाम झाला. या चार दृश्यांवरून त्याने बोध घेतला (तो हा) की जगात दुःख आहे. मनुष्य जीवीत हे अशाश्वत आहे. असे जर नसते तर उपजलेला मनुष्य रोगग्रस्त न होता ! वृद्ध न होता !! आणि मरण न पावता !!! एकंदरीत चौथे दृश्य म्हणजे संन्यासवृत्ती हेच खरे ध्येय होय असे त्यास वाटले. आणि म्हणून ज्या जगात दुःख आहे, जरा आहे, आणि मरण आहे अशा संसारात काहीच अर्थ नाही, असे त्यास वाटू लागले. अशा विचारांच्या जाळ्यात सापडून तो परत घरी आला. परत येताच त्याची पत्नी यशोधरा प्रसूत होऊन तिला एक मुलगा झाल्याचे वृत्त त्याला कळविण्यात आले. ही एक जादा बेडी आपल्या पायांत पडली, असे त्यास वाटले. तथापि संन्यास घेण्याचा त्याचा निश्चय कायम झाला होता. व त्याप्रमाणे त्याने आपला निश्चय त्याचा बाप शुद्धोधन यास जाऊन कळविला. अर्थात गौतमाने असे काही करू नये म्हणून राजवाड्यामध्ये नाना तऱ्हेचे करमणुकीचे, मनरंजनाचे प्रयोग करून या निश्चयापासून गौतमास परावृत करण्याचा प्रयत्न केला. परंतु गौतमाचा निश्चय (पक्का) झालेला होता. तथापि राजाला कळविल्याखेरीज पळून जाणे योग्य नाही, म्हणून आपला मनोदय अमलांत आणण्याचा आपण निर्धार केला आहे, हे सांगण्याकरिता तो राजवाड्यांत गेला आणि बापास म्हणाला की, "मला तुम्ही अडथळा करू नका. तुमचे राज्य, तुमचे प्रजाजन, तुमची संपत्ति तुम्ही घ्या. मला काही नको." दुसऱ्या दिवशी शुद्धोधनाने आपल्या सरदारांची बैठक बसविली व त्यात गौतमाने केलेल्या निश्चयाची बातमी त्यांस दिली. हे कळल्याबरोबर सरदार म्हणाले, "आम्ही त्याच्यावरती पहारा ठेवू. तो आपल्या हातांतून कसा जाईल ? हे आम्ही पाहू." अर्थात अशा कडेकोट बंदोबस्तात निघून जाणेच शक्य नव्हते म्हणून त्याने तो दिवस तसाच जाऊ दिला. मध्य रात्री तो जागा झाला व त्याचा घोडेवाला चंडक यास झोपेतून उठवले व त्यास, "मला जावयाचे आहे, माझ्या घोड्यास घेऊन ये" असे सांगितले. चंडक, त्यास प्रथमतः कबूल होईना व गौतमास जाऊ नको म्हणून गळ घालू लागला. परंतु गौतमाचा निश्चय अढळ आहे असे दिसल्यावर त्याचा घोडा कंथक यास तो घेऊन आला. गौतमाने त्याची बायको व मूल ज्या खोलीत झोपली होती त्याचे दार हळूच उघडून त्यांच्यावर शेवटची नजर टाकून कंथकावर स्वार होऊन त्या रात्री तो कपिलवस्तु सोडून गेला.

गृहत्याग केल्यानंतर गौतमाने दोघा गुरूंचे शिष्यत्व पत्करून जगात दुःख का ? या प्रश्नाचे उत्तर मिळते का हे पाहण्याचा प्रयत्न केला. पहिल्या प्रथम आराद कलाम व त्यानंतर उद्रक रामपुत्र यांचे शिष्यत्व त्याने पत्करले. अशा परी सात वर्षे त्यांच्या सान्निध्यात त्याने घालविली. परंतु त्यांच्या उपदेशांपासून त्याचे समाधान झाले नाही. म्हणून त्यांना सोडून तो मगध देशात उरूवेल (ज्याला हल्ली बुद्धगया असे म्हणतात) त्या ठिकाणी येऊन राहिला. त्या ठिकाणी त्याच्यासारखेच संसाराला सोडून आलेले पांच संन्यासी अरण्यवास पत्करून बसले होते. त्यांच्याबरोबर गौतमाने देहदंडन व खडतर तपश्चर्या करण्यास सुरवात केली. सहा वर्षांच्या देहदंडनाने त्याचे शरीर अत्यंत कृश झाले व त्याला चालण्याची शक्तीदेखील राहिली नाही. एके दिवशी जवळून वाहत असलेल्या फाल्गू नदीतून स्नान करून परत आपल्या आश्रमात येत असताना तो वाटेत घेरी येऊन पडला. जवळच एक धनगर रहात होता. त्याची वडील मुलगी सुजाता हिने गौतमास त्या स्थितीत पाहिले व त्याला घरून दूधभात आणून दिला. शुद्धीवर आल्यानंतर त्याला वाटू लागले की, देहदंडनापासून, जगात दुःख कां याचे ज्ञात होणे शक्य नाही. गौतमाने अन्न सेवन केले यामुळे तो योगभ्रष्ट झाला अशी कल्पना करून घेऊन त्याचे पांच सोबती त्यास सोडून गेले व त्या बुद्धगयेत बुद्ध एकटा राहिला.

एके रात्री एका वृक्षाच्याखाली गौतम बसला असताना या जगात दुःख का व ते दुःख नाहिसे करण्याचा मार्ग कोणता. या प्रश्नाचा त्याला उलगडा झाला. त्याला दिसले की, मानवी जीवनक्रमाचे दोन प्रचलित मार्गाने लोक चालले आहेत. एक चैन करून कालक्रमणा करणे हा, दुसरा देहदंडन करून मरण्याचीं अपेक्षा करीत राहणे हा. हे दोन्ही मार्ग चुकीचे आहेत, या दोन्ही मार्गांनी संसारातील मानवाचे दुःख हरण होणे शक्य नाही, अशी दिव्य दृष्टी त्या रात्री त्या वृक्षाखाली बसला असताना गौतमाला झाली. या दिव्य दृष्टीने गौतम ज्ञानी झाला म्हणून लोक त्याला बुद्ध (ज्ञानी) म्हणू लागले आणि ज्या वृक्षाखाली त्याला ज्ञान झाले त्या वृक्षाला बोधीवृक्ष असे जगप्रसिद्ध नाव प्राप्त झाले.

या नवीन दिव्य दृष्टीचा असा परिणाम झाला की, बुद्धाने देहदंडन सोडून दिले. तो संसारात पुन्हा पडला नाही. पण तो पुन्हा समाजात आला व समाजाच्या उद्धारार्थ त्याने धर्मसंस्थापनेचे कार्य आरंभिले. सर्व हिंदुस्थान पायाखाली घालून आबालवृद्धास, स्त्रीपुरूषांस आपला धर्म त्याने स्वमुखाने सांगितला. हे कार्य त्याने तब्बल चाळीस वर्षे केले. अखेर धर्मप्रचाराकरिता

फिरत असताना बुद्ध पावा येथे मुक्कामास राहिला. त्या गावी चुडा नावाचा एक लोहार रहात असे. त्याने बुद्धास आपल्या घरी जेवण्याकरिता येण्याचा आग्रह केला. चूडा यांच्या घरचे ते अन्न त्याला जाचले व तो आजारी झाला. तशाच आजारीस्थितीत बुद्ध नेपाळच्या पूर्व भागी असलेल्या कुशीनारा गांवी गेला व त्या ठिकाणी त्याचा अंत झाला.

बुद्ध येशू ख्रिस्ताच्या पूर्वी ५६३ व्या वर्षी राजपुत्र म्हणून जन्मास आला व ख्रि. पू. ४८३ व्या वर्षी धर्मसंस्थापक म्हणून मरण पावला.

बुद्धाचे कार्य

बुद्धाच्या धर्माची मूल तत्त्वे काय ? त्याने कोणते कार्य साधले याचे आकलन झाल्याखेरीज बुद्धाचे महत्त्व कळून येणार नाही. या प्रश्नांचा सविस्तर खुलासा स्थळ संकोचामुळे या ठिकाणी करता येणे शक्य नाही; परंतु थोडक्यात बुद्धाच्या कार्याची कल्पना करून देता येणार नाही, असे मात्र म्हणता येणार नाही. बुद्धकालीन ब्राह्मणी धर्माचे तीन आधारस्तंभ होते. वेदप्रामाण्य हा पहिला आधारस्तंभ, यज्ञ बलिदान हा दुसरा आणि वर्णाश्रम हा तिसरा. वेदांत असेल ते सारे खरे, सत्य बुद्धीला पटो अगर न पटो. वेदांत असेल ते सारे खरे, हा जो ब्राह्मणी धर्माला आधारस्तंभ वाटत असे, त्याला बुद्ध मनुष्याच्या ज्ञान मार्गातला पहिला धोंडा असे मानीत होते. वेदांत असेल ते खरे, या ब्राह्मणी धर्माच्या तत्त्वाच्याविरूद्ध ज्ञानाला पटेल तेच खरे असे, बुद्धाचे तत्त्व होते. ब्राह्मणी धर्मात परमेश्वरप्राप्ती हाच धर्माचा हेतू असे मानले जात असे. परमेश्वराला बलिदान दिल्याखेरीज त्याची प्राप्ती होऊ शकत नाही, म्हणून यज्ञ करणे व त्यात बळी देणे हाच खरा धर्म मानला जात असें. अगदी पूर्वी ब्राह्मणी धर्मात मुनष्याचा बळी यज्ञात देत असत व त्या नरबळीचे मांस यजमानास खावे लागत असे. नरबळीची चाल जरी बुद्धाच्याकाळी बंद पडली होती तरी यज्ञांत पशूचा बळी देण्याची चाल जारी होती. त्याकाळचे वाङमय ज्यांनी वाचले असेल त्यांना आजच्या ब्राह्मणांचे पूर्वज असंख्य गाईंचा यज्ञाकरिता कसा संहार करीत असत हे माहीत असेलच. हे वाङमय वाचून जेवढ्या गाई ब्राह्मणांनी यज्ञात कापल्या असतील त्याच्या शतांशाने मुसलमानांनी कापल्या असतील काय, याबद्दल संशय उत्पन्न होतो. जसा वेदप्रामाण्यावर बुद्धाने हल्ला चढविला, तसा त्याने यज्ञावरती हल्ला चढविला. बुद्धाची या बाबतीतील भूमिका अत्यंत क्रांतीकारक होती, असेच म्हटले पाहिजे. धर्माचा आणि परमेश्वर प्राप्तीचा कांही संबंध नाही, असा बुद्धाचा पक्ष होता. मनुष्याने मनुष्याशी कसे वागावे ह्याचे योग्य प्रकारचे

बंधन घालून देणे हे धर्माचे क्षेत्र आहे. ही बुद्धाची भूमिका होती. परमेश्वर प्राप्ती हे धर्माचे क्षेत्र आहे, ही भूमिका बुद्धाला कबूल नव्हती. एका बाजूने परमेश्वर प्राप्तीसाठी यज्ञ करावयाचा, आणि दुसऱ्या बाजूने आपल्या शेजाऱ्याला छळावयाचे, त्याला उपद्रव होईल असे वर्तन करावयाचे, ही धर्माची विटंबना आहे असे बुद्धाचे म्हणणे होते. ब्राह्मणी धर्माचा तिसरा आधारस्तंभ जो वर्णाश्रम धर्म त्याच्यावर तर बुद्धाने फारच मोठा मारा केला. ब्राह्मणी धर्माची सारी मख्खी या वर्णाश्रम धर्माच्या कल्पनेत सामावलेली आहे. जातीभेदाच्या जन्मजात उच्चनीच कल्पनांचा फैलाव होण्यास वर्णाश्रम धर्मच कारणीभूत ठरला आहे. या ब्राह्मणी धर्मात स्त्रिया व शुद्रांना मानाचे स्थान नाही, उपजीविकेचे मार्ग मोकळे नाहीत, कशावर स्वामित्व नाही, म्हणून या दोन वर्गांना स्वातंत्र्य नाही. ही त्यांची जिवंतपणीची अवदशा. ही अवदशा मेल्यानंतरही त्यांच्या पाठी आहेच ! ब्राह्मणी धर्मात स्त्रियांना व शूद्रांना मेल्यावर मोक्ष नाही. कारण ब्राह्मणी धर्माच्या तत्त्वाप्रमाणे ज्याला संन्यास घेता येतो त्यालाच मोक्ष प्राप्त होऊ शकतो. आणि शूद्रांना व स्त्रियांना संन्यास देण्याची ब्राह्मणी धर्माने मनाई केलेली होती. बुद्धाला उच्चनीच भाव मान्य नव्हता. 'ब्राह्मण झाला भ्रष्ट तरी तो तिन्ही लोकी श्रेष्ठ,' हे अघोरी तत्व मुळापासून खणून काढण्याचा बुद्धाने निकराचा प्रयत्न केला. सामाजिक समतेचा बुद्धाइतका मोठा पुरस्कर्ता जगात दुसरा झाला नाही असे म्हटले तरी त्यात अतिशयोक्ती झाली, असे कोणालाही म्हणता यावयाचे नाही. ब्राह्मणी धर्मात स्त्रियांना मोक्ष नव्हता. पण बुद्धाने स्त्रियांना भिक्षुकिणी केल्या. ब्राह्मण धर्मात शूद्रांना मोक्ष नव्हता. बुद्धाने शूद्रांना भिक्षु केले. यावरून बुद्ध समतेच्या तत्त्वाचा नुसता पुरस्कार करून स्वस्थ बसला असे नाही, समता अमलांत आणण्याचा त्याने प्रयत्न केला. नुसत्या स्त्रियांना व शूद्रांना भिक्षू केले इतकेच नव्हे तर अंत्यजांनासुद्धां भिक्षूच्या उच्च पदावर चढविले.

वरील विवरण अगदी त्रोटक असले तरी बुद्धाने या देशात किती महत्त्वाची कामगिरी केली याची कल्पना वाचकांस येऊ शकेल असे आम्हांस वाटते. बौद्ध धर्माची तत्त्वे जितकी ओजस्वी व कल्याणकारी होती तितकाच बौद्ध धर्माचा प्रसार अचाड प्रमाणात झाला. दक्षिणेकडे सिलोन व पॅसिफिक महासागरांतील असंख्य लहानसहान बेटांतून बुद्धाच्या धर्माने आपले अधिष्ठान बसविले आहे. पश्चिमेस ब्रह्मदेश, आसाम, सयाम, चीन, जपान येथवर बुद्ध धर्माचा प्रसार झाला. उत्तरेस तिबेट, नेपाळ, तुर्कस्तान येथवर त्याने मजल मारली. इतकेच नव्हे तर अफगाण लोकांना बौद्ध धर्मीय केले. इतका प्रसार कोणत्याही धर्माचा झाला नाही. बुद्धाच्या धर्माचा आणखी एक विशेष सांगण्यासारखा आहे. सर्वच धर्म आपल्या गुणांच्या

आश्रयाने प्रसार पावलेले नाहीत. मुसलमानी धर्म तलवारीच्या जोरावर वाढला. ख्रिस्ती धर्म कायद्याच्या जोरावर वाढला. फक्त एकट्या बुद्धाच्या धर्माचा प्रसार गुणांमुळे झाला. त्याला तलवारीच्या धारेची अगर कायद्याच्या दंडनाची जरूरी लागली नाही. लोकांना धरून आणून बुद्धाच्या धर्माची दीक्षा देण्याचे कारण पडले नाही. लोकांनी आपण होऊन त्यात उडी घेतली.

असे असताना बुद्धाच्या नावाची विस्मृति लोकांना कशी झाली असा प्रश्न उपस्थित होतो. हिंदुस्थानाबाहेर बौद्ध धर्म अजून जिवंत आहे. त्याची संख्या काही कमी नाही. हिंदुस्थानातून त्याचे उच्चाटन झाले. त्याची कारणे आज येथे स्थलसंकोचामुळे देता येत नाहीत. परंतु त्याचे थोडक्यात दिग्दर्शन करणे अवश्य आहे. बुद्धाच्या नावाची विस्मृति कालाला शक्य नाही. बुद्ध अजरामर, अमर आणि अकाल आहे. त्याच्या नावाचा लोप काल कसा करू शकेल ? बुद्धाची विस्मृति चीनमध्ये झाली नाही, जपानमध्ये झाली नाही, ब्रह्मदेशात झाली नाही. फक्त हिंदुस्थानातच झाली. याला काल कारण नसून बुद्धाचे शत्रू कारणीभूत आहे हे उघड आहे. ब्राह्मण हे एकजात बुद्धाचे शत्रू. ब्राह्मणांचे भांडण काही बुद्धांशीच होते असे नाही. त्यांचे जैन धर्माचा संस्थापक महावीर यांच्याशीही भांडण होते. बुद्धाप्रमाणे महावीर हाही यज्ञाच्या विरूद्ध होता. पण ब्राह्मणांनी जसा बुद्धांवर निष्ठूरपणाचा व निकराचा हल्ला केला तसा महावीरावर केला नाही. याचे कारण बुद्ध जसा चातुर्वर्ण्याच्या विरूद्ध होता तसा महावीर नव्हता. बुद्धाच्या वेदनिंदेबद्दल ब्राह्मणांना जरी विषाद वाटत असे तरी त्यांना त्याची विशेष चीड नसे. वेदाचे प्रामाण्य गेले तरी त्यात ब्राह्मणांचे मोठेसे नुकसान नाही. तसेच काहीसे यज्ञसंबंधाने त्यांना वाटे. यज्ञ राहिला तरी ठीक, गेला तर त्यात काही मोठी आपत्ती ओढवणार नाही, असे त्यांना वाटे. पण चातुर्वर्ण्यासंबंधी मात्र त्यांची मनोदिशा निराळ्या प्रकारची होती. चातुर्वर्ण्य गेले तर ब्राह्मण गेले, हे त्यांनी ओळखले होते. अर्थात चातुर्वर्ण्याला ते आपला प्राण समजत. बुद्धाची चातुर्वर्ण्य विध्वंसनाची मोहीम म्हणजे ब्राह्मणांना ' मुले कुठारः ' असे वाटणे साहजिक आहे. ती त्या काळची ब्राह्मण-ब्राह्मणेतर चळवळ होती असे म्हणावयास काहीच हरकत नाही व त्या चळवळीचा अधिष्ठाता जो बुद्ध, त्याला ते मांग अथवा कालपुरुष लेखीत असत. त्यांचा नायनाट करण्यासाठी त्यांनी होते नव्हते तितके सर्व उपाय केले. आपले वैदिक देव ब्रह्मा, विष्णु, महेश यांना बाजूस सारून क्षत्रिय राजांना देव करून बुद्धाची चळवळ त्यांनी मारली. क्षत्रिय रामाला, ब्राह्मण आज जसे जेध्यांना भजतात तसे भजू लागले. एकट्या रामाला हाताशी धरून कार्य होत

नाही असे दिसताच दुसऱ्या एका क्षत्रिय राजाला-कृष्णाला पुढे करून ब्राह्मणांनी त्याला देव बनविला. ब्राह्मण आपल्याच राजाना भजू लागले, आता ब्राह्मणांच्या विरुद्ध मोहीम चालू ठेवण्यास कारण नाही अशी वृत्ति ब्राह्मणेतरांत उत्पन्न करून, बुद्धाने आरंभिलेल्या ब्राह्मणेतर चळवळीची धार ब्राह्मणांनी काढून टाकली व तिला बोथट केली. बुद्ध तुमचा खरा, पण आम्ही देखील त्याला आमच्या विष्णुचा दहावा अवतार मानतो, असे ब्राह्मण म्हणू लागले. जनता खूष झाली. आमच्या बुद्धाला ब्राह्मणांनी दहावा अवतार मानला. झाले ! आता ब्राह्मणांशी भांडावयाचे कारण काय ? एकीकडून ब्राह्मणेतर जनतेशी सामदाम केला. दुसरीकडून बुद्धाचे अनुकरण करून आणि ब्राह्मण धर्म व बुद्ध धर्म एकच अशी लोकांची दिशाभूल करण्यास ब्राह्मणांनी सुरवात केली. बुद्धाने विहारे बांधली. विहारे ही बुद्ध धर्माची लोकांच्या दृष्टीने जागती ज्योत खूण. बुद्धाच्या विहारांच्या शेजारीच ब्राह्मणांनी आपली विहारे बांधण्यास सुरवात केली. या बाह्यत्कारी साम्यांमुळे लोकांच्या मनातून बौद्ध धर्म व ब्राह्मणी धर्म या दोहोमधील फरक दिसेनासा होऊन धर्माच्या बाबतीत पृथकपणा जाऊन सबगोलंकार झाला. शेवटी मुसलमानांच्या स्वाऱ्यांनी बुद्ध विहारांचा विध्वंस केल्यानंतर जेव्हा बुद्ध भिक्षू देश सोडून गेले तेव्हा त्यांच्या गैरहजेरीत ब्राह्मणांनी बुद्धाच्या नावाचा समूळ लोप करण्याच्या उद्देशाने बुद्ध विहारांना पांडव लेणी म्हणू लागले व बुद्धाच्या मूर्ति फोडून त्या ठिकाणी शिवलिंगाची स्थापना करू लागले.

ब्राह्मणांनी बुद्धाचे नाव या देशातून धुवून काढण्याचा प्रयत्न करावा हे समजण्यासारखे आहे. तो त्यांचा बोलूनचालून शत्रूच होता. त्याची जयंती करावी असा विचार त्यांना कसा रुचेल ? परंतु ज्या ब्राह्मणेतरांच्या हिताकरिता त्यांना अंधश्रद्धेच्या तावडीतून सोडविण्याकरिता, जंतर मंतरच्या खोट्या धर्माच्या कचाट्यातून मोकळे करून खऱ्या मानवी धर्माच्या मार्गावर आणण्याकरिता, त्यांची माणुसकी प्रस्थापित करण्याकरिता, त्यांचा स्वाभिमानदीप प्रज्वलित ठेवण्याकरिता जो झटला, ज्याने ब्राह्मणेतर जनतेच्या हिताकरिता राज्यवैभवाचा त्याग केला, ज्याने आपल्या कीर्तीने देशाचा लौकिक वाढविला अशा महापुरुषाला ब्राह्मणेतरांनी समूळ विसरून जावे, ही मोठी दुर्दैवाची गोष्ट आहे. त्यांनी तरी बुद्धाची स्मृति जिवंत ठेवणे अवश्य होते.

बुद्ध जयंती साजरी करा असे हिंदुमात्रास सांगावयास आम्हाला हे एकच कारण आहे असे कोणी समजू नये. आमचे मुख्य कारण यापेक्षा भिन्न असून सबळ आहे असे आम्हास वाटते. हिंदूंतील सुशिक्षित लोकांना राजकारणात हिंदु संस्कृतीच्या पायावर व हिंदूकरता लोकशाही प्रस्थापित करण्याची इच्छा उत्पन्न झाली आहे व त्या प्रीत्यर्थ त्यांचे सारे प्रयत्न चालू आहेत. असल्या हिंदु लोकांच्या बुद्धीची आम्हांस कीवच येते. या देशात

लोकशाही प्रस्थापित करू असे म्हणणारे लोक एक तर मूर्ख तरी असले पाहिजेत किंवा लबाड तरी असले पाहिजेत. परंतु ही लबाडी व हा मूर्खपणा फार दिवस चालणार नाही. अनुभवाची गाठ पडल्यानंतर असे दिसून येईल की, ब्राह्मणी धर्म आणि लोकशाही ह्या परस्परविरोधी, एकमेकांस विरोधी गोष्टी आहेत. लोकशाही हवी असेल तर चातुर्वर्ण्य नाहीसे झाले पाहिजे. हे चातुर्वर्ण्याचे जंतु काढून टाकण्याकरिता बुद्धाच्या तत्त्वज्ञाना-सारखे मारक रसायन नाही; असे आम्हांस वाटते. म्हणून आम्ही म्हणतो की, राजकारणाची रक्तशुद्धी करण्याकरिता बुद्धजयंती सर्व हिंदूंनी साजरी करणे हितावह व आवश्यक आहे.

हिंदुस्थान देश आज राजकीय दृष्ट्या रोगी माणसासारखा आहे. हिंदुस्थानची आठवण झाली म्हणजे पोट वाढलेले, हातापायांच्या काट्याकुट्या झालेल्या, चेहरा फिकट झालेला, डोळे आत गेलेले, हाडांचा सांगाडा झालेल्या पुरुषाचे चित्र नजरेसमोर उभे रहाते. याला लोकशाहीचा गाडा चालविण्याची ताकद नाही, पण लोकशाहीचा गाडा घेऊन चालविण्याची मोठी हौस. हौस पुरवायची तर त्याला ताकद आवश्यक आहे. ती औषध घेतल्याशिवाय प्राप्त होणे शक्य नाही, पण औषध घेऊन काय उपयोग ? सर्वांना माहित आहे की, कोणतेही औषध घेण्यापूर्वी कोठा साफ करावा लागतो. त्यातील मळ काढावा लागतो. त्याशिवाय औषधाचा गुण येत नाही. आमच्या हिंदुमात्राचा कोठा शुद्ध नाही. त्यात ब्राह्मणी धर्माचा कैक दिवसांचा मळ घर करून बसला आहे. जो वैदु हा मळ धुवून काढील तोच या देशाला लोकशाहीच्या प्रस्थापनेला मदत करू शकेल. तो वैद्य म्हणजे गौतम बुद्ध हाच एक आहे. हिंदूंची रक्तशुद्धी रामाची जयंति करून होणार नाही, कृष्णाची जयंति करून होणार नाही किंवा गांधीची जयंति करून होणार नाही. राम, कृष्ण, गांधी हे ब्राह्मणी धर्माचे उपासक आहेत. लोकशाहीच्या प्राणप्रतिष्ठेला त्यांचा काही उपयोग नाही. उपयोग झाला तर एका बुद्धाचाच होऊ शकेल त्याची आठवण घेणे आणि त्याचीच मात्रा घेणे हाच एक हिंदुमात्राच्या राजकीय व सामाजिक रक्तशुद्धीचा उपाय आहे, असे आम्हास निःसंशय वाटते, म्हणजे

बुद्धम् सरणम् गच्छामि ।
धम्मंम् सरणम् गच्छामि ।।
संघम् सरणम् गच्छामि ।।।

हा महामंत्र त्यांनी जपावा असे आमचे सांगणे आहे. ''

● ● ●

जनता, ता. १७ मे १९४१.

९५

दंगा झाला ! दंगा झाला ! काय उपाय नाही त्याला !

मुंबई शहरामध्ये गेल्या एप्रिल महिन्याच्या सुरवातीपासून हिंदू मुसलमानाच्या दंग्याला सुरवात झाली. याच्यापूर्वी अहमदाबाद शहरात हिंदू मुसलमानाचा दंगा झाला. अहमदाबादचा दंगा चालू असताच कानपूर येथे हिंदू मुसलमानाचा दंगा झाला व लागोलाग बिहारमध्येही हिंदू मुसलमानांचे दंगे झाले आहेत. हे दंगे होण्यापूर्वी बंगाल प्रांतामधील डाक्का शहरी हिंदू मुसलमानाच्या दंग्यास सुरवात होऊन त्याचा वणवा बराच पेटला होता. हिंदू मुसलमानांचा दंगा हा एक नेहमीचाच ठराविक प्रकारचा विधि होऊन बसला आहे. ज्याप्रमाणे लोक यात्रेला जमा होतात, त्याचप्रमाणे दंग्याला लोक उपस्थित होतात. असा हा प्रकार होऊन बसला आहे. फरक इतकाच की यात्रा कधी येणार याचा काळ वेळ ठरविलेला असतो. पण दंगा कधी होईल हे मात्र कोणी सांगू शकत नाही. परंतु दंगा झाला तर त्यात कोणाला नवल विषेश काही वाटत नाही. एकमेकाने एकमेकावर जरब बसवावयाची, मारावयाचे आणि मरावयाचे ही हिंदू मुसलमानांच्या संयुक्त जीवन क्रमाची तऱ्हा होऊन बसली आहे. म्हणून या विषयासंबंधाने लिहिणे अवश्य आहे. मुंबईतील चालू असलेला दंगा हा पूर्वीच्या दंग्यापेक्षा काहीसा निराळ्या प्रकारचा आहे, असे आम्हास पूर्वीपासूनच वाटत होते. या दंग्यात पूर्वीच्या दंग्यापेक्षा मोठी काहीतरी नासाडी झाली आहे किंवा प्राणहानी झाली आहे, असे म्हणता येणार नाही. हा दंगा सुरू झाल्यापासून आतापर्यंत ४२ लोक जिवानिशी मारले गेले. २२२ लोक जखमी झाले. १८५० मवाली लोकांना डांबून ठेवण्यात आले आहे. पूर्वीच्या दंग्याच्या तारतम्याने हा दंगा छोटा म्हणावयास पाहिजे. परंतु या दंग्याला महत्त्व प्राप्त झाले आहे. त्याचे कारण हे की ह्या दंग्याला काहीच कारण नाही. यापूर्वी जे दंगे होत असत, त्या दंग्यात उभयपक्षात तेढ उत्पन्न होण्याकरिता काहीतरी तत्कालिक कारण घडून आल्याचे सांगता येत असे. कधी दंगा मशिदीवरून हिंदू वाद्य वाजवीत गेल्यामुळे झालेला आहे, कधी मुसलमानांनी इदीच्या दिवशी गाय कापली, यामुळे दंगा झालेला आहे. या दंग्याला असे काही निमित्त घडले आहे असे कोणीच सांगू शकत नाही. यातच या दंग्याचे वैशिष्ट्य आहे.

हा दंगा राजकीय आहे, असे आम्हास पूर्वीपासूनच वाटत होते. आणि मद्रास येथे मुस्लिम लीगचे भरलेले अधिवेशन संपल्याबरोबर ही दंग्याची साथ सर्वत्र झाली, एवढ्यावरती आम्ही आपला तर्क बांधलेला होता. परंतु आता तर्क करण्याची आवश्यकता उरलेली नाही. उभय पक्षांनी या बाबतीत कबुलीजबाब दिलेला आहे. दंग्याच्या बाबतीत हिंदू महासभेचे पुढारी बॅ. सावरकर यांनी जे पत्रक काढले होते त्यात त्यांनी असे स्पष्ट म्हटले होते की हा दंगा, दंगा नसून मुसलमानांचे हिंदूविरूद्ध एक बंड आहे. मुसलमानांचे पुढारी बॅ. जिना यांनीही एक पत्रक काढून असा खुलासा केला आहे की मुंबईतील दंगा हा धार्मिक स्वरुपाचा नसून राजकीय स्वरुपाचा आहे. हिंदूपासून राजकीय सत्ता हस्तगत करून घेण्याचा या दंग्याचा मुख्य उद्देश आहे. आतापर्यंत मुंबईचे सरकारी अधिकारी हा दंगा गुंड लोकांनी केला आहे, असे मानून आपली उपाययोजना करीत होते. त्यांनाही आपली दिशाभूल झाल्याचे पटले असावे, असे दिसते. कारण आजच्या टाईम्स ऑफ इंडियाच्या लिखाणावरून तरी दंग्याचे उत्पादक गुंड लोक नसून दंग्याच्या मुळाशी व्यूह रचणारे पाताळयंत्री लोक आहेत, हे मान्य करणे भाग झाले आहे. अशा दंग्याला उपाय काय ? हा प्रश्न जो तो विचारील, यात काही आश्चर्य नाही. हा दंगा बंद व्हावा अशी पुढाऱ्यांची तरी इच्छा दिसत नाही. मि. जिना यांनी हा राजकीय दंगा आहे एवढेच काय ते व्यक्तव्य केले, परंतु आपल्या मुसलमान बंधूना व अनुयायाना तुम्ही दंगा करू नका, असे सांगितले नाही. बॅ. सावरकर, तुम्ही मुसलमानांना दंगा थांबविण्यास सांगा मग आम्ही हिंदुलोकास दंगा थांबविण्यास सांगू, असा वाद, बाबू राजेन्द्रप्रसाद यांच्याशी घालीत बसले आहेत. गांधीनी तर विचित्र प्रकारच केला आहे. त्यांनी जे पत्रक काढले त्या पत्रकामुळे दंगा थांबविण्याऐवजी तो बराचसा चिघळला, असे म्हणावयास काहीच हरकत नाही. अहमदाबादच्या हिंदूवरती झालेल्या अहिंसेच्या घोर परिणामाने विव्हल झालेल्या गांधींना दंगा संपल्यानंतर हिंसाहिंसेसंबंधाने आपले नवे व सुधारलेले विचार काढता आले असते. दंगा चालू असतांना ते काढल्यामुळे मोठा नाश झाला, असे म्हणावयास काहीच हरकत नाही. कारण गांधीचे पत्रक हिंदूलोकांना मुसलमान गुंडाच्या विरूद्ध तुम्ही हिंसा करा आणि आपला बचाव करा, असे प्रोत्साहन देण्यापालिकडे दुसरे काहीच नव्हते, असे म्हणावयास काहीच हरकत नाही. ' गुंड अंगावर आला तर पळून जाऊ नका ' एवढेच जरी गांधीनी सांगितले असले तरी त्यात पळून जाऊ नका आणि मारा, अशी गर्भित नव्हे, उघड सूचना आहे, असा समज सर्वांचा झाला आहे. निदान मुसलमानांचा तरी तसा समज झाला आहे, यात वाद नाही. आणि गांधीचे पत्रक निघाल्यानंतर थांबलेला दंगा पुन्हा सुरू झाला, हा त्याचा पुरावा आहे. पुढाऱ्यांना दंगा थांबविण्याची

इच्छा दिसत नाही. तसेच दंगा थांबविण्याकरिता ज्या समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत त्यांच्या हातून दंगा थांबविला जाईल, असे वाटत नाही. या समित्यांपैकी जिला PEACE कमिटी म्हणून म्हटले जाते त्या समितीने दंग्याला कोणी सुरवात केली हा प्रश्न प्रामुख्याने उपस्थित केलेला दिसतो. दंग्याची जबाबदारी कमिटीचे मुसलमान सभासद हिंदूवरती लादू इच्छितात आणि हिंदू सभासद त्याची जबाबदारी मुसलमानांवरती लादू इच्छितात. दंग्याची मूळ जबाबदारी कोणावरती हे तपासून पाहिल्याशिवाय दंगा थांबविता येणे शक्य नाही, अशा विचाराने समितीचे सभासद भारले गेले असल्याकारणाने या समितीच्या हातून दंगा शमविण्याच्या बाबतीत यश होईल अशी आशा करण्याला फारच थोडी जागा आहे. या PEACE कमिटीशिवाय दंग्यात सापडलेल्या लोकांना मदत करण्यात एक रिलीफ कमिटी हिंदूनी प्रस्थापित केलेली असून दंग्यात सापडलेल्या हिंदू लोकांना मदत करण्याकरिता ती स्थापलेली आहे. दुसरी मुसलमान लोकांना मदत करण्याकरिता स्थापलेली आहे. या कमिट्या दंगा शमविण्याच्या दृष्टीने निरुपयोगी आहेत. इतकेच नव्हे तर त्यामुळे दंगा जास्त दिवस चालू राहण्याचा संभव आहे, असे वाटते. दोन राष्ट्रांमध्ये लढाई सुरू झाली असतांना ती टिकविणे व तिच्यात यश मिळविणे ही गोष्ट सर्वस्वी Supply डिपार्टमेंट याच्यावरती अवलंबून असते. म्हणून लढाईमध्ये लढाईतील हरेक पक्ष आपल्या सैनिकाच्या पाठी एक मोठे Supply डिपार्टमेंट प्रस्थापित करीत असतो. या रिलीफ कमिट्या आमच्या दृष्टीने Supply डिपार्टमेन्टस् आहेत. हिंदूंनी मुसलमानांच्या मदतीकरिता व मुसलमानांनी हिंदूंच्या मदतीकरिता आता रिलीफ कमिट्या प्रस्थापित केल्या असत्या तर त्यांच्या हातून दंगा शमविण्याचे कार्य पुष्कळ अंशी यशस्वी झाले असते, असे आम्हास वाटते. परंतु त्याचे हल्लीचे स्वरुप व त्यांचे ज्ञातिवाचक ध्येय ध्यानात घेतले तर त्यांचा दंगा टिकवून ठेवण्यासच जास्त उपयोग होईल असे म्हणावयास हरकत दिसत नाही. या दृष्टीने पहाता हे ग्रहण सुटणार कसे ? हा एक मोठाच बिकट प्रश्न होऊन बसला आहे. दंगा राजकीय आहे या बाबतीत सर्वांचेच एकमत झालेले आहे. अर्थात हिंदू मुसलमानांचा राजकीय प्रश्न सुटल्याखेरीज हे ग्रहण सुटणे शक्य दिसत नाही. ''दें दान सुटे गिराण' अशी मुसलमान लोकांची वृत्ती झाल्याचे दिसून येते.' काही तरी दान दिल्याखेरीज हे ग्रहण सुटेल असे दिसत नाही. तसल्या प्रकारचे दान दिले असता हा राहू संतुष्ट होईल याच्याबद्दल विशेष कोणाला काही शंका उरली आहे, असे म्हणता यावयाचे नाही. पाकिस्तान द्या किंवा सर्व ठिकाणी अर्धा भाग द्या, अशी मुसलमानांची मागणी आहे, हे आता सर्वांना माहीत आहे. प्रश्न एवढाच आहे की कोणते दान द्यावयास हिंदूलोक

तयार होतील ? आतापर्यंतच्या हिंदूलोकांच्या धोरणावरून असे स्पष्ट दिसते की, या दोहोतून एकही गोष्ट मान्य करण्यास हिंदू लोकांची तयारी नाही. पाकिस्तान मान्य करण्यास हिंदूलोकांची तयारी नाही. पाकिस्तान मान्य करावयाचे नाही, असे त्यांनी ठरविल्याचे दिसते. आणि कम्युनल अवॉर्डपेक्षा सुईच्या अग्रावर जेवढी माती राहते तितकीदेखील जास्त सवलत मुसलमानांना द्यावयाची नाही, हा तर त्यांचा कृतनिश्चय आहे. या दृष्टीने पाहिले असतांना हिंदुस्थानचे भविष्य निराशामय आहे, हे कोणी सांगू शकेल. दान न देता ग्रहण सोडविण्याचे दोन मार्ग हिंदू लोकांनी ठरविल्याचे हिंदू लोकांच्या अनुमानाने दिसते. त्यात काँग्रेस व हिंदू महासभा यांचे मार्ग अगदी भिन्न दिसतात. इंग्रज सरकारला आपल्या चळवळीच्या जोरावर जेरीस आणून त्यांच्या हातून मुसलमानांना शह द्यावयाचा, ही काँग्रेसची लढाईची नीति असावी, असे दिसून येते. हिंदू महासभेचा मार्ग निराळा दिसतो. मुसलमानाशी चौथी पानपत करून त्यांना जाग्यावर बसवावयाचे, हे हिंदू महासभेचे धोरण दिसते. या दोहोंपैकी एकाच्याही मार्गाने यश येईल, असे आम्हास वाटत नाही. बेडकी फुगली तरी ती बैलाएवढी होत नाही. काँग्रेसची चळवळ कितीही फोफावली व कितीही जोरकस झाली तरी इंग्रज सरकारला ती नमवू शकेल इतकी तेजस्वी व बलवान होईल, असे फक्त काँग्रेसचे लोकच म्हणू शकतील. काँग्रेसची राजकीय शक्ती किती मोठी आहे, याची कल्पना करून घेण्याकरिता फार दूर जावयास नको. नुकतेच घडलेले आयर्लंडचे उदाहरण याला पुरेसे आहे. आयर्लंडच्याच उत्तर विभागात सरकारने सक्तीने लष्कर-भरतीचे धोरण अमलात आणण्याचा आपला निश्चय जाहीर केला होता. आयर्लंडच्या उत्तर विभागाचा व दक्षिण विभागाचा आज काही संबंध नाही. राजकीय दृष्ट्या हे विभाग अगदी तुटक आहेत. मि. डी. व्हॅलेरा यांची आयर्लंडच्या उत्तर विभागावर कसल्याहीप्रकारची सत्ता नाही. असे असतांना मि. व्हॅलेरा यांनी ब्रिटिश सरकारच्या सक्तीच्या लष्कर-भरतीच्या धोरणाचा एकदाच एकच भाषण करून निषेध केला. त्याचा परिणाम असा झाला की ब्रिटिश सरकारला आपले सक्तीचे लष्कर-भरतीचे धोरण मागे घ्यावे लागले. काँग्रेस लढाई सुरू झाल्यापासून आज दोन वर्षे सतत आपली राजकीय घोषणा इंग्रज सरकारपुढे मांडीत आहे. परंतु त्याकडे ब्रिटिश सरकारने डोळासुद्धा उघडून पाहिला नाही. यादृष्टीने पाहिले असता ' कहा डि. व्हॅलेरा, कहा गांधी; कहा राजा, कहा पोतराज; कहा राजभोज, कहा गंगा तेली, असे म्हणण्याची पाळी येते. याबद्दल आम्हास खेद वाटतो. परंतु इंग्रजांना जरब लावून मुसलमान लोकांनी केलेल्या पाकिस्थानच्या उठावणीला शह देण्याइतकी शक्ती काँग्रेसच्या चळवळीतूनच निपजेल असे मानणे अत्यंत धाडसाचे होईल, असे म्हणावयास

आम्हास तरी हरकत दिसत नाही. हिंदू महासभेच्या धोरणाकडे पाहता तिचाही मार्ग यशस्वी होईल, असे आम्हास दिसत नाही. हिंदू महासभा म्हणजे एक खोका आणि त्यावर बॅ. सावरकर यांचे नाव याच्यापेक्षा हिंदू महासभेत विशेष काही शक्ती आहे, असे दिसत नाही. हिंदू महासभेचे जे वातावरण आज पसरलेले दिसते ते कायम टिकेल असे म्हणता यावयाचे नाही. हिंदू महासभेचे वातावरण हे एक आकाशातील ढगाप्रमाणे आहे. हे ढग दोन ठिकाणी येऊ शकतात. ज्याठिकाणी हिंदू-मुसलमानांची तेढ आहे त्याठिकाणी महासभेचे ढग दिसतात. ज्याठिकाणी ब्राह्मणी धर्माचा जोर अजून गेलेला नाही त्याठिकाणी हे ढग आलेले दिसतात. मद्रास प्रांतात हिंदू महासभेचे ढग केवळ ब्राह्मणी धर्माच्या वाफा आहेत. बंगालमध्ये हिंदू महासभेचा जोर हिंदू-मुसलमानांच्या दंग्यामुळे आहे. अन्य ठिकाणी हिंदू महासभेचे रोप जीव धरू शकत नाही. हे सर्व अन्य प्रांतातील स्थानिक परिस्थिती जो चोखाळून पाहील त्यास दिसून येईल.

वरील कारणामुळे हिंदू महासभेचे रोप जीव धरून त्याचा मोठा वृक्ष होईल, त्या वृक्षाखाली बसून सर्व हिंदूना आपला कॅम्प करून मुसलमानावरती हल्ला करून त्याचा पराभव करता येईल, ही आशा विफल ठरल्याशिवाय राहणार नाही. दंगा हे एक राजकीय ग्रहण आहे. दान दिल्याशिवाय ते सुटत नाही. दान देण्यास हिंदू तयार नाहीत. आणि दान मागणाऱ्या मांगाना ते जरब लावू शकत नाही. अशा या पेचप्रसंगात हा देश सापडला आहे. याबद्दल आम्हाला फार खेद होतो. हा दंगा थांबविणे मानवाच्या हातात आहे, असे तूर्त तरी दिसत नाही. बंद झाला तर वरुणाच्या कृपेने होईल असे वाटते. म्हणून--

येरे येरे पावसा।

तुला देईन पैसा॥

अशी प्रार्थना मुलांनीच नव्हे, तर सर्व अबालवृद्धांनी करावी, अशी आमची त्यांना सूचना आहे.

●●●

अग्रलेख : जनता, ता. ७ जून १९४१.

उदधृत, गांजरे, खंड ५ पृ. ३२–३६.

९६

एका मातंग गृहस्थाच्या पत्रास उत्तर

" श्री. देवीदासराव नामदेवराव कांबळे (निजामस्ट्रेट) या मातंग समाजसेवक विद्यार्थ्याने बाबासाहेबांना पत्र पाठवून अनेक प्रश्न उपस्थित केले होते. त्यातील प्रमुख प्रश्न हा होता की, बाबासाहेब हे फक्त महार लोकांसाठीच सामाजिक कार्य करीत असतात व ते फक्त महार लोकांनाच जवळ करीत असतात. त्यांनी हे धोरण सोडून द्यावे आणि अस्पृश्य समाजातील सर्व जमातीसाठी कार्ये करावीत व त्यांच्यातील समाजसेवकांना जवळ करावे. या पत्रांतील मुद्यांना बाबासाहेबांनी उत्तरे दिली. त्या उत्तरात त्यांच्या अर्धवट दुःखित भावनांचे आणि अर्धवट संतापजनक उद्वेगाचे प्रतिबिंब पहावयास मिळतेच पण त्यांचा महारेतर जातीतील समाजसेवकांकडे पहाण्याचा दृष्टीकोन कसा व तसा का होता याचेही चित्र पहावयास मिळते. एरवी भावनांच्या आहारी न जाणारे बाबासाहेब त्यांच्या भावनांना उचंबळून वर आणणारे अनपेक्षित प्रसंग उद्‌भवले आणि विशेषतः ते प्रसंग एखाद्याच्या आगाऊपणामुळे उद्‌भवले तर ते आपल्या भावना मोकाट, स्वैर शब्दात व्यक्त न करता वक्रोक्ति, व्याजोक्ति, उपहास वगैरे साहित्यिक अलंकारांच्या द्वारे सुंदर पण जोरदार शब्दांत व्यक्त करीत असत, याचा त्यांचे हे उत्तर एक उत्कृष्ट नमुना आहे. श्री. कांबळे यांचे हे पत्र १४-६-१९४१ च्या जनतेत (पा–५) छापलेले होते व बाबासाहेबांचे उत्तर अग्रलेख म्हणून त्याच अंकात छापले होते." डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उत्तर आणि ते पत्र खालीलप्रमाणे :

" रा. रा. देवीदासराव नामदेवराव कांबळे यांस अनेक . . . .,

आपणास काय मायना लिहावा याबद्दल मी बुचकळ्यात पडलो आहे. नमस्कार म्हणावा तर आपण दोघेही ब्राह्मण नाही, जोहार म्हणावा तर आपण मांग, फूरमान म्हणावे तर मी महार, आशीर्वाद म्हणावा तर मांगाला आशीर्वाद देणारा महार श्रेष्ठ कोण असा अपवाद यायचा, म्हणून काहीच न लिहिता चांगदेवासारखी कोरी जागा ठेवून, आपल्या पत्राचे उत्तर देत आहे. महार समाज व महार पुढारी मातंग जातीवर अन्याय करीत आहेत त्याबद्दल आपले मनातील " खुडखुडी " (मला वाटते, खुमखुमी या मराठी शब्दाचा हा निजामशाही अपभ्रंश असावा) काढून टाकण्याकरिता व एकदाचा " सोक्षमोक्ष" करून घेण्याकरिता पत्र लिहिण्याचे योजिले. यात आपण कांहीच वावगे केले नाही. आपण मला ' परमपूज्य '

या शब्दसमुच्चयाने संबोधिले आहे, त्याबद्दल मी आपला फारच ऋणी आहे. महार लोक नेहमीच ' परमपूज्य ' हे विशेषण लावून मला संबोधितात. पण त्यात विशेष असे काही नाही. महारांनी महाराची स्तुति केली, याला काय किंमत ? आपण मांग आणि मी महार असूनही आपण मला ' परमपूज्य बाबासाहेब ' म्हणालात यातले प्रेम आणि त्याचे स्वारस्य काही और आहे, इतके की, ते सांगता नये.

माझ्या पत्राचे उत्तर न दिल्यामुळे मी गांधींचा तिरस्कार करतो, हा आपला गैरसमज कोणी करून दिला, ते मला समजत नाही. गांधीचा मी तिरस्कार करीत असलो, तरी त्याची कारणे दुसरी आहेत. माझ्या पत्राला त्यांनी उत्तर दिले नाही हे नव्हे. मला आपल्याप्रमाणे अनेक लोक पत्र लिहितात. पण त्यांना कधी उत्तर देण्याचा क्रम मी ठेवलेला नाही. याबद्दल पुष्कळ लोकांस वाईट वाटते, पण ते त्यामुळे माझा तिरस्कार करीत नाहीत. त्यांना ठाऊक आहे की, मी रात्रंदिवस कामात असतो. मला छानशौक, ऐषआराम माहीत नाहीत, नाटक, सिनेमात मी वेळ घालवीत नाही. माझा धंदा, वाचन किंवा सार्वजनिक कार्य या व्यवसायात मी सतत गुंतलो आहे. मला गांधीसारखे सेक्रेटरी नाहीत. माझे काम मलाच करावे लागते. हे जाणूनच पत्र लिहिणारे माझे मित्र, माझे सहकारी मला क्षमा करतात; माझा तिरस्कार करीत नाहीत. ' उत्तर न दिल्यास मी तुमचा तिरस्कार करीन ' असे आपण जे म्हटले आहे, ते मनुष्य स्वभावास धरूनच आहे. आपली योग्यता काय आहे, हे मला माहित नाही. ' मी निजाम इलाख्यामधील मराठवाडा विभागातील मातंग समाजातील शिकलेला, सर्वात पहिला विद्यार्थी आहे, ' असे आपले वर्णन आपण केले आहे. तिरस्कार करण्याची पाळी यावी हे वाईटच पण आपण केवळ विद्यार्थीच असता तर आपल्या तिरस्काराची फारशी मातब्बरी वाटली नसती. पण आपण बजावले आहे की, ' मातंग समाजाच्या सुधारणेची सर्वस्वी जबाबदारी माझ्या शिरावर आहे. ' मी आपणास सामान्य विद्यार्थी या नात्याने पत्र पाठवीत नसून निजाम स्टेटच्या मातंग समाजाचा भावी पुढारी म्हणून पत्र पाठवीत आहे. म्हणून आपण उत्तर देण्यास अनमान करू नये. ज्यू लोकांमध्ये जसा मोझेस तसे मातंग समाजात आपण आहात. हे आपल्या भाषेवरून उघड आहे. आपल्या पत्राला कोण उत्तर देणार नाही ! आपल्या मनात माझ्याविषयी तिरस्कार उत्पन्न झाला, तर सर्व मातंग समाज माझा तिरस्कार करू लागेल. तो टाळला नाही तर तो माझ्या अनर्थाला कारणीभूत होणारा नाही, असे कोण म्हणेल ? मला तरी म्हणता येणार नाही, तो टाळण्याकरिता माझा शिरस्ता मोडून मी आपल्या पत्राचे उत्तर देत आहे.

पहिल्या प्रथम दोन गोष्टीबद्दल आपले आभार मानल्याशिवाय माझ्याने राहवत नाही. महार लोक मला ईश्वरी अवतार मानून माझ्या फोटोचे पूजन करतात आणि माझ्याशिवाय दुसरा कोणी होणारच नाही असा समज करून घेतात, यावर आपण जो कटाक्ष ठेवला आहे तो स्तुत्य आहे. या अंधश्रद्धेचे व भोळेपणाचे अनुकरण मातंग समाजास करू न देण्याचा आपण जो निर्धार केला आहे, तो आपण कृतीत आणावा, अशी माझी आपणास आग्रहाची सूचना आहे. **विभूतिपूजा ही मानवाला कमीपणा आणणारी गोष्ट आहे. मी समतेचा मोठा भोक्ता, नव्हे पुरस्कर्ता आहे.** मी देव नाही, महात्मा नाही, असे सांगून थकलो. पण त्याचा त्यांच्यावर काहीच परिणाम झालेला दिसत नाही. आपण मांग लोकांना माझ्या फोटोची पूजा करू देणार नाही, हे तर चांगलेच आहे. मांग लोकांची अवस, पुनव, ग्रहण मानण्यापेक्षा माझ्या फोटोचे पूजन करणे वाईट आहे, याबद्दल मला काही संदेह नाही. आपण आपली दृष्टी संकुचित केली आहे. याबद्दल मला वाईट वाटते. आपण महार लोकांतूनही हे माझ्या पोटोपूजनाचे खूळ नाहीसे करण्याचे व्रत पत्करले पाहिजे, असे आपल्याला सांगणे मला आवश्यक वाटते. हा आपला मोठाच पराक्रम होईल यात काही शंका नाही. कदाचित एवढा पराक्रम केल्यावर, मातंग समाज आपल्या फोटोची पूजा करू लागेल अशी आपल्याला भीती वाटत असेल, तरी भीती बाळगू नये. आपल्या फोटोची पूजा करण्याची प्रथा माझ्या फोटोची पूजा करण्याच्या प्रथेइतकी कधीच वाईट दुष्परिणामी होणार नाही.

दुसऱ्या एका अभिवचनासाठीही मी आपला आभारी आहे. मी मेल्यावर कसे होईल, अशी चिंता मी अनेक वेळा प्रसिद्ध केली आहे, हे खरे आहे. महारापैकी एकाही तरुणाला मला सांगावयाला हिंमत झाली नाही की, '' काही हरकत नाही, तुम्ही मरा, आम्ही चालवू. '' आपले अभिवचन वाचून आमचे समाधान झाले. द्रोणाने कौरव पांडवांना धनुर्विद्या शिकविल्यानंतर '' मला गुरुदक्षिणा कोण देईल ? '' असा प्रश्न केला. त्याला कोणीच उत्तर देईना. गुरु काय मागतो, कोण जाणे ? प्राण मागतो की काय अशा भयाने सगळेच गप्प बसले. एकट्या अर्जुनाला धैर्य झाले. तो म्हणाला, '' मागा काय मागावयाचे आहे ते, मी देतो. '' द्रोणाच्या ठायी मी व अर्जुनाच्या ठायी आपण आहात असे वाटून माझ्या मागून कोणीतरी आहे, या विश्वासाने मला शांति वाटते. द्रोणाने पण केला होता की, राजा द्रुपदाला शिष्याहाती धरून आणीन म्हणून तसे ब्राह्मण्य नष्ट करणे हा माझा पण आहे. तो माझ्या आयुष्यात माझ्या हातून पुरा होणे शक्य नाही. आपण तो पूरा करण्यास सिद्ध आहात, हे माझे मी मोठे भाग्य समजतो व त्याबद्दल मी आपले आभार मानतो. ही गोष्ट जर आपल्याला करता

आली तर मांग जातीला इतिहासात मोठे स्थान प्राप्त होईल. नमनाला फारच तेल गेले ! आता आपण केलेल्या आरोपांना उत्तर देण्याचा मी प्रयत्न करीत आहे. आपले आरोप दोन प्रकारचे आहेत. काही माझ्यावर व्यक्तिगत लागू असणारे असे आहेत. बाकीचे महार समाजाला लागू असे आहेत.

माझ्यावरचा प्रत्यक्ष आरोप काय आहे, हे मला अजूनही समजले नाही. मी फक्त महारांचाच पुढारी आहे, असा मध्यप्रांतातील मांग लोकांनी ठराव रुपाने केलेला माझ्यावरचा आरोप मी वृत्तपत्रांतून वाचला आहे. त्यांतील विधानासंबंधाने मी ता. ४ जानेवारी १९४१ च्या जनतेत लिहिले आहे ते आपण अवश्य वाचून पहावे. मी महारांचाच पुढारी ही काँग्रेसची ओरड, त्याचीच री मांगांनी ओढली. असे किती पोटार्थी मांग-महार आहेत की, जे पैशासाठी वाटेल ते करतील. ' पुणे करार ' झाला, त्यावेळी काँग्रेस मला ' सर्व हिंदुस्थानातील अस्पृश्यांचा पुढारी ' म्हणून मान्य करीत असे. त्यानंतर मी नुसता मुंबई इलाख्यातील अस्पृश्य लोकांचा पुढारी आहे, असे म्हणू लागली. त्यानंतर नुसत्या महारांचा पुढारी आहे, असे म्हणू लागली. माझी खात्री आहे की, काही दिवसांनी मी कोकणस्थ महारांचाच पुढारी आहे व त्यानंतर मी दापोली तालुक्यातील महारांचा पुढारी, असा प्रचार काँग्रेस करील व त्याला महारांतूनच माणसे सापडतील असे म्हणावयास हरकत नाही. कोणीही काँग्रेसला विरोध करून पहावा, म्हणजे मी म्हणतो त्याची सत्यता कळेल. चांभारांतील एखादा पुढारी काँग्रेसला विरोध करायला निघू द्या, म्हणजे हाच मासला दिसून येईल. तो दाभोळ्या जातीचा असला, तर तो चांभार जातीचा पुढारी नसून दाभोळ्या जातीचा पुढारी आहे, असे ते म्हणतील. हरळ्या जातीचा असला तर हरळ्यांचा पुढारी म्हणतील; आणि चेवल्यांच्या जातीचा असला तर चेवल्यांचा पुढारी म्हणतील. मांगामध्ये काही १२ पोटजाती आहेत, असे मला समजते. मांगामध्ये काँग्रेसला विरोध करणारा कोणी पुढारी निघाला तरी त्याची देखील तीच गत होणार. तो ज्या जातीचा, त्या जातीचा पुढारी, असा गिल्ला झाल्याशिवाय रहाणार नाही. ही वस्तुस्थिति मला माहीत असल्यामुळे महारांचा पुढारी म्हटल्याने मला काही नवल वाटत नाही. शिवाय बाकीच्यांनी माझे पुढारीपण सोडले आणि नुसते महारांनी मानले, तर त्यात काही खेद करण्यासारखे आहे, असे मला वाटत नाही, कोठे तरी कार्य करण्यास संधी असल्यास पुरे. महारांची दुर्दशा काही कमी नाही. नुकत्याच महाराष्ट्र प्रांतिक हरिजन सेवक संघाने प्रसिद्ध केलेल्या रिपोर्टात " सर्वात महारांची स्थिति अत्यंत हलाखीची आहे ", असे कबूल केले आहे. त्यांची दुःस्थिति नाहीशी करण्याची मला संधी राहिली तरी

पुरे आहे, असे मानून काम करण्याची माझी तयारी आहे. ' नामके वास्ते आणि कामके वास्ते ' असे दोन प्रकारचे पुढारी आहेत. मी नामके वास्ते असलेल्या पुढाऱ्यातला नाही. मला काम पाहिजे.

मी पुढारी आहे, मी समाज सेवक नाही. पुढारी या नात्याने चालना देणे, लोकमत तयार करणे, एवढेच माझे काम आहे, त्यात मी जातीभेदाला जागा दिली, असे कोणीही–माझा शत्रूदेखील म्हणणार नाही. मी अस्पृश्य जातीतील सर्वांघरी जेवलो आहे. अस्पृश्यांत सहभोजन व्हावे, सहविवाह व्हावा याचा पुरस्कार मी केला आहे. आणि सहविवाह जरी जारी झाला नसला, तरी चांभार लोक सहभोजनाला तयार नाहीत, पण महारमांगात, महारभंग्यांत सरसहा सहभोजन सुरू आहे. हा माझ्या शिकवणुकीचा परिणाम आहे, असे मी निर्भयपणे म्हणू शकतो. माझ्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभांतून महारांपुरते ठराव कधीच पास झालेले नाहीत, मी महार जातीचे भांडण भांडलो नाही, आणि या भांडणांतून जो लाभ झाला त्यांतला मोठा भाग महारेतर जातींनी घेतला हेही सिद्ध करून देता येईल. मी जी बोर्डिंगे काढली त्यांत जातीभेद कधीच ठेवला नाही, इतर महारांनी जी काढली त्यांत त्यांनीही जातीभेद ठेवलेला माझ्या कानावर आलेला नाही.

स्वतंत्र मजूर पक्ष हा महारांचा पक्ष आहे, असे म्हणण्यात येते. परंतु ते खोटे आहे. स्वतंत्र मजूर पक्षात महार-महारेतर असा भेद नाही. स्वतंत्र मजूर पक्ष जात पहात नाही, गुण पाहतो. गुणाला उतरला तर त्याला त्याच्या लायकीची जागा स्वतंत्र मजूर पक्षात मिळू शकते. राजकारण हे काही पंक्तीभोजन नव्हे. मांग कोणी नाही म्हणून मांग घ्या, भंगी कोणी नाही म्हणून भंगी घ्या, असा नियम स्वतंत्र मजूर पक्ष मानीत नाही. कोणताही राजकीय पक्ष मानू शकणार नाही. नुसत्या शिक्षणाला राजकारणात काही महत्त्व नाही. "मी ग्रॅज्युएट आहे, मला कौन्सिलात घ्या", हा नियम स्वतंत्र मजूर पक्षाला कबूल नाही, कोणाही राजकीय पक्षाला तो नियम मान्य होऊ शकणार नाही. राजकारणात शिक्षण पाहिजे पण शिक्षणापैकी शीलाची जास्त जरूरी आहे. स्वतंत्र मजूर पक्ष जात, शिक्षण, शील या तिन्ही गोष्टी पाहून कौन्सिलचे उमेदवार ठरवतो. अस्पृश्यांचे भांडण भांडण्याकरिता स्वतंत्र मजूर पक्ष उभा केला आहे, त्यात एखाद्या मांगाला जागा मिळाली नसेल. तशी अस्पृश्यांतील नाशिक जिल्ह्यातील एक सधन व कार्यकर्त्या अमृतराव रणखांब्यासारख्या माणसाला व सातारा जिल्ह्यातील एका सधन गृहस्थाच्या मुलांस स्वतंत्र मजूर पक्षात जागा मिळाली नाही. यावरून स्वतंत्र मजूर पक्ष मांगांच्या व चांभारांच्या विरूद्ध आहे, असे म्हणण्यात काही अर्थ नाही. स्वतंत्र मजूर पक्ष नालायकांच्या विरूद्ध आहे, मग ते कोणत्याही जातीचे

असोत. मांग-चांभार स्वतंत्र मजूर पक्षात नसले म्हणून मांग जातीचे किंवा चांभार जातीचे काही नुकसान झाले आहे, असे मला दिसत नाही. स्वतंत्र मजूर पक्ष महारांचा असला तरी तो महारांकरता भांडत नाही, तो भांडतो साऱ्या अस्पृश्यांकरता, भांडणामुळे जो लाभ होतो त्याचे वाटप करणे हे त्यांच्या हाती नाही, ते हाती आहे काँग्रेसच्या, महारांच्या पदरात शून्य, असे वाटप जर काँग्रेसने केले नाही, तर ती काँग्रेस कसली ! स्वतंत्र मजूर पक्षाने हानि केली असेल ती महारांचीच. आपण, महार लोक मांगावर जुलुम करतात असे लिहिले आहे. तो प्रकार आमच्याकडे नाही, आमच्याकडे उलट प्रकार आहे. चांभारांनी, मांगानी काही खोडी काढली तरी महार-गप्प असतात. त्यांना ठाऊक आहे की, मी या बाबतीत त्यांचा पक्ष घेणार नाही. आणि आपण बहुसंख्याक आहोत तेव्हा सोसले पाहिजे; अशी जबाबदारी त्यांना वाटते. आपल्याकडे उलट प्रकार आहे, याबद्दल खेद वाटतो. महारांविरुद्ध निजाम सरकारकडे दाद मागावी अगर आपण सत्याग्रह करावा. त्याला माझा पाठिंबा राहील.

शेवटी येंव करा, त्येंव करा नाहीतर तुमचे मार्ग भिन्न अशी आपण जी निकराची भाषा वापरली आहे, तिच्यासंबंधी दोन शब्द लिहिणे आवश्यक आहे. अशी भाषा आपण वापरली नसती तर बरे झाले असते. गोवेकरीण जशी वाटेल तेंव्हा अडते, किंवा बेगुमान झालेली बायको उल्या, पुल्या करून, 'घे मेल्या तुझे मंगळसूत्र' (असे म्हणून) तोडावयास तयार होते मग क्रंटाळून 'जाव जहन्नममे' अशी म्हणण्याची पाळी (नवऱ्यावर) येते, तसा प्रकार होऊ देणे बरे नाही. भिन्न मार्गाने जावयाचे असेल तर जावे. त्याला मी हरकत करू शकणार नाही, किंवा त्याबद्दल मी काही उदास होऊन मला जे करावयाचे ते बंदही करणार नाही. मात्र भिन्न मार्ग कोणता याचा विचार करून मग तो पत्करावा, मांगांची उन्नति करून त्यांचा स्वाभिमान जागृत करणे, हा या भिन्न मार्गाचा उद्देश असेल तर तो स्तुत्य आहे. पण महारांशी काडीमोड करून, केवळ सनातनी हिंदु किंवा काँग्रेस यांची गुलामगिरी करणे, हाच जर या भिन्न मार्गाचा उद्देश असेल, तर त्यांत काही मांग व्यक्तींचा लाभ होईल, पण त्यात मांग जातीचा अनर्थ आहे, यात मला तरी काही शंका नाही, तरी मर्जीनुसार मार्ग चोखळणे. पत्र बरेच लांबले, पण आपले उत्तर सविस्तर आले पाहिजे, असे फर्मावल्यामुळे संक्षिप्त लिहिता आले नाही.

आपला कृपाभिलाषी,

ता. १३-६-१९४१ (सही) भीमराव रामजी आंबेडकर''

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पाठविलेले दे. ना. कांबळे (मातंग) यांचे पत्र

ॐ

"पाथ्री : ३०-५-१९४१

परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांस देवीदास बुवा पाथ्रीकर याचा सादर प्रणाम वि. वि. लिहिण्यास कारण की, आपणांस पत्र पाठवून पूर्ण खुलासा करून घेण्याचा, माझ्या मनात बऱ्याच दिवसांपासून विचार आहे. याबद्दलचा सोक्षमोक्ष तो काय आताच करून घ्यावा व मनातील खुडखुडी काढून टाकावी असे वाटले म्हणून आपणास हे पत्र पाठवीत आहे. हे पूर्ण वाचून विचार करून आपले खरें उत्तर देणे. जर पत्राचे उत्तर आले नाही तर आपण विलयतेस जाताना १७ पानांचे पत्र गांधीस पाठविले होते, पण गांधीने अधिकाराच्या मदाने, अहंकाराने किंवा तुच्छतेने आपणास निष्काळजीपणाने उत्तर दिले नाही, त्यावेळी आपणास जसे वाईट वाटले व गांधीबद्दल आपणास जसा तिरस्कार उत्पन्न झाला त्यापेक्षाही हजारपट तिरस्कार मला आपणाबद्दल उत्पन्न होईल.

मी निजाम इलाख्यातील मराठवाडा भागातील मातंग समाजातील शिकलेला पहिला विद्यार्थी असून मातंग समाजातील सुधारणेची सर्वस्वी जबाबदारी माझ्या शिरावर आहे. मी आपणास सामान्य विद्यार्थी या नात्याने पत्र पाठवीत नसून निजाम स्टेटच्या मातंग समाजाचा भावी पुढारी म्हणून पत्र पाठवित आहे. म्हणून आपण उत्तर देण्यास अनमान करू नये.

मातंग समाज व महार समाज यांमध्ये देव-दानवासारखे हाडवैर आहे व आपसात वैर, तिरस्कार, द्वेष, मत्सर आणि वाईट भावना आहेत त्याची कारणे--

(१) महार समाज मातंग समाजास तुच्छ व हलका समजतो. (२) मातंग समाज डुकरास पवित्र मानतो व ते जनावर शूर व मर्द असल्यामुळे त्याची (रानडुक्कर) शिकार करतो, पण महार समाज मुसलमानापेक्षाहि डुकरास अपवित्र समजतो. ह्या व इतर क्षुल्लक कारणावरून आपसात विनाकारण झगडे होतात. (३) मातंग समाजात मराठ्याप्रमाणे सर्व सण व लग्नसमारंभ व मिरवणुकी काढण्याचा हिंदु धर्मशास्त्रदृष्ट्या अधिकार आहे, म्हणून ज्यावेळी मातंग लोकांचा नवरदेव गांवामधून घोड्यावरून मारुतीला परण्यास जातो त्यावेळी महार लोक वेशीमध्ये अडवतात व पंचारतीमध्ये थुंकतात. यामुळे भयंकर मारामारी होऊन डोकी फुटतात व वैरभाव वाढतो. (४) कोणतीहि सुधारणेची गोष्ट मांग लोक करीत असता महार लोक ती करू देत नाहीत, व ती हाणून पाडण्याचा कसून

विरोध करतात म्हणून मांग व महार यांचे वाकडे आहे. (५) लोकसंख्येच्या मानाने महार लोकांची संख्या जास्त असल्यामुळे प्रत्येकी गांवी महारांची जास्त आबादी आहे व मांगांची कमी आहे. जर लोक महारांच्या मनाप्रमाणे न वागले तर महार लोक विनाकारण त्रास देतात व त्यांना वाटते की, ज्याप्रमाणे हिंदु लोकांची गुलामगिरी अस्पृश्य समाज करतो, त्याप्रमाणे मातंग समाजाने महार समाजाची गुलामगिरी करावी. (६) अस्पृश्य समाजात शिकलेले व पुढे गेलेले महार लोक आहेत, हे स्वार्थी व आपमतलबी असून इतर समाजातील लोकांस पुढे जाण्यास व सुधारण्यास वाव देत नाहीत. याची साक्ष जितक्या बोर्डिंग्स आहेत त्यात महार विद्यार्थ्यांचाच भरणा जास्त आहे. जितके एम्. एल. ए. आहेत ह्यात महार मेंबरांचाच भरणा जास्त आहे. फक्त नावाकरिता काही ठिकाणी कळसूत्री बाहुल्यांसारखे मांग मेंबर निवडले असून ते बिनबुडाच्या भांड्याप्रमाणे आहेत. (७) आपणाबद्दल मातंग समाजात असा गैरसमज उत्पन्न झाला आहे की, आपण स्वत: महार समाजाच्या कल्याणाची जास्त काळजी घेता. दुसऱ्या समाजाची तितकी घेत नाही. म्हणून मातंग परिषद मध्यप्रांताने आंबेडकर फक्त महार समाजाचे पुढारी आहेत, मातंग समाजाचे नाहीत असा ठराव पास केला. (८) आपली वृत्ति जो प्रथम येऊन (शिकायत) करील त्याचीच बाजू न्यायाची आहे अशी मानणारी असल्यामुळे प्रथम महार समाजातील लोक आपल्याकडे येतात व आपण त्यांची बाजू उचलून धरता म्हणून इतर समाजास पक्षपाती आहात असे भासते व आपण महार समाजाचे हितचिंतक आहात असे वाटते.

जर आपणास अस्पृश्य समाजाचे खरे कल्याण करावयाचे असेल व महार व मातंग समाज यांची एकी करून सांगड घालून नवा मार्ग आखावयाचा असेल तर खालील शर्तींवर विशेष लक्ष घालणे व त्याप्रमाणे मन:पूर्वक लक्ष देऊन कार्य करणे, कारण महार समाज आपणास देवतुल्य मानतो व आपला शब्द प्राणाचे पण लावून पूर्ण करण्याचा कसून प्रयत्न करतो.

माझ्या मताने ज्याप्रमाणे नॉर्मन (Norman) आणि सॅक्सन (Saxon) यांच्या मिश्रणाने रिचर्ड लायन हार्ट यांच्या कारकीर्दीत या परस्परविरूद्ध जातीच्या संमेलनाने अर्वाचीन धैर्यशाली, वीर्यशाली व सुधारलेली इंग्रज जात निर्माण झाली त्याप्रमाणे करावी की, जिचे नाव ऐकताच सर्व जातींवर व समाजावर दरारा बसावा जिचा धर्म व कर्म इतराहून भिन्न असावा, यासाठी आपण खालील गोष्टीकडे लक्ष द्यावे.

[(१) हा मुद्दा गाळलेला दिसतो.] (२) मातंग समाजास महार समाजाने बरोबरीच्या व समानतेच्या नात्याने व बंधुभावाने वागवावे. (३) मातंग समाजातील होतकरू मनुष्याला पुढे येण्यास वाव द्यावा. (४) मातंग लोकांचा नवरदेव वेशीमध्ये अडवू नये व समारंभ व मिरवणुकी यामध्ये अडथळेच आणू नयेत.

(५) महार समाजाने मातंग लोकाकडून कोणत्याही प्रकारचे वतनदारी संबंधीचे हक्क घेऊ नयेत (जसे महार लोक हिंदु समाजाकडून घेत असत). (६) आपण महार समाजाच्या सुधारणेची जशी काळजी घेतात तशीच किंबुहना त्यापेक्षाही जास्त कळकळ मातंग समाजाबद्दल घेणे. कारण, आपण महार समाजामध्ये जन्मला असल्यामुळे आपणावर जातीयतेचा आरोप येतो, व म्हणूनच आपण महाराचेच हितचिंतक आहात अशी कोल्हेकुई होते. (७) डुकराबद्दल महारांच्या मनात तिरस्कार व इतर क्षुल्लक कारणावरून झगडे, द्वेषभाव निर्माण करणारी जी साधने आहेत ती मिटविण्याची व आपापसात प्रेम व बंधुभाव निर्माण करणाऱ्या साधनांची योजना करणे. (८) श्रद्धेने व अज्ञानाने महार समाज आपणास ईश्वरी अवतार मानून आपल्या फोटोचे पूजन करतात व आपणाशिवाय दुसरा कोणी होणारच नाही असा बुद्धीमंतास वाव न देणारा समज करून घेतात, तो मला पसंत नाही व हे अंधश्रद्धेचे व भोळेपणाचे अनुकरण मी मातंग समाजास करू देणार नाही.

जर या सर्व अटी मान्य असतील व आपणास अखिल भारतीय अस्पृश्य समाजाचे पुढारीपण करावयाचे असेल तर मी आपला शिष्य होण्यास तयार आहे. आपल्या व्याख्यानावरून मी गेल्यावर कसे होईल ही काळजी वाटत आहे ती आपल्या कृपेने मी दूर करीन व आपल्या मनाप्रमाणे कार्य करून दाखवीन म्हणून उत्तर पूर्ण विचार करून आपल्या स्वाक्षराने देणे. मी १५ दिवस वाट पाहीन. उत्तर न आले तर मी असे समजेन की, आपला मार्ग निराळा व माझा मार्ग निराळा. म्हणून अवमान न करता आपले मत, विचार सविस्तर पत्र पाठवून खुलासा करणे कारण अजून एक महिन्यानंतर हैद्राबाद दलितवर्ग परिषद हैद्राबादी आंबेडकर बी. एस. व्यंकटराव यांच्या अध्यक्षतेखाली भरणार आहे. व मी मातंग समाजाचा प्रतिनिधी या नात्याने जाणार आहे. म्हणून लवकरच महार व मांग यांच्या भावी जीवनाबद्दल खुलासा करणे किंवा एकदम वेगवेगळे गट करणे, पण असे अर्धवट इकडे ना तिकडे, कच्चे ना पक्के ठेवू नये, कळावे.

आपला कृपाभिलाषी,

देवीदासराव नामदेवराव कांबळे

ता. पाथ्री, मैहलामाळी वाडा, जि. परभणी (निजामस्टेट)

नोट : पूर्ण पत्र वाचणे व पूर्ण विचार करून अनमान न करता उत्तर देणे. मी आतुरतेने वाट पाहात आहे. उत्तर संक्षिप्त देऊ नका. सविस्तर देणे. नाहीतर तुमचा आमचा मार्ग भिन्न.''

जनता, दिनांक १४ जून १९४१

उद्‌घृत, खैरमोडे, खंड ९ वा, पृ. ९१-९९.

१७

हे सत्य की कावा ?

''वीस वर्षे गांधींच्या तत्त्वाज्ञानात भिजत व मुरत घालूनही कृपलानी हे कोरडेच राहिले काय ? जनतेने आपल्या शांतीप्रधान प्रयत्नाने स्वतः सरकार व्हायचे हे गांधींच्या राजकारणाचे सार आहे. राज्यसत्ता म्हणजे सॉव्हरेन्टी ही 'सरकारा'त नसून जनतेत असते असे गांधींचे व इंग्लंडातील लिबरलांचे तत्त्वज्ञान आहे. त्या त्या वेळचे सरकार (गव्हर्नमेन्ट) हे या राज्यसत्तेची इच्छा पार पाडणारे यंत्र असते. ज्यावेळी हे 'सरकार' आपले काम करण्यास पूर्ण निरूपयोगी होते त्यावेळी जनतेची इच्छाशक्ती प्रत्यक्ष कृतीने राज्यसंस्थेचे व सरकारचे रूप पालटून टाकते. गांधींनी हेच कार्य टिळकांचे पुढे चालविण्यासाठी धुरीणत्व पत्करले. त्यांचे तंत्र ठरलेले आहे. शेतकरी, कामकरी व मध्यम वर्ग आणि आपल्या सहाय्यास येतील ते सर्व वरिष्ठ वर्ग यांची संघटना करून राज्यसत्ता लोकमतानुवर्ती होईल, असे दडपण सरकारावर आणायचे. गांधीचा हाच मार्ग होता व आहे.

पण जनतेला मूढ ठेवून तिचे कर्तृत्व नष्ट करून टाकावयाचे हे धोरण आज गांधीसह साऱ्या कॉंग्रेस पुढाऱ्यांनी अवलंबिले आहे. बेजबाबदार व अप्रातिनिधिक गव्हर्नरशाही सोळा कोटी प्रजेवर एक वर्षाहून अधिक काळ नांदते आहे पण लोक तिजवर फिदा आहेत ! इंग्लंडात ही गोष्ट घडली नसती, असे अमेरी स्वतःच्या नव्हे तरी झेटलंडच्या मिशांवर ताव देऊन म्हणाले, तो टोमणा खरा होता. हिंदी जनता आज अहिंसेमुळे अडलेली नाही. तिला मेषपात्र बनविण्यात आले आहे, व याला कॉंग्रेस पुढारी जबाबदार आहेत. ही जबाबदारी लक्षात घेऊन रस्ता बदलावा त्याऐवजी कृपालानी चमत्काराची वाट पाहात आहेत ! चमत्काराची वाट पाहणाऱ्याच्या हाती काय पडते, हे रेनोच्या उदाहरणावरून कळले आहे. आमच्या येथे रेनोच्या इतकी निराशेची परिस्थिती अजून आलेली नाही. वृद्ध पुढाऱ्यांनी हातपाय गाळले असल्यास कॉंग्रेसमधील तरुणांनी तरी आता स्वतःच्या बळावर पुढे पाऊल टाकले पाहिजे—''

वरील उद्‌गार वाचून ते जनता पत्राच्या संपादकाने काढले आहेत, असे जर वाचकांस वाटले तर त्यात काही आश्चर्यकारक आहे, असे कोणास वाटणार नाही. परंतु ते उद्‌गार जनतेच्या संपादकाचे नसून ते गेल्या रविवारच्या

लोकमान्याच्या अंकाच्या अग्रलेखातील उतारे आहेत. वरील उद्‌गार वाचून लोकमान्याच्या मतप्रणालिकेत केवढे मतपरिवर्तन झाले आहे, हे कोणासही कळून येईल. आम्हास आनंद वाटतो की जे मत आम्ही आज कित्येक दिवस प्रतिपादन करीत आलो आहेत तेच मत खरे ठरून शेवटी लोकमान्यासारख्या सर्वस्वी कॉंग्रेसला वाहिलेल्या वर्तमानपत्राला देखील त्याच्या सत्यतेबद्दल ग्वाही द्यावी लागली. आम्हाला जो खेद वाटतो तो एवढ्याकरता की 'लोकमान्या'चे डोळे उघडण्याकरिता इतका कालावधी लागला. आज लोकमान्याने जे मत प्रदर्शित केले आहे तेच मत याच्या पूर्वी जर प्रसिद्ध करण्यात आले असते, आणि ते मत जनतेत प्रसृत करण्यात आले असते तर आज जी स्थिती जनतेची झाली आहे ती झाली नसती. ही स्थिती किती वाईट झाली आहे, हे नुकत्याच 'सोशल वेल्फेअर' या मासिकामध्ये ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीचे चिटणीस आचार्य कृपलानी यांनी लिहिलेल्या लेखावरून कोणालाही कळून येण्यासारखे आहे. 'हल्लीची कोंडी फोडण्यास मार्ग काय आहे' असा आचार्य कृपलानी यांनी आपल्या लेखाला मथळा दिला आहे. आणि 'परचक्र आल्यास हिन्दुस्थानचे संरक्षण कसे करावयाचे' या विषयीची त्यांनी चर्चा केली आहे. काही कॉंग्रेसवादी लोकांना इंग्लंडच्या बाजूची पिच्छेहाट झाल्याची बातमी आली की हर्ष होतो. परंतु आचार्य कृपलानी यांच्या मते इंग्लंडच्या बाजूच्या पिच्छेहाटीची बातमी आली की लोक हताश होतात. आमच्या मते, हे सत्य राजश्री कृपलानी यांनी बाहेर आणले हे चांगले झाले. हताश होण्याची कारणे व त्यावर उपाययोजना कोणती याचा विचार करताना त्यांनी असे म्हटले आहे की या निराशेची कारणे तीन आहेत.

(१) परचक्रास तोंड देण्यास हिन्दुस्थानची पुरेशी लष्करी तयारी नाही. (२) परचक्रास प्रतिकार करता यावा अशी देशाची तयारी करण्यासाठी सरकार काहीही करीत नाही. (३) हिंदी जनतेवर सरकारचा विश्वास नसल्यामुळे सरकार जनतेचे सहाय्य घेत नाही. सरकारी युद्ध प्रयत्नाचे परीक्षण करून ही तीन कारणे कशी खरी आहेत ते कृपलानी यांनी सप्रमाण सिद्ध केले आहे. सरकारच्या बाजूने अशी निराशा झाल्यामुळे लोक कॉंग्रेसकडे पाहतात पण कृपलानी दीनवाणीने म्हणतात : ''कॉंग्रेस तरी काय करणार ? लष्करी संघटना काही खाजगी संस्थामार्फत करता येत नाही. आणि सरकार तर आमचे सहकार्य लाथाडते. तेव्हा करणार काय ? रडत बसू नये. अजूनही एखादा चमत्कार घडून अनुकूल काल येईल त्याची वाट पाहात तयारीने बसावे, निदान ईश्वर आणि सृष्टि याची प्रार्थना करीत तयार रहावे.''

या लेखात रा. कृपलानी यांनी जो मार्ग सुचविला आहे तो पाहिला म्हणजे कॉंग्रेसच्या शक्तीचा किती क्षय झाला आहे, हे दिसून येण्यासारखे आहे.

परमेश्वराची प्रार्थना करीत राहणे याच्याशिवाय परचक्र टाळण्याकरिता दुसरा कोणताही मार्ग देशाला उरलेला नाही, हेच जर खरे असेल तर कॉंग्रेसचा काय किंवा कोणत्याही राजकीय संस्थेचा काही उपयोग नाही. आणि सारे राजकारण व्यर्थ आहे, असे म्हणावे लागेल. कॉंग्रेससारख्या बलवत्तर राजकीय संस्थेची अशी स्थिती व्हावी ही गोष्ट आम्हास देखील शोचनीय वाटते. आम्ही पुष्कळ दिवसापासून सांगत आलो आहोत की जोपर्यंत कॉंग्रेस ही गांधीच्या आधीन आहे तोपर्यंत कॉंग्रेसच्या हातून राजकीय क्रांती नव्हे राजकीय प्रगतिसुद्धा होणे शक्य नाही. पुष्कळ लोकांना हे पटत होते. परंतु त्यापैकी काहींचा युक्तिवाद असा असे की, टीकाकारांनी आंत येऊन त्यांना जी काही सुधारणा करावयाची असेल ती त्यांनी करावी. हा युक्तिवाद आम्हास कधीच पटला नाही. फसून सापळ्यात शिरणाऱ्या उंदराला जसे त्यातून बाहेर पडता येत नाही व सापळाही मोडता येत नाही तद्वत बाहेर राहून जे-कॉंग्रेसवर टीका करतात त्यांना आत जाऊन कॉंग्रेसची सुधारणाही करता येणार नाही व त्यांना सुखरूप बाहेरही पडता येणार नाही. एकतर गांधी व कॉंग्रेस याची फारकत झाली पाहिजे नाहीतर कॉंग्रेसने गांधी तत्त्वाला तिलांजली देऊन व गांधीचे पुढारीपण झुगारून स्वतंत्रपणे आपले जीवन मानवी अनुभवाच्या पायावर रचून कार्य करण्यास सुरवात केली पाहिजे. नाहीतर ज्यांची गांधीपेक्षा देश श्रेष्ठ आहे अशी भावना दृढतर झाली असेल त्यांनी कॉंग्रेसच्या बाहेर येऊन देशाकरिता आपल्याला जे काही करता येईल ते करावे. ही विचारसरणी लोकमान्यकारांनी आपल्या अग्रलेखात मांडली याबद्दल आम्ही त्यांचे अभिनंदन करतो. मांजरीची पिले उपजता त्यांचे डोळे मिटलेले असतात परंतु काही दिवसांनी त्यांचे डोळे उघडून ती सृष्टीचा अनुभव घेण्यास सिद्ध होतात. आमच्या कॉंग्रेस भक्तांचे डोळे कधी तरी उघडतील अशी आशा आम्हास कधीच नव्हती. परंतु निराशेमध्ये एक आशेचा किरण दिसला याबद्दल आम्हासही मोठे समाधान होते.

वरील विचार प्रदर्शित करतांना आमच्या वाचकांना एका गोष्टीबाबत इशारा देणे हे आम्हास अत्यंत अगत्याचे वाटते. पुष्कळशा लोकांना रा. मुनशी हे कॉंग्रेसमधुन बाहेर पडल्यामुळे मोठे समाधान झाल्याचे दिसून येते आहे. रा. मुनशी यांनी कॉंग्रेसचा त्याग केला आहे त्याबद्दल आम्हाला समाधान तर वाटत नाहीच नाही; परंतु त्यांच्या वर्तनाबद्दल मोठी शंका उत्पन्न होत आहे. आम्ही समाधान व्यक्त केले ते लोकमान्यासारख्या कॉंग्रेसला सर्वस्वी वाहून गेलेल्या वृत्तपत्राचे डोळे उघडले याबद्दल ! रा. मुनशी हे कॉंग्रेसबाहेर पडले, असा सर्वत्र समज पसरलेला दिसून येतो. तसेच त्यांनी ज्या कारणामुळे कॉंग्रेस

सोडली ते कारण वैयक्तिक नसून तात्त्विक स्वरूपाचे आहे, असाही समज सर्वत्र पसरलेला दिसतो पण या दोन्ही गोष्टी खऱ्या आहेत, असे आम्हास खात्रीपूर्वक वाटत नाही. मुनशी काँग्रेसच्या बाहेर पडले असे म्हणण्यापेक्षा गांधींनी त्यांना मुद्दाम हेतुपुरस्पर विवक्षित कार्यक्रम साधण्याकरिता काँग्रेसच्या बाहेर सोडले आहे, हेच म्हणणे आम्हाला तरीं संयुक्तिक दिसते. काँग्रेसमधून आतापर्यंत पुष्कळ लोक बाहेर पडून गेले आहेत. श्री. नरीमन, डॉ. खरे, सुभाषचंद्र बोस, एम्. एन्. रॉय यांची उदाहरणे सर्वांच्या नजरेसमोर आहेत. ही सर्व माणसे काँग्रेसमधून बाहेर पडली; परंतु त्यांनी बाहेर पडतांना गांधीची परवानगी किंवा आशिर्वाद मागितल्याचे दिसून येत नाही. गांधीच्या दृष्टीने पाहता काँग्रेसमधून बाहेर पडलेल्या वरील व्यक्तीपेक्षा मुनशी हे कमी पापी ठरतात असे कोणालाही म्हणता येणार नाही. अहिंसेचे तत्त्व हा गांधीचा धर्म आहे. त्या तत्त्वाला झुगारून देऊन बाहेर पडणारा माणूस गांधींच्या दृष्टीने अधर्मीच म्हटला पाहिजे. अशा दृष्टीने श्री. मुनशी हे अधर्मी व पातकी ठरले असतांना देखील त्यांना गांधींनी ते काँग्रेसमधून बाहेर जात असतांना आशिर्वाद द्यावा, त्यांचे शुभ चिंतावे हे मोठेच गौडबंगाल वाटते. आतापर्यंत ज्या ज्या लोकांनी गांधींना विरोध करून काँग्रेसमधून बाहेर पाऊल टाकले त्या त्या प्रत्येकाला गांधींनी आपला शत्रू समजून त्यांना नेस्तनाबूत करण्याकरिता आपली सर्व शक्ती कशी वेचली याचा खेदकारक इतिहास सर्वांच्या परिचयाचा आहे. मुनशीच्या बाबतीत आपले भस्मासुरी वर्तन सोडून मुनशीचा द्रोह आपल्या पोटात घालावा व त्याच्याबद्दल एवढा ओलावा दाखवावा यांच्या मुळाशी काहीतरी हेतू असलाच पाहिजे, असा आम्हास तरी संशय येतो.

हिन्दू महासभेला शह देण्याकरिता हा डाव गांधी व मुनशी यांनी मिळून केला असावा, असा अन्दाज केल्यास तो चुकीचा ठरेल, असे आम्हास आज तरी वाटत नाही. एक गोष्ट निश्चित आहे की मुंबई व अहमदाबाद या ठिकाणी झालेला हिंदू-मुसलमानांच्या दंग्यामुळे गुजराथी प्रजेचा काँग्रेसवरचा विश्वास साफ उडालेला आहे. दुसरी गोष्ट, काँग्रेसवरती असंतुष्ट झालेली गुजराथी प्रजा सधन आहे आणि तिच्या द्रव्यबलाशिवाय कोणतीही राजकीय संस्था जोम धरू शकत नाही. चवथी गोष्ट, हिन्दू महासभेचे पुढारी बॅ. सावरकर हे काँग्रेसचे कट्टर शत्रू आहेत. या गोष्टी गांधीना व त्यांचे सहकारी यांना पूर्णपणे अवगत असल्याच पाहिजेत व गुजराथी समाजाचा ओघ हिन्दूमहासभेकडे वळला तर काँग्रेसला शह देण्यास समर्थ होईल ही गोष्ट देखील गांधी व त्यांचे सहकारी यांना न कळण्यासारखी आहे, असेही म्हणता येणार नाही.

या सर्व गोष्टींचा विचार करून जर गांधींनी गुजराथी समाजाचा ओघ हिंदू महासभेकडे जाऊ देण्यापेक्षा आपल्याच एखाद्या शिष्याच्या हाती राहील अशा प्रकारचा प्रयत्न करणे या प्रसंगी आवश्यक आहे, असे समजून श्री. मुनशीना मुद्दाम बाहेर सोडले असेल, असे म्हटले असतांना त्यात काही वावगे होईल, असे आम्हास वाटत नाही. गांधी जरी महात्मा झाले तरी सर्वसाधारण मनुष्यमात्राला असलेले विकार-मद, मत्सर, दंभ, अहंकार इत्यादी त्यांना नाहीत असे कोणालाही म्हणता येणार नाही. ज्या गुजराथी समाजाच्या आश्रयावर गांधींनी जी आपली राजकीय इमारत रचली आहे तिचा पाया अशारीतीने ढासळत असलेला पाहून त्यांनी आम्ही म्हणतो त्या हेतूने श्री. मुनशी यांना कॉंग्रेस बाहेर सोडून देण्याची हेतू-पुरस्पर योजना करणे स्वाभाविक आहे. आम्ही इच्छितो की आमचा अंदाज चुकीचा ठरो. भविष्यांती काय ठरले तेच खरे. परंतु मुनशीच्या कॉंग्रेस त्यागाबद्दल ज्यांना समाधान वाटते त्यांना या घटनेविषयी आम्हाला जो संशय उत्पन्न होतो तो व्यक्त करून सांगणे, हे आमचे कर्तव्यकर्म आहे.

●●●

अग्रलेख : जनता ता. ५ जुलै १९४१.

उद्‌घृत : गांजरे, खंड ५, पृ. ३७-४१.

१८

इंग्रजाची धोकेबाजी

नामदार व्हॉइसरॉय यांच्या कार्यकारी मंडळाची पुनर्घटना होणार यासंबंधीची वाटाघाट आज लढाई सुरू झाल्यापासून चाललेली होती. त्यासंबंधाने अनेक भवती न भवती होऊन शेवटी एकदाचे नवीन कार्यकारी मंडळ घडविण्यात आले. या नवीन कार्यकारी मंडळाबद्दल जनतेत विशेष कोणत्याही प्रकारचा उत्साह उत्पन्न झाला होता, असे कोणासही म्हणता यावयाचे नाही. ' घडीभर की मौज ' यापेक्षा या नवीन योजनेला लोकांनी जास्त महत्त्व दिलेले नाही. आज लढाईची परिस्थिती पाहतांना या योजनेला देशाच्या संरक्षणाच्या दृष्टीने काही महत्त्व आहे, असेही म्हणता यावयाचे नाही. लढाईचा बहुतेक शेवट होत आला आहे. पाच-सहा महिन्यात तह होऊन जिकडे तिकडे सामसूम होईल, असे म्हटले असतांना त्यात काही असंभवनीय आहे, असे म्हणता यावयाचे नाही. कालमानाच्या दृष्टीने पाहतांना ज्याची कार्यकारी-मंडळावरती योजना करण्यात आलेली आहे, त्यांना प्रेत नेण्याकरिता बोलाविलेल्या मुर्देफरसापेक्षा जास्त मोठी कामगिरी करण्याची संधी लाभेल की नाही, असे म्हटल्यास त्यात काही वावगे होईल, असे आम्हास वाटत नाही.

वरीलप्रमाणे पाहतांना या कार्यकारी मंडळासंबंधाने जे औदासिन्य सर्वत्र पसरून राहिले आहे ते योग्यच आहे. या योजनेचे चीज करण्याइतके तिला महत्त्व नाही व म्हणून तिच्या बरे वाईटपणाबद्दल लिहिण्याचा आमचा इरादा नव्हता. परंतु अस्पृश्यांच्या दृष्टीने तसेच हिंदूंच्या दृष्टीने तिचे महत्त्व विशेष आहे. आणि ते जाणून घेणे हे सर्वांच्याच हिताचे आहे.

पहिल्या प्रथम अस्पृश्य वर्गाच्या लोकांना या कार्यकारी मंडळाच्या योजनेपासून एक धडा घेणे अत्यंत आवश्यक आहे. ज्या दिवसापासून कार्यकारी मंडळाची पुनर्घटना होणार, असे ब्रिटिश सरकारतर्फे जाहीर करण्यात आले त्या दिवसापासून अस्पृश्य वर्गाचा एकतरी प्रतिनिधी या कायदे कौन्सिलात घेतला जाईल, याबद्दल कोणाला कधीही संशय वाटला नव्हता. १९२७ सालापासून तर आतापर्यंतचा हिंदुस्थानातील राजकारणाचा इतिहास तपासून पाहिला असतांना त्यात एक महत्त्वाची गोष्ट दिसून येते, ती गोष्ट ही की ज्या अस्पृश्य समाजाला हिंदू समाजांतर्गत समाज समजला जात असे त्याची स्वतंत्र समाज अशी गणना

होऊ लागली, हीच होय; व त्याप्रमाणे ज्या ज्या ठिकाणी राज्याधिकार असू शकतो त्या त्या ठिकाणी त्यांच्याकरिता स्वतंत्र व्यवस्था करण्यात आलेली होती. ही गोष्ट त्यांच्या हिंदूपासून विलग आणि स्वतंत्र ठरविलेल्या सामाजिक जीवनाचा पुरावाच म्हटला पाहिजे. हिंदूपासून अस्पृश्य लोक राजकीयदृष्ट्या तरी भिन्न आहेत, स्वतंत्र आहेत, ही गोष्ट इतकी सर्वसामान्य झाली होती की गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्टच्याखाली कार्यकारी मंडळात मुसलमानाप्रमाणे अस्पृश्यांचे मंत्री असावेत, असे राजकीय बंधनही घालण्यात आले होते. कॉंग्रेसच्या अरेरावीपणामुळे त्यांनी आपल्या मंत्रिमंडळात अस्पृश्यांचा प्रतिनिधी घेतला नाही, ही गोष्ट अलाहिदा आहे. परंतु मंत्रिमंडळात स्थान मिळणे हा त्यांचा हक्क आहे, याबद्दल कोणालाही संशय घेता येणे शक्य नाही.

अशा पार्श्वभूमीवरून व्हाईसरॉय यांनी घडवून आणलेल्या कार्यकारी कौन्सिलच्या योजनेकडे पाहिले असतांना इंग्रज सरकारने मोठाच अन्याय केला, याबद्दल तिळमात्र शंका नाही. हा नुसता अन्याय असता तरी बरे झाले असते. परंतु हा अन्याय नसून विश्वासघात आहे, असे म्हटल्याशिवाय गत्यंतर नाही. केवळ हल्लीचे लॉर्ड लिनलिथगो यांनी लढाई सुरू झाल्यापासून आतापर्यंत जी राजकीय पत्रके प्रसिद्ध केली त्यांवरून पाहता त्यांनीसुद्धा अस्पृश्य वर्गाचा राजकीय दर्जा मान्य केल्याचे स्वयंसिद्ध आहे. ज्याप्रमाणे मुसलमान समाज हिंदुस्थानातील राजकारणातला एक घटक आहे त्याचप्रमाणे अस्पृश्य वर्गदेखील हिंदुस्थानातील राजकारणाचा एक घटक आहे, अशी कबुली त्यांनी आपल्या स्वमुखाने दिलेली आहे. सर्व राजकीय घटकांच्या संमतीने हिंदुस्थानातील राजकारण चालले पाहिजे, असे आश्वासन त्यांनी स्वतः होऊन दिलेले होते. असे असतांना नवीन कार्यकारी मंडळात हिंदूंचे तीन प्रतिनिधी, मुसलमानाचे तीन प्रतिनिधी व पारशांचा एक प्रतिनिधी याची जरूरी ब्रिटिश सरकारास वाटावी व अस्पृश्यांचा एकही प्रतिनिधी नसला तरी चालेल, असे त्यास वाटावे या मनोभावनेला व राजनीतीला काय म्हणावे हेच समजत नाही. इंग्रजाना '' लुच्चा इंग्रज '' असे विशेषण सर्व युरोपभर लावण्यात येते व त्याबद्दल त्यांना चीडही येते. परंतु असे काही दाखले पाहिले म्हणजे ज्या लोकांनी वरील विशेषण लावण्यास सुरुवात केली त्यांना तसे करण्यास अनुभवाचा मोठाच काहीतरी आधार होता, असे वाटू लागते. दुर्बल अशा अस्पृश्य समाजाशी वचनभंग करून त्यांच्या वाजवी अधिकारावर गदा आणणे यात मोठासा पुरुषार्थ आहे, असे इंग्रजांनी समजू नये.

इंग्रज सरकारच्या या नीच व विचित्र करणीचा जसा तिटकारा येतो तसाच याबाबतीत हिंदू पुढाऱ्यांनी व हिंदू वृत्तपत्रकारांनी जी मौन वृत्ती धारण केलेली

आहे तिच्याबद्दल तितकीच, किंबहुना जास्त चीड आल्यावाचून राहत नाही. सप्रू परिषदेमध्ये अस्पृश्य वर्गाच्या प्रतिनिधींचा समावेश करण्यात आला नाही, याबद्दल कोणत्याही प्रकारची दिलगिरी प्रदर्शित करण्यात आलेली नाही. परंतु सप्रू परिषद काहीतरी विधायक कार्य करील अशी आशा आम्हाला तरी वाटत नव्हती. म्हणून तिच्या संबंधाने निराशाही वाटत नाही. परंतु हिंदूमहासभा व तिचे पुढारी बॅ. सावरकर यांच्या वर्तनासंबंधाने मात्र आश्चर्य वाटते. बॅ. सावरकर हे एकेकाळी ब्रिटिशांचे कट्टे शत्रू होते ब्रिटिशांचे राज्य घालवून देण्याकरिता शस्त्रास्त्राची सामुग्री गोळा करण्याकरिता त्यांनी आपले अर्धे अधिक आयुष्य खर्ची घातले. असे असतांना आज बॅ. सावरकर म्हणजे इंग्रजांच्या ताटाखालचे मांजर झाले आहे, असे म्हणावयास काहीच हरकत नाही. व्हाईसरॉयसाहेबांनी घोषणा करावी व सावरकरांनी शिंग वाजवून आपली पसंती जगजाहीर करावी, याशिवाय सावरकर दुसरे काही करीत असल्याचे त्यांच्या आतापर्यंतच्या राजकारणावरून तरी दिसून येत नाही. हे जे त्यांनी लागूल-चालन चालविलेले आहे त्याला काही सार्वजनिक हिताचा आधार असता तर त्याला कोणी दोष दिला नसता. परंतु इंग्रजांची हिंदू लोकासंबंधीची दृष्टी कशी आहे याचा विचार केला असतांना असेच म्हणावे लागते की, इंग्रज लोक हिंदूच्या हितसंबंधासाठी काय करतात या प्रश्नसंबंधाने सावरकरांना कसलीच चिंता वाटत नसावी. व्हाईसरॉय साहेब आपल्याशी पत्रव्यवहार करतात एवढ्यानेच सावरकर फुगून जाऊन खूष झालेले दिसतात. नाहीतर कोणीही हिंदूमहासभेचा पुरस्कर्ता व्हाईसरॉयने घडवून आणलेल्या कार्यकारी मंडळाच्या योजनेस पाठिंबा देताना, सावरकरांचे सगळे राजकारण इतके विचित्र दिसते की, त्यांना राजकारण कळते किंवा नाही याचा आम्हास तरी संशय वाटू लागला आहे.

हिंदूमहासभा ही संस्था कम्युनल अवॉर्ड याला विरोध करण्याकरिता प्रस्थापित करण्यात आली. मुसलमान लोकांच्या लोकसंख्येपेक्षा मुसलमानांना कायदे कौन्सिलात व कार्यकारी मंडळात जादा प्रमाणात प्रतिनिधी ब्रिटिश सरकारने दिले, हीच तर हिंदूमहासभेची मोठी तक्रार आहे व हेच हिंदूमहासभेच्या दृष्टीने इंग्रजांनी केलेले मोठे महत् पाप, असे समजले जात असे. ही चूक दुरुस्त करून मुसलमानांना जादा दिलेले प्रतिनिधी कमी करावयास लावून लोकसंख्येच्या प्रमाणात मुसलमानांच्या प्रतिनिधींचे कोष्टक आणून बसविणे हेच हिंदूमहासभेचे मोठे महत्त्वाचे कार्य होऊन बसले होते. गेल्यावर्षी जेव्हा कार्यकारी मंडळाची नवीन घटना होण्याचे घाटत आले होते व ज्यावेळी जिन्हा यांनी मुसलमानांना ५० टक्के प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे, अशी मागणी केली होती त्यावेळी सावरकर

यांनी हिंदूमहासभेतर्फे त्याला विरोधही केलेला होता. तसेच त्यावेळी होणाऱ्या कार्यकारी मंडळात एक अस्पृश्यांचा व एक शिखांचा प्रतिनिधी घेण्यात यावा, अशी घोषणा केली होती. आश्चर्याची गोष्ट ही की, आज अमलात आलेल्या कार्यकारी मंडळात मुसलमानांना जवळ जवळ ५० टक्के प्रतिनिधीत्व इंग्रज सरकारने दिलेले आहे. परंतु अस्पृश्यांना अथवा शिखांना एकही प्रतिनिधी देण्यात आलेला नाही. असे असतांना ज्या व्यवस्थेत मुसलमानांना ५० टक्के प्रतिनिधित्व देण्यात आलेले आहे ती व्यवस्था चांगली आहे, अशी प्रशंसा बॅरिस्टर तात्याराव सावरकर करीत आहेत ! हे विचारवैचित्र्य पाहून कोणासही सावरकर यांस बुद्धिभ्रंश झाला आहे, असे वाटल्यास त्यात आश्चर्य नाही. अस्पृश्य व शीख यांच्या प्रतिनिधित्वासंबंधानेही सावरकर यांच्या दृष्टीकोणात मोठाच फेरबदल झालेला दिसून येतो. गतवर्षी अस्पृश्यात शीख यांचे प्रतिनिधी कार्यकारी मंडळात घेतले पाहिजेत, असे आग्रहपूर्वक सांगणारे सावरकर आज फक्त शीख लोकांचा प्रतिनिधी न घेतल्याबद्दल खेद प्रदर्शित करीत आहेत व सावरकर हा शिखावर झालेला अन्याय दूर करावा, अशी मागणी करीत आहेत. परंतु अस्पृश्यांचा प्रतिनिधी न घेतल्याबद्दल त्यांनी एक चकार शब्द काढला नाही. अस्पृश्यांच्या बाबतीत एका वर्षामध्ये सावरकरांच्या दृष्टीकोणात हा फरक घडण्यास कोणते बलवत्तर कारण झाले असेल हे आम्ही सांगू शकत नाही. या त्यांच्या वर्तनावरून हिंदूमहासभा ही संस्था सर्वस्वी ब्राह्मणशाहीच्या आहारी गेली असल्याचे दिसून येते. त्याशिवाय एवढा मोठा प्रमाद सावरकरांच्या हातून घडला नसता.

या बाबतीत सर्व हिंदूजनांना आम्हास एक सूचना करावीशी वाटते. आज जो कोणी हिंदुस्थानातील राजकारणाचे बारकाईने निरीक्षण करून पाहील त्याला एक गोष्ट दिसून येईल की, इंग्रज सरकार हे मुसलमानांच्या घरी गहाण पडले आहे व ते सर्वस्वी मुसलमानांच्या ताब्यात गेले आहे. हिंदूच्या संबंधाने इंग्रजांच्या मनात कुडाभाव असावा, असा संशय येतो. गांधीनी लढाईच्या बाबतीत इंग्रजाशी जसा असहकार पुकारलेला आहे त्याच्याहीपेक्षा कट्टर स्वरुपात जिन्हा यांनी इंग्रजांशी असहकार आरंभिलेला आहे. असे असतांना मुसलमान लोकांना जिन्हापासून फोडून वश करून घेण्याकरिता इंग्रज लोक वाटेल त्या प्रकारचे प्रयत्न करीत आहेत; इतकेच नव्हे तर मुसलमानांना जवळ जवळ ५० टक्के प्रतिनिधित्व देवून पाकिस्तानचा मोबदला त्यांनी अगाऊच देवून टाकला आहे. परंतु गांधीपासून हिंदू लोकांना परावृत्त करून घेण्यास इंग्रजांनी काही प्रयत्न केला नाही व तशी त्यांना इच्छाही झालेली नाही. इंग्रज व मुसलमान यांच्या सहकार्याने, संगनमताने व भागीदारीने आजचे हिंदुस्थानचे राजकारण

चालले आहे. या भागीदारीत इंग्रज सरकार वश्या भागीदार असल्याचे दिसून येते. निदान मुसलमान सांगतील त्याप्रमाणे वागणे याशिवाय त्यांना गत्यंतर राहिलेले नाही. ही मुसलमान इंग्रजांची भागीदारी हिंदूना अत्यंत हानीकारक होणार हे कोणासही सांगावयास नको. आजपर्यंत उभयतांच्या धोरणावरून पाहिले असतांना एकंदरीत या देशाला स्वराज्य मिळू द्यावयाचे नाही, किंवा देणे भाग पडले तर त्याचा विचका करून मग द्यावयाचे, हाच त्यांच्या भागीदारीचा परिणाम होणार आहे. या घोर परिणामापासून हिंदूंना जर आपला बचाव करून घ्यावयाचा असेल तर हिंदूंनी अस्पृश्यांशी समबुद्धीने वागण्याची उदारबुद्धी दाखविली पाहिजे. या घडलेल्या प्रकारावरून मात्र अस्पृश्य वर्गांना बोध घेण्याचा एक मोठाच प्रसंग उत्पन्न झाला आहे, असे म्हणावयास काहीच हरकत नाही. दोघांनीही दगा केला आहे. इंग्रज सरकारवर व हिंदू लोकांवर त्यांनी कितपत विश्वास ठेवावा, याचा त्यांना विचार करण्याची वेळ आली आहे, असे आम्हास वाटते. याविषयी केव्हातरी लिहिण्याचा आमचा इरादा आहे परंतु आज तरी इंग्रज सरकार व हिंदूमहासभा या उभयतांचा जोराचा निषेध करणे, हे अस्पृश्य लोकांचे या घडी मोठेंच कर्तव्यकर्म होऊन राहिले आहे.

● ● ●

अग्रलेख : जनता ता. ९ ऑगस्ट १९४१.

उद्‌धृत : गांजरे, खंड ५, पृ. ४३–४७.

९९

प्रजातंत्रवाद या नाजीवाद

भारत सरकार के श्रम सदस्य माननीय डाक्टर बी. आर. अम्बेदकर का २७ जुलाई, सन १९४२ ई. का वक्तव्य जो उन्होंने समाचारपत्रों में छपने के लिये दिया :

" कोई भी यह आशा नहीं कर सकता कि गान्धीजी के विचार सदा एक से रहेंगे पर सभी को यह आशा थी और सभी को यह आशा करने का अधिकार था कि वह अपनी जिम्मेदारी समझेंगे। इसमें कोई सन्देह नहीं कि गान्धीजी का जन-आन्दोलन चलाने का यह काम गैर-जिम्मेदारी और पागलपन का है।

" यह समझना कठिन है कि गांधीजी ने इतने बडे संकटकाल में एक ऐसी अनर्थकारी योजना चलाना क्यों जरूरी समझा। मेरे लिए कुज बातें स्पष्ट हैं। जहां तक भारत के राजनीतिक उद्देश्यों को प्राप्त करने का सम्बन्ध है कोई भी दस बात को अस्वीकार नहीं कर सकता कि अंग्रेज लोग भारतवासियों को शासन करने का अधिकार बराबर देते रहे हैं और हाल में तो ये अधिकार शीघ्रता से मिल रहे हैं। इसी तरह यह भी स्पष्ट है कि अंग्रेज अन्तिम खाई में जाकर मोर्चा नहीं लेना चाहते और भारत की राजनीतिक उन्नति में कोई रुकावट नहीं डालना चाहते! यदि इस बात के लिए किसी प्रमाण की जरूरत है तो क्रिप्स के प्रस्ताव मौजूद हैं। उनमें (१) स्वतंत्रता और, (२) विधान-सम्मेलन, जो कांग्रेस की दो मांगें है वे मान ली गई हैं।

" क्रिप्स प्रस्ताव के बाद गांधीजी की यह बात मानना कठिन है कि अंग्रेज लोक भारतवासियों को अधिकार देना नहीं चाहते। यह एक ऐसी झूठी बात है जो जान बूझकर कही गई हैं। यदि भारतवासी स्वतंत्रता को औपनिवेशिक स्वराज्य से अधिक अच्छा समझते हैं, तो मेरी समझ में क्रिप्स प्रस्तावों के गिर जाने का यह मतलब नहीं होता कि ब्रिटिश सरकार स्वतंत्रता देने के लिए बाध्य नहीं है! यह बात समझ में नहीं आती कि जब क्रिप्स प्रस्तावों से स्वतंत्रता और विधान-सम्मेलन मिल जाते हैं तो कांग्रेस ने उन्हें क्यों नहीं माना। यदि सविनय अवज्ञा आन्दोलन चलाने का कारण यह है कि भारतवासियों को रक्षाविभाग नहीं

दिया गया तो मुझे विश्वास है कि ऐसे लोक बहुत कम होंगे जो इस अदूरदर्शी विचार को ठीक समझेंगे। कांग्रेस ने पहिले तो केवल इस बात की मांग की कि अंग्रेज अपने युद्ध-उद्देश्यों को बता दें और उसकी यह मांग नहीं थी कि लड़ाई के दौरान में उनपर कार्रवाई की जाय। दूसरी बात यह है कि जहां तक मैं समझता हूँ कि ऐसा कोई भी भारतीय राजनीतिज्ञ नहीं है जो रक्षाविभाग का कला-सम्बन्धी और सैनिक कार्य चला सकें।

कोई सहानुभूति नहीं

" तीसरी बात यह है कि जब क्रिप्स प्रस्तावों से सारे विभाग भारतीयों को दे दिये गये थे तो रक्षा-विभाग के न दिये जाने पर झगड़ा करना लड़कपन था। कोई भी समझदार आदमी यह समझ सकता है कि यदि किसी जरूरी और उचित बात पर हस्तान्तरित विभाग जोर देते तो सुरक्षित विभाग अड़ न जाते। यही बात उस समय गवर्नरों के विशेष अधिकारों के काम में लाने के सम्बन्ध में हुई जब कांग्रेस ने पद ग्रहण किया था। यह बड़े अचरज की बात है कि कांग्रेस इस सम्बन्ध में अपने ही अनुभव को भूल गई।

" मेरी स्पष्ट राय है कि कांग्रेस का यह सविनय अवज्ञा आन्दोलन किसी भी सहानुभूति के योग्य नहीं। इसे देश-सेवा का जो मौका दिया गया था उसे इसने ठुकरा दिया। यह बात देखते हुये मेरी समझ में यह नहीं आता कि गांधीजी का यह काम किस तरह देश के लिये हितकर है। मुझे ऐसा मालूम होता है कि गांधीजी उस गौरव को फिर से प्राप्त करने की कोशिश कर रहें हैं जो उन्होंने और कांग्रेस ने युद्ध छेड़ने के समय से गंवा दिया है। कांग्रेस गौरव के साथ इन ढंगों में से किसी ढंग पर रह सकती है। वह या तो खुल्लमखुल्ला आन्दोलन करके या पद ग्रहण करके जीवित रह सकती है। गांधीजी ने कांग्रेस को पद त्याग करने के लिए बाध्य किया और सत्याग्रह में भाग लेने से इन्कार किया। गांधीजी की इस कुछ न करने की नीति से कांग्रेस के गौरव पर जो चोट पहुंची वह गांधीजी और कांग्रेस के लिए अनर्थकारी सिद्ध हुई और गांधीजी ने यह दुस्साहसपूर्ण चाल इसलिए चली है कि उन्हें अपना पुराना स्थान मिल जाए। कांग्रेस दल के हितों के लिए यह चाल भले ही हितकर हो। किन्तु निश्चय ही यह ढंग देश-सेवा का नहीं है। इस समय गांधीजी की यह चाल शरारत से भरी हुई है और इससे देश को जरूर ही बड़ी हानि पहुंचेगी।

" इस देश को राजनीतिक उन्नति के लिए कांग्रेस पार्टी के सामने दो रास्ते हैं : (१) खुल्लमखुल्ला आन्दोलन करना और (२) उन सब दलों की सम्मिलित

मांग पेश करना जो देश के भिन्न भिन्न दलों के प्रतिनिधि करें। गांधीजी और कांग्रेस पहिले मार्ग पर चलने के लिए बड़े उत्सुक हैं। यह एक ऐसी योजना है जिसे तैयार करने के लिये सोचने की जरूरत नहीं। गांधीजी के सिवाय हर आदमी जानता है कि कुछ हद तक काम देने के बाद यह योजना बिलकुल बेकार हो जाती है और यदि यह सफल भी होती है तो ब्रिटिश सरकार नाजी सरकार की तरह पाशविक शक्ति का प्रयोग करने की आदी नहीं है और एक नैतिक आन्दोलन को दबाने के लिए ऐसी बातें नहीं करती जो नैतिक न हों।

'' गांधीजी यह बात न मानेंगे, किन्तु इसका कारण यही है कि सौभाग्य से उन्हें इसका कोई अनुभव नहीं है कि उनके आन्दोलन के साथ नाजी लोग कैसा बर्ताव करेंगे। नाजियों को गांधीजी के दमन करने में देर न लगेगी और वे यह सिद्ध कर देंगे कि उनका खुल्लमखुल्ला आन्दोलन शुरू होते ही समाप्त हो सकता है।

झुठे इलजाम

'' वह प्रश्न जिससे मैं परेशान हूं यह है कि गांधीजी केवल कांग्रेस केही बल पर खुल्लमखुल्ला आन्दोलन क्यों चलाते हैं जबकि वह इतना बेकार सिद्ध हो चुका है। वह दूसरे उपाय अर्थात् समस्त दलों में एकता कराने का प्रयत्न क्यों नहीं करते ? गांधीजी देश के विभिन्न दलों के नेताओं की एक कान्फरेंस क्यों नहीं बुलाते, और यदि उनकी मांगों के विषय में कोई झगड़ा है तो उनका निपटारा क्यों नहीं करते। यह ऐसा उपाय है जिसके लिये यत्न करने की जरूरत है यह भी राजनीतिज्ञों का एक ढंग है और एक ऐसा ढंग है जिससे जातियों में सदा के लिये शांति स्थापित हो जायगी। किन्तु गांधीजी ने कभी भी ऐसा यत्न नहीं किया और यह बात मेरी समझ में कभी नहीं आई कि उन्होंने यह समस्या इस प्रकार क्यों नहीं हल की। मेरी समझ में इस बात के, कि जब तक अंग्रेज भारत में हैं कोई समझौता नहीं हो सकता, दो ही अर्थ हो सकते हैं : (१) अल्प संख्यक जातियों के नेता अंग्रेजों के हाथ के खिलौने हैं या (२) कांग्रेस समझती है कि ब्रिटिश सरकार के चले जाने के बाद साम्प्रदायिक समझौते की बातचीत करना अच्छा होगा, क्योंकि कांग्रेस को, जिसके हाथ में उस समय शांति स्थापित करने का अधिकार होगा, अल्प संख्यक जातियों को अपनी शर्तें मनवाने तथा समझौता करने के लिये मजबूर करने का अच्छा मौका मिल जायेगा।

'' अगर इसका मतलब पहिली बात से है तो यह अल्प संख्यक जातियों के नेताओं के चरित्र पर एक बहुत बुरा और बेहूदा इल्जाम है। कांग्रेस को यह विचार

छोड़ देना चाहिये कि वही धर्म के पथ पर है और उसे यह बात मान लेनी चाहिये कि वे लोग भी जिनका उससे मतभेद हैं, यदि अधिक नहीं, तो कम से कम उतने ही देशभक्त हैं। मैं समझता हूं कि कांग्रेस और उसके समाचारपत्र बराबर अल्प संख्यक जातियों के नेताओं पर इस प्रकार जो मूर्खता से भरे हुए और निराधार इलजाम लगाते रहते हैं, उससे साम्प्रदायिक समझौते का प्रश्न और भी कठिन हो गया है। यदि इसका मतलब दुसरी बात से है तो निःसंदेह यह एक ऐसी चाल है जो धोखा देने के लिये चली गई है। इन दोनों ही बातों से मालूम होता है कि गांधीजी की राजनीतिज्ञता का दिवाला निकल गया है।

" गांधीजी की समझ में एक बात नहीं आई और उसे वह जितनी ही जल्दी समझ लें अच्छा होगा। उनके राजनीतिक गुण, जिनका बहुत ढिंढोरा पीटा गया, वे यह थे : हिंदू-मुस्लिम एकता स्थापित करना और अछूतों की सेवा करना। अब २० वर्ष बीतने पर न तो मुसलमान और न अछूत ही गांधीजी पर विश्वास करते हैं।

" गांधीजी के जीवन की यह सबसे बड़ी दुर्घटना है। जितनी ही जल्दी गांधीजी इस बात को समझ लें उतना ही अच्छा होगा। अभी गांधीजी अल्प संख्यकों के नेताओं को सलाह करने के लिये बुला सकते हैं। यह कहना बेकार है कि वे ऐसी मांगें पेश करते हैं, जो पूरी न की जा सकें क्योंकि गांधीजी जब भी चाहें अल्प संख्यकों से कह सकते हैं कि वे इस बात पर राजी हो जायें कि उनके मामले अन्तर्राष्ट्रीय पंचायत के पास फैसले के लिये भेज दिये जायें।

" साधारण जनता के लिये ऐसा कोई कारण नहीं कि वह गांधीजी के इस काम का समर्थन करें। यह काम न होना चाहिये था। कोई कारण नहीं कि अल्प संख्यक गांधीजी से मिलें, क्योंकि वह साफ और इमानदारी के साथ कोई ऐसा आश्वासन नहीं देते जिससे नये विधान में उनके हितों की रक्षा हो सके।

" हम ऐसे संकटपूर्ण समय में हैं कि गांधीजी के साथ केवल अपने मतभेद प्रकट करने से ही हमारा कर्तव्य नहीं पूरा होता। हमारा कर्तव्य यह है कि वे लोग जो गांधीजी के आन्दोलन में विश्वास नहीं करते ऐसे कार्य करें जिससे आन्दोलन आरम्भ न हो सके। क्योंकि मुसलमान और अछूतों ने सन् १९३० ई. के सविनय अवज्ञा आन्दोलन में कोई भाग नहीं लिया था फिर भी उन्होंने उसकी ओर उदार तटस्थता को नीति ग्रहण की थी। सन् १९३० ई. की स्थिति आज की स्थिति से भिन्न थी। सन् १९३० ई. के सविनय अवज्ञा आन्दोलन में केवल दो संभावनायें थी ; या तो राजनीतिक शक्ति अंग्रेजों के हाथ में रहती या भारतीयों के हाथ में

चली जाती। इस बात की कोई सम्भावना नहीं थी कि जापान या जर्मनी भारतवर्ष में आ जायेंगे और उसके मालिक बन जायेंगे। यह सम्भावना अब हमारे सामने है। यह पागलपन होगा अगर हमें ऐसे समय में जब कि बर्बर जातियां हमारे द्वार पर हैं और उनका इरादा न केवल अंग्रेजों को हराना है बल्कि हम लोगों को हमेशा के लिए गुलाम बना देना है, इस बात की चेष्टा करें कि यहां की शांति को भंग करें। जिस जन-आन्दोलन की गांधीजी ने इस समय धमकी दी है उसमें और सन् १९३० ई. के आन्दोलन में यही सबसे बड़ा अन्तर है।

" कांग्रेस और गांधीजी सारे देश की ओर से बोलने का दम भर रहे हैं। यह एक झूठा दावा है, परंतु किसी ने भी इस बात की परवाह न की कि उसका खंडन करे। इसका यह कारण है कि लोगों में यह भावना थी कि जब तक कांग्रेस देश के हितों को कोई हानि नहीं पहुंचाती तब तक कोई बात नहीं यदि वह राष्ट्र के नाम पर या अपने दल के नाम पर बोलने का दावा करती है। परन्तु उस समय जबकि कांग्रेस जो कि केवल एक दल है ऐसी नीति पर चलने को कह रही है जिससे देश की रक्षा और उसकी स्वतंत्रता भी खतरे में पड़ जाती है, दूसरे दलों का यह कर्तव्य हो जाता है कि वे अपनी उदार तटस्थता की नीति को छोड़ दें और कांग्रेस का विरोध करें।

" मैं चाहता हूँ कि भारत के लोक दो बातें समझ लें। सबसे पहिले वे यह समझ लें कि उनका भाग्य प्रजातंत्रवाद की नाजीवाद पर विजय के साथ जुड़ा हुआ है। दुसरी बात यह है कि प्रजातंत्रवाद की जीत होने पर संसार की कोई भी शक्ति यदि भारतवासी एक हो जाय भारत को आजाद होने से रोक नहीं सकती। मुझे विश्वास है कि गांधीजी को ऐसा काम करना ही न चाहिये था अगर प्रजातंत्रवाद की जीत होती है तो भारत की स्वतंत्रता के रास्ते में कोई भी रोड़े नहीं अटका सकता। भारतवासियों का इस समय सबसे बड़ा काम यह है कि वे इस बात की कोशिश करें कि प्रजातंत्रवाद की जीत हो। उन्हें ऐसा केवल सिद्धान्त के ही नाते न करना चाहिए। हमारा कर्तव्य है कि अपने देश के भविष्य के लिए हम ऐसा करें।

" गांधीजी वृद्ध हैं और जल्दी में हैं। भारतवासियों को सावधान हो जाना चाहिये कि कोई काम जल्दी में न करें जिसके लिए उन्हें पीछे पछताना पडे।"[1]

● ● ●

[1]: Printed by the Assistant Superintendent-in-charge, Government Branch Press, Lucknow.

१००

फसव्या राष्ट्रवादाच्या भुलथापांनी व पोकळ घोषणांनी कामगार-वर्ग फसला जावू नये

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा कामगार परिषदेस संदेश

हिंदी कामगार फेडरेशनचे वार्षिक अधिवेशन मुंबईत ता. २७, २८ व २९ डिसेंबर रोजी भरणार आहे. अधिवेशनानिमित्त वरळी येथे जेलजवळील मैदानांत मंगळवार ता. २८ डिसेंबर * रोजी संध्याकाळी ६॥ वाजता कामगारांची प्रचंड जाहीर सभा होणार आहे. हिंदी कामगार फेडरेशनच्या या अधिवेशनासाठीं हिंदुस्थान सरकारचे मजूर-मंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीं खालील संदेश पाठविला आहे :—

" मला या परिषदेला हजर राहातां येत नाही याबद्दल अत्यंत वाईट वाटते. हिंदी कामगार फेडरेशन ही संस्था ट्रेड युनियन कॉंग्रेसपेक्षां स्वतंत्र रीतीनें कामगार–परिषद भरवीत आहे यामुळें मला विशेष आनंद होत आहे. कामगारवर्गानें कामगारसंघांच्या मर्यादित कामांतच गुरफटून बसू नये असा धडा हिंदी कामगार फेडरेशनकडून कामगारांना मिळेल अशी मला आशा वाटते. तसेंच फसव्या राष्ट्रीयवादाच्या भुलथापांनीं व पोकळ घोषणांनीं कामगार-वर्ग फसला जावूं नये, कारण कामगारांची पिळणूक करणें हेंच अशा राष्ट्रीयवादाचें कार्य असतें. हे सत्य हिंदी कामगार फेडरेशनच्या या प्रयत्नामुळें कामगारांना पटेल, असा मला विश्वास वाटतो.

एम्. एन्. रॉय यांच्यासारख्या स्वतंत्र विचारांचा, खंबीर मनाचा व निर्भीड वृत्तीचा बुद्धिमान नेता कामगारांना मिळाला ही विशेष आनंदाची गोष्ट होय. एम्. एन्. रॉय यांच्या नेतृत्वाखाली कामगारांचा प्रबल राजकीय पक्ष निर्माण होईल, व देशाच्या अधिकारांचीं सूत्रे हातीं घेण्याइतका हा पक्ष बलवान होईल अशी मला आशा वाटते.

तुमची परिषद यशस्वी होवो !

(सही) बी. आर. आंबेडकर. "

---

* वर्ष दर्शविलेले नाही.

सदरहु परिषद मणिबेन कारा, स्वागताध्यक्ष, वार्षिक परिषद यांचे द्वारे आयोजित होती.

१०१

आम्हाला स्वातंत्र्य पाहिजे ! त्याच बरोबर गुलामगिरीला आम्ही ठोकरीने उडवणार !

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सत्याग्रहींना तेजस्वी संदेश देतात :—

" आमचे भांडण हे नेहमी तत्त्वासाठी असते. ६ कोटी अस्पृश्य समाजाच्या वतीने आमचे भांडण आहे. आम्हाला राजकीय संरक्षण पाहिजे आहे. हे राजकीय संरक्षण अशा तऱ्हेचे पाहिजे की, मूर्खांच्या हातून किंवा लबाडांच्या हातून आमचे काहीही नुकसान होता कामा नये. आमच्या चळवळीमध्ये मूर्खाला किंवा लबाडाला थोडादेखील वाव नाही. लुच्च्या-लफंग्याला जागा मिळणार नाही अशा तऱ्हेची चळवळ आम्हाला करावयाची आहे. इतर लोकांप्रमाणेच आम्हालाही स्वातंत्र्य पाहिजे. आम्हाला कोणाचीही-परकीयांची किंवा स्वकियांची गुलामगिरी पत्करायची नाही. आम्हाला स्वातंत्र्य पाहिजे आहे. परंतु त्याच बरोबर आम्हाला लोकशाहीदेखील पाहिजे आहे. "

" आपण सर्वांनी तन-मन-धन अर्पण करून आपल्या स्वातंत्र्ययुद्धात भाग घेतला पाहिजे. स्वार्थत्यागातच आपला विजय आहे. काँग्रेसचे लोक म्हणतात, ' झंडा उंचा रहे हमारा. ' आपण आपल्या झेंड्यासाठी लढले पाहिजे. कोणत्याही परिस्थितीत आपला झेंडा ' नीचा ' होणार नाही, यासाठी आपण सर्वांनी आत्मीयतेने झटले पाहिजे आणि आपला झेंडा सतत फडकवीत ठेवला पाहिजे. "[१]

---

१ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आत्मकथा—शंकरराव खरात, पृ. २७७.
जनता, दि. २७ जुलै १९४६ चौकटीतील मजकूर.

१०२

तरुणांनी दोन गोष्टी सिद्ध कराव्या !

ना. जोगेंद्रनाथ मंडल यांचे अध्यक्षतेखाली नागपूर येथे दिनांक २५ डिसेंबर १९४६ ला भरलेल्या अ. भा. दलित वर्ग विद्यार्थी परिषदेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संदेश पाठविला होता. तो येणेप्रमाणे--

" अखिल भारतीय शेड्युल्ड कास्टस् फेडरेशनहून वेगळें असें अखिल भारतीय शेड्युल्ड कास्टस् स्टूडंटस् फेडरेशनचे अधिवेशन भरवण्याचे तुम्ही ठरवले हें पाहून मला आनंद वाटत आहे. तुमचा हा विचार स्तुत्य आहे आणि मी त्याशीं सहमत आहे. मी नामदार मंडलाना याबाबत बोलून ठेवले आहे; तें तुमच्या अधिवेशनला निश्चितपणे अध्यक्ष म्हणून उपस्थित राहतील. मला तुमच्या अधिवेशनाला हजर राहाता आले असते तर बरे झाले असते; पण ते शक्य दिसत नाही. परंतु तुमचें हें अधिवेशन उत्तमरित्या पार पडेल अशी शुभेच्छा मी व्यक्त करतो.

आपल्या तरुणांनीं दोन गोष्टी शिकल्या पाहिजेत. पहिली म्हणजे योग्य संधी मिळालीं असता आमचे तरुण बुद्धीमत्ता आणि कर्तव्य यामध्ये कुणालाही हार जाणार नाहींत. दुसरी म्हणजे, वैयक्तीक सुखाच्या पाठीमागे आमचा तरुण वर्ग नसून तो आपली जमात स्वतंत्र, कर्तृत्ववान बनावी आणि इतरांकडून मान्यता मिळवणारी व्हावी यासाठीं ते प्रयत्न करीत आहेत ; हे त्यांनीं सिद्ध करून दाखविलें पाहिजे. जर हें अधिवेशन आमच्या तरुणांना ह्या दोन गोष्टी पटवून देईल तर ते सार्थकी लागले असे म्हणावयास हरकत नाही.

आणि ते तसे पटवून देईल असा मला विश्वास आहे.

मी आपणास सुयश इच्छितो. ''

• • •

गरूड, दिनांक ९ फेब्रुवारी १९४७.

१०३

ज्या लोकांमध्ये आपला जन्म झाला त्यांचा उद्धार करणे आपले कर्तव्य

नवयुग : आंबेडकर विशेषांकासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांसाठी दिलेला संदेश

' माझ्या पंचावन्नाव्या वाढदिवशी तुम्ही खास अंक काढीत आहात. त्यासाठी तुम्हांला संदेश पाहिजे आहे. आपल्या या हिंदुस्थानामध्यें राजकीय पुढाऱ्याला अवतारी पुरुषाप्रमाणें मान दिला जातो ही दुर्दैवाची गोष्ट आहे. हिंदुस्थानाबाहेर केवळ महापुरुषांच्याच जयंत्या साजऱ्या केल्या जातात. पण हिंदुस्थानांत अवतारी पुरुष आणि राजकीय पुरुष या दोघांचेही जन्मदिवस पाळले जातात. हें असें असावें ही दुःखाची गोष्ट आहे. व्यक्तिशः माझा वाढदिवस साजरा व्हावा हे मला मुळींच आवडत नाही. मी लोकशाहीचा कट्टर पुरस्कर्ता आहे. मला विभूतिपूजा कशी आवडेल ? विभूतिपूजा हा लोकशाहीचा विपर्यास आहे. पुढारी लायक असेल तर त्याबद्दल कौतुक, प्रेम, आदर ह्या भावना बाळगायला हरकत नाही. तथापि तेवढ्यानेच त्या पुढाऱ्यांचे आणि त्यांच्या अनुयायांचे समाधान व्हावयास हवे. पण पुढाऱ्यांची देवाप्रमाणे पूजा करणें ही गोष्ट मला बिलकूल मान्य नाही. त्यामुळे त्या पुढाऱ्याबरोबर त्याच्या भक्तांचाही अधःपात होतो. पण हे ह्या ठिकाणी सांगून काय फायदा ? राजकीय पुढाऱ्याला अवतारी पुरुषांच्या आसनावर एकदा चढवून बसविले म्हणजे त्याला तें आपलें सोंग उत्तम तऱ्हेने पार पाडलेच पाहिजे आणि आपल्या अनुयायांना संदेश हा दिलाच पाहिजे !

अस्पृश्यांना मी काय संदेश देऊ बरे ? संदेश देण्याऐवजी मी त्यांना ग्रीक पुराणांतील एक गोष्ट सांगतो. डिमेटर ह्या ग्रीक देवतेवर होमरने लिहीलेल्या स्तोत्रांत ही गोष्ट आलेली आहे.

'' ही डिमेटर देवी आपल्या मुलीच्या शोधार्थ हिंडत केलीओसच्या राज्यांत आली. तिनें दाईचा वेष घेतला होता. म्हणून तिला कोणी ओळखले नाही. राणी मेहोनैराने आपले ' डिमोफून ' नांवाचे तान्हे मूल सांभाळण्यासाठी तिची नेमणूक केली. रोज रात्री राजवाड्यांतली सर्व मंडळी झोपली म्हणजे दारे बंद करून डिमेटर देवी ह्या मुलाला पाळण्यांतून हळूच बाहेर काढी आणि त्याचे कपडे उतरून

ती त्याला जळत्या निखाऱ्यावर ठेवी. ऐकणाराला कदाचित हे क्रूर वाटेल. पण त्या लहान मुलाला ' देव ' करण्याच्या महान तळमळीनें आणि प्रेमानें ती हे करीत असे. हळूहळू जळत्या निखाऱ्याची धग सहन करण्याचे सामर्थ्य त्या मुलामध्ये उत्पन्न झालें. त्याचे बळ वाढूं लागले. त्याच्यामध्ये कांही तरी तेजस्वी, दिव्य, अतिमानुष अंश विकसित होऊं लागला. पण एके रात्री त्याची आई एकाएकी खोलीत शिरली आणि आपल्या मुलाचा ' नारायण ' करण्याचा देवतेने चालविलेला तो प्रयोग बघतांच तिने त्या देवतेला ढकलून दिले. आणि निखाऱ्यावरून मूल एकदम उचलले. अर्थात तिचे मूल तिला मिळाले, पण एका अतिमानुष पुत्राला, एका देवाला मात्र ती मुकली. ''

ही गोष्ट काय सांगते ? हेंच की, विस्तवातून गेल्यावाचून पौरुष किंवा देवपण प्राप्त होत नाही ! अग्नीमधून गेल्यावाचून माणसाची शुद्धी होत नाही. आणि त्याचे बळ वाढत नाही. म्हणून पददलित माणसांना हालअपेष्टांच्या आणि त्यागाच्या अग्निदिव्यांतून गेल्यावांचून मोठेपणा प्राप्त होणार नाही ! आपला भविष्यकाळ घडविण्यासाठी त्यांना ' वर्तमानकाळातील सुखांचा आणि गरजांचाही त्याग करावयाला पाहिजे.' बायबलमध्ये सांगितले आहे कीं, आयुष्याच्या शर्यतीत भाग घेण्याचे आमंत्रण सर्वांना येते, पण फार मोठे लोक त्यातून उत्तीर्ण होतात, असे कां ? त्याचें कारण हेंच कीं भविष्याच्या गरजेसाठी वर्तमानातल्या विलासांचा त्याग करायला लागणारे धैर्य किंवा निर्धार पद्दलित माणसाजवळ नसतो. म्हणून आयुष्याच्या शर्यतीमध्ये त्यांना मोठेपणा मिळत नाही. ह्या ग्रीक गोष्टीपेक्षां अधिक महान संदेश कोणता आहे ? माझ्या मते अस्पृश्यांना तर हा सर्वोत्कृष्ट संदेश आहे. त्यांच्या झगड्यांची आणि हालांची मला जाणीव आहे. स्वातंत्र्य मिळविण्यासाठी माझ्याहीपेक्षा त्यांनी छळ सोसला आहे. असें असूनही मी त्यांना हाच संदेश देतो आहे की, ' झगडा, आणखी झगडा, त्याग करा, आणखी त्याग करा. त्यागाची आणि हालाची पर्वा न करतां एकसारखा झगडा चालू ठेवाल तरच तुम्हाला मुक्ति मिळेल !' जागे होऊन प्रतिकार करण्याची अस्पृश्यांची सामुदायिक इच्छाशक्ति वाढली पाहिजे ! आपले कार्य पवित्र आहे यावर त्यांचा दृढ विश्वास पाहिजे. आपलें ध्येय हस्तगत करण्याचा त्यांनी संघटितपणे निर्धार केला पाहिजे. अस्पृश्यांचे कार्य इतके महान आहे, आणि त्यांचे ध्येय इतके उदात्त आहे की, त्यांनी एकमुखाने अशी प्रार्थना करावी की : ''ज्या लोकांमध्ये आपला जन्म झाला त्यांचा उद्धार करणें आपलें कर्तव्य आहे अशी ज्यांना जाणीव आहे ते धन्य होत ! गुलामगिरीवर हल्ला चढविण्यासाठी जे आपले तन, मन, धन आणि तारुण्य कुर्बान करतात ते धन्य होत.

आणि अस्पृश्यांना आपली माणुसकी पूर्णपणे मिळेपर्यंत जे झन्याची, वाईटाची, सूखाची, दुःखाची, संकटाची, गदळाची, मानाची, अपमानाची पर्वा न करता एकसारखे झगडत राहतील ते धन्य होत !"[१]

* * *

[१] : नवयुग, आंबेडकर विशेषांक, १३ एप्रिल १९४७.

१०४

परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा 'अरुण' साठी संदेश

'श्री. गं. म. ठवरे यांच्या प्रयत्नामुळे नागपूरला 'अरुण' नांवाचे मराठी साप्ताहिक सुरू होत आहे, यात मला आनंद वाटतो. विशेषतः मुंबईच्या 'जनता' पत्राचे प्रकाशन बंद झाल्यामुळे दलित वर्गाला वरील साप्ताहिकाची फारच आवश्यकता आहे. मध्यप्रांत आणि वऱ्हाडात तर वृत्तपत्राची गरज प्रामुख्याने भासत आहे. वेळोवेळीं उपस्थित होणाऱ्या अनेक प्रश्नांसंबंधी जनतेला योग्य मार्गदर्शन करण्याची जबाबदारी हे वृत्तपत्र उत्तम तऱ्हेने पार पाडील अशी आशा आहे. माझ्या दलितवर्गाने 'अरुण' ला पूर्ण सहकार्य द्यावे, अशी माझी हार्दिक इच्छा आहे.

राजगृह, दादर : बी. आर. आंबेडकर.
मुंबई ता. २९ मे १९४७ '[१]

●●●

---

[१] : साप्ताहिक अरुण, नागपूर-संपादक ना. खं. तिरपुडे, बी. ए., एल. एल. बी. (वकील) सोमवार दिनांक ९ जून १९४७.

१०५

बुवांच्या निधनाची वार्ता ऐकून धक्काच बसला

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीतील अत्यंत एकनिष्ट कार्यकर्ते जी. एम. जाधव उर्फ मडके बुवा यांचे रविवार दिनांक २८ मार्च १९४८ पहाटे हृदय विकाराने निधन झाले. त्यांच्या प्रेत यात्रेला साठ हजार जन समुदाय होता. यावरून त्यांचे विषयी दलित समाजात असलेले स्थान स्पष्ट होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना ही दुःखद बातमी फोन द्वारे दिल्लीला त्वरीत कळविण्यात आली. या प्रसंगी बाबासाहेब आंबेडकरांनी शोक संदेश पाठविला, तो असा–

मडकेबुवांच्या निधनानिमित्त

डॉ. बाबासाहेबांचा शोक संदेश

''बुवां[†]च्या निधनाची वार्ता ऐकून धक्काच बसला. अस्पृश्यांचा एक मोठा कार्यकर्ता; कामगारांचा एक मोठा ट्रेड युनियानिस्ट; आणि शेड्युल्ड कास्ट्स फेडरेशनचा एक प्रभावी संघटक, नाहींसा झाला आहे. मी अशी इच्छा व्यक्त करतो कीं, हा संदेश बुवांच्या प्रेतयात्रेच्या लोक-समूहांत वाचून दाखविण्यात यावा. (बुवांच्या निधनानें ओढविलेल्या) आपत्तीत मी सहभागी असल्याचे त्यांच्या पत्नीस कळवा.

डॉ. आंबेडकर

[†] पाहा परिशिष्ट क्रमांक : २१

जनता : ता. ३ एप्रिल १९४८

१०६

बुद्ध व त्याच्या धम्माचे भवितव्य

१९५० च्या वैशाख पौर्णिमेच्या निमित्ताने कलकत्त्याच्या महाबोधी सोसायटी† ने त्यांच्या 'महाबोधी' ह्या मासिकात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा " Buddha and the future of his Religion " शीर्षकाखाली लेख प्रकाशित केला होता. त्या लेखाचा मराठीत केलेला हा मुक्त अनुवाद.

"पृथ्वीतलावर जेवढे म्हणून धर्म संस्थापक होऊन गेले आहेत, त्या सर्वांमध्ये केवळ चौघांनीच भूतकाळ गाजविलेला आहे; एवढेच नव्हे तर वर्तमानकाळ सुद्धा खडबडून जागा केलेला आहे; आणि आपल्या धर्ममतांचा पगडा जनमानसावर कायमचा बसविलेला आहे. बुद्ध, खिस्त, महंमद व कृष्ण हेच ते चार धर्मप्रमुख व धर्मप्रसारक होत. ह्या चौघांच्या व्यक्तिमत्त्वांची व धर्मप्रसारपद्धतींची तुलनात्मक छाननी केली तर परस्परांत मात्र बराच विरोध आढळून येतो.

आत्मस्तुती व अहंभाव यांच्यापासूनची अलिप्तता हे खास वैशिष्ट्य चौघांमध्ये फक्त तथागत बुद्धाच्याच बाबतीत प्रकर्षाने उठून दिसते. बायबलचे वाचन केले तर त्यात सर्वत्र येशू खिस्ताने स्वतःला परमेश्वराचा खास पुत्र म्हणवून घेतल्याचे व जो कोणी त्याला मानणार नाही अशा व्यक्तीस आकाशातील देवांच्या राज्यात प्रवेश करता येणार नाही असे सांगितल्याचे आढळून येते.

महंमद पैगंबराने खिस्तापेक्षा एक पाऊल पुढे टाकले आहे. त्याने स्वतःला अल्लाचा (परमेश्वराचा) प्रेषित किंवा दूत म्हणवून घेतले आहे; आणि तो सुद्धा शेवटचाच. त्याच्यानंतर कोणीही ईश्वराचा प्रेषित असणार नाही किंवा होणार नाही. आणि म्हणून ज्या कोणाला संसारापासून मुक्ती हवी असेल व जन्नत (स्वर्ग) पाहिजे असेल त्याने कोणतीच आशंका न बाळगता महंमद पैगंबरालाच मानले पाहिजे असे त्याने निक्षून सांगितले आहे.

श्रीकृष्णाने तर येशू खिस्त व महंमद पैगंबर ह्या दोघांवरही ताण केली आहे. ईश्वराचा पुत्र किंवा शेवटचा दूत वगैरे असे काही एक न म्हणवून घेता किंवा मी देव आहे असेही न म्हणवून घेता श्रीकृष्णाने स्वतःलाच परमेश्वर म्हणजेच देवाधिदेव (देवांचा देव) म्हणवून घेतले आहे. यास्तव सर्वांनी केवळ त्याचीच पूजा करावयास पाहिजे; त्यालाच भजावयास पाहिजे. म्हणजे सगळ्यांना मुक्ती प्राप्त होऊन स्वर्गलाभ होईल असे त्याने सांगितले आहे.

---

† पाहा, परिशिष्ट क्रमांक : २२

परंतु तथागत बुद्धाने ह्या असल्या कोणत्याच गोष्टीचे प्रतिपादन केलेले नाही. ख्रिस्त, पैगंबर किंवा कृष्ण यांच्या सारखा अंहभाव बुद्धाने मुळीच बाळगलेला नाही किंवा आत्मप्रौढीही गाइलेली नाही. बुद्धाने केवळ आपण एक मानवपुत्र असल्याचे सांगून सर्व साधारण माणूस म्हणूनच त्याने आपल्या धर्ममतांचा व तत्त्वज्ञानाचा प्रसार केलेला आहे. इतरांसारखे त्याने स्वतःचे मुळीच दैवीकरण केलेले नाही किंवा आपण अलौकिक चमत्कार केलेले आहेत असे लोकांना सांगून त्यांना भुरळ पाडण्याचा किंवा त्यांची वंचना करण्याचा अल्पसाही प्रयत्न केलेला नाही. तथागत बुद्धाने 'मार्गदाता' व 'मोक्षदाता' यांत अगदी स्पष्ट असा फरक केलेला आहे. आम्ही सांगितल्याप्रमाणे वागाल तरच तुम्हाला मुक्ती मिळेल, स्वर्ग मिळेल, अशी भूमिका ख्रिस्त, पैगंबर व कृष्ण ह्यांनी घेतलेली आहे. उलट मी केवळ एक मार्गदर्शक आहे, त्याप्रमाणे वागणे न वागणे हे तुम्हीच ठरवायचे आहे माझी तुमच्यावर कोणतीच बळजोरी नाही, अशी भूमिका तथागत बुद्धाची आहे. बुद्धाने आपले म्हणणे लोकांनी मानावे म्हणून ख्रिस्त, पैगंबर किंवा कृष्ण यांच्यासारखी मोक्षाची, स्वर्गाची किंवा मुक्तीची लालूच दाखविलेली नाही. जीवनातील दुःख नष्ट करून सुखप्राप्ती प्रत्येक मनुष्याला करून घेता येते. यावरच तथागत बुद्धाने भर दिलेला आहे.

अजून एक महत्त्वाचा फरक या चौघांत आढळून येतो. ख्रिस्त व पैगंबर हे स्वतःला अनुक्रमे परमेश्वराचा एकुलता एक पुत्र व खास दूत म्हणवून घेत असल्याने त्यांनी सांगितलेले प्रत्येक वचन देवाच्या मुखातील आहे; प्रत्यक्ष देवाने त्यांना सांगितलेले आहे, असा ते दावा करतात. यास्तव ते वचन कधीही खोटे असू शकत नाही आणि म्हणून ख्रिस्ताने किंवा पैगंबराने सांगितलेल्या वचनांवर जगातील कोणत्याही व्यक्तीने अविश्वास दाखवू नये किंवा आशंका बाळगू नये असा आग्रह ते दोघेही करतात. कृष्णाच्या बाबतीत सारेच काही निराळे आहे. कृष्ण हा स्वतःलाच परमेश्वर म्हणवून घेत असल्याने त्याने सांगितलेले प्रत्येक वचन अंतीम सत्य होय आणि म्हणून ते शंकातित आहे, अचूक आहे, असा तो आदेश देतो. परंतु तथागत बुद्धाने असा कोणताच दावा केलेला नाही.

'महापरिनिर्वाण सुत्ता' मध्ये तथागत बुद्धाने आनंदाला सांगितले आहे की, माझा धम्म बुद्धिवादावर व अनुभवावर आधारित आहे आणि म्हणून माझ्या अनुयायांनी मी सांगतो म्हणून सत्य आहे असे समजून अंधानुकरण करू नये, बुद्धिप्रामाण्य व अनुभव हा माझ्या धम्माचा मूलभूत पाया असल्याने कालमानानुरूप व परिस्थितीनुसार त्याच्यात त्यांना बदल करता येतो. एवढेच नव्हे तर माझी जी

मते कालाशी अनुरूप व परिस्थितीशी सुसंगत वाटत नसतील ती मते त्यांना टाकूनही देता येतात. याच कारणामुळे तथागत बुद्धाने बौद्ध धर्म शुष्क, काष्ठ न समजता तो सदाहरित व चिरतरुण मानला जावा, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. त्यासाठी त्याने आपल्या अनुयायांना नितांत गरज भासेल तेव्हा बौद्धमते परिवर्तनशील करण्यास पूर्णपणे स्वातंत्र्य प्रदान केलेले आहे. असे स्वातंत्र्य दुसऱ्या कोणत्याच धर्मगुरूने आपल्या अनुयायांना दिलेले नाही. किंवा तसे स्वातंत्र्य देण्याचे धाडसही दाखविलेले नाही. कारण त्यांना भीती वाटली असावी की, अशा मुक्त स्वातंत्र्याने त्यांनी प्रस्थापित केलेल्या धर्ममतांचा डोलाराच नेस्तनाबूत होईल व त्यांचे नामनिशाण सुद्धा राहणार नाही. परंतु, अशी भीती बुद्धाला कधीही वाटली नाही. त्यांच्या धर्ममतांची इमारतच मुळात भक्कम अशा पायावर आधारलेली होती. जगातील कोणताच वैचारिक झंजावात आपल्या धम्माला जमीनदोस्त करू शकणार नाही, ह्याची बालंबाल खात्री बुद्धाला होती. हेच तथागत बुद्धाच्या अद्वितीय व्यक्तिमत्त्वाचे निदर्शक होय.

बुद्धाचे असाधारण व्यतिमत्व समजून घेतल्यावर बुद्धाच्या धम्माची विचारसरणी काय होती, बुद्ध तत्त्वज्ञान कसे होते आणि आजच्या प्रस्थापित धर्मांच्या तुलनेत बौद्ध धर्माचे काय स्थान आहे हे समजावून घेणे अत्यावश्यक आहे.

भारताच्या संबंधात विचार करताना बौद्धधर्म व हिंदुधर्म यांच्या तुलनेत मोजक्या व प्रमुख बाबींमध्ये फक्त दोनच मुद्यांचा परामर्श घेणे उचित ठरेल. हे दोन मुद्दे म्हणजे धर्मविषयक कर्मकांड व चातुर्वर्ण्यव्यवस्था हे होत.

हिंदू धर्माचा अभ्यास केल्यावर जी बाब प्रकर्षाने जाणवते ती ही की, नीतिमत्ता हिंदू धर्माची आधारशिला नाही. जी काही थोडीफार नीतिमत्ता हिंदू धर्माशी निगडित असलेली आढळते, ती हिंदू धर्माचा अविभाज्य असा घटक नाही. 'धर्म' ह्या प्रचलित शब्दाच्या अर्थामध्येच मूलतः नीतिमत्तेला स्थान नाही. नीतिमत्तेचा संबंध समाज स्वास्थ्याशी निश्चितच लावलेला आहे; परंतु, हिंदू धर्माशी लावला गेलेला नाही. ही अत्यंत आश्चर्यकारक बाब आहे. उलट बौद्ध धर्म हा मूलतःच नीतिमान् धर्म मानला गेला आहे. नीतिमत्ता ही बौद्धधर्माची सर्वप्रथम व प्रमुख अशी आधारशिला मानली गेली आहे. इतर धर्म ईश्वराला धर्माचे प्रमुख व मूलभूत अंग मानतात. परंतु, बौद्ध धर्मात ईश्वराला मुळी स्थानच नाही. ईश्वराचे स्थान बौद्ध धर्मात नीतिमत्तेने पटकावलेले आहे. जे प्राधान्य इतर साऱ्या धर्मांनी ईश्वराला दिले आहे त्याहून काकणभर जास्त प्राधान्य बौद्ध धर्माने नीतिमत्तेला व नीतितत्त्वांना दिलेले आहे.

'धम्म' या शब्दात बुद्धाने जो क्रांतिप्रवण असा विचार अंतर्भूत केलेला आहे तोच मुळी इतर धर्मांकडून डावलला गेला आहे, दृष्टिआड केला गेला आहे. वैदिकांनी योजलेला 'धर्म' हा शब्द सर्वार्थाने बुद्धाच्या 'धम्म' ह्या शब्दापासून भिन्न आहे. नैतिक मूल्यांशी निगडित असलेला अर्थ वैदिकांच्या 'धर्म' या शब्दाशी केव्हाही सूत्रबद्ध नाही. ईश्वराशी संबंधित धर्मकांड करणे किंवा रोमन पुरोहिताच्या जपजाप्याशी निगडित असलेल्या पारिभाषिक अर्थाने विधी करणे म्हणजे धर्म होय असे ब्राह्मणांनी व पूर्वमीमांसाकार जैमिनी ह्याने धर्माचा अर्थ केलेला आहे. ब्राह्मणांच्या धर्म ह्या कल्पनेनुसार ईश्वरास संतुष्ट करण्यासाठी यज्ञयाग करून बलिप्रदान करणे व जपजाप्यादी पूजाअर्चा करणे, हे सर्व धर्मकांड धर्माशी बद्ध असल्याने ब्राह्मणी धर्माचा किंवा वैदिक धर्माचा नीतिमत्तेशी सुतराम संबंध येत नाही.

यांच्या अगदी उलट बुद्धाने धम्माचा अर्थ केलेला आहे. पूजाअर्चा, जपजाप्य, यज्ञयाग इत्यादी ईश्वर विषयक कर्मकांडाशी बुद्धाने सांगितलेल्या धम्माचा काडीचाही संबंध येत नाही. ईश्वरविषयक सारे कर्मकांड करणे म्हणजेच धर्म होय हे बुद्धाने सपसेल नाकारले आहे. ईश्वर विषयक कर्मकांडाऐवजी तथागताने आचारशीलेची प्रतिष्ठापना धर्माचा गाभा म्हणून केलेली आहे. ब्राह्मण आचार्य व तथागत बुद्ध ह्या दोघांनी जरी धर्म हा एकच शब्द वापरला असला तरी दोघांच्याही मूलभूत अर्थामध्ये मात्र वर निर्देशिल्याप्रमाणे फरक आहे. तथागत बुद्ध हाच असा एक धर्मवेत्ता होऊन गेलेला आहे की ज्याने नीतितत्त्वांना धर्माचा एक आधारभूत पाया मानलेला आहे.

भगवद्गीतेचा अभ्यास केला म्हणजे असे दिसून पडते की, कृष्णसुद्धा स्वतःला पारंपारिक धार्मिक विधी व जपजाप्य इत्यादी कर्मकांडापासून अलिप्त ठेवू शकला नाही. उलट त्याने भगवद्गीतेत उपदेशिल्याप्रमाणे निष्काम कर्माची किंवा अनासक्ती योगाची लोकांच्या मनावर भुरळ पाडून कर्मकांडाचाच उदोउदो केलेला आहे. बालवीर (स्काउट) जसा कोणत्याही मोबदल्याची अपेक्षा न करता परोपकार करतो, तशा अर्थाचे निष्काम कर्म ह्या शब्दाची व्याख्या आहे असे म्हटले जाते. परंतु निष्काम कर्माचा हा अर्थ, तो शब्द मुळात ज्या अर्थाने वापरला गेला, त्या अर्थापासून दिशाभूल करणारा आहे. निष्काम कर्म ह्या शब्दयोजनेतील 'कर्म' हा शब्द उदात्त भावनेने वापरल्या जाणाऱ्या परोपकार कृत्य ह्या अर्थाने मुळीच वापरला गेला नाही. तर तो शब्द ब्राह्मणांनी किंवा जैमिनीने योजलेल्या ईश्वरविषयक आचार ह्या अर्थाने वापरला गेला आहे. धार्मिक विधींच्या दृष्टिकोनातून पूर्वमीमांसाकार जैमिनी व भगवद्गीताकार कृष्ण ह्या दोघांनी फक्त एकाच बाबीत मतभेद व्यक्त केलेला आहे.

धार्मिक जपजाप्याच्या व पूजाअर्चेच्या विधीमध्ये ब्राह्मणांनी दोन विभाग केलेले आहेत. एक नित्य कर्म व दुसरे नैमित्तिक कर्म. दररोज व नियमित स्वरूपात केल्या जाणाऱ्या विधी नित्य कर्मात मोडल्या गेल्या, त्यांची सांगड कोणत्याच फलाशी घातली गेली नाही. ह्याच कारणास्तव त्यांना निष्काम कर्म म्हटले गेले. उलट ज्या विधी कोणत्या तरी खास निमित्ताने केल्या जात त्यांना नैमित्तिक कर्म म्हटले गेले. मनामध्ये जेव्हा कोणत्या तरी फलाची अपेक्षा धरली जात असे किंवा इच्छा केली जात असे तेव्हाच ही नैमित्तिक कर्मे केली जात. म्हणूनच त्यांना 'कामायकर्म' असेही म्हटले गेले. भगवद्गीतेत कृष्णाने ज्या कर्माचा धिक्कार केलेला आहे तेच हे कामायकर्म होय. फलाच्या अपेक्षेने न केल्या जाणाऱ्या जपजाप्यादी नित्य कर्माचा म्हणजेच निष्काम कर्माचा कृष्णाने कधीही निषेध केलेला नाही. उलट त्याने त्यांचे गुणगानच गाइले आहे. निष्काम कर्माच्या संबंधात कृष्णाची विचारसरणी लक्षात घेता असाच निष्कर्ष काढावा लागतो की, पूजाअर्चा, जपपाप्य ही नित्यकर्मे करण्यासाठी कृष्णाने नैतिक आचारावर कदापि भर दिलेला नाही. कृष्णाच्या दृष्टिकोनातून धर्म ही नैतिक बाब नसून नुसते कर्मकांडच आहे; आणि तेही कर्मकांड असे की, ज्याचा निष्काम कर्माशी काडीचाही संबंध नाही अशा प्रकारचा जपजाप्य किंवा यज्ञयाग होय.

दुसरा एक महत्त्वाचा फरक बौद्धधर्म व हिंदुधर्म यात आहे. हिंदुधर्म हा असमानतेचा पुरस्कार करणारा आहे. हिंदू धर्माने मान्य केलेली चातुर्वर्ण्य समाजपद्धती हीच असमानतेची मूलभूत आधारशिला आहे. चातुर्वर्ण्य समाजपद्धतीमुळेच जातीभेद निर्माण होऊन उच्चनीचतेची भावना लोकात दृढ झाली. अगदी ह्या उलट समतेचा पुरस्कार करण्यासाठी बुद्ध उभा ठाकला. त्याने चातुर्वर्ण्याविरूद्ध केवळ आवाजच उठविला नाही, तर त्याने एक महान असा लढाही पुकारला व चातुर्वर्ण्याची पाळेमुळे खणून काढण्याचा आटोकाट प्रयत्न केला.

हिंदु धर्मशास्त्रानुसार शूद्रांना व स्त्रियांना विद्या देण्याचे नाकारले गेले आहे. एवढेच नव्हे तर संन्यास घेण्याचा अधिकार सुद्धा त्यांना नाकारला गेला आहे. परंतु बुद्धाने असे कोणतेच बंधन घातलेले नाही; किंवा कुणाला मज्जावही केलेला नाही. त्याने आपल्या भिक्खुसंघात इतरांबरोबर शूद्रांना सुद्धा सामील करून घेतले. त्याने चातुर्वर्ण्याचा कोणताच पंक्तिप्रपंच केला नाही. एवढेच नव्हे तर त्याने स्त्रियांचा सुद्धा भिक्खुणी संघ स्थापना केला व त्यांनाही पुरुषांबरोबर समानतेचा अधिकार दिला. अशाप्रकारे असमानतेवर आधारलेल्या चातुर्वर्ण्याचा बिमोड करून व समानतेचा पुरस्कार करून बुद्ध जेव्हा आपल्या धर्ममतांचा प्रभाव

लोकांवर पडू लागला तेव्हा साहजिकच हिंदू धर्माला आपले अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी फार आटापिटा करावा लागला. त्यासाठी हिंदू धर्माला हिंसेचा त्याग करून बुद्धाने पुरस्कारलेली अहिंसा आत्मसात करावी व मांस भक्षणाचा त्याग करावा लागला. एवढेच नव्हे तर वेदप्रामाण्यालाही झुगारून देण्यास हिंदू धर्माने सिद्धता दर्शविली. परंतु चातुर्वर्ण्यावरील पकड मात्र सोडावयास हिंदू धर्म तयार होऊ शकला नाही. बुद्धाला चातुर्वर्ण्यपद्धती मान्य नसल्याने तो सतत प्रतिकार करीत राहिला. ह्याच कारणास्तव जैन धर्मापेक्षा बौद्ध धर्माचा व बुद्धाचा हिंदू धर्मियांनी सदोदित द्वेष केला व वैरभाव बाळगला. चातुर्वर्ण्याविरुद्ध बुद्धाने उठविलेला आवाज दाबून टाकण्यासाठी हिंदू धर्माने तार्किक दृष्टिकोनातून नव्हे तर तात्त्विक दृष्टिकोनातून चातुर्वर्ण्याचे समर्थन करण्यास सुरवात केली. ह्या नाविण्यपूर्ण समर्थनाची उभारणी सर्वप्रथम भगवद्‌गीतेत करण्यात आली.

भगवद्‌गीता निश्चित कशाचा उपदेश करते हे कोणालाच नीट सांगता येत नाही. परंतु हे मात्र निश्चित आहे की, भगवद्‌गीता चातुर्वर्ण्याचे पुरेपूर समर्थन करते. वस्तुतः भगवद्‌गीता लिहिण्यामागे चातुर्वर्ण्याचा पुरस्कार करण्याचा प्रमुख हेतू आहे. भगवदगीतेने चातुर्वर्ण्याचे समर्थन अशा कोणत्या नाविन्यपूर्ण पद्धतीने केलेले आहे ?

कृष्ण म्हणतो, ''मी स्वतः परमेश्वर असल्याने ह्या चातुर्वर्ण्याची उभारणी मीच केलेली आहे. ती गुणकर्माच्या तत्त्वप्रणालीवर आधारित आहे.'' याचाच अर्थ असा की, प्रत्येक मनुष्याचे समाजातील स्थान व त्याचा व्यवसाय त्या त्या मनुष्याच्या अंगीभूत गुणावर ठरविण्यात आलेला आहे. यावरून दोन गोष्टी उघडकीस येतात.

पहिली गोष्ट अशी की, गुणकर्मशः आधारित चातुर्वर्ण्यपद्धती ही नवीन तत्त्वप्रणाली म्हणून मांडली गेली आहे. पुरातन तत्त्व प्रणालीनुसार चातुर्वर्ण्य वेदप्रामाण्यावर आधारलेले आहे. वेद हे ईश्वरप्रणीत व अपरिवर्तनीय मानले गेले आहेत. त्यामुळे वेदातून सांगितलेले चातुर्वर्ण्यसुद्धा ईश्वरप्रणीत व अपरिवर्तनीय मानले गेले आहे. बुद्धाने वेदाच्या अपौरुषेयत्त्वावर व अपरिवर्तनशीलतेवर प्रहार केल्यामुळे पर्यायाने चातुर्वर्ण्यावर सुद्धा प्रत्याघात करून त्याचा पुरातन पायाच उखडून टाकलेला आहे. याच कारणास्तव अविभाज्य वाटणाऱ्या चातुर्वर्ण्याला टिकविण्यासाठी हिंदू धर्माला भगवद्‌गीतेने पुरस्कारलेल्या तत्त्वप्रणालीचा नवीन व भक्कम आधार घेणे क्रमप्राप्त झाले. परंतु कृष्णाने भगवद्‌गीतेत सांगितलेल्या ह्या नव्या तत्त्वाप्रणालीचे समर्थन कितपत योग्य आहे ? बऱ्याच हिंदू धर्मियांना ही तत्त्वप्रणाली अत्यंत समर्थनीय व निरुत्तर

करणारी वाटते. एवढेच नव्हे तर अहिंदूंना सुद्धा ती सत्य व विलोभनीय वाटते. चातुर्वर्ण्य हे केवळ वेदप्रामाण्यावर अवलंबून ठेवले गेले असते तर ते कधीचेच पूर्णपणे रसातळाला गेले असते. अशी माझी पक्की खात्री आहे. भगवद्गीतेने केलेले शाश्वत जीवनाचा सत्याभास निर्माण करणारे चातुर्वर्ण्याचे नवे समर्थन अत्यंत दिशाभूल करणारे व चुकीचे आहे. कारण ह्या नव्या समर्थनानेच जातीसंस्थेला जन्म दिलेला आहे.

चातुर्वर्ण्याचा हा नवीन सिद्धांत मुळातून सांख्य दर्शनापासून घेतलेला आहे. श्रीकृष्णाने तो काही मूलभूत असा सांगितलेला नाही. चातुर्वर्ण्याला पाठबळ देण्यासाठी त्याने सांख्य तत्त्वज्ञानापासून उसणवारी केलेली आहे. परंतु ही उसणवार करताना मात्र त्यात त्याने आपल्या कल्पनेनुसार अनेक युक्तिवाद घुसडलेले आहेत. सांख्य तत्त्वज्ञानाचा उद्घोषक कपिल ह्याने ईश्वराचे अस्तित्व नाकारले होते. वस्तू जर अजड मानली गेली तर ईश्वराचे अस्तित्व मान्य करण्याचे काहीच कारण पडत नाही. वस्तू जड नाही; ती अजड आहे; अस्थिर आहे. वस्तू ही रज, तम व सत्व ह्या तीन गुणांनी परिपूर्ण असते. प्रकृती ही ह्या तीन गुणांच्या संतुलनामुळे जड भासत असते. तीन गुणांपैकी एक गुण जरी इतर दोन गुणांपेक्षा प्रबळ झाला तरी प्रकृतीतील समतोलपणा बिघडून तिच्यात क्रियाशीलता निर्माण होते. हेच सांख्य तत्त्वज्ञानाचे सार होय. या सिद्धान्ताबाबत कोणताच वाद असू शकत नाही. हा सिद्धांत बहुतेक खराही आहे. व्यक्तिगत प्रत्येकजन प्रकृतीचाच घटक असल्याने सत्व, रज व तम ह्या त्रिगुणांनी परिपूर्ण असतो. एवढेच नव्हे तर या तीन गुणांत परस्परांवर प्रभुत्व मिळविण्याची अहमहमिका लागत असावी हे सुद्धा मान्य केले जाऊ शकते. परंतु एखाद्या व्यक्तीतील विशिष्ट गुण जन्माच्या वेळी इतर दुसऱ्या गुणांवर प्रभुत्व मिळवून सर्वकाळच नव्हे तर मरणाच्या अंतिम क्षणापर्यंत सातत्याने वास करीत राहील, हे कसे मान्य केले जाऊ शकते ? या अनुमानाला सांख्य तत्त्वज्ञानात किंवा प्रत्यक्ष अनुभवात कुठलाच आधार नाही. ज्या वेळेस कृष्णाने गुणकर्मशः चातुर्वर्ण्याची कल्पना ग्राह्य मानली त्यावेळेस जर हिटलर किंवा मुसलोनी जन्माला आले असते तर एक रंगाऱ्याचा पोर व दुसरा गवंड्याचा पोर जगाला नमविणारे हुकूमशहा कसे झाले याचे कोडे उलगडण्यास श्रीकृष्णाला सुद्धा कठीण गेले असते.

वस्तूशी निगडित असणारी अशी एक बाब आहे. ती ही की, व्यक्तिमात्रागणिक प्रकृती सतत बदलत असते. कारण गुणांची सापेक्ष स्थितीसुद्धा परिवर्तनशील आहे. प्रभुत्व मिळविण्याच्या सापेक्ष स्थितीत गुण जर सदोदित बदलत असतील

तर मनुष्याची वर्णांमध्ये विभागणी करण्याची चिरकालीन व स्थायी स्वरुपाची चातुर्वर्ण्य पद्धती किंवा व्यवसाय पद्धती मान्यच होऊ शकत नाही. त्यामुळे भगवद्‌गीतेची विचारसरणी संपूर्णतः कोलमडून पडते. परंतु ह्या अगोदर मी म्हटल्याप्रमाणे हिंदू धर्मियांना तिच्या सत्याभासामुळे व दर्शनीय चांगलेपणामुळे भुरळ पडलेली आहे, ते तिचे गुलाम झालेले आहेत. परिणामी हिंदू धर्माने चातुर्वर्ण्य पद्धतीचा सतत उदोउदो केलेला आहे आणि असमानतेवर आधारलेल्या जातिसंस्थेला कवटाळून धरलेले आहे. हिंदू धर्माच्या या दोन दुर्गुणांपासून बौद्धधर्म पूर्णतः अलिप्त राहिलेला आहे.

बौद्ध तत्त्वज्ञानच हिंदूंना तारू शकते असे अनेक लोकांना वाटते. परंतु ते काहीसे उदासीन झालेले आहेत. भारतात पुन्हा बौद्ध धर्म मूळ धरू शकणार नाही किंवा त्याचे पुनरुज्जीवन होऊ शकणार नाही असे त्यांना वाटते. परंतु त्यांचा हा निराशावाद मला मान्य नाही.

हिंदुधर्म मानणाऱ्यांत दोन विचारसरणीचे लोक आहेत. पहिल्या विचारसरणीचे लोक सर्व धर्म खरे आहेत, एवढेच नव्हे तर सारखेच आहेत असा विश्वास बाळगणारे आहेत. ह्या विचारसरणीला पाठिंबा देणारे इतर धर्मीय सुद्धा भरपूर आहेत. परंतु सर्व धर्म खरे आहेत किंवा सारखे आहेत असे म्हणण्याइतका मिथ्यावाद दुसरा तरी कोणताच नसेल. दुसऱ्या विचारसरणीचे जे हिंदू आहेत, त्यांना असे वाटते की, हिंदू धर्मात अनेक भोंगळपणाच्या व मिथ्या गोष्टी आहेत. परंतु हे लोक उघडपणे असल्या गोष्टी मान्य करण्यास किंवा उच्चारण्यास धजत नाहीत. हे असे का व्हावे हे मात्र कळत नाही !

धर्म हा समाजजीवनातील वारसाचा एक भाग असतो. त्याच्याशी मनुष्याचे जीवन, त्याची प्रतिष्ठा, त्याचा स्वाभिमान इत्यादी गोष्टी निगडित असतात. याचमुळे एखाद्याला स्वतःच्या धर्माचा त्याग करणे सहजासहजी शक्य होत नसते. बरोबर असो वा चूक असो माझा देश म्हणण्यात जो एकप्रकारचा स्वाभिमान अंतर्यामी वसत असतो त्याचप्रमाणे बरोबर असो किंवा चूक असो ' माझा धर्म ' म्हणण्यात सुद्धा एक प्रकारचा ज्वलंत स्वाभिमान अंतःकरणात दडलेला असतो. ह्याच कारणास्तव धर्मातील अनिष्ट व अहितकारक बाबींची जाणीव असूनही अनेक हिंदू धर्मीय स्वतःच्या धर्माचा त्याग करण्याचे धारिष्ट्य न दाखविता त्यालाच कवटाळून राहण्यासाठी दुसरे अनेक मार्ग धुंडाळीत असतात. काही लोक स्वतःचे सांत्वन अशा विचाराने करतात की, सर्वच धर्म सदोष आहेत. त्यामुळे हा धर्म वाईट की तो धर्म वाईट असा विचारच मुळी करू नये. काहींना स्वदेश प्रेमाच्या भोंगळ अभिमानाने बौद्धधर्म अत्युत्तम म्हणवून सुद्धा उघड रीतीने स्वीकारण्यास लाज

वाटते. या सगळ्या प्रवृत्तींचा एकच परिणाम होणार आहे. कालांतराने हिंदू धर्म लय पावणार आहे ; जीवनधारणेस अयोग्य बनणार आहे. हिंदू धर्मात अशी काही पोकळी निर्माण होणार आहे की, जिच्या परिणामामुळे हिंदू धर्माचे शतशः तुकडे होणार आहेत. ही स्थिती आल्यावरच हिंदूचे डोळे खाडकन उघडतील व इतःपर काहीतरी विधायक व सुयोग्य पाऊल उचलले पाहिजे असे त्यांना वाटू लागेल. मला खात्री आहे की त्यावेळेस त्यांचे पाऊल निश्चितपणे बौद्ध धर्माकडे वाटचाल करू लागेल. बौद्ध तत्त्वज्ञानच त्यावेळेस त्यांची जीवनधारणा शाबूत ठेवण्यास मार्गदर्शक ठरेल. हाच एक आशेचा एकमेव किरण हिंदूंचे जीवन प्रफुल्लित करणारा आहे. एवढेच नव्हे तर अनेकविध मार्गांनी त्यांचे जीवन सुफलित करण्यास बौद्ध धर्मच कारणीभूत ठरणार आहे.

आज प्रत्येक धर्माला एका प्रश्नाचे उत्तर देणे भाग आहे. पीडित व पददलित जनतेचा मानसिक व नैतिक अभ्युदय घडवून आणण्याचे सामर्थ्य कोणत्या धर्मात आहे ? आज हयात असणाऱ्या धर्मात अशाप्रकारचे सामर्थ्य नसेल तर तो धर्म कुचकामी होय.

लाखो दलित व अस्पृश्य गणल्या गेलेल्या लोकांची मानसिक व नैतिक स्थिती हिंदुधर्म म्हणविणारा धर्म सुधारू शकतो काय ? दुर्दैवाने याचे उत्तर ' नाही ' असेच म्हणावे लागते. मग ह्या लाखो दलित व अस्पृश्य लोकांनी हिंदू धर्मातच खितपत पडून राहावे अशी अपेक्षा हिंदूंनी करावी काय ? ही अपेक्षा सर्वथा अयोग्य होईल. खरे पाहता हिंदू धर्म आज ज्वालामुखीच्या तोंडाशी रेंगाळत आहे. आज जरी हिंदू धर्माचे अस्तित्व दिसत असले तरी कधी ज्वालामुखीचा उद्रेक होऊन तो रसातळास पोहचेल याची शाश्वती नाही. कारण लाखो पददलित लोकांची अस्मिता जेव्हां जागृत होईल व आपल्या अधोगतीस हिंदू धर्मच कारणीभूत झाला हे कटु सत्य त्यांच्या नजरेस पडेल तेव्हा अनावर विद्रोहाची लाट हिंदू धर्माला नेस्तनाबूत करून टाकील. या संबंधात इतिहासाचा मागोवा घेतला तर रोम साम्राज्यात मूर्तीपूजा मानणाऱ्या व गुलामगिरीचा कडाडून पुरस्कार करणाऱ्या सनातनी धर्माचा पाडाव ख्रिस्ती धर्माने कसा केला ह्याचे स्मरण झाल्यावाचून राहत नाही. अनुचित रूढीप्रिय सनातनी धर्म जेव्हा सर्वसामान्य जनतेला मानसिक व नैतिक स्वातंत्र्य बहाल करू शकत नाही, हे पाहिल्यावरच रोम साम्राज्यातील लोकांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला. रोम साम्राज्यात जे घडले त्याच इतिहासाची पुनरावृत्ती भारतात देखील निश्चितपणे होणार आहे. भारतातील सर्वसामान्य जनतेला सत्याची ओळख पटेल तेव्हा ती जनता आपोआपच बौद्ध धर्माचा मार्ग चोखाळणार आहे.

हिंदुधर्म व बौद्ध धर्म ह्यांच्यात तौलनिक विचार केल्यानंतर इतर धर्मांच्या विचारसरणीत बौद्ध विचारधारा काय आहे, हे आता आपण संक्षेपाने बघू या.

कोणतीही समाजव्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी त्या समाजव्यवस्थेस एकतर कायद्याचा किंवा नीतिमत्तेचा आधार घ्यावा लागतो. कायदा आणि नीतिमत्ता ह्या दोहोंपैकी एखादी गोष्ट जरी नसेल तर समाजस्वास्थ अबाधित राहत नाही. कोणत्याही समाजात कायद्यांना फार थोडा वाव दिलेला असतो कारण थोड्या लोकांना सामाजिक शिस्तीत बद्ध करण्यासाठीच कायद्यांची योजना केलेली असते. त्या कायद्यांच्या जोरावर त्यांना योग्यप्रकारे वागायला भाग पाडून समाजस्वास्थ्य टिकवून ठेवता येते. उलट बहुसंख्य लोकांना नीतिमत्तेच्या धाकाने समाजजीवन सुस्थिर ठेवण्यास प्रवृत्त करता येते. ही बाब लक्षात घेतली म्हणजे नीतिमत्तेवर आधारित धर्म समाजजीवन सुस्थिर करण्याचे व समाजस्वास्थ टिकवून ठेवण्याचे प्रमुख तत्त्व आहे हे मानावे लागते.

दुसरी गोष्ट, धर्म हा विज्ञानाशी विसंवादी असून चालत नाही. तो जर विज्ञानाशी विसंगत असेल तर तो लोकादरास पात्र ठरत नाही. तो हास्यास्पद ठरून जीवनविषयक तत्त्वज्ञान रुजविण्यास असमर्थ ठरतो. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास असे म्हणता येईल की, धर्माला जर कार्यप्रवण व्हावयाचे असेल तर त्याचा संबंध कार्यकारणाशी म्हणजेच विज्ञानाशी दृढतर असावयास पाहिजे.

तिसरी गोष्ट, सामाजिक नीतिमत्ता ह्या दृष्टीने धर्माला एका विशिष्ट चाचणी परीक्षेत उतरावे लागते. धर्म हा केवळ नीतिबद्ध असून चालत नाही तर त्याला स्वातंत्र्य, समता व बंधुत्व या त्रयींच्या चाचणीत उतरावे लागते. ह्या त्रयींशिवाय कोणताही धर्म समाजधारणेस निरर्थकच ठरत असतो.

चवथी गोष्ट, धर्माने दारिद्र्याचे गोडवे गाऊन त्याचे उदात्तीकरण केलेले केव्हाही बरे नसते. धर्माच्या नावाखाली श्रीमंतांच्या संन्यास वृत्तीचे स्तोम माजविले गेले तर ते एकदाचे मान्य केले जाऊ शकते. परंतु गरिबी ही पूर्वजन्माचे फळ आहे असे म्हणून दारिद्र्याचे स्तोम माजविले गेले तर धर्माचा विपर्यास करणे होते ; अनैतिकता व गुन्हेगारी ह्यांना चिरस्थायी स्वरूप प्राप्त करून देणे होते ; एवढेच नव्हे तर नरकाच्या कल्पनेप्रमाणे एका यातनायुक्त जीवनाला मान्यता देणे होते.

वरील या सगळ्या कसोट्यांवर कोणता धर्म पुरेपूर उतरू शकतो ? ह्या प्रश्नाचा विचार करताना एक गोष्ट स्मरणात ठेवणे आवश्यक आहे. आजच्या काळात ' महात्मा ' अवतरण्याचे दिवस राहिले नाहीत. त्यामुळे एखादा नवीन धर्म उदयास येण्याची तिळमात्र शक्यता राहिलेली नाही. जे धर्म आज पृथ्वीच्या पाठीवर अस्तित्वात आहेत त्या मधूनच योग्य तो धर्म निवडणे व त्याचे अनुयायीत्व पत्करणे भाग आहे.

उपरिनिर्दिष्ट कसोट्यांपैकी केवळ एकाच कसोटीला किंवा दोन कसोट्यांना उतरणारा अस्तित्वात असणाऱ्या धर्मांमधून एखाद दुसरा धर्म आढळतो. परंतु प्रश्न असा आहे की, साऱ्याच कसोट्यांना उतरणारा असा कोणता धर्म आहे ? माझ्या माहीती प्रमाणे केवळ बौद्ध धर्मच वरील साऱ्या कसोट्यांना पूर्णपणे उतरू शकतो. बौद्ध धर्म हाच एक असा धर्म आहे की त्याची कास धरणे जगाला आज भाग आहे. आजचे आधुनिक जग प्राचीन जगाच्या मानाने फारच वेगळे आहे. त्यालाच आज धर्माची खरी निकड आहे. आणि ती निकड भागविण्यासाठी त्याला बुद्धाच्या धर्माचीच निवड करावी लागणार आहे.

माझे हे प्रतिपादन लोकांना पटणार नाही. कारण बहुतेक लोकांनी तथागत बुद्धावर लिहिताना बुद्धाने केवळ अहिंसेचेच प्रतिपादन केलेले आहे ; त्याशिवाय दुसरे कोणतेच उच्च विचार त्याने प्रदर्शित केलेले नाहीत असे सांगितल्याचे आढळते. त्यामुळे बौद्धधर्म आजच्या जगाची निकड भागवू शकणार नाही असे त्यांना वाटण्याचा संभव आहे. परंतु हा विचार दिशाभूल करणारा आहे. बुद्धाने अहिंसा तत्त्वाचे प्रतिपादन केलेले आहे हे सत्य आहे. परंतु त्याचे महत्त्व मी मुळीच कमी लेखीत नाही. कारण अहिंसेचे तत्त्व हे महान तत्त्व आहे. त्याचा अंगिकार केल्याशिवाय जगाचे विध्वंसनापासून तारण करता येणार नाही. बुद्धाने अहिंसेव्यतिरिक्त दुसऱ्या बऱ्याच गोष्टी सांगितल्या आहेत, हे मला प्रामुख्याने म्हणावयाचे आहे. धम्माचा भाग म्हणून बुद्धाने सामाजिक, वैयक्तिक, आर्थिक व राजकीय स्वातंत्र्याचा पुरस्कार केलेला आहे. त्याने समानता केवळ पुरुषांपुरतीच मर्यादित ठेवली नाही तर ती समानता स्त्री-पुरुषांमध्येसुद्धा पुरस्कारली आहे. बुद्धाने लोकसमाज जीवनातील नानाविध अंगप्रत्यंगाचा सखोलतेने अभ्यास केलेला आहे. त्याचे तत्त्वज्ञान अत्याधुनिक असून त्याच्या धम्माचा प्रमुख हेतू ऐहिक जीवनात मनुष्याला सुख समाधान प्राप्त करून द्यायचा आहे. परंतु हे समाधान मरणानंतर स्वर्ग नावाच्या न पाहिलेल्या ठिकाणी नव्हे तर ह्याच जगी ह्याच डोळा मिळवून द्यावयाचा आहे. बुद्धाशी तुलना करता येईल असा जगात कोणताच धर्मगुरू मिळणार नाही. बुद्धाचे हे खास वैशिष्ट्य आहे.

बौद्ध धर्माच्या श्रेष्ठत्वाच्या या साऱ्या बाबींचा विचार केल्यावर साहजिकच असा प्रश्न उभा राहतो की, बौद्धधर्म प्रसाराचे स्वप्न कसे साकार करता येईल ? बौद्धधर्म प्रसार साऱ्या विश्वात करून घ्यावयाचा असेल तर पुढील तीन गोष्टींचा गंभीरतेने विचार होणे जरूरीचें आहे.

पहिली गोष्ट ही की, बौद्धधर्माचा बायबल सदृश प्रमाणभूत असा एकमात्र ग्रंथ तयार करणे, दुसरी गोष्ट बौद्ध भिक्खू संघाच्या संघटनेत, ध्येयधोरणात व कार्यप्रणालीत आमूलाग्र बदल घडवून आणणे आणि तिसरी गोष्ट ही की, आंतरराष्ट्रीय बौद्धसेवा संघ स्थापन करणे.

बौद्धधर्म प्रसाराच्या दृष्टीकोनातून बौद्धधर्माचा बायबल सारखा एकमेव प्रमाणभूत ग्रंथ निर्माण करणे ही सर्वप्रथम गरज आहे. बौद्ध वाङ्मय अत्यंत अफाट आहे. बौद्ध वाङ्मयाच्या अथांग महासागरात एखाद्याने बौद्ध धर्माचे सार समजून घेण्यासाठी कितीही बुड्या मारल्या तरी हे हस्तगत करता येणार नाही. बौद्धधर्माच्या तुलनेत इतर धर्मात मात्र एक मोठी सोय आहे. ती ही की, त्या त्या धर्माचा सारभूत एकमात्र धर्मग्रंथ काखेत घेऊन कुठेही नेता येणारा व कुठेही वाचन करता येऊ शकणारा हाताळण्याजोगा केलेला आहे. परंतु बौद्धधर्मात असा एकमेव ग्रंथ नसल्यामुळे सर्व साधारण बौद्ध अनुयायांची अत्यंत कुचंबना होते. बौद्ध ग्रंथसंभारातील ' धम्मपद ' हा ग्रंथ ही उणीव काहीशी भरून काढू शकतो. परंतु भारतातील हिंदी भाषेत तयार केलेला धम्मपद हा ग्रंथ ही अपेक्षा पूर्ण करण्यास मात्र थिटा ठरलेला आहे. प्रत्येक धर्म कोणत्या ना कोणत्या श्रद्धेवर आधारित आहे. परंतु ही श्रद्धा पारंपारिक संप्रदायाच्या स्वरुपात आत्मसात केली जाऊ शकत नाही. ह्या श्रद्धेला पुराण, महाकाव्य ह्यासारख्या किंवा साहित्यातील कल्पनाविलासाने सजलेल्या कथावस्तू सारख्या गोष्टींची आवश्यकता असते. भारतीय धम्मपद अशा प्रासादिक भाषेत गुंफले गेलेले नसल्याने ते केवळ शुष्क तत्त्वज्ञानाचीच चर्चा करून श्रद्धा निर्माण करण्याचा प्रयत्न करते.

यास्तव नियोजित बौद्ध धर्माच्या एकमेव ग्रंथात संक्षेपाने बुद्धाचा जीवनपट, चिनी धम्मपद, काही महत्त्वाचे बुद्धाचे संवाद, बौद्ध धर्मीय लोकांच्या जन्म, मृत्यू, लग्न इत्यादी सामाजिक विधींची माहीती ह्यांचा समावेश होणे आवश्यक आहे. परंतु अशाप्रकारचा एकमेव धर्मग्रंथ तयार करताना भाषेच्या बाबींकडे दुर्लक्ष केले जाता कामा नये. तो ग्रंथ अशाच जिवंत भाषेत लिहिला जावा की त्या भाषेने माणसाचे हृदय हेलावले जावे व त्याचे मन मंत्रमुग्ध व्हावे. ती भाषा रटाळ, कंटाळवाणी किंवा नुसतीच गंभीर किंवा उगीचच भारदस्त असू नये. ग्रंथाच्या भाषाशैलीत लालित्य असावे, माधुर्य असावे, ती भाषा प्रासादिक, मनमोहक व ओजस्वी असावी. तरच ती लोकाच्या मनावर बिंबू शकेल, ठसू शकेल.

हिंदू संन्यासी व बौद्ध भिक्खू ह्या दोहोंत जमीनअस्मानचा फरक आहे. हिंदू संन्यासाला जनाशी, समाजाशी काही कर्तव्य नसते. तो जगापासून पराङ्मुख झालेला असतो, समाज जीवनापासून दूर पळालेला असतो. त्यामुळे तो जगाच्या दृष्टिकोनातून मृतवत असतो, परंतु बौद्ध भिक्खूचे तसे नाही. त्याचा जगाशी व समाजजीवनाशी घनिष्ट संबंध असतो. तो समाजाशी कर्तव्यबद्ध असतो. भिक्खूला संन्याशासारखा एकटा दुकटा न ठेवता तो संघटनेने राहावा, त्यांचा संघ असावा ह्याचा हेतू तरी काय ?

बौद्ध धर्मात सांगितलेल्या आदर्श तत्त्वप्रणालीप्रमाणे समाज व्यवस्था निर्माण करणे, समाजातील प्रत्येक घटकाला नीतितत्त्वांनी वागण्यास कार्यप्रवृत्त करणे व प्रापंचिक लोकांपुढे स्वतःच्या आदर्श वागणुकीचा एक उत्तम नमुना ठेवणे हे प्रमुख हेतू बौद्ध भिक्खू निर्माण करण्यामागे होते. सर्व सामान्य माणसाला बौद्ध तत्त्वज्ञान सहजासहजी आकलन होणारे नाही; याची कल्पना बुद्धाला होती. तथापि ते त्यांनी थोडे फार समजावून घ्यावे व त्यासाठी त्यांच्या नजरेसमोर बौद्ध विचारप्रणालीशी बद्ध असलेला सुसंघटित बौद्ध भिक्खूंचा आदर्श संच असावा, हे भिक्खू संघाच्या निर्मितीचे कारण होय. याच कारणास्तव विनय नावाच्या आदर्श नियमांनी भिक्खू संघाला बद्ध केले गेले. तथापि बौद्ध भिक्खू संघ स्थापनेच्या वेळी बुद्धाच्या मनात दुसरे अनेक हेतू होते. सर्वसाधारण लोकांना सत्य आणि निरपेक्ष मार्गदर्शन देणाऱ्या बुद्धिवादी लोकांचे संघटन करणे आवश्यक आहे असे बुद्धाला वाटत होते. भिक्खू संघाने निरपेक्षपणे जनसेवा करावी हा प्रमुख उद्देश लक्षात घेऊन भिक्खूने स्वतःची मालमत्ता बाळगू नये असा बुद्धाने नियम केला होता. मालमत्तेची धारकवृत्ती मनुष्याच्या स्वतंत्र विचार प्रेरणेला व विचार प्रवृत्तीला बाधा आणत असते व मोठ्यात मोठा अडथळा निर्माण करीत असते. मालमत्तेची धारकवृत्ती जशी घातक असते तसेच भिक्खूने विवाह करून निरपेक्ष जनसेवा करणे कदापि शक्य नसते. यास्तव सामाजिक बंधनात गुरफटून न राहता जनसेवेस तनमनधनाने मुक्त राहण्यासाठी भिक्खूने विवाह करू नये असा निर्बंध बुद्धाने घातला होता.

या सर्व आदर्शांप्रमाणे आजचा भिक्खूसंघ राहतो काय ? ह्या प्रश्नाचे स्पष्ट उत्तर नकारार्थी आहे. भिक्खुसंघ लोकांना मार्गदर्शन तर करीत नाहीच, परंतु जनसेवाही करीत नाही. सद्यपरिस्थितीतील भिक्खुसंघ बौद्ध धर्म प्रसारासाठी निरुपयोगी आहे. आज जगभर भिक्खूंची संख्या अफाट आहे. त्यात केवळ साधू व संन्यासवृत्तीने राहणाऱ्या भिक्खूंचाच भरणा जास्त आहे. ते सगळे आपला वेळ नुसत्या ध्यानात किंवा आळसात घालवितात. लोकांना ज्ञान द्यावे किंवा त्यांची सेवा करावी ही वृत्तीच भिक्खूंत राहिलेली नाही. सेवावृत्तीच्या संदर्भात विचार करता कोणाच्याही मनात सर्वप्रथम रामकृष्ण मिशन उभी राहते. पण भिक्खूंचे खरे कर्तव्य सेवावृत्ती असूनसुद्धा कोणालाही भिक्खूसंघाची आठवण होत नाही. मग अशा स्थितीत कोणाची सेवावृत्ती आदरणीय मानावी ? भिक्खूसंघाची की रामकृष्ण मिशनची ? आज भिक्खूसंघ नुसत्या आळशी लोकांचे एक मोठे सैन्य झाले आहे. आज भिक्खू थोडे जरी असले तरी चालतील, परंतु ते सुशिक्षित व कार्यप्रवण पाहिजेत. ते ऐतखाऊ व ऐदी

नसावेत. ह्या बाबतीत भिक्खुसंघाने जेसुइट खिरस्ती पाद्र्यांपासून प्रेरणा घेण्यास कसलीच हरकत नसावी. त्यांनी खिस्ती धर्माचा प्रसार आशियाभर शैक्षणिक व वैद्यकीय सेवेने केला. त्यांनी केवळ खिस्ती धर्माचे गुणगानच गाइले नाही. त्यांनी त्याबरोबर कला व विज्ञान ह्यांची सुंदर सांगड घालून त्यांचाही त्यांनी प्रसार केला. पुरातन काळातील बौद्ध भिक्खूंचा सुद्धा हाच आदर्श होता. जगभर गाजलेली नालंदा[†] व तक्षशिला[Δ] ही विद्यापीठे भिक्खूंमी स्वतः चालविलेली होती. तिथेच ते भिक्खू राहत व ज्ञानपठन करीत. साहजिकच ते सुशिक्षित व बुद्धिमान असत. स्वधर्ममतांच्या प्रसारासाठी समाजाची सेवा करणे अत्यावश्यक आहे ह्याची त्यांना जाणीव होती. सध्याच्या भिक्खूंनी त्याच जुन्या आदर्श विचारांची कास धरावयास पाहिजे.

भिक्खुसंघाची आजची जडणघडण पाहता बौद्ध भिक्खूसंघ सर्वसामान्य लोकांची सेवा करू शकेल असे म्हणवत नाही. त्यामुळे बौद्ध भिक्खूसंघ स्वतःकडे लोकांना आकर्षित करू शकत नाही. भारतात आज तरी मिशनरी पद्धतीशिवाय बौद्धधर्म वृद्धिंगत होणे कठीण आहे. शिक्षणप्रसाराबरोबर आज धर्मप्रसारसुद्धा होणे आवश्यक आहे. धर्मप्रसार मनुष्यबळाशिवाय व द्रव्यबळाशिवाय होऊ शकणार नाही. हेही तेवढेच खरे आहे; परंतु हे बळ कोण पुरवू शकेल ? अर्थात ज्या देशात आज बौद्धधर्म प्रचलित आहे ते देशच ही गोष्ट करू शकतात. ह्या बौद्धधर्मी देशांनी सुरुवातीस काही प्रमाणात मनुष्यबळ व द्रव्यबळ पुरविल्यास बराच कार्यभाग साधला जाऊ शकतो. परंतु ही गोष्ट ते करू शकतील काय ? सद्यपरिस्थिती लक्षात घेता बौद्धधर्म प्रसाराच्या बाबतीत ते देश उत्साही असल्याचे दिसत नाहीत. उलट ते काहीसे उदासीन असल्याचे दिसतात.

वस्तुतः सध्याचा काळ बौद्ध धर्म प्रसार होण्यास खूपच अनुकूल असल्याचा दिसून येतो. पूर्वी एक काळ असा होता की, धर्म हा मनुष्याचा वारसा हक्कांचा एक भाग होता. मुलगा किंवा मुलगी आपल्या आईवडिलांच्या संपत्तीबरोबर त्यांचा धर्मही वारसातील एक भाग म्हणून स्वीकारीत असे. धर्माचा हा वारसाहक्क घेताना त्या धर्मात उचित अनुचित काय आहे, ह्याची सुद्धा चिकित्सा केली जात असे. इस्टेटीच्या बाबतीत ती घेण्याजोगी आहे किंवा नाही असा प्रश्न कधी कोणी विचारी. परंतु धर्माच्या बाबतीत तो धर्म स्वीकारण्याजोगा आहे किंवा नाही असा चुकूनही प्रश्न केला जात नसे. परंतु आज काळ फारच

[†] पाहा, परिशिष्ट क्रमांक : २३

[Δ] पाहा, परिशिष्ट क्रमांक : २४

बदलला आहे. साऱ्या जगभर बऱ्याच लोकांनी त्यांच्या धर्माच्या वारसाहक्काच्या बाबतीत असामान्य असे धैर्य दाखविलेले आहे. वाडवडिलांचा धर्म म्हणून स्वीकारलाच पाहिजे, ह्या बंधनाला त्यांनी झुगारून दिलेले आहे. काहींनी तर फारच क्रांतिकारक विचार दर्शविले आहेत काही लोक वैज्ञानिक ज्ञानाने भारावून जाऊन धर्म कुचकामी आहे, धर्मात काही तथ्यांश नसतो, तो टाकून फेकून दिला पाहिजे ह्या निर्णयापर्यंत पोहचले आहेत. काही लोक मार्क्सवादी[†] विचारसरणीमुळे धर्म ही श्रीमंतांच्या प्रभुत्वाला शरण जाण्यास गरिबांना प्रभावित करणारी अफूची गोळी आहे म्हणून धर्म झुगारून द्यावा असे म्हणू लागले आहेत. कोणतेही कारण का असेना मात्र हे सत्य आहे की, लोकांनी आज धर्माच्या बाबतीत चिकित्सक बुद्धीची वाढ केलेली आहे. जे लोक वैचारिक पातळीवर ऊहापोह करण्याचे धाडस दाखवितात त्यांच्या मनांत प्रामुख्याने हेच प्रश्न उद्‌भतात की धर्म ही खरोखर आवश्यक बाब आहे काय ? आणि आवश्यक असेल तर कोणता धर्म योग्य आहे ?

ही वैचारिक भूमिका लक्षात घेऊन असेच म्हणावे लागते की, वेळ येऊन ठेपलेली आहे. प्रश्न फक्त इच्छेचा आहे. आज बौद्ध धर्मी देशांनी मनावर घेतले व लोकांची मनोभूमिका जाणून घेतली तर बौद्धधर्म जगभर पसरण्यास व त्याची वाढ होण्यास मुळीच कठीण जाणार नाही. केवळ स्वतः आदर्श बौद्ध बनून कर्तव्यच्यूत राहणे हे खऱ्या बौद्धाचे लक्षण नव्हे. बौद्धधर्म प्रसारासाठी अहोरात्र झटणे हे खऱ्या व आदर्श बौद्धाचे कर्तव्य होय. बौद्धधर्माचा प्रचार व प्रसार करणे म्हणजेच मानवजातीची सेवा करणे होय. ही बाब बौद्ध राष्ट्रांनी ध्यानात घेतली तर मला विश्वास वाटतो की बौद्धधर्म वृद्धीची लाट कधीही थोपविली जाऊ शकणार नाही.

[†] पाहा, परिशिष्ट क्रमांक : २५ बुद्ध, मार्क्स आणि धम्माचे भवितव्य–रत्नमित्रा गणवीर, पृ. ९–२८.

१०७

ब्राह्मणेतर वर्गाने म. फुले यांची स्मृति पुसूनच टाकली

कोल्हापूर, ता. २९ मे १९५०——सत्यशोधक समाज परिषदेचे निमित्तानें सदर परिषदेचे पुढारी श्री. भास्करराव जाधव यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी एक पत्र पाठविले आहे. सदर पत्रांत डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात: 'ब्राह्मणेतर वर्गानें म. फुले यांची स्मृति पुसूनच टाकली आहे असे नसून या वर्गाने त्यांच्या तत्वज्ञानास निर्लज्जपणे दगा दिला आहे. हिंदुस्थानला स्वातंत्र्य लाभले पण या स्वातंत्र्याचा खरा फायदा जर हिंदी जनतेला व्हायचा असेल तर या जनतेच्या मानेवर बसलेले भोळ्या समजुतीचें जोखड झुगारुन दिले पाहिजे व हे महत्वाचे कार्य सत्यशोधक समाजाने करणे अगत्याचें असल्याचेंहि डॉक्टर महाशयांनी सदर पत्रांत नमूद केले आहे.

●●●

जनता : ३ जून १९५०.

१०८

हिंदु स्त्रियांची उन्नती आणि अवनती : जबाबदार कोण ?

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या " The Rise and fall of the Hindu Women : Who was responsible for it ? " या शीर्षकाच्या 'महाबोधी' नियतकालिकाच्या मे-जून १९५१ च्या अंकात प्रकाशित झालेल्या मूळ इंग्रजी लेखाचा हा अनुवाद––संपादक.

ईव्हज विकली ' च्या जानेवारी २१, १९५० च्या अंकात भारतीय स्त्रीच्या अवनतीला मुख्यत: बुद्धाची शिकवण कारणीभूत असल्याचा आरोप करणारा लेख प्रसिद्ध झाला होता. ह्या आरोपाचे खंडन करण्याच्या उद्देशाने लामा गोविंद यांनी लिहिलेला ' स्त्रियांचे हिंदू धर्म आणि बौद्ध धर्म यातील स्थान ' या शीर्षकाचा इंग्रजीतील लेख* ' महाबोधी ' नियतकालिकाच्या मार्च १९५० च्या अंकात प्रसिद्ध झाला होता. अशा आरोपाचे खंडन करणे प्रत्येक बौद्ध धर्मीयाचे कर्तव्य आहे व ते लामा गोविंद यांनी पार पाडले. परंतु हा प्रश्न येथेच संपविता येणार नाही. बुद्धावर आरोप करण्याचा हा काही पहिलाच प्रसंग नव्हे. बुद्धाची महानता ज्यांना सहन होत नाही अशा, ' ईव्हज विकली ' च्या लेखकापेक्षाही अधिक अधिकारवाणी असलेल्या हितसंबंधी लोकांकडून असे आरोप सहसा केले जातात. त्यामुळे या प्रश्नाच्या मुळाशी जाऊन वारंवार होणाऱ्या अशा आरोपाचा मूलत: शोध लावणे अगत्याचे आहे. मला खात्री आहे की हा आरोप खूप गंभीर आणि तिरस्करणीय असल्यामुळे त्याचा आणखी शोध घेण्याचे ' महाबोधी 'चे वाचक स्वागत करतील.

बुद्धाच्या विरुद्ध होणाऱ्या या आरोपाला फक्त दोन ठिकाणी आधार मिळू शकतो :––

पहिला संभाव्य आधार ' महापरिनिब्बाण सुत्ता ' च्या प्रकरण पाच मध्ये आनंदाच्या प्रश्नाला बुद्धाने उत्तर दिले, असे जे, सांगितले जाते, तो असू शकतो. तो येणे प्रमाणे :––

" ९. ' स्त्रियांशी वागताना आम्ही कसे वागावे ? ' आनंदाने विचारले.

' आनंदा, जणू त्यांना बघत सुद्धा नाही, असे. '

---

* Reprinted in Dr. Babasaheb Ambedkar Writings and speeches, Volume 17, Part Two, Appendix-II, P. p. 495-498—Editors.

' परंतु त्यांना पाहावे लागलेच तर आम्ही काय करावे ? '

' आनंदा, बोलू नये. '

' परंतु त्या आमच्याशी बोलल्याच तर भगवंत, आम्ही काय करावे ? '

आनंदा, तुम्ही सर्वोपरी जागरुक असावे. ''

ऑक्स्फर्ड विद्यापीठ प्रेसने प्रकाशित केलेल्या 'महापरिनिब्बाण सुत्त' च्या मूळ भागात प्रस्तुतचा भाग पाहायला मिळेल हे नाकारता येणार नाही. परंतु प्रस्तुत उतारा प्रत्यक्ष त्यात आहे किंवा नाही, हा मुद्दा नाही. मुद्दा असा आहे की प्रस्तुत उताऱ्याच्या आधारावर जर एखाद्या युक्तिवादाची उभारणी होत असेल तर तो संबंधित उतारा हा मूळचा तसेच खरा असून नंतरच्या काळात भिक्खूंनी तो प्रक्षिप्त केलेला नाही हे सिद्ध करण्याची गरज नाही काय ?

खोट्या गोष्टीचे आवरण चढवून, त्यात मूळ बौद्ध विचारांशी अगदीच परकीय असलेल्या ब्राह्मणी विचारांची भर घालून, तसेच मठशाही विचारांना प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने, सुत्तपिटकाला संपूर्णपणे विद्रूप करण्यात आलेले आहे. ज्याला भगवान बुद्धाची मूळ शिकवण माहीत आहे, तो असे सुत्तपिटक वाचून वेडा झाल्याशिवाय राहणार नाही. इतकेच नव्हे तर मिसेस ऱ्हिस् डेव्हिड्स [१] यांना झालेल्या आश्चर्यात तो सहभागी होईल आणि विचारील :--

'' सुत्तपिटकाच्या या भागामध्ये बुद्धाचे विचार कुठे आहेत ? यापैकी किती भागामध्ये बुद्धाचे मूळ विचार स्पष्टपणे मांडल्या गेलेत आणि किती भागामध्ये उत्तरोत्तर वर्षानुवर्ष झालेले निवेदक, स्मृतिबद्ध तसेच कंठस्थ करणारे बहुसंख्य शिक्षक, तसेच मौखिक शिक्षण घेणारे विद्यार्थी, ही सर्व शिकवण, जी क्लिष्ट होती ज्यासाठी कठोर परिश्रम घ्यावे लागत होते, इतकेच नव्हे तर कधीकाळी संपादकांनी ती संपादित केल्यानंतर इतक्या वर्षांनी तंतोतंतपणे कशी मांडली जावू शकते ? हे सर्व निवेदक, शिक्षक तसेच संपादक यांचे जीवन आणि त्यांचे आदर्श समाजातील इतर लोकांपेक्षा अत्यंत वेगळे होते आणि काही तर बौद्ध जगताशी संबंधितही नव्हते. अशा सर्व विपर्यस्त माध्यमांचे कोणीही अध्ययन करावे आणि या वचनासंबंधी स्वतःशी विचारावे की ही शिकवण ज्या व्यक्तीने संपादीत केली, त्याने सर्वमान्य शिक्षक आणि मार्गदर्शक यांच्याकडून वदवून आणि तेच सत्य असल्याचे दर्शविले जाण्याची शक्यता नाही काय ?

---

[१] Preface (xiii) to Kindred Saying, Vol. II.

त्यामुळे नंतरच्या काळात भिक्खूंनी हा उतारा प्रक्षिप्त केला या विधानात फार अतिशयोक्ती नाही. पहिली गोष्ट ही की सुत्तपिटक लिहिण्याकरिता बुद्धाच्या मृत्यूनंतर चारशे वर्षांचा काळ लोटला होता. दुसरे असे की ज्या संपादकांनी त्याचे संकलन आणि संपादन केले ते भिक्खू होते आणि त्यांनी भिक्खूसाठीच त्यांचे संकलन आणि संपादन केले होते. ब्रह्मचर्याचा नियम सुरक्षित ठेवण्याच्या उद्देशाने असे विधान बुद्धासंबंधी करणे भिक्खूला महत्त्वाचे वाटले आणि अशा परिस्थितीत भिक्खू संपादकांनी असे लिहिणे असंभवनीय वाटत नाही.

प्रस्तुत उतारा नंतरच्या काळात प्रक्षिप्त केला या विधानाच्या पुष्ट्यर्थ अन्य दोन बाबी सहाय्यभूत ठरतात.

(१) पहिली, प्रस्तुत सुत्ताला दिलेल्या प्रस्तावनेच्या तक्त्यावरुन (डेव्हिड्सच्या एस. बी. बी. मालिकेतील दीघ निकाय भाग ॥ च्या पृष्ठ ७२ वर पाहायला मिळेल.) असे निदर्शनास येते की, या सुत्तातील बराचसा भाग इतर सुत्तातही आढळून येतो. परंतु प्रस्तुत उतारा दुसऱ्या कोणत्याही सुत्तात आढळत नाही हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. तथापि या सुत्तातील बऱ्याच उताऱ्यांचा इतर सुत्तात समावेश आहे, ही वास्तविकता आहे.

(२) दुसरे, या सुत्ताचे चिनी भाषांतर अस्तित्त्वात असल्याचे या सुत्ताच्या प्रस्तावनेतील पृष्ठ XXXVIII वरुन (डेव्हिड्सच्या एस. बी. बी. च्या खंड XI मध्ये प्रकाशित) निदर्शनास येते. परंतु या चिनी भाषेतील ग्रंथात सुद्धा वरील विशिष्ट उताऱ्याचा समावेश आढळून येत नाही.

आपण याला सत्याच्या कसोटीवर तपासून पाहू. आनंदाने असा प्रश्न विचारण्याचे काही विशिष्ट प्रयोजन होते काय ? बुद्धाचे स्त्रियांशी सर्वश्रुत असलेले संबंध लक्षात घेऊन हा प्रश्न होता काय ? खरे तर आनंदाने असा प्रश्न विचारण्याची शक्यता नाही आणि जर आनंदाने असा प्रश्न विचारलाच असता तर, बुद्धाने असे उत्तर दिले नसते, हे पुराव्यानिशी सांगता येते. आनंद तसेच भगवान बुद्ध यांची पिटकामध्ये नमूद असलेली स्त्रियांप्रती वागणूक आणि त्यासंबंधी निर्माण केलेला प्रश्न व दिलेले उत्तर हे दोन्हीही अगदी विसंगत आहेत.

आनंदाने असा प्रश्न विचारणे खरोखरच गरजेचे होते काय, या मुद्यावर हे नमूद करणे प्रसंगोचित होईल की, महापरिनिब्बाण सुत्ताच्या त्याच प्रकरणात, वर ज्याचा उल्लेख आला आहे, त्यातील फक्त काही गाथा वगळल्या आहेत. आनंदाची वर्तणूक किती आल्हाददायी होती आणि तो सर्वांचा कसा आवडता होता याचे बुद्धाने वर्णन केले आहे. त्यातील दोन गाथा मी खाली नमूद करतो :--

" १६. बंधुंनो, आनंदामध्ये चार अतुलनीय आणि स्फुर्तिदायक सद्‌गुण आहत.

तर बंधुंनो, संघातील भिक्खू आनंदाला भेटण्यासाठी येत असत. त्याला भेटल्यानंतर ते प्रफुल्लित होत असत. आनंद जेव्हा त्यांना धम्म शिकवित असे तेंव्हा प्रवचन ऐकतानाही ते आनंदविभोर व्हायचे. आणि बंधुंनो, आनंद जेंव्हा मौन असे त्यावेळी मात्र ते अस्वस्थ होत असत.

आणि बंधुंनो, संघातील भिक्खूणी . . . . . किंवा धम्मोपासक . . . . धम्मोपासिका त्याला भेटल्यानंतर आणि आनंदाने त्यांना धम्म शिकविल्यानंतर ते प्रफुल्लित होत असत. आणि बंधुंनो, आनंद मौन असताना मात्र ते अस्वस्थ होत असत. "

यावरुन हे स्पष्ट होते की आनंदाचे स्त्रियांशी भेटणे, इतकेच नव्हे तर ज्या धम्मोपासिका संघाच्या सदस्या नव्हत्या अशांनाही भेटणे ही नित्याची व सामान्य बाब होती. तो त्यांना पाहात असे ; भेटत असे आणि त्यांच्याशी बोलत असे. असे असतानाही आनंदाने असा प्रश्न का विचारला ? स्त्रियां आनंदाला भेटतात हे बुद्धाला माहीत होते. त्यांनी या संबंधी कधीही हरकत घेतली नव्हती. असे असतानाही बुद्धाच्या मनात स्त्रियांशी असलेले सर्व संबंध तोडण्याचा तसेच प्रतिबंधीत करण्याचा विचार का आला असावा ? हा संपूर्ण भाग इतका कृत्रिम आहे की तो नंतरच्या काळात मठशाहीने प्रक्षिप्त केल्याचा प्रकार आहे हे निश्चित समजावे.

आनंदाच्या जीवनातील अत्यंत विरोधाभासी असा प्रसंग महापरिनिब्बाण सुत्ताच्या संबंधित भागात आलेला आहे.

हे सर्वविदित आहे की, पहिल्या संगितीत (परिषदेत) आनंदाच्या विरोधात पाच तक्रारी करण्यात आल्या. त्या अशा :—

(१) बुद्धाच्या मतानुसार विनयातील कोणत्या भागात फेरफार आणि दुरुस्ती करण्याचा अधिकार संघाला दिला हे विचारण्यात तो अपयशी ठरला.

(२) भगवंताचे चिवर शिवता शिवता मागे सरताना त्याचा चिवरावर पाय पडला.

(३) भगवंताच्या महापरिनिर्वाणानंतर त्यांच्या पार्थिवाला स्त्रियांना प्रथम वंदन करण्याची परवानगी देऊन त्यांच्या अश्रुमुळे भगवंताच्या पार्थिवाच्या झालेल्या विंटबनेस तो कारणीभूत आहे.

(४) भगवंताला अधिक जगण्यासाठी तो बोलला नाही.

(५) स्त्रियांचा, संघात प्रवेशासाठी तो तत्वतः कारणीभूत होता.

आनंदाने हे सर्व आरोप कबूल केले.

त्याने हे आरोप मान्य करणे किंवा नाकारणे ही बाब वेगळी आहे. महत्त्वाचा आहे तो तिसरा आरोप. सध्याच्या चर्चेतील तो महत्त्वाचा मुद्दा आहे. महापरिनिब्बाण सुत्तात उल्लेखिलेला भगवंताचा उपदेश सत्य आहे ही जर वास्तविकता असेल तर आनंदाने भगवंताच्या पार्थिवाला स्त्रियांना स्पर्श का करू दिला ? बुद्धाने थोड्याच वेळेपूर्वी केलेल्या उपदेशाची त्याने इतक्या उघडपणे आणि जाणीवपूर्वक अवहेलना केली असती काय ? याचे उत्तर निश्चितपणे नकारात्मक असेल. या नकारात्मक उत्तरातून काय निष्पन्न होते ? त्याच्यावर करण्यात आलेल्या आरोपाप्रमाणे बुद्धाने असा काही उपदेश केलाच नव्हता हेच निष्पन्न होते. आणि जर बुद्धाने असा उपदेश केलाच असता तर आनंद त्या विरोधात वागला नसता. यावरून निःसंदिग्धपणे असे म्हणता येते की असा कोणताही उपदेश बुद्धाने केलेला नव्हता.

या प्रश्नासंबंधी बुद्धाचा दृष्टिकोन विचारात घेता बुद्धाने स्वाभाविकरित्या असे उत्तर दिले असते काय ? बुद्धाची स्त्रियांप्रति असलेली वागणूक हेच या प्रश्नाचे उत्तर आहे. बुद्धाने आनंदाला उपदेश केल्याचे जे सांगितल्या जाते त्याप्रमाणे स्त्रियांना भेटण्याचे टाळले होते काय ? वस्तुस्थिती काय आहे ?

दोन प्रसंग नजरेसमोर त्वरीत येतात. त्यातील एक विशाखाचे आहे. बुद्धाच्या ऐंशी प्रमुख शिष्यांपैकी ती एक होती आणि '' दानदात्यांची प्रमुख '' या पदवीने तिचा गौरव होता. विशाखा कधीकाळी बुद्धाचे प्रवचन ऐकावयास गेली नव्हती काय ? तिने त्यांच्या संघारामात प्रवेश केला नव्हता काय ? बुद्धाने आनंदाला स्त्रियांशी जसे वागण्याचा उपदेश केल्याचे सांगितले जाते तसे बुद्ध विशाखासोबत वागले होते काय ? प्रवचनासाठी उपस्थित असणाऱ्या भिक्खूंनी त्यावेळी काय केले ? त्यांनी प्रवचनातून बहिर्गमन केले होते काय ?

दुसरा प्रसंग नजरे समोर येतो तो वैशालीच्या आम्रपालीचा. ती बुद्धाला भेटायला गेली आणि तिने त्यांना तसेच त्यांच्या भिक्खूंना भोजनासाठी तिच्या प्रासादात येण्याचे निमंत्रण दिले. ती एक वारांगणा होती. ती वैशालीतील सर्वात देखणी स्त्री होती. बुद्धाने आणि भिक्खुंनी तिला टाळले होते काय ? याचवेळी लिच्छवींने दिलेले निमंत्रण नाकारल्यामुळे त्यांना (लिच्छवींना) खूप अपमानीत झाल्यासारखे वाटले असतानाही, बुद्धाने तिचे निमंत्रण स्वीकारले आणि तिच्या प्रासादात जाऊन तिने दिलेल्या भोजनात सहभागी झाले.

याशिवाय आणखी उदाहरणांची गरज भासत नाही. नंदकोवद सुत्तात [1] सांगितल्याप्रमाणे बुद्ध श्रावस्ती येथे वास्तव्यास असताना त्यांच्याकडे महाप्रजापती गौतमी आपल्या सोबत पाचशे दानी-स्त्रियांना घेऊन आली. तिने बुद्धाला धम्मासंबंधी मार्गदर्शन करण्यास विनंती केली असताना बुद्धाने त्यांच्यापासून पलायन केले होते काय ?

संयुक्त निकायात [2] नमूद आहे की पज्जुनाची कन्या कोकानदा, जिच्या सौंदर्याचे तेज संपूर्ण महावनात पसरले होते. ती बुद्धाचे वास्तव्य वैशालीला असताना प्रातः समयी त्यांना भेटावयास आली होती.

राजा प्रसेनजीतची पत्नी राणी मल्लीका धम्मासंबंधीच्या उपदेशासाठी बुद्धाकडे वारंवार येत असल्याचे उल्लेख पिटकांमध्ये ठिकठिकाणी आहेत.

या घटनांवरुन हे स्पष्ट आहे की बुद्धाने स्त्रियांना भेटण्यासंबंधी प्रतिबंध केला नव्हता तसेच स्त्रियांना बुद्धाकडे जाण्याकरिता संकोच वाटत नसे.

स्त्रियांशी होणाऱ्या वारंवार भेटी आणि मानवी स्वभावातील कमकुवतपणा लक्षात घेता बुद्धाने भिक्खूंना सामान्य अनुयायांच्या घरी वारंवार भेटी न देण्याचा उपदेश [3] केला होता हे खरे आहे. परंतु त्यांनी अशा भेटीवर प्रतिबंध घातला नव्हता किंवा त्यांनी स्त्रियांविषयी कधीही तिरस्कार दर्शविला नव्हता.

ब्रह्मचर्य पाळण्यासंबंधी बुद्धाची टोकाची भूमिका होती हेही तितकेच खरे आहे. त्यांच्याच शब्दात. [4] " ब्रह्मचर्याचे जीवन कलंकित करण्याकरिता स्त्रियां कारण ठरु शकतात. " या सत्य गोष्टी विषयी बुद्ध अत्यंत जागरूक होते. पण त्यांनी कोणता उपदेश केला ? स्त्रियांशी असलेले सर्व प्रकारचे संबंध तोडण्याकरिता बुद्धाने भिक्खूंना उपदेश केला होता काय ? मुळीच नाही. त्यांनी असा कोणताही प्रतिबंध लावला नाही. असे करण्याऐवजी त्यांनी भिक्खूंना सांगितले की जेंव्हा केंव्हा ते कोणत्याही स्त्रीशी भेटतात तेंव्हा त्यांनी आपल्या मनात व्यक्तिनुरुप माता, भगिनी आणि कन्या असल्याची भावना [5] बाळगावी ; म्हणजेच तुम्ही प्रसंगानुरूप स्वतःच्या माता, भगिनी आणि कन्या सारखे त्या स्त्रीला समजावे.

स्त्रियांच्या भिक्खू संघातील प्रवेशास तसेच त्यांचा संघ बनविण्यास बुद्धाचा विरोध होता. (सरतेशेवटी त्यांनी परवानगी दिली) आणि भिक्खू संघापेक्षा

---

[1] Majjhma Nikaya, II, P. 309.
[2] Vol. 1. P. 40.
[3] Anguttara Nikaya III. P. 190.
[4] Samyutta Nikaya I. P. 53.
[5] Kindred Sayings IV. P. 68.

भिक्खुणी संघाला त्यानी दुय्यम स्थान दिले या आरोपांचा बुद्धाचे विरोधक आधार घेतात. आणि हेच दुसरे संभाव्य कारण असू शकते.

येथे पुन्हा या परिस्थितीचे विश्लेषण करणे गरजेचे आहे. महाप्रजापतीच्या परिव्रज्या घेण्याच्या मागणीला बुद्धाने विरोध का केला ? स्त्रियां ह्या निम्न वर्गाच्या आहेत, ज्यांच्या प्रवेशामुळे भिक्खू संघाचा दर्जा जनमानसात कमी होईल असा बुद्धाचा समज होता म्हणून त्यांनी यास विरोध केला होता काय ? किंवा स्त्रियां बुद्धाचे तत्त्वज्ञान आणि शिकवण प्रत्यक्षात आणण्याकरिता बौद्धिक आणि नैतिक दृष्ट्या असमर्थ आहेत अशा मताचे ते होते म्हणून त्यांनी याला विरोध केला काय ? चर्चेच्या दरम्यान याविषयी बुद्धाची काहीशी कठोर भूमिका बघता या दोन प्रश्नांपैकी दुसरा प्रश्न बुद्धाला निश्चितपणे आनंदाने विचारला होता इतकेच नव्हे तर शंकेला किंवा वादाला कोणत्याही प्रकारचा वाव राहू नये म्हणून बुद्धाने निःसंदिग्धपणे त्याचे उत्तर दिले. त्यांनी सांगितले की त्यांचे तत्त्वज्ञान आणि शिकवण समजून घेण्यास स्त्रियां पूर्णतः समर्थ असून त्यांच्या परिव्रज्या घेण्याच्या मागणीला विरोध असण्याचे हे कारण नाही. यावरुन हे स्पष्ट होते की पुरुषाच्या तुलनेत स्त्री बौद्धिक किंवा चारित्र्याच्या दृष्टीने कमी दर्जाची आहे अशी बुद्धाची भूमिका नव्हती. त्यांचा दर्जा कमी असल्याने त्या संघाच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील या भीतीतून त्यांच्या प्रवेशाला त्यांनी विरोध केला या युक्तिवादात काहीही अर्थ नाही. असेच जर त्यांचे मत असते तर त्यांनी कधीही त्यांना संघात प्रवेश दिला नसता.

भिक्खू संघाच्या तुलनेत भिक्खूणी संघाला त्यांनी दुय्यम स्थान दिले या युक्तिवादाचे उत्तर असे की, या व्यवस्थेमागे श्रेष्ठपणा किंवा कनिष्ठपणाचा कोणताही विचार नसून, ही भूमिका पूर्णतः व्यावहारिक होती. स्त्रियांना परिव्राजीका म्हणून प्रवेश देताना बुद्धाला दोन प्रश्नांना सामोरे जावे लागले. स्त्री आणि पुरुषांसाठी एकच संघ असावा काय ? यावर त्यांनी दोन स्वतंत्र संघ असावे असा निर्णय घेतला. पुरुष आणि स्त्री परिव्राजकांना जर एकत्र ठेवले तर ब्रह्मचर्याचा नियम पूर्णतः लयास जाईल अशी त्यांना भीती वाटत होती आणि म्हणून स्त्रियांना प्रवेश देण्याबाबत आपण आपल्या मताचा उपयोग करावा असे त्यांना वाटले आणि पुरूषांचे व स्त्रियांचे दोन स्वतंत्र संघ असावेत तसेच त्या दोन संघाच्या दरम्यान गतिरोधक असावे अशी त्यांनी भूमिका घेतली. दोन स्वतंत्र संघ निर्माण करण्याचा निर्णय घेतल्यावर, त्यांना दुसऱ्या एका प्रश्नाला सामोरे जावे लागले. तो म्हणजे एक पुरुषांचा आणि एक स्त्रियांचा असे जर दोन स्वतंत्र संघ असतील तर ते पूर्णतः स्वतंत्र आणि एक दुसऱ्यापासून वेगळे संघ असावेत की त्या दोहोंमध्ये काहीसे परस्पर आंतरसंबंध असावेत ?

पहिल्या प्रश्नावर, स्त्रियांचा संघ पुरुषांच्या संघापासून स्वतंत्र असावा याशिवाय दुसरा निर्णय शक्य नव्हता. दोघांनाही बंधनकारक असणाऱ्या ब्रह्मचर्याच्या नियमाची ही अनिवार्य निष्पत्ती होती. पुरुष तसेच स्त्री या दोघांच्याही जीवनात उपजत, नैसर्गिक वैषयिक वासनेचे स्थान किती प्रभावी आहे, याची बुद्धाला जाणीव होती. बुद्धाच्याच शब्दाचा उपयोग करावयाचे झाल्यास ही वासना पुरुषाला स्त्रीच्या आणि स्त्रीला पुरुषाच्या दास्यत्वाकडे ओढते. या प्रभावाला थोडीही संधी दिली, तर ब्रह्मचर्याचा नियम एका क्षणासाठीही अस्तित्वात राहू शकणार नाही. ब्रह्मचर्याच्या नियमाचे संरक्षण करण्याकरिता त्यांना दोन स्वतंत्र संघाची योजना करावी लागली.

दुसऱ्या प्रश्नाचा विचार करता, बुद्धाने घेतलेल्या निर्णयाव्यतिरिक्त दुसरा निर्णय घेणे शक्य होते काय ? ज्या स्त्रियांनी त्यांचा धम्म स्वीकारला त्या अपरिपक्व स्त्रिया होत्या. त्यांना धम्मतत्त्वज्ञानाची शिकवण देणे तसेच, संघाच्या नियमांबाबत त्यांना प्रशिक्षित करणे गरजेचे होते. ही जबाबदारी कोण घेऊ शकले असते ? दुसऱ्या कोणाला त्यांनी हे कार्य सोपविले असते ? त्यांच्या संघातील पुरुष भिक्खूंशिवाय इतर कोणावरही नव्हे. कारण धम्मतत्त्वज्ञानाची शिकवण देऊन संघाच्या नियमाबाबत त्यांना आधीच प्रशिक्षित करण्यात आले होते. आणि त्यांनी नेमके हेच केले. भिक्खुणींना प्रशिक्षित करण्याची जबाबदारी भिक्खूवर सोपविण्याकरिता त्यांच्यातील कोणते संबंध सुदृढ करण्यात आले ? हा महत्त्वाचा प्रश्न निर्माण करणे आवश्यक आहे. त्याशिवाय भिक्खू संघापेक्षा भिख्खुणी संघ दुय्यम स्थानी असण्याचे स्पष्टीकरण होत नाही. या प्रश्नाचे उघड उत्तर असे की, भिक्खूणींना प्रशिक्षित करण्याची जबाबदारी भिक्खूंकडे सोपविल्यावर त्यांच्यातील नाते, शिक्षक आणि विद्यार्थी असे राहील. शिक्षक आणि विद्यार्थी या नात्यात विद्यार्थ्यांच्या प्रती शिक्षकांना काही अधिकार आणि शिक्षकांच्या प्रती विद्यार्थ्यांनी अधीनतेची आणि दुय्यमतेची भूमिका घेणे अंतर्भूत नाही काय ? यापेक्षा बुद्धाने वेगळे काय केले ?

या संदर्भात ख्रिश्चन चर्चमधील पादरी आणि मादरी यांच्यातील संबंधाची तुलना करणे सोयीचे होईल. मादरी, पादरीच्या तुलनेत दुय्यम नाहीत काय ? अर्थातच त्या आहेत.[१] यावरून कुणी असे म्हणू शकेल काय की ख्रिश्चन धर्म पुरुषाच्या तुलनेत स्त्रियांना कमी लेखतो ? भिक्खू आणि भिक्खूणी मधील संबंध नियमित करण्यासाठी बुद्धाने जर काही व्यवस्था केली असेल तर त्याचा वेगळा अर्थ का लावण्यात यावा ?

---

१ See Article " Nuns " in the Catholic Encyclopaedia. Vol. XI. P. 164.

जेथपर्यंत सुत्तपिटकाचा संबंध आहे, तेथपर्यंत बुद्धाचा स्त्रियांच्या प्रती पक्षपाती दृष्टिकोन होता आणि पुरुषांनी त्यांच्यापासून सावध असावे असे आग्रही प्रतिपादन करण्याच्या आरोपाला कुठलाही आधार नाही.

२.

विशिष्ट घटनांना बाजूला ठेवून बुद्धाचा स्त्रियांकडे पाहण्याचा सर्वसामान्य दृष्टिकोन काय होता याकडे वळू या. स्त्रियां नीम्न दर्जाच्या आहेत अशी बुद्धाची धारणा आहे काय ? मला खात्री आहे की, बौद्धांच्या श्रेष्ठ साहित्यात बुद्धाने स्त्रीवर्गासंबंधी केलेले उल्लेख जो कोणी वाचील त्यावरून त्याची खात्री पटेल की, स्त्रियांना खालच्या पायरीवर जावे लागेल असे काहीही करणे तर दूरच उलट, स्त्रियांना उदात्तता प्राप्त व्हावी, उच्च दर्जा प्राप्त व्हावा यासाठी ते सदैव प्रयत्नशील राहिले. या दृष्टिकोनाच्या पृष्टीसाठी मी काही उदाहरणे देऊ इच्छितो.

सर्वसाधारणपणे भारतीय लोकांना प्राचीन काळापासून मुलीचा जन्म ही एक अत्यंत दुःखद बाब वाटते. बुद्ध या भावनेशी सहमत होते काय ? त्यांचा या प्रश्नाच्याप्रती असलेला दृष्टिकोन, हा परंपरागत दृष्टिकोनाच्या अगदी विरुद्ध होता, हे राजा प्रसेनजीतला त्यांनी केलेल्या उपदेशावरून स्पष्ट होते. बुद्ध श्रावस्तीतील जेतवनात असताना एकदा राजा प्रसेनजीतने बुद्धाची भेट घेतली. राजप्रासादातून एक सेवक आला आणि त्याने कळविले की त्याची पत्नी राणी मल्लिका हिने एका कन्येला जन्म दिला. ही बातमी ऐकल्यावर राजाच्या चेहऱ्यावरील तेज मावळले, तो दुःखी आणि विषण्ण दिसायला लागला. त्याच्या चेहऱ्यात झालेला बदल बुद्धाच्या लक्षात आला आणि त्याला त्याचे कारण विचारले. त्याची माहिती मिळाल्यावर बुद्ध म्हणाले[1] " दुःख का करावे ? हे राजपुरुषा, पुत्रापेक्षा कन्या अधिक चांगली अपत्य ठरु शकते. ती ज्ञानी आणि सद्‌गुणी होऊ शकेल. . . . . . . ज्या पुत्राला ती जन्म देईल त्याच्या हातून महान कार्ये घडू शकतील, तो मोठमोठ्या राज्यांवर अधिसत्ता गाजवू शकेल. . . . . . "

काही कुटुंबे उत्कर्षाला पोहचतात आणि इतर नाश पावतात या प्रश्नांच्या उत्तरात बुद्धाने भिक्खूंना सांगितल्याचे नमूद आहे की[2]—

" भिक्खूंनो, जी काही कुटुंबे मालमत्तेने मोठेपण मिळवितात ती, ते मोठेपण दीर्घकाल टिकवू शकत नाही कारण की, जे गमावले ते परत मिळविण्याचा प्रयत्न करित नाहीत, जे नुकसान झाले त्याची भरपाई करित नाहीत, जे अती खाणे आणि पिणे यात दंग असतात, जे अनैतिक पुरुष आणि स्त्रिया यांच्यावर विसंबून राहतात,

---

1: Samyutto Nikaya, Vol. 1, P. 110.
2: Anguttara Nikaya. Vol. II, P. p. 254-255.

ती कुटुंबे दीर्घकाल टिकत नाहीत. या सर्वास वरील चार पैकी एक अथवा इतर कारणे कारणीभूत असतात.

भिक्खूंनो, जी काही कुटुंबे दीर्घकाळ टिकतात, ती सर्व गमावलेले परत मिळविण्याचा प्रयत्न करतात, नुकसान झाल्याची भरपाई करतात, ती खाणे-पिणे मर्यादित ठेवतात आणि सद्‌गुणी स्त्री व पुरुष यांच्याकडे जबाबदारी सोपवितात. अशी कुटुंबे दीर्घकाळ टिकतात. या सर्व गोष्टींना या चार कारणांपैकी एक किंवा इतर कारणे कारणीभूत आहेत.

ज्यावेळी एखादा राजा सर्वांगीण क्रांतिकारक परिवर्तनाचे कार्य करून जगात चक्रवर्ती (सम्राट) होण्याचा संकल्प करतो अशावेळी काय होते हे बुद्धाने भिक्खूंना असे सांगितल्याचे नमूद आहे की–[1]

'' असा सम्राट जेंव्हा केंव्हा होतो त्यावेळी सात साम्पत्तिक (भांडारे) लक्षणे अस्तित्वात येतात. ही साम्पत्तिक लक्षणे म्हणजे रथ, हत्ती, अश्व, रत्न, स्त्री, गृहपिता आणि वारस होत. ''

दुसऱ्या एका प्रसंगी, जगाला स्त्रीची महानता विशद करताना बुद्धाने सांगितले,[2]

'' स्त्री ही सर्वोच्च उपयोगी असण्याचे कारण की (जसा भाष्यकर्ता सुचवितो) ती अपरिहार्य उपयोगाची आहे कारण तिच्यापासूनच बोधिसत्व आणि सम्राट जन्म घेतात. ''

ज्यांच्या दृष्टीने मुलीचा जन्म दुःखद प्रसंग नसून तो आनंदाचा प्रसंग आहे तसेच जी कुटुंबे स्त्रियांवर अवलंबून राहतात अशा कुटुंबाचा नाश होण्यापासून बचाव होतो, सात सर्वोच्च मौल्यवान वस्तुंपैकी स्त्री एक आहे असे जे निःसंकोचपणे प्रतिपादन करतात, त्यांना स्त्रियांचा द्वेष करणारे आणि तुच्छ लेखणारे म्हणून समजावे काय ? स्त्रियांविषयी असलेल्या सर्वसामान्यांच्या भावना बुद्धाने समजून घेतल्या. स्त्रियांचा उपहास आणि अनादर करण्याकरिता हे सर्व योजिले होते असे कोणी तरी म्हणू शकेल काय ?

३.

भिक्खुणींना भिक्खूंच्या अधिपत्याखाली ठेवून बुद्धाने सामाजिक चूक केली असे ज्यांना वाटते, ते बुद्धाने स्त्रियांना संन्यास किंवा परिव्रज्या (भिक्खुणी) घेण्यास परवानगी देण्याच्या क्रांतिकारक कार्याची दखल घेत नाहीत. ब्राह्मणी तत्त्वज्ञानानुसार स्त्रियांना ज्ञानार्जन करण्याचा हक्क आधीच नाकारलेला

---

[1] Ibid. Vol. V, P. 83.

[2] Samyutta Nikaya, Vol. I. P. 62.

होता. जेंव्हा भारतीय स्त्रियांनी सन्यास घेण्याचा प्रश्न उपस्थित झाला तेंव्हा त्यांनी (ब्राह्मणांनी) दुसरी चूक केली. इतिहासानुसार जे ब्राह्मण वेद पूजा करीत होते आणि ज्यांनी उपनिषदांना पूजनीय मानण्यास दीर्घकाळ नाकारले होते त्यांच्या दृष्टीने ' संन्यास ' हा आदर्श नव्हता. संन्यास हा उपनिषदांचा आदर्श होता आणि संन्यासाची परिणती म्हणजे उपनिषदातील ' आत्मा हेच ब्रह्म ' या तत्त्वज्ञानाची अनुभूती करणे होय. सन्याशी जीवनाला ब्राह्मणांचा प्रखर विरोध होता आणि सरतेशेवटी ते नमले व त्यांनी त्यास काही अटींवर मान्यता दिली. त्यापैकी स्त्रियां (आणि शुद्र) हे संन्यासाला पात्र नाही अशी एक अट होती.

स्त्रियांच्या प्रति असलेली ब्राह्मणांची मानसिकता ही बुद्धाच्या अगदी विसंगत होती, यासाठी ब्राह्मणांनी स्त्रियांना सन्यास घेण्यापासून प्रतिबंध का केला हे महत्त्वाचे कारण समजून घेणे उपयुक्त ठरेल. मनूने याचे कारण दिले आहे. ते असे :—

> ९.१८. स्त्रियांना वेद शिकण्याचा अधिकार नाही. त्यामुळे त्यांचे संस्कार वेदमंत्राविना करावे. स्त्रियांना धर्माचे ज्ञान नसते कारण त्यांना वेद शिकण्याचा अधिकार नाही. वेदमंत्राचे उच्चारण पाप क्षालन करण्याकरिता उपयोगी आहेत. ज्याअर्थी स्त्रियां वेदमंत्र उच्चारु शकत नाही त्याअर्थी त्या असत्य (पापमय) आहेत.

मनु बुद्धाच्या नंतर झालेला असला तरीही जुन्या धर्मशास्त्रामध्ये अभिव्यक्त केलेला दृष्टिकोन त्याने प्रतिपादित केला. स्त्रियांबद्दलचा हा दृष्टिकोन भारतीय स्त्रियांचा अपमान आणि त्यांच्यावर अन्याय करणारा आहे. विद्यार्जन करणे हा प्रत्येक मानवाचा जन्मसिद्ध अधिकार आहे. तो कुठल्याही संयुक्तिक कारणाशिवाय स्त्रियांना नाकारण्यात आला. हा स्त्रियांवर केलेला अन्याय आहे. स्त्रियांना विद्यार्जन करण्याची आधी संधी नाकारणे आणि नंतर तिला ज्ञान नसल्यामुळे ती अशुद्ध आणि असत्य (पापमय) असल्याचे जाहीर करणे आणि म्हणून तिला संन्यास, जे ब्रह्माजवळ जाण्याचे माध्यम होते त्याची परवानगी न देणे हा तिचा अपमान होय. ब्राह्मणांनी स्त्रियांना त्यांच्यातील आध्यात्मिक शक्तीची अनुभूति घेण्याचा हक्कच केवळ नाकारला नाही तर तिच्यात आध्यात्मिक शक्तीचा पूर्णपणे अभाव आहे असे जाहीर केले.

स्त्रियांशी केलेला हा क्रूर व्यवहार होय. इतिहासात याला तोड नाही. प्रो. मॅक्समुल्लर [१] यांनी सांगितल्याप्रमाणे '' दैवीशक्तीपासून मानव कितीही दूर असला तरी या पृथ्वीवर ईश्वरासम पुरुषाशिवाय कोणीही नाही, या पृथ्वीवर पुरुषाशिवाय ईश्वर सदृश्य कोणीही नाही. '' हे पुरुषाच्या बाबतीत खरे आहे तर स्त्रीच्या बाबतीत हे खरे का नाही ? ब्राह्मणांजवळ यांचे उत्तर नाही.

स्त्रियांना परिव्राजिकेच्या जीवनात प्रवेश करण्याची मुभा देऊन बुद्धाने एकाच प्रहारात हे दोन्ही अन्याय नाहीसे केले. त्यांनी त्यांना ज्ञानार्जनाचा हक्क देऊन पुरुषांच्या बरोबरीने आध्यात्मिक शक्तीची अनुभूती घेण्याचा हक्क प्रदान केला. ही, भारतीय स्त्रियांच्या दृष्टीने क्रांती तसेच त्यांची मुक्ती दोन्हीही होते. प्रो. मॅक्समुल्लरच्या [२] शब्दात :--

'' भारतीय इतिहास आपल्याला असे शिकवितो की जुन्या ब्राह्मणी गुलामी नियमांच्या जालीम शृंखला सरतेशेवटी तोडल्या गेल्या. बौद्ध तत्त्वज्ञानाने, वैयक्तिक स्वातंत्र्याचा हक्क, मुख्यत्त्वेकरुन सामाजिक विषमतेच्या पाशातून मुक्त होण्याचा हक्क जसे की, इच्छेप्रमाणे रानात जाऊन संपूर्ण स्वतंत्र आध्यात्मिक जीवन जगण्याचा हक्क प्रस्थापित केला, हे मान्य करण्यास तिळमात्र शंका नाही. ''

भिक्खुणी संघाला भिक्खू संघाच्या अधिपत्याखाली ठेवल्याच्या लांच्छनाच्या तुलनेत बुद्धाने भारतीय स्त्रियांना दिलेले स्वातंत्र्य हे कितीतरी महत्त्वाचे आणि श्रेष्ठ आहे. हे पोकळ स्वातंत्र्य नव्हते. या स्वातंत्र्याचे त्यांनी मनापासून स्वागत आणि गुणगाण केले. '' खरोखरच स्वतंत्र आहे ! मी असीमित स्वतंत्र आहे '' असे गुणगान भिक्खुणी मुत्ता, [३] जी ब्राह्मण कन्या होती, तिने केले. तसेच गुणगान दुसरी ब्राह्मण कन्या, भिक्खुणी मेत्तिका हिनेही केले. '' मी येथे या पाषाणावर बसून मनसोक्त स्वातंत्र्याचा श्वासोच्छास घेत आहे. '' [४]

मिसेस ऱ्हिस डेव्हिड्सच्यानुसार [५] :--

'' त्यांनी (स्त्रियांनी) या स्वातंत्र्याचा उपभोग घेण्याकरिता, नंतर झालेल्या ख्रिश्चन भगिनीसारखे, आपली सर्व सामाजिक प्रतिष्ठा, सर्व ऐहिक वैभव आणि पूर्वीच्या जीवनाचा सर्वस्वी त्याग केला. परंतु याच्या बदल्यात, अनुबंधित जीवनाचे कितीही उदात्तीकरण झालेले असेल, कितीही उत्तेजन दिलेले असेल

---

1. Hibbert Lectures on Religion. P. 379.
2. Ibid, P. 373.
3. Psalms of the Sisters, No. XI.
4. Ibid No. XXIV.
5. Preface to Therigatha.

किंवा कितीही मोठा आश्रय मिळाला असेल तरीही त्यांच्या तुलनेत, त्यांनी वैयक्तिक प्रतिष्ठा प्राप्त केली होती. धार्मिक पुरूषांप्रमाणे वस्त्र परिधान करुन आणि मुंडन करुन ही भगिनी मुक्त होती, ती भगिनी कुठेही संचार करण्यास मुक्त होती, घनदाट अरण्यात एकटी जाऊ शकत होती किंवा गिरी शिखरावर चढू शकत होती. ''

बुद्धाने स्त्रियांना भिक्खुणी बनण्याची परवानगी देऊन त्यांच्याकरिता केवळ स्वातंत्र्याचाच मार्ग मोकळा केला नाही तर त्यांनी त्यांना लिंगभेद विरहित प्रतिष्ठा प्राप्त करुन घेण्याचा स्वतंत्र मताधिकार दिला. मिसेस ऱ्हिस डेव्हिडस यांच्या शब्दात :—

''तिला मिळालेल्या स्वातंत्र्यामुळे बुद्धिप्रामाण्य असलेल्या तिच्या ' अर्हत ' बंधुंनी तिच्याशी लिंगभेद न करता तिच्या सन्याशी जीवनाला मान्यता दिली. या स्वातंत्र्यामुळे ती आध्यात्मिक विश्वाची अनुभूति घेऊ शकली तसेच पिटकांमध्ये वर्णन केल्याप्रमाणे ज्यांना बौद्ध जगतात अत्यंत जागृत म्हणून संबोधण्यात आले अशा त्या निवडक श्रेष्ठ अरिया* बरोबर ती बौद्धिक संवाद करू शकली आणि ती त्यांच्या प्रमाणे सर्व बाबींना सत्य स्वरुपात पाहण्याची शक्ती प्राप्त करू शकली.

भिक्खुणी सोमा [1] म्हणते, स्त्रीचे नैसर्गिक जीवन हे आमच्या आणि अरिया यांच्या मध्ये अडसर कसे ठरू शकते ?

'' ते कुणात काय असल्याचे सुचविते
अंतर्ज्ञान सत्य प्रमाण समाजाविते ?
यात की एकाला प्रश्न निर्माण व्हावा :
अशावेळी मी स्त्री आहे काय, किंवा
मी पुरूष आहे ? किंवा मी काहीच नसेल तर ?
अशावेळी 'मार' च सांगण्यास समर्थ आहे ! ''

हेच सर्व काही नव्हे. बुद्धाने स्त्रियांना भिक्खुणी होण्यास परवानगी देऊन त्यांना पुरुषाबरोबर समानतेचा मार्ग खुला केला. मिसेस ऱ्हिस डेव्हिड्सच्या निष्कर्षाप्रमाणे [२] :

'' भिक्खुणींना तांत्रिकदृष्ट्या कायम स्वरूपात भिक्खूंपेक्षा कनिष्ट नेमले हे खरे आहे. हेही तितकेच खरे आहे की थेरी आपल्या बौद्धिक आणि लौकिक सामर्थ्याच्या बळावर संघातील सर्वोच्च व्यक्तीच्या बरोबरीचे स्थान प्राप्त करू

* अरियो: A venerable or holy men ; a saint ; an Arahata (आर्य)

Dr. Baba Saheb Ambedkar written as and speeches Vol. 16, P. 50 : Editions.

1 : Psalms No. XVI.

2 : Preface to Therigatha Pp. XVI-XXVII.

शकली. Psalms मधील घटनेप्रमाणे, XXXVII बुद्धानंतर संघाचा उत्तराधिकारी असणाऱ्या कश्यपाच्या बरोबर ' भद्रा ' हिने आध्यात्मिक पात्रता प्राप्त केली होती. त्यांनी विवाहित, अविवाहित, परित्यक्ता तसेच वारांगणा या सर्व वर्गातील स्त्रियांकरिता त्यांचा मार्ग खुला ठेवला होता. त्या सर्व, पुरुषांबरोबरीची योग्यता, स्वातंत्र्य, प्रतिष्ठा आणि समता प्राप्त करू शकल्या.

४.

एकेकाळी भारतीय स्त्रियांच्या असलेल्या दर्जाचे कमालीचे अधःपतन झाले यात मुळीच शंका नाही. प्राचीन काळी राजकीय घडामोडीत त्यांनी बजावलेल्या भूमिकेबद्दल खूप काही सांगता येत नाही. परंतु त्यांनी देशाच्या बौद्धिक आणि सामाजिक जडणघडणीत अत्युच्च स्थान प्राप्त केले होते यात मुळीच शंका नाही.

अथर्व वेदानुसार हे स्पष्ट आहे की ऐकेकाळी स्त्री ' उपनयन ' या विधीला पात्र होती, जेणेकरून मुलीचे ब्रह्मचर्य संपल्यानंतर ती विवाहयोग्य होत असे, असे बोलल्या जात होते. श्रौत सुत्रानुसार हे स्पष्ट आहे की स्त्रियां वेदमंत्रोच्चार करू शकत होत्या आणि त्यांना वेद शिकविले जात होते. स्त्रियां गुरूकुलात (विद्यापीठात) जाऊन वेदांच्या विविध शाखांचा अभ्यास करून त्यांची मीमांसा करण्यात निष्णात होत्या. पाणिनीचा ' अष्टाध्याय ' हा या गोष्टीचा पुरावा आहे. स्त्रियां ह्या शिक्षिका होत्या आणि त्यांनी विद्यार्थिनींना वेद शिकविले हे पतंजलीच्या महाभाष्यावरून दृष्टीस येते. स्त्रियां पुरुषांशी धर्म, तत्त्वज्ञान आणि मानसशास्त्र इत्यादी गहन विषयावर चर्चा करीत होत्या, अशा गोष्टींची वाण नाही. मनूपूर्व काळात भारतीय स्त्रियांनी ज्ञान आणि विद्वतेच्या जोरावर अत्युच्च शिखर गाठले होते हे जनक आणि सुलभा, याज्ञवल्क्य आणि गार्गी, याज्ञवल्क्य आणि मैत्रयी तसेच शंकराचार्य आणि विद्याधरी यांच्यात झालेल्या जाहीर वादविवादाच्या गोष्टींवरून दिसून येते.

एकेकाळी स्त्रियांचा मोठा आदर केला जात असे यात दुमत नाही. प्राचीन भारतात राजाच्या राज्यभिषेक प्रसंगी महत्त्वाची भूमिका पार पाडणाऱ्या रत्नींमध्ये राणीचाही समावेश असे आणि इतरांप्रमाणेच तो राणीलाही नजराणा देत असे.[1] निवडलेल्या ह्या राजाने केवळ राणीचाच सन्मान केला नव्हता तर त्याने कनिष्ठ जातीतील [2] इतर पत्नींचा सुद्धा सन्मान केला होता. तसेच राज्याभिषेकांच्या समारोहानंतर राजा प्रतिष्ठित स्त्रियांना वंदन करीत असे.[3]

1: Jaiswal Indian Polity Part-II ; P. 16.

2: Ibid P. 17.

3: Ibid P. 82.

स्त्रियांचा हा जगातील अत्युच्च दर्जा होय. तर मग त्यांच्या अवनतीकरिता कोण जबाबदार आहे ? तो हिंदुंचे कायदे करणारा ' मनू ' होता. याशिवाय दुसरे कुठलेही उत्तर नाही. याबाबत शंकेला कुठलाही वाव राहू न देण्याच्या दृष्टीने मनूने स्त्रियांकरिता तयार केलेले काही कायदे जे मनुस्मृतीत आढळतात, ते मी उद्‌धृत करतो.

२.२१३. पुरूषांना आकर्षित करून भ्रष्ट करणे, हे स्त्रियांचे वैशिष्ट्य होय. ह्या कारणामुळे ज्ञानी लोक स्त्रियांच्या सान्निध्यात कधीच बेसावध नसतात.

२.२१४. स्त्रियां केवळ मुर्खांनाच वाम मार्गाने नेतात असे नसून त्या ज्ञानी पुरुषांनासुद्धा काम आणि क्रोध यांचे गुलाम बनवितात.

२.२१५. वासना ह्या प्रबळ असल्यामुळे त्या ज्ञानी पुरुषाला सुद्धा गुलाम बनवितात म्हणून कुणीही आपल्या माता, भगिनी किंवा कन्या यांच्या सोबत एकांतात राहू नये.

९.१४. स्त्रियां पुरूषांच्या सौंदर्याकडे लक्ष देत नाहीत किंवा त्यांच्या वयाकडे बघत नाहीत. ' हा पुरूष आहे ' एवढेच मनात आणून स्त्रियां त्या पुरुषाच्या स्वाधीन होतात. मग तो सुंदर असो अथवा कुरूप असो.

९.१५. स्त्रियांना कितीही ताब्यात ठेवले तरीही, त्यांना पुरूषांबद्दल असलेल्या त्यांच्या वासनेमुळे, त्यांच्या चंचल स्वभावामुळे, तसेच त्यांच्यात निसर्गतः असलेल्या निर्दयीपणामुळे त्या त्यांच्या पतींचा ही विश्वासघात करतात.

९.१६ निर्मात्या ईश्वराने स्त्री निर्मितीच्यावेळी त्यांची रचनाच अशी केली की त्यांना ताब्यात ठेवण्याकरिता प्रत्येक पुरूषाने पराकाष्ठेचे प्रयत्न करावयास पाहिजे.

९.१७ मनूने स्त्रियांना कामवासनेची तीव्र इच्छा, शृंगार, अपवित्र वासना, क्रोध, अप्रामाणिकपणा, मत्सर आणि दुर्वर्तन बहाल केले.

मनूच्या दृष्टीने स्त्री किती नीच होती हे यावरून दिसते.

मनूचे स्त्रियांविरुद्ध असलेले कायदे हे त्याच्या ह्या दृष्टीकोनाचा पुरावा होय.

कुठल्याही परिस्थितीत स्त्रियां स्वतंत्र असू नयेत.

मनूच्या मतानुसारः—

९.२. पुरूषांनी आपल्या कुटुंबातील स्त्रियांना रात्रंदिवस आपल्यावर अवलंबून ठेवावे. त्यांची वैषयिक अभिरूची निर्माण होत असेल तर त्यांना ताब्यात ठेवावे.

९.३. स्त्री तिच्या लहानपणात पिता, तरूणपणात पती आणि म्हातारपणात पुत्र यांच्या नियंत्रणात असते. ती कधीही स्वतंत्र राहू शकत नाही.

९.५. स्त्रीला विशेषकरून पापमय प्रवृत्तीपासून परावृत्त केलेच पाहिजे. जर तिला त्यापासून परावृत्त केले नाही तर क्षुल्लक बाब सुद्धा दोन्ही कुटुंबावर दुःख ओढविते.

९.६. सर्व जातींचे सर्वात महत्वाचे कर्तव्य म्हणजे कमकुवत पतींनी सुद्धा आपल्या पत्नींच्या सुरक्षिततेची पराकाष्ठा करावी.

५.१४७. मुलीने, तरूण स्त्रीने किंवा वृद्ध स्त्रीने स्वतःच्या घरी सुद्धा काहीही स्वतंत्रपणे करू नये.

५.१४८. स्त्रीला तिच्या बालपणी तिच्या पित्यावर, तरूणपणी तिच्या पतीवर आणि तिच्या पतीच्या मृत्यूनंतर तिच्या पुत्रांवर अवलंबून राहायला हवे. ती कधीही स्वतंत्र राहू शकत नाही.

५.१४९. तिने पिता, पती, किंवा पुत्र यांच्यापासून विभक्त होण्याचा प्रयत्न करू नये. त्यांच्यापासून विभक्त झाल्यामुळे ती दोन्हीकडील (स्वतःच्या आणि तिच्या पतीच्या) कुटुंबाला तिरस्करणीय ठरते.

स्त्रीला घटस्फोट घेण्याचा अधिकार नाही.

९.४५. पतीचे पत्नीसोबत असणे बंधनकारक आहे. म्हणजेच, एकदा विवाह झाल्यानंतर पत्नी वेगळी होऊ शकत नाही.

मनूने संस्कारित विवाहालाच सन्मानाचे स्थान दिले आणि म्हणून घटस्फोटाला परवानगी दिली नाही. मनूचा घटस्फोटासंबंधी असलेला हा कायदा, हाच सर्व काही आहे असे बहुतांश हिंदू समजतात आणि येथेच थांबतात. ते त्यांच्या विवेकाचे ह्या विचाराने समाधान करतात तसेच त्याला ईश्वरी मानतात. अर्थात, हे सत्यापासून कितीतरी दूर आहे. मनूच्या

घटस्फोटाविरूद्ध असलेल्या कायद्याचा उद्देश अगदी वेगळा होता. येथे पुरूषाला स्त्रीच्या बंधनात ठेवावयाचे नसून स्त्रीला पुरूषाच्या बंधनात ठेवण्याची आणि पुरूषाला मात्र स्वतंत्र सोडण्याची प्रक्रिया होती.––

पुरुषाने पत्नीला सोडून देण्यावर मनूने कुठलेही बंधन घातले नाही. खरे म्हणजे त्याने (मनूने) पत्नीचा पूर्णपणे त्याग करण्याची पुरूषाला मुभा दिली, इतकेच नव्हे तर तो तिला विकण्याची सुद्धा परवानगी देतो, परंतु तो पत्नीला स्वतंत्र होण्यापासून पूर्णपणे प्रतिबंधीत करतो. मनू काय म्हणतो ते पहा :––

> ९.४६. पत्नीला विकल्यानंतर किंवा तिचा अस्विकार केल्यानंतर सुद्धा ती पतीच्या बंधनातून मुक्त होत नाही.

याचा अर्थ असा की पत्नीला पतीने विकले किंवा तिचा अस्विकार केला तरीही ती दुसऱ्याची, (ज्याने तिला विकत घेतले किंवा आश्रय दिला, त्याची) कायदेशीर पत्नी कधीच होऊ शकत नाही. याच्या इतके क्रूर, दुसरे काहीही असू शकत नाही. परंतु मनू कायदे करीत असताना न्याय आणि अन्याय याची जाणीव ठेवण्याची चिंता करीत नव्हता. मनूला, स्त्रियांना बौद्ध काळात मिळालेल्या स्वातंत्र्यापासून वंचित करावयाचे होते. तिला मिळालेल्या हक्कामुळे मनू दुखावला होता आणि म्हणून त्याने त्यावर पूर्णपणे बंदी घालून मिळालेल्या स्वातंत्र्यापासून तिला वंचित केले.

संपत्तीच्या बाबतीत मनूने पत्नीला गुलामाच्या स्तरावर आणले.

> ९.४१६. पत्नी, पुत्र आणि गुलाम या तिघांनाही कुठलीही संपत्ती संपादन करण्याचा हक्क नाही. त्यांनी मिळविलेली संपत्ती ही ते ज्याच्या मालकीचे आहेत त्याची असते.

पती जर संयुक्त कुटुंबातील असेल तर मनू पत्नी विधवा झाल्यावर तिच्या प्रतिपाळाची परवानगी देतो आणि जर पती कुटुंबापासून विभक्त असेल तर त्याच्या मालमत्तेत तिला गृहीत धरतो. परंतू संपत्तीवरील तिच्या वर्चस्वाला मनू कधीही मान्यता देत नाही.

मनूच्या कायद्याप्रमाणे स्त्री देहदंडास पात्र आहे. तसेच मनू पत्नीला मारण्याचा अधिकार पतीला देतो.

> ८.२९९. पत्नी, पुत्र, गुलाम, विद्यार्थी आणि सख्खा धाकटा बंधु, यांनी जर काही चूक केली असेल तर त्यांना दोरखंड किंवा फोडलेल्या बांबूने मारता येते.

मनूनुसार स्त्रीला ज्ञानार्जन करण्याचा अधिकार नाही.

मनूने वेद शिकण्याच्या तिच्या अधिकारावर पूर्णपणे बंदी आणली.

२.६६. स्त्रियांकरिता सुद्धा संस्कार करुन घेणे आवश्यक आहे आणि ते करावे. परंतु ते वेदमंत्राविना करावे.

ब्राह्मणी तत्त्वज्ञानाप्रमाणे यज्ञ करणे हा धर्माचा मूळ आत्मा होय. मनू स्त्रियांना यज्ञ करण्यापासून प्रतिबंधीत करतो. तो असा कायदा करतो की :—

९.३६-३७. वेदांनी निर्धारित केल्याप्रमाणे स्त्रियांनी दैनंदिन यज्ञयागादी करु नयेत. तिने तसे केल्यास ती पापयोनीत जाते.

स्त्रीला अशाप्रकारचे यज्ञयागादी करता येऊ नये म्हणून मनूने तिला ब्राह्मणांची मदत आणि त्यांचा उपयोग घेण्यास प्रतिबंधीत केले.

४.२०५-२०६. स्त्रीने यज्ञ केल्यानंतर तिने दिलेले अन्न ब्राह्मणांनी ग्रहण करु नये. स्त्रियांनी केलेले यज्ञ हे अमंगल असून ते देवाला मान्य नाही म्हणून ते टाळावे. शेवटी मनूने स्त्री पुढे जीवनाचा आदर्श जसा मांडला तो त्याच्याच शब्दात सांगणे योग्य आहे :—

५.१५१. पित्याने अथवा पित्याच्या संमतीने तिच्या बंधूने तिला ज्या पुरुषाला दान केले असेल, तिने तो जिवंत असेपर्यंत त्याच्या आज्ञेत राहावे आणि त्याच्या मृत्युनंतर त्याच्या स्मृतीचा सुद्धा अपमान करु नये.

५.१५४. प्रामाणिक पत्नीने तिचा पती कितीही दुर्गुणी, व्यभिचारी किंवा सद्‌गुणविरहित असला तरीही त्याची ईश्वर समजून सतत पूजा करावी.

५.१५५. स्त्रियांनी आपल्या पतीशिवाय यज्ञ, नवस, उपवास करु नये. ती पतीच्या आज्ञेत राहिली, केवळ ह्या कारणामुळे ती स्वर्ग लोकांमध्ये गौरवास पात्र ठरते.

यानंतर मनूने स्त्रियांकरिता निर्धारित केलेले मूलभूत निवडक कायदे देत आहे :—

५.१५३. जो पुरुष तिच्याशी पवित्र मंत्रोच्चाराने विवाहबद्ध झाला तो तिच्याकरिता अनुकूल तसेच प्रतिकूल काळात, या जन्मी तसेच पुढच्या जन्मी सतत सुखाचा जनक ठरतो.

५.१५०. तिने नेहमी आनंदी राहावे, घरगुती कामकाजात आणि व्यवस्थापनात कुशल असावे, काळजीपूर्वक भांडी स्वच्छ करावी आणि खर्चात काटकसरी असावे.

हिंदू याला स्त्रियांकरिता असलेला उदात्त असा आदर्श मानतात !!!

' स्त्री-हत्या ' हे केवळ उपपातक म्हणजेच क्षुल्लक गुन्हा आहे, असा मनूने नवीन नियम करून त्याने स्त्रियांच्या निर्बलीकरणाच्या इमारतीवर कळस चढविला.

११.६७. स्त्रियां, शुद्र, वैश्य, क्षत्रिय आणि निरिश्वरवादी इत्यादिंचा शिरच्छेद तसेच मद्यपान हे सर्व क्षुल्लक गुन्हे होत.

शुद्र, वैश्य आणि क्षत्रिय यांची हत्या, हे केवळ उपपातक होते असे मनूने का म्हटले हे कोणीही सहज समजू शकतो. ब्राह्मण या सर्वापेक्षा श्रेष्ठ आहे आणि केवळ ब्राह्मणाचीच हत्त्या हे महापातक होते हे प्रस्थापित करण्याचा तो प्रयत्न होता. परंतु त्याने तसाच नियम स्त्रियांकरिता का वापरला ? याचे एकमेव कारण असे की मनूच्या दृष्टीने ' स्त्री ' ही कुठलीही किंमत नसलेली वस्तू होती.

वरील उद्धारणांच्या वैशिष्ट्यावरून मनू हा भारतीय स्त्रियांच्या अवनतीस कारणीभूत होता याबद्दल कोणीतरी शंका घेऊ शकेल काय ? बऱ्याच लोकांना ह्या बाबींची बहुतेक जाणीव आहे. परंतु त्यांना दोन बाबी माहीत नसल्याचे जाणवते. त्यांना यामध्ये विशेष असे काय आहे, हे माहीत नाही. मनूच्या स्त्रियांविषयी कायद्यांमध्ये नवीन अथवा आश्चर्यकारक असे काहीही नाही. भारतात ब्राह्मणी तत्त्वज्ञानाचा जेव्हापासून उदय झाला तेव्हापासून ब्राह्मणांचा असाच दृष्टिकोन आहे. मनूच्या आधी ते केवळ सामाजिक सिद्धांत होते. ह्या सामाजिक सिद्धांताला राज्याच्या कायद्यामध्ये रुपांतरित करण्याचे काम मनूने केले. मनूने स्त्रियांवर हे निर्बलीकरणाचे कायदे का लादले हे त्यांना माहीत नसणे, ही दुसरी बाब आहे. आर्य समाजात शुद्र आणि स्त्रियां हे महत्त्वाचे दोन घटक होते. ब्राह्मणी धर्माच्या मूलगामी तत्त्वांना सुरूंग लावून ते समुहा-समूहाने बुद्धांच्या धम्मात प्रवेश करण्याकरिता जात होते. बौद्ध धम्माकडे जाणाऱ्या स्त्रियांच्या ह्या लाटेला मनूला थोपवावयाचे होते.

मनूने ह्याकरिता स्त्रियांवर निर्बलीकरणाचे कायदे लादून त्यांना कायमचे पंगू केले. ह्याबद्दल ज्यांना शंका आहे त्यांनी मनूस्मृतीमधील खालील आदेशाचा विचार करावा :—

५.८८. मिश्र विवाहापासून, संन्याश्यापासून तसेच आत्महत्त्या केलेल्या व्यक्तीपासून जन्मलेल्यांचे, ' मृत्यू आणि त्यानंतरचे संस्कार '

सामान्य व्यक्तिच्या मृत्यू आणि अंत्यसंस्काराप्रमाणे करण्यास मनाई केली आहे.

५.८९. ज्या स्त्रियांनी निरिश्वरवादी संप्रदायात (Heretic Sect) प्रवेश घेतला, ज्या स्वच्छंदी वागतात, गर्भात असणाऱ्या अर्भकाला तसेच स्वतःच्या पतीला ज्या इजा पोहचवितात तसेच ज्या मद्यपान करतात अशांनीही वरील संस्कार नाकारले.

हे आदेश इतर उद्देशाशिवाय जे (१) संन्याशी वृत्तीचे आहेत आणि (२) ज्या स्त्रियांनी निरिश्वरवादी संप्रदायात प्रवेश घेतला अशांना दृष्टीत ठेवून जाणीवपूर्वक करण्यात आलेले आहेत. या आदेशामधील संन्याशी हे परिव्राजकाला, म्हणजेच ज्यांनी आपले घरदार पूर्णपणे सोडून संन्यास घेतला आहे अशांना संबोधून आहे. मनूने निरिश्वरवादी सम्प्रदायाचा उल्लेख करताना त्याच्या मनात बौद्ध धर्म होता यात कुठलीही शंका नाही. यावरून हे स्पष्ट आहे की संन्याशी किंवा ज्या स्त्रीने निरिश्वरवादी सम्प्रदायात प्रवेश घेतला असेल त्यांचे कुठलेही अंत्य व उत्तर संस्कार करण्यात येणार नाहीत इतकेच नव्हे तर त्यांच्या कुटुंबातील सदस्यांकरिता, तो पुरुष अथवा स्त्री, तसेच ज्याने बौद्ध धर्मात प्रवेश केला आहे अशांचेही अंत्य आणि उत्तर संस्कार करण्याची मनाई केलेली आहे. दुसऱ्या शब्दात, त्यांचा जणू त्या कुटुंबाशी संबंधच नसून आणि ते त्या कुटुंबाचे घटकच नाहीत अशी मनूला त्यांच्याशी वागणूक ठेवावयाची होती. मनू हा बौद्ध धर्माचा कट्टर विरोधक होता. स्त्रियांवर लादलेल्या अनेक अन्यायांचे हे मर्म आहे. त्याला हे माहीत होते की जर आपले घर बौद्ध तत्त्वज्ञानाच्या आक्रमणापासून सुरक्षित ठेवावयाचे असेल तर ती केवळ स्त्री आहे जिला बंधनात ठेवणे अत्यावश्यक आहे आणि ते त्याने केले. भारतीय स्त्रियांच्या अवनतीला आणि ऱ्हासाला कारणीभूत दोष बुद्धावर नसून तो संपूर्ण मनूवर येतो.

या काही पृष्ठात मी हिंदू स्त्रियांचे उत्थान आणि पतन याची हकीगत मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या अवनतीचा जनक कोण आहे आणि त्याने हे सर्व का केले, याचे सुद्धा स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न केला आहे. पूर्वग्रहदूषित नसलेले तसेच निःपक्ष लोक जाणतील की या सर्व शोकान्तिकेला बुद्धाला जबाबदार धरता येणार नाही, अशी मी अपेक्षा करतो. बुद्ध झटले, ते स्त्रियांना प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी आणि त्यांचा दर्जा पुरूषांच्या बरोबरीने आणण्यासाठीच !!

● ● ●

अनुवादक : संपादक मंडळ, डॉ. कृष्णा. एम. कांबळे व प्रा. आनंद आर. गजवे.

१०९

हिंदु समाजातील वर्गावर्गातील उच्चनीच भेद व लिंगभेद कायम ठेवून कोणतेही सुधारण्याचे कायदे म्हणजे घाण न काढता त्यावरच उभारलेले पत्त्यांचे बंगले !

मी मंत्रिमंडळाचा आतां सभासद राहिलेला नाहीं, हें लोकसभेला अधिकृत रीतीनें जरी नसलें तरी अनधिकृत रीतीनें कां होईना माहीत झालेलें आहे. गुरुवार ता. २७ सप्टेंबर १९५१ रोजीं मी माझ्या मंत्रिपदाचा राजिनामा प्रधान मंत्र्यांना सादर केला व मी त्यांना विनंति केली कीं, माझा राजिनामा ताबडतोब स्वीकारा व मला या जबाबदारींतून मुक्त करा. प्रधान मंत्र्यांनीं तो राजीनामा दुसऱ्या दिवशी स्वीकारण्याची मेहेरबानी केली. मी शुक्रवार तारीख २८ पासून मंत्री म्हणून राहिलेलो आहे. याचे कारण हें कीं, लोकसभेचे चालू अधिवेशन संपेपर्यंत मी मंत्री म्हणून रहावें अशी मला प्रधान मंत्र्यांनीं विनंती केलेली होती.

घटनात्मक दृष्टीनें जी परंपरा रूढ झालेली आहे, त्या परंपरेला अनुसरून प्रधान मंत्र्यांच्या विनंतिला मान देणें हें माझे कर्तव्य होतें.

एखाद्या मंत्र्यानें आपल्या मंत्रीपदाचा राजिनामा दिला तर त्यानें त्याबद्दल आपलें निवेदन लोकसभेंपुढें मांडावें, अशी लोकसभेच्या नियमांत तरतूद केलेली आहे. मी मंत्री असतांना इतर बऱ्याच मंत्र्यांनीं आपले राजिनामे दिलेलें आहेत. जे मंत्री राजिनामे देतात त्यांनी आपलीं निवदनें कशी मांडावीत, याबद्दलच योग्य असा पायंडा, अजून पडलेला नाहीं. आतापर्यंत ज्या मंत्र्यांनीं राजिनामे दिलेले आहेत त्यापैकी कांही जणांनीं निवेदनें न देतांच लोकसभेंतून निघून गेलें, तर कांही जणांनीं निवेदनें दिल्या नंतर निघून गेले. मी या बाबतीत कोणता मार्ग स्वीकारावा या बद्दल मला नक्की निर्णय लौकर घेता आला नाहीं. सर्व परिस्थितीचा विचार केल्यानंतर मी असें ठरविलें की, जो सभासद आपल्या जागेचा राजिनामा देतो त्यानें आपलें निवेदन लोकसभेपुढें मांडणें, हें त्याचें कर्तव्यकर्म आहे आणि या तत्वाला अनुसरून माझ्या राजीनाम्याबद्दल लोकसभेंपुढें मी निवेदन मांडणें अत्यंत आवश्यक आहे.

मंत्रीमंडळ आपलें कार्य करसें करीत असतें, सर्व मंत्र्यांचें प्रत्येक मुद्यावर एक मत होते कीं त्यांच्यात धुसफुस होत असतें याबद्दलची माहिती लोकसभेला कधींच मिळत नाहीं. मंत्र्यामंत्र्यांत मतभेद झाले तरी ज्या मंत्र्याला मंत्रीमंडळांतील बहुमताचा पाठिंबा मिळत नाहीं अशा मंत्र्यानें आपले मतभेद मंत्रीमंडळाबाहेर प्रगट करू नयेत आणि मंत्रीमंडळाच्या संयुक्त जबाबदारीला प्रत्येक मंत्र्यानें मान झुकविली पाहिजें, या तत्वाची घोरपड सदर मंत्र्याच्या गळ्यात अडकलेली असल्यामुळें त्याला आपले मतभेद बाहेर प्रगट करतां येत नाहीत व म्हणून लोकसभेला मंत्रीमंडळाच्या कार्य करण्याच्या पद्धतीची कांही माहिती मिळत नसतें. म्हणून मंत्रिमंडळात मतभेदांचा अग्नि धुमसत असला तरी लोकसभेला वाटतें कीं मंत्रीमंडळाचे सुताच्या धाग्याप्रमाणें सुरळीत चाललेलें आहे. ज्या मंत्र्याला राजिनामा देऊन मंत्रीमंडळ सोडावयाचें आहे त्यानें आपण असें कां करतो याची सविस्तर माहिती लोकसभेला देणें हें त्याचें कर्तव्यकर्म होय.

याशिवाय दुसरें कारण असें कीं, जो मंत्री आपल्या राजीनाम्याची सत्य बाजू लोंकांपुढें न मांडता निघून जाईल त्याबद्दल लोकांचा असा समज होईल कीं, या मंत्र्याचें घोडें कोठें तरी पाणी पित असलें पाहिजें, मग तें त्याच्या खाजगी बाबतींत असो वा सार्वजनिक बाबतींत असो. राजिनामा देणाऱ्या कोणत्याहि मंत्र्यानें लोकांना तर्क कुतर्क करण्यांस वाव देऊं नये यांतून उत्तम मार्ग म्हणजें लोकांपुढें आपल्या कृतिचें निवेदन मांडणें हा होय.

तिसरें कारण असें कीं, आपली जीं वर्तमानपत्रें आहेत त्यांत अशी कित्येक आहेत कीं, ती कांही सार्वजनिक कार्यकर्त्याबद्दल नेहमीच पूर्वग्रहदुषित दृष्टींनें लिहीत असतात, तर कित्येक नुसत्या टीकेचा भडीमार उठवित असतात. प्रत्येक कार्यकर्त्याच्या गुणावगुणांवर योग्य तेवढा प्रकाश टाकणें हें अशा वृत्तपत्रांना नंतर कधींहि जमत नाहीं. राजिनाम्याच्या प्रकरणांत या वृत्तपत्रांना जेवढी म्हणून कांही न्यूनस्थळें दिसतील तेवढीच तीं लोकांपुढें मांडतील आणि राजीनाम्याची खरी कारणें पुढें न मांडता सदर वृत्तपत्रें स्वकपोलकल्पित कारणें पुढें घुसडून देतील. वृत्तपत्रांना ही उलटापालट करण्याची एवढी कां उठाठेव करावी लागते ? कारण, त्याना जे मंत्री प्रिय वाटतात त्यांचा त्यांना उदोउदो करून लोकांत त्यांचें स्तोम माजवावयाचे असतें, आणि जे मंत्री त्यांना अप्रिय वाटतात त्यांची अतीरंजीत वर्णनें अशी करावयाची कीं, ते मंत्री लोकांच्या डोळ्यात खुपत राहावेत !

मंत्रिमंडळांतून बाहेर पडावयाच्या अगोदर मला जे निवेदन या लोकसभेंपुढें मांडावयाचे आहे, त्याची कारणें हीं अशीं आहेत.

मी कायदेमंत्री व्हावे म्हणून मला प्रधान मंत्र्यांनें सुचविले त्याला आज ४ वर्षे १ महिना व २६ दिवस झाले. मंत्रीपदाची सूचना माझ्या पुढें मांडण्यात आली तेव्हां मला मोठे आश्चर्य वाटले. मी विरोधी पक्षांतील माणूस, त्यांतून ऑगस्ट १९४६ मध्यें जें हंगामी सरकार आले त्यांत बसण्यांत सर्वस्वी नालायक म्हणून माझ्याबद्दल चोहोकडे डंका पिटविलेला होता. अशा परिस्थितींत माझे सार्वजनिक आयुष्य जात असतांना मला मंत्रिमंडळात या म्हणून प्रधानमंत्री मला आंमत्रण देतात हें पाहून मला आश्चर्य तर वाटलेच पण असें करण्यास प्रधानमंत्री कोणत्या कारणामुळें उद्युक्त झाले, याबद्दल तर्कवितर्क करण्यास मला विषय मिळाला. प्रधान मंत्र्यांच्या मनांत एवढा थारेपालट झाला तो कशामुळे ? या घटनेबद्दल मी साशंक झालो. जे माझ्याशीं कधी मित्रभावानें वागलें नाहीत अशा मंत्र्यांच्या बरोबर माझे कसें काय जमेल, हें मला कळलें नाहीं. शिवाय मला अशी शंका वाटत होती कीं माझ्या पूर्वी जे गृहस्थ कायदे मंत्री झालेले होते त्याचे जे अवाढव्य ज्ञान होते आणि कायदे खात्यांतील कार्याचा जो एक उच्च दर्जा उत्पन्न करून ठेवलेला होता त्यापुढें माझें कसें काय होईल ! परंतु या माझ्या सर्व शंका आणि माझे हे सर्व तर्कवितर्क मी माझ्या जवळच ठेऊन दिले आणि कायदे मंत्रीपदाची चालून आलेली जागा मी स्वीकारली. ही जागा स्वीकारण्यात माझा प्रमुख हेतु हा होता कीं, राष्ट्रविकासासंबंधीच्या कार्यात जर हे लोक माझ्याशीं सहकार्याचा हात पुढें करीत आहेत तर तो हात न धरणें हे योग्य नव्हे. मंत्रिमंडळाचा सभासद आणि कायदेमंत्री या द्विविध स्वरूपांत मी आपलें कर्तव्यकर्म कितपत चोख रीतीनें बजावलें, हें माझ्या हाती नाहीं, ते जनतेच्या हाती आहे. जनता तें ठरविलच.

माझ्या सहकार्यापासून तुटून दुर होण्यास कोणत्या गोष्टी कारणीभूत झाल्या याबद्दल मी आतां माहीती सांगतो. मंत्रीमंडळातून आपण बाहेर पडावें, अशी मला फार दिवसापासून तळमळ लागून राहिलेली होती. आणि अशी तळमळ लागायला एकामागून एक अशी अनेक प्रकारची कारणें एक सारखी उत्पन्न होत गेली.

प्रथम मी वैयक्तिक कारणांकडे वळतो. हीं वैयक्तिक माझ्या राजिनाम्याला सर्वथा कारणीभूत झाली नाहींत हें मात्र मी आगाऊ सांगतो. व्हाईसरॉयच्या कार्यकारी मंडळाचा मी पूर्वी सभासद होतो त्यामुळें मला माहित आहे कीं, कायदेमंत्रीपद हें अंमलबजावणीच्या दृष्टिनें महत्वाचें पद नाही. भारत सरकारची धोरणें ठरवण्याच्या बाबतींत कायदे खात्याला कधींच संधी मिळाली नाही, व मिळत नसतें. हें खाते म्हणजे एकाद्या बुद्‌ढ्या वकीलाला

मनकरमणुकीसाठीं दिलेलें पोकळ खेळणें होय, असें आम्ही कायदेखात्याबद्दल मत प्रदर्शित करीत असून प्रधान मंत्र्यांनीं जेव्हा मंत्रीपदाची देणगी माझ्यापुढे ठेवली तेव्हां त्यांना मी म्हटलें कीं. मी धंद्यानें वकील आहें हें खरें, पण मी जे उच्च प्रतिचे शिक्षण घेतलेलें आहे, आणि कामाकाजांचा जो मला प्रत्यक्ष अनुभव आलेला आहे त्यावरुन मी दोन खाती चालविण्यास समर्थ आहे आणि व्हाईसरॉयच्या कारकीर्दीत मी अंमलबजावणीचा संबंध असलेलीं दोन खाती चालवित होतों--एक मजूर खातें व दुसरें सेंट्रल पब्लीक वर्क्स डिपार्टमेंट. तेव्हां तुम्ही मला कायदेखाते देतां त्याच्या जोडीला दुसरे अंमलबजावणीचा संबंध असलेंले खातें मला द्या. माझ्या या मागणीला प्रधान मंत्र्यांनी मान्यता दिली व ते म्हणाले कीं, [प्लँनिंग] योजना खातें लौकरच निर्माण करण्यात येईल. व तें तुमच्याकडे सोंपविलें जाईल. दुर्दैवानें हें खातें फार उशीरा निर्माण करण्यात आलें आणि ते जेव्हां निर्माण करण्यांत आलें तेव्हां मला डावलून ते दुसऱ्याच्या हाती दिलें गेलें. मंत्री म्हणून मी जेवढा काळ घालविला तेवढ्या काळांत एका मंत्र्यापासून दुसऱ्या मंत्र्यांकडे अनेक खात्याची फिरवाफिरवी करण्यांत आली. या फिरवांफिरवी जेव्हां चालूं होत तेव्हां मला वाटे की. एकादें जादा खाते मला देण्यांत येईल. परंतु मला शेवटी दिसून आले कीं, या भानगडीतून मला वगळण्यांत आलें. पुष्कळ मंत्र्यांना दोन किंवा तीन खातीं देण्यांत आलेली आहेत. या खात्यांचीं कामें त्यांना डोईजड झालेली आहेत. माझ्याप्रमाणें कांही मंत्र्यांना भरपूर काम नाहीं. त्यांना भरपूर काम मिळावें म्हणून त्यांना जादा खातीं द्यावीत, असें त्यांचे मत होतें. एकादा मंत्री कांही दिवसांसाठी परदेशी गेला तरी त्याचें खातें कांही दिवसांसाठी माझ्याकडे सोंपविण्याचें प्रधान मंत्र्यांना सुचलें नाहीं. • निरनिराळ्या खात्यांची वाटणी मंत्र्यांमध्यें करतांना प्रधानमंत्री कोणत्या तत्वाचा अवलंब करतात, हें सांगणें कठिण आहे. मंत्र्यांची लायकी कीं विश्वासपात्रता कीं मैत्री कीं पडत्या फळाची आज्ञा मानण्याची प्रवृत्ति पाहून प्रधान मंत्री त्यांच्याकडे विशिष्ट खाती सोपवित ? परदेशव्यवहार समिती, इत्यादि ज्या प्रमुख समित्या प्रधानमंडळ नेमते अशा एकहि समितीवर माझी नेमणूक केली नाहीं. आर्थिक व्यवहार समिती जेव्हां निर्माण केली तेव्हां मी अशी अटकळ बांधली कीं मीं अर्थशास्त्र आणि पैश्यांचा व्यवहार या विषयांचा कसून अभ्यास केलेला असल्यामुळे या समितीवर माझी निवड करण्यात येईल. परंतु, याहि वेळीं मला वगळण्यांत आलें; प्रधान मंत्री इंग्लंडला गेले तेव्हा या समितीवर मला नेमण्यात आले; पण ते परदेशाहून परत आले तेव्हां प्रधान मंडळाची पुनर्रचना

करण्यासाठीं त्यांनीं ज्या योजना हाताळल्या त्यांत मला सदर समितीवरून काढून टाकलें. पुढें प्रधानमंत्र्यांनीं प्रधानमंडळाची पुन: जी पुनर्घटना केली तेव्हां माझी सदर कमिटीवर निवड केली. माझ्यासंबंधी मुख्य प्रधानांचें हे जें वर्तन होत होतें त्याबद्दल मी त्यांच्या समोर निषेध केला तेव्हां त्यांचे डोळे उघडले व त्यांनी सदर समितीवर माझी नेमणूक केली.

माझ्या बाबतींत जाणून बुजून जो पंक्तिप्रपंच करण्यात येत होता, त्याबद्दल मी मुख्य प्रधानाकडे कधीं कुरकुर केली नाहीं. याबद्दलची ग्वाही मुख्य प्रधानच देतील, अशी माझी खात्री आहे. सत्तेंचे राजकारण खेळण्यासाठीं किंवा एकाद्या मंत्र्याची जागा रिकामी झाली असतां ती आपणाकडे ओढून घेण्याची प्रधान मंडळांतील सभासदांत जी जिवापांड धडपड चालू होई, त्यांपासून मी पूर्ण पणें अलिप्त राहात असे. मूकावस्थेत राहून सेवा करणें हेच श्रेष्ठ कर्तव्य होय असा माझा विश्वास आहे. आणि त्याप्रमाणें प्रधान मंत्र्यांनी माझी योग्यता जाणून माझ्याकडे जी जागा सोंपविली त्या जागेची सेवा मी मनोभावे केलेली आहे. अशा परिस्थितींतहि माझ्या बाबतींत अन्याय झाला हें मला दिसले नाहीं, असें मी म्हटलें असतें तर तें मनुष्य स्वभावाला सोडून होतें.

आपल्या सरकारबद्दल मी नाराज कां झालों याची दुसरी एक बाजू आहे. ती म्हणजे मागासलेले वर्ग आणि वर्गीकृत वर्ग यांच्या हिताबद्दल सरकारनें जी अनावस्था दाखविली ती होय. मागासलेल्या वर्गांच्या हितांसंबंधीं घटनेंत कांही तरतूद केलेली नाहीं, या गोष्टींचे मला मनस्वी दु:ख होतें. राष्ट्राध्यक्षांनीं जें मंडळ नेमावयाचें आहे त्या मंडळानें या बाबतींत काय ती उपाययोजना सुचवावयाची व त्याची अंमलबजावणी पुढें व्हावयाची असें घटना तयार करतांना ठरविण्यांत आलेलें होतें. आपण घटना मंजूर केली त्याला एक वर्ष होऊन गेलें. परंतु सदर मंडळ नेमण्याचें सरकारला अद्याप जरूर वाटत नाहीं. १९४६ सालांत मी मंत्रीमंडळात नव्हतो. मी आणि दलित वर्गांतील प्रमुख समाजसेवक यांनी हें वर्ष अत्यंत चिंताक्रांत मनस्थितींत घालविलें.

दलित वर्गांचें राजकीय हितसंरक्षणाची हमी ब्रिटीश राज्यकर्त्यांनीं घटनेंत नमुद केलेलीं होती; परंतु त्यांनीं सत्तात्याग केल्यानंतर त्यांची जबाबदारी संपुष्टांत आली. या बाबतीत भारतीय घटना परिषद कोणते धोरण स्वीकारील व कोणते भरीव कार्य करील यासंबंधीं दलित वर्गांना मोठी चिन्ता लागलेली होती. या चिन्ताग्रस्त मन:स्थितीतच मी दलित वर्गाच्या अनुकम्पनीय परिस्थितीचा आढावा

घेऊन एक अहवाल लिहिला व तो संयुक्त राष्ट्रापुढें विचारार्थ ठेवावा असें मनांत योजलें. परंतु तो अहवाल मी संयुक्त राष्ट्राकडे पाठविला नाहीं. याचे कारण हें कीं, या बाबतींत घटना परिषद व लोकसभा या संस्था दलित वर्गांच्या हितसंरक्षणासाठीं आणि प्रगतीसाठी कोणते धोरण स्वीकारतात आणि कोणता कार्यक्रम हातीं घेतात तें अगोदर पहाणें इष्ट होय, असें मला वाटलें. दलित वर्गांसंबंधीं घटनेंत जी तरतूद केलेली आहे ती माझ्यामतें सर्वस्वी अपुरी आहें, तथापि, ती तरतूद समाधानकारक नव्हती तरी तिला मी मान्यता दिली. हेतु हा कीं, या तरतुदीची सरकारनें मनापासून अंमलबजावणी केली तर दलित वर्गांच्या उन्नतीचें कार्य फारसें झालें नाहीं तरी त्या कार्याचा पाया तरी रचिला जाईल. सध्या दलित वर्गांची अवस्था कशी आहे ? या बाबतींत मला जी कांहीं माहितीं आहे तीवरून मी असें म्हणतो कीं १९४६ सालांत त्यांची जी अवस्था होती ती सध्यांहि तशीच आहे. तिच्यांत कांही फेरफार घडून आलेला नाहीं. वरिष्ठ वर्गांकडून दलित वर्गांवर पूर्वी जे जुलूम, अत्याचार आणि दहशतीचे प्रकार होत होते तेच जुलूम, अत्यांचार आणि दहशतीचे प्रकार अद्यापहि होत आहेत, व ते अत्यंत अमानुष स्वरुपांत होत आहेत. याबद्दलची शेंकडो उदाहरणें मी देऊं शकेन. दिल्लीच्या आसपासच्या प्रदेशांतून हजारों दलित वर्गीय लोक आपल्या दुःखद परिस्थितीची हकिकत मला सांगावयास येतात. सवर्ण हिंदु लोक आम्हांवर वेळोवेळी अमानुष अत्याचार करतात व त्याबद्दल आम्ही पोलीसांकडे तक्रारी केल्या-तरी पोलीस आमच्या तक्रारी नोंदवत नाहींत, आमचें दुःख वेशीवर टांगलें जात नाहीं. आणि पोलीसांकडून आम्हांला संरक्षण मिळत नाहीं, अशीं दीनवाणी कहाणी ते लोक मला सांगत असतात. भारतांतील दलित वर्गांची जी शोचनिय व दीनवाणी परिस्थिती आहे तशी परिस्थिती भोगीत असलेला एकादा मानवी वर्ग या पृथ्वीतलावर असेल कीं नाहीं, हे सांगणें कठीण आहे. निदान माझ्या पाहण्यांत असला वर्ग अद्याप आलेला नाहीं. असें असतां सरकार दलित वर्गांचें दुःख हलकें करण्यास कां तयार होत नाहीं ? मुसलमानांना हितसरंक्षण देण्याच्या बाबतींत सरकार जी आस्था दाखविते व जी धडपड करते ती लक्षांत आणा आणि दलित वर्गांसंबंधीं सरकार जी उदास वृत्ति दाखविते ती लक्षांत आणा म्हणजे सरकारच्या या दोन वृत्तींत कसें जमिन असमानचे अंतर आहे हें तुम्हाला पटेल. मुख्य प्रधानांचें सर्व लक्ष आणि सर्व वेळ मुंसलमानांच्या हितसंरक्षणासाठीं खर्च होत असतो. भारतांतील मुसलमानांना ज्या बाबतींत आणि जेव्हां हितसंरक्षणाची जरुरी भासते तेव्हां ती द्यावी, अशी प्रधान मंत्र्यांची इच्छा

असली तरी तिच्यापेक्षाहि प्रबळ इच्छा मला आहे. या बाबतींत मी कोणापुढेंहि मान वाकविणार नाहीं, परंतु मला सरकारकडून हें समजून घेण्याची इच्छा आहे कीं, हितसंरक्षणाला लायक अशी मुसलमान जमातच तेवढी भारतांत आहे काय ? दलित वर्ग, वर्गीकृत वर्ग. अन्य जाती, आणि भारतीय खिस्ती लोक यांना हितसंरक्षणांची जरुरी नाहीं. असें सरकारला वाटते काय ? या लोकांच्या हितासंबंधीं प्रधान मंत्र्यांनीं कधींकाळी कांही कळकळ व्यक्त केलेलीं आहे काय ? माझ्या माहिती प्रमाणें प्रधान मंत्र्यांनीं ही वृत्ति कधी व्यक्त केलेली नाहीं. आणि मुसलमानांपेक्षांही जर जास्त सरकारी संरक्षण कोणाला हवे असेल तर याच उपरिनिर्दिष्ट लोकांना होय.

सरकारनें वर्गीकृत लोकांच्या हितसरंक्षणासंबंधीं जी अनास्था दाखविली त्यामुळें मी मनस्वी संतापलेला होतों. मी हा संताप माझ्या मनांत तसाच धुमसत ठेवला होता. कांही दिवसांपूर्वी वर्गीकृत लोकांची जी सभा भरविण्यांत आली होती तींत मी हा संताप कित्येक दिवसांनी व्यक्त केला. सरकारी नोकऱ्यांत वर्गीकृत लोकांना साडेबारा टक्के जागा राखून ठेवलेल्या आहेत, असा जो एक सरकारी नियम आहे त्यामुळें वर्गीकृत लोकांचा फारसा फायदा झालेला नाहीं, असा सरकारवर मी नेहमी आरोप करतों. यासंबंधीं गृहमंत्र्यांना कोणीसा असा प्रश्न विचारला कीं, या आरोपांत तथ्य आहे काय ? या प्रश्नाला उत्तर देतांना गृहमंत्री महाशय म्हणाले कीं, हा आरोप निराधार आहे. आपण दिलेल्या या उत्तराला पुरावा गोळा करून ठेवण्यासाठीं म्हणा अगर ठोकून देतो ऐसाजे असें जें आपण उत्तर दिलें तें सत्याला धरून नव्हतें अशी त्यांची सद्सदविवेक बुद्धि त्यांच्या मनाला एकसारखी टोंचणी मारीत होती म्हणून म्हणा--पण गृहमंत्री महाशयानीं एक सर्क्युलर काढून प्रत्येक खात्याला असें विचारलेलें आहे कीं अलीकडे सरकारी नोकऱ्यांत वर्गीकृत लोकांचे किती उमेदवार घेतले गेले ? या बाबतींत मला जी माहिती मिळाली आहे ती वरुन मी असें प्रतिपादन करूं शकतों कीं, प्रत्येक खात्याकडून सर्क्युलरला असें उत्तर मिळालेलें आहें कीं, आमच्याकडे एकादा-दुसरा उमेदवार एकाद्या ऑफिसांत घेतलेला आहे; परंतु एकंदरींत जास्त उमेदवार घेतलें नाहींत एवढें खास. मला मिळालेली ही माहिती जर बरोबर असेल, तर गृहमंत्र्यांनी प्रश्न विचारणाराला जें उत्तर दिलें त्यावर मला मल्लीनाथी करण्याची जरूरी रहात नाहीं.

मी वर्गीकृत लोकांत जन्मलो व त्या लोकांची प्रगति घडवून आणण्यासाठी आपलें आयुष्य खर्च करावयाचे, याबद्दलची प्रतिज्ञा मी लहानपणांतच केलेली

आहे. या प्रतिज्ञेपासून च्युत करणारी अनेक आमिषें माझ्या आयुष्यांत आलीं व गेलीं. फक्त स्वतःचेच चांगलें करण्याचें मी लहानपणांत ठरविलें असते तर मला हव्या त्या प्रतिष्ठित पदावर विराजमान होता आलें असतें. आणि काँग्रेसमध्यें मी शिरलो असतो तर तींतील अत्यंत श्रेष्ठ पदाचा मी उपयोग घेतला असता. परंतु वर्गीकृत लोकांच्या उन्नतीप्रीत्यर्थ मी माझे सर्व आयुष्य वाहण्याचें ठरविलें आहे आणि तें ध्येय डोळ्यापुढें ठेवून मी एका तत्त्वाचा अवलंब करीत आलों आहे. तें तत्त्व हें कीं, जें कार्य सफल करण्याचा एकाद्याला भरपूर उत्साह वाटतो व तें कार्य पार पाडणें हेच ज्याच्या मनाला एकसारखें लागून राहिलेलें आहे, त्यानें तें कार्य पार पाडण्यासाठीं आकुंचित विचारसरणीचा व कृतीचा अवलंब केला तरी तें श्लाघ्य होईल. वर्गीकृत लोकांच्या हितानहितांचा प्रश्न सरकारनें फार दिवस त्रिशंकूप्रमाणें लोंबकळत ठेवलेला आहे, हें पाहून माझ्या मनाला दुःखाच्या किती वेदना झालेल्या असतील, याची तुम्हांला वरील हकिकतिवरून स्पष्ट कल्पना येईल.

तिसरी गोष्ट परदेशांसंबंधींचें सरकारचें धोरण. या गोष्टीनें मला नाराज तर केलें आहेच ; शिवाय तिनें मला चिंतेत व मानसिक यातनेच्या खाईत लोटलेले आहे. या धोरणाबद्दल जो कोणी खोल विचार करील आणि त्या धोरणामुळें इतर देशानीं भारताशीं जे संबंध ठेवले याबद्दलची जो ज्यास्त माहिती गोळा करील त्याला हे दिसून येईल कीं, इतर देशांनीं भारताशीं ठेवलेल्या संबंधांत एकदम फेरफार घडवून आणला. १५ ऑगस्ट १९४७ ला आम्हीं स्वतंत्र देश म्हणून वागूं लागलों. तेव्हा आमचें वाईट चिंतणारा एकहि परदेश नव्हता. जगांतील प्रत्येक देश आपणांकडे मित्रत्वाच्या भावनेनें पाहात होता. चार वर्षानंतर आज आपणांला सर्व मित्र सोडून दूर गेलेले आहेत. आता जगांतील एकहि देश आपला मित्र म्हणून राहिलेला नाहीं. आम्ही आमच्या कृतींनीं दुसऱ्यांचें संबंध तोडले. संयुक्त राष्ट्रांच्या बैठकींतहीं आम्ही एकीकडे शिलेदार म्हणून वावरत आहोंत. तेथे आम्हीं एकादा ठराव मांडला तर त्याला दुजोरा देण्यास कोणी पुढें येत नाहीं. अशी आमच्या परराष्ट्र धोरणाची स्थिति आहे. या स्थितीचा मी जेव्हा जेव्हां विचार करतों तेव्हां तेव्हां मला बिस्मार्क आणि बर्नार्ड शॉ यांच्या उद्‌गारांची आठवण होते. बिस्मार्कनें म्हटलेलें आहे कीं, " राजकारण म्हणजे एखादी असंभवनीय गोष्ट साध्य करण्याचा खेळ नव्हें. राजकारण म्हणजे संभवनीय गोष्ट साध्य करण्याचा खेळ आहे." थोड्याच दिवसापूर्वी बर्नार्ड शॉ

म्हणाला होता कीं, चांगली ध्येयें नजरेसमोर ठेवणें हें चांगलें; परंतु सदैव चांगलेपणाच्या पाठीमागें लागणें हें फार धोक्याचें आहे, हेहि लक्षांत ठेवलें पाहिजे. जगांतील सर्वश्रेष्ठ व्यक्तींनीं काढलेल्या वरील उद्‌गारांच्या सर्वस्वी विरुद्ध बाजूला आमचें परराष्ट्र धोरण आहे.

असंभाव्य गोष्टी करण्याच्या मागें लागणें आणि सदैव संतपणाचा अवतार धारण करणें या धोरणामुळें आम्ही आमचें किती नुकसान करुन घेतलेलें आहे, याची साक्ष लष्करावर होत असलेला आमचा भरमसाट खर्च, लाखो क्षुधापिडित जिवांना अन्न देण्यासाठीं भोगावे लागणारे कष्ट आणि आमच्या देशांत औद्योगीकरणाला लागणारी आर्थिक मदत मिळण्याची पडलेली पंचाईत या गोष्टी देतील.

तीनशें पन्नास कोटी वार्षिक उत्पन्नांतून एकशें ऐशीं कोटी रुपये आम्ही लष्करावर खर्च करतो. या अवाढव्य खर्चाला दुसरें उदाहरण नाहीं. आमच्या परराष्ट्रीय धोरणाचा हा परिणाम होय. आमच्या संरक्षणाचा बोजा हलका करणारा आमचा मित्र नाहीं. तो आम्हींच उचलला पाहिजे. त्यामुळें हे परराष्ट्रीय धोरण कितपत शहाणपणाचें आहे तें पहा.

पाकिस्थानशीं वैमनस्य हें आमच्या परराष्ट्रीय धोरणाचे एक अंग आहें. या वैमनस्यांचें मला वावडें आहे.

पाकिस्थानशीं वैमनस्य येण्याची मुख्यतः दोन कारणें आहेत. एक काश्मीरचे प्रकरण व दुसरें पूर्व बंगालमधींल भारतीय जनतेची वर्तमानपत्रावरून समजणारी काश्मीरी जनतेपेक्षां अनुकंपनीय परिस्थिती. असें असतांना फक्त काश्मीरचेंच ढोलकें आम्हीं वाजवीत आहोंत, तरीपण आपण खऱ्या तत्वावर भांडतच नाहीं असा माझा दावा आहे. कोण खरा हा मूलतः प्रश्न नसून काय योग्य हाच मुद्दा आहे. म्हणून काश्मीरची फाळणीच योग्य असें माझें प्रामाणिक मत आहे. भारताच्या फाळणीच्या प्रमाणें काश्मीर मधील बुद्धधर्मीय व हिंदी भाग भारताकडे असावा व बहुसंख्यांक मुसलमानांचा विभाग पाकिस्थानला जोडला जावा. काश्मीरांतील मुसलमानांच्या प्रश्नांशीं आमचा वास्तविक संबंध नाहीं. तो पाकिस्थान व तेथील स्थानिक मुसलमान यांचा प्रश्न आहे. त्यानीं तो वाटेल तसा सोडवावा. नाहींतर काश्मीरचे, काश्मीरचें खोरे, जम्मू-लडाक विभाग व युद्धविराम विभाग असे तीन विभाग करावेत व फक्त काश्मीरच्या खोऱ्यांतील विभागांत सार्वमत घ्यावें. ज्या सार्वमताचा विचार करण्यांत येत आहे त्याचा

परिणाम काश्मीरच्या हिंदी व बुद्ध संस्कृतीचा भाग पाकिस्थानांत जाईल याची साधार भिती वाटत आहे. त्यामुळें आज पूर्व बंगालमध्यें ज्या घटनांना तोंड द्यावें लागत आहे तेच प्रश्न इच्छा नसतांना पाकिस्थानांत पडलेल्या हिंदी व बुद्ध जनतेबाबतींत तोंड वासून उभे राहतील.

आतां माझ्या राजीनाम्यास कारणीभूत झालेल्या दुसऱ्या प्रश्नांकडे वळतो. हिंद सरकारचें मंत्रीमंडळ म्हणजे वेगवेगळ्या समितींनीं अगावूच ठरविलेल्या कार्याची रुपरेषा नोंदण्याचें व सील बद्ध करण्याचें केंद्र बनलें आहे. हें मंत्रीमंडळ या समितींच्याच तंत्रानें चालते. एक संरक्षण समिती आहे. एक परराष्ट्रीय कामकाज समिती आहे. परदेशीय सर्व महत्त्वाच्या घटनांवर ही समिती उपाय योजतें तसेंच संरक्षणाचे प्रश्न संरक्षण समिती पहाते. यावर कांही मंत्री सभासद नेमले जातात. मी यापैकीं कोठल्याहीं समितीचा सभासद नव्हतो.

या समित्या गुप्तपणें आपलीं कामें करतात. जे मंत्री सभासद नसतील त्यांना देशाचें धोरण ठरविण्यांत भाग घेतां येत नाहीं, पण संयुक्त जबाबदारी मात्र पत्करावी लागतें. ही एक चमत्कारीक व अशक्य प्राय गोष्ट करावी लागत असे.

आतां राजीनामा देण्यांस अखेर जी गोष्ट कारणीभूत झाली ती सांगतो व ती म्हणजे हिंदु कोड बिलाबद्दल सरकारनें केलेला चालढकलपणा व बेपर्वाई होय. हें बिल प्रथम ११ एप्रील १९४७ सालीं मांडलें गेलें. चार वर्षापर्यंत तें तग धरूं शकलें व त्यांतील चार कलमें मंजूर झाल्यावर या बिलाची अक्षरशः हत्या करण्यांस वैश्यम्य कोणास वाटलें नाहीं. बिलाचीं सुरवातच आंकडीनें झाली ! जवळ जवळ एक वर्ष तें बिल सिलेक्ट कमिटीकडें पाठवावें याची सरकारला आवश्यकता वाटली नाहीं.

सिलेक्ट कमेटीकडे बिल ९ एप्रील १९४८ सालीं पाठविण्यांत आले व तिनें १२ ऑगस्ट १९४८ रोजीं आपला अभिप्राय पार्लमेन्टला सादर केला. त्याचा ठराव दिवसाचे कामकाजावर आणण्यांतच एवढा काळ गेला, १९४९ च्या फेब्रुवारीच्या अधिवेशनापर्यंत हा ठराव बारगळला व त्याच्यावर चालू चर्चा करण्याचें नाकारण्यांत आलें, त्यामुळें तीं चर्चा दहा महिनें रेंगाळली ; चार दिवस फेब्रुवारीत, एक दिवस मार्च, २ दिवस एप्रिल १९४९ अशी चर्चेची विभागणी झाली ! यानंतर १९ डिसेंबर १९४९ हा एकच दिवस देण्यांत आला व त्या दिवशी माझा हिंदु बिलाचा सिलेक्ट कमिटींनें मान्य केलेला मसुदा पार्लमेंटपुढें यावा हा

माझा ठराव विचारांत घेण्यात आला. १९५० सालीं हिंदु कोड बिलाला वावच देण्यांत आला नाहीं ! पुढें ते बिल पांच फेब्रुवारी १९५१ रोजीं चर्चेस निघालें व एकएक कलमावर चर्चा होऊं लागली. यासाठीं फक्त पांच, सहा व सात हे तीनच दिवस देण्यांत आले व बिल परत बारगळलें !

या पार्लमेन्टचें हे शेवटचें अधिवेशन असल्यामुळें हिंदु कोड बिलाची वासलात काय लावावयाची ते मंत्रिमंडळाने ठरविलें पाहिजे होतें. तें चालू पार्लमेन्टनें पूर्ण करावें कीं नव्या पार्लमेन्टपुढें ठेवावें याचा विचार व्हायला पाहिजे होता. त्याप्रमाणे तें या पार्लमेंटमध्यें निकालांत काढावें असें ठरलें. म्हणून बील १७ सप्टेंबर १९५१ रोजीं चर्चेस काढलें गेलें. ही चर्चा चालु असतां पंतप्रधानांनीं एक नवीन योजना मध्येंच मांडली कीं वेळेच्या अभावी सर्व बिल कलमवार पास होणें शक्य नाहीं म्हणून त्यांतील कांही भाग पास करून त्यांचा कायदा व्हावा म्हणजे सर्व बिल तरी खितपत पडणार नाहीं. हा तर मला मोठा पेंच होता. पण मी तें मान्य केलें, कां तर ' जिथें सारें जातें तिथें थोडें वांचविण्याचें ' तरी घडावें ! या बिलांतील लग्न व घटस्फोट हे विभाग निवडावेत असें पंतप्रधानांनीं सुचविलें. अशी कातरी लावून बिल अखेर मांडले गेलें. दोन तीन दिवसांच्या चर्चेनंतर पंतप्रधानांनी परत दुसरी योजना बाहेर काढली व ती म्हणजे सर्व बिलच गाळण्यांत यावें ! हा मात्र मला मोठ्यांत मोठा आश्चर्याचा धक्का बसला. मी मूग्धच झालों. हें कातर लावलेलें बिल वेळेच्या अभावीं पुढें ढकलण्यांत येत आहे हें आतां मला पटण्याजोगें नव्हतें व मान्यही नव्हतें. कारण आपलीं बिलें पुढें ढकलून ती पास करण्याकडे इतर वजनदार सरकार मंत्री लटपट करीत होते याची मला कल्पना होती.

बनारस अलिगड विश्वविद्यालयाची बिलें व प्रेस बिलें, जी अपूर्णा अवस्थेंत होती, त्यांना संपूर्णावस्थेंत असलेलें हिंदु कोड बिल हुलकावून यांना पार्लमेन्टपुढे मांडण्यांस वेळ कसा दिला गेला तें मला समजत नाहीं. ही विश्वविद्यालयें चालविण्याबाबतींत कांही अस्तित्वांत कायदा नव्हता अशी कांही गोष्ट नव्हती. हीं बिलें इतक्यांत पास झाली नसती तरीही दोन विश्वविद्यालयें रसातळास पोंचली नसतीं. प्रेस बिल पण कांही घाईने पुढें आणण्याचें कारण नव्हतें. हीं बिलें स्थगित करतां आली असतीं. पंतप्रधान हिंदु कोड बिलाबद्दल प्रामाणिक नव्हतें असें नाहीं पण हिंदु बिल पास करण्यास हवी तितकी चिकाटी व आस्था त्यांच्यात नव्हती खास.

हिंदु कोड बिला बाबतींत माझा छळ झाला म्हटलें तर अतिशयोक्ति व्हावयाची नाहीं. राज्यकर्त्या पक्षाचें बळ मला मंत्रिमंडळांत नव्हतें, पंतप्रधानांनीं या बिलावर खुल्या मतदानाची मुभा कॉंग्रेस पक्षाला दिली होती. ही एक अनपेक्षित गोष्ट होती व पक्षाच्या इतिहासांत नवीन प्रथा होती. निदान पार्लमेन्टमधील पक्ष पुढारी (whip) तरीं भाषणांवर वेळेंचे निर्बंध घालील अशी अपेक्षा होती. निदान आवश्यक ती चर्चा झाल्यावर वादविवाद बंद करण्याची सूचना प्रमुख पक्ष पुढारी आणील अशी त्याला सूचना दिली जाईल अशी माझी कल्पना होती. अशा निर्बंधामुळें बिल वेळांत पास होऊ शकले असते. पण अशी सूचना कधी दिली गेली नाहीं. पार्लमेन्टच्या कामाचे मिनिस्टर व सरकारीपक्षाचे प्रतोद याच्या बद्दल कमी सांगितलेलें बरें. हिंदु कोड बिलाचें ते द्वेष्टे होते ! ते पक्के विरोधी होते. त्यांनी सदरील बिल चर्चेस आलें असतांना हजर राहून शिष्टाचाराप्रमाणें मला चर्चा बंद करण्यास मदत करण्याचें पद्धतशीर टाळलें. एका एका कलमावर निरर्थक शब्दाचा कीस पडू लागला आणि हें असे कित्येक दिवस चाललें. सरकारी प्रतोदाचें काम सरकारी वेळ वांचविण्यांचें असतें आणि सरकार-बिले व इतर कामें झपाट्यानें पार्लमेन्टांत पार कशी पडतील त्यावर त्यांना कटाक्ष ठेवायचा असतो. पण या प्रतोदांनीं शिस्तींत माघार घेतली. पंतप्रधानाशीं एकनिष्ठ न राहणारा प्रतोद व अशा प्रतोदाशीं एकनिष्ठ राहणारा पंतप्रधान; असा प्रकार माझ्या पाहण्यांत कधीं कुठें आला नाहीं ! शिस्तभंग करणारा व घटनेनुसार न चालणारा हा प्रतोद पंतप्रधानाच्या गळ्यांतील ताईत आहे ! त्याच्या या बेशिस्त वर्तनाची दखल न घेतां त्याला पक्षाच्या संघटनेंत बढती मिळाली आहे. अशा परिस्थितींत काम करणें केव्हांही अशक्यच.

हिंदु कोड बिलाविरूद्ध बहुमत होतें असें बोललें जातें. पण असे विरोधक कितीं होते ? ह्या बिलावर पार्लमेन्टरी कॉंग्रेस पक्षांत अनेकदां चर्चा झाली आणि मतदान घेतांना प्रत्येकवेळीं विरोधक कोलमडून पडले. सरते शेवटी तें विचारांत घेण्यांत आलें तेव्हां पक्षाच्या एकशेंवीस सभासदांपैकीं फक्त वीसच विरुद्ध गेले. या पक्षामध्यें तें चर्चेस निघालें तेव्हां त्यांतील चव्वेचाळीस कलमें अवघ्या साडेतीन तासांत मंजूर झालीं. ह्यावरून सत्ताधारी पक्षांत किती विरोध होता याची कल्पना येईल !

खुद्द पार्लमेन्ट मध्यें सुद्धां दोन तीन व चार कलमांवर मत विभागणी झाली. प्रत्येकवेळीं ते प्रचंड मतानें पास झालें. हिंदु कोड बिलाचा आत्मा तें चवथें कलमहि मंजूर झालें.

असें असतां पंतप्रधानांची वेळेची सबब मी मान्य कशी करेन. माझ्या राजिनाम्याबद्दल एवढा सविस्तर खुलासा मी करीत आहे कारण कांहींनीं मी आजारपणामुळें राजीनामा देत आहे अशी बातमी उठविली म्हणून आजारीपणाचें निमित्त सांगून माझ्या कर्तव्यापासून मी तसूंभर न ढळणारा अगर माघार घेणारा गृहस्थ आहे.

माझा राजीनामा वस्तुस्थितीस धरून नाहीं. असें कांहीचे म्हणणें आहे. जर मला सरकारचें परराष्ट्रीय धोरण मान्य नव्हतें व मागासलेल्या जमातीला देण्यांत येणारी वागणूक पसंत नव्हती तर आगावूच मी राजीनामा दिला पाहिजे होता. हा आरोप कोणास खरा वाटेल, पण राजीनामा देण्याचें पुढें ढकललें यालाही सबळ कारणें आहेत. एकतर माझ्या मंत्रिपदांतील पुष्कळसा वेळ भारताची घटना करण्यास मी खर्ची पाडला, २६ जानेवारी १९५० पर्यंत मी त्यांत तन्मय होतो. त्यानंतर जनतेच्या प्रतिनिधीत्वाचें बिल व डीलीमिटेशन ऑर्डर या कामांत मी होतों त्यामुळें परराष्ट्रीय धोरणाकडे लक्ष द्यायला मला अवसर मिळाला नाहीं. हातीं घेतलेलें काम टाकून दुसरीकडे लक्ष देणे हें योग्य नव्हतें.

केवळ हिंदु बिलासाठीं मीं राहिलो, कांहींना हें करणें चुकींचें वाटेल. पण माझी दृष्टि वेगळी होती. पार्लमेन्ट पुढील हिंदु कोड बिल ही एक महत्वपूर्ण घटना होती व ती या देशांतील कोणत्याही अधिवेशनांत विचारांत घेतली नव्हती एवढेंच नव्हें तर पार्लमेन्टमध्यें यापूर्वी व पुढेही येणाऱ्या कोणत्याही कायद्याची बरोबरी हिंदु कोड बिलाबरोबर करतां येणार नाहीं इतके त्याचे महत्त्व आहे. हिंदु समाजांतील वर्गावर्गातील उच्चनीच भेद व लींग भेद तसेंच कायम ठेवून केलेले कोणतेही निव्वळ आर्थिक परिस्थिती सुधारण्याचे कायदे म्हणजे घाण न काढतां त्यावरच उभारलेले पत्त्यांचे बंगले होत. ही तर घटनेची थट्टा आहे. हिंदु कोड बिलाला मी कां एवढे महत्व देतो याची यावरून कल्पना येईल. यासाठीं तीव्र मतभेद असतांहि मी मंत्रिमंडळात राहिलों. जर यांत मी चुक केली असेल तर ती कांही भरीव व चांगलें काम करण्याकरतांच होय. हिंदु कोड बिलाच्या विरोधकांचे अडथळे उत्पन्न करणारे डाव उलथून पाडण्याची मला उमेद नव्हती की काय ? याबाबतींत पंतप्रधानांनी पार्लमेन्टमध्यें तीन वेळां केलेल्या खुलाशांकडे मी साऱ्यांचे लक्ष वेधूं इच्छितो.

ता. २८ नोव्हेंबर १९४९ मध्यें पंतप्रधांनानीं " हिंदु कोड बिल पास करण्याचा सरकारनें निश्चय केला आहे व तें त्या मार्गांवर आहे................ सरकार तें पास करून घेईल. अर्थात तो अधिकार पार्लमेन्टचा आहे. जर सरकारने मांडलेल्या महत्वाच्या बिलाला पार्लमेन्टनें मान्यता दिली नाहीं तर त्याचा अर्थ

स्पष्ट असा कीं पार्लमेन्टला चालू सरकार नको. अर्थात नवें सरकार ती जागा घेईल. म्हणून सभासदांनी हे पक्के ध्यानांत ठेवावें कीं हिंदु कोड बिल हें महत्वाचें बिल आहे व सरकारचें अस्तित्व यांवर अवलंबून राहण्याइतकें तें सरकारला महत्वाचें वाटतें. ''

यानंतर ता. १९ डिसेंबर १९४९ मध्यें पंतप्रधान म्हणाले, '' सरकार हिंदु कोड बिलाला अधिक महत्व देत नाहीं अशीं कुणी चुकीची समजूत करून घेऊं नये. सरकारला या बिलाचें फार महत्व वाटतें व केवळ तें त्यांतील विशिष्ट कलमालां अनुसरून नाही तर आर्थिक व सामाजिक प्रश्नांचा मूलभूत छडा या बिलानें लावला आहे म्हणून. आम्ही परकियांपासून स्वतंत्र झालों व राजकीय स्वातंत्र्य आम्ही मिळवलें. या स्वातंत्र्याच्या प्रवासांत अनेक टप्पे आहेत. आर्थिक, सामाजिक तर महत्वाचे आहेत. या सर्व आघाडीवर पुरोगामी प्रगती झाली पाहिजे तर समाज सुधारेल. ''

ता. २६ सप्टेंबर १९५१ मध्यें परत पंतप्रधान म्हणतात :—

'' हे बिल चर्चेस यावें व त्याची जशी जशी प्रगती होईल तसतशी सरकारला हवी आहे त्याचे निराळें आश्वासन सरकारनें देण्यांचें कारण नाहीं. शक्य तीं प्रगती होणे तर जरूर आहे. पण आता यावरील चर्चा स्थगित करावी असें आम्हांस वाटतें व पुढें संधि मिळताच ते चर्चेस ठेवण्यात यावें व तें याच पार्लमेंटमध्यें पास होईल.''

हें आश्वासन पंतप्रधानांनीं बिल पुढें ढकलल्यावर दिलें. पंतप्रधानांच्या या आश्वासनावर विश्वास कोण ठेवणार नाहीं बरें ? पंतप्रधानांची आश्वासनें व प्रात्यक्षिक यांत तफावत असल्याचें मला वाटत असल्यास तो अपराध माझा मुळींच नाहीं.

कदाचित माझ्या मंत्रिमंडळांतून जाण्यानें कुणास कांही महत्व वाटणार नाहीं. पण सत्याशीं मी एकनिष्ठ असेन तर बाहेर पडणेच योग्य. त्यापूर्वी माझ्या सहकाऱ्यांनी दाखविलेल्या प्रेमाबद्दल व शिष्टाचाराबद्दल मी त्यांचे आभार मानतो. मी माझें पार्लमेन्टचें सभासदत्व कायम ठेवीत आहे. पार्लमेन्टच्या सभासदांनीं माझ्या बाबतींत जो सोशिकपणा दाखविला त्याबद्दल त्यांचा पण मी आभारी आहे.

● ● ●

जनता : २० ऑक्टोबर १९५१.

११०

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचें व्रत

" माझ्या समाजाच्या जीवनाबद्दल मला स्वतःच्या अनुभवाने माहिती झाली आहे. आपल्या दुःखी, दरिद्रि समाजासाठीं कांहीतरीं करावें या प्रेरणेनेच मी त्यांच्यासाठी झटलों आहे. माझ्यामध्यें जे काहीं सर्वोत्कृष्ट असेल तें मी त्यांना दिलें आहे. पण हें करीत असतांना मी पूर्ण विचार करून आणि जाणिवेने प्रत्येक पाऊल टाकले आहे. मी कधी कोणाच्या रागा लोभाची पर्वा केली नाहीं. सद्सद्विवेक बुद्धीला पटेल तेंच मी केलें आहे. गांधीजींच्या विरुद्ध मी एकटा उभा राहिलों. मला नेस्तनाबूद करण्याचे अनेकांनीं प्रयत्न केले; पण ते यशस्वी झाले नाहींत. आज सुद्धां मी स्वतःच्या हिमतीवर राजकारणांत उभा आहे. मी कोणाचा बांधील नाहीं, पुढेंहि रहाणार नाहीं.

—डॉ. बाबासाहेब आंबेडकर
(किर्लोस्कर, दिल्ली विशेषांक)

जनता : २ फेब्रुवारी १९५२.

१११

जुन्या वाङ्मयाचा जीर्णोद्धार

मराठी वाङ्मयाची अनेक दिशेनें प्रगति होत असल्याचें अनेक मराठी साहित्यिकांकडून ऐकिवांत येतें. या संबंधानें माझ्या सारख्या केवळ जुन्या वाङ्मयावर वाढलेल्या माणसास मत देणें हें उचित होणार नाहीं. तथापि, जुन्या आणि नव्या मराठी वाङ्मयाचा परीघ तपासून पाहतांना, हल्लींच्या चालू वाङ्मयांतून कांहीं प्रकारचें जुनें वाङ्मय गळून पडलें आहे. नव्हे, नामशेष झालें आहे असें म्हणणें आततताईपणाचें होणार नाहीं असें मला निश्चितपणें वाटतें. जुन्या वाङ्मयांत लावणी आणि गाऱ्हाणी यांचा समावेश बऱ्याच मोठ्या प्रमाणावर होत असे. परंतु आजकालचें वाङ्मय पाहिलें असतांना, त्यांत या दोन प्रकारच्या वाङ्मयाचा लवलेश किंवा नामनिर्देशसुद्धां सांपडत नाहीं. लावणी आणि गाऱ्हाणें हीं कमीं प्रतीचीं असे जरी मानलें तरी लालित्य आणि नवलाई यांच्या दृष्टीनें अशा प्रकारच्या वाङ्मयास कमी प्रतीचें मानता येणार नाहीं. हें वाङ्मय नाश झालेलें पाहून मला खरोखरच मोठा खेद होतो. या वाङ्मयाचा संग्रह करण्याचा एकेकाळीं माझा मानस होता, परंतु कार्य बाहुल्यामुळें ते कार्य मला तडीस नेतां आलें नाहीं. या वाङ्मयापैकीं, गाऱ्हाणें हें वाङ्मय काय प्रकारचें असतें याची ओळख लोकांना करून देण्याच्या उद्देशानें ' साळोबाचें गाऱ्हाणें ' मी प्रसिद्धीकरितां पाठवीत आहे. सावंतवाडी संस्थानांतील झाराप नांवाच्या गावी पंडूची पाथर म्हणून एक स्थळ आहे. त्या स्थळाच्या देवतेचे नांव ' चाळोबा ' आहे. या चाळोबाच्या नांवानें प्रतीवर्षी समाराधना घालण्याचा प्रघात आहे. समाराधनेनंतर भोजन होतें. भोजनोत्तर चाळोबापुढें नारळ ठेवून गाऱ्हाणें घालावयाचें असतें. हें गाऱ्हाणें स्थानिक महार जातीच्या माणसानें घालावयाचें असतें. गाऱ्हाण्याची सत्तावीस कलमें आहेत.

तें दरेक कलम महारानें क्रमाक्रमानें उच्चारावयाचें असतें. त्यांनें उच्चारिल्यावर त्या प्रत्येक कलमाच्या शेवटी इतरांनीं ' होय म्हाराज्या ' म्हणावयाचें असतें. या गाऱ्हाण्याचीं कलमे खालील प्रमाणें आहेत,

१	बा द्यावा म्हाराज्या चाळोबा,	होय म्हाराज्या
२	साठ तीनसें गांवच्या चाळ्या,	होय म्हाराज्या
३	*तीन गावच्या आदिस्थानाच्या म्हाराज्या,	होय म्हाराज्या
४	राजाची देव तूं चाळों,	होय म्हाराज्या
५	हून तूं म्हाराच्या पोटकराच्या नांवान् पावतय्,	होय म्हाराज्या
६	तर म्हाराज्या आज तुकां समरादना हों नाल ठेवलो हा तो मान्ने करून घे,	होय म्हाराज्या
७	गांवांत देस धाम इली तर चतुसिंमे भायर लाव्नही,	होय म्हाराज्या
८	गांव गिरा-मांचा कल्याण कर,	होय म्हाराज्या
९	ह्या प्ररमाणां आज तं साठ तीतशीं गांवाची चाळो,	होय म्हाराज्या
१०	त्या पाटेकराक राजी जा,	होय म्हाराज्या
११	भावय भगवतीक राजी कर,	होय म्हाराज्या
१२	त्या रामेश्वरास राजी कर,	होय म्हाराज्या
१३	आज तूं रवळनाथाची समजी घाल,	होय म्हाराज्या
१४	आज तूं कल्यान पुरसाची समजी घाल,	होय म्हाराज्या
१५	भूमिकेच्या बिरामनाची समजी घाल,	होय म्हाराज्या
१६	आज तूं याताळाक राजी कर,	होय म्हाराज्या
१७	द्यावचाराची समजी घाल,	होय म्हाराज्या
१८	बारा पांचांची गणित याक कर,	होय म्हाराज्या
१९	बारांच्या पूर्वसाक राजी कर,	होय म्हाराज्या
२०	म्हारगिऱ्याची समजी घाल,	होय म्हाराज्या
२१	गावड्या गिरोबाची समजी घाल,	होय म्हाराज्या
२२	आज तूं नितकऱ्याची समजी घाल,	होय म्हाराज्या
२३	**सीमधड्याक राजी कर.	होय म्हाराज्या
२४	आनी हो नाल ठेवलो हा तो मान्ने करून घे,	होय म्हाराज्या
२५	आनी गांवगिरामाचा कल्याण कर,	होय म्हाराज्या
२६	श्यावाचाकरी करून घे,	होय म्हाराज्या
२७	आनीं केल्या कामांत यास देऊन कल्याण कर रे म्हाराज्या.	होय म्हाराज्या

संग्राहक—– भीमराव रामजी आंबेडकर

* टीप :—–तीन गांव आके, रीनेंमळे, व झरोपी हे ते तीन गांव होत.

** टीप:—–सीमघड्याकराजीकर-गावच्या सीमेवरील देव.

जनता : २ ऑगस्ट १९५२.

महार समाजाचे ऐतिहासिक महत्वपूर्ण स्थान लक्षात घेता अशा स्वरुपाची प्रथा प्रचलीत होती हे खालील पुराव्यावरून सिद्ध होते—

संपादक.

" कोकणातील महार यांचे एकेकाळी स्वतंत्र राज्य होते. त्यांना आर्यादी लोकांनी जिंकून त्यांच्यावर इतक्या शरणागतीच्या अटी लादल्या की, त्यांना बंडाला प्रवृत्त होण्यास तिळभरही वाव मिळू नये. या ऐतिहासिक घटनांचे ऐतिहासिक ठसे म्हणजे महारांना कोकणातील गावांत फार मानाचे व महत्त्वाचे स्थान देण्यात आले. ते हजारो वर्षे टिकून राहिलेले आहे. महारांना दिलेले ' भूमिपुत्र ' हे नाव कोकणात चालू आहे. ' गावची देवस्की महारांच्याच हातून पुरी करण्यात येते. महारांनी देव-देवतेला हाका मारून जागे करावे लागते. त्यांची काठी बसल्याशिवाय देवदेवतांच्या अंगात देवपण येत नाही. ' देवचार ' म्हणून एक देवता कोकणात आहे. तिला शांत करण्यासाठी जो विधी करावा लागतो तो महाराला घोंगडी व अन्न दिल्याशिवाय पुरा होत नाही आणि देवता संतुष्ट होत नाही. गावातील देवदेवतांपुढे गाऱ्हाणे घालावयाचे असले तर मराठे वगैरे स्पृश्य गावकऱ्यांना महारापुढे दाती तृण धरून विनवण्या कराव्या लागतात. आणि महारांनी देवदेवतांपुढे गाऱ्हाणी घातली तरच देवदेवता नवसाला पावतात, असा हजारो वर्षांचा रिवाज आहे. यावर सुशिक्षित व अशिक्षित कोकणस्थांचा विश्वास असे. "[१]

महाराष्ट्रातील महार समाज व त्याचे ऐतिहासिक आणि सद्यःस्थितीत असलेले स्थान दर्शविणारे चित्रण ' महाराष्ट्र राज्य गॅझिटिअर ' मध्ये खालील प्रमाणे केले आहे.

---

१ : खैरमोडे, खंड ३ पृ. १५.

" Mahars

This is the most numerous of the Untouchable castes of Maharashtra. There is almost no village in this region where there are no Mahars. One finds them from the Arabian sea-coast to the jungles of Raipur and Bastar. Everywhere they speak the Marathi language and are hereditary village servants. Though a small bit of land is given to the Mahar community of each village, it is never sufficient to procure the livelihood of the community which has to depend on the good-will of the villagers for their subsistence. The hereditary work of the Mahars is to remove the dead cattle from the village, to sweep the village streets, to run errands for the village officers, and to keep a watch on the village property etc. The Mahar is generally the principal witness in disputes about boundaries of fields etc. It is said that the Mahar walks more than all the villagers put together. In modern times the cities with their growing factories have offered the Mahars the opportunity to escape from the narrow tyranny of hereditary serfdom and untouchability and they have availed themselves greedily of this opportunity. The main labour force in the Nagpur textile Mills is that of Mahars. The makers of native leaf-cigarettes in the eastern districts of Bhandara and Gondia are mostly Mahars. The textile mills of Bombay have drawn Mahar labour and the sugar-mills of the Nagar district are also manned to a large extent by the Mahars. They are thus becoming rapidly urbanised. A large number was also converted to Christianity in the last century but conversions have practically stopped now except in Eastern Maharashtra where the Missions are still very active. The Mahar sample is drawn from Nagpur, Poona and Belapur (near Nagar). The Bavane sample is drawn from the region east of the wainganga river called the Bavan Thadi and is treated separately. The Mahars are divided into numerous endogamous regional divisions. The septs are not always clearly defined. The surnames which are used as clan-names are in many cases the same as those of the Marathas and Kunbis. Cross-cousin marriage is allowed. Divorce and widow remarriage are also allowed. A widow does not marry her husband's brother. The Mahars claim to be about ten per cent of the whole Marathi population. It is a very mixed community ranging in skin colour from very fair to dark and cannot generally be distinguished from the other communities except through their poverty and dress." [1]

---

1 : Maharashtra State Gazetteer, 1968, P. 32.

११२

स्वाभिमानाची ज्योत तेवत ठेवा !

स्वाभिमानाची ज्योत तेवत ठेवा ! सुसंघटित व्हा ! नि अन्यायाविरुद्ध सतत झगडत रहा ! अशा तऱ्हेचा संदेश डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीं त्यांच्या वाढदिवशी १४ एप्रिल १९५३ रोजीं, आम्ही महामुंबईतील जनतेच्या वतीनें त्यांना पुष्पहार घेऊन भेटीस गेलो असता; आम्हांला ऐकायला मिळाला. डॉक्टर-साहेबांचे अनेक चहाते आणि मित्रपरिवार त्या दिवशीं येऊन त्यांना दिर्घायुष्य लाभो म्हणून त्यांच्याशीं हस्तांदोलन करीत होते. बाहेर तर शेकडो स्त्री-पुरुष पुष्पहार घेऊन त्यांच्या दर्शनास तिष्ठत होते. डॉ. बाबासाहेबांनीं प्रसन्न अंतःकरणानें सर्वांस भेट दिली. ' पुंडलीकाच्या भेटी येई परब्रह्म ' याप्रमाणे जनता जनार्दनाचें तें अलोट प्रेम पाहून त्यांचे अंतःकरण आनंदानें द्रवून आले. सर्वांचें कुशल विचारलें. अति परिचित होते त्यांच्याशीं विनोद केला. आणि शिक्षक पेशाच्या लोकांना काटकसरीनें राहाण्याचा आदेश दिला.

हळुहळु जनसमुदाय नाहीसा झाला. आमच्या एका मित्रानें कांही दिवसापूर्वी, आम्हांला सांगितले होते कीं, " डॉ. बाबासाहेब जवळ जवळ बुद्धमय झालेत. बुद्धाच्या विचारसरणीचा त्यांच्यावर जबरदस्त पगडा बसला आहे. रात्रंदिवस ते त्याच विचार तंद्रीत असतात." याही वेळी आम्हाला तोच अनुभव आला, बाबासाहेबांपुढें विचारांची वलये फिरत असतानाच, आम्ही भीत भीतच म्हणालो, साहेब कांही संदेश द्याल तर बरें होईल ! आतापर्यंत त्यांच्या अनेक जयंत्या झाल्या पण त्यांनीं त्याच्या वाढदिवशी कोणाला कांही सांगितल्याचें आमच्या ऐकण्यांत वा वाचण्यांत नाहीं. या वेळेस मात्र तें विचारमग्नस्थितीत असतानाच त्यांनीं वरील उद्‌गार काढले. यावरून बाबासाहेब दलित वर्गापुढील समस्यांचा रात्रंदिवस विचार करीत असावेत नि लवकरच ते कांहीं तरीं क्रांतीकारक निर्णय जाहीर करतील असे आम्हांला वाटते.

सध्यां हे चाललें आहे तरी काय ?

बोलता बोलता ते म्हणाले " सध्या हे काय चाललें आहे. सरकार दारुबंदी पायीं लाखो करोडो रुपयांची झीज सोसते पण देशातील कोट्यावधी लोक आज

विषमतेनें भाजून निघत आहेत ते काय सरकारला दिसत नाहीं. कागदावरील योजनांसाठीं लाखो रुपये खर्च केले जातात. पण दलित वर्गासाठीं सरकार एकही भरीव योजना अंमलात आणू शकत नाहीं. नेहरुंसारखे जबाबदार गृहस्थ म्हणतात मी कन्याकुमारीपासून तो हिमालयापर्यंत फिरलो पण अस्पृश्यता अस्पृश्यता म्हणतात ती मला कोठेंही पाहायला मिळत नाहीं ! देशात लाखो एकर जमीन लागवडीविना पडली असता गोरगरीब शेतकऱ्यांना व दलित वर्गांना ती लागवडीस दिली जात नाहीं. टिचभर वतनाच्या जमिनी पायीं संबंध गावच्या महारांना राबवून घेण्यात येते. विशाद करण्यासारखी महत्वाची कोणती गोष्ट असेल तर पवित्र राज्य घटनेची चाललेली पायमल्ली ! घटनेने दलित वर्गाला दिलेले अधिकार आजची राज्य सरकारे उघड उघड डावलित आहेत. लोकशाहीचा हा सारा फार्स पाहिला कीं, सध्याच्या लोकशाहीं सरकारवर कितपत विश्वास ठेवावा याचें वैशम्य वाटते.''

डॉक्टरसाहेबांचे हे विचार पाहिले किंवा ऐकले म्हणजे या देशातील दलित वर्गांपुढें काय वाढून ठेवलें आहे याची कल्पना येते. दिवसेंदिवस जी बेकारी वाढत आहे तिला सरकार आळा घालू शकत नाही. बेकारीच्या त्या खायीत अधिकाधिक कोणता वर्ग लोटला जात असेल तर तो अस्पृश्य वर्ग. खेड्या पाड्यातील परिस्थितीच्या गर्तेत कोण सापडला असेल तर तो दलित वर्ग होय ! कायद्याने सरकारी नोकरींत टक्केवारी ठेवली पण त्याची अंमलबजावणी होते की नाहीं याचे नियंत्रण सरकार करायला तयार नाही. पडीत जमिनी दलित वर्गाला लागवडीसाठी देण्यात याव्यात तर त्या त्याच्या पदरात न पडतील अशीच व्यवस्था चालू आहे. अशा एक ना अनेक गाऱ्हाणी रोज आमच्याकडे येतात. शिवाय ब्रिटीशांची परंपरा चालवायची म्हणून कीं काय फोडा नी झोडा या अनितीचा अवलंब करून सरकार दलित वर्गाच्या संघटनेचा विचका करू पाहते. स्वातंत्र्यात सारे काही ठीक होईल म्हणणारे आजचे सरकारी धुरा वाहणारे लोक ते हेच का अशी शंका मग मनाला चाटून जाते.

याला उपाय सुसंघटित व्हा !

राज्यकर्त्यांचे हे डाव हाणून पाडायचे झाल्यास दलित वर्गांनें आपले सारे मतभेद विसरुन सुसंघटीत व्हायला पाहिजे. आपली ताकद पणाला लावून आपल्या शक्तिचा प्रभाव आपण दाखवायला हवा. बाबासोहब नेहमी सांगतात कीं, '' हजारो बाजार बुणग्यांचे सैनिक असण्यापेक्षा मला दहाच शिस्तीचे प्रामाणिक

सैनिक असले तरी बस्स झाले. ८५ वयाच्या शेलार मामाने कोंडाणा सर केला तेव्हां अवघे पंचविस कडवे नवजवान तळहातावर शीर घेऊन पुढे सरसावले होते. मुठभर इंग्रजांनीं एवढ्या मोठ्या या देशावर दिडशे वर्षे राज्य केले ते कशाच्या जोरावर ! संघटणेच्या नि शिस्तीच्या. म्हणून नुसती संघटना आम्हाला नको तर ती सुसंघटणा हवी. तिच्यात इर्षा आणि स्वाभिमानाचा अग्नी सारखा प्रज्वलीत राहीला पाहिजे.

हा अग्नी प्रज्वलीत ठेवायचा झाल्यास, आपली जी संघटणा फेडरेशन ती बळकट केली पाहिजे. फेडरेशन बळकट करायची झाल्यास दरएक वयांत आलेल्या स्त्री-पुरुषानें वर्षाचे चार आणे भरून तिचे सभासद झाले पाहिजे. असें शेकड्याने किंवा हजारोनें नव्हे लाखांनीं सभासद होऊन तिचा निळा झेंडा फडकवित ठेवला पाहिजे. तेच निळें निशाण आपल्या स्वाभिमानी चळवळीचें '' प्रतिक '' आहे. त्या निळ्या निशाणा खालीच एकत्र येऊन आपण अनेक निकराचे लढे दिलेत. त्यानेच आपल्यात बंधुभाव नि आपुलकी निर्माण केली न् माणुसकी जागृत ठेवली. नुसत्या मुंबईत तीन ते चार लाख दलित वर्गाची लोकसंख्या होईल. एक लाख लहान मुलं नि अर्भकें सोडली तर तीन लाख लोक जर फेडरेशनच्या निळ्या निशाणाखाली एकत्र आले तर जगांतील मानबिंदू आम्हीं गाठलाच म्हणून समजा.

परिणाम काय होईल

आज या देशांत बरेचसे राजकीय पक्ष आहेत. त्या सर्वांचे भांडवल मुंबई सारख्या शहरातूनच आहे. नुसत्या मुंबईतच कॉंग्रेस, समाजवादी, कम्युनिस्ट, हिंदुमहासभा वगैरे पक्ष ठाण मांडून बसले आहेत. दरेकाच्या कचेरींत जाऊन त्यांच्या पक्षाचे सभासद नोंदणीचे रजिस्टर पाहिले तर कोणाचेही एक लाख सभासद मिळणें शक्य नाहीं. कारण या पक्षांचे राजकीय अधिष्ठान या देशांतील भांडवलदार, जमीनदार, जहागीरदार, कारखानदार नि धर्ममार्तंड या सारख्या प्रतिगामी विचार सरणीच्या लोकांवर चालले आहे. फेडरेशनचा तसा काहीं कोणाशीं लागाबांधा नाहीं. नव्हे फेडरेशनमध्यें या विचारसरणीलाच मुळीं स्थान नाहीं. थोडक्यात फेडरेशन सारख्या सोज्वळ स्वरुपाचा पक्षच या देशात अस्तित्वांत नाहीं असे आमचे ठाम मत आहे.

अशा या सोज्वळ नि स्वतःच्या ताकदीवर पुढे पाऊल टाकणाऱ्या पक्षाचे भवितव्यही सूर्यप्रकाशा इतके स्पष्ट आहे. म्हणूनच महा मुंबईच्या फेडरेशनने

एक लाख सभासद नोंदविण्याची मोहीम सुरु केलेली आहे. ही आमची मोहीम यशस्वी झाल्यास आम्हांला फेडरेशनचा कार्यक्रम हाती घेणें सुलभ तर जाईलच पण आमच्या पक्षाची आर्थिक परिस्थितीही कमालीची सुधारेल. सरकारनें हल्लीच जसे दलित वर्गाच्या परिस्थितीची पहाणी करण्याकरतां कांही तोंडपुंज्या लोकांचे कमिशन नेमले आहे, तशात-हेचे पण खास अस्पृश्यांच्या जीवनाशी ज्यांचा निकटचा संबंध आहे, जे त्यांच्या रक्त मांसाचे आहेत, जें त्यांच्याच उदरी जन्म घेऊन परिस्थितिशी अहोरात्र झगडत आहेत, अशा हाडांच्या अस्पृश्यांचे एक कमिशन फेडरेशन नेमील. अस्पृश्यांच्या जीवनाची ते कमिशन बारकाईने छाननी करून त्यांच्या साद्यंत हकिगतिचा ते एक अहवाल तयार करील. तो अहवाल फेडरेशन ग्रंथ रुपात छापून काढील. त्याची एक प्रत भारत सरकारें त्याच प्रमाणें जगातील इतर राष्ट्रांनाही पाठविल्या जातील. इतकं करूनही भारत सरकारच्या दृष्टीकोणांत कांही बदल झाला नाही तर जागतिक न्यायालयाकडे (युनो) बॅ. कांबळे सारख्या खमके बॅरीस्टरांची योजना करून, तेथें आम्ही भांडण सुरूं करून राज्यकर्त्यांची नि हिंद म्हणविणारांची लक्तरे अशारीतीने जगाच्या वेशीवर टांगू. हा आमच्या पक्षाचा सनदशीर मार्ग आहे.

याची दखल राज्यकर्त्यांनी घेतल्यास, बाबासाहेबानीं सहा महिन्यापूर्वी दिलेल्या इषाऱ्याप्रमाणें होईल.

● ● ●

शब्दांकन–रामचंद्र आं. जाधव.

जनता : ता. ९ मे १९५३.

११३

भाषावार प्रांत रचना

प्रत्येकाने आपण स्वतंत्र आहोत, दुसऱ्यांहून भिन्न आहोत असा एकसंघपणाचा अर्थ करून घेतला तर थोड्या अवधीत हिंदुस्थानचेही छकले होतील

ब्रिटिशांनी दीडशें वर्षांहून अधिक काल भारतावर राज्य केलें. या राजवटीत भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न नेहमी समोर असतांनाही ब्रिटिशांनीं भाषावार प्रांतरचना केली नाहीं. अनेक भाषीय प्रांतांतील लोकांच्या ' संस्कृतिऐक्या ' च्या हाकाटीला दाद न देतां मजबूत राजशासन, कायदा आणि शांतता प्रस्थापित करण्याकडेच अधिक लक्ष घातलें. वस्तुतः त्यांच्या राजवटीच्या उत्तरार्धांत त्यांना कळून चुकले की, त्यांनी निर्माण केलेल्या राज्ययंत्रामध्ये ज्याठिकाणी अधिक बेबनाव आहे अशा ठिकाणी तरी भाषावार प्रांतरचनेच्या दृष्टीने काही सुधारणा अवश्यमेव आहेत. इंग्रज निघून जाण्यापूर्वी बंगाल, बिहार आणि ओरिसा हे भाषावार प्रांत त्यांनी निर्माण केले हा त्याचा दाखला आहे. अजूनही इंग्रजी सत्ता भारतावर राहिली तर त्यांनी सामान्य तर्काला अनुसरून भाषावार प्रांतरचना करण्याचा मार्ग पुढें चोखाळला असता की नाहीं हें सांगणें थोडें अवघड आहे.

ब्रिटिशांनी भाषावार प्रांतरचनेचा विचार करण्यापूर्वी गांधींच्या नेतृत्वाखाली काँग्रेसने १९२० साली भाषावार प्रांतरचनेच्या आधारानें एक घटना बनविली. अर्थात १९२० सालीं काँग्रेसने बनविलेल्या ह्या घटनेला आधारभूत विचारप्रणाली विशुद्ध विचार विनिमयांतून झाली कीं, काँग्रेसच्या गोटांत जनतेला ओढण्यासाठी हें चेटूक केलें हें अजमावण्यासाठी आतां कुणी वेळ दवडू नये. मात्र ब्रिटिशांनी भाषावार प्रांतरचनेचें महत्व ओळखलें आणि लागलीच कांही प्रांतांची भाषावार रचनाही केली.

१९२० च्या घटनेनें काँग्रेसनें आपल्यावर जी जबाबदारी घेतली त्याचा १९४५ पर्यंत तरी तिनें उल्लेखही केला नाहीं पण १९४५ मध्यें जेव्हा अधिकारग्रहण करण्याचा प्रसंग आला तेव्हा मात्र काँग्रेसच्या म्हातारीचा कोंबडा झाकलेला असतानाही भाषावार प्रांतरचनेचा रवि उमद्यावर उगवलाच ! अलिकडेच भारतीय संसदेच्या एका सभासदाने संसदेमध्ये भाषावार प्रांतरचनेचा ठराव आणून

या प्रश्नाला आवश्यक ती गती प्राप्त करून दिली. सरकारच्यावतीनें संसदेच्या चर्चेत या प्रश्नाला उत्तर देण्याची जबाबदारी पर्यायानें माझ्यावरच आली. स्वाभाविकच वरिष्ठ पदाधिकाऱ्यांचा दृष्टिकोन निश्चित करून घेण्यासाठी ही बाब मी त्यांच्याकडे नेली आणि आश्चर्य हें कीं, कांही प्रांतांची भाषावार रचना करण्यास या वरिष्ठांचा (High Command) बिलकूल विरोध होता. अशा परिस्थितीत ह्या चर्चेला उत्तर देण्याची जबाबदारी पंतप्रधानांनींच घ्यावी हा एकच उचित मार्ग होता. अर्थातच पंतप्रधानांनी या चर्चेस उत्तर दिलें आणि आंध्र प्रांत लागलीच प्रस्थापित होईल असें आश्वासनही दिलें. पंतप्रधानांच्या या आश्वासनावर भाषावार प्रांत रचनेचा ठराव मागें घेतला गेला आणि हा प्रश्न इथेच थंड झाला.

घटना-मसुदा तयार झाल्यावर पुनः एकदा या प्रश्नाला तोंड देण्याचा माझ्यावर प्रसंग आला. घटनेंतील ' अ ' विभाग प्रांतामध्यें आंध्र प्रांताचा समावेश करावा की नाही यासंबंधाने मी त्यांना पत्राद्वारें पृच्छा केली. त्याला पुष्टी म्हणून संसदेंतील तद्विषयक चर्चेची व त्यांनी दिलेल्या आश्वासनाची स्मृतीही त्यांना करून दिली. त्याबाबतीत वस्तुतः कुठे माशी शिंकली हें मला ठाऊक नाही. मात्र घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी उत्तर प्रांताचे एक वकील श्री. धार यांच्या नेतृत्वाखाली भाषावार प्रांत रचनेची चौकशी करण्यासाठी एक समिती नियोजित केली, एवढे मात्र खरे !

भाषावार प्रांत रचनेप्रमाणे संयुक्त-महाराष्ट्र निर्माण झाला तर कोणत्याही परिस्थितीत मुंबई शहर त्यामध्यें समाविष्ट होणार नाहीं, असें जे मत धार-समितीनें दिलें त्यामुळें तरी धार-समिती आमच्या स्मृतींतून जाणें शक्य नाहीं. धार-समितीचा हा अहवाल कॉंग्रेसच्या जयपूर अधिवेशनांत विचारात घेण्यात आला. जयपूर अधिवेशनात या कामासाठी खुद्द पंतप्रधान, वल्लभभाई पटेल आणि डॉ. पट्टाभि-सितारामय्या या त्रयींची निवड झाली. त्यांनी जो अहवाल काढला त्याचा सारांश एवढाच की, आंध्र प्रांताची त्वरीत रचना व्हावी. मात्र मद्रास शहर तामिळांनाच द्यावें ! याबाबतींत तपशिलवार शिरण्यासाठी एक समितीही नेमण्यांत आली. या समितीनें एक बहुमतानें अहवाल तयार केला. पण या अहवालाला श्री. प्रकाशम्सारख्या प्रमुख व्यक्तीचाच विरोध होता. कारण त्यांना मद्रास शहर हातचें घालवावयाचे नव्हते आणि त्यामुळेच आंध्र प्रांत रचनेचा गाडा इथेंच थडकला.

त्यानंतर श्री. पोट्टी श्रीरामुलु यांच्या मृत्यूची घटना घडली. त्यानें आंध्र प्रांतासाठी आपला जीव दिला. सगळ्या कॉंग्रेसवाल्यांनीं आंध्र प्रांत निर्मितीची गोष्ट मान्य करूनही सर्वसंमत गोष्टीला निष्कारण दिरंगाई करून श्री. श्रीरामुलुला

मृत्यूदरींत ढकललें ही गोष्ट मोठी दुखःद आहे. आतां जो आंध्र प्रांत निर्माण होत आहे तें केवळ श्रीरामुलुच्या गतात्म्याला पंतप्रधान पिंडदान प्रदान करीत आहेत. जगातील इतरत्र कुठल्याही देशांत अशाप्रकारची घटना जनता सहन करील अशी कल्पनाच करू नये !

भाषावार प्रांताची रचना करण्यापूर्वी तीन गोष्टींची पूर्ती झाली पाहिजे. पहिली गोष्ट म्हणजे तो प्रांत स्वतःचा गुजारा करणारा स्वयंपूर्ण पाहिजे. घटना निर्मितीच्यावेळीं संस्थानांच्या विलीनीकरणाचा प्रश्न जेव्हा उद्‌भवला तेव्हां हा आर्थिकदृष्ट्या स्वावलंबीपणा अगत्याचा वाटला आणि म्हणूनच जी संस्थानें होतीं त्यांनाच स्वतंत्र प्रांताचें स्थान मिळालें. बाकींची लगतच्या प्रांताला जोडून घेतली गेलीं.

आंध्र हा स्वयंपूर्ण असा प्रांत आहे का ? आंध्र प्रांताच्या वार्षिक अंदाज पत्रकामध्ये पाच कोटी रुपयांपर्यंत तूट पडेल असे आपलें प्रांजल मत न्या. वांच्छू यांनी प्रदर्शित केलें आहे. असें असताना होऊ घातलेल्या आंध्र प्रांताला कराच्या रुपाने उत्पन्न वाढवून किंवा राज्य व्यवस्थेवरील खर्च कमी करून ही तूट भरून काढता येईल कां ? आंध्राच्या समोर आज हा यक्ष प्रश्न आहे. मध्य सरकार ही तूट भरून काढण्याची हमी घेणार आहे कां ? तशी जर मध्य सरकारनें जबाबदारी घेतली तर ती आंध्रा पुरतीच घेतली जाणार की अशा पेचांत सापडलेल्या इतर प्रांतांनाही अशी मदत सरकार देणार ? हे सर्व प्रश्न आजच सोडविले गेलें पाहिजेत.

आंध्र प्रांताकडे निश्चित स्वरुपाचें भांडवल नाहीं. भांडवलाच्या आधाराशिवाय एखादे राज्य निर्माण होऊ शकते ही गोष्ट कुठेही ऐकिवात नाही. तामीळांचा कट्टर म्होरक्या श्री. राजगोपालचारी आंध्र प्रांताच्या नवीन सरकारला मद्रास शहरांत एक रात्रही थारा द्यायला तयार नाही. त्यांच्या हिंदू धर्मांतील साधें '' आतिथ्य '' दाखविण्याचा औपचारिकपणाही त्यांच्यामध्यें नाही. नव्या आंध्र सरकारला आपले कामकाज चालविण्यासाठी निराळी जागा धुंडावी लागत आहे आणि कुटीरांतून आपल्या कचेऱ्या सजवाव्या लागल्या आहेत. आंध्र आपली राजधानी म्हणून कोणती जागा निवडणार ? आंध्र हे सहारा वाळवंटासारखे आहे आणि कुठंही हिरवळ त्यांना दिसत नाहीं. आपल्या राजधानीसाठी आंध्रला या वाळवंटातही चांगली निवाऱ्याची आणि आरोग्यकारक जागा शोधून काढणें भाग आहे आणि तात्पुरत्या उभारलेल्या कचेऱ्यापायीं होणारा हा बांधकाम खर्च म्हणजे पैशांची धूळदाण आहे. या गोष्टीचा सरकारनें कधी विचार केला आहे काय ? सरकारनें अशी एखादी जागा कां देऊ नये कीं जी आंध्राची कायमची बनूं शकेल ?

वारंगळ राजधानी बनण्यालायक शहर आहे. आंध्राची ती प्राचीन काळची राजधानी होती. ते रेल्वेचें जंक्शन आहे. शिवाय या शहरात पुरेशा इमारतीही आहेत. पण हें शहर आंध्राचा भाग असला तरी तें आज हैद्राबाद संस्थान मध्ये मोडत आहे. तत्वतः हैद्राबाद संस्थान मोडून त्याच्यातील आंध्राचा भाग मिळून नवा आंध्र प्रांत बनला पाहिजे. पंतप्रधानांचा हैद्राबाद संस्थान मोडण्यास काही स्वार्थ असला तरी निदान हैद्राबादचा आंध्रापुरता काहीं भाग काढून घेऊन वारंगळ राजधानी बनविण्याचा मार्ग मोकळा करून द्यायला काय हरकत आहे आणि असा परराज्यांतील तुकडा काढून घेणे ही भारताला नवीन गोष्ट नाही. परंतु, पंतप्रधानांना हैद्राबाद आणि काश्मीर या दोन्ही संस्थानांबाबत ईश्वराज्ञेच्या उलटच वर्तन करावयाचें आहे. पण माझी खात्री आहे की, लवकरच याचे दुष्परिणाम पंतप्रधानांना स्वतःच्या डोळ्यांनीं पहावे लागतील.

हे थोडे विषयांतर झालें. माझा मुद्दा आहे तो राज्य आर्थिकदृष्ट्या स्वयंसिद्ध पाहिजे आणि भाषावार प्रांतरचना करताना हा मुद्दा विशेष महत्वाचा आहे. दुसरा मुद्दा असा आहे की, भाषावार प्रांत बनतांना होणाऱ्या संभाव्य इष्टानिष्ट घटनांची पूर्व जाणीव असणे. दुर्दैवाने हिंदुस्थानातील लोकवस्तीचें जन्म-मृत्यू, जाती-वंश यांचा तपशीलवार आढावा या वर्गीकरणाप्रमाणे अचूक संशोधन आणि समीक्षण करणारा अभ्यासू विद्यार्थी नाही. आमच्या दशवार्षिक खानेसुमारीच्या अहवालावरून मुसलमान किती, हिंदू किती, अस्पृश्य किती, ज्यू किती आणि ख्रिश्चन किती अशाच प्रकारची माहिती मिळतें. देशामध्यें एकंदर धर्म किती एवढीच माहिती मिळाल्यानें कांही कार्यभाग होत नाही. आम्हांला माहिती पाहिजे ती ही की, प्रत्येक भाषिक विभागामध्यें जातिविभागणी कशी आहे. पण याबाबत आपल्याला थोडीच माहिती उपलब्ध आहे आणि त्यामुळें स्वतःच्या ज्ञानावर व माहितीवर एकाद्याला अवलंबून राहावें लागतें. प्रांतात बहुधा एक दोन जातीचें संख्या प्राबल्य असते आणि बाकीच्या जाती अगदीच अल्पसंख्यांक असतात. त्या बहुसंख्य जमातीवर अवलंबून असतात असे म्हटले तर तें वावगे होणार नाहीं.

उदाहरणादाखलच बोलायचे झाले तर पंजाब मधील पेप्सू प्रांताचे पहा. तेथें जाटांचे संख्या प्राबल्य आणि तेथील अस्पृश्य सर्वस्वी त्यांच्यावर अवलंबून असतात. आंध्रमध्ये दोन किंवा तीन जाती सर्वत्र प्रामुख्याने आढळतात. रेड्डी, कम्मा आणि कप्पू या त्या जाती होत. जमिनदारी, सरकारी नोकऱ्या, व्यापार-उद्योग या सर्व बाबतींत तेच स्वामित्व गाजवितात आणि अस्पृश्यांना तिथें दुय्यम परावलंबी स्थान आहे. महाराष्ट्राचेच घ्या. महाराष्ट्राच्या खेडोपाडी मराठ्यांची अफाट वस्ती आहे. ब्राह्मण, गुजर, अस्पृश्य आणि कोळी हे दुय्यम

स्थान धरून आहेत. एक काळ असा होता की जेव्हा ब्राह्मण आणि बनिया लोक निर्भयपणें राहात. पण तो काळ आता पालटला आहे. गांधीजींच्या खूनानंतर ब्राह्मण आणि बनिया लोक मराठ्यांच्या प्रकोपाला भिऊन खेड्यापाड्यांतून जीव घेऊन पळाले आणि शहरांचा आसरा त्यांनी केला आणि दुर्दैवी अस्पृश्य, कोळी आणि माळी हे लोक मराठ्यांची मगरूरी आणि जुलूम सहन करीत जीवन कंठीत आहेत आणि त्यांना ह्या चमत्कारीक जाति-रचनेची जाणीव नाही त्या प्रत्येकाला हा जाच सहन करावाच लागेल. भाषावार प्रांतरचनेमध्ये अल्पसंख्यांक ज्ञातींना काय आधार आहेत ? त्यांना कायदेमंडळात निवडून येण्याची काही आशा आहे का ? त्यांना आर्थिक प्रगतीची अपेक्षा करता येईल कां ? प्रांतिक सरकारातून नोकऱ्या चाकऱ्या मिळण्याची शक्यता आहे का ? या अशा परिस्थितीत भाषावार प्रांतरचना म्हणजे बहुसंख्य ज्ञातीच्या हातीं ' स्वराज्य ' देण्यासारखे आहे. गांधींच्या स्वराज्याची ही काय स्थिती बरं !

ज्यांना ह्या प्रश्नाची बाजू बरोबर उमगली नाही त्यांना भाषावार प्रांतरचना असा शब्दप्रयोग समजणार नाही. उलट, अशा प्रांतांना जाट प्रांत, रेड्डी प्रांत किंवा मराठा प्रांत असे म्हटल्यावरच बरोबर समजूं शकेल.

तिसरा मुद्दा आहे तो म्हणजे एकच भाषा बोलणाऱ्या लोकांचा. एका प्रांतात समावेश केल्यावर त्यांच्यांत एकसंघपणा निर्माण होईल कां ? सगळे महाराष्ट्रीयन महाराष्ट्रांत एकसंघ होतील कां ? सगळे आंध्र आंध्रप्रदेशांत समाविष्ट होतील का ? या एकसंघपणाचा अर्थ एक नवीन घटक निर्माण करणे असा नव्हे. उत्तर प्रदेश, बिहार, पं. बंगाल या प्रांतांतील एकसंघपणाशीं त्यांचा संबंध पोचतो. उत्तर प्रांताप्रमाणें हिंदी बोलणाऱ्या सर्वांचा एक-समुचय प्रांत का असू नये ? पण जे या एकसंघपणाचा पाठपुरावा करतात त्यांना दुसऱ्या प्रांताबरोबर झगडा निर्माण करावयाचा आहे का ? आणि प्रत्येकाने आपण कुणी स्वतंत्र आहोत, दुसऱ्याहून भिन्न आहोत असा या एकसंघपणाचा अर्थ करून घेतला तर थोड्याच कालावधीत मौर्य साम्राज्यभंगाप्रमाणे आजच्या हिंदुस्थानचीही छकलें होतील.

त्याचा अर्थ असा नव्हे की, भाषावार प्रांतरचनेच्या मागणीला कांही बाजू नाहीं. भाषावार प्रांताच्या बुरख्याखाली त्या त्या प्रांतांतील बहुसंख्य ज्ञातीकडून भाषावार प्रांतरचनेच्या हेतुचा मुडदा पडू नये म्हणून योग्य ती निश्चित स्वरुपाची खबरदारी आणि समतोलपणा राखण्यासाठी सूचना आहे.

● ● ●

जनता : ता. २ मे १९५३.

११४

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया

डॉ. बाबासाहेब आंबेडकर येवले येथे १३ ऑक्टोबर १९३५ रोजी प्रतिज्ञा करताना म्हणतात, '' दुर्दैवाने अस्पृश्य-हिंदू असा डाग घेऊन मी जन्माला आलो, पण ती गोष्ट माझ्या स्वाधीन नव्हती. . . . मी तुम्हाला स्पष्टपणे सांगतो की, हिंदू म्हणवून घेत मी मरणार नाही.'' त्यानंतर त्यांनी कोणता धर्म स्वीकारावा या दृष्टीने अनेक धर्मांचा तुलनात्मकदृष्ट्या अभ्यास सुरू ठेवला. या दरम्यान त्यांनी ' स्वतंत्र मजूर पक्ष ' आणि ' अ. भा. शेड्यूल्ड कास्टस् फेडरेशन ' या दोन राजकीय पक्षांची स्थापना केली. सर्व धर्मांच्या परिक्षणांती त्यांनी बौद्ध धम्म स्वीकारण्याचा निश्चय केला आणि तशा स्वरूपाचे निवेदन तारीख २० ऑगस्ट १९५५ च्या जनतेच्या अंकात प्रसिद्ध केले.

बौद्ध धम्माचा स्वीकार केल्यानंतर जातिवाचक ' शेड्यूल्ड कास्टस् फेडरेशन ' हा राजकीय पक्ष ठेवता येणार नाही या दृष्टीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्व-समावेशक अशा राष्ट्रीय नव्या राजकीय पक्षाची स्थापना करण्याचा विचार करीत होते. याबाबत जनता, तारीख १० डिसेंबर १९५५ मध्ये प्रसिद्ध त्यांची खालील भूमिका बोलकी आहे.

'' औरंगाबाद येथे डिसेंबर १९५५ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर आजारी अवस्थेत होते. त्या दरम्यान ते म्हणाले, माझा ' रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ' हा एक नवा राजकीय पक्ष काढण्याच्या विचार आहे. भारतीय राज्यघटना खऱ्याखुऱ्या अर्थाने राबविण्यासाठी हा पक्ष काढण्यांत येणार असून पक्षाचे मुख्य ध्येय समानता, स्वातंत्र्य व बंधुभाव असे राहणार आहे.

भारतांतील सत्ताधारी काँग्रेस पक्षाला विरोध करण्यासाठी सर्व लहानसहान पक्षांचे या नवीन पक्षात एकीकरण करण्यात येईल आणि अमेरिकन धर्तीवर हा पक्ष कार्य करीत राहील.

भारतांतील व्यापारी वर्गानें अमेरिकेतील व्यापारी वर्गाप्रमाणें सत्ताधारी व विरोधी पक्षास आर्थिक सहाय्य केल्यास दोनही पक्ष मजबूत पायावर कार्य करू शकतील व त्यामुळे लोकशाहीच्या निरोगी वाढीस फार मोठे सहाय्य होईल.

लहानसहान पक्षाजवळचें मामुली निधी, कार्यकर्त्यांची वाण या गोष्टी लक्षांत घेतां सध्याच्या राजकीय वातावरणांत अशा पक्षांना बिलकूल भविष्य काळ नाही असें डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत आहे.

सरकारने व देशभक्तांनी अमेरिकेप्रमाणेच कॉंग्रेस व रिपब्लिकन पक्ष अशा दोन पक्षांच्या वाढीस प्रोत्साहन द्यावे असेही त्यांना वाटते.

उदाहरण देण्यासाठी ते म्हणाले, गेल्या निवडणुकीत शेड्यूल्ड कास्टस् फेडरेशनला थोडे हजार रुपयेही खर्च करतां आले नाहींत. याच्या उलट कॉंग्रेसनें शेड्यूल्ड कास्टस् फेडरेशनचा पाडाव करण्यासाठी अमाप पैसा खर्च केला. ''[१]

या दृष्टीने तारीख ३० सप्टेंबर १९५६ रोजी नवी दिल्ली येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षेतखाली त्यांच्या निवासस्थानी ' अ. भा. शेड्यूल्ड कास्टस् फेडरेशन ' च्या कार्यकारिणीची बैठक घेण्यात आली आणि त्यात ठरावाद्वारे ' अ. भा. रिपब्लिकन पार्टी ' स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्या बैठकीचा वृत्तांत प्रबुद्ध भारताच्या तारीख ६ आणि १३ ऑक्टोबर १९५६ च्या अंकात प्रसिद्ध झाला. तो खालीलप्रमाणे–

'' अखिल भारतीय दलित फेडरेशनच्या कार्यकारणीची बैठक दिल्ली येथे तारीख ३० सप्टेंबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली, त्यांच्या निवासस्थानी भरली होती. भारतांतील निरनिराळया प्रदेशांतील दलित फेडरेशनच्या कार्यकारिणीचे सभासद हजर होते. कार्यकारिणीत चालू राजकीय परिस्थितीवर चर्चा झाली व निरनिराळया विषयानुसार ठराव सम्मत करण्यांत आले. दलित फेडरेशन या राजकीय पक्षाऐवजी, ' अखिल भारतीय रिपब्लिकन पार्टी ' या नावाचा राजकीय पक्ष स्थापण्याचा महत्त्वाचा असा निर्णय घेण्यात आला.

कॉंग्रेस व्यतिरिक्त पक्षाशी सहकार्य

सम्मत झालेल्या ठरावामध्ये एक ठराव, कॉंग्रेस व्यतिरिक्त असलेल्या पक्षाबरोबर आगामी सार्वत्रिक निवडणुकांत सहकार्य करण्याबद्दलचा आहे. त्या ठरावांत असें नमूद करण्यांत आले की, कॉंग्रेस पक्षाशिवाय, इतर कोणत्याही राजकीय पक्षास, अ. भा. दलित फेडरेशनबरोबर, निवडणुकाबाबत संधी करावयाचा असेल तर फेडरेशन त्या गोष्टीस तयार राहील. अशा निवडणुका संधी बाबत, काय अटी व मुद्दे असावेत याचा विचार, कॉंग्रेस व्यतिरिक्त पक्षाबरोबर करील.

---

[१] : जनता, ता. १० डिसेंबर १९५५.

कार्यकारिणीनें केलेल्या ठरावांत, नवा भारतीय रिपब्लिकन पक्ष काढण्याबाबतचा ठराव ; राज्य पुनर्रचनेच्या प्रश्नाबाबतचा ठराव सध्याच्या भारतीय परराष्ट्रीय धोरणासंबंधीचा ठराव व सुएझ कालव्यासंबंधाचा ठराव, असें चालू महत्त्वाच्या विषयांवर ठराव पास करण्यांत आले.

रिपब्लिकन पक्ष स्थापन होणार

नवा भारतीय रिपब्लिकन पक्ष स्थापन करण्याबाबतच्या ठरावांत कार्यकारिणीने नमूद केले आहे की, आगामी सार्वत्रिक निवडणुकीपुरतीचें कॉंग्रेस पक्षास विरोधी अशी एकच संयुक्त आघाडी निर्माण करण्याची राजकीय वेळ आलेली आहे, एवढेंच नव्हे तर भारतांतील, कॉंग्रेस-विरोधी मतदारांस, एका संघटनेमध्यें आणून असें संघटन एका राजकीय पक्षाद्वारा निर्माण करण्याची आवश्यकता सध्याच्या राजकीय परिस्थितीप्रमाणें आवश्यक आहे. मानलेल्या अस्पृश्य जाती, वन्य जाती व इतर मागासलेला समाज हे समान अन्तःकरणाचे घटक आहेत, त्यांच्या परिषदा, आगामी सार्वत्रिक निवडणुकापूर्वी व तद्नंतरही घ्याव्यात, असा आदेशही कार्यकारिणीनें ठरावांत दिला आहे. या परिषदेद्वारा, नवा भारतीय रिपब्लिकन पक्ष काढण्याचें कार्य करण्यात येईल.'' [१]

' रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ' या नवीन पक्षाची मुहूर्तमेढ रोवण्याच्या दृष्टिकोनातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राजकारणातील समविचारी काही प्रमुख व्यक्तिंशी बोलणी केली होती आणि त्यांच्याशी पत्रव्यवहार सुरू ठेवला होता. त्यात प्रमुख सोशियालिस्ट पार्टीचे प्रमुख डॉ. राममनोहर लोहिया होते. याबाबत डॉ. राममनोहर लोहिया यांचा, त्यांचे कार्यकर्ते आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी झालेल्या पत्रव्यवहारात ' रिपब्लिकन पार्टी ' चा स्पष्ट उल्लेख आहे.†

रिपब्लिकन पार्टीचा पाया कोणत्या विचारधारेवर आधारित राहील याकरिता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी एक निवेदन भारतीय जनतेसाठी तयार केले होते. या निवेदनाला ' रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ', भारताच्या लोकसत्ताक पक्षास भारतीय लोकांनी पाठिंबा द्यावा म्हणून त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेले खुले पत्र म्हणून संबोधल्या गेले आहे.

---

[१] : प्रबुद्ध भारत, ता. ६ ऑक्टोबर १९५६.

† पाहा परिशिष्ट क्रमांक-२६.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर नागपूर येथे नियोजित धम्म दिक्षेकरिता आले असताना तारीख १३ ऑक्टोबर १९५६ रोजी वृत्तपत्र वार्ताहरांबरोबर त्यांची जी मुलाखत झाली ती खालीलप्रमाणे--

प्रश्न : धर्मांतरानंतर शेड्युल्ड कास्टस् फेडरेशनचे काय होणार ?

उत्तर : कदाचित तो कायम राहील किंवा नवा पक्ष स्थापन होईल. मी मात्र बौद्ध धर्मांत प्रवेश केल्यानंतर शेड्युल कास्टस् फेडरेशनचा सदस्य राहणार नाही.

प्रश्न : बौद्ध धर्म स्वीकारल्यानंतर आपण काय करणार ?

उत्तर : मी ' मिशनरी ' होणार आहे, पण राजकारणाचा संन्यास मात्र घेणार नाही. निवडणुकीलाही निश्चितपणे उभा राहीन.

प्रश्न : रिपब्लिकन पार्टी स्थापन करण्याचे आपण निश्चित केले आहे काय ?

उत्तर : हो, ते नक्की ठरले आहे. मी त्या पक्षाची घटनाही तयार केली आहे. त्याच्या प्रिअंबलमध्ये स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व या तत्त्वांवर हा पक्ष आधारलेला राहील असे स्पष्ट केले आहे. पार्लमेंटमध्ये येणाऱ्या प्रत्येक विधेयकाची कसोटी या तीन निकषांवर पाहिली जाईल.

प्रश्न : पण पक्षाचे तत्त्वज्ञान कोणते राहील ?

उत्तर : पक्षासाठी मुख्य गरज असते ती कणखर नेत्याची.

प्रश्न : या पक्षाचे स्वरूप व्यापक राहील काय ?

उत्तर : हो ! या पक्षात सर्वांना प्रवेश दिला जाईल. "[१]

यावरून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ' रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ' या पक्षाची स्थापना करण्याचा निर्णय ठामपणे घेतला होता आणि त्या दृष्टीने त्यांनी आवश्यक बाबींची पूर्तताही केली होती. परंतु त्यांच्या आकस्मिक निधनामुळे ते त्या पक्षाच्या स्थापनेची घोषणा जाहीरपणे करू शकले नाही, त्याला त्यांचा नाईलाज होता.

या पक्षाचे वैशिष्ट्य दर्शविताना ' India votes ' या ग्रंथाचे संपादक-- R. Chandidas, Ward Morehouse, Leon clark, Richard Fontera म्हणतात,

" Republican Party of India is an All-India Political Party founded by Late Dr. Babasaheb Ambedkar who was the great political thinker, the great social revolutionary and the great constitutional

---

[१] : प्रबुद्ध भारत, आंबेडकर बौद्ध विशेषांक, २७ आक्टोबर १९५६, पृ. २५-२६.

expert, he dedicated his life to the cause of reconstructing the Indian society based on liberty, equality and fraternity. The Republican Party of India dedicates itself to this great task :

Republican Party of India stands for Parliamentary Democracy—

1. The Republican Party of India will stand for the Parliamentary system of Government as being the best form of Government both in the interest of the public and in the interest of the individual.

Secularism upheld

2. The Republican Party of India upholds the secular character of the State."[1]

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या पक्षाची मुहूर्तमेढ ज्या विचारधारेवर रोवली आहे ती एवढी प्रभावी आणि कार्यक्षम आहे की त्यानुसार हा पक्ष कार्यशील असला तर तो जगाचा आणि भारताचा बचाव रक्तपातापासून करू शकेल. असा निष्कर्ष काढताना डॉ. आंबेडकरांच्या चळवळीच्या काळात त्यांचे खंदे कार्यकर्ते असलेले आणि विचारवंत ॲड. बी. सी. कांबळे, माजी खासदार आपल्या ' त्या निवेदनाचे प्रश्नोत्तर-रूपी सोपे व यथार्थ विवेचन ' यात म्हणातात,

" . . . . डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या खुल्या पत्राचा संदेश भारताच्या कानाकोपऱ्यात आणि भारतीय लोकांपर्यंत पोहचविणे अत्यंत निकडीचे आहे. त्याचप्रमाणे, जणू हे खुले पत्र जगातील लोकांस उद्देशून आहे असे समजून, खुल्या पत्राचा संदेश राष्ट्रसंघापर्यंत व शक्यतो जगातील लोकांपर्यंत पोहोचविणे तितकेच निकडीचे आहे.

" कोणी हे कार्य करील तर ते जगाच्या धन्यवादाला पात्र होतील. कोणी हे करो वा न करो रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाला मानणाऱ्या तमाम लोकांनी हे कार्य करण्यासाठी सर्वांपुढे यावे व जगाचा व भारताचा बचाव रक्तपातापासून करावा. "

या निवेदनाचे भाषांतर मा. दा. ता. रूपवते यांनी करून ते प्रबुद्ध भारत : रिपब्लिकन पार्टी स्थापना विशेषांक १९५७ मध्ये प्रसिद्ध केले आहे. ते येणेप्रमाणे–

---

1. India Votes : P. 85.

परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचें भारतीय जनतेला प्रकट पत्र रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (भारतीय लोकसत्ताक पक्ष) या पक्षांत सामील होण्याबद्दल आवाहन

[परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या नवीन पक्षाची मुहुर्तमेढ रोवण्याचें निश्चित केलें होते. भारतीय राजकारणांतील कांहीं प्रमुख्य व्यक्तींशीं त्यांनी त्याबाबत बोलणीहि सुरुं केली होती. भारतीय जनतेला लोकशाहीची संपूर्ण जाणीव देणारें, लोकशाहीमध्यें विरोधी पक्षाची किती आवश्यकता आहे याचें दिग्दर्शन करणारें, रिपब्लिकन पार्टी कां स्थापली जात आहे याची कल्पना देणारे, या नव्या पक्षाचें ध्येयधोरण विशद करणारें सविस्तर पत्र त्यांनीं त्यांच्या हयातींत लिहून ठेवले होते. 'रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया' या नूतन पक्षाला पाठिंबा देण्याबद्दल आवाहन करणारें, भारतीय जनतेला लिहिलेलें असें हें बाबांचें प्रकट पत्र आहे. ते हयात असते तर त्यांनी यावरून हात फिरविला असता, तें परिपूर्ण व्हावें म्हणून त्यांनीं कदाचित कांही फेरबदलहि केलें असतें, त्यांत भर घातली असती. मध्येंच त्यांचें महानिर्वाण झाल्यानें हें होऊं शकलें नाहीं. उपलब्ध असलेलें त्यांचें पत्र जसेच्या तसें छापणें इष्ट असल्यानें मी स्वतः अक्षरशः भाषांतर करून येथें छापलें आहे. मूळ लिखाण इंग्रजीत आहे.--दा. ता. रुपवते]

[१] चळवळीला राजकीय पक्षाचें स्वरूप कसें प्राप्त होतें

हिंदी कॉंग्रेसची स्थापना १८८५ सालीं झाली. १९४७ पर्यंत स्वराज्य प्राप्तीची चळवळ म्हणून तिनें काम केलें. सुरवातीला तिला स्पष्ट असें ध्येय नव्हतें. प्रथम तिनें सुराज्याची (चांगल्या राज्यकारभाराची) मागणी केली. त्यानंतर तिनें हें ध्येय बदललें, आणि ' स्वराज्या ' ची मागणी पुढें ठेवली. ब्रिटीश राजकीय वर्तुळांत ह्या स्वराज्याच्या कल्पनेचें दोन पर्यायी अर्थ करण्यांत आले; (१) वसाहतीचें स्वराज्य (Dominion Status) व (२) संपूर्ण स्वातंत्र्य (Independence) समान (एकाच) राजाला राजनिष्ठ राहून उपभोगावयाचें स्वातंत्र्य म्हणजे वसाहतीचें स्वराज्य होय. तर संपूर्ण स्वराज्याचा अर्थ राजनिष्ठाविरहित स्वातंत्र्य असा होता.

हिंदी राष्ट्रसभा (कॉंग्रेस) सूरवातीला कांही काळ वसाहतीचे स्वराज्य मान्य करीत होती. पण तो काळ अगदींच अल्प होता.

१९३० सालीं अगदींच नाट्यपूर्ण व अनपेक्षितपणे तिनें संपूर्ण स्वराज्याचा ठराव मंजूर केला. हें स्वातंत्र्य १९४७ सालीं मिळालें.

येथपर्यंत कॉंग्रेसचे स्वरूप हे संसदीय लोकशाही (Parliamentary Democracy) यशस्वी करण्यासाठीं उभारलेल्या सैन्यासारखें नसून परकीय सत्तेंच्या विरुद्ध युद्ध करण्यासाठीं एकत्रित केलेल्या पलटणीसारखें होतें. ह्याची कल्पना असल्यामुळेंच, कॉंग्रेस ही संस्था बरखास्त करण्याची आणि स्वराज्यांतील सरकार चालविण्यासाठीं पक्षपद्धतीनें बांधलेले नवीन पक्ष उभारण्याची अत्यंत सूज्ञ सूचना श्री. गांधी यांनीं केलीं होती. परंतु कॉंग्रेस पक्षांतील पुढारी तर सरकारी कामकाजाची सूत्रे हातीं घेण्यासाठीं आपापल्या तंबूंत सर्व शस्त्रास्त्रासह सजून बसले होते ! श्री. गांधींचा सल्ला त्यांनीं जुमानला नाहीं. सर्वसाधारणपणें अशी राजनैतिक परंपरा आहे कीं, शांततेच्या प्रस्थापनेनंतर युद्ध काळांत उभारलेले सैन्य बरखास्त करावें लागतें. याचे कारणहि उघड आहे. लढाईच्या काळांत सैन्य भरती करताना योग्य तीं पथ्यें पाळलेलीं नसतात. चांगलें, वाईट, बेफिकीर, संधिसाधू अशा सर्व प्रकारच्या लोकांची भरती पलटणींत होत असल्यानें तिचा दर्जा खूपच खालावलेला असतो. भारताच्या बाबतींत हें असें सैन्य बरखास्त करण्याचें दूरच राहो, उलट त्यानें सारी सत्ता हस्तगत केली आहे.

आपणाला आतां कॉंग्रेस सरकारच्या गेल्या दहा वर्षाच्या कारभाराचा अनुभव मिळाला आहे. कारभार कांही भूषणावह नाहीं. असेंच कोणीहि म्हणेल.

श्री. गांधी यांच्या सल्ल्याचा विचार गंभीरपणें करण्याची आणि संसदीय लोकशाहींतील विरोधी पक्ष म्हणून काम करील असा पक्ष उभारण्याची वेळ आतां आली आहे.

[२] संसदीय आधुनिक लोकशाहीच्या Parliamentary Democracy च्या यशस्वीतेसाठीं आवश्यक गोष्टी

लोकशाही पद्धतीची शासनसंस्था यशस्वीपणें राबविता यावी म्हणून आवश्यक असलेल्या बाबी कोणत्या ?

या विषयी येथें थोडक्यांत चर्चा करण्याचें मी योजिलें आहे.

या विषयाची पार्श्वभूमी

प्रत्यक्ष विषयाची चर्चा करण्यापूर्वी तद्विषयक पार्श्वभूमीबाबत कांही प्राथमिक बाबींचा मी येथें उल्लेख करतों.

पहिली गोष्ट अशी कीं, ' लोकशाही ' चें स्वरुप सारखें बदलतें राहिलें आहे. आपण ज्या लोकशाहीबद्दल बोलतो ती कांही सातत्यानें एक स्वरुपीं राहिलेली नाहीं. ग्रीक लोकांची ' ॲथेनियन लोकशाही ' (Athenian Demo-cracy) च घ्या. ही ' ॲथेनियन लोकशाही ' आणि आजची आपली लोकशाहीची कल्पना यांत महद्अंतर आहे. ' ॲथेनियन लोकशाही ' मध्यें पन्नास टक्के लोक हे गुलाम असत. खरोखरी ' स्वतंत्र ' जनता फक्त पन्नास टक्केच असायची. बाकी पन्नास टक्के गुलाम असलेल्या जन विभागाला शासन संस्थेत कोणत्याहि प्रकारचें स्थान नव्हतें. ही एकच बाब ' ॲथेनियन लोकशाही ' व आधुनिक लोकशाही यांतील फरक दाखवायला पुरेशी आहे. प्रथम दर्शनीच तिच्याकडे तुमचें लक्ष वेधावें असें मला वाटतें ती दुसरी गोष्ट ही कीं, कोण्त्याही एका देशांत देखील लोकशाहीचें स्वरुप एकच राहिलेलें नाही. इंग्लंडचें उदाहरण घ्या. १६८८ सालांत झालेल्या क्रांतीच्या पूर्वीची त्या देशातील लोकशाही व त्यानंतरची तेथील लोकशाही यांचें स्वरुप एकच आहे असें कोणीहि म्हणूं शकणार नाहीं. कोणी असेंहि म्हणूं शकणार कीं, १६८८ ते १८३२ या काळांतील इंग्लंडमधील लोकशाही व १८३२ सालीं मंजूर करण्यात आलेला ' पहिला सुधारणा कायदा ' (First Re-form Bill) अंमलांत आल्यानंतरची लोकशाही ही एकच आहे. लोकशाहीचें स्वरुप सारखें बदलत आलें आहे.

तिसरी गोष्ट अशी कीं, लोकशाहीचें नुसतें ' स्वरुप ' च (Form) बदलत आलें आहे असें नाहीं तर, तिचें ' उद्दिष्ट ' (Purpose) देखील काल ओघाबरोबर बदलत आले आहे. पुन्हां पुरातन इंग्लिश लोकशाहीचेंच उदाहरण घ्या. त्यावेळीं तेथील लोकशाहीचें ' उद्दिष्ट ' काय होतें ? राजाच्या अबाधित सत्तेवर नियंत्रण घालणें, त्याला त्याच्या विशिष्ट हक्कांच्या (Prerogative rights) अंमलबजावणीपासून परावृत्त करणें हेंच तें उद्दिष्ट होय. त्यावेळचा इंग्लंडमधील ' राजा ' ह्या थराला जाऊन म्हणत असें कीं, '' कायदे करण्याचा हक्क पार्लमेंटला असला तरी मी राजा म्हणून कायदे करूं शकतो व माझ्या कायद्यांना वरिष्ठ स्थान दिलें जाईल ! '' राजाच्या ह्या अशा प्रकारच्या झोटिंगशाहीमुळें (Autocracy) लोकशाही सत्यस्वरुपांत उतरूं शकली नाहीं.

आज लोकशाहीचें उद्दिष्ट कोणतें आहे ? **आधुनिक लोकशाहीचें उद्दिष्ट हें अनियंत्रित राज सत्तेवर नियंत्रण घालणें हें नसून ' लोककल्याण ' साधणें हें आहे.**

लोकशाहीच्या उद्दिष्टांत आलेला हा बदल महत्त्वपूर्ण आहे. आणि यामुळेंच मी त्यांना विशदपणे " आधुनिक लोकशाहीच्या यशस्वी प्रयोगासाठीं आवश्यक असलेल्या गोष्टी " असे हेतुतःच संबोधिलें आहे.

' लोकशाही ' ची व्याख्या

' लोकशाही ' ची व्याख्या तरी काय ? पुढील चर्चा करण्यांपूर्वी ' लोकशाही ' या शब्दप्रयोगांत येणाऱ्या कल्पनेचें स्पष्ट स्वरुप आपण जाणून घेऊं या. तुम्हांला माहीत असेल कीं, ' लोकशाही ' ची व्याख्या राज्यशास्त्रवेत्ते, लेखक, समाजशास्त्रज्ञ आणि इतर कित्येक लोकांनी आपापल्या परीनें केलेली आहे. अशा व्याख्यांपैकीं फक्त दोनच मी माझा मुद्दा स्पष्ट करण्यासाठीं येथें देत आहे. वॉल्टर बेग्हॉट यानें इंग्लिश संविधानावर (English Constitution) एक सुप्रसिद्ध ग्रंथ लिहीला आहे. त्यांत ' लोकशाही ' चें सुस्पष्ट चित्र रेखाटण्याचा प्रयत्न केला गेला आहे. या ग्रंथात त्यानें लोकशाहीची व्याख्या, " चर्चेवर आधारलेली शासनसंस्था " (Government by discussion) अशी केली आहे. अब्राहम लिंकननें केलेली व्याख्या आतां बघूं या. दक्षिणेकडील राज्याशी झालेल्या युद्ध समाप्तीनंतर गॅटिसबर्ग येथें सुप्रसिद्ध भाषण केलें, त्यांत लोकशाहीची व्याख्या त्यानें " लोकांचें सरकार, लोकांनीं नियुक्त केलेलें सरकार, आणि लोकांकरितां राबणारें सरकार " (" A Government of the people, by the people and for the people ") अशी केली. अशा आणखी कितीतरी व्याख्यांचा नामनिर्देशन करतां येईल. माझ्या पुरतें बोलायचें झाल्यास मी लोकशाहीची व्याख्या निराळ्या शब्दानीं करील. **मला असें वाटतें कीं, तीच लोकशाहीची आज खरी व्याख्या होऊं शकेल. माझी व्याख्या अशी. " लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनांत क्रांतिकारक बदल रक्तविरहीत मार्गांनीं घडवून आणणारी शासनपद्धति म्हणजे लोकशाही होय. "** ज्या शासनपद्धतिमुळें सत्तारुढ मंडळीला सामाजिक व आर्थिक क्षेत्रांत मूलभूत बदल करतां येतात आणि असें बदल ग्रहण करतांना जनता रक्तलांच्छित (हिंसात्मक) मार्गाचा अवलंब करीत नाही तेथे लोकशाही नांदते आहे. असें मी म्हणेन कीं, हीच लोकशाहीची खरी कसोटी आहे. तीच उच्चतम कसोटी आहे. ज्यावेळी तुम्ही एकाद्या पदार्थाचे गुणग्रहण करतां त्यावेळी सगळ्यांत कडक कसोटी त्याला लावणें जरूर आहे. तेव्हांच त्याची खरी परीक्षा होते. लोकशाहीची ही व्याख्याच मी निकष म्हणून इथें वापरणार आहे.

ही अशी लोकशाही यशस्वी कशी होणार ? ह्या बद्दल प्रामुख्यानें मी लिहिणार आहे. लोकशाहीच्या यशस्वी अमलबजावणीसाठी आवश्यक असलेल्या बाबी

कोणत्या, याबद्दल ' लोकशाही ' या विषयाची मांडणी करणाऱ्या कोणत्याहि लेखकानें स्पष्टपणें कांही मूलभूत अधिष्ठानें सागून ठेवलेलीं नाहींत म्हणूनच लोकशाहींचे प्रयोग ज्या ज्या देशात झाले त्या त्या देशाच्या इतिहासाचें परिशीलन करुन लोकशाहीच्या अपयशाची कारणें शोधावी लागतात व **योग्य ती अनुमानें** आपणासच काढावी लागतात.

लोकशाहीच्या यशस्वी सिद्धीसाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टींचा आतां आपण क्रमानें विचार करूं.

(१) लोकशाही यशस्वी व्हावयास लागणारी **प्रथम आवश्यक बाब ही कीं, समाज व्यवस्थेंत विषमता नसली पाहिजे.** पीडित-दडपलेला वर्ग समाजांत असता कामा नये. सर्व हक्क व सत्तेचे केंद्रीकरण ज्यांच्या ठायीं झालें आहे असा वर्ग एका बाजूला व सर्व प्रकारचे भार वाहण्याचें काम करणारा वर्ग दुसऱ्या बाजूला अशी विभागणी असूं नये. अशी विषमता, अशी अन्यायकारण विभागणी व त्यावर आधारलेली समाजरचना यांमध्ये हिंसात्मक क्रांतीचीं बीजें असतात आणि मग त्यांचें परिमार्जन करणें ' लोकशाही ' ला अशक्य होतें. **लिंकन आपल्या त्याच गॅटिसबर्ग येथील भाषणांत म्हणाला होता, '' स्वतःच्या विरुद्ध विभागलेलें घर तग धरूं शकत नाहीं ''** (a house divided against itself cannot stand) या त्याच्या उच्चाराचा अर्थ लोकांना संपूर्णपणें आकलन झाला नाहीं. अर्थातच अमेरिकेंतील दक्षिण व उत्तर संस्थानांमधील झगड्याबद्दल तो हें बोलला. ज्यावेळीं '' विभागलेलें घर टिकूं शकत नाहीं '' असें तो म्हणाला त्यावेळीं त्याला हेंच म्हणावयाचें होतें कीं, '' तुम्ही दक्षिणेकडील लोक व आम्ही उत्तरेकडील लोक जर विभागलों गेलों-एकमेकांच्या विरुद्ध उभे राहिलों-मग परकीय शत्रूंविरुद्ध आपण एकत्र उभे राहू शकणार नाहीं '' **पण त्या त्यांच्या वाक्यांत यापेक्षांही आणखी खोल व महत्त्वपूर्ण अर्थ भरलेला आहे असें मला वाटते. माझ्या मतें वर्गा-वर्गातील जे महदअंतर आहे, वर्गसंघर्ष आहेत ते लोकशाहीच्या यशसिद्धीच्या मार्गावरील सर्वात मोठी अडसर बनतात हाच तो अर्थ होय.** कारण उघड आहे. लोकशाही मध्यें घडतें काय ? लोकशाहीमध्यें पीडित, दलित, ज्यांचे हक्क छिनून घेतलेले असतात असे, जे भारवाहक बनलेले असतात ते लोक आणि ज्यांनी सर्व हक्कांचा समुच्चय स्वतःपाशी केलेला असतो असे लोक या दोहोंनाही मतदानाचा समान हक्क प्राप्त होतो. मातब्बर वर्ग (Privileged Class) हा बहुधा, पीडित वर्गापेक्षा संख्येनें कमी असतो; आणि निर्णय घेण्याच्या कामी आपण '' बहुमतां' चें तत्व मान्य करीत असल्यानें, जर ह्या सुरक्षित [मातब्बर] वर्गानें सुखासुखी व स्वेच्छेनें आपले विशेष अधिकार सोडले नाही, तर मग त्यांच्या व

खालच्या वर्गामधील अंतर दुणावेल, तें (अंतर) लोकशाहीच्या नाशास व भलत्याच एखाद्या राज्यपद्धतीला जन्म देण्यास कारणीभूत होईल. **आणि म्हणूनच मी असें निःसंकोचपणें म्हणतो कीं जगातील निरनिराळ्या भागातील लोकशाहीच्या इतिहासाचा अभ्यास केल्यास, लोकशाहीच्या अपयशांचें कारण सामाजिक विषमता, वर्गावर्गात उभी असलेली असमतेची दरी हेंच आहे असें दिसून येईल.**

(२) **लोकशाहीच्या यश सिद्धीसाठीं आवश्यक असलेली दुसरी गोष्ट म्हणजे विरोधी पक्षाचे अस्तित्व !** याबाबतीत पक्ष पद्धती (Party System) विरूद्ध बोलणारे पुष्कळ लोक याच देशांत नव्हे तर इंग्लंडमध्यें देखील मी खूप पाहिले आहेत. इंग्लंडमध्ये पार्टी सिस्टिमवर (पक्ष पद्धतीवर) हेन्सार्ड सोसायटीनें लिहिलेल्या ग्रंथांत एक संबंध प्रकरणच्या प्रकरण लिहिलें आहे आणि त्यात, पक्ष पद्धती ही चांगली पद्धती आहे कीं नाहीं आणि तीं राबवायची कीं नाहीं असा प्रश्न उपस्थित करून त्याचा उहापोह केला आहे. या प्रश्नांबाबत पुष्कळ दृष्टीकोन मांडले जातात. माझ्या मतें, जे लोक ' पक्ष पद्धती ' विरूद्ध आहेत आणि अनुषंगानेंच ज्यांना विरोधी पक्षाची आवश्यकता वाटत नाहीं, त्यांना ' लोकशाही ' या चीजेचें संपूर्ण आकलन झालेलें नसावें. लोकशाही म्हणजे काय ? मी कांहीं तिची व्याख्या येथें सागत नाहीं, तर तिची कार्य-मिमांसा करतो आहे. या अर्थाने लोकशाहीला ' सत्तेवरील नियंत्रण ' (Veto of Power) असें म्हणतां येईल. 'वंश परंपरागत सत्ता ' व सरंजामदारशाही (सनातनशाही) यांच्या नेमका उलट अर्थाचा शब्द म्हणजे लोकशाही. लोकशाहीचा अर्थच हा कीं, सत्तारूढ मंडळीच्या अमर्याद सत्तेला कोठें तरी केलेलें नियंत्रण. झोटिंगशाहीमध्यें नियंत्रणाला वावच नसतो. एकदां निवडलेला राजा आपल्या ' उपजत व दैवी ' अधिकारानें राज्य करतो. दर पांच वर्षांनीं त्याला आपल्या प्रजेकडे जाऊन असें म्हणावें लागत नाहीं कीं, '' कांहों, मी चांगला माणूस आहे ना ? गेल्या पांच वर्षातील माझा कारभार तुम्हांला पसंत आहे कीं नाहीं ? पसंत असेल, तर मला पुन्हां राजा म्हणून निवडाल ना ? '' राजाच्या सत्तेवर कोणाचेंहि नियंत्रण नसतें. परंतु लोकशाहींत आपण अशी व्यवस्था केलेली असतें कीं ज्यामुळें सत्तारूढ असलेल्या मंडळीला दर पाच वर्षांनीं लोकांपुढे जावें लागतें; आणि ते सत्तास्थानीं रहावयास लायक आहेत कीं नाहीं, लोकांचा सांभाळ आणि संरक्षण करण्यास समर्थ आहेत कीं नाहीं या प्रश्नावर त्यांना लोकांचा कौल घ्यावा लागतो. यालाच मी सत्तेवरील नियत्रंण (Veto) म्हणतो. परंतु दर पांच वर्षांनीं फक्त एकदां लोकमताचा कौल घेण्याच्या आधी मधल्या काळांत अनियंत्रित सत्ता वापरण्याच्या ह्या ' पंचवर्षिक ' नियंत्रणामुळें खरीखुरी लोकशाही येत नाहीं.

लोकशाहीमध्यें राज्यसत्तेवर लोकमताचें नियंत्रण नुसतेंच हवें असें नाहीं, तर तें तात्काळ व सतत असावयास हवें. लोकसभेमध्यें (पार्लमेंट-कायदेमंडळ यामध्यें) सरकारला तेथल्या तेथें अडविणारे व आव्हान देणारे लोक असावें लागतात. या विवेचनावरून तुम्हाला दिसून येईल कीं, कोणालाहि अविरतपणें सत्ता गाजविण्याचा अधिकार नाही; परंतु शासनसंस्था (सरकार) ही लोकमतानुवर्ति असावयास हवी आणि तिला अडविणारें, आव्हान देणारे लोक खुद्द सभागृहांत (कायदेमंडळांत) च असलें पाहिजेंत. विरोधी पक्षाचें महत्व यावरून तुम्हाला कळेल. विरोधी पक्षाच्या अस्तित्वामुळें सत्तारूढ सरकारचें ध्येयधोरण तापवून ऐरणीवर ठोकून नीटनेटकें करण्याची व्यवस्था असते. सत्ताधारी पक्षाला आपल्या धोरणाचें व राज्यकारभाराचें समर्थन आणि त्या पक्षांत नसलेल्या लोकांच्या शंकांचें निरसन सततपणें करावें लागतें. दुर्दैवानें आपल्या देशांतील बहुतेक वर्तमानपत्रें, सरकारी जाहिरातीच्या उत्पन्नासाठीं म्हणा किंवा अन्य कारणासाठीं म्हणा, सरकारी पक्षाला जास्त उचलून धरतात, विरोधी पक्षाला प्रसिद्धी देत नाहींत. विरोधी पक्षाकडून त्यांना काय मिळणार ? सरकारकडून त्यांना जाहिरातीचा पैसा मिळतो आणि मग काय, सत्तारूढ पक्षाच्या सदस्यांनीं केलेल्या भाषणांची प्रतिवृत्तें रकानेच्या रकाने भरून ही वृत्तपत्रें प्रसिद्ध करतात. विरोधी पक्षाच्या सदस्यांनी केलेलीं भाषणें अगदी त्रोटकपणें शेवटच्या पानावर, कोठेंतरी कोंपऱ्यांत छापली जातात. आणि म्हणूनच लोकशाही यशस्वी होण्यासाठीं विरोधी पक्षाची आवश्यकता आहे. इंग्लंडमध्यें विरोधी पक्षाला नुस्ती मान्यताच दिली जाते, एवढेच नव्हे तर विरोधी पक्ष-नेत्याला त्याच्या पक्षाचें कामकाज चालविता यावें म्हणून पगार दिला जातो. त्याला सेक्रेटरी (चिटणीस), टंकलेखक, कारकून असा लवाजमा पुरविला जातो. ' हाऊस ऑफ कॉमन्सच्या ' इमारतींतच त्याचें ऑफिस थाटून दिलें जातें. कॅनडामध्यें देखील पंतप्रधानासारखाच विरोधी नेत्याला पगार दिला जातो. कारण उघड आहे. ह्या दोन्हीं देशांत सरकार चुकीच्या मार्गानें जात आहे कीं काय हें सांगणारांची आवश्यकता त्या लोकांना भासते. हें काम अविरतपणें व सातत्यानें व्हावयास पाहिजे याची त्यांना निकड भासते. आणि म्हणूनच ते विरोधीपक्षांसाठीं खर्च करावयास तत्पर असतात.

(३) **लोकशाहीच्या यशासाठी जरुर असलेली तिसरी बाब म्हणजे वैधानिक व कारभार विषयक क्षेत्रांत पाळावयाची समता ही होय.** ' कायद्यांतील समता ' (Equality before law) या विषयाची जादा चर्चा करण्याची आवश्यकता नाहीं. अर्थात ह्या तत्वाची अंमलबजावणी करतांना कांही ठिकाणीं अन्याय होत

असतातच. परंतु राज्यकारभार करतांना पाळावयाची समता-दृष्टी ही चीज आज जास्त महत्त्वाची बनलेली आहे. आपल्यांतील कित्येक लोकांना राज्यकारभारांतील वशिलेबाजीची चांगलीच चुणुक अनुभवावयास वा पाहावयास मिळाली असेल. सत्तारूढ पक्षाच्या गोटांतील मंडळीला किफायतशीर होईल अशा पद्धतीने राज्य कारभार केला गेल्याचीं कित्येक प्रकरणें तुमच्या आढळांत आली असतील. मला स्वतःला अशीं कित्येक उदाहरणें आठवतात. अमुक एका वस्तूचा व्यापार, लायसेन्स (परवान्या) शिवाय कोणालाही करतां यायचा नाहीं असा समजा कायदा आहे. असा कायदा तत्वतः सर्वांना सारखाच लागूं असल्यानें त्याबद्दल कोणीहि तक्रार करणार नाही. त्यांत वशिलेबाजीचा मागमूसहि नाहीं. पण त्यापुढें जाऊन आपण त्या कायद्याच्या अंमलबजावणीची छाननी करूं या. समजा सदर कायद्यान्वयें लागणारे परवाने मागायला निरनिराळे लोक सरकारी अधिकाऱ्याकडे किंवा मंत्र्यांकडे जाऊं लागले आणि अशावेळी मंत्रीमहाशय जर त्या इच्छुकांच्या टोप्यांचा रंग न्याहाळून निर्णय घेऊं लागले व आपल्या पक्षाच्या छापाच्या टोपीवाल्याला लायसेन्स देऊं लागले, तर मग ती वशीलेबाजी होईल आणि कारभार विषयक समता राहणार नाहीं. अर्थात लायसेन्सचें हें प्रकरण लहानसे आहे आणि त्यांतील वशिलेबाजीचा परिणाम अगदींच थोड्या लोकांवर होतो. पण हीच वशिलेबाजी राज्यकारभारांत आणखी खोलवर घुसल्यास काय गहजब होईल ? एकाद्या पक्षांतील सभासदावर समजा कायदेशीर खटला करणें कायद्यान्वयें आवश्यक झालेलें आहे, सरकारी अधिकाऱ्यांजवळ तसा भरपूर पुरावा उपलब्ध झाला आहे, अशावेळीं जर त्या विभागांतील त्या पक्षाचा पुढारी जिल्हा अधिकाऱ्याला जाऊन भेटला, तो खटला काढून टाकण्याबद्दल सांगू लागला, व म्हणाला, " हें बघा, तुम्हीं जर आमचें एवढें काम केलें नाहीं, तर मंत्र्यांला सांगून तुमची दूर बदली करायला लावील." हें असें जर होऊं लागलें तर राज्यकारभार केवढा अन्यायकारक व गोंधळाचा होईल. कल्पनाच केलेली बरी ! अमेरिकेमध्यें ' स्पॉइल्स सिस्टिम् ' (Spoils system) नांवाची एक राज्यकारभार विषयक पद्धत पूर्वी होती. नवीन पक्ष सत्तेवर आला म्हणजे तो पूर्वीच्या सरकारनें नेमलेल्या कारकून शिपायासह सर्व नोकरांना कामावरून दूर करीत असे व आपल्या पुढ्यातील आणि निवडणुकींमध्यें आपल्या पक्षाला मदत केलेल्या लोकाची नेमणूक करीत असे. या पद्धतीमुळें अमेरिकेला कित्येक वर्षे चांगली कारभार यंत्रणा कधीं लाभलीच नाहीं. पुढें ही पद्धत लोकशाहीला पोषक नाहीं याची खात्री पटल्यावर त्यांनीं ती अव्हेरली. इंग्लंडमध्यें, राज्यकारभार निष्कलंक, निःपक्षपाती व राजकारणापासून अलिप्त राहावा म्हणून तेथील लोकांनी राजकीय व नागरिक अशी नोकऱ्यांची

विभागणी केली आहे. नागरिक (कारभार विषयक) नोकऱ्या कायम स्वरुपी असतात. त्यातील नोकरवर्ग कोणत्याहि पक्षाचें सरकार आलें तरी कारभार चालवितो आणि मंत्रिमंडळहि त्यांच्या कामाकाजात हस्तक्षेप करीत नाहीं. अशा प्रकारची पद्धत आपल्या देशांत ब्रिटिश लोक असतांना त्यांनीं अवलंबिली होती. मध्यवर्ती (भारत) सरकारचा मंत्री असतांना मला जो एक अनुभव आला त्याची आठवण ताजी आहे. प्रत्येक व्हॉईसरॉयच्या नांवाचा कोणता तरी रस्ता किंवा क्लब दिल्लीमध्यें आहे. फक्त लॉर्ड लिनलिथगो यानेंच स्वतःचें नांव कोणत्याहि स्थळाला किंवा संस्थेला देवविलें नाहीं. त्यांचा खाजगी चिटणीस माझा मित्र होता. त्यावेळीं मी बांधकाम (P. W. D.) खात्याचा मंत्री होतो व माझ्या अखत्यारींत पुष्कळ कामें चाललेलीं होतीं. तो मजकडे आला आणि म्हणाला, " डॉक्टरसाहेब, लॉर्ड लिनलिथगोंचें नांव कोणत्या तरी संस्थेला किंवा स्थळाला देण्याबाबत तुम्हीं कांहीं करु शकणार नाहीं काय ? बाकी सर्व व्हॉइसरॉयांची नांवें कोठें ना कोठें दिलेली आहेत. पण लॉर्ड लिनलिथगोंचेंच फक्त नाहीं " मी त्याला विचार करण्याबद्दल आश्वासन दिलें. दिल्ली शहरांत उन्हाळ्यांत पाण्याची कमतरता भासत असल्यानें तीं दूर करण्याच्या योजनेबद्दल मी त्यावेळीं विचार करीत होतो. माझा युरोपियन सेक्रेटरी श्री. प्रायर ह्यांस मी म्हटलें, " हें बघ, व्हॉइसरॉयच्या सेक्रेटरीनें मजजवळ अशी सूचना केली आहे. आपण या बाबतींत कांही करूं शकणार नाहीं काय ?" आणि त्यानें काय उत्तर दिलें ? तो म्हणाला, " साहेब, आपण अशी कोणतीहि गोष्ट करूं नये. " सध्याच्या परिस्थितींत या देशांत असें उत्तर मिळणें दुरापास्त आहे. मंत्र्याच्या मताविरुद्ध बोलणें आज कोणत्याहि सेक्रेटरीला शक्य नाहीं. कारण उघड आहे. ब्रिटिश आमदानीत आपण देखील ग्रेट-ब्रिटनसारखाच नियम करून टाकला होता कीं, कारभार विषयक कामांत सरकारनें हस्तक्षेप करूं नये. सरकारचें काम हें धोरण ठरविण्याचें आहे, हस्तक्षेप किंवा पक्षपात करण्याचें नाहीं. ही बाब मूलभूत स्वरुपाची असून तिच्यापासून आपण आज दूर जात आहोत, तिचा त्याग करीत आहोंत.

(४) **लोकशाहीचें यश हस्तगत करण्यासाठीं आवश्यक असलेली चौथी गोष्ट म्हणजे संविधानात्मक नीतींचें** (Constitutional Morality) **पालन होय.** पुष्कळ लोक आपल्या घटनेबद्दल (संविधानाबद्दल) अतिउत्साही दिसतात. माझें मात्र तसें नाहीं. उलट सध्याच्या भारतीय घटनेचें उच्चाटन करूं इच्छिणाऱ्या, कमींत कमी ती **संपूर्ण दुरुस्त करण्यासाठीं झटणाऱ्या मंडळींत सामील होण्यास मी तयार आहे.** आपण एक गोष्ट मात्र लक्षांत ठेवली पाहिजे कीं, **आपली आजची घटना ही कायदेशीर तरतुदींचा व तत्वांचा नुसता सांगाडा आहे.**

ह्या सांगाड्याला आवश्यक असलेलें रक्तमांस संविधानात्मक (घटनात्मक) नीतिमत्तेच्या पालनांतच मिळेल. इंग्लंडमध्यें ह्या घटनात्मक नीतीलाच घटनात्मक संकेत (Conventions of the Constitution) म्हणतात व लोक ते संकेत स्वखुशीनें पाळतात. याबाबतींत मला आठवणारे दोन प्रसंग हटकून येथें देत आहे. अमेरिकेंतील १३ घटक राज्यांनीं ज्या वेळीं बंड पुकारलें त्या वेळीं अमेरिकेची सूत्रें वॉशिंग्टनच्या हातीं होती. तो अमेरिकेचा ' नेता ' होता, हें विधान त्याचें त्या वेळचें अमेरिकेंतील समाज जीवनांतील स्थान परिपूर्णपणें वर्णू शकत नाहीं. अमेरिकन लोकांना तो प्रत्यक्ष देवच वाटत होता. अमेरिकेची घटना लिहून झाल्यावर वॉशिंग्टनला पहिला अध्यक्ष म्हणून निवडण्यांत आले. त्याची अध्यक्षीय मुदत संपल्यावर त्यानें दुसऱ्यांदा अध्यक्ष होण्यास नकार दिला. ही गोष्ट निःसंशय आहे कीं, वॉशिंग्टन दहा वेळां जरी सलगपणें अध्यक्षीय निवडणुकीस उभा राहिला असतां तरी त्याला कोणी प्रतिस्पर्धी बनला नसतां व लोकांनीं त्याला मोठ्या आनंदानें व एकमतानें निवडून दिलें असते. पण तो मात्र दुसऱ्यांदा उभा रहाण्यासहि तयार झाला नाहीं. त्याला कारण विचारलें असतां तो उत्तरला, " माझ्या प्रिय देशबंधूनों, ही घटना आपण ज्या हेतूनें बनविली, त्याचा तुम्हाला विसर पडलेला दिसतो. आपल्याला वंशपरत्वें चालणारी राजेशाहीं, वंशपरंपरेनें येणारा राजा किंवा हुकुमशहा नको होता म्हणूनच आपण ही घटना बनविली. इंग्लिश राजाशीं तुम्हीं या हेतूनेंच प्रेरित होऊनच संबंध तोडलें आहेत. मग माझी पूजा करून मला जर तुम्हीं वर्षानुवर्षे अध्यक्ष बनवूं लागलात तर तुमच्या तत्त्वाचे काय होईल ? इंग्लिश राजाच्या ठिकाणीं माझी स्थापना करून तुम्हीं असें म्हणूं शकाल काय कीं, इंग्लिश राजाच्या सत्तेविरुद्ध तुम्ही केलेला उठाव हा योग्य होता ? तसें तुम्हीं कोणत्या तोंडानें म्हणूं शकाल ? माझ्यावरील प्रेमामुळें व श्रद्धेमुळें तुम्हीं जरी मला दुसऱ्यांदा उभें राहाण्यांचा आग्रह करूं लागलात तरी तुमच्या या भावनाविवशतेला बळी न पडण्याचे काम, वंशपरंपरागत सत्ताशाहीचा बीमोड करण्याच्या तत्वज्ञानाचा उद्गाता म्हणून, मला कर्तव्य बुद्धीनें पार पाडावेच लागणार." तरी परंतु लोकाग्रहास्तव त्याला दुसऱ्यांदा अध्यक्ष व्हावें लागलें. पण जेव्हां तिसऱ्यांदाहि त्याला गळ घालण्यासाठीं लोक त्याच्याकडे गेले तेव्हां त्यानें त्यांना कठोरपणें झिडकारलें.

दुसरें एक उदाहरण मी देतो, आठव्या एडवर्डची कहाणी तुम्हाला माहीत असेल. गोलमेज परिषदेसाठीं मी लंडनला गेलो होतो. राजानें त्याला हव्या असलेल्यां स्त्रीशीं लग्न करावें कीं नाहीं, आणि त्यानें तसें लोकमताच्या व ठरलेल्या संकेताच्या विरूद्ध जाऊन लग्न केल्यास त्याला सिंहासनावर ठेवायचें कीं नाहीं

या प्रश्नावर त्या देशांत त्यावेळीं मोठें रण माजलें होतें. राजाला लग्नाच्या बाबतींतील हें एवढें वैयक्तिक स्वातंत्र्यहि द्यायचें कीं नाहीं ? हाहि प्रश्न उपस्थित झाला होता. मि. बाल्डवीन (त्यावेळेचे हुजूर पक्षीय पंतप्रधान) अर्थातच राजाच्या ह्या लग्नाविरुद्ध होते. तो राजाला म्हणत होता, "तूं जर माझे ऐकलें नाहींस, तर तुला राजपद सोडावें लागेल." मि. चर्चिल हे राजा एडवर्डचें मित्र होते व त्यांच्या पाठीशीं उभे रहाण्यास तयार होते. लेबर पार्टी (मजूर पक्ष) विरोधी पक्ष म्हणून त्यावेळी होता. मला पक्कें आठवतें कीं हुजूर पक्षांतील ह्या प्रश्नावरील फाटाफूटीचा फायदा उचलून बाल्डविनचा पराजय करायचा कीं नाहीं याबद्दल मजूर पक्षांत विचार चालू होता. कारण हुजूर पक्षांतील कित्येक सभासद राजनिष्ठेमुळें एडवर्डची बाजू घेण्यांस तयार होते. त्यावेळीं प्रोफेसर लास्की (मजूर पक्ष) 'हेराल्ड' या नियतकालिकांत लेखामागून लेख लिहून मजूर पक्षानें तसें करूं नये म्हणून बजावीत होते, अशा हालचालीचा निषेध करीत होते. ते म्हणत होते, " आपण घटनात्मक संकेतानें एक गोष्ट मान्य केली आहे कीं, पंतप्रधानाचा सल्ला राजा मानील; आणि त्यानें तसा तो न मानल्यास पंतप्रधान राजाला घालवून देऊं शकेल. हा असा आपला सर्वमान्य संकेत असल्यानें, ज्यायोगें राजाचें अधिकारक्षेत्र वाढेल अशी वर्तणूक करून या प्रश्नावर बाल्डविनचा पराजय करणें चुकीचें ठरेल." मजूर पक्षाने हा सल्ला मानला. संकेत खिलाडू वृत्तीनें पाळलेच पाहिजेत असें त्यांनीं ठरविलें. इंग्लंडचा इतिहास वाचताना अशीं कित्येक उदाहरणें तुम्हांला आढळतील कीं, जेथें **तात्पुरत्या सत्तेच्या विलोभनास बळी पडून पक्षनेत्यांनीं आपल्या विरोधकांस, मग ते सत्तेवर असोत किंवा विरोधीपक्ष म्हणून काम करीत असोत, कैचीत पकडण्याचे प्रसंग संविधानाची (घटनेची) व लोकशाहीची हानी होऊं नये म्हणून कटाक्षानें टाळलें आहेत.**

(५) लोकशाहीचा प्रयोग यशस्वी व्हावा म्हणून आणखी एका गोष्टीची आवश्यकता आहे असें मला वाटते, ती म्हणजे **लोकशाहीच्या नांवाखालीं अल्पसंख्याकांची (अल्पमतवाल्यांची) गळचेपी बहुमतवाल्यांकडून होता कामा नये. अल्पसंख्यकांना सुरक्षितता वाटली पाहिजे.** बहुसंख्यांक मंडळी कारभार करीत असली तरी आपल्याला इजा पोहोंचणार नाहीं, आपल्यावर अन्याय होणार नाही याची हमी अल्पसंख्यांकाना मिळाली पाहिजे. इंग्लंडमधील हाऊस ऑफ कॉमन्स (लोकसभे) मध्यें ह्या तत्वाचा मान फार राखला जातो. १९३१ सालच्या इंग्लंडमधील सार्वत्रिक निवडणुकानंतर मजूर पक्षाचे नेते श्री. रॅम्से मॅकडोनाल्ड यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय मंत्रिमंडळ तयार करण्यांत आलें. त्यानंतर निवडणुका आल्या त्यावेळीं मजूर पक्षाची सभासद संख्या १५० वरून ५० वर

घसरली. श्री. बाल्डविन हे पंतप्रधान बनले. मी त्यावेळी इंग्लंडमध्यें होतो. हुजूर पक्षाच्या प्रचंड बहुमताखालीं काम करणाऱ्या या अल्पसंख्य मजूर सदस्यांकडून भाषणाबद्दल, तहकुबीसुचनांबद्दल वा अन्य विरोध करण्याच्या पद्धतिबद्दल बहुमतवाल्या हुजूर पक्षांकडून कधीं गळचेपी किंवा अन्याय झाल्याची तक्रार मला ऐकायला मिळाली नाहीं. आपल्या लोकसभेचें उदाहरण घ्या. विरोधी पक्षांचे सभासद सदासर्वकाळ आणीत असलेले निंदाव्यंजक ठराव किंवा तहकुबी सुचना किंवा तत्सम प्रकार सर्वच मला मान्य आहेत असें नाहीं. सातत्यानें तहकुबी सुचना मांडीत बसणें हें कांहीं चांगलें लक्षण नाहीं. हें कांहीहि असें असलें तरीं एकादी सूचना ग्राह्य करून तिच्यावरील चर्चेस परवानगी दिल्याचें तुम्हाला क्वचितच ऐकायला मिळेल. ह्या गोष्टींबद्दल मला अचंबा वाटतो. इंग्लिश पार्लमेंटच्या कामकाजाच्या माझ्या वाचनांत तहकुबी सुचना अमान्य केल्याचें उदाहरण क्वचितच आलें असेल. मी मुंबई विधानसभेचा सदस्य असतांना श्री. मुरारजी देसाई, श्री. मुन्शी, श्री. खेर वगैरे मंडळी सत्तारूढ होती. त्यांनीं एक देखील तहकुबी सूचना चर्चेसाठीं येऊं दिली नाहीं. त्यावेळचे स्पीकर (अध्यक्ष) श्री. मावळणकर हे अशा सूचना स्वतः फेटाळून तरी लावायचे किंवा त्यांनीं कधीं काळीं परवानगी दिलीच तर मंत्री विरोध करायचे. मंत्र्यानें विरोध केल्यास, तहकुबी सूचना आणणाऱ्या सभासदाला ठराविक ३०/४० किंवा काय असेल तेवढ्या सभासदांचा पाठिंबा मिळवायचा असतो. **छोट्या अल्पसंख्य जमातींच्या ४/६ सभासदांच्या गटानें उपस्थित केलेल्या तहकुबी सुचनांना जर सरकारी पक्षाकडून सतत विरोध झाल्यास ह्या अल्पसंख्यांक लोकांना आपल्या दुःखांना वाचा फोडायला संधि मिळणार नाहीं. अशा परिस्थितींत ह्या अल्पसंख्यांकांत बेसनदशीर मार्ग अवलंबिण्याचे, क्रांतिकारक उठाव करण्याचे वारे मग निसर्गतःच शिरतें.** आणि म्हणूनच लोकशाही कारभारांत बहुमतवाल्यांकडून असें दडपशाहींचें वर्तन कदापि होता कामा नये.

(६) या संदर्भात आणखी एका मुद्याचें विवरण करणें जरूर आहे. माझ्या मतें राज्य व्यवस्थेसाठीं नीतिमान समाज व्यवस्थे (Moral order) ची अत्यावश्यकता आहे. या मुद्याबद्दल आपल्या राजकीय शास्त्रवेत्यांनीं कांहींच विचार केलेला आढळत नाहीं. **नीतिशास्त्र हें राजशास्त्राहून कांहींतरी अलग प्रकरण आहे असें मानण्यांत येतें.** त्याचा अन्योन्य कांहींच संबंध नाही असें समजलें जातें. **नीतिमत्तेशिवाय राजकारण करतां येतें या समजुतीनें राजकारणाचा अभ्यास करणाराला नीतिशास्त्राचा गंध नसला तरी चालेल असा प्रवाद आहे. माझ्या मतें हा प्रवाद महाभयंकर व गंभीर स्वरूपाचा आहे.** लोकशाहीत घडतें तरी काय ? लोकशाही म्हणजे स्वतंत्र सरकार असें

संबोधण्यात येतें. असें सरकार म्हणजे तरी काय ? स्वतंत्र सरकार म्हणजे ती राज्यपद्धति कीं, जिच्यामध्यें जास्तीत जास्त सामाजिक क्षेत्रांत लोकांना कायद्याच्या हस्तक्षेपाशिवाय मोकळेपणानें जीवन जगतां येतें, आणि जर कायदा करण्याची आवश्यकता वाटलीच तर तसला कायदा पाळला जाण्याइतपत सामाजिक नीति समाजामध्यें निर्माण झाली असल्याची खात्री कायदे करणारांना मिळाली पाहिजे. लोकशाहीच्या या अंगाबद्दल फक्त प्रोफेसर ' लास्की ' यांनींच उल्लेख केला आहे. त्यांच्या एका ग्रंथांत ते असें ठामपणें म्हणतात कीं, लोकशाही राज्यपद्धतीमध्यें समिष्टींतील नीतिमान जीवन गृहित धरलेले असतें. सामाजिक नीतीच्या अभावी लोकशाही यशस्वी होऊं शकत नाहीं, ती छिन्नविछिन्न होईल. आपल्या देशांत हा अनुभव आपल्याला मिळतो आहे.

(७) लोकशाहीच्या प्रस्थापनेंसाठी आवश्यक असलेली आणखी एक बाब म्हणजे विचारी (विवेकी) लोकमत (Public Conscience) होय. प्रत्येक देशांत अन्याय होत असतात याबद्दल शंका नाहीं; तरी परंतु तो सर्वत्र सारख्याच प्रमाणांत आहे असें मात्र नाहीं.

समाजांतील कांही लोकांना अन्यायाची अगदींच थोडी झळ बसतें; तर कांहींना अनन्वित छळ सोसावा लागतो, ते अन्यायाच्या ओझ्याखालीं दडपून गेलेले असतात.

या संदर्भात इंग्लंडमधील ज्यू लोकांचें उदाहरण देतां येईल. तेथील ख्रिश्चन लोकांनीं कधीं अनुभवला नाहीं असा एक आगळाच अन्याय त्याना भोगावा लागला, त्यामुळें ज्यू लोकांना या अन्यायाच्या विरूद्ध एकाकी लढा द्यावा लागला. इंग्लिश ख्रिश्चन लोकांनी त्यांना कधीं मदत केली नाहीं. उलट ज्यूवर होणाऱ्या अन्यायांत त्यांना आनंद वाटायचा. ज्यूंना मदत करणारी इंग्लंडमधील एकुलति एक व्यक्ति म्हणजे तेथील राजा. याचे कांहींना आश्चर्य वाटेल. पण त्याचे कारणही तसेंच गमतीचें आहे. जुन्या ख्रिश्चन कायद्याप्रमाणें ज्यू लोकांच्या वंशजांना ते ज्यू आहेत या कारणासाठीं म्हणून वाडवडिलांची प्राप्ति (इस्टेट) मिळत नसें. ती राजाची दौलत म्हणून सरकार जमा होत असें. यामुळें राजाला साहजिकपणेंच आनंद व्हायचा. मृत ज्यूंचीं मुलें ज्यावेळीं राजाकडे अशा इस्टेटीसाठीं अर्ज करायची, त्यावेळी राजा उदार होऊन त्यांना थोडासा हिस्सा देऊन बाकी सर्व स्वत:कडे ठेऊन घ्यायचा. अशा प्रकारचा अन्याय ज्यू लोकांवर होत असतांना देखील एकहि इंग्लिश माणुस, त्यांच्या मदतीला धावला नाहीं. हा सार्वजनिक विवेक बुद्धी (Public Conscience) जागृत नसल्याचा परिणाम होता. अन्याय कोणावरहि होत असो, अन्याय दिसला रे दिसला कीं,

जागृत होऊन उठणारी शक्ति म्हणजे समिष्टीची सद्सद्विवेक बुद्धी. सार्वजनिक विवेक बुद्धी याचा अर्थच असा कीं, जिच्या प्राग्दुर्भावामुळें समाजातील प्रत्येक माणूस, मग तो त्या अन्यायाचा बळी असो वा नसो, अन्यायाचें परिमार्जनार्थ पीडितांना साथ द्यायला उभा राहतो. अगदीं अलिकडचें उदाहरण द्यायचें झाल्यास दक्षिण आफ्रिकेकडे बोट दाखविता येईल. तेथें अन्यायाचे बळी पडणारे लोक हिंदी आहेत. तेथील गोऱ्या लोकांना त्यांची कांही झळ पोहचत नाहीं. असें असतांनाहि मि. स्कूट हा गोरा इसम सदर अन्यायाचें परिमार्जन करण्यासाठीं जिवाचें रान करीत असल्याचें आपण पाहातो. दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांच्या चळवळींत कित्येक गौरवर्णीय, तरूण तरुणी सामील होत आहेत. हें दृश्य कां दिसतें ? तें जनतेंतील सारासार विवेकबुद्धीचें फळ आहे. **मला तुम्हांला डिवचायचें नाहीं; परंतु मला पुष्कळ वेळा आपल्या विसराळूपणाचें नवल वाटतें. दक्षिण आफ्रिकेंतील अन्यायाबद्दल आपण मोठ्या आवेशानें बोलतो. आफ्रिकेंतील विभक्त (अलग) लोकवस्ती** (Segregation) **च्या धोरणा विरुद्ध बोलणारे आपण आपल्या देशांत जर दृष्टी टाकूं लागलों, तर प्रत्येक गावांत हें विभक्त वस्तींचें तत्वज्ञान कार्यवाही झालेलें आपणास दिसणार नाहीं काय ? आपल्या प्रत्येक खेड्यांत ' दक्षिण आफ्रिका ' अवतरली आहे.** असें असलें तरीं, विभक्त वस्तीत ठेवलेल्या अस्पृश्य (दलित) जातींचा प्रश्न हाताळण्यासाठीं व त्यांच्यावरील अन्यायाचा मुकाबला करण्यासाठी क्वचितच कोणीं पुढें आल्याचें दिसतें. हें असे कां होते ? कारण उघड आहे. सामाजिक विवेक बुद्धीचा अभाव ! असा प्रकार जर होऊं लागला आणि **अल्पसंख्यांकांवर होणाऱ्या अन्यायांचा मुकाबला करण्यासाठीं जर इतर लोक पुढें आले नाहीत तर मग पुन्हां क्रातींचें वारें अल्पसंख्यकांच्या डोक्यांत खेळूं लागते.**

वरील विवेचन म्हणजे निरनिराळ्या राजकीय तत्वांचीं ठोकळेबाज जंत्री नव्हें; परंतु निरनिराळ्या देशांचा राजकीय इतिहास वाचल्यामुळें माझ्या मनावर बिंबलेल्या गोष्टींची ती अनुभूति आहे.

आपल्याला स्वातंत्र्य मिळाले आहे. ब्रिटिश चालते झाले आहेत, लोकशाहीचा पुकारा करणारी राज्यघटना आपण केली आहे, तेव्हां आपल्याला या बाबतींत आणखी काय हवें आहे ? आपण आतां निश्चिंत बसूं या, असल्या प्रकारची भावना या देशांतील लोकांत बळावत आहे. **राज्यघटना तयार केली म्हणजे आपले काम संपले ह्या प्रकारच्या आत्मघातकी भावनेच्याबाबत मी सर्वांना धोक्याचा इषारा देऊं इच्छितो. आपलें काम आताशीं कुठें सुरूं झालें आहे.** आपण

ध्यानात ठेवलें पाहिजे कीं, लोकशाहीचा वृक्ष सर्वच ठिकाणी नीटपणें फोफावू शकतो असें नाहीं. तो अमेरिकेत वाढला आहे. इंग्लंडमध्यें त्याची वाढ झाली. कांही अंशानें त्यानें फ्रान्समध्येंहि मूळ धरलें आहे. इतरत्र घडलेल्या ह्या आशादायक घटनांपासूनच आपणास धीर येईल.

तुम्हाला आठवत असेल की, पहिल्या महायुद्धाचा परिणाम म्हणून आणि ऑस्ट्रिया-हंगेरीच्या साम्राज्याचे विघटन केल्यामुळे, स्वयंनिर्णयाच्या (Self determination) तत्त्वानुसार आस्ट्रियाहून अलग अशी छोटी छोटी राष्ट्रे विल्सननें निर्माण केली. त्यांना लोकशाही घटना, लोकशाही सरकार आणि इंग्लंड येथील लोकसत्ताप्रमाणें मूलभूत हक्कांची व्यवस्था करणारी राज्यघटना होती. त्या लोकशाहीचें काय झालें ? तिचा लवलेश तरी तुम्हांला तेथें दिसतो काय ? ती आता संपूर्ण लुप्त पावली आहे, नष्ट झाली आहे. ही सर्व राष्ट्रें आज दुसऱ्या कुणाच्या तरी गुलामगिरींत किंवा मगरमिठींत सापडलेली आहेत.

अलिकडची कांही उदाहरणें घेऊं या. सिरियामध्यें लोकशाहीनिष्ठ सरकार होतें. कांही वर्षानंतर तेथें एक लष्करी बंड झालें, लष्कराचा सरसेनापति सीरियाचा राज्यप्रमुख बनला व लोकशाही हवेंत विरली. दुसरें उदाहरण घेऊं या. इंजिप्त मध्यें काय घडलें ? तेथें देखील लोकशाही राज्यपद्धति १९२२ सालापासून सतत तीस वर्षें अंमलांत होती. एकारात्रींत फारुकची हकालपट्टी झाली, नागिब हुकुमशहा बनला. त्यानें घटना बरखास्त केली.

हीं सर्व उदाहरणें आपल्यासमोर असल्यानें आपण आपल्या भविष्याबद्दल अत्यंत जागरूक व विचारी बनलें पाहिजे. लोकशाही सुरक्षित करण्यासाठीं तिच्या मार्गातील दगड धोंडे दूर करण्याकरतां आपण कांहीं निश्चित पावलें उचलायची कीं नाहीं याचा आपण विचार करावयास हवा.

मी केलेल्या या सर्व विवेचनामुळें, तुम्हीं सर्वजण ह्या प्रश्नांबाबत डोळेझाक करणार नाहीं, एवढे झालें तरी मला समाधान लाभेल.

[३] संसदीय राज्यपद्धतीत विरोधीपक्षाची आवश्यकता कां असते ?

सृजनशील लोकमताच्या अभावामुळें लोकशाहीं राबविण्यांत अडचणी येतात. सरकार व कायदेमंडळाचे कामकाज योग्य रीतीनें होण्यासाठीं लोकमत ओळखता आलें पाहिजे.

हा मुद्दा स्पष्ट करण्यासाठीं शिक्षण व प्रचार यांतील फरक सांगणें जरूर आहे. प्रचाराधिष्ठित सरकार व लोकशिक्षणाचा पाया करणारे सरकार यांत

महद्अंतर आहे. प्रचार म्हणजे कोणत्याहि गोष्टीची एक बाजू होय. लोकशिक्षणावर आधारलेलें सरकार म्हणजे प्रत्येक प्रश्नाच्या दोन्ही बाजूंची सांगोपांग छाननी करून कारभार करणारे सरकार होय. ज्या प्रश्नावर कायदे मंडळांना निर्णय घ्यायचा असतो, त्या प्रश्नाच्या दोन्ही बाजू लोकांपुढें जाणें जरूर आहे. त्यासाठीं ओघानेंच दोन पक्षांची आवश्यकता असते. एकच पक्ष दोन्ही बाजू निसर्गतःच मांडू शकत नाही. एकपक्षीय कारभार म्हणजे निव्वळ हुकुमशाही होय. हुकुमशाही टाळण्यासाठीं दुसऱ्या पक्षाची जरूर आहे. ही मुलभूत बाब आहे. चांगल्या कायद्यापेक्षां चांगल्या राज्य-कारभाराशी लोकांना कर्तव्य असते. कायदे चांगले असतीलहि, पण त्यांची अंमलबजावणी वाईट तऱ्हेने होऊं शकते.

राज्य कारभार चांगला किंवा वाईट आहे हें अंमलबजावणीसाठीं नेमलेल्या अधिकाऱ्याला कितपत स्वातंत्र्य आहे यावर अवलंबून आहे. ज्यावेळी एकच पक्ष असतो त्यावेळी कोणतांहि अधिकारी मंत्रि या नांवाने ओळखल्या जाणाऱ्या त्याच्या राजकीय नेत्याच्या मर्जीप्रमाणें वागणारा प्राणी बनतो. मंत्र्यांचें अस्तित्व मतदारांवर अवलंबून असते, व मग मतदारांना खूष ठेवण्यासाठीं पुष्कळ वेळा मंत्रिमहाशयांकडून विचित्र (चुकीचा) असा कारभार अधिकाऱ्यांकडून करवून घेतला जातो. विरोधी पक्ष असला तर मंत्र्यांची हीं चुकीची कृत्ये तो उघडकीस आणू शकेल. आणि त्यामुळें अशा गोष्टींना पायबंद बसेल.

चांगल्या कारभाराखालील लोकांना भाषण स्वातंत्र्य व विनाचौकशी तुरुंगवासापासून मुक्तता या गोष्टींची आवश्यकता वाटते. विरोधी पक्ष असतो त्यावेळी भाषण स्वातंत्र्य व आचार स्वातंत्र्य यांचा लाभ होतो. विरोधीपक्ष नसल्यावर लोकांचे हे मूलभूत हक्क धोक्यांत येतात. कारण मग ह्या हक्कांची पायमल्ली करणाऱ्या सत्तारूढ पक्षाला कोणीच जाब विचारूं शकत नाहीं.

विरोधीपक्षाची गरज कां आहे याची हीं थोडक्यांत कारणें आहेत. जेथे जेथें संसदीय लोकशाही राज्यपद्धति (Parliamentary Government) आहे, त्या त्या देशांत विरोधीपक्ष ही सरकारमान्य राजकीय संस्था (Recognised Political Institution) असतें.

इंग्लंड व कॅनडामध्यें विरोधीपक्ष ही कायद्यानें मान्य केलेलीं संस्था आहे. आणि पार्लमेन्ट (कायदेमंडळ) मधील कामें बिनधोक पार पाडता यावीत म्हणून विरोधी पक्ष–नेत्याला सरकारी तिजोरीतून पगार दिला जातो.

[४] पक्ष म्हणजे काय ?

पक्ष हा सैन्यासारखा असतो, त्याला खालील बाबींची आवश्यकता असतें.

(१) सरसेनापतीसारखा पुढारी (नेता),

(२) संघटना, तींत

(अ) सभासद,

(ब) मूलभूत योजना,

(क) शिस्त, या गोष्टींचा समावेश होतो.

(३) ध्येय आणि धोरण, तत्वज्ञान.

(४) कार्यक्रम.

(५) राजकीय डावपेंच व मुत्सद्देगिरी [म्हणजेच ध्येयसिद्धीसाठीं, तारतम्यानें कोणती गोष्ट, केव्हां व कशी करायची याची योजना]

सोप्या भाषेंत सांगायचें झाल्यास, विशिष्ट ध्येयवादानें प्रेरित होऊन मतदारांनीं केलेली संघटना म्हणजे पक्ष होय.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (भारतीय लोकसत्ताक पक्ष) ह्या संस्थेस पक्षाला मान्य असलेल्या तत्वज्ञानाच्या व उद्दिष्टांच्या पुर्तिसाठीं मतदारांची (जनतेची) संघटना करावी लागेल. ही पक्ष संघटना पुढील प्रमाणें काम करील :—

(१) पक्ष स्थापनेसाठीं व त्याच्या संघटीत वाढीसाठी झटणें; आणि पक्षाचे तत्वज्ञान व ध्येयधोरण यांचा प्रचार करणें ;

(२) पक्षाची तत्वें, विचारसरणी यांचा प्रचार, वृत्तपत्रे, सभा-संमेलनें, व्याख्यानें, वाङ्मय-लेखन इत्यादि मार्गानें करणें;

(३) पक्ष सभासदांच्या वतीनें संयुक्त राजकीय चळवळी व राजकीय कृति करण्यासाठीं निवडणुका लढविणें.

[५] ' रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया '——ध्येय व उद्दिष्टें

(१) भारतीय घटनेचा उपोद्‌घात (Preamble) पुढीलप्रमाणें आहे——

'' आम्हीं भारतांतील लोक प्रतिज्ञापूर्वक असें ठरवितो कीं, भारत हें स्वतंत्र, सार्वभौम, लोकसत्ताक राष्ट्र राहील आणि त्यांतील सर्व नागरिकांना——सामाजिक, आर्थिक, व राजकीय न्याय; विचार, भाषण, मत आणि धार्मिक स्वातंत्र्य; संधि व सामाजिक प्रतिष्ठा या बाबत समता; व्यक्तिस्वातंत्र्य व राष्ट्रैक्य साधणारा बंधुभाव; या गोष्टी मिळवून देण्यासाठीं झटूं. ''

भारतीय घटनेच्या ह्या उपोद्घातांमधील ध्येय व उद्दिष्टें [न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुत्व] साध्य करणें हेंच रिपब्लिकन पक्षाचें ध्येय व उद्दिष्ट राहील.

हीं उद्दिष्टें साध्य करण्यासाठीं रिपब्लिकन पक्ष सार्वजनिक व्यवहारांत खालील तत्वांना बांधलेला राहील,

(१) सर्व भारतीयांना समान न्याय मिळेल; एवढेंच नव्हे तर समान न्याय हा प्रत्येक भारतीयाचा हक्क आहे असें मानण्यांत येईल. आणि यानुसार जेथें समता नाहीं तेथें ती आणण्यासाठीं पक्ष झटेल व जेथें ती नाकारण्यांत येते, तेथें, ती राबविण्यासाठीं लढा देईल.

(२) प्रत्येक व्यक्तीचें सुख हा केंद्रबिंदु समजण्यांत येईल आणि आपल्या उद्धारास्तव प्रयत्न करण्याची प्रत्येक व्यक्तीस समानसंधी मिळेल. शासनसंस्था (State) ही, हें साध्य मिळविण्यासाठीं वापरावयाचें साधन होय.

(३) इतर देशबांधवांच्या हक्कांचें व शासनसंस्थेच्या आवश्यक तेवढ्या अधिकारांचें संरक्षण करून प्रत्येक नागरीकांस धार्मिक, आर्थिक, राजकीय स्वातंत्र्य असलें पाहिजे असें हा पक्ष मानील.

(४) प्रत्येक भारतीय नागरिकांस समान संधीचा अधिकार असल्याचें हा पक्ष मान्य करील. अर्थात, ज्यांना आत्मोन्नतीसाठीं कधींच संधी मिळाली नसेल त्यांना संधी मिळालेल्या लोकांपेक्षां अग्रक्रम देण्याचें तत्व पक्ष अंगिकारील.

(५) प्रत्येक व्यक्तीस जीवनांतील गरजा व भीति यापासून मुक्ति मिळवून देण्याच्या शासन संस्थेच्या कर्तव्याची जाणीव सरकारला हा पक्ष सातत्यानें देईल.

(६) हा पक्ष स्वातंत्र्य, समता व बंधुत्व यांच्या प्रस्थापनेसाठीं आग्रह धरील आणि एका माणसाकडून दुसऱ्या माणसाची, एका वर्गाकडून दुसऱ्या वर्गाची, किंवा एका राष्ट्राची दुसऱ्या राष्ट्राकडून होणारी पिळवणूक व दडपशाही यांना पायबंद घालील.

(७) व्यक्ति व समाज या दोहोंच्या भल्याच्या दृष्टीनें संसदिय राज्यपद्धति (Parliamentary System of Government) ही सर्वोत्तम राज्यपद्धति आहे अशी या पक्षाची श्रद्धा राहील.

११५

' बुद्ध अँड हिज धम्म '
तीन पैकी एक ग्रंथ

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यानी दिनांक १५ मार्च १९५६ रोजी ' बुद्ध अँड हिज धम्म ' या ग्रंथाकरिता प्रस्तावना लिहिली. या प्रस्तावनेप्रमाणे ' बुद्ध अँड हिज धम्म ' हा ग्रंथ (१) बुद्ध अँड कार्ल मार्क्स आणि (२) रिव्होल्यूशन अँड काँऊटर रिव्होल्यूशन इन एन्शट इंडिया या ग्रंथाशिवाय परिपूर्ण होत नाही असे स्पष्टपणे नमूद केलेले आहे, ते खालील प्रमाणे––संपादक.

I may mention that this is one of the three books which form a group for the proper understanding of Buddhism. The other two books are (1) Buddha and Karl Marx and (2) Revolution and Counter Revolution in Ancient India. They are written out in parts. I hope to publish them soon.

15th March 1956. B R Ambedkar

I may mention that this is one of the three books which will form a group for the proper understanding of Buddhism. The other two books are (1) Buddha and Karl Marx and (2) Revolution and Counter Revolution in ancient India. They are written out in parts. I hope to publish them soon.

15th March 1956. (Sd.) B. R. AMBEDKAR

मी नमूद करु इच्छितो की बुद्ध धम्माचे योग्यरित्या आकलन होणाऱ्या तीन ग्रंथांच्या संचातील प्रस्तुतचा एक आहे. अन्य दोन ग्रंथ आहेत (१) ' बुद्ध आणि कार्ल मार्क्स ' आणि (२) प्राचीन भारतातील क्रांती आणि प्रतिक्रांती ते विभागशः लिहिलेले आहेत. ते लवकरच प्रकाशित करण्याची माझी इच्छा आहे.

दिनांक १५ मार्च १९५६ (सही) बी. आर. आंबेडकर [१]

---

[१] Rattu Nanakchand, Last few days of Dr. Ambedkar P. 197.

११६

ट्रेनिंग स्कूल फॉर एन्ट्रन्स टू पॉलिटिक्स

भारतीय संविधानाने अंगिकारलेल्या संसदीय प्रणालीतील केन्द्रीय आणि प्रांतीय कायदेमंडळातील प्रतिनिधींचे व्यक्तिमत्व शील आणि प्रज्ञायुक्त असावे अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची मनोमन इच्छा होती. या संदर्भात २३ नोव्हेंबर १९५० रोजी त्यांनी संसदेत केलेल्या भाषणात आपले विचार व्यक्त केले आहेत. *

उत्कृष्ट संसदपटू होण्यासाठी आवश्यक असणाऱ्या गुणांची या क्षेत्रात कार्य करणाऱ्या नेतृत्वात निर्मिती होण्याच्या उद्देशाने त्यांनी मुंबई येथे ' ट्रेनिंग स्कूल फॉर एन्ट्रन्स टू पॉलिटिक्स ' सुरु केले. या संस्थेचे संचालक स्वत: डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणी शां. शं. रेगे हे रजिस्ट्रार होते. या संबंधीची माहीती खालील प्रमाणे आहे--संपादक.

" देशातील लोकशाहीविषयक विचाराला आणि कार्याला परिणामकारक चालना मिळावी, त्याचप्रमाणे आपल्या नियोजित रिपब्लिकन पक्षामध्ये तरुणांची भरती होत राहावी ह्या हेतूने राजकारणात प्रत्यक्ष भाग घेऊ इच्छिणाऱ्या लोकांसाठी मुंबई येथे एक प्रशिक्षण विद्यालय (ट्रेनिंग स्कूल) सुरू करावे असे डॉ. आंबेडकरांनी ठरविले. ग्रंथपाल शां. शं. रेगे यांच्या सहाय्याने ते प्रशिक्षण विद्यालय स्थापण्यासंबंधी ते खटपट करीत होते. जे विधिमंडळात कामकाज करण्याची महत्त्वाकांक्षा बाळगतात त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था या प्रशिक्षण विद्यालयात करावयाची होती. त्या प्रशिक्षण विद्यालयाच्या मुख्याध्यापकाच्या जागेसाठी त्यांना लायक व्यक्ती पाहिजे होती. शिक्षक होऊ इच्छिणारा मनुष्य आपल्या विषयात प्रवीण पाहिजे. त्याला उत्तम रीतीने व्याख्यान देता आले पाहिजे. त्याचे व्यक्तिमत्व आकर्षक पाहिजे. विद्यालयाचा लौकिक शिक्षकांच्या कर्तृत्वावर आणि वक्तृत्वाच्या सामर्थ्यावर बराच अवलंबून असतो, असे त्यांनी रेग्यांना लिहिले. १ जुलै १९५६ ते मार्च १९५७ पर्यंत शां. शं. रेगे यांच्या देखरेखीखाली ते प्रशिक्षण विद्यालय चालले. त्याचे संस्थापक आणि चालक डॉ. आंबेडकर यांना त्या

---

* Dr. Babasaheb Ambedkar Writings and Speeches, Vol. 15, P. p. 188-192.

विद्यालयाला भेट देण्याचा योग आला नाही हे दुर्दैव. ते प्रशिक्षण विद्यालय त्यांच्या मृत्यूनंतर पोरके होऊन बंद पडले. ते विद्यालय अत्यंत उपयुक्त ठरले असते. राज्यकारभाराला योग्य वळण लावण्यासाठी जाणत्या नि लायक, तज्ज्ञ नि कर्तृत्ववान आमदारांचा नि खासदारांचा विधिमंडळांना नि लोकसभेला पुरवठा झाला असता !''[1]

'' संसदीय संस्थेमध्ये सभागृहाला आपल्या सौम्य अथवा तीक्ष्ण तर्कशुद्ध आणि माहितीपूर्ण भाषणाने जो सभासद भारून टाकू शकतो तोच सभासद यशस्वी होऊ शकतो. '' संसदीय वक्तृत्वाबद्दल बाबासाहेबांनी काढलेले हे उद्‌गार त्यांनी आपल्या संसदीय कारकीर्दीमध्ये सार्थ करून दाखविले. कोणत्याही संसदीय संस्थेत निवडून गेलेला प्रतिनिधी हा कार्यक्षम असला पाहिजे. लोकांना जे प्रश्न भेडसावतात ते सोडविण्याचे सामर्थ्य आणि विचारशक्ती ह्याची त्याने प्राप्ती केली पाहिजे. डॉ. आंबेडकरांनी ह्या जाणिवेने आपल्या जीवनाच्या अखेरच्या पर्वात मुंबईत जुलै १९५६ पासून संसदीय शिक्षण देणारी एक आदर्श संस्था ' ट्रेनिंग स्कूल फॉर एन्ट्रन्स टू पॉलिटिक्स ' स्थापन केली होती. त्यात राजकारण, अर्थशास्त्र, अंदाजपत्रक, कामगार संघटना, संसदीय कामकाजविषयक नियम आणि परंपरा इत्यादी आवश्यक विषयांबरोबर वक्तृत्वसाधनेला प्राधान्य दिले होते. खुद्द बाबासाहेब ह्या संस्थेचे संचालक होते. डिसेंबर १९५६ मध्ये वक्तृत्वावर व्याख्याने देण्याचे त्यांनी निश्चित केले होते. दुर्दैवाने त्यांच्या अकस्मात परिनिर्वाणाने एका प्रभावी वक्त्याच्या मार्गदर्शनाला ही संस्था आणि तिचे उत्सुक विद्यार्थी मुकले. ''[2]

१ : कीर, पृ. ५११, ५१२.

२ : रेगे, पृ. ८०-८१.

११७

परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या क्रांतीचे दिशादर्शक सूत्रे

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ग्रंथालयातील घोषवाक्य--

'' (१) शब्दात शहाणपण,
विचारात निष्ठा,
वर्तनात चारित्र्य
असेल तर भारत महान बनू शकेल.

(२) तुला जर मनुष्य बनावयाचे असेल तर
स्वतःच स्वतःशी कठोर शिस्तीने वागले पाहिजे.

(३) सत्य हे सत्य म्हणूनच ओळखा
व असत्य हे असत्य म्हणूनच ओळखा.

(४) धर्म मनुष्या करता आहे, मनुष्य धर्माकरता नाही. ''[१]

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या ग्रंथात उद्धृत केलेल्या मूळ इंग्रजी वचनांचे मराठी भाषांतर--

'' (१) तुम्ही किती अंतर तोडुन पुढे गेला हे कमी महत्वाचे आहे.
तुम्ही अचूक दिशेने गेला काय हे अधिक महत्वाचे आहे.

--टॉलस्टाय

(२) तुम्ही आमचे मालक बनावे हे तुमच्या हिताचे असेल.
परंतु आम्ही तुमचे गुलाम बनावे हे आमच्या हिताचे कसे होऊ शकेल ?

--थुसिडायस

(३) जो कोणी युक्तिवाद करीत नाही, तो केवळ हट्टी आहे.
जो कोणी युक्तिवाद करू शकत नाही, तो मुर्ख आहे,
जो कोणी युक्तिवाद करण्याचे धैर्य करीत नाही, तो गुलाम आहे.

--ड्रमंड ''[२]

---

[१] समग्र आंबेडकर चरित्र--बी. सी कांबळे, खंड १० वा पृष्ठ १७-१८

[२] समग्र आंबेडकर चरित्र--बी. सी कांबळे, खंड ३ रा.

परिशिष्टे

परिशिष्ट-१

बॅ. जयकर यांचे भाषण

हिंदी राष्ट्रीय सामाजिक परिषदेचे अध्यक्ष या नात्यानें बॅ. जयकर यांनीं केलेल्या भाषणाचा गोषवारा खाली दिला आहे.

सुधारणेचा इतिहास

सामाजिक सुधारणेची चळवळ करणें हें एका काळीं फार कठीण काम होतें. तिच्यात भाग घेणारांस पुराणमतवादी लोकांचा छळ व उपहास सहन करावा लागे. राष्ट्रीय सभेचा मंडप सामाजिक परिषदेसाठीं मिळणेंही तेव्हां दुष्कर होतें. पण तो काळ आतां राहिला नाहीं. राजकीय सुधारणा आधी कीं समाजसुधारणा आधीं हा वाद आता मागें पडला आहे; व दोन्ही सुधारणा एकसमयावच्छेदेकरून झाल्या पाहिजेत हें तत्व सर्वांना पटलें आहे.

पूर्वी व आतां

आद्य सुधारकांचे सुधारणेचे प्रयत्न मूलगामी नव्हते. स्त्रियांचा पुनर्विवाह, हुंडा, शिक्षण वगैरे प्रश्नांपलीकडे त्यांची नजर गेली नाहीं. पण हल्ली जी सुधारणेची चळवळ चालू आहे तिची व्याप्ती फार मोठी आहे. सामाजिक व्यवहारांत आमूलाग्र क्रांति घडवून आणणें हें तिचें ध्येय आहे. अस्पृश्य व ब्राह्मणेतर यांच्या चळवळींकडे पाहिल्यास ही गोष्ट ध्यानांत येईल. हे वर्ग सामाजिक समतेसाठीं झगडत आहेत. समतेला मारक अशीं जीं जीं धार्मिक नियमनें आहेत, त्यांच्याविरुद्ध या चळवळींचा मोर्चा आहे.

राजकीय हक्क व सामाजिक समता

आणि राजकीय प्रगतीमुळें सामाजिक समतेची ही चळवळ आजच्या स्वरूपाला पोचली आहे. प्रातिनिधिक संस्थांचा प्रवेश हिंदुस्थानांत झाल्यामुळें व्यक्तींचा दर्जा वाढला, व त्यामुळेंच सामाजिक समतेची मागणी सुरू झाली. जातिभेदाचीं बंधनें असह्य होणें हेंही अर्थातच अपरिहार्य झालें. जातीभेदाची उत्पत्ती व प्राचीन कालीं त्यांची उपयुक्तता काय होत असेल ती असो. पण आज जातीभेद हा आपल्या राजकीय प्रगतीच्या मार्गात एक विघ्न होऊन बसला आहे. जातीनीं परस्परांशीं ममतेनें वागावें या म्हणण्याला आतां कोणी किंमत

देत नसून जातीभेद पूर्णपणें नष्ट झाला पाहिजे व व्यक्तीसमता प्रस्थापित झाली पाहिजे हें मत जारी आहे. सामाजिक समतेसाठी सत्याग्रह सुद्धां करण्याची तयारी शुद्रातिशुद्र मानलेल्या समाजांत दिसून येत आहे.. शुद्धीसंघटणाच्या चळवळींचा या दिशेनें इष्ट परिणाम होत आहे. या चळवळी जरी पुराणमतवादी लोकांनीं चालविलेल्या असल्या तरी त्यांचा परिणाम नवमतांना चालना देण्याकडेच होत आहे.

सरकार व समाज सुधारणा

लोकांच्या सामाजिक दृष्टीकोणात अशा प्रकारें क्रांती होत असतां हे सरकार मात्र जुन्याला चिकटून बसलें आहे. सामाजिक सुधारणेंसाठीं कायदे केल्यानें लोकमत खवळेल हा सरकारचा सनातन आक्षेप आहे. पण हा आक्षेप केवळ अप्रामाणिकपणाचा आहे. कारण लोकमत ज्यांयोगें खवळेल असे अनेक कायदे याच सरकारनें पास केले आहेत. पण ते केव्हां ? सरकार अडचणींत असेल तेव्हां ! सामाजिक सुधारणेचे प्रश्न कौन्सिलपुढे आले असतां मात्र हें सरकार तटस्थ रहाते. ज्यांबद्दल लोकांत विशेष मतभेद नाहीं अशा कायद्यांना सुद्धां सरकारनें कधीही मनापासून पाठिंबा दिला नाहीं असा अनुभव आहे. इतर देशांत सामाजिक सुधारणा सरकारी कायद्यानेंच घडून येत असते. पण या देशांतील सरकार या बाबतींत शुद्ध सोंवळें आहे. आपण परकी आहों या भावनेनें ते वागत असतें. त्याच्या मनांतील परकेपणामुळे जनता व सरकार यांमधील दुजाभाव जास्तच दृढ होत आहे; व सरकारच्या दृष्टीनें ते घातुक आहे.

स्त्रियांची चळवळ

प्राचीनकालीं आपल्यांत स्त्रियांचा दर्जा मोठा होता त्यांना स्वातंत्र्य होतें. तेव्हां बालविवाहपद्धती नव्हती. अविवाहित रहाण्याचें मनांत असल्यास स्त्रियांना तसे रहातां येत असे. त्यांना आर्थिक हक्कही बरेच होते स्वतः इस्टेट कमावण्यास त्यांना आडकाठी नव्हती वडिलार्जित इस्टेटीवर मुलीचा हक्क असे. पण कालांतराने ही परिस्थिति नष्ट होऊन स्त्रिया पुरुषांच्या गुलाम बनल्या. त्यांचे धार्मिक हक्क नाहीसे झाले. इस्टेटीवरचा त्यांचा हक्क पूर्णपणें उडविण्यांत आला. बालविवाहाच्या पद्धतीमुळें तर स्त्रियांचा शारीरिक व मानसिकदृष्ट्या भयंकर ऱ्हास झाला. या सर्व रूढींविरूद्ध स्त्रिया हल्ली चळवळ करूं लागल्या आहेत. विधवेला नवऱ्याच्या इस्टेटीचा वारसा मिळावा, मुलीला पित्याची इस्टेट मिळावी, मुलीच्या विवाहाच्या वेळेची वयोमर्यादा १६ वर्षापर्यंत वाढवावी घटस्फोट रूढ व्हावा या स्त्रियांच्या मागण्या आहेत. तसेंच वराची निवड

करतांना त्याची निवड करण्याचें क्षेत्र सध्याहून विस्तृत कां असूं नये असा आजच्या काळांतील स्त्रिया सवाल करीत आहेत. सध्याची वरपरिक्षणाची पद्धति दोषार्ह आहे. विशेषतः ज्या समाजाचे क्षेत्र लहान आहे, ज्या समाजांतील माणसें फार थोडी आहेत अशा समाजांतील स्त्रियांची फार कुंचबणा होत असते. उदाहरणार्थ, मुंबईचा पाठारे प्रभु समाज घ्या, या समाजांतील स्त्रीपुरुषांचे प्रमाण जवळ जवळ सारखेच आहे. त्यांची संख्या चार ते पांच हजारांच्या आंत आहे. एवढेंच हे लहान क्षेत्र असल्यामुळें या समाजांतील मुलींस जवळच्या नातलगाशीं लग्नें करावी लागतात ! याचा परिणाम ती जाती खालावण्यात होते. यामुळें सध्यां आपल्या विवाहसंस्थेत सुधारणा करण्याची आवश्यकता फार मोठ्या प्रमाणांत भासूं लागली आहे व ज्यांच्या चालीरिती, संवई वगैरे समान आहेत अशा स्वतःच्या जातीबाहेरील मुलींशीं किंवा मुलांशीं विवाह करण्याची मोकळीक असावी या प्रकारची सवलत मिळणें जरूर आहे व तद्नुसार लग्नाचे कायदे बदलविण्यांत आले पाहिजेत. मुंबई हायकोर्टातील एक माजी जज्ज ना. शहा यांनीं एका खटल्यांत उच्च ज़ातीच्या पुरुषाचे कनिष्ट जातींतील स्त्रीशीं लग्न झाल्याने मुंबई इलाख्यांत कायदेशीर मानण्यांत यावें असा निकाल देऊन या सुधारणेस उचलून धरले आहे. परंतु स्त्री समाजाचें समाधान एवढ्यानेंच झालेले नाहीं. प्रतिलोम पद्धतिची लग्नें, कायदेशीर मानण्यांत यावी. स्त्रियांचे एवढेंच मागणें आहे कीं, आपल्या मर्जीप्रमाणें वराची निवड करण्याचा आपणांस अधिकार असावा, त्यावेळी जातीगोताचा आकुंचित प्रश्न आपल्या आड येऊ नये.

बहिष्कृत भारत, ता. ४ जानेवारी १९२९.

परिशिष्ट-२

कोंकण प्रांतिक पूर्वास्पृश्य शिक्षण परिषद, मालवण

कोंकण प्रांतातील सर्व पूर्वास्पृश्यांची परिषद उन्हाळ्याच्या सुटींत सुप्रसिद्ध पुढारी डॉ. आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली भरणार आहे. तरी सर्व पूर्वास्पृश्य बंधु भगिनींनी स्वागत मंडळाचे सभासद घेवून परिषद यशस्वी करण्याचे कामीं मदत करावी अशी त्यांना नम्र विनंती आहे.

स्वागत मंडळ

अध्यक्ष :—डॉ. राजाराम केशवराव गवंडे, मालवण.

उपाध्यक्ष :—श्री. गंगाधर कृष्णाजी राऊळ, नामदेव दास वेरलकर, वेरली ता. मालवण, सावळा गेनूजी येडगावकर (कलल हवालदार,) मुकुंद धाकू चव्हाण लो. बो. मेंबर ता. मालवण, भागुजी गंगाराम पोइपकर मु. पोइप.

ऑ. सेक्रेटरी :—लक्ष्मण सगुण चव्हाण.

अ. सेक्रेटरीज :—श्री. भिवा सोमा जाधव, कणकवली ता. देवगड, गोविंद येसू मालवणकर नांदगाव ता. देवगड, शंकर लक्ष्मण भिलवडकर पुरळ ता. देवगड, कृष्णा धाकू चव्हाण परुळे पेठा वेंगुर्ले.

खजिनदार :—कृष्णा बाबाजी चव्हाण.

अ. खजिनदार :—खापरनाईक बाबू जाधव, कांदळगांव ता. मालवण.

ता. क.—सर्व पत्र व्यवहार सेक्रेटरीच्या नांवें करावा.

परिषदेची नक्की तारीख मागाहून कळविण्यांत येईल.

• • •

बहिष्कृत भारत, ता. ४ जानेवारी १९२९.

परिशिष्ट-३

अखिल हिंदुस्थानांतील अस्पृश्य व त्यांचे पुढारी डॉ. आंबेडकर यांस, खिस्त जयंतीचा संदेश

(श्री. प्रभाकर ना. उबाळें यांजकडून)

बंधुजनहो, आज आपल्या समाजाची होत असलेली दुर्दशा पाहून आमच्या अंतःकरणाला अतिशय खेद होत आहे, व त्यामुळेंच खिस्त जयन्तीचा हा संदेश आपल्याकडे पाठवीत आहो. या संदेशाच्या योगें आमचें आध्यात्मिक कल्याण झालें आहे असें आम्हांस खात्रीपूर्वक वाटतें, व तसेंच तें तुमचेंही होईल यांत आम्हांला मुळींच शंका वाटत नाहीं. निर्विकार मनानें, खुल्या अंतःकरणानें व दुराग्रह सोडून, व तुमच्या सर्व समाजाची हलाखीची परिस्थिती लक्षांत आणून तुम्हीं या संदेशाचा विचार कराल अशी आशा आहे.

धर्म हा तुमचा आवडता विषय असल्यामुळे त्याजकडे तुमची ओढ असणें साहजिक आहे. आणि तशी ती आहे म्हणूनच आज हिंदूधर्मीय लोकांपाशीं धार्मिक व सामाजिक हक्कांची मागणी तुम्हीं करीत आहां. पण तुम्ही त्यांच्याकडे जे हक्क मागत आहां ते तुम्हाला देण्यास त्यांची तयारी नाहीं. याचें कारण तुम्ही धर्मानें हिंदु नाहींत. तुम्ही हिंदु असतां तर त्यांनीं केव्हाच तुम्हाला आपलेसे करून तुम्हीं मागत असलेले हक्कही दिले असते. असें असल्यामुळें तुम्हीं हिंदु लोकांकडे जी मागणी करीत आहां ती सर्वथैव चुकीची व व्यर्थ आहे. म्हणून निष्कारण हिंदू लोकांचे चरण धरून तुम्हीं आपल्या माणुसकीला कमीपणा आणू नका. परंतु ज्या खिस्ती इंग्रजांच्या राज्यांत तुमच्या सामाजिक सुधारणेकडे व उन्नतीकडे लक्ष देण्यांत येऊन तसे प्रयत्नही करण्यांत येत आहेत, त्या लोकांच्या धर्मासंबंधी विचार करा. खिस्ती इंग्रजांचे हिंदुस्तानवर राज्य नसतें तर आज डॉ. आंबेडकरांसारख्या विद्वानालाही, केवळ ते अस्पृश्य म्हणून, जगापुढे येणें अशक्य झालें असतें, हें समस्त अस्पृश्यांना कबूल होईलच. पण आश्चर्याची गोष्ट ही कीं, आमचे अस्पृश्य बंधू, ज्या धर्माचे लोक त्यांना जवळ घेऊ इच्छितात त्यांच्यापासून दोन हात दूर राहूं चाहतात, व जे लोक त्यांना कुत्र्यामांजरापेक्षांही नीच समजून दूर ठेवतात, त्यांच्या मागें जाण्याची इच्छा करतात. या त्यांच्या अज्ञानाबद्दल व स्वाभिमानशून्यतेबद्दल कोणालाहि त्यांची कींवच येईल.

पापमुक्तीविषयीं विचार

धर्माविषयी बोलूं लागल्यावर ज्या अत्यंत महत्वाच्या गोष्टीबद्दल विचार करावयाचा ती गोष्ट म्हणजे आपल्याला पापमुक्ती किंवा मोक्ष कसा प्राप्त होईल ही होय. हा विचार करण्याच्या पूर्वी मनुष्याला आपल्या पातकाची जाणीव झाली पाहिजे तशी ती झाली म्हणजे साहजिकपणेंच तो त्या पातकापासून मुक्त होण्याचा विचार करील. आणि असा विचार करीत असतां कोणत्या गोष्टीकडे लक्ष द्यायचें ते एका कवीने खालील कवितेंत सांगितलें आहे :—

तारण म्हणजे काय? कशाला?
होईल सत्य कशानें हो?
त्राता कैसा? कोण असावा?
हेंच विचारें पाहा हो.

गद्यभाषेंत सांगावयाचे म्हणजे, तारण अर्थात पापमुक्ती म्हणजे काय, ती कोणाकडून मिळेल, मुक्तीदाता कसा असावा या मुद्यांचा विचार केला पाहिजे. पण अस्पृश्य समाज परंपरेला बांधलेला असल्यामुळें तो आत्मोन्नतीचा विचार करीत नाही. जोपर्यंत अस्पृश्यबांधवांस जगापुढें येण्याची लालसा जागृत होत नाही, जोपर्यंत त्यांचा मेलेला अभिमान जागा होत नाही, तोपर्यंत त्यांच्यांत विचारक्रांती घडून येणें अशक्य आहे. म्हणून त्यांना आमचा असा संदेश आहे कीं उठा, जागे व्हा, आणि पाप मुक्तिच्या व सामाजिक व धार्मिक उन्नतीचा या खिस्त जयंतीच्या मंगल समयीं विचार करा.

पापमुक्तीचे साधन

या जगांत कोणतीही वस्तु साधनाशिवाय प्राप्त होत नाही. पापमुक्तीलाही हाच नियम लागू आहे. ज्या ज्या लोकांना पापमुक्त होण्याची उत्कंठा लागली त्यांनी त्यांनी विविध साधनांचा उपयोग केला आहे, व करीत आहेत. फत्तराची मूर्ती बनवून तिची पूजा करणें, तिला पंचपक्वानांचे नैवेद्य दाखविणे, तिच्यापुढे बकऱ्या कोंबड्यांचे बळी देणें, गुरू करून घेऊन त्याची सेवा करणें वगैरे नानाविध साधनांचा उपयोग करून लोक पापमुक्ती मिळविण्याचा प्रयत्न करीत असतात. पण या मुक्तीसाधकांनी हेतुसिद्धिसाठीं हातांत जीं साधनें धरलीं आहेत, त्यांनीं त्यांचे साध्य साधलें जाईल किंवा नाही याचा विचार केला पाहिजे. भाव तेथें देव या भाबड्या व मोघम समजुतीत कांहीं अर्थ नाही. मुर्ति या साधनाविषयीं विचार केला असतां, तो मनुष्यानें विशिष्ट आकार दिलेला एक निर्जीव फत्तर आहे हें सांगावयास नकोच. त्याच्यांत देवपण नाहीं. डोळे

मिटून मूर्तिपुढें बसल्यानें डोळ्यापुढे ती फत्तराची मूर्तिच येईल; ईश्वराचें स्वरूप लक्षांत येणें शक्य नाहीं. अर्थात पापमुक्ति मिळणें दूरच राहिलें. तीर्थाच्या ठिकाणीं केलेल्या स्नानाचीही हीच गत आहे. स्नान केल्यानें भ्रष्ट झालेले अंतःकरण स्वच्छ होणार नाहीं. बकऱ्या-कोंबड्यांच्या बलिदानाविषयीं विचार केला असतां, त्या बिचाऱ्या प्राण्यांना ठार मारून पापांची क्षमा कशी काय मिळेल तें समजत नाहीं. पापमुक्तीसाठी संतांचें व तत्वज्ञान्यांचें शिष्यत्व पत्करण्यांतही सुज्ञपणा नाहीं. कारण, त्यांनीं गूढ व गहन धर्मतत्वांचा खल केलेला असला तरी आमच्या तत्वज्ञानाचा अभ्यास करणारांना आम्हीं पापमुक्ती देऊं असें त्यांनी सांगून ठेवलें नाहीं. थोडक्यांत सांगायचें म्हणजे, पापमुक्तीसाठीं लोक ज्या साधनांचा अवलंब करतात, तीं कोणत्या ना कोणत्या प्रकारांने लटकीं ठरत आहेत. साधन असें पाहिजे कीं त्याकडून मुक्तीचे वचन मिळेल.

एकेश्वरी मताकडे झुकूं नका

शुद्धाद्वैवादी किंवा एकेश्वरी नांवाचा एक पंथ आहे. त्याचें म्हणणें असें आहे की पापमुक्ती व देवप्राप्ती होण्यास साधनाची जरूरी नाहीं; देव दयाळू व प्रेमाळू आहे, त्याच्यासमोर आपल्या पातकांचा पश्चाताप केला कीं तो पातकाची क्षमा करतो. व पातक्याच्या अंतःकरणाला समाधान देतो. पण त्यांचें हें म्हणणें व्यवहाराला मुळींच धरून नसल्यामुळे तें अंतःकरणाला पटत नाहीं. कोणताही व्यवहार जर साधनाशिवाय होत नाही, तर देवप्राप्ति व पापमुक्ती तरी साधनाशिवाय कशी काय साध्य आहे? या साधनाला कोणी मध्यस्थ किंवा प्रतिनिधि म्हणतात, व या साधनांपैकी काहींचे विवेचन पूर्वी आलें आहे. मध्यस्थाचें अगर प्रतिनिधीचें हें तत्व सर्व धर्मांनीं एकमुखानें मान्य केलें आहे ! एवढेच नाहीं तर कांहीं शुद्धाद्वैतवाद्यांनाहीं तें शेवटीं कबूल करावें लागलें आहे. सर फ्रान्सिस न्यूपोर्ट नांवाचा एक प्रख्यात शुद्धाद्वैतवादी होऊन गेला. तो अंथरुणावर पडून असतां म्हणाला, "मी देवाच्या क्रोधाचा परिणाम रात्रंदिवस भोगीत आहें . . . . मला लहानपणीं ख्रिस्ती धर्माचें शिक्षण इतरांपेक्षां अधिक मिळालें असतांही मी दयेच्या आत्म्याचा (पवित्र आत्म्याचा) धिःकार केला हेंच याचें कारण असावें..." या कट्ट्या शुद्धाद्वैतवाद्यानें मध्यस्थाच्या तत्वाला न जुमानतां आपल्या पातकांबद्दल पराकाष्टेचा पश्चाताप ईश्वरासमोर केला होता. मग त्याच्या पातकांची क्षमा होऊन त्याच्या अंतःकरणाला समाधान कां मिळालें नाहीं ? त्याच्या आत्म्याची अपरिमित तळमळ कां झाली ? याचें कारण हेंच कीं मध्यस्थाशिवाय आपण जें केलें तें व्यर्थ अशीं त्याची खात्री पटली होती. एकेश्वरी मत अग्राह्य आहे हें यावरून ध्यानांत येण्यासारखें आहे.

ईश्वर व मानव यांच्यामधील मध्यस्थ येशू खिरस्त

पापमुक्ती व देवप्राप्ति मिळविण्यासाठी विविध लोक जीं विविध साधनें हातीं घेतात, त्यांनी त्यांचे इच्छित साध्य होणें शक्य नाहीं हें पूर्वी दाखविलेंच आहे. असें आहे म्हणूनच लोकांना ईश्वरप्राप्ती करून द्यावयाला व त्यांच्या पातकांची क्षमा करायला म्हणजेच त्यांना पापमुक्ती द्यायला, येशू खिरस्त देह धारण करून या पातकी जगतांत आला. येतांना तो म्हणाला "होम व अर्पणें यांची तुला इच्छा नाहीं. त्यांनी तुला संतोष झाला नाही. . . तुझी इच्छा पूर्ण करावयास मी आलों आहे." याच समयीं स्वर्गातील दूत हर्षानें म्हणूं लागले "उर्ध्वलोकीं देवाला गौरव व पृथ्वीवर मनुष्यांना शांति मिळाली आहे. त्यांजवर त्याचा प्रसाद झाला आहे." खुद्द येशू खिरस्त म्हणतो "प्रभू परमेश्वराचा आत्मा मजवर आला आहे. दीनांस सुवार्ता सांगावयास परमेश्वरानें मला अभिषेक केला आहे. पाडाव केलेल्यांस मुक्तता द्यावी, बंदीवानांस बंधमुक्त करावें व शोकग्रस्तांस समाधान द्यावें म्हणून त्यानें मला पाठविलें आहे." आणि परमेश्वर येशु खिरस्तांविषयी म्हणतो, "तू युगानुयुग (मी व मानव यांच्यामध्यें) मध्यस्थ आहेस." येशूचा एक शिष्य म्हणतो "पहा जगाचें पाप हरण करणारा देवाचा कोंकरा." दुसरा शिष्य म्हणतो "असाच मध्यस्थ आम्हांस योग्य होता". या पुराव्यावरून हेंच ठरतें कीं येशू हा देव व मानव यांच्या मधला मध्यस्थ असून मानवाला पापमुक्ती व ईश्वरप्राप्ति करून देण्यासाठीं खुद्द परमेश्वरानें त्याची योजना केलेली आहे.

अस्पृश्य बांधवांनीं येशूचे शिष्यत्व कां पत्करावें ?

(१) तो मानवप्राणी व ईश्वर यांमधला मध्यस्थ आहे.

(२) त्यानें दिलेलें शिक्षण अत्यंत उदात्त आहे. आणि विशेष हें कीं तो लोकांस जें शिकवी त्याप्रमाणेंच तो स्वतः वागे. "बोले तैसा चाले" हें त्याच्या चारित्र्याचें वैशिष्ट्य आहे.

(३) त्यानें सर्व मानवप्राण्यांस समसमान मानलेले असून सर्वांना एकमेकांवर प्रेम करण्यांस बजाविलें आहे. हा एकच मुद्दा सर्व पापी मानवांना अत्यंत फायद्याचा व मोलाचा आहे; व अस्पृश्य समाजानेंच नव्हे तर सर्व जगानें येशूचे शिष्यत्व कां पत्करावें हें दाखविणारा आहे.

(४) त्यानें सर्व जगाला राजरोसपणें जाहीर केलें आहे कीं मानवप्राण्यांचा मुक्तीदाता मी आहे. तो म्हणतो मी पाप्यांस बोलाविण्यास आलों आहे. अहो

कष्टी व भाराक्रांत जनहो, तुम्ही सर्व मजकडे या म्हणजे "मी तुम्हाला विश्रांति देईन. मला पापांची क्षमा करण्याचा अधिकार आहे." पुढें तो आणखी म्हणतो "मी स्वर्गाचें दार आहे. मजकडे आल्याशिवाय कोणीही स्वर्गाच्या राज्यांत जाणार नाहीं."

अशाप्रकारें येशू खिस्त हा पापमुक्ति व ईश्वरप्राप्ति करुन देणारा आहे. अस्पृश्यबंधूनों, तुम्हीं पापमुक्ति करतां व ईश्वरप्राप्तिकरतां जीं साधनें हातीं धरलीं आहेत, तीं जर पापमुक्तिचें वचन देत नसतील व ईश्वराचीही ओळख करून देत नसतील तर त्यांच्या मागें अंधश्रद्धेनें जाऊन आपल्या आत्म्याचा नाश करून घेऊं नका. यापेक्षां "पापांची क्षमा करण्याचा मला अधिकार आहे" असें आश्वासन देणाऱ्या येशूकडे समजून उमजून या व त्याचें शिष्यत्व पत्करा. जर दुसरा कोणी अवतार खिस्तासारखेच आश्वासन देत असेल, तर प्रथम त्याचे आचरण पहा व त्याचे आश्वासन कोणाकरतां आहे याचा चांगला विचार करा. पण आमची खात्री आहे कीं येशूखिस्तासारखे आश्वासन कोणीहि दिलेले नाही. म्हणून येशू खिस्तजयंती निमित्त हा जो संदेश तुम्हाकडे पाठविला आहे त्याचा नीट विचार करा, अशी विनंति आहे.

● ● ●

बहिष्कृत भारत, ता. १८ जानेवारी १९२९.

परिशिष्ट-४

पुणें जिल्हा बोर्ड व अस्पृश्य समाज

सुधारणेच्या नवीन कायद्यान्वयें सरकारनें स्वराज्याचा थोडाथोडा भाग जनतेच्या स्वाधीन करण्याचें ठरवून त्यांपैकीं अत्यंत महत्वाचें खातें म्हणजे शिक्षणखातें आज ४-५ वर्षे डिस्ट्रीक्ट बोर्डाच्या हातीं दिले आहे. सदर ४-५ वर्षांतील पुणेंबोर्डाच्या अस्पृश्य समाजाविषयींच्या कामगिरीचा मासला (फार्स) खालील प्रमाणें आहे !

(१) पुणें जिल्हा स्कूल बोर्डानें फेब्रुवारी १९२८ मध्यें अस्पृश्य समाजाविषयीं जिवंत सहानुभूती दाखवून एक ठराव पास केला तो एणे प्रमाणें :—

"इ. ५ ते ७ करितां प्राथमिक शिक्षणाचे एक मोफत बोर्डिंग जिल्ह्यांत सुरूं करावें." सदर ठराव पास होऊन डि. बोर्डाकडे गेला तेथें खर्चाची बाब पुढें करून त्यांनी असें ठरविलें कीं, जर सरकारनें खर्च दिला तर बोर्डिंगला आमची संमती आहे. अशा आशयाचा ठराव करून सरकारकडे पाठविला.

प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत व्हावें म्हणून सरकारवर पूर्वी सारख्या टीका होत. आतां त्या कटकटींतून सरकार मोकळें झालें. असें असतां ही मागणी. अर्थांत सरकार त्यास नकारार्थीं उत्तर देणारच !! त्याप्रमाणें उत्तर सरकारनें दिलेंही आहे. आतां आमचें हितचिंतक डिस्ट्रीक्टबोर्ड झाले कृतकृत्य !! पडलें एकदाचे अस्पृश्यांच्या मागणीतून पार !!!

(२) ह्या पहिल्या अंकाची समाप्ति होते न होते तो अस्पृश्य समाजावर सहानुभूतीची दुसरी खैरात डि. स्कूलबोर्डानें नुक्तीच उडविली तीं एणें प्रमाणें. "अस्पृश्यांच्या शाळा तपासण्याकरितां अस्पृश्य सुपरवायझर नेमणें व त्याचा खर्च सरकारनें द्यावा" आतां हा ठराव डि. बोर्डात पास होऊन सरकारकडे पुढील महिन्यांत जाणार व सरकारकडून पुन्हा नकारार्थी उत्तर आलें कीं दुसऱ्या अंकाची समाप्ति होणार ! या वरील प्रकारांस सहानुभूति म्हणावी कीं टिंगल म्हणावी याचा निर्णय डि. बोर्डानेंच लावावा.

बोर्डास अस्पृश्य समाजाची खरी कळकळ वाटत असेल तर वरील दोन्ही योजना अस्पृश्य समाजाच्या अत्यंत हिताच्या आहेत. अस्पृश्य समाजांतील

सुपरवायझर खेरीज अस्पृश्य समाजांत मिसळून त्यांची मनें शिक्षणाकडे वळविण्याचें काम कोणताही स्पृश्य सुपरवायझर करणार नाहीं हें डि. बोर्ड जाणत आहेच. करितां वरपांगी सहानुभूति न दाखवितां अस्पृश्यांच्या सुधारणेचे प्रयत्न कृतींत बोर्ड दाखवील अशी आशा आहे.

(१) रंभाजी राघुजी बगारे
राहणार गाजूबाई (बारामती)
जि. पुणें.
(२) शंकर दगडू धेंडे
राहणार बेलसर, जि. पुणें.

● ● ●

बहिष्कृत भारत, ता. १ फेब्रुवारी १९२९.

परिशिष्ट-५

।। सत्यमेव जयते ।।

हिंदु समाजास जाहीर विनंती

आम्ही ५००० लोक हिंदू धर्म सोडणार ?

सध्या हिंदू धर्मात जो जातीभेद रुढ आहे, त्यामुळें हिंदु धर्माचे पाठबळ विभागले गेले आहे.

गेल्या हजारों वर्षांपासून हिंदु धर्मात राहिल्याने महार मांग इत्यादि आम्हां अस्पृश्यांचा हरघडी असह्य अपमान होत आहे. हिंदुच्या देवळांत मूर्ति भंजक व गोभक्षक परधर्मी मुसलमान अथवा ख्रिस्ती लोक जाऊं शकतात, परंतु हिंदु देवतांना पूज्य मानणाऱ्या आम्हां गोभक्त अस्पृश्यांना हिंदु लोक त्यांच देवळाची पायरी देखील चढूं देत नाहींत.

खरें पाहतां ज्या हिंदु धर्मांत आम्ही आहोंत त्याच धर्मांचे लोक आमचा द्वेष करीत असून तेच आमचे खरेखुरे शत्रू आहेत. जळगांव येथील महार हा सहा महिन्यापूर्वी बाटून मुसलमान झाला, तो पूर्वीचा पिराजी व आतां शेख पिरन म्हणवून कसाबाचा धंदा करतो. व रोज टोपलींत गाईचे मांस घेऊन रस्तोरस्ती सर्व हिंदु समोर विक्री करीत फिरतो. तोच शेख पिरन हिंदु लोकांचे विहिरीवर राजरोस पाणी भरतो. पण हिंदु लोक त्याला मनाई करीत नाहींत. आणि आम्हां महार मांगापैकी शेकडों लोक ' मानभव ' व ' वैष्णव ' पंथाचे असून ते गाईचेच काय पण कसलेही मांस खात नाहींत. तरी पण त्यास हिंदु लोक स्पर्श करण्यांस राजीं नाहींत, आमचा स्पर्श झाल्यानें हिंदु धर्म व हिंदूचे देव बाटतात. तर असला ' बाटगा धर्म ' व ' बाटगे देव ' आम्ही आमचे मानणें यांत आम्हांस शरम पैदा होते. ज्या हिंदु धर्मांत आम्हीं आहों त्या धर्माने आमच्याकरितां इतके दिवसांत काय केलें आहे ? असा आमचा हिंदु धर्माच्या पुढाऱ्यांना जाहीर सवाल आहे.

अशा उच्च धर्मांत महार मांगांनीच काय पण इतरांनी देखील राहू नये, अशी आमची सर्व लोकांस सूचना आहे. या नोटिशीनें सर्व हिंदु लोकांस आम्हीं जाहीर करितों कीं, ता. १ जून १९२९ च्या आंत तुम्हीं जर आमचा स्पर्शास्पर्श

भेद नाहींसा करणार नाहीं; व आम्हांस समाजांत निदान तुम्हीं मुसलमान लोकांइतके सामाजिक हक्क देणार नाहीं; तर ता. २ माहे जून १९२९ रोजीं आम्ही जळगांवचे व आसपासचे खेड्याचे मिळून मुलाबाळांसह ५००० लोक मुसलमान अथवा ख्रिस्ती धर्माचा स्विकार करूं. हिंदुस्तानांतील कांहीं पुढारी अस्पृश्यांकरिता झटतात. परंतु त्यांचेवर बऱ्याच धनिकांचा रुसवा होऊन त्यांना असह्य त्रास भोगावा लागतो व त्या योगें त्यांचें मन बरेंच दुखवत असेल. हिंदु सभा, सत्यशोधक समाज, आर्यसमाज इत्यादिकांना आमच्याशी पत्रव्यवहार करणें असल्यास तो भिकु इसाजी खंडेराव, मु. पोष्ठ जळगांव (जामोद), जिल्हा बुलढाणा या पत्यावर पत्रव्यवहार करावा. कळावे. आपले,

सह्या पांच हजार लोकांतर्फे

१. पुनाजी सोनाजी महार द. खू.

२. मोतीराम व जामा महार नि. खू.

३. भावजी व रामजी महार नि. खू.

• • •

बहिष्कृत भारत, ता. १५ मार्च १९२९.

परिशिष्ट–६

चवदार तळ्याचा दावा

महाडचे बातमीपत्र

(आमच्या बातमीदाराकडून)

चवदार तळ्याच्या दाव्यांत दोन्हीं पक्षांनी आपआपल्या साक्षी याद्या दिल्या आहेत. दाव्याचें पुढील काम जूनमध्यें चालेल. चवदार तळ्याची म्युनिसिपालिटीच्या मालकीची एक पाळी मागील वर्षाच्या पावसानें कोसळली होती. या पाळीशेजारून गांवचा एक सार्वजनिक रस्ता जात आहे. या कोसळलेल्या पाळीमुळें हा सार्वजनिक रस्ता आज ७/८ महिने रहदारीस बंद झाला होता, परंतु चवदार तळ्याची पाळी बांधण्याचें काम नुकतेंच म्युनिसिपालिटीनें सुरू केलें असल्यानें पाळीस जोडून असलेल्या स्वतंत्र रस्त्याच्या दुरुस्तीचे काम लवकर पुरे होईलसें वाटतें. रस्ता ७/८ महिने नादुरुस्त व त्यामुळें १।। पुरुषाचा खड्डा पडलेला ! अशा स्थितींत रात्रीं कोणीही त्या खड्ड्यात पडलें नाहीं, हें नागरिकांचे सुदैव ! या बाबतींत महाड म्युनिसिपालिटी फार लवकर जागी झाली ! "महारांनीं चवदार तळ्यांत खुशाल पाणी भरावें आपणांस त्याच्याशीं कांहीं कर्तव्य नाहीं " असें म्हणणारा एक नवीनच उपपक्ष येथें निर्माण झाला आहे. ह्या उपपक्षाभिमानी लोकांनीं आपआपल्या आवारांत विहिरी खणण्याचें व चवदार तळ्याच्या पाण्यावर बहिष्कार घालण्याचें ठरविलें आहे. या उपपक्षाच्या जन्मामुळें पुराणमतवादी सनातनाभिमानी तटवाल्यांचीं धाबीं दणाणून गेलीं आहेत.

"चवदार तळ्याची एकंदर परिस्थिति व सुधारणेच्या काळांतील भवितव्यता लक्षांत घेऊन घरोघर लवकर विहिरी खणाव्यात" असा प्रचार कांहीं मंडळी येथें करीत आहेत. प्रचारानुरूप सनातन तत्त्वांच्या संरक्षणार्थ विहिरी खणण्याचा उपक्रम धडाक्यानें सुरू झाला आहे. उपक्रमाचा अग्रमान येथील एक रहिवासी मामाराव भोळे यांनी मिळविला. त्यांनीं चवदार तळ्यास हडसून असलेल्या जागेंत एक बुडखी खणली असून चवदार तळ्याच्या संपर्काचें पाणी आडपडद्यानें बुडखींत घेतलें ! व आपलें सोवळें राखलें.

● ● ●

बहिष्कृत भारत, ता. ३१ मे १९२९.

परिशिष्ट-७

जळगांवचे (वऱ्हाड) महार मुसलमान झाले

(आमच्या बातमीदारांकडून)

जळगांव (वऱ्हाड)* येथील सुमारें एक हजार महारांच्या सह्यानिशी स्पृश्य लोकांना उद्देशून एक निर्वाणीचा जाहीरनामा पूर्वी निघाल्याचें जाहीर झालेच आहे. सदरहू जाहीरनाम्यांत आम्हांस विवक्षित मुदतींत इतर हिंदुप्रमाणें समानतेचे हक्क न दिल्यास आम्ही ख्रिस्ती किंवा मुसलमान धर्मात प्रवेश करू असें जाहीर झाल्यामुळें तेथें बरीच खळबळ उडाली होती. हा जाहिरनामा प्रसिद्ध करण्याचें कारण कांहीं ब्राह्मण, हिंदुसभा व आर्यसमाजिष्ट सभांतून वारंवार अस्पृश्य निवारणाचा ठराव पास करीत असत. या त्यांच्या ठरावाची कसोटी पाहावी म्हणून कांहीं महार पुढाऱ्यांनीं ब्राह्मणांना व हिंदुमहासभावाल्यांना जाहीर रीतींने सवाल केला कीं, ठराव नुसते पास होऊन उपयोग नाहीं त्याप्रमाणें प्रत्यक्ष कृति करून दाखवा. या सवालास त्यांनीं असें उत्तर दिलें की तुम्ही अस्पृश्य वर्गातील महार, मांग, चांभार वगैरे जातींनी एकत्र सहभोजन करा म्हणजे आम्ही सभेत पास केलेल्या ठरावाप्रमाणें प्रत्यक्ष कृति करून दाखवू. याप्रमाणे जळगांव येथील महार पुढाऱ्यांनीं तसा प्रसंग घडवून आणून सहभोजन केले. परंतु या गोष्टीचा फायदा स्पृश्य वर्गातील कांही मूर्ख लोकांनी निराळ्याच रीतीनें घेतला. त्यांनी आसपासच्या गांवच्या महार लोकांना जाऊन चिथविलें कीं जळगांवचें महार लोक मांगाबरोबर जेवले हा भ्रष्टाकार तुम्हाला पसंत आहे कां? तुमच्या वाडवडिलांनीं असें कधींच केलें नव्हते. म्हणून तुम्ही जळगांवच्या महार लोकांवर बहिष्कार टाका. त्याप्रमाणें त्या अडाणी महार लोकांनीं जळगांवच्या महार लोकांवर बहिष्कार टाकला. पुढें हें कृत्य कोणाच्या चिथावणीनें झाले हें कळून आल्यामुळें ब्राह्मण व इतर स्पृश्य हिंदूच्या आत्मघातकी वागणूकीमुळें अन्यायाची चीड येऊन वरील जाहीरनामा प्रसिद्ध करण्यांत आला होता. या त्यांच्या धर्मांतरास ता. २९-५-१९२९ रोजीं पातुर्डा मुक्कामी भरलेल्या परिषदेनेही पाठिंबा दिला. ठरल्याप्रमाणें ता ४ जून १९२९ रोजी बरेचसे महार मुसलमान झाले. हिंदुमहासभावाले आर्यसमाजिष्ट या मंडळीनें त्यांनीं मुसलमान

---

* जिल्हा बुलडाणा (महाराष्ट्र) बहिष्कृत भारत, ता. २१ जून १९२९.

होऊ नये म्हणून पुष्कळ प्रयत्न केलें. पण त्यांच्या बोलण्यावर कोणीही भरंवसा ठेवीना. आतां तेथल्या स्पृश्य हिंदुनीं आम्ही तुम्हास सार्वजनिक विहिरी मोकळ्या करून देतो, देवालयाचा प्रश्नही थोड्क्याच मुदतीनें सोडवितों, अशा थापा मारण्याचें काम चालूं केलें आहे. दोन विहीरी खेरीज अद्याप विशेष कांहीं झालें नाहीं. तरी पण जळगांवचे महार पुढारी हा प्रश्न शेवट पर्यंत धसास लावणार आहेत.

परिशिष्ट-८

हिंदु देवालये व अस्पृश्यता

शेठ जमनालाल बजाज यांचे भाषण

गेल्या ता. ३१ जुलै रोजीं वऱ्हाडांतील मोंगलाइच्या वेळची राजधानी एलीचपूर येथील 'दत्त दरबार' या नांवानें सुप्रसिद्ध असलेल्या श्री. दत्तमंदिराचीं द्वारें अस्पृश्य मानलेल्या वर्गालासुद्धां सर्व हिंदूंना उघडीं करण्याचा समारंभ राष्ट्रीय सभेच्या अस्पृश्यताविरोधक कमिटीच्या तर्फे साजरा करण्यांत आला. देवालय अस्पृश्यांना मुक्तद्वार करण्याच्या बाबतींत सर्व ट्रस्टींचें एकमत आहे असें सदरील प्रसंगीं जाहीर करण्यांत आलें आणि देवालयावर तें बहिष्कृतांसुद्धां सर्व हिंदूना मुक्तद्वार असल्याबद्दलची पाटी लावून ती शेठ जमनालाल बजाज यांच्या हस्तें अनावृत्त करण्यांत आली. पाटीवरील पडदा दूर केल्यावर शेठ जमनालाल बजाज यांनीं जमलेल्या मंडळीच्या समवेत देवालयामध्ये प्रवेश केला. या मंडळींत बहिष्कृत वर्गातलीं सुमारे ५० माणसें होतीं. सदरील प्रसंगी शेठ जमनालाल यांचें पुढील आशयाचें भाषण झालें :—

ज्या आपल्या धर्मबांधवांची आपण आतांपर्यंत उपेक्षा केली त्यांच्याकरितां या देवालयाची द्वारें आज खुलीं करण्यांत येत आहेत. या प्रसंगीं माझ्याकडून आपण विद्वत्ताप्रचूर भाषणाची अपेक्षा करीत नसालच. कारण तुम्हाला माहीतच आहे कीं, मी कांहीं कोणी शास्त्री किंवा पंडीत नाहीं. धर्मशास्त्रांतील वचनें घेऊन त्यांच्यावर पांडित्याची कसरत करणें मला शक्य नाहीं. फार काय, परंतु संस्कृत भाषाहि मला अवगत नाहीं. जे वर्ग अस्पृश्य म्हणून समजून आम्ही त्यांना वागवीत आहों त्यांच्या संबंधाचा प्रश्न हा खरोखर अगदीं सोपा व साधा असा प्रश्न आहे. त्यांत कांहीं पांडित्य किंवा वकिली पाहिजे असें नाहीं. हा केवळ न्यायानें वागविण्यासंबंधाचा प्रश्न आहे; इतकेंच नव्हे तर आपण वरिष्ठवर्गीय हिंदूंनीं आपल्या पापांचें क्षालन करण्यासाठीं हें प्रायश्चित घेणें आहे असें मी म्हणतों. ज्या रीतीनें अस्पृश्यांना आम्हीं आतांपर्यंत वागविलें व सध्या वागवीत आहों ती सर्वथैव अक्षम्य आहे हें कोणीहि नाकबूल करूं शकणार नाहीं. आपला कौटुंबिक धर्म असा आहे कीं, कुटुंबांतील वडील व जाणत्या माणसांनींच कुटुंबाच्या योगक्षेमाची जबाबदारी घेतली पाहिजे, कुटुंबांतील जीं कोणी माणसें दुर्बल व स्वतःची काळजी घेण्यास असमर्थ असतील त्यांची

काळजी घेतली पाहिजे, इतकेंच नव्हे तर कुटुंबांत जरी एकादा वेडापिसा व निकामी मनुष्य असला तरी त्याचा सांभाळ केला पाहिजे, आणि कुटुंबांतल्या सर्व माणसांना समतेनें वागविलें पाहिजे. आपला कौटुंबिक धर्म हा 'देवाण घेवाण' या न्यायाचा नसून प्रेमावर आधारलेला आहे. समाज म्हणजे एक मोठ्या प्रमाणावरील कुटुंबच होय. तेथेंहि तोच धर्म लागू असला पाहिजे. समाजांतल्या जाणत्या व पुढारी माणसांवर आणि वरिष्ठ वर्गांवर निकृष्ट मानलेल्या वर्गांना प्रेमानें व ममतेनें वागविण्याची जबाबदारी आहे. वरिष्ठपणा किंवा पुढारीपणा म्हटला कीं ही जबाबदारी आलीच. अस्पृश्य मानलेल्या वर्गातील लोक अज्ञान, वेडगळ, धर्मसमजुतींना चिकटून राहणारे, अस्वच्छतेनें वागणारे आहेत म्हणून आम्ही त्यांची उपेक्षा करतों असें म्हणणें योग्य नव्हें. उलट, अस्पृश्य मानलेले लोक अज्ञान व अस्वच्छ राहणीचे आहेत याकरितां त्यांची आपण विशेष काळजी घेतली पाहिजे, त्यांना सज्ञान केलें पाहिजे, त्यांना स्वच्छतेनें राहण्यास शिकविलें पाहिजे, थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे त्यांच्यांत आपण माणुसकीचा अभिमान उत्पन्न केला पाहिजे. पण खरोखर पाहतां आपण तसें करितों काय ? त्यांना आपण परमेश्वराच्या घरांत-देवालयांत जाण्यासहि मज्जाव करतों. ईश्वराला 'जगत्पिता,' 'जगन्माता,' 'पतितपावन' अशा नांवांनी संबोधणारे आम्ही वरिष्ठजातीय हिंदु लोक तोच परमेश्वर एकाद्या अस्पृश्याला आपल्या दर्शनानें पावन करण्याच्या ऐवजीं त्याच्या संपर्कानें विटाळतो, त्याला आपल्या हीनदीन बालकाचा संसर्ग खपत नाहीं, असें मानतों. हा एक प्रकारचा दैवदुर्विलासच नव्हे काय ? आम्हां वरिष्ठजातीय हिंदूंना अत्यंत लज्जास्पद अशी ही गोष्ट नव्हे काय ?

परमेश्वराचा छळ !

आपला कौटुंबिक धर्म कशा प्रकारचा आहे हें मीं नुकतेच आपल्यास सांगितलें आहे. जो पिता आपल्या मुलांना पंक्तिप्रपंचानें वागवितो त्याला तुम्ही काय म्हणाल? अथवा कुटुंबांतील जे वडील मुलगे आपल्या धाकट्या दुर्बळ भावांना आपल्या आईला भेटावयास जाऊं देणार नाहींत आणि त्यांना कायमचे अलग करून ठेवावयास पाहतील त्यांना तुम्ही काय म्हणाल? आपल्या कनिष्ठ अपत्यांना आपल्यापाशीं येण्याला ज्येष्ठ अपत्यांनीं प्रतिबंध केला तर मातेच्या मनाला किती वेदना होतील याची तुम्हीच कल्पना करा. आपल्याच धर्मबांधवांना देवालयांत जाण्यास मज्जाव करणें म्हणजे देवालयाचा जो उद्देश आहे त्याच्यावर कुऱ्हाड घालणें होय. आमची परिस्थिती विशेष चांगली आहे, तेव्हां आम्ही आमच्यापेक्षां ज्यांची स्थिती वाईट आहे त्या आपल्या धर्मबांधवांना हातभार लावावयाचा कीं, त्यांचा जो जन्मजात हक्क आहे म्हणजे देवालयांत जाऊन

देवदर्शन घेण्याचा व देवाची उपासना करण्याचा जो त्यांना हक्क आहे तोहि त्यांच्यापासून हिरावून घ्यावयाचा? ''देवालय' असें म्हणावयाचें आणि फक्त मोजक्या लोकांना मात्र तेथें जाऊं द्यावयाचें याचा अर्थ काय? देव फक्त थोड्यांशा सुखवस्तु लोकांचाच आहे काय? देव सर्वांचा आहे. त्याला गरीब, श्रीमंत, विद्वान्, अविद्वान् उच्च नीच सर्व सारखे ! इतकेंच नव्हे तर देवाची आवश्यकता श्रीमंतांपेक्षा गरिबांना, विद्वानांपेक्षा अविद्वानांना व उच्चवर्गीयांपेक्षा निकृष्टवर्गीयांनाच अधिक आहे. आईचा ओढा शहाण्या सुरत्या निरोगी मुलापेक्षां निर्बुद्ध व रोगी मुलाकडेच अधिक प्रमाणानें असत नाहीं काय?

सार्थ "देवालये"

देवालयें जर खरोखर देवालयें-परमेश्वराचीं वसतिस्थानें झालीं पाहिजेत तर त्यांचा मूळ उद्देश सफल झाला पाहिजे. स्वतःचे आकुंचित विचार देवावर लादून आम्ही जगांतील इतर देशांच्या उपहासाचे विषय झालों आहोंत. आमचें आत्मिक ध्येय व त्यांतला उदारमतवाद हीं देवालयांमध्ये प्रतिबिंबित झालीं पाहिजेत. नाहीपेक्षां आमचा ढोंगीपणा मात्र त्यांत प्रतिबिंबित होईल आणि स्वाभाविकपणेंच दुसरे लोक आमची थट्टा करितील.

आमच्या देवालयांमध्यें अस्पृश्य मानलेल्या लोकांना जाण्यास पूर्ण मोकळीक ठेवणें म्हणजे आईपासून जबरीनें काढून घेतलेल्या लहान मुलांना पुनः तिची भेट करून देणें आहे, तिच्या हृदयापाशी त्यांना जांऊ देणे आहे. परमेश्वर आम्हां सर्वांची माता आहे. या मातेच्या दुर्बल बालकांना आम्ही तिच्यापासून दूर करून तिच्या हृदयाला भयंकर वेदना केल्या आहेत, हें आपण विसरतां कामा नये.

असें बोलून हा 'दत्तदरबार' सर्व हिंदू स्त्रीपुरुषांना आजपासून मुक्तद्वार आहे असें मी जाहीर करतों. याउपर या दरबारांत सर्व हिंदुधर्मीय लोक भेदाभेद न बाळगतां एकत्र बसतील आणि येथें नारायणाच्या कृपादृष्टीखालीं त्याचीं सर्व बालकें त्याच्याशीं तादात्म्य करून संसारांतला विविध ताप सहन करण्यास लागणारी प्रेरणा व आत्मिक ज्ञान संपादन करितील. आजचें हें पुण्यकृत्य ज्यांनी घडवून आणलें त्या सर्वांचें मी अभिनंदन करितों. त्यांना परमेश्वराचा आर्शीवाद मिळो आणि या पुण्यमार्गावर पुढें पुढें जाण्यास परमेश्वर त्यांचा सांगाती होवो !

बहिष्कृत भारत, ता. ६ सप्टेंबर १९२९.

परिशिष्ट-९

संपचौकशीचा निकाल

मुंबई सरकारने गेल्या ता. ३ जुलै रोजी ट्रेड डिस्प्यूट्स ॲक्टाच्या चौथ्या कलमान्वये मुंबईच्या गिरण्यातील संपाचा विचार करण्यासाठी चौकशी-मंडळ (कोर्ट) नेमले. न्या. पियर्सन (अध्यक्ष), बॅ. तलियारखान व रूपचंद बिलाराम या तिघांची या मंडळावर नेमणूक केली. या मंडळाकडे ज्या चार प्रश्नांचा निर्णय देण्याचे काम दिले ते प्रश्न पुढीलप्रमाणे—

(१) १९२९ च्या मार्च-एप्रिल महिन्यात मुंबईच्या गिरण्यांतील मजुरांचे जे संप झाले त्यांना कारणीभूत झालेल्या मालक व मजूर यांच्या वादाची चौकशी करून त्या वादाचे नक्की स्वरूप काय होते हे ठरविणे.

(२) असा वाद आढळून आल्यास त्याला मालक किंवा मजूर किंवा दोघेही जबाबदार आहेत की काय व ते कोणत्या प्रमाणात जबाबदार आहेत?

(३) संप लांबण्याची कारणे कोणती? याबद्दल जबाबदार कोण, मालक का मजूर? का दोघेही? व ते कोणत्या प्रमाणात?

(४) मालक व मजूर यांचे वाद मिटविण्याचे बाबतीत काय अडचणी आहेत?

ता. ६ जुलैपासून या मंडळाच्या बैठकी सुरू झाल्या. ता. २१ ऑगष्टपर्यंत एकंदर २९ बैठकी होऊन ३५ साक्षीदारांच्या साक्षी घेण्यात आल्या. (१) मिलओनर्स असोसिएशन (२) गिरणीकामगार युनियन (३) मुंबई टेक्स्टाईल लेबर युनियन (४) गिरणी कामगार महामंडळ (५) मुंबई मिलवर्कर्स युनियन (६) जाम मॅन्युफॅक्चरिंग कंपनी लि. यांच्यातर्फे साक्षी झाल्या. मीरतच्या खटल्यात उपस्थित झालेल्या प्रश्नासंबंधी म्हणजे गिरणी कामगार युनियनही कॅम्युनिस्ट आहे की काय, या प्रश्नासंबंधी पुरावा घेण्याचे व विचार करण्याचे चौकशीमंडळाने नाकारले.

चौकशीमंडळाचा निर्णय

मंडळाचा निर्णय थोडक्यात पुढीलप्रमाणे आहे—

(१) ऑक्टोबर १९२८ च्या सुमारास गिरणी कामगारात असंतोष माजला होता. आपली मजुरी कमी करण्यात येईल, सर्व गिरण्यास एकच इयत्ता

(स्टँडर्डायझेशन) लागू केल्यास आपल्यापैकी काही जणावर बेकारीचा प्रसंग येईल. या भीतीमुळे कामगार असंतुष्ट झाले होते. त्या असंतोषाचा गिरणी कामगार युनियनच्या पुढाऱ्यांनी फायदा घेतला.

(२) मिल कमिट्या या सल्लागार कमिट्या होत. पण गिरणी कामगारसंघाने गैरसनदशीरपणाने त्यांच्या कार्यकारी कमिट्या बनविल्या. सदर मिल कमिटीतील सभासदास व्यक्तिशः संप पुकारण्यास उत्तेजन दिले. कमिटीने संप पुकारणे सनदशीर होय, पण कमिटीतील एखाद्या सभासदाने तो पुकारणे बिनसनदशीर होय. त्यांनी कामगार व गिरणीवाले यांचें दरम्यान द्वेष वाढविला, व कामगाराकडून लहान लहान संप करविले. १९२८ च्या आक्टोबरात त्यास सार्वत्रिक संप घडवून आणावयाचा होता. त्याची पूर्वतयारी त्यांनी छोट्या संपामार्फत चालविली होती. त्याप्रमाणे सार्वत्रिक संप ठरल्या वेळेस त्यांनी पुकारलाही. गिरणीवाले व गिरणी कामगारसंघ यांची बैठक २४ एप्रिल रोजी भरली होती. पण सदर बैठकीत ज्या योगाने कामगारसंघास सार्वत्रिक संप पुकारावा लागेल अशी कोणतीही आगळीक गिरणीवाल्यांच्या प्रतिनिधींच्या हातून घडली नव्हती. त्यांनी गिरणी कामगारसंघाची पहिली मागणी कबूल केली होती. दुसऱ्या मागणीचा विचार करण्यात ते नाकबूल नव्हते, आणि तिसऱ्या व चौथ्या मागणीपर्यंत वाटाघाट पोहचलीही नाही. आपल्या अधिकाऱ्यास गिरणीवाल्यांनी खुनशीपणाने वागविले, असे कामगारसंघास सिद्ध करता आले नाही व वाडिया मिलमधून काढून टाकलेल्या कामगारास पुनः कामावर का घ्यावे याचेही समर्पक कारण त्यास दाखविता आले नाही.

(३) ज्या भांडणामुळे संप घडून आला तशा प्रकारचे भांडण किंवा वाद गिरणीवाले व गिरणी कामगार याजमध्ये अस्तित्वात होता की नाही, हे सांगणे कठीण आहे. भांडण किंवा वाद असलाच तर तो कामगारसंघाचे अधिकारी व गिरणीवाले यामध्ये होता व तो संघाचे अधिकारी व मिल कमिट्यांचे अधिकारी यांचे धोरण व हालचाली यामुळे उद्‌भवला होता. या भांडणात गिरणीवाल्यांचे धोरण स्वतःचा बचाव करणे एवढेच होते. काही बाबतीत गिरणीवाले व त्यांचे अधिकारी यांनी जितके विचारपूर्वक वागावयास पाहिजे तितके ते वागले नाहीत. तथापि दोषाचे सगळे खापर संघाच्या माथीच फुटते.

संप का लांबला ?

(१) गिरणी कामगारसंघाच्या पुढाऱ्यांची चढाईची व खोडसाळपणाची चळवळ व कामगारास चिथावणारे लेख व भाषणे.

(२) संपवाल्यांनी केलेले पिकेटिंग, दिलेला धाकदपटशा व संपात सामील न झालेल्यांवर केलेला अत्याचार या कारणांनी संप लांबला.

जे संपवाले आपापल्या गावी गेले ते पावसाळा संपून अजून परत न आल्यामुळे गिरण्या पूर्णपणे जोरात सुरू नाहीत. संप लांबण्याचे कारणही गिरणी कामगार संघाचे अधिकारीच होत असे आमचे मत आहे.

गिरणीवाले व गिरणी कामगार याजमधील वाद मिटविण्यास मुख्य अडचण अशी की, गिरणी कामगारसंघाचे अधिकारी हे हटवादी आहेत. विणकरांची मजुरी ७।। टक्क्यांनी कापली याबद्दल कामगार मनातून असंतुष्ट आहेत, असे आम्हास वाटते. त्याचप्रमाणे लायकीची योजना लागू केल्यास काम जाईल की काय याची भीती व एप्रिल महिन्याचा पगार दिला नाही याही कारणामुळे कामगार असंतुष्ट आहेत, व त्याचा भरपूर फायदा कामगारसंघाने घेतला आहे. गिरणीवाले व गिरणी कामगार यांचा संबंध येण्यास काही साधन नाही व भांडण उपस्थित झाल्यास ते मिटविण्यास लवादाची स्थापना नाही. या योगाने तडजोड घडवून आणणे बिकट झाले आहे.

• • •

केसरी, ता. २१ सप्टेंबर १९२९, सारसंग्रह अर्थात् केसरीचे छोटे फाईल, १९२९. पाने ३९१-३९२.

उद्धृत : गणवीर, पृ. ५२९-५३१.

परिशिष्ट-१०

पनवेल येथील गणेशोत्सव

गेल्या वर्षी गणपती विसर्जन रामकृष्ण गंगाराम भातनकर यांनीं वडाळी तळ्याचे देवघाटावर केला होता त्यावेळी तळ्याला लागून असलेल्या बल्लाळेश्वराचे देवळाच्या पंचानीं किंवा कोणत्याहि ब्राह्मणांनी अडथळा केला नाहीं. तसेंच सबंध वर्षांत कोणीही अस्पृश्यतेचा वाद उपस्थित केला नाहीं. परंतु यंदाच्या गणेशोत्सवापूर्वी सदरहू बल्लाळेश्वर देवळाचे ब्राह्मण पंचांनीं कांहीं लोकांच्या सह्यानिशी अर्ज तयार करून पनवेलच्या मामलेदारसाहेबांकडे पाठविला. व त्यांत त्यांनीं विनंति केली कीं, गेल्या वर्षी गणपती विसर्जन रा. भातनकर या अस्पृश्य गृहस्थानें वडाळी तळ्याचे देवघाटांवर केलें. सदरहू घाटांवर गणपती विसर्जन करण्याची अस्पृश्यांची वहिवाट नाहीं. जर ते यंदा करतील तर शांततेचा भंग होईल. म्हणून सरकारनें बंदोबस्त करावा. इंग्रज सरकारला सैतानीं सरकार म्हणणारें ब्राह्मणांनीं अखेर त्याच सरकारचें बूट चाटूपणा केला.

या अर्जावरून गांवांत पुष्कळ गडबड उडून गेली होती, देवळाचें पंच खेरीज करून सर्व हिंदुलोक रा. भातनकर यांस वडाळी तळ्याचे देवघाटांवर गणपती विसर्जन करण्यास कसलीच हरकत नाहीं म्हणून म्हणूं लागलें व त्याप्रमाणें गुजराथी, व दक्षिणी हिंदूंनीं रा. भातनकर यांस आमची कोणत्याहि प्रकारें हरकत नाहीं म्हणून सह्या दिल्या. इकडे हा प्रकार होत असतांना ता. ८-९-१९२९ रोजीं तेली लोकांचा मेळा बाजारपेठेंतील मुसलमानी वस्तींतून जाऊं लागला असतां त्या रस्त्यानें जाऊं नये म्हणून मुसलमानांनी अडथळा केला या प्रकारावरून सर्व हिंदूंचीं मनें दुखावल्यावरून त्यांची त्याच दिवशीं सभा झालीं. सभेंत बुधवार ता. ११-९-१९२९ रोजीं सर्व मेळ्यानें जमावानें मुसलमानांच्या वस्तींतून जावें असें ठरलें.

त्या सभेंत रा. भातनकर ह्यांना ब्राह्मण वगैरे मंडळींनी प्रश्न केला की, तुम्ही अस्पृश्य लोक आम्हाला मदत करणार किंवा नाहीं? भातनकरांनीं सर्व अस्पृश्यातर्फे उत्तर दिलें कीं, आम्ही हिंदुधर्माकरितां मरायला तयार आहों. तुम्ही जेव्हां हाक माराल तेव्हां आम्ही हिंदू धर्माच्या मदतीला येण्यास तयार आहो. परंतु तुम्ही आमच्या हक्काकडे दुर्लक्ष करतां कामा नये, असें म्हटल्यावर सर्व हिंदू पुढारी

म्हणालें कीं, आम्ही तुमचें हक्क तुम्हाला आजपासूनच दिलें आहेत. तुमचा प्रश्न आम्ही सभेला येण्यापूर्वीच सोडवून ठेवला आहे. त्याची काळजी करू नका. इकडे मामलेदार साहेबानीं कलेक्टर, प्रांत व डी. एस. पी. ह्यांना तारा केल्या. त्याप्रमाणें कलेक्टर, प्रांत व डी. एस. पी. आर्मस् पोलीससह येऊन हजर झालें. एक हजार अस्पृश्यबंधूही रा. भातनकरांच्या हाकेसरसे मिरवणूकीला हजर झाले. स्पृश्य-अस्पृश्य बंधूंची दहा हजार लोकांची मिरवणूक मोठ्या तोऱ्यानें मुसलमान वस्तींतून व मशिदीवरून पार पडली. हिंदु-लोक आनंदातिशयानें बेहोष झाले. परंतु अस्पृश्यांचे दुर्दैव ओढवलें ! गुरूवारीं सकाळीं मामलेदार साहेबांनीं १४४ कलमाखाली नोटीस काढून, ती रामकृष्ण भातनकर यांजवर बजाविली. त्या नोटिशींत असें म्हटलें होतें कीं, वडाळी तळ्याचे देवघाटांवर गणपती विसर्जन करण्यास हरकत नाहीं. परंतु बल्लाळेश्वराचे देवळाच्या खाजगी जागेंतून जाऊं नये. गेल्यास १८८ कलमाखाली खटला भरण्यांत येईल. या नोटिशींनें सर्व हिंदु विचारांत पडले व सर्वांनीं रा. भातनकरांना आश्वासन दिलें कीं, आम्ही सर्व लोक आज तुमच्या गणपती विसर्जनाला येणार. तुम्ही कांहीं काळजी करूं नका. पनवेल म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष आत्मारामशेठ आटवणे यांनीं वचन दिलें कीं, जेथें अस्पृश्याच्या गणपतीचें विसर्जन होईल तेथेंच माझ्या गणपतीचें मी विसर्जन करणार. झाले संध्याकाळीं ४ वाजतां अस्पृश्यांचा बाळ सुधारक मेळा व गणपती याची मिरवणूक श्री. शिवतरकर व सुभेदार शिरावले यांच्या पुढारीपणाखालीं निघाली.

मिरवणूकींत अस्पृश्यांचे स्थानिक पुढारी रा. बळीराम भातनकर, रामकृष्ण भातनकर, व यशवंत भातनकर, विष्णू पोशीरकर वगैर मंडळी होती. मिरवणूक शंकरराव पत्की वकिलांच्या घरासमोर आल्यावर त्यांनी मेळ्याचें मोठ्या प्रेमानें स्वागत केलें. नंतर पत्की वकील, रेंजर गुप्ते, जोशी वकील वगैरे का. प्रभु मंडळी व मराठे व गुजराथी बंधु यासह मिरवणूक श्री. आटवणे शेठच्या घरासमोर आली. मिरवणूक त्यांच्या घरासमोर आल्याबरोबर त्यांनी बंदुकीचे बार करून मेळ्याचें स्वागत केलें. नंतर त्यांनीं आपला स्वतःचा गणपती व इतर गणपती मिरवणूकीबरोबर घेतले. तेथें जोशी वकील वगैरे ब्राह्मण ब्राह्मणेतर लोकांचा समुदाय मिरवणूकीबरोबर वाढत चालला होता. शेवटीं मिरवणूक बल्लाळेश्वराच्या देवळासमोर आल्यावर, त्या देवळाचे इंग्रज सरकारचे पायपेड भट पुराणिकशाहीचे बगलबच्चे दोन तीन पुढें येऊन म्हणूं लागले कीं, आपण तडजोड करूं या. तुमचा गणपती देवळाच्या मनाई केलेल्या जागेच्या शेवटापर्यंत आणा. तेथें आरती करा, आणि मग तेथून आम्ही देवघाटावर आमच्या हातानें तुमच्या गणपतीचें विसर्जन करूं ही तडजोड रा. शिवतरकर, रा. भातनकर, जोशी आणि पत्की वकील यांनीं कबूल केली नाहीं.

स्पृश्य हिंदुलोक देखील ब्राह्मण पंचांचा तिरस्कार युक्त भाषेंत निषेध करूं लागले शेवटीं शिवतरकर यांनीं ब्राह्मण पंचांना स्पष्ट सांगितलें कीं, आम्ही सर्व अस्पृश्य लोक आमच्या गणपतीचें विसर्जन तळ्याचें देवघाटांवरच करूं. आम्ही कॉंग्रेसमध्यें शिरणारे व स्वराज्य मागणारे ब्राह्मण हे कोणत्या अंतःकरणाचें असतात हें जाणून आहोत. म्हणून आम्ही नासक्या मेंदूच्या लोकांबरोबर तडजोड करूं इच्छित नाहीं. लागलीच आटवणे शेठ यांनीं होडी मागविली; व त्या होडींत आटवणे शेठचा व रामकृष्ण भातनकर आणि इतरहि अस्पृश्यांचे गणपती व गौरी बसविल्या व देवघाटावर नेल्या. तेथें देवघाटावर गणपती होडींतून उतरल्याबरोबर सर्व हिंदूंनीं प्रचंड टाळयांचा गजर केला, व गजानन महाराज की जय, शिवाजी महाराज की जय. डॉ. आंबेडकर महाराज की जय करुन गणपतीचें विसर्जन केलें. नंतर अस्पृश्यांनीं घरुन तयार करून आणलेला प्रसाद सर्वांना वाटला, त्यावेळीं सर्व हिंदु जनता अशिक्षित कुणबीसुद्धां देवळाचें पंच ब्राह्मणांचा धिःकार करूं लागलीं. व म्हणू लागली की ब्राह्मण आपल्या जातीवर गेलें.

रात्रौ पानसुपारीचा समारंभ सर्व मेळेवालें व स्पृश्य-अस्पृश्य हिंदुबंधुकरितां ठरविण्यांत आला. पानसुपारीस मे. मामलेदारसाहेब, आटवणे शेठ, मेसर्स पत्की व जोशी वकील, वेदक, पाटील, मेघजी, बाळासाहेब पटवर्धन, गुप्ते वकील, मोहनलाल शेठ, संभू शेठ वगैरे गुजराथी व महाराष्ट्रीय हिंदु पुढारी हजर होते. अस्पृश्यही महार चांभारासह फार मोठ्या जमावानिशी होते. त्यावेळीं मेसर्स शिवतरकर, पाटील, जोशी, गुप्ते, आटवणे शेठ व मामलेदारसाहेब यांची भाषणें झाल्यावर समारंभ संपला. त्यावेळीं रा. शिवतरकर यांनीं जाहीर केलें कीं, यापुढें आम्ही दरवर्षी गणपती विसर्जन देवघाटावरच करीत जाऊं.

बहिष्कृत भारत, ता. ४ ऑक्टोबर १९२९.

परिशिष्ट-११

पर्वती देवस्थानाच्या पंचांना विनंती

महाराष्ट्रातील सर्व देवळांच्या मालकांना व चालकांना मी केलेल्या जाहीर विनंतीस अनुसरून ठिकठिकाणाहून उत्तेजनपत्रे मजकडे येत असून काही ठिकाणी माझी सूचना लवकरच प्रत्यक्षपणे अंमलात आणण्याविषयी जातीने तयारी चाललेली आहे, व यामुळे देवळांच्या बाबतीतील अस्पृश्यपणाचे निवारण पूर्णपणे चार-दोन वर्षात झाल्याविना खास राहत नाही, अशी उमेद वाटू लागलेली आहे.

खुद्द पुणे शहर व त्यालगतचा टापू यात मुख्यतः पर्वती देवस्थानाबद्दल मोठा बोलबाला आहे. विशेषतः दरवर्षी श्रावण महिन्यातील सोमवारी या देवस्थानाचे नाव आबालवृद्धांच्या तोंडून ऐकू येत असते. पर्वती देवस्थान सार्वजनिक स्वरूपाचे असून त्याची व्यवस्था पंचामार्फत होत असते. सुदैवाने सदर देवस्थानाचे सध्याचे पंच सुशिक्षित व देशकालपरिस्थिती जाणणारे असे आहेत. हिंदूधर्मीयांमध्ये या देवस्थानाचा नावलौकिक होण्याविषयी पंचांची अहर्निश खटपट चाललेली असते, इतकेच नव्हे, तर परधर्मीय अधिकाऱ्यांचीही सहानुभूती मिळविण्यासाठी पंच मंडळी नेहमी दक्ष असते.

हिंदू समाजापैकी अस्पृश्य गणलेले पोटसमाज हिंदुधर्मीय असल्याबद्दल पंचांना पूर्ण जाणीव आहे, असे समजण्यास हरकत नाही. पर्वतीच्या पायऱ्या चढताना एक लहानसा पीर ज्या देवस्थानच्या हद्दीत दृष्टीस पडतो व जो पंचांना सहन करवतो, ते देवस्थान व त्याचे पंच स्वधर्मीयांबद्दल असहिष्णु असण्याचा संभव दिसत नाही. अस्पृश्य समाजाची अस्पृश्यता घालवून टाकण्याविषयी सर्व राष्ट्रीय पुढाऱ्यांची जी एका सुराने विनवणी चाललेली आहे, तिचा ध्वनी-प्रतिध्वनी पंचांच्या कानावर गेलेला असून त्याचा पडसाद त्यांच्या अंतःकरणात उमटत असलाच पाहिजे. सध्याची पंच मंडळी स्वार्थत्यागी, कर्मनिष्ठ व धडाडीची असल्याबद्दल त्यांची ख्याति आहे.

म्हणून, या पत्राद्वारे मी त्यांना अशी जाहीर विनंती करण्याचे धाडस करतो की, त्यांनी सर्व दृष्टीने पोक्त विचार करून, देवस्थानाच्या आवारात अस्पृश्यास्पृश्य भेदभाव यंदापासून नष्ट करावा, व सर्व देवस्थान व देवता सर्व हिंदुधर्मीयांना

खुल्या कराव्यात, व त्यांच्या धन्यवादाचे धनी व्हावे ! सर्व हिंदू जनता त्यांच्या या कृत्याबद्दल व धैर्याबद्दल त्यांचा गौरव करील, एवढेच नव्हे तर पुढील अनंत हिंदू पिढ्यांची कृतज्ञता ते निःसंशयपणे संपादन करतील !

ल. ब. भोपटकर

• • •

(केसरी, ता. २७ ऑगस्ट १९२९ ; 'सारसंग्रह अर्थात् केसरीचे छोटे फाईल, वर्ष १९२९.' पान ३६४.)

उद्‌धृत : गणवीर, पृ. ५४४.

३५

परिशिष्ट-१२

पर्वतीवरील अस्पृश्यांचा सत्याग्रह

पर्वतीच्या टेकडीवरील देवालयांत जाण्याचा अस्पृश्यांचा सत्याग्रह सुरू होणार, या बातमीमुळे आक्टोबर रविवार ता. १३ रोजीं सकाळपासूनच पुणें शहराच्या निरनिराळ्या भागांतील लोकांत मोठी खळबळ उडाल्याचें स्पष्ट दिसून येत होतें. ज्याच्या त्याच्या तोंडी हाच विषय निघत होता. रविवारी सकाळीं सात वाजण्याच्या पूर्वीच

पर्वतीच्या टेंकडीकडे लोकांचा लोंढा

चालूं लागला होता. भिकारदास गेट, चिंचेची तालीम, स्वारगेट, वगैरे शहराच्या दक्षिणेकडील विविध मार्गांनी लोकांचें थवेच्या थवे पर्वतीच्या पायऱ्याकडे लोटूं लागल्यामुळें एकाद्या यात्रेसारखाच देखावा सर्वत्र दिसूं लागला. श्रावण महिन्यात शेवटच्या सोमवारीहि जेवढीं गर्दी होत नसेल, तेवढी आज त्या ठिकाणीं दिसूं लागल्यामुळें आज त्या ठिकाणीं कांहीं तरी विशेष प्रकार घडणार हे उघड दिसत होतेंच. आठ साडेआठच्या सुमारास सुमारें दोन अडीचशें अस्पृश्य मंडळी व त्यांना सत्याग्रहाच्या कामीं अंतःकरणपूर्वक सहाय्य करणारी कांहीं अस्पृश्य मंडळीहि पर्वतीच्या पायथ्यावर धर्मशाळेनजीक जेथें एका नवीन देवालयाचें बांधकाम चालूं आहे त्याच्या पुढील पर्वतीच्या बाजूकडील खुल्या जागेंत ही मंडळी जमली होती. साडेआठ नऊ वाजण्याच्या सुमारास अस्पृश्यांची

एक दिंडी भजनीही

लष्करहद्दींतून पर्वतीच्या पायथ्याजवळ सत्याग्रही मंडळींना मिळण्याकरितां आली. रा. थोरात, [महार] रा. लांडगे [मांग] वगैरे पंचवीस तीस मंडळी व

अस्पृश्य समाजांतील कांहीं स्त्रिया

या दिंडीसह तेथें येऊन पोहोंचल्या. वाटेंत मधूनमधून मृदंग पेटीच्या तालसुरावर भजन म्हणत व

'छत्रपति शिवाजी महाराज कीं जय,'

'चोखा मेळा कीं जय,'

असा जयजयकार करीत दिंडीने लोक पर्वतीच्या पायथ्यापाशीं येऊन तेथें हजर असलेल्या सत्याग्रही मंडळींत मिळाले.

इकडे सत्याग्रहास विरोधी असलेले व कोणतीच बाजू न घेतां केवळ कुतुहलपूर्वक काय प्रकार घडतो हें पाहण्याकरितां जमलेले शेकडों लोक पर्वतीच्या पायऱ्या चढून वर जात होतें. यावेळी उन्हाची तिरीप बरींच लागत होती, त्यामुळे पर्वतीच्या पायथ्याजवळील झाडाझुडपांच्या व घरांच्या सावलीतील सर्व जागा लोकांनी अगदी गजबजून गेल्या होत्या. पायऱ्यावर लोकांची रहदारी सारखी चालूच होती. वाटेंत श्रांत लोकांना बसण्याकरिता म्हणून वळणावळणांवर जेथे कायमची लोखंडी बाके ठेविलेली आहेत, त्या सर्व ठिकाणी

स्पृश्यांच्या टोळ्या जागा धरून बसून राहिल्या

होत्या. पर्वतीच्या मुख्य देवालयाकडे जाण्याकरितां दगडी नंदीजवळ जें शेवटचें वळण लागतें तेथें तर लोकांची फारच मोठी गर्दी

पर्वतीवर जाण्याचा रस्ता बंद करून

बसली होती. कोणी छत्र्या उघडून रस्त्याच्या दोन्हीं बाजूकडील बैठ्या बुरूजावर दाटीनें उभे होते, तर बरेच लोक त्या ठिकाणच्या पायऱ्यांवर खेटून बसले होतें.

पुण्याचे कलेक्टरसाहेब मि. गुल्ड, असि. कलेक्टर मि. इझॅकेल, रा. हसबनीस मामलेदार व आणखी कांही अधिकारी सकाळीं अगदी आधीपासून पर्वती टेकडीच्या माथ्यावर जाऊन तेथील सर्व बंदोबस्त पहाण्यासाठी हजर झाले होतें. सत्याग्रह्यांना अडविण्यासाठीं ट्रस्टीमंडळींनी आदल्या दिवसापासूनच

पर्वतीवरील सर्व देवालयांचे दरवाजे बंद

करून त्यांना कुलुपें लावल्यानें आंत अस्पृश्य अथवा अस्पृश्य यापैकी कोणाचाच तेथें प्रवेश होण्यासारखा नव्हता. पर्वतीवरील मुख्य जें श्री महादेवाचें देवालय त्याचे दरवाजे आंतून अगदी बंद केलेले होते. या मंदिरांतील महादेवास

श्रीदेवदेवेश्वर

हें नांव प्राचीन काळापासून रूढ होते. व ऐतिहासिक कागदपत्रांत याच नांवाने या देवस्थानाचा उल्लेख आढळतो, पण अलीकडे हें नांव मागें पडले असून पर्वतीचें देवालय याच नांवानें तें देवस्थान सामान्यतः ओळखलें जातें. पर्वती टेकडीच्या माथ्यावरील सपाटीवर श्रीविठ्ठलरखुमाइ, कार्तीकेयस्वामी, व श्रीविष्णू यांची जी देवालयें आहेत तींहि सत्याग्रहापूर्वीच म्हणजे शनिवारपासून अगदी बंद असून तेथे रक्षणासाठी ट्रस्टींच्या विनंतीवरून

शनिवार पासून पोलिसांचा पहारा

बसलेला होता. रविवार सकाळी तर रा. पाटील फौजदार हे आणखी कांही पोलिस अधिकारी व सुमारें चाळीस पन्नास पोलिसांची तुकडी घेऊन तेथे आले. ठिकठिकाणी बंदोबस्त करीत ते हिंडत होते. नऊ वाजून सूर्य जसजसा वर चढूं लागला तसतशीं उन्हाची तिरीप अधिकच वाढूं लागली व इकडे सर्व जातीच्या स्पृश्यांची गर्दीही वाढून

सुमारे तीन चार हजार

इतका लोकसमुदाय पर्वतीवर दिसूं लागला. प्रथम यापैकी बरेच लोक पर्वती देवालयाच्या

महाद्वारापुढें गर्दी करून

बसून राहिलें व कित्येकांनीं नगारखान्याकडे जाण्याचा जो दगडी जिना आहे तोही पूर्णपणें व्यापून टाकिला, पण कांही वेळानें पोलिस अधिकारी तेथे आले व त्यांनी ही

जागा खाली करून तेथून निघून जाण्याचा हुकूम

नगारखान्याखालच्या मंडळींना फर्माविला. त्याबरोबर लोक तेथून हळूं हळूं निघून गेले व महाद्वाराच्या पुढील पायऱ्या व नगारखान्याच्या तळमजला हा मोकळा झाला. ह्या वेळपर्यंत

कलेक्टर मि. गुल्ड हे नानासाहेब पेशव्यांच्या स्मारक मंदिरापुढे

मोकळ्या जागीं झाडाच्या छायेत खुर्ची टाकून सभोवार अवलोकन करीत बसलेले होते. कलेक्टर साहेबांचे पर्सनल असिस्टंट मि. इझीकेल, इन्स्पेक्टर मिल्स, रा. पाटील फौजदार व रा. हसबनीस मॅजिस्ट्रेट वगैर अधिकाऱ्यांचीहि येथें येजा चालू होती व त्यांची आपसात बोलणीही चालू होती. नंतर कलेक्टरसाहेब तेथून निघून मुख्य देवालयाच्या महाद्वारापुढील फरसबंदीवर आले. या ठिकाणाहून पर्वतीच्या पायऱ्यांचा मार्ग खाली बराच लांबपर्यंत दिसण्यासारखा असल्यामुळें कलेक्टरसाहेबानें उभें राहण्याकरिता ही जागा पसंत केली असावी असें वाटतें. सरकारी अधिकारी व पोलीस यांचा बंदोबस्त याप्रमाणे जय्यत होता. इकडे श्रीविष्णुच्या देवालयापुढें बंद करता येण्यासारखे दरवाजे किंवा फाटकही नसल्यामुळे

वेळूंची दांडकी आडवी बांधून तेथील मार्ग बंद

ठेवण्यांत आला होता. त्यामुळें लोकांना आंत जातां येत नव्हतें. पण एक कुलुंगे कुत्रें मात्र बिनहरकत प्रवेश मिळून महाविष्णूच्या मंदिरापुढील फरसबंदीवर स्वस्थ बसलेले दिसत होतें. त्याला आत बसलेलें पाहून मज्जाव झालेल्या स्पृश्य लोकांच्या तोंडून कांही तरीं उद्‌गार निघत. कोणी म्हणें कीं,

कुत्र्याला जेथे प्रवेश आहे तेथे स्पृश्यांनाहीं नसावा काय ?

तर कोणी 'श्वानो युवानो मघवान' या सुत्राची आठवण करून तेथून परत फिरत. इकडे पायऱ्यांचा मुख्य रस्ता टेकडीच्या माथ्याजवळ जेथें संपतो तेथें लोकांची अगदी हुल्लड माजून राहिली होती व कित्येक

फोटोग्राफर आपले कॅमेरे सजवून

गर्दीचे व देवालयाच्या भागांचे निरनिराळ्या ठिकाणांहून फोटो घेण्यात गर्क झाले होते.

पर्वतीच्या पायथ्याशीं बसलेले सत्याग्रही

हे यावेळीं शांततेनें व शिस्तींने वागण्याबद्दल एकमेकांस सांगत होते. अस्पृश्य सत्याग्रहांत बरेच स्पृश्य लोकही सामील झाले होते. अस्पृश्यांच्या भजनी मेळ्याकडून सतत हरीनामाचा गजर चालू होता. रा. श्री. रा. थोरात यांच्या भजनी दिंडीने तर बहारच करून सोडली; हा एकंदर देखावा मनोरम होता; मंदीरप्रवेशाविषयी उत्सुक झालेल्या अस्पृश्य बांधवांचे चेहऱ्यावर एक प्रकारचें अभिनव तेज दिसत होते.

भजनरंगानंतर भाषणांना सुरवात

झाली. रा. शिवराम जानबा कांबळे, रा. राजभोज, रा. थोरात, वगैरे अस्पृश्य पुढाऱ्यांची हृदयस्पर्शी भाषणें होऊन सर्व बांधवांना शांततेनें व शिस्तीनें वागण्याविषयीं त्यांनी कळकळीची विनंती कली; 'आम्ही आपल्या शब्दाबाहेर बिलकूल नाही ' अशा आशयाचा आरोळ्या उमटूं लागल्या; रा. राजभोज यांनी आपल्या भाषणांत, सत्याग्रहाविरोधी सकट प्रभृति मंडळीचा निषेध कला; व इंगळे, लांडगे प्रभृति प्रमुख मातंग ज्ञातीतील मंडळींनी आपणांकडे एक पत्र धाडलें असून 'सकट वायदंडे ' यांजवर ज्ञातीतील मंडळींचा विश्वास नाहीं असे कळविलें असल्याचें सांगितलें. नंतर रा. थोरात म्हणाले कीं, केसरींत पासष्ट सह्यांचे तें पत्र छापलें आहे त्या खालीं माझी सही आहे; परंतु तें पत्र केसरींत छापण्याकरिता पाठविण्यात येईल असें मला वाटलें नाहीं. केवळ आमच्यांतील

वैयत्तीक मतभेदामुळें मी त्या पत्रकावर सही दिली होती; पण कृपा करून माझ्याविषयीं कोणी गैरसमज करून घेऊ नये, मी सत्याग्रहाचा पूर्ण पुरस्कर्ता आहें, मी व माझी बायको सत्याग्रहांत सामील झालों आहों. मी ही चळवळ यशस्वी व्हावी म्हणून दोन रुपयांची मदत करीत आहे. दुसरी आनंदाची गोष्ट कीं, लष्करांतील एक गुजराथी व्यापारी छगनभाई भिकाभाई बिडी मर्चंट यांनी सत्याग्रहास मदत म्हणून रु. ५ ची देणगी दिली आहे. याप्रमाणे रा. थोरात यांचे भाषण झाल्यावर रा. न. वि. गाडगीळ यांचे भाषण झालें. अस्पृश्यांना सहानुभुति दाखविण्याबद्दल त्यांनी स्पृश्य मंडळीना विनंती केली. याप्रमाणे भाषणे झालीं.

सत्याग्रहप्रसंगी अस्पृश्य समाजांतील पुढील मंडळी हजर असलेली दिसत होती. रा. पां. ना. राजभोज, शिवराम जानबा कांबळे, मिसेस तानुबाई कांबळे व त्यांची कन्या मिसेस शेवंतीबाई ओगळे, स. कं. चे उपाध्यक्ष लांडगे, ज. स. रणपिसे, श्री. रा. थोरात, आर. के. कदम, वगैरे सुमारे २५० अस्पृश्य स्त्री-पुरूष मंडळी पायथ्याशी एकजुटीनें व शांततेने जमा होऊन उभी होती. सत्याग्रही मंडळींनी पर्वतीचा मार्ग आक्रमिण्यास प्रथम १२ लोकांची तुकडी निवडली. तींत चार स्त्रिया होत्यां, नंतर तीन तीन माणसांच्या अशा चार तुकड्या करण्यांत आल्या, त्या पुढीलप्रमाणें :—

पहिली तुकडी

रा. गाडगीळ, राजभोज, भुस्कुटे.

दुसरी तुकडी

कांबळे यांच्या पत्नी, कांबळे यांची कन्या.

तिसरी तुकडी

कांडगे, कोथळेकर, स्वामी योगानंद.

चौथी तुकडी

ईश्वरा, भाऊ वाघचौरे, कोथळेकर यांच्या मातोश्री.

पांचवी तुकडी

पैसाफंड रानडे सर्वाच्या मागें

चालत होतें. याखेरीज रा. केशवराव जेधे, रा. रा. माधवराव श्रीपतराव शिंदे, मजूर चे संपादक रा. लाड वगैरे ब्राह्मणेतर पक्षाची मंडळीही सत्याग्रहास मदत करण्यासाठीं तेथें हजर होती. नऊ वाजण्याचा सुमार झाला तेव्हां

पर्वतीच्या तळाजवळील पायऱ्यांवरून जयजयकाराची गर्जना ऐकूं आली व सत्याग्रही मंडळी वर येण्यास निघाल्याचा इषारा सर्वांना त्या योगें सहजच मिळाला. सत्याग्रहीलोक हळू हळू वर चढू लागले तसतशी रस्त्याच्या बाजूनें व आसपासच्या डोंगराळ भागांत उभे असलेल्या स्पृश्य लोकांच्या टोळ्यातून विरोधी गर्जना व हातवारे सुरुं झाले. सत्याग्रहींची निर्भत्सना जोरानें होऊं लागली.

ही महारें देवळांत कशी घुसतात पाहूं

असेही धमकावणीचे उद्‌गार कित्येकांच्या तोंडून निघत. असें होतां होतां सत्याग्रह करणारी

"रा. भुस्कुटे, राजभोज, गाडगीळ, लांडगे, प्रभृति मंडळी"

दगडी पायऱ्यांचा बहुतेक मार्ग चढून वर अगदीं शेवटच्या वळणाजवळ आली व तेथें मात्र

सनातनी स्पृश्य टोळ्यांचा विरोध

फारच वाढल्यामुळें त्यांना पुढें एकही पाऊल टाकणें अशक्य झालें. सत्याग्रही लोकांना धमक्या देणाऱ्या गर्जना निघूं लागल्या. इतकेंच नव्हें तर अंगाशीं लगट करून प्रत्यक्ष

खालीं रेटण्याचाहि सपाटा

सुरूं झाला. याप्रमाणें दंगल माजतांच सत्याग्रही लोकांना वर जाण्याचा मार्ग तर अजिबात बंद झालाच, पण त्यांना त्या ठिकाणी ऊभें राहणेही अशक्य झाले. साध्या

रेटारेटीचें रूपांतर मारहाणींत

होण्याला फारसा उशीर लागला नाहीं. कित्येक चवताळलेले सनातनी स्पृश्य सत्याग्रही (म्हणजे रा. नरहरपंत गाडगीळ व रा. विनायकराव भुस्कुटे) यांना लाथा बुक्या मारूं लागले, तर कित्येकांनी एकमेकास त्यांच्या अंगावर ढकलण्याचा

गांवगुडी खेळ

सुरू केला. सत्याग्रही मंडळी अत्यंत शांतपणानें हा प्रकार सहन करीत होती. पायऱ्यांच्या वरील बाजूस रा. नारायणराव गुंजाळ, रा. विश्वासराव डावरे, श्रीमंत आप्पासाहेब गद्रे, रा गो. पा. महाजन, रा. बाबूराव फुले, रा. गणपतराव देवधर, डॉ. जेजूरीकर, रा. झांजले, रा. नलावडे, रा. देडगांवकर

वगैरे सनातनी मताची पुढारी मंडळी इकडे तिकडे वावरत होती. त्यांच्याच पलिकडे दहाबारा पायऱ्याखालील भागांत एकच दंगल माजून राहिली होती. एकंदर परिस्थिती अत्यंत बिकट होण्याची चिन्हें दिसूं लागली. सनातनी मंडळी रेटारेटी करून गाडगीळ, भुसकुटे, राजभोज, लांडगे यांना

पायऱ्यावरून खाली निवडुंगांत पाडण्याचा प्रयत्न

करीत होती. त्यावेळीं या मंडळीचा कडेलोट होणार कीं काय अशी क्षणभर भीती वाटली. पण रा. गाडगीळ व रा. भुस्कुटे हे जोरानें उठून उभे राहून पुनः सत्याग्रहाला प्रवृत्त झाले. यावेळीं

देवळांतून मोठा दगड रा. राजभोजांचे खांद्यावर

येऊन धडकला. त्यामुळे ते विव्हळ झाले. निवडुंगाच्या फड्यांचाही प्रसाद सर्व मंडळीना मिळाला. पण त्याला बिलकूल दाद न देतां सत्याग्रही मंडळी सनातन्यांना तोंड देऊ लागली. यावेळी लहान सहान दगड फेकण्यांत येत होते.

कांही सनातन्यांनाही दगडाचा प्रसाद

मिळाला, पण तो त्यांच्याच पक्षाकडून त्यांना मिळाला. सत्याग्रही मंडळी चिकाटी सोडत नाहींत, हें पाहून सनातनी चिडल्यासारखे दिसले. यावेळी सूर्यकिरण बरेंच प्रखर होऊं लागलें होते. इतक्यांत यावेळी

रा. राजभोज हे मूर्च्छीत पडले

असल्याची बातमी आली. त्यांना डोक्यावर, मानेवर व इतर ठिकाणीही बराच मार लागल्यामुळें त्यांना अखेरीस मूर्च्छा आली व कांही लोकांनी त्यांना तेथून हालविण्याचा प्रयत्न केला.

देशदास रानडे

हे नेहमींप्रमाणें बोडके व अंगावर फक्त एक गादीचे वस्त्र पांघरून आले होते, व त्यांच्या उघड्या अंगावरही काठ्या, छत्र्या, दगड, विटा वगैरेचा बराच मार लागला.

रा. न. वि. गाडगीळ

वकील यांचेवर दंगेखोर गुंडांचा विशेष रोख दिसत होता. त्यामुळे त्यांनाही बरीच मारहाण सहन करावी लागली. फेकलेले दगड लागल्यामुळें त्यांचे पाय रक्तबंबाळ झाले, तीच दशा रा. भुस्कुटे इतर सत्याग्रहींची झाली; पण सत्याग्रहींनी प्रतिकार केला नाही. अभिनंदनीय शांततेनें त्यांनी तें सहन केलें. गुंड

लोकांच्या घोळक्यांने सत्याग्रह्यांचा वर जाण्याचा मार्ग अजिबात बंद करून त्यांना खाली रेटण्याचा सपाटा चालविला व अखेर ही मंडळी मुख्य रस्त्याच्या डाव्या बाजुस फुटणाऱ्या कच्च्या पायवाटेकडे वळली. पण तेथेंही मारहाण चालूंच होती. पायऱ्यांच्या रस्त्याच्या दुतर्फा शिताफळींची बरीच झाडें आहेत व "झाडाच्या फळास कोणी हात लावूं नये, तसे केल्यास कायदेशीर इलाज केला जाईल" अशा अर्थाच्या पाट्याहि भिंतीवर लाविलेल्या होत्या तथापि त्या व्यर्थ ठरून सत्याग्रही लोकांवर दोन्हीं बाजूंनीं

कच्च्या शिताफळांचा मारा

होऊं लागला. सत्याग्रहविरोधी पक्षांतील कांही लोक मौज पहाण्याकरितां सोईस्कर जागा म्हणून आधींच झाडावर चढून बसले होते. त्यांनी जवळच्या फांद्यांची कच्ची कठीण शिताफळें तोडून तीं फेंकण्याचा उपक्रम केला व नंतर लौकरच दगडविटांचाही संचार आकाशांत दिसूं लागला. भगवी वस्त्रें परिधान केलेले एक

आर्यसमाजी स्वामी योगानंद

सत्याग्रहींच्या बाजूनें वर चढत होते. त्यांना लोकांनी वाटेंत अडविलें व एकानें त्यांच्या डोक्याचा भगवा फेटा उडवून दिला. त्याबरोबर स्वामी दंगलमस्ती करणाऱ्या लोकांना झिटकारून मोकळें झालें. व तेथेंच पायरीवर, न हलण्याच्या इराद्यानें बैठक मारून बसले. लागलाच त्यांच्या भोवती दंगेखोरांचा गराडा पडला व त्यांतील एकजण स्वामींची समजूत घालून त्यांना फिरण्याचा सल्ला देऊ लागला. स्वामीचा निश्चय ढळेना इतक्यांत कोणी

स्वामींना उचलून पायऱ्यांखाली लोटून दिले.

त्यामुळे ते तीन चार पायऱ्या घडगडत खाली गेलें व पुन्हा सांवरून वर चढूं लागले तोच पुन्हां त्याना कोणी

खाली ढकलून दिलें

याप्रमाणें बराच वेळ मारामारी चालली असतां पोलिस देवळाकडील भागाहून खालीं आले व त्यांनी हे प्रकार थांबविण्याचा प्रयत्न चालविला, खुद्द कलेक्टर व त्यांचे पर्सनल असिस्टंट हेंही ऐन गर्दीच्या जागीं पायऱ्यांवर आले व त्यांनी दंगेखोर लोकांची समजूत पाडून त्यांना शांत केलें. पण एके ठिकाणी शांतता करावी तर दुसरीकडे गडबड होऊन मारपीट होई असा प्रकार चालला होता. अखेर पोलिस अधिकाऱ्यांनी

रा. गाडगीळ, राजभोज प्रभृति

सत्याग्रहींना दंगेखोरांच्या कचाटींतून सोडवून संगिनी धारण करणाऱ्या सात आठ पोलिसांच्या संरक्षणाखालीं वर देवळाच्या दरवाजाकडे नेले. पण तसें करण्याच्या आधीं थोडा वेळ देवालयापर्यंतचा

पायऱ्यांचा रस्ता सार्वजनिक आहे

असा कलेक्टरचा जाहीरनामा पुकारण्यांत आला. हा रस्ता सार्वजनिक असल्यामुळें त्यावरुन जाणाऱ्या सत्याग्रहींना कोणीही प्रतिबंध करुं नये असें मे. कलेक्टरनीं जाहीर करतांच पायऱ्यावरील गर्दी हळूंहळूं कमी होऊं लागली. तथापि कदाचित अजूनही त्रास देतील अशी भीति असल्यामुळे पोलिसांच्या संरक्षणाखालींच सत्याग्रही लोकांना वर जावें लागलें. पण पोलिसांचे संरक्षण सत्याग्रही मंडळीनीं मांगितलें नव्हतें. ही मंडळी वर जाऊन पहातात तों श्रीदेवदेवेश्वराच्या मंदिराचें

महाद्वार अजिबात बंद

असल्याचें त्यांच्या दृष्टोत्पत्तीस आलें. तेव्हा ही मंडळी

पायरीवर साष्टांग नमस्कार

घालून खालीं परत फिरली. रा. राजभोज फारच थकले होते, त्यामुळें गाडगीळ यांच्या खाद्यांवर मान टाकून ते डोळे मिटून एकएक पायरी कशीबशी खालीं उतरत होते. रा. गाडगीळ व इतर मंडळींही मार लागल्यामुळें बरीच थकलेली होती.

पर्वतीवरुन खाली उतरतेवेळीं सत्याग्रही मंडळीबरोबर आंठ-दहा पोलिस होते बहुधा त्यामुळेंच त्यांना यानंतर लोकांकडून प्रत्यक्ष उपद्रव झाला नाही. तथापि दुतर्फा लोकांतून धिक्कारप्रदर्शन आरोळ्या मात्र एकसारख्या उठत होत्या.

याप्रमाणे राजभोज, गाडगीळ प्रभुति मंडळी खाली पायऱ्याशी पोहोंचल्यावर त्यांना

रा. मानुरकरांच्या मोटारींतून

घरी नेण्यात आलें. रा. राजभोज यांना बराच मार लागल्यामुळें त्यांना उपचारासाठी इस्पितळांत ठेवणें जरुर होतें. म्हणून

रा. राजभोज यांना पर्वतीजवळील मिशन हास्पिटलमध्यें

पोहोंचविण्यात आले व रा. गाडगीळ वकील शनिवार पेठेत त्यांच्या रहात्या घरी मोटारींतूनच आले. रा. भुस्कुटे, रा. रानडे, रा. लांडगे वगैरे मंडळीही गंभीर मुद्रेनें परत गेली.

सत्याग्रहास पाठिंबा देणारी जी कित्येक मंडळी पर्वतीच्या पायथ्याजवळ बसली होती त्यांनाहि परत जातांना लोकांनी बरीच मारहाण करुन जागोजागीं बखेडा उत्पन्न केला. अस्पृश्यांच्या भजनी मेळ्याबरोबर एक तेलगू इसम आले होते. त्यांचेवर लोकांनी कालव्याच्या पुलाजवळ हल्ला करुन मारहाण केली व त्याची

बाजाची पेटी पुलाखालीं फेकली

त्यामुळे तिच्या ठिकऱ्या झाल्या. सत्याग्रही मंडळी अशा प्रकारें पर्वतीहून निघून गेल्यावर पुराणमताभिमान्यांचे थवेही विजयश्रीच्या आनंदांत घरोघरी निघून जाऊं लागले. दुपारी बारा वाजल्यानंतरही पर्वतीचे दरवाजे बंदच होतें. गावांत सर्व दिवस हाच चर्चेचा विषय होऊन बसला होता.

सत्याग्रही मंडळींचे अभिनंदन

करण्यासाठी पुष्कळ मंडळी रा. गाडगीळ, रा. भुस्कुटे, रा. राजभोज यांजकडे गेली होती. झालेला प्रकार हा सत्याग्रहाचा नैतिक विजयच होय असें या मंडळींचे स्पष्ट मत आहे. रा. राजभोज यांच्या समाचारासाठी अस्पृश्य वर्गातील मंडळी इस्पितळांत जात होती. त्यांची प्रकृती बरीच नादुरुस्त झाली आहे, पण चिंताजनक नाही. आपलें उद्दिष्ट साध्य होईपर्यंत सत्याग्रहाची ही चळवळ यापुढेही चालूं ठेवण्याचा सत्याग्रही मंडळीचा निर्धार असल्याचें रा. गाडगीळ यांनी एका मुलाखतींत जाहीर केलें.

लष्करी पलटनी बोलाविल्या

पर्वतीच्या पायऱ्यांवर सत्याग्रही लोकांना मारपीट सुरुं झाली तेव्हां दंग्याचे स्वरुप अधिक भयंकर होऊन रक्तपाताचा प्रसंग येतो कीं काय अशीही भीति उत्पन्न झाली होती. कलेक्टरसाहेबांच्या हुकुमावरुन नजीकच्या पोलिस ठाण्यावरुन फोननें संदेश रवाना झाल्यामुळें सशस्त्र लष्करी पलटणीही बोलावण्यात आल्या होत्या असें कळतें. परंतु त्यांचा उपयोग करण्याची आवश्यकता न राहिल्यामुळें त्यांची परत रवानगी करण्यांत आली.

पर्वतीवर सशस्त्र पोलिसांचा पहारा.
अजून दरवाजे बंद सोमवारची परिस्थिती.

पुणें येथील पर्वतीच्या देवालयांचें महाद्वार सोमवार ता. १३ ला बंदच होतें. देवालयापुढे सशस्त्र पोलिसांचा पहारा ठेवण्यात आला होता. देवालयांचे दरवाजे बंद ठेवल्याचा हा तिसरा दिवस होय. असा प्रकार गेल्या १५० वर्षात कधींच झाला नव्हता. ट्रस्टीपैकी कांही मंडळी पर्वतीवर गेली होती. इतरांना मज्जाव होता.

पर्वतीवर संस्थान खाजगी आहे काय ?
खाजगीपणाविरुध्द खास पुरावा.

(एका मार्मिक इतिहास संशोधकाकडून)

सध्या हा प्रश्न संस्थानच्या पंचाच्या एका लहानशा पत्रामुळें उपस्थित झाला आहे. म्हणून सरपंच श्रीमंत सरदार मुजुमदार हे एक इतिहाससंशोधक असल्यानें पंचाच्या या पत्राला ऐतिहासिक दृष्टींने महत्त्व आलेलें आहे. म्हणून या प्रश्नाचा शांतपणें विचार होणें अवश्य आहे.

रा. सरदेसाई यांची-रियासत मध्य विभाग ३ (सन १९२२ ची आवृत्ती) पृष्ठ २५७ वर पर्वती संस्थानची विस्तृत माहिती दिलेली आहे. ती पैकीं प्रस्तुत प्रकरणीं उपयुक्त तेवढी याखालीं देतो :-

" पुण्याजवळील एका सुंदर टेकाडावर

लहानसें देवस्थान पूर्वीपासून होतें

त्या ठिकाणाहून दिसणारा रम्य देखावा मनांत आणून नानासाहेब पेशव्याने तेथें एक भव्य मंदिर बांधून त्यांत देवदेवेश्वराची व चार कोपऱ्यांत चार लहान मंदिरें बांधून, त्यांत देवी, गणपती, सूर्य व विष्णु यांची स्थापना केली.

जुन्या पर्वताईची मुर्ती अद्यापी देवीच्या मंदिरात ठेविलेली

दृष्टीस पडते, शाहू छत्रपतींच्या पादुकाही पेशव्यानें देवदेवेश्वराच्या मंदिरांत ठेवल्यामुळें या पर्वतीवरील मंदिरास विशेष महत्त्व व शोभा आली." या मंदिराच्या खर्चाचा तपशील नानासाहेबांच्या रोजनिशी भाग २ ले ३४३ यांत पुढील प्रमाणें दिला आहे :-

"खर्च रु. ९,०२०

धर्मदाय पोतांपैकी

पर्वती येथें श्री देवाच्या स्थापनेस श्री देवदेवेश्वर बाण रुप्याचा महादेव वजनतोळे ६७३४ मांडीवर मूर्ती सुवर्णाच्या, उजवीकडे गणपती, डावीकडे पार्वती वजन तोळे ६८६ बाहेर गणपती पाषाणाच्या व पार्वती भवानी "

यांत धर्मादाय पोतांपैकी

असा स्वच्छ तपशील आहे आणि धर्मादाय **पोत म्हणजे खाजगी नव्हें** हें कोणीही सांगेल. अशा स्थितीत नानासाहेबांच्या **खाजगींतून हें** मंदिर बांधले

असें इतिहाससंशोधक व भारत इतिहास संशोधक मंडळाचे चिटणीस श्रीमंत मुजुमदार हे कोणत्या आधारावर म्हणतात हें त्यांनी जाहीर करावें. श्री. मुजुमदारास अनुकूल असा पुरावा त्यांच्या मंडळांत नवीन तयार तर होत नाहींना !

दुसरें, पर्वतीवर पूर्वीचें एक मंदीर होतेंच व त्या मंदीरांतील देवी अद्यापिहीं तेंथे आहेच. ती देवी तर नानासाहेबांची खाजगी नाहीं ना ! मग तिच्याही दर्शनास पंच कसे प्रतिबंध घालूं शकतात ? सारांश पंचाची ही निव्वळ दांडगाई आहे व ती जनतेनें चालू देतां उपयोगी नाहीं.

● ● ●

बहिष्कृत भारत, ता. १५ नोव्हेंबर १९२९.

परिशिष्ट-१३

वज्रसूची

भारतीय विद्वान भदन्त अश्वघोष यांनी रचलेल्या ' सौन्दरनन्द ' महाकाव्यातील पुष्पिकेत उपलब्ध ' आर्यसुवर्णाक्षीपुत्रस्य साकेतस्य भिक्षोराचार्य भदन्तास्वाघोषस्थ महाकवेर्महावदिनः कृतिरियम् ' या उल्लेखावरुन तो साकेतनिवासी सुवर्णाक्षीचा पुत्र असून महान तार्किक विद्वान महाकवी असा बौद्धभिक्षू होता असे निःसंदिग्धपणे म्हणता येते.

अश्वघोषांचा काळ व कालिदासावर प्रभाव

दार्शनिक परंपरेमध्ये त्यांचे नाव आचार्य नागार्जुन आणि आर्यदेव ह्यांच्याही आधी येते. चीनी परंपरा चरकाला कुषाण राजा कनिष्काचे चिकित्सा-गुरु आणि महाकवी अश्वघोषांना धर्मगुरु मानते. म्हणजेच अश्वघोष हे कनिष्कांचे समकालीन होते. कनिष्कांचा काळ इ.स. ७८-१०१ मानला जातो. कनिष्काच्या शासनकाळात काश्मिर मधील कुण्डलवन नावाच्या विहारात चवथी बौद्धसंगीती आयोजिली होती. या संगीतीचे उपाध्यक्षपदी महाकवी अश्वघोष विराजमान झाले होते. तीत त्रिपिटकावर लिहिल्या गेलेल्या विभाषाशास्त्राच्या संपादनकार्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. अश्वघोषांचा कालनिर्णय अत्यंत विवाद्य ठरला आहे. अश्वघोषाचा कालनिर्धारित करताना महाकवी कालिदासाचा विचार केल्याशिवाय पुढे पाऊल टाकताच येत नाही. समय ठरवताना या दोहोंचेही पौर्वापौर्वत्य दत्त म्हणून समोर उभे ठाकते. बव्हंशी पाश्चात्य व भारतीय विद्वान भदन्त अश्वघोष हे कालिदासापूर्वीच होऊन गेल्याचे सिद्ध करतात. डॉ. जॉन्सटनच्या मते, अश्वघोष पहिल्या शतकाच्या पूर्वार्धात होवून गेल्याचे दिसते. म.म. मिराशींनी आपल्या संशोधन मुक्तावलीत अश्वघोषाचे कालिदासपूर्वत्व सिद्ध केले. एवढेच नव्हे तर कालिदासावर अश्वघोषांचा प्रभाव कसा पडला तेही सप्रमाण सिद्ध करुन अनेकविध साम्यस्थळेही दाखविली आहेत. ते लिहितात, ' कालिदासाने अश्वघोषाच्या काव्याचा चांगलाच अभ्यास केलेला दिसून येईल. या अभ्यासामुळे रमणीय कल्पना व काही विशिष्ट लकबाही कालिदासाच्या काव्यात आलेल्या दिसतात.' या विधानाच्या पुष्टयर्थ ते काही उदाहरणे उद्धृत करुन पुन्हा लिहितात, ' अश्वघोषाचे दोष टाळून व मधुरवृत्तीने त्याच्या काव्यातील चांगला असाच भाग घेऊन कालिदासाने आपले

ग्रंथ रचले.' (पृष्ठ ४०) केवळ अश्वघोषाचेच कालिदासाने अनुकरण केले, एवढेच नुसते सिद्ध करुन डॉ. मिराशी थांबले नाहीत, तर शेंबवणकरांच्या, 'अश्वघोषाने कालिदासाचे अनुकरण केले 'या मताचे उपहासपूर्वक खंडन करीत म. म. मिराशींनी डॉ. सुशीलकुमार डे यांच्या मताचा नजराणा पुढे केला तो असा, 'To argue that Ashvaghosha is later than Kalidas is to presume without sufficient reason a retrogressive phase in literary evolution (The History of sanskrit literature page-124)' म्हणजेच कालिदासानंतर अश्वघोष होऊन गेला असे म्हटल्यास वाङःमयीन उत्क्रान्तीत पुच्छप्रगती झाली असे पुरेसे कारण नसताही म्हणावे लागेल. प्रा. सुर्यनारायण चौधरी यांचेही मत यादृष्टीने विचारणीय आहे. ते म्हणतात, 'बौद्धभिक्षू होने के सिवा अश्वघोष वाल्मीकि व कालिदास के कोटिका कवि था। काव्य विकास के क्रम में वह वाल्मिकि के बाद और कालिदास के पहले आता है। काव्य में जिस तरह वह वाल्मीकि का ऋणी और उत्तराधिकारी था वैसेहि कालिदास भी उसका ऋणी था।' (बुद्धचरित पृ. ६)

प्रो. कॉवेलच्या मते देखील कालिदासानेच अश्वघोषाचे अनुकरण केले. किथच्या मते तर केवळ कालिदासच नव्हे तर कवी नाटककार भास देखील अश्वघोषचे उत्तराधिकारी होते.

भदन्त अश्वघोष काव्यसंगीतशास्त्रप्रवीण असा अनन्यसाधारण बौद्धधर्म प्रसारक होते. चीनी प्रवाश्यांच्या वृत्तान्तावरुन स्पष्ट कळते की, त्याचे स्वतःचे एक संगीत मंडळ होते आणि ते संगीत मंडळ चौकाचौकातून व बाजारहाटातून बौद्ध धर्मविषयक गुढातिगूढ सिद्धांतांना काव्यरुप देऊन अत्यंत मधुर आवाजात लय आणि रागांची संगत लावून गात फिरत असत. त्यासाठी त्यांनी एकतारीसारखे वाद्य वापरात आणले होते. त्यांची गायन शैली इतकी आकर्षक आणि गोड होती की श्रोते देहभान विसरत आणि त्यांचे हृदय उचंबळून येत असे. श्रोत्यांच्या मनावर होणारा अश्वघोषाच्या गंभीर प्रवचनाचा प्रभाव वर्णितांना सियुकी (Si-Yu-Ki) म्हणतात. 'Ashavaghosha preached so eloquently that the entire congregation was moved to tears'. श्रोत्यांच्या डोळ्यात अश्रू उभे राहत. त्यांचा उपदेश ऐकूण भदन्त अश्वघोषाच्या बहुश्रुततेबद्दल बीलच्या ग्रंथात गौरवपूर्ण उल्लेख आढळतात. त्यावरुन त्यांची विविध शास्त्रपारंगतता प्रत्ययास येते. त्याला चुंबकीय वकृत्वशैलीची जोड मिळाली होती. केवळ माणसेच काय घोडे देखील त्यांचे प्रवचन चालले असताना आवाज (घोष) करीत नसत. त्यामुळे त्यांना अश्वघोष हे सार्थक नाव प्राप्त झाले असे मानले जात असे.

अश्वघोषांची ग्रंथसंपदा

कविकुलगुरु अश्वघोषांनी ' बुद्धचरित ' आणि ' सौन्दरनन्द ' या दोन महाकाव्या-व्यतिरिक्त ' महायान श्रद्धोत्पादनसंग्रह वा शास्त्र ', ' जातीभेदविध्वंसक ' ' वज्रसूचि ', ' सारिपुत्रप्रकरण ', ' सूत्रालंकार ' आणि ' गाण्डिस्तोत्रगाथा ' ह्या ग्रंथांची रचना केली आहे. सुत्रालंकारात बौद्ध धर्माचे तत्त्वज्ञान सुलभ व हृदयंगम करण्यासाठी समग्र जातककथा आणि अवदान कथांचे संकलन केले आहे.

वज्रसूची

हिऱ्याच्या सुई प्रमाणे म्हणजेच डायमंड निडल प्रमाणे सूक्ष्म दृष्टीने संचलित होत असल्यामुळे ह्या ग्रंथाला वज्रसूची असे म्हणतात. वज्रच्छेदिका किंवा वज्रसूचिकोपनिषद ह्या नावांनी सुद्धा या ग्रंथाला ओळखतात. वर्णाश्रम व जातीभेदाचे समर्थकांना ही कृती रुतणाऱ्या सुईप्रमाणे अत्यंत त्रस्त करीत असते. कारण यात वर्णव्यवस्था व जातीभेदाचे भयंकर खतरनाक पद्धतीने 'पोस्टमार्टम ' केले आहे. अठराशे एकोणतीस साली 'वज्रसूची'चे बी. एच. हॉडसन यांनी भाषांतर केले आणि नंतर डॉ. एल. विल्किसन यांनी १८३९ साली सर्वप्रथम वज्रसूचीचे संपादन केले. ह्या ग्रंथाचा मुख्य हेतू विशद करताना प्रो. संघसेन सिंह म्हणतात. " इस ग्रंथ का मुख्य उद्देश जन्म के आधार पर चातुर्वर्ण्यव्यवस्था का खंडन करना मालूम होता है । ग्रंथकार यह भी कहता है कि चार वर्ण तो ' कर्मक्रिया विशेष ' के आधारपर बनाए गए न कि जन्म के आधारपर, वह शील कि प्रधानता पर बडा जोर देता है ।" अर्थात चातुर्वर्ण्यव्यवस्थेवर मर्मान्तक प्रहार करून महाकवी अश्वघोषांनी समता व मानवतेचा पुरस्कार केला आहे. वैदिक धर्मग्रंथामधून आवश्यक ती प्रामाणिक उद्धरणे घेऊन ब्राह्मण्यवर्चस्वाचे अगदी तर्कशुद्ध पद्धतीने यात बिनतोड खंडन केले आहे. या ग्रंथात औदार्यपूर्ण दृष्टीने अखिल मानव जातीचा एकात्मता व कल्याणकारक समतेचा विचार समर्थपणे प्रतिपादिला आहे. त्यामुळेच पाश्चिमात्य देशातील विद्वानांनी हा ग्रंथ डोक्यावर घेतला आहे. पाश्चात्य समीक्षक या ग्रंथातील समताभावनेच्या समर्थनामुळे यावर अगदी मोहित झाले आहेत. अशा या अनन्यसाधारण ग्रंथाचे महात्म्य वर्णन करताना डॉ. द्विवेदी लिहितात, ' ब्राह्मण धर्म की मान्य वर्ण व्यवस्था एवं जातिभेद की विचारधारा का उसमें अत्यंत बुद्धिमत्ता एवं युक्तिसे खंडन किया गया है, जो वस्तुतः स्वाभाविक भी है । कारण यह है कि सभी दृष्टी यों, जीवन-मरण, सुख-दुःख, हानि-लाभ आदि में, जब समग्र मानव समान है, तो फिर उन्हें समानाधिकार से वंचित करना कहाँ

की बुद्धिमत्ता है ? अस्तु इस संसार में समस्त प्राणि-वर्ग को प्रकृति से जो समानाधिकार प्राप्त हैं, उन्हें अवश्य प्राप्त होना चाहिये । यही सच्ची मानवता के लिए समुचित एवं सार्वभौम सिद्धान्त है । यहि लोक में परिदृश्यमान पारस्परिक भेद की खाई को पार सकता है और यही वह सिद्धान्त है, जो सच्चे लोकतंत्र का आधार है तथा जो भारतीय लोकतंत्र मे सहाय्यक सिद्ध हो सकता है । इसी महनीय सिद्धान्त का आदर्श इस ग्रंथ में प्रस्तुत है ।'

२६. किं चान्यत्। शूद्रोपि ब्राह्मणो भवति। का हेतुः। इह हि मानवे धर्मे ऽभिहितं-

अरणी गर्भसम्भूतः कठो नाम महामुनीः।
तपसा ब्राह्मणो जातस्तस्माज्जातिरकारणम् ।।२१।।

कैवर्तीगर्भसम्भूतो व्यास नाम महामुनीः।
तपसा ब्राह्मणो जातस्तस्माज्जातिरकारणम् ।।२२।।

उर्वशीगर्भ सम्भूतो वसिष्ठो पि महामुनीः।
तपसा ब्रह्मजातस्तस्माज्जातिरकारणम् ।।२३।।

हरिणीगर्भसम्भूतो ऋष्यशृ ड्गो महामुनीः।
तपसा ब्राह्मणो जातस्तस्माज्जातिरकारणम् ।।२४।।

चण्डालीगर्भसम्भूतो विश्वामित्रो महामुनीः।
तपसा ब्राह्मणो जातस्तस्माज्जातिरकारणम् ।।२५।।

ताण्डूली गर्भसम्भूतो नारदोहि महामुनीः।
तपसा ब्राह्मणो जातस्तस्माज्जातिरकारणम् ।।२६।।

जितात्मा निष्प्रतिद्वन्दःपत्र्च जित्वा यतेन्द्रियः।
तपसा तापसो जातो ब्राह्मचर्येण ब्राह्मणः ।।२७।।

न च ते ब्राह्मणीपुत्रास्ते च लोकस्य ब्राह्मणाः ।
शील शौचमयं ब्रह्म तस्मात्कुलंनकारणम् ।।२८।।

शील प्रधानं न कुलं प्रधानं कुलेन किं शीलाविवर्जितेन ।
बहवो नरा नीचकुल प्रसुताः स्वर्ग गताःशीलमुपेत्य धीराः ।।२९।।

२७. के पुनस्ते कठ व्यासवसिष्ठ ऋष्यशृड्गाविश्वामित्रप्रभृतयो ब्रह्मार्षयों नीचकुल प्रसूतास्ते च लोकस्य ब्राह्मणाः। तस्मादस्य वचनस्य प्रामापण्यादप्यनियतोऽयं ब्राह्मणपसड्ग इति शूद्रकुलोऽपि ब्राह्मणो भवति।

वाय- ६४१-३५

अजून असे आहे की एखादा शूद्र देखील शूद्र ब्राह्मण होतो. याचे कारण काय? कारण मनुस्मृतीमध्ये म्हटले आहे—

अरणीच्या गर्भातून जन्मलेला महान ऋषी ' कठ ' आपल्या तपश्चर्येने ब्राह्मण बनला. म्हणून जाती हे ब्राह्मणत्वाचे कारण नव्हे. केवट स्त्रीच्या पोटी जन्मलेला व्यास एक महान ऋषी झाला. म्हणून जन्म हे ब्राह्मणत्वाचे कारण नव्हे. उर्वशिचा पुत्र वशिष्ठ आपल्या तपाने ब्राह्मण बनला म्हणून ब्राह्मणत्त्वाचे कारण नव्हे. हरिणीगर्भातून जन्मलेला पुत्र ऋष्यशृंग आपल्या तपाने महान बनला म्हणून जन्म हे ब्राह्मणत्वाचे कारण नव्हे. चाण्डाळ स्त्रीच्या गर्भातून जन्मलेला विश्वामित्र एक महान ऋषी बनला म्हणून जन्म हे ब्राह्मणत्वाचे कारण नव्हे. ताण्डूलीचा पुत्र नारद आपल्या तपाने महान ऋषी बनला म्हणून त्याची जात ब्राह्मणत्वाचे कारण नव्हे. शील आणि सदाचाराने युक्त असलेला संयमी, आत्मसंयम आणि आत्मदमन केलेल्या मनुष्यच जितेन्द्रिय होतो. मनुष्य हा तपामुळे तापस आणि ब्रह्मचर्याने ब्राह्मण बनतो. या जगात केवळ ब्राह्मण स्त्रीच्या पोटी जन्मल्याने कोणीही ब्राह्मण बनत नसतो. त्या (कठादि) महापुरूषांच्या माता ब्राह्मणी नव्हत्या. परंतु लोकांसाठी ते ब्राह्मणच ठरले होते. सदाचार आणि पावित्र्यामध्ये ब्राह्मणत्व साठवले आहे. म्हणून ब्राह्मणत्वाकरिता जन्म हे कारण ठरत नाही. जन्म किंवा वंशाला प्राधान्य नसून फक्त शीला (सदाचारा) लाच प्राधान्य आहे. मनुष्य जर सदाचारपतित असेल तर त्याच्या जाती किंवा वंशाचे काय करायचे? कारण शील संपन्न परंतु निम्नकुलात जन्मलेले अनेक लोक स्वर्गात गेलेत.

२८. किं चाप्यन्यद भवदीय मतं-

-मुखतो ब्राह्मणो जातो बाहुभ्यां क्षत्रियथ्तथा।

उरूभ्या वैश्यं: संजात: पदभ्यां शूद्रक एव च ।।३०।।

या व्यतिरिक्त आपले वेगळे मत आहे काय? जसे की–

ब्राह्मण ब्रह्माच्या मुखातून, क्षत्रिय भुजातून जन्मलेत, वैश्य जांघेतून आणि शुद्र पायातून जन्मलेत.

२९. अत्रोच्यते। ब्राह्मणा बहवो न ज्ञायन्ते कुतो मुखतो जाता ब्राह्मणा इति। इह हि कैवर्तरजक चण्डाल कुलष्वपि बाह्मणाः संति। तेषामपपि चूडाकरणमुंजदण्ड काष्टादिभि: संस्कारा: क्रियन्तो। तेषामपि ब्राह्मणसंज्ञा क्रियते। सरस्माद ब्राह्मणवत्क्षत्रियादयोऽपीति पश्याम एकवर्णो नास्ति, चातुर्वर्ण्यमिति।

येथे यासंबंधी असे म्हटले जाते. अशाप्रकारे अनेक प्रकारच्या ब्राह्मणांच्या अस्तित्वाची माहिती मिळते. त्यामुळे मुखातून जन्मलेला ब्राह्मण कुठे आहे

याचा पत्ताच लागत नाही. केवट, धोबी आणि चाण्डाळ कुळात जन्मलेले ब्राह्मणदेखील अस्तित्वात आहेत. 'मुंज' 'आहुती' देणे आणि यज्ञोपवीत (जानवे) इत्यादी पुण्यानुष्ठानाची ब्राह्मणोचित क्रियाकर्मे त्यांच्यासाठी देखील केली जातात. ते देखील ब्राह्मण गणले जातात. म्हणून ब्राह्मणाप्रमाणेच क्षत्रीय आणि वैश्यदेखील एकाच वर्णाचे (एक सारखेच) वाटतात. म्हणून चार वर्ण नसून एकच वर्ण आहे.

३०. अपि च। एकपुरूषोत्पन्नां कथं चातुर्वण्यम् इह कश्चिद्देवदत्त एकस्यां स्त्रियां चतुरः पुत्रां जनयति। न च तेषां वर्णभेंदोस्ति। अयं ब्राह्मणोऽयं क्षत्रियोऽयं वैश्योऽयं शूद्र इति। कस्मात् एकपितृकत्वाद्। एवं ब्राह्मणादीना कथं चातुर्वण्यम्।

आणि मग एकाच माणासापासून (ब्राह्मापासून) जन्मलेल्या लोकांमध्ये चार जाती (वर्ण) कशा राहू शकतात? देवदत्त नावाचा एखादा मनुष्य आहे की, ज्याच्या पासून एखाद्या स्त्रीच्या पोटी चार पुत्र जन्मतात. त्यापुत्रांमध्ये वर्णाच्या आधारावर भेद (फरक) नसतो. त्यांना हा ब्राह्मण, हा क्षत्रिय, हा वैश्य आणि हा शूद्र असे कसे म्हणता येईल? तर ते एकाच पित्यापासून जन्मले आहेत म्हणून. असे असतांना ब्राह्मणादि चार जाती कशा असू शकतील?"[1]

● ● ●

---

[1] : लोखंडे, पृ. १-४, १४-१५ आणि २९-३१.

परिशिष्ट-१४

महाराज सयाजीराव गायकवाड

श्रीमंत सयाजीराव महाराजांचा जन्म १७ मार्च १८६३ रोजीं नाशिक जिल्ह्यांत मनमाडपासून सुमारे १८ मैलांवर असलेल्या कवळाणें नांवाच्या गांवी झाला. सयाजीराव हे गायकवाड घराण्यांतील सुप्रसिद्ध दमाजी गायकवाड यांच्या प्रतापराव नावांच्या भावापासून पांचव्या पिढींतील काशीराव गायकवाड यांचे द्वितीय चिरंजीव होत. सयाजीराव महाराज यांचे वडील काशीराव यांची स्थिती श्रीमंतीची नव्हती; परंतु तें कुटुंब कवळाणें गांवीं कुलीन, अब्रुदार, खाऊनपिऊन सुखी म्हणून मानले जात असे. काशीरावांचे दोघे बंधू उखाजी व सखारामराव यांनी गरिबीस कंटाळून व बडोद्याच्या गायकवाडाशी असलेले आपले नातें लक्षात घेऊन त्यांची भेट घेतली. मल्हारराव गादीवर आल्यावर पुनरपि उखाजींने त्यांची भेट घेतली व त्यांनींहि त्यास पोषाख देऊन भरदरबारात उखाजीचा बहुमान करण्याचा विचार ठरविला; परंतु उखाजींने हा मान आपला वडील भाऊ काशीराव यास मिळावा अशी इच्छा दर्शविल्यावरून मल्हारराव यांनी काशीराव यास आणवून पोषाख व थोडे पेन्शन देऊन त्याची बोळवण केली.

काशीरावास आनंदराव, गोपाळराव व संपतराव असे तीन पुत्र होते. गोपाळराव म्हणजेच श्रीमंत सर सयाजीराव गायकवाड, बडोद्याचे महाराज होत. गायकवाड घराण्याशी संबंधीत बडोदा आणि कवळाणें येथील मुलांची चौकशी करून त्यातील गोपाळराव यांस ता. २७ मे १८७५ रोजी पसंत करुन सयाजीराव या नांवानें दत्तक विधिपूर्वक घेण्यात आले.

इ. स. १८८१ च्या डिसेंबर महिन्यात महाराजांचा शिक्षणक्रम संपला. इलियट या इंग्रज साहेबांच्या शिक्षणाचा महाराजांच्या मनावर योग्य सुपरिणाम झाला. कांहींच्या मतें आंग्लविद्येने भारल्यामुळें महाराज नास्तिक बनले. पण महाराजांस सर्वांगीण शिक्षण मिळालें, ही गोष्ट कोणासहि नाकबूल करतां येणार नाही. महाराजांची बुद्धि जशी चौरस तशी त्यांची दृष्टीही व्यापक परंतु सूक्ष्म होती. इंग्रजी शिक्षणानें व इतिहासाच्या परिशीलनानें त्यांच्या बुद्धीचा विकास झाला. स्वतंत्र विचार करण्याची शक्ति त्यांस प्राप्त झाली. बुद्धिरूपी तराजूंत प्रत्येक बाब तोलून जिकडे तिकडे तिचा (बुद्धीचा) कांटा झुकेल तीच गोष्ट करण्याची त्यांस संवय झाली. दृढनिश्चय, उद्यमशीलता, बाणेदारपणा,

कडक शिस्त, दुसऱ्यास हुकूमात ठेवण्याची कला या गोष्टी ते आपल्या युरोपियन शिक्षकापासून शिकले. राजकीय परिस्थितीचें यथायोग्य आकलन व निरीक्षण करून त्यांतील व्यंगें काढून टाकून सुयंत्रित कारभार चालविणें हें त्यांचे ध्येय ठरलें. केवळ रुढी, अंधश्रद्धा किवा परपरागत समजूत म्हणून एखादी गोष्ट मान्य करावयाची नाहीं, तर सुराज्यास परिपोषक असें असेल व बुद्धीस पटेल तेवढेच ठेवावयाचें, निरुपयोगी भाग नाहींसा करावयाचा हे धोरण महाराजांनी आखलें. 'आजकालच्या* बडोद्यातील सुधारणा म्हणजे महाराजांस मिळालल्या सुशिक्षणाचें दृश्यफल होय हें कोणीही कबूल करील.'[१] एवढेच नव्हे तर त्यानंतर आपल्या निधनापर्यंत संस्थानाच्या सर्वांगीण उन्नती करिता एक आदर्श लोककल्याणकारी राजा म्हणून आपले स्थान ठेवले आहे. ते ५ मार्च १९०७ च्या भाषणात स्पष्टपणे म्हणतात, "प्रजेचें कल्याण हेंच माझे कर्तव्य व तोच माझा मोक्ष." शिक्षण सार्वत्रिक असण्यामागील आपले विचार स्पष्ट करताना ते १९. जून १९०४ च्या भाषणात म्हणतात, "विद्या ही एकाच व्यक्तीला किंवा वर्गाला, फार तर काय एकाच समाजालाहि मिळून फायदा नाही. ती सार्वत्रिक असली पाहिजे, तरच आपले पाऊल पुढें पडणार आहे हें लक्षांत ठेवा. सर्व राष्ट्राचा उत्कर्ष पाहिजे आहे, तो एका समाजानें साधणार नाहीं. लहानापासून थोरापर्यंत सर्वच विद्या शिकलेले होतील असें करण्यास तुम्ही झटलें पाहिजे; तरच राष्ट्र पुढें जाईल ..... जन्माने कोणी मोठें नाही, हें तुम्ही मनांत वागवलें पाहिजे. खेड्यांपाड्यांतून सुद्धां हे विद्याप्रसाराचे काम अव्याहत व सुयंत्र चाललें पाहिजे. आपल्या देशांत महारापोरांपासून तो अगदी वरच्या पायरीपर्यंतच्या सर्व लोकांना कार्यकारण भाव समजूं लागेल तर आपला उर्जितकाल जवळ आला आहे असे म्हणण्यास कांहीं हरकत नाही."

शिक्षणाची अनिवार्यता विशद करताना ते म्हणतात, " Education is absolutely necessary for the realisation of my ambition and wishes and for the success of my policy."

"Education is the basis of all reforms and is the only way of solution from our present condition."[१]

"भारतीय संस्थानिकांपैकी पुण्यश्लोक सयाजीराव गायकवाड यांचे अस्पृश्यता निवारण्याच्या क्षेत्रातील कार्य मोठे भरीव नि परिणामकारक ठरले. असा प्रजाहित दक्ष, ज्ञानदाता नि प्रगतिप्रिय नरेश अर्वाचीन भारतात क्वचित झाला

---

* इ. सन १९३३ पर्यंत म्हणजेच महाराजांच चरित्र लिहित असें पर्यंत.

१ : श्री. सयाजी गौरव ग्रंथ - १९३३.

असेल. स्पृश्य हिंदूंच्या हृदयशुन्यतेमुळे अस्पृश्यांकरिता काढलेल्या शाळेसाठी स्पृश्य हिंदू शिक्षक मिळेनात, म्हणून सयाजी महाराजांना मुसलमान शिक्षक नेमावे लागले.”[१]

महाराजांनी केवळ विचारच मांडले नाही तर त्यानुसार कृतीही केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनातील खालील प्रसंग या संदर्भात उद्‌बोधक ठरावा.

“वडिलांच्या मृत्युमुळे भीमराव आंबेडकरांचा होता नव्हता तो आधार तुटला. पैशाचे पाठबळ नाही, आप्तांचा आधार नाही, अशी परिस्थिती. बडोद्यात नोकरीवर रुजू होण्यासारखी त्यांची मनःस्थिती नव्हती. त्या नोकरीतील अनुभवही काही चांगला नव्हता. आता त्यांना स्वतःच्या पायावर उभ राहण्यावाचून गत्यंतर नव्हतें. त्यांच्या ठायी ज्ञान संपादन करण्याची अनिवार इच्छा होती. जगात काही महत्तम कार्य करावे, अशी त्यांची अबोल महत्त्वाकांक्षा होती. त्यामुळे त्यांचे मन अस्वस्थ होई. कुटुंबाचे पालनपोषण तर केले पाहिजे. आणि शिक्षण पुढे चालवावे म्हटले तर पदरी कवडीदेखील नाही. वडिलांचा शेवट कर्जबाजारीपणात झालेला. अशा प्रकारे जीवनकलहाच्या तीव्र धुमाळीतून मार्ग कसा काढावा, ह्या विवंचनेत असताना ते बडोदा नरेशांना मुंबईत भेटले. त्या सुमारास बडोदे सरकारने उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देऊन चार विद्यार्थी अमेरिकेस पाठविण्याचा विचार केला होता. महाराजांनी शिष्यवृत्तीसाठी भीमरावांना अर्ज करण्यास सांगितले. त्या चार विद्यार्थ्यांत त्यांनी भीमराव आंबेडकरांची निवड केली.”[२]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा ‘ब्रिटिश भारतातील प्रांतिक वित्तिय उत्क्रांती’ (दी इव्हॅल्यूशन ऑफ प्रॉव्हिन्शल फायनान्स इन ब्रिटिश इंडिया) या नावाने प्रसिद्ध ग्रंथाच्या प्रती नियमाप्रमाणे कोलंबिया विश्वविद्यालयाला सादर करताच त्या विश्वविद्यालयाने रीतसर त्यांना ‘डॉक्टर ऑफ फिलासॉफी’ ही अत्युच्य पदवी दिली, उपरोक्त प्रबंध डॉ. आंबेडकरांनी श्रीमंत सयाजीराव महाराज ह्यांना त्यांजविषयीच्या आपल्या कृतज्ञतेचे द्योतक म्हणून अर्पण केला.[३]

पहिल्या गोलमेज परिषदेकरिता श्रीमंत सयाजीराव गायकवाड हे सुद्धा गेले होते. त्या परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचेहि भाषण झाले. त्या भाषणाने

---

[१] : महाराष्ट्रीय ज्ञानकोश, विभाग ७ वा, पृ. ६४४, उद्‌धृत - कीर, पृ. ५.

[२] : कीर, पृ. ३१.

[३] : ततैव्य, पृ. ३४-३५.

संपूर्ण सभागृह भारावून गेले होते. ब्रिटिश पंतप्रधान मॅक्डोनाल्ड तर डॉ. आंबेडकराचे भाषण ऐकूण थक्कच झाले. उपसंहारात्मक केलेल्या आपल्या भाषणात त्यांनी तसे उघडपणे बोलून दाखविले. परिषदेतील आणखी एक मोठी व्यक्ती डॉ. आंबेडकरांच्या ह्या भीमपराक्रमाने त्यांच्यावर अमाप खूष झाली. त्या व्यक्तीचे डोळे आनंदाश्रूंनी भरून आले. समाधान, कौतुक व कृतार्थता ह्यांनी हृदय ओसंडू लागले. आपल्या राजवैभवी निवासस्थानी परत जाताच ते आपल्या राणीला म्हणाले, आपले सारे प्रयत्न आणि पैसा ही सार्थकी लागली. आज एका महत्कार्याची सफलता झालेली पाहिली, यश लाभास आले. डॉ. आंबेडकरांचा हा मोठा चाहता दुसरा तिसरा कोण नसून ज्या बडोद्याच्या महाराजांनी आंबेडकरांच्या शिक्षणास सक्रिय साहाय्य केले होते, तेच बडोद्याच नरेश सयाजीराव गायकवाड होत. डॉ. आंबेडकरांच्या ह्या यशाबद्दल सयाजीराव गायकवाडांनी आपल्या निवडक मित्रांना एक मोठी मेजवानी दिली. अशी ही नियतीची मोठी रोमांचकारक किमया होती की अनेक वर्षांच्या ताटातुटींनंतर या नरेशाची आणि नरवीराची भावना उचंबळून आणण्याच्या अशा एका प्रसंगी गाठ पडावी.[१]

श्रीमंत सयाजीराव महाराजांचे बौद्ध धम्माकडे विशेष आकर्षण होते. या दृष्टीने त्यांनी केलेल्या कार्याचे वर्णन Dr. A. L. Nair, यांनी आपल्या " The Maharaja's Love of Buddha's Teachings" या त्यांच्या ७१ व्या वाढदिवसाप्रित्यर्थ लिहिलेल्या लेखात केले आहे. ते म्हणतात,

"दुल्लभो पुरिसो जञ्ञा, न सो सब्बत्थ जायति.

It is with feelings of admiration, great appreciation and devotion to His Highness that I tender my sincere homage and greatfulness to His Highness on his witnessing the 71st Birth-day. A ruler of a State and in fact a model and all-progressive State has so many and varied calls on his powers of body and mind that in his sincerity of purpose and generous and keen desire to do good to his subjects, he has scarcely and any time left to devote to his health and personal comforts. It is with the heartfelt blessings and devoted love of his subjects that a ruler lives long, and this fact is most eloquently proved in the case of His Highness. It is on this auspicious occasion that I take the opportunity of expressing my own sentiment and appreciative greatfulness for the service that His Highness has first rendered to the cause of Bhagawan Buddha on this side of India. I propose, therefore, to do it by emphasising on the great love that the Maharaja entertains towards my Bhagawan.

---

[१] : कीर, पृ. १६१.

When I recall to my mind the past history of Buddhism, I feel sad and disappointed to see how the Bhagawan Buddha, who, for the first time, taught loving service and self-sacrifice at the alter of suffering humanity and entire creation of life as the end-all and be-all of religion, should have been entirely neglected and forgotten in the land of His birth where, He first began the work of conveying a message of hope and inspiration to the suffering and ignorant masses of India, to all those "who had ears to listen." He then extended His sphere of self-less activity through his devoted Bhikkhus outside India and in the then known world. He reduced all speculation in religion to practical love and piety, irrespective of any considerations of caste, creed or sex, touchable or untouchable. On the broadest principles of universal love, brotherhood and Ahimsa, Bhagawan Buddha effected a tremendous revolution in the political, social, moral and religious aims and ideals, and it was due to Him and His methods of teaching that Art was first applied to religion and religious purposes. It is the happiest signs of the times that Modern India has been showing renewed and appreciative interest in the Bhagawan Buddha and His times and teaching. But my admiration for His Highness is still further intensified by the fact that long before this renaissance of Buddhism in India, His Highness had taken great interest in Bhagawan Buddha, and showed the greatest love for him. His Highness had on many occasions been gracious to come to my place, and always evinced great reverence for Him in talks with me. His Highness really desired that Bhagawan Buddha's teachings should be studied in India and His ideals of self-conquest, Ahimsa and humanitarian and altruistic work on the basis of Universal Brotherhood should be widely known and given prominence to. Out of great love His Highness has installed in the Jubilee Garden of Baroda a big bronze statue of Bhagawan Buddha, and arranged lectures on Buddha and Buddhism in the year 1910; and Prof. Dharmanand Kosambi delivered 5 lectures in Marathi. His Highness introduced Pali as a second language in the Baroda College first and then in the High School, and for the first time appointed the late Prof. C. V. Rajvade, who was entrusted with the work of translating into Marathi three volumes of the Dighnikaya in the Shree Sayaji Sahityamala and instituted scholarships for Pali studies in the Fergusson and the Baroda Colleges. His Highness assimilated many of the Buddhistic principles, like removing untouchability, giving equal status

to all castes, and gave them practical shape in his State. His Highness expressed a desire to translate Pali Books into Marathi and edit Pali texts in the Devangari characters, and to this effect His Highness spoke to me, when I had the privilege of meeting His Highness in 1931. His Highness has in fact instructed Mr. Yande to give first preference for the publication of Pali books in Translation form as the best means of educating the public in the life and teachings of Bhagawan Buddha. His Highness' proof of Bhagawan's love is further given when His Highness kindly consented to open the Anand Vihara in Bombay on the occasion of the 2,555th Birthday of the Bhagawan solemnised by the Buddha Society. On this occasion His Highness in his speech paid an eloquent tribute to Bhagawan Buddha's teachings. "His doctrines," remarked His Highness, "have been the consolation in life and death to untold millions, softening wild and savage races, by tender words of loving kindness, raising the despairing to higher things and sharing the blessedness of the Noble Aryan Middle Path." By His Highness' pronouncement, the Buddha Society has been greatly assured and helped, and I, as the resident of that Society and an humble and devoted servant of the Bhagawan, am filled with emotion of gratefulness."[1]

---

१ : श्री. सयाजी गौरव ग्रंथ - १९३३, पृ. ५७-६०.

परिशिष्ट-१५

बेनीतो मुसोलिनी

मुसोलिनी बेनीतो : (२९ जुलै १८८३ - २८ एप्रिल १९४५) इटलीचा हुकूमशहा (१९२२-४३) व फॅसिझम या तत्त्वप्रणालीचा प्रवर्तक. त्याचा जन्म सामान्य लोहाराच्या कुटुंबात दोव्हिया (प्रेदाप्या) येथे झाला. त्याचे वडील आलेस्सांद्रो हे समाजवादी असून लोहारकाम करीत, तर आई रॉझा ही प्राथमिक शाळेत शिक्षिका होती. फॉर्लीम् पॉपॉली येथील शाळेतून मुसोलिनीने अध्यापनाची पदविका मिळविली (१९०१). शिक्षक म्हणून काही दिवस काम केल्यानंतर तो स्वित्झर्लंडला पळून गेला (१९०२); परंतु खोट्या पारपत्रामुळे त्याला इटलीला परतावे लागले (१९०४). या काळात त्याने कार्ल मार्क्स, सोरेल, प्येअर प्रूदाँ, लुई ब्लांकी, प्यॉटर क्रपॉटक्यिन इ. विचारवंतांचे साहित्य वाचले आणि तो कट्टर समाजवादी कामगार नेता बनला. राजकीय प्रचारासाठी त्याने ट्रेन्टमधील लालोता दी क्लास या प्रांतिक वृत्तपत्राचे संपादकत्व स्वीकारले. यानंतर त्याची समाजवादी पक्षाचा संचालक म्हणून निवड झाली आणि तो लवकरच अवंती या मिलानमधील वर्तमानपत्राचा संपादक झाला (१९१२). त्याच्या परखड, सडेतोड लेखनामुळे अवंतीचा खप चौपटीने वाढला. पहिल्या महायुद्धा इटलीने तटस्थ राहावे, ही आधीची भुमिका सोडून त्याने देशाच्या महायुद्धप्रवेशाचे समर्थन केले. परिणामतः समाजवादी पक्ष व अवंती यांमधून त्याची हकालपट्टी झाली (१९१४). त्यानंतर त्याने आपल्या विचारांच्या प्रसारार्थ पोपोलो द इतालिया हे स्वतंत्र वृत्तपत्र काढले.

मुसोलिनीने मिलान येथे २३ मार्च १९१९ रोजी फॅसिस्ट पक्षाची स्थापना केली. त्यानंतर १९२१ मध्ये तो संसदेवर निवडून आला. आंदोलनाचा मार्ग अवलंबून फॅसिस्टांनी बोलोन्या आणि मिलान या शहरांचा ताबा घेतला. प्रशासकीय यंत्रणा त्यांच्या हिंसक कृत्यांना आळा घालण्यास असमर्थ ठरत होती. अशा वेळी नेपल्स येथे फॅसिस्टांचे अधिवेशन भरले (१९२२). त्यात लूईजी फात्ता सरकारच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली. फॅसिस्टांना कारीखानदारांसह उच्च मध्यमवर्गीयांचा पाठिंबा मिळाला. तेव्हा त्यांनी रोमवर मोर्चा काढला (२८ ऑक्टोबर १९२२). राजाने लष्करी कायदा पुकारण्या-ऐवजी फात्ताचा राजीनामा घेऊन मुसोलिनीला नवीन मंत्रिमंडळ बनविण्याची

आज्ञा केली. त्याने फॅसिस्ट व राष्ट्रीय पक्षाचे संयुक्त सरकार बनवले. राजाने व संसदेने मुसोलिनीला पंतप्रधान करून सर्वाधिकार दिले. सुरुवातीस त्याने घटनात्मक चौकटीतून शांतता प्रस्थापित करून अंतर्गत कारभारात फॅसिस्ट अधिकारी नेमले व राजाकडून आपल्या लष्करी संघटनेला मान्यता मिळविली. हळूहळू मुसोलीनीने नवा मतदान विषयक कायदा संमत करून, संसदेत आपल्या पक्षाचे वर्चस्व प्रस्थापित केले (१९२४).

फॅसिस्ट दहशतवादाला समाजवादी सदस्य गीया जाकोमो मात्तेऑत्ती याने फॅसिस्टी एक्सपोझ्ड नावाच्या ग्रंथातून गुन्ह्यांची यादी सादर करून कडवा विरोध केला, तेव्हा त्याचा खून करण्यात आला (१० जून १९२४). काही दिवस मुसोलिनीच्या लोकप्रियतेला धोका निर्माण झाला. तेव्हा मुसोलिनीने वृत्तपत्रांच्या स्वातंत्र्यावर निर्बंध लादून विरोधकांच्या सभांवर बंदी घातली. उदारमतवादी आणि कम्युनिस्ट यांनी यावेळी उग्र निदर्शने केली; पण ती कठोरपणे मोडण्यात आली. अखेर मुसोलिनीनें संसदेकडून ३१ जानेवारी १९२६ रोजी एका अधिकृत कायद्याने राज्य करण्याचा संपूर्ण अधिकार मिळविला आणि त्याने संप आणि टाळेबंदी अवैध ठरवून फॅसिस्ट युवक संघटना स्थापल्या. त्याच्या डोळ्यासमोर आर्थिक पुनर्रचनेवर आधारित इटलीचे श्रेणीसत्ताक राज्य (कार्पोरेटीव्ह स्टेट) स्थापन करण्याचे ध्येय होते. लोकशाही विरोधी भूमिकेमुळे त्याच्यावर तीन-चार प्राणघातक पण अयशस्वी हल्ले झाले. त्याने एका कायद्याने कामगारांचे कामाचे तास वाढवून नगरपालिका, प्रांत आणि पुढे सार्वत्रिक निवडणुका रद्द केल्या आणि पोलीस व लष्करी यंत्रणेत स्थायी सेवेवर फॅसिस्ट स्वयंसेवक नेमले. १९२८ मध्ये फॅसिस्ट ग्रँड कौन्सिल (पक्षाचे वरिष्ठ मंडळ) हीच शासनाची सूत्रधार होती आणि मुसोलिनी हा सर्वसत्ताधारी होता.

परराष्ट्रीय धोरणात मुसोलिनीच्या डोळ्यापुढे इटलीचे साम्राज्य –रोमन एंपायर- ही कल्पना असल्यामुळे साम्राज्यविस्तारास त्याने सुरुवात केली. इथिओपियावर स्वारी केली (१९३५) आणि ते इटालियन साम्राज्यात समाविष्ट केले. १९३९ मध्ये त्याने ॲबिसिनिया पादाक्रांत केला. प्रारंभी त्याला हिटलरविषयी आस्था नव्हती; परंतु राष्ट्रसंघाने इटलीचे सभासदत्त्व रद्द केले आणि त्याच वेळी मुसोलिनीने स्पॅनिश यादवी युद्धात बंडखोरांचा नेता फ्रँको याला सहकार्य दिले. तेव्हा इंग्लंड आणि फ्रान्स या देशांशी त्याचे वैर निर्माण झाले. परिणामतः त्याला जर्मनीवर अवलंबून राहणे क्रमप्राप्त झाले. साहजिकच तो जागतिक परिस्थितीला अनुसरून हिटलरच्या पूर्ण कच्छपी गेला आणि हिटलरच्या ज्यू द्वेष

द अन्य धोरणास त्याने संपूर्ण पाठिंबा दिला. इटलीची लष्करी तयारी नसतानाही त्याने दुसऱ्या महायुद्धात उडी घेतली. अमेरिकेच्या युद्धप्रवेशानंतर इटलीच्या सैन्याची पीछेहाट होऊ लागली. महायुद्ध आणि साम्राज्यवादी धोरण यामुळे जनसामान्यावरील कराचा बोजा वाढला आणि व्यक्तिगत स्वातंत्र्याची गळचेपी झाली. तेव्हा संत्रस्त जनतेने मुसोलिनीच्या राजीनाम्याची मागणी केली. फॅसिस्ट पक्षात अस्थिरतेचे वातावरण निर्माण झाले. आवाक्याबाहेरच्या अंतर्गत परिस्थितीचा विचार करून मुसोलिनीने राजीनाम दिला. त्याला व त्याच्या सहकाऱ्यांना अटक करण्यात आली; परंतु जर्मन सैनिकांनी त्यांची सुटका केली. जर्मनव्याप्त उत्तर इटलीत काही दिवस फॅसिस्ट पक्षाद्वारे त्याने राज्य केले; परंतु जर्मनीचा पराभव होताच तो निष्प्रभ झाला आणि २८ एप्रिल १९४५ रोजी त्याने स्वित्झर्लंडमध्ये पळून जाण्याची योजना आखली; पण विरोधकानी त्याला पकडले आणि दाँग्गा (कोमो) येथे कॅलेता या प्रेयसीसह त्याला गोळ्या घालून ठार मारले.

युरोपीय राजकीय संस्कृतीच्या संदर्भात फॅसिझमचा पराभव झाला. प्राचीन रोमन साम्राज्याचे स्वप्न आणि त्याची उग्र राष्ट्रवाद व सैनिकी सामर्थ्य ही साधने विसाव्या शतकातील युरोपीय संस्कृतीशी विसंगत ठरणारी होती; कारण या शतकात ब्रिटिशादिकांची साम्राज्येच खिळखिळी होत आली होती. प्रादेशिक विस्तारवाद राष्ट्रराज्याच्या उदयामुळे अशक्यप्राय आणि अन्याय्य ठरत होता. खुद्द इटली लष्करी दृष्ट्या पुरेसा सामर्थ्यवानही नव्हता. इतिहासाचा रोख व दिशा यांच्या अज्ञानाच्या त्या निदर्शक होत्या. हुकूमशाही व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीचे शेवटचे एक नमुनेदार स्वरूप मुसोलिनीच्या चरित्रातून दिसून येते. तथापि, त्यातही समाजवादाकडून अवचितपणे हुकूमशाही महत्त्वाकांक्षेकडे झालेले त्याचे परिवर्तन हे त्याच्या चरित्रातील एक कायमचे रहस्य ठरेल. मात्र मुसोलिनीप्रणीत फॅसिझमच्या प्रवृत्तीला लोकशाही मूल्यांनीच शह देता येईल, हेही जागतिक इतिहासात त्याच्याच चरित्राने सुचवून ठेवले आहे. त्याचे विविध वृत्तपत्रातून कामगार चळवळ व समाजवादाचे समर्थन करणारे तसेच समाजवाद विरोधी व राष्ट्रीयत्त्वाचे प्रतिपादन करणारे – फॅसिस्ट प्रवृत्तीचा प्रसार करणारे अनेक प्रखर व जहाल लेख प्रसिद्ध झाले. त्याने आत्मचरित्र (१९२८) लिहले. त्याची पत्रे पुढे प्रसिद्ध झाली.

● ● ●

मराठी विश्वकोश : १३, पृ. ७८३-७८४.

परिशिष्ट-१६

फॅसिझम

इटलीमध्ये पहिल्या महायुद्धानंतर उदयास आलेली एक सर्वंकष सत्तावादी आधुनिक राजकीय विचारप्रणाली. इटलीत अडचणीच्या आणि गोंधळाच्या परिस्थितीत फॅसिझम निर्माण झाला. *बेनीतो मुसोलिनीने* त्या नव्याने वाढणाऱ्या चळवळीचें व संघटनेचे नेतृत्व केले. मुसोलिनी सुरुवातीला समाजवादी होता. समाजवादी पक्षाचे मुखपत्र *अवंती (Avanti)* या दैनिकाचा तो संपादकही होता; परंतु नंतर त्याचे मन बदलले आणि तो समाजवादाला कडवा विरोध करणाऱ्या फॅसिस्ट पक्षाचा निर्माता आणि पुढारी झाला. हे १९२० च्या सुमारास घडले. फॅसिझम हा शब्द 'फॅसिओ' वरून निघालेला आहे. फॅसिओ म्हणजे लाकडांच्या जुडीमध्ये बांधलेली कुऱ्हाड, रोमन साम्राज्याचे ते चिन्ह होते. फॅसिझमचा पुढे वाढलेला साम्राज्यवाद आणि युद्धखोर वृत्ती यांचा त्या चिन्हाने चांगला बोध होतो.

मुसोलिनीने उभारलेल्या फॅसिस्ट पक्षात मुख्य भरणा होता, तो बेकार कामगारांचा आणि मध्यम वर्गातील दिशाहीन तरुणांचा. सुरुवातीला हा पक्ष लहान होता. भांडवलदारांच्या व इतर श्रीमंत मंडळींच्या पाठींब्यामुळे तो हलके हलके वाढत गेला; पण त्याची खरी वाढ झाली, ती राजकीय सत्ता हातात आल्यानंतर. राजकीय सत्ता हस्तगत करण्यासाठी फॅसिस्टांनी २८ ऑक्टोबर १९२२ रोजी राजधानीच्या रोम शहरावर मोर्चा काढला. या रोम शहरावरील मोर्चाचा फॅसिस्ट चळवळीत 'मोठी वीरश्रीची घटना' म्हणून उल्लेख होतो; परंतु त्या मोर्चामध्ये वीरश्री दाखविण्याचे कारणच पडले नाही. मोर्चाला कुणाचाही विरोध झाला नाही. फॅसिस्टांना रोममध्ये बिनविरोध प्रवेश मिळाला आणि राजाने आपण होऊन राजसूत्रे मुसोलिनीला बहाल केली. मुसोलिनी राजाच्या आमंत्रणावरून देशाचा मुख्यमंत्री बनला आणि तेव्हापासून इटलीमध्ये फॅसिस्ट राजवट सुरू झाली.

या काळात इटलीमध्ये समाजवादी, साम्यवादी व अराज्यवादी असे वाममार्गी पक्ष होते. याखेरीज उजव्या विचारसरणीचे व मध्यम मार्गाचे असे इतरही काही पक्ष होते. या सर्व पक्षांच्या सभासदांची संख्या फॅसिस्ट पक्षाच्या सभासदांपेक्षा कितीतरी अधिक होती. सर्वांनी मिळून एकजुटीने फॅसिस्ट

पक्षाचा विरोध केला असता, तर त्या पक्षाचे पाऊल पुढे पडले नसते; पण ते सर्व पक्ष एकमेकांत भांडत होते, विशेषतः समाजवादी व साम्यवादी पक्षांतील भांडण अत्यंत तीव्र होते. त्यामुळे ते नामोहरम झाले आणि देशात फॅसिस्ट पक्षाची हुकूमशाही स्थापन झाली.

सत्ता हाती आल्याबरोबर मुसोलिनीने विरोधकांचा छळ सुरू केला. भाषणस्वातंत्र्य, मुद्रणस्वातंत्र्य, संघटनास्वातंत्र्य इ. नष्ट केले आणि मुसोलिनी व त्याचा पक्ष यांच्याविरूद्ध ब्र काढणेही अशक्य झाले. विरोधकांची धरपकड चालूच होती, यावेळी मुसोलिनीने विरोधकांना जबरदस्तीने एरंडेल तेल पाजण्याचे नवे तंत्र सुरू केले. अनेक विरोधक या जाचाला कंटाळून देश सोडून गेले, अनेकांना वर्षानुवर्षे तुरुगांत खितपत पडावे लागले. तरीदेखील थोडासा विरोध झालाच; पण फॅसिस्टांनी पाशवी उपायांचा अवलंब करून तो चिरडून टाकला.

राज्यसत्ता हातात आली, त्या वेळी लोकसभेत फॅसिस्ट पक्ष अल्पसंख्य होता. एकदोन वर्षात मुसोलिनीने राज्यघटना बदलली आणि त्यानंतर झालेल्या निवडणुकीत फॅसिस्ट १००% निवडून आले. त्या निवडणुकीची तऱ्हा मोठी वेगळी होती. फॅसिस्ट पक्षाने तयार केलेल्या उमेदवारांच्या यादीवर 'होय किंवा नाही' एवढेच जाहीर करण्याचा मतदारांचा हक्क होता आणि तो हक्क देखील त्यांनी उघडपणे बजावला पाहिजे, अशी योजना होती. म्हणजेच मतदान गुप्त नव्हते, शिवाय मतदान आपल्या बाजुने व्हावे, म्हणून फॅसिस्ट गुंडांची धाकदपटशाही आणि गुंडागिरी होतीच. निकाल अर्थातच त्यांच्या बाजूने लागला.

मुसोलिनीचा लोकशाही राज्यव्यवस्था आणि लोकशाही हक्क यांवर विश्वास नव्हता. लोकशाहीमुळे देशामध्ये नाना पक्ष आणि पंथ माजतात, त्यामुळे देश विस्कळित होतो व त्याला कोणतेही निश्चित धोरण आखता येत नाही, असे त्याचे मत होते. लोकशाही स्वातंत्र्यामुळेही तेच घडते, असेही त्याला वाटत होते. म्हणून देशाचा कारभार सुरळीत रीतीने चालावयाचा आणि देशाची प्रगती व्हावयाची तर देशामध्ये एकच पुढारी असला पाहिजे व देशातील सर्व कारभार त्याच्या एकट्याच्या मर्जीनुसार चालला पाहिजे, असा त्याचा आग्रह होता. म्हणूनच त्याने एकतंत्री राज्यकारभार सुरू केला आणि त्या कारभाराला कुणाचाही विरोध होऊ नये, म्हणून हुकूमशाही स्थापन केली. देशामध्ये एकच पुढारी असला पाहिजे म्हणून तो राज्याचा सर्वाधिकारी व पक्षाचा एकमेव नेता बनला. फॅसिस्ट पक्षाखेरीज इतर सर्व पक्ष त्यान बेकायदा ठरवले व

देशातील सर्व राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक संस्था आपल्या पक्षाच्या हुकूमतीखाली आणल्या.

फॅसिझमला, फॅसिस्ट पक्षाला व मुसोलिनीला इटलीमध्ये सर्वसामान्य जनतेचा पाठिंबा मिळाला. त्याचे मुख्य कारण हे की लोक तत्कालीन दुरावस्थेला, शासनाच्या दुबळेपणाला व समाजातील गोंधळला कंटाळले होते. त्यांना स्थिर व समर्थ सरकार हवे होते. असे सरकारच आर्थिक अरिष्टातून मार्ग काढून उद्योगधंदे वाढवू शकेल, बेकारी दूर करू शकेल व राष्ट्राचे नाव उज्ज्वल करू शकेल,असे त्यांना वाटत होते. पहिल्या महायुद्धात विजयी राष्ट्रांच्या बाजूने युद्धात भाग घेऊनही हवा असलेला मुलूख पदरात पडला नाही. म्हणून इटलीचा मोठा मानभंग झाला होता. या सर्व बाबतीत मुसोलिनीने व फॅसिस्ट पक्षाने मोठी आकर्षक आश्वासने दिली. लोक त्यामुळे भुलले व त्यांनी फॅसिझमला पाठिंबा दिला. पुढे ती आश्वासने फसवी ठरली, ही गोष्ट वेगळी.

शिवाय देशांमध्ये लोकशाही परंपरा नव्हती. 'राजा, सरदार, चर्च व वरिष्ठवर्ग यांचे लोकांच्या मनावर खूप दडपण होते. त्यांनी राज्य करावे व आपण आपली परंपरागत शेती करावी किंवा कारखान्यात अगर लहान-सहान उद्योगात काम करावे, अशी लोकांची भावना होती. प्रत्येक बाबतीत त्यांना कुणीतरी पुढारी हवा असे व त्या पुढाऱ्याच्या म्हणण्याप्रमाणे वागावे अशी त्यांची वृत्ती होती. त्यांना स्वास्थ्य व सुरक्षितता हवी होती. स्वातंत्र्याबद्दल त्यांचा विशेष आग्रह नव्हता. लोकांच्या या मनोवृत्तीचा मुसोलिनीने फायदा घेतला आणि त्यांना फॅसिझमच्या दावणीला जुंपले.

आधुनिक जगात ही मनोवृत्ती अनेक समाजांत दृष्टीस पडते. उत्पादन यंत्रणा प्रचंड वाढलेली आहे, राज्यसत्ता खूप प्रबळ झालेली आहे व समाज फार विस्कळित झालेला आहे, त्यामुळे व्यक्तीला हतबल झाल्यासारखे वाटते. त्याला एकलेपणाची व स्वातंत्र्याची भीती वाटू लागते, तो आधार शोधू लागतो. तो आधार त्याला पुष्कळ वेळा बलदंड पुढाऱ्यात आणि त्या पुढाऱ्याच्या नेतृत्वाखालील एकतंत्र राज्यअवस्थेत आढळतो. अलीकडील समाजातील या समस्येचे *एरिख फ्रॉम* या सामाजिक तत्त्वज्ञाने आपल्या फीअर ऑफ फ्रीडम किंवा *एस्केप फ्रॉम फ्रीडम* या ग्रंथात अतिशय सुंदर विवेचन केले आहे. फॅसिझम इटलीपुरता मर्यादित राहिला नाही. इटलीमध्ये पाय रोवल्यानंतर तो जर्मनी, जपान, स्पेन, पोर्तुगाल, अर्जेंटिना आदी देशांत पसरला. जर्मनीमध्ये हिटलरच्या नेतृत्वाखालील नाझी पक्षाच्या रूपाने त्याने अत्यंत विकृत व भीषण स्वरूप धारण केले. प्रत्येक देशात फॅसिझमचे स्वरूप तेथील परिस्थित्यनुसार भिन्न होते. कारण त्याला

सुस्पष्ट व सुसंगत असे तत्वज्ञान नव्हते. उदा. जर्मनीमध्ये वंश तत्वावर भर होता. हिटलरच्या राजकीय तत्त्वज्ञानात आर्यवंश हाच सर्व मानवी वंशांमध्ये जन्मतः श्रेष्ठ असून तोच मानवजातीवर राज्य करण्यास समर्थ आहे, असा मूलभूत सिद्धांत गृहीत धरला आहे. तसा सिद्धांत फॅसिझमने मान्य केला नव्हता; परंतु प्राचीन रोमन साम्राज्याप्रमाणे इटलीचे साम्राज्य निर्माण करण्याचे स्वप्न फॅसिझम पाहू लागला.

समाजामध्ये राज्यसंस्था ही सर्वश्रेष्ठ संस्था व सर्वंकष राज्य आहे, असे फॅसिझम मानतो. समाज ही सावयव एकात्मक वस्तू असून व्यक्ती ह्या समाजाचे घटकांश आहेत. शरीराचे अवयव व पेशी हे जसे अंश होत, तसेच व्यक्ती हे अंश होत. अवयव वा पेशी जशा शरीराकरिता असतात, तशा व्यक्ती समाजाकरिता असतात. राष्ट्र वा राज्य हे समाजाचेच विकसित वा उन्नत रूप होय. म्हणून राज्याचे आदेश सर्वांनी बिनतक्रार मानले पाहिजेत. राज्याचे हित ते सर्वांचे हित. व्यक्तीचा विकास राज्याच्या छायाछत्राखालीच होऊ शकतो. राज्याचे संरक्षण व संवर्धन सर्वांनी मिळून केले पाहिजे आणि त्यासाठी झीज सोसण्याची वा आत्मत्याग करण्याची प्रत्येकाची तयारी हवी. राज्य, राष्ट्र आणि समाज यांमध्ये भेद नाही.

राष्ट्राचा नेता हाच राज्याचा आणि समाजाचा नेता असतो. त्याच्या हाती अनियंत्रित सत्ता हवी. राष्ट्राचे हित कशात आहे, हे तोच जानतो. ते हित साधण्यासाठी सर्वांना त्यांच्या कुवती नुसार कामाला लावणे, हा त्याचा अधिकार आहे. तो एक पक्ष निर्माण करतो. एक राष्ट्र, एक नेता व एक पक्ष अशी घोषणा केली जाते.

राष्ट्र एकजीव असते. त्यामध्ये वर्गभेद माजवणे म्हणजे त्याची ताकत खच्ची करण्यासारखे आहे. कामगार, भांडवलदार, शेतकरी व जमीनदार यांनी एकजुटीने काम करून राष्ट्राची ताकत वाढवली पाहिजे.

राष्ट्र हे वर्धिष्णू असले पाहिजे. त्याने आपले साम्राज्य निर्माण केले पाहिजे. त्यासाठी युद्ध करावे लागते. युद्धाची नेहमी तयारी हवी. युद्धामध्ये पाप नाही, त्यामुळे व्यक्तीचे शौर्य, धैर्य वाढते व त्यांच्या गुणांची कसोटी लागते.

लोकशाही लोकांच्या हिताची नाही. तिने श्रीमंताचे व धंदेवाईक राजकारण्यांचे फावते व लोकांचे नुकसान होते. सर्वसामान्य लोकांना राष्ट्रहिताचे गहन प्रश्न समजत नाहीत, त्यांना त्यांमध्ये रस नसतो, म्हणून ते प्रश्न जाणत्या लोकांनी हाताळणे हे उत्तम. या तत्त्वावरून फॅसिझमचा अभिजनवाद (इलिटिझम) उघड होतो; पण फॅसिस्टांना तो दोष आहे, असे वाटत नाही.

व्यक्तीचे स्वातंत्र्य व व्यक्तीची समानता फॅसिझमला मान्य नाही. विषमता निसर्गदत्त आहे, ती नाहीशी होणार नाही. काही व्यक्तींमध्ये पुढारीपणाचे गुण असतात, त्यांच्या आज्ञेनुसार काम करणे हेच इतरजनांचे कर्तव्य; त्यातच त्यांचे स्वातंत्र्य आहे व जीवनाची परिपूर्तीही आहे.

इतिहास आर्थिक कारणामुळे घडत नाही. तो घडतो, तो पराक्रमी पुरुषांच्या पराक्रमामुळे. त्यांना त्यांच्या मर्जीनुसार पराक्रम गाजविण्याची संधी देणे यातच समाजाचे हित आहे.

राष्ट्राच्या नेत्याला मदत करण्यासाठी व त्याचे कार्यक्रम अंमलात आणण्यासाठी संघटना हवी. ती संघटना म्हणजे फॅसिस्ट पक्ष. तो पक्ष शिस्तबद्ध व लढाऊ वृत्तीचा हवा व त्याचा नेत्यावर संपूर्ण विश्वास हवा.

ही झाली फॅसिझमची वा नाझीझमची सर्वसाधारण तत्त्वे. त्याच्या तत्त्वज्ञानाचा म्हणजेच विश्वविषयक कल्पनांचा मुद्दामच उल्लेख केलेला नाही, कारण त्या फार गोंधळाच्या व परस्पर विसंगत आहेत. फॅसिझम जडवादी आहे की आदर्शवादी आहे, हे सांगणेही कठीण आहे. त्याच्या कृतीमध्ये खालच्या दर्जाचा जडवाद किंवा भौतिकवाद दृष्टीस पडतो. तर त्याच्या सर्वात महत्वाच्या राज्य या संकल्पनेत आदर्शवाद दृष्टीस पडतो. फॅसिझमला वा नाझीझमला हिंसेचे वावडे नाही, त्यांमध्ये उलट हिंसेचा पुरस्कारच आढळतो. तसेच नीती-अनितीचाही त्याला विधिनिषेध नाही. राष्ट्रीय उद्दिष्ट साधण्यासाठी कोणत्याही मार्गाचा अवलंब केला तरी त्याला चालते. फॅसिझम शांततावादी नसून उलट तो युद्धवादी आहे, तसाच तो उग्र राष्ट्रवादी आहे. उग्र राष्ट्रवाद आणि युद्ध यांचे नेहमी साहचर्य असतेच.

ऐतिहासिक दृष्ट्या फॅसिझम व त्याचे जुळे भावंड नाझीझम जन्माला आले, ते पहिल्या महायुद्धाच्या अंतानंतर, व्हर्सायच्या तहामुळे जी आंतरराष्ट्रीय व्यवस्था निर्माण झाली, तिचा उच्छेद करण्याच्या हेतूने युद्धा जर्मनीचा पराभव झाला होता. त्यामुळे त्याला आपल्या वसाहतींना मुकावे लागले व ॲल्सेस-लॉरेन यांसारख्यां काही भागांनाही मुकावे लागले. इटलीचा पराभव झाला नव्हता; पण युद्धानंतर आपले साम्राज्य वाढविण्यासाठी दक्षिण यूरोपमध्ये व उत्तर आफ्रिकेमध्ये आपल्याला काही मुलूख मिळेल, अशी त्याची अपेक्षा होती. ती पूर्ण झाली नव्हती. म्हणून इटलीही असंतुष्ट होता. आपल्यावर अन्याय झाला आहे अशी दोन्ही देशांची भावना होती. अन्याय दूर करून घेण्यासाठी त्यांना युद्ध हवे होते. म्हणून त्यांनी उग्र राष्ट्रवादाला व युद्धखोर प्रवृत्तींना उत्तेजन दिले. फॅसिस्ट व नाझी पक्षांचा तर तोच कार्यक्रम होता. त्यामुळे त्यांना राजाश्रय मिळाला व दोन्ही पक्षांची ताकत व महत्त्व एकदम खूप वाढले.

याचवेळी दुसरीही एक घटना घडत होती. ती म्हणजे पगारकाट, कामवाढ, नोकरकपात इ. स्वरूपाचा भांडवलशाहीचा कामगारांवरील हल्ला, युद्धानंतरच्या आर्थिक परिस्थितीत कामगारांना नवीन सवलती देणे, तर भांडवलशाहांना शक्य नव्हते; पण जुन्या सवलती चालू ठेवणेही अशक्य झाले होते. कारण भांडवलशाहीची वाढ थांबली होती. त्यामुळे अटळ असे तीव्र वर्गयुद्ध सुरू झाले होते. कामगार संप, निदर्शने वगैरे तर करतच होते; पण त्यांनी राजकीय लढाही सुरू केला होता. रशियात तो लढा यशस्वीही झाला होता व तिथे कामगारांचे राज्य स्थापन झाले होते. इतर देशांतील भांडवलदारांना तीच धास्ती वाटत होती. अशा वेळी त्यांना आधार दिला तो फॅसिस्ट विचारसरणीने व फॅसिस्ट पक्षाने. साम्यवादी व समाजवादी विचारांना उत्तर देणारे विचार त्यांना फॅसिझममध्ये आढळले आणि कामगारांच्या चळवळी व संघटना दडपून टाकणारी यंत्रणा त्यांना फॅसिस्ट पक्षाने पुरवली. म्हणून भांडवलशाही व फॅसिझम यांच्यामध्ये निकटचे नाते निर्माण झाले.

मार्क्सवाद्यांचा फॅसिझमबद्दलचा सिद्धांत या अनुभवावरून तयार झाला. त्यांचा सिद्धांत असा की, भांडवलशाहीला उतरती कळा लागते त्यावेळी ती फॅसिझमला जन्म देते. चढत्या काळात तिला लोकशाही कामगारसंघ, कामगारांचे संप वैगरे परवडत होते; पण उतरती कळा लागल्यानंतर त्या गोष्टी परवडणार नाहीत, असे दृष्टीस पडल्यामुळे त्यांच्या विनाशासाठी भांडवलशाहीने फॅसिझम निर्माण केला. या उपपत्तीतील दोष असा की फॅसिझमला भांडवलशाहीची खूप मदत झाली असली, तरी तिने तो निर्माण केला असे म्हणणे कठीण आहे, तो अगोदरच अस्तित्वात आलेला होता, त्याची उपयुक्तता ओळखून भांडवलशाहीने नंतर त्याला जोपासले. तसेच राजकीय सत्ता हस्तगत केल्यानंतर त्यानेही भांडवलशाहीला वेठीस धरले, ही गोष्ट देखील विसरता कामा नये. शिवाय फॅसिझमला मध्यम वर्गाचा जो पाठींबा लाभला, त्याचेही स्पष्टीकरण या उपपत्तीमुळे होत नाही. केवळ भांडवलदारांचा पक्ष एवढेच त्याचे स्वरूप असते, तर मध्यम वर्गाने फॅसिझमला पाठिंबा दिला नसता; पण त्याचा उग्र राष्ट्रवाद व मध्यम वर्गाला वेगळे व स्वतंत्र स्थान देण्याची घोषणा यांनी मध्यम वर्गीयांच्या मनाला भुरळ पडली आणि त्यांनी फॅसिझमच्या जुलूमजबरदस्तीकडे दुर्लक्ष केले. त्याचे प्रायश्चित त्यांना अर्थातच नंतर भोगावे लागले. फॅसिझम प्रत्यंक्षात समाजवाद व साम्यवाद यांचा शत्रू म्हणून वाढला, या गोष्टीमुळे मात्र त्या उपपत्तीला पाठिंबा मिळतो.

सत्तासंपादनानंतरची पहिली तीन-चार वर्षे मुसालिनीला सत्ता सुसंघटित व स्थिर बनविण्यात घालवावी लागली. या काळात त्याने सर्व विरोधी पक्ष व विरोधी संस्था नष्ट केल्या आणि देशातील कायदेमंडळ, नोकरशाही, लष्कर, वर्तमानपत्रे, शैक्षणिक व सांस्कृतिक संस्था यांवर आपले प्रभुत्व प्रस्थापित केले. म्हणजेच देशामध्ये एक नेता, एक पक्ष व एक आवाज असला पाहिजे, हा जो फॅसिझमचा कार्यक्रम, तो त्याने अंमलात आणला. तो अंमलात आणताना त्याने खूप दडपशाही केली. विरोधकांवर अत्याचार केले व सर्व लोकशाही हक्क पायदळी तुडविले; पण देशातील कायदा आणि सुव्यवस्था ढासळली होती. ती त्याने पुनर्प्रस्थापित केली. त्याचेच पुष्कळांना कौतुक झाले. मुसोलिनीच्या राज्यात गाड्या वेळेवर सुटतात म्हणून अनेकांनी त्याची स्तुती केली; पण त्यासाठी केवढी किंमत मोजावी लागली व पुढे मोजावी लागणार आहे, याचा त्यांना विसर पडला.

त्यानंतर मुसोलिनीचे साम्राज्ययुग सुरू झाले आणि ते देखील फॅसिझमच्या कार्यक्रमानुसार. साम्राज्यवाद फॅसिझमचा अविभाज्य भाग आहे. उग्र राष्ट्रवादाची परिणती नेहमी साम्राज्यवादातच होते. फॅसिझमपुढे उद्दिष्ट होते, ते जुन्या रोमन साम्राज्याचे. त्या काळात इटलीला जी प्रतिष्ठा होती, ती पुन्हा परत मिळवण्याची स्वप्ने फॅसिस्टांना पडत होती. त्यासाठी युद्धे करावी लागतील, हे त्यांना माहित होते. म्हणून त्यांने लष्कर सुसज्ज करण्याकडे खूप लक्ष दिले. लोकांना भाकरी मिळाली नाही तरी चालेल; पण लष्कराला युद्ध साहित्य कमी पडता कामा नये, असा त्यांचा आग्रह होता. इटलीतील जनतेला उद्देशून त्यांनी जे घोषवाक्य तयार केले होते ते असे, "विश्वास ठेवा, आज्ञापालन करा, लढा". १९३९ साली केलेल्या एका भाषणात मुसोलिनी म्हणाला होता, "अधिक महत्त्वाचे व निश्चित स्वरूपाचे आहे, ते हे की आपण शस्त्रबळ वाढवले पाहिजे," माझा हुकूम आहे, "तो हा, अधिक बंदुका, अधिक जहाजे व अधिक विमाने मिळवा, कितीही किंमत द्यावी लागली तरी व कोणत्याही मार्गाने त्यासाठी आपण ज्याला सुसंस्कृत जीवन म्हणतो, त्याला तिलांजली द्यावी लागली तरी बिघडत नाही." मुसोलिनीच्या या भाषणात फॅसिझमचे युद्धविषयक धोरण चांगले प्रतिबिंबीत झाले आहे.

फॅसिझमच्या धोरणानुसार इटलीचे साम्राज्य वाढविण्यासाठी मुसोलिनीने १९३५ साली ॲबिसिनियावर (आताच्या इथिओपियावर) स्वारी करून तो पादाक्रांत केला व नंतर १९३९ साली अल्बेनिया गिळंकृत केला. संस्कृतीचा प्रसार करण्यासाठी आपण हे केले, असा त्याचा दावा होता. त्याला सुएझचा कालवा

व ईजिप्त यांवरदेखील आपली सत्ता प्रस्थापित करावयाची होती; परंतु तेवढ्यात १९३९ साली दुसरे महायुद्ध पेटले आणि त्याला फॅरिझमविरोधी युद्ध असे स्वरूप येऊन त्यामध्ये इटली, जर्मनी व जपान या तिन्ही देशांतील फॅसिस्ट राजवटींची आहुती पडली. हे युद्ध सुरू झाले ते देखील नाझी-फॅसिस्ट जपानी हुकूमशाहांच्या युद्धखोर वृत्तीमुळे व साम्राज्यतृष्णेमुळे. युध्दखोर वृत्ती व साम्राज्यतृष्णा फॅसिझममध्ये अंतर्निहित आहेत, तसाच लोकशाहीबद्दलचा तिरस्कार. लोकशाही राष्ट्रे लढतील व इतक्या निकराने लढतील असे त्यांना वाटले नव्हते. त्यामुळे ते सुलभ विजयाची स्वप्ने पहात होते; पण लोकशाहीने त्यांचा भ्रमनिरास केला. युद्धातील पराजयामुळे हुकूमशाह तर नष्ट झालेच, पण त्यांनी उभारलेल्या संघटनाही नष्ट झाल्या.

दुसऱ्या महायुद्धातील पराभवामुळे फॅसिस्ट राजवटी नष्ट झाल्या; पण फॅसिस्ट प्रवृत्ती नष्ट झाली असे म्हणता येत नाही. माणसामध्ये अधिकार गाजवण्याची हौस असते आणि संधी सापडली की काही माणसे शिरजोर बनतात. त्यांना अनुकूल संधी म्हणजे इतर मंडळीची अगतिकता. राजकीय आपत्तीमुळे किंवा आर्थिक संकटामुळे अशी अगतिकता समाजामध्ये काही वेळा पसरते; मग माणसे आधार शोधू लागतात. एखादा बलदंड मनुष्य त्यांना आधार द्यायला पुढे येतो. हे लहान प्रमाणावार घडते, त्या वेळी त्या माणसाला दादा किंवा गुंड म्हणतात. देशव्यापी स्वरूपावर ते घडले म्हणजे तो मनुष्य फॅसिस्ट हुकूमशाह बनतो. हे संकट टाळण्याचा एकच उपाय आहे; तो म्हणजे माणसांना अगतिक न बनू देणे. त्यांच्या ठिकाणी आत्मविश्वास निर्माण करणे व संकटाच्या काळी त्यांना आधार देतील, अशा त्यांच्या स्वतःच्या संघटना वाढवणे. हे लोकशाहीचे कार्य ती ज्या प्रमाणात पार पाडील, त्या प्रमाणात फॅसिझमचा धोका कमी हाईल.

●●●

मराठी विश्वकोष : १०, पृ ८२८-८३१.

परिशिष्ट-१७

कम्युनिस्ट पक्ष

ऐतिहासिक पार्श्वभूमी : मार्क्स आणि एंगेल्स यांच्या तत्त्वज्ञानाचा प्रचार आणि प्रसार करणे, क्रांतीच्या मार्गाने कामगारावर्गाची राजकीय सत्ता स्थापन करणे आणि मार्क्सवादी तत्त्वांवरच समाजरचना करण्यासाठी त्या सत्तेचा वापर करणे, अशा ध्येयधोरणाने संघटित झालेला गट, कम्युनिस्ट पक्ष या नावाने ओळखला जातो. रशियात १९१७ साली जी राजकीय क्रांती झाली, तिचे नेतृत्व *लेनिनकडे* होते. तो रशियातील कम्युनिस्ट पक्षाचा आग्रही पुरस्कर्ता आणि एक संस्थापक मानला जातो. त्याने कम्युनिस्ट पक्ष म्हणजे ' कामगारवर्गाचे संघटित अग्रदल ' असे वर्णन केले आहे. या पक्षाने कामगारवर्गाला संघटित करावे, त्या संघटनेच्या बळावर समाजातील भांडवलदारवर्ग आणि पक्ष यांच्याकडून सत्ता हस्तगत करावी, त्यानंतर समाजातील सर्व उत्पादन साधने राज्याच्या मालकीची करावी, व त्यातून शेवटी वर्गविरहित समाजरचनेचे ध्येय साकार करावे, अशी या पक्षाच्या ध्येयधोरणाची रुपरेषा लेनिनने स्पष्ट केली. स्टालिनन आपल्या भाष्याप्रमाणे ते ध्येयधोरण व्यवहारात आणले व रशियातील कम्युनिस्ट पक्षाचे नेतृत्व संपूर्णपणे आपल्या हाती केंद्रित केले.

रशियात झालेल्या क्रांतीच्या प्रेरणेने जगातील इतर अनेक देशांतही कम्युनिस्ट पक्ष स्थापन झाले आणि रशियाच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी आपापल्या देशांत राजकीय क्षेत्रात कार्य केले. १९६० मध्ये प्रसिद्ध झालेल्या आकड्यांप्रमाणे जगातील ८३ देशांमध्ये कम्युनिस्ट पक्ष स्थापन झाले असून त्यांची सभासदसंख्या एकूण तीन कोटींच्या जवळपास होती. त्यांपैकी सु. ८५ टक्के सभासदसंख्या रशिया आणि चीन या दोन देशांतील कम्युनिस्ट पक्षांची असून बाकीची १५ टक्के सभासदसंख्या ८१ देशांतील पक्षसदस्यांची आहे.

कम्युनिस्ट पक्ष पश्चिम यूरोपातील औद्योगिक दृष्ट्या पुढारलेल्या देशांत वाढेल आणि कानगार-संघटनांच्या साहाय्याने तो त्या देशात क्रांती करील, अशी मार्क्सवाद्यांची अपेक्षा होती. पण प्रत्यक्षात कम्युनिस्ट पक्षाचे बळ प्रामुख्याने अर्धविकसित किंवा अविकसित देशांत वाढले. त्यातून पहिल्या महायुद्धाच्या काळात रशियात क्रांती झाली. दुसऱ्या महायुद्धानंतर चीनमध्ये कम्युनिस्ट पक्षाने सत्ता हस्तगत केली. दुसरे महायुद्ध संपत असतानाच रशियाने पूर्व

यूरोपीय देशांत कम्युनिस्ट पक्षाला आपल्या लष्करी सामर्थ्याच्या जोरावर सत्तास्थानी बसविले. चेकोस्लोव्हाकिया, हंगेरी, पोलंड, रूमानिया, बल्गेरिया, पूर्व जर्मनी या देशांत कम्युनिस्ट पक्षाचे सामर्थ्य दुसऱ्या महायुद्धाच्या काळात अतिशय मर्यादित होते. पण रशियाच्या मदतीने ते पक्ष अधिकारारूढ झाले. पूर्वेकडे चीनच्या कम्युनिस्ट पक्षाने आपल्या प्रभावाचे क्षेत्र कोरिया, व्हिएटनाम, इंडोनेशिया, ख्मेर प्रजासत्ताक, मलेशिया, ब्रह्मदेश, श्रीलंका आणि काही प्रमाणात भारत या देशांत वाढविले. वरील दोन्ही घटनांचा अर्थ असा होतो की, कम्युनिस्ट पक्ष प्रामुख्याने शेतीप्रधान, औद्योगिक दृष्ट्या मागासलेल्या अशा अर्धविकसित देशांत संघटित होऊ शकला. आफ्रिका आणि द. अमेरिका या खंडातील काही देशांत कम्युनिस्ट संघटनेची मुळे रुजू पहात आहेत.

कम्युनिस्ट पक्षाचे श्रद्धास्थान : रशियाच्या बाहेरील देशांतील कम्युनिस्ट पक्ष जवळजवळ १९५० पर्यंत रशियातील कम्युनिस्ट पक्षाच्या आज्ञेनुसार कार्य करीत होते, ही वस्तुस्थिती तात्त्विक दृष्ट्या कोणी अमान्य केली, तरी व्यवहारात ती नाकारता येण्यासारखी नाही. रशियातील क्रांतीनंतर सतत तीस वर्षे रशियाचेच नेतृत्व जगातील सर्व कम्युनिस्टपक्षांनी अविरोध मान्य केले. पण १९४८ साली यूगोस्लाव्हियाने प्रथम या अद्वितीय नेतृत्वाला आव्हान दिले आणि आपल्या देशातील कम्युनिस्ट पक्षाचे धोरण स्वतंत्र असावे, असा आग्रह धरला. त्या नंतर चीनने आपल्या देशाच्या कम्युनिस्ट पक्ष स्वतंत्र रीत्या धोरण आखेल असे जाहीर केले. स्टालिनच्या मृत्यूनंतर हंगेरी, पोलंड, चेकोस्लोव्हाकिया यां देशांतील कम्युनिस्ट पक्षाने रशियन नेतृत्वाविरुद्ध अयशस्वी उठाव केले. या सर्व घटनांचा परिणाम, विशेषतः रशिया आणि चीन यांच्या वैमनस्याचा परिणाम, आशियातील, दक्षिण अमेरिकेतील व आफ्रिकेतील जवळजवळ सर्वच कम्युनिस्ट पक्षांच्या धोरणावर झालेला दिसून येतो. रशियावादी आणि चिनवादी असे कम्युनिस्ट पक्षांचे दोन गट या देशांत पडलेले दिसून येतात.

ध्येय आणि धोरण : सर्व कम्युनिस्ट पक्षांचे श्रद्धास्थान मार्क्स व एंगेल्स यांचे ग्रंथ मानले जातात. त्यांत नंतर लेनिन आणि स्टालिन यांनी केलेल्या मार्क्सवादाच्या स्पष्टीकरणाची भर पडली. स्टालिनच्या मृत्यूनंतर या भाष्यकारांतून त्याचे नाव वगळण्यात आले. चीन व चीनवादी कम्युनिस्ट पक्ष माओ-त्से-तुंग यांचे भाष्य अधिकृत मानतात.

कम्युनिस्ट पक्षांच्या सूत्रांवरून त्या पक्षांच्या उद्दिष्ट फक्त लक्षात येऊ शकेल : (१) देशातील सर्व उत्पादनसाधने समाजाच्या मालकीची करणे, त्यात उद्योगधंदे आणि शेती यांचाही समावेश आहे. (२) कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाने क्रांती

करून सत्ता हस्तगत करणे. (३) सशस्त्र क्रांतीवर विश्वास ठेवणे, (४) राज्यक्रांतीनंतर इतर पक्ष आणि संघटना बरखास्त करणे. (५) शिस्तबद्ध आणि कृतिशील अशा पक्षनेतृत्वाकडे समाजाने राजकीय शासन आणि आर्थिक साधने यांची जबाबदारी सोपविणे.

सत्ता हस्तगत करण्यापूर्वी आणि नंतरही काही दिवस कम्युनिस्ट पक्ष देशातील अल्पसंख्य जाती-जमाती, असंतुष्ट वर्ग, धार्मिक अल्पसंख्यांक, वांशिक छोटे गट आणि अत्यंत दरिद्री लोक यांना विकासाची आश्वासने देऊन पक्षाविषयीं सहानुभूती आणि आपुलकी निर्माण करतो. पक्षाच्या राजकीय डावपेचाचाच हा एक भाग मानला जातो. त्याबरोबरच धनिक वर्ग, उत्पादनसाधनांचे मालक, अधिकारावर उच्चस्थानी असलेल्या व्यक्ती आणि विरोधी राष्ट्रे यांचा, भांडवलादारांचे हस्तक, शोषक, साम्राज्यवादी इ. विशेषणांनी समाजात प्रचार केला जातो. वरील डावपेचाची ही दुसरी बाजू. आंतरराष्ट्रीय पातळीवरही याच अनुषंगाने प्रचार करण्यात येतो. कम्युनिस्ट देश शांततावादी आणि कम्युनिष्ठेतर देश युद्धखोर असे समीकरण बनविण्यात येते आणि मग अविकसित राष्ट्रांनी शांततावादी धोरणास, म्हणजेच कम्युनिस्ट देशांच्या धोरणास, पाठिंबा द्यावा असे आवाहन केले जाते. यालाच जागतिक राजकारणाच्या पातळीवरील वर्गसंघर्ष मानण्यात येतो. या प्रचाराचा मागासलेल्या देशांतील कम्युनिस्ट पक्षांवर अधिक प्रभाव पडू लागला, म्हणजे त्याला सक्रिय उत्तेजन देऊन शक्य तर निवडणुकीच्या मार्गाने आणि न जमल्यास लष्करी बळाच्या मार्गाने सत्तेवर आणणे, हेही त्या डावपेचाचे एक अंग होय. त्यासाठी राजकीय धोरणाबरोबर सामाजिक आणि सांस्कृतिक संघटना, साहित्यविषयक चळवळी, कलेच्या क्षेत्रांतील प्रयोग इ. विविध साधनांचाही उपयोग करण्यात येतो. सरकारी यंत्रणा आतून पोखरून टाकणे, पोलीस आणि न्यायखाते यांना निष्क्रिय बनविणे आणि जमल्यास लष्करातील तरुण अधिकाऱ्यांवर छाप पाडणे, यांचाही समावेश कम्युनिस्ट पक्षाच्या डावपेचांत करण्यात येतो आणि हे सारे क्रांतीसाठी आवश्यक आणि अपरिहार्य मानल्यामुळे त्यात अयोग्य किंवा वावगे समजले जात नाही.

रशियन कम्युनिस्ट पक्ष : एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी औद्योगिक क्षेत्रातील असंतोषातून रशियात मार्क्सवादी चळवळीला आरंभ झाला. प्ल्येखनॉव्ह या क्रांतिकारकाने मार्क्सवादी साहित्य परदेशांतून रशियात गुप्तपणे नेऊन रशियन भाषेत त्याचा प्रचार आणि प्रसार सुरू केला, आरंभी मार्क्सवादी गटाचे क्षेत्र फार छोटे होते. लेनिन आणि त्याचे सहकारी हेही त्या गटात सामील झाले. १८९० मध्ये रशियात चोवीस लक्ष कामगार होते. आरंभी त्यांची संघटना करणे

अत्यंत अवघड होते. १८९८ मध्ये मिन्स्क येथे रशियन सोशल डेमोक्रॅटिक लेबर पार्टीची स्थापना झाली. रशियन कम्युनिस्ट पक्ष अधिकृतरीत्या स्थापन झाल्याचे तेव्हापासून मानले जाते. १९०३ मध्ये या पक्षात फाटाफूट झाली आणि बोल्शेव्हिक आणि मेन्शेव्हिक असे दोन गट त्यातून वेगळे झाले. लेनिन आणि त्याचे सहकारी यांचा बोल्शेव्हिक गट अधिक प्रभावी होता. रशियन क्रांतीच्या वेळी हा गट प्रामुख्याने आघाडीवर होता. मार्च १९१८ मध्ये या गटाने रशियन कम्युनिस्ट पार्टी (बोल्शेव्हिक) असे नाव स्विकारले. १९२५ मध्ये ऑल युनियन कम्युनिस्ट पार्टी (बोल्शेव्हिक) असे नाव बदलण्यात आले. त्यानंतर १९५२ मध्ये बोल्शेव्हिक हा शब्द गाळण्यात आला आणि कम्युनिस्ट पार्टी ऑफ दी सोव्हिएट युनियन असे नाव त्यास देण्यात आले.

पक्षाने घेतलेला निर्णय सर्व सभासदांवर संपूर्णपणे बंधनकारक मानला जातो. या निर्णयाविरुद्ध चर्चा करणे, जाहीरपणे वा गुप्तपणे त्यासंबंधी बोलणे निषेधार्ह मानले जाते आणि त्याबद्दल सभासद शिक्षेला पात्र ठरतो. एखाद्या निर्णयाची चर्चा करणे सभासदाला आवश्यक वाटत असेल, तर त्याने तो प्रश्न पक्षाच्या बैठकीत जेव्हा चर्चेला येईल तेव्हाच त्यासंबंधी आपले मत व्यक्त करावे. त्याविरुद्ध वर्तन करणाऱ्याला शिस्तभंगासाठी निरनिराळ्या प्रकारच्या शिक्षा ठेवलेल्या आहेत. लोकांसमोर अपमानित करणे, सरकारी यंत्रणेतून काढून टाकणे आणि अशाच इतर मार्गांनी त्याची पक्षातून हकालपट्टी करणे इ. शिक्षा करतां येतात. सभासदाची पक्षातून हकालपट्टी करण्यापेक्षा पक्षनेत्याला अधिक काही करतां येत नाही. म्हणून स्टालिन आपल्या विरोधकांना नष्ट करण्यासाठी पक्षशिस्तीचे कारण न सांगता त्यांच्यावर राज्य उलथून पाडण्याच्या गुन्ह्यांचा आरोप ठेवीत असे. अर्थात अशा गुन्ह्याला शिक्षा करणे कायद्याच्या कक्षेत येत असल्यामुळे स्टालिन आपल्या विरोधकांची सजहगत्या वाट लावू शकत असे. त्यामुळे पक्षाचे शुद्धीकरण झाले असेही मानण्यात येत असे.

उमेदवारीच्या काळात सभासदाने कोठेही आणि कोणत्याही कामासाठी जाण्याची तयारी ठेवली पाहिजे; उमेदवाराचे वय किमान १८ वर्षांचे हवे. रशियाबाहेरही कम्युनिस्ट पक्षाचे सभासदत्व मिळणे असेच काहीसे गुंतागुंतीचे असते. पक्षाच्या ध्येयासाठी त्यागपूर्वक कष्ट करण्याची तयारी, शिस्त आणि आज्ञापालन या तीन महत्त्वाच्या कसोट्या मानण्यात येतात. पक्षाच्या अगदी तळाशी असलेल्या प्राथमिक पक्ष केंद्राचा सभासद आपल्या कार्याने वरच्या पक्षसंघटनांत प्रवेश करून आपले कर्तृत्व अधिक व्यापक करू शकतो, अशी पक्षाच्या नियमांत तरतूद आहे. क्रांतीच्या पूर्वी पक्ष सदस्यांना अत्यंत प्रतिकूल

परिस्थितीतून जावे लागत असे. क्रांतीनंतर ती परिस्थिती बदलली, पण नवी परिस्थितीही सर्व सभासदांना सारखीच अनुकूल ठरली, असे मात्र म्हणता येणार नाही.

पक्षाचे सभासद होणे जेवढे अवघड आहे, तेवढेच पक्षातून बाहेर पडणेही अवघड असते. एखाद्या सभासदाने राजीनामा द्यावयाचे ठरविले, तर त्याचा अर्थ त्या सभासदाचा पक्षाच्या ध्येयधोरणाशी, कार्यक्रमाशी किंवा पक्षनेत्यांनी केलेल्या आज्ञांशी विरोध आहे, असे मानले जाते आणि मग त्याला आपला विरोध स्पष्ट करता येत नाही. किंवा पक्षातून सरळ राजीनामा देऊन बाहेरही पडता येत नाही. एक प्रकारे त्याच्या मनाचा कोंडमारा होत राहतो. म्हणून पक्षातून राजीनामा दिलेले सभासद सापडत नाहीत. नेतृत्वाच्या विरोधामुळे सभासदांना पक्षातून काढले जाते. सभासदाला मतभेद व्यक्त करणेही अशक्य असते. कारण असा मतभेद म्हणजे पक्षाने ठरविलेल्या कार्यक्रमांशी द्रोह करण्यासारखे मानले जाते. त्यासाठी नेत्याचा विरोध पतकरावा लागतो.

लोकशाही केंद्रित सत्ता हे पक्षाचे संघटनात्मक मार्गदर्शक तत्त्व मानले जाते. पण प्रत्यक्ष व्यवहारात ही लोकशाही फक्त खालच्या पातळीवरील पक्षसंघटनांच्या सभांत टीका करण्यापर्यंतच मर्यादित असते. पक्षाच्या ध्येयधोरणाचे सर्वोच्च निर्णय घेणाऱ्या पक्षनेतृत्वावर या मार्गदर्शक तत्त्वाचे आक्रमण होता कामा नये, याची प्रत्यक्षाप्रत्यक्ष रीतीने तरतूद करून ठेवलेली असते.

● ● ●

मराठी विश्वकोष : ३, पृ ३०१-३०३.

परिशिष्ट-१८

फ्रेंच राज्यक्रांती

इ.स. १७८९ मध्ये फ्रान्समध्ये झालेली ही राज्यक्रांती म्हणजे अठराव्या शतकातील जगाच्या इतिहासातील सर्वांत महत्त्वाची घटना होय. या क्रांतीमुळे निर्माण झालेल्या विचारप्रवाहांचा यूरोपीय देशांवर निरनिराळ्या प्रमाणात प्रभाव पडून यूरोपची सरंजामशाही समाजरचना पूर्ण नष्ट झाली आणि भांडवलशाही समाजरचना औद्योगिक क्रांतीच्या पायावर उभारली जाऊ लागली; म्हणून आधुनिक यूरोपची उभारणी फ्रेंच राज्यक्रांतीपासून झाली असे मानतात. त्याचप्रमाणे क्रांती ही संकल्पना इतिहास व राज्यशास्त्र यांत प्रथम अस्तित्वात आली, ती फ्रेंच राज्यक्रांतीनंतर व राज्यक्रांतीमुळेच !

ही राज्यक्रांती यूरोपच्या इतिहासातील किंबहुना मानवी इतिहासातील एक अत्यंत महत्त्वपूर्ण अशी घटना मानली जाते. राजकीय, सांस्कृतिक आणि वैचारिक क्षेत्रांत चौदाव्या लूईपासून (१६४३-१७१५) फ्रान्सला यूरोपमध्ये अनन्यसाधारण स्थान प्राप्त झाले होते; म्हणून फ्रेंच राज्यक्रांतीमुळे सर्व यूरोप प्रभावित झाला, यात नवल नाही. फ्रान्समधील बूँर्बा घराण्याच्या अनियंत्रित सत्तेला क्रांतीमुळे पायबंद घातला गेला. तेथे चालत आलेली परंपरागत सरदारवर्ग व धर्मगुरू यांची मिरासदारी क्रांतीने संपुष्टात आणली. शहरातील नवीन उदयास येणारा जो उत्पादकवर्ग त्याच्यावरील करांचा बोजा नाहीसा झाल्याने त्याला धंद्यात व राजकारणात पुढे येण्यास वाव मिळाला. जमीन कसणारा शेतकरी क्रांतिकाळातील कायद्यांमुळे आपल्या शेतीचा मालक बनला. या क्रांतीमुळे फ्रान्समध्ये लिखित संविधानाची प्रथा सुरू झाली. धार्मिक पुरोहितशाहीविरूध्द बुद्धिवादाची प्रतिष्ठापना क्रांतिकाळात झाल्यामुळे राजकारणावरील चर्चची पकड कायमची ढिली झाली.

कारण मीमांसा : या क्रांतीची कारणे सांगताना वैचारिक प्रबोधनापासून मिळालेली प्रेरणा या गोष्टींवर भर दिला जात असे क्रांतिपर्व सुरू झाल्यानंतर क्रांतिकारकांनी त्या विचारांचा आपल्या प्रश्नांची मांडणी करताना उपयोग करून घेतला होता, एवढीच साक्ष इतिहास देतो. त्याहून जास्त श्रेय प्रबोधन आणि विवेकवाद यांना देता येत नाही.

क्रांतीला पोषक असे जे वातावरण निर्माण झाले, त्यामध्ये श्रमजीवी शेतकऱ्यांची हलाखीची परिस्थिती हा प्रमुख घटक होता. शासनव्यवस्थेवरील सरदारवर्गाचे वर्चस्व कमी झाले होते; परंतु आर्थिक व सामाजिक संबंधांत ते टिकून होते. बहुसंख्य शेतकरी वस्तुतः आपल्या जमिनीचे मालक झाले होते; तरीपण परंपरागत सरदारवर्गास अनेक प्रकारचा करभार त्यांस विनाकारण द्यावा लागे. माल विकावयास नेताना रस्ताकर, नदी ओलांडताना पूलकर, पिकांचा ठराविक हिस्सा व अंडी इत्यादी सरदारवर्गास हक्काने मिळत. आठवड्यातील तीन दिवस सरदारवर्गाच्या शेतावर राबावे लागे अथवा त्याऐवजी पैसे द्यावे लागत. त्याचप्रमाणे तथाकथित संरक्षणासाठी वार्षिक कर सरदारवर्गास द्यावा लागे. शिवाय शेतकऱ्यास उत्पन्नाचा बारावा किंवा पंधरावा हिस्सा दशांशकर म्हणून चर्चला द्यावा लागे.

वरील करांपेक्षा जाचक म्हणजे सरकारकडे भरावे लागणारे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर होत. यांमध्ये जमीनसारा, डोईकर, प्राप्तिकर, मिठावरील कर इ. मोडत. यांव्यतिरिक्त शेतकऱ्यास रस्त्याच्या कामासाठी वर्षातून कित्येक आठवडे वेठबिगार करावी लागे. वरील सर्व करांपोटी जमीन कसणाऱ्यास उत्पन्नाचा अर्धा भाग तरी पदरात पडत होता की नाही, याची शंकाच आहे.

शहरात नव्याने निर्माण होणाऱ्या कामगारवर्गाची स्थितीही शेतकऱ्यांप्रमाणे हलाखीची होती. कमी मजुरी, वाढत्या किंमती, अनिश्चित बाजारभाव, बेकारी, उपासमार व रोगराई त्याच्या नशिबी कायमची होती. समाजामध्ये एका टोकास दुर्दैवी श्रमजीवी वर्ग होता; तर दुसऱ्या टोकास चैनीत व विलासात मशगुल झालेला सरदार-पुरोहितांचा वर्ग होता. आर्मां झां रीशल्य (१५८५-१६४२) व चौदावा लूई यांच्या धोरणामुळे सरदारवर्गास शासनव्यवस्थेमध्ये काहीच स्थान राहिले नव्हते. त्यांच्यातले मातब्बर लोक व्हर्सायला टोलेजंग वाडे बांधून राजाचे अनुकरण करीत आणि चैनीचे आयुष्य घालवीत असत. यामुळे शेतकरी- वर्गापासून ते संपूर्णतः दुरावले होते.

फ्रान्सची राज्यव्यवस्था पूर्णपणे अनियंत्रित पद्धतीची होती. राजा मनास येईल ते कायदे करी व विरोधकांस पकडून बेमुदत तुरुंगात डांबून ठेवी. स्टेट्स् जनरलचे (संसदेचे) अधिवेशन १६१४ पासून बोलावलेच गेले नव्हते. न्यायपद्धतीत कमालीचा अनागोंदीपणा होता. कायद्यामध्ये एकवाक्यता, एकसूत्रीपणा व समता यांचा पूर्णतः अभाव होता.

अन्याय, दारिद्र्य व विषमता ही फक्त फ्रान्सपुरती मर्यादित होती; असे नव्हते;

तर युरोपमधील इतर देशांमध्ये ह्या सर्व गोष्टी होत्या; किंबहुना पोलंड व जर्मनीमधील प्रशिया, बव्हेरिया, सॅक्सनी, होल्डनबर्ग, ब्रुन्झविक इ. काही राज्यांमध्ये त्या जास्तच प्रमाणात होत्या; परंतु या परिस्थितीवर मात करून आपण आपले भविष्य उज्वल करू अशी श्रद्धा फ्रेंचांमध्ये जेवढ्या प्रमाणात होती, तेवढी ती अन्यत्र कोठेही नव्हती. ही श्रद्धा वैचारिक क्रांतीच्या पोटी निर्माण झाली होती व ती दृढमूल होण्याचे कारण म्हणजे इंग्लंडमधील वैभवशाली राज्यक्रांतीची (१६८८-८९) स्फूर्ती व अमेरिकेचा स्वातंत्र्यलढा (१७७५-८३). या लढ्यात फ्रेंच सैन्याने सक्रिय भाग घेतला होता. नवविचारांचे आंदोलन फ्रान्सप्रमाणे इंग्लंड, जर्मनी व अमेरिका यातही झाले होते; परंतु फ्रान्समधील विचारवंत जास्त प्रभावी ठरून जनमानसावर त्याचा परिणाम झालेला दिसतो. नवविचारांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांमध्ये देशासंबंधी विचार केला नसून देशनिरपेक्ष मानवसमाजाच्या कल्याणाचा विचार केलेला आढळतो. सामाजिक, राजकीय व धार्मिक संस्थांचे मूल्यमापन मानवतावादाच्या दृष्टिकोनातून केले गेले. सामाजिक, अर्थव्यवस्थेवर व विशेषतः तत्कालीन धर्मसंस्थांवर या विचारवंतांनी कडाडून हल्ला केला होता. दनी दीद्रो (१७१३-८४), चार्ल्स मॉंतेस्क्यू (१६८९-१७५५), फ्रान्स्वा व्हॉल्तेअर (१६९४-१७७८), झां झाक रुसो (१७१२-१७७८) इत्यादींचे या संबंधीचे कार्य उल्लेखनीय आहे.

या नवविचारांचे स्वागत मुख्यतः फ्रान्समधील मध्यमवर्गाने व्यापारी, बँकांचे संचालक, दुकानदार, धंदेवाले लोक, वकील, डॉक्टर, अध्यापक यांनी केले. सरदार व पुरोहित यांचे वर्चस्व आणि विशेष हक्क किंवा अधिकार नष्ट करणे, राज्यकारभार सुधारणे, वर्गनिरपेक्षपणे सर्वांस राजकीय, आर्थिक व धार्मिक स्वातंत्र्य उपलब्ध करून देणे; या त्यांच्या प्रमुख मागण्या होत्या. जनता सार्वभौम आहे, या रुसोच्या तत्त्वाने ते भारले गेले होते; पण वरील गोष्टी साध्य करण्यासाठी फ्रेंच राज्यपद्धतीत सनदशीर मार्ग दिसत नसल्यामुळे क्रांतीच्या अपरिहार्यतेची जाणीव त्यांस होऊ लागली होती.

अशा वेळी सोळावा लूई (१७७४-८९) गादीवर आला. या पापभीरू व सत्प्रवृत्त राजाच्या ठायी राज्यकर्त्यास आवश्यक असणारा कणखरपणा, कर्तृत्व व बुद्धिमत्ता नव्हती. सर्व सत्ता त्याची पत्नी राणी मारी आंत्वानेत (१७५५-९३) हिच्या हातात होती. राज्यकारभारावर तिचा प्रभाव जास्त होता. राजा लोकांचे भले करू इच्छित होता; परंतु शासन व राजकारण यांत त्याला विशेष आस्था नव्हती. नाईलाजाने राजाने संसदेचे अधिवेशन मे १७८९ मध्ये बोलाविले. राज्यकारभारात बदल घडवून आणावयाच्या उत्साहात वर्गवार

निवडणुका झाल्या. मध्यमवर्गीय व शेतकामगार यांचा मिळून जो तिसरा वर्ग बनला होता, त्याच्या प्रतिनिधींनी नेहमीच्या प्रथेप्रमाणे गाऱ्हाणी सादर केली. त्यांचा रोख राज्यकारभारात सुधारणा करणे व समाजातील विषमता नष्ट करणे, यांवर होता; परंतु या गाऱ्हाणी पत्रकात राजाविरुद्ध शब्दसुद्धा काढला नव्हता किंवा क्रांतीची कल्पनाही सुचविली नव्हती, ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे.

यानंतर संसदेच्या मतदानपद्धतीबद्दल वाद उपस्थित झाला. पुरोहित व सरदार यांचे म्हणणे पडले की, परंपरागत पद्धतीप्रमाणे पुरोहित, सरदार व सामान्य किंवा तिसरा गट (थर्ड इस्टेट) या तिन्ही वर्गांनी अलग अलग बैठका भरवून मतदान करावे. असे केल्याने पुरोहित व सरदार या दोन वर्गांची मते एका बाजूस व तिसऱ्या गटाचे मत विरुद्ध बाजूस अशी स्थिती होऊन तिसरा वर्ग बहुसंख्य असताही त्याचे मत संसदेमध्ये कधीच प्रभावी ठरू शकणार नाही व त्यास हव्या असणाऱ्या सुधारणा कधीच अंमलात येऊ शकणार नाहीत; हे लक्षात घेऊन तिसऱ्या गटाने अशी मागणी केली की, सर्व वर्गांची एकत्र सभा बोलवावी व मतदान दरडोई एक मत या पद्धतीने घ्यावे. या प्रश्नावर राजा निश्चित धोरण लवकर ठरवत नाही, हे पाहून १७ जून १७८९ रोजी तिसऱ्या वर्गाने आपली सभा ही राष्ट्रीय सभा असल्याची घोषणा केली. पुरोहित व सरदार यांस सदर सभेत सामील होण्यासाठी आवाहन केले. शाही बैठकीच्या तयारीचे निमित्त करून राजाने तिसऱ्या गटाच्या सभागृहस्थानास कुलूप लावून तेथे लष्कर आणून ठेवले. हे पाहून ऑनॉरे गाब्रीएल मीराबो (१७४९-९१) व आबे स्येयअस यांच्या नेतृत्वाखाली तिसऱ्या वर्गाचे प्रतिनिधी शेजारच्या टेनिस क्रीडांगणावर गेले व तेथे त्यांनी शपथ घेतली की, 'जनतेचे सार्वभौमत्व प्रस्थापित करणारे संविधान तयार केल्याखेरीज आम्ही राष्ट्रीय सभेचे (संसदेचे) प्रतिनिधी एकमेकांपासून दूर होणार नाही'. २० जून १७८९ चा हा शपथविधी म्हणजे फ्रेंच राज्यक्रांतीची नांदी होती, असे म्हणण्यास हरकत नाही.

संसदेची एकत्र बैठक घेण्यास राजाने अखेर संमती दिली, परंतु त्याचबरोबर सैन्याची जमवाजमव करून दडपशाहीची तयारी ठेवली. याचा परिणाम असा झाला की, पॅरिसची जनता संसदेच्या मदतीस आली व त्यांनी जुलूमशाहीचे प्रतीक असलेला बॅस्तीलचा तुरुंग फोडला (१४ जुलै १७८९). अशा प्रकारे क्रांतीकारकांनी विजयाची पहिली पताका फडकाविली. क्रांतिकाळात राजेशाहीला विरोध करणाऱ्या क्रांतीकारकांनी लाल टोपी ही स्वातंत्र्याचे प्रतीक म्हणून सर्रास वापरली. तसेच फ्रान्सच्या राष्ट्रध्वजातील लाल, पांढरा आणि निळा

असा तिरंगी राष्ट्रध्वज या क्रांतिकाळातच बोधचिन्ह म्हणून १७ जुलै १७८९ रोजी वापरण्यात आला.

हिंसक चळवळीचे पर्व : जनतेच्या उठावापुढे लूईने तात्पुरती मान तुकविली. पण उठाव दडपून टाकण्यासाठी सैनिक बोलविले. हे समजताच पॅरिसच्या जनतेने परत उठाव केला व व्हर्सायच्या राजवाड्यावर ५ ऑक्टोबर १७८९ रोजी स्त्रियांचा मूक मोर्चा नेला. मार्की द लाफायेत (१७५७-१८३४) याच्या प्रसंगावधानामुळे राजकुटुंब त्या दिवसाच्या हत्याकांडामधून बचावले; पण लूईला व्हर्साय सोडून पॅरिसला यावे लागले. पॅरिसच्या तुलरीझ राजवाड्यात तो १० ऑगस्टपर्यंत ओलीस असल्यासारखा राहिला. मूक मोर्चाच्या बातम्या देशभर प्रसृत झाल्या आणि सगळीकडे शासनयंत्रणेविरुद्ध बंडाचे वातावरण फैलावले. ग्रामीण विभागात ठिकठिकाणी शेतकऱ्यांनी सरदारांच्या वाड्यांवर हल्ले करून त्यांची हक्कपत्रे जाळून टाकली आणि धार्मिक मठांचा विध्वंस केला. लूईचा पळून जाण्याचा प्रयत्न फसल्यानंतर राजाविरुद्ध वातावरण चांगलेच संतप्त झाले. राजसत्ता नष्ट करून प्रजासत्ताक स्थापन करावे, अशी भाषा लोक बोलू लागले.

क्रांतिकाळातील राज्यघटना व सत्तांतरे : सोळाव्या लूईने नाइलाजास्तव बोलविलेल्या संसदेने राष्ट्रीय सभा हे नामाभिधान घेतले. ही सभा म्हणजे फ्रान्सचे एकगृही विधीमंडळ होते. मंत्रिमंडळाची निवड राजा स्वतः करी व त्याचा संसदेशी काही संबंध नसे. राजाच्या तांत्रिक संमतीशिवाय कोणताही प्रस्ताव कायदा म्हणून अंमलात येऊ शकत नव्हता; परंतु मूलतः कमकुवत मनोवृत्तीचा लुई कठीण परिस्थितीत सापडल्यामुळे संसदेचे प्राबल्य वाढले होते. बॅस्तीलच्या पाडावातून पॅरिसच्या कम्यूनचे (स्थानिक स्वराज्यसंस्थेचे) महत्त्व वाढत जाऊन संसदेवर कम्यून दबाव आणीत असे. साहजिकच पॅरिस कम्यून मध्ये प्रभावी असलेला गट व व्यक्ती यांचा फ्रान्सच्या राजकारणावर हळूहळू प्रभाव पडू लागल्याचे दिसून येते.

राष्ट्रीय संसदेने १७८९ ते १७९१ या काळात संविधान तयार केले; महत्त्वाचे कायदे संमत करून त्यांनी मानवी हक्कांची घोषणाही केली. या घोषणेत स्वातंत्र्य, समता आणि जनतेचे सार्वभौमत्व उद्‌घोषित करण्यात आले. क्रांतीनंतरच्या काळात यूरोपीय क्रांतिकारकांना ह्या घोषणेपासून स्फूर्ती मिळत गेली. नेपोलियनच्या सर्व सैन्यापेक्षा ही घोषणा जास्त प्रभावी होती, असे लॉर्ड जॉन ॲक्टन (१८३४-१९०२) याने म्हटले आहे. ४ ऑगस्ट १७८४ रोजी संसदेत एका सरदाराने त्यावेळी अस्तित्वात असलेल्या सरदारांचे सर्व

खास अधिकार रद्द करण्यात यावेत, असा प्रस्ताव मांडला. पाठोपाठ पुरोहितवर्गाच्या प्रतिनिधींनी स्वतःस व चर्चला असलेले खास अधिकार रद्द व्हावेत, अशीही मागणी केली होती. दोन्ही वर्गांचे तत्सम प्रस्ताव सभेपुढे आणण्याची जणू अहमहमिकाच चालली होती. एका बैठकीत राष्ट्रीय संसदेने संविधान समितीच्या भूमिकेवरून मॉतेस्क्यू आणि रूसो यांच्या तत्त्वांवर आधारलेले संविधान तयार केले.

या संविधानानुसार राजाची सत्ता मर्यादित करण्यात आली. मंत्रिमंडळ निवडण्याचा अधिकार राजास देण्यात आला; पण हे मंत्री विधिमंडळाचे सभासद असता कामा नये व त्यांनी विधिमंडळाच्या बैठकीस केव्हाही हजर राहता कामा नये, असा दंडक घालण्यात आला. राजाला खर्चासाठी ठराविक रक्कम मंजूर करण्यात आली. त्याचे परमाधिकार मर्यादित करण्यात आले. विधिमंडळ हे एकगृही ठेवण्यात येऊन त्याची मुदत दोन वर्षांची ठरविण्यात आली; पण मतदानाचा अधिकार विशिष्ट रकमेपेक्षा जास्त कर भरणाऱ्यास देण्यात आला. सर्व न्यायाधीश लोकनियुक्त राखून ज्यूरींची पद्धत सुरू केली गेली. विभागीय शासनाची पुनर्घटना करण्यात आली. चर्चची संपत्ती सरकारजमा केली गेली. या संपत्तीच्या आधारावर कागदी चलन सुरू करण्यात आले; पुण पुढे ते प्रमाणाबाहेर गेल्यामुळे प्रत्यक्षात त्याची किंमत कमी होऊ लागली आणि आर्थिक व्यवहारात गोंधळ माजला. लोकांनी पुरोहितांची निवड करावयाची व त्यास वेतन पोपकडून न मिळता ते शासनाकडून मिळवावयाचे, हा महत्त्वाचा बदल करण्यात आला. पोपने या बदलाचा निषेध केल्यामुळे प्रत्युत्तरादाखल राष्ट्रीय विधिमंडळाने पुरोहितांस या कायद्याशी एकनिष्ठ राहण्यांची शपथ घ्यावयास भाग पाडले.[1]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ता. २५ डिसेंबर १९२७ रोजी जी महाड सत्याग्रह परिषद आयोजित केली होती त्या परिषदेत जे भाषण केले त्यात या परिषदेचे औचित्य आणि तिची तुलना फ्रेंच क्रांतीशी करताना म्हणतात,

" इतरांप्रमाणे आम्हीही माणसे " आहोत हें सिद्ध करण्याकरितांच त्या तळ्यावर आपणांस जावयाचें आहे. म्हणजे ही सभा समतेची मुहर्तमेढ रोवण्यासाठींच बोलावण्यांत आली आहे.

या दृष्टीनें या सभेचा विचार केला असतां ती अपूर्व आहे, याबद्दल कोणासही शंका वाटणार नाही, अशी माझी खात्री आहे. आजच्या प्रसंगास या हिंदुस्थानच्या इतिहासांत तिला तोड सांपडेल असें मला मूळींच वाटत नाहीं. याच तोडीची

---

[1] : मराठी विश्वकोष : १०, पृ ११२०-११२२.

पूर्वकालीं भरलेली दुसरी सभा आपण शोधू लागलों तर आपल्याला युरोप खंडांतील फ्रान्स देशाच्या इतिहासांत शिरावें लागेल. १३८ वर्षांपूर्वी फ्रॉन्स देशांतील सोळाव्या लुई राजाने तारीख २४ जानेवारी सन १७८९ या दिवशी एक आज्ञापत्र काढून आपल्या राज्यांतील प्रजेच्या प्रतिनिधींचीं अशीच एक सभा बोलाविली होती. या फ्रेंच राष्ट्रीय सभेच्या नांवानें कांहीं इतिहासकार खडे फोडतात. या सभेनें फ्रान्स देशाच्या राजाराणीस सुळी दिलें; वरिष्ठ वर्गास सळो का पळोंसें करून त्यांची कत्तल केली व उरले त्यांना देशोधडीस लाविलें. श्रीमंतांची मालमत्ता जप्त केली व १५ वर्षांहून अधिक साऱ्या युरोपखंडांत यादवी माजवून ठेवली. असा त्यांचा या फ्रेंच राष्ट्रीय सभेवर आरोप आहे. माझ्यामतें हा ठपका अस्थानीं आहे, इतकेंच नव्हे तर अशा इतिहासकारांना या फ्रेंच राष्ट्रीय सभेनें जी कामगिरी केली तिचें खरें इंगीत कळलें नाहीं असेंच म्हणावें लागतें. या सभेच्या कामगिरीमुळें फ्रान्स देशाचेंच कल्याण झालें आहे असें नव्हे, तर साऱ्या युरोपखंडाचें कल्याण झालें आहे. आज युरोपियन राष्ट्रें सुख व समृद्धी भोगीत असतील त्याला कारण एकच. व तें हें कीं या १७८९ साली भरलेल्या क्रांतिकारक फ्रेंच राष्ट्रीय सभेनें समाजसंघटनेचीं जीं तत्वें विस्कळीत व निर्माल्यवत झालेल्या तद्कालीन फ्रेंच राष्ट्रापुढें मांडली व त्यावर तीं जबरीनें लादली तींच तत्वें युरोपखंडानें मान्य केली व आचारांत आणली.

या फ्रेंच राष्ट्रीय सभेचें महत्त्व व तिच्या तत्वांची महती कळण्याकरितां त्या काळाची फ्रेंच समाजाची परिस्थिती ध्यानांत घेतली पाहिजे. आपला हा हिंदु समाज वर्णाश्रम धर्मावर रचण्यांत आला आहे हें आपणा सर्वांस विदित आहेच. तशाच प्रकारची वर्णाश्रमव्यवस्था फ्रान्स देशामध्येंही सन १७८९ सालीं होती. फरक इतकाच की, फ्रेंच समाज हा त्रैवर्णीकांचा होता. हिंदुसमाजाप्रमाणें फ्रेंच समाजांतही ब्राह्मण वर्ण होता, व क्षत्रिय वर्णही होता. मात्र फ्रेंच समाजामध्यें वैश्य, शूद्र व अतिशूद्र असे तीन निरनिराळे वर्ण न करितां तिघांचा मिळून एकच तृतीय वर्ण करण्यांत आला होता. हा फरक अगदीं गौण आहे. महत्त्वाची गोष्ट ही कीं, हिंदु समाज व फ्रेंच समाज या उभय समाजांत वर्णाश्रमव्यवस्था सारखीच होती. वर्णव्यवस्थेमुळें उभयतांत उत्पन्न होणारी भिन्नता एवढेंच काय तें साम्यतेच्या दृष्टीनें ध्यानात घेण्यासारखें आहे असें नाहीं. तर वर्णव्यवस्थेंतील असमानताही फ्रेंच समाजांत होती. फ्रान्स देशांत या असमानतेचे स्वरूप निराळ्या प्रकारचें होतें. तेथें परस्पर वर्णांतील असमानता आर्थिक स्वरूपाची होती पण ती तितक्याच तीव्र प्रकारची होती. एकूण लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं,

आजच्या या आपल्या सभेंत व फ्रान्समधील व्हरसाय मुक्कामीं ता. ५ मे सन १७८९ रोजीं भरलेल्या फ्रेंच लोकांच्या क्रांतीकारक राष्ट्रीय सभेंत अत्यंत मोठें साम्य आहे.

त्यांच्या परस्परांतील परिस्थितींत साम्य दिसतें इतकेंच नव्हें तर त्यांच्या ध्येयातही पुष्कळसें साम्य आहे. फ्रेंच लोकांची ती सभा फ्रेंच समाजाची संघटना करण्यास्तव बोलविण्यांत आली होती. आजची ही सभा हिंदु समाजाचें संघटन करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे. अर्थात ही संघटणा कोणत्या तत्वावर करण्यांत यावी याची चर्चा करण्यापूर्वी या फ्रेंच लोकांच्या सभेनें फ्रान्स देशाची संघटणाकरण्याकरितां कोणते धोरण स्विकारिलें व कोणत्या तत्वांचा आधार घेतला याची बूज आपण सर्वांनी करून घेतली पाहिजे. या फ्रेंच सभेचा व्याप आपल्या आजच्या सभेच्या व्यापापेक्षां पुष्कळच विस्तृत असा होता. फ्रेंच लोकांच्या या सभेस राजकीय, सामाजिक व धार्मिक असें त्रिविध प्रकारचें संघटन करावयाचें होतें. आपल्याला फक्त सामाजिक व धार्मिक संघटना कशी होईल याचाच विचार करणें अवश्य आहे. आपणांस राजकीय संघटणांशीं तूर्त कर्तव्य नसल्यामुळें धार्मिक व सामाजिक संघटणेचे बाबतींत या फ्रेंच सभेनें काय केलें एवढेंच काय तें आपणांस पहावयाचें आहे. या फ्रेंच सभेने सामाजिक व धार्मिक संघटणेचे बाबतींत जें धोरण ठेविलें होतें तें धोरण कोणत्या प्रकारचें होतें हें या सभेनें जें तीन महत्त्वाचे जाहीरनामे काढले त्यावरून कोणासही उघड दिसून येणार आहे. पहिला जाहीरनामा ता. १७ जून १७८९ रोजीं काढण्यांत आला. तो जाहीरनामा फ्रान्स देशांतील वर्णाश्रम धर्मासंबंधानें होता. पूर्वी सांगितल्याप्रमाणें फ्रेंच समाज त्रैवर्णिक होता. या जाहीरनाम्यानें हा त्रैवर्णिक समाज मोडून साऱ्या समाजाचा एकवर्ण करण्यांत आला. इतकेंच नव्हे तर राजकीय सभागृहांत या त्रैवार्णिकांसाठी ज्या निरनिराळ्या जागा राखण्यांत आल्या होत्या, त्या खालसा करण्यांत आल्या. दुसरा जाहीरनामा धर्मोपदेशकासंबंधानें होता. पुरातन रूढीप्रमाणें हे धर्मोपदेशक नेमणे किंवा काढणे हें राष्ट्राच्या स्वाधीन नसून, पोपसारख्या परदेशीय धर्माधिकाऱ्याची मिरास होऊन बसली होती. ज्यांस धर्मोपदेशक पोप नेमील तो धर्मोपदेशक होत असे; मग, ज्यांना हा धर्मोपदेशक धर्माचा उपदेश करणार त्यांच्या दृष्टीनें तो त्या अधिकारास लायक असो किंवा नसो ! या जाहिरनाम्यानें धर्माधिकारी वर्गाचें स्वयंभूपण नाहींसें करण्यांत आलें व हा पेशा कोणी करावा, त्याला लायक कोण व नालायक कोण, त्याला वेतन द्यावयाचें किंवा न द्यावयाचें, वगैरे गोष्टी ठरविण्याचा अधिकार फ्रेंच राष्ट्राला देण्यांत आला. तिसरा जाहीरनामा राजकीय,

आर्थिक अथवा धार्मिक व्यवस्थेसंबंधी नव्हता. तो सर्वसाधारण असून हरएक प्रकारची सामाजिक व्यवस्था, कोणत्या तत्त्वाच्या पायावर उभारली जावी, यासंबधाचा होता. त्यादृष्टीनें हा जाहीरनामा या तीनही जाहीरनाम्यांत अत्यंत महत्त्वाचा असा जाहीरनामा आहे. किंबहुना त्यास या सर्व जाहीरनाम्यांचा राजा आहे, असे म्हटलें तरी चालेल. हा जाहीरनामा जन्मसिद्ध मानवी हक्कांचा जाहीरनामा यानांवानें सर्व जगती तलावर सुप्रसिद्ध होऊन राहिला आहे. तो जाहिरनामा नुसत्या फ्रान्स देशाच्या इतिहासांतील एक अपूर्व अशी चीज आहे; इतकेंच नव्हे तर साऱ्या सुधारलेल्या राष्ट्रांच्या इतिहासांत तो अपूर्व होऊन राहिला आहे. कारण या सभेचें अनुकरण करून युरोपांतील दरेक राष्ट्रानें आपल्या राज्यव्यवस्थेंत त्याला अधिष्ठान दिलें आहे. यास्तव त्यानें नुसत्या फ्रान्स देशांतच क्रान्ति केली नाहीं, तर सर्व जगांत क्रान्ति केली, असें म्हणण्यास मुळींच हरकत नाही. या जाहीरनाम्याची एकंदर १७ कलमें आहेत. त्यांपैकीं खालील कलमें महत्वाची आहेत.

(१) सर्व माणसें जन्मतः समान दर्जाची आहेत; व तीं मरेपर्यंत समान दर्जाचींच राहतील. लोकहिताकारणेंच त्यांच्या दर्जात अंतर करतां येईल. येरवी, त्यांचा समान दर्जा तसाच कायम राहिला पाहिजे.

(२) वरील जन्मसिद्ध मानवी हक्क कायम रहावेत हाच राजकारणाचा अंतिम हेतु असला पाहिजे.

(३) अखिल प्रजा ही सर्वाधिकाराची मायभूमि आहे. कोणत्याही व्यक्तीचें, समुदायाचें अगर वर्गाचे विशिष्ट हक्क जर ते प्रजेनें दिले नसतील तर ते इतर कशाच्याही आधारावर–मग तो आधार राजकारणाचा असो, धर्मकारणाचा असो –मान्य केले जाणार नाहीं.

(४) कोणत्याही व्यक्तीला आपल्या जन्मसिद्ध हक्काप्रमाणें वागण्यास पूर्ण स्वातंत्र्य आहे. त्यावर जर मर्यादा घालण्यांत आली तर ती दुसऱ्या व्यक्तीला तिचा जन्मसिद्ध हक्क उपभोगण्यास अवसर मिळावा, इतक्यापुरतीच घालतां येईल. व ती मर्यादा कायद्यानें ठरविली जाईल. ती धर्मशास्त्राच्या आधारानें किंवा इतर कशाच्याही आधारानें ठरविली जाणार नाहीं.

(५) जेवढ्या गोष्टी समाजास विघातक होतील तेवढ्याच गोष्टी करण्याची कायद्यानें बंदी केली जाईल. जी गोष्ट कायद्यानें मना केली नसेल ती करण्यास सर्वांना मुभा असावी. तसेंच जी गोष्ट करणें कायद्यानें अवश्य ठरविली नसेल ती गोष्ट करावयास कोणासही भाग पाडलें जाऊं नये.

(६) कायदा म्हणजे अमूक एका वर्गांनें ठरविलेली बंधनें नव्हे. तो कोणत्या प्रकारचा असावा, हें ठरविण्याचा हक्क सर्व प्रजेस अगर तिच्या प्रतिनिधीस आहे. हा कायदा संरक्षक असो अगर शासनात्मक असो, तो सर्वांस सारखाच असला पाहिजे. आणि सर्वांची समानता या तत्त्वाच्या आधारावरच सर्व प्रकारची व्यवस्था उभारणें न्याय असल्यामुळें सर्व व्यक्ती कोणत्याही प्रकारच्या मानसन्मानास, अधिकारास, व्यवसायास सारखीच पात्र आहेत. या बाबतींत जर काहीं भेदाभेद झाला तर तो केवळ व्यक्तींतल्या गुणभेदामुळेंच होऊ शकेल. जन्मामुळें होऊं शकणार नाहीं.

आजच्या या आपल्या सभेनें या फ्रेंच राष्ट्रीय सभेची प्रतिमा आपल्या डोळ्यांपुढें ठेविली पाहिजें, असें मला वाटतें. तिनें जो मार्ग फ्रेंच राष्ट्राच्या संवर्धनासाठीं आंखून ठेवला व जो मार्ग सर्व सुधारलेल्या राष्ट्रांनी मान्य केला, तोच मार्ग हिंदुसमाजाच्या संवर्धनासाठीं या सभेनें आंखला पाहिजे व बेटीबंदीपासून भेटीबंदीपर्यंत वर्णाश्रमाच्या चौकटीचे हे खिळे उडवून हिंदुसमाजाचा एक वर्ण केला पाहिजे. त्याशिवाय अस्पृश्यता जाणार नाहीं व समताहि प्रस्थापित होणार नाहीं."[1]

या क्रांतीपूर्वी खालीलप्रमाणे फ्रान्समध्ये वर्ग व्यवस्था होती.

१ ला वर्ग— ख्रिश्चन पादरी, बिशप व आर्च बिशप - यांचे जीवन ऐश्वर्यशाही, स्वरुपाचे असून ते स्वतःला इतर पादरी वर्गांपेक्षा उच्च समजणारे.

२ रा वर्ग— सुप्रतिष्ठित, श्रीमंतःचा वर्ग, गरीबाविषयी विषमता, द्वेष इत्यादी बाळगणारे.

३ रा वर्ग— गरीब, शेतकरी, कामगार, मजूर व इतर सामान्य, अत्यंत गरीब, लहान-लहान घरात राहणारे, दुःखी, कोणालाही जेलमध्ये त्याची बाजू ऐकून न घेता कित्येक दिवस ठेवणे, तसेच एका स्वरुपाच्या गुन्ह्याकरिता वर्गानुसार वेगवेगळी शिक्षा ठोठावणे.

या क्रांतीची महुर्तमेढ रोवण्यात बुद्धिवादी व तत्त्वज्ञानी लोकांनी सामान्य लोकात चेतना निर्माण करण्यासाठी मोलाची कामगिरी बजाविली होती. त्यात प्रामुख्याने मॉन्टेस्क्यू (१६८९-१७५५); वाल्टेर (१६९४-१७७८) आणि रुसो

---

१ : बहिष्कृत भारत, ता. ३ फेब्रुवारी १९२८.

(१७१२-१७७८) यांचा उल्लेख केला जातो. त्यांनी प्रखरपणे मानवतावादी भूमिका घेऊन विषमतेचा धिःकार, विषमतेवर आधारित धर्मव्यवस्थेवर आघात रूढी, परंपरा व अंधश्रद्धेवर कठोर प्रहार केले आणि वर्ग व्यवस्थेचे नग्न स्वरूप लोकांच्या नजरेस आणले. रुसोने याचबरोबर मनुष्य हा स्वाभाविकपणे सदाचारी, सरळ, स्वतंत्र, इमानदार, समानतावादी असतो परंतु सर्व जागी शृंखलेने बांधला गेला या दृष्टिकोनातून सामाजिक धार्मिक प्रबोधन केले.

ता. ५ ऑक्टोबर १७८९ रोजी स्त्रियांनी हातात काठ्या व गदा घेऊन पॅरिस ते वर्साइल पर्यंत, रोटी-रोटी-रोटी चे नारे देत मोर्चा काढून ता. ६ ऑक्टोबर १७८९ रोजी राजमहालावर आक्रमण केले आणि यामुळे राजा, राणी, मुले पॅरिसला पळाले.

या क्रांतीचे नेतृत्व दुसऱ्या वर्गाच्या हातात होते. त्यात प्रथम श्रेणीचे बिशप व आर्च बिशप सोडून सर्व पादरी आणि तिसऱ्या वर्णाचे सर्व लोक यांचा सहभाग होता.

क्रांतीचे परिणाम व महत्त्व : स्वातंत्र्य, समता व विश्वबंधुत्व ही तत्त्वत्रयी वरील क्रांतिकारक सुधारणांची प्रेरणा होती. त्यांच्या जोडीला क्रांतीने जनतेच्या सार्वभौमत्वाची घोषणा केली होती. ही तत्त्वत्रयी क्रांतीच्या काळात सार्वजनिक इमारतींवर झळकत असे. नेपोलियनने हुकूमशाही प्रस्थापित केल्यावरही ती शब्दावली न पुसता तशीच ठेवण्यात आली. स्वातंत्र्यामध्ये भाषण, लेखन, प्रकाशन तसेच धार्मिक आणि खाजगी मालमत्तेचे स्वातंत्र्य ह्या गोष्टी अभिप्रेत होत्या. समतेमध्ये सरदारवर्गाची व तिच्यामधील खास अधिकारांची समाप्ती, सर्व नागरिकांस वर्गनिरपेक्ष समान संधी व कायद्याच्या बाबतीत समानता या गोष्टी अंतर्भूत होत्या. विश्वबंधुत्व म्हणजे जगामध्ये स्वातंत्र्य व समता यांवर विश्वास असणारे व ती तत्त्वे अंमलात आणण्यासाठी झगडणारे सर्व लोक, मग ते कोणत्याही देशांतील असोत; ते एकमेकांचे बंधू आहेत. स्वातंत्र्य, समता व विश्वबंधुत्व आणि जनतेचे सार्वभौमत्व या कल्पनांचा प्रसार सशस्त्र क्रांतीपूर्वी वैचारिक क्रांती करणाऱ्या फ्रेंच तत्त्ववेत्त्यांनी आपल्या लेखनाद्वारे केला होता. क्रांतीने या कल्पना साकार करण्याचा रांगडा, धसमुसळेपणाचा प्रयत्न केला. क्रांतीला आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले, ते यूरोपीय जनतेमुळे नव्हे; तर फ्रेंच सैन्यामुळे ! फ्रान्सबाहेर क्रांती मानली न जाता लादली गेली होती. तत्त्वापेक्षा परिस्थितीच्या गरजेचा प्रभाव त्यांच्या कृतीवर जास्त पडला होता. सामाजिक समतेवर अशा प्रकारच्या लोकशाहीची व सामाजिक न्यायाची

कल्पना यूरोपीय विचारांमध्ये कायमची दृढमूल झाली. पुढील इतिहासावरून ही कल्पना मूर्त स्वरुपात आणण्याचे प्रयत्न यूरोपात व अन्यत्र झालेले दिसून येतात आणि आधुनिक युगातही ते पुढे चालू आहेत. तसेच या काळात गरजेच्या पोटी किंमतीवर नियंत्रण आणणे, खाजगी मालमत्ता ताब्यात घेणे, यांसारख्या ज्या काही गोष्टी क्रांतिकालीन शासनांना कराव्या लागल्या; त्यांमधून काही विचारवंतांना समष्टिवादाची प्रेरणा मिळाली. क्रांतिकारकांचे बंधुत्त्व व आंतरराष्ट्रीय एकात्मता जगाच्या निदर्शनास आणण्यासाठी फ्रेंच नेता लाफायत याने बस्तीलच्या किल्ल्या अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन यास देण्यासाठी इंग्लिस क्रांतिकारक टॉमस पेन याच्या हवाली केल्या. टॉमस पेन व जेरेमी बेंथॅम यांस फ्रान्सने नागरिकत्त्वाचे हक्क दिले. क्रांतीची तत्त्वे व वरील घटना यांचा विचार करता फ्रेंच राज्यक्रांतीची बैठक आंतरराष्ट्रीय स्वरूपाची होती, हे लक्षात येते. दुसरा महत्वाचा परिणाम म्हणजे फ्रान्समध्ये व फ्रेंचाच्या ताब्यातील इतर देशांत राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण झाली; राष्ट्रवादास प्रोत्साहन मिळाले आणि विसाव्या शतकातील राजकीय जागृतीवरही तिचा परिणाम झाला. क्रांतीकारक फौजांनी परक्या राजघराण्यास हाकलून लावले खरे; पण क्रांतीचा प्रसार करण्यास निघालेल्या फ्रेंच फौजांमध्ये उत्तरोत्तर स्वार्थी व आक्रमक स्वरूपाचा राष्ट्रवाद संचारला व त्याची प्रतिक्रिया म्हणून विरोधक देशांतील लोकांमध्ये स्वत्वाची म्हणजेच राष्ट्रीयत्वाची भावना जागृत झाली. विशेषतः पुढे नेपोलियनच्या काळात ही भावना प्रखर झालेली आढळते. फ्रेंच राष्ट्राच्या यशासाठी व नेपोलियनच्या इभ्रतीसाठी आपणास कारभार सहन करावा लागावा, हे स्पेन, हॉलंड, ऑस्ट्रिया यांसारख्या देशांतील लोकांस मानहानीचे वाटू लागले. अन्यायाच्या व अपमानाच्या जाणिवेतून राष्ट्रीय भावनेने उसळी घेतली. शासन स्थापणे हे नवे ध्येय निर्माण झाले. यूरोपातील जुनी सामाजिक व राजकीय घडी विस्कटल्यामुळे एकोणिसाव्या शतकाच्या मध्यास इटली व जर्मनी यांची एकीकरणाची चळवळ सुरू होण्यास क्रांतीने गती मिळाली. अशा प्रकारे अभावितपणे फ्रेंच राज्यक्रांतीमुळे यूरोपातील राष्ट्रवादास स्फूर्ती मिळाली व एकोणिसाव्या शतकात या राष्ट्रवादी चळवळी फोफावल्या.

फ्रेंच क्रांतीचे मूल्यमापन आधुनिक विचारवंत अनेक प्रकारे करतात; परंतु क्रांतीच्या उद्दिष्टांपेक्षा तिची परंपरा व्यापक आहे. तीमध्ये क्रांतिकारी प्रक्रियेची अधिमान्यता, क्रांतीच्या मार्गाने मोठे उद्देश गाठण्याची शक्यता, क्रांतीगर्भ प्रचार आणि कृती ही अधिमान्य राजकीय साधने व आशय आहेत. क्रांतीने राजकीय कृतीचा धडा यूरोपीय जनतेला दिला. या सामूहिक अनुभवातून क्रांतीची

संकल्पना व सिद्धांत निघाले. विद्यमान परिस्थिती बदलून जीवन अधिक प्रगतिशील करण्यासाठी झगडणारा मानव, हा इतिहासामध्ये स्फूर्तिस्थाने शोधण्याचा सतत प्रयत्न करीत असतो. त्यास निष्ठेच्या, त्यागाच्या व हौतात्म्याच्या उदाहरणांनी खच्चून भरलेली फ्रेंच राज्यक्रांती निःसंशय स्फूर्तिदायक ठरेल.[१]

फ्रेंच राज्यक्रांतीवरील प्रतिक्रिया :

एक तत्त्वज्ञानी—कोणत्याही क्रांतीचे नेतृत्त्व, त्याचे तत्त्वज्ञान इत्यादी राजकीय लोकाकडे नसावे, फक्त मध्यम मार्ग हाच त्याचा पाया असावा.

डॉ. जे. इ. स्वेन—संपूर्ण विश्व लोकशाहीचा विजय म्हणून या क्रांतीचा जयजयकार करीत आहे.

●●●

---

१ : मराठी विश्वकोश-१०, पृ. ११२४-११२५.

परिशिष्ट-१९

नाझीवाद

जर्मनीत १९१९ साली स्थापन झालेला नॅशनल सोशॅलिस्ट वर्कर्स पार्टीच्या मूळ जर्मन आद्याक्षरावरून त्याला नाझी पक्ष असे नाव रूढ झाले. १९२० साली हिटलर या पक्षाचा सभासद आणि नंतर एकमेव नेता झाला.

तत्पूर्वी इटलीत मुसोलिनीच्या फॅसिस्ट पक्षाने सत्ता काबीज करून फॅसिझमच्या हुकूमशाही तत्त्वज्ञानाला सत्ता मिळवून दिली होती, म्हणून काही काळ नाझींना फॅसिस्ट म्हटले जात असे. मुसोलिनीचा फॅसिझम आणि हिटलरचा नाझीवाद यांच्यात बरेच साम्य असले, तरी नाझीवाद पुष्कळसा स्वतंत्र व वेगळ्या प्रकारचा आहे.

हिटलरने आत्मचरित्रात व निरनिराळ्या प्रसंगी केलेल्या भाषणांत आपले विचार आणि कल्पना मांडल्या आहेत. नाझीवादाच्या दृष्टिकोनाचा, विचाराचा प्रारंभ व्यक्तीपासून होत नाही; राष्ट्र हा या प्रणालीचा केंद्रबिंदू आहे. राष्ट्रीय समाज रक्ताच्या बंधनाने एकात्म झालेला असतो, असे त्याचे म्हणणे. व्यक्ती ही या समाजापासून स्वतंत्र वा वेगळी नसते. समाजाचे मन व इच्छा यांचे स्वातंत्र्य हे सर्व व्यक्तींच्या इच्छा वा मने यांच्या स्वातंत्र्यापेक्षा भिन्न व अधिक महत्त्वाचे आहे. हिटलरचा हा विचार म्हणजे अमेरिकन आणि फ्रेंच क्रांतीने मानवतेला दिलेल्या व्यक्तिस्वातंत्र्याच्या, व्यक्तीच्या माणूस म्हणून प्रतिष्ठेच्या, संकल्पनांचा संपूर्ण धिक्कार होता. हिटलरने हे एका भाषणात स्पष्टच केले. तो म्हणतो की, नाझीवादाच्या कार्यक्रमातील महत्त्वाचा भाग व्यक्तीची उदारमतवादी संकल्पना आणि मानवतेची मार्क्सवादी संकल्पना नष्ट करणे हा आहे.

हिटलर समाज अथवा लोक (मूळ जर्मन फोक) हा शब्द वापरीत असला, तरी त्याला संपूर्ण जर्मन समाज अभिप्रेत नव्हता. मानववंशाची उच्चनिचता गृहीत धरूनच त्याने आपल्या तत्त्वज्ञानाची उभारणी केली. नॉर्डिक वंश हाच जगातील सर्वश्रेष्ठ वंश आहे. अन्य वंशातील लोक हे दुय्यम दर्जाचे मानव आहेत व त्यांच्यावर राज्य करण्याचा नॉर्डिक वंशाचा म्हणजे जर्मनांचा ते श्रेष्ठवंशीय असल्यामुळे हक्कच आहे, हा त्याचा सिद्धांत होता. या नॉर्डिक वंशालाच तो आर्य वंश म्हणत असे. भिन्नभिन्न मानववंशात समानता मानणे हा त्याला गुन्हा वाटे. वंशा-वंशांतील समानतेप्रमाणेच मानवा-मानवांतील समता हाही हिटलरच्या दृष्टीने भयंकर गुन्हा होता. भिन्न मानवसमाजांतील व भिन्न व्यक्तींतील असमानता हाच हिटलरच्या वंशसिद्धांताचा अर्थ होता.

जो लायक तोच जीवनकलहात टिकेल, या डार्विनच्या सिद्धांताचा तो एक प्रकारे पुरस्कार करीत असे. संघर्ष हा जीवनाइतकाच प्राचीन असल्यामुळे जे प्रबळ तेच टिकतील आणि दुर्बळ ते नाश पावतील, हा निसर्गाचाच क्रम आहे. मनुष्य हा मानवतेच्या तत्त्वानुसार प्राणिजगात श्रेष्ठ होत नाही, तर अत्यंत पाशवी लढ्यानेच तो स्वतःला जिवंत ठेवू शकतो, हा त्याच्या नाझीवादाचा विचार होता. त्याला सिलेक्शन ऑफ द फिटेस्ट, म्हणजे जे लायक तेच जगण्यासाठी निवडले जातात, असे सूत्ररूप त्याने दिले.

वंशश्रेष्ठत्वाच्या, असमानतेच्या, अन्य वंशीयांना दुय्यम दर्जाचे मानव समजण्याच्या नाझी विचारप्रणालीत त्याचा ज्यू-द्वेष हा विशेष भाग होता. ज्यू हे सैतान आहेत. श्रेष्ठ वंशीय जर्मनांचा पुरुषार्थ खच्ची करण्यासाठी त्यानी निरनिराळ्या प्रकारची कारस्थाने रचली. ख्रिस्ती धर्म हेही असेच एक कारस्थान होते. मार्क्सवादी बोल्शेव्हिझम हेही नाझींच्या मते ज्यूंचे कारस्थान होते. कम्युनिझमपासून वेश्याव्यवसायापर्यंत सर्व भ्रष्ट व अधःपाताचे मूळ ज्यू लोकच आहेत, अशी एक पिसाट श्रद्धा नाझीवादाच्या प्रणेत्यांची होती. यातूनच ज्यूंच्या शिरकाणाची भीषण कृत्ये निर्माण झाली. नाझींची बंधनागारे व संहारकेंद्रे हा या मानवताविरोधी व ज्यू-द्वेष्ट्या विचारसरणीचाच परिपाक होता. ही बंधनागारे माणसांची केवळ हत्या करण्यासाठी नव्हती. माणसांची नुसती कत्तलच करावयाची असती, तर या छावण्यांची जरूर नव्हती; पण नाझींना नुसती कत्तल करावयाची नव्हती. अमानुष शारीरिक छळ व विटंबना करून माणसाची माणुसकी नष्ट करावयाची होती. त्याचा मानवी आत्मा, त्याची आत्मप्रतिष्ठा प्रथम संपूर्ण नष्ट केल्यानंतरच गॅसच्या मोठ्या शेगड्यांत टाकून त्यांची अक्षरशः राख करण्यात आली. म्हणजे ज्या मानवी मुल्यांचा नाझीवाद तिरस्कार करीत होता, ती मूल्ये त्यांनी भस्मसात केली. हा नाझीवादातील नाशवादाचा भीषण आविष्कार होता.

नाझीवादाने व्यक्तिस्वातंत्र्याचे मूल्य झिडकारले, तसाच लोकशाही शासनपद्धतीचा अव्हेर केला. हिटलरला १९३३ मध्ये सर्वाधिकार मिळताच त्याने कायदा करून नाझी पक्ष हाच जर्मनीचा एकमेव राजकीय पक्ष म्हणून जाहीर केले. दुसरा कोणताही राजकीय पक्ष अस्तित्वात आणण्याचा प्रयत्न करणे हा राजद्रोह ठरविण्यात आला आणि पक्षातही अन्य प्रतिस्पर्धी नेता असणे हिटलरला मान्य नव्हते. त्याच्या नाझीवादात नेतृत्त्वाच्या या तत्त्वाला असाधारण महत्त्व होते. कारण एक जरी विरोधी वा बंडखोर पुढारी निर्माण झाला, तरी सर्वाधिकारशाहीचा सर्व डोलारा कोसळून पडण्याची भीती होती. म्हणून पक्ष

आणि नेता यांची एकात्मता व एकनेतृत्वाचे तत्त्व प्रस्थापित करण्यात आले. सर्व जर्मन राष्ट्राचे त्याने नाझीकरण केले. वृत्तपत्रांचे नाझीकरण केले व ज्यांचे नाझीकरण करता येत नव्हते, ती वृत्तपत्रे बंद केली. बालवर्गापासून विद्यापीठापर्यंत सर्व शिक्षण नाझीवादाच्या प्रभुत्वाखाली आणले. तरुणांची एकमेव राष्ट्रीय हिटलर युवक संघटना स्थापन करण्यात आली. सर्व कामगार संघटना बेकायदेशीर करून त्याऐवजी कामगार व मालक यांची संयुक्त कामगार आघाडी निर्माण करण्यात आली.

नाझीवादी हुकूमशाहीचे आणखी एक वैशिष्ट्य नमूद करण्यासारखे आहे. सामान्यतः हुकूमशाही वा सर्वाधिकारशाही म्हणजे अल्पसंख्यांकांची बहुसंख्यांवर त्यांच्या इच्छेविरूद्ध लादलेली सत्ता, असा अर्थ केला जातो; पण हिटलरच्या नाझी पक्षाला जर्मनीत १९३३ मध्ये झालेल्या शेवटच्या खुल्या निवडणुकीत ४४ टक्के मतदान झाले होते. नाझी पक्षासारखीच विचारसरणी असलेल्या अन्य पक्षांचे मतदान हिशेबात घेतले, तर नाझीवादाला पन्नास टक्क्यांच्यावर जर्मन मतदारांनी पाठिंबा दिला होता. बहुसंख्य मतदारांच्या संमतीने स्थापन झालेली आणि त्यावेळच्या वायमार प्रजासत्ताकाच्या संसदेने अधिकृतरीत्या मान्य केलेली आधुनिक काळातील ही एकमेव बहुमताची हुकूमशाही होती.

नाझीवादाने खून व दहशत हे आपले अधिकृत धोरण ठरविले होते; कारण चर्चा व वादविवाद यांवर त्यांचा विश्वास नव्हता. सॉक्रेटीसने बुद्धिवादाचा रोग प्रथम प्रसृत केला. कारण मूलभूत प्रश्न चर्चेने व वादविवादाने सोडवावे हा सिद्धांत त्यानेच प्रस्थापित केला. म्हणून सॉक्रेटीस हा पहिला सोशल डेमोक्रॅट होता, असे नाझीवादाचा श्रेष्ठ सैद्धांतिक आर्थर रोझेनबर्ग म्हणत असे. एकंदरीत सर्व उदारमतविरोधी प्रवृत्तीचे व भूमिकांचे अंतिम व एकान्तिक पर्यवसान नाझीवादात झाले होते. आक्रमक नाझीवाद हा १९१९ च्या व्हर्साय तहात जर्मनीत झालेल्या अन्यायांमुळे उदयास आला अथवा १९२९-३२ सालांतील आर्थिक मंदीच्या परिणामामुळे पराभूत झालेल्या व बिकट अर्थसंकटात ग्रासलेल्या जर्मनीत निर्माण झाला, असे एक मत आहे. व्हर्सायच्या तहापेक्षा द्वितीय महायुद्धानंतर ज़र्मनीची परिस्थिती अधिक भीषण झाली; परंतु तेथे पुन्हा नाझीवादाचा उदय झाला नाही, हे येथे लक्षात घेण्यासारखे आहे. तसेच १९२९-३२ ची आर्थिक मंदीही जागतिक होती. इंग्लंड, अमेरिका हे देशही या मंदीच्या तडाख्यातून वाचले नव्हते; पण तेथे या आर्थिक संकटातून हुकूमशाही निर्माण झाली नाही. जर्मनीत तसे घडले नाही, कारण त्यावेळी तेथे लोकशाही कमजोर होती आणि सर्वाधिकारी विचारसणीचा प्रभाव अगोदर वाढलेला होता.

नाझीवाद हा एकाधिकारी भांडवलशाहीचा परिपाक होय असे मार्क्सवादी मानतात. जर्मनीत एकाधिकारी भांडवलशाही होती व तिचा प्रभाव उदारमतवादी लोकशाहीला अनुकूल नव्हता; परंतु या एकाधिकारी भांडवलशाहीचे कैसरच्या काळातही राष्ट्रसत्तेशी जवळचे नाते होते. इंग्लंड, अमेरिकेतही एकाधिकारी भांडवलशाही होती; असे असूनही फक्त जर्मनीत एकाधिकारी भांडवलशाहीला नाझी हुकूमशाही का निर्माण करता आली; याचा खुलासा केवळ आर्थिक कारणांनी होत नाही. समाजात दृढमूल झालेल्या राजकीय परंपरा, संकल्पना व संस्था यांचे बळ हा महत्त्वाचा घटक असतो. तो जर्मनीत, नसल्यामुळेच नाझीवादाचा उदय होऊ शकला.

नाझीवादाचा उदय का झाला व त्याला जर्मन जनतेचा पाठिंबा का मिळू शकला, याची कारणे नाझीवादाच्या प्रत्यक्ष अमानुष स्वरूपाइतकीच महत्त्वाची आहेत. त्यांतून मानवाला, विशेषतः मानवतेची, व्यक्तीस्वातंत्र्याची, समानतेची, लोकशाहीची आणि मानवी प्रतिष्ठेची मूल्ये जपणाऱ्यांना एक महत्त्वाचा धडा मिळतो. नाझीवादासारख्या मानवता व माणुसकीविरोधी शक्ती सुप्तपणे सर्वच समाजात असू शकतात. वंशवाद, आत्यंतिक राष्ट्रवाद, विशिष्ट समाजगटाचा द्वेष, कल्पित वा वास्तव अन्यायाची गैरवाजवी चीड अशा अनेक प्रवृत्तींच्या रसायनांतून हे तत्त्वज्ञान निर्माण होऊ शकते व त्याला व्यापक पाठिंबा मिळू शकतो. म्हणून जगावर व मानवतेवर असे संकट पुन्हा न यावे यासाठी या प्रवृत्तींविरुद्ध सतत सावधान राहणे आवश्यक असते.

●●●

मराठी विश्वकोश : ८, पृ. ४५०-४५१.

परिशिष्ट-२०

हरिजन सेवक संघ

On the 30th September 1932, a largely attended meeting of the Hindu of Bombay was held in the Cowasjee Jehangir Hall under the Presidentship of Pandit Malviya. The object of the meeting was to form an All-India Anti-Untouchability League with branches in different provincial centres. The headquarters of the League were to be in Delhi. Mr. G. D. Birla was to be the President and Mr. Amritlal V. Thakkar, General Secretary. The All-India Anti-Untouchability League was Mr. Gandhi's project. It was inspired by him and was the direct outcome of the Poona Pact. At any rate, Mr. Gandhi adopted it as his baby, the moment it was born. The first thing Mr. Gandhi did was to change its name. In a press message issued on 9th December 1932, Mr. Gandhi told the public that the organisation would thenceforth be known as Servants of the Untouchables Society. This name also did not appear to Mr. Gandhi as the best. He was searching for another. Ultimately he decided to give it a new name. He called it the *Harijan Sevak Sangh.* Which means a society of those engaged in Service to the Untouchables. This was a natural sequence of the name Harijan by which Mr. Gandhi used to call the Untouchables. This change did not pass off without a controversy between the Shaivas and Vaishnavas. *Hari* is one of the hundred names of Vishnu, while *Har* is one of the hundred names of Shiva. In choosing the name Harijan, Mr. Gandhi was accused of sectarian partiality. The Shaivas contended that the Untouchables should be called Harijan. Mr. Gandhi did not yield and as the first fruits of this new organisation the Untouchables got a new name.

On the 3rd November 1932, Mr. Birla and Mr. Thakkar issued a statement to the Press in which they set out the programme of this organization and the set-up of the machinery to carry out the programme.

As to the programme the statement said :—

" The League believes that reasonable persons among the Sanatanists are not much against the removal of Untouchability as such, as they are against inter-caste dinners and marriages. Since it is not the ambition of the League to undertake reforms beyond its own scope, it is desirable to make it clear that while the League will work by persuasion among the caste Hindus to remove every vestige of Untouchability, the main line of work will be constructive, such as the uplift of Depressed Classes educationally, economically and socially, which itself will go a great way to remove Untouchability. With such a work, even a staunch Sanatanist can have nothing but sympathy. And it is for such work mainly that the League has been established. Social reforms like the abolition of the caste system and inter-dining are kept outside the scope of the League."

For the convenient prosecution of the programme it was proposed that each Province should be divided into a number of units and each unit to be in charge of paid workers. A unit may or may not be coterminus with a district. It may be formed by grouping together two districts or two States."[1]

From this summary of its activities an impression may be created that the Sangh must be spending quite a lot of money on the welfare of the Untocuhables. What are the facts ? It will be recalled that the normal amount of money which the Sangh expected to be able to spend on the uplift work among the Untouchables was to be about Rs. 6,00,000 per year. How much has the Sangh been actually spending ? The Secretary of the Sangh in his Report issued in May 1941 says[1] :—

" During the course of the last 8 years the various branches and the central office of the Sangh have spent approximately Rs. 24,25,700 and Rs. 3,41,607 respectively, on the Harijan work. Looking to the needs of the problem, this sum of Rs. 27,67,307 is too insignificant an amount."

---

[1]: Writings and Speeches, Vol. 9, P.p. 126-127 and 130-131.

On this basis the Sangh's expenditure comes to about Rs. 3,45,888 per year, which is 50 per cent less than what the Sangh hoped to collect. It will be seen that the Sangh is not as big as it is made out to be by its friends. The Sangh has been carrying on a very poor existence. A Budget of three lakhs per year for a population of 50 millions of Untouchables is not a matter on which the Untouchables need be very jubilant. Even this much show, the Sangh would not have been able to put up if during the two years that they were in office the Congress Governments in different Provinces had not given large grants to the Sangh.[1]

●●●

[1]: Writings and Speeches, Vol. 9, P.p. 126-127 and 130-131.

परिशिष्ट-२१

बुवा गेले

रविवार ता. २८ मार्च १९४८ रोजी पहाटे मुंबई येथें, श्री. मडके बुवा स्वर्गवासी झाले, हें ' जनते ' च्या वाचकांना कळविण्यास आम्हास अत्यंत दुःख होत आहे.

त्यांना गेले कित्येक दिवस हृदयाचा विकार होता. त्या व्यथामधून मुक्त होण्यासाठीं त्यांनी हर प्रयत्न केले. पण व्यर्थ ! शेवटी त्यांना अंथरुणास खिळून रहावे लागले नि त्यांतच त्यांचा अंत झाला. मृत्यूसमयी, त्यांचे ६९ वर्षांचे वय होते. त्यांच्या मृत्यूमुळें, डॉ. बाबासाहेबांच्या भाषेंत बोलावयाचे झाल्यास " दलितांचा एक मोठा कार्यकर्ता, मजूरांचा एक मोठा ट्रेड युनियनिस्ट व दलित फेडरेशनचा प्रभावी संघटक, अस्पृश्यामधून नाहीसा झाला आहे." दलित वर्गाची, मजुरांची व फेडरेशनची ही एक मोठी हानीच झालेली आहे, यांत शंका नाहीं.

मडके बुवांचें पूर्ण नांव श्री. गणपत महादेव जाधव असें होते. परंतु या नांवानें ते फारसें परिचित नव्हतें. कित्येकांना श्री जाधव हें नांव माहितही नसेल. मात्र, ' मडकें बुवा ' हे नांव माहीत नाहीं अशी एकही व्यक्ति दलित समाजांत सांपडणें शक्य नाहीं. एवढेंच नव्हे तर, धनाजी जाधवांचे नांव ऐकल्याबरोबर शत्रूच्या घोड्यांना देखील पिण्याच्या पाण्यांत धनाजी जाधव दिसत असे, त्या प्रमाणें, डॉ. बाबासाहेबांचे विरोधक, अस्पृश्यांमध्यें भेदनीति पेरणारे फुटकळ मजूर पुढारी; गोरगरिबांना नाहक छळणारे रानवट पोलीस अधिकारीं; व अस्पृश्य नोकरवर्गांस हिडीस फिडीसपणें वागविणारे म्युनिसिपल कमिशनर या सर्वांना मडकेबुवा हें नांव ऐकल्यावर कसला तरी धाकदायक वचक बसत असें. कोणाचीच बिशाद नव्हती मडके बुवांचे शब्द ओलंडून जाण्याची ! मडके बुवा हे फर्मानांचे, आज्ञेंचे एक ' कोड ' च बनले होते. मडके बुवा म्हणजे, टिच्चून दारूगोळा भरलेली मोठी तोफच होती. त्या तोफेच्या फैरींत सांपडलेला विरोधक वा अधिकारी बेचिराख होत असें.

श्री. जाधव या नावाऐवजी मडके बुवा हें नामाभिधान अधिक प्रस्तृत व लोकमुखी होण्याचें पहिले कारण असें कीं ते पूर्वी बुवा होते. ते माळकरी होते. भगवी वस्त्रें देखील ते पूर्वी पेहरित असत. त्यावेळीं ते निव्वळ बुवा म्हणूनच ओळखले जात. परत १९२९ सालीं आफ्रिकेतून आल्यावर त्यांनी

मुंबईस ज्यावेळीं मडकी विकण्याचा व्यापार सुरुं केला तेव्हांपासून ते ' मडके बुवा ' म्हणूनच परिचित झाले.

कै. मडके बुवांचे शिक्षण झालेले नव्हते; ते स्वतःची ठराविक घोटीव सही करीत असत. ते अशिक्षित होते; परंतु ते अज्ञानी मात्र नव्हते. त्यांना गुजराथी, उर्दू, मराठी वगैरे भाषा चांगल्याच अवगत होत्या. त्यांचे पाठांतर तर केवढें अचाट होते. संत तुकाराम, नामदेव, चोखामेळा यांचे अंभग ते अस्खलितपणें म्हणून दाखवित असत. परंतु, असे अभंग उद्धृत करण्यात प्रसंगाची समयोचितता व हातोटी त्यांच्यामध्यें दिसून येई. उगीच कांही तरी तोंडपाठ आहे, म्हणून कांहीतरी उतारे ते देत नसत. त्यांच्या दृष्टांतात मार्मिकता होती. कधीं कधीं असें दृष्टांत संताच्या संप्रदायातील असत; तर कधीं व्यवहारांतील पण गांवंढळही असत.

त्यांना मेकॅनिक्सचे अत्यंत उत्कृष्ट काम येत असें. त्या कसबावर फिदा होऊनच कीं, काय, एका गोऱ्याने बॉयलर मेकर म्हणून त्यांना आफ्रिका देशास १९२८ सालीं नेले होते. बॉयलर मेकरची जागा ३००-४०० रुपये दरमहा पगाराची होती. परंतु आफ्रिकेंत त्यांचे गोऱ्या बरोबर फारसें पटलें नाहीं म्हणून एक वर्षानें १९२९ ला ते परत मुंबईस आले.

कै. मडके बुवांचे वक्तृत्वही चांगले होतें. त्यांच्या करड्या आवाजांत एक तऱ्हेचा मुरब्बीपणा असे. दररोज जीवनांत ज्या ठेंचाखोंचा खाव्या लागत त्याची उदाहरणे घेऊन अडाण्यातील अडाणी माणसाला आपल्या ग्रामीण भाषेंत डॉ. बाबासाहेबांचे तत्वज्ञान अचूकपणें ते समजाऊन सांगत असत.

त्यांच्या अंगी संघटना चातुर्य फार मोठें होतें. त्यांच्या संघटना चातुर्याच्या शक्तिबद्दल डॉ. बाबासाहेबांचा मोठा विश्वास होता. म्हणून मुंबईच्या दलित चळवळीची सूत्रें कै. मडकेबुवा यांच्या हवाली डॉ. बाबासाहेबांनीं केली होती.

पण या सर्व गुणांत सर्वश्रेष्ठ असा त्यांचा गुण म्हणजे, आपले परमपूज्य पुढारी बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरील निस्सिम भक्ति. ते नेहमी म्हणत, " बाबासाहेब माझा देव आहे. माझा देव कधींच चुकणार नाहीं. माझ्या देवाच्या मनांत कधीं वाईट साईट येत नाहीं. त्यांच्यावरील माझी निष्ठा ढळणार नाहीं. त्यांच्या पायाशेजारीच मला मरण यावे."

या अथांग निष्ठेतच त्यांच्या कर्तृत्वाची शक्ति व नांवलौकिक सामावलेली दिसून येतील.

सन १९२४ सालापासून ते तहत मृत्यूपर्यंत ते बाबासाहेबांचे एकनिष्ठ अनुयायी होते. १९२४ साली बाबासाहेब बॅरिस्टर होऊन स्वदेशी आल्यानंतर कै. मडके बुवांनी बाबासाहेबांच्या अभिनंदनपर सभा घेतली होती. महाड-सत्याग्रह, नाशिक-सत्याग्रह, व महार परिषद यामध्यें कै. मडकेबुवानीं बजावलेली कामगिरी प्रामुख्याची होती.

महाड येथील सत्याग्रहाच्या वेळचा एक प्रसंग, मडकेबुवांच्या आठवणीच्या दृष्टीने तो फारच चिरस्मरणीय आहे. महाड येथें, हिंदुंचा दुष्ट धर्मग्रंथ-मनुस्मृती-जाहीरपणें जाळण्याचा संकल्प बाबासाहेबांनी जाहीर केला होता. तो मनुस्मृत्ति-दहनाचा विधीही पण शास्त्रोक्त करावयाचा होता. अस्पृश्यांची, निष्ठावंत भीमसेना आत्मियतेंने तसेंच जागरुकपणें हा मंगल विधी पहाण्यास व त्याचें परिणाम भोगण्यास ठाकली होती. ज्याप्रमाणें एकाद्या देवीपुढें बकरे द्यावयाचें असले म्हणजे, त्यास शेंदूर लावला जातो; लिंब गळ्यांत बांधला जातो; नि मग वाजत गाजत, त्याचें बलिदान करावयाचे असतें, त्याचप्रमाणें सर्व कांहीं संस्कार मनुस्मृतिस ज्वालामध्यें बळी देतांना करावयाचे होते. या अभूतपूर्व समयासाठी कांहीं बुवांची नेमणूक करण्यांत आली होती. या बुवांनी अग्नि देवतेस जागृत करण्यासाठी श्र्लोक म्हणावयाचे; नि नंतर विधिपूर्वक मनुस्मृतीचा होम करावयाचा होता. या बुवांच्यापैंकी मडके बुवा एक होते; नव्हे ते तर म्होरकेच होते. त्यांनी श्र्लोक म्हटले; नि पृष्ठा पृष्ठांनी मनुस्मृतींस अग्निकुंडांत गडप करून टाकले. असे मनुस्मृतीचे अंत्य संस्कार, बुवांनी बाबासाहेबांचे एकनिष्ठ अनुयायी म्हणून केले. एकनिष्ठेंत त्यांना कशाचीच डर नव्हती.

डॉ. बांबासाहेबांच्या सुरक्षतेबद्दल त्यांना केवढी तरी चिंता वाटत असे. डॉ. बाबासाहेबांच्या जीवावर जे कांही बाके प्रसंग गुदरले, त्या त्या वेळी, बुवांनीं स्वतःचे प्राण धोक्यांत गेले तरी बेहत्तर या भावनेनें ते बाबासाहेबांचे संरक्षक म्हणून राहिले, असे दोन प्रसंग नमूद करण्यासारखें आहेत.

पहिला प्रसंग, रायगडावरील आहे. डॉ साहेब महाडची सभा आटोपून रायगडी चालले होते. शौर्यानें सवर्ण हिंदुंना चीत करण्याचा तो काळ होता. सवर्ण हिंदुही घाव घालण्यास व डाव साधण्यास टपून होते. रायगडावर डॉसाहेबांच्यावर सवर्ण हिंदुंनी हल्ला चढविण्याचा बेत रचला होता. त्या प्रसंगी डॉसाहेबांना सुरक्षित ठेवण्यास ज्यानी धैर्यानें तोंड दिलें त्यापैकी मडकेबुवा प्रमुख होते.

दुसराही असाच प्रसंग आहे. महाड नजीक काळ्या सुकवली खिंडीत डॉसाहेबांची मोटार पाण्याच्या लोंढ्यामध्यें सांपडली होती. पाऊस व चिखल

असल्यामुळें मोठी अडचण निर्माण झाली होती. त्यावेळी मडकेबुवांनी शर्थीने डॉसाहेबांना व मोटारीस बाहेर काढले.

परंतु याहीपेक्षां अधिक चिरस्मरणीय असे कार्य त्यांनी दोन संस्थांमध्यें केलेलें आहे. त्या दोन संस्था म्हणजे मुंबई शहराचें शेड्युल्ड कास्ट्स् फेडरेशन व मुंबई म्युनिसिपल कामगार संघ या होत. फेडरेशनच्या प्रभावी संघटनेचे बरेच श्रेय कै. मडकेबुवांकडे जाते. फेडरेशन स्थापन झाल्यापासून ते शेवटपर्यंत मुंबई व उपनगर शाखेचे ते अध्यक्ष होते. म्युनिसिपल कामगार संघाचेही ते सेक्रेटरी होते. त्यांची अशी खात्री झाली होती कीं, कांहीही मजूर शास्त्र सांगो, गलिच्छ कामें करणाऱ्या अस्पृश्य कामगारांचा प्रश्न अत्यंत भिन्न, बिकट व अतिशय महत्वाचा आहे. तो सोडविण्यासाठी अगदीच वेगळ्या स्वरुपाची व्यवस्था झाली पाहिजे. म्यु. कामगार संघ मजबूत व्हावा म्हणून त्यांनी अनेक खस्ता खाल्ल्या; अनेक क्लुप्त्याही योजिल्या.

शंभर टक्के सभासद त्यांनी करुन घेतले. या प्रकारच्या मजुराच्या प्रश्नास त्यांनी चातुर्यानें सामाजिकही रूप देऊन ज्ञातिबांधवास आळवून दटावून त्यांनी झाडून कामगारांना सभासद करून घेतले. तसेंच ज्या कामगारांच्या व्यक्तिगत अडचणी असतील त्या दूर करण्यासाठीं त्यांनी जातीनें लक्ष घातलें. तसेंच कामाव्यतिरिक्त इतर बाबीसंबंधानें गुन्हा शाबिदी झाल्यामुळें कामगारांच्या नोकरीवर जी गदा येत असे, ती ते दूर करीत असत. मुंबई म्युनिसिपल कामगार संघ ही संस्था इतकी कीर्ति पावलेली व नमुनेदार म्हणून गणली गेली होती की, ऑल इंडिया म्युनिसिपल कामगार संघाचे लोक बुवांचे ऑफीस पहाण्यास आले होते. म्युनिसिपल कामगारांच्या बाबतीत, बुवांचे धोरण कधीच पडखाऊ नसें. या बाबतींत ते भारीच एकेरी होते. संघामार्फत त्यांनी (इतर सहकाऱ्यांसह) संपाद्वारे जे कांही कामगारांना मिळवून दिले आहे, त्याचा नमुना याच अंकात पहिल्या पानावर दिला आहे. बुवांनी संपाची नोटिस दिली कीं, म्युनिसिपल अधिकाऱ्यांचे धाबे दणाणत असत. कारण बुवांना दुखवून संप ओढवून घ्यावा, तर ड्रेनेजची कामें अडून राहून म्युनिसिपल अधिकाऱ्यांसह सर्व मुंबई गटार गंगेत उभी न्हाऊन निघेल याचे ‘ स्वच्छ ’ (?) चित्र त्यांच्या पुढें उभें राही. म्हणून बुवांची विनतवारी करण्यास म्यु. कमिशनर बुवांच्या ऑफिसवर व घरी खेटे घालीत असत. बुवांनी म्यु. कामगारास जे हक्क मिळवून दिलेत, त्याबद्दल, म्यु. का. संघाचे उपाध्यक्ष श्री. दोंदे यांचेजवळ भाई मिरजकर सारख्या कम्युनिस्टानें असें उद्‌गार काढले होते कीं, “ कोठल्याच कामगार संघटनांना कामगारांसाठी जे आजपर्यंत कांही मिळविता येणे अशक्य झाले आहे ते बुवांनी मिळविले आहे. ”

बुवांच्यामध्यें कांही दुर्गुणही होते. परंतु सर्व सदगुणी कोण आहे ? बुवांचा स्वभाव करडा असल्यामुळें व त्यांच्या कांही दोषांमुळें कांही जणांची त्यांच्यावर चांगलीच गैरमर्जी झाली होती आणि ते कांहीसे स्वाभविकही होते. त्यामुळें त्यांना शेवटी अप्रीयपणा पत्करावा लागला. म्युनिसिपालिटीच्या निवडणुकीसाठी ते चार वेळा तरी उभे राहीले असतील पण कधीच निवडून आले नाहींत. एवढेंच नव्हे तर त्यांना अस्पृश्यांची देखील जेमतेम मतें मिळत हें एका दृष्टीनें ते लोकांतून उतरल्याचें लक्षण होते. परंतु त्यांनी वैतागानें कधींच निष्ठा ढळूं दिली नाही, की कधीच पक्षाशी बेंइमानीपणा केंला नाही, की कधीच आपल्या हितशूत्रकडे पक्षाची तत्वें गहाण म्हणून त्यांनी टाकली नाहींत. स्वतःपेक्षा पक्ष थोर होता, त्याहीपेक्षां डॉसाहेब त्यांना थोर होते.

असा एक कार्यकर्ता आपल्यामधून गेला आहे. त्यामुळें आपली मोठीं हानी झालेली आहे. याची सर्वांना खात्री पटेल. डॉ. बाबासाहेबांच्या विचारांचे अचूक किंबहुना अधीक पुढचें स्पष्टीकरण करणारा एक कार्यकर्ता गेला, त्यामुळें निर्माण झालेली पोकळी त्यांच्या इतक्याच अगर अधिक निष्ठावंत कार्यकर्त्यांने भरून निघेल, तरच पक्षास मजबुति येईल.

कै. बुवांच्या कुटुंबावर जी आपत्ती कोसळली आहे, त्यांत आम्हीं सहभागी आहोंत. मृतात्म्यास शांति मिळो ! बुवा गेले !!

जनता : ता. ३ एप्रिल १९४८.

परिशिष्ट-२२

महाबोधी सोसायटी

" The Maha Bodhi Society is the first Buddhist organisation in the history of modern Buddhism to begin a propaganda for the dissemination of the Dharma in non-Buddhist lands. India had completely forgotten the Aryan doctrine of the Tathagata, although at one time it held the foremost place among the Aryan religions in Aryavarta. For twenty-six years the Maha Bodhi Society has continued to exist in spite of the many obstacles, thanks to the generosity of a few friends of the Anagarika Dharmapala. The Society was founded by him in May, 1891, under the presidency of the late illustrious High Priest Sumangala of Ceylon, at Colombo.

In 1892 the Anagarika Dharmapala established the Journal of the Maha Bodhi Society, which is still in existence, and now being printed at Colombo in the Maha Bodhi Press. Owing to the paucity of Buddhists who are able to understand English in Buddhist countries the number of subscribers thereto is insufficient to make it pay. The Journal is sent free to the learned societies throughout the world as well as to the princes and nobles of Buddhist countries. For twenty years we are sorry to state the wealthy Buddhist dignitaries in Buddhist countries have failed to respond generously for the expansion of the objects of the Maha Bodhi Society. Japan and Siam have not helped by a single contribution for the furtherance of the noble objects of the society. Burma, contributed generously at the commencement of operations of the society, but since sixteen years have failed to render any assistance. Several hundreds of subscribers to the Maha Bodhi Journal in Burma, India and Ceylon have failed to pay their subscriptions, and the loss thereby to the Journal amounts to several thousand rupees.

The society had been able to erect two Dharmasalas at Buddhagaya and Sarnath, Benares through the help of the Buddhists of Burma, Arakan and Ceylon.

The Anagarika Dharmapala's mother, Srimati Malika Hevavitarana sent the first contribution of Rs. 600.00 to purchase three acres of land at Sarnath, Benares.

The late Raja of Bhinga conributed Rs. 2,000.00 which amount was expended in the purchase of ten bighas of land at Sarnath. The Society also has purchased a plot of land at Gaya, and it is lying idle as we have not the means of erecting a Dharmasala thereon for the use of pilgrims who visit Buddha Gaya. For nearly fifeen years efforts were made to get contributions to erect a Dharmasala from the well-to-do Buddhists, but we are sorry to say we have failed to find one Buddhist who is willing to contribute for the purpose.

Buddhists of Burma and Arakan, countries nearer to India, when written to for help, answers that they have no interest in India. China, Japan, Siam, independent Buddhist countires, when asked for help answer that charity begins at home. For nearly twenty years the society have received very little help from the people of Ceylon.

Buddhism the oldest and foremost of missionary religions has ceased to exist as a living force in the land of its birth, though its spirit still lingers. The last missionary went forth from Bengal in the person of Srignana Dipankara Atisa to reform the Buddhism of Tibet, nine hundred years ago. The Buddhism of Java was destroyed by the Arab Muhammedans about five hundred years ago. According to the researches of Archaeological scholars in Central Turkestan, Buddhism was a living religion in those distant lands a thousand year ago.

Archaeological evidence shows that Buddhist temples were built for the last time in Bengal and Magadha in the reign of Mahipala, king of Bengal in the eleventh century. In the beginning of 13th century the university of Nalanda was destroyed by Bakhtyar Khilji."[1]

●●●

1: Guruge, Ananda Editor, Returned to Righteousness, Pp. 732-733.

परिशिष्ट-२३

नालंदा विद्यापीठ

नालंदा बिहार राज्यातील सुप्रसिद्ध प्राचीन बौद्ध अवशेषांचे एक स्थळ. ते गंगेच्या काठी पाटण्याच्या आग्नेयीस सु. ७० कि.मी. वर व राजगीरच्या उत्तरेस ११.२७ कि.मी. वर बडगाव नामक खेड्याच्या परिसरात वसले होते. नालंदा हे प्राचीन विद्यापीठ म्हणून भारतात ख्यातनाम होते. प्राचीन वाङ्मयात नालंदाची नल, नालक, नालकग्राम, नालंद वगैरे भिन्न नामांतरे आढळतात. नालंदा या नावाविषयी अनेक आख्यायिका प्रसिद्ध आहेत. नालंदा याचा अर्थ (न + अलम् + दा = पुरेसे देऊ न शकणारी) असा करण्यांत येतो.

प्राचीन वाङ्मयीन पुराव्यानुसार नालंदाची प्राचीनता मौर्यकाळातील अशोकाच्या साम्राज्यापर्यंत जाते; तथापि या स्थळाची भरभराट इसवी सनाच्या पाचव्या सहाव्या शतकांपासून पुढे झाली आणि हर्षवर्धन व पाल राजे (आठवे ते बारावे शतक) यांचा उदार आश्रय येथील विद्यापीठास मिळाला. कनिंगहॅम यांनी या स्थलाचा शोध १८७१ मध्ये लावला; पण प्रत्यक्ष उत्खनन मात्र १९१६ पासून पुढे कित्येक वर्षे करण्यात आले. यात अनेक मंदिरे, विहार, स्तूप, मुद्रा व ब्रॉझच्या मूर्ती सापडल्या. अनेक पायऱ्या असलेली उत्तुंग मंदिरे, मधे चौक व भोवताली व्हरांडा आणि अनेक खोल्या असलेले अनेक विहार आणि सभागृहे यांवरून प्राचीन विद्यापीठीय जीवनाची कल्पना येते. या इमारतीचे स्तंभ आणि भिंती कलात्मक चित्रांनी व कोरीव कामाने सजविलेल्या होत्या. विद्यार्थ्यांचे जीवन कसे होते, यावर प्रकाश टाकणारा पुरावाही येथे मोठ्या प्रमाणावर उपलब्ध झाला आहे. विहार अनेक वेळा आगीच्या भक्षस्थानी पडल्याचा पुरावाही मिळतो. सुमात्राच्या राजाच्या विनंतीवरून देवपाल राजाने (नववे शतक) विहारांना गावे इनाम दिल्याचा ताम्रपट सापडला आहे. नालंदा विहाराच्या तसेच खाजगी व श्रेणींच्या मुद्राही बऱ्याच मिळाल्या आहेत. अनेक स्तूपांत बौद्ध मठ व धार्मिक ग्रंथांचा मजकूर असलेल्या मृण्मुद्राही हाती आल्या आहेत.

नालंदा विद्यापीठ प्राचीन भारतातील एक आदर्श विद्यापीठ, बिहार राज्यातील राजगीरच्या उत्तरेस ११.२७ कि.मी. अंतरावर हे विद्यापीठ होते. त्याची स्थापना इ.स. पाचव्या शतकाच्या सुरुवातीस झाली असावी. याचे श्रेय बौद्ध आचार्य

नागार्जुन याचा शिष्य आर्यदेव यास देतात. उत्खननात सापडलेल्या मुद्रेवर ‘ श्रीनालंदा महाविहार–आर्यभिक्षुसंघस्य ’ असे लिहिलेले आहे व तिच्या दोन्ही बाजूंवर सारनाथचे धर्मचक्र आहे.

नालंदा विद्यापीठाच्या सु. दीड कि.मी. लांब व सु. पाऊण कि.मी. रुंद क्षेत्रात विद्यापीठाची भव्य इमारत व वसतिगृह होते. याशिवाय सुसज्ज ग्रंथालयासाठी रत्नसागर, रत्नोदय व रत्नरंजक अशा आणखी तीन सुंदर इमारती होत्या. या ग्रंथालयाच्या विभागास धर्मगंज म्हणत. निवासासाठी ४,००० व अभ्यासासाठी १,००० खोल्या होत्या. ८,५०० विद्यार्थी व १,५०० शिक्षक होते. प्रत्येक दिवशी शंभर व्याख्याने होत. येथे राहणाऱ्यांना निवास, भोजन, कपडालत्ता, औषधोपचार व शिक्षण विनामूल्य असे. हा सर्व खर्च दान दिलेल्या १०० खेड्यांच्या उत्पन्नातून व इतर देणग्यांतून चाले.

नालंदा विद्यापीठाचा अभ्यासक्रम प्रगत, उदार आणि बहुव्यापक होता. त्यात सांप्रदायिकतेस स्थान नव्हते. बौद्ध धर्माचे भिन्न संप्रदाय, जैन धर्म, ब्राह्मणी धर्म व इतर धर्म त्याचप्रमाणे योग, व्याकरण, साहित्य, तर्कशास्त्र, शब्दविद्या, चिकित्साविद्या, गणित, चित्रकला, शिल्पशास्त्र, दंडनीती, वेदविद्या इ. विषय शिकविण्याची व्यवस्था होती. सत्याच्या शोधाची पहिली अट स्वातंत्र्य आहे, असे मानण्यात येई. विद्यापीठाच्या कीर्तीमुळे देशातील कानाकोपऱ्यांतून व चीन, कोरिया, तिबेट इ. परदेशांतूनही तेथे विद्यार्थी येत. द्वारपंडित घेत असलेली प्रवेशपरीक्षा अत्यंत कडक असे. प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी शेकडा २० ते ३० टक्के विद्यार्थ्यांनाच प्रवेश मिळे. विद्यापीठाने आर्यदेव, सिलभद्र, कर्णमती, स्थिरमती, गुणमती, बुद्धकीर्ती, शांतरक्षित, कमलशील इ. विद्वानांची मालिका निर्माण केली. न्यायशास्त्र ही या विद्यापीठाची मोठी देणगी आहे.

चारित्र्यसंपन्न व बुद्धिवान शिक्षक, अभ्यासू व होतकरू विद्यार्थी, कुशल प्रशासन, राज्यकर्त्यांचा सतत लाभलेला आश्रय यांमुळे नालंदा विद्यापीठाची उत्तरोत्तर सतत आठ शतके भरभराट होत गेली. भारतातील अध्ययन-अध्यापनाच्या श्रेष्ठ परंपरेला सातत्य व समृद्धी लाभवून देण्यात या विद्यापीठाचा वाटा फार मोठा आहे. नालंदा विद्यापीठाची आठवण म्हणून त्याच ठिकाणी बिहार सरकारच्या सहकार्याने १९५१ साली नव नालंदा महाविहार (नालंदा पाली प्रतिष्ठान) स्थापन करण्यात आले आहे. [१]

---

[१] : मराठी विश्वकोश : ८ पृ. ५४५.

" नालंदा विश्वविद्यालय की स्थापना ईसा की पांचवी शताब्दी मे हुयी ऐसा बताया जाता है । ई. सन ६०० के समय तो यह अपनी परम किर्ती पर पहुंचा था । नालन्दा राजगृह के पास था । राजगृह भगवान बुद्ध के समय मगध की राजधानी थी । भगवान बुद्ध ने कई बार राजगृह की भेंट की है । उपाली राजगृह के ही थे, औंर सारिपुत्र का जन्मग्राम नालक नालन्दा के पास ही था ।

स्थापत्य की दृष्टि से नालन्दा सबसे बडा और सबसे सुन्दर महाविहार था । ई. सन ६०० मे यहाँ १५०० अध्यापक और दस हजार विद्यार्थी थे । अध्ययन-अध्यापन के लिए कई शालाएँ थी । व्याख्यानों के लिऐ बडे-बडे प्रकोष्ठ बंधवाए थे । शक्रादित्य, बुद्धगुप्त, तथागतगुप्त, बालादित्य, वज्र तथा हर्ष इन छः राजाओं ने अपने अपने समय यहाँ भवन निर्माण किए थे । बंगाल के पाल वंशीय राजा और सुमात्रा के बालपुत्रदेव राजा ने भी यहाँ भवन बनवाये थे, ऐसी जानकारी मिलती है ।

नालन्दा यह महायानी शाखा का प्रमुख विश्व विद्यालय था, परन्तु बौद्धों के १८ भी पन्थों के ग्रंथ यहाँ पढाये जाते थे । साथ ही अधिधर्म-कोश, हेतु-विद्या, शब्द-विद्या, चिकित्सा, संगीत, सांख्य, व्याकरण, न्याय, आदि विद्याएँ भी यहाँ सिखाई जाती थी ।

नालन्दा मे हस्तलिखित ग्रन्थों का महान संग्रह था । दुनिया मे इंतना बडा ग्रंथ-संग्रह उस समय कही भी नही था । यहाँ ग्रन्थालय कें लिए नौ मंजिलोंवाली ईमारते थी । उनको 'धर्मगज' ऐसा कहा जाता था ।

इस विश्वविद्यालय मे प्रवेश पाने कें लिए इच्छुक विद्यार्थीयों को प्रवेश-परीक्षा देनी पडती थी । दिनभर का शिक्षण-क्रम घटिका-यंत्र के सहारे अनुशासन बद्ध होता था । शिक्षण-व्यवस्था के नियमों का भंग करने वाले विद्यार्थीयों को दण्ड दिया जाता था । पाठ्यक्रम के अन्त मे दीक्षान्त-समारोह होकर उत्तीर्ण विद्यार्थीयों को उपाधियाँ (डिग्रीज) प्रदान की जाती थी । ई. सन ६०२ के समय शीलभद्र नाम के विद्वान भिक्षु इस विश्वविद्यालय कें प्रधान आचार्य थें । प्रसिद्ध विद्वान नागार्जून, शांतिरक्षक, दिडनाग, ज्ञानश्री, आदि यहाँ आचार्य रह चुके थे।

एशिया–खंड के कोने-कोने से विद्यार्थी हजारों मील की यात्रा कर नालन्दा मे पढने के लिए आते थे । प्रसिद्ध चिनी-यात्री हुएनसांग ई. सन ६२९ मे यहाँ आया था । १० वर्ष तक उसने यहाँ पढाई की, उसने अपने यात्रा–वर्णन मे नालन्दा का विस्तृत वर्णन किया है । फाहियान ने ई. सन ४०८ मे तथा इत्सिंग

ने ६८० मे नालन्दा की भेट की । नालन्दा ठहर कर इत्सिंग ने भी कुछ समय तक अध्ययन किया । अपनी यात्रा-वर्णन मे उसने नालन्दा का वर्णन विस्तृत रूप से लिखा है ।

११९७ इस्वी मे बिहार पर मुस्लिम-आक्रमण हुआ, और उसमे यह विश्व-विद्यालय नष्ट हुआ । लेकिन अभी भी बिहार राज्य मे राजगृह के पास विद्यमान बडगाँव देहात मे इस विश्वविद्यालय के उध्वस्त खण्डहर देखने मे आते है ।"[१]

" ....Taranath, in his History of Buddhism (of C.A.D. 1500), records the tradition that Nalanda was the birth place of Sariputta whose *Chaitya* was seen by Ashoka who added a temple to it. And ' in this way the first founder of the Nalanda *Vihara* was Ashoka.' (P. 72)........... Taranath makes Nagarjuna spend a large part of his life at Nalanda, with which he also associates his pupil "[1]

" ....I-tsing stayed for his studies at Nalanda for the long period of ten years (A.D. 675-685), during which he collected there some 400 texts amounting to 500,000 *Slokas* (P.XVII). This shows that Nalanda possessed a well-equipped library. Information on the Nalanda University Library is given in the Tibetan accounts, from which we know that the library, situated in a special area known by the poetical name of *Dharmaganj* (Mart of Religion), comprised three huge buildings, called *Ratnasangara, Ratnodadhi* and *Ratnaranjaka,* of which *Ratnsangaro,* which was a nine-storeyed building, specialized in the collection of rare sacred works like *Pranaparamita-Sutra* and *Tantrika* books like *Samajaguhya* and the like. " After the Turushka raiders had made incursions in Nalanda, the temples and Chaitya there were spared by a sage named Mudita Bhadra."[2]

" Two notable Muslim Kings who destroyed the Buddhist shrines were Mahmud Gazinav and Bakhiaruddin Khilji. The former plundered the Buddhist shrines at Kot Kangra (Himachal Pradesh) in the 10th Century and the latter destroyed the monasteries of Nalanda, Vikramasila and Odantapuri which were living institutions till the

---

१ : दीनबंधु, पृ. ३०-३१.

1 : Mukarji, P 557.

2 : *Ibid*, P. 574.

12th Century. Commenting on the Muslim invasion, Dr. Ambedkar says* that "the religion of the Buddha got the severest blow from the Muslim invasion. They destroyed the Buddhist idols and killed the Bhikkhus. They mistook the great Nalanda University as the fort of the Buddhists and killed a large number of monks thinking that they were soldiers. The few Bhikkhus who escaped the onslaught fled away to the neighbouring countries like Nepal, Tibet and China." So whatever was left by the Hindu Kings was destroyed by the Muslims.

That the opponents of Buddhism among the Hindus did not lag behind in destroying the Buddhist shrines is evident from the heaps of ashes, burnt images and bones of the monks found by the archaeologists at Sarnath and its neighbourhood. Apparently, the monasteries were burnt by the fanatics and this seems to have happened more than once, as says Major Kittoe who carried out excavations at Sarnath in 1851. He says,** " All has been sacked and burn priests, temples, idols, all together, for in some places, bones, iron, wood, and stone are found in huge masses, and this has happened more than once."

How some Hindu Yogins exploited the situation created by the Muslim invasion of the Buddhist shrines in Bihar is vividly described by Dharmasvamin, a Tibetan pilgrim, who visited Bihar about three decades after the catastrophe. According to him, Ratnabodhi, the biggest library at Nalanda, which had escaped destruction at the hands of the Muslims, was burnt by Hindu mendicants. He says "they (Hindus) performed a Yajna, fire sacrifice, and threw living embers and ashes from the sacrifice pit into the Buddhist temples etc. This produced a great conflagration which consumed Ratnabodhi, the nine-storeyed library of the Nalanda University.***"[1]

● ● ●

---

* Speech of Colombo, Sri Lank on 29 May 1950.

** The Gazetteer of India, Indian Union-Country and People, 1965, P.452.

*** Buddh Prakash, Aspeet of Indian History and Civilization, Agra, 1965. P. 213, Also see Tibetan Text-Pag-Sam-Jan-Zang. ed. Sarat Chandra Das. P. 92 cited in 'Mediaval School of Indian logic' by S.C. Vidhyabhushan. P. 146.

[1] : Ahir, P. 31-33.

परिशिष्ट–२४

तक्षशीला विद्यापीठ

तक्षशीला शिक्षण–केंद्र की स्थापना बुद्ध पूर्व की हैं । यह स्थल वर्तमान पाकिस्तान मे पेशावर से २० मील दूरीपर स्थीत है । प्राचीन काल से ही यह स्थल विद्या का केद्र था । इस नगर को नागराजा तक्षक नें बसाया था । पिता के मृत्यु का बदला चुकाने के लिए जनमेजय ने यहाँ के नाग लोगों को तथा इस नगरी को नष्ट किया था ।

बुद्ध-कालीन कोशल के राजा प्रसेनजित तथा मगध नरेंश बिंबिसार के राजवैद्य जीवक ने यहाँ ही शिक्षण लिया था । सम्राट कनिष्क नें (समय इ. पूर्व १०० मे) यहाँ अनेंक बौद्ध स्थलों का एवं भवनों का निर्माण किया था । लेकिन विदेशी आक्रमणीं में यह स्थल बार बार विनष्ट होता था । पाँचवी सदी के आरंभ में यह पूर्णतः नष्ट हो गया था ।

प्रसिद्ध चीनी यात्री फाहियान पाँचवी सदी के आरंभ मे यहाँ आया था । उसके समय यह विद्या-केंद्र कुछ अच्छा था । लेकिन सातवी सदी में आये हुए हुएनत्सांग के समय यह खण्डहर जैसा था । बौद्ध-काल मे तक्षशीला का विकास भली-भाँती हुआ । पहले यहाँ हस्तिविद्या, चिकित्सा, आदि १८ शिल्पों की पढाई होती थी । बौद्ध काल मे यहाँ बौद्ध धम्म तथा दर्शन का अध्ययन होता था । एक समय यहाँ के महाविहार में भिक्षु कुमारलब्ध प्रमुख आचार्य थे।[१]

* * *

---

[१] : दीनबंधु, पृ. २९-३०.

परिशिष्ट–२५

मार्क्सवाद

मार्क्सवाद म्हणजे प्रख्यात क्रांतिवादी तत्त्ववेत्ता कार्ल मार्क्स (१८१८-१८८३) याने आणि त्याचा मित्र व अखेरपर्यंतचा सहकारी *फ्रीड्रिख एंगेल्स* याने प्रतिपादन केलेले विचार व तत्त्वप्रणाली. मार्क्सवाद हा शास्त्रीय समाजसत्तावादाचा मूलाधार आहे. औद्योगिक क्रांती झाली आणि वाढत्या उद्योगाबरोबर कामगारांची व सामान्य जनतेची परिस्थिती अधिकाधिक हलाखीची बनत गेली. तेव्हा म्हणजे अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात व एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात समाजसत्तावादाचा उदय व प्रसार झाला. त्या वादाचा इंग्लंड व फ्रान्स मध्ये अनेक नामवंत विद्वानांनी व समाजधुरीणांनी जोरदार पुरस्कार केला. त्या विचारवंतांमध्ये रॉबर्ट ओएन, चार्ल्स फौरिएर, प्रूदाँ, सेंट सायमन वगैरे प्रमुख होते. त्या विचारांना कार्लाइल, डिकन्स, रस्किन आदी लेखकांचाही पाठिंबा होता. या समाजसत्तावादाच्या प्रणेत्यांनी केवळ समाजसत्तावादी समाजाचे भव्य चित्र रेखाटले. तो अस्तित्वात आणण्याचा शास्त्रशुद्ध मार्ग दाखविला नाही. म्हणून त्यांना यूटोपिअन (अस्थितादर्शवादी) म्हटले जाते.

मार्क्सवाद एकोणिसाव्या शतकात वाढला. त्याचे पहिले विशदीकरण १८४८ साली प्रसिद्ध झालेल्या साम्यवादी जाहीरनाम्यात (द कम्युनिस्ट मॅनिफेस्टोत) आढळते. जाहीरनामा मार्क्स व एंगेल्स दोघांनी मिळून लिहिला; पण त्यात मार्क्सचाच अधिक हात होता.

कामाचा दिवस शक्य तितका वाढवून आपल्या मर्जीनुसार कामावर लावलेल्या मजूराला पगार देणे व आपला नफा वाढवणे हे भांडवलदारांचे धोरण होते. या व्यवस्थेविरुद्ध कामगारांमध्ये तीव्र असंतोष माजला होता. तो असंतोष फुलवून त्याचे क्रांतिकारक उठावात रुपांतर करंता येईल, अशी मार्क्सची, त्याच्या मित्रांची व इतर समाजवाद्यांची कल्पना होती. १९४८ हे युरोपमधील क्रांतीचे वर्ष. त्यावर्षी यूरोपमधील अनेक देशांत क्रांतीकारक उठाव झाले. त्या उठावांत सामील होण्याचे आवाहन साम्यवादी जाहीरनाम्याने कामगारांना केले. जाहीरनाम्याच्या शेवटी मार्क्स लिहितो, " जगातील कामगारांनो, एक व्हा; शृंखलांखेरीज तुमच्या जवळ गमावण्यासारखे असे दुसरे काही नाही."

उत्तर वयात त्या तत्त्वांचा परिपोष करणारी मार्क्सने अनेक विद्वत्ताप्रचुर पुस्तके व पुस्तिका लिहिल्या. त्यांमध्ये सर्वश्रेष्ठ आहे तो तीन खंडी *कॅपिटल*

हा ग्रंथ, फर्स्ट इंटरनॅशनलने (इंटरनॅशनल वर्किंग मेन्स असोसिएशनने) *कॅपिटल* ग्रंथ कामागार वर्गाचे *बायबल* म्हणून गौरविला. पहिला खंड मार्क्सच्या आयुष्यात १८६७ या वर्षी प्रसिद्ध झाला. पुढचे दोन खंड त्याच्या मृत्यूनंतर एंगेल्सने प्रसिद्ध केले. त्या ग्रंथात भांडवलशाहीच्या उत्पत्तीचा व विकासाचा शास्त्रशुद्ध अभ्यास असून तिच्या अंगभूत गुणधर्माप्रमाणे ती कामगारांचे वाढते शोषण करते व त्यामुळे इतिहासक्रमानुसार येणाऱ्या पुढच्या अवस्थेला म्हणजे क्रांतीला समाज कसा तयार होतो, ते दाखवले आहे. याखेरीज अनेक महत्त्वाची लहानमोठी पुस्तके व पुस्तिका त्याने व त्याचा सहकारी मित्र फ्रीड्रिख एंगेल्स (१८२०-१८९५) याने साम्यवाद व तत्संबंधी विषयांवर लिहिली. याखेरीज त्याचे त्या त्या प्रसंगांना धरुन लेख, पुस्तिका व पत्रव्यवहार आहे. यामध्ये एंगेल्सच्या पुस्तकाचांही समावेश होतो; कारण मार्क्सवादाच्या उभारणीत मार्क्सइतकाच त्याचाही हात होताच. हे सर्व लिखाण मूळ जर्मनमध्ये लिहिले गेले.

मार्क्सवाद रशियन बोल्शेविक क्रांती झाल्यानंतर संबंध जगभर पसरला आहे. ज्या देशांत मार्क्सवादी क्रांती झाली, तिथे म्हणजे सोव्हिएट युनियन, पूर्व युरोपियन साम्यवादी राष्ट्रे, चीन आणि क्यूबा येथे त्याला सर्वश्रेष्ठ धर्माची प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे.

आपली जबाबदारी जग बदलणे ही आहे; ही मार्क्सची तत्त्वज्ञानाबद्दलची भूमिका होती. समाजव्यवस्था बदलत असते अणि हा बदल उत्पादन साधने, उत्पादन पद्धती व त्या पद्धतींत निर्माण झालेले सामाजिक संबंध यांच्या बदलांमुळे घडून येतो; हा मूळ सिद्धांत होय; यालाच ऐतिहासिक भौतिकवाद (हिस्टॉरिकल मटीरिॲलिझम) असे म्हणतात. इतिहास घडतो व बदलतो तो भौतिक कारणांमुळे; आजूबाजूच्या परिस्थितीमुळे, वस्तूंच्या उत्पादनाची व विनिमयाची साधने व पद्धती बदलल्यामुळे. त्यांमध्ये परमेश्वरी योजना नसतें किंवा महान व्यक्तींचे कर्तृत्वही महत्त्वाचे नसते. या सिद्धांतानुसार मार्क्सने त्याच्या काळापर्यंतच्या मानवेतिहासाची संगतीही स्थूलमानाने लावून दाखविली.

अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात उत्पादनसाधनात तंत्रविज्ञानातील शोधामुळे अभूतपूर्व औद्योगिक क्रांती झाली. व्यापारी भांडवलाचे यंत्रोद्योगाच्या भांडवलात रूपांतर झाले. वाफेच्या शक्तीवर चालणारी अनेक यंत्रे निर्माण झाली. त्या यंत्रांवर ज्यांनी आपली मालकी प्रस्थापित केली ते समाजामध्ये सत्ताधारी झाले. तेच आजचे भांडवलदार. त्यांनी राजेरजवाडे आणि जमीनदार यांना सत्ताभ्रष्ट करून त्या जागी आपले राज्य प्रस्थापित केले, ही भांडवलशाही क्रांती. ती वेगवेगळ्या देशांत वेगवेगळ्या वेळी घडून येते. पण इतिहास

इथेच थांबला नाही. तो पुढे चाललेला आहे. भांडवलशाहीच्या अंगभूत नियमांनुसार कामगार वर्ग मोठा व प्रबळ बनतो; भांडवलदारांना समाजाच्या गरजेस पुरेसे उत्पादन वाढवता येत नाही अशी स्थिती उत्पन्न होते, तेव्हा भांडवलशाही उत्पादन-पद्धत समाजाच्या प्रगतीच्या मार्गातील धोंड ठरते व मग कामगारांच्या नेतृत्वाखाली क्रांती होते; राजकीय सत्ता कामगारवर्ग काबीज करतो; लुबाडणारे लुबाडले जातात; समाजवादी क्रांती घडून येते; वर्गहीन समाज अस्तित्वात येतो; राज्यसंस्थेची गरज हळूहळू संपते; राज्यसंस्था सुकत जाऊन गळून पडते. तात्पर्य, इतिहासाच्या शक्तीमुळे विकासाच्या नियमानुसार समाजवाद स्थापन होणे अटळ आहे; असा मार्क्सवादाचा अंतिम निष्कर्ष आहे.

श्रम वाचविणाऱ्या म्हणजे कमी कामगारांकडून अधिक उत्पादन मिळवणाऱ्या यंत्रांच्या शोधात भांडवलदार नेहमीच असतो. श्रमाची उत्पादकता वाढवून नफा मिळविणे हेच उद्योजकाचे मुख्य उद्दिष्ट असते. कामगाराला जगण्यापुरता आणि कुटुंब निर्वाहापुरता कामगाराच्या श्रमातून निर्माण झालेल्या संपत्तीतला भाग दिला जातो. कामगाराने निर्माण केलेल्या संपत्तीतील उरलेला भाग मालक आपल्याकडे ठेवतो, तोच नफा. नफा म्हणजे शोषण वा पिळवणूक. नफा हेच अतिरिक्त मूल्य. अशा रीतीने स्वतःचा नफा वाढविण्याचे भांडवलदारांचे उद्योग नेहमीच कामगारांच्या मुळावर येतात. स्पर्धेत टिकावयाचे तर असे उद्योग त्यांना सदोदित करावे लागतातच. म्हणजेच सकृतदर्शनीदेखील कामगारांचे व भांडवलदारांचे हितसंबंध परस्परविरोधी आहेत. यातूनच तेढ व वर्गकलह सुरू होतो व त्याचे पुढे वर्गयुद्धात रूपांतर होते. मार्क्सवादामध्ये वर्गकलह आणि वर्गयुद्ध यांना मोठे महत्त्वाचे स्थान आहे. वर्गकलहामुळेच मानवसमाजाचा इतिहास घडतो, अशी मार्क्सची धारणा आहे. साम्यवादी जाहीरनाम्यात त्याने म्हटले आहे की, आतापर्यंतचा समाजाचा सर्व इतिहास वर्गकलहांचा इतिहास आहे. भांडवलशाही जगात वर्गकलह सतत वाढतच जाणार आहे आणि त्या कलहातूनच क्रांती होऊन समाजवाद निर्माण होणार आहे. हा कलह कसा आणि का वाढत जातो, ते मार्क्सने *कॅपिटल* आदी ग्रंथातून स्पष्टपणे आणि सविस्तर दाखविले आहे.

भांडवलशाहीमध्ये उत्पादनाची साधने एका व्यक्तीच्या म्हणजे भांडवलदाराच्या मालकीची असतात. उदरनिर्वाहासाठी कामगाराला काम शोधावे लागते. भांडवलदारच हे काम त्याला देऊ शकतो. म्हणून कामगार त्याला आपली श्रमशक्ती विकतो; श्रमशक्ती ही एक अजब चीज आहे. तो सर्व मूल्य निर्माण करते. शेती श्रमाने निर्माण होते. सर्व उत्पादन साधने मानवी श्रमाने

घडविलेली असतात, उपभोगाची वा जीवनाची सर्व साधनें मानवी श्रमातून निर्माण होतात. तात्पर्य, वस्तूंमध्ये मूल्य निर्माण होते ते श्रमशक्तीच्या वापरामुळे; यालाच श्रममूल्याचा सिद्धांत असे म्हणतात. म्हणजे कामगार आपल्या श्रमांनी सर्व मूल्ये निर्माण करतात; परंतु, सर्व मूल्य त्यांच्या हाती येत नाही; त्याचा अल्प भागच येतो. त्याच्या हातांत उरते ते फक्त मजुरीच्या रुपाने मिळणारे मूल्य. मजुरीचाही अपरिवर्तनीय असा कायदा आहे. मार्क्सने तो 'डेव्हिड रिकार्डो या इंग्रजी अर्थशास्त्रवेत्त्याकडून घेतला. या कायद्याप्रमाणे स्वतःच्या व कुटुंबियांच्या जगण्यासाठी-संतती जगविण्यासाठी जरूर तेवढीच मजुरी कामगाराला मिळू शकते. श्रमातून निर्माण झालेल्या मूल्याचे दोन भाग; एक भाग कामगाराचे वेतन व दुसरा शिल्लक भाग म्हणजे अतिरिक्त मूल्य; ते नफा म्हणून उत्पादन साधनावरील मालकीमुळे भांडवलदाराच्या पदरात पडते. यांत्रिक शोधामुळे उत्पादन सारखे वाढत जाते; त्यामुळे अतिरिक्त मूल्य वा नफा अधिकाधिक निर्माण होतो. तो पदरात पडल्यामुळे भांडवलदार वर्ग अधिकाधिक श्रीमंत व समर्थ बनतो आणि कामगार वर्ग व तो यांच्यामधील दरी वाढत जाते.

अशा रीतीने समाजामध्ये दोन वर्ग तयार होतातः एक श्रीमंत भांडवलदारांचा आणि दुसरा गरीब आणि दिवसेंदिवस अधिकाधिक गरीब होणाऱ्या कामगारांचा. कालानुक्रमे मधले वर्ग नष्ट होतात वा दुर्बल होतात; आणि भांडवलदार व कामगार हे दोनच वर्ग युद्धाच्या पवित्र्यात एकमेकांसमोर उभे ठाकतात. भांडवलशाही समाजाच्या अखेरच्या परिस्थितीचे हे मार्क्सवादी भविष्य आहे.

भांडवलशाहीची चौकट मोडण्याचा व त्या पलीकडे जाण्याचा मार्गही मार्क्सवादाने दाखवून दिलेला आहे. क्रांती अटळ आहे, हा मार्क्सवादाचा सिद्धांत. समाजातील अत्यंत नाडलेला, पिडलेला वर्ग जो कामगारांचा, तो ही क्रांती घडवून आणील. कामगार सुरुवातीला आपले कारखानानिहाय संघ बनवतात. ते संघ या घडीच्या मागण्याही मिळविण्यासाठी असतात. हलके हलके ते संघटन वाढत जाते व त्याला राष्ट्रव्यापी स्वरूप प्राप्त होते. लवकरच कामगार राजकीय मागण्याही करू लागतात. त्यासाठी ते आपला राजकीय पक्षही बनवतात. राजसत्ता हस्तगत करण्याची आवश्यकता त्यांना भासू लागते. दरम्यान त्यांची दुरवस्था, गरिबी, बेकारी वगैरे वाढलेली असते. मग क्रांती करून भांडवलशाही व तिचे राज्य उलथून पाडण्याखेरीज दुसरा मार्ग त्यांच्यापुढे उरत नाही. कामगारवर्ग भांडवलदारवर्गापुढे लढाईसाठी उभा ठाकतो. यावेळी कामगारवर्गाचे सामर्थ्य व संख्याबल खूप वाढलेले असते व भांडवलदारवर्गाचे

खूप कमी झालेले असते. भांडवलशाहीचा पराभव होतो आणि तिच्या जागी कामगारांचे राज्य येते. ही क्रांती सशस्त्र क्रांती असते आणि तिच्यामध्ये रक्तही सांडावे लागते. इंग्लंडसारख्या अपवादभूत देशांमध्येच ती शांततेनेही पार पडू शकेल असे मार्क्सला कालांतराने वाटू लागले. (पुढे लेनिनचे मत पडले की तोही अपवाद शक्य नाही) ही रक्तरंजित क्रांती यशस्वीपणे पार पाडवायाची म्हणजे कामगारांची जय्यत तयारी हवी. त्यांचा शिस्तबद्ध व लढाऊ असा पक्ष हवा. तोच साम्यवादी पक्ष. असा पक्ष यूरोपमधील औद्योगिक क्रांती झालेल्या प्रत्येक देशात उभा रहावा असे मार्क्सवादाचे उद्दिष्ट होते. विसाव्या शतकात मार्क्सवादाचा जगभर प्रसार झाला आणि अनेक देशांत मार्क्सवादी साम्यवादी पक्ष निर्माण झाले.

क्रांतीनंतर जी वर्गहीन समाजव्यवस्था निर्माण होईल तिच्याबद्दल मार्क्सने फारसे काही लिहिलेले नाही. साम्यवाद ताबडतोब स्थापन होणार नाही, हा इशारा मात्र त्याने स्पष्टपणे दिलेला आहे. संक्रमण काळात कामगारांची हुकूमशाही प्रस्थापित होईल असे मार्क्सने एके ठिकाणी जाता जाता लिहिले आहे.

शासन व शोषण विरहित स्वतंत्र व समान व्यक्तींचा स्वतंत्र समाज हे मार्क्सवादाचे अंतिम राजकीय उद्दिष्ट आहे. राज्य वा शासन लागते ते वर्गीय समाजात; वर्ग नष्ट झाले, वर्गीय पिळवणूक नष्ट झाली, की राज्याची व शासनाची गरज उरत नाही. मग माणसावर राज्य करायचे नसते, तर वस्तूंचे वाटप करायचे असते, प्रत्येकाला त्याच्या गरजेप्रमाणे धन मिळावे व त्याच्या कुवतीप्रमाणे काम त्याने द्यावे, हे साम्यवादाचे स्वप्न होते.

मार्क्सवादाची काही भाकिते खरी ठरली नाहीत. त्यांपैकी एक-दोन भाकितांचा उल्लेख या ठिकाणी प्रस्तुत ठरेल. औद्योगिकदृष्ट्या पुढारलेल्या भांडवलशाही देशांत कामगार क्रांती अगोदर घडून येईल, असा मार्क्सवादाचा अंदाज होता. त्याप्रमाणे इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स अगर अमेरिका या देशांत कामगार क्रांती अगोदर घडून यायला हवी होती; पण ती घडली १९१७ साली औद्योगिक दृष्ट्या मागासलेल्या रशियात. त्यानंतर पासष्ट वर्षे उलटून गेली तरी त्या चार देशात साम्यवादी क्रांतीची चिन्हे दिसत नाहीत. यांवरून धडा घ्यायचा तो एवढाच की उद्योगधंदे वाढले की कामगार क्रांतिप्रवण होतात, असे नाही. दुसराही एक अंदाज खोटा ठरला तो हा की भांडवलशाहीच्या वाढीबरोबर कामगारांचे दैन्य व दारिद्र्य वाढेल, ते घडलेले नाही. उलट

कामगारांची परिस्थिती सुधारली आहे. त्यामुळे वर्गकलह हा मर्यादित प्रमाणातच तेथे चालतो. त्यांची राहणी सुधारली आहे, त्यांचे खाणेपिणे, कपडेलत्ते सुधारले आहेत. त्यांच्यासाठी कल्याणाच्या अनेक सोई व कायदे झाले आहेत.

मार्क्सवादाविरुद्ध हल्ली खूप टीका होते. ती टीका केवळ भांडवलशाही मानणाऱ्यांकडून होते असे नाही. खुद्द मार्क्सवाद्यांमध्ये देखील त्या तत्त्वज्ञानावर टीका करणारे पुष्कळ निघाले आहेत. रशिया इ. साम्यवादी देशांत मार्क्सवादाविरुद्ध टीका करणे शक्य नाही; पण तिथेही काही धाडसी टीकाकार निर्माण झाले आहेत; त्यांना अर्थातच शासनाच्या रोषाला बळी पडावे लागले.

भारतातील पहिले प्रसिद्ध मार्क्सवादी एम्. एन्. रॉय यांचाही या बाबतीत उल्लेख करता येईल. वर्गवादामध्ये गुंतून पडल्यामुळे मार्क्स व्यक्तीला विसरला, हा त्यांनी घेतलेला आक्षेप मूलगामी स्वरूपाचा आहे. मार्क्सवाद्यांमध्ये एक अधिक जहाल व क्रांतीकारक गट निर्माण झाला आहे. त्याला ' न्यू लेफ्ट ' असे म्हणतात. त्यामध्ये हर्बर्ट मार्क्यून, चे गेव्हेरा, झा पॉल सार्त्र, फ्रान्स फनान इत्यादींचा समावेश होतो. त्यांच्या दृष्टीने विकसित देशांतील औद्योगिक कामगार आता क्रांतिकारक राहिला नाही; तो क्रांतीकारक वारसा ते तिसऱ्या जगातील शेतकऱ्यांना, शेतमजुरांना, विद्यार्थ्यांना व इतरांना देतात. काही टीकाकार मार्क्सच्या उत्तर आयुष्यातील विचारांपेक्षा पूर्वायुष्यातील विचारांना अधिक महत्त्व देतात. त्या विचारांत सर्वात महत्त्वाचा विचार आहे, तो परात्मवादाचा (एलिएशनचा); त्यांमध्ये मानवतावाद देखील आहे. तोच खरा मार्क्सवाद असेही त्यांच्यापैकी काही जण म्हणतात.

मराठी विश्वकोष : १३, पृ. ३८२-३८५.

परिशिष्ट-२६

DR. AMBEDKAR—LOHIA CORRESPONDENCE

Hyderabad, 10th December 1955

Dear Dr. Ambedkar,

The enclosed folders are self-explanatory. "Mankind" would try earnestly to reveal the caste problem in its entirety. It would therefore be very happy to have an article from you. It expects its articles to range between 2,500 and 4,000 words. You are of course free to select your own subject. Should you select one or the other aspect of the caste system prevalent in our country, I would want you to write something which makes the people of India sit up, not alone in anger, but also in wonderment. I do not know whether the speeches I made about you during the parliamentary campaign in Madhya Pradesh were communicated to you by your lieutenant who also travelled with the me. Even now I very much wish that sympathy should be joined to anger and that you became a leader not alone of the scheduled castes, but also of the Indian people.

The Zonal Study Camp would be very glad to have you in its midst. The accompanying list of subjects is meant to help. If you could give us a resume of your lecture in advance it would be good for purposes of publication afterwards. We expect that a lecture lasting an hour would be followed up by a discussion of similar duration.

I do not know whether the foundation conference of the Socialist Party would have any interest for you. Although you are not a member of the Party, the conference would want to have you as special invitee. The conference will take up, among other subjects, problems relating to agricultural labour, artisans, women and parliamentary work, on any one of which you have something

significant to say. If you feel like participating in the proceedings of the conference in order to bring out one or another point, I trust that the conference will extend you special permission to do so.

With warm greetings,

yours sincerely,

Rammanohar Lohia.

MESSRS MEHROTRA AND GOSWAMI'S LETTER

I

My dear Doctor Saheb, 27-9-'56.

Through a friend of ours, we were invited to visit Delhi and meet Dr. Ambedkar. The friend is Dr. Ambedkar's most trusted man. We went to Delhi to meet him, and had a 75 minute talk with him. It was made clear we came purely in a personal capacity.

Dr. Ambedkar would very much like to meet you whenever you are in Delhi. He is an old man and not well. He walked with support.

He wants a copy of all Party literature and all copies of "Mankind". He will pay for it (including constitution, policy and programme.)

He agreed with our view that Mr. Nehru is trying to wreck every party, and that opposition should be strong.

He was in favour of a new political party with strong roots.

He did not understand communism or socialism of the Marxist variety as of any good to India, but when we explained our stand, he was interested.

We invited him to seek election from Kanpur City general constituency to parliament; he did not dislike the idea, but said that

he wanted to talk to you with an All-India perspective, and we made it clear that we can have no alliances, as per our policy. He, it seems, is not enamoured of his Scheduled Castes Federation. The executive is meeting in Delhi on 30th. He was very interested in the facts about Mr. Nehru (cinema outfit, state belongs to leader etc. from Mankind) and said that adequate publicity be given to these facts. He was interested in taking out an English daily from Delhi.

He was very sympathetic, cordial and eager to understand our viewpoint in detail. He explained the democratic practice in England, at some length, of choosing a candidate, and it seems is a very great believer in democracy.

This is the gist. We could not report in person because we did not know where you were and we had no money. Our trunk call to Hyderabad on 23-9-1956 to party office resulted in "no reply," as nobody picked up the phone on that side.

Dr. Ambedkar's Address : 26, Alipore Road, New Delhi.

Yours sincerely,

Vimal Mehrotra,

D.V. Goswamy.

II

DR. AMBEDKAR'S LETTER

ALL INDIA SCHEDULED CASTES FEDERATION

26, Alipur Road, Civil Lines, Delhi. 24th September 1956.

Dear Dr. Lohia,

Your two friends had come to see me and I had quite a long talk with them although we did not enter into any discussion about your election programme.

The working committee of the All-India Scheduled Castes Federation is meeting on 30th September 1956 and I shall put to the committee the proposal which your friends have left with me. After the working committee meeting is over I should like to have a discussion with the important members of your Party so that we can finally settle as to what we can do in coming together. I would therefore be glad if you can be in Delhi on Tuesday, the 2nd October 1956 at my place. If you are coming please let me know by wire so that I can detain some people of the working committee also to meet you.

With kind regards,

Yours sincerely,

B. R. Ambedkar.

III

LETTER TO DR. AMBEDKAR

Hyderabad, 1st October 1956.

Dear Dr. Ambedkar,

I thank you for your kind letter of 24th September. I read it today after my return to Hyderabad and am therefore wholly unable to reach Delhi in time for the meeting that you have suggested. I would, however, welcome an opportunity to meet you as early as possible. I would be in the Uttar Pradesh round the middle of October so that I could see you in Delhi on the 19th or 20th of October. In case you are in Bombay on the 29th of October, I could meet you there. Please let me know by wire which of the two dates would suit you.

I was concerned to know about your helth from other friends. I hope you are taking all necessary care.

I am also having the three numbers of 'Mankind' issued so far sent to you under separate cover. I had half a mind to suggest a subject for you. But I desist from doing so. The three issues of

'Mankind' will themselves impel you to the subject of your choice. I only wish to emphasise the utter intellectual collapse that has overtaken our country. I hope only temporarily, and how necessary it is for a man like you to speak unreservedly.

Yours sincerely,

Rammanohar Lohia.

IV

LETTER TO MESSRS MEHROTRA AND GOSWAMY

Hyderabad, 1st October 1956.

Dear Vimal and Dharmavir,

I have your letter. I would want you to pursue your talk with Dr. Ambedkar, but remember that you are not to depart from the lines you have yourself indicated in your letter to me.

With Dr. Ambedkar, the greatest difficulty has always been his ideological affiliation with the Atlantic camp. I do not think that this affiliation is anything except ideological. But we have to be very careful about it. I wish that Dr. Ambedkar became attuned with the position of the camp of equal-irrelevance. You might continue a little ideological discussion with him through your common friends.

I am having a copy of my letter to Dr. Ambedkar sent to you. In case he wants me to meet him in Delhi, you may also be there. My meeting with Dr. Ambedkar will be as much a tribute to the fact that the backward and the scheduled castes can produce an intellect like him as for its political consequences.

Your sincerely,

Rammanohar Lohia.

V

DR. AMBEDKAR'S LETTER

Delhi, 5th October 1956.

Dear Dr. Lohia,

I am in receipt of your letter No. 8821 of 1st October 1956. If you wish to meet me on the 20th of October I shall be in Delhi and you are welcome. You have only to telephone me to fix the time.

With kind regards,

Yours sincerely,

B. R. Ambedkar.

VI

MR. MEHROTRA'S LETTER TO DR. AMBEDKAR

Kanpur, 15th October 1956.

Respected Doctor Saheb,

My friend Mr. D. V. Goswamy and I met you in Delhi last month. and subsequently we communicated our conversation to Dr. Lohia.

I have been studying with keenest interest the decisions taken by the executive committee of the Schedule Castes Federation. Three points emerge of special interest to the people of the country.

(a) Your committee has felt the need of a new party to be named as Republican Party of India. We do not as yet know the policy and programme of the new party or its ideology, and it is not possible for the people as yet to form any opinion about it, though the country is looking forward eagerly to the views of a man of your intellectual stature on the remedy for the present ills of ours. It may be out of place for men like me to venture to give advice to you but the country would have very much liked that you had gone through the policy and programmes of various political parties already existing in the country, and given your observations on the profession and practice of these political parties.

(b) You must forgive me if I frankly admit that I have not been able to understand the policy of your committee on the question of election alliances. I am totally confused. The spokesman of the parliamentary board of U.P.S.C.F. has said in a statement that S.C.F. does not desire any election alliance with any leftist party, while, if I understood correctly from news reports, your central committee favoured electoral adjustments, or some such similar alliance. The Socialist Party, of course, has in its policy laid down that we will not enter into any electroal alliance or adjustment, but will not contest elections except in those constituencies where its membership is at least one per cent of the total electorate and is spread over one-third of its polling stations. The Socialist Party does not believe that any other party is an opposition party, but the above decision has opened a way for automatic electroal adjustment with other allegedly opposition parties because by this we will be contesting in about 500 to 600 constituencies only and we will keep ourselves out of nearly 3,000 constituencies.

(c) The resolution adopted by your committee on the Suez may be based primarily in national interest, but I am extremely doubtful if in the long run, this will be really in the interest of the Indian people. This would mean that the foreign capital invested in India may not be nationalized without the consent of the countries whose nationals the foreign capitalists may be.

May I request you to very kindly ask the office of S.C.F. to send us a copy of those resolutions.

I understand that Dr. Lohia was to have met you, but I do not think that he will be able to meet you in the immediate future, but if you can spare your valuable time, I may come over and discuss matters with you.

I hope that your health will permit you to spare some time.

Yours sincerely,

Vimal Mehrotra.

CC : (1) Sri D.V. Goswamy, Civil Lines, Allahabad.

(2) Dr. Rammanohar Lohia, Hyderabad.

(3) G. N. Saxena, Socialist Party, 4, Pan Dariba, Lucknow.

VII

LETTER TO MADHU LIMAYE

HYDERABAD, 1-7-1957.

Dear Madhu,

I have found the correspondence with and concerning Dr. Ambedkar and I am having it sent to you. You can well understand that my sorrow at Dr. Ambedkar's sudden death has been and is somewhat personal. It had always been my ambition to draw him into our fold, not only organizationally but also in full ideological sense, and that moment seemed to be approaching.

Of course, I would not like you even for a moment to read this correspondence with the back-ground of our common personal loss. Dr. Ambedkar was to me, a great man in Indian politics, and apart from Gandhiji, as great as the greatest of caste Hindus. This fact had always given me solace and confidence that the caste system of Hinduism could one day be destroyed.

I have always been trying to communicate to the Harijans of India, an idea which is basic with me. Dr. Ambedkar and Sri Jagjivan Ram are the two types of modern Harijans in India. Dr. Ambedkar was learned, a man of integrity, courage and independence; he could be shown to the outside world as a symbol of upright India, but he was bitter and exclusive. He refused to become a leader of non-Harijans. I can well understand the agony of the last 5,000 years to and their continuing impact on the Harijans. But that is precisely the point. Such a great Indian as

Dr. Ambedkar, I had hoped, would some day be able to rise above the situation. but death came early. Mr. Jagjivan Ram maintains an apparent good-will towards all Indians and Hindus and although he is known to flatter and kowtow to the caste Hindus when he deals with them. he is reported to sing to the bitter tunes of hatred in exclusively Harijan meetings. This is still no basis for the uplift either of Harijans or of India. But Dr. Ambedkar's type also needs to be modified.

I do not know the men who now run the Scheduled Castes Federation. But I wish that the Scheduled Castes of India were persuaded to make a rational estimate of the last 40 years of Indian politics. I wish they continue to have the symbol of Dr. Ambedkar for homage and imitation, and Dr. Ambedkar with his independence but without his bitterness, a Dr. Ambedkar who would act so as to be a leader of all India and not Harijans only.

Your affectionately,

Rammanohar Lohia.

Lohiya. Pp. 29-37.

व्यक्ती, संस्था, कार्य—सूची

अय्यंगार श्रीनिवास एस (१८७४-१९४१) :—एक हिंदी कायदेपंडित. शिक्षण मद्रास प्रेसिडेन्सी कॉलेजात. मद्रास हायकोर्टाचे ॲडव्होकेट. मद्रास युनिव्हर्सिटीच्या सीनेटचे सभासद. सोशल रिफॉर्म असोशिएशनचे अध्यक्ष. काँग्रेसचे व मध्यवर्ती असेंब्लीचे सभासद. १९२६-२७ साली राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष. १९२९ मध्ये इंडिपेंडन्स ऑफ इंडिया लीगचे अध्यक्ष.

अली इमाम, सर (१८६९-१९३२) :—हिंदुस्थानातील राष्ट्रीय मुसलमान पक्षाचे संस्थापक व बिहार प्रांतातील सुप्रसिद्ध कायदेपंडित, यांची गणना अखिल भारतीय हिंदी पुढाऱ्यात होई. जन्म बिहारमधील अन्हा गावी. कॉलेज कोर्स करण्यापूर्वीच हे इंग्लंडला बॅरिस्टर होण्याकरिता गेले व तेथे बॅरिस्टर झाले. यावेळी काँग्रेसतर्फे इंग्लंडमध्ये एक शिष्टमंडळ गेले होते. त्यात जॉर्ज यूल, सुरेन्द्रनाथ बॅनर्जी, मुधोळकर, अर्डले नॉर्टन व सर मोरोपंत जोशी हे होते. या मंडळींबरोबर काम केले. पुढे यांनी पाटणा येथे वकिली सुरू केली (१८९०). १९०८ मध्ये बिहार प्रांतिक परिषदेचे अध्यक्ष व त्याच वर्षाच्या शेवटी अमृतसर येथे भरलेल्या मुस्लिम लीगच्या अधिवेशनाचे हे अध्यक्ष होते. अलिगढ मुस्लिम विश्वविद्यालयाची कल्पना काढणारे सर सय्यद अहमद यांच्या मनाची छाप प्रथम यांच्यावर होती. तथापि, धर्म व समाज यांच्या हिताबरोबर राष्ट्राकडे आपले लक्ष असले पाहिजे, असे त्यांचे मत होते. १९१०-१९१५ पर्यंत व्हॉईसरॉयच्या कार्यकारी मंडळाचे सभासद होते. कलकत्ता हायकोर्टाच्या न्यायाधीशाच्या पदावर काही महिने काम केले (१७१७). लीग ऑफ नेशनमध्ये हे हिंदुस्थानचे पहिले प्रतिनिधी म्हणून हजर होते (१९२०). निजामाच्या हैद्राबाद संस्थानात तीन वर्षे दिवाणपद भूषविले. सायमन कमिशनवर बहिष्कार घालण्यात त्यांनी भाग घेतला. सर्वपक्षीय परिषदेत प्रामुख्याने भाग घेऊन नेहरू रिपोर्ट तयार करण्यात सहकार्य केले. यानंतर मुसलमानांनी संयुक्त मतदार संघाची मागणी करावी, अशा मताचा पुरस्कारही त्यांनी केला व त्यासाठी राष्ट्रीय मुस्लीम पक्षाची स्थापना केली. दुसऱ्या गोलमेज परिषदेकरिता ते गेले होते. लखनौ येथे झालेल्या नॅशनॅलिस्ट मुस्लीम कॉन्फरन्सचे हे अध्यक्ष होते (१९३१).

आर्य समाज—पाहा स्वामी दयानंद सरस्वती.

इसापनीती :—इसाप नावाचा एक ग्रीक गुलाम इ. स.पूर्वी ६२० ते ५६० या काळात होऊन गेला. तो अत्यंत कुरुप परंतु स्वभावाने कुशाग्र बुद्धीचा होता

असे म्हटले जाते. तो आपल्या मालकाच्या छोट्या मुलांना पशुपक्षांच्या विविध बोधकथा सांगत असे. त्या साऱ्या कथा नीतितत्त्वावर आधारित असत. त्यांचा संग्रह 'इसाप फेबल्स' (इसापनीती) म्हणून प्रसिद्ध आहे. जगातील सर्व भाषात इसापनीतीच्या कथा अनुवादित झाल्या आहेत. ह्या नीतिकथांचा मुखवटा बराचसा बुद्धाच्या 'जातककथां' शी किंवा 'पंचतंत्रा'तील कथांशी मिळता-जुळता आहे.

कबीर; महात्मा (१४२५-१५०५) :—बहुजन समाजाच्या दृष्टिकोणातून समाज परिवर्तनाचे कार्य फारच कणखरपणे केले. ते मूर्तिपूजा, जातिव्यवस्था, पुरोहितवाद व त्यांच्याकडून होणाऱ्या विधी इत्यादिंच्या विरोधी होते. त्यांच्या उपदेशाचा केंद्रबिंदू मानवतावाद, वैज्ञानिकता, बुद्धीवाद होता. ते म्हणतात, " जर दगडाची पूजा केल्यास देवदर्शन घडत असेल तर मग मी पहाडाची पूजा करतो. जर स्नान केल्याने मोक्ष प्राप्त होत असेल तर बेडकाला सर्वांच्या अगोदर मोक्षप्राप्ती व्हावयास पाहिजे. जर नग्नावस्थेत राहिल्याने ईश्वर प्राप्त होत असेल तर हरिणांना सर्वांच्या अगोदर ईश्वर प्राप्त व्हावयास पाहिजे. मनुष्य शेकडो पुस्तके वाचून पंडित होत नाही. पंडित तोच आहे की ज्याला फक्त अडिच शब्द 'प्रेम' या पूर्ण शब्दाची जाणीव आहे. महामानव कबीरांचे विचार निश्चितच क्रांतीकारी आहेत आणि म्हणूनच बहुजन समाजात कबीर पंथीय लोक बऱ्याच प्रमाणात होते आणि आहेत. डॉ. आंबेडकर म्हणतात, " माझे दुसरे गुरू कबीर होत. माझे वडील कबीर पंथी होते. त्यामुळे कबीराच्या जीवनाचा आणि तत्त्वाचाही माझ्यावर फार मोठा परिणाम झाला. माझ्या मताप्रमाणे कबीराला बुद्धाच्या तत्त्वज्ञानाचे खरे रहस्य कळले. मी मोठा कोणालाच म्हटले नाही. गांधींना मी महात्मा म्हटले नाही. कारण कबीराने म्हटले आहे "माणूस होना कठीण है । तो साधू क्या बने ।" जो माणूस झाला नाही, तो महात्मा कसा होईल ? " (खंड १८, भाग - ३, पृ. ४०२) जर डॉ. आंबेडकरांनी महात्मा कबीरांना आपले गुरू म्हणून घोषीत केले नसते तर कबीरांच्या जीवन आणि कार्याला जो उजाळा मिळत आहे तो मिळाला नसता; ते काळाच्या ओघात नष्ट झाले असते.

कांबळे; शिवराम जानबा :—बाबा वलंगकर यांची चळवळ विटाळविध्वंसन, अस्पृश्यतानिवारण करण्याविषयी आखलेली होती. त्या चळवळीने त्यांनी अस्पृश्य समाजात नवे युग सुरू केले. त्यांनी आपल्या जीवंत वाणीने व लेखणीने त्या वेळच्या तरुण अस्पृश्य पिढीच्या अंतःकरणात सामाजिक, धार्मिक, आर्थिक इत्यादि प्रकारच्या गुलामगिरीच्या जाळ्यातून बाहेर पडण्याची प्रेरणा उत्पन्न

केली. त्या प्रेरणेने फुरफुरलेले तरुण सामाजिक चळवळीच्या आखाड्यात उतरले. त्यात पुण्याचे श्री. शिवराम जानबा कांबळे हे प्रमुख होत. ते लहानपणी एका युरोपियनाकडे नोकरी करीत होते. तरुणपणात अस्पृश्योन्नतीची चळवळ सुरू केली. प्रो. राजारामशास्त्री, लोकहितवादी बाबा पदनमजी, आगरकर, फुले वगैरे समाजसुधारकांचे लेख व पुस्तके वाचून त्यांनी अस्पृश्यांच्या सुधारणेबद्दलचा आपला दृष्टिकोन बनविला. पुढे त्यांनी अस्पृश्यांच्या हितासंबंधी वर्तमानपत्रात लेख लिहिण्यास सुरुवात केली.

त्यांचा पहिला लेख कोल्हापुरात प्रसिद्ध होत असलेल्या 'मराठा दिनबंधु' या पत्रात ऑक्टोबर १९०२ मध्ये प्रसिद्ध झाला होता. आपल्या लोकांना लष्कर व पोलिस खात्यात नोकऱ्या मिळाव्यात व मुलांमुलींचे शिक्षण सरकारने पत्करावे, यासंबंधी सरकारला जाहीर विनंती करण्यासाठी त्यांनी सासवड येथे ता. २४-११-१९०२ ला ५१ गावच्या महार लोकांची सभा भरविली. अस्पृश्यांच्या हितासाठी सरकारने काय काय कार्य करावे, याबद्दलचा उहापोह करणारा अर्ज कांबळे यांनी तयार करून, त्यावर १५८८ महारांच्या सह्या घेतल्या व तो अर्ज सरकारकडे पाठविला. अस्पृश्यांतर्फे सरकारला गेलेला हाच पहिला अर्ज होय. या अर्जाच्या इंग्रजी प्रती इंग्लंडमधील व हिंदुस्थानातील प्रमुख गृहस्थांकडे व इंग्रजी प्रती वर्तमानपत्रांकडे पाठविल्या होत्या; पण सरकारने त्या अर्जाला वाटाण्याच्या अक्षता लावल्या. त्यामुळे चिडून श्री. आगरकर यांनी 'सुधारका' च्या ता १४-११-१९०४ च्या अंकात, 'महारांचा अर्ज, सरकार आणि आपला समाज' या मथळ्याखाली सरकारावर एक कडक स्फुट लिहिले. या अर्जाचा विचार सरकारने सहानुभूतिपूर्वक केला नाही, म्हणून इतर वर्तमानपत्रांनीही सरकारवर टीका केली.

कांबळे यांनी ता. १ जुलै १९०८ ला 'सोमवंशीय मित्र' या नावाचे मासिक सुरू केले. त्याची वार्षिक वर्गणी ८ आणे होती. या मासिकातून त्यांनी अस्पृश्य वर्गाच्या शैक्षणिक, धार्मिक, सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी अनेक लेख लिहिले व त्यांनी समाजसुधारणेसाठी चालविलेल्या चळवळीचे वृत्तांत या मासिकाद्वारे प्रसिद्ध केले. अस्पृश्य जातीत देवींना मुली व मुलगे वाहण्याची जी दुष्ट रूढी होती, तिच्याविरूद्ध त्यांनी जोरात चळवळ केली. मुरळ्या व जोगत्या म्हणून देवींना मुली सोडणे व त्या उपवर झाल्यानंतर त्यांच्या देहविक्रयावर त्या मुलींच्या नातलगांनी जगणे, ही रूढी अत्यंत अमानुष, तिरस्करणीय व समाजहितबाधक आहे, अशी त्यांनी चळवळ केली. तेव्हा काही मुरळ्या व जोगत्या आपला पेशा सोडून लग्ने करुन संसारी जीवन कंठण्यास तयार

झाल्या. अशा स्त्रियांपैकी शिवुबाई लक्ष्मण जाधव या एका बाईने विवाह करून संसारास सुरुवात केली, तेव्हा तिने श्री. कांबळे यांचे आभार मानणारे व इतर मुरळ्यांना व जोगतीणींना आपले अनुकरण करा असा उपदेश करणारे पत्र कांबळे यांना उद्देशून लिहिले. ते पत्र कांबळे यांनी 'सोमवंशीय मित्र' या मासिकाच्या ता. १ डिसेंबर १९०८ च्या अंकात प्रसिद्ध केले. यामुळे अस्पृश्य समाजात बरीच खळबळ झाली. काही देवदासींनी शिवुबाईचा कित्ता गिरविला.

१९०२ साली अहमदनगर येथील सार्वजनिक हौदात गोविंद वल्लभ मुकुंदा महार या गृहस्थाने आपला पोहरा सोडून स्वतः पाणी काढले व ते पाणी तेथेच प्यायला. हा प्रकार पाहून नगरातील सवर्ण हिंदूच्या अंगाचा तिळपापड उडून गेला. नगरातील धर्ममार्तंडांनी हौद 'भ्रष्ट' केल्याबद्दल गोविंदावर इं. पि. कोडाच्या २७७ कलमाखाली कोर्टात फिर्याद ठोकून दिली. आरोपीचा बचाव व्हावा म्हणून महाराष्ट्रातील महारांनी सरकारकडे विनंतीअर्जाची भेंडोळी पाठवून दिली. बचावमदतीचा फंड उभारला. त्यावेळचे नगरचे मॅजिस्ट्रेट बापू हरी गोडबोले (दुसरा वर्ग) यांच्यापुढे खटला चालला व त्यात त्यांनी आरोपीला दोन आठवड्याची साधी कैद व आठ रुपये दंड अशी शिक्षा सुनावली. सदर शिक्षा अन्यायमूलक आहे, अशी त्यावेळचे नगरचे कलेक्टर सर रिचर्ड यांनी हायकोर्टाकडे तक्रार केली. हायकोर्टाने गोविंदाला झालेली शिक्षा रद्द केली व त्याला दोषमुक्त केले. गोविंदाचा खटला त्यावेळी महाराष्ट्रात फारच गाजला. त्या खटल्याची माहिती कांबळे यांनी 'सुचिपत्र' या नावाच्या आपल्या छोट्या पुस्तकात दिली. सरकारी व गावकरी यांच्या कामानिमित्त महार लोकांवर ठिकठिकाणी कसे अन्याय होतात, याची प्रत्यक्ष उदाहरणे गोळा करून कांबळे यांनी सदर पुस्तकात ती गोवली. महार लोकांवर होत असलेल्या अन्यायांना जनतेत प्रसिद्धी मिळावी म्हणून कांबळे यांनी सदर पुस्तक छापून त्याच्या प्रती गावोगावी वाटल्या.

कांबळे यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या साहाय्याने १९०४ ला पुणे येथे 'श्री शंकर प्रासादिक सोमवंशीय हितचिंतक मित्र समाज' ही संस्था स्थापन केली; व " श्री सच्चिदानंद वाचनगृह " उघडले ते आपल्या समाजात जागृती करीत असत."[1]

---

[1] खैरमोडे, खंड १ला, पृ. १९५-१२७.

कीर, भागोजी बाळूजी (१८६९-१९४४) :—इमारती बांधणारे ठेकेदार, बाप्याची फुले विकणारा व चर्नी रोड स्टेशनवर हमाली करणारा गरीब मनुष्य कर्तृत्व व प्रामाणिकपणाच्या बळावर मोठा श्रीमंत झाला. अनेक ठिकाणी धर्मशाळा, देवळे व शाळा उदारपणे बांधून दिल्या. दानशूर म्हणून प्रसिद्ध. रत्नागिरीत समाजक्रांतीचे प्रतीक असे पतितपावन मंदिर स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या इच्छेप्रमाणे बांधून दिले.

भागोजी कीरांनी रत्नागिरी किल्ल्यावर श्रीभागेश्वर मंदिर बांधले होते. तेथे ते दर महाशिवरात्र मोठ्या थाटामाटाने करीत. एकदा त्यांनी स्वा. सावरकरांना उत्सवासाठी बोलाविले. तेव्हा बोलताना सावरकर म्हणाले, "अखिल हिंदूगात्रांस देवपूजा व प्रार्थना सांघिकपणे, एकत्र व समतेने करता यावी असे पतितपावनाचे मंदिर आपण बांधावे." भागोजी शेठनी या विनंतीचा आज्ञा म्हणून स्वीकार केला. भागोजी कीरांना पसंत असलेली जागा रत्नागिरी हिंदु सभेने दिली. २२ फेब्रुवारी १९३१ रोजी शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी यांच्या हस्ते मूर्तीची प्राणप्रतिष्ठा होऊन 'पतितपावन मंदिरा' चे स्वप्न पूर्ण झाले.

केतकर, गजानन विश्वनाथ (१८९८-१९८०) :—केसरीचे संपादक व विश्वस्त, हिंदुत्ववादी सार्वजनिक कार्यकर्ते. लो. टिळकांच्या ज्येष्ठ कन्येचे पुत्र. १९३५ पासून 'मराठा' ह्या इंग्रजी साप्ताहिकाचे संपादक. पहिली पत्नी निवर्तल्यावर १९५० मध्ये हिंदू करून घेतलेल्या एका युरोपियन स्त्रीशी दुसरा विवाह. त्यामुळे काहूर माजून केसरीचे संपादकत्व सोडावे लागले. १९५७ पासून पुण्याच्या 'तरुण भारता' चे संपादकत्व स्वीकारले.

केळकर, नरसिंह चिंतामण (१८७२-१९४७) :—मिरज संस्थानात मोडनिंब येथे जन्म. राजकारणी व साहित्यिक. केसरी, मराठा व सह्याद्रि यांचे संपादक. १९१९ मध्ये इंग्लंड येथे काही काळ 'इंडिया' या पत्राचे संपादक. बडोद्यास भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, १९२१ मध्ये. १९३२ च्या तिसऱ्या गोलमेज परिषदेत एक प्रतिनिधी म्हणून उपस्थिती. काँग्रेस डेमोक्रॅटीक पक्षाची स्थापना. केसरी संस्थेतून निवृत्तीनंतर शेवटपर्यंत अव्याहत लेखनवाचन. वाङ्मयाच्या विविध क्षेत्रात लक्षणीय व उल्लेखनीय कामगिरी, त्यामुळे लोकांकडून 'साहित्य सम्राट' ही पदवी. स्वभावाने टिळक परंपरावादी पण मवाळ व थंड. लो. टिळक चरित्र, गतगोष्टी इत्यादि ग्रंथांचे लेखक.

गिरणी कामगार युनियन संघ :—मे १९२८ मध्ये मुंबई गिरणी कामगारांनी संप केला होता आणि २२ मे १९२८ रोजी 'गिरणी कामगार युनियन संघा' ची स्थापना झाली. त्यांच्या कार्यकारिणीत के. नी. जोगळेकर, शां. सा. मिरजकर, श्रीपाद डांगे, ब्रॅडला आदि होते. या संपाबद्दल बोलतांना डांगे म्हणाले होते की, 'हा संप आमची निर्मिती नव्हती तर आम्हीच संपाची निर्मिती होतो.'

गोरा कुंभार (१२६७-१३१७) :—एक मराठी संत. पंढरपूरजवळील तेरढोकी येथे तो राहत असे. जातीने तो कुंभार होता आणि त्याला संती व रामी नावाच्या दोन बायका होत्या. आपले काम करीत असता तो विठ्ठलाचे नामस्मरण करी. एकदा माती तुडवितांना तो नित्याप्रमाणे नामस्मरणात तल्लीन झाला आणि त्याने रांगत आलेले स्वतःचे लहान मूल पायाखाली तुडविले, अशी आख्यायिका आहे. त्याच्याबाबत इतरही आख्यायिका रुढ आहेत.

ज्ञानेश्वरादी संत मंडळीत तो सर्वात वडील होता आणि सर्व जण त्याला गोरोबा काका म्हणत. नामदेव परमार्थात कच्चा आहे की पक्का, हे ठरवितांना गोरोबाचे मत प्रमाणभूत मानले गेले. त्याने आपल्या स्वानुभवाच्या थोपटण्याने मडके वाजवून योग्य तो निर्णय दिला, असे म्हटले जाते. त्याचे फक्त वीसच अभंग उपलब्ध आहेत. त्यांत त्याने नामदेवाचा मोठ्या प्रेमाने वारंवार उल्लेख केला आहे. सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात होऊन गेलेल्या उद्धवचिद्‌घनाने त्याचे मराठीत ओवीबद्ध चरित्र लिहिले आहे. तेरढोकी येथे त्याची समाधी असून तेथील त्याचे घर त्याचप्रमाणे मूल तुडविलेली जागा आजही लोक दाखवितात.[1]

गुरु चरित्र :—महाराष्ट्रातील अत्यंत पूज्य मानलेला मराठीतील पुराणग्रंथ. सरस्वती गंगाधर नावाच्या कवीने लिहिला, त्यात नरसिंह सरस्वती या १४ व्या शतकात होऊन गेलेल्या एका स्वामीचे चरित्र आहे. हा ग्रंथ शके १४४० ते १४७० च्या दरम्यान लिहिला गेला. त्यात तत्कालीन परिस्थितीचे चित्रण केले असून मुख्यतः ब्राह्मणांच्या आचारधर्माचे विस्तृत विवेचन केलेले आहे. स्त्रीजातीला हा ग्रंथ वाचण्याचा अधिकार नाही.

चक्रधरस्वामी :—"जातिभेदाविरुद्ध उभे केलेले तिसरे बंड चक्रधराचे. चक्रधर स्वामी महानुभावी पंथाचा संस्थापक व प्रवर्तक. गुजराथेतील भडोचच्या मल्लदेव

---

[1] : मराठी विश्वकोश : ५, पृ. २५७.

राजाचा विशाळदेव नामक सामवेदी लाड ब्राह्मण होता, त्याचा चक्रधर हा मुलगा. हरपाळदेव हे त्याचे मूळ नाव." (विचार-समीक्षा पा. २२). त्यांचा जन्म भडोच येथे शके १११६ (इ. स. ११९४) मध्ये झाला. ते शके ११४५ (इ. स. १२२३) मध्ये महाराष्ट्रात आले. महाराष्ट्र हाच प्रदेश आपल्या कार्याला योग्य आहे असे ठरवून त्यांनी महाराष्ट्रात महानुभाव पंथ स्थापन केला व वाढविला. ते गुजराती असूनही त्यांनी आपला उपदेश मराठीतून दिला. (इ. स. ११८१ - इ. स. १२६७). ते शके ११९६ (इ. स. १२७४) सालात दिवंगत झाले. ते ज्ञानदेवाच्या अगोदर ७१ वर्षे जन्मले व २१ वर्षे अगोदर दिवंगत झाले. त्यांच्या हयातीत एकही महानुभावी पंथीय ग्रंथ लिहिला गेला नाही. परंतु त्यांनी वेळोवेळी जो उपदेश केला, त्यातील सुत्रमय वचने पुढे त्यांच्या शिष्यांनी एकत्र करून एक ग्रंथ तयार केला. त्याला सूत्रपाठ हे नाव दिले, तो महानुभावांचा वेद. "जातिभेदाचा उच्छेद करा," असे सूत्रपाठात स्पष्ट म्हटले नसले, तरी पण 'चातुरिवर्णाचरित भीक्षा या शास्त्रास आनुसारिजे ' (आ. ८१) हे सूत्र जातिभेदाला निःसंशय (चातुर्वर्ण्यं चरेद्‌भक्ष्यग) प्रतिकूल आहे. मात्र चक्रधराच्या शिष्यांत संन्यास दीक्षा घेतलेले पूर्वाश्रमींचे ब्राह्मण पुष्कळ होते. त्यांनासुद्धा सर्वच शिष्यांना 'तुम्ही चारही वर्णांच्या हातचे भिक्षान्न ग्रहण करा–' असे चक्रधर सांगतो. तेव्हा तो अन्न-व्यवहारापुरता तरी जातिभेद मानीत नव्हता, हे उघड आहे. शंकराचार्याने ब्राह्मणाखेरीज इतरांना संन्यास दीक्षेचा अधिकार ठेवला नव्हता; पण हे तत्त्व स्वतः चक्रधराने कधीच धाब्यावर बसविले नसते, तर त्याच्या पश्चात त्याच्या प्रत्येक शब्दाला वेदवाक्य मानणाऱ्या महानुभावपंथीय आचार्यांनी कोणताही वर्ण वा जात न पाहता वाटेल त्याला आपल्या गोटात घेऊन त्याला संन्यास देण्याचा जो धूमधडाका चालविला होता, तो त्यांनी तसा चालविला असता काय ? यावरूनही चक्रधर जातिभेदाचा पुरस्कर्ता नव्हता, असेच अनुमान निघते. जनरूढीविरुद्ध एकजात सर्वांनाच संन्यास दीक्षेची मोकळीक ठेवावयाची, आणि वर 'तुम्ही चारही वर्णांच्या हातचे भिक्षान्न ग्रहण करीत जा ' असा उपदेश करावयाचा हा जातिभेदावर उघड उघड हल्ला होता. मुख्यतः या हल्ल्यामुळेच नामदेवापासून महानुभाव पंथावर कोरडे ओढण्याची सनातनी वर्गात प्रवृत्ती उत्पन्न झाली." —(विचारसमीक्षा)

श्री. देशपांडे यांच्या मते चक्रधर वेदादी हिंदू धर्मग्रंथांना मानीत असे. डॉ. वि. भि. कोलते यांनी ज्ञानदेव व चक्रधर यांच्यासंबंधी मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या ५३ व्या वार्षिकोत्सवात वागळे हॉलमध्ये ता. २३ व २४ नोव्हेंबर १९५० रोजी जी व्याख्याने दिली त्यांत त्यांनी स्पष्ट मत प्रदर्शित केलेले

आहे की, चक्रधर वेदादी ग्रंथ मानीत नसत. आणि जातिभेदाचे ते कट्टर वैरी होते. वेदात ईश्वरस्वरूपाचे ज्ञान नाही व ईश्वरप्राप्तीसाठी वेदांचा काही उपयोग नाही, असे चक्रधर मानीत असत. वेदादी धर्मग्रंथ व जातिभेद यावर चक्रधराने प्रखर टीका केली. त्यांची चळवळ व शिकवण ही ब्राह्मणेतरातील बहुजन समाजात जोराने फैलावली व त्यामुळे वेदादी हिंदुधर्मग्रंथ व जातिभेदादी अनिष्ट रूढी यांच्याबद्दल बहुजन समाजात अनास्था उत्पन्न झाली. जनतेत पसरलेली ही अनास्था पाहून ज्ञानदेवाने हिंदुधर्माच्या प्रचाराचे कार्य हाती घेतले व त्या प्रचाराला अनुरूप असे ग्रंथ लिहिले. भावार्थदीपिका हा ग्रंथ लिहून ज्ञानदेवाने चक्रधराच्या विचारप्रणालीचे खंडन केले व हिंदुधर्मातील वेद, वेदांगे, पुनर्जन्म, अवतार, कर्मवाद, मायावाद, चातुर्वर्ण्य, जातिभेद इत्यादी भावनांबद्दल जनतेत पुन्हा निष्ठा जागृत केली.

ज्ञानदेवांच्या धार्मिक चळवळीला हिंदू राजांचा सक्रिय पाठिंबा मिळाला. महानुभावी पंथातील लोकांनी हिंदूच्या अमानुष छळांना तोंड दिले, पण त्यांचे जातिभेद नष्ट करण्याचे कार्य सफल झाले नाही."[१]

चर्चिल, सर विन्स्टन (३० नोव्हेंबर १८७४ - २४ जानेवारी १९६५). -- ब्रिटनचा युद्धकाळातील पंतप्रधान, वृत्तपत्रकार, साहित्यिक व एक थोर राजकारणपटू. त्यांचे पूर्ण नाव विन्स्टन लेनर्ड स्पेन्सर चर्चिल. ब्रिटनच्या प्रसिद्ध मार्लबरो या उमराव घराण्यात त्याचा ऑक्सफर्डशर येथे जन्म झाला. वडील लॉर्ड रॅन्डॉल्फ हे एक तडफदार, बंडखोर गणले जाणारे संसदेचे सदस्य होते, तर आई जेनेट ही देखणी आणि न्यूयॉर्क येथील लेनर्ड जेरोम या लक्षाधीशाची मुलगी होती. साहजिकच विन्स्टन यांचे बालपण लाडात गेले व त्यास अनौपचारिक-रीत्या घरातच प्राथमिक शिक्षण देण्यात आले.

प्राथमिक शिक्षणानंतर विन्स्टननी हॅरो या जगविख्यात विद्यालयात प्रवेश केला. एक अत्यंत हूड व अभ्यासात मागे, असा विद्यार्थी म्हणून विन्स्टन यांची प्रथम ख्याती होती. हॅरोमध्ये काही दिवस शिक्षण घेऊन त्यांनी सॅंढर्स्टच्या लष्करी शाळेत प्रवेश मिळविला. त्यांच्या स्वभावास जुळेल असे वातावरण व आवडता विषय मिळाल्याबरोबर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा तेथे झपाट्याने विकास होऊ लागला. लष्करी शिक्षणानंतर १८९४ मध्ये त्यांनी चौथ्या हुस्सार पलटणीमध्ये प्रवेश मिळविला. नुसते सैनिक म्हणून जगण्यात त्यांना समाधान नव्हते. म्हणून १८९५ मध्ये त्यांनी क्यूबा येथील बंड शमविण्यात स्पेन सरकारच्या वतीने भाग

---

[१]खैरमोडे, खंड १ ला, पृ. ११७-११८.

घेतला. ह्या वेळी *डेली टेलिग्राफ* या वृत्तपत्रातून युद्धाचे वृत्त प्रसिद्ध करून त्यांनी आपल्या वृत्तपत्रीय जीवनास प्रारंभ केला. पुढील वर्षी त्यांची नेमणूक भारतात झाली. मालकंद खोऱ्यातील एका लहानशा लढाईत त्यांनी भाग घेतला आणि अलाहाबादच्या *पायोनिअर* पत्रासाठी इतिवृत्ते पाठविली. ह्या लढाईवर द स्टोरी ऑफ द मालकंद फील्ड फोर्स (१८९८) हे पुस्तक लिहून त्यांनी साहित्य क्षेत्रात पदार्पण केले. सेनापती किचनेरच्या मनाविरूद्ध त्यांनी १८९८ मध्ये सूदानच्या मोहिमेत भाग घेतला, तसेच त्या वर्षी ते बोअर युद्धाच्या प्रसंगाने दक्षिण आफ्रिकेत *मॉर्निंग पोस्ट* या वृत्तपत्राचे बातमीदार म्हणून गेले. तिथे ते शत्रूंच्या हातात सापडले. युद्धकैदी असताना विलक्षण धाडसाने त्यांनी आपली सुटका करून घेतली आणि पुन्हा सैन्यात प्रवेश करून बोअर युद्धात ब्रिटिशांना यश मिळवून देण्यात हातभार लावला.

हुजुर पक्षातर्फे १९०० मध्ये ते ब्रिटिश संसदेवर निवडून आले. संसदेत एक प्रभावी वक्ता म्हणून त्यांनी कीर्ती मिळविली. खुल्या व्यापाराचा त्यांनी पुरस्कार केला व १९०३ मध्ये जोसेफ चेंबरलिनच्या जकात धोरणाला कसून विरोध केला. ह्या बाबतीत हुजूर पक्षाशी न पटल्यामुळे त्यांनी तो पक्ष सोडून उदारमतवादी पक्षात प्रवेश केला. १९०६ च्या सार्वत्रिक निवडणुकीत उदारमतवाद्यांना फार मोठे बहुमत मिळाले. लवकरच त्यांची वसाहतींचा उपसचिव म्हणून नियुक्ती झाली. या वेळी त्यांनी *लॉर्ड रॅन्डॉल्फ चर्चिल* (१९०६) हे चरित्र लिहिले. चर्चिल यांना ब्रिटिश मंत्रिमंडळात प्रवेश मिळाला. एक दोन अपवाद सोडता १९०६ पासून १९५५ पर्यंत चर्चिल कोणत्या ना कोणत्या तरी खात्याचे मंत्री होते.

नौदलाचे १९११ मध्ये मंत्रिपद मिळाल्यावर त्यांनी थोड्या काळातच नौदलाची पुनर्रचना केली. यामुळे पहिल्या महायुद्धाच्या सुरुवातीस ब्रिटिशांचे नौदल सुसज्ज झाले होते. नौदलाला वायुदलाची जोड देण्याची कल्पना काढून त्यांनी जर्मन चढाई थोपवून धरली. दार्दानेल्सच्या सामुद्रधुनीतून तुर्कस्तानवर हल्ला करण्याची त्यांची योजना अयशस्वी झाली आणि गलिपलीच्या सुप्रसिद्ध लढाईत (१९१५) ब्रिटिश सैन्याचा मोठ्या प्रमाणात संहार झाला. ह्याचा दोष साहजिकच चर्चिलवर लादण्यात आला.

रशियन क्रांतीस त्यांनी कडवा विरोध करून डाव्या लोकांचे शत्रुत्व पत्करले.

मजूर पक्षाचा नेता रॅम्से मॅक्डॉनल्ड ह्यांच्या विषयी त्यांचे प्रथमपासूनच वाईट मत होते. त्यामुळे १९३२ च्या राष्ट्रीय मंत्रिमंडळात मॅक्डॉनल्ड यांनी त्यास

कोणतेच मंत्रिपद दिले नाही. हिंदी स्वातंत्र्याचे ते कट्टर विरोधक असल्यामुळे भारतास थोडे तरी अधिकार देण्याचे हुजूर पक्षाचा नेता बाल्डवीन ह्याचे धोरण होते; ते त्यांस मान्य नव्हते. एवढेच नव्हे तर पुढे दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी अत्यंत बिकट परिस्थितीतसुद्धा त्यांनी हा अट्टाहास सोडला नाही. ते म्हणत मी काही ब्रिटीश साम्राज्याचे दिवाळे काढण्यासाठी इथे बसलो नाही. म्हणून १९३५ च्या हुजूर पक्षाच्या मंत्रिमंडळातही त्यांना घेण्यात आले नाही. ह्या वेळी हिटलरच्या वाढत्या सत्तेला पायबंद घालणे आवश्यक आहे, असे ते प्रतिपादित. एवढेच नव्हे तर, हिटलर जगावर सर्वंकष युद्ध लादणार असे युद्धाच्या अगोदर ३-४ वर्षे चर्चिल यांनी भाकित केले होते. पण त्याकडे कुणी फारसे लक्ष दिले नाही. या काळात त्यांनी आणखी एक पुस्तक मार्लबरो : हिज लाइफ अँड टाईम्स (४ खंड, १९३३-३८) लिहिले. वरील दोन ग्रंथामुळे त्यांस भरपूर आर्थिक लाभ झाला आणि साहित्यिक क्षेत्रात त्यांचा नावलौकिक वाढला.

दुसरे जागतिक युद्ध १९३९ मध्ये सुरू झाले. चर्चिल यांना प्रथम आरमार खात्याचा मंत्री म्हणून बोलाविण्यात आले आणि वर्षाच्या आतच १९४० मध्ये त्यांची नेमणूक संमिश्र सरकारात पंतप्रधान म्हणून झाली. ही वेळ ब्रिटिश साम्राज्याची काळवेळ होती. हिटलरचे विजयी सैन्य चौफेर चढाई करीत होते व पोलंड, हॉलंड, बेल्जियम, नार्वे, फ्रॉन्स अशा देशांनी एकापाठोपाठ एक शरणागती पत्करली होती. जर्मनीच्या अमानुष विस्ताराला आळा घालून लोकशाहीचे संरक्षण करणे, हा तत्कालीन लोकशाहीवादी राष्ट्रांचा मुख्य उद्देश होता. आपल्या पहिल्या भाषणातच त्यांनी रक्त, अश्रु, श्रम व घाम यांखेरीज माझ्याजवळ देण्यासारखे काहीही नाही, असे तडफदारपणे सांगून ब्रिटीशांची विजिगीषू वृत्ती उत्तेजित केली. ह्याच झुंजार वृत्तीने इंग्लंडने त्यांच्या प्रत्यक्ष नेतृत्वाखाली अमेरिका युद्धात पडेपर्यंत एकट्याने लढत दिली. पुढे त्यांनी अमेरिकेची मैत्री संपादन केली. एवढेच नव्हे, तर साम्यवादाबद्दल अंतरी द्वेष असतानाही त्यांनी स्टालिनशी हातमिळवणी करून रशियाबरोबर मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले आणि इंग्लंड, फ्रान्स आणि अमेरिका या तीन बड्या राष्ट्रांत (थ्री बिग्ज) रशियास घेऊन जर्मनीविरूद्ध फळी उघडली. डंकर्क येथील पराभवाने न डगमगता जपान व जर्मनीचा जमेल तिथे पराभव करून ब्रिटनचे नैतिक धैर्य त्यांनी कधीही खचू दिले नाही.

इंग्लंडच्या आणि जगाच्या इतिहासात चर्चिल यांचे युद्धकालीन नेतृत्त्व असामान्य

असले. पण जर्मनीबरोबरची युद्धसमाप्ती होताच जपानचा पराभव होण्याच्या आधीच झालेल्या निवडणुकीत त्यांच्या पक्षाचा संसदेत पराभव झाला आणि मजूर पक्षाला १५० मतांचे मताधिक्य मिळाले. ह्यानंतरची सहा वर्षे विरुद्ध पक्षाचा पुढारी म्हणून त्यांनी संसदेत काम केले. ह्याच काळात मार्च १९४६ मध्ये अमेरिकेतील बोस्टन या शहरी भाषण करताना त्यांनी आगामी शीतयुद्धाच्या धोक्याची जाणीव करून दिली. १९५१ मध्ये ते पुन्हा हुजूर पक्षाच्या मताधिक्याने पंतप्रधान झाले. पुढे ५ एप्रिल १९५५ रोजी प्रकृतीच्या निमित्ताने ते निवृत्त झाले. या काळात त्यांनी दुसऱ्या महायुद्धाचा इतिहास द सेकंड वर्ल्ड वार (६ खंड, १९४८-५३) या शीर्षकाने प्रसिद्ध केला व इंग्रजी साहित्यात फार मोलाची भर घातली. याबद्दल त्यांस साहित्यातील नोबेल पारितोषिक मिळाले (१९५३). उर्वरित आयुष्यांत त्यांनी लेखन व चित्रकला यांना वाहून घेतले. ए हिस्ट्री ऑफ द इंग्लिश स्पीकिंग पीपल्स (४ खंड, १९५६-५८) हे इंग्लंडच्या इतिहासाविषयीचे पुस्तक लिहिले आणि आपल्या चित्रांचे प्रदर्शन भरविले.

लढाईनंतर त्यांना उमरावपद देण्याची सहावे जॉर्ज यांची फार इच्छा होती. पण त्यांनी हाऊस ऑफ कॉमन्स ही सभा सोडण्याचे नाकारले.

त्यांच्या इतके दीर्घकाळ मंत्रिपद जगातील कोणाही राजकारणी पुरुषाला अद्यापि लाभले नाही. लढवय्या, साहित्यिक, वृत्तपत्रकार, चित्रकार, वक्ता आणि कुशल राजकारणी असा बहुविध मान त्यांना मिळाला. एक बहुश्रुत धुरंधर म्हणून त्यांचे नाव इतिहासात अजरामर झाले. ते लंडन येथे मृत्यू पावले. त्यांचा सरकारी इतमानाने अंत्यविधी झाला.[1]

* **चतर्जी, रामानंद** (१८६५-१९४३) :—हिंदुस्थानातील जगद्विख्यात संपादक व राष्ट्रीय वृत्तीचे गृहस्थ. बंगालमधील सुप्रसिद्ध चट्टोपाध्याय नावाच्या ब्राह्मण कुलात जन्म. कलकत्ता येथे कॉलेजचे शिक्षण घेत असतानाच 'दासी' या नियतकालिकचे हे संपादन करीत. नंतर प्रथम प्रयाग येथील कायस्थ कॉलेजात प्राध्यापकाचे काम केले. मग अलाहाबाद विश्वविद्यालयात फेलोही झाले. पण पुढे संपादकीय व्यवसायच स्वीकारला. काही दिवस 'इंडियन मेसेंजर' या पत्राचे संपादक होते. पुढे यांनी 'प्रदीप' नावाने नियतकालिक व १९०१ मध्ये 'प्रवासी' नावाचे बंगाली मासिक सुरु केले. पुढे १९०७ मध्ये सुप्रसिद्ध आंग्ल मासिक 'मॉडर्न रिव्ह्यू' सुरु केले. पैकी शेवटची दोन दीर्घकाल

---

[1] : मराठी विश्वकोश : ५, पृ. ६७९-६८१.

* मराठी विश्वकोश : ६, पृ. २३४.

चालून त्यांनी वृत्तपत्रसृष्टीत महत्त्वाचे स्थान पटकाविले. हे ब्राम्हो समाजाचे कर्ते अनुयायी व राजकारणात पूर्ण स्वातंत्र्यवादी होते. लो. टिळकांनी सुरु केलेल्या स्वराज्याच्या चळवळीस यांनी ' Towards Home Rule ' ही ग्रंथमाला सुरु करून उत्कृष्ट साहाय्य केले. तसेच मि. जे. टी. सदरलॅन्ड यांचे ' इंडिया इन बॉण्डेज ' हे पुस्तक प्रकाशित करून येथील ब्रिटीश राजनीतीवर झगझगीत प्रकाश टाकला. सरकारने ते पुस्तक शेवटी जप्त केले. हे राष्ट्रसभेचे अनुयायी होते. तथापि राष्ट्रसभेचे मुसलमानविषयक धोरण यांना पसंत नसल्यामुळे, हे हिंदुसभेत प्रविष्ट झाले. सुरत येथील अखिल भारतीय हिंदुमहासभेच्या अधिवेशनाचे हे अध्यक्ष होते (एप्रिल १९२९).

चेट्टी, सर त्यागराय (१८५२-१९२५) :—दक्षिणेतील ब्राह्मणेतर चळवळीचे कर्णधार. त्यागी व दानशूर पुरुष. स्वतःचा पक्ष निवडून आल्यावरही स्वतः दिवाणपद स्वीकारले नाही.

जयकर, बॅ. मुकुंदराव रामराव (१८७३-१९५९) :—ब्राह्मणेतर ऐक राजकारणी, समाजकारणी व जागतिक कीर्तीचे कायदेपंडित. मुंबईच्या आर्यन एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक. राष्ट्रीय पक्षाचे प्रमुख पुढारी म्हणून लंडनच्या गोलमेज परिषदेत एक प्रतिनिधी. १९४८ साली स्थापन झालेल्या पुणे विद्यापीठाचे काही वर्षे कुलगुरु. इंग्रजी भाषेवर प्रभुत्व. फर्डे वक्ते म्हणून प्रसिद्ध.

जेधे, केशवराव मारुतीराव (१८९६-१९५९) :—सुरुवातीच्या कारकीर्दीत ब्राह्मणेतर पक्षात असलेले सत्यशोधक समाजाचे कट्टर पुरस्कर्ते, पुढे कॉंग्रेसचे पुढारी. १९२३ मध्ये ' तरुण मराठा पक्षा ' ची स्थापना व ' शिवस्मारक ' साप्ताहिकाची सुरुवात. १९२४ मध्ये ' मजूर ' नावाच्या दैनिकाची सुरुवात. दिनकरराव जवळकरांच्या सोबतीने मुंबईत ' कैवारी ' नावाच्या साप्ताहिकाची सुरुवात. पुढे दोघांत वितुष्ट. मुंबई इलाखा शेतकरी परिषदेचे प्रवर्तक. १९३३ मध्ये हरिजन सेवक संघाच्या पुणे शाखेचे अध्यक्ष. १९३५ मध्ये कॉंग्रेसतर्फे मध्यवर्ती असेंब्लीत निवड. काही काळ महाराष्ट्र कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष. पुढे कॉंग्रेस सोडून बहुजनपक्षाची स्थापना व शेतकरी, कामकरी लोकांची संघटना.

ठक्कर, अमृतलाल विठ्ठलदास (२९ नोव्हेंबर १८६९-१९ जानेवारी १९५१) :— गुजरातमधील समाजसुधारक. ' ठक्करबाप्पा ' या नावानेही ते ओळखले जात. भावनगर येथे जन्म. पुण्याच्या अभियांत्रिकी महाविद्यालयातून ते ' एल.सी.ई ' (१८९०). पुढे त्यांनी वढवाण व पोरबंदर ह्या संस्थानांत

(१८९८-९९), पूर्व आफ्रिकेतील युगांडा रेल्वेत (१८९९-१९०२) व सांगली संस्थानात (१९०४-१९०५) अभियंता म्हणून कामे केली. ते मुंबई महानगरपालिकेत नौकरीस होते. ही नोकरी करीत असतानाच अस्पृश्य जातींच्या अवनत स्थितीकडे त्यांचे लक्ष गेले व त्यांच्या उद्धारासाठी ते झटू लागले. १९१४ साली मुंबई महानगरपालिकेची नोकरी सोडून ते 'भारत सेवक समाजा' चे सदस्य बनले. आसाम, उत्तर प्रदेश, प. बंगाल, गुजरात व ओरिसा या राज्यांत त्यांनी दुष्काळ-निवारणाचे कार्य केले. ओरिसात असताना त्यांनी पंचमहाल जिल्ह्यातील भिल्लांचे जीवन जवळून पाहिले व त्यांचे लक्ष हरिजनांकडून गिरिजनांकडे वळले त्यांनी 'भिल्ल सेवा मंडळ' व 'अंत्यज सेवा मंडळ' यांची स्थापना केली (१९२३-२५). भिल्ल समाजातील अज्ञान आणि व्यसनाधीनता दूर करणे, त्यांच्यावरील अन्याय दूर करणे यांसाठी त्यांनी परिश्रम केले. अस्पृश्यांसाठी विहिरी व भंग्यांसाठी धर्मशाळा बांधण्यामध्ये त्यांनी पुढाकार घेतला. म. गांधींनी चळवळीशी संबंध नसतानाही त्यांना सरकारने पकडून शिक्षा केली; पण पुढे अपीलात ते सुटले (१९३०) जातीय निवाड्यांतील अस्पृश्यांचे स्वतंत्र मतदारसंघ रद्द व्हावेत म्हणून म. गांधींनी जी चळवळ केली; तीमध्ये सर्वांत मोठा वाटा ठक्करबाप्पांनी उचलला. 'हरिजन सेवक संघा' चे ते १९३२ मध्ये मुख्य कार्यवाह झाले. १९३७ साली काँग्रेसची मंत्रिमंडळे अधिकारावर आली, तेव्हा निरनिराळ्या प्रांतांतील हरिजन, आदिवासी इ. मागासलेल्या लोकांचे पाहणी करण्याचे कार्य त्यांच्यावर सोपविण्यात आले व ते त्यांनी अतिशय कसोशीने पार पाडले. पुढे १९५० साली देशभर हिंडून त्यांनी आदिवासी लोकांची माहिती गोळा केली. तिच्या आधारेच आदिवासींचे कल्याणविषयक कायदे पुढे तयार करण्यात आले. त्यांनी 'आदिवासी सेवा मंडळा' ची स्थापना केली. त्यांची राहणी अतिशय साधी होती.[1]

डांगे, कॉम्रेड श्रीपाद अमृत (१८९९) :—एक हिंदी कम्युनिस्ट पुढारी व समाजकार्यकर्ते. मुंबईच्या विल्सन कॉलेजात आल्यासून इंग्रजीत लिहिण्याचा, बोलण्याचा व कविता करण्याचा सराव. १९२२ साली 'सोशॅलिस्ट' पत्र काढून समाजवादी मताचा प्रसार केला. सहकाऱ्यांच्या मदतीने कानपूर येथे ५९२५ मध्ये 'कम्युनिस्ट' पार्टीची स्थापना. 'मीरत केस' प्रकरणी १९२९ साली १२ वर्षांची शिक्षा. परंतु अपिलात ती शिक्षा ३ वर्षांची ठरून १९३५ साली सुटका. नंतर 'क्रांति' ह्या मराठी व 'नॅशनल फ्रंट' ह्या इंग्रजी साप्ताहिकांचे प्रकाशन. १९३९ साली मुंबईस महागाई भत्त्यासाठी ऐंशी हजार

---

[1] : मराठी विश्वकोश : ६, पृ. ९३४.

कामगारांच्या प्रचंड संपाचे नेतृत्व. पॅरिस येथे भरलेल्या जागतिक कामगार परिषदेत सर्व वसाहतींचे पुढारी बनले व वसाहतींच्या स्वातंत्र्याला मान्यता मिळविली. लेनिन व गांधी, वैदिक कालाचा इतिहास इत्यादि पुस्तके लिहिली.

तुकाराम (१६०८–९ मार्च १६५०) :—वारकरी संप्रदायाच्या चार श्रेष्ठ संतांपैकी अखेरचे संतकवी. पित्याचे नाव बोल्होबा किंवा बाळोबाबावा; मातेचे कनकाई. कुलनाम मोरे; उपनाव अंबिले. तुकाराम महाराजांचा जन्म देहू (पुणे जिल्हा) येथला. आपल्या जातीचा ते शूद्र वा कुणबी असा उल्लेख करतात.

तुकाराम महाराजांच्या पूर्वीच्या आठ पिढ्यांची माहिती मिळते. त्यांच्या पूर्वीच्या आठव्या पिढीचे प्रमुख विश्वंभर त्यांना एका शेतात विठ्ठल रखमाईच्या मूर्ती सापडल्या. नदीकाठावरील एका घरात त्या मूर्तींची त्यांनी प्रतिष्ठापना केली. ह्या घरास 'देऊळवाडा' असे म्हणत असत.

तुकाराम महाराजांची वंशावळ अशी : विश्वंभर—हरी—विठोबा पदाजी—शंकर—कान्होबा—बोल्होबा आणि तुकाराम महाराज चैतन्य. तुकाराम महाराजांच्या आईला सावजी, तुकाराम आणि कान्होबा असे तीन मुलगे झाले. तिला दोन मुलीही झाल्या, असे काही संशोधक सांगतात.

तुकाराम महाराजांचे शिक्षण तत्कालीन सुसंस्कृत आणि प्रतिष्ठित घराण्यांतील व्यक्तींप्रमाणे झाले होते, असे दिसते. त्यांच्या साहित्यात संस्कृत-प्राकृत ग्रंथांच्या व्यापक अध्ययनाची आणि सखोल व्यासंगाची अनेक प्रमाणे मिळतात. भक्तिमार्गात असताना पातंजल योगमार्गाचाही त्यांना बोध झाला होंता, असे काही अभंगांवरून दिसते. मालकीचे पांडुरंगमंदिर असल्याने तेथे होणारी नित्यनैमित्तिक भजने, कीर्तने, पुराणे ऐकूण लहान वयातच त्यांना बहुश्रुतपणा आलेला होता. घरचा व्यवसाय सांभाळण्याच्या दृष्टीने लेखन-वाचन-जमाखर्च ह्यांचे शिक्षणही त्यांना अपरिहार्य होते.

लहानपणी चेंडूफळी, हुंबरी, हुतूतू, विटीदांडू इ. अनेक खेळ ते खेळले असावेत. टिपऱ्या, हमामा, फुगड्या इ. खेळही त्यांनी रस घेऊन पाहिले असावेत. क्रीडाविषयक अनेक सुंदर अभंग त्यांनी रचिले आहेत. तुकाराम महाराजांच्या गाथेइतके खेळांचे वैविध्य अन्य संतांच्या गाथांत आढळत नाही.

वयाच्या चौदाव्या वर्षी त्यांचा पहिला विवाह झाला; परंतु त्यांची पहिली पत्नी रखमाई ही अशक्त आणि आजारी असल्यामुळे पुणे जिल्ह्यातील खेड येथे

राहणाऱ्या आप्पाजी गुळवे ह्यांच्या अवलाई नावाच्या मुलीशी त्यांचा दुसरा विवाह झाला. हीच जिजाई.

लहानपणापासून झालेले अध्यात्मविद्येचे संस्कार जागृत होऊन त्यांना उपरती झाली. अभ्यासाची ओढ लागली. ते एकांतवासात रमू लागले. देहूच्या परिसरात सह्याद्रीचे अनेक उंच उंच रम्य पहाड आहेत. त्यांवर जाऊन वाचन-मनन-चिंतनात ते गढून जाऊ लागले. देहूच्या उत्तरेस असलेल्या भामनाथ किंवा भामचंद्र डोंगरावरील लेण्यात ते बसू लागले. ह्याच ठिकाणी त्यांनी गीता, भागवत, ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, नामदेवादिकांच्या गाथा, योगवासिष्ठ, रामायण, दर्शने इत्यादिकांचा व्यासंग केला. प्रिया, पुत्र, बंधू ह्यांचा संबंध मनातून तुटला. दुकानात बसून केवळ कुटुंबाच्या आणि देहाच्या धारणेपुरते मिळवण्यावर ते संतोष मानू लागले (अभंग १४८६). मनाच्या आणि इंद्रियांच्या विकारांवर ताबा मिळविण्याचा प्रयत्न करू लागले. संतांचा, हरिभक्तांचा सहवास त्यांना मिळत गेला.

त्यांना कवित्वाची स्फुर्ती झाली. तुकाराम अभंग लिहू लागले. संसार-परमार्थाच्या अनुभवांतून निष्पन्न झालेला विचार रम्य शब्दरूप घेऊ लागला. शब्दांची रत्ने आणि शस्त्रे त्यांना गवसली (अभंग ३३९६). त्यांच्या अभंगांत शब्दांची रत्ने जशी दिसतात, तसेच चमत्कार दाखविणारे बाबालोक; भविष्यशकुन सांगणारे, त्यांचे अपधर्म; पाखंड, धार्मिक, कर्मकांड वा थोतांड इत्यादिकांचे परखड खंडन करणारी शस्त्रास्त्रेही आढळतात. त्यांच्या शैलीचेच सूत्र उपर्युक्त अभंगातून त्यांनी बोलून दाखविले आहे. अभंगातून स्वतःचा उल्लेख ते 'तुका' असा करतात.

आपल्या जीवनातून आणि अभंगांतून शुद्ध परमार्थधर्माच्या स्थापनेचे कार्य त्यांनी चालू ठेवले. त्यांच्या अलौकिक प्रतिमेतून निर्माण झालेल्या अमृतवाणीने सामान्य जनाचा आणि प्रतिष्ठित, सुसंस्कृत लोकांचा समाज आकर्षित होऊ लागला. ब्रह्मसाक्षात्कारी महान संत कवी म्हणून त्यांची कीर्ती त्यांच्या हयातीतच महाराष्ट्रात पसरली होती. लोकांच्या स्तुतीमुळे आपला झडलेला अहंकार पुन्हा जडेल की काय अशीही त्यांना भीती वाटू लागली होती. तथापि मोहाचा तो टप्पाही त्यांनी ओलांडला. 'मी आहे मजूर विठोबाचा' असे ते लोकांना सांगू लागले. त्यांना महादेव, विठोबा, नारायण हे तीन मुलगे आणि काशी, भागीरथी व गंगा ह्या तीन मुली अशी सहा अपत्ये होती. ह्या मुली मोझे, गाडे व चांभुलीकर ह्या प्रतिष्ठित घराण्यांत दिलेल्या होत्या.

त्यांनी जातपात, उच्चनीच भेद नाकारले. विष्णुदास जन्म घेतात तेच पवित्र कुळ आणि तोच पवित्र देश अशी त्यांची भूमिका होती. सामान्य लोकांना उचित साधनमार्ग दिला पाहिजे. भुताखेतांची साधना, जटाभार वाढविणारे ढोंगी, शकुन सांगणारे भविष्यवादी, क्षुद्र देवतांच्या उपासना ह्यांपासून लोकांना दूर केले पाहिजे, असे त्यांना वाटे. सगुण-निर्गुण हे एकाच आध्यात्मिक साक्षात्काराचे पैलू आहेत; वासना संपूर्ण विलीन होऊन पूर्ण व अविचल स्थिती अनुभवणे हे त्या साक्षात्काराचे फलित आहे, असे त्यांनी सांगितले.

मराठी साहित्यात तुकारामांच्या अभंग-गाथेने अढळ स्थान मिळविले आहे. साधकदशेतील ' मनासी झालेले संवाद ' व ' नाना बुद्धीचे तरंग ' उत्कटपणे तुकोबांनी व्यक्त केले. संसारातील काही प्रसंग, जनात आलेले अनुभव, अभंगरूप दर्णने त्यांच्या गाथेत आढळतात. संसारी लोकांना केलेला नीत्युपदेश व समाजातील सांगाढोंगावर केलेला प्रहार हेही त्यांच्या अभंगवाणीचे मोठेच विषय आहेत. तिच्यात लौकिकाच्या नाना क्षेत्रांतील उपमारूपकादी अलंकारांचा मार्मिक वापर आढळतो. ही अभंगवाणी सुभाषितात्मक वचनांनी नटलेली आहे. ती मराठी भाषेचेच एक अंग बनली असून जनसामान्यांच्या तोंडी कायमची स्थानापन्न झाली आहे. आधुनिक मराठी कवींना ही उत्स्फूर्त, उत्कट अल्पाक्षसुंदर अभंगवाणी स्फूर्तिदायक ठरली व अनुकरणीय वाटली. मराठी काव्याचे ती एक शाश्वत भूषण होय.[१]

तुकारामांच्या " आचरण पद्धतीला अत्युच्च तत्त्वज्ञानाचा, अत्यंत गंभीर दर्शनाचा दर्जा देणारी त्यांची दोन वचने फार महत्त्वाची वाटतात. त्या दोन्ही वचनांचा आशय परस्परांना पोषक, पुरक आहे. मन हेच गुरू आणि मन हेच शिष्य. हे त्यापैकी एक वचन होय. मला मीच व्यालो आणि मी स्वतःच्या पोटाला आले, हे त्यातील दुसरे विधान होय. .... मनुष्याच्या ' स्व ' च्या गाभ्यातून उत्सफूर्तपणे उसळून येणाऱ्या दुसऱ्याच काही घटकांमुळे तो आपल्या अत्युच्च ध्येयापर्यंत पोचत असतो............त्याच्या मनाच्या अणू-अणूमध्ये एक स्थित्यंतर घडते. त्याच्या अंतरंगाच्या पेशीपेशीमध्ये एक रुपांतर घडते. त्याच्या अस्तित्वाची जणू काही एक पुनर्रचना होते. त्याच्या व्यक्तित्वाचा जणू काही पुनर्जन्म होतो. यातूनच त्याची मूल्यें निश्चित होतात, मार्ग पक्का होतो. ध्येयनिष्ठा स्थिरावते."[२]

---

१ : मराठी विश्वकोश : ७, पृ. ३९१-३९३.

२ : साळुंखे, पृ. १४३.

"सर्व प्राण्यांना समान लेखणे ही नीती आणि हीच खरी पुजा ही त्यांची भूमिका हा धर्माच्या क्षेत्रातील पवित्रम विचार म्हटला पाहिजे."[१]

स्वामी दयानंद सरस्वती :—(१८२४-१८८३) आर्यसमाजाचे संस्थापक व हिंदुधर्मोद्धारक, मोरबी संस्थानातील औदिच्य ब्राह्मण कुलात जन्म. मूळ नाव मूलशंकर, ब्रह्मचारी राहून वेदाध्ययन करण्यासाठी स्वामी पूर्णानंद नावाच्या विद्वान महाराष्ट्रीय संन्यासाकडून संन्यास–दीक्षा. 'स्वामी दयानंद' हे नाव धारण करून वैदिक ज्ञानाचे अुज्वल स्वरूप लोकांपुढे मांडले, प्रचलित मूर्तिपूजेविरुद्ध प्रखर मत मांडले, गोवधाविरुद्ध उग्र चळवळ केली. शुद्धी चळवळीचा फार मोठा प्रयत्न केला. १० एप्रिल १८७५ ला आर्य समाजाची स्थापना केली. सत्यार्थप्रकाश, वेदांवरील भाष्ये इत्यादि ग्रंथ लिहिले. वेदांमध्ये सर्व काही आहे हे अतिशयोक्तिपूर्ण मत प्रतिपादताना अगदी अलीकडील शास्त्रीय शोधही त्यात आहे हे सिद्ध करण्यासाठी वेदांतील ऋचांचा विक्षिप्त अर्थ लावीत. हिंदुस्थानला वैदिक मार्गाने जाऊनच उद्धार करता येईल हे सांगताना युक्तिवाद लटपटीत असत. वक्तृत्वाच्या जोरावर ते अनेक धाडसी विधाने बिनधास्त करीत.

नरीमन, खुरशेद फ्रामजी :—(१८८५-१९४९) एक पारशी हिंदी पुढारी. तरुणांच्या चळवळी चालविण्यात पुढाकार. मुंबई प्रांतिक काँग्रेस कमिटीचे अनेक वर्षे अध्यक्ष. गांधींच्या अगोदर ६ एप्रिल १९३० ला मिठाचा सत्याग्रह. पं. मोतीलाल नेहरू कमिटीच्या योजनेला विरोध. अनेक वर्षे मुंबई म्युनिसिपल कार्पोरेशनचे तसेच मुंबई कायदेमंडळाचे सभासद.

* **नानक** (१४६९-१५३९) :—शीख धर्माचे संस्थापक, जन्म तलवंडी राईबोई या गावी. त्यांचे मूळ नाव नानकन साहिन. वडिलांचे नाव कालीयानदास बेदी. हे त्या गावचे कुळकर्णी (मेहता) होते. त्यांची पत्नी श्रीतृप्ता ह्या होत. हिंदू पंडित आणि मुसलमान मुल्ला यांच्याजवळ नानक यांचे शिक्षण झाले. ऐहिक व्यवहारापेक्षा धार्मिक व्यवहाराकडे त्यांचा लहानपणापासूनच ओढा. यांचा विवाह सुलखणी हिच्याबरोबर झाला. पण त्यांचे लक्ष संसारात नव्हते. हिंदु व इस्लामी धर्माचे शिक्षण घेऊन त्यांनी भक्तिमार्ग, मोक्ष वगैरे बाबीसंबंधी सूक्ष्म विचार केला. जगातील सर्व मानव हे एकाच परेश्वराची मुले होत व ते परस्परांचे बंधू होत. हा बंधुभाव लक्षात घेऊन सर्व धर्मीय वागू लागले तर जगात द्वेष, वैर, कलह राहणार नाही. या विचारामुळे भारुन, तो

---

१ : तत्रैव पृ. १०७.

भारतात प्रसृत करण्यासाठी त्यांनी भारतात सर्व प्रमुख भागात दौरा काढला. त्यांच्याबरोबर हिंदू धर्माचे संत व मुसलमान धर्माचे फकीर होते. मथुरा, काशी, जगन्नाथपुरी, मलबार, कोकण, मुंबई, राजस्थान, सिलोन, लडाख, नेपाळ, मक्का, मदिना वगैरे ठिकाणी जाऊन तेथील लोकांना उपदेश केला. ईश्वराचे चिंतन व नामस्मरण करीत असतांना नानक यांना जी दृश्ये दिसत व ज्या सद्‌भावना मनात उत्पन्न होत, त्यांना त्यांनी अक्षरबद्ध करुन ठेवले. ही अक्षरबद्ध स्त्रोत्रे पुढे एकत्र करुन लिहून काढली. त्या ग्रंथाला पुढे आदिग्रंथ किंवा ग्रंथसाहेब हे नाव मिळाले. परमेश्वर अवतार घेतो यावर त्यांचा विश्वास नव्हता. नानक यांची प्रवचने ऐकून हजारो हिंदू व मुसलमान त्यांचे शिष्य झाले. या शिष्यांना संत्संग हे नावे दिले.

ते महामानव कबीरांना आपले अध्यात्मिक मार्गदर्शक समजत होते. त्यांच्यावर बुद्ध व मो. पैगंबर याच्या तत्त्वज्ञानाचा पगडा असल्याचे स्पष्ट दिसते. ते पुरोहितांच्या कर्मकांड, अंधश्रद्धा, जातियता, अवास्तविक धार्मिक अवडंबर व प्रथा, मुर्तिपूजा यांच्या विरोधी होते. त्यांचा प्रामाणिकपणा, सदाचारी जीवन, विनय, दया, उदार्‍पणा, सत्य इत्यादी मानवी मूल्यांवर पूर्ण विश्वास होता. यामुळे त्यांनी शील व कृतीची शुद्धता आणि नैतिकतेच्या नियमावर विशेष भर दिला. गुरुनानकांच्या या मानवी विचारधारेमुळे ब्राह्मणवादी समाज व्यवस्थेचे मानेवर जोखड असलेल्या बहुतांश शुद्रातिशुद्रांनी शिख धर्माचा स्वीकार केला. आज शीख धर्माचे भारतीय जीवनात प्रमुख स्थान आहे.

नायर, डॉ. तारावत माधवन :—(१८६८-१९१९) जन्म तिरूर येथे. शिक्षण प्रेसिडेन्सी महाविद्यालय व मद्रास मेडिकल महाविद्यालयामध्ये. पुढे चालून प्रख्यात डॉक्टर, नामवंत प्राध्यापक, झुंजार पुढारी, धैर्यशाली समाज सुधारक व एक निर्भय राजकारणी पुरुष म्हणून कीर्ती. दक्षिणेतील ब्राह्मणेतर चळवळीचे अध्वर्यु. मद्रासच्या विधिमंडळात सभासद. ‘अँटीसेप्टीक’ नावाच्या वैद्यकीय नियतकालिकाचे संपादक. जातिभेदाची उच्चनीचता पाळणाऱ्या ब्राह्मणांच्या हाती मॉंटफर्ड सुधारणा राबविण्याची सत्ता गेली तर मनुस्मृतीतील निर्बंधच सुधारून नि अद्यावत करून पुन्हा नव्या स्वरूपात मनूचे निर्बंध सर्व हिदूंना लागू करण्यात येतील असे त्यांचे ठाम मत होते.

नॉर्डिक वंश :—नॉर्डिक वंश हाच जगातील सर्व श्रेष्ठ वंश आहे. अन्य वंशांतील लोक हे दुय्यम दर्जाचे मानव आहेत व त्यांच्यावर राज्य करण्याचा नॉर्डिक वंशाचा म्हणजे जर्मनांचा ते श्रेष्ठ वंशीय असल्यामुळे हक्कच आहे, हा

हिटलरचा सिद्धांत होता. या नॉर्डिक वंशालाच हिटलर आर्य वंश म्हणत असे. भिन्नभिन्न मानव वंशांत समानता मानणे हा त्याला गुन्हा वाटे. वंशावंशातील समानतेप्रमाणेच मानवा-मानवांतील समता हाही हिटलरच्या दृष्टीने भयंकर गुन्हा होता. मानव समाजांतील व व्यक्तींतील असमानता, भिन्नता हाच हिटलरच्या वंशसिद्धांताचा अर्थ होता.

नेहरू, पं. मोतीलाल :—(१८६१-१९३१) हिंदुस्थानातील सुप्रसिद्ध राज्य घटनाशास्त्रज्ञ, कायदेपंडित, राजकारणी, मुत्सद्दी व वादविवादपटू. काश्मिरी ब्राह्मण. परंतु अलाहाबादमध्ये कायम वास्तव्य. तीन महिन्याचे असतानाच वडिल वारले. संगोपन वडील भावाने केले तेही वकील होते. यांनी हायकोर्ट वकिलीची परीक्षा देऊन सुवर्णपदकही मिळविले व वकिली सुरू केली. खूप पैसा मिळवावा, अत्यंत ऐषारामात राहावे व प्रसंगी प्रागतिकांच्या राजकारणात भाग घ्यावा, असा यांचा तेव्हां कार्यक्रम असे. पण म. गांधींच्या राजकारणाने हे भारले गेले आणि चढाईच्या राजकारणात दाखल झाले. पंजाब प्रकरणाबाबत चौकशी करण्याकरिता राष्ट्रसभेने नेमलेल्या कमिटीवर काम केल्यानंतर यांची अमृतसर राष्ट्रसभेचे अध्यक्ष म्हणून निवडणूक झाली (१९१९). पुढे असहकारितेच्या चळवळीतही ते सामील झाले. स्वराज्य पक्षाची स्थापना केली. दिल्लीच्या मध्यवर्ती कायदेमंडळात हे पक्षाचे पुढारी म्हणून निवडले जाऊन यांनी आपल्या वादविवादकौशल्याने सरकारला हादरून सोडलें. साम्राज्यान्तर्गत स्वराज्याची यांची राष्ट्रसभेने मान्य केलेली योजना ' नेहरू रिपोर्ट ' या नावाने प्रसिद्ध.

पटेल, वल्लभभाअी जव्हेरभाई :—(१८७५-१९५०) सरदार वल्लभभाई पटेल म्हणून प्रसिद्ध. स्वतंत्र भारताचे पहिले गृहमंत्री व कॉंग्रेसचे एक प्रमुख पुढारी. गुजरातमधील खेडा जिल्ह्यातील नडियाड गावी जन्म. इग्लंडमधील मिडलटेंपलमधून बॅरिस्टर होऊन आल्यावर वकिली करीत असताना गांधींच्या स्वराज्य चळवळीत भाग. अनेकदा तुंरुगवास. १९३१ च्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनाचे अध्यक्ष. करडेपणाच्या व करारीपणाच्या वृत्तीचा लोकमतावर मोठा परिणाम. त्यांच्या कडक धोरणामुळेच हैद्राबाद संस्थान मुक्त होऊन स्वतंत्र भारतात सामील होऊ शकले. त्यामुळेच त्यांना पोलादी पुरुष म्हटले गेले.

प्रार्थना समाज, मुंबई :—महाराष्ट्रात १८६७ मध्ये स्थापन झालेला एक धर्मपंथ. प्रत्येक धर्मात कमीअधिक प्रमाणात सत्याचा लोप झालेला असतो किंवा धर्मविकास थांबला असतो तेव्हा विवेचक बुद्धीने सर्व धर्मांमधील सत्य

तेवढे ग्रहण करावे. देशकालपरत्वे धर्मप्रवृत्तीत असत्याचा अंश त्यागावा व जागृत विवेक बुद्धीने उन्नतीकारक मतांचे अवलंबन करावे हा प्रार्थना-समाजाचा मूळ उद्देश. षड्रिपूंचे उच्चाटन होण्याकरिता प्रार्थना आहे हे जाणून प्रार्थना-समाज प्रार्थनेवर जोर देतो. राजा राममोहन रॉय यांनी कलकत्त्यास स्थापन केलेल्या ब्राह्म-समाजाच्या धर्तीवरच प्रार्थना-समाजाची प्रथम मुंबईस स्थापना झाली. त्याचे प्रर्वतक डॉ. भांडारकर, न्यायमूर्ती रानडे, रमाबाओी रानडे, डॉ. आत्माराम पांडुरंग, मामा परमानंद, वासुदेव बाबाजी नवरंगे, रामचन्द्र विष्णु माडगावकर, बाळ मंगेश वागळे, भास्कर हरि भागवत, वामन आबाजी मोडक, शंकर पांडुरंग पंडित, दिनानाथ विष्णु माडगावकर, नारायण गणेश चंदावरकर ही मंडळी होती. ह्या समाजातर्फे १८७३ पासून ' सुबोधपत्रिका ' हे साप्ताहिक सुरू केले गेले. द्वा. गो. वैद्य यांनी प्रार्थना-समाजाचा इतिहास लिहिला आहे.

बजाज, शेठ जमनालाल :—(१८८९-१९४२) व्यापारी वर्गातील एक सार्वजनिक कार्यकर्ते. वर्धा येथील शेठ बच्छराज यांनी १८९४ मध्ये आपला नातू म्हणून दत्तक घेतले. शिक्षण शाळेत किंवा विद्यापीठात झाले नाही. गांधीजी, विनोबा भावे व श्रीकृष्णदास जाजू यांच्या सहवासामुळे मनावर सुपरिणाम होऊन राष्ट्रकार्याकडे ओढा. रावबहादूर पदवीचा त्याग करुन कॉंग्रेसच्या स्वातंत्र्य चळवळीत भाग. स्वमालकीचे लक्ष्मीनारायण मंदिर १९२८ साली अस्पृश्यांसाठी खुले केले. अशा प्रकारचे अस्पृश्यांसाठी खुले केलेले हिंदुस्थानातील हे पहिलेच मंदिर होते. ते कर्ते सुधारक होते. १९२० पासून राष्ट्रीय सभेचे खजिनदार होते. म. गांधीजींचे उजवे हात म्हणून प्रसिद्ध.

बसवेश्वर :—" बिज्जल हा बाराव्या शतकात होऊन गेला. तो कर्नाटकाचा राजा होता. त्याचा प्रधान बसव. बसव जातीने ब्राह्मण होता. त्यावेळी हिंदुधर्म व जैनधर्म यांचे प्राबल्य होते. बिज्जल राजा हा जैनधर्मी होता. बसव शूर, धोरणी, पण भक्तिप्रधान माणूस होता. हिंदू धर्मातील व जैन धर्मातील त्यावेळचे रुढाचार पाहून तो दुःखी झाला. या दोन्ही धर्मांत त्याला हेच दिसले की, बहुजन समाजाची दैन्यावस्था आणि पुरोहित वर्गाची चंगळ ! श्री. बसव यांनी वेद, वेदांगे, श्रुति, स्मृति, पुराणे, ह्यावर प्रचंड हल्ले चढविले. त्याचप्रमाणे त्याने ब्राह्मणी वर्चस्व, जातिभेद आणि पूजा-अर्चा व इतर धार्मिक विधी यांच्याविरुद्ध बंड उभारले व नवीन धर्माची-लिंगायत-स्थापना केली. श्री. बसवाच्या लिंगायत धर्मात बहुजन समाजाचे व ब्राह्मण समाजाचेही लोक आले. (The Lingayat Movement, p.20).

" त्यांनी धार्मिक व सामाजिक क्रांतीद्वारे मानव क्षेत्राचे शुद्धीकरण करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी कर्मकांड, यज्ञयाग, अंधश्रद्धा, चातुर्वर्ण्य यास कडाडून विरोध केला. पुरोहितवाद, तीर्थयात्रा, ग्रंथपूजा, प्रारब्ध, परलोक, परदेव, परतत्व, यावर विश्वास ठेवून निष्क्रीय बनलेल्या समाजाला सक्रीय करण्याचे कंकण बांधले. उद्योग हाच कैलास आहे. प्रत्येक उद्योग कैलासाएवढे पवित्र आहेत. त्यात उच्चनीचतेचा भेद नाही. असे सांगितले ......, ' सदाचार हाच स्वर्ग व अनाचार हा नरक आहे ' असे संबोधून वास्तववाद प्रगट केला."[१]

" बसव यांना जातिभेदाचा लहानपणापासून तिरस्कार होता. जातिभेदाचे थोतांड नष्ट करण्याकरिता त्यांनी लहानपणापासून कार्य हाती घेतले. 'बसवेश्वरांचे चरित्र इ.स. १३६९ च्या सुमारास रचिलेल्या ' बसवपुराण ' नामक ग्रंथात गुंफिले असून त्याच्या तिसऱ्या भागात असा वृत्तांत दिला आहे की, बसव हा ब्राह्मणपुत्र असल्यामुळे त्याच्या मुंजीचा बेत ठरला. त्यावेळी ' मी ब्राह्मण नाही ' असे म्हणून त्याने मुंज करण्याचे साफ नाकारले !' (विचारसमीक्षा, पा.५३). जातिभेदाचे थोतांड नष्ट करण्यासाठी बसवेश्वरांनी आमरण चळवळ केली व कष्ट केले. परंतु जातिभेदाची कल्पना समाजातून नष्ट करण्यात त्यांना यश आले नाही. याचे कारण हे की, हिंदुधर्मातील अवतार, पूर्वजन्म, कर्मवाद, मोक्ष, नरकयातना, मायावाद, इत्यादी शिकवणींची लोकांच्या मनावर पडलेली कायमची छाप ! कालांतराने बसवेश्वराच्या अनुयायांनी लिंगायत धर्मातही जातिभेदाचे रोप रुजू दिले आणि लिंगायतांमध्ये जातिभेदाचे जाळे कायमचे पसरले गेले."[२]

बाळाजी बाजीराव :—(१७२१-१७६१) थोरल्या बाजीरावाचा मोठा मुलगा (नानासाहेब) साते येथे जन्म. बाजीरावानंतर याच्याइतका योग्य दुसरा पुरुष न दिसल्यामुळे शाहूने याला पेशवे पद दिले. १७३९ मध्ये झालेल्या मिरजेच्या स्वारीत शाहूबरोबर होता. १७४०-१७४८ पर्यंत सुरज भेलसे, माळवा, गुजराथ, बंगाल, प्रयाग, भेलसे, कर्नाटकची पहिली लढाई इ. लढाया याने केल्या. पुढे शाहूने याच्या स्वाधीन राज्याची सर्व सूत्रे केली (१७४९). पुढे कोल्हापूरच्या ताराबाईचा नातू राजाराम यास गादीवर बसविले. १७५१ मध्ये निजामचा पाडाव केला. १७६१ मध्ये पानिपतावर मराठ्यांचा जो भयंकर संहार झाला त्यामुळे जबर धक्का बसून १८ जून १७६१ रोजी पुण्यास मरण पावला. हा उत्तम संस्कृततज्ज्ञ, कलमबहाद्दर, धोरणी व अत्यंत हिशोबी होता.

---

[१] : मोगलेकर, डॉ. पृ. ४३.

[२] : खैरमोडे, खंड १ ला, पृ. ११६-११७.

बिस्मार्क, ऑटो फोन :—(१ एप्रिल १८१५ - ३० जुलै १८९८). जर्मन साम्राज्याचा जनक आणि जर्मनीचा पहिला चॅन्सेलर. याचा जन्म सॅक्सनीतील शनहाऊझेन येथे सरंजामदार घराण्यात झाला. वडील फर्डिनांट फोन बिस्मार्क-शनहाऊझेन आणि आई व्हिल्हेल्मीन मेन्केम. फर्डिनांटना राजकारणात रस नव्हता; तथापि त्याची आई प्रगत विचारांची व महत्त्वांकाक्षी होती. बिस्मार्कने गटिंगन विद्यापीठातून कायद्याची पदवी घेतली (१८३५). लष्करी शिक्षणाची त्याला फारशी आवड नव्हती. आईच्या मध्यस्थीने त्याला एक्स-ला-शपेल येथे शासकीय विधिखात्यात नोकरी मिळाली; परंतु आत्यंतिक आळशी व उच्छृंखल स्वभावामुळे ती त्यास सोडावी लागली. त्यानंतर पॉट्स डॅम येथे त्यास दुसरी नोकरी मिळाली. ती ही त्यांनी सोडली. नंतर बिस्मार्क विलासी जीवन व्यतीत करू लागला. त्याने योहान्ना पुटकामर फोन या सरदार घराण्यातील युवतीशी विवाह केला (१८४७). एका सदस्याच्या अनुपस्थितीत बिस्मार्कने प्रशियाच्या संसदेत त्याचे प्रतिनिधित्त्व केले (१८४७). पुढे १८४९ मध्ये तो कनिष्ठ गृहावर निवडून आला. १८५१-१८५८ दरम्यान त्याने जर्मन संस्थांनाच्या फ्रॅंकफुर्ट येथील प्रातिनिधिक संस्थेत (फेडरल डायेट) प्रशियाचा प्रतिनिधी म्हणून काम केले. त्यामुळे त्यास संसदीय कामकाजाचा अनुभव मिळाला. १८५९ साली त्याची नेमणूक प्रशियाचा रशियातील वकील म्हणून झाली. रशिया व प्रशिया यांच्यातील संबंध सुधारण्याचा त्याने प्रयत्न केला. १८६२ मध्ये बिस्मार्कची प्रशियाचा राजदूत म्हणून फ्रान्समध्ये नेमणूक झाली. चौथ्या फ्रेडरिक विल्यमच्या मृत्यूनंतर (१८६१) पहिला विल्यम प्रशियाच्या गादीवर आला. त्याच्या सैनिकी कार्यक्रमाच्या अधिनियमास संसदेचा विरोध होता. या परिस्थितीत १८६२ मध्ये बिस्मार्कला पंतप्रधान व परराष्ट्रमंत्री नेमण्यात आले. प्रशियन संसदेशी टक्कर देण्यास समर्थ असा बिस्मार्कखेरीज दुसरा मुत्सद्दी नाही, याची जाणीव विल्यमला झाली होती. १८६२ ते १८७० ह्या काळात बिस्मार्क प्रशियाचा पंतप्रधान आणि १८७१ ते १८९० ह्या काळात जर्मनीचा चॅन्सेलर होता.

बिस्मार्क हा राजेशाहीचा पुरस्कर्ता व हुकूमशाही प्रवृत्तीचा होता. साहजिकच नव्यानेच उदयास येत असलेल्या समाजवादाच्या तो विरोधी होता. जर्मनीच्या विकासासाठी त्याने समान कायद्याची निर्मिती केली व समान चलनव्यवस्था अंमलात आणली. १८७५ च्या बँक कायद्यानुसार देशातील बँकांचे नियंत्रण जर्मन संसदेच्या वरिष्ठ सभागृहाकडे (बुनडेस्टाख) सोपविण्यात आले आणि १८७६मध्ये राइख बँक किंवा इंपिरिअल बँकेची स्थापना करण्यात आली. रेल्वे मार्गांचे व्यवस्थापकीय एकीकरण, बँक व्यवसायातील सुधारणा आणि सक्तीची

सैन्यभरती या सुधारणांमुळे अंतर्गत शासनात कार्यक्षमता वाढली. कामगारांच्या परिस्थितीत सुधारणा व्हावी व त्यांनी समाजवादी पक्ष व त्यांची विचारसरणी यांकडे आकर्षित होऊ नये, म्हणून बिस्मार्कने कामगारांच्या हिताचे अनेक कायदे संसदेत संमत करून घेतले. त्यात अपघात व आजारपण यांत कामगारांना आर्थिक सहाय्य, कामाचे विशिष्ट तास, स्त्री-कामगार व बाल-कामगार यांना संरक्षण यांसंबंधीचे कायदे महत्त्वाचे होते. या सुधारणांबरोबरच जर्मन उद्योगधंद्यांना उत्तेजन व संरक्षण देण्याचे धोरण त्याने अंगीकारले. जर्मन मालाला बाजारपेठ मिळावी, तसेच कच्च्या मालाचा पुरवठा व्हावा, म्हणून जर्मनीसाठी वसाहती मिळवण्याचा प्रयत्नही त्याने केला. रोमन कॅथलिक चर्चचा जर्मन राष्ट्रवादाला विराध होता. याकरिता रोमन कॅथलिक चर्चबरोबर त्याने संघर्षाचे धोरण अवलंबिले. त्याने जेझुइटांना हाकलून दिले, व्हॅटिकनबरोबरचे राजनैतिक संबंध तोडले आणि कायदे करून चर्चवरील शासकीय प्रभाव वाढविला; परंतु त्याच्या या धोरणाला चर्चने व कॅथलिकांच्या मध्यवर्ती संस्थेने जोरदार विरोध केला. त्यामुळे या धोरणाला फारसे यश लाभले नाही. एवढेच नव्हे, तर चर्चच्या विरोधातील बहुसंख्य कायदे पुढे मागे घेण्यात आले. १८८८ मध्ये गादीवर आलेल्या जर्मन सम्राट दुसऱ्या विल्यम कैसरबरोबर बिस्मार्कचे मतभेद निर्माण झाले. परिणामतः १८९० मध्ये बिस्मार्कला राजीनामा देणे भाग पडले. निवृत्तीनंतर काही वर्षांनी तो बर्लिन येथे मरण पावला.

बिस्मार्कचे परराष्ट्रीय धोरण अंतर्गत धोरणाशी काही अंशी संलग्न होते. तरीही प्रखर बुद्धिवाद व व्यापक दृष्टिकोण ह्यांमुळे ह्या काळात बिस्मार्क प्रशिया - जर्मनी यांच्या कक्षा ओलांडून यूरोपीय मुत्सद्दी झाला. १८६२ ते १८६६ पर्यंत प्रशियन, १८६६ ते १८७० पर्यंत जर्मन व १८७० नंतर तो युरोपीय मुत्सद्दी होता. त्याच्या प्रगल्भ दृष्टिकोनानुसार त्याचे परराष्ट्रीय धोरण बदलत गेले. त्याने आपल्या परराष्ट्रीय धोरणाला लष्करी सामर्थ्याची सदैव जोड दिली.

संसदेशी टक्कर देताना बिस्मार्कने १८६२ मध्ये आदर्शवादी लोकांचा पराभव केला; परंतु राष्ट्रीय चळवळीला कमी लेखले नाही. लोकशाही प्रधान राज्य आणि जर्मनीचे एकीकरण या दुहेरी मागणीतील एकीकरणाच्या प्रवृत्तीस त्याने प्रोत्साहन दिले. त्यामुळे आदर्शवादी लोकांचा विरोध झाला; तरी सर्वसामान्य जनता त्याच्या विरुद्ध नव्हती. एकीकरणासाठी फ्रान्सशी युद्ध अटळ होते व ऑस्ट्रियाशी संभवनीय होते. जर्मन लोकांवर ऑस्ट्रियाचे असलेले वजन दूर

करण्यासाठी कुठल्याही साधनांचा वापर करण्यास बिस्मार्क तयार होता. युद्ध हेही त्याच्या राजनीतीतील एक साधन होते आणि ते त्याने वापरले. श्लेझविग व होलस्टाइन ह्या औत्तरीय प्रांतावर असलेले डेन्मार्कचे वर्चस्व जर्मन राष्ट्रवाद्यांना जाचक होते. ह्याचा उपयोग करून बिस्मार्कने ऑस्ट्रियास आपल्याशी मैत्री करणे भाग पाडले आणि ह्या प्रांताचा कबजा मिळविला. प्रशियाने एकट्यानेच जर्मन राष्ट्रवादी भूमिका घेऊन जर्मनीमध्ये वर्चस्व मिळवू नये, म्हणून ऑस्ट्रियास प्रशियाशी संगनमत करणे भाग पाडले. ऑगस्ट १८६५ मध्ये गास्टाइनच्या करारान्वये ऑस्ट्रियाने होलस्टाइन आणि प्रशियाने श्लेझविग प्रांत ताब्यात घ्यावा असे ठरले; परंतु ऑस्ट्रियाशी युद्ध हे अनेक कारणांनी अटळ होते. जर्मनीचे नेतृत्त्व प्रशियाकडे असावे की ऑस्ट्रियाकडे हा मूलभूत प्रश्न लष्करी सामर्थ्यानेच सुटणारा असल्याने बिस्मार्कने ऑस्ट्रियाशी युद्ध पुकारले. त्यासाठी त्याने इटलीशी तह करून ऑस्ट्रियाच्या ताब्यातील व्हिनीशिया मिळवून देण्याचे वचन दिले. ह्या तहामुळे ऑस्ट्रियाचे प्रचंड सैन्य इटलीत गुंतून पडले. प्रत्यक्षात प्रशियन लष्करीव्यवस्था ही ऑस्ट्रियापेक्षा अधिक कार्यक्षम ठरली. १४ जून १८६६ रोजी युद्ध पुकारले गेले. ३ जुलैला दोन्ही सैन्यांची कनिखग्रेट्स येथे गाठ पडून ऑस्ट्रियाचा संपूर्ण पराभव झाला. जर्मनीतील प्रशियाचे नेतृत्त्व वादातीत झाले. श्लेझविग-होलस्टाइन प्रांत प्रशियास मिळाले.

जर्मनीच्या एकीकरणात फ्रान्सशी युद्ध अटळ होते. एक प्रबळ व महत्त्वाचे यूरोपीय राष्ट्र म्हणून फ्रान्सला यूरोपीय समस्यांमध्ये रस होताच; शिवाय जर्मनीचा प्रदेश फ्रान्सच्या सीमेला भिडत असल्याने व जर्मनीचे ॲल्सेस व लॉरेन्स हे दोन प्रांत फ्रान्सकडे असल्याने फ्रान्सचे बारीक लक्ष जर्मनीच्या धोरणावर होते. युद्ध अटळ असल्यास ते कुशलतेने घडवून आणावे, हे धोरण बिस्मार्कचे होते. स्पेनच्या गादीवर कुणी बसावे, ह्या प्रश्नावरून वातावरण तंग होऊन त्याची परिणती १८७० च्या फ्रान्स व प्रशिया यांमधील युद्धात झाली. या युद्धात फ्रान्सचा दारुण पराभव झाला. १८ जानेवारी १८७१ रोजी व्हर्सायच्या आरसेमहालात बिस्मार्कने जर्मन साम्राज्य अस्तित्वात आल्याची घोषणा केली.

मध्य यूरोपात १८७१ पासून पुढे जैसे थे परिस्थिती कायम राखणे, हे बिस्मार्कच्या धोरणाचे मुख्य सूत्र होते; कारण ती स्थिती नवोदित जर्मनीच्या विकासाच्या दृष्टीने हिताची होती. पराभूत फ्रान्सला यूरोपात अलग पाडण्यावरच त्याच्या धोरणाची यशस्विता अवलंबून होती. फ्रान्सचे संभाव्य मित्र ऑस्ट्रिया व रशिया होते; परंतु अशी मैत्री होण्यापूर्वीच बिस्मार्कने या दोन्ही देशांशी १८७३ मध्ये युती केली (त्रिसम्राट संघ). १८७९ मध्ये ऑस्ट्रियाबरोबर स्वतंत्र युती

केली, तर १८८२ मध्ये त्याने ऑस्ट्रिया, इटली आणि जर्मनी यांच्यात युती घडवून आणली (त्रिराष्ट्र-करार). १८८७ मध्ये त्याने रशियाबरोबर समझोता करण्याचा प्रयत्न केला; कारण तत्पूर्वी त्रिसम्राट संघ भंग पावला होता. याशिवाय ब्रिटनबरोबर संघर्ष येऊ न देण्याची दक्षता त्याने घेतली होती. एकूण १८७१ पासून तो सत्तेवर असेपर्यंत (१८९०) फ्रान्सला मित्र मिळू न देण्यात व अलग पाडण्यात बिस्मार्कचे धोरण यशस्वी झाले, असे म्हणता येईल.

एकोणिसाव्या शतकात विशेषतः १८१५ ते १८६२ दरम्यान वेगवेगळ्या लहानमोठ्या राज्यांत विखुरलेल्या जर्मन लोकांच्या राजकीय ऐक्याचे अनेक प्रयत्न झाले; पण ते अयशस्वी ठरले. सत्तेवर आल्यानंतर दहा वर्षांच्या आतच बिस्मार्कने त्याच्या पद्धतीनुसार जर्मनांचे एकीकरण घडवून आणले आणि फ्रँको-प्रशियन (जर्मन) युद्धाने जर्मनी या आधुनिक राष्ट्राचा उदय झाला. त्यामुळे आधुनिक जर्मनीचा तो शिल्पकार ठरला. जर्मनी हे यूरोपातील लष्करी दृष्ट्या एक बलवत्तर राष्ट्र झाले आणि जागतिक राजकारणात त्याची प्रतिमा उंचावली; परंतु बिस्मार्कच्या युद्धखोर व अधिकारशाही विचारसरणीमुळे जर्मनीत लोकशाहीची बीजे दीर्घ काळ रूजू शकली नाहीत. एवढेच नव्हे तर विसाव्या शतकात जर्मनीने जे युद्धखोर व विस्तारवादी धोरण स्वीकारून जगाला ज्या दोन जागतिक महायुद्धांच्या खाईत लोटले, त्याची बीजेही बिस्मार्कच्या कारकीर्दीतच पेरली गेली.

भागवत, **राजारामशास्त्री रामकृष्ण** (१८५१-१९०८) :—महाराष्ट्रीय संस्कृत पंडित, व्यासंगी वेदाभ्यासक व सुधारक. राजापूर तालुक्यात केळशी गावी जन्म. मुंबईत शिक्षण. संस्कृतचे अनेक वर्षे प्राध्यापक. मुंबई विद्यापीठात शेवटची ५-६ वर्षे संस्कृतचे परीक्षक. निर्भीड वृत्ती. अस्पृश्यांच्या उन्नतीविषयी खूप कळकळ. स्वतंत्र विचारांमुळे अतिविक्षिप्त म्हणून कीर्ती. वेद, विविध धर्म, इतिहास, संत कवी, भागवत संप्रदाय, व्याकरण इत्यादि नाना विषयांचा मूलगामी अभ्यास. अनेक लेखांचे व ग्रंथांचे लेखन.

भोपटकर, लक्ष्मण बळवंत :—जन्म १८८० मध्ये. प्रसिद्ध 'भाला' कार भोपटकर यांचे कनिष्ट बंधू. नामांकित वकील, अनेक ग्रंथांचे लेखक, वृत्तपत्रांचे संपादक. सार्वजनिक, राजकीय तथा सामाजिक चळवळीत प्रत्यक्ष भाग. राजकीय मतस्वातंत्र्याबरोबरच सामाजिक मतस्वातंत्र्यही असावे या विचाराचे. १९०५ सालापासूनच अस्पृश्यता-निवारणाच्या विषयावर लिहिणे व बोलणे सुरू होते. त्यावेळीच नागपुरातील प्रतिष्ठा पावलेल्या एका अस्पृश्य

पुढाऱ्यास बोलावून पुणे येथे त्याचे व्याख्यान करविले. श्री. माटे यांच्या अस्पृश्यता निवारक मंडळाचे ते अध्यक्ष होते. विद्याभ्यास सुरू असताना कुस्ती, दांडपट्टा, देशी व्यायाम-पद्धती व खेळ यांचे ज्ञान त्यांनी संपादन केले. पुण्यातील महाराष्ट्र व्यायाम शाळा त्यांनीच भरभराटीस आणली. तसेच महाराष्ट्र विद्यालय या नावाचे राष्ट्रीय हायस्कूल या बंधूंनी काढले. १९०५ साली 'भाला' कार भोपटकर यांना राजद्रोहाबद्दल शिक्षा झाल्यावर त्यांनी काही काळ 'भाला' पत्राचे संपादन केले. 'लोकसंग्रह' या दैनिकाचे ते दोन वर्षे संपादक होते. महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस कमिटीचे चार वर्षे अध्यक्ष होते. पूना लॉ कॉलेज सुरू करण्यात त्यांनी पुढाकार घेऊन ते त्या कॉलेजात कायद्याचे प्रोफेसर होते व व्हॉईस प्रिंसिपाल पण होते. त्यांनी 'Law of Torts' इ. कायद्याची पुस्तके, दांडपट्टा, कुस्ती ही व्यायामविषयक पुस्तके, नवरत्नाचा हार, मृत्यूच्या मांडीवर इ. पुस्तके लिहिली.

मोझेस :—(इ. स. पू. सु. चौदावे - तेरावे शतक). ज्यू राष्ट्रसंस्थापक, सर्वश्रेष्ठ ज्यू प्रेषित व ज्यूंना त्यांची धार्मिक-नैतिक-सामाजिक संहिता देणारा एक श्रेष्ठ नेता. मो़झेस (हिब्रु - मोशे) हा शब्द ईजिप्शियन भाषेत मोसे म्हणजे मुलगा या अर्थाचा आहे. त्याचा जन्म ईजिप्तमध्ये झाला. मोझेसचा पिता अम्राम व आई जोशेबेद. हे दोघेही लेव्ही जमातीचे ज्यू होते. परंतु ज्या दुसरा रॅमसीझ (इ. स. पू. सु. १३०४ - १२३७) ह्या ईजिप्ती राजाच्या (फ़ेअरो) राज्यात ते गुलाम म्हणून राहत होते, त्याने ज्यूंच्या मुलांना नाईल नदीत बुडवून मारावे असा हुकूम काढला होता. मोझेसला त्याच्या आईवडिलांनी तीन महिने कसेतरी गुप्तपणे सांभाळले; परंतु शेवटी त्यांनी त्याला गवताच्या पेटाऱ्यात ठेवून नाईल नदीत सोडून दिले. सुदैवाने फेअरोची राजकन्या नदीवर आंघोळीस आली असता तिला हे मूल आढळले व ते तिला इतके आवडले की, तिने त्याचे पोटच्या मुलाप्रमाणे पालनपोषण केले व त्याचे नाव मोझेस असे ठेवले. मोझेस मोठा झाल्यावर एकदा त्याने एक ईजिप्शियन माणूस एका ज्यूचा छळ करीत असताना पाहिले. लगेच त्याने त्या माणसास ठार केले. मोझेसच्या रक्ताला हा गुण उत्तरोत्तर अधिक प्रगट होऊ लागला. फेअरोच्या हाती सापडण्यापूर्वीच तो तेथून पळाला व जेथ्रो ह्या मीडियनच्या धर्मगुरूकडे आला. तिथे त्याने त्या धर्मगुरूची मुलगी झिप्पोरा हिच्याशी लग्न केले. तिला मोझेसपासून जेरशोम व एलिएझर हे दोन पुत्रही झाले. तिथेच मोझेसने चाळीस वर्षे मेंढपाळाचा व्यवसाय केला. एकदा होरेब पर्वतावर मेंढ्या चारीत असता मोझेसला एका झुडपात अग्निज्वाला

दिसली आणि तरीही ते झुडूप जळत नव्हते. तो जवळ गेला तेव्हा त्याला ईश्वराचा साक्षात्कार झाला व ईजिप्तला परत जाऊन आपल्या भाऊबंदांना सोडवून आणण्याचा परमेश्वरी आदेश मिळाला. त्याप्रमाणे तो ईजिप्तला आला. तिथे त्याला त्याचा भाऊ एअरन भेटला. ज्यूंना सोडून देण्यासाठी फेअरोचे मन वळविणे कठीण आहे असे दोघा भावांना पटले. मग मोझेसच्या दैवी शक्तीमुळे येहोवाने ईजिप्तवर दहा वेळा प्लेगच्या साथी आणल्या. शेवटी ईजिप्शियन लोकांनी ज्यूंचा छळ थांबवून त्यांना सोडून दिले. मग सारे ज्यू आपली मेंढरे घेऊन सुएझच्या दक्षिणेकडे वसाहत करण्यासाठी निघाले. त्यांचे नेतृत्व मोझेसने केले. हा प्रसंग 'एक्झोडस'म्हणून बायबलमध्ये व इतिहासातही प्रख्यात आहे. त्यांच्यावर अनेक संकटे आली; पण त्यांना ईश्वराने-येहोवाने सांभाळले. सिनाई येथे सारे आले तेव्हा त्यांचे मोठे स्वागत झाले. इथेच या पर्वताच्या शिखरावर (जेबेल मूसा) मोझेसला ईश्वरी साक्षात्कार झाला व ईश्वराने त्याला आपल्या 'दशाज्ञा' वा दहा नितिनियम दिले. सिनाई पर्वतावर मोझेस ४० दिवस ईश्वराच्या सान्निध्यात होता. नंतर खाली येऊन त्याने आपल्या भाईबंदाना कादेश येथे नेले. तेथून ३८ वर्षानंतर ते पूर्वेकडे निघाले. एसौ व मोआब यांच्या प्रदेशातून त्यांना सुखरूपपणे जाता आले; परंतु पुढे त्यांच्या मार्गात प्रतिबंध आला. जॉर्डन नदी ओलांडून पलीकडे कॅनन प्रदेशात जाता येणार नाही व आपला अंतकाळही जवळ येऊन ठेपला आहे असे पाहून मोझेसने आपल्या साऱ्या बांधवांना बोलावून त्यांना शेवटचा संदेश दिला ('ड्यूटेरोनॉमी' वा 'पेंटाट्यूक' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या बायबलमधील पहिल्या पाच पुस्तकांत हा संदेश ग्रथित आहे). नंतर सर्वांना आशीर्वाद देऊन तसेच जोशुआस आपला वारस नियुक्त करून मोझेस नेबो पर्वतावरील पिसगाह शिखरावर गेला व तिथे त्याने वयाच्या एकशेविसाव्या वर्षी देह ठेवला. इ. स. पू. सु. १३९२ ते सु. १२७२ असा त्याचा आयुकाल अभ्यासक मानतात.

ज्यू धर्माप्रमाणे येहोवाने इझ्राएल राष्ट्र निर्माण करण्यासाठी मोझेसला प्रेषित बनविले होते व त्याच्या द्वारा ईश्वर आपल्या साऱ्या आज्ञा ज्यू जनतेला कळवीत राहिला. मोझेस हा स्वभावाने अत्यंत शांत होता, असे त्याचे वर्णन आढळते. 'ज्याने ईश्वराला समोरासमोर पाहिले असा धर्मप्रेषित एकटा मोझेसच होय', अशी त्याची थोरवी गायिली जाते. ज्या काळात मोझेसने आपल्या बांधवांची एकी घडवून आणली त्या काळात येहोवा या देवाचा नाममहिमा नुकताच सुरू झाला होता. अशा काळात मोझेसच्या प्रयत्नांमुळे ज्यू जनतेने या ईश्वरावर श्रद्धा ठेवली. 'सिनाई पर्वतावरून जे वादळ आले त्यामुळे साऱ्या वाळवंटावर

पावसाचा वर्षाव झाला व जिकडे तिकडे पिके डवरून आली ', या त्यांच्या उद्गारावरून मोझेसने ज्या ईश्वरावर त्यांना श्रद्धा ठेवायला सांगितली, त्याने अनेक चमत्कार केल्याच्या कथा आहेत. मोझेस खरोखरच त्यांना मदत करणारा ठरला. मोझेसची खरी कीर्ती त्याने घालून दिलेल्या नियमांमुळे विशेष झाली आहे. मोझेसच्या ड्यूटेरोनॉमीतल्या नियमांमुळे ज्यू लोकांची एकी झाली, त्यांच्यात राष्ट्रीय भावना निर्माण झाली; इतकेच नव्हे, तर धर्माची खरी कसोटी विधी आणि पूजा यांवर अवलंबून नसून नैतिक आचरणावर आहे, हा दृष्टिकोन त्यांना प्रथम मोझेसकडून मिळाला.

मायकेलअँजेलो या प्रसिद्ध कलावंताने तयार केलेल्या मोझेसच्या पुतळ्यात मोझेसच्या कपाळातून शिंगे बाहेर आलेली दाखविली आहेत. मोझेसच्या कपाळावरील शिंगाची कल्पना मूळ हिब्रूवरून लॅटिनमध्ये झालेल्या चुकीच्या भाषांतरामुळे आली आहे. 'जेव्हा मोझेस सिनाई पर्वतावरून खाली उतरला तेव्हा त्याच्या चेहेऱ्यावरील कातडी चमकत होती ' या *बायबलच्या* वाक्यातील मूळ हिब्रूतील 'चमकत होती ' या अर्थाचा शब्दप्रयोग '(तिच्यातून) किरणे निघत होती ' असा आहे. लॅटिनमध्ये 'किरण' व 'शिंग' यांचा घोटाळा केला गेला. मोझेसच्या जीवनातील प्रसंगांवर अनेक प्रख्यात चित्रकारांनी आणि शिल्पकारांनी आपल्या चित्र-शिल्पाकृती तयार केल्या आहेत.[१]

रामकृष्ण परमहंस (१८३६–१८८६). :—बंगालमधील जगप्रसिद्ध सिद्धपुरुष व वेदान्तप्रतिपादक. बंगाल्यात हुगळी जिल्ह्यात कामारपुकुर येथे जन्म. मूळ नाव गदाधर चट्टोपाध्याय. यांचे आई-वडिल अत्यंत धार्मिक व सनातनी वृत्तीचे ब्राह्मण होते. १८५३ मध्ये हे आपले वडिलबंधू रामकुमार यांचे बरोबर कलकत्त्यास आले. १८५६ मध्ये राणी रासमणीने यांच्या वडील भावाला कलकत्त्याजवळच्या कालीच्या दक्षिणेश्वर मंदिराचे मुख्य पुजारी नेमले. हे त्यांना मदत करीत. यावेळी तोतापुरी नावाच्या एका सन्यासाने त्यांना सन्यास देऊन त्यांचे नाव रामकृष्ण परमहंस ठेविले. नंतर त्यांनी ख्रिश्चन व मुसलमान धर्माची त्या त्या धर्मातील अनुयायाप्रमाणे उपासना केली. तसेच निरनिराळे संप्रदाय व मतामतान्तरे यांचा आस्तिकपणे अभ्यास करून तद्नुसार यानी काही दिवस साधनाही केली. यांचे विचार ईश्वराधिष्ठित असून ते अत्यंत साधे व शुद्ध असत. यांचे चरित्र व उपदेश इतके अलौकिक व चमत्कारपूर्ण आहेत की जगातील विद्वानांवर त्यांचा परिणाम झाला. यांचे प्रमुख प्रसिद्ध शिष्य विवेकानंद होते. वयाच्या

---

१ : मराठी विश्वकोश : १३, पृ. ११८५-११८६.

१४ व्या वर्षापासूनच यांची समाधी लागे. वारंवार देहभान विसरुन ते ब्रह्मस्वरूपात लीन होत. यांचे प्रतिपादन तर्कशुद्ध, स्पष्ट आणि थोडक्यात असे. काही प्रसंगी यांच्या बोलण्यात गूढता येई. अंत्यजापेक्षा आपण वरचढ आहोत ही भावना नष्ट करण्यासाठी त्यांनी अंत्यजाच्या घरचा केर आपल्या जटांनी काढला.

रामतिर्थ, स्वामी (१८७३–१९०६) :—प्रसिद्ध साधुपुरुष, तत्त्वज्ञानी व कवी. पंजाबातील मुरलीवाला या गावी जन्म. मूळ नाव तीर्थराम. संन्यास घेतल्यावर रामतीर्थ हे नाव धारण केले. सांपत्तिक स्थितीला तोंड देऊन ते गणितात एम. ए. झाले (१८९५). काही काळ लाहोरच्या मिशन कॉलेजात गणिताचे प्राध्यापक. स्वामी विवेकानंदांची वेदान्तावरील व्याख्यानांचा परिणाम होऊन सर्वसंगपरित्याग. टोकियो येथे यांची भाषणे अत्यंत लोकप्रिय झालीत. ते अमेरिकेला पण गेलेत. तेथं प्रचंड स्वागत. संताचा पिंड परंतु वृत्ती देशभक्तीची. गंगेत स्नान करीत असताना पायाखालचा दगड निसटून बुडून मरण पावले.

राय, राजा राममोहन (१७७४–१८३३). :—एक प्रमुख बंगाली देशभक्त, धर्मसुधारक व ब्राह्मसमाजाचा आद्य संस्थापक. बंगालमधील हुगळी जिल्ह्यातील राधानगर येथे जन्म. बंगाली, फारसी, अरबी व संस्कृतचे शिक्षण. वेदान्त व उपनिषदांच्या अध्ययनातून एकेश्वरी मत. ' तुहफतुल मुवहिद्दीन ' हा फारसी ग्रंथ लिहून मूर्तिपूजेवर कडक टीका. पुढे इंग्रजी भाषेचा अभ्यास. १८१४ साली दिवाणगिरीची नोकरी सोडून कलकत्त्यास आत्मीय सभेची स्थापना. भावजयीच्या सती जाण्याचे दारुण दृश्य पाहून सती जाण्याच्या क्रूर चालीचा विरोध व त्यांच्याच प्रयत्नाने सतीबंदीचा कायदा. १८३० साली मोगल बादशहाने राजा ही पदवी दिली होती. फ्रान्स येथील ब्रिस्टल शहरी मृत्यु. कार्नोव्हेल येथे त्यांची समाधी आहे.

राजेसाहेब पानगल तथा रामराय निंगार (१८६६–१९२८) :—यांचा जन्म एका क्षत्रिय कुटुंबात झाला. १८९३ साली प्रथम रसायनशास्त्राचे पदवीधर नंतर वकिलीची परीक्षा उतीर्ण होऊन १८९९ साली तामीळ व संस्कृत विषयात एम. ए. वरिष्ठ विधी मंडळाचे सभासद व साम्राज्य युद्ध परिषदेचे हिंदुस्थानचे प्रतिनिधी. १९२१ मध्ये स्थानिक स्वराज्य खात्याचे दिवाण. डॉ. नायरनंतर १० वर्षे मद्रास इलाख्याच्या राजकारणाचे सूत्रधार. ब्रिटिश सरकारने त्यांना १९२३ मध्ये 'राजे' ही वंशपरंपरेची पदवी दिली होती. १५ डिसेंबर १९२८ रोजी ते दोपी तापाच्या विकाराने निधन पावले.

लॉस्की, निकोलस अनू प्रियथेव्हिच :—(६ डिसेंबर १८७०—२४ जानेवारी १९६५). अलिकडच्या काळातील प्रमुख रशियन तत्त्ववेत्ते. जन्म रशियाच्या

व्हीटेप्स्क प्रांतातील क्रेस्लाव्हका ह्या खेड्यात. सेन्ट पीटर्झबर्ग विद्यापीठातून पदवी संपादन केल्यानंतर जर्मनीत पदव्युत्तर शिक्षण. प्रसिद्ध जर्मन तत्त्ववेत्ते, व्हिल्हेल्म व्हिंडलबांट, व्हिल्हेल्म व्हुंट आणि जी. ई. म्यूलर हे त्यांचे शिक्षक होते. १९०७ मध्ये डॉक्टरेट संपादन केल्यावर त्यांनी सेन्ट पीटर्झबर्ग विद्यापीठात अध्यापक म्हणून १९२१ पर्यंत काम केले. १९२२ मध्ये सोव्हिएट सरकारने त्यांना देशातून बहिष्कृत केले. त्यानंतर त्यांनी प्राग येथील विद्यापीठात प्राध्यापक म्हणून काम केले. १९४६ मध्ये ते अमेरिकेला गेले व पुढील अनेक वर्षे ते न्यूयॉर्क येथील सेन्ट व्हलद्यीम्यिर रशियन ऑर्थडॉक्स सेमिनरीमध्ये प्राध्यापक होते. लॉस्की यांनी विपुल लिखाण केले आहे. त्यांच्या अनेक ग्रंथांची परभाषांत भाषांतरेही झाली आहेत.

लॉस्की ह्यांच्या तत्त्वज्ञानावर लायप्निट्स आणि आरी बेर्गसॉ ह्यांचा विशेष प्रभाव आहे. बेर्गसॉच्या प्रभावामुळे त्यांनी प्रतिमान ह्या संकल्पनेला आपल्या ज्ञानमीमांसेत मध्यवर्ती स्थान दिले. लॉस्की यांच्या मताप्रमाणे ज्ञानाचा विषय असलेली जी वस्तू असते, ती वस्तूच त्या ज्ञानात आपल्याला साक्षात गोचर झालेली असते. तिचे प्रतिनिधित्व करणारी संवेदना, प्रतिमा इ. हा ज्ञानाचा विषय नसतो; ती वस्तूच ज्ञानाचा साक्षात विषय असते. अशा साक्षात ज्ञानाला प्रति मान म्हणतात लॉस्की ह्यांनी प्रतिमानाचे तीन प्रकार कल्पिले आहेत. अवकाश आणि काळ ह्यांच्यात स्थाने असणाऱ्या ज्या वस्तू किंवा घटना असतात, त्यांची प्रतिमाने आपल्याला असतात. ही ऐंद्रिय प्रतिमाने. अशा वस्तू-घटनांना वास्तव सत्ता असते, असे लॉस्की म्हणतात. संख्या, वस्तू आणि तिचे गुण यांच्यामधील संबंध इ. ह्यांना अस्तित्व, म्हणजे सत्ता आहे; पण हे अस्तित्व स्थळकाळातील नसते, अशा अस्तित्वांची आपल्याला जी प्रतिमाने लाभतात, ती बौद्धिक प्रतिमाने असतात. शिवाय लॉस्की ह्यांच्या मताप्रमाणे स्थळकाळातील अस्तित्वापलीकडची अशी केवल सत्ता आहे. ही केवल सत्ता म्हणजे ईश्वर ईश्वराचेही आपल्याला प्रतिमान होऊ शकते. हे गुह्य प्रतिमान होय.

लॉस्की ह्यांची वस्तुमीमांसा लायप्निट्स ह्यांच्या वळणाची आहे. लायप्निट्स ह्यांच्या एकक ह्या संकल्पनेच्या जागी ते द्रव्यात्मक कर्ता ही संकल्पना स्वीकारतात. लायप्निट्स यांच्या म्हणण्याप्रमाणे हे संबंध वस्तुजात जसे अखेरीस एककांचे बनलेले आहे, एकक असलेली द्रव्ये हे जसे त्याचे अंतिम घटक आहेत, त्याप्रमाणे लॉस्की ह्यांच्या मतानुसार द्रव्यात्मक कर्ते हे वस्तुजाताचे अंतिम घटक आहेत. प्रत्येक द्रव्यात्मक, कर्त्याला निवड करण्याचे स्वातंत्र्य असते. एखादा परमाणू हा सर्वात कनिष्ठ प्रकारचा द्रव्यात्मक कर्ता आहे. निवडीचे स्वातंत्र्य असल्यामुळे कनिष्ठ पायरीवरील द्रव्यात्मक कर्ता वरच्या आणि मग त्याच्या वरच्या अशा पायऱ्यांवरील स्वरूप प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न करतो. असा प्रयत्न करण्याचे सामर्थ्य अंगी असल्यामुळे तो कर्ता

असतो. अशा रीतीने कनिष्ठ स्तरावरील द्रव्यात्मक कर्ते उच्चतर प्रकारांत उत्क्रांत होत जातात. जेव्हा एखाद्या द्रव्यात्मक कर्त्याला अंतिम नैतिक मूल्यांची प्रतिमाने प्राप्त होतात आणि त्यांना अनुसरून तो आपली निवड वा निर्णय करतो, तेव्हा तो एक व्यक्ती किंवा पुरुष (पर्सन) ह्या पदाला पोहोचतो.

ईश्वर हा सर्व द्रव्यात्मक कर्त्यांचा निर्माता आहे. ह्या द्रव्यात्मक कर्त्यांचे एकमेकांशी जे कलह-सहकार्याचे संबंध असतात आणि त्यांचा एकमेकांवर जो प्रभाव पडतो, त्यांतून विश्वाचा व्यवहार निष्पन्न होतो. विश्वातील सर्व वस्तु एकाच अवकाशात आणि काळात आहेत म्हणून विश्व एक आहे असे नाही, तर ईश्वराने सर्व वस्तू म्हणजे द्रव्यात्मक कर्ते निर्माण केले आहेत म्हणून विश्व एक आहे. ज्याला आपण अवकाश आणि काल म्हणतो, ती द्रव्यात्मक कर्त्यांमधील संबंधाची रुपे आहेत. माणसांचे अंतिम भवितव्य हे ईश्वराचे म्हणजे केवल सत्तेचे साक्षात दर्शन किंवा शुद्ध प्रतिमान प्राप्त करून घेणे हे आहे. ईश्वराच्या अशा प्रतिमानातून माणसाला निरपेक्ष अथवा केवल नीतीचे तत्त्व लाभते. सर्व निर्णय ह्या तत्त्वाला अनुसरून करण्याने माणूस आपले आदर्श स्वरूप प्रत्यक्षात सिद्ध करतो.[1]

लिनलिथगो, लार्ड व्हिक्टर अलेक्झांडर जॉन होप (२४ सप्टेंबर १८८७ - ५ जानेवारी १९५२). :—दुसऱ्या महायुद्ध काळातील ब्रिटिशांकित हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल व व्हाइसरॉय (१९३६-४३). त्याचा जन्म खानदानी घराण्यात ॲबरकॉर्न (पश्चिम लोथिअन-स्कॉटलंड) येथे झाला. ईटन (केंब्रिज विद्यापीठ) येथे त्याने उच्च शिक्षण घेतले. त्याला १९०८ मध्ये वडिलार्जित उमरावपद प्राप्त झाले. पहिल्या महायुद्धात (१९१४-१८) त्याने पश्चिम आघाडीवरील सैन्य दलात विशेष कामगिरी केली. त्यानंतर त्याची आरमारात मुलकी अधिकारी म्हणून नियुक्ती झाली. इंग्लंडमध्ये मजूरपक्ष सत्तेवर येताच हुजूरपक्षाच्या उपाध्यक्षपदी त्याची निवड झाली (१९२४). शाही कृषी आयोगाचा तो अध्यक्ष म्हणून हिंदुस्थानात आला (१९२६-२८). येथील अनेक प्रश्नांची माहिती त्याने करून घेतली. हिंदुस्थानात घटनात्मक बदल करण्यासाठी नियुक्त केलेल्या निवड समितीचाही तो अध्यक्ष होता. पुढे त्याची व्हाइसरॉय म्हणून हिंदुस्थानात नेमणूक झाली (१९३६).

त्याने प्रारंभी १९३५ च्या कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी प्रयत्न केले. प्रांतीय स्वायत्ततेच्या तत्त्वानुसार काँग्रेसने निवडणुकीत भाग घेतला आणि सात प्रांतांत स्वतंत्र मंत्रिमंडळे बहुमताच्या तत्त्वावर स्थापन केली (१९३७).

[1] : मराठी विश्वकोश : १५, पृ. ४६६.

त्यांच्या प्रशासकीय व्यवस्थेत प्रांतिक गव्हर्नरांनी विशेष अधिकार वापरून ढवळाढवळ करू नये, अशी कॉंग्रेसची अपेक्षा होती; परंतु मुस्लिम लीग आणि एकूण सरकारी धोरण यामुळे मंत्रिमंडळांना हवी ती स्वायत्तता लाभली नाही. त्यातच १९३९ साली दुसरे जागतिक महायुद्ध सुरू झाले. कॉंग्रेस व एतद्देशियांचा सल्ला न घेता हिंदुस्थानने महायुद्धात भाग घेतल्याचे लिन्‌लिथगोने जाहीर केले. वसाहतीचे स्वराज्य व इतर किरकोळ आश्वासने देऊन महायुद्धात भारतीयांनी सक्रिय साह्य करावे, असे लिन्‌लिथगोने सुचविले. सरकारला साह्य नाकारण्यासाठी आणि व्हाइसरॉयच्या घोषणाचा निषेध व्यक्त करण्यासाठी डिसेंबर १९३९ मध्ये कॉंग्रेसच्या मंत्रिमंडळांनी राजीनामे सादर केले.

वसाहतीचे स्वराज्य, राजकीय पक्षांचे प्रतिनिधी व संस्थानिक मिळून युद्ध सल्लागार मंडळ नेमण्याचे आणि युद्ध समाप्तीनंतर हिंदुस्थानची आगामी घटना तयार करण्यासाठी सर्वपक्षीय घटना समिती बोलाविण्यात येईल, असे लिन्‌लिथगोने ऑगस्ट १९४० मध्ये घोषित केले. घोषणेतील आश्वासने सरकारने पाळली नाहीत म्हणून कॉंग्रेसने म. गांधींच्या नेतृत्वाखाली सत्याग्रह सुरू केला. त्यावेळी मुस्लिम लीगने हिंदुस्थानच्या फाळणीचा पुरस्कार केला.

आंतरराष्ट्रीय परिस्थिती १९४१ मध्ये बदलली. जपानने जर्मनीची बाजू घेऊन युद्धात उडी घेतली आणि इंडोनिशियात वर्चस्व स्थापून सिंगापूर, रंगून आदी प्रदेश व्यापले. सागरीमार्गे जपान भारतावर आक्रमण करील, अशी चिन्हे दिसू लागली. लिन्‌लिथगोने युद्ध साहित्य व वीस लाखांची फौज तयार केली. हिंदुस्थानातील राजकीय पक्षांचा पाठिंबा मिळावा म्हणून स्टॅफर्ड क्रिप्सच्या नेतृत्त्वाखाली एक शिष्टमंडळ भारतात आले. युद्धोत्तर काळात भारतीय संघराज्यास वसाहतीचे स्वराज्य देणारी घटना मांडण्यात येऊन लोकप्रतिनिधींची घटना समिती बोलाविण्यात येईल, असे क्रिप्सने जाहीर केले. क्रिप्स योजना अयशस्वी झाल्यानंतर म. गांधींनी ८ ऑगस्ट १९४२ रोजी छोडो भारत आंदोलन सुरू केले. परिणामतः म. गांधींसह मान्यवर नेत्यांना अटक झाली. या वेळी सुभाषचंद्र बोस यांनी नजरकैदेतून पलायन करून जपान मध्ये आझाद हिंद सेनेची उभारणी केली. लिन्‌लिथगोचे देशातील चळवळ दडपण्याचे प्रयत्न निरर्थक ठरले व त्याला इंग्लंडला परत जावे लागले. पुढे स्कॉटलंडमध्ये एडिंबरो विद्यापीठाच्या कुलपतिपदी त्याची नियुक्ती झाली (१९४४-५२). त्या पदावर असतानाच तो ॲवरकॉर्न येथे मरण पावला.

स्वामी विवेकानंद (१८६३–१९०२) :—मूळ नाव नरेन्द्र दत्त. कायस्थ घराण्यात

जन्म. कॉलेजात असतानाच पौर्वात्य व पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाचा अभ्यास. बी. ए. झाल्यावर ब्राह्म समाजात प्रवेश. पुढे रामकृष्ण परमहंसांचे शिष्यत्व. विविध धर्मांचा तौलनिक अभ्यास व आध्यात्मिक चिंतन. १८९३ सालच्या शिकागोच्या जागतिक धर्मपरिषदेत हिंदू धर्माचे प्रतिनिधित्व. आपल्या असाधारण वक्तृत्वाने ही परिषद गाजविल्यावर जागतिक कीर्ती. ४ जुलै १९०२ रोजी समाधिस्थ. धर्मापेक्षा मानव श्रेष्ठ व म्हणून मानवसेवा हाच खरा धर्म ही लोकांना प्रमुख शिकवण. त्यासाठी रामकृष्ण मिशनची स्थापना.

विष्णुबुवा ब्रह्मचारी (१८२५-१८७१) :—ख्रिस्ती मिशनऱ्यांना प्रारंभी तोंड देणारे हिंदू मिशनरी व स्वतंत्र विचाराचे गृहस्थ. यांचे पूर्ण नाव विष्णु भिकाजी गोखले. गाव शिरवली. हे वडिलांचे दहावे अपत्य. वडिल पाचव्या वर्षी वारले. थोडे घरगुती शिक्षण झाल्यानंतर गुरे चारणे, दुकान, जकातनाके वगैरे ठिकाणी नोकरी केल्यावर २० व्या वर्षी उपरती होऊन यांनी सप्तश्रृंगीच्या डोंगरावर तपश्चर्या केली. पाखंड मताचे खंडन करून वैदिक धर्माची पुनःस्थापना करण्याचा आदेश यांना मिळाला (वेदोक्त धर्मप्रकाश पा. ७३८). हा ईश्वरी प्रसाद झाल्यावर पंढरपुरी विठ्ठलाच्या मांडवात यांनी भावार्थरामायणाची तीन पारायणे केली. भावार्थसिंधु हा ओवीबद्ध ग्रंथ प्रसिद्ध केला (१८५६) व महाराष्ट्रभर व्याख्याने देऊन हे मुंबईस आले. तेथे ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या आक्षेपाला उत्तर देण्याकरिता दर शनिवारी प्रभु लोकांच्या विद्यालयात व्याख्याने देण्यास सुरूवात केली व इतर ठिकाणी वादविवाद केले. तेथे एक आणा दर ठेवूनहि पोलिस बंदोबस्त ठेवण्याइतपत गर्दी होई. बंदिस्त जागेत अस्पृश्य व ख्रिस्ती यांना येण्यास हरकत होती, हे पाहून त्यांनी समुद्रकिनाऱ्यावर व्याख्याने देण्यास सुरूवात केली. ५७ च्या बंडात यांना व्याख्याने देण्यास बंदी झाली. तेव्हा यांनी 'वेदोक्तधर्मप्रकाश' हा ग्रंथ प्रसिद्ध केला. हे गौरवर्णीय, धडधाकट व प्रसन्न मुद्रेचे गृहस्थ मोठे लहरी होते.

"महार दरवाज्याबाहेर आणि ब्राह्मण आत असा पक्षपात करू नये." अशा विचाराचे ते होते.

शारदा बिल :—बालविवाहासंबंधीचे होते. ते रायसाहेब हरविलास शारदा (सारडा) यांनी खाजगी सभासद म्हणून मांडले होते. मुलीच्या वयाची मर्यादा १४ वर्षे ठेवली होती. १४ वर्षांपेक्षा लहान मुलीचे लग्न केल्यास आई-वडिलांना

मराठी विश्वकोश : १५, पृ. ५०६-५०७.

१ महिन्याची शिक्षा व १००० रु. दंड सुचविला होता. सनातन्यांचा ह्या बिलाला विरोध होता. वय कमी मान्य करावे असा सनातन्यांचा आग्रह होता.

शिंदे, महर्षी विठ्ठल रामजी (१८७३–१९४४) :—समतोल विचारवंत, सर्व धर्मांचे व्यासंगी अभ्यासक व कर्ते सुधारक. जमखंडी येथे मराठा जातीत जन्म. फरस्ट बी.ए.,एल.एल.बी.ची परीक्षा झाल्यावर प्रार्थना समाजाकडे ओढा. याच समाजातर्फे तौलनिक धर्मशास्त्रांचा अभ्यास करण्याकरिता ऑक्सफोर्ड येथील मँचेस्टर कॉलेजात अध्ययन. अस्पृश्यांच्या उन्नतीच्या चळवळीसाठी १९०६ मध्ये 'डिप्रेस्ड क्लास मिशन' ची (भारतीय निराश्रित सहाय्यकारी मंडळाची) मुंबई येथे स्थापना. महाराष्ट्रातील बहुसंख्य मराठा समाज राजकारणात मागासलेला राहू नये म्हणून १९१७ साली 'राष्ट्रीय मराठा पक्षा' ची स्थापना व लो. टिळकांच्या बरोबर राजकीय क्षेत्रात सहकार्य, पुढे म. गांधींबरोबर राष्ट्रीय आंदोलनात भाग घेऊन १९३० साली ६ महिने सश्रम कारावास. विविध विषयांवर संशोधनपर, चिंतनपर लेखन. 'माझ्या आठवणी व अनुभव' हे आत्मचरित्रात्मक, पुस्तक. 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' हे संशोधनात्मक पुस्तक प्रसिद्ध.

सत्यमूर्ती (१८८७–१९४३) :—दक्षिणेतील एक राजकारणी व समाजकारणी कार्यकर्ते, वक्ते. शिक्षण पदुकोट्टा येथील राजपुत्रांचे कॉलेज व मद्रास येथे. ३० वर्षे काँग्रेसच्या राजकारणात सक्रीय भाग. मद्रास जिल्हा व तामीलनाड प्रांतिक कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष.

समाज-समता-संघ :—सामाजिक समतेच्या चळवळीची प्रगती व्हावी, यासाठी प्रत्यक्ष लोकजागृती व्हावी या हेतूने आपल्या हातून कार्य व्हावे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एक संस्था स्थापन करण्याचे ठरविले. सहकाऱ्यांशी विचारविनिमय करून त्यांनी ४ सप्टेंबर १९२७ रोजी समाज-समता-संघा ची स्थापना केली. या संघाची तत्त्वें व उद्देश खालीलप्रमाणे होती—

(१) सर्व मनुष्यप्राणी समानाधिकारी असून स्वतःतील मनुष्यत्वाच्या विकासासाठी कारणीभूत होणाऱ्या प्रत्येक साधनावर, सवलतीवर व संधीवर त्यांचा प्रत्येकाचा समसमान व सारखा हक्क असतो, असा या संघाचा विश्वास आहे.

(२) समानतेचा हक्क हा पवित्र, अबाधित व अभेद्य आहे.

(३) हा हक्क वर्ण, पंथ, जात व स्त्रीपुरुष भेदातीत आहे.

(४) सामाजिक समता अस्तित्वात आल्याशिवाय समाजाचा सामुदायिक जीवनक्रम सुरळीत चालणे अशक्य आहे.

(५) समाजाच्या सुरळीत व सुसंघटित आयुष्य क्रमाला बाधक होणारे सर्व विचार, आचार (कार्य) व संस्था ही सारी समाज समता तत्त्वाच्याविरुद्ध आहेत, अशी या संघाची निषेधपूर्वक घोषणा आहे.

(६) शक्य त्या उपायांनी वरील तत्त्वांची अंमलबजावणी करण्याचा ह्या संघाचा संकल्प आहे.

सावरकर, डॉ. नारायण दामोदर (१८८९–१९४९) :—स्वातंत्र्यवीर सावरकरांचे कनिष्ठ बंधु, हिंदुसभेचे निष्ठावंत कार्यकर्ते. लॉर्ड मिंटोवरील बॉम्बफेक प्रकरणात व जॅक्सन खून प्रकरणात अटक. १९१२ साली कलकत्त्याच्या मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश. कॉलेज फी भरण्यासाठी कादंबऱ्या लिहिल्या. १९१६ मध्ये एल.सी.पी.एस. व एल.अेम.एस. (होमिओ) या परीक्षा उत्तीर्ण. दंतवैद्यकी सुरू. १९२०-२१ मध्ये होम रूल चळवळीत प्रत्यक्ष सहभाग. स्वामी श्रद्धानंद यांच्या मृत्यूनंतर सुरू केलेल्या ‘श्रद्धानंद’ या पत्राचे सात वर्षे संपादक.

सुर्वे, ॲड. आनंदराव :—भंडारी जातीतील पहिलेच बी.ए., एल.एल.बी. विद्यार्थी दशेपासूनच सार्वजनिक कार्याची आवड. त्यांनी एक नाईट हायस्कूल काढले होते.

○ ○ ○

आधारभूत वाङ्मय सूची

मराठी

कांबळे, ॲड. बी.सी; समग्र आंबेडकर चरित्र, ११/१७४ आदर्श नगर, प्रभादेवी, मुंबई; भाग-३, ६ डिसेंबर १९८५; भाग-१०, १४ एप्रिल १९८७.

कीर, धनंजय· डॉ. बाबासाहेब आंबेडकर; पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, सहावी आवृत्ती : १० आक्टोबर १९८९, पुनर्मुद्रण : १९९९.

खरात, डॉ. शंकरराव; डॉ. आंबेडकर यांची आत्मकथा; इंद्रायणी साहित्य २७३, शनिवार पेट, पुणे-४११ ०३०; १५ मार्च १९८७.

खैरमोडे, चां. भ; डॉ. भीमराव रामजी आंबेडकर-चरित्र खंड; ३ (१९६४), ४ (१९६८), ९ (१९८७).

गगवीर, रत्नमित्रा; अनुवादक : बुद्ध, मार्क्स आणि धम्माचे भवितव्य, सुगत प्रकाशन : डॉ. आंबेडकर मार्ग, आवळे चौक, नागपूर-१७, धम्मचक्र प्रवर्तन दिन १९७८.

गांजरे, मा. फ. संपादक-डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे, अशोक प्रकाशन, बॅनर्जी ले-आऊट, नागपूर ४४० ०२७.

गणवीर, रत्नाकर; संपादक-डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बहिष्कृत भारतातील अग्रलेख; रत्नमित्रा प्रकाशन, वेझनबाग, नागपूर-४, १४ ऑक्टोबर १९८५.

दीनबन्धु, एस. ए. शेगावकर; बुद्धोत्तर धम्म इतिहास; प्रकाशक सौ. कौसल्याबाई शेगावकर, तथागत प्रकाशन, बुद्ध छाया, भीमनगर, अकोला-४४४ ००२, ३२ वा धम्म-दीक्षा स्मृति दिन, २० ऑक्टोबर १९८८, बुद्धाब्द २५३२.

मराठी विश्वकोष, संपादक-तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी, प्रकाशक-महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळ, मुंबई-४०० ००१.

रेगे, शां. शं. भीमपर्व, सुगावा प्रकाशन, ५६२, सदाशीव पेठ, चित्रशाला बिल्डिंग, पुणे ३० (दुसरी आवृत्ती ६ डिसेंबर, २००१)

लोखंडे, डॉ. भाऊ; आचार्य अश्वघोष वज्रसूची; करुणा प्रकाशन, वैशाली विहार, मॉडेल टाऊन, कामठी रोड, नागपूर-४४० ०१४. डॉ. आंबेडकर जन्मशताब्दी वर्ष, ऑक्टोबर १९९१.

श्री. सयाजी गौरव ग्रंथ-संपादक व प्रकाशक वाढदिवस-मंडळ, मुंबई व बडोदे-१९३३.

साळुंखे. डॉ. आ. ह. विद्रोही तुकाराम, सदाशिव बागाईतकर स्मृतिमाला, १७६, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०; ५ डिसेंबर १९९७.

English

Ahir, D.C; How and why Buddhism declined in India; The Maha Bodhi Society of India, Buddha Vihar, Mandir Marg, New Delhi (1978).

Ambedkar, Dr. B.R; Dr. Babasaheb Ambedkar Writings and Speeches, Vol. 9. containing What Congress and Gandhi have done to the Untouchables.

India Votes, Edited and Compiled by - R. Chandidas, Ward Morehouse, Lean Clark and Richard Fantera Published by Popular Prakashan, 35 C, Tardeo Road, Bombay-34, (First published 1968).

Lohia, Dr. Rammanohar; The Caste System, Rammanohar Lohiya Samata Vidyalaya Nyas; 4-5-46, Sultan Bazar, Hyderabad-500 001, Second Edition 1979, May.

Maharashtra State Gazetteer; Author - Dr.(Mrs.) I. Karve, Directorate of Government Printing, Stationery and Publications, Maharashtra State - 1968.

Mukharji, Radha Kumud; Ancient India Education; Macmillan and Co. Ltd, St. Martin's Street, London (1947).

Rattu, Nanak Chand, last few days of Dr. Ambedkar, Amrit Publishing house, New Delhi (1997).

Returned to Righteousness : A Collection of Speeches, Essays and Letters of the Anagarika Dharmapala, Edited by Guruge Ananda, Published by the Anagarika Dharmapala Birth Centenary Committee, Ministry of Education and Cultural Affairs, Ceylon, (17th September 1965).

मराठी नियतकालिके

अरूण - संपादक - ॲड. ना. खं. तिरपुडे, नागपूर.

गरूड - संपादक - दा. म. शिर्के, कोल्हापूर.

चित्रा

जनता - संस्थापक - डॉ. भी. रा. आंबेडकर, गोकुलदास पास्ता रोड, दादर, मुंबई-१४.

नवयुग - संपादक - प्र. के. अत्रे, मुंबई.

प्रबुद्ध भारत - संस्थापक - डॉ. भी. रा. आंबेडकर, गोकुलदास पास्ता रोड, दादर, मुंबई-१४.

बहिष्कृत भारत - संपादक व प्रकाशक - डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, बार-ॲट-ला. रहिम बिल्डिंग, पोयबावडी, परेळ-मुंबई.

विविध वृत्त.

संदर्भ सूची

(डॉ. म. ल. कासारे,)

१. विषय सूची

य

र

ल

बाय-६४१-४३

ह

क्ष

२. वर्ग सूची

(वंश, वर्ण, धर्म, पंथ, जाती, संस्कृती, संप्रदाय इत्यादी विषयक)

भ

म

य

र

३. म्हणी, वाक्प्रचार, तत्सम वाक्य रचना इत्यादी

४. व्यक्तिनाम सूची

५. संस्था, परिषदा आणि चळवळ सूची

६. वृत्तपत्रांची सूची

●●●

७. स्थळ सूची

शुद्धीपत्रक

पृष्ठ क्रमांक (१)	परिच्छेद (२)	ओळ (३)	च्या ऐवजी (४)	असे वाचावे (५)
४	१	१०	काँगेसनें	काँग्रेसनें
१७		२९	जोड मिळाली तेथे	जोड मिळाली नाही तेथे
२५	१	२१	मूलमानांच्या	मुसलमानांच्या
३९	२	१२	स्पृश्यांच्या	अस्पृश्यांच्या
६९	१	२६	अस्पृशंनी	अस्पृश्यांनी
७७	२	१	कलपनातीत	कल्पनातीत
९४	१	२	अस्पृश्येच्या	अस्पृश्यतेच्या
१२७	३	१	वतनदसिचें डांडूक	वतनदारीचें हाडूक
१८३		शीर्षक		क्रांती कशाला म्हणतात ?
२१४	२	७	अस्पृश्य हिंदुनी	स्पृश्य हिंदुंनी
२१६	२	७	पडदें	पडवें
२४१	२	२	बिटनला	ब्रिटनला
२४३	२	१	स्वतंत्र्य	स्वतंत्र्
२८९	३	६	अशी	अशा
३५०	१	१	तत्त्वाज्ञानात	तत्त्वज्ञानात
३५८	१	११	अस्पृश्यात शीख	अस्पृश्य व शीख
३६०	२	२	कुज	कुछ
४४७	२	२७	पंचवंर्षिक	पंचवार्षिक
४५३	२	८	महाभंयकर	महाभयंकर
५११	३	१	माणासापासून	माणसापासून
५११	३	१	(ब्राह्मापासून)	(ब्रह्मापासून)
५२०	१	७	राजीनाम	राजीनामा
५२८	१	२	फॅरिझंमविरोधी	फॅसिझमविरोधी
५२९	१	१२	स्टलिनन	स्टलिनने
५६३	४	३	धर्मगज	धर्मगंज
५९७	३	५	उत्सफूर्तपणे	उत्स्फूर्तपणे
६०४	१	१०	विराध	विरोध
६०५	१	५	कबजा	कब्जा
६१६	३	५	उतीर्ण	उत्तीर्ण

शामुको.--वाय ६४१-५००० पु.*-३.२०१६

खंड-१४ (दोन भागात)
हिंदु कोड बिल (आवृत्ती संपली)
खंड-१५
कायदेमंत्री डॉ. आंबेडकर (आवृत्ती संपली)
खंड-१६
पाली व्याकरण आणि शब्दकोश
(आवृत्ती संपली)
खंड-१७
डॉ. आंबेडकर यांची सामाजिक क्रांती - भाग १ ते ३
रुपये ३७५/-
खंड-१८ (मराठी)
डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे - भाग १ ते ३
रुपये ३००/-
खंड-१९ (मराठी)
डॉ. आंबेडकर यांची पत्रकारिता १९२०-१९२८
रुपये २००/-

इतर प्रकाशित खंड

खंड-१ (इंग्रजी)
आंबेडकरी चळवळीच्या इतिहासाची साधने.
(आवृत्ती संपली)
खंड-२ (मराठी)
डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बहिष्कृत भारत आणि मूकनायक (आवृत्ती संपली)

वरील उपलब्ध ग्रंथांची विक्री शासन मुद्रण लेखन सामग्री आणि प्रकाशन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या खालील बुक डेपोंमधून केली जाते.

१) शासकीय मध्यवर्ती ग्रंथागार, नेताजी सुभाष रोड, चर्नी रोड रेल्वे स्टेशनजवळ, मुंबई-४०० ००४.
२) शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार, जी.पी.ओ. जवळ, पुणे स्टेशन, पुणे-४११ ००१.
३) शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार, सिव्हील लाईन्स, नागपूर-४४० ००१.
४) शासकीय ग्रंथागार, शहागंज, गांधी चौकाजवळ, औरंगाबाद-४३१ ००१.
५) कोल्हापूर बुक डेपो

वाचकांनी सदर ग्रंथ खरेदीसाठी व ग्रंथ पोस्टाने मागवायचे असल्यास डाकखर्च इ. चौकशीसाठी वरील ठिकाणी परस्पर संपर्क साधावा. व्ही.पी.ची पद्धत नाही. ग्रंथांच्या किमतीची आणि डाकखर्चाची रक्कम मनीऑर्डर अथवा डिमांड ड्राफ्टद्वारे वरील पत्त्यावर पाठवून सदर ग्रंथ मागवता येतील.

हिंदुसमाज म्हणजे फ्रान्सच्या बर्बून राजघराण्याप्रमाणे कांही शिकत नाही व कांही विसरत नाही (Learns nothing and forgets nothing) हिंदुसमाज [illegible]का कोडगा असला तरी त्याच्या अंगी आपल्या अस्तित्वाचे तात्पुरते संरक्षण करण्याइतका लवचीकपणा आहे हेंही मात्र कबूल केलें पाहिजे. उपाय शोधून काढण्यांत हिंदुधर्मातल्या शास्त्रीपंडितांचा कोणी हात धरूं शकणार नाहीं. वेळ पडेल त्याप्रमाणें वाटले तशी तडजोड करणें आणि आलेली वेळ कशीबशी मारून नेणें हा हिंदुसमाजाचा जन्मस्वभावच आहे. या लवचीकपणामुळेंच, " महापुरें झाडें जातो ! तेथे लव्हाळे वांचती " या न्यायानें तो आतापर्यंत टिकून राहिला. बाकी, असले जगणें कितपत श्रेयस्कर आहे हा प्रश्न अलाहिदा. हा लवचीकपणा केवळ तात्पुरत्या आत्मसंरक्षणालाच उपयोगी पडूं शकतो. समाजपुरूषाची शरीरप्रकृती निकाप होण्यास आणि त्याचे सामर्थ्य वाढण्यास त्याच्या शरिरांतील सर्व दोष अगोदर निघून गेले पाहिजेत.

हिंदुमहासभेची चळवळ ही कृत्रिम, आकुंचित दृष्टीची, ध्येयशून्य व तत्त्वपराङ्‌मुख आहे. अस्पृश्यांविषयी खरी कळकळ त्या चळवळीच्या पुढाऱ्यांत नाही. अस्पृश्यांनी धर्मांतर करू नये व त्यामुळें हिंदूंचे संख्याबळ कमी होऊ नये एवढ्याच उद्देशानें हिंदुमहासभावाल्यांनी अस्पृश्यतानिवारणाचा प्रश्न हाती घेतलेला आहे. अर्थात् त्यांत जीवत कळकळ नाही. जेव्हां केवळ न्यायाच्या व समतेच्या दृष्टीनेंच विचार करण्यास आणि मानवी हक्कांविषयीं तळमळ बाळगण्यास हिंदुसभावाले शिकतील तेव्हांच त्यांच्या चळवळीत खरा जीवंतपणा येईल. आज हिं. म. सभावाल्यांना चातुर्वर्ण्याची चौकट मोडून टाका म्हणून सांगितले तर ते रूचत नाही व तें त्यांच्या बुद्धीलाही पटत नाही. हिंदुसमाजाची प्रगती खुंटविणारी, त्यांची शकलें पाडणारी, त्याला हतबल करून टाकणारी जातिभेदपद्धति कायम ठेवून खरे हिंदुसंघटण होणे शक्य नाही. अर्थातच जातिभेदजन्य उच्चनीचपणा कायम ठेवून जे संघटण होत आहे ते केवळ संघटणाचे सोंग आहे.

GOVERNMENT PHOTOZINCO PRESS, PUNE